
श्रीमहार्थमञ्जरी



संकलक :- डॉ. केशव रामचंद्र जोशी एम्. ए., पीएच्.डी

।। श्रीगुरु:शरणम् ।।

श्रीमहेश्वरानंदप्रणीत

श्रीमहार्थमंजरी

परिमल व्याख्यार्थासहित



-: संकलक :-

डॉ. केशव रामचंद्र जोशी

एम्. ए; पीएच. डी.

।।श्रीगुरुःशरणम्।।

।। ॐ श्रीमद् अमृतमूर्तये शिववामनाय नमः।।

श्रीमहेश्वरानंदप्रणीत

अर्थात्

महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ विरचित

श्रीमहार्थमंजरी

परिमलव्याख्यार्थासहित

शक्तिपात



✡ संकलक ✡

डॉ. केशव रामचंद्र जोशी

एम्. ए; पीएच्. डी.

✡ प्रकाशक ✡
व्यवस्थापक,
सिद्धयोग प्रकाशन,
3,गौरीशंकर अपार्टमेंट,
सर्व्हे न. १४/२/3, वडगाव बुद्रुक,
आनंदनगर, सिंहगड पथ,
पुणे ४०००५१.


✡ संगणकीय अक्षरजुळणी ✡
"संजीवनी,"
५. न्यू संजोग, राधानगर,
तुळिंज, नालासोपारा पूर्व,
ता. वसई, जि. ठाणे.
पिन कोड ४०१२०९.

✡ मुद्रक ✡
प्रसाद मुद्रणालय,
५०४, मनःशांती,
मेहुणपुरा,शनिवार पेठ,
पुणे. ४११030

✡ प्रकाशनकाल ✡
प्रथमावृत्ती - इ. स. २००3

✡ मूल्य - ३५० रुपये ✡

योगिराज सद्गुरू संतश्रेष्ठ श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज



शक्तिपाताचा महामेरू । बहुत जनांसी आधारू ।
ब्रह्मस्थितीचा निर्धारू । शांभव योगी ।।



शिव गोरक्षः

भगवान् श्रीशिवांचा अनुग्रह

विश्वोत्पत्तिविपत्तिभूः स भगवानत्र प्रवक्ता शिव-

स्तस्याहं प्रतिशब्दपर्वतगुहा यन्मे न गर्वग्रहः।

तद्दोषोस्तु गुणोऽपि वा न खलु तत् स्वायत्तमित्थं स्थिते

मात्सर्यमहतामुदेतु यदि वा वात्सल्यमुज्जृम्भताम्।।

अर्थ :- संसाराचा उद्भव आणि संहार यांचे कारण भगवान् श्रीशिव हेच या "**श्रीमहार्थमंजरी**" ग्रंथाचे प्रवक्ते आहेत अर्थात् त्यांनीच हा ग्रंथ कथन केलेला आहे. मी त्यांच्या शब्दाच्या प्रतिध्वनिरूप पर्वताची गुंफा आहे. या ग्रंथाच्या निर्मितीत त्यांचेच शब्द माझ्या द्वारा प्रतिध्वनित झालेले आहेत. या ग्रंथाचा प्रणेता किंवा ग्रंथकर्ता असल्याचा मला लेशमात्रही गर्व नाही. हा ग्रंथ दोषयुक्त असो, गुणयुक्त असो किंवा हा जसा असेल तसा असो. यामुळे विद्वान् माझा मत्सर करोत किंवा माझ्यावर प्रेम करोत. ते माझ्याविषयी स्नेहवात्सल्य तर बाळगतीलच. हा ग्रंथ भगवान् श्रीशिवांचा अनुग्रह अथवा प्रसाद आहे.

महार्थमंजरी (परिमल)

नाथ निरंजन की आरती

नाथ निरंजन आरती साजै। गुरु के सबदूं झालरि बाजै।। टेक।।

अनहद नाद गगन में गाजै। परम जोति तहां आप बिराजै।।१।।

दीपक जोति अषंडत बाती। परम जोति जगै दिन-राती।।२।।

सकल भवन उजियारा होई। देव निरंजन और न कोई।।३।।

अनत कला जाके पार न पावै। संष मृदंग धुनि बेनि बजावै।।४।।

स्वाति बूंद लै कलस बंदाऊँ। निरति सुरति ले पहुप चढाऊँ।।५।।

निज तत नांव अमूरति मूरति। सब देवां सिरि उदबुदि सूरति।।६।।

आदिनाथ नाती मछेन्द्रनाथ पूता। आरती करै गोरष औधूता।।७।।

विषय सूची

विषय	पृष्ठांक

।। श्रीगुरु:शरणम्।।

।। श्रीमद् अमृतमूर्तये शिववामनाय नमः।।

श्रीमहार्थमंजरी

॥७॥ प्रस्तावना ॥७॥

माझ्या हृदयसिंहासनावर अखंड विराजमान झालेले माझे परमपूजनीय प्रातःस्मरणीय सद्गुरुनाथ श्रीसंत वामन दत्तात्रेय गुळवणीमहाराज हे आसेतु-हिमाचल पसरलेल्या भारतवर्षातील एक अनुपायप्रक्रियासंपन्न, अनुत्तर महासिद्धयोगी, औत्तरआम्नायक्रमदर्शनपारंगत, अद्वयात्मक श्रीशिवशक्ति-सामरस्यानुभूतियुक्त, शक्तिपाताचार्य व महामाहेश्वराचार्यवर्य असे लोकोत्तर, अलौकिक व एकमेवाद्वितीय महान् साधुपुरुष होते. त्यांच्या अपार कृपाबलाने श्रीमत् महामाहेश्वराचार्यवर्य महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ अर्थात् श्रीमहेश्वरानंद विरचित श्रीमहार्थमंजरी हा ग्रंथ मूळ प्राकृत व संस्कृत गाथा, त्यांचा अर्थ, या ग्रंथावर त्यानी स्वत: लिहिलेल्या परिमलव्याख्येचा अर्थ आणि या गाथांचे व परिमलव्याख्येचे विशेष सुबोध मराठी भाषांतर व विवेचक अशा तीन प्रस्तावनांसह सिद्धयोगाच्या सर्व साधक, भक्त व वाचकांना मराठी भाषेत प्रथमच उपलब्ध होत आहे ही परमभाग्याची गोष्ट आहे.

प्रातःस्मरणीय परमपूजनीय महासिद्धयोगी श्रीसंत गुळवणीमहाराज यांनी परमहंस परिव्राजकाचार्य श्रीगंगाधरतीर्थस्वामीमहाराज, परमहंस परिव्राजकाचार्य श्रीनारायणतीर्थस्वामीमहाराज, परमहंस परिव्राजकाचार्य श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ-स्वामीमहाराज आणि परमहंस परिव्राजकाचार्य श्रीलोकनाथतीर्थस्वामीमहाराज यांच्याकडून परंपरेने प्राप्त झालेला सिद्धयोगसाधनगंगेचा पवित्र व निर्मळ प्रवाह प्रवाहित करून आसेतुहिमाचल पसरलेल्या भारतवर्षातील हजारोहजार साधकांना अनुपायप्रक्रियासंपन्न व अनुत्तर अर्थात् सर्वश्रेष्ठ अशी शक्तिपातयोग-दीक्षा देऊन कृतार्थ केले होते. त्यांच्या अनुज्ञेनेच या सिद्धयोगसाधनपरंपरेची अक्षुण्णधारा "**ना आदिगुरु शंकरा। लागोनि शिष्यपरंपरा। बोधाचा हा संसरा। जाला जो आमुतें ।।१८.१७५९।। तो हा तूं घेऊनि आघवा। कळीं गिळितयां जीवां। सर्व प्रकारी घांवा। करीं पां वेगीं।।१७६०।।**" या संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी "**श्रीज्ञानेश्वरी**" या ग्रंथात सांगितलेल्या

न्यायाने शब्दब्रह्मात्मक किंवा तात्त्विक अगर सैद्धान्तिक (Theoretical) आणि साधनात्मक किंवा कृतिशील म्हणजे प्रयत्नाभ्यासात्मक (Practical) अशा उभयविध पद्धतीने माझ्याकडून प्रवाहित होत असून, या सिद्धयोग किंवा शक्तिपातयोगसाधनगंगेत अनेकानेक साधक-भक्त-योगी-मुमुक्षुजन सुस्नात होऊन आपले जीवन धन्य व कृतार्थ करण्यासाठी मार्गस्थ होत आहेत, ही परमानंदाची व चिरस्मरणीय अशी गोष्ट आहे.

सिद्धयोगसाधनपरंपरेतील व इतरही परंपरेने प्रवाहित झालेल्या साधक-भक्तयोगिशिष्यांना शब्दब्रह्मात्मक सिद्धयोगांतर्गत उच्चस्तरीय तत्त्वांचा किंवा सिद्धान्तांचा लाभ व्हावा म्हणून आजपर्यंत श्रीमन् महामाहेश्वराचार्यवर्य महायोगी श्रीअभिनवगुप्ताचार्य संग्रहित **"तंत्रवटधानिका," "बोधपञ्चदशिका"** व **"परमार्थचर्चा,"** श्रीवसुगुप्ताचार्य संग्रहित **"श्रीस्पंदशास्त्र"** किंवा **"श्रीस्पंदकारिका"** अर्थात् **"उच्चस्तरीय सिद्धयोग साधन पद्धती"** श्रीमन् महामाहेश्वराचार्यवर्य महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ विरचित **"अमरौघप्रबोध," "अमरौघशासन," "योगबीज"** व **"अमनस्कयोग अर्थात् स्वयंबोध अमनस्कयोग"** हे सर्व ग्रंथ प्रसिद्ध केले. आता त्यांनीच श्रीमहेश्वरानंद या नावाने लिहिलेला **"श्रीमहार्थमंजरी"** हा ग्रंथ प्रकाशित करीत आहोत. सिद्धयोगमार्गात किंवा शक्तिपातयोगमार्गात श्रीसद्गुरुप्रसादाने किंवा कृपेने म्हणजे परंपराप्राप्त शक्तिपातयोगदीक्षेने दैवीशक्तीचे दर्शनाने, स्पर्शाने, शब्दाने व नुसत्या संकल्पाने संक्रमण होऊन साधकभक्तयोगिशिष्याची अनादिनिद्रिस्थ आत्मचैतन्यशक्ती कुंडलिनी जागृत झाल्यामुळे अंतरंग योगसाधन स्थूल, सूक्ष्म व परपातळीवर मनःप्राणक्रियांच्या द्वारा उपस्थित होऊन, ते सहजतेने आपोआप होऊन व अंतिमतः प्राणशक्ती कुंडलिनी सुषुम्नागामी होऊन सहस्रारात श्रीशिवशक्तीचे अर्थात् जीवशिवांचे मिलन होऊन सामरस्यसिद्धी प्राप्त होते. या अनुप्रायप्रक्रियायुक्त व अपुरुषार्थसंपन्न साधनाचे पर, उच्च व श्रेष्ठ पातळीवर स्वरूप काय आहे अर्थात् अनुत्तर पातळीवर सिद्धयोगसाधनाच्या अंतर्यात्रेचे स्वरूप काय आहे याची सर्व सिद्धयोगसाधनाश्रयी साधकभक्त-योगिशिष्यांना माहिती व्हावी म्हणून त्यांनी या ग्रंथाचा साक्षेपपूर्वक अभ्यास करून त्यातील सारग्रहण करावे.

श्रीसद्गुरुनाथमहाराज हे ज्याप्रमाणे बोधाच्या अर्थात् दीक्षेच्या ऐश्वर्याचा विस्तार आपल्या अमोघ संकल्पाप्रमाणे माझ्याकडून करवून घेत आहेत त्याच-प्रमाणे त्यांच्याच इच्छेने या संप्रदायसिद्धपरंपरेने विभूषित झालेल्या सिद्धयोग-

साधनगंगेचे निखळ शास्त्रीय स्वरूप साधकांना व अभ्यासू वाचकांना उपलब्ध व्हावे म्हणून त्यांनी कितीतरी ग्रंथ माझ्याकडून लिहून घेतले. आत्तापर्यंत प्रसिद्ध केलेल्या सर्व ग्रंथांपेक्षा या ग्रंथाचे स्वरूप सर्वस्वी निराळे असून ते शक्तिपात-योगाच्या किंवा सिद्धयोगाच्या उच्च स्तरावरील अभ्यासाने युक्त असे आहे. जरी हा सर्व अभ्यास किंवा त्याचे स्वरूप हे अत्यंत दुरूह असले तरी श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी **"श्रीअनुभवामृत"** या ग्रंथात **"शिवशक्तिसमावेशें। मियां नमन केलें ऐसें। रंभागर्भ आकाशें। रिगाला जैसा।।१.६४।।"** असे म्हणून श्रीशिव व शक्ती यांच्या समावेशाचा व तद्वारा नमनाचा म्हणजे अंतिम सामरस्यसिद्धीचा जो अनुत्तर, एकमेवाद्वितीय, अलौकिक व अपूर्व सिद्धान्त मांडला आहे, त्याचा उलगडा करून घ्यावयाचा असेल व सिद्ध-योगाचे किंवा शक्तिपातयोगाचे अनुत्तरस्वरूप आकळावयाचे असेल तर महामाहेश्वराचार्यवर्य श्रीअभिनवगुप्त, श्रीसोमानंद, श्रीशंभुनाथ, श्रीजयरथ, श्रीक्षेमेंद्र, श्रीउत्पलदेव, श्रीवसुगुप्त इत्यादि आचार्यांनी काल, त्रिक, स्पंद, प्रत्यभिज्ञा, त्र्यंबक किंवा तत्सम मार्गांसंबंधी लिहिलेल्या ग्रंथांचा अभ्यास करणे नितांत आवश्यक असून या धारणेपोटीच हा ग्रंथ प्रसिद्ध करीत आहे. **"कानडेचि अभ्यासावे निरंतर,"** या श्रीसमर्थरामदासस्वामीमहाराजांनी सांगितलेल्या न्यायाने साधक-भक्त-वाचकांनी या ग्रंथाचा आस्वाद घ्यावा. त्याचप्रमाणे सिद्धयोगात श्रीसद्गुरुकृपेने आत्मशक्ती कुंडलिनी जागृत होऊन योगसाधन सहजतेने आपोआप होत असल्यामुळे त्यात पुरुषार्थसंपन्न अभ्यासाचे कारण पडत नाही; मात्र साधकाला जागृत कुंडलिनी शक्तिरूप श्रीसद्गुरूंना शरणागतसंपन्न होऊन साधन करावे लागते. या दृष्टीने सिद्ध-योगाच्या साधकांनी या ग्रंथाचा अभ्यास करून सार ग्रहण करावे.

सारांश, **"आहाच बोलाची वालीफ फेडिजे। आणि ब्रह्माचियाचि आंगा घडिजे। मन सुखेंसी सुरवाडिजे। सुखाचि माजीं।।श्रीज्ञानेश्वरी ६.२५।।"** याप्रमाणे शब्दाच्या लक्ष्यार्थभूत असलेल्या ब्रह्मस्वरूपाशीच तद्रूप होण्यासाठी आणि मग स्वस्थपणाने सुखामध्येच रंगून जाऊन सुखाची गोडी घेण्यासाठी वरवर असलेली शब्दरूपी टरफले किंवा कवचे दूर करणे आवश्यक आहे असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सिद्धान्तरूपाने स्पष्ट केले आहे. हा सिद्धान्त सिद्ध होण्यासाठी **"ऐसें हळुवारपण जरी येईल। तरीच हें उपेगा जाईल।।श्रीज्ञानेश्वरी ६.२६।।"** या त्यांनी कथन केलेल्या उपायाचाच अवलंब करणे आवश्यक आहे; कारण जर या उपायाचा अवलंब केला नाही

तर "**एऱ्हवीं आघवी गोठी होईल। मुकिया बहिरयाची।।श्रीज्ञानेश्वरी ६.२६।।**" अशी स्थिती झाल्याशिवाय राहणार नाही. हा उपाय म्हणजे शब्दांची टरफले दूर करण्याचा जो हळुवारपणा तो साधनात्मक व तात्त्विक अशा द्विविध पद्धतींनी महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ यांना त्यांचे श्रीसद्गुरू श्रीमत्स्येन्द्रनाथ यांच्याकडून कसा प्राप्त झाला हे आपण वर पाहिलेच आहे. परार्थाने शब्द म्हणजे शक्ती होय. या शक्तीचे कवच, टरफल किंवा आच्छादन म्हणजे तिने धारण केलेला संकुचित जीवपणा होय. तो दूर करण्यासाठी आणि श्रीशिवरूप होण्यासाठी हळुवारपण आले पाहिजे; म्हणजे श्रीसद्गुरुकृपेने शक्तिपातयोगदीक्षा होऊन काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे षड्रिपू, जरा, मरण, काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार व अविद्या हे अष्टबंध, घृणा, लज्जा, भय, शोक, निंदा, कुल, शील व जाती हे अष्टपाश आणि मल, विक्षेप व आवरण यांनी जड झालेले प्राण शुद्ध व सूक्ष्म होऊन सुषुम्नेत गेले पाहिजेत. शब्दरूप शक्तीची टरफले दूर करण्याचा हा पहिला साधनात्मक मार्ग होय. सूक्ष्मार्थाने शब्दाचा अर्थ वेद किंवा सारस्वत अगर शास्त्र होय. त्याचा रहस्यभेद करण्यासाठी "**श्रीअहिर्बुध्न्य संहिता**" या ग्रंथावर आधारित असलेल्या "**रहस्यत्रयसार**" या ग्रंथात श्रीवेदान्तदेशिक यांनी "**परो नाम रहस्यशास्त्रप्रतिपादिताक्षरनिघण्टुप्रक्रियया प्रतीयमानोऽर्थः।**" असे म्हणून परार्थाचे जे लक्षण सांगितले आहे त्या दृष्टीने रहस्य अर्थात् तंत्रशास्त्रात प्रतिपादित केलेल्या अक्षरांच्या अर्थामुळे प्रतीत होणाऱ्या ज्या अर्थाला पर अर्थ असे म्हणतात, त्या परार्थाची प्राप्ती करणे आवश्यक ठरते. या परार्थ-प्राप्तीच्या आवश्यकतेपोटीच महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ यांच्या "**श्रीअमरौघ-प्रबोध**" ग्रंथ प्रसिद्ध केला. शब्दरूप शास्त्राची टरफले दूर करण्याचा अर्थात् बुद्धिरूप प्राणांना हळुवार करण्याचा हा दुसऱ्या प्रकारचा सैद्धान्तिक किंवा तात्त्विक मार्ग होय.

माझे श्रीसद्गुरू महासिद्धयोगी श्रीगुळवणीमहाराज यांनी वर उल्लेखिलेली उपेक्षा व हेळसांड दूर व्हावी म्हणून आपल्या उभ्या आयुष्यभर साधनात्मक किंवा कृतिशील (Practical) आणि तात्त्विक किंवा सैद्धान्तिक (Theoretical) अशा द्विविध पद्धतींचा अवलंब करून शक्तिपातयोगाची किंवा सिद्धमहायोगशास्त्राची पायाभूत उभारणी करून "**कळीं गिळितयां जिवां।। श्रीज्ञानेश्वरी १८.१७६०।।**" या न्यायाने या घोर अशा कलीने त्रस्त झालेल्या व गिळल्या जाणाऱ्या जीवांना दुःखापासून सर्व प्रकारे मुक्त करण्यासाठी जे

अलौकिक, अभूतपूर्व व एकमेवाद्वितीय कार्य केले त्याला उभ्या भारतवर्षात क्वचित्च तोड सापडेल असे म्हटले; तर त्यात यत्किंचितही अतिशयोक्तीच्या, हेत्वाभासाच्या किंवा अर्थवादाच्या म्हणजे स्तुतीच्या दोषाचा स्पर्श झाला असे त्यांच्या उपरोक्त द्विविध कार्यपद्धतीचा मागोवा घेतला म्हणजे कोणासही वाटणार नाही, असा नितांत विश्वास वाटतो.

या विवेचनाच्या प्रकाशात "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाचे साररूप विवेचन जर पुढीलप्रमाणे स्पष्ट केले तर ते सर्व सिद्धयोगसाधकभक्तयोगि-शिष्यांना उपयुक्त होईल असे वाटते. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाच्या मूळ गाथा एकाहत्तर असून त्यातील प्रत्येक गाथा ही एकेका सूत्रासारखी आहे. या सूत्रांवर महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी स्वतःच परिमलव्याख्या लिहून गाथांचा अर्थ स्पष्ट केला आहे. हा ग्रंथ आपण योगिनी देवतेच्या इच्छेप्रमाणे व महायोगिराज श्रीसद्गुरू श्रीमत्स्येंद्रनाथ यांच्या कृपाप्रसादाने लिहीत आहोत असे एक्काहत्तराव्या गाथेवरील परिमलव्याख्येत सविस्तर सांगून त्यांनी या ग्रंथाच्या निर्मितीचा इतिहास कथन केलेला आहे. त्याचप्रमाणे या ग्रंथाचे अलौकिक माहात्म्य स्पष्ट करताना त्यांनी असे म्हटले आहे की, "अनेक जन्मांनी जो शुद्ध, निर्मल व भाग्यवान् झाला आहे त्यालाच योगिनीचा हा उपदेश लाभतो. श्रीब्रह्मा, श्रीविष्णू आणि श्रीशिव हे महातेजस्वी देवही याच ज्ञानाने शुद्ध होऊन स्वतःचे अधिकार जागरूकतेने पाळतात. श्रीवामदेव, श्रीशुकदेव आदि ज्ञानी ज्या अध्यात्म संपत्तीच्या परमसीमेवर पोहोचले त्याला मूलकारण हा विमर्श होय. युद्धामध्ये आपल्या बांधवांच्या हिंसेपासून परावृत्त झालेल्या अर्जुनाला श्रीमुकुंदानी अर्थात् श्रीगोपालकृष्णनाथमहाराजांनी याचाच म्हणजे महार्थरूप सिध्दयोगाचाच उपदेश केला आहे. या "**श्रीमहार्थमंजरी**" ग्रंथाचे क्षणभर जरी आलोकन केले तरी जीवन्मुक्ती सुलभ आहे; मग सतत अभ्यासाने संपूर्ण आध्यात्मिक ऐश्वर्य घरी चालत येते हे सांगायला नको!!"

अशा या महान् ग्रंथात सिद्धयोगसाधनाचे उच्चतम पातळीवरील स्वरूप व तदंगभूत तत्त्वज्ञानाचे सिद्धान्त कसे प्रकट झाले आहेत, हे आता पाहावयाचे आहे.

जगातील सर्व दार्शनिकांनी कोणत्या ना कोणत्या रूपात संसाराच्या मूळ पदार्थाचा विचार केला आहे. भारतीय दर्शनात या पदार्थाचे "तत्त्व" म्हणून सर्व दार्शनिकांनी वर्णन केले आहे. मूळ तत्त्व जाणले अर्थात् त्याच्याशी समरस झाले की, मोक्ष किंवा स्वसंवेद्य आत्मस्वरूपाची प्राप्ती होते व

मूळतत्त्वाच्या विकृत रूपात गुंतल्यामुळे प्राणी बंधनात पडतो. हे बंधन किंवा आवरण दूर होणे हेच तत्त्वज्ञानाचे खरे स्वरूप आहे. तत्त्व म्हणजे पद, ब्रह्म, पुरुष, स्वसंवेद्य आत्मरूप किंवा श्रीशिव होय व ज्ञान म्हणजे शक्ती, कुंडलिनी, सत्ता, प्रकृती किंवा माया होय. ज्ञान झाले की, तत्त्वाची प्राप्ती होते. "**अतोऽत्यन्तप्रसिद्धं ज्ञानं ज्ञाताऽप्यत एव प्रसिद्ध इति। तस्माज्ज्ञाने यत्नो न कर्तव्यः किं त्वनात्मबुद्धिनिवृत्तावेव तस्माज्ज्ञान-निष्ठा सुसम्पाद्या।**" असे श्रीमदाद्यशंकराचार्यांनी "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथाच्या अठराव्या अध्यायातील पन्नासाव्या श्लोकावर भाष्य करताना म्हटले आहे. याचा अर्थ असा आहे की, ज्ञान अत्यंत प्रसिद्ध आहे; कारण ज्ञात्यावाचून केवळ ज्ञानाची सिद्धीच होणे शक्य नाही. (याप्रमाणे ज्ञान सर्वथा सिद्धच असल्यामुळे त्याविषयी भावना, उपाय, मार्ग इत्यादि विधी नाही.) याकरिता ज्ञानाविषयी यत्न करावयाला नको; तर अनात्मबुद्धी निवृत्त करण्यासाठीच साधना करावयाला पाहिजे. त्यामुळे ज्ञाननिष्ठा अनायासाने संपादन करता येण्यासारखी आहे. ही ज्ञाननिष्ठा संपादन करण्याची जी साधने आहेत तीही ज्ञानरूपच आहेत असे "**अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ।।१३.११।।**" या "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथातील श्लोकावर टीका करताना श्रीमदाद्यशंकराचार्यांनी, "तत्त्वज्ञानाचा अर्थ मोक्ष असून सर्व संसाराचा उपशम, त्याचे आलोचन करणे, हे तत्त्वज्ञानार्थदर्शन होय व या तत्त्वज्ञानासाठी सांगितलेले साधनजातही ज्ञानच होय; कारण ते ज्ञानासाठी आहे," असे म्हटले आहे.

अशा या तत्त्वज्ञानाची प्राप्ती झाली की, जीवाला मोक्षप्राप्ती होते; कारण "**तत्त्वज्ञानान्निश्रेयसाधिगमः।**" असे शास्त्रवचन आहे. जीव हा मूळचा ब्रह्मस्वरूप आहे; पण त्याला आपल्या स्वस्वरूपाचे स्वसंकोचामुळे अज्ञान प्राप्त झाल्यामुळे तो जीवभावाला प्राप्त होऊन बद्ध झाला आहे. या अज्ञानाची निवृत्ती स्वस्वरूपाचे अपरोक्षज्ञान झाल्याशिवाय इतर कोणत्याही उपायांनी होत नाही. ज्याप्रमाणे प्रकाशाशिवाय अंधकाराचा विनाश इतर कोणत्याही उपायांनी किंवा साधनांनी होत नाही त्याप्रमाणे तमोरूप अज्ञानाची निवृत्ती तत्त्वज्ञानाशिवाय इतर कोणत्याही साधनांनी होत नाही. अज्ञानाच्या व जन्ममरणचक्रपरंपरेच्या फेऱ्यातून मुक्त होण्याकरिता जीवाला तत्वज्ञान-प्राप्ती अर्थात् स्वसंवेद्य आत्मस्वरूपाशी समरस होणे हा एकच उपाय आहे व हे सर्व जग प्रकाशयुक्त परमात्मस्वरूप अर्थात् "**जग ही असी की वस्तुप्रभा**"

आहे अशी जाणीव होणे, हेच या तत्वज्ञानाचे स्वरूप आहे.

जीव, जगत् आणि ईश्वर यांचे खरे स्वरूप काय आहे? हे कळून येणे याला तत्त्वज्ञान असे म्हणतात. ज्यावेळी **"तरी गुरु दाविलिया वाटा। येऊनि विवेकतीर्थतटा। धुऊनियां मळकटा। बुद्धीचा तेणे।। श्रीज्ञानेश्वरी १८.१०११।।"** याप्रमाणे ज्यावेळी श्रीगुरूंनी शक्तिपात करून दाखविलेल्या सिद्धयोगमार्गाच्या वाटेने जाऊन साधक शुद्ध होतो त्यावेळी त्याला तत्त्वज्ञानरूप सामरस्याची प्राप्ती होते. या प्राप्तीमुळे जीव, जगत् व ईश्वर ही भिन्न नसून एकरस व परिपूर्ण आहेत असा बोध होऊन द्वैत प्रपंचाचा बाध होतो. असे झाले म्हणजे ब्रह्म सत्य आहे, जगत् प्रकाशरूप आहे व जीव आणि परमात्मा म्हणजे श्रीशिव आणि शक्ती ही समरस आहेत असा अनुभव येऊन वेदान्ताचा परम सिद्धान्त सिद्ध होतो. शेवटी एक अद्वितीय, निष्प्रपंच व सच्चिदानंद अशी श्रीशिवशक्तियुक्त व परब्रह्मरूप स्वसंवेद्य आत्मवस्तूच शिल्लक राहते. यालाच अद्वयावस्था किंवा समरसावस्था असे म्हणतात.

उपरोक्त दृष्टीने प्रथमत: **"श्रीमहार्थमंजरी"** या ग्रंथाच्या नावातील "महार्थ" या शब्दाचा अर्थ स्पष्ट करतानां ग्रंथकारांनी "सर्व उत्तमातला उत्तम असा हा महार्थ अर्थात् परार्थ होय," असे **"श्रीमहानयप्रकाश"** या ग्रंथाधारे कसा स्पष्ट केला आहे हे पाहणे योग्य होइल.

या दृष्टीने भैरव (पृ. १७५ व १७७), देव (पृ. १७७) षोडशसहस्रशक्ति: (पृ. १८०), कंथा (पृ. १८९ व १९०) कपाल (पृ. १८९ व १९०), योगिनी (पृ. १८९ व १९०) त्रिशूल (पृ. १९०), वंदन (पृ. १९०) इत्यादि विविध शब्दांचे महार्थ म्हणजे परार्थ लक्षात घेतले म्हणजे सत्तराव्या गाथेत **"श्रीमद्भगवद्गीता"** हा ग्रंथ महार्थाने किंवा परार्थाने कसा परिप्लुत झालेला आहे हे स्पष्ट होते. या दृष्टीनेच महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ यांनी सत्तराव्या गाथेत असे म्हटले आहे की, "श्रीमहाभारताचे युद्ध सुरू होण्याच्या वेळेला मोहाने ग्रासलेल्या पांडुपुत्र अर्जुनाला सोळा हजार अर्थात् अनंत शक्तीनी युक्त भगवान् श्रीलक्ष्मीपती श्रीमाधवांनी याच महार्थतत्त्वाचा अर्थात् परंपराप्राप्त महायोग ज्ञानामृताचा म्हणजे सिद्धयोगसाधनप्राप्त श्रीशिवशक्तिसामरस्य सिद्धीचा उपदेश दिला." हा महार्थ अर्थात् महार्थरूप सिद्धयोगसाधनमार्ग अत्यंत भाग्यवान् सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्यांना मिळतो असेही त्यांनी याच गाथेच्या परिमल व्याख्येत स्पष्ट केले आहे. "हे महार्थ तत्त्व अर्थात् सिद्धयोगसाधनतत्त्व श्रीसद्गुरुकृपेने प्राप्त झालेले असल्यामुळे व ते याच रीतीने

म्हणजे श्रीसद्गुरूंकडून शक्तिपातयोगदीक्षा होऊन अनादिनिद्रिस्थ आत्मचैतन्य-शक्ती कुंडलिनी जागृत झाल्यामुळे प्राप्त होत असल्यामुळे हा अर्थ आटोक्यात न आल्याने सामान्यांच्या किंवा विद्वानांच्या मनात मत्सर किंवा वात्सल्य वाटले तरी मला त्याचे काहीही नाही. (पृ. २००)" असे ग्रंथकारांनी म्हटले आहे.

महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ यांनी वर जो महार्थाचा महिमा प्रकट केला आहे तो सिद्धयोग साधनशास्त्राचा महिमा असून तो अनधिकारी लोकांना सांगू नये असे त्यांनी स्पष्ट म्हटले आहे. (पृ. १२८) याचे खरे कारण म.म. श्रीगोपीनाथ कविराज यांनी **"भारतीय संस्कृति और साधना"** या पुस्तकाच्या पहिल्या खंडातील **"ईश्वरमें विश्वास"** या लेखात लिहिल्या-प्रमाणे हेच असावे की, "साधन जगत् का जो निगूढ रहस्य है, जिसकी प्राप्ति के लिये दीर्घकाल तक सत्यस्वरूप सद्गुरुकी कृपा का अवलंबन कर तीव्र पुरुषार्थ का प्रयोग करना पडता है, तार्किक प्रकृति विशिष्ट तथा साधनहीन पुरुषके सामने उस रहस्य की आलोचना करना उचित नहीं है। वहाँ इस आलोचना का यथार्थ फल उत्पन्न नहीं हो सकता।"

त्याचप्रमाणे योगिराज श्रीश्यामाचरण लाहिडी महाशयांनी **"श्रीमद्भगवद्गीता"** या ग्रंथावर लिहिलेल्या **"आध्यात्मिकदीपिका"** या ग्रंथाच्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत महामहोपाध्याय श्रीगोपीनाथ कविराज यांनी उपरोक्त विषयाच्या दृष्टीनेच असे म्हटले आहे की, "आध्यात्मिक व्याख्येच्या औचित्याच्या संबंधा-मध्ये अनेक लोकांची भिन्न भिन्न मते आहेत. लौकिक व्यवहार क्षेत्रामध्ये अशा प्रकारची व्याख्या अत्यंत अप्रासंगिक होते याविषयी कोणतीही शंका नाही. याचे कारण असे आहे की, सामान्य मनुष्य आपल्या सामान्य दृष्टीने जे काही पाहत असतो ते जाणून घेण्यासाठी त्याला असाधारण उपायांचा आधार घेण्याची आवश्यकता भासत नाही. परंतु सत्यदर्शनाची एक असाधारण अशी दिशा आहे. विशेषज्ञाशिवाय अन्य कोणीही ही दिशा जाणून घेऊ शकत नाही. असाधारण किंवा असामान्य असल्यामुळे हिला अग्राह्य किंवा उपेक्षणीय असे म्हणता येत नाही. आपल्या चिरपरिचित विश्वाला आपण ज्या दृष्टीने पाहत असतो त्या दृष्टीने एक उच्च कोटीचा वैज्ञानिक विश्वदर्शन करीत नाही. या वैज्ञानिकाच्या सूक्ष्मदृष्टीला जगताचे जे चित्र प्रतिभात होते किंवा जगताच्या ज्या चित्राचे ज्ञान होते ते सर्वजनप्रसिद्ध चित्राहून पूर्णपणे भिन्न असूनही अधिकतर सत्य आहे."

याकरिता "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथातील तत्त्वज्ञानाचा म्हणजे जीव, जगत् व ईश्वर यांच्या रूपाने होणारी पिंडब्रह्मांडाची उभारणी व सिद्धयोग साधनाने अर्थात् महार्थाने या सर्वांची संहारणी होऊन श्रीशवशक्ति-सामरस्यावस्थेची प्राप्ती कशी होते हे या ग्रंथाद्वारे पाहिले म्हणजे या ग्रंथाच्या वास्तविक स्वरूपाचे रहस्य लक्षात आल्याशिवाय राहणार नाही व आपण या महार्थाला, परार्थाला, रहस्यार्थाला अर्थात् सिद्धयोगसाधनाला योग्य आहोत अशी खात्री पटेल.

प्रथमतः श्रीमहार्थमंजरीकार महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ यांनी जीवाचे किंवा पिंडाचे अर्थात् साधकभक्तयोगिशिष्याचे जे स्वरूप "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथातील मूळ गाथा व त्यावरील स्वकृत परिमलव्याख्येत व्यक्त केले आहे ते पाहू.

गाथा क्रमांक सहामध्ये अधिकारी अशा मुमुक्षूंचा ऊहापोह केलेला असून गाथा क्रमांक आठमध्ये आत्मवस्तुचिंतनविमुख जीवात्म्याचे वर्णन केले आहे. त्याचप्रमाणे गाथा क्रमांक एकवीसमध्ये प्रमाता म्हणजे जीवादि त्रिपुटीचे अर्थात् सत्त्व, रज व तमाचे अद्वैतात पर्यवसान होत असल्याचे कथन केले आहे. जीवाचे स्वरूप सांगताना ग्रंथकारांनी श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांच्या वचनाचा दाखला देताना असे म्हटले आहे की, "आत्मतत्त्वाला न जाणता इतर विवेचन करण्याची ज्याला इच्छा आहे त्याला तू कोण? असा प्रश्न विचारल्यावर तो काय उत्तर देईल?" अशी वास्तविक स्थिती असल्यामुळे ग्रंथकारांच्या दृष्टीने मुळात जीवत्वच प्रातिभासिक किंवा काल्पनिक असल्यामुळे ते असे म्हणतात की, "वास्तविक पाहता बंधच नाही आणि बंध नसल्यामुळे मोक्षही नाही. बंध मोक्ष हे सर्व काल्पनिक आहेत. त्यामुळे त्यांना काही वास्तविक अस्तित्वच नाही." (पृ. २२)

गाथा क्रमांक आठमध्ये जीवात्म्याचे स्वरूप स्पष्ट करताना ग्रंथकाराने असे म्हटले आहे की, "जीवात्मा आत्मवस्तूच्या चिंतनापासून विमुख होऊन आणि जन्म व मरणभयरूप विश्वप्रपंचामध्ये अनुरक्त होऊन म्हणजेच आत्मविमुख होऊन संसारभयरूप विषवेगाने सद्वस्तूबद्दल भ्रमित किंवा मोहित होत राहतो. त्याला आत्मविवेक राहत नाही. त्याचा हा मोह सद्वस्तू अर्थात् परमात्मतत्त्वासंबंधी संशयाच्या विषवेगाचा परिणाम आहे. (पृ. २४)" या गाथेच्या परिमलव्याख्येत श्रीशिवच म्हणजे त्यांची चिच्छक्तीच संकुचित जीवरूपाने पशू किंवा जीव होऊन कशा प्रकारे विचरण करतात याचे

अत्यंत मर्मग्राही विवेचन केलेले आहे. ते मुळातूनच अभ्यासू साधकभक्त-योगिशिष्यांनी वाचून चिंतन करण्यासारखे आहे.

त्याचप्रमाणे, "ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञानरूपामध्ये विश्वव्यवहार परमात्म्याच्या निश्चयात्मिका व परम स्वतंत्र चिच्छक्तीने प्रभावित अथवा सक्रिय किंवा विमर्शरूप आहे," असे सांगून श्रीशिवांची शक्ती हीच जीवरूपाने संकुचित होऊन जीवरूपाने नटते असे स्पष्ट केले आहे. (पृ. ८१)

महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथात वरील प्रकारे व इतरत्रही जीवाच्या स्वरूपाचे जे वर्णन केले आहे त्याचे साररूपाने वर्णन करताना म.म. श्रीगोपीनाथ कविराज यांनी "**भारतीय संस्कृती और साधना**" **खंड पहिला** या ग्रंथामधील "**जपसाधना**" या लेखात असे म्हटले आहे की, "अशा प्रकारे आत्मा स्वरूपतः पूर्णप्रकाशात्मक, परमेश्वररूप, स्वतंत्र व भोक्ता असूनही स्वेच्छापूर्वक जीवभाव ग्रहण करतो. त्यामुळे त्याचे स्वातंत्र्य व भोक्तृभाव लुप्त होऊन जातात. वास्तविक पाहता आत्म्यामध्ये सर्व शक्तींचा समावेश व समन्वय आहे. त्यामुळे आत्म्याचा पूर्ण अहंभाव स्वभावसिद्ध आहे. "अ"पासून "ह"पर्यंत सर्व वर्ण व कला एकमेकाशी व आत्म्याबरोबर अभिन्नरूपाने व अखंडभावाने स्फुरित होणे ही आत्म्याची पूर्ण अहंता आहे. चैतन्य, विमर्श, स्वातंत्र्य किंवा ऐश्वर्य ही त्याचीच दुसरी नावे आहेत. या सर्व अकारादि वर्णांचे वाच्य अनुत्तरादि विमर्श आत्माच असून तो आपल्या विमर्शाचेही स्वरूप आहे. अखंड स्थितीत हे सर्व एक व अभिन्नरूपाने प्रकाशित होतात; परंतु आत्मा ज्यावेळी स्वेच्छापूर्वक सृष्ट्युत्पत्तीला उद्युक्त होतो त्यावेळी त्याच्या स्वरूपाश्रित असणारे सर्व अकारादि वर्ण उद्भूत होतात. अद्वैत अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्यावस्थेत सर्व कला अभिन्न भावाने आंतर शब्द किंवा स्वभावरूपात राहतात. या सर्व कला तत्स्वरूपात अक्षुण्ण राहिल्यावरही सृष्टीच्या उन्मेषदशेत जणू काही अंशतः विभक्तरूपाने क्रमशः ब्राह्मी-प्रभृती अष्ट-वर्ग शक्तींच्या आणि अ, आ इत्यादि पन्नास रुद्र शक्तींच्या रूपात अवतीर्ण होतात. अकारादि वर्ण आत्म्याशी स्वतःशी विमर्शरूप व एकरूप असूनही अज्ञानावस्थेमध्ये आत्म्यापासून भिन्नरूपात प्रतीत होतात. या स्थितीत त्या कला किंवा अंश या नावाने संबोधिल्या जातात. हीच मातृकाशक्ती होय. श्रीमदाद्यशंकाराचार्य यांनी "**श्रीदक्षिणामूर्तिस्तोत्र**" या स्तोत्रात "महाविभूती म्हणून ज्यांचा उल्लेख केलेला आहे त्यांच्या द्वाराच आत्म्याचे ऐश्वर्य किंवा वैभव लुप्त होते. कला

आत्मस्वरूपापासून उत्पन्न होऊन आत्म्याचा ऐक्यभाव झाकून टाकतात. त्यामुळे श्रीशिवरूपी आत्मा हा जीव किंवा पशुरूपात उत्पन्न होतो. हाच आत्म्याचा स्वरूपसंकोच किंवा अणुभावाची प्राप्ती आहे. मग हा अणुरूपी प्रमाता किंवा जीव पूर्वी वर्णन केलेल्या अष्टवर्गीय ब्राह्मी आदि शक्ती, अकारादि रुद्रशक्ती व त्यापासून उत्पन्न झालेल्या पदवाक्यादिमय असंख्य क्षुद्रशक्तींच्या खेळाची वस्तू बनतो. मातृका अणुजीवाच्या प्रत्येक संवेदनेमध्ये अंतःपरामर्शनाच्या द्वारा स्थूल अगर सूक्ष्म असा शब्दानुवेध करतात आणि वर्ग-वर्गी इत्यादि देवतांच्या अधिष्ठानाच्या द्वारा चित्तामध्ये काम, क्रोध, लोभ, मोह, राग, द्वेषादि भाव किंवा वृत्तिसमूह उत्पन्न करतात. अशा प्रकारे आत्म्याचे असंकुचित स्वातंत्र्यमय चिद्धनरूप झाकून जाते व देहात्मभाव, पारतंत्र्य आणि पाशबंधनाचा सूत्रपात होतो."

या सर्वांचा सारांश असा आहे की, ज्याप्रमाणे उत्कृष्ट माणिक रत्न झाकलेले राहूनही आपल्या प्रभेने किंवा तेजाने प्रस्फुटित म्हणजे प्रकाशित होत राहते त्याचप्रमाणे परमात्मा आपल्या पूर्ण तेजाने भूतमात्रांच्या दृष्टीत अत्यंत प्रकाशित होत राहतो आणि स्वतःतच प्रविष्ट होऊन जातो अर्थात् एकमात्र सर्वव्यापक चैतन्य (जीवरूपाने संकुचित होऊन) स्व-स्वरूपात अंतर्निहित होऊन राहते. (पृ. २९) त्याचप्रमाणे येथे जो महाप्रकाश सांगितला आहे तो त्या त्या जीवरूप प्रकाशामध्ये प्रवेशाधीन होऊन अर्थात् प्रवेश करून प्रकाशमान होतो आणि स्वस्वभावमात्रानेच शिल्लक राहतो. (पृ. १०)

आता "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथात महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ यांनी जगताचे, ब्रह्मांडाचे किंवा विश्वाचे जे स्वरूप कथन केले आहे ते पाहू.

जगताचे स्वरूप स्पष्ट करताना ग्रंथकार असे म्हणतात की, छत्तीस तत्त्वांनी स्वरूपभूत असा विश्वविमर्श हा महाप्रकाशयुक्त ज्योतीमध्ये स्थित असतो. आपल्याला बाह्य व आभ्यंतर ज्ञानप्रकाश अर्थात् महाप्रकाश हा पूर्णपणे व्यापून असतो. शास्त्राने असे म्हटलेलेच आहे की, "**ज्ञानदृते नार्थसत्ता ज्ञानरूपं ततो जगत्।**" अर्थात् "विश्वविलासविमर्शामध्ये परमात्मप्रकाशाची सत्ता म्हणजे शक्ती ही सर्वत्र विद्यमान आहे." त्या त्या रूपाने युक्त होऊन ज्ञान आत आणि बाहेर प्रकाशित होते. ज्ञानाशिवाय कोणत्याही वस्तूला किंवा पदार्थाला अस्तित्व नाही आणि त्यामुळेच हे जगही ज्ञानरूपच आहे. (पृ. १०)

सर्व विश्व हे श्रीशिवमय आहे. (पृ. २५) श्रीशिवात्मा हेच खरोखर

प्रकाश होत. तेच शक्तिसदाशिवादि क्रमानुसार मूर्त व मूर्ततर होत होत येथे प्रस्तुत केलेल्या सांप्रतच्या पंचभूतांपर्यंत घनरूपता धारण करतात. त्याबरोबरच प्रकाशरूपाचे ज्ञातृत्व कमी होत जाते आणि ज्ञेयत्वाची पराकाष्ठा होऊन अत्यंत व्यक्त अशी काठिन्यता अनुभवाला येते. (पृ. ६७) त्याचप्रमाणे छत्तीस तत्त्वांचे रूप धारण करणारे ते श्रीशिव इतरही रूपे घेत व्यवहारा-साठी स्थूल व जडाप्रमाणे भरीव पार्थिव रूपे घेतात. त्या श्रीशिवांची मधुरता व समरसता ही आकाशादि पंचमहाभूते टाकत नाहीत. समरसता म्हणजे सर्वज्ञस्वभावी श्रीपरमशिवांच्या प्रकाशकिरणांचा महान् आनंद होय. हा पंचभूतात कमी-अधिक प्रमाणात असतो. महाभूते या आनंदाला गर्भात वागवितात आणि कार्य करतात. श्रीशिव आणि पंचमहाभूते यात फरक असा आहे की, श्रीशिव स्वच्छप्रकाशरूप आहेत आणि भूते व्यक्त व घन किंवा भरीव स्वरूपाची असतात. त्याला दृष्टान्त असा देतात की, ऊसाचा रस व त्याच्या पाकाने भरीव बनविलेले गुळाचे खडे त्या उसाच्या रसाची मधुरता टाकून देत नाहीत. (पृ. ८८)

सारांश, श्रीपरमेश्वरच विश्वशरीर आहे, असे आगमांमध्ये सांगितलेले आहे. **"श्रीशिवसूत्र"** या ग्रंथात असेच सांगितले आहे की, **"दृश्यं शरीरम्।"** अर्थात् "दिसणारे (ते) श्रीईश्वराचे शरीर होय." विश्वव्यापक श्रीपरमशिव परमात्म्यांचे असीम, अनंत व अपार ऐश्वर्य त्यांच्या स्वेच्छेची म्हणजेच स्वतंत्रतेची अभिव्यक्ती किंवा प्रकटीकरण आहे. परमेश्वराच्या विश्वशरीर-रूप असण्यामध्येच त्याचे परमैश्वर्य प्रत्यक्ष आहे. याप्रमाणेच **"श्रीशिवसूत्र"** या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, **"शक्तिसन्धाने शरीरोत्पत्तिः।"** अर्थात् "शरीराची उत्पत्तीच शक्तीच्या संधानामध्ये संबंधित आहे." त्याचप्रमाणे **"श्रीशिवसूत्र"** या ग्रंथामध्ये **"स्वशक्तिप्रचयोऽस्य विश्वम्।"** अर्थात् "जर विश्वव्यापकतेमध्ये त्याचे ऐश्वर्य अशा प्रकारे उपकल्पित आहे तर विश्वलयामध्ये त्याच्या शक्तीची उपकल्पना स्वाभाविक आहे." (पृ. ७७)

या रीतीने गाथा क्रमांक पंचवीस ते एकोणतीसपर्यंत उपरोक्त जगताच्या स्वरूपाचे सांगोपांग विवेचन ग्रंथकारांनी अत्यंत चिकित्सकपणे केले आहे. सिद्धयोगाचे साधन करणाऱ्या साधकभक्तयोगिशिष्यांना त्याच्या वाचनाने जगताच्या प्रकाशविमर्शयुक्त स्फुरणात्मक व उल्लासात्मक दृष्टी प्राप्त झाल्या-शिवाय राहणार नाही.

"श्रीमहार्थमंजरी" या ग्रंथातील उपरोक्त व अन्यत्र प्रकाशित केलेल्या

जगताच्या स्वरूपाचा जर सारांश सांगावयाचा झाला तर असे म्हणता येईल की, श्रीभगवान् हे सृष्टी, स्थिती, संहार, निग्रह किंवा तिरोधान व अनुग्रह या पाच कृत्यात नेहमीच मग्न असतात. ही त्यांची नित्यकृत्ये आहेत. त्यामुळे ते आपल्याशी अभिन्न असलेल्या शक्तीच्या द्वारा सृष्टीची किंवा विश्वाची निर्मिती करतात. श्रीभगवान् आपल्या स्वातंत्र्यशक्तीने सर्वात् प्रथम आपल्या स्वरूपाला आच्छादित करणाऱ्या महामाया शक्तीला प्रकट करतात. त्यामुळे आकाशवत् स्वच्छ व प्रकाशमान् आत्म्यात संकोचाचा आविर्भाव होतो. त्यावेळी प्रकाश म्हणजे मूळ आत्मस्वरूप व विमर्श म्हणजे सृष्टीचे प्रकटीकरण या दोन्हींचे स्वरूप विद्यमान असते. सृष्टीच्या सर्व व्यापाराच्या मुळाशी प्रकाश व विमर्श या दोहोंचीही सत्ता राहते हे प्रसिद्ध आहे. ज्यावेळी पराशक्ती स्वातंत्र्याच्या उन्मेषाने अंतर्लीन अवस्था सोडून देऊन अभिव्यक्त होते त्यावेळी विश्वरूप-चक्राचे आवर्तन सुरू होते. खरे पाहता सृष्टीची अभिव्यक्ती ही शक्तीची किंवा विमर्शाची होत असते. प्रकाश हा या स्थितीत केवळ उपचारमात्र असतो. या दृष्टीने पाहिले तर हे लक्षात येते की, तत्त्वमात्रच शक्तीच्या स्वातंत्र्योल्लासाची विशेष अशी अवस्था आहे. याकरिता श्रीशिवतत्त्व हृदतत्त्व असल्यामुळे त्याची शक्तिकोटीत गणना होते. याकरिता प्रकाश व विमर्श हे एक प्रकारे परमविमर्शाचे केवळ रूपात्मक भेद आहेत. या स्थितीत शुद्ध परमात्मतत्त्व यांमध्ये अंतर्लीन राहते. याकरिता तत्त्वांचा विचार करताना प्रकाश व विमर्श हे दोन्हीही विमर्शात्मक किंवा शक्त्यात्मक असल्यामुळे त्यांच्यात अंशांची कल्पना केली जाते.

वामकेश्वरतंत्राच्या मताने प्रकाशाचे चार अंश असून त्याच्याशी एकरूप असलेल्या विमर्शाचेही चार अंश आहेत. अंबिका, वामा, ज्येष्ठा व रौद्री या नावाचे प्रकाशाचे चार अंश असून शांता, इच्छा, ज्ञान व क्रिया या नावाचे विमर्शाचे चार अंश आहेत. अंबिका व शांता यांच्या सामरस्यावस्थेमध्ये शांतभावयुक्त पराशक्ती ही परावाक् या नावाने प्रसिद्ध आहे. हीच आत्म-स्फुरणाची अवस्था आहे.

आत्मनः स्फुरणं पश्येद्यदा सा परमा कला।
अम्बिकारूपमापन्ना परावाक् सम्मुदीरिता।।

अर्थ :- ज्यावेळी ही पराशक्ती आपल्या स्फुरणाला पाहते त्यावेळी ती अंबिकारूपाला प्राप्त झालेली "परावाक्" आहे असे म्हटले जाते.

या आत्मस्फुरणाच्या अवस्थेत संपूर्ण विश्व बीजरूपाने अर्थात् अस्फुट

रूपाने आत्मसत्तेत विद्यमान असते. त्यानंतर शांतेपासून इच्छेचा उदय झाल्यावर विश्व अव्यक्त विश्वशक्तीच्या गर्भातून बाहेर येते. त्यावेळी इच्छाशक्ती वामाशक्तीशी एकरूप होते व पश्यंतिवाक् या नावाने ओळखली जाते. यानंतर ज्ञानशक्तीचा आविर्भाव होतो. ज्ञानशक्ती ही ज्येष्ठेबरोबर एकरूप असून मध्यमावाक् या नावाने ओळखली जाते. ही शक्तीच सृष्ट म्हणजे दिसणाऱ्या विश्वाच्या स्थितीचे कारण आहे. ज्ञानानंतर क्रियाशक्ती रौद्रीबरोबर एकरूप होऊन वैखरी या नावाने प्रसिद्धीला येते. प्रपंचात्मक वाग्वैचित्र्य हे वैखरीचेच स्वरूप आहे. **(भारतीय संस्कृती और साधना, खंड पहिला, लेख – "तांत्रिक दृष्टि" पृष्ठ ३८ ते ४०)**

शक्ती अर्थात् प्रकृती हीच विश्वनिर्मितीला कारणीभूत आहे हे कथन करताना श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी **"श्रीज्ञानेश्वरी"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

मा इये प्रकृती तंव। गुणमयी हेंचि नांव।
किंबहुना सावेव। गुण तेचि हे।।१३.९८७।।
हे प्रतिक्षणीं नित्य नवी। रूपा गुणाचीच आघवीं।
जडातेंही माजवी। इयेचा माजु।।९८८।।
हे वाङ्मयाची वाढी। साकारपणाची जोडी।
प्रपंचाची धाडी। अभंग हे।।९८९।।
कळा येथून जालिया। विद्या इयेच्या केलिया।
इच्छा ज्ञान क्रिया। वियाली हे।।९९०।।

अशा प्रकारे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सृष्टीच्या उन्मीलनात्मक किंवा उभारणीचे जे स्वरूपरहस्य प्रकट केले आहे ते वर वर्णन केलेल्या विवेचनाचे सारच आहे. या दृष्टीनेच शास्त्रकारांनी असे म्हटले आहे की -

अकार सर्ववर्णाग्र्यः प्रकाशः परमः शिवः।
हकारोऽन्त्यकलारूपो विमर्शः कथितः प्रिये।।

याचा अर्थ असा आहे की, "अ" म्हणजे श्रीशिव हे प्रकाशात्मक आहेत व "ह" म्हणजे शक्ती ही विमर्शात्मक असल्यामुळे "अ" व "ह" हे दोन वर्ण सर्व वर्णमालेचे द्योतक आहेत. ही सर्व वर्णमाला श्रीभगवंताच्या प्रकाश किरणांचे किंवा शक्तींचे प्रतीक आहे. "ह" हा प्राणवाचक आहे. चिच्छक्ती ही प्राणशक्तीच्या रूपात परिणत होऊन पुन्हा विलोमक्रमाने आपल्या मूळ श्रीशिवस्थानात परत येते. त्यावेळी पुन्हा क्रियेचा आविर्भाव

होऊन "अ" किंवा अनुत्तराबरोबर म्हणजे श्रीशिवांबरोबर समरस होते. याचेच नाव "अहं" असे आहे. हा "अहं" सतत स्पंदमय असतो. यातूनच पुढे "इदं" भावाची उत्पत्ती होते म्हणजे सृष्टीची रचना होते. "इदं" भावच विश्वाचे प्रतीक आहे. या दृष्टीने पाहिले म्हणजे सर्व विश्व हे शब्दापासून उत्पन्न होणारे व शब्दातच राहणारे आहे. **"शब्देष्वेवाश्रिता शक्तिर्विश्वसास्य निबन्धनी," "वागेव विश्वा भुवनानि यज्ञे वाच इत् सर्वाममृतं यच्च मर्त्यम्।"** इत्यादि शास्त्रवचनांवरून हे स्पष्ट होते की, शब्दच म्हणजे शक्तीच जगत्सृष्टीचे मूळ आहे व सृष्टीच्या बाहेर जाण्यासाठी शब्दच अर्थात् शक्तीच एकमात्र उपाय आहे." **(भारतीय संस्कृति और साधना, खंड पहिला, लेख - शक्तिका जागरण पृ. ३१७ व जपसाधना पृ. ३३०)**

यानंतर महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ यांनी **"श्रीमहार्थमंजरी"** या ग्रंथात श्रीशिव, श्रीपरमेश्वर, आत्मा किंवा ईश्वर या मूळ तत्त्वाचे जे स्वरूप प्रकट केले आहे ते पाहू.

या तत्त्वाचे प्रकाशन करताना ग्रंथकार असे म्हणतात की, "आत्म-विचार अर्थात् आत्मतत्त्वाची प्राप्ती हेच मुख्य असे साध्यसर्वस्व तत्त्व आहे," (पृ. ९) आत्मा हाच विश्वाचे मूळ कारण आहे. (पृ. १५) परमात्मा व विश्व हे एकरूप आहेत किंवा विश्व हेच परमात्म्याचे रूप आहे, (पृ. १८, २९, ३५ व ३७) प्रमाणांनी ईश्वराची प्राप्ती होत नाही, (पृ. १७) आत्मस्वरूप स्पष्ट आहे, (पृ. १८) आत्मस्वरूप सुसंवेद्य, अलक्ष्य, निरंजन, परमातत्त्व, परम-उपास्य, ज्ञेय, ध्येय आणि प्राप्तव्य आहे. सृष्टिसंहारादि विभिन्न रूपात दिसणाऱ्या शक्तीच्या हजार-हजार व्यापारांचे ऐक्यच निजहृदय उद्यमरूप सर्वतंत्र स्वतंत्र श्रीपरमशिव या नावाने (संपूर्ण विश्वप्रपंचात) अभिव्यक्त होते, (पृ. ३९) उन्मेष व निमेष हे परमेश्वराचे अतिश्रेष्ठ असे स्पंदत्व आहे, (पृ. ४३) राग, माया, कला, अविद्या व नियती या पाच शक्तींमुळेच परमेश्वरा-मध्ये कर्तेपणाचा बोध होतो; कारण हे सर्व पाश म्हणून प्रसिद्ध आहेत, अन्यथा या शक्तींच्या अभावी परमेश्वर हा आपल्या नितांत परमेश्वरी ऐश्वर्यात राहून पाषाणाप्रमाणे निष्क्रिय असतो, (पृ.५०) परमस्वातंत्र्य ज्ञानस्वरूप श्रीशंभू हेच या विश्वनाटकाचे म्हणजेच विश्वप्रपंचाचे नट किंवा सूत्रधार आहेत, (पृ. ५१) परमेश्वर हा आभासांशाने संहारकर्ता असतो. अभेदाचे अवलोकन करीत असताना म्हणजे अभेदाचा अनुभव घेत असताना तुरीयानुभवितृत्व अर्थात् श्रीपरमेश्वर तुरीयेचा अनुभव करणारा

होतो आणि प्रकाशाच्या एकरूपतेने एकदम पाहण्यात त्या श्रीपरमेश्वराला अनुग्राहकत्व येते. अशा रीतीने जरी सृष्टिकार्यात रस घेतला नाही तरी एकाच वेळी सृष्ट्यादि पंचकृत्ये करण्याचे ऐश्वर्य (किंवा प्रभुत्व, सामर्थ्य अगर नियामकत्व) श्रीपरमेश्वराला आहेच. त्यामुळेच संकुचित स्वभावाचा असूनही श्रीपरमेश्वर तत्त्वदृष्ट्या विकसित झालेला असल्याने त्याला "पुरुष" असे म्हटले जाते. (पृ. ५३) श्रीपरमेश्वर हाच कर्म करणारी, दुःखरूप असलेली, कर्मफलामुळे प्राप्त होणारी व नरकसागरात पिचत पडलेली शरीरे लीलया अर्थात् सहज धारण करतो. (पृ. ५४) ब्रह्मदेवापासून कीडामुंगीपर्यंत नानाविध उपाधी धारण करून आविर्भूत होणारा अर्थात् प्रकट होणारा तोच एक म्हणजे श्रीपरमेश्वर आहे, तोच एकटा प्रकाशित होतो व शोभून दिसतो, (पृ. ५६) श्रीपरमशिवांची स्वतःस्फुरित विमर्श व संरंभमयी अर्थात् ज्ञान व ऊर्जेने युक्त अशी शक्ती शुद्ध विद्यास्वरूपिणी आहे. ही शक्ती चिद्, आनंद, इच्छा, ज्ञान आणि क्रियारूप शक्तिपंचक आहे. श्रीशंभू द्वैताद्वैतविवर्जित अनुत्तरात्मा श्रीपरमेश्वर आहेत. (पृ. ७०) जेथे चंद्र व सूर्य लीन झाले आहेत अशा महाकाशात झोपेतून जागे झालेले आवरणरहित असे ज्ञानवान् श्रीशिवच आहेत. (पृ.१०६) श्रीशिव हे शुद्ध, सूक्ष्म, निर्मल, निष्कल, निरूपाधिक शून्यस्वरूप व निरंश आहेत. (पृ. १२१) "**शक्तयोऽस्य जगत्सर्वम्।**" अर्थात् "हे सर्व जग म्हणजे (श्रीशिवांच्या) शक्ती आहेत." (पृ. १५२) आणि श्रीशिव हेच दाता, श्रीशिव हेच भोक्ता असून हे सर्व जगत्‌ही श्रीशिवमय आहे. त्यामुळे शब्द आणि अर्थ यांच्या विचारामध्ये अशी एकही अवस्था नाही की, जी श्रीशिव नाही. वस्तुतः श्रीशिवमय अशा हृदयामध्ये सर्व प्रकारांनी स्फुट असे श्रीशिवमयच शोभून दिसते. हे सर्व श्रीशिवमयच असल्याने तुम्ही जाऊन जाऊन तरी कोठे जाल? हा सर्व विस्तार परमेश्वरयुक्त प्रकाशरूपच आहे अशी दृष्टी असणाऱ्या साक्षात् परमेश्वरत्व पावलेल्या महापुरुषाला आत्मस्वरूपावाचून दुसरे प्रमाण व स्फुरण कोठे असणार? (पृ. १६०)

अशा रीतीने "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथात शैवशास्त्रानुसार श्रीईश्वराच्या, श्रीपरमेश्वराच्या किंवा आत्म्याच्या मूळ तत्त्वाचे जे स्वरूप महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ यांनी विविध अंगांनी स्पष्ट केले आहे त्याचे साररूप कथन करताना म.म. श्रीगोपीनाथ कविराज यांनी "**भारतीय संस्कृती और साधना**", खंड पहिला, या ग्रंथातील "**ईश्वरमें विश्वास**" या

लेखात असे म्हटले आहे की, "संसाराची सृष्टी अर्थात् निर्मिती, स्थिती आणि संहाराचा कर्ता व अनुग्रह आणि निग्रहाला हेतुभूत किंवा कारण-स्वरूप सच्चिदानंदमय अनंतशक्तिसमन्वित सत्ता विशेष" म्हणजे "ईश्वर" होय. या सत्तेमध्ये ज्या शक्ती अंतर्निहित राहतात त्या शक्तींच्या साम्यावस्थेलाच ईश्वराचा "ब्रह्मभाव" असे म्हणतात. ज्यावेळी वैषम्यकालात कोणतीही शक्ती मुख्य होऊन इतर शक्तींना सामावून घेऊन प्रकाशित होते त्यावेळी केवळ त्या शक्तीची क्रिया दृष्टिगोचर होते. सृष्टीच्या शेवटी कोणतीही शक्ती शिल्लक राहत नाही; मात्र शक्ती व शक्तिमान् हे अभिन्नभावाने एकरस किंवा समरस होऊन प्रकाशित होत राहतात. संसारात जे काही आहे किंवा होईल, ते सर्व ईश्वरापासून उद्भूत झालेले असते, ईश्वरात स्थित असते व शेवटी ईश्वरातच विलीन होते. याकरिता जोपर्यंत जगत् आहे तो पर्यंत ज्याप्रमाणे समुद्र किंवा तलाव हे तरंगांचे आश्रयस्थान असते त्याप्रमाणे जगताच्या आश्रयरूप ईश्वरसत्तेचा साधनाभ्यासपूर्वक साक्षात्कार करून घेणे आवश्यक आहे. केवळ एवढेच नव्हे; तर सांसारिक सत्ता ही मूलतः ईश्वरीय सत्तेशी एकरूप किंवा अभिन्न असल्यामुळे तिचीही प्राप्ती करणे आवश्यक आहे. जगताच्या अस्तित्वाच्या वेळी त्याच्या संरक्षक, नियामक, दर्शक आणि भोक्त्याच्या रूपातही ईश्वराच्या सत्तेचे अनुसंधान करणे योग्य आहे. ज्या कला आणि विद्यारूप शक्ती प्रवाहरूपाने प्रवर्तित होऊन व्यावहारिक जगात कार्य-साधन करीत असतात त्यांची मूळ प्रवृत्ती जेथून सुरू होते, तोच ईश्वर आहे."

त्याचप्रमाणे म. म. श्रीगोपीनाथ कविराज यांनी **"तांत्रिक वाङ्मयमें शाक्तदृष्टि"** या ग्रंथातील **"श्रीभगवान् का स्वरूप और कार्य (द्वैत शैवमत)"** या लेखात असे म्हटले आहे की, "श्रीभगवान् हे आगमशास्त्रानुसार नेहमी पंचकृत्यनिरत राहतात. त्यानुसार ते सृष्टी, स्थिती, संहार, निग्रह किंवा तिरोधान व अनुग्रह या गोष्टी नेहमीच करीत असतात. ही त्यांची नित्यकृत्ये आहेत. परंतु ईश्वराच्या स्वरूपाची एक अशीही अवस्था आहे की, ज्या अवस्थेत ते काही करतात असे म्हणणेही शक्य होत नाही. द्वैतमतानुसार जीव किंवा पशू हा अनादि कालापासून मलाने झाकलेला आहे. जरी जीव हा स्वरूपतः श्रीशिवत्वसंपन्न असला तरीही या मलाच्या आवरणामुळे तो आपले श्रीशिवत्व विसरून, जीवाचे स्वांग धारण करून व कर्तृत्वभाव ग्रहण करून शुभाशुभ कर्मफलभोगाकरिता मायिक जगतातील विभिन्न लोकांमध्ये व देहांमध्ये

संसारी होऊन निरंतर भ्रमण करीत राहतो. श्रीशिवांची किंवा जीवाची स्वतःची आत्मविस्मृती हीच या भ्रमणरूप व्यापाराच्या मुळाशी आहे. खरे पाहता; या आत्मविस्मृतीच्या मुळात मलाचे आवरण किंवा रोधशक्ती आहे. ही परमेश्वराच्या इच्छेनेच बनलेली आहे आणि ज्यावेळी त्याच्या इच्छेने किंवा अनुग्रहाने ही आवरणशक्ती दूर होते त्यावेळी जीव आपले श्रीशिवत्व प्राप्त करतो. हीच त्याची परामुक्ती आहे. जोपर्यंत ही मुक्ती होत नाही तोपर्यंत जीव कोणत्याही अवस्थेत जरी राहिला तरी ती त्याची सर्वश्रेष्ठ अंतिम अवस्था असत नाही. या निग्रहाच्या आणि अनुग्रहाच्या मुळाशी स्वतः श्रीभगवानच असतात आणि या दोन अवस्थांच्या मध्ये सृष्टी, स्थिती व संहाराचे चक्र फिरत राहते.

मात्र अद्वैतदृष्टीने आत्मा सर्व अवस्थांच्या वर असलेल्या साक्षात् श्रीपरमशिवदशेला प्राप्त होऊ शकतो. अशा प्रकारे हे लक्षात येते की, सच्चिदानंद हे परमेश्वराचे स्वरूप असून त्याची शक्तीही सच्चिदानंदरूपा आहे. त्याचप्रमाणे ते नित्य निष्क्रिय राहूनही नेहमीच पंचकृत्यकारी आहेत व अशी पंचकृत्ये करूनही ते नित्य स्वस्पंद स्वरूपात राहत असतात. ज्यावेळी जीव आपल्या श्रीशिवस्वरूपाला प्राप्त होतो त्यावेळी तोही तोच आहे. जीवाला जीवरूपात आपल्यापासून दूर करणे हा जसा त्यांचा स्वभाव आहे त्याप्रमाणेच जीवाला आपल्या निजस्वरूपात लीन करून घेणे हाही त्यांचाच स्वभाव आहे. या स्वभावाचे अवलंबन करूनच त्यांची नित्यलीला निरंतर कालाच्या बाहेर प्रवर्तित होत राहते आणि कालाच्या आतही कर्मसूत्राच्या द्वारा त्यांचा छायाभिनय चालतच राहतो."(पृ. १३२)

येथपर्यंत आपण "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथात महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ यांनी श्रीशिवच आपल्याशी समवायसंबंधाने, अनवच्छेद्यपणे, अविनाभावाने, लयप्रक्रियेने अद्वयरूपाने, समभावाने, संघट्टपणे एकरसरूप, समव्याप्त व समरस असलेल्या प्रकाशयुक्त स्वातंत्र्यशक्तीच्या द्वारा जीव, जगत् व ईश्वररूपाने पिंडब्रह्मांडाची निर्मिती अर्थात् उभारणी कशी करतात हे पाहिले. आता ही शक्तीच बाह्यः श्रीसद्गुरुकृपेने अर्थात् शक्तिपातयोगदीक्षेने जागृत झाल्यावर अंतरतः श्रीसद्गुरुरूपानेच साधनरूप होऊन पिंडब्रह्मांडाची संहारणी करीत असल्यामुळे या शक्तीचे विविधनामयुक्त अंतर्बाह्य स्वरूप तिच्या श्रीसद्गुरू, श्रीशिव, सिद्धयोगसाधनमार्ग, उपासना व सामरस्यरूप अंतिम फलनिष्पत्ती या विविध अंगाचे दर्शन श्रीमहार्थमंजरीकारांनी कसे घडविले

आहे हे पाहू.

श्रीशिवांशी समरस असेलली ही शक्ती माया, प्रकृती, स्वातंत्र्य इत्यादि विविध नावांनी प्रसिद्ध असून तिचे स्वरूप विविधांगांनी स्पष्ट करताना महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ असे म्हणतात की -

इच्छा, ज्ञान व क्रियारूपात्मक विश्वविस्तार हे श्रीशिवांच्या निज म्हणजेच अंतरंग शक्तीचे कार्य आहे, (पृ. ४०) ज्यावेळेला श्रीशिव स्वहृदयस्थ तत्त्वाला बाहेर प्रकाशित करण्यासाठी उद्योग करतात अर्थात् उद्युक्त होतात त्यावेळेला त्यांना शक्ती असे म्हणतात. (पृ. ४१) स्वतंत्र व चिद्रूपाला विश्वरूपाने होण्याची इच्छाच अर्थात् शक्तीच जगताचे कारण व कर्त्री अर्थात् निर्माण करणारी अशी उभयरूपिणी आहे, (पृ. ४१) माझे (श्रीशिव) रूप म्हणजेच संवित् असून ती स्वच्छत्व स्वातंत्र्याने भरगच्च असलेली आहे. वस्तुसंयोगाने ती संवित् उसाच्या रसाप्रमाणे भरीव होते आणि त्यामुळे पदार्थनिरूपणप्रसंगी चैत्य म्हणजे चित्संबंधी पदार्थांना चिद्रूपता येते. (पृ. ६८) ज्ञानस्वरूपिणी परमात्मशक्ती ही शुद्ध विद्या आहे. (पृ. ४४) संवित्‌ची स्वातंत्र्यशक्ती हीच शुद्ध विद्या आहे. (पृ. ४५) मुक्त पुरुषाला बद्ध करण्याला आणि बद्ध पुरुषाला मुक्त करणाऱ्या अर्थात् मुक्त हा बद्ध आहे व बद्ध हा मुक्त आहे अशा तऱ्हेने विमोहित करणाऱ्या शक्तीलाच माया असे म्हणतात. ही मायाशक्ती ईश्वराच्या स्वतंत्रतेची पराकाष्ठा आहे. (पृ. ४६) माया, मायास्वरूप परामर्श अर्थात् मायारूप विचार हीच जीवन्मुक्ती होय असे उपनिषद्प्रमाण आहे. (पृ. ४९) एका पदार्थाचा त्याग करून दुसऱ्या पदार्थात इच्छेने प्रवेश करण्याची चित्ताची जी आंतरात्मिक अर्थात् लंबमान अवस्था आहे त्याला सर्व ज्ञानी लोक शक्तीचे अद्वैत असे म्हणतात. शक्ती हीच पूरणता या गुणामुळे पुरुषतेला (उपाधीला) प्राप्त होणारी आहे. (पृ. ५३) प्रकृती ही सत्त्वगुणस्वभावाची असताना ती ज्ञानशक्ती असते, ती रजोगुणस्वभावाची असताना क्रियाशक्ती असते आणि तमोगुणस्वभावाची असताना ती मायाशक्ती असते. अशा तऱ्हेने विभक्त दशेमध्ये प्रकृती ज्ञानक्रियामायामुक्त असते आणि अविभक्त अर्थात् एकत्रित अवस्थेत ती प्रकृती म्हणजेच शांभवशक्ती होय. (पृ. ५८) कुंडलिनी शक्तीच साररूपाने हृदय आहे असे म्हटले जाते. (पृ. ६५) शक्ती ही श्रीपरमशिव परमेश्वराचीच महाशक्ती आहे. त्या शक्तीमध्ये समस्त संयोजन व वियोजन म्हणजेच उभारणी व संहारणीयुक्त भुवनतत्त्वांचा विलास किंवा विस्तार ओतप्रोत भरेलला असतो. (पृ. ७०) श्रीशिवांची

स्वांतस्फुरित शुद्धविद्यारूपिणी महाशक्ती त्यांच्याशी अभिन्न आणि श्रीशिव-स्वरूपिणी आहे. शक्ती आणि शक्तिमान् यांच्यामध्ये अभेदच असतो, (पृ. ७०) श्रीशंभू हे सर्वश्रेष्ठ व त्यांची शक्ती ही स्वभावाने त्यांच्यासारखीच आहे, (पृ. ७१) श्रीशिवांची शक्ती विमर्शमयी अर्थात् स्वयंस्फुरणरूप आहे, (पृ. ७५) समस्तविश्वव्यवहार अथवा विमर्श हा निःसंदेह एका ज्ञानशक्तीचा म्हणजे चिच्छक्तीचा ज्ञाता आणि ज्ञेय यांच्या रूपातला विस्तार आहे. ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान यांच्या त्रिपुटीच्या अंतरात हीच चिच्छक्ती सर्वथा संबद्ध ज्ञानकला म्हणून विद्यमान असते. पर म्हणजे श्रेष्ठ व अपर म्हणजे कनिष्ठ अशी स्वस्वरूपावाचून सर्वांचा ग्रास करण्यासाठी उद्युक्त झालेली किंवा समर्थ असेलली अशी आनंदमयी परब्रह्मशक्ती म्हणजे पादुका होय. (पृ.१०२) हे चराचरासहित त्रैलोक्यविश्व त्याच एका सृष्टिमय महाशक्तीने व्याप्त झालेले आहे. सृष्टी, स्थिती, संहार व अनाख्य यांनी आक्रांत विश्ववैचित्र्यव्यवहारामध्ये व्याप्त, सर्वोत्कृष्ट, सर्वानुग्रहमयी व पारमेश्वरी चिच्छक्तीच भासाशक्ती आहे. ही सर्वव्यापिका आहे. या शक्तीतच प्रमातृप्रमेयात्मक जगत् प्रतिबिंबरूपा-मध्ये भासते. भासाशक्तिमय श्रीपरमेश्वरच श्रीसद्गुरू आहेत आणि ती शक्तीच श्रीसद्गुरूमय आहे (पृ.१०७) आणि विश्वरूपाने भासणाऱ्या व बहिर्मुख दिसणाऱ्या; पण तुम्हाला म्हणजे श्रीशिवांना सन्मुख असणाऱ्या या शक्तीला विश्वलय करण्याच्या स्वातंत्र्याने भरलेली असे आम्ही समजतो. (पृ.१६४)

महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ यांनी उपरोक्त प्रकारे **"श्रीमहार्थमंजरी"** या ग्रंथात श्रीशिवांशी समरस असलेल्या शक्तीचे जे वर्णन केले आहे त्याचे साररूपाने वर्णन करताना महामहोपाध्याय श्रीगोपीनाथ कविराज यांनी या दृष्टीने **"भारतीय संस्कृति और साधना"** खंड पहिला या ग्रंथातील **"शक्तिसाधना"** या लेखात असे म्हटले आहे की, "आपण ज्या अनंत अशा वैचित्र्ययुक्त विश्वाचा निरंतर नाना प्रकाराने अनुभव घेत असतो ते सर्व विश्व खरे पाहता आत्मप्रकाशाव्यतिरिक्त आणखी काहीही नाही. अत्यंत सुसूक्ष्म असे कारण जगत्, लिंगात्मक सूक्ष्म जगत् आणि इंद्रियगोचर स्थूल जगत् ही सर्व शक्तीच्याच विकासाची भिन्न भिन्न रूपे आहेत. या विश्वाच्या मुळाशी जी पूर्ण सत्ता पारमार्थिक रूपाने राहत असते तेच शक्तीचे परमश्रेष्ठ स्वरूप आहे. या पूर्ण व परमश्रेष्ठ शक्तीच्या स्वरूपाला "विशुद्ध चैतन्य" शक्ती असे नाव देऊन जरी त्याचे वर्णन केले तरी त्याचा योग्य परिचय होऊ शकत नाही आणि "सच्चिदानंद" या शब्दाने जरी त्याचे वर्णन केले तरीही

त्या स्वरूपाचा पूर्ण निर्देश झाला असे वाटत नाही. अशा प्रकारे वाणी आणि मनाच्या पलीकडे असलेली व जिचा निर्देश करता येत नाही अशी जी एक अवर्णनीय परमार्थसत्ता आहे तिलाच शास्त्रामध्ये "परमपद" असे म्हटले आहे. हे परमपद सत् आहे की असत् आहे, हा विषय लौकिक विषयाच्या दृष्टीने विचार करण्यास योग्य असला तरीही ज्यावेळी या विषयाची चर्चा करण्याला व सूक्ष्म विचार करण्याला सुरुवात होईल त्यावेळी परमपदात प्रकाश व विमर्श हे दोन्ही अंश स्वभावसिद्धरूपाने स्थित असतात, हे स्वीकारावे लागेल. प्रकाशाच्या शिवाय ज्याप्रमाणे विमर्श किंवा विचार असणे शक्य नाही त्याप्रमाणे विमर्शाचा किंवा विचाराचा त्याग केला तर प्रकाशाची स्थिती असणे शक्य नाही. या श्रीशिवशक्तिस्वरूप प्रकाश आणि विमर्श यांच्या नित्यसंबंधाचीच चैतन्यरूपाने महापुरुषांना अनुभूती येते. या संबंधाचे व अनुभूतीचेच शास्त्रांमध्ये विस्ताराने वर्णन केलेले आहे. परंतु चैतन्य असले तरीही प्रकाश आणि विमर्शाच्या साम्यावस्थेत ते अव्यक्तच राहते. या अवस्थेचे दुसरे नाव "परमपद" असे आहे, यात काहीच शंका नाही. या साम्यावस्थेत महाशक्तिरूप अनादि शक्ती ही श्रीपरमशिवांच्या बरोबर सामरस्यभावयुक्त होऊन अद्वयस्वरूपात विराजमान राहते. स्वरूपाच्या दृष्टीने या अवस्थेला एक प्रकारे "परब्रह्मभाव" असे दुसरे नाव देता येईल. परंतु या अवस्थेत स्वरूपभूत स्वातंत्र्य नित्य स्थित राहत असल्यामुळे ही अवस्था ब्रह्मतत्त्वाहूनही विलक्षण असते. या महाशक्तिस्वरूप परमपदाची जी गोष्ट येथे कथन केली आहे, ती वाचल्यावर हाच निष्कल अथवा पूर्णकल परमेश्वर आहे असे भ्रमाने कोणीही समजता कामा नये; कारण की, निष्कल, निष्कल-सकल आणि सकल या विश्वाच्याच तीन अवस्था आहेत. परंतु महाशक्ती सर्वातीत असल्यामुळे विश्वातीत परमपदापासून तिच्या स्वातंत्र्यस्वरूप आत्मविलासामुळे नित्य साम्य कोणत्याही प्रकारे भग्न न होता, एक प्रकारे भग्नवत अवस्था उत्पन्न होते आणि या वैषम्याचे फळ म्हणून गुणप्रधान भावात छत्तीस तत्त्वांनी युक्त असलेले विश्व निर्माण होते. अखंड परमार्थस्वरूप श्रीशिवशक्ती एकरूप, अभिन्न व एकरस किंवा समरस असले; तरी स्वातंत्र्यजनित विक्षोभामुळे शक्तीच्या द्वारा किंवा तिच्यातच भेदमय विश्वप्रपंचाचा उदय होतो. यावरून हे स्पष्ट होते की, त्रिविध विभागांनी युक्त असलेले सर्व विश्व मूळ शक्तीचा फक्त विकास आहे, हे निश्चित सत्य आहे."

ज्याप्रमाणे चैतन्यशक्ती कुंडलिनी बहिर्मुख गतीने प्रसारित होऊन

पिंडब्रह्मांडाची रचना करते त्याप्रमाणेच ती श्रीसद्गुरुकृपेने, ईश्वराच्या कृपेने, कालाच्या परिपाकाच्या प्रभावाने, तीव्र संवेगाने किंवा इतर कोणत्याही कारणाने जागृत झाल्यावर पिंडब्रह्मांडाची संहारणी करून आपली मूळ साम्यावस्था प्राप्त करून घेते. या प्रक्रियेचे वर्णन करताना महामहोपाध्याय श्रीगोपीनाथ कविराज "**भारतीय संस्कृति और साधना**" खंड पहिला, या ग्रंथातील "**कुंडलिनी तत्त्व**" या लेखात असे म्हणतात की, "ज्यावेळी प्रसारणशक्ती अर्थात् उभारणीची क्रिया बाधित होते त्यावेळेला संकोच-शक्तीच्या क्रियेचा आरंभ होतो. सर्व ब्रह्मांडात सर्वत्र हीच व्यवस्था आहे. समस्त ब्रह्मांड या संकोचशक्तीच्या प्रभावाने स्वतःमधील वैषम्याचा परित्याग करून साम्यावस्थेला सामोरे जाते. निरनिराळ्या प्रकारे प्रयत्न न करताही प्रत्येक व्यक्ती ही ब्रह्मांडाच्या मुक्तीबरोबर महाप्रलायाच्या वेळी मोक्ष प्राप्त करते. जर जीवाने आपल्या मुक्तीकरिता निराळा प्रयत्न केला तर त्याला ब्रह्मांडाच्या मोक्षकालाची किंवा महाप्रलयाची अपेक्षा किंवा प्रतीक्षा करावी लागत नाही.

जीव स्थूल तत्त्वाच्या आवरणामुळे आवृत झालेला असल्यामुळे सूक्ष्म अशा सुषुम्णा मार्गात प्रविष्ट होऊ शकत नाही. पूर्वसंस्कार किंवा वासना, अभिमान किंवा कर्तृत्वबोध आणि फलाकांक्षा किंवा भोगाभिलाषा अर्थात् ज्याला कामना असे म्हणतात, अशा तीन आवरणांमुळे जीव स्थूलत्वसंपन्न होतो. विषयेंद्रादि रूप हेच जीवावरील स्थूलावरण असून ते त्याला आपल्या मूळ स्वरूपाप्रत परत जाऊ देत नाही. प्रत्येक जीव हा ज्ञान, आनंद व अमरत्वाची इच्छा करीत असतो, इतकेच नव्हे; तर तो ब्राह्मी स्थितीचीही आकांक्षा बाळगून असतो आणि ही विशेष आशा मनात ठेवूनच तो विषय-राज्यात परिभ्रमण करित असतो. वास्तविक विषयादि गोष्टी या अपेक्षित किंवा आवश्यक नसून आनंदप्राप्तीच इष्ट आहे. मात्र या आनंदाच्या सिद्धी-साठी तो गौणसाधनरूपी विषयादिकांची आकांक्षा करीत राहतो. परंतु जीव युग-युगांतरात व कल्प-कल्पांतरात फिरूनही आपल्या आकांक्षांची तृप्ती करू शकत नाही. याचे एकमात्र कारण हे आहे की, तो सर्व ठिकाणी आपल्या वासना व कर्तृवादि अभिमान बरोबर घेऊन फिरत असतो. खरे पाहता शेवटी जोपर्यंत वासनेचा एक क्षणभरसुद्धा उच्छेद होत नाही तोपर्यंत सुषुम्णेच्या मार्गात जीवाला प्रवेश मिळू शकत नाही. कारण स्थूल वस्तू सूक्ष्ममार्गात प्रविष्ट होऊ शकत नाही; भूतशुद्धी, चित्तशुद्धी इत्यादि क्रियांचे

तात्पर्य स्थूलतेच्या विसर्जनाशिवाय दुसरे काहीही नाही. ज्यावेळी पंचभूते शुद्ध होतात त्यावेळी पंचीकरणाची स्थिती राहत नाही. एवढेच नव्हे; तर पंचबिंदूही एका बिंदूच्या रूपात परिणत होतात. त्यानंतर चित्तशुद्धी होते. ज्यावेळी एकबिंदूही निर्मळ होतो त्यावेळी ज्ञानचक्षू किंवा तृतीय नेत्र उघडतो. हीच जीवाची विशुद्धावस्था आहे. यानंतर जीव ईश्वरतत्त्व समोर धारण करीत करीत क्रमाने अग्रेसर होतो. यालाच दुसऱ्या शब्दात उपासना असे म्हणतात. उपासनेच्या वेळी आज्ञाचक्रातील बिंदूत आणि सहस्रारातील महाबिंदूत भेद व अभेद या दोन्ही गोष्टी राहतात. ज्यावेळी क्रमाक्रमाने भेदाभेदाच्या मध्यातील भेदांश गळून जातो त्यावेळी अभेदाची प्रतिष्ठा होऊन ब्रह्मज्ञानाची प्राप्ती होते. यांनतर त्रिगुणातीत परम साम्यावस्थेमध्ये किंवा ब्रह्मत्वामध्ये साधक प्रतिष्ठित होतो. या सर्व विवेचनावरून हे स्पष्टपणे प्रतीत होईल की, कुंडलिनीशक्ती जागृत झाल्याशिवाय जीवाची ऊर्ध्वगती होऊ शकत नाही. ती जागृत झाली की, संकोचशक्ती अथवा ऊर्ध्व बिदूतील आकर्षणशक्तीच्या प्रभावाने क्रमाक्रमाने अंतर्मुखगती वृद्धिंगत होते व शेवटी साम्यावस्था स्थिर होते. (पृ. ३१०-३११)

उपरोक्त वर्णन केलेली श्रीशिवरूप शक्ती हीच श्रीसद्गुरुरूपाने व्यक्त होते हे कथन करताना व या श्रीसद्गुरूंचे चरणरूप, सहजस्फुरणरूप, अनाहत-नादरूप व शक्तिपातयोगदीक्षारूप स्पष्ट करताना महायोगी श्रीसिद्धगोरक्ष-नाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "बुद्धि-स्फुरणाचे अर्थात् बाह्य श्रीसद्गुरुकृपेने अंतरंगात जागृत होणाऱ्या कुंडलिनी शक्तीचे रूप "**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथामध्ये स्पष्टपणे सांगितलेले आहे. ही बुद्धिस्फुरणरूप प्रकाशदेवता विश्वव्यवहाराचे प्रकाशन किंवा दर्शन घडवून सर्वांवर अनुग्रह करीत असल्यामुळे ती श्रीसद्गुरुरूपच जाणावी. ही प्रकाश-देवता नसती तर ही सृष्टी अंधत्व किंवा बधिरत्व पावली असती व काही ज्ञान झाले नसते. श्रीपरमशिवभट्टारक हे त्या आत्मरूप प्रमात्याचे म्हणजे जीवाचे दुसरे नाव आहे अर्थात् संवित् प्रकाश म्हणजे ही शक्ती व श्रीसद्गुरू हे दोन्ही एकच आहेत. "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथामध्ये "**गुरुरुपाय:**" म्हणजे "श्रीसद्गुरू हा उपाय म्हणजे श्रेष्ठ साधन आहे," असे सांगितलेले आहे. श्रीसद्गुरूंच्या चरणांमुळे ज्ञानक्रियाशक्तिरूप स्वातंत्र्य मिळते. याच श्रीसद्गुरु-चरणांमुळे हे स्वातंत्र्य कळते व आचरिले जात असते. हे श्रीसद्गुरुचरण विश्वाला प्रलयामध्ये भक्षण म्हणजे आत्मरूपात समाविष्ट करून घेतात, (पृ.

५) श्रीसद्गुरू हे महाप्रकाशस्वरूप असून ते विश्वविलासामध्ये परनिर्मल ज्योतीच्या स्वरूपात आहेत. तेच महाप्रकाशी श्रीसद्गुरू मायेच्या मलाचे उपलेपरूपाने जे संस्कार आहेत, त्यांचा उच्छेद करणारे निर्मल उद्योत आहेत. (पृ. ९-१०) तत्त्ववृत्तीने पाहता स्वात्म्याशी अभिन्न अशा श्रेष्ठ स्वभावाचा नादशक्तिरूपाचा विमर्श म्हणजे सहजप्रकाशस्फुरण हेच श्रीसद्गुरुनाथ होत, (पृ. ११०) श्रीसद्गुरूंच्या कृपाकटाक्षाने साधक क्षणातच अमृतस्वभावरूप जीवन्मुक्ती, महान् उपभोग आणि परमाह्लादाने युक्त होऊन जातो (पृ.१७०) आणि सौभाग्यशाली साधकांचा श्रीसद्गुरूंच्या केवळ कृपाकटाक्षाने अर्थात् शक्तिपाताने अत्यंत गूढापासून गूढतरापर्यंत, स्पष्टापासून स्पष्टतरापर्यंत व्यक्त व अव्यक्त, क्षर व अक्षर आणि प्रकट व अप्रकट असा द्विविधात्मक व उभयात्मक व्यवहार समाप्त होऊन जातो. ते श्रीशिवस्वरूपात प्रतिष्ठित होतात आणि त्याच जन्मात कृतार्थ होऊन जातात अर्थात् श्रीसद्गुरूंचा कृपाकटाक्ष अर्थात् शक्तिपातयोगदीक्षा होऊन अनादि निद्रिस्थ आत्मचैतन्यशक्ती कुंडलिनी जागृत झाल्याने त्यांच्यासाठी द्विविधात्मक स्थितींची शंकाच राहत नाही. त्यांचा तोच जन्म अंतिम जन्म असतो. ते अमृततत्त्वामध्ये प्रतिष्ठित होतात. (पृ. १७२)

असे हे श्रीसद्गुरूंचे अपरंपार माहात्म्य असल्यामुळे महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ अर्थात् श्रीमहेश्वरानंद यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाच्या सुरुवातीला लिहिलेल्या श्लोकांमध्ये "श्रीसद्गुरुमूर्ती ही परमकृपामयी, शक्तिपातकारिणी व मुक्तप्रदायिनी असून तिचा जयजयकार असो," असे म्हणून जो जयजयकार केला आहे तो सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य वाचकांनी मुळातूनच वाचून त्याचा रसास्वाद घ्यावा.

श्रीसद्गुरूंचा, त्यांच्या कृपेचा म्हणजे शक्तिपातयोगदीक्षेचा असा अपरंपार महिमा असल्याने त्याचे साररूपाने वर्णन करताना "**श्रीज्ञानेश्वरी : सिद्धयोग दर्शन**" या ग्रंथात प्रस्तुत संकलकाने "**श्रीज्ञानेश्वरीतील सिद्धयोगाची शास्त्रीय प्रक्रिया**" या आठव्या प्रकरणातील "**श्रीसद्गुरुकृपेचा महिमा**" या मुद्यात असे म्हटले आहे की -

श्रीसद्गुरुकृपेचा महिमा :-

"श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी "**मज हृदयीं सद्गुरु। जेणें तारिलों हा संसारपूरु ।।१.२२।।**" या पहिल्या अध्यायातील ओवीपासून ते "**श्रीगुरुकृपा काय नोहे। ज्ञानदेवो म्हणे।।१८.१७३५।।**" या अठराव्या अध्यायातील ओवी-

पर्यंत सिद्धयोगसाधनेच्या शास्त्रीय प्रक्रियेला सर्वांत आधारभूत व मूर्धन्य गोष्ट म्हणून श्रीसद्गुरुकृपेचा महिमा कसा गाइला आहे याचा आता विचार करावयाचा आहे. हा विचार करताना श्रीसद्गुरू म्हणजे काय? व कृपा म्हणजे काय? याचा प्रथम विचार करणे अत्यावश्यक आहे; कारण हे पाहिल्याशिवाय श्रीसद्गुरुकृपा म्हणजे खरोखरी काय आहे हे कळणार नाही व त्याशिवाय श्रीसद्गुरुकृपेच्या महिम्याचा महिमाही कळणार नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी **"तया चित्सूर्या श्रीनिवृत्ती। आतां नमों म्हणों पुढतपुढती।।१६.१७।।"** असे म्हणून चिच्छक्तिस्वरूपी कुंडलिनीने युक्त असे श्रीसद्गुरुनाथ निवृत्तिमहाराज सूर्यासारखे असून मी त्यांना नमस्कार करतो हे सांगून श्रीसद्गुरू हे चिच्छक्तिस्वरूप आहेत, हा सिद्धान्त श्रीसद्गुरू म्हणजे काय या प्रश्नाचे उत्तर देताना मांडला आहे. "**भावनोपनिषद्**" या ग्रंथात "**श्रीगुरुः सर्वकारणभूता शक्तिः।।**" असे सांगून "श्रीसद्गुरू हे सर्वकारणभूत शक्ती आहेत," असेच म्हटले आहे. "**श्रीशिवसूत्रवार्तिक**" या ग्रंथातही परमेश्वराच्या अनुग्रहात्मक पराशक्तीला श्रीसद्गुरू असे म्हटले आहे. "**श्रीतंत्रराज**" या ग्रंथातही श्रीसद्गुरूंची व्याख्या करताना असे म्हटले आहे की -

गुरुराद्या भवेच्छक्तिः सा विमर्शमयी मता।
नवत्वं तस्य देहस्य रन्ध्रत्वेन विभासते।।

श्रीसद्गुरू हीच आद्यशक्ती कुंडलिनी होय. ती विमर्शमयी विश्वाची उभारणी करणारी आहे. देहाच्या नऊ रंध्रांनी किंवा द्वारांनी ती भासित होत असते. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथांनी "**श्रीसिद्धसिद्धान्तपद्धती**" या ग्रंथात ज्या कुंडलिनी शक्तीचा "**परम्पराशक्तिराज्ञावती प्रसिद्धा।।४.१०।।**" असे म्हणून उल्लेख केला आहे, ती प्रसिद्ध आज्ञावती कुंडलिनी शक्ती म्हणजेच श्रीसद्गुरुरूपाने प्रकट झालेली व जीवांवर निरंतर दया करणारी अशी साक्षात् शांकरी विद्या आहे असे सांगताना "**श्रीअनुभवामृत**" या ग्रंथात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी असे म्हटले आहे की -

गुरुरित्याख्यया लोके साक्षाद्विद्याहि शाङ्करी।
जयत्याज्ञा नमस्तस्यै दयार्द्रायै निरन्तरम्।।२।।

या सर्व विवेचनाचा अर्थ असा की, श्रीसद्गुरू म्हणजेच शक्ती होय. **"जय जय आचार्या। समस्तसुरवर्या। प्रज्ञाप्रभासूर्या। सुखोदया।।१४.१।। रविचंद्रादि शुक्ती। उदय करिती त्रिजगतीं। तें तुझिया दीप्ती। तेज तेजां।।८।। जें चळवळिजे अनिळें। तें दैविकेनि जी निजबळें। नभ**

तुजमाजीं खेळे। लपीथपी।।९।।" या सर्व ओव्यांचा भावार्थ ध्यानी घेतला म्हणजे श्रीसद्गुरू हीच शक्ती होय हे समीकरण सिद्ध होते.

कृपेला शास्त्रीय परिभाषेत शक्तिपात असे म्हणतात. या शक्तिपातालाच अनुग्रह किंवा दीक्षा असे शास्त्रकारांनी संबोधिले आहे. कृपेचा अर्थ सविस्तरपणे आपण पुढे पाहणारच आहोत; म्हणून येथे त्याचे फक्त दिग्दर्शन मात्र केले. **"लोहाचें कनक होये। हें सामर्थ्य परिसींच आहे। कीं मृतही जीवित लाहे। अमृतसिद्धि।।१.७७।। जरी प्रकटे सिद्धसरस्वती। तरी मुकयाहि आथी भारती। एथ वस्तुसामर्थ्यशक्ति। नवल कायी।।७८।।"** या ओव्यांच्या अर्थांतरात आपण प्रवेश केला म्हणजे आपल्या असे लक्षात येईल की, ज्याप्रमाणे परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते व अमृतामुळे मेलेला माणूसही जिवंत होतो त्याप्रमाणे श्रीसद्गुरूंनी कृपा म्हणजे शक्तिपात केला, अनुग्रह केला किंवा दीक्षा दिली की, साधकाच्या जीवाचे सोने होते. तो श्रीशिवरूप होतो. साधकाला श्रीसद्गुरूंनी स्पर्श केला की, त्यांच्या ठिकाणची शक्ती शिष्यात संक्रमित होऊन शिष्याच्या देहात मूलाधारात निद्रिस्त असलेली कुंडलिनी शक्ती म्हणजे वस्तुसामर्थ्य शक्ती प्रकट होते. ती सर्व विद्यांची जननी किंवा सिद्धसरस्वती असल्यामुळे ती जेव्हा जागृत होते तेव्हा मुकाही महान् लेखक किंवा कवी होतो. अशा प्रकारे शक्ती जागृत होणे म्हणजेच श्रीसद्गुरूंची कृपा होणे होय. श्रीसद्गुरूंना शिष्य अनन्यभावाने शरण जाऊन तो त्यांच्या मनात कृपा कशी उत्पन्न करतो व श्रीसद्गुरूही अशा शिष्याला कृपेने म्हणजेच शक्तिपातदीक्षानुग्रहाने कसे कृतार्थ करतात याचा अगदी स्पष्ट उल्लेख श्रीमुकुंदरायांनी **"श्रीविवेकसिंधु"** या ग्रंथात करताना असे म्हटले आहे की -

तंव शिष्यु तापत्रयीं संतप्तु। शमदमसाधनीं संयुक्तु।
गुरूतें शरणागतु। विनविता जाला।।१.८९।।
जी मी संसारसागरीं बुडालों। तापत्रयें वडवानळीं पोळलों।
क्रोधादि जळचरीं विसंचिलों। जालों अतिशोच्यु।।९०।।
ज्ञानाचिया तारुवीं बैसउनि। कृपेचिये सुवायें पेलौनि।
देवेची तारक होवौनि। उतरावें मातें।।९१।।
संसाराचिये बंदिशाळें। बांधलों अज्ञानसाखळें।
तियें बंधनें तोडावीं स्वामी सकळें। ज्ञानशस्त्रें करौनिया।।९२।।
भवार्क मध्यान्ह तापवेळें। तापलो तापत्रयें दावानळें।

जी कृपाजळधरा ज्ञानजळें। निववावें मातें।।९३।।
ऐसीं कृपा उपजवौनि। विनवी शिष्यशिरोमणी।
मस्तकु श्रीगुरुचरणीं। न्यासिता जाला।।९४।।
तंव बोलिला श्रीगुरुराजा। बारे तूं शिणलासी कवणीये काजा।
कैसें बंधन तोडीजैल वोजा। हें चोज पाही रोकडेंचि।।९५।।
ऐसी प्रतिज्ञा स्वीकारौनि। शिष्यातें सन्मुख बैसवोनि।
ज्ञानसमावेश करौनि। गुरुसंप्रदायक्रमें।।९६।।
तेथें ज्ञानशक्तीचा प्रकाशु। अज्ञानशक्तीचा निरासु।
बोध उठिला स्वयंप्रकाशु। शिष्यचैतन्यीं।।९७।।
ते वेळीं कंपस्वेदादिक। उठिले भाव सात्त्विक।
जैसें साम्राज्य पावे रंक। तैसें वर्त्तते जाले।।९८।।
या नांव शक्तिपातु बोलिजे। जेथें स्वानुभवुचि अनुभविजे।
नि:शेष तेही विसरिजे। स्मरण सांसारिक।।९९।।

याप्रमाणे अनेक आगमनिगमपुराणतंत्रशास्त्रादि ग्रंथांच्या आधारे व संतांच्या ग्रंथाधारे कृपा म्हणजे शक्तिपात, अनुग्रह किंवा दीक्षा होय असे दाखविता येईल. वरील सर्व विवेचनाचा सारांश असा की, श्रीसद्गुरुकृपा म्हणजे शक्तिस्वरूपात असलेल्या श्रीसद्गुरूंनी शिष्यावर शक्तिपात करून केलेला अनुग्रह किंवा दीक्षा होय व तद्द्वारा शिष्याची निद्रिस्त कुंडलिनी शक्ती जागृत करणे होय. अज्ञानशक्तीच्या रूपाने बहिर्मुख असलेली ही शक्ती अंतर्मुखाने जागृत करून तिचे सुषुम्नेत चालन करणे व जीवशिवांचे ऐक्य सहस्रारात घडवून आणणे हाच खरा श्रीसद्गुरुकृपेचा अर्थ आहे. या अर्थानेच श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी श्रीसद्गुरू श्रीगोपालकृष्णनाथमहाराज कृपा-सागर होते हे सांगताना असे म्हटले आहे की -

ऐसेनि तो कृपावंतु। नानापरी असे शिकवितु।।२.२९।।
ऐसें सर्वज्ञाचा बापु। जो श्रीकृष्णु ज्ञानदीपु।
तो म्हणतसे सकृपु। ऐकें राया।।४.२०९।।
तंव अर्जुन म्हणे हे कायी। चकोरेंवीण चांदणेंचि नाहीं।
जगचि निवविजे हा तयाच्या ठायीं। स्वभावो कीं जी।।९.२३३।।
येरें चकोरें तिये आपुलिये चाडे। चांचू करिती चंद्राकडे।
तेवीं आम्ही विनवूं तें थोकडें। देवो कृपासिंधु।।२३४।।
तैसा कृपाळुवांचा रावो। म्हणे आइकें गा महाबाहो।।१०.५४।।

हें बोलोनि तो कृपावंतु। म्हणे विष्णु मी आदित्यांआंतु।।१०.२२१।।
राया जो निर्मळु। निष्कलंक लोककृपाळु।
शरणागतां प्रतिपाळु। शरण्यु जो।।१२.२४०।।
यापरी बाप पुण्यपवित्र। जगीं भक्तिबीजासि सुक्षेत्र।
तो श्रीकृष्णकृपे पात्र। याचिलागीं।।६.१२६।।
हा बोलु आइकतखेवीं। अर्जुना आधि न माये जीवीं।
म्हणे देवें कृपा करावी। सांगावें तें।।१७.३२६।।
तेथ कृपाळुचक्रवर्ती। म्हणे आईक तयाची व्यक्ती।
जेणें सात्त्विक तें मुक्ती-। रत्न देखे।।३२७।।
किंबहुना ऐसा नृपा। पार्थु जालासे कृष्णकृपा।।१८.१६५४।।
कैसा विश्वाचिया कृपा। करूनि महानंद सोपा।
अर्जुनव्याजें रूपा। आणिला देवें।।१८.१६८७।।
पैं आणिकही एक परी। इये प्रतीतीची येतसे थोरी।
जे मागें ऐसेंचि ऋषीश्वरीं। सांगितलें तूंतें।।१०.१५३।।
परि तया सांगितलियाचें साचपण। हें आतां माझें देखतसे अंतःकरण।
जे कृपा केली आपण। म्हणौनि देवा।।१५४।।
तो निर्गुण काय आचरे। कैसेनि गुण निस्तरे।
हें सांगिजो माहेरें। कृपेचेनि।।१४.३२१।।

अर्जुनाच्या बाबतीत त्याचे श्रीसद्गुरू श्रीगोपालकृष्णनाथमहाराज हे जसे कृपाळुचक्रवर्ती म्हणजे शक्तिपात करण्यात अनन्यसाधारण व एकमेवाद्वितीय असे सर्वश्रेष्ठ राजे होते त्याचप्रमाणे आपले श्रीसद्गुरू श्रीनिवृत्तिनाथमहाराजही कृपेच्या म्हणजे शक्तिपाताच्या अलौकिक सामर्थ्याने संपन्न असून "**ज्ञानदेव म्हणे मी चाडें। सद्गुरूनीं केलें कोडें। माथां हात ठेविला तें फुडें। बीजचि वाइलें।।६.४९२।।**" याप्रमाणे त्यांनी प्रत्यक्ष डोक्यावर हात ठेवून आपल्याला स्पर्शदीक्षा दिली व आपली शक्ती जागृत केली हे सांगून श्रीज्ञानेश्वरीत अनेक वेळा त्यांच्या शक्तिपातसामर्थ्याच्या महिम्याचा उल्लेख श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी केला आहे. यासंबंधी ते असे म्हणतात की-

तो हा निजस्वरूप। अनादि निष्कंप।
परी कवणें मानें सकृप। जाहला आहे।।४.१४।।
संजयें व्यासाचिया निरोपा। तो वेळु फेडिला तया नृपा।
तैसा मीही निवृत्तिकृपा। सांगेन तुम्हां।।१६.४७१।।

आधींच तंव तो कृपाळू। वरी गुरुआज्ञेचा बाळू।
जाला जैसा वर्षाकाळू। खवळणें मेघां।।१८.१७६१।।
हे तीन्ही एकवटले। तेथ शब्दब्रह्म कवळलें।
तें मियां श्रीगुरुकृपा नमिलें। आदिबीज।।१.२०।।
तें बुद्धीही आकळितां सांकडें ! म्हणौनि बोलीं विपायें सांपडे।
परी श्रीनिवृत्तिकृपादीप उजियेडें। देखैन मी।।६.३२।।
जें दिठीही न पविजे। तें दिठीविण देखिजे।
जरी अतींद्रिय लाहिजे। ज्ञानबळ।।३३।।
ना तरी जें धातुवादाही न जोडे। तें लोहींचि गंधर्वें सांपडे।
जरी दैवयोगें चढे। परिसु हातां।।३४।।
तैसी गुरुकृपा होये। तरी करितां काय आपु नोहे।
म्हणौनि तें अपार मातें आहे। ज्ञानदेवो म्हणे।।३५।।
तेणें कारणें मी बोलेन। बोलीं अरूपाचें रूप दावीन।
अतींद्रिय परी भोगवीन। इंद्रियांकरवीं।।३६।।

श्रीसद्गुरुकृपेने मी शब्दब्रह्म कवळले आहे, त्या शब्दब्रह्मरूपी आदिबीजाला मी नमस्कार केला आहे, अरूप शब्दब्रह्माचे रूप मी बोलीने म्हणजे शब्दब्रह्मानेच दाखवीन व ही शब्दब्रह्माची अतींद्रिय अवस्था मी इंद्रियांकडून भोगवीन अशी जेव्हा श्रीज्ञानेश्वरमहाराज प्रतिज्ञा करतात तेव्हा हे सर्व आपण श्रीनिवृत्तिनाथमहाराजांच्या कृपेच्या म्हणजे शक्तिपातरूपी दिव्याच्या साहाय्याने पाहून सांगणार आहोत; कारण शब्दब्रह्म किंवा अरूप हे बुद्धीला आकलन करणे कठीण असून तेथे दृष्टी पोहोचत नाही व ते वैखरी वाणीने सांगता येत नाही असे ते म्हणतात. मात्र आत्मशक्ती कुंडलिनी श्रीसद्गुरुकृपेने म्हणजे शक्तिपाताने जागृत झाली की, अतींद्रिय ज्ञानबळ प्राप्त होऊन हे अरूप शब्दब्रह्म दृष्टीशिवाय पाहता येते व इंद्रियांशिवाय भोगता येते. **"परा-परिमलोल्लास"** या ग्रंथामध्ये शब्दब्रह्माची व्याख्या करताना असे म्हटले आहे की -

शब्दब्रह्मेति तं प्राह साक्षाद्देवः सदाशिवः।
अनाहतेषु चक्रेषु स शब्दः परिकीर्त्यते।।

ज्याला शब्दब्रह्म म्हणतात ते साक्षात् श्रीसदाशिवच आहेत. हा शब्द अनाहत चक्रामध्ये आहे. यापूर्वी आपण हे पाहिले आहे की, शब्द म्हणजे शक्ती व ब्रह्म म्हणजे श्रीशिव होत. त्याचा अर्थ शब्दब्रह्माच्या रूपाने

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी श्रीशिवशक्तीला कवळले म्हणजे श्रीसद्गुरुकृपेने त्या तत्त्वाशी ते एकरूप झाले. असे एकरूप होणे हाच खरा नमस्कार होय. यालाच श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराजांनी आत्मनिवेदन भक्ती असे म्हटले आहे. श्रीसद्गुरुकृपेचा म्हणजे जागृत कुंडलिनी शक्तीचा आधार घेऊनच त्यांनी अरूपाचे रूप दाखविले आहे म्हणजे शब्दब्रह्म साकार केले आहे. हे कसे घडते? शास्त्रात असे लिहिले आहे की, "**अनादिनिधनं ब्रह्म शब्दतत्त्वं यदक्षरम्। विवर्ततेऽर्थभावेन प्रक्रिया जगतो यतः।।**" अनादि अनंत शब्द नामक ब्रह्मतत्त्वच अर्थरूपाने विवर्तित म्हणजे भासमान होऊन जगताची रचना करते. "**वागेव विश्वा भुवनानि यज्ञे**" याचा अर्थ हाच आहे. सर्व वर्णमाला किंवा वर्णमातृका या शब्दब्रह्माचेच अंग आहेत. या दृष्टीने म.म. श्रीगोपीनाथ कविराज यांनी "**तांत्रिक वाङ्मयमें शाक्तदृष्टि**" या ग्रंथात "**शाक्तदृष्टिसे श्रीगुरुतत्त्व**" या लेखात असे म्हटले आहे की, "**गुरुतत्त्व" शब्दब्रह्मस्वरूप है। "शब्दब्रह्मणि निष्णातः परं ब्रह्माधिगच्छति," यही शास्त्रीय सिद्धान्त है। अर्थात् परब्रह्मरूप उपेयको यदि पाना हो तो शब्दब्रह्मही उसका एकमात्र उपाय है। शब्दब्रह्मसे उद्भूत चैतन्यशक्तिसंपन्न शब्द या वाक्यही मंत्ररूपमें परिगणित होता है। यह शब्द जिनके मुखसे उच्चारित होकर शुश्रूषु शिष्यके कानमें तथा उनके द्वारा हृदयमें अर्पित होता है, उनके व्यवहारभूमिमें गुरुपद वाच्य और गुरुरूपसे पूजनीय होनेपर भी वास्तवमें यह मंत्रही यथार्थ गुरुरूपमें ग्राह्य है। इस शब्दब्रह्मसे परा, पश्यंति आदिके क्रमके अनुसार वैखरीपर्यंत चार प्रकारकी वाक् उत्पन्न हुई हैं एवं वाक्से पृथिवीसे लेकर सदाशिवपर्यंत सब तत्त्व उत्पन्न हुए हैं। इसीलिए गुरु व्यक्त और अव्यक्तरूपसे समग्र विश्वमें व्याप्त हैं एवं वे विश्वके बाहर शब्दब्रह्मके रूपसे एवं शब्दब्रह्मका अतिक्रमण कर परब्रह्म सच्चिदानंदरूपसे नित्य विराजमान हैं। पूर्ण ब्रह्माका परम स्वरूप अव्यक्त है और वह बद्ध जीवके लिए अवाङ्मनसगोचर है। इसीलिए वे जीवको स्वरूप धरा देनेके लिए गुरुरूपसे नीचे उतर आते हैं एवं जीवको धरकर क्रमशः फिर उसी अव्यक्त परम धाममें पहुँचा देते हैं। यही उनकी महाकृपाका विलास है। वह परम धाम सकल तत्त्वोंके अतीत, चित्तके संचारक्षेत्रके ऊपर एवं शिवशक्तिकी सामरस्यमय अद्वय भूमि है। इनका बाहरी अंश अतिसूक्ष्म ध्यानके गोचर और अखंड सच्चिदानंदस्वरूप होनेपर भी अंतरतम अंश**

वैसे ध्यानके भी अगोचर तथा सब प्रकारके विकल्पोंके अतीत होनेके कारण नेति "नेति रूपसेही निर्देशके योग्य है।"

या सर्व विवेचनाच्या पार्श्वभूमीवर "**आंगें सांनें परिणामें थोरु। जैसें गुरुमुखींचें अक्षरु।।१७.१२९।।**" हा दृष्टान्त वाचला म्हणजे त्यातील रहस्य उलगडू लागते. श्रीसद्गुरुकृपा हीच आत्मविश्रांती देणारी, विषयत्याग घडविणारी, तत्त्वदर्शन करविणारी व सहजावस्था देणारी असल्यामुळे तिचे वर्णन करताना श्रीज्ञानेश्वरमहाराज असे म्हणतात की -

ते वेळीं आत्मानंदें आघवें। जें सदा वसतें बरवें।
तें तैसेंचि पाटण पावे। गुरुकृपेचें।।१६.४४२।।
तेथ प्रियाची परमसीमा। तो भेटे माउली आत्मा।
तयें खेंवीं आटे डिंडिमा। सांसारिक हे।।४४३।।
ऐसा जो कामक्रोधलोभां। झाडी करूनि ठाके उभा।
तोचि येवढिया लाभा। गोसावी होय।।४४४।।
नातरी श्रीगुरुवचना। दिठी देतु जतना।
शिष्य आत्मभुवना-। माजीं पैसे।।४५७।।

हा श्रीसद्गुरुकृपेचा महिमा खरोखर अपरंपार आहे. एकदा श्रीसद्गुरुकृपा झाली व श्रीसद्गुरुवचनाप्रमाणे साधनाभ्यास घडला की, शिष्याला चिच्छक्ती कुंडलिनीच्या परमप्रेमाची सीमा असलेला श्रीशिवरूप आत्मा भेटून सर्व संसाराचा डिंडिमाच नाहीसा होतो. हीच खरी आत्मविश्रांती आहे. ती श्रीसद्गुरु-कृपेनेच मिळते हे सांगताना श्रीस्वात्मारामयोगींद्र "**श्रीहठयोगप्रदीपिका**" या ग्रंथात असे म्हणतात की -

दुर्लभो विषयत्यागो दुर्लभं तत्त्वदर्शनम्।
दुर्लभा सहजावस्था सद्गुरोः करुणां विना।।४.९।।

श्रीसद्गुरूंच्या कृपेशिवाय विषयत्याग, तत्त्वदर्शन व सहजावस्था या गोष्टी अत्यंत दुर्लभ आहेत. अशा प्रकारे कृपा करणारे श्रीसद्गुरू साक्षात् श्रीशिव असल्यामुळे त्यांना नमस्कार करताना ते असे म्हणतात की -

नमः शिवाय गुरवे नादबिन्दुकलात्मने।
निरञ्जनपदं याति नित्यं यत्र परायणः।।४.१।।

नाद, बिंदू व कला या गोष्टींनी युक्त होऊन आत्मरूपाने शोभणाऱ्या श्रीशिवरूप श्रीसद्गुरूंना नमस्कार असो. जो प्रतिदिन व अखंड श्रीसद्गुरु-तत्त्वाशी किंवा श्रीसद्गुरूंनी दिलेल्या साधनात तत्पर राहतो तो साधक

शुद्धरूप ब्रह्मपदाला पोहोचतो. आचार्य बलभद्रांनी यासंबंधी "**श्रीसिद्ध-सिद्धान्तसंग्रह**" या ग्रंथाच्या पाचव्या उपदेशात असे म्हटले आहे आहे की, "परंपरेने प्राप्त झालेल्या सन्मार्गाचे ज्ञान करून देण्याची योग्यता जेथे असेल तेच श्रीसद्गुरू पदवीला योग्य होत; कारण तेच या जडजीवाला विश्रांती प्राप्त करून देऊ शकतात. अशा श्रीसद्गुरुमाउलींनी दाखविलेल्या मार्गानेच स्वसंवेद्य आत्मस्वरूपाचे ज्ञान किंवा दर्शन होते म्हणून या श्रीसद्गुरुमाउलींचे देवभावाने नेहमी चिंतन करावे. परमात्मरूपी श्रीसद्गुरूंची कृपादृष्टी ही सर्व कल्याणांची खाण आहे. योगिलोक सर्व सिद्धींचा परिपूर्ण-पणे त्याग करून एकमात्र स्वात्मवेद्य निरुत्थान दशेचीच प्राप्ती करतात व स्वपिंडाला म्हणजे कुंडलिनी शक्तीला श्रीशिवांशी समरस करण्याची क्षमता प्राप्त करतात. एखादाच साधक या सिद्धान्ताला आत्मसात करून निरुत्थानरूपी ऐश्वर्यलाभासाठी किंवा निरुत्थानस्थितीच्या ज्ञानासाठी प्रयत्न करतो. यामुळे स्वतःच्या अंतःकरणाची निर्मनस्कस्थिती किंवा निश्चलता पूर्वकर्मानुसंधानाने व ज्ञानावेशाने त्याला साधते. नेहमी ज्ञानाचा चित्तप्रवेश साधू लागला म्हणजे प्राण हळूहळू सुषुम्नेत जाऊ लागले की, अतिशय दृढ किंवा गाढ असे चित्ताचे उत्थान साधते. त्यामुळे निरतिशय आनंदावस्थेचा लाभ होतो म्हणजे त्या आनंदाचे नेहमी स्फुरण होत राहते. त्यानंतर ज्ञानाच्या सातत्यामुळे निर्मलानंदरूपी चमत्काराचे गमक म्हणून ज्ञानप्रकाशाचा उदय होतो व त्यामुळे जीव आणि परमात्मा यातील भेददृष्टी दूर होते. असा साक्षात्कार वरचेवर होऊ लागला की, चैतन्याचे आभासक असे भेदरहित अभिन्नज्ञान नेहमी स्फुरते व ते करतलावरील आवळ्याप्रमाणे आपल्या अधीन होऊन राहते. त्यामुळे त्या साधकामध्ये परमपद मोक्षाचा अभ्युदय होऊ लागतो व त्या ज्ञानबलाने त्याला स्वपिंडदेहाचे यथायोग्य ज्ञान होते. अशा रीतीने पिंडाचे उत्तम ज्ञान झाल्यानंतर परमपदाच्या ठिकाणी त्याचे ऐक्य करून ज्ञानवृत्ती अंतर्मुख करण्याचा अभ्यास वरचेवर केल्यास उन्मेष म्हणजे आत्मज्ञान उदय पावते. ही दुसरी अवस्था होय. याच उन्मेषाचा प्रत्याहार समरसतेला उत्पन्न करतो. या सामरस्य क्रियेपासून ज्ञानप्रकाशाचा पुंज उत्पन्न होतो. मुनी याच ज्ञानाला आत्मस्वरूपाच्या ठिकाणी अंगीकृत किंवा विलीन करून स्वतः फलप्राप्तीसाठी उद्युक्त होतात. हे ज्ञान आत्मसात केलेला योगी पूर्णतृप्त, संकल्पातीत, स्थिरचित्त व सिद्धसिद्धी प्राप्त झालेला असा होतो. ही ज्ञानप्रक्रिया केवळ श्रीसद्गुरुमुखाने म्हणजे शक्तिपातानेच समजू

शकते. अन्यथा समजू शकत नाही. अनेक शास्त्राध्ययनाने, स्वकर्तृत्वाने, विज्ञानाने, बलाने किंवा वेदपठनाने हे कळत नाही. ज्ञानाने, लक्ष्याकडे नुसती दृष्टी ठेवल्याने, कर्माभ्यासाने, अपेक्षेने अर्थात् वासनेमुळे, वैराग्याने, नैराश्याने, कायाक्लेशाने किंवा प्राणायामाने हे ज्ञान प्राप्त होऊ शकत नाही. मुद्रा धारणाने, मौनव्रताने, उदासीनतेने, देहत्यागाने किंवा अहिंसावृत्तीनेही हे ज्ञान समजत नाही. सेवावृत्तीने, उपदेशाने, अनेक व्रतानुष्ठानाने, षड्-दर्शनाध्ययनाने, वेष धारणाने अगर मुंडनाने हे ज्ञान प्राप्त होऊ शकत नाही. सारांश, अनंत उपायांनी किंवा प्रयत्नांनी ते परमपद मिळत नाही. ज्या साधकांना शक्तिपातयोगदीक्षेचा अनुग्रह मिळाला आहे म्हणजे ज्यांच्यावर श्रीसद्गुरुकृपा झाली आहे अशा हठयोगी किंवा सत्यवादी साधकांना हे ज्ञान श्रीसद्गुरूंनी आपल्या दृष्टीच्या पाताने त्याच्या ठिकाणी संक्रमित करताच म्हणजेच शक्तिपाताने अनादि आत्मसत्तारूप निद्रिस्त कुंडलिनी शक्तीचे मूलाधारातील अज्ञानावरण काढून टाकून सुषुम्नेमध्ये तिचे चालन करताच मूलतःच शक्तीच्या रूपाने शिष्याच्या ठिकाणी असलेल्या ज्ञानाचा म्हणजेच जागृत शक्तीचा उदय होतो. श्रीसद्गुरूंनी वाणीने सांगताच म्हणजे शब्दाने, दृष्टिपात करताच म्हणजे दृष्टीने, त्यांच्या सान्निध्याने, दर्शनाने किंवा श्रीसद्गुरुप्रसन्नतेने शिष्यसाधकाला शक्तिपातदीक्षेचा प्रसाद प्राप्त होऊन हे ज्ञान उत्तम रीतीने प्राप्त होते."

या सर्व प्रक्रियेचा निर्देश श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी "**ते गुरुशिष्याची गोठी। पदपिंडाची गांठी। तेथे स्थिर राहोनि नुठी। कवणे काळीं ।।३. २७२।।**" या ओवीत साररूपाने केला आहे. श्रीसद्गुरुशिष्यांची गुह्य गोष्ट म्हणजे श्रीसद्गुरूंनी शिष्यावर केलेला शक्तिपात अनुग्रहच होय. त्यामुळेच पद म्हणजे सहस्रारातील श्रीशिवांची **(पदं हसः प्रकीर्तितः)** व पिंड म्हणजे मूलाधारातील कुंडलिनी शक्तीची **(पिण्डं कुण्डलिनी शक्तिः)** गाठ पडते, एकीकरण घडते किंवा सामरस्य होते. या सामरस्यात शिष्याने स्थिर राहावे, तेथून कधीही हलू नये, ती अवस्था मोडू देऊ नये व व्युत्थान दशेत येऊ नये असे श्रीगोपालकृष्णनाथमहाराजांचे अर्जुनाला सांगणे आहे. या बाबतीत म.म. श्रीगोपीनाथ कविराज यांनी "**तांत्रिक वाङ्मयमें शाक्तदृष्टि**" या ग्रंथातील "**अमरत्व साधनपर शाक्तदृष्टि**" या लेखात असे म्हटले आहे की, "**परपिंडसे लेकर स्वपिंडपर्यंत सब पिंडोंका ज्ञान संपादित कर परमपदमें समरसता प्राप्त की जाती है। परंतु**

स्वात्मविश्रांति प्राप्त किये बिना पिंड और परमपद समरस नहीं किये जा सकते। इसलिए सबसे पहले विश्रांति आवश्यक है, जिसके मूल सद्गुरु स्वयंही हैं। सद्गुरु वाक्यसे अथवा दृष्टिसे एकही क्षणमें स्वाश्रित शिष्यकी चित्तविश्रांति संपादित कर देते हैं। कहा भी है -

किमत्र बहुनोक्तेन शास्त्रकोटिशतेन वा।
दुर्लभा चित्तविश्रान्तिर्विना गुरुकृपां पराम्।।

अर्थात् इस विषयमें बहुत कहनेसे अथवा करोडो शास्त्रवचनोंको उद्धृत करनेसे क्या लाभ? गुरुके परमकृपाके बिना चित्तविश्रांति कदापि प्राप्त नहीं हो सकती। चित्तविश्रांतिके अनंतर परमपद साक्षात्कारकी अपेक्षा होती है। यह साक्षात्कार यद्यपि अत्यंत दुःसाध्य है तथापि जिसका चित्त विश्रांत हो चुका हो उसके लिए यथाकथंचित् सुसाध्य होता है। परमपदका साक्षात्कार कर उसमें अपने पिंडका समरसीकरण करना चाहिये। उसी समय आत्यंतिक निरुत्थान दशाका उदय होता है। परमपद स्वसंवेद्य है, वहाँ तक न वाणीकी पहुँच है और न मनकी। योगी महती सिद्धि प्राप्त कर अपने स्वरूपका अनुसंधानेच्छु होकर निजावेशका सेवन करता है और निरुत्थान अवस्थाको प्राप्त करता है। सच्चिदानंद चमत्कार, अद्भुत-अद्भुत आकारोंका प्रकाश, प्रबोध और परमपदमें प्रवेश क्रमशः धीरे-धीरे होने लगते हैं। इस अनुभवके बलसे अपने पिंडकी सिद्धि होती है। तब सिद्ध हुए निज पिंडके साथ परपिंडका एकीकरण होता है।"(पृ.२४०)

श्रीसद्गुरुकृपेचा महिमा असा अपार असल्याने आपण त्याच्या जोरावरच संसारसागर तरून गेलो हे स्वानुभवपूर्वक सांगताना श्रीज्ञानेश्वरमहाराज असे म्हणतात की -

मज हृदयीं सद्गुरु। जेणें तारिलों हा संसारपूरु।
म्हणौनि विशेषें अत्यादरु। विवेकावरी।।१.२२।।

माझ्या हृदयात वास करणारे जे श्रीसद्गुरू आहेत त्यांच्या कृपेने मी संसारमहापुरातून बाहेर पडलो. यामुळे विवेकाबद्दल मला विशेष व अत्यंत आदर आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी **"मज हृदयीं सद्गुरु"** व **"अत्यादरु विवेकावरी"** असे म्हणून बाह्य श्रीसद्गुरू व आंतर श्रीसद्गुरू असे दोन भेद स्पष्टच दाखविले आहेत. यातील बाह्य श्रीसद्गुरू शक्तिपातरूपी उपायाच्या मंद, मध्य व तीव्र इत्यादि भेदांनी अनेक प्रकारचे असतात असे शास्त्रकारांनी

सांगितले आहे. त्यातील अकल्पित, अकल्पितकल्पक, कल्पित व कल्पिताकल्पिक हे चार भेद विशेष मानले आहेत. याशिवाय सिद्धगुरू व दिव्यगुरूही शास्त्रांनी मानले आहेत. बाह्य श्रीसद्गुरूंचे पृथक्करणात्मक पद्धतीने कितीही भेद मानले तरी सर्वांच्या मुळाशी शेवटी परमेश्वराची अनुग्रह शक्तीच आहे. त्यामुळे या शक्तिरूपी श्रीसद्गुरूंशिवाय कोणीही अनुग्रह करू शकत नाही किंवा दीक्षा देऊ शकत नाही. त्यामुळे शास्त्रात असे म्हटले आहे की -

यस्मान्महेश्वरः साक्षात् कृत्वा मानुषविग्रहम्।
कृपया गुरुरूपेण मग्नाः प्रोद्धरति प्रजाः।।

याचा अर्थ असा आहे की, स्वतः श्रीमहेश्वरच आपल्या शक्तितत्त्वाच्या रूपाने मनुष्यरूप धारण करून कृपेने म्हणजे शक्तिपाताने श्रीसद्गुरुरूपाने मायामग्न जीवांचा उद्धार करतात. या उद्धारात आंतरिक विवेकरूपी श्रीसद्गुरूंची म्हणजे कुंडलिनी शक्तीची किंवा निद्रिस्त आत्मस्वरूपाची जागृती होत असल्याने विवेकरूपाने उदित होणाऱ्या जागृत कुंडलिनी शक्तिरूपी अंतस्थ श्रीसद्गुरूंवर आपले विशेष प्रेम आहे, असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी स्पष्ट केले आहे. "**आत्मा वै गुरुरेकः।**" म्हणजे आत्माच एकमात्र श्रीसद्गुरू आहे असे सांगून शास्त्रकारांनी आंतर श्रीसद्गुरूंची "**विशेष अत्यादरु**" या रूपाने प्रतिष्ठा केली आहे. एकदा कुंडलिनी शक्ती जागृत झाली की, बाह्य श्रीसद्गुरूंचे कार्य संपून तिच्या रूपाने उपस्थित होणाऱ्या आंतरश्रीसद्गुरूंचे कार्य सुरू होते. या दृष्टीनेच महर्षी श्रीपतंजलींनी "**स एष पूर्वेषामपि गुरुः कालेनाऽनवच्छेदात्।। समाधिपाद।।२.२६।।**" असे "**योगसूत्र**" सांगून हे आतून विवेकशक्तीच्या रूपाने प्रकट झालेले श्रीसद्गुरू पूर्वी होऊन गेलेल्या सर्व श्रीसद्गुरूंचेही श्रीसद्गुरू आहेत; कारण या श्रीसद्गुरूंना कालाचे बंधन नाही असे म्हटले आहे. ही सर्व प्रक्रिया कशी घडते हे "**भारतीय संस्कृति और साधना,**" खंड एक, या ग्रंथातील "**शक्तिपातरहस्य**" या लेखात म.म. श्रीगोपीनाथ कविराज यांनी स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे अंतरंगात विवेकरूपी श्रीसद्गुरूंच्या रूपाने उपस्थित होणारे अनुत्तर महाज्ञान हे शास्त्रज्ञानापेक्षा कसे श्रेष्ठ आहे, हे स्वसंवेद्य तत्त्वप्राप्तीच्या प्रक्रियेतील विवेकाचे स्थान कोणते आहे? या प्रश्नाचा उलगडा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी केला आहे. तो कसा केला आहे हे वाचकांनी प्रस्तुत संकलकाच्या "**श्रीज्ञानेश्वरी : सिद्धयोग दर्शन**" या ग्रंथातून जाणून घ्यावे.

हे विवेकाने उत्पन्न होणारे प्रातिभज्ञान प्रत्येक जीवाच्या ठिकाणी मुळातच

असते. मात्र ते श्रीसद्गुरूंकडून शक्तिपात झाल्यावर उदय पावून शेवटी साधकाला गुणातीत अवस्थेला नेते. हे सर्व अर्थपंथाने म्हणजे सिद्धयोगाने घडते. त्यामुळे "**मोटकें गुरुमुखें उदैजत दिसे। आणि हृदयीं स्वयंभचि असे। प्रत्यक्ष फावों लागे तैसें। आपैसयाचि।।९.४९।।**" असा श्रीसद्गुरुकृपेचा सिद्धान्तरूप महिमा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी मांडला आहे. त्यासाठीच जाणत्या साधकाने श्रीसद्गुरूंचे भजन केले पाहिजे व मीही त्यासाठीच त्यांना अभिवंदन करतो हे सांगताना ते असे म्हणतात की -

जैसें डोळ्यां अंजन भेटे। ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे।
मग वास पाहिजे तेथ। प्रगटे महानिधी।।१.२३।।
कां चिंतामणी जालियां हातीं। सदा विजयवृत्ति मनोरथीं।
तैसा मी पूर्णकाम श्रीनिवृत्ति। ज्ञानदेवो म्हणे।।२४।।
म्हणौनि जाणतेनें गुरु भजिजे। तेणें कृतकार्य होईजे।
जैसें मुळसिंचनें सहजें। शाखापल्लव संतोषती।।२५।।
कां तीर्थें जियें त्रिभुवनीं। तियें घडती समुद्रावगाहनीं।
ना तरी अमृतरसास्वादनीं। रस सकळ।।२६।।
तैसा पुढतपुढती तोचि। मियां अभिवंदिला श्रीगुरुचि।
जो अभिलषित मनोरुचि। पुरविता तो।।२७।।

श्रीसद्गुरुकृपेचा महिमा असा अपार आहे. या दृष्टीनेच **Principles of Tantra PartII** या ग्रंथामध्ये श्री.ऑर्थर ॲव्हलॉन यांनी **"On The Guru"** या प्रकरणात असे म्हटले आहे की, **"Shastra has therefore said" He who is my Lord is the Lord of the world. He who is my Guru is the Guru of the world; and hence in all Tantras there has been ordained one Dhyana and one Mantra in the case of the Guru. In fact, just as the wick of one lamp is ignited at the flame of another, so the Divine Shakti which is Mantra is communicated to the disciples body from that of the Guru. Just as the power of burning and giving light in the case of either lamp or of the fire which is the result of their combination remains the same, both before and after the ignition (the fire of both lamps being the same), so the real Guru is everywhere the same, whether in the body of the (earthly) Guru or in that of his disciple. (Page 206)**

Even Shastra is not greater than Guru, nor is Tapasya,

Mantra, or the fruit of religious rites greater than Guru, nor is the Devi Herself greater than Guru, nor is even Shiva Greater than Guru. No form and appearance is superior to that of Guru, and there is even no Japa which is superior to Guru - that is to say, by performance of Sadhana of Guru alone one becomes Siddha in all the other methods of Sadhana. Hence it has been said in Yamala :

Shiva alone is Guru and I am that Shiva. O great Devi! Thou too art Guru and Mantra alone is Guru. For this reason as regards Mantra there is no difference between Gurudeva and Ishtadeva. (Page 211, 212)

For this reason Bhagwan, the creator of all things, has said in the Pichchila Tantra: "his Sadhanashastra is based solely on Guru. In it there is no beneficient lord other than Guru. O Maheshvari! a Sadhaka should seek the protection of Guru" (Page213)

त्यामुळेच शास्त्राने असे म्हटले आहे की, जे माझे (ब्रह्माचे) स्वामी आहेत ते सर्व जगाचे स्वामी आहेत व जे माझे श्रीसद्गुरू आहेत ते सर्व जगाचे श्रीसद्गुरू आहेत. यासाठीच सर्व तंत्रांमध्ये श्रीसद्गुरूंबद्दल एकाच ध्यानाची व मंत्राची दीक्षा कथन केली आहे. वास्तविकपणे ज्याप्रमाणे एका दिव्याची वात दुसऱ्या दिव्याच्या ज्योतीवर पेटविली जाते त्याप्रमाणेच मंत्ररूपाने असेलेली दैवी शक्ती ही श्रीसद्गुरूंकडून शिष्याच्या देहात संक्रमित केली जाते. अग्नीची जळण्याची व दिव्याची प्रकाश देण्याची शक्ती हा अग्नी व इंधन किंवा ज्योत व वात यांच्या एकीकरणाचा परिणाम असला तरी ज्वलनापूर्वी व नंतरही ही शक्ती सारखीच असते (किंवा दोन्ही दिव्यातील अग्नी सारखाच असतो); त्याप्रमाणे आपल्या भौतिक शरीरातील किंवा शिष्याच्या देहात असणारे खरे श्रीसद्गुरू सर्वत्र सारखेच असतात. (पृ.२०६)

एवढेच नव्हे; तर शास्त्रसुद्धा श्रीसद्गुरूंपेक्षा श्रेष्ठ नाही; तपस्या, मंत्र व धार्मिक संस्कारांचे फलसुद्धा श्रीसद्गुरूंपेक्षा श्रेष्ठ नाही. स्वतः देवीसुद्धा श्रीसद्गुरूंपेक्षा श्रेष्ठ नाही व श्रीशिवसुद्धा श्रीसद्गुरूंपेक्षा श्रेष्ठ नाहीत. कोणतीही आकृती किंवा स्वरूप श्रीसद्गुरूंपेक्षा वरचढ नाही किंवा कोणताही जपसुद्धा श्रीसद्गुरूंपेक्षा अधिक महत्त्वाचा नाही. याचा अर्थ असा आहे की, श्रीसद्गुरूप्रदत्त साधनेच्या आविष्कारानेच साधक कोणत्याही पद्धतीच्या साधनाने सिद्ध होतो. त्यामुळेच यामलात असे म्हटले आहे की -

श्रीशिव हेच एकमात्र श्रीसद्गुरू असून ते श्रीशिव मीच आहे. हे श्रेष्ठ देवी! तू स्वतःच श्रीसद्गुरू असून फक्त मंत्रच श्रीसद्गुरू आहेत. या कारणामुळेच मंत्रासंबंधी विचार करता श्रीसद्गुरुदेव व इष्टदेवता यांच्यामध्ये कोणताही फरक नाही. (पृ.२११, २१२)

या कारणामुळेच सर्व गोष्टींचा निर्माता असलेल्या श्रीभगवंतांनी "**श्रीपिच्छिलातंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "हे साधनाशास्त्र संपूर्णपणे श्रीसद्गुरूंवरच आधारलेले आहे. यामध्ये श्रीसद्गुरूंशिवाय कोणीही कल्याणकारक स्वामी नाही. हे महेश्वरी! साधकाने श्रीसद्गुरूंचा आधार किंवा संरक्षण मिळविण्याचा अवश्य प्रयत्न केला पाहिजे." (पृ.२१३)

"**श्रीगुरुतंत्र**" या ग्रंथात या दृष्टीने असे म्हटले आहे की, "जर श्रीसद्गुरू संतुष्ट झाले तर श्रीशिव संतुष्ट होतात. जर श्रीसद्गुरू असंतुष्ट झाले तर त्रिनेत्र श्रीशिव असंतुष्ट होतात. याकरिता हे महेश्वरी! संसारसागर तरून जाण्याला श्रीसद्गुरू हेच तारक, संरक्षक आहेत व तेच मुक्तिदाता आहेत. त्यामुळे श्रीशिवच श्रीसद्गुरुरूपाने अधिष्ठानभेदाने सर्वत्र विद्यमान असतात. याकरिता श्रीशिवांत व श्रीसद्गुरूंमध्ये भेद करणे योग्य नाही. सर्व जगच श्रीसद्गुरुमय आहे असे समजले पाहिजे. समस्त शास्त्र, तप, मंत्र, फल, देवी, श्रीशिव, मुक्ती व जप यांपैकी कोणीही श्रीसद्गुरूंपेक्षा श्रेष्ठ नाही.

"**श्रीरुद्रयामल**" या ग्रंथातही श्रीसद्गुरूंचा महिमा कथन करताना असे म्हटले आहे की -

भावेन ज्ञानमुत्पन्नं ज्ञानान्मोक्षमवाप्नुयात।
आत्मना मनसा वाचा गुरुरीश्वर उच्यते।।१.२२३।।
ध्यानं संयोजनं प्रोक्तं मोक्षमत्र मनोलयम्।
गुरोः प्रसादमात्रेण शक्तितोषो महान् भवेत्।
शक्तिसन्तोषमात्रेण मोक्षमाप्नोति साधकः।।२२४।।
गुरुमूलं जगत्सर्वं गुरुमूलं परन्तपः।
गुरोः प्रसादमात्रेण मोक्षमाप्नोति सद्वशी।।२२५।।
गुरुभक्तेः परं नास्ति भक्तिशास्त्रेषु सर्वतः।
गुरुपूजां विना नाथ! कोटिपुण्यं वृथा भवेत्।।२४५।।

भावनेने ज्ञानोत्पत्ती व ज्ञानाने मोक्षप्राप्ती होते. काया-वाचा-मनाने श्रीसद्गुरूंना श्रीईश्वर समजावे. श्रीसद्गुरूंशी एकरूप होणे म्हणजे ध्यान व श्रीसद्गुरुरूपात मनोलय होणे म्हणजे मोक्ष होय. श्रीसद्गुरूंच्या केवळ कृपेनेच

कुंडलिनी शक्ती संतुष्ट म्हणजे जागृत होते. शक्तिसंतोषाने साधकाला मोक्ष मिळतो. सर्व विश्वाचे मूळ श्रीसद्गुरू होत. श्रीसद्गुरूच परमतप आहेत. जितेंद्रिय साधकाला केवळ श्रीसद्गुरुप्रसादाने मोक्ष मिळतो. भक्तिशास्त्रात श्रीसद्गुरु-भक्तीशिवाय काहीही श्रेष्ठ नाही व श्रीसद्गुरुपूजेशिवाय इतर कोटी कोटी पुण्यकारक गोष्टी व्यर्थ आहेत असे म्हटले आहे.

"श्रीयोगिनीतंत्र" या ग्रंथामध्येही देवीने श्रीशंकरांना श्रीसद्गुरू कोण आहेत?, त्यांचे स्वरूप काय आहे? व तत्त्वज्ञानापेक्षाही श्रीसद्गुरू श्रेष्ठ आहेत असे आपण कसे म्हणता?, त्याबद्दल आपले विवरण ऐकण्याची माझी इच्छा आहे असे विचारताच श्रीशंकर श्रीसद्गुरूंचा महिमा सांगताना असे म्हणतात की -

आदिनाथो महादेवि महाकालो हि यः स्मृतः।
गुरुः स एवं देवेशि सर्वमन्त्रेऽधुना परः।।१.४२।।
शैवे शाक्ते वैष्णवे च गाणपत्ये तथैन्दवे।
महाशैवे च सौरे च स गुरुर्नात्र संशयः।
मन्त्रवक्ता स एव स्यान्नापरः परमेश्वरी।।४३।।
मन्त्रप्रदानकाले हि मानुषो नगनन्दिनी।
अधिष्ठान भवेत्तस्य महाकालस्य शाङ्करी।
देवि ह्यमानुषी चेयं गुरुता नात्र संशयः।।४४।।
मन्त्रदाता शिरःपद्मे यज्ज्ञानं कुरुते गुरुः।
तज्ज्ञानं कुरुते देवि शिष्योयं शीर्षपङ्कजे।।४५।।
गुरुमूलमिदं शास्त्रं गुरुमूलमिदं जगत्।
गुरुरेव परं ब्रह्म गुरुरेव शिवः स्वयम्।
गुरुर्यस्य वशीभूतो देवास्तं प्रणमन्ति च।।२४।।
अतएव महेशानि एक एव गुरुः स्मृतः।
अधिष्ठानं भवेत्तस्य मानुषस्य महेश्वरी।
माहात्म्यं कीर्तितं तस्य सर्वशास्त्रेषु शाङ्करी।।४६।।

हे देवेशी! हे महादेवी!! जे श्रीआदिनाथ महाकाल आहेत तेच परम-श्रेष्ठ श्रीसद्गुरू आहेत. शैव, शाक्त, वैष्णव, गाणपत्य, ऐंदव, महाशैव व सौरादि मंत्रांचा तेच मंत्रवक्ता किंवा दीक्षागुरू आहेत. त्यांच्याशिवाय दुसरे कोणीही श्रीसद्गुरू नाही, यात संदेह नाही. हे परमेश्वरी! हे पर्वतनंदिनी!! मंत्रप्रदान करण्याच्यावेळी ते श्रीआदिनाथच मनुष्यरूपाने मंत्र देतात. हे

शांकरी! त्या मंत्रप्रदानाच्या वेळी श्रीसद्गुरूंमध्ये महाकालाचेच अधिष्ठान असते. त्यामुळे हे देवी! श्रीसद्गुरूंचे हे कर्म अमानुष म्हणजे दैवी आहे असे समज. याबद्दल कोणताही संदेह बाळगू नकोस. श्रीशिवस्वरूप मंत्रदीक्षादाता श्रीसद्गुरू शिरोरूप सहस्रदलकमलामध्ये ज्याप्रकारे श्रीशिवशक्तीच्या सामरस्याचे ज्ञान प्राप्त केलेले असतात त्याप्रमाणेच हे देवी! दीक्षादानानंतर शिष्यही स्वतःच्या शीर्षकमलामध्ये त्याच प्रकारच्या श्रीशिवशक्तिसामरस्यात्मक ज्ञानाची अनुभूती घेतो. हे देवी! हे सिद्धयोगाचे शास्त्र व सर्व जग हे श्रीसद्गुरुमूलक आहे. श्रीसद्गुरूच परब्रह्म व श्रीसद्गुरूच स्वतः शिव आहेत किंवा साक्षात् श्रीशिव-स्वरूप आहेत. (शिष्य व श्रीसद्गुरू ते स्वतःच आहेत.) ज्याने श्रीसद्गुरूंना वश केले आहे त्याला सर्व देव प्रणाम करतात. त्यामुळे हे महेशानी! श्रीसद्गुरूंनाच सर्वश्रेष्ठ समजले पाहिजे. हे महेश्वरी! मंत्र म्हणजे दीक्षा देताना श्रीसद्गुरूंच्या मनुष्य देहात अमानुष देवतेचे अधिष्ठान असल्यामुळे सर्व शास्त्रात श्रीसद्गुरूंचे म्हणजेच श्रीसद्गुरूकृपेचे माहात्म्य सांगितले आहे.

श्रीसद्गुरूंच्या महिम्याची किंवा श्रीसद्गुरुकृपेच्या श्रेष्ठत्वाची पावती अशा प्रकारे सर्व शास्त्रे देत असल्यामुळे व शेवटी तेच एकमात्र सर्व आपत्तीत तारक किंवा आश्रयस्थान असल्यामुळे आपले श्रीसद्गुरू श्रीगोपालकृष्णनाथ-महाराज यांची प्रार्थना करताना, करुणा भाकताना, महिमा वर्णन करताना किंवा मागणी करताना अर्जुनाच्या मुखातील श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे उद्गार मननीय व चिंतनीय आहेत. ते असे म्हणतात की -

तरी श्रीकृष्णा तुवां जाणावें। निकें तें आम्हां सांगावें।
जे सखा सर्वस्व आघवें। आम्हांसि तूं।।२.५८।।
तूं गुरु बंधु पिता। तूं आमुची इष्ट देवता।
तूंचि सदा रक्षिता। आपदीं आमुतें।।५९।।
जैसा शिष्यांतें गुरु। सर्वथा नेणें अव्हेरू।
कीं सरितांतें सागरू। त्यजीं केवीं।।६०।।
नातरी अपत्यांतें माये। सांडूनि जरी जाये।
तरी तें कैसेंनि जिये। ऐकें कृष्णा।।६१।।
तैसा सर्वांपरी आम्हांसीं। देवा तूंचि एक आहासी।
आणि बोलिलें जरी न मानिसी। मागील माझें।।६२।।
तरी उचित काय आम्हां। जें व्यभिचरेना धर्मा।
तें झडकरी पुरुषोत्तमा। सांगें आतां।।६३।।

देवा तुज ऐसा निजगुरु। आजि आर्तीधणी कां न करूं।
एथ भीड कवणाची धरूं। तूं माय आमुची।।३.२१।।
हां गां कामधेनूचें दुभतें। दैवें जाहलें जरी आपैतें।
तरीं कामनेची कां तेथें। वानी कीजे?।।२२।।
जरी चिंतामणी हाता चढे। तरी वांछेचें कवण सांकडें।
कां आपुलेनि सुरवाडें। इच्छावें ना?।।२३।।
देखा अमृतसिंधूतें ठाकावें। मग ताहानाचि जरी फुटावें।
तरी सायासु कां करावे। मागील ते?।।२४।।
तैसा जन्मांतरीं बहुतीं। उपासितां श्रीलक्ष्मीपती।
तूं दैवें आजि हातीं। जाहलासी जरी।।२५।।

श्रीज्ञानेश्वरमहाराजांप्रमाणेच उपरोक्त प्रकारे श्रीसद्गुरुकृपेचा महिमा सांगताना शास्त्रकारांनी उद्घोष करून असे म्हटले आहे की -

त्वमेव माता च पिता त्वमेव त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव त्वमेव सर्वं मम देवदेव।।

श्रीसद्गुरू हे माता, पिता, बंधू, मित्र, विद्या, द्रव्य इतकेच नव्हे; तर सर्व-काही आहेत. ते कामधेनू, चिंतामणी व अमृतसिंधू आहेत असे सांगून या वस्तूंतील सामर्थ्याप्रमाणे त्यांची कृपा अगाध आहे हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी मोठ्या खुबीने सूचित केले आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथांनी **"श्रीविवेक-मार्तंड"** व **"श्रीगोरक्षपद्धति"** या दोन्ही ग्रंथांच्या सुरुवातीला निम्नलिखित श्लोकाने श्रीसद्गुरुकृपेचा अकथनीय महिमा आपल्या संप्रदाय परंपरेला अनुसरून सांगून श्रीशिवजीवाचे समरसीकरण करणाऱ्या सिद्धयोगाचे प्रतिपादन केले आहे. ते असे म्हणतात की -

श्रीगुरुं परमानन्दं वन्दे स्वानन्दविग्रहम्।
यस्य सन्निधिमात्रेण चिदानन्दायते तनुः।।१।।

श्रीसद्गुरू हे परम आनंदमय आहेत. जागृत कुंडलिनी शक्तीच्या रूपाने असणारा स्वतःचा आनंद हीच त्यांची शरीर धारण केलेली सच्चिदानंदमय मूर्ती आहे. ही मूर्ती शक्तिपातदीक्षेने शिष्याची किंवा साधकाची निद्रिस्त कुंडलिनी शक्ती आपल्या कृपाबलाने जागृत करून शिष्यालाही आपल्यासारखी स्वानंदरूप बनविणारी किंवा स्वानंद देणारी आहे. श्रीसद्गुरुदेवांच्या केवळ सान्निध्यानेच जीवाच्या, साधकाच्या किंवा शिष्याच्या देहात शक्तिसंक्रमण होऊन तोही चैतन्यशक्तीच्या जागृतीमुळे स्वशरीर आनंदमय होऊन जातो.

असे कृपाबल असणाऱ्या श्रीसद्गुरूंना नमस्कार असो.

श्रीशिवसूत्रकार श्रीवसुगुप्तांनी शाक्तोपायाचे कथन करताना "**गुरुरुपायः ।।२.६।।**" असे जे सूत्र सांगितले आहे त्याचा अर्थच शक्तीच्या जागृतीसाठी शक्तिसंपन्न श्रीसद्गुरूंची कृपा हाच उपाय आहे असा आहे. परमहंस परिव्राजकाचार्य श्रीविष्णुतीर्थस्वामीमहाराज यांनी "**शक्तिपात किंवा कुंडलिनी महायोग**" या आपल्या पुस्तकात "**शक्तिपाताद्विशेषेण।।४.७।।**" व "**तत्तु गुरुकृपयैव लभ्यते।।४.८।।**" अशी दोन सूत्रे लिहून कुंडलिनी शक्ती शक्तिपाताने विशेषरीतीने जागृत होते व शक्तिपाताची म्हणजे दीक्षेची किंवा अनुग्रहाची प्राप्ती श्रीसद्गुरुकृपेनेच होते असे सांगून श्रीगुरुकृपेचा महिमा स्पष्ट केला आहे. "**श्रीवातूलनाथसूत्र**" या ग्रंथात "**महासाहसवृत्त्या स्वरूपलाभः।।१।।**" असे सूत्र घालून शक्तिपातरूपी श्रीसद्गुरुकृपेने म्हणजेच महासाहसाने साधकाला स्वस्वरूपाचा लाभ होतो असे सांगितले आहे. यावर टीका करताना "**श्रीमदनन्तशक्तिपाद**" यांनी आपल्या "**वृत्तीत**" असे म्हटले आहे की, "**अतितीव्रातितीव्रतर विश्रृङ्खलशक्तिपाताघ्रातस्य स्वस्वरूपसमाविष्टस्य कस्यचित् क्वचित् कदाचित् अकस्मादेव महासाहसवृत्त्या घस्मरमहाघनतरपरनादोल्लासस्फारेण सविकल्पनिर्विकल्पात्मकसमस्तसंविन्निवहघट्टनान्निरावरणमहाशून्यतासमावेशनिष्ठया "स्वरूपलाभः" समस्तकल्पनोत्तीर्णत्वादकृतकनिरवकाशनिरुत्तरनिस्तरङ्गनिरवधिर्निर्निकेतास्पर्शसंवित्प्राप्तिर्भवति।**" श्रीसद्गुरुकृपेने होणाऱ्या अतितीव्रातितीव्रतर शक्तिपाताने साधकाला सर्व कल्पनांच्या उत्तरांच्या, तरंगांच्या, कालाच्या, स्पर्शाच्या पलीकडे चैतन्ययुक्त स्वरूपाची म्हणजे श्रीशिवशक्तीच्या स्वरूपाची प्राप्ती होते. हेच श्रीसद्गुरुवाक्याचे बळकटपण होय. हे सांगताना श्रीज्ञानेश्वरमहाराज असे म्हणतात की -

तो उपशमें निहटिला। धैर्येंवरी दाटिला।
गुरुवाक्यें काढिला। बळकटपणें।।४.१३१।।

श्रीसद्गुरुवाक्याचे हे बळकटपण, ही कृपा, साहस किंवा धैर्य आणि शक्तिपातदीक्षा किंवा अनुग्रह यांच्या जोरावर आपण श्रीमद्भगवद्गीतेवर ओव्यांच्या रूपाने सहजतेने श्रीज्ञानेश्वरी हा प्रबंध लिहीत आहोत हे नऊ अध्याय संपल्यावर "**आतां आपुलेनि कृपाप्रसादें। मियां भगवद्गीता वोंवीप्रबंधें। पूर्वखंड विनोदें। वाखाणिलें।।१०.२३।।**" असे सांगून त्यांनी स्पष्ट केले आहे. श्रीसद्गुरू श्रीनिवृत्तिनाथमहाराजांनी केलेल्या कृपेमुळे म्हणजे

शक्तिपातदीक्षेमुळेच हे अलौकिक कार्य आपण संपन्न करू शकलो याची जाणीव श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी श्रोत्यांना वारंवार करून देताना असे म्हटले आहे की -

तुमचा अनुग्रहो गणेशु। जैं दे आपुला सौरसु।
तैं सारस्वतीं प्रवेशु। बाळकाही आथी।।१०.६।।
जी दैविकीं उदार वाचा। जैं उद्देशु दे नाभिकाराचा।
तैं नवरससुधाब्धीचा। थावो लाभे।।७।।
जी आपुलिया स्नेहाची वागेश्वरी। जरी मुकेयातें अंगिकारी।
तो वाचस्पतीशीं करी। प्रबंधुहोडा।।८।।
मागां दूध दे म्हणतलियासाठीं।
आघविया क्षीराब्धीची करूनि वाटी।
उपमन्यूपुढें धूर्जटी। ठेविली जैसी।।१७।।
ना तरी वैकुंठपीठनायकें। रुसला ध्रुव कवतिकें।
बुझाविला देऊनि भातुकें। ध्रुवपदाचें।।१८।।
तैसी जे ब्रह्मविद्यारावो। सकल शास्त्रांचा विसंवता ठावो।
ते भगवद्गीता वोंविये गावों। ऐसें केलें।।१९।।
जयांचेनि आठवें। शब्दसृष्टि आंगवें।
सारस्वत आघवें। जिव्हेसि ये।।१३.२।।
वक्तृत्वा गोडपणें। अमृतातें पारुखें म्हणे।
रस होती वोळंगणें। अक्षरांसीं।।३।।
भावाचें अवतरण। अवतरविती खूण।
हाता चढे संपूर्ण। तत्त्वभेद।।४।।
श्रीगुरूंचे पाय। जैं हृदय गिंवसूनि ठाय।
तैं येवढें भाग्य होय। उन्मेखासी।।५।।
हा ठावोवरी मातें। पुरतया सारस्वतें।
केलें असे श्रीमंतें। श्रीगुरुरायें।।१३.११६५।।
तेणें जी कृपासावायें। मी बोलें तेतुलें सामाये।
आणि मी तुमचिये सभे लाहें। गीता म्हणों।।११६६।।
आतां रिता कुंभ समुद्रीं रिगे। तो उचंबळत भरोनि निगे।
कां दशीं दीपसंगें। दीपुचि होय।।१७.१९।।
तैसा तुझिया प्रणितीं। मी पूर्णु जाहलों श्रीनिवृत्ती।

आतां आणीन व्यक्तीं। गीतार्थु तो।।२०।।
तो सर्वोपकारी समर्थु। सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथु।
राहाटत असे मजही आंतु। रिघोनियां।।१८.१७२९।।
आतां आयती गीता जगीं। मी सांगें मऱ्हाठिया भंगीं।
येथ कें विस्मयालागीं। ठावो आहे।।१७३०।।
श्रीगुरूचेनि नांवें माती। डोंगरीं जयापासीं होती।
तेणें कोळियें त्रिजगतीं। येकवद केली।।१७३१।।
चंदनें वेधलीं झाडें। जालीं चंदनाचेनि पाडें।
वसिष्ठें मानिली कीं भांडें। भानूसीं शाटी।।१७३२।।
मा मी तव चित्ताथिला। आणि श्रीगुरु ऐसा दादुला।
जो दिठीवेनि आपुला। बैसवी पदीं।।१७३३।।
आधींचि देखणी दिठी। वरी सूर्य पुरवी पाठी।
तैं न दिसे ऐसी गोठी। कैंही आहे?।।१७३४।।
म्हणौनि माझे नित्य नवे। श्वासोच्छ्वासही प्रबंध होआवे।
श्रीगुरुकृपा काय नोहे। ज्ञानदेवो म्हणे।।१७३५।।
आधींच तंव तो कृपाळू। वरी गुरुआज्ञेचा बोलू।
जाला जैसा वर्षाकाळू। खवळणें मेघां।।१७६१।।
मग आर्ताचेनि वोरसें। गीतार्थग्रंथनमिसें।
वर्षला शांतरसें। तो हा ग्रंथु।।१७६२।।
तेथ पुढां मी बापिया। मांडला आर्ती आपुलिया।
कीं यासाठीं येवढिया। आणिलों यशा।।१७६३।।
एवं गुरुक्रमें लाधलें। समाधिधन जें आपुलें।
तें ग्रंथें बोधौनि दिधलें। गोसावी मज।।१७६४।।
वांचूनि पढे ना वाची। ना सेवाही जाणें स्वामीची।
ऐशिया मज ग्रंथाची। योग्यता कें असे?।।१७६५।।
परी साचचि गुरुनाथें। निमित्त करूनि मातें।
प्रबंधव्याजें जगातें। रक्षिलें जाणा।।१७६६।।
यालागीं मी गुणदोष-। विषीं क्षमाविना विशेष।
जे मी संजात ग्रंथलों देख। आचार्यें कीं।।१७७०।।

उपरोक्त सर्व ओव्या श्रीसद्गुरुकृपेच्या अपार महिम्याने ओतप्रोत भरल्या आहेत. श्रीज्ञानेश्वरीचे सर्व कर्तृत्व श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी आपल्या श्रीसद्गुरु-

चरणी अर्पण केले आहे. किंबहुना "**ऐसें श्रीनिवृत्तिनाथाचें। गौरव आहे जी साचें। ग्रंथु नोहे हें कृपेचें। वैभव तिये।।१८.१७५१।।**" अशीच त्यांची धारणा आहे. श्रीज्ञानेश्वरी हा आपला ग्रंथ श्रीसद्गुरुमहाराजांच्या कृपेचाच गौरव किंवा वैभव आहे, या उत्कट धारणेपेक्षाही आपल्याला श्रीसद्गुरु-कृपाप्रसादाची नितांत आवश्यकता असल्यामुळे आपणाला ग्रंथ निर्मितीचे निमित्त केले गेले असे "**किंबहुना मज। तुमचिया कृपा काज। तियेलागीं व्याज। ग्रंथाचें केलें।।१३.३३३।।**" याप्रमाणे सांगून श्रीसद्गुरूंच्या कृपा-प्रसादाचा महिमा हा अंतिम व एकमेव आधार असून त्याच्या पलीकडे या जगात दुसरी कोणतीही गोष्ट श्रेष्ठ असू शकत नाही किंवा कधीही असणार नाही हाच सिद्धान्त श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी प्रस्थापित केला आहे. त्यांच्या लेखी "**गुरोः कृपैव केवलम्।।**" हेच सर्वश्रेष्ठ आहे. त्यापलीकडे सिद्धान्तच नाही. श्रीसद्गुरू ही सर्व शास्त्रांची त्यांच्या दृष्टीने परमसीमा आहे. "**गुरुमूलमिदं सर्वं शास्त्रज्ञानं सुरेश्वरी।**" हे जे श्रीशंकरांनी पार्वतीला सांगितले आहे त्याचा विस्तार म्हणजे श्रीज्ञानेश्वरी आहे. श्रीसद्गुरुकृपा या एका शब्दात सर्व श्रीज्ञानेश्वरी साठविलेली आहे. किंबहुना श्रीसद्गुरुकृपा म्हणजे श्रीज्ञानेश्वरी असे समीकरण मांडले तर ते अधिक शोभून दिसेल; कारण श्रीज्ञानेश्वरी म्हणजे काय हे एका शब्दात सांगा असे कोणी विचारल्यास त्याला श्रीसद्गुरुकृपा येवढे एकाच शब्दात सुंदर उत्तर देता येईल. आपल्या कृपेचे संचरण शिष्यदेहात करणारे म्हणजे वेधदीक्षा देणारे किंवा शक्तिपात करणारे श्रीसद्गुरू ही भूलोकावरील दुर्लभ गोष्ट असून ही दीक्षा स्वीकारणारा अधिकारी शिष्यही दुर्लभच असतो हे सांगताना "**श्रीकुलार्णवतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

वेधदीक्षाकरो लोके श्रीगुरुर्दुर्लभः प्रिये।
शिष्योऽपि दुर्लभस्तादृक् पुण्ययोगेन लभ्यते।।१४.६६।।

श्रीशिव श्रीपार्वतीला असे म्हणतात की, हे प्रिये! या भूलोकावर वेध-दीक्षा देणारे म्हणजे परंपराप्राप्त शक्तीने शक्तिपात करून शिष्याची निद्रिस्त कुंडलिनी शक्ती जागृत करणारे श्रीसद्गुरू अत्यंत दुर्मिळ असून या दीक्षेचा अधिकारी शिष्यही अत्यंत दुर्मिळच असतो. केवळ पूर्वपुण्याच्या प्रभावाने अशा श्रीसद्गुरूंची प्राप्ती होते.

अर्थांतराने हीच गोष्ट सर्व संतांनी, महात्म्यांनी व शास्त्रकारांनी आपल्या ग्रंथात उच्चरवाने सांगितली आहे. "**श्रीरामचरितमानस**" या ग्रंथाच्या सुरुवातीला श्रीगोस्वामी तुलसीदासांनी "**वन्दे बोधमयं नित्यं गुरुं शङ्कर-**

रूपिणम्" म्हणजे शक्तिपाताने बोध देणाऱ्या नित्य अशा श्रीशिवरूप श्रीसद्गुरूंना मी नमस्कार करतो असे म्हटले आहे. श्रीसद्गुरुकृपेच्या म्हणजेच श्रीसद्गुरु-प्रदत्त शक्तीच्या, शक्तिसंचाराच्या किंवा दिव्य शक्तिप्रदानाच्या दृष्टीनेच श्रीसंत मीराबाईंनी असे म्हटले आहे की, **"पायो जी मैंने राम रतन धन पायो। वस्तु अमोलक दी मेरे सतगुरु किरपा करी अपनायौ।।"** श्रीसंत कबीरांनी **"श्रीकुलार्वणवतंत्र"** या ग्रंथातील उक्ती निम्नोक्त पद्धतीने प्रकट केली आहे. ते असे म्हणतात की -

यह तन विष की बेलडी, गुरु अमृतकी खान।
सीस दिये जो गुरु मिलै तो भी सस्ता जान।।

याचा अर्थ असा की, शक्तिपात दीक्षा देणारे म्हणजे पूर्णकृपा करणारे श्रीसद्गुरू दुर्लभ आहेत. **"जब सत्‌गुरु पूरा मिलै चाखै अमृत सार।"** असे श्रीसंत चरणदासांनी म्हटले आहे त्याचा अर्थ ही हाच आहे. यावर टीका करताना **"श्रीगुरुपरंपरा"** या ग्रंथात परमहंस परिव्राजकाचार्य श्रीशिवोम-तीर्थस्वामीमहाराज असे म्हणतात की, **"शक्तिसंपन्न समर्थ गुरुकी कृपा प्राप्त होनेपरही शिष्य आंतरिक साधनकी अवस्थायें प्राप्त करता हुआ उन्नतिकी ओर अग्रसर होता है। केवल बाते बनानेवाले और मौखिक उपदेश देकरही गुरुकर्त्तव्यकी इतिश्री मान लेनेवाले गुरुओंके द्वारा यह काम कदापि संभव नहीं। गुरुके अंदर वह चेतन शक्ति जाग्रत होनी चाहिए जिससे वह शिष्यकी अंतःकरणकी लहरोंको अभीष्ट दिशामें मोड दे, अपने अंतःमें प्रकाशित दीपसे शिष्यके अंतःके तिरोहित दीपको प्रज्वलित कर उसके हृदयको भक्ति और ज्ञानसे आलोकित कर दे। इसका तात्पर्य यह है कि सद्गुरु शिष्यको मौखिक उपदेशही नहीं, अपितु और भी कुछ देता है। उस शक्तिविशेषको देनेकोही गुरुकृपा कहते है। इसके अनुभवका आनंद तो सौभाग्यप्राप्त साधकही उठा सकते हैं।"**

श्रीसद्गुरुकृपेचे हे महत्त्व महर्षी श्रीव्यासांनी **"श्रीमद्भागवत"** या ग्रंथात सांगताना असे म्हटले आहे की -

अनाद्यविद्यायुक्तस्य पुरुषस्यात्मवेदनम्।
स्वतो न सम्भवादन्यस्तत्त्वज्ञो ज्ञानदो भवेत्।।११.२२.१०।।

जीव अनादि कालापासून अविद्येने ग्रस्त असल्यामुळे त्याला स्वतःला स्वतःचे ज्ञान होऊ शकत नाही किंवा तो स्वतः आपले आपल्याला जाणू

शकत नाही. त्याला आत्मज्ञान होण्यासाठी दुसऱ्या कोणाच्या तरी सर्वज्ञाच्या म्हणजे श्रीसद्गुरूंच्या साहाय्याची आवश्यकता असते. श्रीजनकांनी महामुनी श्रीशुकांना उपदेश करताना हेच सांगितले की, श्रीसद्गुरुकृपेची नितांत आवश्यकता आहे. ते असे म्हणतात की -

न विना ज्ञानविज्ञाने मोक्षस्याधिगमो भवेत्।
न विना गुरुसम्बन्ध ज्ञानस्याधिगमः स्मृतः।।
गुरुः प्लावयिता तस्य ज्ञानं प्लवमिहोच्यते।
विज्ञाय कृतकृत्यस्तु तीर्णस्तदुभयं त्यजेत्।।

ज्याप्रमाणे ज्ञान-विज्ञानाशिवाय मोक्षाची प्राप्ती होत नाही त्याप्रमाणे श्रीसद्गुरूंची कृपा झाल्याशिवाय म्हणजे शक्तिपातदीक्षा झाल्याशिवाय ज्ञानप्राप्तीही होऊ शकत नाही. या संसारसागरातून पलीकडे नेणारे किंवा तारणारे श्रीसद्गुरूच आहेत व त्यांनी दिलेले ज्ञान हे नौकेप्रमाणे आहे असे म्हटले जाते. ज्याप्रमाणे नदी पार केल्यावर मनुष्य नाव व नाविक या दोन्ही गोष्टी सोडून देतो त्याप्रमाणे मुक्त झालेला पुरुष श्रीसद्गुरू व ज्ञान या दोन्ही गोष्टी सोडून देतो.

श्रीसद्गुरुकृपेचा महिमा श्रीएकनाथमहाराजांनी **"श्रीएकनाथी भागवत"** या ग्रंथात फारच सविस्तरपणे वर्णन केला आहे. त्यात ते असे म्हणतात की -

आता वंदू जनार्दनु। जो भवगजपंचाननु।
जनीं विजनीं समानु। सदा संपूर्णु समत्वें।।१.७९।।
ज्याचेनि कृपापांगें। देहीं न देखतीं देहांगें।
संसार टवाळ वेगें। केलें वाउगे भवस्वप्न।।८०।।
जयाचेनि कृपाकटाक्षें। अलक्ष्य लक्ष्येंवीण लक्षे।
साक्षी विसरली साक्षें। निजपक्षें गुरुत्वें।।८१।।
तो मुखाचें जाला निजमुख। दृष्टीतें प्रकटे सन्मुख।
तोचि विवेकेंकरून देख। करवी लेख ग्रंथार्थी।।९८।।

याप्रमाणेच श्रीएकनाथमहाराजांनी श्रीगोपालकृष्णनाथमहाराजांनी श्रीसद्गुरुरूपाने उद्धवावर शक्तिपाताने स्वशक्तिसंचरण करून श्रीसद्गुरुकृपा कशी केली व हीच गुह्यातिगुह्य गोष्ट आहे हे सांगताना असे म्हटले आहे की -

यालागीं कृष्ण जगजेठी। उद्धवाची पाठी थापटी।
अतिगुह्याची गुह्य गोष्टी। तुझे कृपेसाठीं मी बोलतों।।११.१२७।।
पाठी थापटावयामिसें जाण। करीत स्वशक्तिसंचरण।

तेणें अद्वयबोधलक्षण। उद्धवासी जाण प्रकाशी।।१२८।।
तेवीं गुरुकृपाउजियेडें। ज्याचें लिंगदेह विघडे।
त्यासी परमात्म्यासी ऐक्य घडे। येर बापुडे देहबंदीं।।१५२।।
बाप भाग्य उद्धवाचें। सगुणनिर्गुण दोहींचें।
सुख भोगीतसें साचें। हें श्रीकृष्णकृपेचें महिमान।।२१.५२३।।
जेथ सद्गुरुकृपा संपूर्ण। तेथ शिष्याची आवडी प्रमाण।
तो जैं मागे मूर्ति सगुण। तैं तेचि जाण गुरु दे।।५२४।।
पाहिजे निर्गुण निजप्राप्ती। ऐशी आवडी ज्याचें चित्ती।
तें निर्गुणाचिये निजस्थितीं। गुरुकृपा निश्चितीं नांदवी।।५२५।।
सगुण निर्गुणे स्वरूपें दोनी। भोगावया आवडी ज्याचें मनीं।
तेही स्थितीच्या गुरु दानीं। कृपाळूपणें समर्थ।।५२६।।
सद्गुरूचें अगाध महिमान। जें वेदा न बोलवेचि जाण।
त्याची कृपा झालिया पूर्ण। दुर्लभ कोण पदार्थ।।५२७।।
ते कृष्णकृपेस्तव जाण। फिटलें उद्धवाचें दुर्लभपण।
सगुण निर्गुण एक कृष्ण। हे खूण संपूर्ण बाणली।।५२८।।
कोटीकोटी साधनें करितां। गुरुकृपेवीण सर्वथा।
हे न ये कोणाचे हातां। जाण तत्त्वतां उद्धवा।।५३८।।
ते गुरुकृपेलागीं जाण। आचरावे स्वधर्म पूर्ण।
करावें गा शास्त्रश्रवण। वेदपठण तदर्थ।।५३९।।
ते कृपेलागीं आपण। व्हावें दीनाचेंही दीन।
धरितां संतांचें चरण। स्वामीं जनार्दन संतुष्टे।।५४०।।
गुरु संतुष्टोनि आपण। करवी भागवत निरूपण।
एका विनवी जनार्दन। कृपा नित्य नूतन करावी।।५४१।।

श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराजांनीही **"दासबोध"** या ग्रंथात उपरोक्त संतांप्रमाणेच श्रीसद्गुरुकृपेचा महिमा सांगताना असे म्हटले आहे की -

सद्गुरुकृपेविण कांहीं। भवतरणोपाय नाहीं।
याकारणें लवलाही। सद्गुरुपाय सेवावे।।४.४.४।।
सद्गुरूविण ज्ञान कांहीं। सर्वथा होणार नाहीं।
अज्ञानप्राणी प्रवाहीं। वाहतचि गेले।।५.१.२१।।
तरी सद्गुरुकृपेविरहित। सर्वथा न घडे स्वहित।
यमपुरीचा अनर्थ। चुकेना येणें।।३४।।

जंव नाहीं ज्ञानप्राप्ती। तंव चुकेना यातायाती।
गुरुकृपेवीण अधोगती। गर्भवास चुकेना।।३५।।
ध्यान धारणा मुद्रा आसन। भक्तिभाव आणि भजन।
सकळही फोल ज्ञान। जंव तें प्राप्त नाहीं।।३६।।
सद्गुरुकृपा न जोडे। आणि भलतीकडे वावडे।
जैसे आंधळें चांचरूनी पडे। गारी आणि गडदरा।।३७।।
आतां सद्गुरु ते कैसे। नव्हेत इतरा गुरू ऐसे।
जयांचे कृपेनें प्रकाशें। शुद्ध ज्ञान।।४५।।
जे नेणवें पुराणीं। जेथें शिणल्या वेदवाणी।
तेंचि आतां येच क्षणीं। बोधीन गुरुकृपें।।५.६.३२।।
पाहिलें नसतां संस्कृतीं। रीग नाहीं महाराष्ट्र ग्रंथी।
हृदयीं वसिल्या कृपामूर्ती। सद्गुरु स्वामी।।३३।।
आतां न लगे संस्कृत। अथवा ग्रंथ प्राकृत।
माझा स्वामी कृपेसहित। हृदयीं वसे।।३४।।
न करितां वेदाभ्यास। अथवा श्रवणसायास।
प्रयत्नेंवीण सुरस। सद्गुरुकृपा।।३५।।
सद्गुरुकृपा कळे त्यासी। जो शोधील आपणाशीं।
पुढे कळेल अनुभवासी। आपोआप वस्तु।।६.१०.११।।
सद्गुरुकृपेस्तव। झाला संसार वाव।
ज्ञान झालिया ठाव। पुसे अज्ञानाचा।।३७।।
आतां आठवीन समर्था। सद्गुरुसी।।७.१.११।।
जयाचेनि कृपादृष्टी। होय आनंदाची वृष्टी।
तेणें गुणें सर्व सृष्टी। आनंदमय।।१२।।
सद्गुरुकृपा तेचि किल्ली। जेणें बुद्धि प्रकाशली।
द्वैतकपाटें उघडलीं। एकसरां।।७.२.१५।।

श्रीसंत तुकाराममहाराजांनी तर आपल्यावर श्रीसद्गुरुकृपा कशी झाली हे **"सद्गुरुरायें कृपा मज केली। परि नाहीं घडली सेवा कांहीं।।१।। सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना। मस्तकीं तो जाणा ठेविला कर।।२।।"** अशा प्रकारे कथन करून स्पर्शदीक्षेचे वर्णन केले आहे. श्रीसद्गुरू किंवा श्रीसंतकृपेचे त्यांनी पुढील काही अभंगातून जे वर्णन केले आहे ते पाहण्यासारखे आहे. ते असे म्हणतात की -

श्रीसंतांचिया माथा चरणांवरी। साष्टांग हें करी दंडवत।।१।।
विश्रांति पावलों सांभाळ उत्तरीं। वाढलें अंतरीं प्रेमसुख।।२।।
डौरली हे काया कृपेच्या वोरसें। नव्हे अनारिसें उद्धरलों।।३।।
तुका म्हणे मज न घडतां सेवा।
पूर्वपुण्यठेवा वोढवला।।४।१९२७।।

❄ ❄ ❄ ❄ ❄

पायांच्या प्रसादें। कांहीं बोलिलों विनोदें।।१।।
मज क्षमा करणें संतीं। नव्हे अंगभूत युक्ती।।२।।
नव्हे हा उपदेश। तुमचें बडबडलों शेष।।३।।
तुमचे कृपेचें पोसणें। जन्मोजन्मीं तुका म्हणे।।४।२१३३।।

❄ ❄ ❄ ❄ ❄

आपुलिया बळें नाहीं मी बोलत। सखा कृपावंत वाचा त्याची।।१।।
साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी। शिकविता धणी वेगळाची।।२।।
काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें। परी त्या विश्वंभरें बोलविलें।।३।।
तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा।
वागवी पांगुळा पायावीण।।४।२९८२।।

अशा प्रकारे अनेक संतांची वचने उधृत करून श्रीसद्गुरुकृपेचा महिमा स्पष्ट करता येईल; परंतु विस्तारभयास्तव तसे करणे योग्य ठरणार नाही. उपरोक्त सर्व विवेचनाचा अर्थ श्रीसद्गुरुकृपा म्हणजे शक्तिपात होणे अपरिहार्य आहे हाच आहे. आपल्याला निमित्त करून या ग्रंथाच्या रूपाने श्रीनिवृत्तिनाथ-महाराजांची कृपा तर शब्दरूपाने साकार झालीच; पण श्रीमद्भगवद्गीतेचा भावार्थ स्पष्ट होऊन श्रीसद्गुरुकृपा म्हणजे सिद्धयोगाचे सोपे साधन होय, हे त्यांनी जगाला दाखवून उपलब्ध करून दिले असे **"एथ श्रवणाचेनि द्वारें। तीर्थीं रिघतां सोपारें। ज्ञानदेवो म्हणे दातारें। माझेनि केलें।।११.८।।"** या रीतीने सांगितले म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी स्पष्ट केले आहे. **"मग तेथ आपण। एकाग्र अंतःकरण। करूनि सद्गुरुस्मरण। अनुभविजे।।६.१८६।।"** हे सांगताना श्रीसद्गुरुकृपा व सिद्धयोगसाधन हे कसे एकरूप आहेत हेच त्यांना साधकाच्या मनावर ठसवावयाचे आहे. या साधनाच्या फलस्वरूपात श्रीसद्गुरुकृपेचा महिमाही अंतर्निहित असल्यामुळे तो सांगताना ते असे म्हणतात की -

तें वेळीं आपणपेयां सहितें। इयें अशेषेंही भूतें।

माझ्या स्वरूपीं अखंडितें। देखसी तूं।।४.१६९।।
ऐसें ज्ञानप्रकाशें पाहेल। तैं मोहांधकारु जाईल।
जैं गुरुकृपा होईल। पार्था गा।।१७०।।
तैसें दुर्भेद जे अभिप्राय। कां गुरुगम्य हन ठाय।
तेथ सौरसेंवीण जाय। बुद्धि तयाची।।६.४५९।।
जयां सद्गुरुतारू फुडें। जे अनुभवाचे कांसे गाढे।
जयां आत्मनिवेदनतरांडें। आकळलें।।७.९८।।
येणें उपायें मज भजले। ते हे माझी माया तरले।।१०२।।
तैसीच गुरुकृपा उखा उजळली। ज्ञानाची वोतपली पडली।
तेथ साम्याची ऋद्धि उघडली। तयाचिये दिठी।।७.१३१।।
ते वेळीं आत्मानंदें आघवें। जें सदा वसतें बरवें।
तें तैसेंचि पाटण पावे। गुरुकृपेचें।।१६.४४२।।
ते सत्त्वशुद्धी साहाकारें। गुरुकृपामृततुषारें।
सासिन्नलेनि बोधें वोसरे। द्वैतदैन्य।।१८.२५९।।
परी हेचि आत्मसिद्धि। जो कोणी भाग्यनिधि।
श्रीगुरुकृपालब्धि-। काळीं पावे।।९८४।।

श्रीसद्गुरुकृपेने म्हणजे शक्तिपाताने जागृत झालेल्या कुंडलिनी शक्तीमुळेच उपरोक्त सर्व फले साधकाला प्राप्त होऊन तो कृतार्थ होतो. ही सर्व फलनिष्पत्ती एकमात्र श्रीसद्गुरुकृपांतर्गतच आहे असा निर्वाळा सकल शास्त्रकारांनी एकमुखाने दिला आहे. "**श्रीगुरुनाथस्य सर्वकारणकारणम्।।१४।।**" असे "**श्रीकाश्यपसूत्रे**" या ग्रंथात म्हटले आहे. श्रीसद्गुरू हे सर्व कारणांचे व त्यांच्या परिणामांचे कारण असून त्यांची एकमात्र कृपाच फक्त मुक्ती देऊ शकते हे नितांत सत्य आहे. या दृष्टीनेच महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथांनी "**श्रीगोरक्षसिद्धान्तसंग्रह**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**अस्मिनमार्गे सर्वश्रेयोमूलभूतो गुरुरेव (पृ. १) भो पुरुषः! गुरुहीनानां तेषां कष्टं भवेत्; तदा तादृशः पूर्वोक्तः पूर्णो गुरुर्लभ्येत तदा महदपि कष्टं स्वल्पं भवेत्। तत्र दृष्टान्तः यथा महाभारयुक्ता या शिला भवेत् तस्या उत्थापने सहस्राणामपि पुरुषाणां कष्टं भवेत्, सा च बुद्धिमता पुरुषेण कृतकाष्ठादियत्नेनाप्रयासेनैवोत्थाप्यते, तथा गुरुमय्या कुञ्चिकया स्वल्पेनापि कष्टेन सहजसिद्धिर्भवति, यदि च महत्कष्टमपि भवेत् तदा कष्टोत्तरे तु महानानन्दो भवत्येव यस्त्वखण्डैकनाथरूपो भवति। (पृ.१२) स च योगो गुरुकृपया-**

ऽल्पश्रमेणैव प्राप्तो भवेदतोऽन्यत्सर्वं परित्यज्य योग एव सेवनीयः।" **(पृ.१६)** याचा अर्थ असा आहे की, या सिद्धयोगमार्गामध्ये सर्व कल्याणाचे मूळ श्रीसद्गुरूच आहेत. हे साधकांनो! जे लोक श्रीसद्गुरुविरहित असतात त्यांना निश्चितच खूप कष्ट पडतात. जर पूर्वी सांगितल्याप्रमाणे शांकरी विद्या जाणणारे म्हणजे शक्तिपात करणारे श्रीसद्गुरू मिळाले तर अत्यंत महान् कष्टही अत्यंत स्वल्प होतात. काही विशेष युक्तीशिवाय किंवा गोल गोल लाकडांच्या आधाराशिवाय जर खूप मोठी शिला हलविण्याचा प्रयत्न केला तर हजारो पुरुषांनाही ती शिला हलत नाही व खूप कष्ट होतात. मात्र एखाद्या बुद्धिमान पुरुषाने सांगितलेल्या युक्तीमुळे लाकडांच्या व आधारांच्या साहाय्याने ती शिला सहज हलविता येते. याच प्रकारे श्रीसद्गुरुदेवांनी सांगितलेल्या युक्तीच्या किल्लीने अत्यंत थोड्या कष्टात खूप मोठी सिद्धी म्हणजे ब्रह्मज्ञान प्राप्त होते. ही सिद्धी प्राप्त होताना जे कष्ट होतात ते खूप कष्ट आहेत असे जरी मानले तरीसुद्धा त्या कष्टांनंतर खूप मोठा आनंद साधकाला प्राप्त होतो. जरी श्रीसद्गुरूंची थोडीही कृपा झाली तरी अत्यंत अल्प परिश्रमात या सिद्धयोगाची प्राप्ती होते. यासाठी इतर सर्व गोष्टी सोडून देऊन योगाचाच अभ्यास केला पाहिजे. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्येही महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथांनी सिद्धयोगसाधनशास्त्राचा अमर सिद्धान्त पुढील शब्दात ग्रथित केला आहे. ते असे म्हणतात की -

यदुक्तं मयैव श्रीपादुकोदये।
गुरुमत्तैव नः शास्त्रे परमं फलमुच्यते।। (पृ. १७०)

"**श्रीपादुकोदय**" या ग्रंथात मीच असे सांगितले आहे की, श्रीसद्गुरू करणे हेच आमच्या या सिद्धयोगशास्त्रातील श्रेष्ठ फल (किंवा अंग) होय. श्रीसद्गुरुकृपेचा हा महिमा "**श्रीगुरुगीता**" या ग्रंथात श्रीशंकरांनी पार्वतीला स्वतःच सांगताना असे म्हटले आहे की -

अखण्डमण्डलाकारं व्याप्तं येन चराचरम्।
तत्पदं दर्शितं येन तस्मै श्रीगुरवे नमः।।६७।।
अज्ञानतिमिरान्धस्य ज्ञानाञ्जनशलाकया।
चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्री गुरवे नमः।।३४।।
न गुरोरधिकं तत्त्वं न गुरोरधिकं तपः।
तत्त्वज्ञानात्परं नास्ति तस्मै श्रीगुरवे नमः।।७४।।
गुरुरादिरनादिश्च गुरुः परमदैवतम्।

गुरोः परतरं नास्ति तस्मै श्रीगुरवे नमः।।७७।।
ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम्।
मन्त्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोः कृपा।।७६।।
गुरोः कृपाप्रसादेन आत्मारामो हि लभ्यते।
अनेन गुरुमार्गेण आत्मज्ञानं प्रवर्तते।।११०।।

जे अखंड मंडलाकार रूप धारण करून हे सारे चराचर विश्व व्यापून राहिलेले आहेत व जे परमात्म्याच्या परमपदाचे दर्शन घडवून आणतात अशा श्रीसद्गुरूंना नमस्कार असो. अज्ञानरूपी तिमिराने अंध झालेल्या व्यक्तीचे नेत्र ज्ञानरूपी अंजनशलाकेच्या द्वारे जे उघडतात तेच खरे श्रीसद्गुरू होत. अशा श्रीसद्गुरुदेवांना नमस्कार असोत. श्रीसद्गुरुतत्त्व हे सर्वात श्रेष्ठ आहे; कारण श्रीसद्गुरूंहून दुसरे मोठे तत्त्व नाही. श्रीसद्गुरुसेवा व श्रीसद्गुरु-भक्तीहून श्रेष्ठ असे दुसरे तप नाही म्हणजे कोणतेही तप श्रीसद्गुरूंपेक्षा श्रेष्ठ नाही. श्रीसद्गुरुतत्त्वज्ञानाहून दुसरे कोणतेही तत्त्वज्ञान या जगात श्रेष्ठ नाही. अशा श्रेष्ठ श्रीसद्गुरूंना नमस्कार असो. श्रीसद्गुरूच सर्वांचे उगमस्थान आहेत. तेच आदि किंवा प्रथमपासून आहेत. त्यांच्याहून आदि असे दुसरे काहीच नाही. याचा अर्थ श्रीसद्गुरूंना स्वतःला दुसरे उगमस्थान नाही. श्रीसद्गुरुतत्त्व स्वयंभू आहे. श्रीसद्गुरूच परमदैवत आहेत. श्रीसद्गुरूंहून दुसरे श्रेष्ठ काही नाही. अशा श्रीसद्गुरूंना नमस्कार असो. श्रीसद्गुरुमूर्तीचे ध्यान हे सर्व ध्यानाचे मूळ किंवा आधारस्थान आहे. श्रीसद्गुरूंच्या चरणकमलांची पूजा हीच सर्व पूजांचे मूळ आहे. श्रीसद्गुरुवाक्य हे सर्व मंत्रांचे मूळ आहे व श्रीसद्गुरूंची कृपा हेच मुक्ती प्राप्त करण्याचे प्रमुख साधन आहे. केवळ श्रीसद्गुरुकृपेच्या सामर्थ्यानेच आत्मारामपदाचा लाभ होतो. श्रीसद्गुरुमार्गाचा अवलंब केल्यानेच आत्मज्ञानाचा उदय होतो.

सारांश, परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामी-महाराज यांनी "**श्रीवृद्धशिक्षा**" या प्रकरण ग्रंथात म्हटल्याप्रमाणे "**विशारदं ब्रह्मनिष्ठं श्रोत्रियं गुरुमाश्रयेत्।।६।।**" अशा श्रीसद्गुरूंनाच शरण जावे. "**श्रीवृद्धशिक्षा**" या ग्रंथातील उपरोक्त श्लोकावर टीका करताना स्वतः श्रीटेंबेस्वामीमहाराजच असे म्हणतात की, मुमुक्षूने शब्दब्रह्म व परब्रह्म-निष्णात म्हणजे दृष्टान्तादिकांनी व शक्तिपाताने सर्वानर्थमूळ अज्ञान निवृत्त करणाऱ्या समर्थ अशा श्रीसद्गुरूंचा आश्रय करावा. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या श्रीसद्गुरुकृपेच्या महिमाकथनाचे हे सार आहे. किंबहुना महिमा किंवा स्तुती

सांडून श्रीसद्गुरुचरणांवर माथा ठेवणे हेच श्रीसद्गुरुकृपेच्या महिम्याचे सार असल्यामुळे व "**द्रष्टा श्रीगुरुमूर्ती। न रिगता दृश्यपंथीं। तरी कां ह्या उपास्ती। आकळता तो?।।१८.१७०४।।**" अशी त्यांची नितांत धारणा असल्यामुळे ते असे म्हणतात की -

तैसें श्रीगुरूचें महिमान। आकळितें कें असे साधन?।
हें जाणोनि मियां नमन। निवांत केलें।।१०.१३।।
जरी प्रज्ञेचेनि आथिलेपणें। श्रीगुरुसामर्थ्या रूप करूं म्हणे।
तरि ते मोतियां भिंग देणें। तैसें होईल।।१४।।
कां साडेपंधरया रजतवणी। तैशीं स्तुतींचीं बोलणीं।
उगियाचि माथा ठेविजे चरणीं। हेंचि भलें।।१५।।
यालागीं आतां। स्तुति सांडूनि निवांता।
चरणीं ठेविजे माथा। हेंचि भलें।।१४.१५।।

श्रीसद्गुरूंच्या चरणांवर माथा ठेवल्यावर त्यांच्या कृपेचे महिमान हृदयात कसे प्रस्फुटित होते हे ज्यांनी अनुभवले आहे त्यांनाच यातील रहस्य हृदयंगम होईल हेच खरे!"

श्रीसद्गुरुकृपेने प्राप्त होणाऱ्या साधनाचे किंवा उपासनेचे स्वरूप सर्वार्थाने उच्चस्तरीय व परपातळीवर असल्याने त्यासंबंधी प्रस्तुत ग्रंथात महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथांनी असे म्हटले आहे की, "आत्मचिंतनाच्या बाबतीत विधिनिषेधाचे प्रयोजनच सिद्ध होऊ शकत नाही. आत्मा अथवा परमात्मा सर्व व्यापक आहे व त्याचे चिंतन हाच सर्वांसाठी विधी आहे. ज्या परमतत्त्वात मन पूर्ण विश्रांतीचा अनुभव घेते तेच त्याच्यासाठी श्रेयस्कर असून तीच रुची म्हणजे साधन आहे, (पृ. २२-२३) सामान्य लोकांनी जी प्रायश्चित्त-स्वरूप शुद्धी सांगितली आहे ती शुद्धी शंभुदर्शनात अशुद्धीच होय. त्यामुळे कल्पनात्याग ही खरी शुद्धी होय. (याकरिता) माणसाने निर्विकल्प व्हावे, (पृ. २४) प्राणिमात्र ज्या कर्मांमुळे म्हणजेच कुंडलिनी शक्तीच्या बहिर्मुख गतीमुळे नरकात पडतात त्याच कर्मांमुळे म्हणजे कुंडलिनी शक्तीच्या अंतर्मुख गतीमुळे अर्थात् ते वर म्हणजे सहस्त्रारात येतात व त्रिकालज्ञानी होतात, (पृ. २४) आत्म्याला संसारी जीव असे म्हटले जाते. हा भ्रममोह म्हणजेच अज्ञान घालविण्याकरिता चांगल्या श्रीसद्गुरुचरणांची पूजादि सेवा उपाय अर्थात् साधन म्हणून सांगितली आहे, (पृ. २६) विश्वाला स्वतःत सामावून घेणे हे विवक्षित नसून विश्वाला स्वतःत खेचून घेणे हे विवक्षित व योग्य आहे, (पृ. ३८)

"**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथामध्ये असलेल्या "**उद्यमो भैरवः।**" या सूत्राने अर्थात् "श्रीसद्गुरुकृपेने अर्थात् शक्तिपातयोदीगक्षेने अनादिनिद्रिस्थ आत्मचैतन्यशक्ती कुंडलिनी जागृत होऊन सिद्धयोगाचे आतून स्वतः होणारे साधन होऊ देणे हाच उद्यम असून त्यामुळे जागृत कुंडलिनी शक्ती सुषुम्नागामी होऊन अंतिमतः साधकभक्तयोगी सहस्त्रारात श्रीभैरव अर्थात् श्रीशिवरूप होतो," यालाच स्वहृदय उद्योग असे संबोधिले आहे. यालाच स्वच्छंदत्व किंवा स्वातंत्र्य असेही म्हणतात, (पृ. ३९) साधकयोग्याने हे अखिल विश्व भुवनापासून क्रमाक्रमाने सहाही मार्गरूपाने ध्यानात आणावे म्हणजेच या विश्वाचे स्थूल, सूक्ष्म व पर अशा क्रमाने ध्यान करावे व मनोलय होईपर्यंत ध्यानसातत्य ठेवावे, (पृ. ७५) स्वात्मरूप परमेश्वर हीच अंतःश्चक्र देवता आहे. स्वात्मरूप परमेश्वराच्या या स्वशरीररूप महापीठात त्याचे अर्चन म्हणजे पूजा होत असते. स्वात्मरूप श्रीपरमेश्वर चक्रदेवता आहेत आणि करणशक्ती त्याच्या आवरण देवता आहेत, (पृ. ८५-८६) आणि स्वरांशिवाय प्रकट होणारा महच्छशरीरी, क्रमरहित व सर्वांचा श्रीसद्गुरू असलेला असा हा अनाहतनाद ईश्वराच्या ठिकाणचे स्मरणरूप स्फुरण आहे." (पृ. १०२)

ज्याप्रमाणे मत्स्यजालाचे सर्व धागे एका मोठ्या सूत्रात एकत्रित केलेले असतात त्याप्रमाणे कुलार्णवगत ज्ञान पादुकात साठविलेले किंवा प्रतिष्ठित झालेले आहे, (याकरिताच श्रीसद्गुरूंच्या पादुकांची उपासना करावी;) कारण पादुका हीच पराशक्ती आहे. या दृष्टीने शास्त्रात असे म्हटले आहे की, "**परा-परात्मना स्वात्मनः परानन्दमयी स्वव्यतिरेककवलोद्युक्ता परा शक्तिः पादुकेति गीयते।**" अर्थात् "पर म्हणजे श्रेष्ठ व अपर म्हणजे कनिष्ठ अशी स्वस्वरूपावाचून सर्वांचा ग्रास करण्यासाठी उद्युक्त झालेली किंवा समर्थ असेलेली अशी आनंदमयी परब्रह्मशक्ती म्हणजे पादुका होय." (पृ. १०२) आत्मशक्तीचे प्रकाशन किंवा संप्रयोग अथवा परामर्श अर्थात् चिंतन म्हणजेच सिद्धयोगाचे श्रीसद्गुरुकृपेने अनादिनिद्रिस्थ आत्मचैतन्यशक्ती कुंडलिनी जागृत होऊन तिच्या द्वारा आपोआप होणारे सिद्धयोगाचे साधन हीच उपासना आहे आणि अशा प्रकारची उपासना या लोकामध्ये तरी दुर्लभ आहे. विश्वपती परमेश्वराच्या पूजेसाठी आसव अर्थात् मध, तांबूल, गंध व फले इत्यादि सर्व द्रव्ये तर सहजपणे मिळू शकतात, (पृ. ११२) खरोखर आत्मबल हेच मंत्र आहेत, (पृ. ११३) हृदयाची जी संवेद्यविमर्श शक्ती अर्थात् संविज्ञान शक्ती आहे. तीच मंत्र आहे. ती मननरूप आणि प्राणरूप असल्यामुळे तिचीच

उपासना करणे आश्यक आहे, (पृ.१ २९) आपल्या सत्त्वाचे पर्यालोचन अथवा चिंतन करण्यात स्वसामर्थ्यरूप विभवात आत्मा शांत झाल्यावर बाह्यवृत्तींचा उच्छेद होणे म्हणजेच प्राणांचे संयम करणे यालाच प्राणायाम समजले पाहिजे. (पृ. ११६) (साधकभक्तयोगिशिष्यांनी "सोऽहं" या मंत्राचा श्वास आत घेताना "सो" व श्वास बाहेर सोडताना "हं" असे म्हणून ध्यानोपासना करावी. अशा प्रकारे उपासना करून त्याने) "स"कार व "ह"काराहून पलीकडे, शून्य, सच्चिदानंदस्वरूप व अलख निरंजन परमात्मतत्त्वात मनाचे उन्मन अर्थात् मन नाहीसे करून "सोऽहं" स्वरूपात प्रतिष्ठित झाले पाहिजे, (पृ. १४५) (साधकभक्तयोगिशिष्यांनी आहे त्या स्थितीत राहून) विश्वग्रास करून स्वानंदानुभवात मग्न राहावे (पृ. १६६) आणि ज्याप्रमाणे तुमची स्थिती आहे त्याप्रमाणे तुम्ही निश्चित अथवा अव्याकुल होऊन प्रतिष्ठित अथवा स्थिर व्हा हाच विवेक आहे. (पृ. १६६)

महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ यांनी **"श्रीमहार्थमंजरी"** या ग्रंथात वर वर्णिलेल्या ज्या विविध उपासना कराव्या म्हणून सांगितल्या आहेत त्या सिद्धयोगमार्गात श्रीसद्गुरुकृपेने अर्थात् शक्तिपातयोगदीक्षेने आत्मचैतन्यशक्ती कुंडलिनी जागृत झाल्यावर तिच्याकडून होणाऱ्या स्वतःसिद्ध सिद्धयोगसाधनामुळे साधकभक्तयोगिशिष्याच्या अंतरात त्याच्या पूर्वजन्माच्या संस्कारामुळे व पात्रतेमुळे आपोआपच होत असतात. त्यामुळे त्या स्वतंत्रपणे करण्याची आवश्यकता राहत नाही. या दृष्टीने **"श्रीस्पंदशास्त्र"** या ग्रंथाच्या प्रस्तावनेत प्रस्तुत लेखकाने असे म्हटले आहे की -

अशा प्रकारे मंत्रद्वारा किंवा अनुपाय प्रक्रियेद्वारा श्रीसद्गुरूंकडून शक्तिपात होऊन सिद्धयोगाचे कुंडलिनी शक्तीकडून आतून सहजपणे स्वतः चालणारे साधन सुरू होणे व साधकाने ते प्रयत्नाभ्यासपूर्वक दीर्घकाल, निरंतर व श्रद्धाभक्तिसत्कारपूर्वक करणे नितांत आवश्यक असून, त्यामुळेच सिद्धयोग साधक स्पंदांवर आरूढ होऊन किंवा विचाराने दोन स्पंदांमधील अनुत्तर मुक्त स्थितीत विलीन होऊन अंतिम सिद्धीची प्राप्ती करून घेतो. हेच तत्त्व सिद्धान्तरूपाने आपल्या शब्दात सांगताना महामहोपाध्याय श्रीगोपीनाथ कविराज यांनी **"भारतीय संस्कृति और साधना"** खंड पहिला यातील काही लेखांच्या शेवटी असे म्हटले आहे की -

"शक्तिपाताशिवाय म्हणजे भगवंताची कृपा झाल्याशिवाय कोणताही जीव पूर्णत्व प्राप्त करू शकत नाही. इतकेच काय; तो पूर्ण प्राप्त करण्याच्या

(सुषुम्ना) मार्गात प्रवेश देखील करू शकत नाही. जीवाच्या आधारशक्तीच्या अर्थात् धारणाशक्तीच्या भेदानुसार शक्तिपाताचे कमी जास्त प्रमाण दिसून येते. मात्र हेही तितकेच खरे आहे की, जीव कितीही सामान्य कोटीतील असला आणि भोग, वासना, आकांक्षा इत्यादींनी कितीही गुरफटलेला असला तरी एकदा त्याच्यावर शक्तिपात झाला की, तो श्रेष्ठ अशा ब्रह्मपदाला अवश्य पोहोचतो. मात्र भोगाकांक्षादि विक्षेपांमुळे जीवाच्या परमपदाला जाण्याच्या गतीत अडथळा उत्पन्न होतो. जर शक्तिपाताची मात्रा तीव्रातितीव्र असेल व आडवे येणारे विक्षेप जर नसतील तर अत्यंत शीघ्र गतीने म्हणजे क्षणभरात-सुद्धा जीव परमपदाला जाऊन पोहोचतो. शक्तिपातयोगदीक्षेच्या वेळी योग्या-योग्यतेचा विचार केला जात नाही. मात्र जीवाच्या मुळातील योग्यतेनुसारच शक्तिपाताचे प्रमाण स्वाभाविकपणे निश्चित होत जाते. परंतु प्रमाण जरी काहीही असले तरी भगवंताच्या शक्तीचा महिमा इतका मोठा आहे की, एकदा का होईना श्रीसद्गुरूंकडून ही शक्ती साधकात संक्रमित झाली की, ती त्या जीवाला भगवंताच्या घरी अर्थात् सहस्रारातील श्रीशिवपदाला किंवा ब्रह्मपदाला पोहोचविल्याशिवाय शांत होत नाही, हे अगदी नितांत सत्य आहे." **(शक्तिपातरहस्य - पृ. २३७)**

"शक्तिपात होऊन कुंडलिनीशक्ती जागृत झाल्याशिवाय ब्रह्मप्राप्तीच्या महान् मार्गाच्या वाटचालीला सुरुवातही होत नाही. मग ब्रह्मप्राप्तीची गोष्ट तर फारच दूरची आहे. शक्ती जागृत होणे हाच मनुष्य जीवनाचा खरा उद्देश आहे. केवळ अपूर्ण कैवल्य प्राप्त करून जन्ममृत्यूच्या चक्रात सापडून वरच्या दर्जाचे स्थान प्राप्त करणे हे मनुष्य जीवनाचे ध्येय असूच शकत नाही. आपली सुप्त भगवच्छक्ती जोपर्यंत पूर्णपणे जागृत होत नाही तोपर्यंत मनुष्य जीवनाचे खरे सार्थक होत नाही. कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याशिवाय जड व चैतन्य यातील संघर्ष समाधानकारकपणे संपत नाही. विवेकज्ञानाचा उपयोग हा या मार्गाची वाटचाल सुरू करण्याची पहिली पायरी म्हणून ठीक आहे; परंतु शक्तीची साधना केल्याशिवाय श्रीशिवभावाची प्राप्ती होणे अत्यंत कठीण आहे." **(शक्ति का जागरण- पृ. ३२२)**

अशा प्रकारे पिंडब्रह्मांडाची संहारणी होऊन साधकाला ज्या तत्त्वज्ञानाची म्हणजे अंतिम स्थितीची, मोक्षाची, कैवल्याची, अमात्रक स्थितीची, स्वस्पंद-स्थितीची किंवा श्रीशिवशक्तिसामरस्याची प्राप्ती होते त्या स्थितीचे किंवा अवस्थेचे वर्णन श्रीस्पंदशास्त्रकारांनी कसे केले आहे ते पाहू.

श्रीस्पंदशास्त्रकारांनी या श्रीशिवशक्तिसामरस्याचे वर्णन "अभेदोपलब्धी" या नावाने केले असून याचे वर्णन करताना श्रीसंत तुकाराममहाराजांनी असे म्हटले आहे की -

लवण मेळवितां जळे। काय उरलें निराळें।।१।।
तैसा समरस जालों। तुजमाजीं हरपलों।।२।।
अग्निकर्पूराच्या मेळीं। काय उरली काजळी।।३।।
तुका म्हणे होती। तुझी माझी एक ज्योती।।४।।

श्रीस्वात्मारामयोगींद्र यांनीही उपरोक्त दृष्टान्ताच्याच आधारे श्रीशिवशक्तिसामरस्याची स्थिती किंवा आत्मोपलब्धी म्हणजेच समाधी होय, हे सांगताना "**श्रीहठयोगप्रदीपिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "ज्यावेळी मीठ पाण्यात पडून विरघळते त्यावेळी ते पाण्याशी एकरूप होते. त्याचप्रमाणे ज्यावेळी मनरूपी जीव किंवा शक्ती आत्मरूपाशी अर्थात् स्पंदरूप श्रीशिवांशी म्हणजे चैतन्याशी एकरूप होते त्यावेळी त्या अवस्थेला समाधी असे म्हणतात. ज्यावेळी प्राणांची गती क्षीण होते व मनाचाही लय होतो त्यावेळी जी समरस अवस्था उपस्थित होते त्याला समाधी असे म्हणतात. जीवात्मा व परमात्मा यांच्या उपरोक्तप्रकारे होणाऱ्या ऐक्याला समता म्हणतात. या समतेच्या अवस्थेत सर्व संकल्प पूर्णपणे नष्ट होत असल्याने यालाच समाधी असे म्हणतात." (४.५, ६, ७)

अशी ही एकरस, अनवच्छेद्य, अभेद्य, अपूर्व, अपरंपार, अकथनीय एकमेवाद्वितीय, अलौकिक व अनुत्तर अवस्था आहे; कारण या अवस्थेत एकाचवेळी ज्ञान व भक्ती आणि चित् व आनंद यांचा समावेश झालेला दृष्टीस पडतो. या अवस्थेत ज्ञान व भक्ती ही एकाकार होते. स्वसंवेद्य आत्मरूपाची ही अवस्था असल्याने ज्ञानाची अंतिम सीमा व प्रेमाची पराकाष्ठा येथे पाहावयास मिळते. ही समन्वयाची भूमी असल्याने येथेच द्वैताद्वैताचे सामंजस्य झालेले दृष्टीस पडते. या ठिकाणी श्रीशिव व शिक्ती पूर्णपणे एकरस होत असल्याने येथे श्रीशिवांचे अगर शक्तीचे प्राधान्य असत नाही. हीच खरी साम्यावस्था होय. यालाच श्रीशिवशक्तीचे सामरस्य असे म्हणतात. या समरस अवस्थेलाच अद्वयअवस्था किंवा अभेदावस्था म्हटले जाते. या अवस्थेत दोन किंवा अनेकांचे वैषम्य तर नाहीसे होतेच; परंतु विषमतेचे बीजही राहत नाही. ही चिदानंदमयी अद्वैतनिष्ठा आहे यात काहीही शंका नाही. ही अवस्था बुद्धीच्या, विचाराच्या किंवा ध्यानाच्या पलीकडे असून ती अव्यक्त व स्वयं-

प्रकाश आहे.

या श्रीशिवशक्तीच्या ऐक्यासंबंधी व अंतिम सामरस्यसिद्धीसंबंधी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथात महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ यांनी असे म्हटले आहे की, कुलरहित अशा या देवाचे म्हणजे श्रीशिवांचे कुल विस्तृत करणारी अशी कौलिकी नामक श्रेष्ठ शक्ती आहे. तिला सोडून प्रभू वेगळे राहू शकत नाहीत. (पृ. ४१) जगद्धारकाची जी शक्ती त्याच्याशी समवायसंबंधाने म्हणजेच त्याच्याशी नित्यसंबंधाने समरस असते. ती सृष्टी करण्याची इच्छा असणाऱ्या श्रीशिवांची इच्छा होते. (पृ. ४२) अहंता ही श्रीशिवशक्तिरूप आहे. (पृ. ४४) श्रीशिव आणि शक्ती ही दोन्हीही एकरूप किंवा समरसच आहेत. त्यांच्यातील भेद हा काल्पनिक आहे. (पृ. ६९) उन्मेष व निमेष या दोन्ही शक्तींचा मिळून अनुभूती चमत्कार म्हणजे श्रीशिवांचा स्वभाव अर्थात् "स्व" म्हणजे श्रीशिव व "भाव" म्हणजे शक्ती अर्थात् त्यांचे सामरस्य होय. (पृ. ७४) आणि "**न शिवेन विना शक्तिर्न शक्तिरहितः शिवः।**" अर्थात् "श्रीशिवांवाचून शक्ती नाही व शक्तीवाचून श्रीशिव नाहीत," असा नियम असल्याने प्रकाश हा विमर्श क्रियेशी अर्थात् स्फुरणरूपक्रियेशी व्यभिचरित होत नाही व विमर्श-क्रिया प्रकाशाच्या कर्तृतेशी व्यभिचरित होत नाही अर्थात् हे दोघे एकमेकाला सोडून वेगळे असू शकत नाहीत. त्यामुळे या दोघांचे शरीर हे (स्वरूप) एकत्वाचे अर्थात् अद्वैततत्त्वाचे भव्य सोभाग्यच आहे, असे तात्पर्य आहे. हे देवी! तू जशी श्रीशिवमय आहेस तसेच श्रीशिवही तन्मयच म्हणजे तत्स्वरूपच आहेत. अभिन्न अशा तुम्हा दोघांचे तत्त्व मात्र अगदी एकच आहे. हे अंतर्मुख लोकांनाच कळू शकते. या एकाच तत्त्वात हे जगद्रूप वैचित्र्य भेदरूपाने भासते. (पृ. ७७) येथपर्यंत ग्रंथकारांनी श्रीशिवशक्तींचे अनादिसिद्ध ऐक्य आहे हे स्पष्ट करून ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय, प्रकाश, अंड, पिंड, ब्रह्मांड, पूजा, परावाणी, भोग, मोक्ष व आनंद या सर्व यावत् विरुद्ध दिसणाऱ्या व भासणाऱ्या सर्व गोष्टी यामलसिद्धीने समरसच आहेत अशी अनुभूती सिद्ध-योगसाधकभक्तयोगिशिष्याला येत असल्यामुळे व हीच या "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाची अर्थात् सिद्धयोगसाधनमार्गाची अंतिम सिद्धी किंवा फलनिष्पत्ती अर्थात् सिद्धान्तरहस्य आहे हे सांगताना ग्रंथकारांनी असे म्हटले आहे की, "वेत्ता म्हणजे ज्ञाता हाच वेद्य अर्थात् जाणण्याचा विषय, वेद्य हाच वेत्ता आणि वित्ति म्हणजे ज्ञान हेच वेद्य इत्यादि सर्व गोष्टी समरसत्वाने एकरूप असतात हेच आमचे सिद्धान्त रहस्य आहे, (पृ. ८२) प्रकाशच सर्वत्र एक-

रूपतेने व समरसतेने भासत असतो, (पृ. ८५) सर्व वस्तू परमेश्वरामध्ये स्वात्मत्वयुक्त अर्थात् सहजस्फुरणरूप जो विमर्श म्हणजेच प्रत्यभिज्ञारूप-परामर्श अर्थात् आत्मस्वरूपाचे ज्ञान हेच सुगंधित पुष्प आहे; कारण ते स्वभावपोषक अर्थात् "स्व" म्हणजे श्रीशिव आणि "भाव" म्हणजे शक्ती अर्थात् श्रीशिवशक्तींचे सामरस्य घडवून आणणारे व श्रीसद्गुरुरूपच आहे, (पृ. ८८) अंड व पिंड यांचे सामरस्य करणे हेच मुख्य ध्येय आहे, (पृ. ८५) जरी विश्वमयत्व व विश्वोत्तीर्णत्व हे निराळे दिसले तरी ते समरसच असतात व याचे सामरस्य अनुभविणे हीच अंतिम फलनिष्पत्ती आहे. परा, पश्यन्ती मध्यमा व वैखरी या सर्व वाणी एकरूप आहेत असे जाणणे हेच सिद्धयोगाचे साध्य आहे. (पृ. १३०) संसाराचे सुख आतिशय आहे आणि मोक्षमार्गाचे सौभाग्यही सुलभ आहे. यांमध्ये कोणत्याही तऱ्हेचे भय नाही. हीच श्रीशिवयोग्यांची भोगमोक्ष सामरस्याने युक्त अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्यानुग्रहाने युक्त अशी सिद्धी आहे, (पृ. १६८) आनंदात सत्त्वाची व चित्त्वाची समरसता असते व तीच सिद्धयोगाची निष्पत्ती आहे. (पृ. १०५) आणि ज्यावेळी सिद्धयोग्याला यामलसिद्धी अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्यरूप महास्थिती प्राप्त होते त्यावेळी त्याला सर्व, भाव, वृत्ती, पुष्टी, द्रव्य, भूमिका, देव व वर्ण या सर्वांविषयी समता प्राप्त होते.

येथपर्यंत आपण "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथात आलेल्या विविध विषयांचे साररूपाने दर्शन घेण्याचा प्रयत्न केला. या साराचेही सार व समग्र "**श्रीमहार्थ-मंजरी**" या ग्रंथाचे सार "**क्रमदर्शन**" या एका शब्दातच साठविलेले आहे; कारण निर्विकल्प परमतत्त्वज्ञानरूप श्रीशिवशक्तिसामरस्याचा उपाय सर्व विकल्प दूर करणे हाच आहे. हे सर्व संस्कार सिद्धयोगसाधनाने म्हणजेच श्रीसद्गुरुकृपेने अर्थात् श्रीसद्गुरूंनी दिलेल्या शक्तिपातयोगदीक्षेने जागृत झालेल्या अनादिनिद्रिस्थ आत्मचैतन्य कुंडलिनी शक्तीच्याद्वारा आपोआप होणाऱ्या सिद्धयोगसाधनाने ती सुषुम्नागामी झाल्यावर विगलित होत असल्यामुळे क्रमा-क्रमाने म्हणजेच हळूहळू विलीन होतात. ही प्रक्रिया एकदम किंवा अचानक होत नाही. त्यामुळे सिद्धयोगाचे नाव क्रमदर्शन असे झाले आहे. एका अर्थाने महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ यांनी सिद्धयोगरूप क्रमदर्शनाचा व तदंगभूत क्रमपूजा, क्रमसिद्धी आणि क्रमज्ञान यांचा विविध अंगांनी, रहस्यमय रीतीने व विश्लेषणात्मक पद्धतीने सांगोपांग विचार या ग्रंथात प्रस्तुत केला आहे व यातील सर्व रहस्ये साक्षेपाने उलगडून दाखविली आहेत, असे म्हटले तर

यत्किंचितही अतिशयोक्ती होणार नाही. उपरोक्त दृष्टीने महामहोपाध्याय श्रीगोपीनाथ कविराज यांनी **"तांत्रिक वाङ्मयमे शाक्तदृष्टी"** या ग्रंथातील **"तांत्रिक पूजा का परम आदर्श"** या लेखात क्रमदर्शन, क्रमपूजा, क्रमसिद्धी व क्रमज्ञान या सर्वांचा उलगडा करताना असे म्हटले आहे की,

"अध्यात्मपथावरील प्रत्येक साधकयोग्याला पूजा, जप, ध्यान आदि विषयांचे कमी-अधिक प्रमाणात व्यावहारिक ज्ञान असतेच; कारण की, सामान्य ज्ञान झाल्याशिवाय कोणत्याही कार्यात कोणीही प्रवृत्त होणे शक्य असत नाही. संप्रदाय भेद आणि साधकयोग्याच्या अधिकारगत तारतम्यानुसार या सर्व विषयांमध्ये नाना प्रकारची विविधता असते. विभिन्न शास्त्रीय ग्रंथांमध्ये या संबंधात वर्णने आढळून येतात. येथे आम्ही विस्तृत विवरणात शिरू इच्छित नाही. येथे तांत्रिक साधनेच्या दृष्टीने पूजा आणि जप यांच्या संबंधात एक-दोन आवश्यक विषयांवर आपण विचार करू.

आता प्रथम पूजेच्या रहस्याविषयी विचार करू. साधकयोग्याने पूजा-तत्त्वाचा आदर्श आणि पूजातत्त्वाचे सूक्ष्म विज्ञान जाणून घेणे आवश्यक आहे. त्याने पूजातत्त्वाचे सम्यक ज्ञान प्राप्त करून घेतले की, तो आपल्या स्वतःच्या ठिकाणी असलेल्या श्रीशिवत्वाचा अनुभव घेऊन जीवन्मुक्तीच्या आनंदाचा आस्वाद घेऊ शकतो. वर्णन करावयाला सोपे व्हावे यासाठी तंत्रशास्त्रामध्ये देवीपूजेला सामान्यपणे उत्तम, मध्यम आणि अधम या तीन श्रेणींमध्ये विभक्त केले जाते. या तीन प्रकारच्या पूजांना काही ठिकाणी "परा," "परापरा" आणि "अपरा" असे म्हटले जाते. प्रसंगानुरूप येथे असे म्हणता येईल की, अपरा किंवा अधम पूजेपेक्षाही कनिष्ठ दर्जाची पूजा आहे. व्यवहारात सामान्यपणे ज्या प्रकारच्या पूजा प्रचलित आहेत त्या पूजा त्या त्या क्षेत्रातील अधिकारी व्यक्तींच्या आध्यात्मिक विज्ञानाच्या दृष्टीने सर्वार्थाने उपयोगी असूनही कनिष्ठ अर्थात् अधमाधम किंवा चतुर्थ श्रेणीच्या पूजेअंतर्गतच असतात, यात कोणतीही शंका नाही. यामुळे असे अनुभवाला येईल की, वर्तमान काळात जगतामध्ये आध्यात्मिक अधिकार संपत्तीचा इतका ऱ्हास झालेला आहे की, साधारणतः आपल्यामधील जास्तीत जास्त लोक सध्याच्या काळात भगवत्पूजेच्या अधमकोटीमध्ये प्रवेश करण्याला देखील योग्य राहिलेले नाहीत. जोपर्यंत कुंडलिनी शक्तीची सुषुप्तावस्था भंग पावत नाही अर्थात् जोपर्यंत जीव अनादि मायेच्या आवरणाखाली झाकलेला असतो तोपर्यंत त्याला अधम पूजेचाही अधिकार प्राप्त होत नाही. जोपर्यंत निद्रितावस्थेतील

महाशक्ती जागृत होत नाही किंवा आपले डोळे उघडून पाहत नाही तोपर्यंत चिन्मय जगतात प्रवेश किंवा संचार तर होऊ शकतच नाही, इतकेच नव्हे; तर त्याचे दार देखील उघडत नाही. सध्याच्या काळातील प्रचलित असलेली बहुतेक करून सर्व बाह्य साधने ही हे दार उघडण्यासाठी केलेले साधारण प्रयत्नच आहेत. परापूजा हीच खरी पूजा आहे. कनिष्ठ किंवा नीच कोटीच्या दर्जाच्या पूजा या केवळ परमपूजेचा अधिकार प्राप्त करून घेण्यासाठी असलेला जिना आहे. यासाठी आम्ही येथे प्रसंगानुरूप अधम आणि मध्यम श्रेणीच्या पूजांविषयी थोडक्यात विचार करून तंत्रात प्रतिपादन केलेल्या उत्तम पूजेचे रहस्य जाणून घेण्याचा अल्पमात्र प्रयत्न करणार आहोत.

"पूजा" या शब्दाचा अर्थ कोणत्याही मनुष्याची, देवतेची, ऋषीची पूजा अशा अर्थाने येथे केलेला नाही. ज्यांच्यापासून संपूर्ण जगताची उत्पत्ती झालेली आहे, ज्यांच्यामध्ये समस्त जगत् स्थित आहे आणि प्रयलकाळामध्ये समस्त जगत् ज्यांच्यामध्ये परत सामाविले जाते असे एकमात्र परमतत्त्वच पूजेला योग्य आहे. आम्ही येथे त्यांच्याच पूजेच्या श्रेष्ठ आदर्शाविषयी विचार करू इच्छितो. या परमपदार्थालाच सर्वजण भगवान्, भगवती, परब्रह्म, परमाया अशा विविध नावांनी संबोधितात. तंत्रशास्त्रामध्ये याला श्रीपरमशिव आणि पराशक्ती यांचे अभिन्न रूप अर्थात् एक अखंड वस्तू असे म्हटले आहे. ते श्रीपरमशिव जडतत्त्वमय अशा सर्व विश्वाशी सर्व प्रकारे अभिन्न अर्थात् एकरूप असूनही नेहमीच विश्वाच्या पलीकडे आहेत. ते प्रकाशस्वरूप आहेत कारण त्यांच्याच प्रकाशामुळे सर्व जगत् प्रकाशमय आहे. त्यांच्या ठिकाणी त्यांची स्वरूपभूत विमर्श नावाची महाशक्ती नेहमीच अभिन्नपणे अर्थात् समरस होऊन राहत असते. या शक्तीच्या न राहण्याने ते म्हणजे श्रीशिव प्रकाशस्वरूप असूनही स्वयंप्रकाशी होऊ शकत नाहीत. अद्वैतवादी लोक आगमशास्त्रात यालाच "परावाक्" असे म्हणतात.

त्यांच्या ठिकाणी त्यांची स्वरूपभूत नावाची महाशक्ती असते. याविषयी असे म्हटले आहे की -

वाग्रूपता चेदुत्क्रामेदवबोधस्य शाश्वती।
न प्रकाशः प्रकाशेत सा हि प्रत्यवमर्शिनी।।

परमेश्वराच्या स्वरूपभूत अशा या विमर्शशक्तीचीच पूजा केली जाते. व्यवहारात हिलाच परमेश्वराची पूजा असे म्हटले जाते; कारण ही शक्ती परमेश्वराशी सर्वस्वी आणि सर्वदा अभिन्न अर्थात् संलग्न आहे. शक्तिनिरपेक्ष

रूपाने परमेश्वराची पूजा, ध्यान, जप आदि काहीही होऊ शकत नाही. कारण याविषयी असे म्हटले आहे की -

शक्त्या विना परे शिवे नाम धाम न विद्यते।

अर्थात् शक्तीची उपेक्षा केल्याने श्रीपरमाशिवांमध्ये नाम आदि कोणत्याही भावाचा संबंधच राहू शकत नाही. (आणि खरे तर शक्तीची उपेक्षा कोणीही साधकयोगी करू शकत नाही.)

श्रीपरमशिवांशी समरस होण्यालाच "परापूजा" असे म्हणतात. साधक भक्तयोगी जेव्हा स्वतःला मायेच्या अधीन अर्थात् मायेने झाकला गेलेला, मर्यादित प्रमाता किंवा जीव न समजता अपरिच्छिन्न किंवा अमर्यादित अशा परमेश्वररूपाचा अनुभव घेतो तेव्हा त्याला महाशक्तीचा सर्वश्रेष्ठ उपासक मानले जाते.

"**श्रीसंकेतपद्धती**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

न पूजा बाह्यपुष्पादिद्रव्यैर्या प्रथिताऽनिशम्।
स्वे महिम्न्यद्वये धाम्नि सा पूजा या परा स्थितिः।।

याचे तात्पर्य असे आहे की, बाह्य जगतामध्ये पुष्प-चंदनादि वेगवेगळ्या उपचारांनी किंवा उपकरणांनी जी पूजा केली जाते ती खरी पूजा नसते. जगतामध्ये अशा प्रकारच्या बाह्य पूजेचाच प्रचार झालेला आढळतो. खरे पाहता द्वैतभावरहित होऊन आपल्या स्वरूपभावामध्ये म्हणजेच श्रीशिवांशी समरस होऊन जी स्थिती साधकभक्तयोगी प्राप्त करून घेतो तिलाच खऱ्या अर्थाने "पूजा" असे म्हणता येते. साधकयोग्याला एकदा या पूजेचा अधिकार प्राप्त झाला की, पुन्हा त्याचे पतन किंवा स्खलन होत नाही. वरील श्लोकात "परास्थिति" या शब्दाने हेच सूचित केलेले आहे. यामुळे जिला लोक अद्वैतास्थिती असे म्हणतात, ती श्रीपरमशिवरूपी आत्म्याची स्वतःच्या महिम्यातील स्थिती आहे. हेच परमपूजेचे स्वरूप आहे.

ही पूजा अद्वैतभावामध्ये राहून अर्थात् समरस होऊन आणि संपूर्ण इंद्रियव्यापारांचा आश्रय घेऊनच केली जाते. या अवस्थेत बाहेरील किंवा आतील कोणत्याही विषयात जरी मन प्रवृत्त झाले तरी त्याविषयांचे संस्कार होण्याची अर्थात् मन विषयांमध्ये लीन होण्याला जागा शिल्लक राहत नाही. याचे कारण असे आहे की, सर्वव्यापक परावस्था किंवा परमेश्वराची स्वरूपभूत सत्ता विषयामध्ये नेहमी वर्त्तमान राहते. याच्याच सत्तेने विषयाची सत्ता आहे आणि त्याच्याच प्रकाशामुळे विषयाचा प्रकाश आहे. ही सत्ता आगम

आणि निगम यात प्रसिद्ध आहे. परमेश्वराची चैतन्यशक्ती इंद्रियरूपी मार्गांनी समस्त विषयांमध्ये अभिव्यक्त होत असते. साधकयोग्याला या अवस्थेची सम्यक् प्राप्ती झाली की, विषयांबद्दल असलेला अचित्भाव नाहीसा होतो. जेव्हा त्यांची जडता नष्ट होते तेव्हा एकमात्र अखंड स्वयंप्रकाश चेतन्याची अद्वैतानुभूती राहते. ही अनुभूती म्हणजे स्वप्रकाश चैतन्याच्या स्वरूपाशिवाय अन्य काहीही नाही, हे येथे सांगण्याची गरज नाही. ही काही अंतःकरणाची वृत्ती नाही.

मध्यमश्रेणीच्या पूजेमध्ये अशा प्रकारची अद्वैतानुभूती विशुद्ध रूपाने राहत नाही; कारण "बाह्य जड पदार्थ आभ्यंतरिक चिन्मय स्वरूपामध्ये किंवा अद्वैत रूपामध्ये विलीन होत आहेत," अशा प्रकारची बाह्य पदार्थांच्या संबंधात भावना ठेवणे हे मध्यम पूजेचे लक्षण आहे. चिद्वस्तूमध्ये अर्थात् श्रीशिवांमध्ये अचिद्वस्तूचा अर्थात् जीवाचा लय होत असतो. हेच या पूजेचे फळ आहे. उत्तम पूजेमध्ये भावनेची आवश्यकता असत नाही. परंतु जोपर्यंत या चरमस्थितीचा उदय होत नाही तोपर्यंत पूजेमध्ये भावना ही राहतेच.

बाह्य चक्र, आवरण इत्यादींची रचना करून अपरा पूजा केली जाते. त्यामुळे या पूजेत नेहमीच भेदज्ञान अर्थात् द्वैत राहते, असे सांगणे व्यर्थ आहे; कारण पूजामार्गात अग्रेसर होणाऱ्या साधकभक्तयोग्याला प्रथम बाह्य-पूजेनेच साधनेचा आरंभ करावा लागतो. त्यानंतर क्रमाक्रमाने आंतरिक पूजाभावनेतून जाऊन विशुद्ध आंतर पूजेचा अर्थात् सामरस्याचा अधिकार प्राप्त करून घ्यावा लागतो. यावरून असे लक्षात आलेच असेल की, द्वैताचे ज्ञान हाच प्रथम पूजेचा आधार आहे. द्वितीय पूजेमध्ये याचा थोडासा उपशम होतो आणि भावनेच्या द्वारा अभेदज्ञानाची सूचना केली जाते. मात्र तृतीय किंवा श्रेष्ठ पूजेमध्ये भेदज्ञान लेशमात्रही शिल्लक राहत नाही. यावेळी केवळ एकत्वाचे म्हणजेच सामरस्याचे ज्ञान होते अर्थात् केवळ अद्वैताचाच बोध होत राहतो.

आम्ही येथे ज्या चक्रपूजेविषयी सांगत आलो आहोत ती इष्टदेवतेच्या तारतम्यानुसार नाना प्रकारची असूनही मूलतः एकच आहे. चतुष्कोणापासून सर्व चक्रांचा प्रारंभ होतो आणि बिंदूमध्ये त्यांची समाप्ती होते. वस्तुतः सर्व देवतांचा मूलाधारचक्रापासून ते सहस्रारचक्रापर्यंतच्या सात चक्रांमधील वासनानुकूल विकास आणि विस्तार आहे. येथे "चतुष्कोण" या शब्दाचा अर्थ "मूलाधार" आणि बिंदू या शब्दाचा अर्थ सहस्रार असा आहे. या चक्र-

पूजेच्या आत आपल्या इष्टदेवतेच्या आवरणरूपामध्ये सर्व देवतांची पूजा करावी असे विधान आहे. अपरापूजा ही तिसऱ्या श्रेणीची असूनही उपेक्षा करण्यासारखी असत नाही. तांत्रिक सिद्धाचार्यांनी याविषयी असे म्हटले आहे की, श्रीपरमेश्वर हे स्वतः सर्वज्ञ असूनही नित्यनिरंतर श्रीमहाशक्तीची अपरा-पूजा करीत असतात. यामुळेच अभेदज्ञानाचे अर्थात् श्रीशिवशक्तीच्या सामरस्याचे प्रकटीकरण होते. यासाठीच या अभेदज्ञानरूपी संपत्तीची म्हणजेच सामरस्य-प्राप्तीची इच्छा करणाऱ्या ज्ञानी साधकयोग्याने नेहमी अपरापूजा करणेच योग्य आहे. या श्रेणीच्या पूजेचे विधिपूर्वक आणि नित्यनेमाने अनुष्ठान केल्याने साधकयोगी याच्याच द्वारा मध्यम पूजेचा अधिकार प्राप्त करून घेण्यास समर्थ होत असतो. आवरणार्चनारूपी कर्मात्मक बाह्य तसेच द्वैतावस्था क्रमशः भावनेच्या क्रमिक उत्कर्षाच्या द्वारा ज्ञानमय तसेच अद्वैतबोध मय स्वरूपामध्ये विलीन होऊन जाते. जेव्हा या दृढ भावनेमुळे कर्म हे ज्ञानाचे रूप धारण करू लागते तेव्हा मध्यमपूजेच्या अनुष्ठानाची सूचना मिळते. ज्याप्रमाणे प्रज्वलित अग्नीमध्ये तुपाची आहुती दिली जाते अगदी त्याप्रमाणेच अर्चनेच्या द्वारा आपल्या विकल्पात्मक प्रकृतीला अखंड प्रकाशरूप चिदानंदघन परमेश्वराच्या परमज्योतीत निक्षेपित करावे लागते. हेच मध्यमपूजेचे रहस्य आहे. साधनेच्या बळाने सिद्ध झाल्यावर परमपूजेचा महिमा अर्थात् माहात्म्य आपोआप विकसित होत असते. देहाच्या ऊर्ध्वभागामध्ये असलेल्या ब्रह्मरंध्र नामक स्थानामध्ये सहस्त्रदलयुक्त शुभ्रवर्णी अधोमुख असलेले अकुल नावाचे पद्म आहे. त्या "पद्मामध्ये" निष्कला नावाची शक्ती विराजमान आहे, तिच्या गर्भामध्ये असलेल्या अनंत शक्तीच्या सत्तेचा अनुभव सूक्ष्म दृष्टीच्या साहाय्याने घेता येतो. या सर्व शक्तींमध्ये "व्यापिनी" नावाची एक शक्ती किंवा कला आहे. या कलेच्या द्वारा वरून खालच्या बाजूला अमृत झिरपत राहते. या महापद्मवनाच्या वर "समना"रूप तिरोधान शक्तीचे अधिष्ठान आहे. मनाची गती येथपर्यंतच असू शकते. याच्यावर मनोराज्याची क्रिया संचारित होत नाही. या पद्मातील आतील बाजूला असलेल्या कर्णिकेमध्ये "वाग्भव" नावाचा एक त्रिकोण असून यातून परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या चार प्रकारच्या वाणी बाहेर पडतात. साधकभक्तयोग्यांनी वर्णिलेल्या "**श्रीसद्गुरुपादुका**" याच त्रिकोणात आहेत. जगद्गुरू किंवा विश्वगुरू श्रीपरमशिवांच्या पादुका याच "**श्रीसद्गुरुपादुका**" आहेत, असा तंत्रशास्त्राचा सिद्धान्त आहे.

"**श्रीसद्गुरुपादुका**" "पर" आणि "अपर" भेदाने दोन प्रकारच्या आहेत.

याविषयी असे म्हटले आहे की -

स्वप्रकाशशिवमूर्त्तिरेकिका तद्विमर्शतनुरेकिका तयोः ।
सामरस्यवपुरिष्यते परा पादुका पराशिवात्मनो गुरोः ।।

अर्थ :- स्वप्रकाश परम श्रीशिव, त्यांची स्वरूपभूता विमर्शशक्ती अर्थात् श्रीपार्वती आणि या दोघांचे सामरस्य हे तीन परापादुकांचे भेद आहेत.

या श्रीसद्गुरुपादुकांतून निरंतर स्निग्ध चंद्रकिरणांसमान घनीभूत चिद्रस किंवा परमानंदाच्या धारांचा वर्षाव होत असतो. या धारा चराचर जगताला पुष्ट आणि पुनरुज्जीवित करीत असतात. हाच साधकभक्तयोग्याचा आत्मा आहे.

यानंतर प्रसाद ग्रहण करण्याची व्यवस्था केलेली आहे. यामुळे श्रीपरमशिवांच्या साधकभक्तयोग्याची सोऽहं रूपामध्ये अद्वैतभावना प्रतिष्ठित होत असते. हेच खरे अमृत आहे. हे अमृत अभिव्यक्त झाल्यावर साधकभक्त-योगी परमानंदमय अद्वैतभावामध्ये स्थिती प्राप्त करून घेत असतो. तंत्रमताने श्रीसद्गुरुप्रसाद आणि त्याच्या ग्रहणाचे फल पुढीलप्रमाणे आहे -

स्वप्रकाशवपुषा गुरुः शिवो यः प्रसीदति पदार्थमस्तके ।
तत्प्रसादमिह तत्त्वशोधनं प्राप्य मोदमुपयाति भावुकः ।।

अर्थ :- श्रीशिवरूपी श्रीसद्गुरू स्वप्रकाशरूपाने जेव्हा पदार्थमस्तकामध्ये प्रसन्न होतात तेव्हा सर्व तत्त्वे शुद्ध होतात अर्थात् त्यांची चिदात्मरूपात अनुभूती येते. परमानंदाची प्राप्ती हे याचे स्वाभाविक फळ आहे, हे येथे सांगण्याची आवश्यकता नाही. श्रीपरमेश्वराशी अद्वैतभाव अर्थात् सामरस्य हाच श्रीसद्गुरूंचा प्रसाद आहे. या प्रसादाचा अंगीकार केल्याने परमानंद आपोआपच उल्हासित होऊ लागतो. हेच परापूजेचे रहस्य आहे.

ज्ञानीपुरुषांच्या समाजात प्रचलित असलेल्या उत्तम पूजेची लक्षणे या विवरणावरून लक्षात येतात. समस्त ज्ञेयपदार्थांची चिद्भूमीत विश्रांती यालाच पूजा असे म्हणतात, असे "**श्रीऋजुविमर्शिनी**" या ग्रंथात म्हटले आहे. "**श्रीपादुकोदय**" प्रभृति ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, श्रीसद्गुरूंची आपल्या आत्मरूपात भावना करणे हीच पूजा आहे अथवा निर्विकल्प महाकालामध्ये आदरपूर्वक लय होणे हीच पूजा आहे. या पूजालक्षणांमध्ये कोणतीही विशेष प्रकारची विलक्षणता किंवा वेगळेपणा नाही. श्रीमदाद्यशंकराचार्य विरचित "**श्रीशिवमानसपूजास्तोत्र**" या स्तोत्र ग्रंथातील एका श्लोकामध्ये याच अर्थाची एक झलक आढळून येते त्यात असे म्हटले आहे की -

आत्मा त्वं गिरिजा मतिः सहचराः प्राणाः शरीरं गृहं
पूजा ते विषयोपभोगरचना निद्रा समाधिस्थितिः।
सञ्चारः पदयोः प्रदक्षिणाविधिः स्तोत्राणि सर्वागिरो
यद्यत् कर्म करोमि तत्तदखिलं शम्भो तदाराधनम्।।

अर्थ :- हे श्रीशंभो! आपणच माझा आत्मा आहात. आपली शक्तिरूपिणी पार्वती हीच माझी बुद्धी आहे. माझे सर्व प्राण अर्थात् प्राण अपान, समान, व्यान, उदान इत्यादि आपले सहचरस्वरूप अर्थात् सेवक आहेत. माझे शरीर हे आपलेच गृह किंवा मंदिर आहे. विषयभोगासाठी माझे जे इंद्रियव्यापार होत असतात तीच आपली पूजा आहे. माझी जी निद्रा आहे तीच आपली समाधिस्थिती आहे. माझे चालणे हीच आपली प्रदक्षिणा आहे. मी जे काही बोलतो ते सर्व काही आपलेच स्तोत्र आहे. थोडक्यात सांगावयाचे झाले तर मी जी काही कर्मे करतो ती आपलीच आराधना आहे.

आत्म्याची सर्व कर्मे ही श्रीशिवांची अर्चना आहे. आत्मा हा श्रीशिवस्वरूप आहे. ही सर्व कर्मे श्रीशिवरूपी आत्म्याच्या तृप्तीसाठी केली जातात. श्रीमदाद्य-शंकराचार्य यांच्या या उक्तीचे मूळ श्रीपूर्व आगमशास्त्रात असलेले आढळून येते. त्यांनी यामध्ये असे म्हटले आहे की -

द्रवद्रव्यसमायोगात् स्नपनं तस्य जायते।
गन्धपुष्पादिगन्धस्य ग्रहणं यजनं स्मृतम्।।
षड्रसास्वादनं तस्य नैवेद्याय प्रजायते।
यमेवोच्चारयेद् वर्णं स जपः परिकीर्तितः।

अर्थ :- द्रव पदार्थाचा स्पर्श हेच त्यांचे अर्थात् श्रीशिवांचे स्नान आहे. गंधपुष्पादींचा सुगंध ग्रहण करणे हीच त्यांची अर्चना आहे. षड्रसांचा आस्वाद हाच त्यांचा नैवेद्य आहे. तसेच सर्व वर्णांचे उच्चारण हाच त्यांचा जप आहे.

"**श्रीसंविदुल्लास**" या ग्रंथात याविषयी असे म्हटले आहे की -

विश्वं मूर्त्तिर्वैखरी नाममाला यस्यैश्वर्यं देशकालातिलाङ्घि।
त्वद्भक्तानां स्वैरचारः सपर्या स्वेच्छा शास्त्रं स्वस्वभावश्च मोक्षः।।

अर्थ :- हे श्रीशंभो! तुमच्या भक्तांसाठी विश्व हीच तुमची मूर्ती आहे. वैखरीवाणी हीच तुमची नाममाला आहे. स्वैराचार ही पूजा आहे, स्वेच्छा हे शास्त्र आहे आणि आपला स्वभाव हाच मोक्ष आहे. देश आणि काल यांनी तुमचे ऐश्वर्य अपरिच्छिन्न आहे.

ही अवस्था अतिदुर्लभ आहे. श्रीमदभिनवगुप्तपादाचार्य यांनी याविषयी

असे म्हटले आहे की, ज्या क्षणभंगूर पुरुषाच्या संसार परिभ्रमणाचा अंतःकाळ जवळ येतो आणि ज्याच्यावर भगवती चितिशक्ती प्रसन्न झालेली आहे अशा विरळ्या महापुरुषाच्या अंतःकरणामध्ये अशा प्रकारचे पूजारहस्य प्रस्फुटित किंवा विकसित होते. सामान्य पुरुषाला हा अधिकार प्राप्त झालेला असत नाही.

"श्रीचिद्गगनचंद्रिका" तसेच अन्यान्य आगमग्रंथांमध्ये "चार," "राव," "चरु" आणि "मुद्रा" या चार प्रकारच्या पूजेचे विधान सांगितले आहे. यात "राव" या पूजेला प्राधान्य दिलेले आहे. विमर्श म्हणजे विचार तसेच आपल्या आत्मशक्तीच्या साक्षात्काला अर्थात् अनुभूतीला "राव" असे म्हणतात. "चार," "चरु" तसेच "मुद्रा" या शब्दांनी क्रमशः आचारविशेष, द्रव्यविशेष तसेच मूर्ती किंवा वेषविशेष समजावे. "राव" साठीच या "चार," "चरु" आणि "मुद्रा" इत्यादि शब्दांची योजना केलेली आहे. आपल्या स्वरूपाची अपरोक्ष अनुभूती हीच परमपूजा आहे. याविषयी काहीही शंका नाही. या परमपूजेलाच "राव" असे म्हणतात. काही काही आचार्य "निजबलनिभालन" या नावाने याचे वर्णन करीत असतात. साधकभक्तयोग्याची आपल्या ह्दयाची स्फुरत्ता हाच श्रीपरमेश्वर आहे. हीच देवता आहे. त्यात स्वतःसह अभिन्न भावात विद्यमान असणारी विश्वविक्षोभाची जीं सहिष्णुता आहे ती विमर्शशक्ती असून ती बलस्वरूप आहे. विमर्शशक्तीचे वर्णन करणे हेच पूजेचे रहस्य आहे. आत्मविमर्शाचेच दूसरे नाव "जीवन्मुक्ती" असे आहे. "श्रीभगवतीची परापूजा" हा याचा पर्याय आहे. या अवस्थेचा उदय झाला की, "आज्ञाधारत्व" आदि बाह्य विभूती आपोआपच प्रगट होत असतात.

आत्मविमर्शाचे स्वरूप चांगल्या प्रकारे जाणून घेण्यासाठी सृष्टिप्रभृती विभिन्न चक्रांचे तत्त्वनिरूपण आवश्यक आहे. अद्वैतदृष्टीने पाहता श्रीपरमेश्वर किंवा श्रीविश्वगुरू साधकभक्तयोग्याच्या स्वतःच्या आत्म्याहून अभिन्न आहेत. चिच्छक्ती ही परमेश्वराची असामान्य स्वातंत्र्यशक्ती आहे. ही शक्ती निरंतर स्वभावतः पंचकृत्य रूपामध्ये स्वतःला प्रगट करीत असते. सृष्टी, स्थिती, संहार, अनाख्या आणि भासा या पंचकृत्यांचा स्वभाव क्रमशः क्रिया, ज्ञान, इच्छा, इद्योग आणि स्वभाव यांच्या रूपात वर्णिलेला आहे. या आधी ज्या स्वातंत्र्यशक्तीचा उल्लेख आलेला आहे त्यालाच आगमशास्त्रामध्ये महाप्रतिभा-शाली "भासा" असे म्हटले आहे. शांत समुद्रात ज्याप्रमाणे वाऱ्यामुळे लाटांचे चांचल्य निर्माण होते आणि यातून एकामागोमाग एक अशा भीमकाय लाटांची उत्पत्ती होत राहते त्याचप्रमाणे निर्विशेष, शांत आणि क्षोभशून्य भासारूपी

महासत्तेच्या वक्ष:स्थळावर स्वातंत्र्याच्या उल्हासामुळे उद्योगरूपी आदिस्पंदाचा उदय होतो. यालाच सृष्टीच्या प्रथम कलेचा आत्मप्रकाश असे म्हणतात. उद्योग, अवभास, चर्वण आत्मविलापन आणि नि:स्तरंगत्व या पाच प्रकारच्या समष्टीला "सृष्टी" असे म्हणतात. प्रत्येक जीवात्म्यामध्ये ही शक्ती सारखीच सामावलेली आहे. येथे आपण कुंभाराचे उदाहरण घेऊ शकतो. घडा बनविण्याच्या आधी घड्याचा भाव कुंभाराच्या ठिकाणी त्याच्या आत्मचैतन्यासह अभिन्न रूपात राहतो. अशा प्रकारे अभिन्न रूपात राहणाऱ्या या भावाला भिन्न अथवा वेगळ्या म्हणजे द्वैत रूपाने बाहेर काढण्यासाठी जे प्राथमिक स्पंदन आहे त्याला "उद्योग" असे म्हणतात. यानंतर काठी, चाक इत्यादींच्या साहाय्याने हा भाव बाहेर प्रकट होत असतो. यालाच "अवभास" असे म्हणतात. सृष्टि-क्रियेच्या अंतर्गत ही द्वितीय प्रथा आहे. यानंतर बाह्यरूपात अवभासित किंवा प्रकाशित होणाऱ्या या भावाचा नाना प्रकारच्या व्यापाराच्या द्वारा वारंवार आपल्या रूपात अनुभव घ्यावा लागतो. याचेच पारिभाषिक नाव "चर्वण" असे आहे. इतके झाल्यावर या भावविषयासंबंधी उदासीनता निर्माण होते; कारण की, अर्थाक्रियाकारित्व आणि स्त्रष्ट्याचे प्रयोजन संपादन हा सर्व भावांचा एकमात्र उद्देश्य आहे. हा उद्देश सिद्ध झाल्यावर याविषयी उदासीनता निर्माण होणे स्वाभाविक आहे. हीच "विलापन" नावाची चतुर्थ प्रथा आहे. जेव्हा या अर्थक्रियेची स्मृतीसुद्धा लुप्त होऊन जाते तेव्हा नि:स्तरंगत्व नामक पंचम प्रथेचा आविर्भाव होतो. आम्ही दिलेल्या समुद्राच्या उदाहरणामध्ये आत्मा किंवा परमेश्वराचे स्वरूप यांना समुद्राची उपमा दिलेली असून घटादि प्रत्येक भाव त्याच्या लाटांसमान आहेत. या लाटा परमेश्वरामध्ये उदित होतात आणि पुन्हा त्याच्यातच विलीन होऊन जातात. भासा अथवा स्वातंत्र्यशक्ती वस्तुत: निष्कल असूनही कलामय आहे व ती क्रमहीन असतानाही क्रमविशिष्ट असल्याप्रमाणे वाटते. सृष्टिव्यापारामध्ये ज्या पाच प्रथांचा उल्लेख केला गेला आहे त्या त्याच्याच कलेचा खेळ आहेत. सिद्धपुरुष असे म्हणतात की, श्रीपरमेश्वर किंवा आत्मा यांच्या सृष्टिव्यापारामध्ये दहा कला, स्थितीमध्ये बावीस कला, संहारामध्ये अकरा कला आणि अनाख्यामध्ये दहा कला कार्य करीत असतात. सृष्टीच्या समस्त कला प्रथम प्रवृत्तीकडे वळत असतात. आत्म्याच्या स्वस्थानातील पंचयोनी आणि त्यांच्यासह अविनाभूत पंचसिद्ध या मिळून दहांचे वर्णन सृष्टीच्या दहा कलांच्या रूपामध्ये केलेले आहे. तात्त्विक दृष्टीने पाहिले असता पूर्वी सांगितलेले उद्योग अवभासन, आत्मविलापन

आणि निःस्तरंगत्व हे भिन्न पदार्थ नाहीत. सृष्टिप्रभृतितील प्रत्येक व्यापारामध्ये यांचा खेळ दिसून येतो. याच कारणाने एकमात्र सृष्टीमध्येच सृष्टी, स्थिती, संहार, अनाख्या आणि भासा या पाच कृत्यांच्या समस्त वैचित्र्यांचे स्पष्ट रूपात विकसन झालेले आढळून येते. अशा प्रकारे अन्य चक्रांमध्ये त्याहून भिन्न चक्रांच्या स्वभावाचा जो अनुप्रवेश झालेला आढळून येतो तो अपरिहार्यच आहे. यासाठी श्रीपरमेश्वराच्या प्रत्येक कृत्यामध्ये पंचकृत्य प्रवृत्तीची उन्मुखता दिसून येते. या सर्व कलांमध्ये जेव्हा एक कला स्वतःच स्फुरित होते तेव्हा अन्य कला त्याच्याशी समरसभावामध्ये विद्यमान असतात.

आत्मस्वरूपाला विभिन्न रूपांनी धारण करणे याला स्थिती असे म्हणतात. स्थितिचक्रामध्ये ज्या बावीस कला कार्य करतात त्यातील आठ श्रीशिवचक्रामध्ये, अर्थात् सहस्रारामध्ये, बारा हृदयस्थ षट्कोणामध्ये आणि दोन या षट्कोणाच्या मध्यबिंदूमध्ये राहतात. पहिल्या आठ कलांपैकी चार कला चार पीठांचे अधिष्ठाता चार युगनाथांच्या नावांनी प्रसिद्ध आहेत आणि इतर चार कला या त्या युगनाथांच्याच शक्ती आहेत. उड्डीयान, जालंधर, पूर्णगिरी आणि कामरूप या चार केंद्रांमध्ये श्रीपरमेश्वराच्या परम कर्तृत्वाची अभिव्यक्ती होत असल्याने ही चारही केंद्रे "पीठ" या नावांनी प्रसिद्ध आहेत. श्रीपरमेश्वराचे जे प्रतिबिंब कर्त्याच्या रूपात त्यांच्या परमकर्तृत्वाच्या स्फुरणेच्या द्वारा उड्डीयान पीठामध्ये आपल्या शक्तीसह राहते त्याला कलियुगाचा "नाथ" असे म्हणतात. अकारात्मक प्रणवकलामंत्राच्या द्वारा त्या नाथाचे ऐश्वर्य वाढते. जागृत अवस्थेतील विश्वाच्या स्थापनेचा अधिकार याच्या वर आहे. याला "कर्ता" असे म्हणतात. याच प्रकारे जालंधर, पूर्णगिरी आणि कामगिरी पीठाचे अधिष्ठातृगण द्वापर आदि तीन युगांचे नाथस्वरूप आहेत. उकार, मकार आणि नादात्मक प्रणवकलामंत्रांच्या द्वारा नाथांचे ऐश्वर्य वृद्धिंगत होत असते. ते सर्व परमेश्वराच्या परमकर्तृत्वाच्या स्फुरणविशेषाचे कर्ता आहेत. हे क्रमशः ज्ञान, व्यवसाय किंवा विचार आणि चैतन्य यांच्या आश्रयरूपामध्ये स्वप्नावस्थाक्रांत, सुषुप्त्यावस्थाक्रांत आणि तुरीयावस्थाक्रांत विश्वाची स्थापना करीत असतात. ज्या आठ कलांच्या द्वारा जाग्रतादि चार अवस्थांमध्ये जगताच्या स्थितीचे संपादन होत असते तेच मस्तकातील चक्रात राहणारे चार पीठांचे अधिष्ठाता शक्तीसह चार युगनाथ या नावाने प्रसिद्ध आहेत. हृदयस्थित षट्कोणांमध्ये ज्या बारा कलांविषयी सांगितले गेले आहे त्या तंत्रशास्त्रामध्ये "राजपुत्र" या नावाने प्रसिद्ध आहेत. यातील सहा साधिकार असून अन्य सहांना निरधिकार असे

म्हणतात. "**दर्शनशास्त्रात**" ज्यांना इंद्रिये असे म्हटले जाते त्यांचाच येथे राजपुत्र या नावाने निर्देश केलेला आहे. बुद्धी आणि पंचकर्मेंद्रिये साधिकार राजपुत्र आहेत. मन आणि पंचज्ञानेंद्रिये निरधिकार राजपुत्र आहेत. हाच दोहोंमधील फरक आहे. षट्कोणाच्या केंद्रस्थानामधील ज्या कुलेश्वर आणि कुलेश्वरी याविषयी सांगितले आहे ते अभिमान आणि अहंकारशक्तीचे वर्णन समजावे, आत्मस्वरूपाच्या त्या त्या रूपामध्ये धृतीच्या मुळाशी या बावीस कला ओवलेल्या किंवा सामावलेल्या आहेत हे स्थितिचक्राचे रहस्य आहे.

संहारचक्रामध्ये अकरा कलांचे कार्य दिसून येते. जितके भाव आत्मस्वरूपापासून वेगळे होऊन विक्षिप्त अर्थात् इतस्ततः विखुरलेले आहेत त्यांना पुन्हा आत्मप्रकाशामध्ये वासनारूपाने एकत्रित करून ठेवणे हाच संहार या शब्दाचा अर्थ आहे. अकरा संहारशक्ती अंतःकरणाच्या समष्टिरूप अहंकाराचा तसेच बाह्य इंद्रियांचा ग्रास घेऊन प्रकाशित होत असतात. येथे अहंकार हा प्रमाता, इंद्रिये ही प्रमाणे आणि इंद्रियांच्या विषयरूप समस्त ग्राह्य वस्तू प्रमेय आहेत. ज्या कला प्रमाता, प्रमाण आणि प्रमेय यांना गिळून टाकून प्रकाशित होत असतात त्या आत्मरूपी श्रीभगवंतांच्या संहारिणी शक्ती आहेत. याच अकरा शक्तींशी असलेल्या संबंधामुळे श्रीपरमेश्वराला "एकादशरुद्र" असे म्हणतात.

"अनाख्या" नामक चतुर्थ चक्रामध्ये तेरा शक्तींची कार्ये दिसून येतात. "आख्या" या शब्दाने पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी या तीन प्रकारच्या वाणींच्या स्वभावाचा बोध होतो. यामुळेच आख्याहीन अनाख्या चक्रामध्ये या वाक्प्रवृत्ती राहू शकत नाहीत. आम्ही ज्या सृष्टी, स्थिती आणि संहार नामक तीन चक्रांविषयी सांगत आलो आहोत त्यातील संहारधामामध्ये नादरूपा पश्यंती वाक् कार्य करते. स्थितिधामामध्ये बिंदुरूपा मध्यमावाक् व्याप्त राहते तसेच सृष्टिधामामध्ये लिपिरूपा स्थूल किंवा वैखरी वाणी कार्य करीत असते. या तिन्ही प्रकारच्या वाणी ऊर्ध्वस्थित विमर्श अथवा परावाक्च्या द्वारा अनुप्राणित अर्थात् भारलेले तुरीयावस्थेतील प्रमाता, प्रमाण आणि प्रमेय या त्रिपुटीचा उपसंहार करून चिदाग्निरूपामध्ये पर्यवसित होत असतात. "**श्रीसंविदुल्लास**" या तंत्रग्रंथामध्ये या वर्णनाच्या प्रसंगात असे म्हटले आहे की -

उद्योगमयमालस्यं प्रकाशैकात्मकं तमः।
अशून्यं शून्यकल्पं च तत्त्वं किमपि शाम्भवम्।।

अर्थ :- श्रीशिवरूपी आत्म्याचे तत्त्व खरोखरीच अनिर्वचनीय अर्थात् अवर्णनिय आहे. हे उद्योगमय असूनही आलस्यमय आहे. तसेच हे तत्त्व शुद्ध प्रकाशमय असूनही समोरूप आहे आणि शून्य नसतानाही शून्यवत् आहे.

या अवस्थेला वस्तुतः शून्यरूप म्हणता येत नाही. या अवस्थेत योगी हे प्रकाशाबरोबरच जणू एक प्रकारच्या अंतर्विमर्शाचा किंवा अंतर्शक्तीचा आतल्या आत अनुभव घेत असतात. याला अलौकिक स्फुरणरूपी भासाच्या किंवा महाप्रतिभा नावाच्या श्रीभगवंताच्या स्वातंत्र्यरूपा चिच्छक्तीच्या आनंदमय अनुभवाचे विजृंभण असे म्हणतात. **"श्रीस्पंदकारिका"** या ग्रंथात या अवस्थेच्या वर्णनाच्या प्रसंगात याविषयी असे म्हटले आहे की -

तदा तस्मिन् महाव्योम्नि प्रलीनशशिभास्करे।
सौषुप्तपदवन्मूढः प्रबुद्धः स्यादनावृतः।।

अर्थ :- चंद्र आणि सूर्य जेथे विलीन झालेले आहेत अशा महाव्योमामध्ये म्हणजेच महदाकाशामध्ये आत्मा सुषुप्त्यावस्थापन्न मूढवत् प्रतीत होत असूनही आवरणहीन तसेच नित्य जागृतावस्थेत राहतो.

जरी ही अवस्था महासुषुप्त्यावस्थेसमान वाटत असली तरी तिला चिन्मय मुक्तावस्था असे म्हणतात. या अवस्थेत सामान्यतः "शक्ती" म्हणण्यामागे जो अर्थ व्यक्त होत असतो त्याची कल्पनाही करता येणार नाही. शक्तीच नव्हे; तर या शक्तीच्या संख्या आणि प्रकार यांचा निर्देश करणे असंभव आहे तथापि तंत्रामध्ये शक्तीचा औपचारिक प्रयोग केलेला दिसून येतो. अनाख्या चक्रामध्ये ज्या तेरा कलांविषयी सांगितले आहे त्यातील बारा कला व्यष्टिभावात इंद्रियांच्या स्फुरणरूपाने असतात. आणखी एक कला या सर्वांच्या समष्टिरूपात आहे. खरे पाहता, सृष्टी आदि करणाऱ्या सर्व शक्ती संहारक रूपात परिवर्तीत होत असतात. येथे जो संख्या आदींचा निर्देश केला जातो तो भविष्यात होणाऱ्या ज्ञेयपदार्थांच्या विविधतेला तसेच वर्तमान काळात जो वासनारूपाने आत स्थित आहे त्याला लक्ष्य करून केला जात असतो. सृष्टीत किंवा जगतात सृष्टी, स्थिती, संहार आणि तुरीय या चार अवस्था आहेत. अशा प्रकारे स्थिती आणि संहार यातील प्रत्येकामध्ये या चारही अवस्था राहतात. अशा प्रकारे सर्व मिळून बारा शक्तींचे किंवा देवींचे खेळ आढळून येतात. ज्या महाशक्तीतून या बारा शक्ती बाहेर पडतात आणि परत तिच्यातच लीन होतात त्या महाशक्तीला "त्रयोदशी" असे म्हणतात. वास्तविक पाहता ही त्रयोदशी म्हणजे सर्वांमध्ये सामावलेल्या तुरीयेशी संलग्न असलेल्या "भासा" शिवाय

दुसरे काहीही नाही.

श्रीभगवंतांच्या स्वातंत्र्यरूपा चिच्छक्तीचेच दुसरे नाव "भासा" किंवा "महाप्रतिभा" असे आहे. याचा उल्लेख आम्ही या आधीच केलेला आहे. या चिच्छक्तीच्या गर्भामध्ये पंचकृत्यमय अनंत वैचित्र्य किंवा वैविध्य सामावलेले आहे. ही सर्वातीत असूनही सर्वांवर अनुग्रह करणारी पराशक्ती आहे. ज्याप्रमाणे आरशात नगरादि दृश्य प्रपंच प्रतिभासित किंवा प्रकाशित होतात त्याप्रमाणे या स्वच्छ चिन्मयी पराशक्तीच्या भित्तीमध्ये प्रमाता, प्रमाण आणि प्रमेयरूप समस्त जगत् प्रतिबिंबाप्रमाणे स्फुटित किंवा विकसित होत असते. येथे जे काही भान किंवा ज्ञान होते त्याचे पर्यवसान या चिच्छक्तीतच होत असते. त्यामुळेच यापासून कोणत्याही प्रकारचा विकल्प स्वतः निर्माण होण्याची शंका असत नाही. हेच निर्विकल्प परमधाम आहे. असे असतानाही आत्यंतिक स्वच्छतेमुळे सृष्ट्यादि समस्त चक्र याच प्रतिबिंबरूपात स्फुरित होत असतात. याच कारणाने एक प्रकारे तत्तत् शक्तीच्या विकल्परूपाने उपासना करण्याचा एक न्यायसंगत हेतू दिसून येतो. यासाठी "**श्रीक्रमकेली**" या स्तोत्रात श्रीमदभिनवगुप्तपादाचार्यांनी असे म्हटले आहे की, "**अतएव ये निर्विमर्श तुर्यातीतमिच्छन्ति ते निरुपदेशा एव।**" हिलाच "सप्तदर्शी कला" असे म्हणतात. षोडश कला या विश्वप्रतिबिंबस्वभावाच्या असतात आणि सप्तदशी कला ही विश्ववैचित्र्याच्या भिंतीच्या अर्थात् आधाराच्या स्वरूपाची असते. यामुळे "सप्तदशी" या शब्दाने विश्व व विश्वोत्तीर्ण परमेश्वर असा दोघांचाही बोध होतो.

ही स्वातंत्र्यशक्तिरूपा संविद्देवी संकोच आणि विकास या दोन्ही प्रणालींपासून नाना रूपामध्ये प्रकाशित होत असते. पन्नास मातृकारूपी वर्णमाला हा या स्वातंत्र्यशक्तीचाच विकास आहे. दुसऱ्या दृष्टीने नवचक्र आणि पंचपिंड हे या शक्तीचे संक्षिप्त रूप आहे. नवचक्र म्हटले की, मूर्ती, प्रकाश, आनंद आणि वृंद ही चार चक्रे आणि सृष्टी, स्थिती, संहार, अनाख्या व भासा ही पाच चक्रे अशा एकूण नऊ चक्रांचा बोध होतो. श्रीसद्गुरू अथवा श्रीपरमेश्वर यांची पूर्वी सांगितलेली नवचक्रे पीठनिकेतनाकडे पाच प्रकारांनी अथवा पंचस्रोतामध्ये प्रवाहित होत असतात. सर्व प्रपंच हा या पाच प्रवाहांमध्ये पर्यवसित होत असल्याने हे पाचपिंड "पंचपिंड" या नावाने प्रसिद्ध आहेत. हे पंचपिंड अधिकच संक्षिप्त होऊन वाग्भवबीजामध्ये परिणत होत असतात. वाग्भव बीजाचे पर्यवसान अनुत्तरकलेमध्ये होत असते आणि चरमावस्थेमध्ये अनुत्तर

कला ही विशुद्ध आत्मपरामर्शरूपात परिणत झाल्यावर आपले परमेश्वरत्व सिद्ध होत असते. यामुळे जीवन्मुक्तीची प्रतिष्ठापना होते. पूर्वोक्त विवेचनावरून असे लक्षात येते की, श्रीभगवंतांची पराशक्ती ही एकीकडे आत्मविमर्शरूपात राहते आणि दुसरीकडे पन्नास वर्णांच्या रूपामध्ये विश्वप्रसाराच्या विमर्शरूपामध्ये स्फुरणशील होते. आत्मा विश्वातीत असूनही विश्वमय आहे.

येथे ज्या सृष्टी, स्थिती, संहार, अनाख्या आणि भासा या पाच चक्रांविषयी सांगितले आहे ती पाचचक्रे "पंचवाह महाक्रम" या नावाने प्रसिद्ध आहेत. प्रथम सृष्टीपासून अनाख्यापर्यंत चार चक्रांच्या पूजेला "क्रमपूजा" असे म्हणतात. यानंतर अक्रम क्रमपूजेचा अधिकार येतो असे शास्त्राचे विधान आहे.

श्रीपरमेश्वर निरंतर अविच्छिन्न किंवा अखंड भावाने आपल्या स्वरूपभित्तीपासून सृष्टिप्रभृतीला स्फुटित किंवा विकसित करीत असतात. याच कारणाने स्रष्टुत्व आदि सर्व गुणांमध्ये त्यांचे स्वतःचे श्रेष्ठ असे कर्तृत्व सामावलेले असते. श्रीपरमेश्वराला विमर्शमय किंवा स्वातंत्र्यशाली असे म्हणतात, हेच यांचे तात्पर्य आहे अर्थात् हाच याचा अर्थ आहे. सामान्य जीवांना वस्तुतत्त्वविषयक ज्ञान होत नाही. त्यामुळे ते जन्ममृत्यू यांच्या स्रोतामध्ये किंवा प्रवाहामध्ये विवश होऊन वाहत जातात. ते काळाच्या अधीन असल्याने पंचचक्रांच्या क्रमाचा अनुभव घेण्याला समर्थ असत नाहीत. यामुळेच सृष्टीहून "भासा" अर्थात् श्रीभगवंतांच्या चिच्छक्तीचे व्यवधान हे अनुभवसिद्ध आहे; कारण की, क्रमबोधांच्या अधीन झाल्याने सर्व जीवांची अशी धारणा होते की, सृष्टीच्या पलीकडे स्थिती, संहार आणि अनाख्य या तीन चक्रांचे व्यवधान आहे आणि हा अडथळा पार केल्याशिवाय "भासा" हिचा साक्षात्कार होऊ शकत नाही. ही धारणा हा केवळ परतंत्रता आणि अज्ञान यांचा विलास आहे; कारण की, भासा हीच सृष्टीची अधिष्ठान भूमी असल्याने तात्त्विक दृष्टीने सृष्टी आणि भासा यांच्यामध्ये कोणतेही व्यवधान राहत नाही. हे प्रथमच कथन केले आहे की, भासा किंवा चिच्छक्ती यांच्या पूर्व परिस्पंदन रूपामध्ये उद्योग आदि क्रमाने सृष्टीचा आविर्भाव होत असतो. अशा प्रकारे विचार केल्यावर असे लक्षात येते की, भासा किंवा श्रीभगवंतांची चिच्छक्ती हे सृष्टीचे मूळ आहे आणि सृष्टी हा भासाचा विकास आहे. अन्यान्य चक्रांविषयी असाच विचार करणे आवश्यक आहे अर्थात् सृष्टी हे स्थितीचे मूळ आहे आणि स्थिती हा सृष्टीचा विकास आहे. इत्यादि.

याचेच तात्पर्य असे आहे की, सृष्टिप्रभृति चार कार्यांपैकी प्रत्येकामध्ये

हे चारही प्रकार आहेत. त्यामुळे शेवटी सर्वांचे पर्यवसान भासा किंवा चिच्छक्तीत होत असते. एका बाजूने चिच्छक्ती ही जरी विशुद्ध स्वरूपाच्या साक्षात्कारामुळे चैतन्याची अखंड अनुभवस्वरूप व अद्वैतरूप असली तरी ती प्रतिबिंबात्मक प्रपंचाच्या स्वभावाचे अनुकरण करून पंचकरूपात वर्णन करण्याला योग्य अशी आहे. याच कारणाने पंचकरूपांपैकी प्रत्येकामध्ये पंचात्मकत्व राहते. यात पूर्व-पूर्व पंचकाच्या पंचम कलेचा आश्रय करून परवर्ती किंवा पुढील पंचकाच्या प्रथम कलेचे स्फुरण होत असते आणि पुढील पंचकाची प्रथम कला ही पूर्ववर्ती पंचकाच्या अंतिम कलेमध्ये विश्रांती प्राप्त करून घेत असते. अशा प्रकारे सर्वत्र एक क्रम आहे. याच्याच द्वारा श्रीपरमेश्वराच्या पंचकृत्यचक्राचा व्यापार चालत असतो. हा क्रम इतका सूक्ष्म आहे की, सामान्यत: कोणीही श्रीपरमेश्वराला जाणू शकत नाही. अत्यंत तीव्र अभ्यासाच्या द्वारा तसेच श्रीसद्गुरूंच्या कृपेने एखादाच विरळा महापुरुष श्रीपरमेश्वराला जाणून घेण्यास समर्थ होत असतो. यालाच "क्रमपरामर्श" असे म्हणतात.

हा क्रमपरामर्श हाच पूर्वोक्त स्वात्मविमर्श किंवा जीवन्मुक्ती आहे. या अवस्थेला प्राप्त करून घेतल्यावर प्रकृती वश होत असते आणि अनंत प्रकारच्या बाह्य विभूती साधकयोग्यासाठी स्वाभाविक होत असतात. श्रीमदाद्यशंकराचार्यांनी "**श्रीदक्षिणामूर्तिस्तोत्र**" यात ज्या महाविभूतिरूप श्रीईश्वरत्वाचे वर्णन केलेले आहे ते या क्रमविमर्शाहून भिन्न नाही. हाच इच्छाशक्तीचा विकास आहे. श्रीसद्गुरूंच्या कृपेशिवाय हे ज्ञान प्राप्त करून घेणे संभव असत नाही. "**श्रीक्रमसिद्धी**" नावाच्या ग्रंथात याविषयी असे म्हटले आहे की -

गुर्वायत्तं क्रमज्ञानमाज्ञासिद्धिकरं परम्।
क्रमज्ञानान्महादेवि त्रैलोक्यं कवलीकृतम्।।

अर्थ :- श्रीसद्गुरूंच्या अनुग्रहावर क्रमज्ञान अवलंबून आहे. हे ज्ञान योग्यासाठी परम अशा आज्ञासिद्धीचे संपादन करीत असते. हे महादेवी! क्रमज्ञानाची प्राप्ती करून घेतल्यावर त्रैलोक्य अधीन होते.

यावरून आम्ही क्रमपूजेचे रहस्य जाणणारे आदर्श पूजक म्हणून ज्यांचे वर्णन केलेले आहे ते क्रमसिद्ध महायोगी आणि जीवन्मुक्त महापुरुष आहेत. ते परमेश्वरासह अभेद ज्ञानात प्रतिष्ठित होऊन स्वातंत्र्यशक्तीचे अधिकारी झालेल आहेत. महाशक्तीच्या श्रेष्ठ उपासकाचे हेच स्वरूप आहे."

श्रीसंतज्ञानेश्वरमहाराज यांनी आपले परात्पर श्रीसद्गुरू महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथात ज्या "क्रमदर्शनाचे" म्हणजे "क्रमशास्त्राचे" वर्णन त्याच्या सर्व पृथक्करणासह व सूक्ष्म चिकेत्सह केलेले आहे त्याचेच "क्रमयोग" व "क्रमयोग्याच्या निष्ठा" म्हणून श्रीज्ञानेश्वर-महाराज यांनी "**श्रीज्ञानेश्वरी**" या ग्रंथात सिद्धयोगसाधनाच्या रूपात पुढील-प्रमाणे स्पष्ट केले आहे. ते असे म्हणतात की -

सिद्धीं प्राप्तो यथा ब्रह्म यथाप्नोति निबोध मे।
समासेनैव कौन्तेय निष्ठा ज्ञानस्य या परा।।५०।।

अर्थ :- हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य कुंतीपुत्रा! जी ज्ञानाची म्हणजे श्रीशिवशक्तिसामरस्याची पराकाष्ठा आहे ती अंतिम श्रीशिवशक्ति-सामरस्याची सिद्धी सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य सिद्धयोगसाधनाच्याद्वारा सहस्रारात कशी प्राप्त करतो त्या साधनाचा मार्ग तू माझ्या मुखातून थोडक्यात समजावून घे.।।५०।।

परी हेचि आत्मसिद्धि। जो कोणी भाग्यनिधि। श्रीगुरुकृपालब्धि-। काळीं पावे।।९८४।। उदयतांचि दिनकरु। प्रकाशुचि आते आंधारु। कां दीपसंगें कापुरु। दीपुचि होय ।।९८५।। तया लवणाची कणिका। मिळतखेंवो उदका। उदकचि होऊनि देखा। ठाके जेवीं।।९८६।। कां निद्रितु चेवविलिया। स्वप्नेंसि नीद वायां। जाऊनि आपणपयां। मिळे जैसा।।९८७।। तैसें जया कोण्हासि दैवें। गुरुवाक्यश्रवणाचि सवें। द्वैत गिळोनि विसंवे। आपणया वृत्ती।।९८८।। तयासि मग कर्म करणें। हें बोलिजैलचि कवणें। आकाशा येणें जाणें। आहे काई?।।९८९।। म्हणौनि तयासी कांहीं। त्रिशुद्धि करणें नाहीं। परी ऐसें जरी हें कांहीं। नव्हे जया।।९९०।। कानावचनाचिये भेटी-। सरिसाचि पैं किरीटी। वस्तु होऊनि उठी। कवणि एकु जो।।९९१।। एऱ्हवीं स्वकर्माचेनि वह्नी। काम्यनिषिद्धाचिया इंधनीं। रजतमें कीर दोन्ही। जाळिलीं आधीं।।९९२।। पुत्र वित्त परलोकु। यया तिहींचा अभिलाखु। घरीं होय पाइकु। हेंही जालें।।९९३।। इंद्रियें सैरा पदार्थीं। रिगतां विटाळलीं होतीं। तियें प्रत्याहार तीर्थीं। न्हाणिलीं कीर।।९९४।। आणि स्वधर्माचें फळ। ईश्वरीं अर्पूनि सकळ। घेऊनि केलें अढळ। वैराग्यपद।।९९५।। ऐसी आत्मसाक्षात्कारीं। लाभे ज्ञानाची उजरी। ते सामुग्री कीर पुरी। मेळविली।।९९६।। आणि तेचि समयीं। सद्गुरु भेटले पाहीं। तेवींचि

तिहीं कांहीं। वंचिजेना।।९९७।। परी वोखद घेतखेंवो। काय लाभें आपुला ठावो?। कां उदयजतांचि दिवो। मध्याह्न होय?।।९९८।। सुक्षेत्रीं आणि वोलटें। बीजही पेरिलें गोमटें। तरी आलोट फळ भेटे। परी वेळे कीं गा।।९९९।। जोडला मार्गु प्रांजळु। मिनला सुसंगाचाही मेळु। तरी पाविजे वांचूनि वेळु। लागेचि कीं ।।१०००।। तैसा वैराग्यलाभु जाला। वरी सद्गुरुही भेटला। जीवीं अंकुरु फुटला। विवेकाचा।।१००१।। तेणें ब्रह्म एक आथी। येर आघवीचि भ्रांती। हेंही कीर प्रतीती। गाढ केली।।१००२।। परी तेंचि जें परब्रह्म। सर्वात्मक सर्वोत्तम। मोक्षाचेंही काम। सरे जेथ।।१००३।। यया तिन्ही अवस्था पोटीं। जिरवी जें गा किरीटी। तया ज्ञानासिही मिठी। दे जे वस्तु।।१००४।। ऐक्याचें एकपण सरे। जेथ आनंदकणुही विरे। कांहींचि नुरोनि उरे। जें कांहीं गा।।१००५।। तिये ब्रह्मीं ऐक्यपणें। ब्रह्मचि होऊनि असणें। तें क्रमेंचि करूनि तेणें। पाविजे पैं।।१००६।। भुकेलियापासीं। वोगारिलें षड्रसीं। तो तृप्ति प्रतिग्रासीं। लाहे जेवीं।।१००७।। तैसा वैराग्याचा वोलावा। विवेकाचा तो दिवा। आबुथितां आत्म-ठेवा। काढीचि तो।।१००८।। तरी भोगिजे आत्मऋद्धी। येवढी योग्यतेची सिद्धी। जयाच्या आंगीं निरवधी। लेणें जाली ।।१००९।। तो जेणें क्रमें ब्रह्म। होणें करी गा सुगम। तया क्रमाचें आतां वर्म। आईक सांगों।।१०१०।।

परार्थ :- पण जो साधकभक्तयोगी भाग्याचा ठेवाच असतो त्याला ज्यावेळी श्रीसद्गुरुकृपा म्हणजे शक्तिपातयोगाची दीक्षा प्राप्त होऊन त्याची आत्मचैतन्यरूप कुंडलिनी शक्ती जागृत होते त्यावेळी ती शक्ती सुषुम्नागामी होऊन सहस्रारस्थ श्रीशिवाशी समरस होते. असे झाले म्हणजे त्या साधक-भक्तयोग्याला आत्मसिद्धीचा म्हणजे अंतिम सामरस्यसिद्धीचा लाभ होतो. ।।९८४।। ज्याप्रमाणे सूर्याचा उदय झाल्याबरोबर अंधारच प्रकाश होऊन जातो किंवा कापराला दिव्याच्या ज्योतीचा स्पर्श होताच तो कापूरच दिवा होऊन जातो।।९८५।। किंवा मिठाचा एक खडा पाण्यात मिसळताक्षणीच तो जलरूप होऊनच राहतो।।९८६।। किंवा झोपलेल्या माणसाला जागृत केल्यावर त्याची झोप स्वप्नासह नाहीशी होऊन तो आपल्या जागृतीतील मूळ स्वरूपाप्रत परत येतो।।९८७।। त्याप्रमाणे दैवयोगाने ज्यावेळी एखाद्या साधकभक्तयोगिशिष्याला श्रीसद्गुरूंकडून तत्त्वमस्यादि महावाक्याच्या द्वारा शब्ददीक्षा होते त्यावेळी या प्रकाराने शक्तिपातयोगदीक्षा झाल्याबरोबर त्याचे

षड्विकार, अष्टबंध, अष्टपाश, मल, विक्षेप, आवरण, सर्व द्वैत व समस्त भोगाकांक्षादि संसारोन्मुखवृत्ती निःशेष नाहीशा होऊन अर्थात् आपोआप गिळल्या जाऊन त्याला श्रीशिवशक्तिसामरस्यावस्था प्राप्त होते म्हणजे तो आपल्या स्वसंवेद्य आत्मस्वरूपाच्या ठिकाणी स्थिर होतो.।।९८८।। अशा प्रकारे साधकभक्तयोगिशिष्याला श्रीशिवशक्तिसामरस्यावस्था प्राप्त झाल्यावर ज्याप्रमाणे आकाश हे सर्वत्र व्यापकरूपाने भरलेले असल्यामुळे त्याला इकडून तिकडे येणे-जाणे असत नाही त्याप्रमाणे अशा सिद्धयोग्याला कोणतेही कर्म करण्याचे शिल्लक राहत नाही अर्थात् त्याला कर्म करावयाचे शिल्लक राहते असे तरी कोण म्हणेल?।।९८९।। अशा प्रकारे श्रीशिवशक्तिसामरस्यावस्था प्राप्त झालेल्या सिद्धयोग्याला निश्चितपणे काहीएक कर्म किंवा कर्तव्य करावयाचे शिल्लक राहत नाही; पण जो मंदप्रद अर्थात् बुद्ध म्हणजे थोडासा जागृत झालेला साधकभक्तयोगिशिष्य असतो त्याला श्रीसद्गुरूंच्या शब्ददीक्षेने तत्काळ श्रीशिवशक्तिसामरस्यावस्था प्राप्त होत नाही. अशा साधकभक्तयोगिशिष्याला दीर्घकाल, निरंतर व सत्कारपूर्वक सिद्धयोगाचे साधन करून समस्त दोष व संसारोन्मुखवृत्ती नाहिशा करण्याकरिता जागृत कुंडलिनी शक्ती सुषुम्नागामी होण्यास वाव देऊन सहस्रारात श्रीशिवशक्तिसामरस्यावस्था प्राप्त करावी लागते.।।९९०।। मात्र जो प्रबुद्ध झालेला अर्थात् साधनचतुष्टयसंपन्न अधिकारी साधकभक्तयोगिशिष्य असतो त्याला श्रीसद्गुरूंनी हे शिष्या! तू स्वतः ब्रह्मच आहेस अशी शब्ददीक्षा दिल्याबरोबर कानावचनाची भेट होऊन तो साधकभक्तयोगिशिष्य तत्क्षणीच वस्तू म्हणजे ब्रह्म अर्थात् श्रीशिवस्वरूप होऊन सुबुद्ध असा सिद्धयोगी होतो. मात्र जो प्रबुद्ध साधकभक्तयोगिशिष्य असतो तो आपला अधिकार किंवा पात्रता सिद्ध व्हावी म्हणून बाह्यतः वर्णाश्रमधर्माप्रमाणे वाट्याला आलेले स्वधर्माचरणरूप अग्नीत काम्य व निषिद्ध कर्मरूपी इंधन घालून तद्वारा अंतःकरणातील रज व तम हे दोन्हीही आधीच जाळून टाकण्याचा प्रयत्न करतो.।।९९२।। त्याचप्रमाणे पुत्र, द्रव्य व परलोक या तीनही विषयांची अभिलाषा या साधकभक्तयोगिशिष्याच्या घरी सेवक होऊन राहिलेली असते अर्थात् या तिन्ही विषयांची इच्छा त्याच्या अंतःकरणातून नाहीशी झालेली असते.।।९९३।। याशिवाय प्रबुद्ध साधकभक्तयोगिशिष्य आपण सुबुद्ध किंवा सिद्धयोगी व्हावे म्हणून पूर्वी इंद्रियांनी धर्माधर्माचा विचार न करता स्वैरपणे व अविचाराने विषयांच्या ठिकाणी प्रवेश केल्यामुळे अर्थात् त्यांचा उपभोग घेतल्याने जी इंद्रिये विटाळली

होती त्या सर्व इंद्रियांना अष्टांगयोगातील प्रत्याहाररूपी तीर्थात स्नान घालून तो ती पवित्र करतो अर्थात् सर्व इंद्रियांना आतमध्ये वळवून त्यांची बहिर्मुख गती संपवून टाकतो।।९९४।। आणि वर्णाश्रमधर्माप्रमाणे आचरलेल्या स्वधर्माचे संपूर्ण फल प्रबुद्ध साधकभक्तयोगिशिष्य ईश्वराला समर्पण करून त्याच्या योगाने अर्थात् ईश्वरप्रसादाने वैराग्याचे अढळ व अभंगपद अर्थात् साधन-संपत्ती प्राप्त करून घेतो.।।९९५।। अशा प्रकारे प्रबुद्ध साधकभक्तयोगिशिष्य आत्मसाक्षात्काराचा अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्याच्या ज्ञानाचा लाभ अर्थात् अनुभूतीची उजरी प्रकर्षत्वाने व्हावी म्हणून तो जितकी म्हणून साधनसंपत्ती असेल तितकी तो सर्व आत्मसात करून घेतो.।।९९६।। अशा प्रकारे प्रबुद्ध साधकभक्तयोगिशिष्याने सर्व साधनसंपत्ती मिळविली असताना त्याची जर शक्तिपातयोगदीक्षा देणाऱ्या श्रीसद्गुरूंची गाठ पडली आणि त्यांनीही याप्रकारे प्रबुद्ध झालेल्या साधकाने त्यांच्या चरणी दीक्षेसाठी प्रार्थना केल्यानंतर उदार अंतःकरणाने व विनासंकोचाने दीक्षा दिली।।९९७।। (तर सिद्धयोगाचा साधनमार्ग मिळूनही) ज्याप्रमाणे औषध घेताक्षणीच तत्काळ रोगाची निवृत्ती होऊन रोग्याला मूळचे प्रकृती स्वास्थ्य किंवा आरोग्य प्राप्त होते काय? किंवा सूर्य उगवताक्षणीच मध्याह्नकाळ होतो काय?।।९९८।। अथवा उत्तम आणि ओलावा असलेल्या जमिनीत किंवा शेतात चांगले बी पेरले म्हणजे अमाप पीक येते हे जरी खरे असले तरी हे अर्जुना! त्याला काही वेळ लागतोच।।९९९।। आणि सिद्धयोगासारखा अत्यंत सोपा, सुलभ व प्रांजळ मार्ग श्रीसद्गुरूंच्या कृपेने मिळाला व त्यातच सुसंगतीचाही लाभ झाला तर साधकभक्तयोगिशिष्य निश्चितपणे मुक्कामाला अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्याच्या सिद्धीप्राप्तीपर्यंत जरी जात असला तरीही त्याच्या तेथपर्यंत जाण्याला काही वेळ लागावयाचा तो लागणारच असतो. ।।१०००।। त्याप्रमाणे प्रबुद्ध साधक-भक्तयोगिशिष्याला तीव्र वैराग्यही प्राप्त झाले, त्यातच शक्तीपातयोगदीक्षाद्वारा सिद्धयोगाचा मार्ग उपलब्ध करून देणाऱ्या श्रीसद्गुरूंचीही भेट झाली आणि त्यांनी शक्तिपातयोगदीक्षा दिल्यामुळे अनादि निद्रिस्त आत्मचैतन्यशक्ती कुंडलिनी जागृत होऊन ती सुषुम्नागामी झाल्यामुळे विवेकाचाही उदय झाला ।।१००१।। मग एक ब्रह्मच अर्थात् श्रीशिवच आहे बाकीचा सर्व पिंडब्रह्मांडरूप संसार हा केवळ भ्रांतिरूप किंवा भासात्मक आहे हीही अनुभूती घेऊन ती दृढ झाली; ।।१००२।। परंतु तेच परब्रह्म अर्थात् श्रीशिव हेच सर्वात्मक म्हणजे विश्वात्मक व सर्वोत्तम व विश्वोत्तीर्ण आहेत अशी अनुभूती श्रीशिवशक्ति-

सामरस्याच्या अनुभूतीने दृढ झाली की, मोक्षाचे म्हणजे सामरस्याचे कामही संपून जाते.।।१००३।। हे अर्जुना! ज्यावेळी साधकभक्तयोगिशिष्याला ही अंतिम श्रीशिवशक्तिसामरस्यावस्था प्राप्त होते त्यावेळी ही अवस्थाच किंवा सिद्धीच ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान या त्रिपुटीला अर्थात् साध्य, साधक व साधन या त्रिपुटीला किंवा जागृती, स्वप्न व सुषुप्ती यातील अवस्थांना गिळून टाकते. इतकेच नव्हे; तर हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! वस्तू म्हणजे परब्रह्म किंवा श्रीशिव हे सहस्रारात आलेल्या ज्ञानरूप शक्तीला आलिंगन देत असल्यामुळे ते आपल्या स्वतंत्र अवस्थांची जाणीव नाहीशी झाल्यामुळे एका अनिर्वचनीय व द्वैताद्वैतविवर्जित अवस्थेत स्थिर राहतात.।।१००४।। या सामरस्याच्या, समरसतेच्या किंवा एकरसतेच्या अवस्थेत श्रीशिव व जीवरूप शक्ती यांना आपण सहस्रारात एकरूप झालो आहोत याचीही जाणीव होत नाही. अशा या एकमेवाद्वितीय अपूर्व अलौकिक व लोकोत्तर अवस्थेत आनंदाचे कण म्हणजे आनंदाची जाणीवही विरून जाते आणि द्वैत व अद्वैत इत्यादि काहीही शिल्लक न राहता किंवा जाणीव व नेणीव हे दोन्हीही नाहीसे होऊन एकमात्र स्वसंवेद्य चिन्मय आत्मस्वरूपच शिल्लक राहते.।।१००५।। अशा प्रकारे ज्यावेळी साधकभक्तयोगिशिष्य ब्रह्म म्हणजे श्रीशिवरूपाशी समरस होऊन राहतो त्यावेळी तो एकरूप व एकरस होऊन अखंडपणे त्या स्थितीतच अवस्थित राहतो. मात्र प्रबुद्ध साधकभक्तयोगिशिष्याला ही सामरस्याची स्थिती मंदाधिकारामुळे व कामोपभोगाकांक्षाइच्छावासनातृष्णासंकल्पनादि सर्व संसारोन्मुखवृत्तींमुळे एकदम न मिळता सिद्धयोगसाधनाभ्यासामुळे क्रमाक्रमाने प्राप्त होते.।।१००६।। ज्याप्रमाणे भुकेलेल्या माणसाला षड्रस पक्वान्नांचे भोजन वाढले असता त्याची प्रत्येक घासाबरोबर अधिकाधिक तृप्ती होत जाते।।१००७।। त्याप्रमाणे प्रबुद्ध साधकभक्तयोगिशिष्याला ज्यावेळी तेलरूपी वैराग्याची साधनसंपत्ती प्राप्त होते व श्रीसद्गुरुनाथमहाराजांच्या कृपेने शक्तिपातयोगदीक्षेच्याद्वारा मूलाधारस्थ कुंडलिनी शक्ती जागृत होते त्यावेळी जागृतीने विवेकाचा दिवा प्रज्वलित झाला असता त्या दिव्याच्या प्रकाशाच्या विकासाने तो आपला आत्मज्ञानाचा म्हणजे सहस्रारातील आपल्या मूळ आत्मस्वरूपाचा श्रीशिवस्वरूपाने असलेला ठेवा सामरस्यात्मक अनुभूतीने प्राप्त करून घेतो.।।१००८।। अशा रीतीने प्रबुद्ध साधकभक्तयोगिशिष्य सुबुद्ध होऊन आपल्या स्वसंवेद्य आत्मस्वरूपाचे अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्याचे ऐश्वर्य भोगावे एवढ्या योग्यतेची सिद्धी प्राप्त करून घेतो. ही सामरस्यसिद्धी सुबुद्ध अर्थात् सिद्धयोग्याच्या

अंगावरील जणू काही कायमचा किंवा निरंतरचा अलंकारच होऊन राहिलेली असते.।।१००९।। तो प्रबुद्ध साधकभक्तयोगिशिष्य ज्या क्रमाक्रमाने ही श्रीशिवशक्तिसामरस्याची अंतिम सिद्धी प्राप्त करून घेतो त्या क्रमाचे वर्म मी तुला सांगतो ते तू ऐक.।।१०१०।।

बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च।
शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च।।५१।।

अर्थ :- जो सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अत्यंत शुद्ध व निष्कपट बुद्धीने युक्त होऊन, धैर्याने शरीर व इंद्रिये यांच्या संघाताचे नियमन करून अर्थात् सात्त्विक धारणेने अंतःकरणाला वश करून, शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या सर्व विषयांचा त्याग करून आणि प्रीती व द्वेष यांना नष्ट करून (श्रीसद्गुरुकृपेने अर्थात् शक्तिपातयोगदीक्षेने जागृत झालेल्या कुंडलिनी शक्तीच्या अंतर्मुखाने स्वतःच आपोआप होणारे सिद्धयोगाचे साधन करतो तो जीवशक्तिरूप सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य सुषुम्नामार्गाने सहस्रारात येऊन माझ्याशी समरस व समव्याप्त होतो.)।।५१।।

तरी गुरु दाविलिया वाटा। येऊनि विवेकतीर्थतटा। धुऊनियां मळकटा। बुद्धीचा तेणें।।१०११।। मग राहूनें उगळिली। प्रभा चंद्रें आलिंगिली। तैसी शुद्धत्वें जडली। आपणयां बुद्धि।।१०१२।। सांडूनि कुळें दोन्ही। प्रियासी अनुसरे कामिनी। द्वंद्वत्यागें स्व-चिंतनीं। पडली तैसी।।१०१३।। आणि ज्ञाना ऐसें जिव्हार। नेवों नेवों निरंतर। इंद्रियीं केलें थोर। शब्दादिक जे।।१०१४।। ते रश्मिजाळ काढलेया। मृगजळ जाय लया। तैसें वृत्तिरोधें तयां। पांचांही केलें।।१०१५।। नेणतां अधमाचिया अन्ना। खादलिया कीजे वमना। तैसीं वोकविली सवासना। इंद्रियें विषयीं।।१०१६।। मग प्रत्यगावृत्ती चोखटें। लाविलीं गंगेचेनि तटें। ऐसीं प्रायश्चित्तें धुवटें। केलीं येणें।।१०१७।। पाठीं सात्त्विकें धीरें तेणें। शोधारलीं तियें करणें। मग मनेंसीं योगधारणें। मेळविलीं।।१०१८।। तेवींचि प्राचीनें इष्टानिष्टें। भोगेंसीं येउनी भेटे। तेथ देखलियाही वोखटें। द्वेषु न करी।।१०१९।। ना गोमटेंचि विपायें। तें आणूनि पुढां सूये। तयालागीं न होये। साभिलाषु।।१०२०।। यापरी इष्टानिष्टीं। रागद्वेष किरीटी। त्यजूनि गिरिकपाटीं। निकुंजीं वसे।।१०२१।।

परार्थ :- सिद्धयोगाचे साधन करणाऱ्या साधकभक्तयोगिशिष्याने श्रीसद्गुरुनाथमहाराजांनी शक्तिपातयोगदीक्षा देऊन जे साधन शरीरात उपस्थित

करून श्रीशिवशक्तिसामरस्याच्या अंतिम सिद्धीची वाट दाखविलेली असते त्या वाटेने किंवा मार्गाने जाऊन विवेकरूपी तीर्थाच्या तटावर येऊन म्हणजे नित्यानित्यविचाराने अर्थात् एक परमात्माच नित्य असून बाकी सर्व अनित्य आहे अशा दृढ विचाराने आपल्या बुद्धीचा सर्व मळ धुऊन टाकावा.।।१०११।। मग ज्याप्रमाणे राहूच्या ग्रासातून मुक्त झालेली चंद्राची प्रभा चंद्राकडून आलिंगिली जाते त्याप्रमाणे सिद्धयोगाच्या साधकभक्तयोगिशिष्याची बुद्धिरूप कुंडलिनी शक्ती शुद्ध होऊन ती आपल्या मूळच्या श्रीशिवस्वरूप आत्मस्वरूपाशी समरस होते.।।१०१२।। अशी अंतिम सामरस्यसिद्धी प्राप्त झाली म्हणजे कुलस्त्री अर्थात् पतिव्रता स्त्री सासर व माहेर या दोन्ही कुळांचा अभिमान व स्नेह टाकून देऊन केवळ आपल्या प्रिय पतीलाच अनुसरते त्याप्रमाणे बुद्धिरूप कुंडलिनी शक्ती सर्व सुख दुःखादि द्वंद्वांचा त्याग करून केवळ स्वसंवेद्य आत्मचिंतनातच म्हणजे आपल्या श्रीशिवस्वरूपातच मग्न होऊन राहते।।१०१३।। आणि आत्मज्ञानासारख्या अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्यासारख्या जिव्हाळ्याच्या वस्तूला ज्या इंद्रियादि विषयांनी शब्दादिक विषयांना नुसतेच महत्त्व देऊन थोर केलेले असते व त्यांचे स्तोम माजवून त्या वस्तूला निरंतर बाहेर विषयांकडे नेलेले असते।।१०१४।। ते इंद्रियांचे पाच विषय ज्याप्रमाणे सूर्याच्या किरणांचा समुदाय बाजूला काढून घेतला असता म्हणजे नाहीसा झाला असता मृगजळ आपोआप नाहीसे होते त्याप्रमाणे सिद्धयोग साधनाने इंद्रियांच्या द्वारा बाहेर धावणाऱ्या सर्व संसारोन्मुख वृत्तींचा निरोध होऊन त्या आपोआपच नाहीशा होतात.।।१०१५।। मग ज्याप्रमाणे अजाणता अधम अर्थात् नीच किंवा भ्रष्ट झालेल्या मनुष्याचे खाल्लेले अन्न ओकून टाकावे त्याप्रमाणे सिद्धयोगाचा साधकभक्तयोगिशिष्य दीर्घकाल, निरंतर व श्रद्धाभक्तिपूर्वक साधन करून इंद्रियांकडून वासनेसह विषय ओकवून टाकतो अर्थात् त्याग घडवून आणतो.।।१०१६।। मग विषयांपासून परावृत्त झालेली इंद्रिये अर्थात् संसारोन्मुख करणारी आत्मचैतन्य शक्ती शुद्ध होऊन श्रीगंगेच्या तटावर म्हणजे सुषुम्नानाडीच्या मूलाधारात तटावर अर्थात् मुखापाशी आल्यावर साधकभक्तयोगिशिष्य प्रायश्चित्तांच्या अर्थात् नामस्मरण, ध्यान, मनन, चिंतनांच्या द्वारा आपल्या वृत्तिरूप शक्तीला शुद्ध करतो नंतर ती सर्व शुद्ध केलेली इंद्रिये अर्थात् बहिरोन्मुख वृत्ती सात्त्विक धैर्याच्या बळावर मनरूपी शक्तीसह योगधारणेकडे अर्थात् सुषुम्नागामी होण्याकडे प्रवृत्त होतात अर्थात् सिद्धयोगाचा साधकभक्तयोगिशिष्य हे घडावे म्हणून कुंडलिनी शक्तीला वाव देतो.।।१०१८।।

त्याचप्रमाणे अशा स्थितीत त्या साधकभक्तयोगिशिष्याला पूर्वकर्माच्या योगाने अर्थात् प्रारब्धानुसार इष्ट म्हणजे अनुकूल व अनिष्ट म्हणजे प्रतिकूल भोगांची प्राप्ती झाली असता त्यातील अनिष्ट भोग वाढला असता तो त्या वाईट भोगाचा द्वेष करीत नाही।।१०१९।। अथवा प्रारब्धाने जरी सहज चांगला अनुकूल भोगविषय पुढे आणून ठेवला तरी तो साधकभक्तयोगिशिष्य त्या विषया-विषयी आपल्या मनात अभिलाषा बाळगीत नाही.।।१०२०।। याप्रमाणे हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! सिद्धयोगाचा साधकभक्तयोगिशिष्य इष्ट व अनिष्ट अशा सर्व भोगांविषयींचे प्रेम व द्वेष टाकून देऊन पर्वताच्या गुहेत अथवा निर्जन वनात एकांतात वास करतो.।।१०२१।।

विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः।
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः।।५२।।

अर्थ :- जो सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य वन, पर्वत, गुहा इत्यादि एकांतस्थानाचे सेवन करतो, जो हितकर, परिमित, हलके व पवित्र अन्न खातो, जो वाणी, शरीर व मन यांचे नियमन करतो, जो सतत सिद्धयोग-साधनेत तत्पर झालेला अर्थात् दीर्घकाल, निरंतर व श्रद्धाभक्तिसत्कारपूर्वक साधन करीत असतो आणि जो ऐहिक व पारलौकिक विषयांविषयी वैराग्य अर्थात् विरक्ती धारण करून राहतो (तो सिद्धयोगाचा साधकभक्तयोगिशिष्य कालौघात या सिद्धयोगसाधनाच्या बलावर सुषुम्नामार्गाने सहस्रारात येऊन माझ्याशी समरस व समव्याप्त होतो.)।।५२।।

गजबजा सांडिलिया। वसवी वनस्थळिया। अंगाचियाचि मांदिया। एकलेया।।१०२२।। शमदमादिकीं खेळे। न बोलणेंचि चावळे। गुरुवाक्याचेनि मेळें। नेणे वेळु।।१०२३।। आणि आंगा बळ यावें। नातरी क्षुधा जावें। कां जिभेचे पुरवावे। मनोरथ।।१०२४।। भोजन करितांविखीं। यया तिहींतें न लेखी। आहारीं मिती संतोषीं। माप न सूये।।१०२५।। अशनाचेनि पावकें। हारपतां प्राणु पोखे। इतुकियाचि भागु मोटकें। अशन करी ।।१०२६।। आणि परपुरुषें कामिली। कुळवधू आंग न घाली। निद्रालस्या न मोकली। आसन तैसें।।१०२७।। दंडवताचेनि प्रसंगें। भुयीं हन अंग लागे। वांचूनि येर नेघे। राभस्य तेथ ।।१०२८।। देहनिर्वाहापुरतें। राहाटवी हातापायांतें। किंबहुना आपैतें। सबाह्य केलें।।१०२९।। आणि मनाचा उंबरा। वृत्तीसी देखों नेदी वीरा। तेथ कें वाग्व्यापारा। अवकाशु असे।।१०३०।। ऐसेनि देह वाचा मानस। हे

जिणौनि बाह्यप्रदेश। आकळिलें आकाश। ध्यानाचें तेणें।।१०३१।। गुरुवाक्यें उठविला। बोधीं निश्चयो आपुला। न्याहाळी हातीं घेतला। आरिसा जैसा।।१०३२।। पैं ध्याता आपणचि परी। ध्यानरूप वृत्तिमाझारीं। ध्येयत्वें घे हे अवधारीं। ध्यानरूढी गा।।१०३३।। तेथ ध्येय ध्यान ध्याता। ययां तिहीं एकरूपता। होय तंव पंडुसुता। कीजे तें गा।।१०३४।। म्हणौनि तो मुमुक्षु। आत्मज्ञानीं जाला दक्षु। परी पुढां सूनि पक्षु। योगाभ्यासाचा।।१०३५।। आपानरंध्रद्वयां-। माझारीं धनंजया। पार्ष्णी पिडूनियां। कांवरुमूळ।।१०३६।। आकुंचूनि अध। देऊनि तिन्ही बंध। करूनि एकवद। वायुभेदी।।१०३७।। कुंडलिनी जागवूनि। मध्यमा विकाशूनि। आधारादि भेदूनि। आज्ञावरी।।१०३८।। सहस्त्रदळाचा मेघु। पीयूषें वर्षोनि चांगु। तो मूळवरी वोघु। आणूनियां।।१०३९।। नाचतया पुण्यगिरी। चिद्भैरवाच्या खापरीं। मनपवनाची खीच पुरी। वाढूनियां।।१०४०।। जालिया योगाचा गाढा। मेळावा सूनि हा पुढां। ध्यान मागिलीकडां। स्वयंभ केलें।।१०४१।। आणि ध्यान योग दोन्ही। इये आत्मतत्त्वज्ञानीं। पैठी होआवया निर्विघ्नीं। आधींचि तेणें।।१०४२।। वीतरागतेसारिखा। जोडूनि ठेविला सखा। तो आघवियाचि भूमिका-। सवें चाले।।१०४३।। पहावें दिसे तंववरी। दिठीतें न संडी दीप जरी। तरी कें आहे अवसरी। देखावया।।१०४४।। तैसें मोक्षीं प्रवर्तलया। वृत्ती ब्रह्मीं जाय लया। तंव वैराग्य आथी तया। भंगु कैचा।।१०४५।। म्हणौनि सवैराग्यु। ज्ञानाभ्यासु तो सभाग्यु। करूनि जाला योग्यु। आत्मलाभा।।१०४६।। ऐसी वैराग्याची आंगीं। बाणूनियां वज्रांगीं। राजयोगतुरंगीं। आरूढला।।१०४७।। वरी आड पडिलें दिठी। सानें थोर निवटी। तें बळीं विवेकमुष्टीं। ध्यानाचें खांडें।।१०४८।। ऐसेनि संसाररणा आंतु। आंधारीं सूर्य तैसा असे जातु। मोक्षविजयश्रीये बरैतु। होआवयालागीं।।१०४९।।

परार्थ :- (विविक्तसेवी) सिद्धयोगाचे साधन करणारा साधकभक्त-योगिशिष्य लोकांनी गजबजलेले ठिकाण सोडून देऊन आपण एकटाच आपल्या शरीराच्या अवयवांच्या समुदायासह वनात किंवा अरण्यातील जागेत वस्ती करून राहतो.।।१०२२।। हा साधकभक्तयोगिशिष्य शम, दम, तितिक्षा, उपरती, श्रद्धा व समाधान यांच्याशी खेळत असतो अर्थात् यांच्या द्वारा तो अखंड मनो-निग्रहाचा अभ्यास करतो, मौन हेच त्याचे बोलणे असते आणि श्रीसद्गुरुनाथ-

महाराजांच्या वाक्याने म्हणजे तत्त्वमस्यादि एखाद्या महावाक्याच्या किंवा सोऽहंच्या मनन चिंतनात सतत तल्लीन झाल्यामुळे त्याला वेळेचे कधीच भान राहत नाही.।।१०२३।। **(लघ्वाशी)** आणि आपल्या अंगात शक्ती यावी अथवा आपली भूक निभवावी किंवा जिभेचे लाड अगर चोचले पुरवावेत ।।१०२४।। या तिन्ही गोष्टी भोजन करण्याच्या बाबतीत साधकभक्तयोगिशिष्याच्या मनात कधीही येत नाहीत किंवा यासंबंधी तो कधीच पर्वा करीत नाही. तो नेहमी अल्प आहारातच संतुष्ट असतो. अशा प्रकारे आहार केल्याने त्याला जो संतोष होतो त्याचे मोजमापच करता येणार नाही.।।१०२५।। हा साधकभक्तयोगिशिष्य उपवासाने जठराग्नी प्रक्षुब्ध होऊन त्यामुळे प्राणनाश होईल म्हणून प्राणरक्षणापुरते बेताचेच अन्न सेवन करतो.।।१०२६।। **(यतवाक्कायमानसः)** आणि ज्याप्रमाणे परपुरुषाने इच्छा केली असता कुलीन स्त्री त्याला थारा देत नाही किंवा परपुरुषाला वश होऊन त्याच्या स्वाधीन आपले शरीर करीत नाही त्याप्रमाणे सिद्धयोगाचा साधकभक्तयोगिशिष्य निद्रेला व आळसाला वश होत नाही. त्याप्रमाणेच तो भोजनालाही वश होत नाही. त्याचे शरीर श्रीभगवंताना किंवा संतमहात्म्यांना साष्टांग दंडवत प्रणाम करतानाच फक्त भूमीला स्पर्श करते. याशिवाय तो अविचाराने वाटेल त्यावेळी आपले शरीर जमिनीवर टाकून लोळत पडत नाही.।।१०२८।। तो आपल्या हातपायांची हालचाल किंवा उपयोग शरीर चालवण्याकरिताच करतो. फार काय सांगावे! तो आपले अंतःकरण, मन, शरीर व इंद्रिये नेहमी स्वाधीन ठेवतो.।।१०२९।। आणि हे वीरश्रेष्ठ अर्जुना! असा सिद्धयोगाचा साधकभक्तयोगिशिष्य आपल्या वृत्तीला मनाचा उंबरा देखील पाहू देत नाही अर्थात् मनात संकल्प किंवा विकल्प उठू देत नाहीत. अशा स्थितीत वाणीने बोलणे आणि इतर कर्मेंद्रियांनी कर्मे करणे यांच्या व्यापाराला अवकाश किंवा वाव कोठून मिळणार?।।१०३०।। **(ध्यान)** अशा प्रकारे हा साधकभक्तयोगिशिष्य शरीर, वाणी व मन ही सर्व बाहेरची ठिकाणे अर्थात् संसारोन्मुख करणाऱ्या सर्व वृत्ती जिंकून ध्यानाचे आकाश आपल्या स्वाधीन करून घेतो. अर्थात् अशा साधकभक्तयोगिशिष्याची प्राणशक्ती कुंडलिनीचे सुषुम्नेत अत्यंत सहजतेने चालन होऊन त्याला ध्यानावस्था आपोआप प्राप्त होते.।।१०३१।। ज्याप्रमाणे एखाद्या माणसाने आरसा आपल्या हातात घेऊन त्यात आपले स्वरूप किंवा प्रतिबिंब पाहिले असता ते स्पष्ट व स्वच्छपणे दिसते त्याप्रमाणे ज्या साधकभक्तयोगिशिष्याला श्रीसद्गुरुनाथमहाराजांकडून शब्ददीक्षा होऊन

त्याची अनादि निद्रिस्त आत्मचैतन्यशक्ती कुंडलिनी जागृत होते तो त्या बोध-रूप शक्तीच्या महाप्रकाशरूप आरशात आपले आत्मस्वरूप अगर ब्रह्मस्वरूप किंवा श्रीशिवस्वरूप निश्चितपणे पाहतो म्हणजे त्याची जागृत शक्तीच मी श्रीशिवस्वरूप आहे असा अनुभव सहस्रारात श्रीशिवांशी समरस होऊन घेते.।।१०३२।। हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! अशा प्रकारे ध्याता म्हणजे ध्यान करणारा साधकभक्तयोगिशिष्य आपल्या ध्यानरूप झालेल्या वृत्तीमध्ये ध्येयरूपाने समरस होऊन जातो. हीच ध्यान करण्याची प्रसिद्ध रीत आहे. याकरिता हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य पंडुसुता! ध्येय, ध्यान व ध्याता ही त्रिपुटी विसरून जाईपर्यंत म्हणजे त्यांचे सहस्रारात समरसीकरण होईपर्यंत हे ध्यान अर्थात् सिद्धयोगाचे साधन करावे लागते.।।१०३४।। **(योगपरः नित्यं)** याकरिता जो मुमुक्षू म्हणजे मोक्षाची अर्थात् श्रीशिवशक्ति-सामरस्याची इच्छा ठेवून त्याप्रमाणे त्याची प्राप्ती करून आत्मज्ञानामध्ये प्रवीण होतो तो किंवा आत्मज्ञान प्राप्त करून घेण्याविषयी तत्पर होतो तो सिद्धयोग साधनाभ्यासाचा पक्ष म्हणजे मार्ग स्वीकारून योगाभ्यासाच्या आश्रयाने ही सामरस्यावस्था प्राप्त करून घेण्याला प्रवृत्त होतो.।।१०३५।। हे सिद्धयोग-साधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! असा साधकभक्तयोगिशिष्य साधनाभ्यास सुरूकरण्यापूर्वी प्रथम गुदद्वार व उपस्थ म्हणजे लिंग या दोन द्वारांच्या मध्यभागी जी शिवण आहे तिचा मध्य डाव्या किंवा उजव्या पायाच्या टाचेने दाबून त्यावर दुसरा पाय ठेवून सिद्धासन घालून बसतो.।।१०३६।। मग तो साधकभक्तयोगिशिष्य अधोभागाचे म्हणजे गुदस्थानाचे आकुंचन करून प्रथम मूलबंध नंतर उड्डीयान व शेवटी जालंधर बंध साधून प्राणापानादि अर्थात् इडा व पिंगला नाड्यांमधून वाहणारे प्राणवायूचे भेद मोडून त्यांना एकत्रित व सुषुम्नागामी करून।।१०३७।। अर्थात् अशा प्रकारे जो प्राणनिरोधपूर्वक कुंडलिनी शक्ती जागृत करून तिचा मध्यमा म्हणजे सुषुम्ना नाडीत प्रवेश करून व तिला विकसित करतो तो साधकभक्तयोगिशिष्य मूलाधारचक्रापासून पुढील स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध या सर्व चक्रांचे भेदन करून आज्ञाचक्रापर्यंत येतो अर्थात् तो आत्मचैतन्यशक्ती कुंडलिनीला आज्ञाचक्रात आणून स्थिर करतो. सिद्धयोगाचे साधन करणाऱ्या साधकभक्तयोगिशिष्याची कुंडलिनी शक्ती श्रीसद्गुरुकृपेने साधन करता करता सहजच आज्ञाचक्रापर्यंत येते व तेथे स्थिर होते.।।१०३८।। त्यानंतर कुंडलिनी शक्ती आज्ञाचक्रातून निघून सहस्रारात गेल्यावर ब्रह्मरंध्रातील सहस्रदलकमलरूपी अमृताच्या मेघाची वृष्टी होऊ

लागते. हा अमृताचा ओघ सुषुम्नानाडीच्या द्वारा मूलाधारचक्रापर्यंत खाली येतो.।।१०३९।। त्यानंतर पुण्यगिरी पर्वतावर अर्थात् सहस्रारातील पुण्यगिरी पीठावर नृत्य किंवा नर्तन करीत असलेल्या चैतन्यरूप श्रीभैरवाच्या म्हणजे भवाचे रवंथ करणाऱ्या अर्थात् सर्व संसार गिळून टाकणाऱ्या श्रीशिवांच्या खापरात म्हणजे भिक्षापात्रात कुंडलिनी शक्ती मन व प्राण यांचे एकीकरण करून खिचडी वाढते अर्थात् बुद्धी, मन प्राणादि इतर सर्व शक्तींसह श्रीशिवांशी समरस होते.।।१०४०।। अशा प्रकारे श्रीसद्गुरुकृपेने जागृत झालेल्या स्वसंवेद्य आत्मचैतन्य कुंडलिनी शक्तीच्या द्वारा होणाऱ्या या सर्व साधनांचा मेळवा पुढे करून अर्थात् सिद्धयोगसाधनाचे बळकट साहाय्य घेऊन म्हणजे दीर्घकाल, निरंतर व श्रद्धाभक्तिपूर्वक अभ्यास करून पश्चिममार्गाने अर्थात् आज्ञाचक्रापासून सहस्रारापर्यंतचा मार्ग निश्चयाने ओलांडून ध्यान स्वयंभुरूप करतो अर्थात् तो साधकभक्तयोगिशिष्य अखंड स्वसंवेद्य आत्मस्वरूपरूप श्रीशिवशक्तीच्या समरसावस्थेत राहतो.।।१०४१।। **(वैराग्यं)** आणि या साधकभक्तयोगिशिष्याने आपले ध्यान व योग हे दोन्हीही आत्मतत्त्वज्ञानामध्ये अर्थात् अंतिम श्रीशिवशक्तिसामरस्यावस्थेत निर्विघ्नपणे स्थिर होण्यासाठी प्रथमपासूनच।।१०४२।। वैराग्यासखा परममित्र जोडून ठेवलेला असतो. हा वैराग्यसखा मूलाधारात श्रीसद्गुरुकृपेने आत्मचैतन्यशक्ती कुंडलिनी जागृत होऊन सिद्धयोगाचे साधन सुरू झाल्यापासून ती सहस्रारात श्रीशिवांशी समरस होईपर्यंत तो वरवरच्या भूमिकांवर आरुढ होताना आडव्या येणाऱ्या प्रतिबंधांचा नाश करण्याकरिता त्याच्याबरोबर राहतो.।।१०४३।। ज्याप्रमाणे पाहवयाची वस्तू दिसेपर्यंत दिव्याने जर डोळ्यांची सोबत सोडली नाही तर मग ती वस्तू दिसावयाला वेळ लागत नाही।।१०४४।। त्याप्रमाणे मोक्षाची म्हणजे श्रीशिवशक्तिसामरस्याची प्राप्ती व्हावी म्हणून साधनाला प्रवृत्त झालेल्या अर्थात् साधन करणाऱ्या साधकभक्तयोगिशिष्याची वृत्ती म्हणजे जागृत आत्मचैतन्य शक्ती कुंडलिनी सहस्रारात श्रीशिवांशी लय अर्थात् समरस होईपर्यंत जर वैराग्याने सोबत सोडली नाही तर मग श्रीशिवशक्तिसामरस्यानुभूतिरूप अंतिम मोक्षसिद्धीला प्रतिबंध होत नाही.।।१०४५।। याकरिता जो साधकभक्तयोगिशिष्य ज्ञानाचा म्हणजे ज्ञानरूप जागृत कुंडलिनी शक्ती सुषुम्नागामी होऊन तिचा आपल्या मूळच्या श्रीशिवस्वरूपात विकास व्हावा म्हणून दीर्घकाल, निरंतर व श्रद्धाभक्तिपूर्वक साधनाभ्यास करतो तोच भाग्यवान् असून त्यालाच श्रीशिवशक्तिसामरस्यप्राप्तीचा आत्मलाभ होतो.।।१०४६।। अशा

प्रकारे जो साधकभक्तयोगिशिष्य वैराग्याचे चिलखत किंवा वज्रासारखे अभेद्य कवच अंगावर चढवून राजयोगरूप अर्थात् सिद्धयोगसाधनरूप घोड्यावर आरूढ होऊन।।१०४७।। विवेकाच्या बळकट मुठीत ध्यानरूपी म्हणजे सिद्धयोगसाधनरूपी धारदार तलवार धरून साधनामध्ये आडव्या येणाऱ्या व दृष्टीस पडणाऱ्या सर्व लहान मोठ्या अडथळ्यांचा संहार करीत सुटतो. ।।१०४८।। अशा रीतीने ज्याप्रमाणे सूर्य अंधारात निःशंकपणे शिरतो त्याप्रमाणे जन्ममरणचक्रपरंपरारूपी संसाराच्या रणांगणात मोक्ष अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्यरूपी विजयश्रीला वरण्याकरिता तो साधकभक्तयोगिशिष्य निःशंकपणे सिद्धयोगाचे साधन करीत राहतो अर्थात् या साधनाच्या बलावर आपण निश्चितपणे अंतिम सामरस्यसिद्धी प्राप्त करू अशा निश्चयाने साधन करण्यास निघतो.।।१०४९।।

अहङ्कारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम्।
विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते।।५३।।

अर्थ :- जो सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य देहादिकांच्या ठिकाणी असलेला अहंकार अर्थात् "अ" म्हणजे श्रीशिव व "हं" म्हणजे कुंडलिनी शक्ती यांचे द्वैत, बल म्हणजे काम, इच्छा व प्रेमादींनी प्रयुक्त असलेले सामर्थ्य, दर्प म्हणजे मद, काम म्हणजे भोगेच्छा, क्रोध म्हणजे द्वेष व परिग्रह म्हणजे शरीर धारण करणाऱ्या किंवा धर्माचरणाला योग्य व अवश्य असलेल्या सर्व परिग्रहाचा म्हणजे संग्रहाचाही त्याग करून आणि ममत्व म्हणजे माझेपणा सोडून दिल्यामुळे अत्यंत शांत अंतःकरणयुक्त झालेला असतो तोच सच्चिदानंदघन ब्रह्म अर्थात् सहस्रारात श्रीशिवशक्तिसामरस्य किंवा ऐक्य करण्याला समर्थ अगर सिद्ध होतो व ब्रह्मरूप होण्याला योग्य होतो.।।५३।।

तेथ आडवावया आले। दोषवैरी जे धोपटिले। तयांमाजीं पहिलें। देहाहंकारु।।१०५०।। जो न मोकली मारुनी। जीवों नेदी उपजवोनि। विचंबवी खोडां घालुनी। हाडांचिया।।१०५१।। तयाचा देहदुर्ग हा थारा। मोडूनि घेतला तो वीरा। आणि बळ हा दुसरा। मारिला वैरी।।१०५२।। जो विषयाचेनि नांवें। चौगुणेंही वरी थांवे। जेणें मृतावस्था धांवे। सर्वत्र जगा।।१०५३।। तो विषय विषाचा अथावो। आघविया दोषांचा रावो। परी ध्यानखड्गाचा घावो। साहेल कैंचा?।।१०५४।। आणि प्रिय विषयप्राप्ती। करी जया सुखाची व्यक्ती। तेचि घालूनि बुंथीं। आंगीं जो वाजे।।१०५५।। जो सन्मार्गा भुलवी। मग अधर्माच्या आडवीं। सूनि

वाघां सांपडवी। नरकादिकां।।१०५६।। तो विश्वासें मारितां रिपु। निवटूनि घातला दर्पु। आणि जयाचा अहा कंपु। तापसांसी।।१०५७।। क्रोधा ऐसा महादोखु। जयाचा देखा परिपाकु। भरिजे तंव अधिकु। रिता होय जो।।१०५८।। तो कामु कोणेच ठायीं। नसे ऐसें केलें पाहीं। कीं तेंचि क्रोधाही। सहजें आलें।।१०५९।। मुळाचें तोडणें जैसें। होय कां शाखोद्देशें। कामु नाशलेनि नाशे। तैसा क्रोधु।।१०६०।। म्हणौनि काम वैरी। जाला जेथ ठाणोरी। तेथ सरली वारी। क्रोधाचीही।।१०६१।। आणि समर्थु आपुला खोडा। शिसें वाहवी जैसा होडा। तैसा भुंजौनि जो गाढा। परिग्रहो।।१०६२।। जो माथांचि पालाणवी। अंगा अवगुण घालवी। जीवें दांडी घेववी ममत्वाची।।१०६३।। शिष्यशास्त्रादिविलासें। मठादिमुद्रेचेनि मिसें। घातले आहाती फांसे। निसंगा जेणें।।१०६४।। घरीं कुटुंबपणें सरे। तरी वनीं वन्य होऊनि अवतरे। नागवीयाही शरीरें। लागला आहे।।१०६५।। ऐसा दुर्जयो जो परिग्रहो। तयाचा फेडूनि ठावो। भवविजयाचा उत्साहो। भोगीतसे जो।।१०६६।। तेथ अमानित्वादि आघवे। ज्ञानगुणाचे जे मेळावे। ते कैवल्यदेशींचे आघवे। रावो जैसे आले।।१०६७।। तेव्हां सम्यक्ज्ञानाचिया। राणिवा उगाणूनि तया। परिवारु होऊनियां। राहत आंगें।।१०६८।। प्रवृत्तीचिये राजबिदीं। अवस्थाभेदप्रमदीं। कीजत आहे प्रतिपदीं। सुखाचें लोण।।१०६९।। पुढां बोधाचिये कांबीवरी। विवेकु दृश्याची मांदी सारी। योगभूमिका आरती करी। येती जैसिया।।१०७०।। तेथ ऋद्धिसिद्धींचीं अनेगें। वृंदें मिळती प्रसंगें। तिये पुष्पवर्षी आंगें। नाहातसे तो।।१०७१।। ऐसेनि ब्रह्मैक्यासारिखें। स्वराज्य येतां जवळिकें। झळंबित आहे हरिखें। तिन्ही लोक।।१०७२।। तेव्हां वैरियां कां मैत्रियां। तयासि माझें म्हणावया। समानता धनंजया। उरेचिही ना।।१०७३।। हें ना भलतेणें व्याजें। तो जयातें म्हणे माझें। तें नोडवेचि कां दुजें। अद्वितीय झाला।।१०७४।। पैं आपुलिया एकीं सत्ता। सर्वही कवळूनिया पंडुसुता। कहीं न लगती ममता। धाडिली तेणें।।१०७५।। ऐसा जिंतिलिया रिपुवर्गु। अपमानिलिया हें जगु। अपैसा योगतुरंगु। स्थिर जाला।।१०७६।। वैराग्याचें गाढलें। अंगीं त्राण होतें भलें। तेंही नावेक ढिलें। तेव्हां करी ।।१०७७।। आणि निवटी ध्यानाचें खांडें। तें दुजें नाहींचि पुढें। म्हणौनि हातु आसुडें। वृत्तीचाही।।१०७८।। जैसें रसौषध खरें। आपुलें काज करोनि

पुरें। आपणही नुरे। तैसें होतसे ।।१०७९।। देखोनि ठाकिता ठावो। धांवता थिरावे पावो। तैसा ब्रह्मसामीप्यें थावो। अभ्यासु सांडी।।१०८०।। घडतां महोदधीसी। गंगा वेगु सांडी जैसी। कां कामिनी कांतापासीं। स्थिर होय।।१०८१।। नाना फळतिये वेळे। केळीची वाढी मांटुळे। कां गांवापुढें वळे। मार्गु जैसा।।१०८२।। तैसा आत्मसाक्षात्कारु। होईल देखोनि गोचरु। ऐसा साधनहतियेरु। हळूचि ठेवी।।१०८३।। म्हणौनि ब्रह्मेंसीं तया। ऐक्याचा समो धनंजया। होतसे तैं उपाया। वोहटु पडे।।१०८४।। मग वैराग्याची गोंधळुक। जे ज्ञानाभ्यासाचें वार्धक्य। योगफळाचाही परिपाक। दशा जे कां।।१०८५।। ते शांति पैं गा सुभगा। संपूर्ण ये तयाचिया आंगा। तैं ब्रह्म होआवयाजोगा। होय तो पुरुषु।।१०८६।। पुनवेहुनी चतुर्दशी। जेतुलें उणेपण शशी। कां सोळे पाउनि जैसी। पंधरावी वानी।।१०८७।। सागरींही पाणी वेगें। संचरे तें रूप गंगे। येर निश्चळ जें उगें। तें समुद्र जैसा।।१०८८।। ब्रह्मा आणि ब्रह्महोतिये। योग्यते तैसा पाडु आहे। तेंचि शांतीचेनि लवलाहें। होय तो गा।।१०८९।। पैं तेंचि होणेंनवीण। प्रतीती आलें जें ब्रह्मपण। तें ब्रह्म होती जाण। योग्यता येथ।।१०९०।।

परार्थ :- (अहंकार) ज्यावेळी साधकभक्तयोगिशिष्य सिद्धयोगसाधनाची वाटचाल करावयाला सुरुवात करतो त्यावेळी तो साधनमार्गात आडव्या येणाऱ्या ज्या ज्या दोषरूपी वैऱ्यांना धोपटून काढतो त्यातील पहिला मुख्य वैरी देहाहंकार हा आहे.।।१०५०।। हा अहंकार साधकभक्तयोगिशिष्याला नुसते मारून सोडून देत नाही अर्थात् मेल्यानंतरही तो सोडीत नाही; तर पुन्हा जन्माला घालून सुखाने जगूही देत नाही आणि त्याला हाडांच्या खोड्यात म्हणजे देहाच्या सापळ्यात घालून नेहमी कुचंबत ठेवतो.।।१०५१।। **(बल)** हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य वीरा अर्जुना! साधकभक्तयोगिशिष्याचा देहरूपी किल्ला हाच अहंकाराचा मुख्य आधार आहे. साधन करताना साधकभक्तयोगिशिष्य या किल्ल्याचा विध्वंस करून तो जिंकून घेतो आणि बल म्हणजे भोगेच्छारूपी सर्व संसारोन्मुख वृत्तींच्या रूपाने असणाऱ्या दुसऱ्या शत्रूलाही मारून टाकतो किंवा त्याचा नाश करतो.।।१०५२।। हा बलरूपी शत्रू विषयोपभोगांचे नाव घेताच चौपटीपेक्षाही अधिक वाढतो आणि त्याच्या योगाने सर्व जगाला मृतावस्था प्राप्त होते म्हणजे सर्व जग ईश्वरप्राप्तीचे साधन न करता भोगेच्छाप्राप्तीतच रममाण होऊन जाते.।।१०५३।। तो बलरूपी शत्रू

विषयरूपी विषाचा केवळ अगाध डोह असून सर्व दोषांचा राजा आहे. असे असले; तरी तो ध्यानरूपी तलवारीचा घाव कसा सहन करू शकेल? अर्थात् सिद्धयोग साधनाने प्राप्त होणारे ध्यान बलरूपी शत्रूचा नाश करून टाकते. ।।१०५४।। **(दर्प)** आणि जो प्रिय विषयांच्या प्राप्तीच्या सुखाची अभिव्यक्ती करतो, जो त्या सुखाचा म्हणजे विषयानंदाचा बुरखा अंगात घालून गर्जना करतो अर्थात् साधकभक्तयोगिशिष्याच्या यथार्थ आत्मस्वरूपावर आच्छादन टाकून त्याला विषयसुखात भुलवितो.।।१०५५।। जो साधकभक्तयोगिशिष्याला सन्मार्गाविषयी भूल पाडून त्याला दूर नेतो अर्थात् कुमार्गाला नेतो आणि अधर्माच्या रानात घालून नरकादिरूप वाघांच्या तावडीत अचूक नेऊन सोडतो. ।।१०५६।। अशा विश्वासघातकी दर्परूप शत्रूला साधकभक्तयोगिशिष्य सिद्धयोगसाधनाने मारून टाकतो. **(काम)** आणि अहाहा! त्या कामाचे नाव ऐकताच तपस्वी लोकांचाही थरकाप होतो.।।१०५७।। क्रोधासारखा भयंकर दोष हा या कामाचाच परिपाक किंवा परिपक्व अवस्था आहे आणि कामेच्छेप्रमाणे जो जो विषयभोग भोगीत जावे तो तो काम अपूर्णच राहतो म्हणजे भोगेच्छा अधिकाधिक वाढतच राहते.।।१०५८।। असे ज्या कामाचे स्वरूप आहे त्या कामाला साधकभक्तयोगिशिष्य सिद्धयोगसाधनाच्या बळावर पूर्णपणे निपटून नाहीसे करतो. **(क्रोध)** पुढे क्रोधाची देखील तीच स्थिती होते.।।१०५९।। ज्याप्रमाणे झाडाचे मूळ तोडल्यामुळे त्याच्या शाखा अर्थात् फांद्या तोडण्याचा उद्देश सफल होतो त्याप्रमाणे कामाचा नाश केला की क्रोधाचाही आपोआपच नाश होतो.।।१०६०।। त्यामुळे ज्यावेळी सिद्धयोग-साधनयुद्धात कामरूपी शत्रू मारला जातो त्यावेळी क्रोधाचेही येणे जाणे सहजच संपून जाते.।।१०६१।। **(परिग्रह)** ज्याप्रमाणे सत्ताधीश आपले ओझे पैजेने दुसऱ्याच्या शिरावर टाकून ते त्याला वाहवयास लावतो त्याप्रमाणे परिग्रह हा सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्याच्या मनात विषयसंग्रहाची तीव्र इच्छा उत्पन्न करून भोग भोगावयास लावतो.।।१०६२।। तो परिग्रह सिद्ध-योगसाधकभक्तयोग्याचा पराभव करण्याकरिता त्याच्या मस्तकावर आपले खोगीर ठेवतो, आपल्या अंगचे अवगुण त्याच्या ठिकाणी जडवतो व त्याला हे माझे अशा ममत्वाची व अभिमानाची काठी धरावयाला लावतो अर्थात् त्याला विषयासक्तीत गुंतवितो.।।१०६३।। हा परिग्रहरूप शत्रू वैराग्यशील व निःसंग सिद्धयोगसाधकभक्तालाही शिष्य, शिष्यशाखा, मठ, ग्रंथ, मुद्रा म्हणजे अनुग्रहदीक्षादि व्यापार इत्यादि लक्षणांच्या मिषाने किंवा निमित्ताने संगाच्या

पाशात अडकवितो.।।१०६४।। सिद्धयोगसाधकभक्तयोगी जरी प्रथम आपल्या घरचा कुटुंबाच्या रूपाने असलेला परिग्रह संपवून वनात जाऊन राहिला तरी तेथील वन्य पदार्थांवरील ममत्वाच्या रूपाने तो परिग्रह पुन्हा अवतीर्ण होतो. इतकेच नव्हे; तर जरी सिद्धयोगसाधकभक्तयोग्याने कपड्याचा त्याग करून तो नग्न राहू लागला तरी शरीराच्या रूपाने परिग्रह हा त्याला आपल्या पाशात गुंतविण्यासाठी पाठीमागे लागलेला असतो.।।१०६५।। ज्यावेळी जिंकण्याला अत्यंत कठीण असलेल्या परिग्रहरूपी शत्रूला जिंकून त्याचा ठावठिकाणा नाहीसा करून सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य संसार जिंकल्याचा किंवा त्यातून सुटण्याच्या विजयाचा आनंद भोगतो।।१०६६।। **(निर्ममः)** त्यावेळी अमानित्वादि सर्व ज्ञानगुणांचे समुदाय (अध्याय १३ श्लोक ७ ते ११) हे जणू काही कैवल्याचे म्हणजे श्रीशिवशक्तिसामरस्याचे ज्याप्रमाणे राजेच असावेत त्याप्रमाणे समोर येतात अर्थात् हे सर्व ज्ञानाचे गुण सिद्धयोगसाधकभक्तयोग्याच्या ठिकाणी येऊन राहतात.।।१०६७।। ज्यावेळी सिद्धयोगसाधकभक्तयोग्याला ही स्थिती प्राप्त होते त्यावेळी हे सर्व ज्ञानाचे गुण त्याला यथार्थ ज्ञानाचे अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्याचे राजपद अर्पण करून ते स्वतः त्याचे परिवार होऊन राहतात अर्थात् सिद्धयोग्याच्या ठिकाणी ज्ञानाचे सर्व सद्गुण अखंडपणे राहत असतात.।।१०६८।। त्याचप्रमाणे प्रवृत्तिरूपी राजमार्गात असलेल्या जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तीन अवस्थारूपी स्त्रिया या सिद्धयोग्यावरून पावलोपावली आपापल्या सुखाचे लिंबलोण उतरवून टाकीत असतात अर्थात् सिद्धयोग्याला तुर्यावस्था प्राप्त झालेली असल्यामुळे या तिन्ही अवस्था त्याच्या दासी होतात.।।१०६९।। अशा सिद्धयोग्याच्या पुढे विवेक हा बोधरूप काठीने त्याच्यापुढे येणाऱ्या दृश्यांची अर्थात् द्वैत पदार्थांची किंवा विचारांची गर्दी दूर करतो आणि सर्व योगभूमिका या जणू काही हातात आरत्याच घेऊन त्याला ओवाळावयाला येतात अर्थात् सिद्धयोग्याच्या चरणी सर्व योगभूमिका आश्रय घेऊन राहतात.।।१०७०।। त्यावेळी त्या प्रसंगी सिद्धयोग्याच्या ठिकाणी ऋद्धिसिद्धींचे अनेक समुदाय येऊन मिळतात आणि त्यांनी केलेल्या पुष्पवृष्टीच्या योगाने तो स्वतः अगदी न्हाऊन निघतो.।।१०७१।। अशा रीतीने जीव ब्रह्मैक्यासारखे म्हणजे जीवरूपाने संकुचित झालेली कुंडलिनी शक्ती सिद्धयोगसाधनाने विभू होऊन ब्रह्म म्हणजे श्रीशिवांशी समरस झाल्यामुळे स्वराज्य अर्थात् या सामरस्यात्मक स्वसंवेद्य आत्मस्वरूपाची प्राप्ती जसजशी जवळ येते तसतसे त्याला सर्व त्रैलोक्य आनंदाने उचंबळून भरून गेलेले आहे

अशी अनुभूती येते.।।१०७२।। हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! ज्यावेळी सिद्धयोगसाधकभक्तयोगी अशा प्रकारे श्रीशिवशक्तिसामरस्याची अंतिम सिद्धी प्राप्त करतो त्यावेळी त्याला समानता किंवा समभाव प्राप्त झाल्यामुळे हा माझा वैरी आहे अथवा हा माझा मित्र आहे असे म्हणण्यासारखे द्वैत किंवा विषमता ही त्याच्या ठिकाणी अल्पांशानेही उरत नाही.।।१०७३।। इतकेच नव्हे; तर असा सिद्धयोगी कोणत्याही निमित्ताने कोणत्याही गोष्टीला माझे असे म्हणेल इतकेही द्वैत किंवा दुजेपणा त्याच्यासमोर येत नाही; कारण तो स्वतःच अद्वितीय अशा अद्वय म्हणजे श्रीशिवशक्तिसामरस्य अवस्थेला प्राप्त झालेला असतो.।।१०७४।। हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्यअर्जुना! याप्रमाणे सिद्धयोगी हा केवळ आपल्या एका सत्तेने म्हणजे श्रीसद्गुरुकृपेने जागृत झालेल्या स्वसंवेद्य आत्मचैतन्यरूप कुंडलिनी शक्तीच्या श्रीशिवस्वरूपात विकसित झालेल्या भावाने सर्व विश्वाला कवटाळून म्हणजे व्यापून राहिल्यामुळे त्याला ममता कधीच जडत नाही; कारण सामरस्यावस्था प्राप्त झाल्यामुळे त्याच्याकडून ममतेचा केव्हाच त्याग झालेला असतो.।।१०७५।। **(शांत)** याप्रमाणे सर्व अहंकारादि शत्रुसमुदायाला जिंकल्यानंतर आणि या सर्व आभासात्मक जगाचा निरास केल्यानंतर किंवा या सर्व जगाच्या रूपाने आपणच नटलेले आहोत अशी अनुभूती घेतल्यानंतर जो साधकभक्तयोगिशिष्य या सिद्धयोगरूप घोड्यावर बसून असतो तो सहस्रारातील श्रीशिवशक्तिसामरस्यानुभूतीमुळे आपोआपच स्थिर होतो.।।१०७६।। त्यावेळी सिद्धयोगी साधन करताना आपल्या अंगात घातलेले वैराग्याचे अत्यंत बळकट असे कवच किंवा चिलखत हे सुद्धा घटकाभर किंवा क्षणभर ढिले करतो.।।१०७७।। आणि ध्यानरूपी तलवारीच्या योगाने ज्याचा नाश करावयाचा असतो असे कोणतेच द्वैत त्याच्यापुढे यत्किंचितही उरलेले नसल्यामुळे तो ध्यानाची तलवार धारण करणाऱ्या वृत्तीचाही हात आसुडतो म्हणजे झिडकारून टाकतो व उगारलेले शस्त्र मागे घेतो अर्थात् ध्यान म्हणजे जागृत कुंडलिनी शक्ती ध्येयात म्हणजे श्रीशिवात विलीन झाल्यामुळे सिद्धयोगसाधनाची जरूरी राहत नाही.।।१०७८।। ज्याप्रमाणे एखादे खरे औषधीरसायन रोग बरे करण्याचे आपले काम पूर्ण केल्यानंतर आपणही शिल्लक राहत नाही त्याप्रमाणे ध्यान ध्येयरूप झाल्यावर नाहीसे होते।।१०७९।। किंवा ज्याप्रमाणे जेथे पोहोचावयाचे असते ते मुक्कामाचे ठिकाण दिसू लागल्यावर धावणाऱ्या मनुष्याचे पाय मंदावून थांबू लागतात त्याप्रमाणे ब्रह्म अर्थात् श्रीशिवाशी समरस होण्याची प्राप्ती जवळ आल्यावर सिद्धयोगसाधकभक्त-

योगिशिष्याचा साधनाभ्यासही आपोआप मंदावू लागतो.।।१०८०।। ज्याप्रमाणे श्रीगंगानदी समुद्राला मिळाल्यावर आपला वाहण्याचा वेग सोडून देते किंवा कामिनी स्त्री आपल्या पतीशी एकांतात गाठ पडल्यावर त्याच्याशी समरस व स्थिर होऊन शांत होते.।।१०८१।। अथवा केळीचे झाड फळल्यावर त्याची वाढ खुंटते किंवा गांव येताच मार्गही संपून जातो।।१०८२।। त्याप्रमाणे साधकभक्तयोगिशिष्याला आत्मसाक्षात्कार अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्याची अनुभूती जवळ आली आहे असे समजताच किंवा दृष्टीस पडताच तो सिद्धयोगसाधनरूपी हत्यार आपल्या हातातून हळूच खाली ठेवतो अर्थात् साधनच म्हणजे कुंडलिनी शक्तीच साध्यरूप म्हणजे श्रीशिवरूप झाल्यावर सिद्धयोगाच्या साधकाला साधनाची आवश्यकताच राहत नाही.।।१०८३।। याकरिता हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! ब्रह्माशी म्हणजे आपल्या स्वसंवेद्य आत्मस्वरूपयुक्त श्रीशिवांशी ज्यावेळी ऐक्य अर्थात् समरस होण्याची वेळ येते त्यावेळी सिद्धयोगसाधनमार्गाला हळूहळू ओहोटी लागत जाते अर्थात् सर्व साधन थांबू लागते.।।१०८४।। मग वैराग्याची सांजवेळ किंवा ज्ञानाच्या अभ्यासाचे वार्धक्य अथवा सिद्धयोगफलाची परिपक्व दशा।।१०८५।। असलेली अशी शांती हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! त्या सिद्धयोग्याच्या अंगप्रत्यंगातून खेळत राहते. ज्यावेळी साधकभक्तयोगिशिष्याला या शांतीची प्राप्ती होते त्यावेळी तो श्रीशिवशक्तिसामरस्यावस्थेची अनुभूती घेऊन त्या अवस्थेत अखंड स्थिर राहण्याचा योग्य अधिकारी होतो.।।१०८६।। ज्याप्रमाणे पौर्णिमेपेक्षा चतुर्दशीच्या दिवशी चंद्राच्या कलेत जितका कमीपणा किंवा उणेपणा असतो अथवा सोन्याच्या सोळाआणे पूर्ण कसापेक्षा पंधराआणे कसात जितकी कमतरता असते।।१०८७।। किंवा श्रीगंगानदीने समुद्रात वेगाने प्रवेश केल्यानंतर तिच्या पाण्याचा वेग जेथपर्यंत दृष्टीस पडतो तेथपर्यंत जरी श्रीगंगेचेच स्वरूप असले तरी जेथे तिचा वेग थांबतो तेथे समुद्राचेच स्वरूप असते।।१०८८।। त्याप्रमाणे ब्रह्म म्हणजे श्रीशिव व ब्रह्मरूप अर्थात् श्रीशिवरूप होणारा देहधारी जीवन्मुक्त सिद्धयोगी यांच्यात जरी अंतर दिसत असले तरी ते अंतर अखंड शांतीच्या प्राप्तीच्या योगाने तत्काल नाहीसे होऊन सिद्धयोगी ब्रह्म अर्थात् श्रीशिव होतो.।।१०८९।। परंतु अशी पूर्णब्रह्मरूपता म्हणजे श्रीशिवशक्तिसामरस्यावस्था प्राप्त होण्यापूर्वी आपण मुळचे श्रीशिवस्वरूपच आहोत अशी जी प्रतीती किंवा अनुभूती सिद्धयोग्याला आलेली असते तीच त्याची अनुभूती ब्रह्मरूप अर्थात् श्रीशिवरूप होण्याची पात्रता आहे असे तू

समज.।।१०९०।।

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम्।।५४।।

अर्थ :- जो सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य सिद्धयोगाचे स्वतः आपोआप होणारे साधन करता करता ब्रह्मभूत म्हणजे सहस्रारात श्रीशिवशक्तिसामरस्यावस्थेला प्राप्त झालेला असतो तो आत्मानंदामुळे नेहमी प्रसन्नचित्त व आनंदी असतो. तो कशाबद्दलही शोक किंवा आकांक्षा करीत नाही. तो सर्व भूतांना समभावाने अर्थात् श्रीशिवरूपाने पाहतो आणि तो ज्ञानोत्तर पराभक्तीला अर्थात् दिव्य प्रेमरूप शक्तीच्या परावस्थेला प्राप्त होतो.।।५४।।

ते ब्रह्मभावयोग्यता। पुरुषु तो मग पंडुसुता। आत्मबोध-प्रसन्नता। पदीं बैसे।।१०९१।। जेणें निपजे रससोय। तो तापुही जैं जाय। तैं ते कां होय। प्रसन्न जैसी।।१०९२।। नाना भरतिया लगबगा। शरत्काळीं सांडिजे गंगा। कां गीत रहातां उपांगा। वोहटु पडे।।१०९३।। तैसा आत्मबोधीं उद्यमु। करितां होय जो श्रमु। तोही जेथें समु। होऊनि जाय।।१०९४।। आत्मबोधप्रशस्ती। हे तिये दशेची ख्याती। ते भोगीतसे महामती। योग्यु तो गा ।।१०९५।। तेव्हां आत्मत्वें शोचावें। कांहीं पावावया कामावें। हें सरलें समभावें। भरितें तया।।१०९६।। उदया येतां गभस्ती। नाना नक्षत्रव्यक्ती। हारवीजती दीप्ती। आंगिका जेवीं।।१०९७।। तेवीं उठतिया आत्मप्रथा। हे भूतभेदव्यवस्था। मोडीत मोडीत पार्था। वास पाहे तो।।१०९८।। पाटियेवरील अक्षरें। जैसीं पुसतां येती करें। तैसीं हारपती भेदांतरे। तयाचिये दृष्टी।।१०९९।। तैसेनि अन्यथा ज्ञानें। जियें घेपती जागरस्वप्नें। तियें दोन्ही केलीं लीनें। अव्यक्तामाजीं।।११००।। मग तेंही अव्यक्त। बोध वाढतां झिजत। पुरलां बोधीं समस्त। बुडोनि जाय।।११०१।। जैसी भोजनाच्या व्यापारीं। क्षुधा जिरत जाय अवधारीं। मग तृप्तीच्या अवसरीं। नाहींच होय।।११०२।। नाना चालीचिया वाढी। वाट होत जाय थोडी। मग पातला ठायीं बुडी। देऊनि निमे।।११०३।। कां जागृति जंव जंव उद्दीपे। तंव तंव निद्रा हारपे। मग जागीनलिया स्वरूपें। नाहींच होय।।११०४।। हें ना आपुलें पूर्णत्व भेटे। जेथ चंद्रासीं वाढी खुंटें। तेथ शुक्लपक्षु आटे। निःशेषु जैसा।।११०५।। तैसा बोध्यजात गिळितु। बोधु बोधें ये मज आंतु। मिसळला तेथ साद्यंतु। अबोधु गेला।।११०६।। तेव्हां कल्पांताचिये

वेळे। नदी सिंधूचें पेंडवळें। मोडूनि भरलें जळें। आब्रह्म जैसें।।११०७।। नाना गेलिया घट मठ। आकाश ठाके एकवट। कां जळोनि काष्ठें काष्ठ। वह्नीचि होय।।११०८।। नातरी लेणियांचे ठसे। आटोनि गेलिया मुसे। नामरूपभेदें जैसें। सांडिजे सोनें।।११०९।। हेंही असो चेइलया। तें स्वप्न नाहीं जालिया। मग आपणचि आपणयां। उरिजे जैसें।।१११०।। तैसा मी एकवांचूनि कांहीं। तया तयाहीसकट नाहीं। हे चौथी भक्ति पाहीं। माझी तो लाहे।।११११।। येर आर्तु जिज्ञासु अर्थार्थी। हे भजती जिये पंथीं। ते तिन्ही पावोनि चौथी। म्हणिपत आहे ।।१११२।। एऱ्हवीं तिजी ना चौथी। हे पहिली ना सरती। पैं माझिये सहजस्थिती। भक्ति नाम।।१११३।। जे नेणणें माझें प्रकाशूनि। अन्यथात्वें मातें दाऊनि। सर्वही सर्वीं भजौनि। बुझावीतसे जे।।१११४।। जो जेथ जैसें पाहों बैसे। तया तेथ तैसेंचि असे। हें उजियेडें कां दिसे। अखंडें जेणें।।१११५।। स्वप्नाचें दिसणें न दिसणें। जैसें आपलेनि असलेपणें। विश्वाचें आहे नाहीं जेणें। प्रकाशें तैसें।।१११६।। ऐसा हा सहज माझा। प्रकाशु जो कपिध्वजा। तो भक्ति या वोजा। बोलिजे गा।।१११७।। म्हणौनि आर्ताच्या ठायीं। हें आर्ति होऊनि पाहीं। अपेक्षणीय जें कांहीं। तें मीचि केला ।।१११८।। जिज्ञासुपुढां वीरेशा। हेचि होऊनि जिज्ञासा। मी कां जिज्ञास्यु ऐसा। दाखविला ।।१११९।। हेचि होऊनि अर्थना। मीचि माझ्या अर्थीं अर्जुना। करूनि अर्थाभिधाना। आणी मातें।।११२०।। एवं घेऊनि अज्ञानातें। माझी भक्ति जे हे वर्ते। ते दावी मज द्रष्टयातें। दृश्य करूनि ।।११२१।। येथें मुखचि दिसे मुखें। या बोला कांहीं न चुके। तरी दुजेपण हें लटिकें। आरिसा करी।।११२२।। दिठी चंद्रचि घे साचें। परी येतुलें हें तिमिराचें। जे एकचि असे तयाचे। दोनी दावी।।११२३।। तैसा सर्वत्र मीचि मियां। घेपतसें भक्ति इया। परी दृश्यत्व हें वायां। अज्ञानवशें।।११२४।। तें अज्ञान आतां फिटले। माझें द्रष्टृत्व मज भेटलें। निजबिंबीं एकवटलें। प्रतिबिंब जैसें।।११२५।। पैं जेव्हांही असे किडाळ। तेंव्हांही सोनेंचि अढळ। परी ते कीड गेलिया केवळ। उरे जैसें।।११२६।। हां गा पूर्णिमे आधीं कायी। चंद्रु सावयवु नाहीं?। परी तिये दिवशीं भेटे पाहीं। पूर्णता तया।।११२७।। तैसा मीचि ज्ञानद्वारें। दिसें परी हस्तांतरें। मग द्रष्टृत्व तें सरे। मियांचि मी लाभें।।११२८।। म्हणौनि दृश्यपथा-। अतीतु माझा पार्था। भक्तियोगु चवथा। म्हणितला गा।।११२९।।

परार्थ :- हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! मग ब्रह्मभाव अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्य प्राप्त होण्याच्या योग्यतेला पोहोचलेला साधकभक्तयोगिशिष्य सिद्ध होऊन आत्मबोध प्रसन्नतेच्या म्हणजे स्वसंवेद्य आत्मस्वरूपप्राप्तीच्या आनंदाच्या पदावर अखंड आरूढ होतो.।।१०९१।। ज्याप्रमाणे ज्या अग्नीच्या योगाने स्वयंपाक तयार होतो त्या अग्नीची त्या अन्नात उतरलेली उष्णता ज्यावेळी निघून जाते त्यावेळी ते अन्न प्रसन्नपणे सेवन करण्यास योग्य होते।।१०९२।। अथवा शरदऋतूमध्ये श्रीगंगानदीही वर्षाकालात आपली दररोज येणारी भरती व ओहोटी सोडून देऊन स्थिर होते किंवा गाणे संपले म्हणजे त्याच्या साथीला असलेली मृदंग, तंबोरा इत्यादि वाद्यसाधनेही बंद पडतात।।१०९३।। त्याप्रमाणे ज्यावेळी अंतिम आत्मबोधाची अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्याची प्राप्ती व्हावी म्हणून प्रयत्न करताना साधनचतुष्टयादि साधनसंपत्ती जमविण्याचे श्रम झालेले असतात तेही सामरस्यावस्थेत विलीन होऊन शांत होतात.।।१०९४।। हे अत्यंत बुद्धिमान् सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! ही श्रीशिवशक्तिसामरस्यावस्था आत्मबोधप्रसन्नता या नावाने प्रसिद्ध असून सिद्धयोगीच ही स्थिती भोगण्यास योग्य असतो.।।१०९५।। या स्थितीत समभावाचे म्हणजे श्रीशिवशक्तिसामरस्याचे भरते आल्यावर व सर्वत्र आत्मबुद्धी स्थिर झाल्यावर एखाद्याविषयी दुःख करावे किंवा त्याला दुःख व्हावे अथवा कशाची तरी प्राप्ती व्हावी म्हणून इच्छा धरावी या दोन्ही गोष्टी सिद्धयोग्याच्या ठिकाणी आपोआपच संपून जातात.।।१०९६।। ज्याप्रमाणे सूर्य उदयाला आल्याबरोबर सर्व नक्षत्रे आपल्या अंगची प्रभा हरवून बसतात ।।१०९७।। त्याप्रमाणे हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! ज्या साधकभक्तयोगिशिष्याला आत्मप्रभा म्हणजे श्रीशिवशक्तिसामरस्यात्मक आत्मानुभूती प्राप्त होऊन जो सिद्धयोगी झालेला असतो तो प्राणिमात्राविषयीचा भेदभाव मोडीत काढून अखंड स्वस्वरूपात्मक अद्वयानंदात स्थिर राहतो.।।१०९८।। ज्याप्रमाणे पाटीवर लिहिलेली अक्षरे हाताने पुसता येतात अर्थात् अक्षर म्हणजे श्रीशिव व त्यातून प्रकट होणारा अर्थ म्हणजे शक्ती ही समरस होऊन जातात त्याप्रमाणे सिद्धयोग्याच्या ठिकाणी सर्व कल्पित किंवा आभासात्मक भेदाभेद नाहीसे होतात.।।१०९९।। असे झाले म्हणजे अन्यथा अर्थात् विपरीत ज्ञानामुळे जागृती व स्वप्न या ज्या दोन अवस्था प्रतीत होत असतात या दोन्ही अवस्था अव्यक्तामध्ये अर्थात् अज्ञानामध्ये लीन होतात.।।११००।। मग जसजसा आत्मबोध अर्थात् बोधरूप चैतन्यशक्ती

कुंडलिनी सिद्धयोगसाधनाने विकसित होत आपले मूळचे श्रीशिवस्वरूप धारण करीत जाते तसतसे मूळ अज्ञान हळू-हळू झिजत झिजत नाहीसे होऊन पूर्णबोधात म्हणजे श्रीशिवस्वरूपात लीन किंवा गडप होते.।।११०१।। ज्याप्रमाणे भोजन करताना घासाबरोबर भूक कमी कमी होत जाते व पूर्ण तृप्ती झाल्यावर ती अजिबात नाहीशी होते किंवा जसजसा चालण्याचा वेग वाढत जातो तसतशी वाटही कमी होता होता मुक्कामाला पोहोचल्यावर ती संपूर्णपणे संपून जाते।।११०३।। किंवा हळूहळू जो जो जागेपणा येत जातो तो तो झोप कमी कमी होत जाते आणि मग पूर्णपणे जागे झाल्यावर ती पूर्णपणे नाहीशी होते.।।११०४।। अथवा हे दृष्टान्त राहू देत. पौर्णिमेच्या दिवशी चंद्राला आपले पूर्णत्व प्राप्त झाल्यावर ज्यावेळी चंद्राची वाढ खुंटते त्यावेळी शुक्लपक्ष निःशेष नाहीसा होतो।।११०५।। त्याप्रमाणे बोध्य म्हणजे जाणावयाचे ज्ञेय, बोधू म्हणजे श्रीसद्गुरुकृपेने जागृत झालेली जीवरूप कुंडलिनी शक्ती सुषुम्नागामी होऊन व सहस्रारात गमन करून बोधाने म्हणजे अनुभूतीने बोध्याला म्हणजे श्रीशिवांना गिळून टाकते त्यावेळी ती शक्ती श्रीशिवांशी एकरूप व समरस अर्थात् लय पावून मिसळून जात असल्यामुळे समूळ अज्ञान नाहीसे होते.।।११०६।। ज्याप्रमाणे कल्पांताच्या वेळी नदी व समुद्र यांच्या सीमा नाहीशा होऊन आब्रह्मस्तंभापर्यंत सर्व विश्व पाण्याने भरून जाते।।११०७।। किंवा घट, मठ यांचा आकार नाहीसा झाल्यावर त्यांच्यातील आकाश मूळ महाकाशाशी एकरूप होऊन जाते व फक्त निरुपाधिक एकुलते एक महाकाशच शिल्लक राहते अथवा काष्ठाच्या परस्पर घर्षणाने निर्माण झालेला अग्नी सर्व कष्ठांना जाळून टाकून केवळ आपणच शिल्लक राहतो ।।११०८।। अथवा अनेक प्रकारच्या आकारांचे दागिने मुशीमध्ये घालून आटविले असता दागिन्यांचे नाव व रूप म्हणजे आकार इत्यादि भेद नाहीसे होऊन एकमात्र केवळ सुवर्ण खाली उरते.।।११०९।। हेही दृष्टान्त राहू देत. ज्याप्रमाणे पूर्णपणे जागे झालेल्या माणसाचे स्वप्न नाहीसे होऊन मग तो आपणच आपल्या ठिकाणी एकटा उरतो।।१११०।। त्याप्रमाणे सिद्धयोग्याला एक माझ्याशिवाय त्याच्याही सकट दुसरे असे काहीही उरत नाही अर्थात् अशा सिद्धयोग्याला स्वतःच्या अस्तित्वाचेही भान न उरता तो स्वसंवेद्य आत्मस्वरूपयुक्त श्रीशिवशक्तीशी समरस होऊनच राहिलेला असतो. या स्थितीला चौथी भक्ती असे म्हणतात. ही सर्व अवस्थांच्या पलीकडे असलेली चौथी भक्ती सिद्धयोग्याला प्राप्त होते.।।११११।। इतर जे दुसरे जिज्ञासू व

अर्थार्थी हे ज्या ज्या पंथांनी अर्थात् मार्गांनी मला भजतात त्या तिन्ही मार्गांच्या किंवा पंथांच्या अपेक्षेने या भक्तीला मी चौथी भक्ती असे म्हणतो.।।१११२।। जर वास्तविक विचार करून पाहिले तर भक्तीला पहिली, दुसरी, तिसरी व चौथी असे काहीच म्हणता येत नाही; कारण माझी जी स्वसंवेद्य चैतन्यरूप व श्रीशिवशक्तिसामरस्यरूप सहजस्वरूपस्थिती असते त्या स्थितीला भक्ती हे नाव आहे.।।१११३।। माझी ही भक्ती म्हणजे माझ्या स्वस्वरूपाशी अभिन्न व एकरूप असलेली कुंडलिनी शक्ती ही माझ्याविषयीच्या अज्ञानालाही विकसित करून मलाच विपरीत म्हणजे जगदाकाराच्या भावाने दाखवून सर्वांना सर्व ठिकाणी भक्ती अर्थात् प्रेम करायला लावून सर्वांना समजावीत असते;।।१११४।। कारण जो साधकभक्तयोगिशिष्य मला ज्या ठिकाणी माझी जशी कल्पना करून पाहतो तेथे मी त्याला तसाच दिसतो. हे सर्व माझ्या अखंड चित्-प्रकाशामुळेच भासले किंवा प्रकाशले जाते.।।१११५।। ज्याप्रमाणे स्वप्नाचे दिसणे किंवा न दिसणे हे आपल्या अस्तित्वावर अवलंबून आहे त्याप्रमाणे विश्वाचे असणे म्हणजे उदय किंवा उभारणी होऊन भासणे आणि नसणे म्हणजे संहारणी होऊन लोप पावणे हे श्रीशिवांशी अभिन्न असलेल्या प्रकाशावर म्हणजे त्याच्याशी समरस असलेल्या कुंडलिनी शक्तीवर किंवा सत्तास्फूर्तिरूपावर अवलंबून असते.।।१११६।। हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! असा हा जो माझा सहजप्रकाश अर्थात् ज्ञानरूप चित्शक्ती कुंडलिनी यालाच सर्वश्रेष्ठ अशी उत्तमभक्ती असे म्हणतात.।।१११७।। याकरिता आर्त भक्तांच्या ठिकाणी ही भक्ती आर्ति अर्थात् उत्कट इच्छेच्या रूपाने प्रकट होऊन तद्वारा ज्या पदार्थांची ते भक्त अपेक्षा किंवा इच्छा करतात त्या सर्व इच्छांच्या विषयांमध्ये आलंबन किंवा अधिष्ठान म्हणून मीच राहत असतो.।।१११८।। हे वीरश्रेष्ठ सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! जो साधकभक्तयोगिशिष्य जिज्ञासू होऊन मला जाणण्याची इच्छा करतो त्याला ही भक्ती म्हणजे श्रीसद्गुरु-कृपेने जागृत होणारी कुंडलिनी शक्ती मार्गदर्शक होऊन श्रीसद्गुरू बनून जिज्ञास्य म्हणजे जाणण्याचा विषय म्हणून मलाच दाखविते.।।१११९।। हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! हीच भक्ती म्हणजे बहिर्मुखाने संसारोन्मुख होऊन धावणारी शक्ती आपणच अर्थाच्या प्राप्तीची इच्छा किंवा साधने व अर्थ-प्राप्तीची इच्छा करणारी होऊन माझीच याचना करून मलाच अर्थ या नावाने नावारूपाला आणते.।।११२०।। अशा प्रकारे अज्ञानाचा स्वीकार करून माझी ही भक्ती म्हणजे माझ्याशी समवायसंबंधाने, अविनाभावाने, संघट्टपणे, एक-

रसरूपतेने, अद्वयरूपाने समव्याप्त, समरस व अभिन्न असलेली कुंडलिनी शक्ती ज्यावेळी संसारोन्मुख होऊन व्यवहार करू लागते त्यावेळी मी द्रष्टा अर्थात् साक्षिस्वरूपाने पाहणारा असलो तरी ती मला पाहण्याची वस्तू दृश्य म्हणजे साकार करून दाखविते.।।११२१।। ज्याप्रमाणे आरशात पाहिले असता आपलेच मुख आपल्याला प्रतिबिंबरूपाने दिसते, या म्हणण्यांत काहीही चूक असत नाही; परंतु प्रतिबिंब रूपाने खोटा भासणारा जो दुजेपणा असतो तो मात्र आरसा निर्माण करतो.।।११२२।। किंवा तिमिर नावाचा नेत्ररोग झालेल्या मनुष्याची दृष्टी जरी खरोखर एकाच चंद्राला पाहत असली तरी ती एकाच चंद्राचे दोन चंद्र दाखविण्याचेच फक्त काम करते.।।११२३।। त्याप्रमाणे हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! या भक्तीच्या म्हणजे कुंडलिनी शक्तीच्या योगाने मीच सर्वत्र आपल्या स्वतःकडून स्वतःलाच आकलन अर्थात् अनुभूत केला जातो; परंतु जेवढे म्हणून दृश्यत्व दिसते ते सर्व आभासात्मक किंवा मिथ्या असते; कारण ते अज्ञानाच्या म्हणजे शक्तीच्या बहिर्मुखतेमुळे दिसत असते.।।११२४।। ज्याप्रमाणे आरसा इत्यादि उपाधींचा नाश झाल्यावर म्हणजे आरसा बाजूला काढल्यावर त्यात भासणारे प्रतिबिंबही आपल्या बिंबस्वरूपात ऐक्य पावते त्याप्रमाणे भक्तीने म्हणजे श्रीसद्गुरुकृपेने जागृत झालेल्या ज्ञानशक्ती कुंडलिनीमुळे अज्ञान नाहीसे झाले की, माझे दृष्टत्व म्हणजे संकुचित जीवरूप शक्ती विभू होऊन मला भेटते अर्थात् माझ्या सहस्रारातील स्वरूपाशी एकरूप किंवा समरस होते.।।११२५।। ज्याप्रमाणे सोन्यात् ज्यावेळी हिणकस धातू मिसळलेला असतो त्यावेळीही त्याच स्थितीत सोन्याचे सोनेपण अढळतच असते; परंतु हा हिणकस धातू काढून टाकल्यावर मग केवळ शुद्ध सोनेच खाली उरते.।।११२६।। अरे पौर्णिमेच्या आधी कोणत्याही तिथीला चंद्र हा सर्वांगाने परिपूर्ण नसतो काय? परंतु पौर्णिमेच्या दिवशी मात्र त्याला त्याची पूर्णता प्राप्त होते असे वाटते।।११२७।। त्याचप्रमाणे मीच अज्ञानाने अर्थात् अन्यथा ज्ञानाने पिंडब्रह्मांडाच्या रूपाने भिन्नपणे दिसतो; मग ज्ञानाने म्हणजे जागृत कुंडलिनी शक्तीने ज्यावेळी दृश्याचा म्हणजे पिंडब्रह्मांडाचा निरास होऊन ते दृष्टत्वात म्हणजे माझ्यात समरस होऊन जाते त्यावेळी संकुचित जीवशक्तिरूपाने प्रकट झालेला मी जागृत कुंडलिनी शक्तिरूप भक्तीमुळे श्रीशिवस्वरूपाने विभू होऊन माझा मलाच येऊन मिळतो किंवा मीच माझ्याशी समरस होतो.।।११२८।। त्यामुळे हे पार्था! माझा हा भक्तियोग म्हणजे सिद्धयोगांतर्गत शक्तिपातयोग सर्व दृश्य

मार्गांहून निःसंशयपणे भिन्न म्हणजे कल्पनातीत असल्यामुळे त्याला मी चौथा भक्तियोग असे म्हटले आहे. ब्रह्म अर्थात् श्रीशिव ही कल्पनातीत वस्तू असल्यामुळे ती प्राप्त करण्याकरिता सिद्धयोगांतर्गत कल्पनातीत असे शक्तिपात-योगाशिवाय दुसरे कोणतेही सहजसुलभ साधन या भूतलावर प्रकट झालेले नाही. त्यामुळेच श्रीज्ञानेश्वरमहाराज या सिद्धयोगसाधनमार्गाला दृश्यपथा-पलीकडील भक्तियोग असे म्हणतात.।।११२९।।

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः।
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम्।।५५।।

अर्थ :- जो सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य मला पराभक्तीच्या म्हणजे श्रीसद्गुरुकृपेने जागृत झालेल्या आत्मचैतन्यशक्ती कुंडलिनीच्या द्वारा सहस्रारात माझ्याशी समरस व समव्याप्त होऊन ज्यावेळी तत्त्वतः उत्तम प्रकारे जाणतो त्यावेळी मी जेवढा, जो व जसा म्हणजे प्रभावाचा आहे त्याचे यथार्थ ज्ञान त्याला होते अर्थात् अनुभूती येते. त्यानंतर अशा प्रकारे मला यथार्थपणे जाणून म्हणजे माझ्या विभुश्रीशिवशक्तिस्वरूपाची अनुभूती घेऊन तो कुंडलिनी शक्तिरूप सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य मग माझ्या ठिकाणी प्रवेश करतो अर्थात् माझ्याशी समरस व समव्याप्त होऊन अद्वयरूपाने निरंतर स्थिर राहतो.।।५५।।

या ज्ञान भक्ति सहज। भक्तु एकवटला मज। मीचि केवळ हें तुज। श्रुतही आहे।।११३०।। जे उभऊनियां भुजा। ज्ञानिया आत्मा माझा। हें बोलिलों कपिध्वजा। सप्तमाध्यायीं।।११३१।। ते हे कल्पदीं भक्ति मियां। भागवतमिषें ब्रह्मया। उत्तम म्हणौनि धनंजया। उपदेशिली।।११३२।। ज्ञानी इयेतें स्वसंवित्ती। शैव म्हणती शक्ती। आम्ही परमभक्ती। आपुली म्हणौं।।११३३।। हे मज मिळतिये वेळे। तयां क्रमयोगियां फळे। मग समस्तही निखिळें। मियांचि भरे।।११३४।। तेथ वैराग्यविवेकेंसीं। आटे बंध मोक्षेंसीं। वृत्ती तिये आवृत्तीसीं। बुडोनि जाय।।११३५।। घेऊनि ऐलपणातें। परत्व हारपें जेथें। गिळूनि चाऱ्ही भूतें। आकाश जैसें।।११३६।। तया परी थडथाद। साध्यसाधनातीत शुद्ध। तें मी होऊनि एकवद। भोगितो मातें।।११३७।। घडोनि सिंधूचिया आंगा। सिंधूवरी तळपे गंगा। तैसा पाडु तया भोगा। अवधारी जो।।११३८।। का आरिसयासि आरिसा। उटूनि दाविलिया जैसा। देखणा अतिशयो तैसा। भोगणा तिये।।११३९।। हें असो दर्पणु नेलिया। तो मुख बोधुही

गेलिया। देखलेंपण एकलेया। आस्वादिजे जेवीं।।११४०।। चेइलिया स्वप्न नाशे। आपलें ऐक्यचि दिसे। तें दुजेनवीण जैसें। भोगिजे का।।११४१।। तोचि जालिया भोगु तयाचा। न घडे हा भावो जयांचा तिहीं बोलें केवीं बोलाचा। उच्चारु कीजे।।११४२।। तयांच्या नेणों गांवीं। रवी प्रकाशी हन दिवी। कीं रायपण काय भोगी? का आंधारु हन आलिंगी। दिनकरातें?।।११४४।। आणि आकाश जें नव्हे। तया आकाश काय जाणवे?। रत्नाच्या रूपीं मिरवे। गुंजांचें लेणें?।।११४५।। म्हणौनि मी होणें नाहीं। तया मीचि आहें केहीं। मग भजेल हें कायी। बोलों कीर।।११४६।। यालागीं तो क्रमयोगी। मी जालाचि मातें भोगी। तारुण्य कां तरुणांगीं। जियापरी।।११४७।। तरंग सर्वांगी तोय चुंबी। प्रभा सर्वत्र विलसे बिंबीं। नाना अवकाश नभीं। लुंठतु जैसा।।११४८।। तैसा रूप होऊनि माझें। मातें क्रियावीण तो भजे। अलंकारु का सहजें। सोनयातें जेवीं।।११४९।। का चंदनाची द्रुती जैसी। चंदनीं भजे अपैसी। का अकृत्रिम शशीं। चंद्रिका ते।।११५०।। तैसी क्रिया कीर न साहे। तऱ्ही अद्वैतीं भक्ति आहे। हे अनुभवाचिजोगें नव्हे। बोलाऐसें।।११५१।। तेव्हां पूर्वसंस्कार छंदें। जें कांहीं तो अनुवादे। तेणें आळविलेनि वो दें। बोलतां मीति।।११५२।। बोलतया बोलताचि भेटे। तेथें बोलिलें हें न घटे। तें मौन तंव गोमटें। स्तवन माझें।।११५३।। म्हणौनि तया बोलतां। बोली बोलतां मी भेटतां। मौन होय तेणें तत्त्वतां। स्तवितो मातें।।११५४।। तैसेंचि बुद्धी का दिठी। जें तो देखों जाय किरीटी। तें देखणें दृश्य लोटी। देखतेंचि दावी।।११५५।। आरिसया आधीं जैसें। देखतेंचि मुख दिसे। तयाचें देखणें तैसें। मेळवी द्रष्टें।।११५६।। दृश्य जाउनियां द्रष्टें। द्रष्टयासीचि जैं भेटे। तैं एकलेपणें न घटे। द्रष्टेपणही।।११५७।। तेथ स्वप्नींचिया प्रिया। चेवोनि झोंबों गेलिया। ठायिजे दोन्ही न होनियां। आपणचि जैसें।।११५८।। का दोहीं काष्ठांचिये घृष्टी-। माजीं वह्नि एक उठी। तो दोन्ही हे भाष आटी। आपणचि होय।।११५९।। नाना प्रतिबिंब हातीं। घेऊं गेलिया गभस्ती। बिंब-ताही असती। जाय जैसी।।११६०।। तैसा मी होऊनि देखतें। तो घेऊं जाय दृश्यातें। तेथ दश्य ने थितें। द्रष्टृत्वेंसीं।।११६१।। रवि आंधारु प्रकाशिता। नुरेचि जेवीं प्रकाश्यता। तेवीं दृश्यीं नाहीं द्रष्टृता। मी जालिया।।११६२।। मग देखिजे ना न देखिजे। ऐसी जे दशा निपजे। ते

तें दर्शन माझें। साचोकारें।।११६३।। तें भलतयाही किरीटी। पदार्थाचिया भेटी। द्रष्टृदृश्यातीता दृष्टी। भोगितो सदा।।११६४।। आणि आकाश हें आकाशें। दाटलें न ढळें जैसें। मियां आत्मेन आपणपें तैसें। जालें तया।।११६५।। कल्पांतीं उदक उदकें। रुंधिलियां वाहों ठाके। तैसा आत्मेनि मियां येकें। कोंदला तो ।।११६६।। पावो आपणपयां वोळघे?। केवीं वह्नि आपणपयां लागे?। आपणपां पाणी रिघे। स्नाना कैसें? ।।११६७।। म्हणौनि सर्व मी जालेपणें। ठेलें तया येणें जाणें। तेंचि गा यात्रा करणें। अद्वया मज।।११६८।। पैं जळावरील तरंगु। तरी धांविन्नला सवेगु। तरी नाहीं भूमिभागु। कमिला तेणें।।११६९।। जें सांडावें कां मांडावें। जें चालणें जेणें चालावें। तें तोयचि एक आघवें। म्हणौनियां ।।११७०।। गेलियाही भलतेउता। उदकपणें पंडुसुता। तरंगाची एकात्मता। न मोडेचि जेवीं।।११७१।। तैसा मीपणें हा लोटला। तो आघवेंयाचि मजआंतु आला। या यात्रा होय भला। कापडी माझा ।।११७२।। आणि शरीर स्वभाववशें। कांहीं येक करूं जरी बैसे। तरी मीचि तो तेणें मिषें। भेटे तया।।११७३।। तेथ कर्म आणि कर्ता। हें जाऊनि पंडुसुता। मियां आत्मेनि मज पाहतां। मीचि होय।।११७४।। पैं दर्पणातें दर्पणें। पाहिलिया होय न पाहाणें। सोनें झंकिलिया सुवर्णें। न झांकें जेवीं।।११७५।। दीपातें दीपें प्रकाशिजे। तें न प्रकाशणेंचि निपजे। तैसें कर्म मियां कीजे। तें करणें कैंचें?।।११७६।। कर्मही करितचि आहे। जैं करावें हें भाष जाये। तैं न करणेंचि होये। तयाचें केलें।।११७७।। क्रियाजात मी जालेपणें। घडे कांहींचि न करणें। तयाचि नांव पूजणें। खुणेचें माझें।।११७८।। म्हणौनि करीतयाही वोजा। तें न करणें हेंचि कपिध्वजा। निफजे तिया महापूजा। पूजी तो मातें।।११७९।। एवं तो बोले तें स्तवन। तो देखे तें दर्शन। अद्वया मज गमन। तो चाले तेंचि।।११८०।। तो करी तेतुली पूजा। तो कल्पी तो जपु माझा। तो निजे तेचि कपिध्वजा। समाधी माझी।।११८१।। जैसें कनकेंसीं कांकणें। असिजे अनन्यपणें। तो भक्तियोगें येणें। मजसीं तैसा।।११८२।। उदकीं कल्लोळु। कापुरीं परीमळु। रत्नीं उजाळु अनन्यु जैसा।।११८३।। किंबहुना तंतूंसीं पटु। का मृत्तिकेसीं घटु। तैसा तो एकवटु। मजसीं माझा।।११८४।। इया अनन्यसिद्धा भक्ती। या आघवाचि दृश्यजातीं। मज आपणपेंया सुमती। द्रष्टयातें जाण।।११८५।। तिन्ही

अवस्थांचेनि द्वारें। उपाध्युपहिताकारें। भावाभावरूप सफुरे। दृश्य जें हें।।११८६।। तें हें आघवेंचि मी द्रष्टा। ऐसिया बोधाचा माजिवटा। अनुभवाचा सुभटा। धेंडा तो नाचे।।११८७।। रज्जु जालिया गोचरु। आभासतां तो व्याळाकारु। रज्जुचि ऐसा निर्धारु। होय जेवीं।।११८८।। भांगारापरतें कांहीं। लेणें गुंजहीभरी नाहीं। हें आटुनियां ठायीं। कीजे जैसे।।११८९।। उदका येकापरतें। तरंग नाहींचि हें निरुतें। जाणोनि तया आकारातें। न घेपे जेवीं।।११९०।। नातरी स्वप्नविकारां समस्तां। चेऊनियां उमाणें घेतां। तो आपणयापरौता। न दिसे जैसा।।११९१।। तैसें जें कांहीं आथी नाथी। येणें होय ज्ञेयस्फूर्ती। तें ज्ञाताचि मी हे प्रतीती। होऊनि भोगी।।११९२।। जाणे अजु मी अजरु। अक्षयो मी अक्षरु। अपूर्वु मी अपारु। आनंदु मी।।११९३।। अचळु मी अच्युतु। अनंतु मी अद्वैतु। आद्यु मी अव्यक्तु। व्यक्तुही मी।।११९४।। ईश्य मी ईश्वरु। अनादि मी अमरु। अभय मी आधारु। आधेय मी।।११९५।। स्वामी मी सदोदितु। सहजु मी सततु। सर्व मी सर्वगतु। सर्वातीतु मी।।११९६।। नवा मी पुराणु। शून्यु मी संपूर्णु। स्थुलु मी अणु। जें कांहीं तें मी।।११९७।। अक्रियु मी येकु। असंगु मी अशोकु। व्यापु मी व्यापकु। पुरुषोत्तमु मी।।११९८।। अशब्दु मी अश्रोत्रु। अरूपु मी अगोत्रु। समु मी स्वतंत्रु। ब्रह्म मी परु।।११९९।। ऐसें आत्मत्वें मज एकातें। इया अद्वयभक्ती। जाणोनि निरुतें। आणि याही बोधा जाणतें। तेंही मीचि जाणें।।१२००।। पैं चेइलेयानंतरें। आपुलें एकपण उरे। तेंही तोंवरी स्फुरे। तयाशींचि जैसें।।१२०१।। कां प्रकाशतां अर्कु। तोचि होय प्रकाशकु। तयाही अभेदा द्योतकु। तोचि जैसा।।१२०२।। तैसा वेद्यांच्या विलयीं। केवळ वेदकु उरे पाहीं। तेणें जाणवें तथा तेंही। हेंही जो जाणे।।१२०३।। तया अद्वयपणा आपुलिया। जाणती ज्ञप्ती जे धनंजया। ते ईश्वरचि मी हे तया। बोधासि ये।।१२०४।। मग द्वैताद्वैतातीत। मीचि आत्मा एकु निभ्रांत। हें जाणोनि जाणणें जेथ। अनुभवीं रिघे।।१२०५।। तेथ चेइलियां येकपण। दिसे जे आपुलया आपण। तेंही जातां नेणों कोण। होइजे जेवीं।।१२०६।। कां डोळां देखतिये क्षणीं। सुवर्णपण सुवर्णीं। नाटितां होय आटणी। अळंकाराचीही।।१२०७।। नाना लवण तोय होये। मग क्षारता तोयत्वें राहे। तेही जिरतां जेवीं जाये। जालेपण तें।।१२०८।। तैसा मी तो हें जें असे। तें स्वानंदानुभवसमरसें। कालवूनियां प्रवेशे।

मजचि-माजीं। ।१२०९। । आणि तो हे भाष जेथ जाये। तेथें मी हें कोण्हासी आहे। ऐसा मी ना तो तिये सामाये। माझ्याचि रूपीं। ।१२१०। । जेव्हां कापुर जळों सरे। तयाचि नाम अग्नि पुरे। मग उभयतातीत उरे। आकाश जेवीं। ।१२११। । कां धाडलिया एका एकु। वाढे तो शून्य विशेखु। तैसा आहे नाहींचा शेखु। मीचि मग आथी। ।१२१२। । तेथ ब्रह्म आत्मा ईशु। या बोला मोडे सौरसु। न बोलणें याही पैसु। नाहीं तेथ। ।१२१३। । न बोलणेंहीं न बोलोनी। तें बोलिजे तोंड भरुनी। जाणिव नेणिव नेणोनि। जाणिजे तें। ।१२१४। । तेथ बुझिजे बोधु बोधें। आनंदु घेपे आनंदें। सुखावरी नुसधें। सुखचि भोगिजे। ।१२१५। । तेथ लाभु जोडला लाभा। प्रभा आलिंगिली प्रभा। विस्मयो बुडाला उभा। विस्मयामाजीं । ।१२१६। । शमु तेथ सामावला। विश्रामु विश्रांति आला। अनुभवु वेडावला। अनुभूतिपणें। ।१२१७। । किंबहुना ऐसें निखळ। मीपण जोडे तया फळ। सेवूनि वेली वेल्हाळ। क्रमयोगाची ते। ।१२१८। । पैं क्रमयोगिया किरीटी। चक्रवर्तीच्या मुकुटीं। मी चिद्रत्न तें साटोवाटीं। होय तो माझा । ।१२१९। । कीं क्रमयोगप्रासादाचा। कळसु जो हा मोक्षाचा। तयावरील अवकाशाचा। उवावो जाला तो। ।१२२०। । नाना संसार आडवीं। क्रमयोग वाट बरवी। जोडिली ते मदैक्यगांवीं। पैठी जालीसे। ।१२२१। । हें असो क्रमयोगबोधें। तेणें भक्तिचिद्रांगें। मी स्वानंदोदधी वेगें। ठाकिला कीं गा। ।१२२२। । हा ठायवरी सुवर्मा। क्रमयोगीं आहे महिमा। म्हणौनि वेळोवेळां तुम्हां। सांगतों आम्ही। ।१२२३। । पैं देशें काळें पदार्थें। साधूनि घेइजे मातें। तैसा नव्हे मी आयतें। सर्वांचें सर्वही। ।१२२४। । म्हणौनि माझ्या ठायीं। जाचावें न लगे कांहीं। मी लाभें इयें उपायीं। साचचि गा । ।१२२५। । एक शिष्य एक गुरु। हा रूढला साच व्यवहारु। तो मत्प्राप्तिप्रकारु। जाणावया। ।१२२६। । अगा वसुधेच्या पोटीं। निधान सिद्ध किरीटी। वह्नि सिद्ध काष्ठीं। वोहां दूध। ।१२२७। । परी लाभें तें असतें। तया कीजे उपायातें। येर सिद्धचि तैसा तेथें। उपायीं मी। ।१२२८। । हा फळहीवरी उपावो। कां पां प्रस्तावीतसे देवो। हे पुसतां परी अभिप्रावो। येथिंचा ऐसा। ।१२२९। । जें गीतार्थाचें चांगावें। मोक्षोपायपर आघवें। आन शास्त्रोपाय कीं नव्हे। प्रमाणसिद्ध। ।१२३०। । वारा आभाळचि फेडी। वांचूनि सूर्यातें न घडी। कां हातु बबुळी धाडी। तोय न करी । ।१२३१। । तैसा आत्मदर्शनीं आडळु। असे अविद्येचा जो मळु। तो

शास्त्र नाशी येरु निर्मळु। मी प्रकाशें स्वयें।।१२३२।। म्हणौनि आघवींचि शास्त्रें। अविद्याविनाशाचीं पात्रें। वांचोनि न होतीं स्वतंत्रें। आत्मबोधीं।।१२३३।। तया अध्यात्म-शास्त्रांसीं। जैं साचपणाची ये पुसी। तैं येइजे जया ठायासी। ते हे गीता७४१ ,।।१२३४।। भानुभूषिता प्राचिया। सतेजा दिशा आघविया। तैसी शास्त्रेश्वरा गीता या। सनाथें शास्त्रें।।१२३५।। हें असो येणें शास्त्रेश्वरें। मागां उपाय बहुवे विस्तारें। सांगितला जैसा करें। घेवों ये आत्मा।।१२३६।। परी प्रथमश्रवणासवें। अर्जुना विपायें हें फावे। हा भावो सकणवे। धरूनि श्रीहरी।।१२३७।। तेंचि प्रमेय एक वेळ। शिष्यीं होआवया अढळ। सांगतसे मुकुल। मुद्रा आतां।।१२३८।। आणि प्रसंगें गीता। ठावोही हा संपता। म्हणौनि दावी आद्यंता। एकार्थत्व।।१२३९।। जे ग्रंथाच्या मध्यभागीं। नाना अधिकार प्रसंगीं। निरूपण अनेगीं। सिद्धांतीं केलें।।१२४०।। तरी तेतुलेही सिद्धांत। इये शास्त्रीं प्रस्तुत। हें पूर्वापर नेणत। कोण्ही जैं मानी।।१२४१।। तैं महासिद्धांताचा आवांका। सिद्धांत-कक्षा अनेका। भिडऊनि आरंभु देखा। संपवितु असे।।१२४२।। एथ अविद्यानाशु हें स्थळ। तेणें मोक्षोपादान फळ। या दोहीं केवळ। साधन ज्ञान।।१२४३।। हें इतुलेंचि नानापरी। निरूपिलें ग्रंथविस्तारीं। तें आतां दोहीं अक्षरीं। आनुवादावें।।१२४४।। म्हणौनि उपेयही हातीं। जालया उपायस्थिती। देव प्रवर्तले तें पुढती। येणेंचि भावें।।१२४५।।

परार्थ :- ज्या ज्ञानरूप व भक्तिरूप जागृत कुंडलिनी शक्तीच्या सहज-योगसाधनाने अर्थात् सिद्धयोगसाधनाने जो साधकभक्तयोगिशिष्य माझ्याशी एकरूप किंवा समरस झालेला असतो तो केवळ मीच आहे हे तू ऐकलेच आहेस;।।११३०।। कारण हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! ज्ञानी म्हणजे श्रीशिवशक्तिसामरस्यानुभूतिसंपन्न सिद्धपुरुष हा माझा आत्माच आहे असे हात उभारून मी सातव्या अध्यायामध्ये प्रतिज्ञेने सांगितलेलेच आहे. ।।११३१।। हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! ती ही भक्ती अर्थात् श्रीसद्गुरुकृपेने जागृत होणारी आत्मचैतन्यरूप कुंडलिनी शक्ती हीच माझ्याशी समरस होण्याचे उत्तम साधन असल्यामुळे मी ती कल्पाच्या आरंभी श्रीभागवताच्या निमित्ताने श्रीब्रह्मदेवाला उपदेशिली होती.।।११३२।। ज्ञानी लोक हिला म्हणजे या चौथ्या भक्तीला स्वसंवित्ती अर्थात् स्वतःच स्वतःला जाणणारे चैतन्यरूप आत्मज्ञान असे म्हणतात. शैव हिला शक्ती असे म्हणतात.

आम्ही हिला आपली परमभक्ती असे म्हणतो अर्थात् स्वसंवित् शक्ती व भक्ती म्हणजेच जागृत कुंडलिनी शक्ती होय.।।११३३।। ज्यावेळी क्रमयोगी कर्मयोगाचे अर्थात् कर्म म्हणजे जागृत कुंडलिनीच्या द्वारा आपोआप होणारे सिद्धयोगाचे साधन करतो त्यावेळी तो सहस्रारात माझ्याशी समरस झाल्यावर त्याला ती परमभक्ती फलद्रूप होते आणि मग मीच सर्वत्र ओतप्रोत भरून राहिलेलो आहे व हे सर्व पिंडब्रह्मांडादि विश्व श्रीशिवशक्तिरूपाने साकारलेले आहे अशी त्याला अनुभूती येते.।।११३४।। या सामरस्याच्या अंतिम अवस्थेत विवेकासह वैराग्य आणि मोक्षासह बंधही आटून जातात व मिथ्या वृत्तीबरोबरच ब्रह्माकार वृत्तीही नाहीशी होते अर्थात् सिद्धयोग्याला द्वैताद्वैतविवर्जित अशी स्थिती प्राप्त होते.।।११३५।। ज्याप्रमाणे आकाश हे पृथ्वी, आप, तेज व वायू या भूतांना व्यापून शेष राहते त्याप्रमाणे श्रीशिवशक्तिसामरस्यावस्थेमध्ये ऐलपणाला म्हणजे संकुचित झालेल्या जीवपणाला घेऊन परत्व म्हणजे ईश्वरपणाही नाहीसा होतो अर्थात् सिद्धयोग्याला परापरहित स्थिती प्राप्त होते.।।११३६।। या स्थितीत सिद्धयोगी अलीकडील काठ, मध्यभाग व पलीकडील भाग याप्रमाणे असलेल्या साधक, साधन व साध्य या सर्वांच्या पलीकडे असलेल्या शुद्ध अशा माझ्या श्रीशिवस्वरूपाशी समरस होऊन तो सिद्धयोगी मला भोगतो म्हणजे आत्मानंदात निमग्न होऊन राहतो.।।११३७।। ज्याप्रमाणे श्रीगंगानदी समुद्राला मिळाल्यानंतर समुद्राशी एकरूप होऊन शोभू लागते म्हणजे ती समुद्राच्या व्यापकत्वाचा भोग भोगते त्याप्रमाणे जो साधकभक्तयोगिशिष्य माझ्याशी समरस पावलेला असतो त्याचा विभुरूपाने भोग भोगण्याचा प्रकार असतो अर्थात् या स्थितीत तो सिद्धयोगी आपणच देव व भक्त होऊन भक्तीचा आनंद अनुभवीत राहतो. ।।११३८।। किंवा ज्याप्रमाणे दोन आरसे स्वच्छ करून एकमेकापुढे ठेवले असता पाहणारा व भोगणारा असे दोन्ही आरसेच असल्यामुळे त्यांचे सुरेख ऐक्य होऊन ते एकमेकांचा आनंद घेत राहतात त्याप्रमाणे श्रीशिवशक्ती अर्थात् जीव व श्रीशिव समरस होऊन आत्मानंदाचा आनंद घेत राहतात. ।।११३९।। हे असो! ज्याप्रमाणे आरसा पाहणाऱ्याच्या मुखासमोरून दूर केल्यावर व आरशातील मुखाच्या प्रतिबिंबाचा आभासही नाहीसा झाल्यावर आरशात पाहणारा मनुष्य एकटाच आपल्या मुखाच्या स्वरूपाचा आनंद भोगत राहतो त्याप्रमाणे सिद्धयोगीही आपल्या स्वसंवेद्य श्रीशिवशक्तियुक्त आत्मस्वरूपाचा आनंद भोगीत राहतो।।११४०।। किंवा एखादा मनुष्य जागा झाल्यावर त्याचे स्वप्न नाहीसे होऊन मग आपल्या एकट्याचेच ऐक्य दिसू

लागते किंवा त्याला आपल्या एकपणाच्या स्वरूपाचाच अनुभव येतो व मग तो आपला एकपणा दुसऱ्याशिवाय आपणच आपला भोगतो त्याप्रमाणे सिद्धयोगी संसारस्वप्नातून जागा होऊन आपल्या स्वसंवेद्य आत्मस्वरूपाशी समरस झाल्यावर आपला आनंद आपणच भोगतो.।।११४१।। जे द्वैतवादी शंका घेऊन वस्तूशी एकरूप किंवा समरस झाल्यावर वस्तूचा भोग घडत नाही असे म्हणतात त्यांना असे विचारावेसे वाटते की, तुम्ही शब्दानेच शब्दाचा उच्चार कसा काय करता?।।११४२।। अशा प्रकारे शंका घेणाऱ्यांच्या गावात सूर्य हा दिव्याकडून प्रकाशित होत असावा किंवा सूर्याला दिव्याने पाहण्याची चाल असेल अथवा त्यांनी आकाशाला आत घेण्याकरिता मांडव उभारला आहे की काय हे कळत नाही.।।११४३।। अरे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! ज्याच्या अंगी राजेपण असत नाही तो राजेपण भोगू शकेल काय? किंवा अंधार हा सूर्याला कधी आलिंगन देऊ शकेल काय?।।११४४।। किंवा जो साधकभक्तयोगिशिष्य स्वतः आकाश म्हणजे व्यापक असे श्रीशिवस्वरूप झाला नाही त्याला आकाशाची व्याप्ती म्हणजे श्रीशिवस्वरूपाचा विभुपणा कसा काय कळणार? किंवा अनुभवाला येणार? अशी अनुभूती न येणे म्हणजे गुंजांचे दागिने रत्नांचे म्हणून मिरविण्यासारखेच आहे.।।११४५।। याकरिता जो साधकभक्तयोगिशिष्य माझ्या स्वसंवेद्य आत्मस्वरूपाशी म्हणजे श्रीशिवस्वरूपाशी समरस झालेला नाही त्याला माझे व्यापक स्वरूप म्हणजे काय आहे? आणि त्या स्वरूपात आपणच देव व भक्त होऊन भजन किंवा भक्ती कशी करावयाची हे कसे काय कळेल? खरोखर या संबंधी काही बोलावयासच नको.।।११४६।। ज्याप्रमाणे तरुण स्त्रीच्या अंगी असलेल्या तारुण्याचा उपभोग तरुण स्त्री तरुणपणातच घेऊ शकते त्याप्रमाणे क्रमयोगी अर्थात् सिद्धयोगाचे साधन करणारा साधकभक्तयोगिशिष्य माझ्याच स्वरूपाशी समरस झाल्यावरच माझ्या स्वरूपाचा उपभोग घेतो.।।११४७।। ज्याप्रमाणे तरंग किंवा लाटा सर्वांगाने पाण्याचे चुंबन घेतात किंवा प्रकाश हा बिंबाशी एकरूप होऊन बिंबरूपानेच सर्वत्र विलसत असतो अथवा पोकळी आकाशात सर्वत्र व्याप्त होऊन लोळत असते।।११४८।। आणि अलंकार हे आपण सोने आहोत हे कधीही विसरत नाहीत म्हणजे सोन्याशी अनन्य असणे हेच अलंकाराचे भजन असते त्याप्रमाणे सिद्धयोगी माझ्याशी समरस होऊन कोणतीही क्रिया अथवा साधन न करता मला भजत असतो अर्थात् माझ्या श्रीशिवस्वरूपाशी समरस होणे व त्याच स्थितीत

अखंड राहणे हेच सिद्धयोगसाधकाचे भजन असते.।।११४९।। ज्याप्रमाणे चंदनाचा सुवास चंदनाला आपोआपच भजतो म्हणजे तो त्याच्याशी समरसच असतो किंवा चंद्राचे चांदणे चंद्राला सहजस्वभावाने अनन्य होऊन भजत असते अर्थात् चंद्र व त्याचे चांदणे हे अखंड समरसच असतात.।।११५०।। त्याप्रमाणे श्रीशिवशक्तिसामरस्याच्या अद्वैय स्थितीत खरोखर कोणतीही क्रिया सहन होत नसली म्हणजे संभवत नसली तरीही अद्वैतात भक्ती आहे ही गोष्ट स्वतःच्या अनुभवानेच कळण्यासारखी असल्यामुळे ती बोलून दाखविता येण्यासारखी नाही.।।११५१।। अशा प्रकारे सामरस्यसिद्धिप्राप्त झालेला सिद्धयोगी देह असेपर्यंत पूर्वीच्या संस्कारामुळे जे काही बोलतो ते बोलणे हेच माझी आळवणी अथवा भक्ती केल्यासारखी होऊन मी त्याला ओ देतो, अर्थात् त्या सिद्धयोग्याने मला हाक मारताक्षणीच त्याला ओ देऊन बोलणारा व तो हाक मारणारा असे दोन्हीही मीच असतो.।।११५२।। ज्यावेळी बोलणाऱ्याला स्वतः बोलणाराच भेटतो त्यावेळी बोलणे होण्याचा संभव असत नाही किंवा व्यवहार घडत नाही त्यामुळे मौन हीच माझी उत्तम स्थिती अर्थात् उत्तम स्तुती होय.।।११५३।। याकरिता सामरस्यसिद्धिप्राप्त सिद्धयोगी बोलत असताना त्याच्या बोलण्यात बोलणाऱ्याला मुखाने बोलविणारा तो मी भेटत असल्यामुळे त्याचे बोलणे हे मौनच असते. अशा प्रकारच्या मौनानेच तो सिद्धयोगी तत्त्वतः माझे स्तवन करीत असतो.।।११५४।। त्याचप्रमाणे हे सिद्धयोगसाधक-भक्तयोगिशिष्य किरीटी! असा सिद्धयोगी आपल्या बुद्धीने अथवा डोळ्याने जे जे पाहतो अथवा जाणतो त्याचे ते पाहणे किंवा जाणणे दृश्याला नाहीसे करून केवळ द्रष्ट्यालाच दाखविते अर्थात् असा सिद्धयोगी सर्वत्र अखंड श्रीशिवशक्तिरूपच भरलेले आहे व पिंडब्रह्मांडाचे दृश्य काही नाहीच असे अखंड पाहतो.।।११५५।। ज्याप्रमाणे आरशात पाहण्यापूर्वी आपले मुख असते तेच आरशाच पाहताना दिसते त्याप्रमाणे सिद्धयोगी हा श्रीशिवशक्तिस्वरूप झालेला असल्यामुळे त्याला दृश्याच्या निमित्ताने आपणच पिंडब्रह्मांडाच्या रूपाने साकार झालेले आहोत अशी अनुभूती येऊन द्रष्ट्याचे म्हणजेच श्रीशिवांचे व द्रष्ट्याला म्हणजे श्रीशिवस्वरूप झालेल्या सिद्धयोग्याला दर्शन घडते अर्थात् त्याने आपणच आपल्याला पाहिल्यासारखे होते.।।११५६।। ज्यावेळी श्रीशिवशक्तिसामरस्यानुभूतीमुळे दृश्याचा म्हणजे पिंडब्रह्मांडादि रूपाने भासमान होणाऱ्या कल्पनेचा निरास होऊन द्रष्टा म्हणजे जीव हा आपली कुंडलिनी शक्तिरूपाने संकुचित झालेली अवस्था सोडून श्रीशिव-

रूपाने विभुस्वरूप होऊन द्रष्ट्याला म्हणजे श्रीशिवांना भेटतो अर्थात् त्यावेळी द्रष्टा म्हणजे एकमात्र श्रीशिवशक्तिस्वरूप राहत असल्यामुळे द्रष्टेपणाचा म्हणजे पाहणेपणाचा धर्मही उरत नाही अर्थात् एकमात्र स्वसंवेद्य आत्मचैतन्यस्वरूपच खाली उरते.।।११५७।। ज्याप्रमाणे एखादा मनुष्य जागा झाल्यावर स्वप्नात भेटलेल्या आपल्या प्रियेला अत्यंत प्रेमाने आलिंगन देण्याला सिद्ध झाला असता स्वप्नातील आलिंगन देणारा पुरुष व आलिंगन द्यावयाची स्त्री हे दोन्हीही नाहीशी झाल्यामुळे तो आपणच आपल्या जागी केवळ एकटाच शिल्लक राहतो।।११५८।। अथवा दोन लाकडांच्या घर्षणातून एकच अग्नी उत्पन्न होतो व तो दोन्हीही लाकडांना जाळून लाकडे ही भाषा किंवा त्यांचे नाव नाहीसे करून आपणच एकटा राहतो।।११५९।। किंवा सूर्य आपले पाण्यात पडलेले प्रतिबिंब हातात धरावयाला गेला असता त्याचे प्रतिबिंब तर नाहीसे होऊन जातेच; पण त्याचे प्रतिबिंबासापेक्ष जे बिंबत्व असते तेही नाहीसे होऊन जाते।।११६०।। त्याप्रमाणे जो द्रष्टा म्हणजे सिद्धयोगी मद्रूप म्हणजे माझ्याशी समरस होऊन दृश्य म्हणजे समस्त पिंडब्रह्मांडादि भासात्मक वस्तू ज्यावेळी पाहवयास जातो त्यावेळी दृश्य वस्तू म्हणून इतर वेगळे असे काहीच उरत नाही; परंतु द्रष्टेपणाही दृश्यासह नाहीसा होतो.।।११६१।। ज्याप्रमाणे सूर्य अंधाराला प्रकाशित करू लागला म्हणजे प्रकाश्य अर्थात् प्रकाशित होणारा जो अंधार तो उरत नाही म्हणजे केवळ प्रकाशच राहतो त्याप्रमाणे सिद्धयोगी मत्स्वरूप किंवा माझ्याशी समरस झाल्यावर दृश्याच्या ठिकाणी तोच असल्यावर तत्सापेक्ष द्रष्टेपणाही राहत नाही.।।११६२।। याप्रमाणे मग पाहणेही नाही किंवा न पाहणेही नाही अशी दशा अर्थात् सहजस्थिती उत्पन्न होते तेच माझे यथार्थ दर्शन आहे.।।११६३।। हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य किरीटी! जो सिद्धयोगी कोणताही पदार्थ पाहत असता द्रष्टा व दृश्य म्हणजे पाहणारा व पाहिला जाणारा पदार्थ या परस्परावलंबी सापेक्ष भावरहित, द्वैतनिरपेक्ष, सहज व अखंड असलेल्या आपल्या दृष्टीने नेहमीच त्याचा अनुभव घेत असतो अर्थात् सर्वत्र आपणच स्वस्वरूपाने भरून राहिलेलो आहोत असे पाहतो आणि आकाश हे स्वस्वरूपाने सर्वव्यापकपणे ओतप्रोत भरून राहिलेले असल्यामुळे त्याला जसे ढळणे म्हणजे क्रियात्मक हालचाल करणे मुळीच असत नाही त्याप्रमाणे तो सिद्धयोगी माझ्या आत्म अर्थात् श्रीशिवस्वरूपाशी एकरूप किंवा समरस झालेला असल्यामुळे आपणच आपल्या ठिकाणी घनदाटपणे व्यापून राहिलेले आहोत असा त्याला आपल्या

स्वसंवेद्य आत्मस्वरूपाचा प्रत्यय येतो.।।११६५।। ज्याप्रमाणे कल्पाच्या शेवटी म्हणजे प्रलयाच्या वेळी सर्वत्र ओतप्रोत पाणीच भरल्यामुळे पाण्यानेच पाण्याचा प्रतिबंध होऊन ते वाहण्याचे थांबते त्याप्रमाणे सिद्धयोगी हा माझ्या एका आत्म अर्थात् श्रीशिवशक्तिस्वरूपानेच सर्वत्र कोंडून किंवा व्यापून राहतो अर्थात् सिद्धयोग्याला श्रीशिवशक्तिवाचून दुसरा पदार्थच उरत नाही व उरेल कसा?।।११६६।। ज्याप्रमाणे आपला पाय आपणच आपल्यावर चढेल काय? अग्री आपण स्वतःच आपल्याला लागून जळेल काय? किंवा पाणी हे स्वतःच स्नानासाठी पाण्यात प्रवेश करील काय?।।११६७।। त्याचप्रमाणे हे सिद्धयोग-साधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! तो सिद्धयोगी श्रीशिवशक्तिस्वरूपाने सर्वत्र मीच असल्यामुळे त्याचे येणे-जाणे बंद पडते. अशा प्रकारे माझे जे अद्वय म्हणजे श्रीशिवशक्तिस्वरूप आहे ते होऊन राहणे हेच सिद्धयोग्याचे यात्रा करणे असते अर्थात् त्याच्या या अनुभूतीतच यात्रेचे सर्व श्रेय अंतर्भूत असते.।।११६८।। ज्याप्रमाणे पाण्यावरील लाट अत्यंत वेगाने उसळून जरी धावली तरी तिने पाण्याला सोडून जमिनीवर आक्रमण केले असे होत नाही;।।११६९।। कारण त्या लाटेला जे ठिकाण सोडावयाचे असते किंवा तिला ज्या ठिकाणी जावयाचे असते ते ठिकाण चालणारी लाट तिचे चालणे व तिने चालावयाचे तिचे पाय हे सर्व पाणीच असते म्हणून।।११७०।। हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! ती लाट जरी पाहिजे तितकी व वाटेल तिकडे धावत गेली तरी उदकस्वरूपच असल्यामुळे तिची एकात्मता किंवा एकरूपता केव्हाही मोडत किंवा ढळत नाही।।११७१।। त्याप्रमाणे सिद्ध-योगी हा मीपणाने म्हणजे अहंब्रह्मास्मी रूपाने अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्याने परिपूर्ण भरलेला असतो त्यामुळे तो सर्वस्वाने मत्स्वरूप झालेला असतो. साधकभक्तयोगिशिष्याने मूलाधारातून निघून सुषुम्नामार्गाने सहस्रारात येऊन माझ्या श्रीशिवस्वरूपाशी समरस होणे हीच सर्वोत्तम यात्रा असून या यात्रे-मुळेच तो सर्वश्रेष्ठ सिद्धमहायोगी होत असल्याने सर्वोत्कृष्ट यात्रेकरू असतो।।११७२।। आणि असा सिद्धमहायोगी आपल्या शरीराच्या स्वभावधर्मानुसार जे जे काही करू लागतो त्या त्या सर्व व्यवहारात त्याचे ते ते सर्व करणे मीच असल्यामुळे त्या त्या कृत्याच्या निमित्ताने किंवा रूपाने मीच त्याला भेटत असतो.।।११७३।। त्यावेळी हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य पंडुसुता! सिद्धयोग्याचे कर्म आणि कर्ता हे दोन्ही भाव जाऊन तो मला आत्मत्वाने म्हणजे श्रीशिवशक्तिस्वरूपाने पाहत असल्यामुळे मत्स्वरूपच होऊन

राहतो.।।११७४।। हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! ज्याप्रमाणे आरशाने आरशालाच पाहिले तर ते न पाहिल्यासारखे असते किंवा सोन्याने सोने झाकले तर ते न झाकणेच होत असते अर्थात् ते झाकले जात नाही किंवा ते न झाकणेच होत असते।।११७५।। अथवा दिव्याने जर दिव्यालाच प्रकाशीत केले तर ते न प्रकाशणेच असते त्याप्रमाणे मद्रूप अर्थात् माझ्याशी समरस होऊन कर्म करणे हे कर्म करणे कसे होईल?।।११७६।। सिद्धयोगी हा कर्म तर करीतच असतो; पण मी कर्ता असून अमुक एक कर्म करणे हे माझे कर्तव्य आहे असा त्याचा अभिमान ज्यावेळी नाहीसा होतो त्यावेळीच त्याने केलेले सर्व कर्म हे कर्म न केल्यासारखेच होते.।।११७७।। अशा प्रकारेच सिद्धयोग्याच्या सर्व क्रिया किंवा कर्म मद्रूपच होत असल्याकारणाने त्याचे सर्व कर्म किंवा क्रिया हे काहीच न करणे होते. असे होणे हेच माझे खरे पूजन असून तेच माझे खुणेचे मर्म आहे असे समज.।।११७८।। याकरिता हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य कपिध्वजा! असा सिद्धयोगी ज्या पद्धतीने यथासांग क्रिया व कर्म करीत असतो ते त्याचे करणेच न करणे होते. अशा रीतीने वागून जो माझी पूजा करीत असतो तीच माझी महापूजा होते.।।११७९।। अशा रीतीने सिद्धयोगी जे जे बोलेल ते ते माझे स्तवन किंवा स्तुती होते, तो जे जे पाहील ते ते माझे दर्शन होते आणि तो जसजसा चालेल तेच अद्वय अर्थात् श्रीशिवशक्तिस्वरूप असलेल्या अशा माझ्याकडे त्याचे येणे किंवा यात्रा होते.।।११८०।। हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य कपिध्वजा! असा सिद्धयोगी जी जी क्रिया किंवा कर्म करतो ती ती सर्व माझी पूजा होय, तो जी जी कल्पना करील ती ती माझा जप होय आणि तो निजतो तीच माझी समाधी अवस्था होय.।।११८१।। ज्याप्रमाणे सुवर्णाची कंकणे ही सुवर्णाशी नेहमीच अभिन्न किंवा एकरूप असतात त्याप्रमाणे सिद्धयोगी हा भक्तियोगाच्या म्हणजे श्रीसद्गुरुकृपेने जागृत झालेल्या कुंडलिनी शक्तीच्या द्वारा होणाऱ्या साधनाने माझ्याशी अखंड, अभिन्न, अनन्य व समरस झालेला असतो.।।११८२।। ज्याप्रमाणे पाण्याशी लाट, कापुराशी सुवास किंवा रत्नाशी तेज हे अभिन्न असते।।११८३।। फार काय सांगावे! तंतूचे वस्त्राशी किंवा मातीचे घड्याशी जसे तादात्म्य असते त्याप्रमाणे माझा भक्त नेहमी माझ्याशी अभिन्न, एकरूप किंवा समरस झालेला असतो.।।११८४।। हे शुद्ध बुद्धीच्या सिद्धयोग-साधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! तो सिद्धयोगी या स्वयंसिद्ध व अनन्य अर्थात् समरसरूप भक्तीच्या म्हणजे जागृत शक्तीच्या योगाने हे जे सर्व दिसणारे

नामरूपात्मक अखंड ब्रह्मांड आहे ते सर्व नामरूप व आभासविरहित असे श्रीशिवशक्तिस्वरूपच आहे असे जाणतो.।।११८५।। जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तीन अवस्थांच्या द्वाराने, स्थूल, सूक्ष्म व कारण या तीन देहरूप उपाधींच्या रूपाने आणि विश्व, तैजस आणि प्राज्ञ या तीन उपहितांच्या आकाराने जे भाव व अभावरूप दृश्य स्फुरण पावते।।११८६।। हे शूरश्रेष्ठ सिद्धयोगसाधक-भक्तयोगिशिष्य अर्जुना! ते हे सर्व दृश्य द्रष्टास्वरूप असलेल्या माझेच स्वरूप आहे. अशा बोधाच्या म्हणजे अपरोक्षानुभूतीच्या म्हणजे श्रीशिवशक्तिसामरस्याच्या धुंदीत तो सिद्धयोगी आपल्या ऐक्याचा किंवा समरसतेच्या अनुभवाचा धेंडा नाचवीत असतो.।।११८७।। ज्याप्रमाणे अंधारात सर्पाकाराने भासणारी दोरी ही दिव्याच्या प्रकाशात दोरीच आहे असे दिसू लागले म्हणजे सर्पाच्या आकाराचा भास जाऊन ती खरोखर दोरीच आहे असा आपला निश्चय होतो. ।।११८८।। किंवा सोन्याचे अलंकार आटविल्यानंतर त्यात सोन्याशिवाय गुंजभर देखील दुसरे काही नाही असे निश्चित करता येते।।११८९।। किंवा एका पाण्याव्यतिरिक्त त्यावर उठणारे तरंग होऊन दुसरे काहीच नाही हे पक्के समजल्यावर तरंगाच्या आकाराची स्वतंत्र वस्तू किंवा त्याचे स्वतंत्र अस्तित्व नसल्याचे जाणून माणूस भुलत नाही।।११९०।। किंवा जागे झाल्यानंतर स्वप्नात दिसणाऱ्या सर्व गोष्टींचा हिशेब करावयाला लागले असता आपल्या व्यतिरिक्त दुसरे काहीच दिसत नाही.।।११९१।। त्याप्रमाणे समस्त संसारात जे काही आहे व नाही या भावाभावरूपाने ज्ञेयाचे म्हणजे आपल्या स्वसंवेद्य आत्मस्वरूपयुक्त श्रीशिवशक्तीचे स्फुरण होते. ते सर्व मी ज्ञाताच आहे अशी प्रत्यक्षानुभूती येऊन तो सिद्धयोगी त्याचा अनुभव घेत असतो.।।११९२।। अशा स्थितीत तो सिद्धयोगिभक्त मी जन्मरहित, वार्धक्यरहित, नाशरहित, व्ययरहित अर्थात् अविनाशी, अनादि, अमर्याद अर्थात् अनंत आणि आनंदमय असा आहे असे जाणतो म्हणजे सतत अनुभवीत असतो।।११९३।। त्याप्रमाणे तो सिद्धयोगिभक्त मी न चळणारा म्हणजे स्थिर, स्वस्वरूपापासून च्युत न होणारा अर्थात् न ढळणारा, अनंत अर्थात् अमर्याद, अद्वैतरूप अर्थात् त्रिविध परिच्छेदरहित, आद्य अर्थात् सर्वांचे मूळ कारण असलेला, अव्यक्त म्हणजे निराकार व व्यक्त म्हणजे साकारही आहे अशी त्याची अनुभूतियुक्त अखंड धारणा असते.।।११९४।। तसेच मी ईश्य म्हणजे ज्याचे नियमन करावयाचे ते नियम्य, श्रीईश्वर म्हणजे सर्वांचा नियामक, अनादि म्हणजे उत्पत्तिरहित, अमर म्हणजे मरणरहित, अभय म्हणजे भयरहित, सर्वांचा आधार आणि

आधेय म्हणजे आधारभूतही मीच आहे अशी ज्याची निरंतरची अनुभूती असते,।।११९५।। याशिवाय सिद्धयोगिभक्ताची मी स्वामी म्हणजे मालक, सदोदित म्हणजे नेहमी किंवा नित्य असणारा, सहज म्हणजे स्वतःसिद्ध, सतत म्हणजे अखंड, सर्व म्हणजे सर्वव्यापी असलेला, सर्वगत म्हणजे सर्वांत भरून राहिलेला आणि सर्वांच्या पलीकडचाही अशी दृढधारणात्मक अनुभूती असते.।।११९६।। त्याचप्रमाणे मी नवा, जुना, शून्यरूप, संपूर्ण, अस्थूल म्हणजे अणुरेणूहूनही लहान व अनणू म्हणजे सर्वांहून मोठा व व्यापक असे जे काही आहे ते माझेच स्वरूप आहे असे तो सतत अनुभवीत असतो.।।११९७।। त्याचप्रमाणे सिद्धयोगिभक्त मी क्रियारहित एकटा म्हणजे स्वगतादि भेदरहित, असंग म्हणजे संगरहित, अशोक म्हणजे शोकरहित, व्याप्त म्हणजे विश्वात्मक व व्यापक म्हणजे विश्वोत्तीर्ण उत्तम पुरुष आहे, अशा अनुभूतीनेच जगत असतो.।।११९८।। त्याचप्रमाणे तो मी अशब्द म्हणजे शब्दरहित किंवा शब्दातीत, कर्णरहित, रूपरहित, गोत्ररहित, सम म्हणजे सर्वत्र सारखा किंवा समव्याप्त असलेला, स्वतंत्र आणि सर्वांहून श्रेष्ठ म्हणजे परब्रह्म अर्थात् श्रीशिव-शक्तिस्वरूप आहे, अशा अखंड अनुभूतीने युक्त असतो.।।११९९।। अशा प्रकारे तो सिद्धयोगिभक्त मला एकाला अद्वयभक्तिद्वारा म्हणजे जागृत कुंडलिनी शक्तिद्वारा आत्मत्वाने म्हणजे श्रीशिवशक्तिस्वरूपाने यथार्थ जाणतो आणि याही बोधाला जाणणारा म्हणजे अनुभूती घेणारा जो परमात्मा तोही आपणच आहोत असे तो अनुभूतीने जाणतो.।।१२००।। ज्याप्रमाणे स्वप्नातून जागे झाल्यानंतर स्वप्नातील अनेकता जाऊन आपले एकपणच शिल्लक राहते व तेही आपल्याला आपल्याच ठिकाणी स्फुरते।।१२०१।। किंवा सूर्य प्रकाशत असताना तोच स्वतःचा प्रकाशक म्हणजे प्रकाश करणारा होतो आणि या प्रकाश्य व प्रकाशक या दोहोंमधील अभेदही दाखविणारा तोच असतो।।१२०२।। त्याप्रमाणे वेद्याच्या म्हणजे ज्ञेयाच्या किंवा जाणल्या जाणाऱ्या वस्तूचा विलय झाला असता केवळ वेदक म्हणजे द्रष्टा किंवा ज्ञाता अगर जाणणारा उरतो, हेही ज्याच्या साहाय्याने जाणले जाते तो परमात्माही मीच स्वतः आहे हेही तो सिद्धयोगिभक्त जाणतो.।।१२०३।। हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य धनंजया! आपल्या त्या अद्वयपणाला म्हणजे श्रीशिवस्वरूपाला जाणणारी जी व्यक्ती म्हणजे ज्ञानरूप व आत्मचैतन्यरूप अशी कुंडलिनी शक्ती असते तीही श्रीईश्वर म्हणजे श्रीशिवरूपच आहे व तो श्रीईश्वर म्हणजे श्रीशिवरूपच आहे व तो श्रीईश्वर म्हणजेही श्रीशिवस्वरूपच आहे असे सिद्धयोगिभक्ताला अनुभवाला

आलेले असते.।।१२०४।। मग तो सिद्धयोगिभक्त द्वैताद्वैतविवर्जित असा मी एकमेवाद्वितीय आत्मा अर्थात् शक्तियुक्त श्रीशिव आहे हे निभ्रांत अर्थात् निःसंशयपणे जाणून या अनुभूतीतच विलीन व समरस होऊन राहतो.।।१२०५।। ज्याप्रमाणे स्वप्नातून जागे झाल्यानंतर आपल्याला आपला जो एकपणा दिसू लागतो तोही नाहीसा झाला असता कोणती स्थिती प्राप्त होते काही कळत नाही।।१२०६।। किंवा सोन्याच्या अलंकाराकडे सोनेपणाच्या दृष्टीने पाहताक्षणीच त्या अलंकाराची आटणी न करताच आटणी केल्यासारखीच होते ।।१२०७।। अथवा पाण्याच्या संबंधाने मिठाचे पाणी होते व त्या मिठाचा खारटपणा पाण्याच्या रूपाने राहतो; मात्र तो खारटपणा विरून गेल्यावर मिठाचे पाणी झाल्याचा व्यवहारही नाहीसा होतो।।१२०८।। त्याचप्रमाणे सिद्धयोगाचे साधन सुरू करताना साधकभक्तयोगिशिष्य हा भक्त आणि मी देव म्हणजे श्रीशिव असा जो भेद असतो तो सहस्रारात जीव म्हणजे कुंडलिनी शक्ती व श्रीशिव यांचे समरसीकरण झाल्यावर हे दोघे एकत्र कालवल्यामुळे जी स्वानंदाची अनुभूती येते त्या सर्वांसकट तो सिद्धयोगिभक्त माझ्या स्वसंवेद्य आत्मस्वरूपात प्रवेश करून स्थिर राहतो.।।१२०९।। आणि ज्या समरस अवस्थेत तो ही भाषा नाहीशी होते तेथे मी हा शब्द तरी कोठे आणि कोणाच्या अपेक्षेने उरणार? अशा रीतीने जेथे मीही नाही व तोही नाही अशा द्वैताद्वैतविवर्जित स्वसंवेद्य आत्मचैतन्यस्वरूपात सिद्धयोगिभक्त परिपूर्ण रीतीने समरस झालेला असतो.।।१२१०।। ज्याप्रमाणे कापूर जळून संपताक्षणीच अग्नीही त्याच्याच नावाबरोबर नाहीसा झाल्यामुळे अग्नी व कापूर या दोघांहून भिन्न असलेले आकाश हेच एकमात्र शेष राहते।।१२११।। किंवा एकातून एक वजा केला असता बाकी केवळ शून्य उरते त्याप्रमाणे आहे व नाही या सापेक्षभावाची वजाबाकी केल्यानंतर मी म्हणजे कुंडलिनी शक्तीसह असलेला श्रीशिवच शेष राहतो.।।१२१२।। अशा स्थितीत ब्रह्म, आत्मा व श्रीईश्वर या शब्दांच्या बोलण्याचे अर्थात् तद्द्वारा भिन्नतेचे निदर्शन करण्याचे स्वारस्यच शिल्लक राहत नाही व तत्सापेक्ष काही न बोलण्यालाही तेथे जागा राहत नाही. ।।१२१३।। ही स्थिती न बोलणेही न बोलता ते तोंड भरून बोलावे व जाणीव म्हणजे ज्ञान व नेणीव म्हणजे अज्ञान या दोन्ही कल्पनारहित झाल्यावर जाणले जात असल्यामुळे किंवा अनुभूतीला येत असल्यामुळे।।१२१४।। बोधानेच बोधाचा, आनंदानेच आनंदाचा आणि केवळ सुखानेच सुखाचा अनुभव घ्यावा लागतो.।।१२१५।। सिद्धयोगिभक्ताला प्राप्त झालेल्या या

सामरस्याच्या अवस्थेत लाभालाच लाभाची प्राप्ती होते, प्रभेलाच प्रभा आलिंगन देते व आश्चर्यच आश्चर्यात उभेच्या उभे म्हणजे पूर्णपणे बुडून जाते. ।।१२१६।। या स्थितीत शमाला शांती मिळते, विश्रामाला विश्रांती मिळते व अनुभव हा अनुभूतीनेच वेडा होऊन जातो. ।।१२१७।। फार काय सांगावे! जो साधक-भक्तयोगी क्रम किंवा कर्मयोगाचे अर्थात् सिद्धयोगाच्या वेलीचे म्हणजे साधनाचे वेल्हाळपणे अर्थात् दीर्घकाल, निरंतरपणे व श्रद्धाभक्तिपूर्वक सेवन करतो अर्थात् ते दृढपणे करतो त्याला मीपणाचे म्हणजे कुंडलिनी शक्तियुक्त असलेल्या श्रीशिवाच्या समरसतेच्या लाभाची प्राप्ती होते. ।।१२१८।। हे सिद्ध-योगसाधकभक्तयोगिशिष्य किरीटी! या क्रम किंवा कर्म अर्थात् सिद्धयोगरूप सार्वभौम पंथराजाच्या अभ्यासाने जो साधकभक्तयोगिशिष्य चक्रवर्ती असा सिद्धयोगिभक्त होतो त्याच्या मुकुटात मी चैतन्यरूप रत्न अर्थात् शक्तियुक्त श्रीशिव होतो व मी अशा रीतीने शोभून दिसतो आणि अशा प्रकारे सिद्ध-योगसाधकभक्तयोगिशिष्य आपण कुंडलिनी शक्तिरूपाने धारण केलेली संकुचित जीवदशा सोडून देऊन तो विभुरूपाने माझ्याशी समरस होऊन राहतो. ।।१२१९।। किंवा कर्म अथवा क्रियायोगरूपी म्हणजे सिद्धयोगरूपी मंदिराचा म्हणजे सहस्राराचा हा जो मोक्षरूपी कळस म्हणजे श्रीशिवशक्ति-सामरस्यावस्था आहे त्यावरील अवकाशाचा म्हणजे समस्त ब्रह्मांडाचा तो सिद्धयोगी विस्तार होऊन म्हणजे तो विश्वोत्तीर्ण अवस्थेत स्थित राहतो. ।।१२२०।। अथवा क्रम किंवा कर्मयोगरूपी सिद्धयोग हा संसाररूपी अरण्या-कील अत्यंत सोपी व सहज अशी वाट अर्थात् मार्ग असून तो श्रीसद्गुरुकृपेने शक्तिपातयोगदीक्षा मिळून प्राप्त झाला असता साधकभक्तयोगिशिष्य सुषुम्ना-मार्गाने चालता चालता आपोआपच माझ्या ऐक्य म्हणजे सहस्रारातील सामरस्यरूपी गावात येऊन पोहोचतो. ।।१२२१।। हे असो! कर्म किंवा क्रमयोगाच्या अर्थात् सिद्धयोगाच्या ओघाने म्हणजे तीव्रातितीव्र साधनाने भक्तिरूप चित्‌गंगा म्हणजे जागृत चैतन्ययुक्त कुंडलिनी शक्ती ही अत्यंत वेगाने स्वानंदरूप समुद्र असलेल्या मला सहस्रारात येऊन मिळते. ।।१२२२।। हे मर्मज्ञ सिद्धयोग-साधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! असा हा क्रम किंवा कर्म अर्थात् सिद्धयोगाचा अपूर्व, अद्भुत व एकमेवाद्वितीय महिमा असल्यामुळे मी तो तुला वारंवार सांगत आहे. ।।१२२३।। खरोखर योग्य देश, काल व पदार्थ इत्यादिकांच्या साधनाने अर्थात् अनुकूलतेने माझी प्राप्ती होईल किंवा मला साध्य करून घेता येईल असा मी नाही; कारण मीच सर्वांचा आत्मा, स्वतःसिद्ध आणि सर्वांचे

सर्वही मीच असल्यामुळे सहजच सदासर्वदा मी प्राप्तच आहे.।।१२२४।। त्यामुळे माझ्या प्राप्तीकरिता अर्थात् स्वसंवेद्य आत्मस्वरूपयुक्त श्रीशिवशक्तिसामरस्याची अंतिम सिद्धी मिळविण्याकरिता काहीही शिणावे लागत नाही अर्थात् पौरुष प्रयत्नाने म्हणजे बाह्य साधनांच्या आधाराने कष्ट करण्याची आवश्यकता राहत नाही; कारण मी या क्रम किंवा कर्म अर्थात् श्रीसद्गुरुकृपेने म्हणजे शक्तिपातयोगदीक्षेने जागृत झालेल्या कुंडलिनी शक्तिद्वारा आपोआप होणाऱ्या सिद्धयोगरूपी सहजसाधनाने निश्चितपणे प्राप्त होतो.।।१२२५।। एक शिष्य व एक श्रीसद्गुरू हा जो सिद्धमहायोगात किंवा शक्तिपातयोगात संप्रदायपरंपरेने सत्य व्यवहार रूढ झाला आहे तोच माझ्या प्राप्तीचा उचित व योग्य मार्ग आहे अर्थात् हा मार्ग साध्यसाधनरूप असल्यामुळे याच्या साधनातच साध्याचे फळ अंतर्निहित असते.।।१२२६।। हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य किरीटी! पृथ्वीच्या पोटात धनाचा ठेवा आयताच सिद्ध असतो, लाकडात अग्नीही आयताच सिद्ध असतो आणि कासेत दूधही आयतेच सिद्ध असते; ।।१२२७।। परंतु या सर्व गोष्टी जरी आयत्याच सिद्ध असल्या तरीही त्या सिद्ध वस्तूंचा लाभ होण्याकरिता काही उपाय हे करावेच लागतात त्याप्रमाणे मी मूळचाच स्वतःसिद्ध आहे जरी हे खरे असले तरीही माझ्या स्वसंवेद्य आत्मस्वरूपावर षड्रिपू, अष्टबंध, अष्टपाश व मलविक्षेपादि आवरणे अर्थात् सर्व संकुचितपणा दूर करण्यासाठी सिद्धयोगाच्या साधनमार्गानेच माझी प्राप्ती करून घ्यावी लागते.।।१२२८।। अशा प्रकारे फळप्राप्ती सांगितल्यानंतरही देव पुन्हा सिद्धयोगसाधनमार्ग सांगण्याचा उपक्रम किंवा त्याची प्रस्तावना का करीत आहेत? अशी जर शंका घेऊन कोणी विचारणा करील तर त्यांच्या सांगण्याचा अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे.।।१२२९।। श्रीमद्भगवद्गीतेच्या भावार्थाचे किंवा परार्थाचे अगर महार्थाचे सामर्थ्य असे आहे की, ते मोक्षप्राप्तीचे अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्याची अंतिम सिद्धी प्राप्त करून देणारे सिद्धयोगाचे साधन सांगणारे आहे. हाच श्रीमद्भगवद्गीतेच्या भावार्थयुक्त परार्थाचा किंवा महार्थाचा अत्यंत महत्त्वपूर्ण व सर्वश्रेष्ठ चांगुलपणा आहे; इतर शास्त्रांनी सांगितलेले उपाय किंवा साधनमार्ग हे प्रमाणसिद्ध म्हणजे साधकभक्तयोगिशिष्याला अनुभूती देऊन सिद्ध होणारे नाहीत.।।१२३०।। ज्याप्रमाणे वारा सूर्याच्या आड येणाऱ्या ढगांना दूर करतो; पण त्याव्यतिरिक्त तो काही नवीन सूर्य उत्पन्न करीत नाही किंवा हात पाण्यावरील शेवाळे दूर करतो; मात्र नवे पाणी उत्पन्न करीत नाही ।।१२३१।। त्याप्रमाणे आत्मदर्शनाला अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्यप्राप्तीला

प्रतिबंध करणारा किंवा त्याच्या आड येणारा जो अविद्येचा मळ असतो तो श्रीमद्भगवद्गीतोक्त सिद्धयोगसाधनमार्गानेच नाहीसा होतो एवढेच. याशिवाय मी स्वयंप्रकाश व निर्मळ असल्यामुळे माझ्या स्वसंवेद्य आत्मस्वरूपाला कोणतीही साधने प्रकाशित करू शकत नाहीत.।।१२३२।। याकरिता सर्व अध्यात्मशास्त्रे ही अविद्येचा नाश करण्याची साधने आहेत. त्याव्यतिरिक्त ती स्वतंत्रपणे स्वत:सिद्ध अर्थात् स्वसंवेद्य आत्मस्वरूपाचा म्हणजे श्रीशिवशक्ति-सामरस्याचा बोध करण्याला समर्थ असत नाहीत.।।१२३३।। या सर्व अध्यात्म-ज्ञानप्रतिपादशास्त्रांना ज्यावेळी आपला खरेपणा सिद्ध करण्याचा किंवा सत्यत्वाविषयी प्रमाण देण्याचा विषय येतो त्यावेळी त्यांना श्रीमद्भगवद्गीता-शास्त्राचा आधार घेऊन तेथेच यावे लागते.।।१२३४।। ज्याप्रमाणे सूर्योदयाने पूर्व दिशा शोभायमान व अलंकृत झाल्यावर इतरही सर्व दिशा प्रकाशमय होतात त्याप्रमाणे या एका सर्व शास्त्रात श्रेष्ठ असलेल्या श्रीमद्भगवद्गीताशास्त्राने सर्व शास्त्रे सनाथ होतात अर्थात् सर्व शास्त्रांना छत्र लाभते व आधार मिळतो. ।।१२३५।। हं असो! या श्रीमद्भागवद्गीतारूपी शास्त्रेश्वराने म्हणजे सर्वश्रेष्ठ शास्त्राने मागील सतरा अध्यायात सिद्धयोगाचा उपाय निरनिराळ्या नावाने साधकभक्तयोगिशिष्यांना आत्मा आपल्या हातात घेता येईल अर्थात् श्रीशिव-शक्तिसामरस्याची प्रत्यक्षानुभूती येईल अशा रीतीने पुष्कळ विस्ताराने सांगितलेला आहे.।।१२३६।। परंतु पहिल्यानेच ऐकल्याबरोबर हे अर्जुनाला क्वचितच समजले असेल किंवा एकदाच सांगितल्यामुळे क्वचितच ग्रहण झाले असेल असा भाव करुणावंत श्रीभगवंतांनी कळकळीने आपल्या मनात-धरून।।१२३७।। पुन्हा एकदा तोच सिद्धयोगाच्या साधनमार्गाचा सिद्धान्त शिष्याच्या अंत:करणात पूर्णपणे दृढ होऊन बिंबावा म्हणून श्रीगोपालकृष्ण-नाथमहाराज अत्यंत मोकळ्या मनाने थोडक्यात संक्षेपाने सांगत आहेत. ।।१२३८।। आणि आता श्रीमद्भगवद्गीता ही समाप्त होण्याचा प्रसंग ओघानेच आलेला असल्यामुळे उपक्रम व उपसंहार अर्थात् आरंभ व शेवट यांची एकरूपता साधण्याकरिता म्हणजे श्रीमद्भगवद्गीतेत आरंभापासून शेवटपर्यंत एकाच अर्थाचे प्रतिपादन केले आहे असे श्रीभगवान् सांगत आहेत.।।१२३९।। किंवा श्रीमद्भगवद्गीतेच्या मध्यभागात निरनिराळ्या अधिकार प्रसंगी अनेक सिद्धान्त मांडून जे प्रतिपादन केले आहे।।१२४०।। ते तितकेही सिद्धान्त पूर्वापार विचारात न घेता श्रीमद्भगवद्गीमध्ये मांडलेले किंवा सांगितलेले आहेत असे जर कोणी मानील तर।।१२४१।। सिद्धयोगसाधनाच्या महासिद्धान्ता-

पाशीच सर्व उपसिद्धान्तांचे ऐक्य करून दाखविणे म्हणजे ते मुख्य अशा सिद्धयोगाच्या महासिद्धान्ताचे भाग किंवा बाजू आहेत असे दाखवून आरंभाला सांगितलेला मुख्य सिद्धयोगाचा सिद्धान्तच पुन्हा एकदा शेवटी सांगून भगवान् श्रीमद्भगवद्गीता ग्रंथ संपवीत आहेत.।।१२४२।। या श्रीमद्भगवद्गीता या शास्त्राचा अविद्येची निवृत्ती किंवा नाश करणे हा मुख्य सिद्धान्त किंवा प्रतिपाद्य विषय आहे आणि त्याच्या योगाने मोक्षाची म्हणजे श्रीशिवशक्ति-सामरस्याची प्राप्ती करून घेणे हे या शास्त्राचे फळ, प्रयोजन किंवा हेतू आहे आणि या दोन्ही गोष्टी साध्य करून घेण्याचे साधन केवळ ज्ञान अर्थात् श्रीसद्गुरुकृपेने जागृत होणारी कुंडलिनी शक्ती हीच आहे.।।१२४३।। हेच ज्ञान म्हणजे जागृत ज्ञानरूप कुंडलिनी शक्तीकडून होणारे शक्तिपात-योगाचे साधन या श्रीमद्भगवद्गीता या ग्रंथात नाना प्रकारांनी जे विस्तारपूर्वक सांगितलेले आहे तेच आता दोन अक्षरात पुन्हा एकदा सांगावयाचे आहे. ।।१२४४।। असे मनात आणून उपेय म्हणजे श्रीशिवशक्तिसामरस्याची सिद्धी हातात आल्यावर म्हणजे प्राप्त झाल्यावरही या साध्याची सहजतेने प्राप्ती होण्याचे सिद्धयोगाचे साधन सांगण्यासाठी देव पुन्हा वरील उद्देशानेच किंवा भावानेच प्रवृत्त झाले.।।१२४५।।

सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः
मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम्।।५६।।

अर्थ :- ज्या सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्याने आपल्या सर्व गोष्टी किंवा वृत्ती म्हणजे मूळ महाकुंडलिनी शक्तीशी शरीरातील सर्व उपशक्ती समरस करून त्या सिद्धयोगसाधनद्वारा सुषुम्नेत प्रविष्ट केलेल्या असतात व या रीतीने ज्याने केवळ माझाच आश्रय केलेला असतो असा सिद्धयोगी सर्व विहित व निषिद्ध कर्मे जरी नेहमी करीत असला तरी मीच सहस्रारात राहून माझ्याच प्रसादाने अर्थात् कृपेने सर्व शक्तींच्या रूपाने सुषुम्नेत प्रविष्ट झालेल्या त्या कुंडलिनी शक्तिरूप सिद्धयोग्याला माझ्याकडे वर खेचून घेऊन त्याला माझ्याशी समरस व समव्याप्त करून घेतो. अशा रीतीने तो सिद्धयोगिभक्त शाश्वत अशा अक्षयपदाला प्राप्त होतो.।।५६।।

मग म्हणे गा सुभटा। तो क्रमयोगिया निष्ठा। मी होउनी होय पैठा। माझ्या रूपीं।।१२४६।। स्वकर्माच्या चोखौळीं। मज पूजा करूनि भलीं। तेणें प्रसादें आकळी। ज्ञाननिष्ठेतें।।१२४७।। ते ज्ञाननिष्ठा जेथ हातवसे। तेथ भक्ति माझी उल्लासे। तिया भजन समरसें। सुखिया होय।।१२४८।।

आणि विश्वप्रकाशितया। आत्मया मज आपुलिया। अनुसरे जो करूनियां। सर्वत्रता हे।।१२४९।। सांडूनि आपुला आडळ। लवण आश्रयी जळ। का हिंडोनि राहे निश्चळ। वायु व्योमीं।।१२५०।। तैसी बुद्धी वाचा कायें। जो मातें आश्रऊनि ठाये। तो निषिद्धेंही विपायें। कर्मे करूं।।१२५१।। परी गंगेच्या संबंधीं। बिदी आणि महानदी। एक तेवीं माझ्या बोधीं। शुभाशुभांसी।।१२५२।। का बावनें आणि धुरें। हा निवाडु तंवचि सरे। जंव न घेपती वैश्वानरें। कवळूनि दोन्ही।।१२५३।। ना पांचिकें आणि सोळें। हें सोनया तंवचि आलें। जंव परिसु आंगमेळें। एकवटीना।।१२५४।। तैसें शुभाशुभ ऐसें। हें तंवचिवरी आभासे। जंव येकु न प्रकाशें। सर्वत्र मी।।१२५५।। अगा रात्री आणि दिवो। हा तंवचि द्वैतभावो। जंव न रिगिजे गांवो। गभस्तीचा।।१२५६।। म्हणौनि माझिया भेटी। तयाचीं सर्व कर्मे किरीटी। जाऊनि बैसे तो पाटीं। सायुज्याच्या।।१२५७।। देशें काळें स्वभावें। वेंचु जया न संभवे। तें पद माझें पावे। अविनाश तो।।१२५८।। किंबहुना पंडुसुता। मज आत्मयाची प्रसन्नता। लाहे तेणें न पविजतां। लाभु कवणु असे।।१२५९।।

परार्थ :- मग भगवान् श्रीगोपालकृष्णनाथमहाराज असे म्हणाले की, हे महायोद्ध्या अर्जुना! तो क्रम किंवा कर्म अर्थात् सिद्धयोगसाधकभक्त-योगिशिष्य अशा निष्ठेने म्हणजे दीर्घकाल, निरंतर व श्रद्धाभक्तिपूर्वक केलेल्या सिद्धयोगाच्या साधनामुळे माझ्या स्वरूपात अर्थात् श्रीशिवशक्तिस्वरूपात प्रविष्ट होऊन तेथेच अढळपणे स्थिर राहतो.।।१२४६।। सिद्धयोगसाधक-भक्तयोगिशिष्य हा स्वकर्माच्या म्हणजे बाह्यतः वर्णाश्रमधर्मविहित आचरणरूप व अंतरतः श्रीसद्गुरुकृपाप्राप्त सिद्धयोगसाधनरूप उत्तम पुष्पांनी माझी सुंदर पूजा करून त्यामुळे प्राप्त होणाऱ्या माझ्या कृपाप्रसादाने ज्ञाननिष्ठा अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्याची अखंड स्थिती प्राप्त करून घेतो.।।१२४७।। ज्यावेळी साधकभक्तयोगिशिष्याला ही ज्ञाननिष्ठा म्हणजे श्रीसद्गुरुकृपेने जागृत कुंडलिनीरूप कृपाशक्तीचा मार्ग हस्तगत होतो त्यावेळी माझी परमभक्ती सहजच उल्लसित व अभिव्यक्त होते आणि या अद्वयभक्तीने तो माझ्याशी समरस होऊन सुखी होतो.।।१२४८।। आणि विश्वाला प्रकाशित करणाऱ्या व आत्मरूप असणाऱ्या मला तो सर्वभावे करून मी विश्वव्यापक व विश्वोत्तीर्ण आहे हे जाणून मला अनुसरतो.।।१२४९।। ज्याप्रमाणे मीठ हे आपला मीठ-पणा व कठीणपणा सोडून देऊन पाण्याचा आश्रय केल्यावर त्यात

विरघळून जाते किंवा वायू आकाशामध्ये सर्वत्र फिरून पुन्हा आकाशातच शांत राहतो।।१२५०।। त्याप्रमाणे बुद्धी, वाणी व देहाने ज्याने केवळ माझाच आश्रय केला आहे त्याच्याकडून चुकून एखाद्यावेळी जरी निषिद्ध कर्मे केली गेली।।१२५१।। तरी श्रीगंगानदीला मिळणारा घाणेरड्या पाण्याला ओहोळ व महानदीचा प्रवाह श्रीगंगारूप होऊन जातात त्याप्रमाणे माझ्या बोधाने म्हणजे श्रीशिवशक्तिसामरस्यानुभूतीनंतर त्याची शुभ व अशुभ कर्मे मत्स्वरूपच होतात.।।१२५२।। ज्याप्रमाणे चंदन आणि साधे लाकूड यांच्यामधील भेद जोपर्यंत त्या दोघांना अग्नी कवटाळीत नाही तोपर्यंतच असतो।।१२५३।। किंवा पाच कसाच्या हिणकस सोन्याला व सोळा कसाच्या शुद्ध सोन्याला जोपर्यंत परिसाचा स्पर्श होत नाही तोपर्यंतच त्यांचा हिणकसपणा राहतो. ।।१२५४।। त्याप्रमाणे साधकभक्तयोगिशिष्याला जोपर्यंत प्रकाशरूपाने मी सर्वत्र ओतप्रोत भरून राहिलेलो आहे असा अनुभव येत नाही तोपर्यंतच त्याला ही शुभ व ही अशुभ कर्मे आहेत असे भासत राहते.।।१२५५।। अरे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! जोपर्यंत सूर्याच्या गावात प्रवेश केला नाही तोपर्यंतच रात्र आणि दिवस हा भेद राहत असतो.।।१२५६।। याकरिता हे किरीटी! ज्यावेळी साधकभक्तयोगिशिष्याची व माझी भेट सहस्त्रारात होते अर्थात् तो माझ्याशी ज्याक्षणी समरस होतो त्याक्षणी त्याची सर्व शुभाशुभ कर्मे नाहीशी होऊन तो सायुज्याच्या म्हणजे समरसतेच्या श्रेष्ठ पदावर जाऊन बसतो.।।१२५७।। अशा ज्या पदाचा देशाने, कालाने व स्वभावाने अर्थात् नैसर्गिक धर्मामुळे कधीही नाश किंवा ऱ्हास होणे संभवत नाही त्या माझ्या समावेशात्मक अविनाशी पदाची त्याला प्राप्ती होते.।।१२५८।। किंबहुना हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! माझ्या आत्मस्वरूपाची प्रसन्नता अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्याची अंतिम प्रसादरूप सिद्धी प्राप्त झाल्यावर त्या सिद्धयोग्याला या जगात अप्राप्य असा कोणता लाभ बाकी राहिलेला असतो?।।१२५९।।

चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः।
बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चितः सततं भव।।५७।।

अर्थ :- यासाठी हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! तू सर्व अंतर्बाह्य कर्मांना अर्थात् श्रीसद्गुरुकृपेने म्हणजे शक्तिपातयोगदीक्षेने अंतर्मुखाने जागृत झालेल्या कुंडलिनी शक्तीकडून होणाऱ्या सिद्धयोगसाधनात्मक व कुंडलिनी शक्तीच्या अखंड जागृत असलेल्या बाह्यसंसारोन्मुखतेने होणाऱ्या

नित्यनैमित्तिक कामोपभोगाकांक्षावासनातृष्णासंकल्पनादि कर्मांना विवेकबुद्धीने अर्थात् जागृत कुंडलिनी शक्ती सुषुम्नागामी झाल्यामुळे प्राप्त झालेल्या नित्यानित्यविवेकाने माझ्या म्हणजे श्रीईश्वराच्या ठिकाणी अर्पण करून मीच एकमात्र श्रेष्ठ आहे असा होऊन बुद्धियोगाचा म्हणजे जागृत कुंडलिनी शक्तीकडून आपोआप होणाऱ्या सिद्धयोगाचा आश्रय करून आणि माझ्या ठिकाणी म्हणजे सुषुम्नेत आपले चित्त म्हणजे श्रीसद्गुरुकृपेने जागृत झालेली कुंडलिनी शक्ती अखंड राहील असा नेहमी होऊन सहस्रारात माझ्याशी समरस व समव्याप्त हो.।।५७।।

याकारणें गा तुवां इया। सर्व कर्मा आपुलिया। माझ्या स्वरूपीं धनंजया। संन्यासु कीजे।।१२६०।। परी तोचि संन्यासु वीरा। करणीयेचा झणें करा। आत्मविकेकीं धरा। चित्तवृत्ति हे।।१२६१।। मग तेणें विवेक-बळें। आपणपें कर्मावेगळें। माझ्या स्वरूपीं निर्मळें। देखिजेल।।१२६२।। आणि कर्माची जन्मभोये। प्रकृति जे का आहे। ते आपणयाहूनि बहुवे। देखसी दूरी।।१२६३।। तेथ प्रकृति आपणयां-। वेगळी नुरे धनंजया। रूपेंवीण का छाया। जयापरी।।१२६४।। ऐसेनि प्रकृतिनाशु। जालया कर्मसंन्यासु। निफजेल अनायासु। सकारणु।।१२६५।। मग कर्मजात गेलया। मी आत्मा उरें आपणपयां। तेथ बुद्धि घापे करूनियां। पति-व्रता।।१२६६।। बुद्धि अनन्य येणें योगें। मजमाजीं जैं रिगे। तैं चित्त चैत्यत्यागें। मातेंचि भजे।।१२६७।। ऐसें चैत्यजातें सांडिलें। चित्त माझ्या ठायीं जडलें। ठाके तैसें वहिलें। सर्वदा करी।।१२६८।।

परार्थ :- याकरिता हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य धनंजया ! तू आपली सर्व अंतर्बाह्य कर्मे म्हणजे जागृत कुंडलिनी शक्ती माझ्या ठिकाणी म्हणजे सुषुम्नेमध्ये समर्पण कर व या रीतीने संन्यास साध्य करून घे.।।१२६०।। परंतु हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना ! तू नित्यकर्मांचा संन्यास कदाचित् वरकांती कृत्रिमपणे करशील; पण तसे करू नकोस, कारण हा खरा संन्यास नव्हे. याकरिता आपली चित्तवृत्ती म्हणजे जागृत कुंडलिनी शक्ती सुषुम्नागामी करून आत्मविवेक म्हणजे नित्यानित्यविवेक धारण करणे हाच खरा संन्यास आहे व अशा आत्मविवेकाकडेच तू आपली सर्व चित्तवृत्ती लाव.।।१२६१।। असे केले म्हणजे विवेकाच्या अर्थात् नित्यानित्य किंवा आत्मानात्म विचाराच्या सामर्थ्याने आपण सर्व कर्मांहून वेगळे आहोत अशी अनुभूती तुला येऊन तू माझ्या निर्मळ श्रीशिवस्वरूपाच्या ठिकाणी अखंड

असल्याचे दिसेल अर्थात् अनुभवाला येईल.।।१२६२।। त्याचप्रमाणे सर्व कर्मांची जन्मभूमी असलेली प्रकृती अर्थात् अविद्या किंवा माया ही बहिरोन्मुख कुंडलिनी शक्ती आपल्या मूळच्या श्रीशिवस्वरूपाहून फार दूर व भिन्न आहे असे तुझ्या अनुभवाला येईल.।।१२६३।। मग हे सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य अर्जुना! ज्याप्रमाणे कोणत्याही शरीरापासून किंवा पदार्थांहून त्याची छाया अलग राहू शकत नाही किंवा वेगळी व स्वतंत्र अशी दृष्टीस पडत नाही त्याप्रमाणे प्रकृती, अविद्या, माया किंवा कुंडलिनी शक्ती ही आपल्या श्रीशिवरूपाहून वेगळी नाही असे तुझ्या अनुभवाला येईल; कारण शक्ती ही श्रीशिवांशी कोणत्याही अवस्थेत अभिन्नच असते.।।१२६४।। अशा प्रकारच्या ज्ञानाने म्हणजे सामरस्यानुभूतीमुळे सर्व कर्मांचा अर्थात् तदंगभूत अविद्येचा म्हणजे सर्व कर्माला मूळ कारण असणारी कुंडलिनी शक्ती श्रीशिवांशी समरस झाल्यामुळे कर्मसंन्यास आपोआपच घडून येतो.।।१२६५।। मग या रीतीने सर्व कर्मे अर्थात् तत्स्वरूप कुंडलिनी शक्ती श्रीशिवांशी सहस्रारात समरस झाल्यावर केवळ मी एक आत्माच म्हणजे श्रीशिवच शक्तीसह आपल्या ठिकाणी उरतो त्या ठिकाणी तू आपली बुद्धी पतिव्रतेप्रमाणे एकनिष्ठ करून ठेव.।।१२६६।। अशा प्रकारे जो अनन्ययोगाने म्हणजे सिद्धयोगाने बुद्धी म्हणजे जागृत कुंडलिनी शक्ती माझ्या ठिकाणी म्हणजे सुषुम्नेत प्रवेश करील त्यावेळी चित्त म्हणजे ती बुद्धिरूप जागृत शक्ती सुषुम्नागमनामुळे सर्व विषयांचे चिंतन टाकून केवळ माझ्याच ठिकाणी रंगून जाऊन माझेच भजन करील अर्थात् सहस्रारगामी होण्यासाठी उद्युक्त होईल.।।१२६७।। याकरिता सर्व विषयचिंतन किंवा अनात्मपदार्थचिंतन सोडून देऊन चित्त म्हणजे श्रीसद्गुरुकृपेने जागृत झालेली आत्मचैतन्य शक्ती कुंडलिनी सदासर्वदा सुषुम्नागामी होऊन माझ्या श्रीशिवस्वरूपाशी समरस होईल अशा साधनमार्गाचा तू लवकर अवलंब कर.।।१२६८।।

येथपर्यंत आपण "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाधारे जीव, जगत् व ईश्वर यांच्या रूपाने होणारी पिंडब्रह्मांडाची उभारणी अर्थात् त्यांचे स्वरूप व सिद्धयोगसाधनाने अर्थात् क्रमयोगाने या सर्वांची संहारणी होऊन श्रीशिवशक्तिसामरस्यावस्थेची प्राप्ती कशी होते हे विस्तृतपणे पाहिले. या सर्व विवेचनाचे श्रीसंत तुकाराममहाराजांनी पुढील चार अभंगात साररूपाने वर्णन करताना असे म्हटले आहे की -

संकोचोनी काय झालासी लहान। घेई आपोशन ब्रह्मांडाचें।।१।।

करोनी पारणें आंचवू संसारा। उशीर उशीरा लावूं नको।।२।।
घरकुलीनें होता पाडिला अंधार। तेणें केलें फार कासावीस।।३।।
झुगारूनी दुरी लपविलें काखे। तुका म्हणे वाखे कौतुकाचे।।४।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

निरंजनीं आम्हीं बाधियेलें घर। निराकारीं निरंतर राहिलोंसे।।१।।
निराभासीं पूर्ण झालो समरस। अखंड ऐक्यास पावलों आम्ही।।२।।
तुका म्हणे आतां नाहीं अहंकार। झालों तदाकार नित्य शुद्ध।।३।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

निरंजनीं एकवटवाणे। संग नेणें दुसरा।।१।।
पाहा चाळविलें कैसें। लावूनि पिसें गोवळें।।२।।
लपविलें अंगें अंग। दिला संग होता तो।।३।
तुका म्हणे नव्हतें ठावें। झाले भावें वाटोळें।।४।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

लवण मेळवितां जळें। काय उरलें निराळें।।१।।
तैसा समरस झालों। तुजमाजीं हरपलों।।२।।
अग्निकर्पूराच्या मेळीं। काय उरली काजळी।।३।।
तुका म्हणे होती। तुझी माझी एक ज्योती।।४।।

❋ ❋ ❋ ❋ ❋

हे साधका! तू मुळात चैतन्यस्वरूप, विभुरूप, आत्मरूप अर्थात् श्रीशिव-शक्तिरूप असताना आपल्या स्वस्वरूपाशी अभिन्न असलेल्या शक्तीचा संकोच करून जीवरूपाने लहान का झालास? ही जी उभारणी तू स्वतः केली आहेस तिची संहारणी करण्याकरिता ब्रह्मांडाचे आपोशन घे अर्थात् श्रीसद्गुरुकृपेने जागृत झालेली मूलाधारस्थ जीवरूप कुंडलिनी शक्ती आज्ञाचक्राच्या पर्यंत असलेल्या पिंडातून सुषुम्नाद्वारे ब्रह्मांडात म्हणजे आज्ञाचक्राच्या वर सहस्रा-रात नेऊन श्रीशिवाशी समरस कर.।।१।। अशा रीतीने पारणे करून म्हणजे अनंत जन्मपर्यंत संकुचितपणामुळे जो स्वस्वरूपाचा उपवास अर्थात् विस्मरण झाले होते ते उपरोक्त प्रकारे सामरस्याच्या द्वारा दूर करून समस्त संसार गिळून टाक. हे घडून येण्याकरिता फार उशीर लावू नको अर्थात् दीर्घकाल, निरंतर व अत्यंत सत्काराने श्रीगुरुकृपाप्राप्त साधन कर.।।२।। घरकुलीने अर्थात् जीवपणामुळे, देहाभिमानामुळे, वासनामुळे व इच्छा-आकांक्षादि संसारोन्मुख वृत्तींमुळे जन्ममरणपरंपरारूप आत्मस्वरूपाच्या अज्ञानामुळे अंधार पडला

होता त्याने तुला जन्मजन्मांतरी अत्यंत कासावीस केले होते अर्थात् त्रिविध तापाने पोळून टाकले होते.।।३।। श्रीसंत तुकाराममहाराज असे म्हणतात की, हे साधका! तू आपल्याला स्वतःला आपल्याच काखेत अर्थात् स्वतःच्या ठिकाणी लपवून स्वतःच हा संसाराचा खेळ कौतुकाने लपून खेळत होतास; पण हा खेळ तापदायक असल्यामुळे तो तू दूर झुगारून दे अर्थात् जीवरूपाने जे स्वांग घेतलेले आहे ते सोडून देऊन श्रीशिवरूप हो.।।४।।

आम्ही निरंजनात म्हणजे निःशेष अंजनरहित अशा शुद्ध श्रीशिवशक्तिसामरस्यावस्थेत घर बांधले आहे अर्थात् तेथे समरस झालो आहोत आणि त्या अवस्थेतच अखंड निराकार रूपाने आहोत.।।१।। अशा प्रकारे श्रीशिवशक्तीचे जे निःशेष आभासरहित अर्थात् पिंडब्रह्मांडाच्या उभारणीविरहित जे स्वरूप आहे त्याच्याशी आम्ही समरस आणि त्रिकालाबाधित समावेशावस्थेला प्राप्त झालो आहोत.।।२।। श्रीसंत तुकाराममहाराज असे म्हणतात की, आता "अ" म्हणजे श्रीशिव व "हं" म्हणजे शक्ती या दोघांचे सहस्रारात समरसीकरण झाल्यामुळे आमच्या ठिकाणी "अहं"कार शिल्लक राहिलेला नाही. आम्ही नित्य शुद्ध अशा श्रीशिवशक्तीशी तदाकार, एकरूप किंवा समरस झालो आहोत.।।३।।

माझे मूळचे श्रीशिवशक्तिस्वरूप हे निरंजन अर्थात् शुद्ध व कलंकरहित असे होते. त्या अवस्थेत मला कोणाचाही संग नव्हता. असे माझे निःसंग व निखळ शुद्ध रूप होते.।।१।। परंतु ईश्वराने स्वतःच स्वतःला चाळविले अर्थात् स्वेच्छेनेच आपल्याला जीवरूपाने संकुचित करून घेऊन पिंडब्रह्मांडाच्या गुंत्यात अडकवून घेतले.।।२।। अशा प्रकारे संसारोन्मुख होऊन त्याने आपल्याला अर्थात् स्वस्वरूपाला लपवून टाकले आणि मूळची एकसंगाची अद्वय स्थिती मोडून टाकली.।।३।। अशा प्रकारे जीवभाव प्राप्त झाल्याने आमचे वाटोळे झाले व पुन्हा मी श्रीशिवभाव प्राप्त करून घेतल्यामुळे आमचे वाटोळेच झाले.।।४।।

ज्याप्रमाणे मीठ पाण्यात घातल्यावर ते पाण्यापेक्षा वेगळे राहत नाही।।१।। त्याप्रमाणे मी ईश्वराशी अर्थात् माझ्या स्वसंवेद्य अशा मूळच्या श्रीशिवशक्तिस्वरूपाशी समरस अर्थात् एकरूप व एकरस झालो. या रीतीने मी श्रीभगवंतामध्ये हरवून अर्थात् विरघळून गेलो.।।२।। ज्याप्रमाणे अग्नी आणि कापूर यांचा संबंध आला असता कापूर जळून जाऊन खाली काजळी सुद्धा उरत नाही ।।३।। त्याप्रमाणे ईश्वराची व माझी स्वरूप ज्योती मुळातच जी एक होती ती आता सर्व संकुचितपणाचा निरास झाल्यामुळे पूर्ववत् एक झाली आहे.।।४।।

सारांश, सिद्धयोगाचे साधन करणाऱ्या साधकांना या साधनाचे अत्युच्च व अनुत्तर पातळीवरील श्रीगुरुस्वरूपाने मार्गदर्शन करून अंतःस्फूर्ती देणारा आणि आपल्या स्वसंवेद्य व स्वस्पंद अर्थात् श्रीशिवशक्तिरूप आत्मस्वरूपाकडे अर्थात् सामरस्यरूप व अंतिम सिद्धीकडे मार्गस्थ होण्यासाठी प्रेरणा देणारा "**श्रीमहार्थमंजरी**" हा एक अपूर्व, अलौकिक, लोकोत्तर व एकमेवाद्वितीय ग्रंथ आहे. साधक वाचक, भक्त व जिज्ञासू अभ्यासकांना या ग्रंथाचा लाभ होईल.

श्रीमहेश्वरानंद अर्थात् महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ यांनी लिहिलेल्या मूळ गाथांचे व त्यांनी स्वतःच त्यावर "परिमलव्याख्येच्या" रूपाने केलेल्या टीकेचे भाषांतर कै. श्री. परशुराम रेणुकादास बोधनकर यांनी करून दिले होते त्याचे सुश्लिष्ट विवरण चि. सौ. मंजिरी प्रीतम पाटील, एम्. ए. (सुवर्णपदक विजेती) हिने केले आहे. याशिवाय श्रीगोरखनाथ मंदिर, गोरखपूर येथून प्रसिद्ध झालेले "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाचे संपादक व टीकाकार श्री. रामलाल श्रीवास्तव यांनी त्या ग्रंथावर "विशेष" म्हणून जी टीका केली आहे तीही तिने भाषांतरित केलेली असून ती साधकवाचकांच्या सोयीसाठी या ग्रंथात समाविष्ट केलेली आहे. तसेच या ग्रंथाला महंत श्रीअवेधनाथ यांनी जे "आशीर्वचन" लिहिले आहे व श्री. रामलाल श्रीवास्तव यांनी "संपादकीय" लिहिले आहे त्याचे अत्यंत अर्थवाही भाषांतर चि. सौ. डॉ. दीप्ती महेश दाभाडे हिने करून दिले आहे. त्याच प्रमाणे सौ. स्नेहाताई बैजू देशपांडे यांनी या ग्रंथाच्या सूच्यांचे काम अत्यंत आत्मियतेने करून दिले आहे या तीघींच्याकडून या संप्रदायाची अशीच सेवा उत्तरोत्तर व्हावी व त्यांच्यावर अखंड श्रीगुरुकृपा राहावी म्हणून श्रीसद्गुरुचरणी प्रार्थना आहे. त्याचप्रमाणे या ग्रंथाची मुद्रिते तपासण्याचे काम चि. सौ. सुवर्णा दत्तगुरू पाटील हिने अत्यंत मेहनतीने व साक्षेपाने केले असून त्याबद्दल तिचे कितीही कौतुक केले तरी ते थोडेच होईल. याशिवाय श्री. दिलीप मधुसूदन पिंगळे यांनी या ग्रंथाची मुद्रिते संगणकावर तपासून जे साहाय्य केले ते अत्यंत अमोल व अपूर्व असेच आहे. याशिवाय या ग्रंथाची अक्षर जुळणी चि. विवेक जयवंत हटकर, श्री. नितीन यशवंत रोडे यांनी सेवाभावाने, प्रेमाने व श्रद्धेने केलेली आहे, ही अत्यंत स्पृहणीय गोष्ट आहे. या सर्वांवर व त्यांच्या कुटुंबियांवर श्रीसद्गुरुचरणांनी अखंड कृपादृष्टी ठेवावी ही त्यांच्या चरणी प्रार्थना आहे.

ज्यांनी अत्यंत आत्मीयतेने, आपुलकीने व प्रेमाने अर्थसाहाय्य करून हा ग्रंथ प्रसिद्ध होण्याचा मार्ग सुलभ करून दिला त्या सर्वांवर व त्यांच्या

कुटुंबियांवर श्रीसद्गुरुचरणांनी अखंड कृपादृष्टी ठेवावी अशी त्यांच्या परम-कोमल चरणी प्रार्थना आहे.

सिद्धयोगाचे समाधिधन ज्या ज्या ग्रंथामधून संपूर्णपणे अगर अल्पांशाने प्रकट झालेले असेल ते ते ग्रंथ मूळ व मराठी भाषांतरासह साधकांपर्यंत पोहोचविण्याचा पूर्वी केलेला संकल्प माझे हृदयस्थ श्रीसद्गुरू सकलसंतश्रेष्ठ महासिद्धयोगी श्रीसंत गुळवणीमहाराज आपल्या अमोघ शक्तिसामर्थ्याने, माझ्यावरील प्रेमाने व अपरंपार कृपाबलाने पूर्ण करून घेतील असा नितांत विश्वास आहे; कारण हे त्यांनी माझ्यावर सोपविलेले कार्य आहे. श्रीसद्गुरूंनी दिलेले किंवा सोपविलेले कार्य हे नेहमीच यशस्वी होत असते. (Given mission is always successful) असा शास्त्रकारांचा निर्वाळा आहे; कारण हे कार्य निमित्तमात्र म्हणून कोणीही करीत असला तरी अंततः संप्रदाय परंपरेने वाहत आलेली श्रीसद्गुरुरूप इच्छाशक्तीच आपल्या अपूर्व बलाने हे घडवून आणीत असते, हे नितांत सत्य आहे.

सारांश, "**तया अक्षराआंतील भावो। पाववीन मी तुमचा ठावो। आइका म्हणे केशवो। श्रीवामनाचा।।**" या न्यायाने "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाची विस्तृत प्रस्तावना त्यातील रहस्य साररूपाने उलगडून दाखवून पूर्ण झाली. "**फोडूनि शब्दांचे अंतर। वस्तु दाखवी निजसार। तोचि सद्गुरु माहेर। अनाथांचे।।५.२.१५।।श्रीदासबोध।।**" या श्रीसमर्थ रामदास-स्वामीमहाराजांच्या म्हणण्याप्रमाणे हा ग्रंथ श्रीसद्गुरुनाथस्वामीमहाराजांच्या कृपेचे वैभव आहे, हे नितांत सत्य आहे. श्रीसद्गुरुकृपेने होणाऱ्या कुंडलिनी शक्तीच्या उत्थापनाद्वारा महार्थाशी अर्थात् श्रीशिवस्वरूपाशी एकरूप किंवा समरस करणाऱ्या अमनस्कयोगाची किंवा क्रमयोगाची सिद्धी हा या ग्रंथाचा मूर्धन्य महासिद्धान्त असून इतर तदंगभूत उपसिद्धान्त हे या ग्रंथाचे स्वरूप आहे. सिद्धयोगाचे साधन करणाऱ्या साधकांना शब्दरूप श्रीसद्गुरुस्वरूपाने मार्गदर्शन करणारा हा एक अमोलिक, अपूर्व व अलौकिक असा ग्रंथ आहे.

सिद्धयोग हे ब्रह्मविद्येचे बीज आहे. सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्यांना महार्थयुक्त, स्वस्पंदात्मक व संविन्मूर्तिरूप अर्थात् चैतन्यरूप श्रीशंभूची किंवा श्रीशिवशक्तिसामरस्याची प्राप्ती व्हावी म्हणून श्रीसद्गुरुनाथस्वामीमहाराजांच्या अपार कृपेने हे महार्थरूप सिद्धयोगसाधनेचे रहस्य या ग्रंथरूपाने प्रसिद्ध होत आहे. सिद्धमहायोगशास्त्र अर्थात् शक्तिपातयोगरहस्य म्हणजे शुद्धबोधाचा उल्लास आहे. मत्सर, द्वेषादि क्षुद्र व संकुचित बुद्धी सोडून देऊन या शास्त्राच्या

रहस्याचा सर्व संतांच्या व पंथांच्या सारस्वताच्या प्रांगणात शिरून विचार केला पाहिजे. हे शास्त्र म्हणजे एक महान् आश्चर्य आहे. या शास्त्राचा कधीही अनादर करता कामा नये.

सच्छिष्यरूप साधकभक्तयोगिशिष्यांच्याकरिता या ग्रंथाची रचना महामाहेश्वराचार्यवर्य महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ अर्थात् श्रीमहेश्वरानंद यांनी केली आहे. ज्याप्रमाणे दिवा हातात असला म्हणजे चालणाऱ्यांचे पाय घसरत नाहीत व वाट चुकत नाही त्याचप्रमाणे आडमार्गाने जाणाऱ्या साधकभक्तयोगिशिष्यांनाही या ग्रंथाच्या प्रकाशात शुद्धमार्ग दृष्टीस पडतो. अत्यंत सावधानतेने, साक्षेपाने व निश्चयाने जो सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्य या सिद्धमहायोगशास्त्राचा अर्थात् शक्तिपातयोगरहस्याचा अभ्यास करतो तो आपल्या आयुष्यातच आपल्या महार्थरूप भगवत्तेची अनुभूती घेऊन कृतार्थ होतो. यापेक्षा दुसरे कोणते मोठे आश्चर्य असू शकते?

शक्तिपात ही या भूतलवरील एक अलौकिक, लोकोत्तर, एकमेवाद्वितीय व अपूर्व अशी सिद्धयोगांतरगतसाधनप्रक्रिया असून तिचा महिमा ग्रंथग्रंथातरी, शास्त्रांतरी व श्रीसंतवाङ्मयात विपुलतेने पाहावयास मिळतो. या सिद्धयोगसाधनप्रक्रियेच्या अंतर्भूत असलेल्या श्रीसद्गुरुकृपा, शक्तिपातयोगदीक्षा, सिद्धयोगसाधन, कुंडलिनी शक्तीचे स्वरूप, इत्यादि विविध पैलूंचे सांगोपांग दर्शन घेण्यासाठी साधकांनी वेळोवळी निर्दिष्ट केलेल्या ग्रंथांचे अवश्य अवलोकन करावे. या सर्व ग्रंथाच्या वाचनाने "**श्रीमहार्थमंजरी**" सारख्या दुरूह ग्रंथाचे साकल्याने आकलन होणे सहज शक्य होईल.

इत्यलम्! विश्वात्मक व विश्वोत्तीर्ण श्रीसद्गुरुचरणी नित्य व अखंड अगत्य ठेवून त्यांच्या अखंड श्रीचरणस्मरणाने जीवन धन्य व कृतार्थ करावे ही नम्र प्रर्थना.

श्रीसद्गुरुचरणरजसेवक
अर्थात्
श्रीसद्गुरुचरणपादपद्मोपजीवी
केशव रामचंद्र जोशी

प्रस्तावना

लेखक :- श्री. भागीरथप्रसाद त्रिपाठी
"वागीशः शास्त्री"

क्रमदर्शन

निर्विकल्प परमतत्त्वज्ञानरूप मुक्तीचा उपाय विकल्पसंस्कार हाच आहे. हा संस्कार क्रमाने म्हणजेच हळूहळू होतो, एकदम किंवा अचानक होत नाही. त्यामुळे याचे नावच "**क्रमदर्शन**" असे झाले आहे. हे दर्शन म्हणजे शास्त्र क्षेप म्हणजे फेकणे, ज्ञान, प्रसंख्यान, गती व नादरूप पाच कृत्ये कालौघात संपादित करते अर्थात् घडविते म्हणून याचे "**कालीनयः**" असे दुसरे नावही आहे. श्रीशिवांच्या अनुग्रहाने म्हणजेच कृपेने अक्रमाने म्हणजे क्रमविरहित ज्ञानाने तत्काळ मोक्ष मिळतो असा अनुग्रहाचा किंवा कृपेचा म्हणजेच शक्तिपातयोगदीक्षेचा असामान्य महिमा "**श्रीप्रत्यभिज्ञा-हृदय**" या ग्रंथात प्रकट केला आहे. परंतु या क्रमदर्शनात मात्र मोक्ष क्रमानेच मिळतो असे सांगून अनुग्रहशक्तीला दुय्यम स्थान दिलेले आहे. येथे विकल्पसंस्कारांशिवाय मोक्ष मिळत नाही असे सांगितले आहे. साधकाने मनाला स्थिर करून असार आणि अनपेक्षित अंशांना किंवा गोष्टींना दूर करणे हाच क्रमनयामध्ये विकल्पसंस्कार होय. या दर्शनातला सर्वसार असा सिद्धान्त म्हणजे अद्वैत सिद्धान्तच होय. सांख्यसिद्धान्ताचे येथे खंडन केलेले आहे. प्रकाश हाच सर्वांचा उपास्यदेव आहे असे येथे सांगितले आहे.

परंपरा

ग्रंथकारांनी परंपरेविषयीचा ग्रंथात खूप आदर प्रकट केला आहे. या दृष्टीने "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथातील खालील श्लोक उद्धृत केले आहेत.

इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्।
विवस्वान् मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत्।।४.१।।
एवं परम्पराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः।
स कालेनेह महता योगो नष्टः परन्तप।।४.२।।
स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः।
भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम्।।४.३।।

अर्थ :- हे अर्जुना! मी हा अक्षय फल देणारा व अविनाशी असा

सिद्धयोग (कल्पारंभी) श्रीसूर्याला सांगितला होता. (पुढे) श्रीसूर्याने (हा सिद्धयोग आपला मुलगा) श्रीमनूला सांगितला आणि श्रीमनूने (आपला मुलगा) राजा श्रीइक्ष्वाकुला सांगितला.।।४.१।।

याप्रमाणे परंपरेने प्राप्त झालेला हा सिद्धयोग राजर्षींनी म्हणजे क्षत्रियांनी अर्थात् साधकांनी जाणून घेतला आणि त्यांनी या सिद्धयोगाचे अनुष्ठान म्हणजे साधन केले; परंतु हे अर्जुना ! हा सिद्धयोग दीर्घकालापासून या भूलोकावरून संप्रदायरहित अर्थात् लुप्तप्राय झाला आहे.।।४.२।।

हे अर्जुना ! तू माझा भक्त आणि प्रिय सखा अर्थात् मित्र असल्यामुळे तोच हा प्राचीन असा सिद्धयोग मी तुला आज सांगितला किंवा सांगत आहे; कारण हा सिद्धयोग अत्यंत उत्तम, रहस्यमय अर्थात् सर्वश्रेष्ठ असा ज्ञानमय आहे.।।४.३।।

उपरोक्त रीतीने या ग्रंथात अर्जुनाप्रमाणे शिष्यभावाने प्रपत्ती अर्थात् सर्वधर्मांचा परित्याग करून सर्वभावपूर्वक शरणागती सांगितली आहे; कारण या शरणागतीमुळेच श्रीसद्गुरूंची कृपा अर्थात् शक्तिपातयोगदीक्षा होत असल्यामुळे त्याविषयी या ग्रंथात असे सांगितले आहे की -

दीक्षया मुच्यते जन्तुः प्रातिभेन तथा प्रिये।
गुर्वायत्ता तु सा दीक्षा बद्धबन्धनमोक्षणे।।
सा च सर्वाध्वसम्पूर्णमात्रसंविदभेदिना।
गुरुणानुग्रहधिया शिष्ये यदवलोकनम्।

अर्थ :- हे प्रिये ! दीक्षेने त्याचप्रमाणे प्रातिभ ज्ञानाने अर्थात् स्वाभाविक अशा योग्य प्रतिभेने मनुष्य मुक्त होतो. ती बद्ध जीवाला बंधनमुक्त करणारी दीक्षा श्रीसद्गुरूवर अवलंबून असते.

सर्व मार्गात संवित्‌चा अभेद पाहणाऱ्या श्रीसद्गुरूंनी अनुग्रहबुद्धीने अर्थात् कृपा करण्याच्या बुद्धीने शिष्याकडे पाहणे म्हणजे केवळ दृष्टीने शक्तिपात करून त्याची अनादि निद्रिस्थ आत्मचैतन्यशक्ती कुंडलिनी जागृत करणे ही चाक्षुषी किंवा दृक् दीक्षा होय.

तेथे आणवी, शाक्ती व शांभवी हे दीक्षेचे प्रकार सांगितले आहेत.

"**तीव्रसंवेगानामासन्नः।**" अर्थात् "ज्यांना तीव्रातितीव्रशक्तिपाताचा संवेग प्राप्त होतो त्यांना मुक्ती अर्थात् श्रीशिवशक्तीसामरस्य जवळ असते," याप्रमाणे "**श्रीपातंजल योगदर्शन।।समाधिपाद १.२१।।**" या ग्रंथात कथन केल्याप्रमाणे शक्तिपाताचे तीव्रातीव्रतरत्वादि भेदही स्वतःच शोधून

पाहावेत. "**गुरुमत्तैव नः शास्त्रे परमं फलमुच्यते।**" अर्थात् "आमच्या शास्त्रात श्रीसद्गुरूंनी युक्त असलेल्या अर्थात् शक्तिपातयोगदीक्षा घेतलेल्या साधकभक्तयोगिशिष्यालाच परमफल मिळेल म्हणजे श्रीशिवशक्तिसामरस्याची प्राप्ती होईल," असे याचे सार होय. त्यामुळे या ग्रंथात खूप प्रमाणात स्वगुरू आणि आपण यांचीच उदाहरणे दिली आहेत. उपसंहार अर्थात् ग्रंथाचा शेवट करीत असताना श्रीकृष्णार्जुनांचा श्रीसद्गुरुशिष्यभाव प्राधान्याने प्रकट करून श्रीसद्गुरुकृपेनेच शिष्योद्धार होतो असे प्रस्थापित केले आहे. ती गाथा पुढील-प्रमाणे आहे.

एनमेव महार्थं युद्धारम्भे पाण्डुपुत्रस्य।
षोडशसहस्रशक्तिर्देव उपदिशति माधव इति शिवम्।।७०।।

अर्थ :- हाच महार्थ म्हणजे सिद्धयोगसाधनशास्त्र युद्धाच्या सुरुवातीला पांडुपुत्र अर्जुनाला सोळा हजार शक्तींनी युक्त असेलल्या श्रीमाधवदेवांनी उपदेशिला आहे.

शोक, मोह व भ्रम यांनी युक्त झालेला मानव स्वतःला इष्ट असणाऱ्या गोष्टींचे समनुष्ठान अर्थात् शास्त्रानुसार योग्य असलेले अनुष्ठान किंवा साधन करू शकत नाही. त्यामुळे शोक, मोह व भ्रम यांना दूर करण्यासाठीच योग प्रवृत्त होतो. "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथातही हेच तत्त्व खालील श्लोकातून सांगितले आहे.

सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति।
वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जांयते।।१.२९।।
गाण्डीवं संस्रते हस्तात् त्वक् चैव परिदह्यते।
न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः।।३०।।
एवमुक्त्वार्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत्।
विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः।।४७।।

अर्थ :- ज्यावेळी सिद्धयोगसाधकभक्तयोगिशिष्याला असे वाटते की, आपण दुसऱ्याच मार्गाला अर्थात् विषयगामी किंवा संसारोन्मुख होऊन चाललो आहोत व आपले साधन सुटून चालले आहे त्यावेळी भयाने त्याच्या अंगावर रोमांच उभे राहतात, हळूहळू श्वास-प्रश्वास शिथिल होतात व शरीर आग लागल्याप्रमाणे तापून जाते.

त्यावेळी साधकभक्तयोगिशिष्य देवाची अशी प्रार्थना करतो की, "हे प्रभो! मी स्थिरतापूर्वक राहून सिद्धयोगसाधनयुद्ध खेळण्याला असमर्थ आहे. माझे मन

भ्रमयुक्त होत आहे आणि सर्व अनिष्टसूचक अशी लक्षणे मला दिसत आहेत.

अशा प्रकारे चिंतेमुळे शिथिल झाले की, साधकाचे मन व्यथित होऊन शोकामुळे सम्यक् प्रकाराने उद्विग्न होते.

"**श्रीपातंजल योगदर्शन**" या ग्रंथातही "**दुःखदौर्मनस्याङ्गमेजयत्व-श्वासप्रश्वासाविक्षेपसहभुव।।समाधिपाद १.३१।।**" अर्थात् "ही जी सिद्धयोगाभ्यासातील विघ्ने कथन केलेली आहेत तीच अर्जुनाच्या ठिकाणी उपस्थित झाली. मात्र श्रीसद्गुरू भगवान् श्रीगोपालकृष्णनाथमहाराजांच्या उपदेशाने व कृपाप्रसादाने म्हणजे शक्तिपातयोगदीक्षेमुळे त्याचा मोह व विघ्ने नाहीशी होऊन शेवटी तो आपल्या श्रीसद्गुरुनाथमहाराजांना असे म्हणाला की -

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत।
स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव।।१८.७३।।

अर्थ :- अर्जुनाच्या शरीराच्या द्वारा तेज व्यक्त होत आहे. त्यामुळे तो असे म्हणाला की, "माझा मोह आणि संदेह सर्व काही नाहीसे झाले आहे. जे तू सांगशील तेच मी करीन."

जो मनुष्य विप्रतिपन्नचित्त अर्थात् साधनहीन अशा अवस्थेत असतो तो कधीही संसारसागर पार करून किंवा तरून जाऊ शकत नाही; "**अथ चेत्त्वमहङ्कारान्न श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि।।१८.५८।।**" अर्थात् "हे अर्जुना! जर तू माझ्याच ठिकाणी म्हणजे सुषुम्नेत निरंतर चित्त म्हणजे जागृत कुंडलिनी शक्ती धारण करण्याचा प्रयत्न करशील तर तू माझ्या कृपेमुळे संसाराला कारण होणाऱ्या जन्ममृत्यू इत्यादि सर्व संकटांना व अज्ञानादि सर्व निमित्तांना तरून किंवा त्यांचे उल्लंघन करून जाशील; पण जर तू अभिमानामुळे माझे म्हणणे ऐकणार नसशील तर तुझा विनाश होईल अर्थात् तू परमार्थातून भ्रष्ट होशील." या न्यायाने अहंकार हाच मुळात एकमात्र शत्रू आहे. त्याच्या निरसनार्थ भगवान् श्रीगोपालकृष्णनाथमहाराजांनी अर्जुनाला दोन वेळा असे सांगितले की -

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।।१८.६५।।
सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।।१८.६६।।

अर्थ :- माझ्यातच मन ठेव अर्थात् सिद्धयोगसाधन कर. माझेच भजन कर अर्थात् सिद्धयोगसाधन कर. नमस्कुरु अर्थात् ॐकाराचे साधन कर. जे श्रीगुरुवक्त्रगम्य आहे ते सत्य मी तुला सांगत आहे की, तू माझाच

होशील. मी प्रतिज्ञा करून सांगत आहे; कारण की, तू मला प्रिय आहेस.

कोठेही आसक्तिपूर्वक पाहू नकोस. तू केवळ आत्म्यामध्ये मन ठेवून श्रीसद्गुरुवाक्याच्या द्वारा प्राप्त करून घेतलेले साधन करीत राहा. ॐ हे स्मरण करीत राहा. हे साधन करता करता अन्य दिशेला आसक्तिपूर्वक दृष्टी करण्यापासून मी तुला मुक्त करीन. याचाच अर्थ असा आहे की, साधकाची दृष्टी साधनेच्या परावस्थेत अन्यत्र कोठेही जात नाही. यासाठी तू कसलीही चिंता करू नकोस.

श्रीमहेश्वरानंद यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या प्रस्तुत ग्रंथाच्या उपसंहारात वेगळ्या प्रकाराने उपरोक्त अर्थच अभिव्यक्त केला आहे.

व्युत्पत्तिप्रकार

या ग्रंथात शब्दांचा अर्थ प्रकट करताना ग्रंथकारांनी स्पष्ट प्रतिपत्तीसाठी व्युत्पत्तीचा मार्ग अवलंबिला आहे. येथे ग्रंथातील काही व्युत्पत्ती दाखविल्या आहेत.

गुरुः :-"गृणाति प्रकाशयति विश्वव्यवहारम्।" अर्थात् "जो विश्वातील व्यवहाराचे प्रकाशन करतो तो श्रीसद्गुरू होय." या निरुक्तीनुसार श्रीसद्गुरू सर्वानुग्राहक होत. तशा प्रकारच्या प्रकाशाशिवाय विश्वाला अंधत्व व बधिरता येण्याची आपत्ती येईल आणि ते श्रीसद्गुरू म्हणजे श्रीपरमशिवभट्टारकच होत. तेच स्वात्मरूप महान् प्रमाता आहेत. "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात याविषयीचे "**गुरुरुपायः।।२.६।।**" अर्थात् "श्रीसद्गुरू हेच उपाय आहेत," असे सूत्र आहे.

चरणौ :- ज्ञान व क्रिया हे चरणांचे लक्षण आहे. हे चरण स्वातंत्र्याचे चरण करवितात म्हणजे स्वातंत्र्य जाणवून देतात, प्राप्त करवून देतात व बोध करवून देतात. त्यांच्या साहाय्याने विश्वाचे भक्षण करता येते. त्यामुळे त्यांना चरण असे म्हणतात. येथे कुब्जिकामताचा आधार घेऊन ही निरुक्ती सांगितली आहे.

पुरुषः :- शरीराच्या पुरात राहतो तो पुरुष होय. पुरांचे म्हणजे शरीरांचे अर्थात् स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण किंवा लिंग देहांचे दहन करतो म्हणजे देहात्मभाव छिन्नभिन्न करतो तो पुरुष होय.

बुद्धिप्राणशरीराख्ये यदेतस्मिन् पुरत्रये।
अहङ्काराद् वसत्यात्मा तेनायं पुरुषः स्मृतः।।
एतत् पुरत्रयं दग्धं येन स त्रिपुरान्तकः।

स एव पुरुषः प्रोक्तः स्मरारिरपि स स्मृतः।।

अर्थ :- बुद्धी, प्राण व शरीर नावाच्या या त्रिपुरात आत्मा अहंकाराने राहत असतो. त्यामुळे त्याला "पुरुष" असे म्हटले आहे. हे पुरत्रय ज्याने जाळले आहे त्याला "त्रिपुरांतक" असे म्हणतात. त्यालाच पुरुष असे म्हटले असून "स्मरारि" सुद्धा त्यालाच म्हणतात.

आलोकः :- आसमंतापासून लोकन म्हणजे बघणे अर्थात् साकल्याने स्वांतःकरणाचे चर्वणचातुर्य होय. ज्यावेळी हे चातुर्य तुटून विस्कळीत होते त्यावेळी ब्राह्यभावांच्या स्वभावावर साधकभक्तयोगिशिष्य नियंत्रण मिळवून त्यांच्या पार जातो.

वीर्यम् :- वीराशी संवंधित असणारे ते धर्म म्हणजे वीर्य होय.

गणपतिः :- **"गण्यते"** उ भोगरूप उल्लासांना मोजतो म्हणजे गणना करतो तो गण होय. **"तं पाति"** उ त्यांचे रक्षण करतो तो गणपती होय. अशा रीतीच्या प्रक्रियेमुळे हा निरुक्तिप्रकार अत्यंत सुखकारक आहे.

खेचरी :- बोधरूप प्रमात्यात संचार करते अर्थात् फिरते ती खेचरी होय.

दिक्चरी :- दिशांमध्ये म्हणजेच अंतःकरणात संचार करते ती दिक्चरी होय.

गोचरी :- गोषु म्हणजेच बाह्य इंद्रियांमध्ये संचार करते ती गोचरी होय.

भूचरी :- भूमध्ये म्हणजेच विषयभूमींमध्ये संचार करते ती भूचरी होय.

मूर्तिः :- मूर्च्छना अर्थात् आत्मस्वरूप विस्मृता म्हणजे आत्मस्वरूपाच्या विस्मृतीमुळे व बहिर्मुख वृत्तीने प्राप्त झालेल्या संसाराच्या मोहरूपामुळे किंवा समुच्छ्रयणरूपामुळे अर्थात् उसळण्यामुळे मूर्तित्व होय.

पुष्पम् :- स्वभावाचे पोषण करतात म्हणून पुष्पे होत.

मन्त्राः :- मनन म्हणजे विचार व प्राण म्हणजे रक्षण या धर्मांचा असणारा तो मंत्र होय. अशी व्युत्पत्ती आम्नायात आलेली आहे.

जपः :- जनन म्हणजे जन्म आणि पालन या स्वभावामुळे जप असे म्हणतात.

मुद्रा :- मुद म्हणजे आनंद, राति अर्थात् देणारी ती मुद्रा होय.

होमः :- चेतनारूप पळीने मनासह हवन केले जाते तो होम होय.

निष्कलम् :- "निष्कल"मधला कला हा शब्द "कलयति" अर्थात् परिमितप्रमाणात बाहेर परिच्छिन्न करते अर्थात् झाकून टाकते या व्युत्पत्ती-

नुसार कला म्हणजे माया होय.

कुम्भः :- कुम्भयति अर्थात् अव्याकुलाचे म्हणजेच स्थिर चित्ताचे अवस्थापन करतो या व्युत्पत्तीनुसार प्रतिष्ठा करण्याला कारणीभूत होणारा आधार विशेष होय.

देशना :- येथे देश म्हणजेच देशना होय. आत्म्याची आठवण करवून देण्याच्या रहस्यरूप अर्थाच्या उपदेशाने युक्त असा याचा स्वभाव असतो. अशा व्युत्पत्तीप्रमाणे श्रीसद्गुरुनाथांच्या शरीरात प्रविष्ट झालेले श्रीपरमेश्वरच कारुण्यामुळे ज्याचे प्रमातृरूप किंवा जीवरूप अवच्छिन्न झालेले अर्थात् संपावयाला किंवा तुटावयाला आलेले आहे अशा शिष्याला तारून नेतात. श्रीसद्गुरूंना शिष्याला उद्धरून नेण्याची उद्भावना होते. याविषयी आगमात असे म्हटले आहे की -

कुलाचार्यमधिष्ठाय देवो दीक्षयिता शिवः।

अर्थ :- कुलाचार्यपदावर अधिष्ठित होऊन श्रीशिवच दीक्षा देणारे होतात.

भैरवः :- श्रीभैरव या शब्दाच्या खालील सहा व्युत्पत्ती आहेत.

(१) भीरवः :- म्हणजे संसाराने चकित झालेल्या प्राण्यांना अभय प्रदान करणाऱ्यांचे आप्त म्हणजे श्रीभैरव होत.

(२) भीः :- म्हणजे संसाराने भयभीत होणाऱ्यांचे निबंधन करणारे व **रवः** म्हणजे प्राण्यांचे आक्रंदन होय. त्यांचे प्रवर्तक म्हणजे श्रीभैरव होत.

(३) भियं :- म्हणजे पशुसंबंधित होय. त्याला उद्देशून **रवण** म्हणजेच जो आवाज त्या स्वभावाच्या माहेश्वर्यादि वर्गाधिष्ठात्री देवतांचे स्वामी म्हणजे श्रीभैरव होत.

(४) भवः :- लोकसंबंधित भयाचा रौति म्हणजे नाश करतो म्हणजेच देण्याच्या दृष्टीने ज्ञान देतो म्हणून किंवा भीरु अर्थात् मृत्युकालादींना अवच्छिन्न केलेला भयंकर वर्ग होय. त्याच्याहूनही हे श्रीभैरव भयंकर होत.

(५) भानि :- म्हणजेच नक्षत्रांनी उपलक्षित केलेल्या चंद्रसूर्यादि ज्योतींना प्रेरणा देणारे होत.

(६) भेरः :- म्हणजे काल होय. त्या कालाचे शोषण करतात ते श्रीभैरव होत. महाकालयोग्यांचे हे अधिष्ठाते होत.

विश्वाचे भरण, रमण व वसन यांचे प्रायोजक किंवा दाते म्हणजे श्रीभैरव होत. याविषयी श्रीक्षेमराजांनी असे म्हटले आहे की -

भीरूणामभयप्रदो भवभयाक्रन्दस्य हेतुस्ततो

हृद्धाम्नि प्रथितश्च भीरवरुचामीशोऽन्तकस्यान्तकः।
भेरं वायति यः सुयोगिनिवहस्तस्य प्रभुर्भैरवः।
विश्वस्मिन् भरणादिकृत् विजयते विज्ञानरूपः शिवः।।

अर्थ :- भयभीतांना अभय देणारे, भव म्हणजे संसारभयाच्या आक्रंदाचा हेतू किंवा कारण असणारे, हृदयरूप धामात म्हणजे घरात पसरलेल्या भीरवरुचेचा ईश्वर असणारे, कालाचाही शेवट असणारे व सुयोगिसमूहांचे श्रीभैरव असणारे तेच विज्ञानरूप श्रीशिव आहेत. त्यांचा विजय असो.

देवः :- देव हा शब्द दिव् या धातूपासून बनला असून त्याचे क्रीडा व विजिगिषा अर्थात् जिंकण्याची इच्छा इत्यादि खालीलप्रमाणे अनेक अर्थ आहेत.

(१) क्रिडा :- हेय म्हणजे त्याज्य व उपादेय म्हणजे स्वीकार्य आदि विकल्पांच्या विमुखतेने म्हणजेच विकल्पांना विमुख करून स्वसंविदशी एकघन किंवा एकरस होऊन होणारे उच्चलन अर्थात् वरच्या दिशेने चालन म्हणजे "**क्रीडा**" होय.

(२) विजिगीषा :- सर्वोत्कर्षाने विद्यमान राहण्यासाठीची उत्सुकता म्हणजे "**विजिगीषा**" होय.

(३) व्यवहार :- निर्विकल्प अशा आत्म्यात विकल्पप्रथेचा परामर्श किंवा विचार म्हणजे "**व्यवहार**" होय.

(४) द्युती :- अवभास्य अशा सर्व प्रपंचाच्या अवभासाशिवाय असणारी स्वयंप्रकाशता म्हणजे "**द्युती**" होय.

(५) स्तुती :- स्वरूपलाभापासून आरंभ करून सर्वाम्नायप्रवृत्तीत शेवट करणे म्हणजेच "**स्तुती**" होय.

(६) गती :- सृष्ट्यादि कृत्यांमध्ये इच्छाक्रियात्मक तीनही शक्तींचा अंगीकार म्हणजे "**गती**" होय.

संप्रदायानुसार निरुक्तीचे शोधन करावे. असे या व्युत्पत्तीच्या प्रकारात श्रीमहेश्वरानंदांचे मत आहे.

त्या विषयी श्रीमहेश्वरानंद यांनी असे म्हटले आहे की -

नैश्चिन्त्योत्कटमुच्चलन्नभिलषन् सर्वोत्तरं वर्तितुम्।
स्वस्मिन् भेदमभेदितेऽपि विमृशन् स्वात्माविशेषं स्फुरन्।।
अर्थानामुदयव्ययप्रकृतिभूरुच्छ्रायवान् इच्छया।
देवो दृक्क्रिययोः प्रदीप्तमहिमा भावेषु वो दीव्यतु।।

अर्थ :- उत्कट निश्चिततेला उच्चलित करून, सर्वांच्या वरती अथवा

पलीकडे जाण्याची इच्छा करीत, अभिन्न अशा आत्म्यामध्ये भेदाचा विचार करीत अविशिष्ट स्वात्म्याने स्फुरण पावत इच्छेने अर्थाचा उदय व व्यय यांची प्रकृतिभूतत्वाने उच्छ्रायित म्हणजे उभारणी (व संहारणी) करणारा हा अत्यंत तेजस्वी महिमा असणारा देव दृश्य व क्रिया यांच्या भावांमध्ये तुम्हाला प्रकाशित होवो.

उपोद्घात

लेखक :- श्रीव्रजवल्लभ द्विवेदी

"महार्थमंजरी" या ग्रंथात प्रतिपादन केलेला क्रमदर्शनाचा इतिहास

श्रीमहेश्वरानंदांनी महार्थमंजरी आणि परिमल टीकेत महार्थ म्हणजे औत्तराम्नाय, अनुत्तराम्नाय व क्रमसरणी आदि नावांनी क्रमदर्शन स्पष्ट केले आहे. हे क्रमदर्शन प्रामुख्याने त्रिकदर्शनाचे अनुसरण करते असे ते स्वतःच म्हणतात. "**श्रीमहार्थत्रिकदर्शनयोर्नात्यन्तं भेदप्रथा।**" अर्थात् "श्रीमहार्थ आणि त्रिकदर्शन यांच्यात फारसा भेद नाही. कौलदर्शनाहूनही हे दर्शन फारसे विलक्षण किंवा वेगळे नाही. यासंबंधी त्यांनीच असे म्हटले आहे की -

अस्यामर्थस्थितिः सैव या सर्वत्र कुलागमे।
किन्तु शब्दस्य शय्यान्या नात्यन्तं सा विभिद्यते।।

अर्थ :- जी कुलागमात सर्वत्र अर्थस्थिती आहे तीच येथेही आहे. फक्त शब्दांचा वेगळेपणा आहे अर्थात् फारसा भेद नाही.

मतदर्शनाची येथे फारशी चर्चा केलेली नाही, तथापि श्रीमहेश्वरानंदांचे परमगुरू श्रीशिवानंद उर्फ श्रीमतेश यांनी श्रीशंभुनिर्णयाचे व्याख्यान केले आहे. ठिकठिकाणी मतशास्त्र व मतोत्तर प्रभृति ग्रंथांचा उल्लेख केलेला आढळतो. याच ग्रंथात असे म्हटले आहे की -

वेदाच्छैवं ततो दक्षं ततो वामं ततः कुलम्।
ततो मतं ततश्चापि त्रिकं सर्वोत्तमं मतम्।।

अर्थ :- वेदाहून शैवदर्शन, शैवाहून दक्ष, दक्षाहून वाम, वामाहून कुल, कुलाहून मत आणि त्यासर्वांपेक्षाही त्रिकदर्शन सर्वोत्तम मानले आहे.

"**श्रीपरात्रिंशिका**" या ग्रंथावरच्या टीकेत श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांनी उद्धृत केलेल्या या वचनात कुल आणि त्रिक यांच्यामध्ये मतदर्शनाचे स्थान दिसून येते. अशा प्रकारे क्रम, मत, कुल व त्रिक या दर्शनांमध्ये फारसा फरक नसून उपासना करण्याच्या विधींमध्येच काय तो फरक आहे असे आपण म्हणू शकतो. येथे मतदर्शनातील उपासनाविधी ग्रंथ उपलब्ध नसल्यामुळे हे स्पष्ट करणे शक्य नाही. "**कुब्जिकामत, मतशास्त्र, मतोत्तर व**

मतेश" इत्यादि ग्रंथांचे प्रकाशन होताना तो उपासनाविधी मिळेल असे वाटते. दक्षिणस्रोतांकडून प्रवृत्त झालेल्या चौसष्ट भैरवागमात देव श्रीभैरव हे वक्ता आणि हिमगिरितनया श्रीपार्वतीदेवी या श्रोत्याच्या रूपात समुपस्थित आहेत. हेच कुलागमांमध्येही दिसून येते. औत्तराम्नायादि क्रमदर्शनात भगवती श्रीकाली ही वक्ता व श्रीशिव हे श्रोता आहेत. क्रमसद्भावादि शास्त्रांमधल्या उद्धृत केलेल्या वचनांमधून हे पाहता येते. श्रीभैरवागम हे दक्षनय असून औत्तरागम, देव्यागम, ऊर्ध्वाम्नायादि कुलागम हे वामनय आहेत. दक्षिणाचार व वामाचार हे शब्द सांप्रत जो अर्थ व्यक्त करतात त्या अर्थाने हे शब्द येथे प्रयुक्त केलेले नाहीत. केवळ यांचा दक्षिण व वाम मुखोद्गततत्वाने प्रयुक्त केलेला भेद त्यावेळेला अस्तित्वात होता. पूजासाधनांमध्ये मात्र फारसा भेद नाही हे त्या त्या शास्त्रांचे अवलोकन करून सांगता येते. त्रिकदर्शन हे सिद्धान्त नावाने प्रसिद्ध असलेल्या शैवागमातील आणि क्रम व कुलदर्शनांमधील श्रीशिवाद्वैतसिद्धान्त प्रतिपादण्याच्या एकमेव ध्येयाने एकत्र करून प्रवर्तित झाले आहे. (सिद्धान्त हा शब्द पंकजादिशब्दांप्रमाणे योगरूढाने श्रीशिवांनी प्रणीत केलेल्या कामिकादि अठरा तंत्रांमधून प्रसिद्ध आहे. असे "**श्रीरत्न-त्रयोल्लेखिनी**" या ग्रंथामध्ये श्रीअघोरशिवाचार्य यांनी म्हटले आहे.) येथे शैवागमातील सिद्धान्त आणवोपाय म्हणून, क्रमदर्शनातील सिद्धान्त शाक्तोपाय म्हणून व कुलागमातील सिद्धान्त शांभवोपाय म्हणून स्वीकारून अनुपाय नावाचा चौथा उपायही वर्णिला आहे. आगमदर्शनाला येथेच सर्वोत्तम उत्कर्ष प्राप्त झाला. आताची श्रीशिवानंदमहेश्वरानंदप्रभृतींची परंपरा त्रिकदर्शनातूनच निघाली आहे असे दिसून येते.

या शास्त्रातही अनेक भेद दिसतात का? असा प्रश्न उत्पन्न झाल्यास ते बाहुल्याने उपासना पद्धतीतच दिसून येतात असे म्हणावे लागेल. क्रम, मत, कुल व त्रिक ही दर्शने अद्वैतवादी आहेत. यांच्या शास्त्रात खूप वाङ्मय आहे. त्याचा आपल्याला येथे समाचार घ्यावयाचा नाही. केवळ प्रासंगिक विषयांचेच येथे अवलोकन करावयाचे आहे. त्रिपुराविद्या ही चारही आम्नायांमध्ये येऊनही ती दक्षिणतंत्रांची पक्षपाती आहे. असे श्रीविद्यानंद म्हणतात. (अर्थ पृ.४१) या अर्थाशी श्रीअमृतानंदही (यो. दी. पृ.११०) सहमत आहेत. "**दक्षिण-पक्षपातिनि**" पदाने या विद्येचे श्रीभैरवानुगमानुवर्तित्व दिसून येते. त्रिपुरोपासना प्रतिपादन करणाऱ्या "**श्रीनित्याषोडशिकार्णव**" ग्रंथात तीन ही संख्या प्रतिपादित केली आहे. त्यांचा संग्रह श्रीलघुभट्टारकांनी एकाच श्लोकात

पुढीलप्रमाणे केला आहे.

देवानां त्रितयं त्रयी हुतभुजां शक्तित्रयं त्रिस्वरा-
स्त्रैलोक्यं त्रिपदी त्रिपुष्करमथ त्रिब्रह्म वर्णास्त्रयः।
यत्किञ्चिज्जगति नियमितं वस्तु त्रिवर्गात्मकं
तत्सर्वं त्रिपुरेति नाम भगवत्यन्वेति ते तत्त्वतः।। (श्लोक ९)

अर्थ :- तीन देव म्हणजे ब्रह्मा विष्णू व महेश होत. तीन अग्नी म्हणजे दक्षिण, गार्हपत्य व आहवनीय होत. तीन शक्ती म्हणजे इच्छा, ज्ञान व क्रिया होत. तीन स्वर म्हणजे ह्रस्व, दीर्घ व प्लुत किंवा उदात्त, अनुदात्त व स्वर होत. तीन लोक म्हणजे स्वर्ग, पृथ्वी व पाताळ होत. त्रिपदी म्हणजे गायत्रीची तीन पदे होत. त्रिपुष्कर, त्रिब्रह्म, तीन वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य होत. अशा रीतीने जगामध्ये ज्या ज्या तीन या संख्येने नियमित केलेल्या त्रिवर्गात्मक वस्तू आहेत त्या सर्व भगवती त्रिपुरा या नावाने प्रसिद्ध असून त्यांचे तत्त्वतः शोधन करावे.

हे पदार्थ "**श्रीनित्याषोडशिकार्णव**" या ग्रंथातील चतुर्थ पटलातील पहिल्या वीस श्लोकांच्या वचनात आणि अन्यत्र उल्लेखिलेले आहेत. कौल-दर्शनात पिंड, पद, रूप व रूपातीत हे चार पदार्थ सांगितले आहेत. यानुसारच श्रीशिवानंदानी "**श्रीऋजुविमर्शिनी**" आणि श्रीअमृतानंदांनी "**श्रीयोगिनी-हृदय,**" "**श्रीसौभाग्यसुधोदय**" इत्यादि ग्रंथांमध्ये अनाख्य नावाचे चौथे तत्त्व स्वीकारून चार तत्त्वे प्रतिपादन करणारे त्रैपुर तंत्र प्रतिपादिले आहे. "**श्रीअर्थरत्नावली**" या ग्रंथात श्रीविद्यानंदांनी संकेत पद्धतीचे अनुसरण करून पीठपंचकाचे, वामादिपंचकाचे, इच्छादिपंचकाचे, अकारहकारपंचकाचे, हत-अनाहतांच्या पलीकडच्या नादांचे व अनिकेतरसत्रितयादिपदांचे व्याख्यान क्रमदर्शनातील सिद्धान्तांनुसार केले आहे. "**श्रीत्रिपुरसुंदरीदंडक**" या ग्रंथात "**सुस्फुटं वाममार्गस्य सर्वोत्तमत्वं समुपदिशता।**" अर्थात् "वाममार्गाचे सुस्पष्टपणे सर्वोत्तमत्व उपदेशिलेले आहे" असे सांगणाऱ्या श्रीदीपकनाथ-सिद्धांनी त्रिपुराविद्या ही वाममार्गाकडे झुकणारी आहे असे सांगितले आहे. अशा प्रकारे एकाच त्रिपुरेच्या उपासनेत व्याख्यान करणाऱ्याच्या भेदाने दृष्टिभेद आणि विधिभेद दिसून येतात. श्रीमहार्थमंजरीकारांनी या ग्रंथात स्वात्मदेवताच उपास्यदेवता म्हणून क्रममार्गाला अनुसरून सांगितली आहे. ही स्वात्मदेवता म्हणजे "**श्रीतंत्रराज**" या ग्रंथातील "**स्वात्मैव देवता प्रोक्ता ललिता विश्वविग्रहा**" अर्थात् "स्वात्मा म्हणजेच विश्वाकार अशी

ललितादेवी सांगितली आहे." या वचनाप्रमाणे ललिता भगवती श्रीत्रिपरसुंदरी होय. येथेच देवतास्वरूपाचे प्रतिपादन करणाऱ्या श्रीमहार्थमंजरीपरिमल ग्रंथाचा विनियोग दिसून येतो. या स्वात्मदेवतेच्या पूजाविधींचे प्रदर्शन करण्याच्या हेतूनेच येथे सर्वत्र महार्थ सांगितलेला आहे.

क्रम, कुल व त्रिकदर्शनांची समष्टी असेलले हे श्रीमहार्थमंजरी नावाचे महान् तंत्र आहे. येथे आलेले काही विशिष्ट सांस्कृतिक आणि दार्शनिक विषय यांचे विवेचन पुढे करण्यात येत आहे.

श्रौतस्मार्तादि शास्त्रांचे अवरत्व

श्रौतस्मार्तादि शास्त्रांना येथे "बाह्याम्नाय" या नावाने ओळखले जाते. श्रीशांकराद्वैतदर्शन हे मायावेदान्त, पाशवेदान्त, बाह्याद्वैतसिद्धान्त, पाशव-शास्त्र आदि पदांनी उल्लेखिलेले आहे. याचे समर्थन **"वेदाच्छैवं ततो वामम्"** अर्थात् "वेदांपेक्षा शैव व शैवांपेक्षा वामदर्शन श्रेष्ठ आहे," या **"श्रीपरा-त्रिंशिका"** ग्रंथातील व्याख्येतील वचनाने **"सर्वेभ्योश्चोत्तमा वेदा वेदेभ्यो वैष्णवं परम्।"** अर्थात् "सर्वांपेक्षा वेद उत्तम असून वेदांपेक्षा वैष्णवदर्शन श्रेष्ठ आहे." या कुलार्णव वचनाने होते. त्यामुळेच ते असे म्हणतात की, श्रुतिस्मृतींपेक्षाही या तंत्राचे प्रामाण्य उच्च आहे. वर्णाश्रमादि व्यवस्थेनुसार प्रकाशित होणाऱ्या व्यवहाराला श्रीमहेश्वरानंदांनी "पाशप्ररोह" असे म्हटले आहे. त्यांनी ब्राह्मण-चांडालादि वर्णांची व्यवस्था त्यागली असल्याने ते असे म्हणतात की -

घृणा शङ्काभयं लज्जा जुगुप्सा चेति पञ्चमी।
कुलं जातिश्च शीलं चेत्यष्टौ पाशाः प्रकीर्तिताः।।

अर्थ :- घृणा, शंका अर्थात् संशय, लज्जा, निंदा, कुल, जाती व शील हे आठ पाश सांगितले आहेत.

हे पाश स्वतः होऊनच किंवा आपोआपच नाहीसे होतात, असेही त्यांनी सांगितले आहे.

हे वचन **"श्रीस्वच्छंदतंत्र"** या ग्रंथातील खालील वचनांनुसार आहे.

ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः शूद्राश्चान्येऽथवा प्रिये।
सर्वे ते समधर्माणः शिवधर्मे नियोजिताः।।१।।
एकैव सा स्मृता जातिर्भैरवीया शिवाव्यया।
तन्त्रमेतत् समाश्रित्य प्राग्जातिं नह्युदीरयेत्।।२।।
प्राग्जात्युदीरणाद् देवि प्रायश्चित्ती भवेन्नरः।

अविवेकी भवेत्तस्माद्य इच्छेदुत्तमां गतिम्।।३।।

अर्थ :- ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य अथवा शूद्र हे श्रीशिवधर्मात आल्यानंतर समधर्माचे अर्थात् एकाच जातीचे असतात.।।१।।

या श्रीशिवधर्मात श्रीशिवाव्यय श्रीभैरवीय ही एकच जात सांगितली आहे. या तंत्राचा आश्रय घेऊन प्राग्जातीचे उदीरण म्हणजे पूर्वीच्या जातींचा उच्चार करू नये.।।२।।

प्राग्जातींचे उदीकरण म्हणजे पूर्वीच्या जातींचा उच्चार केल्यामुळे मानवाला प्रायश्चित्त घ्यावे लागते. त्यामुळे जो उत्तम गतीची इच्छा करतो तो अविवेकी होतो.।।३।।(४.५४०.४६)

विधिनिषेधव्यवस्था

त्यामुळेच श्रीमहार्थमंजरीकार वैदिक आचारांचेही समालोचन करतात; मात्र त्याचे सर्वार्थाने अनुसरण करीत नाहीत. त्याचप्रमाणे सातव्या गाथेच्या व्याख्यानात ते असे म्हणतात की, "संध्योपासनादींमध्ये विधी सांगतात आणि कलंजभक्षणादींमध्ये निषेध म्हणून सांगतात. मग त्या विधिनिषेधात ज्ञान झाल्यामुळे लोक प्रवृत्त निवृत्त होतात का तदनुकूल इच्छाही आवश्यक आहे? जर केवळ ज्ञानानेच प्रवृत्ती अथवा निवृत्ती होते असे मानले तर संध्या न करणारा आणि कलंज भक्षण करणारा कोठेही दिसून येत नाही. जर स्वेच्छा प्रवृत्तिनिवृत्तीसाठी कारणीभूत होत असेल तर अनुष्ठान करणाऱ्यांची रुचीच विधिनिषेधात प्रवृत्त होते असा अर्थ होतो. जेथे संध्यादिकांची आवड तेथे विधी आणि जेथे कलंजभक्षणादींमध्ये नावड निर्माण झाली तर तेथे निषेध होईल आणि कलंजभक्षणादींमध्ये आवड निर्माण झाली तर तेथे विधी अशी स्थिती येईल. हा सिद्धान्त "**श्रीसंवित्प्रकाश**" या ग्रंथातील खालील श्लोकाने प्रमाणित केला आहे.

त्यागः शक्यक्रियो यस्य स हेय इति निश्चिता।
त्यक्तुं न शक्यते यच्च तदुपादेयमित्यपि।।

अर्थ :- ज्या गोष्टींचा त्याग करणे शक्य आहे ते हेय म्हणून निश्चित केले असून ज्याचा त्याग करणे शक्य नाही ते उपादेय म्हणून निश्चित केले आहे.

ख्यातिस्वरूप

ख्याती हा शब्द सामान्यपणे "प्रसिद्धी" या अर्थाने वापरला जातो; परंतु एका धातूचे अनेक अर्थ असल्याकारणाने भारतीय दर्शनात तो भ्रांतिबोधक या अर्थाने वापरला आहे. जडचेतनात्मक असे हे जगत् पाहून मनात अशी

जिज्ञासा उत्पन्न होते की, या जगताचे कारण काय असावे? या जिज्ञासेचे समाधान करण्यासाठीच सर्व दर्शनशास्त्रे प्रवृत्त होत किंवा झाली आहेत. दार्शनिकांच्यामध्ये जडचेतनात्मक कार्य आणि कारणांच्या स्वरूपाचे प्रतिपादन करण्यामध्ये मतभेद आहे. भारतीय दर्शनांमध्ये हा मतभेद "ख्याति" हा शब्द चांगल्या प्रकारे व्यक्त करतो. या ख्यातीची सहा प्रकारे व्याख्या केली जाते. विज्ञानाद्वैतवादी योगाचार (संप्रदाय) हा आत्मख्यातीचे समर्थन करणारा आहे. शून्यवादी माध्यमिक असत्ख्यातीविषयी सांगतात. प्राभाकर अख्यातीबद्दल बोलतात; तर नैयायिक अन्यथाख्यातीचे समर्थन करणारे आहेत. ब्रह्माद्वैतवादी शांकर अनिर्वचनीय नावाची ख्याती स्वीकारतात. रामानुजादि वैष्णव दार्शनिक सत्ख्यातीचा अंगिकार करतात. त्यापैकी आत्मख्याती म्हणजे आत्म्याच्या विशेष ज्ञानाचा विषयरूपाने होणारा प्रतिभास होय. हे रजत अर्थात् चांदी आहे अशा प्रकारचे विज्ञानच रजतरूपाने प्रकाशित होते. तेथे अन्य विषयाची अपेक्षा नाही. "हा घट आहे" इत्यादींमध्ये सर्वत्र विज्ञानाचाच विषयाच्या आकारात उल्लेख संभवत असल्याकारणाने येथेही त्याचेच औचित्य आहे असे विज्ञानाद्वैतवादी बौद्ध म्हणतात. असत्ख्याती म्हणजे असत् अशा रजतादींचा अनुभव होय असे शून्याद्वैतवादी माध्यमिक बौद्ध म्हणतात. अख्याती म्हणजे ज्याची ख्याती अर्थात् प्रतीती म्हणजेच अनुभव येत नाही अशी गोष्ट होय. शिंपला आणि चांदी यांच्या ठिकाणी हे रजत् आहे या ठिकाणी इदमंशच अर्थात् हा अंश प्रतीतीचा अथवा अनुभवाचा विषय आहे, रजतांश हा अनुभवाचा विषय नाही; कारण इदमंश हा डोळ्याला जास्त जवळचा आहे, रजत हे स्मृतींमधल्या आकाराचे दर्शन होय असे प्राभाकरांचे मत आहे. श्रीअभिनवगुप्तपादाचार्य या अख्यातीचाच स्वीकार करतात. त्याचप्रमाणे **"यावता पूर्णेन रूपेणं प्रख्यातव्यं विमर्शपर्यन्तं तावन्न प्रख्यातीत्यपूर्णख्यातिरूपाऽख्यातिरेव भ्रान्तितत्त्वम्।। ईश्वरप्रत्यभिज्ञा विमर्शिनी।२।२।१३।।"** अर्थात् "जोपर्यंत पूर्ण रूपाने विमर्शापर्यंत सांगितले जात नाही अर्थात् पूर्ण ज्ञान दिले जात नाही तोपर्यंत ती अपूर्णख्यातिरूप अख्याती असून तोच भ्रम आहे." अन्यथाख्याती म्हणजे अन्याची अन्यरूपाने प्रतीती किंवा अनुभव येणे होय. अन्यदेशकालात असणारे रजत त्याच्या विरुद्ध अन्यदेशकालात असल्याने संस्कारांमुळे शिंपल्याशी युक्त होऊन दोषांनी भरल्या गेलेल्या इंद्रियाने शिंपला म्हणून ग्रहण केले जाते, असे अन्यथाख्यातिवादी नैयायिकांचे म्हणणे आहे. जर सर्व ठिकाणी केवळ

संसर्गच असत् म्हणून अवभासित होतो तर संसर्गी हे सत् (विद्यमान) म्हणून अवभासित होतात. ही विपरीतख्याती आहे असे मीमांसकांचे म्हणणे आहे. "शिंपला चांदी म्हणून वाटतो त्यावेळेसही विद्यमान असणारी रजतत्वजाती विद्यमान असणाऱ्या शिंपल्यांच्या तुकड्यांचे अस्तित्व नसतानाही आत्मत्वाने जाणले जाते," अशी भाट्टमीमांसकांनी प्रतिपादित केलेली विपरीतख्याती ही अन्यथाख्यातीहून फारशी वेगळी नसून सदसत्ख्याती म्हणूनही ओळखली जाते. अनिर्वचनीयख्याती म्हणजे सत्त्वाने आणि असत्त्वाने अनिर्वचनीय अशा रजतादींची ख्याती म्हणजेच प्रतीती किंवा अनुभव होय. शिंपला व रजत म्हणजे चांदी यांच्या ठिकाणी शिंपल्याच्या अज्ञानाचा परिणाम म्हणून सत् व असत् अर्थात् आहे व नाही अशा अवस्थेतून अनिर्वचनीय व अपूर्व असे रजत किंवा चांदी निर्माण होते. प्रपंचाचेही अनादि अविद्येमुळे अनिर्वचनीयत्व आहे असे ब्रह्माद्वैतवादी श्रीशांकरमतवादी सांगतात. सत्ख्याती म्हणजे ज्ञान-विषयाचे सत्यत्व होय. जर असे असेल तर तेथे भ्रम कसा काय होतो? या प्रश्नाचे उत्तर देताना रामानुजीय असे म्हणतात की, विषयव्यवहाराचा बाध होत असल्यामुळे तेथे भ्रमत्व निर्माण होते. अशा प्रकारे या सर्व दर्शनांमधून ख्यातिवादाच्या मिषाने कारण व कार्य यांच्याविषयीची प्रत्येकाची आपापली विशिष्ट दृष्टीच दिसून येते.

या ग्रंथात श्रीमहेश्वरानंदांनी श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांप्रमाणेच अख्याति-वादाचा अवलंब केला आहे. त्या दोघांनाही परंपरेनुसार अख्यातिवादच संमत होता. हे पुढील काही उद्धरणांवरून आपल्याला दिसून येईल. "**ख्याति-मपूर्णाम्**" (श्लोक ५२) हे "**विरुपाक्षपंचाशिका**" या ग्रंथातील वचन, "**अख्यातिर्यदि**" हे "**प्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथातील श्रीक्षेमराजांचे वचन उद्धृत करून अपूर्णताख्यातिरूप अख्यातीचाच स्वीकार केला आहे. पुढे अपूर्णताख्याती हा आणवमलाचा व्यापार आहे असे सांगून भेदवादखंडन करताना अख्यातिवादाचे स्मरण केले आहे. निष्कल या शब्दावर व्याख्यान करताना कला या शब्दाची स्वात्मअपूर्णख्याती हेच लक्षण असणारा स्वीयसंकोचशील म्हणून व्याख्या केली आहे.

तांत्रिकदर्शन हे श्रीसद्‌गुरुमतानुसार चालणारे आहे

केवळ अख्यातिवादाच्या प्रसंगीच नाही तर संवित्स्वरूपाची व्याख्या करीत असताना विश्वव्यवहार, ज्ञातृज्ञेयज्ञानरूप त्रिपुटीचा स्वीकार व अन्विता-

भिधानवादाचा स्वीकार या सर्व विवेचनाप्रसंगी श्रीमहेश्वरानंदांनी प्राभाकरदर्शनाचे समर्थन केले आहे. श्रीमहेश्वरानंद हे भगवत्संवित्च योग्य आहे असे म्हणून श्रीसद्गुरुमतमर्यादेचा स्वीकार करतात. याचे वैशिष्ट्य असे आहे की, तांत्रिकांनी संवित्ची व्याख्या प्राभाकरांप्रमाणे ज्ञान या शब्दाचा पर्याय म्हणूनच नव्हे; तर परतत्त्वाचे प्रतिपादन करणारी म्हणूनही केली आहे. त्यामुळेच श्रीशिवानंद याविषयी असे म्हणतात की, **"संविदेव भगवती स्वान्तः स्थितं जगद् बहिः प्रकाशयती दर्शनरहस्यम्।। (ऋजु विमर्शिनी. पृ. २७)"** अर्थात् "भगवती संविद्च आपल्या आत असणारे जग बाहेर प्रकाशित करते" हेच दर्शनरहस्य आहे. या संविद्विषयी **"प्रत्यभिज्ञाविमर्शिनी," "प्रत्यभिज्ञा-विवृत्ति" "विमर्शिनी"** इत्यादि ग्रंथांमध्ये श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांनी केलेले स्पष्टीकरण आलेले आहे. बऱ्याच मीमांसकांनीही संवित्चा स्वीकार केलेला होता. यामुळे काश्मीरात दार्शनिकांची विशेषतः मीमांसक आणि तांत्रिकांची एक विशिष्ट परंपरा दाखविली जाते. ही परंपरा बौद्ध दार्शनिकांशी स्पर्धा म्हणून विकसित झाली आणि तिचाच श्रीकुमारिलभट्टांनी पुढील श्लोकात उल्लेख केला आहे.

प्रायेणैव हि मीमांसा लोके लोकायतीकृता।।

अर्थ :- बहुधा मीमांसा लोकात किंवा संसारात लोकायत केली गेली.

न्यायरत्नाकरकार असे म्हणतात की, **"मीमांसा हि भर्तृमित्रा दिभिर-लोकायतैव सती लोकायतीकृता।"** अर्थात् "भर्तृमित्रादि अलोकायतां-कडूनच मीमांसा लोकायत केली गेली." प्राभाकरसिद्धान्त आणि काश्मीर तांत्रिक दर्शन त्याच परंपरेतून विकसित झाले असे वाटते. येथे एक नवीनच दृष्टी विकसित झाली आहे. याच दृष्टीने बौद्धदार्शनिकांनी मीमांसाप्रभृती दर्शनांतून समालोचन केले आहे. काश्मीरचे प्रत्यभिज्ञादर्शन हे शून्याद्वैतवादी, विज्ञानाद्वैतवादी, अनिर्वचनीयाद्वैतवादी आणि अन्य दार्शनिकांच्या सिद्धान्ताचे समालोचन करीत स्वातंत्र्याद्वैतवादाची प्रतिष्ठापना करण्याच्या उद्देशाने प्रवर्तित झाले आहे. ते प्रत्येक वेळेला स्पष्ट होईलच.

अन्विताभिधानवाद

एकाच भावाची स्वव्यतिरिक्त म्हणजे त्या भावाशिवाय अन्यभावयुक्तत्वाने स्थापना करीत असताना श्रीमहेश्वरानंद असे म्हणतात की, "यामुळे अभिहितान्वयवादापेक्षा अन्विताभिधानवाद उचित होय. "हा स्तंभ पाहा," या वाक्यात स्तंभपदार्थाशीच अन्वित असलेली किंवा जोडलेली दर्शनक्रिया

क्रियापदाने सांगितली आहे. त्याचप्रमाणे "पश्य" क्रियापदाशी स्तंभ हा कर्मकारकाने जोडला आहे. त्यामुळे नंतर सांगितलेल्या अर्थानुगुण्यानेच अन्वय होतो असे उत्पन्न होते." याचा भाव असा आहे की, सांगितलेल्या स्वस्ववृत्तीच्या पदांनी उपस्थापित केलेल्या अर्थांचा अन्वय म्हणजे अभिहितान्वय असे मानणाऱ्यांच्या भाट्टमीमांसकांच्या मते "घट करतो" येथे घटवृत्तीच्या कर्माला अनुकूल असा व्यापार किंवा कृती होय. त्यापैकी घट शब्दाचा घट हा अर्थ असून "अम्" प्रत्ययाचा कर्म हा अर्थ आहे. वृत्तिता ही कशाचीच नसते म्हणून वृत्तिता अपदार्थ आहे असे तात्पर्य निघाल्यामुळे यांचे संबंध संसर्गविधीने भासतात. आधी पदे एकमेकांशी अन्वित होऊन मग विशिष्ट अर्थ सांगतात असा सिद्धान्त मानणारे ते अन्विताभिधानवादी प्राभाकर होत. त्यांच्या मते पदार्थ हा वाच्य व अभिधेय असतो. तात्पर्य नावाच्या दुसऱ्या वृत्तीने बोध करवून देणारा असत नाही. त्याचप्रमाणे "देवदत्ता ! गाय आण," या उत्तमपुरुषाला उद्देशून केलेल्या प्रयोगानुसार शिंगे, आचळ असणाऱ्या प्राण्याला गाय आणावयाला सांगितलेल्या व्यक्तीकडे नेतो. त्या क्रियेने त्या वाक्याचे तोच अर्थ जाणवून देण्याच्या सामर्थ्याचे अनुमान करून नंतर "गाय ने, घोडा आण," या प्रयोगात गाय नेणे, घोडा आणणे, हे पाहून अन्वयव्यतिरेकाने क्रियापदार्थाशी जोडलेल्या कारकात कारकपदाची आणि कारकपदार्थाशी जोडलेल्या क्रियापदाची शक्ती बालक जाणून घेतो. त्यानंतर प्रयोगकाळी त्याची पहिल्यापासूनच अन्वितबुद्धी निर्माण होते. त्यामुळे जर अभिधेनेच अन्वयाचे ज्ञान होत असेल तर तात्पर्यरूप अन्य वृत्ती कशासाठी? असा त्यांचा आशय आहे. अशा प्रकारे एकाच भावाची त्याच्याव्यतिरिक्त अशेष-भावात्मकता अन्विताभिधानवादानेच साध्य होऊ शकते. प्रकाश हा कधीच विमर्शक्रियत्वाला व्यभिचरित करीत नाही आणि विमर्श हा प्रकाशकर्तृता व्यभिचरित करीत नाही अर्थात् बाध आणत नाही. हे सर्व जगत् प्रकाशविमर्शाने युक्त आहे.

सर्व सर्वात्मक आहे

श्रीशिव हे प्रकाशरूप असून शक्ती ही विमर्शरूप आहे, असा आगमसिद्धान्त आहे. हे सर्व विश्ववैचित्र्य प्राकाशविमर्शाच्या अंतर्गतच आहे. प्रकाशरूप आत्म्याचे अनुप्राणन विमर्शशक्तीनेच होते. वास्तविक पाहता "**न शिवेन विना शक्तिर्न शक्तिरहितः शिवः ।। सूतसंहिता ।।४.१३.२९।।**" अर्थात् "श्रीशिवांशिवाय शक्ती नाही आणि शक्तीशिवाय श्रीशिव नाहीत" या सूत-

संहितेतील वचनाप्रमाणे प्रकाश हा विमर्शक्रियतेला बाध आणत नाही यामुळे यांचे वास्तव शरीर म्हणजे ऐक्यस्वभाव होय. श्रीपरमेश्वरांची उन्मेषनिमेषयुक्त लक्षण असणारी एक शक्ती आहे. तिच्यात स्वरूपाचा उन्मेष झाला की, विश्वाचा निमेष होतो आणि विश्वाचा उन्मेष झाला की, स्वरूपनिमेष होतो असे तुलाधृताप्रमाणे म्हणजे तराजूची दोन पारडी खालीवर होतात त्याप्रमाणे उत्पन्न होते. त्याच्यामुळेच विश्वोत्तीर्ण व विश्वात्मक असे श्रीपरमेश्वर सिद्ध होतात. विश्वोन्मेषाच्या अवस्थेत आत्मरूप फक्त नाहीसे होते; मात्र आत्मरूपाचा अत्यंत उपप्लव अर्थात् पूर्णपणे बुडून जाणे किंवा नाहीसे होणे हे होत नाही. विश्वोत्तीर्ण अशा श्रीपरमेश्वरांचा आणि विश्वाचा उन्मेष हाच निमेष आणि निमेष हाच उन्मेष होय ही मोठीच व्याहति म्हणजे विह्वलता किंवा कमीपणा आहे असे म्हणू नये. विश्वव्यवहारात तत्त्वज्ञान्यांचा सर्व वचनपरंपराप्रपंच आणि ज्ञाता, ज्ञान व ज्ञेयरूप त्रिपुटी या सर्वांचे अर्थरूप आत्म्यात पर्यवसान होते. परमार्थतः वेदिता म्हणजे ज्ञाता हाच वेद्य म्हणजे ज्ञेय होय व वेद्य हेच वेदिता आणि वित्ती हीच वेद्य होय. यामुळे सर्व स्वभावसामरस्याची सिद्धी शेवटी सिद्धान्तरहस्यत्वात पर्यवसित होत असल्यामुळे उन्मेष हाच निमेष होय इत्यादींमध्ये व्याहतिदोष अर्थात् उणेपणा किंवा उणीव काढणे हे असमंजसपणाचे लक्षण आहे. "**श्रीप्रत्याभिज्ञाविमर्शिनी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**विमर्शो हि सर्वंसह आत्मानमपि परीकरोति, परमप्यात्मीकरोति, द्वयमप्येकीकुरुते, उभयमपि न्यग्भावयति।। १।५। १३।।**" अर्थात् "विमर्श सर्व सहन करीत आत्म्याला परका करतो, परक्याला आपलेसे करतो, दोघांना एक करतो आणि दोघांना एकदम शून्य करतो." सर्वैकरसवादाच्या स्वीकारात सत्य व असत्य आणि भाव व अभाव यांचे युक्तिपर्यालोचनेत एकरूपत्वच सिद्ध होते. हे बत्तीसाव्या व तेहतीसाव्या गाथेच्या स्पष्टीकरणात श्रीमहेश्वरनंदांनी युक्तीसह प्रदर्शित केले आहे आणि अशा प्रकारे एकाच भावाला स्वव्यतिरिक्त म्हणजे इतर अशेष अर्थात् सर्व भावात्मकता आहे असा आगमसिद्धान्त प्रस्थापित केला आहे. याविषयी "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

अस्यां भूमौ सुखं दुःखं बन्धो मोक्षश्चितिर्जडः।
घटकुम्भवदेकार्थाः शब्दाः।।२।१९।।

अर्थ :- या भूमीवर सुख, दुःख, बंध, मोक्ष, चैतन्य व जड हे शब्द घट व कुंभ यांच्याप्रमाणे एकार्थी किंवा समानार्थी आहेत.

"सर्व सर्वात्मक आहे," हा सिद्धान्त "**श्रीशिवदृष्टी**" या ग्रंथात प्रथमाह्निकात संक्षेपाने आणि चौथ्या व पाचव्या आह्निकात विस्ताराने "हे सर्व श्रीशिवच आहेत," हे उपपादित करण्याच्या हेतूने स्पष्ट केला आहे. "**समता सर्वभावानाम्।**" इत्यादींमधून तंत्रालोकविवेकात त्रिकशास्त्रवचन म्हणून उद्धृत केलेल्या आणि श्रीमहेश्वरनंदांनी उल्लेखिलेल्या श्लोकांमधून ही "**अतो विश्वात्मको नाथः।**" अर्थात् "त्यामुळे विश्वात्मक श्रीनाथ...." येथपासून सुरुवात करून "**महार्थात्मा महार्थिकमनीषिणाम्।**" अर्थात् "महार्थिक विद्वानांचा महार्थात्मा" येथपर्यंतच्या पादुकोदयातील श्लोकांचा उल्लेख करीत चार्वाक अभावब्रह्मवादी, माध्यमिक, सांख्य, शब्दब्रह्मवादी, मीमांसक, नैयायिक व सौगत इत्यादींच्या श्रौत व अश्रौत अशा सर्व सिद्धान्तामध्ये अत्यंत फरक नाही असे सांगितले आहे. स्वात्मपरामर्श अर्थात् स्वात्मविचार म्हणजेच आत्मज्ञान हीच परादेवता आहे असे सांगून "**येन येन स्वरूपेण भासते तस्य तन्मयी।**" अर्थात् "ज्या स्वरूपाने भासते त्याची तन्मय अशी......" अशी सुरुवात करून "**सर्वेषां मोहनी स्मृता।**" अर्थात् "सर्वांना मोहित करणारी म्हणून मोहनी होय," असा शेवट करून त्या परदेवतेचा त्या त्या मतात तो तो अधिकार व अदिरोह तारतम्याने अन्यथा अर्थात् वेगळा वेगळा व्यवहार आहे असे निर्दिशित केले आहे. पारमार्थिक अवस्थेत सर्वसामरस्यसिद्धी होऊनही व्यवहारदशेत मात्र भेद स्वीकारला जातोच. त्यामुळेच परिमलकारांनी प्रसक्ती व अनुप्रसक्ती अर्थात् संबंध व निकटसंबंध यांच्याद्वारा वैशेषिक व माध्यमिक यांच्यातील काही सिद्धान्त त्याचप्रमाणे क्षणभंगवाद व अनिर्वचनीयवाद यांचेही समालोचन केले आहे.

अन्यदर्शनसमीक्षण

श्रीमहेश्वरानंदांनी "**अविकल्पात्मा महाप्रकाशः सामान्यम्।**" अर्थात् "अविकल्प असा महाप्रकाश हाच सामान्य...." (पृ.–) असे सामान्याचे लक्षण करून "**अनुवृत्तिप्रत्ययनिमित्तं सामान्यम्।**" अर्थात् "अनुवृत्तीच्या प्रत्ययाला निमित्त होणारे ते सामान्य होय" हे वैशेषिकांचे लक्षण आणि सामान्यांचे पदार्थांतरत्व यांचे खंडन केले आहे. अशाच प्रकारे चोपन्नाव्या गाथेत आणि त्याच्यावरच्या परिमल टीकेत क्षणभंगवाद आणि त्या प्रसंगाने शून्यवाद यांचे समालोचन केले आहे. शांकरतत्त्वज्ञांचा अनिर्वचनीयतावाद आणि माध्यमिकांचा शून्यवाद यांचा त्यांनी अनेक ठिकाणी ऊहापोह केला आहे. त्याचप्रमाणे दुसऱ्या गाथेच्या परिमलटीकेत "**स्फुटप्रकाशात्मनि**

प्रपञ्चोद्योते न कस्यचिन्मिथ्यात्वोपादकादेश्छलस्यावकाशः" अर्थात् "प्रपंच-प्रकाशक निर्मल आत्मरूपात खोट्यापासून उत्पन्न होणाऱ्या फसवणुकीला थाराच नाही," असे प्रतिपादन करून माध्यमिक अनिर्वचनीयवादांची मर्यादा शिथिल केली. अशाच प्रकारे अधिकारिनिरूपणप्रसंगी वेदान्तात सांगितलेल्या साधनचतुष्टयसंपत्तिउपात्त अर्थात् अर्थात् साधनचतुष्टयापासून उत्पन्न होणाऱ्या इहपरलोककल्याणदायक विरक्ती व मुमुक्षुत्व यांची अनावश्यकता प्रतिपादित केली आहे. त्याचप्रमाणे **"परमेश्वरस्य ह्ययमेवासाधारणस्वभावो यत् सर्वदा सृष्ट्यादिपञ्चकृत्यकारित्वम्। एतदनङ्गीकाराद्धि मायावेदान्तादि-निर्णीत स्यात्मनः स्वस्फुरणामोदमान्द्यलक्षणमसत्कल्पत्वमापतितम्।"** (पृ. ५२) अर्थात् "श्रीपरमेश्वरांचा नेहमी सृष्ट्यादि पंचकर्मे करीत राहणे हाच असाधारण स्वभाव आहे. हा स्वभाव जर मानला नाही तर मायावेदान्तादींमधून निर्णीत झालेल्या आत्म्याला स्वस्फुरणरूप गुण नाही अशी आपत्ती येईल." अशा प्रकारे सूचित केलेल्या अर्थाचे स्पष्टीकरण करण्यासाठी **"बाह्याद्वैतसिद्धान्तः पाशवशास्त्रशय्यामधिशेते।"** अर्थात् "(विमर्श नाकारणारा) जो बाह्याद्वैतसिद्धान्त आहे तो पशुशास्त्राच्या बैठकीवर बसणारा आहे," असे निर्देशित करून **"अद्वैतवादनिर्वाहो वेदान्तेष्वपि दृश्यते।"** अर्थात् "अद्वैतवादाचा व्यवहार वेदान्तातही दिसून येतो," अशी प्रतिज्ञा करून **"तत्रात्मा कश्चिदुत्तीर्णः।"** अर्थात् कोणतातरी पलीकडे गेलेला आत्मा असा आरंभ करून **"नित्यमुक्तो निरूपितः।"** अर्थात् "अशा प्रकारे नित्यमुक्ताचे निरूपण केले." असा शेवट करून ते सिद्धान्त स्वीकारून **"अविम्रष्टत्वपर्यायमकतृत्वं न युज्यते।।"** अर्थात् "अविम्रष्टत्वाला पर्याय असणारे अकर्तृत्वयोग्य असत नाही," अशी असंगती दाखवून खालील श्लोकांनी उपसंहार किंवा शेवट केला आहे-

तस्माद्विमर्शो देवस्य स्वभावोऽस्माभिरुच्यते।
भवन्त्यस्यैव पर्यायाः शक्तिरैश्वर्यमुद्यमः।।
स्पन्दः स्वतन्त्रता स्फूर्तिरूर्मिरोजः कलेत्यपि।।

अर्थ :- त्यामुळे आम्ही विमर्शाला देवांचा स्वभाव असे म्हणतो. त्या स्वभावाचीच शक्ती, ऐश्वर्य, उद्यम, स्पंद, स्वतंत्रता, स्फूर्ती, ऊर्मी, ओज व कला अशी पर्यायी नावे आहेत. पुढे वेदान्ताला संमत असलेले विमर्शाच्या लक्षणाचे विवेचन करून **"विवर्तो विचित्रेण रूपेण वर्तनं न त्वविद्यावशात् अपि तु स्वातन्त्र्यतः।"** अर्थात् "स्वातंत्र्यामुळे विचित्र रूपाने वर्तन करणे

म्हणजे विवर्त होय व हे वर्तन अविद्येमुळे होणारे नाही." असे **"श्रीक्रमकेली"** या ग्रंथात सांगितलेले विवर्ताचे लक्षण समुपस्थापित करून **"संवित्स्वातन्त्र्यमय्या महासत्तया विश्वव्यवहारस्य निर्वचनयत्वनैयत्यादेतद्विपर्ययात्मा तस्यानिर्वचनीयत्वपक्षोऽप्यपहस्तित एव स्यात्।"** अर्थात् "संवित्स्वातंत्र्ययुक्त महासत्तेने विश्वव्यवहाराचे निर्वचनीयत्व नाहीसे होत असल्यामुळे हा विपर्ययात्मा व त्याचा अनिर्वचनीय पक्ष हे दोन्हीही नष्ट झाल्यासारखे होईल," असे प्रतिपादन केले आहे. परिमलटीकेत द्वैतवाद्यांची योग्यता आणि भूतचैतन्यवादी व शून्यवादी यांच्या पक्षावर आक्षेप घेतला आहे. सांख्यसंमत पुरुष उदासीनपक्ष आणि ब्रह्मपरिणामवाद यांचे समालोचन केले आहे. अशा प्रकारे व्यवहारदृष्टीने या परमतवाद्यांचा निरास करून श्रीमहेश्वरांनी ब्रह्म, जीव व जगत् विषयक सिद्धान्त कुल, क्रम व त्रिक दर्शनानुसार प्रस्थापित केला आहे.

प्रतिबिंबवादसतत्त्व आभासवाद

माध्यमिकांच्या शून्यवाद, योगाचारांचा विज्ञानवाद, शांकरवेदान्त्यांचा अनिर्वचनीयतावाद यांच्याप्रमाणे तांत्रिकांचा प्रतिबिंबवादासहित आभासवाद असून तो स्वातंत्र्याद्वैतवादाच्या साधनासाठी मुख्य आधार आहे. हाच सिद्धान्त **"विश्वं दर्पणदृश्यमाननगरीतुल्यं निजान्तर्गतम्।"** अर्थात् "आरशात दिसणाऱ्या नगरीप्रमाणेच आपल्या आतही विश्वाचे (प्रतिबिंब असते)" या शब्दात दक्षिणामूर्तिस्तोत्रातही हा सिद्धान्त प्रतिपादन केला आहे, असे कथन केले आहे. परिमलकारांनी **"दर्पणादिप्रकाशानां हि।"** अर्थात् "दर्पणादि प्रकाशांच्या" इत्यादींनी **"तस्य च विमर्शाख्योऽतिशयः"** अर्थात् "आणि त्याचा विमर्श नावाचा अतिशय" येथपर्यंत आणि **"प्रतिबिम्बप्रक्रिया च।"** अर्थात् "आणि प्रतिबिंबप्रक्रिया" याने प्रतिबिंबवादाचे सूचन केले आहे आणि **"श्रीतंत्रालोक"** ग्रंथातल्या तृतीय आह्निकाचा आधार घेऊन विस्ताराने प्रतिपादित केलेल्या शांभवोपायाचे वर्णन करणाऱ्या एकोणसाठाव्या गाथेच्या व्याख्यानाच्या वेळेसही प्रतिबिंबवादाचा उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे जगात दर्पणादि स्वच्छ वस्तूंवर प्रामुख्याने उल्लसित होणारे तोंड इत्यादि पदार्थ प्रतिफलनयुक्तीने परिस्फुरण पावतात असा अप्रसिद्ध अर्थ केला आहे. त्यात मुखादि अभिमत भाव प्रतिबिंबनक्रियेचा अनुभव घेतात आणि आरशाने युक्त होऊन त्याचा आधार घेऊन त्याचे प्रयोजक होतात, असे कथन केले आहे. अशाच प्रकारे हा आदर्श आननादींनी चिह्नित केलेला स्तंभकुंभादि वेद्यविलास

स्वच्छपणाचा उत्कर्ष होण्याचा स्वभाव असणाऱ्या स्वस्वभावाशी अभिन्न असणाऱ्या श्रीपरमेश्वरयुक्त मुकुरमंडलात तन्मयत्वाच्या मर्यादेत राहून प्रतिबिंबनाच्या युक्तीने परिस्फुरण पावतो असे कथन केले आहे. त्यामुळे प्रतिबिंबवादातही खोटेपणाची शंका अपरिहार्यतेने येते. स्वच्छ दर्पणादि-द्रव्याने परत पाठवलेली डोळ्यांच्या किरणांना परावृत्त करून स्वात्म्याचे ग्रहण करते अशा प्रसिद्धीने आरशात पुरुष आहे असा अनुभव ही भ्रांती म्हणून निश्चय केला जातो. आरशात पुरुष नाही अशा नंतर येणाऱ्या दुसऱ्या प्रतीतीमुळे त्याचा बाध होतो त्यामुळे ही भ्रांती आहे असे म्हणतात का? असा प्रश्न उपस्थित झाला असता त्याचे उत्तर नाही असे आहे; कारण बाह्य दर्पणादिकांत बिंबसव्यपेक्ष अर्थात् बिंबाला अवलंबिणारे प्रतिबिंबाचा उपलंभ अर्थात् दर्शन आहे. स्वात्मरूपात परत हे उलटे आहे; कारण सर्व विश्व-वैचित्र्य हे प्रतिबिंबरूपाने अनुभवास येते. प्रतिबिंबाने वैविध्यपूर्ण झालेली अलौकिकत्वामुळे अनवद्य अर्थात् अर्थात् कलंकरहित किंवा निर्दोष कक्षेवर अधिरोहण करते ही या कारणाला उपन्यस्त अर्थात् दिलेल्या नीतीनुसार बिंबव्यपेक्षा अर्थात् बिंबाची अपेक्षा उत्पन्न होत नाही. तशी संभावना झाली असता प्रतिबिंबाचे स्फुरण हे बिंबाच्या अन्वयव्यतिरेकाच्या अनुरोधाने असते अशा खोटेपणाच्या शंकेला अवकाश मिळतो. बिंबाशिवाय प्रतिबिंब कोठेही उत्पन्न होत नाही, असे म्हटले असता त्याचे उत्तर देताना ग्रंथकार असे म्हणतात की, होय; हे खरे आहे. मग आता यावर काय करावे? बिंबाची अपेक्षा नसतानाही विश्वाचे प्रतिबिंबन करण्याचे सामर्थ्य असणे हेच श्रीपरमेश्वरांचे अतिशय स्वातंत्र्य आहे. दर्पणादि प्रकाशवस्तूंना प्रतिबिंबादि गोष्टींची क्षमता असूनही प्रमातृप्रकाशाची अपेक्षा असल्यामुळे त्यांना उपाधित्व आहे. प्रमातृकाशही दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहणारा आहे अर्थात् तो स्वतंत्र नाही. त्याचा स्वीकार अतिशय विमर्श नावाच्या तत्त्वाने केला जातो. नाहीतर दर्पणादिप्रकाशाप्रमाणे प्रमातृप्रकाशाला जडत्वाचा दर्जा दिल्याप्रमाणे होईल. त्यामुळेच येथील प्रतिबिंबप्रक्रिया स्फटिक व आरसा यांच्या व्यतिरिक्त एखादी अलौकिक प्रक्रिया म्हणून स्वीकारावी; कारण स्फटिक आदींमध्ये प्रतिबिंबन होण्यासाठी प्रतिबिंबाची अपेक्षा अवश्य असते; परंतु ही सर्व प्रपंचाच्या प्रतिबिंबनाबद्दल भिंत म्हणून राहिल्यामुळे हा विपर्यय होतो.

स्वातंत्र्यशक्ती भासा

हेच श्रीपरमेश्वरांच्या दुर्घट घटना घडविण्याचे प्रागल्भ्यरूप लक्षण असलेले

स्वातंत्र्य आसूत्रित करते. ईश्वर परमस्वतंत्र आहेत. स्वात्म-अवभास-अद्वैत अर्थात् स्वात्मप्रकाशाशी अद्वैतरूप असणाऱ्या जगतात भेद व प्रभेद यांचे वैचित्र्य निर्माण करण्याचे प्रावीण्य हीच श्रीपरमेश्वरांच्या स्वातंत्र्याच्या उत्कर्षाची शेवटची पायरी आहे. त्यामुळेच त्यांना अतिदुर्घटकारी श्रीपरमेश्वर असे म्हटले जाते. त्यामुळेच ते लोकपती व देहाक्षभुवनादि प्रपंचाचे ईश्वर आहेत. माया जर नसेल तर भेद हाच परम अर्थ असणारा प्रपंचही नसतो. त्या प्रपंचाच्या किंवा मायेच्या अभावी त्याचा प्रतियोगी असणाऱ्या श्रीपरमेश्वरांची उपपत्ती अर्थात् सिद्धी होत नाही व त्यामुळे कशाचाच विस्तार होणार नाही. ती ही माया म्हणजेच श्रीपरमेश्वरांचे उत्कृष्ट स्वातंत्र्य होय. "**श्रीपरमार्थसार**" या ग्रंथात याविषयी असे म्हटले आहे की -

परमं यत्स्वातन्त्र्यं दुर्घटसम्पादनं महेशस्य।
देवी मायाशक्तिः स्वात्मावरणं शिवस्यैतत्।।

अर्थ :- श्रीमहेशांचे परम स्वातंत्र्य म्हणजेच त्यांचे दुर्घटसंपादनत्व अर्थात् घडून येण्याला कठीण कार्यांची सिद्धी होय आणि देवी मायाशक्ती म्हणजेच श्रीशिवांचे स्वात्मावरण म्हणजे आत्म्यावरचे आवरण आहे. स्वातंत्र्य हेच लक्षण असणारी व महान् अशी ही श्रीपरमशिवांची शक्ती तत्त्वांच्या एकमेकांच्यात असणाऱ्या प्रयोज्यप्रयोजकभावात प्रगल्भ होत पृथ्व्यादि भाववर्गाप्रमाणे अनाश्रित श्रीशिवांनाही क्रोडीकृत्य अर्थात् आलिंगन देत वर्धित होते. "**चितिः स्वतन्त्रा विश्वसिद्धिहेतुः।। प्रत्यभिज्ञाहृदय १।।** अर्थात् "स्वातंत्र्यशक्तीने युक्त चिती हीच विश्वाच्या सिद्धीचे कारण आहे," या वचनांमधूनही हाच अर्थ प्रतिपादिला आहे. हेच स्वातंत्र्य क्रमदर्शनामध्ये भासा या नावाने स्पष्ट केले जाते. परिमलकारांनी याविषयी असे म्हटले आहे की, भासा म्हणजे सृष्ट्यादि कृत्यांच्या पलीकडचे विश्ववैचित्र्य व्यवहार आपल्यात सामावून घेणारी, सर्वांच्या पलीकडची व सर्वांवर कृपा करणारी पारमेश्वरी चिच्छक्ती होय. तिचे स्वातंत्र्यही तेच होय. याविषयी श्रीपादुकोदय या ग्रंथात असे म्हटले आहे की -

भासा च नाम प्रतिभा महती तत्त्वगर्भिणी।
स्वस्वभावशिवैकात्म्यदेशिकात्मकचिन्मयी।।
यस्यां हि भित्तिभूतायां मातृमेयात्मकं जगत्।
प्रतिबिम्बतया भाति नगरादीव दर्पणे।।
स्वातन्त्र्यरूपा सा काचिच्चिच्छक्तिः परमेष्ठिनः।

तन्मयो भगवान् देवो गुरुर्गुरुमयी च सा।।

अर्थ :- भासा म्हणजे महान् प्रतिभा, सर्व तत्त्वांना आपल्यात सामावून घेणारी, स्वस्वभावरूप, श्रीशिवांशी समरस झालेली, श्रीसद्गुरुयुक्त व चिन्मयी(शक्ती) होय. ती पार्श्वभूमी होऊन तिच्यावर हे सर्व जगत् ज्याप्रमाणे आरशात नगर आदि वस्तूंचे प्रतिबिंब दिसते त्याचप्रमाणे प्रतिबिंबित होते. ती स्वातंत्र्यरूप असून श्रीपरमेश्वरांची चिच्छक्ती आहे. भगवान् श्रीशिवस्वरूप असून श्रीसद्गुरू हे त्या भासा शक्तीने युक्त आहेत तर ती भासा शक्ती श्रीसद्गुरुमय आहे.

वर सांगितलेले ते स्वातंत्र्य संवित्स्वभावाच्या पलीकडे कधीच जात नाही अर्थात् अतिक्रमण करीत नाही. भगवती श्रीसंविद्च स्वतःमध्ये असेलले जगत् बाहेर प्रकाशित करते.

चिदात्मैव हि देवोऽन्तःस्थितमिच्छावशाद्बहिः।
योगीव निरुपादानं अर्थजातं प्रकाशयेत्।।

अर्थ :- अंतःस्थित चिदात्मा देवच इच्छाशक्तीमुळे एखाद्या योग्याप्रमाणे उपादानरहित पदार्थसमूह बाहेर प्रकाशित करतो.

असे सांगून प्रत्यभिज्ञाकारही याच अर्थाचे समर्थन करतात. अशा प्रकारे पत्र, पट, भिंत इत्यादींच्या पार्श्वभूमीवर चित्रकाराप्रमाणे संविद् स्वच्छ असा निर्मळ आरसा, तलवार, पाणी आदींमध्ये पडणाऱ्या मुखादि प्रतिबिंबाप्रमाणे स्वातंत्र्यशक्तियुक्त चिदात्म्यावर विश्वाचे उन्मीलन किंवा निर्माण करते आणि ते विश्व घटपटादिरूपाने आभासित होते. हा आभास श्रीसुरेश्वराचार्यादींनी प्रतिपादन केलेल्या आभासाप्रमाणे खोटा किंवा अनिर्वचनीय नाही; परंतु संविन्मयच आहे. विश्वमय आणि विश्वोत्तीर्ण असे श्रीपरमेश्वर आहेत असा आगम सिद्धान्त आहे.

विश्वोत्तीर्ण अडतीस तत्त्वे

विश्वमय व विश्वोत्तीर्ण, अनाश्रितापासून कालाग्निरुद्रापर्यंत छत्तीस तत्त्वरूप विचित्र विश्वाचे संयोजन आणि वियोजन करण्यात मग्न असणाऱ्या श्रीपरमशिवांची शक्तीच स्वतंत्र आणि तत्त्वांच्या एकमेकातील प्रयोज्य व प्रयोजक भावात प्रगल्भ होते. पृथ्व्यादि भाववर्गाप्रमाणे अनाश्रितादि श्रीशिवां-नाही क्रोडीकृत्य अर्थात् आलिंगन देत परिस्फुरते. ती विमर्शसंरभमयी अर्थात् उभारणी करणारी आहे. विमर्श नावाचा संरंभ अर्थात् आरंभ किंवा आवेश म्हणजेच अंतःकरणात स्फुरणाऱ्या क्रियाशक्तीच्या विस्तारापासून बनलेली

आहे. ती भासाशक्ती चित्, आनंद, इच्छा, ज्ञान व क्रिया या शक्तिपंचकांचे सामरस्य हाच स्वभाव असणारी आहे. या छत्तीस तत्त्वांच्या समूहाला आत्मसात् केलेला महान् "श्रीपरमशिव" नावाचा प्रमाता सदतीसावे तत्त्व म्हणून स्वीकारला जातो. त्याचे तादृश्यरूपही "विकल्पत्वा"त मोडते. विश्वोत्तीर्ण अविकल्पात्मा असावा या दृष्टीने अविकल्पवृत्ती अडतीसावे तत्त्व म्हणून काही आगमात सांगितले आहे.

श्रीपरमेश्वरांचा विश्वव्यवहार

विश्वोत्तीर्ण व अविकल्प अशा या श्रीपरमेश्वरांचे विश्वव्यवहर्तृत्व अर्थात् विश्वाचा व्यवहार करण्याचे सामर्थ्य **"श्रीमद्भगवद्गीता"** या ग्रंथातील **"मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च।।१५.१५।।"** अर्थात् "माझ्यापासूनच स्मृती, ज्ञान व त्यांची निवृत्ती आदि होतात" या वचनाने व **"श्रीप्रत्यभिज्ञा"** या तंत्र-ग्रंथातील **"स्यादेकश्चिदवपुर्ज्ञानस्मृत्यपोहनशक्तिमान्।।१.३.७।।"** अर्थात् "एकच चैतन्यवपू ज्ञान, स्मृती आणि अपोहन अर्थात् लपविणे या शक्तीने युक्त आहे." या वचनाने ज्ञान, स्मृती व अपोहन या तीन शक्तित्वांच्या साहाय्याने सिद्ध होते. परिमलकारांनी तेराव्या गाथेच्या व्याख्यानाच्या वेळेला सूचित केलेला विश्वस्फुरणप्रकार चौपन्नाव्या गाथेच्या स्पष्टीकरणात अर्थात् परिमलटीकेत ज्ञान, स्मृती व अपोहन यांचे लक्षण करण्याच्या मिषाने दाखविला आहे. ज्यांना या विषयांबद्दल विशेष जिज्ञासा आहे त्यांनी हा विषय **"श्रीमद्भगवद्गीता"** व **"श्रीप्रत्यभिज्ञाविमर्शिनी"** या ग्रंथामध्ये पाहावा. विश्वस्फुरण प्रक्रियेत स्वीकार्य असणाऱ्या या शक्तींमध्ये बोध व स्मृती विश्व-मय चिच्छक्तीमुळे तादात्म्याचा पूर्ण त्याग करीत नाहीत. त्यामुळे विश्वाच्या संहारप्रक्रियेत त्या वर्ज्य होतात. श्रीभगवंतांची सामर्थ्यवती स्वातंत्र्यशक्तीच "अपोहन" या पदाने ओळखली जाते. ती विश्वाच्या अंताच्या वेळेला आणि विश्वाच्या सृष्टीच्या वेळेला समानपणे स्वीकारली जाते. त्यामुळेच परिमलकार प्रकरणाचा असेच सांगून शेवट करतात.

तिसृभिः शक्तिभिराभिः शिवः कुविन्दो भवन् कुलालो वा।
अनुभवति सुखं स्मरति च बहु च विकल्पयाति विश्ववैचित्र्यम्।।

अर्थ :- या तीन शक्तींनी हे श्रीशिव कोष्टी किंवा कुंभार होऊन विश्वाचा अनुभव (ज्ञान) घेतात, स्मरण करतात व (विश्वाला) बदलूनही टाकतात.

विश्वोत्तर श्रीपरमेश्वरांचा हा विचित्र विश्व स्फुरणप्रकार परिमल टीकेत विस्ताराने सांगितला आहे. जिज्ञासूंनी तेथूनच तो जाणून घ्यावा. आता

स्वातंत्र्यशक्तीचे पंचकृत्यांचे प्रयोजयितृत्व अर्थात् पंचकृत्ये करण्यास प्रेरणा देणे सांगितले जाईल.

स्वातंत्र्यशक्तीचे पंचकृत्यप्रयोजयितृत्व

श्रीपरमशिवांची स्वातंत्र्यशक्ती चित्, आनंद, इच्छा, ज्ञान व क्रियारूप पाच शक्तींच्या सामर्थ्याने सृष्टी, स्थिती, संहार, तिरोधान व अनुग्रहरूप किंवा सृष्टी, स्थिती, संहार, अनाख्या व भासारूप पाच कृत्यांची प्रयोजना करविते. **"आभासन- शक्ति-विमर्शन-बीजावस्थापन-विलापनत-स्तानि ।।११।११।।"** या प्रत्यभिज्ञाहृदयसूत्रानुसार परिच्छिन्न प्रमात्यातही पंचकृत्य करविण्याचे सामर्थ्य अभिव्यंजित होते. सूत्रार्थ मूळ ग्रंथातूनच पाहावा. श्रीपरमेश्वर मीच सर्व आहे, अशा वैश्वात्म्यप्रथेच्या अनुभूतिविस्ताराच्या चमत्काराने शुद्ध किंवा निर्मळ, संकोचाच्या शंकेने रहित अर्थात् संकोचाचा अभाव असणाऱ्या संवित्च्या स्वस्वातंत्र्यस्वभावरूप विद्येने युक्त असण्याचा अनुभव घेतो आणि याच हेतूने **"श्रीशिवसूत्र"** या ग्रंथात **"नर्तक आत्मा ।।३।९।।"** या सूत्राने त्यांना विश्वनाटकाचा अभिनेता असे संबोधिले जाते. पृथ्वी ते श्रीशिवांपर्यंतच्या तत्त्वसमूहाने युक्त विश्वसृष्टिस्थित्यादि पाच अवस्थांशी संवित् शक्ती अविनाभूत अर्थात् कधीही एकमेकांपासून अलग न होणाऱ्या संबंधाने युक्त असल्याकारणाने आरंभयत्नादि पाच अवस्था हेच लक्षण असणाऱ्या नाटकाचे अनुकरण करते. येथे सृष्टिस्थित्यादि पाच अवस्थांनी युक्त जगत् आणि आरंभयत्नादि पाच अवस्था ज्यात आहेत असे नाटक यांची तुलना केली आहे. आरंभ, यत्न, प्रत्याशा, नियताप्ती व फलागम नावाच्या या पाच अवस्था **"दशरूपक"** (१।१९-२२) **"साहित्यदर्पण"** (६।७०-७३) **"अग्निपुराण"** (३३८।२१) इत्यादि ग्रंथांमधून निरूपिल्या आहेत.) पाच कृत्यात व श्रीपरमेश्वरांच्या सृष्टिस्थितिसंहार या तिन्हींमध्ये कधीही वैषम्य नसते. वरील पाच कृत्यांपैकी ज्यावेळेला विमोहित झालेल्या पशूंच्या अपेक्षेने समयभ्रंशाचे आपादानादि रूप हेच चित्ताचे व्याकुलीकरण होणे आणि ज्यावेळेला कारुण्याचा उत्कर्ष झाल्यामुळे या दोषाच्या नाहीसे होण्याने परत स्वस्वरूपलाभाचे प्राप्त होणे या दोन कृत्यांना तिरोधान व अनुग्रह अशी दोन कृत्ये म्हणतात. ज्यावेळेला पशुप्रमात्यादींच्या अवच्छेदाच्या अर्थात् वेगळे करण्याच्या व्यपोहाने अर्थात् घालवून देण्याच्या किंवा दूर करण्याच्या इच्छेन् विश्वच कार्य म्हणून अनुसंधिले जाते अर्थात् विश्वाचे कार्य म्हणून अनुसंधान केले जाते त्यावेळेला त्याला अनाख्या व भासा या दोन कृत्यांनी ओळखले जाते.

सृष्टी ही उद्योग, अवभास, चर्वण, आत्मविलापन व तरंगरहित्व ही पाच लक्षणे असणारी आहे. याचे स्पष्टीकरण एकुणचाळिसाव्या गाथेत ओलेले आहे. सर्वांचा अगदी आपल्या जीवमात्रांचाही या पंचकर्मांशी अविनाभाव असतो अर्थात् शाश्वत संबंध असतो. तो प्रथापंचक म्हणजे क्रिया, ज्ञान, इच्छा, अनाख्या व भासा या स्वरूपांनी निष्कर्षिला जातो. त्यानंतर सृष्ट्यादि पंचकृत्यांतर्गत असलेले सर्व विश्ववैचित्र्य एका सृष्टीतच परिस्फुरित किंवा प्रकाशित होते. स्थिती म्हणजे निर्मिती झालेल्या पदार्थांचा जोपर्यंत उपसंहार होत नाही तोपर्यंत अवैयाकुल्य अर्थात् क्षेमरूपाने अवस्थान अर्थात् स्थिर राहणे हाते. संहार म्हणजे बाहेर उन्मुख झालेल्या भावांचे पारमेश्वर प्रकाशात परत प्रसूतिऔचित्याने वटधानादि नीतीनुसार वासनायुक्ततेने अवस्थान होय. अनाख्या म्हणजे आख्येचा अभाव होय. आख्या ही पश्यंत्यादि स्थूल तीन वाणींच्या स्वभावाची असते. भासा म्हणजे सृष्ट्यादि कृत्यांच्या पलीकडची व सर्वांवर अनुग्रह अर्थात् कृपा करणारी म्हणजेच श्रीगुरुरूपाने शक्तिपात-दीक्षा देऊन कृतार्थ करणारी श्रीपरमेश्वरांची चिच्छक्ती होय. पाचांना प्रणेतृत्व अर्थात् नेतृत्व देणे हेच श्रीपरमेश्वरांचे ऐश्वर्य आहे. ते ज्यातून अर्थ नष्ट झालेला आहे अशा चारांचे अवभासन, तीन प्रमेयांच्या अर्थात् ज्ञेयांच्या वासनावृत्ती जेथे लीन झाल्या आहेत अशी स्थिती आणि ज्ञेय व ज्ञान अर्थात् प्रमेय व प्रमाण घस्मर अर्थात् नाशक ज्ञातृत्व, सविकल्पप्रमेयांचा अर्थात् ज्ञेयांचा विमर्श, निर्विकल्प प्रमेयाचा अवभास आहे अशा क्रमाने आगमांमधून संक्षेपाने सिद्ध केले जाते.

स्वतंत्र चितिशक्ती हीच विश्वाच्या निर्मितीसाठी हेतू अर्थात् कारण आहे असे प्रतिपादित केले जाते. चितिशक्तीच चेतनपदावरून खाली येऊन संकुचित होऊन चित्त बनते. श्रीपरमेश्वर हेही संसारी बनतात. त्याचप्रमाणे ज्याची स्वातंत्र्यशक्ती अडथळारहित आहे अशा इच्छादि शक्ती पशु-अवस्थेत कासवांच्या अंगाप्रमाणे संकुचित होऊन क्रमशः अपूर्णताख्यातिरूप आणवमल, वेद्य अर्थात् ज्ञेयभेदप्रथारूप मायीयमल, शुभ व अशुभ अनुष्ठानात्मक कार्म-मल यांना उत्पन्न करतात. त्याचप्रमाणे सर्वकर्तृत्व, सर्वज्ञत्व, पूर्णत्व, नियत्व व व्यापकत्वशक्ती संकोच ग्रहण करीत क्रमानुसार कला, विद्या, राग, काल व नियतिरूप होतात. त्याचप्रमाणे हा शक्तिदरिद्र संसारी जीव आहे त्याला अवच्छिन्न प्रमाता असेही म्हणतात. या अवच्छिन्न प्रमात्याचे चित्तमयत्व **"तन्मयो मायाप्रमाता।।सूत्र ६।।"** अर्थात् "त्याने युक्त माया प्रमाता

होय," या "**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथातील सूत्राने सांगितले जाते. हाच अर्थ श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांनी खालील श्लोकात सांगितला आहे.

स्वतन्त्रः स्वच्छात्मा स्फुरति सततं चेतनशिवः।
परा शक्तिश्चेयं करणसरणिप्रान्तमुदिता।।
तदाभागैकात्म स्फुरति च समस्तं जगदिदं।
न जाने कुत्रायं ध्वनिरनुपतेत् संसृतिरिति।।

अर्थ :- स्वतंत्र, अत्यंत शुद्ध व निर्मळ असे श्रीचेतनशिव सतत स्फुरण पावत असतात. ज्यावेळेला ही परा शक्ती करणसरणिप्रान्तमुदिता अर्थात् करणाच्या म्हणजे साधनांच्या मार्गाच्या प्रांतावरून उदित झालेली असते त्यावेळेला हे भोगयुक्त समस्त जगद् स्फुरते. न जाणो कोठून हा "संसृति अर्थात् संसार" असा ध्वनी ऐकू येतो?

तीन मलांच्या संपर्काच्या तारतम्यामुळेच सकलप्रलयाकल, विज्ञानाकल, मंत्र, महेश्वर, मंत्रमहेश्वर व अनाश्रितशिव हे सात प्रमाते उत्पन्न होतात. त्यामुळे तीन मलांना जाळून टाकणे हेच स्वस्वरूपाच्या अभिव्यक्तीला निमित्त होते. मलशंकेचा पूर्णपणे त्याग करणे हाच मलनाशाचा उपाय आहे. अशा प्रकारे स्वरूपाची अभिव्यक्ती अर्थात् आपण कोण आहोत याचे पूर्ण ज्ञान देणे हाच मोक्ष आहे आणि त्याच्या उलट किंवा विरुद्ध प्रक्रिया म्हणजे बंध असे मोक्ष व बंधाचे लक्षण सांगितले आहे.

बंधमोक्ष

वस्तुस्थित्या न बन्धोऽस्ति तदभावान्न मुक्तता।
विकल्पघटितावेतावुभावपि न किञ्चन।।

अर्थ :- वस्तुस्थिती बघता बंधही नाही आणि बंधच नसल्यामुळे मोक्षही नाही. ही दोन्हीही तत्त्वे विकल्पांनी बांधलेली आहेत. बाकी काहीही नाही.

या न्यायाने या तंत्रमार्गात बंधमोक्षव्यवस्था ही विकल्पांनी बांधलेली आहे. वास्तविक बंधच नाही त्यामुळे मोक्ष तरी कुठून असणार आणि त्याची इच्छा तरी कोठे असणार? स्वस्वरूप परामर्श अर्थात् "स्व"चे ज्ञान नावाचा चिदानंदाचा लाभ करून देणारा स्वस्वभावच येथे मोक्ष म्हणून ओळखला जातो आणि ज्यावेळेला स्वस्वभाव अपूर्णताख्यातिरूप आणवादि मलांनी आवृत होतो अर्थात् झाकला जातो त्यावेळेला पशुआवेश हाच स्वभाव असणारा बंध म्हणविला जातो. दान व क्षपण हेच लक्षण असणाऱ्या

दीक्षा आदींनी आणि तीन मलांच्या दाहानंतर श्रीसद्गुरूंचा कृपाकटाक्षाने धन्य झालेल्या मनुष्यांच्या बाबतीत परमशिवीभाव या लक्षणाचा मोक्ष आविर्भूत होतो. अशा प्रकारे येथे पाशववेदान्त्यांनी उपदेशिलेले इहपरफलभोगविरागादि अधिकारी विशेषत्वाने ग्रहण केले जात नाहीत; कारण इहपरफलांच्या भोगांचा उद्रेक म्हणजेच मोक्ष (असे) पुरुषार्थात्मा स्वात्मविमर्शाला प्रेरणा देणारा म्हणून ओळखला जातो. हेच या दर्शनाचे इतर दर्शनांहून वेगळेपण आहे. या दर्शनात भोगमोक्षांचे सामरस्य मानले जाते. हेच श्रीमहेश्वरानंदांनी पासष्ठाव्या गाथेत आणि त्याच्या परिमल टीकेत विस्ताराने प्रतिपादिले आहे. तेथे त्याचा शेवट पुढीलप्रमाणे केला आहे "**श्रीमदुत्तरक्रमप्रणयनप्रवीणस्य श्रीपरमेश्वरस्य परमकारुण्यमात्रोपपादितेयमास्माकीना यामली सिद्धीः। या श्रीकुलगह्वरादिषु भोगमोक्षसामरस्यात्मकतयोपपाद्यते।।**" अर्थात् "श्रीमदुत्तरक्रमाचे प्रणयन करण्यात प्रवीण असलेल्या श्रीपरमेश्वरांकडून परमकरुणेने युक्त होऊन सिद्ध केलेली ही आमची यामली सिद्धी श्रीकुलगह्वरादि ग्रंथांमधून भोग व मोक्ष यांचे सामरस्य म्हणून सांगितली गेली आहे." आणि "**अस्यां भूमौ सुखं दुःखं बन्धो मोक्षश्चितिर्जडः। घटकुम्भवदेकार्थाः शब्दाः।**" अर्थात् "या भूमीत सुख, दुःख, बंध, मोक्ष, चैतन्य व जड हे सर्व शब्द घट व कुंभ या समानार्थी शब्दांप्रमाणे एकार्थी आहेत. सर्व प्रपंचाच्या विकल्पांचे परिस्फुरण क्रोडीकार अर्थात् आलिंगन देणारा विलक्षण असा विमर्शच सांगितलेल्या आत्मरूपाचे ज्ञान करून दिलेल्या भोग व मोक्ष लक्षणांच्या दोन्ही पुरुषार्थाची सिद्धी करून देतो. अशा स्थितीत भोग हा मोक्षयुक्त आहे आणि मोक्ष हा भोगस्वभावी आहे अशी एकमेकांशी मिलनरूप असणारी व श्रीमदनुत्तरसंवित्शी अद्वैत असणाऱ्या सिद्धान्ताने साध्य असणारी ही जीवन्मुक्ती अभिव्यंजित केली जाते.

जीवन्मुक्ती

"**चिदानन्दलाभे देहादिषु चेत्यमानेष्वपि चिदैकात्म्यप्रतिपत्तिदार्ढ्यं जीवन्मुक्तिः।।सूत्र १६।।**" अर्थात् "(अशा प्रकारे) चिदानंदाच्या प्राप्तीनंतर देहादिक आहेत असे (साधकाला) जाणवले किंवा त्यांची अनुभूती आली तरी चिच्छक्तीच्या बरोबर एकात्मकतेच्या प्रतिपत्तीची प्राप्तीची, खात्रीची किंवा निश्चयाची दृढता हीच जीवन्मुक्ती आहे." या "**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथातील व्याख्येच्या मर्यादेनुसार भोग आणि मोक्ष यांच्या साक्षात्कार म्हणजेच जीवन्मुक्ती ही स्व आणि विश्वात्मा यांच्या अनुसंधानाने अनुसंधित अर्थात्

योग्य अशा संबधित ऐश्वर्याच्या प्रमात्यांचा स्वभावच आहे. येथे कोणतीही अतिशयोक्ती स्वीकारार्ह नाही. जीवन्मुक्ती म्हणजे जीवनमरणादि अनस्यूत असणाऱ्या अवस्थांच्या पलीकडची स्वानंदाच्या उत्सवाची अनुभूती होय. हा जो शोधण्याचा भाव आहे तोच स्वहृदयस्फुरत्ता हे दुसरे नाव असणारी महासत्ता आहे. या दृष्टीने **"श्रीरत्नमाला"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

यस्मिन् काले तु गुरुणा निर्विकल्पं प्रकाशितम्।
तदैव किल मुक्तोऽसौ यन्त्रं तिष्ठति केवलम्।।

अर्थ :- ज्या काळात श्रीसद्गुरूंकडून निर्विकल्प (ब्रह्म) प्रकाशित केले जाते त्याच क्षणी साधकभक्तयोगिशिष्य मुक्त होऊन यंत्रासारखा राहतो.

अशा प्रकारे श्रीसद्गुरूंचा कृपाकटाक्ष पडल्यामुळे कालाचा लेशही न उरलेला विशेष आत्मा अर्थात् साधकभक्तयोगिशिष्य क्षणातच सृष्टीत प्रवेश होऊनही चित् व आनंद या दोघांच्या सामरस्याच्या साराने जीवन्मुक्त होऊन तो साधकभक्तयोगिशिष्य महोपभोग अर्थात् महान् उपभोग घेणारा होतो. त्या प्रकारचा भाव कारणीभूत झाल्यामुळे त्याला सर्व तिर्यक्त्व अर्थात् पशुत्व, मनुष्यत्व, जीवत्व, अमृतत्व, जडत्व, अजडत्व आदि विषयांमध्ये तारतम्य अर्थात् विवेक न करता येणारा प्रमातृवर्ग इत्यादि सर्व प्रकारचा विश्वविलास हेच लक्षण असणाऱ्या बंधांच्या कारणांपासून पार होऊन शुद्धचैतन्यस्व-भावाचा होऊन कालतत्त्वापासून पाषाणादि जड पदार्थ स्वभावापत्ती पर्यंतचे सर्व इदंतेचे साम्राज्य परमश्रीशिवरूप चैतन्याच्या उत्कर्षापर्यंत जाऊन अहंतेच्या सर्व भोगांच्या स्वरूपाचे आणि विश्वाच्या पलीकडच्या सामरस्याचा स्वाद ज्याच्याशी सारखा आहे असे सौभाग्य व अंतःकरण आकर्षून घेण्यात कुशल असणारे श्लाघ्यत्व प्राप्त होते अर्थात् हे सर्व जीवन्मुक्त पुरुषाला स्वचा परिस्पंद म्हणून प्राप्त होते. याचा भावार्थ असा आहे की, श्रीसद्गुरूंच्या कृपा-कटाक्षाच्या वेळेलाच पुरुषांना स्वहृदयसंवादसौंदर्यशाली अशा जीवन्मोक्ष लक्षणाच्या पुरुषार्थाची प्राप्ती होते. अशा प्रकारे सर्वसाम्यस्वभावी स्वस्वरूपात अवस्थिती म्हणजे महार्थसंमत जीवन्मुक्ती होय.

वरती सांगितेलल्या लक्षणांनी युक्त अशी ही जीवन्मुक्ती स्वात्मविमर्श हेच लक्षण असणाऱ्या क्रमपरामर्शाने किंवा क्रमज्ञानाने उन्मिलित होते. परिमलकारांनी क्रमज्ञानाची प्रक्रिया पुढीलप्रमाणे सांगितली आहे.

सृष्ट्यादि चार कृत्यांमध्ये सृष्टिसृष्टी, सृष्टिस्थिती अशा क्रमाने प्रत्येक चातुर्विध्यापर्यंत आणि त्याचे पर्यवसान भासा शक्तीमध्ये होते. भासा स्वरूप-

निष्कर्षाच्या अवलोकनात अर्थात् पाहण्यात किंवा निरीक्षणात संविदैक्याच्या परामर्शाच्या साराने युक्त असूनही विश्वरूप प्रतिबिंबात युक्तीने अनुप्रविष्ट होणाऱ्या प्रपंचाच्या स्वभावाचे अनुकरण करणारी होऊन पंचकस्वरूपाचीच असते; त्यामुळे पाचही कृत्ये प्रत्येक पंचकात्मकतेचे उल्लंघन करीत नाहीत. त्यांच्यामध्ये पूर्व पूर्व पंचकातील पाचवी कला उत्तरोत्तर पंचकातील पहिली कला होऊन स्फुरण पावते. अशा प्रकारे उत्तरोत्तर अर्थात् नंतर नंतरच्या पंचकातील पहिल्या स्फुरत्तेचे खालच्या खालच्या अर्थात् आधीच्या पंचकापर्यंत शक्तींमधला विश्रांतीचा अनुभव असे **"उत्पलदलदशशतविदलनलाघवोल्लासवत्"** म्हणजे "कमलदलांच्या हजारो पाकळ्यांचे विदलन करण्याच्या लाघवाच्या उल्लासाप्रमाणे" क्रमसद्भावातही असंलक्ष्यक्रमा अर्थात् ज्या शक्तीमुळे क्रम संलक्षित होत नाही अशी पारमेश्वरी शक्ती पंचकृत्यचक्रनिर्व्यूढी अर्थात् पंचकृत्ये ही चक्राप्रमाणे करण्यात गढून गेलेली असल्यामुळे अत्यंत गाढ अभ्यास करणाऱ्या काही प्रौढांनी ज्ञानास योग्य म्हणून अवस्थापित केली आहे. अशा प्रकारे क्रमपरामर्श हाच स्वात्मविमर्शरूप जीवन्मोक्ष आहे.

वैष्णव दार्शनिकांनी जीवन्मुक्तीचा स्वीकारच केलेला नाही. त्याचप्रमाणे श्रीरामानुजाचार्यांनी **"समन्वयाधिकरणभाष्य"** या भाष्यग्रंथात **"तत एवं जीवन्मुक्तिरपि दूरोत्सारिता"** अर्थात् "त्यानंतरच जीवन्मुक्ती सुद्धा दूर फेकली आहे," असा आरंभ करून **"अतः सकलभेदनिवृत्तिरूपा जीवन्मुक्तिर्जीवतो न सम्भवति।"** अर्थात् "त्यामुळेच सर्व भेद शांत करणारी अशी जीवन्मुक्ती जिवंत असणाऱ्या माणसांच्या बाबतीत शक्य नाही," असा शेवट करून ग्रंथात तिचे प्रत्याख्यान केले आहे. हा प्रत्याख्यानप्रकार स्वात्मविमर्शरूप सर्वसाम्यस्वभावी स्वस्वरूपाच्या अवस्थितीत म्हणजेच जीवन्मुक्तीत कसाच घटित होत नाही. त्यामुळे स्वातंत्र्याद्वैतवाद्यांचा जीवन्मोक्ष असंभावना या दोषापासून रहित आहे.

उपसंहार

अशा रीतीने श्रीमहार्थमंजरी या ग्रंथातील व परिमलव्याख्येतील काही सांस्कृतिक विषयांचे यथामती विवेचन केले. मात्र षट्त्रिंशतत्त्वाच्या स्फुरणाचा प्रकार, श्रीपीठ-पंचवाह-नेत्रत्रयवृन्दचक्रप्रतिपादनपर क्रमसपर्याविधी इत्यादि विस्ताराने चर्चिलेले विषय जिज्ञासूंनी मूळ ग्रंथातूनच पाहावेत. इत्यलम्।

आशीर्वचन

लेखक :- महंत श्रीअवेद्यनाथ
(श्रीगोरक्षपीठाधीश्वर)

श्रीमहार्थमंजरी या ग्रंथाचे माहात्म्य

महार्थतत्त्व हा महायोगामृताचा परंपराप्राप्त सनातन सिद्धान्तोपदेश आहे. याचे साधन आणि चिंतन यांच्यामुळे स्वसंवेद्य अलख निरंजनाचा साक्षात्कार किंवा सहजपणे बोध होतो. या तत्त्वाचा उपदेश योगेश्वर भगवान् श्रीगोपाल-कृष्णनाथमहाराज यांनी महाभारताच्या विशाल युद्ध प्रांगणामध्ये पांडवसेना-नायक अर्जुन हा शोकग्रस्त आणि आत्मा-अनात्मा यांच्या स्वरूपाबद्दल निश्चयाने मोहित झाल्यावर त्याला सद्सद्विवेकप्राप्ती आणि आत्मस्वरूपप्राप्ती प्रदान करून स्वकर्माविषयी प्रबुद्ध किंवा जागृत केले होते. त्या योगपात्र अर्जुनाने श्रीभगवंतांजवळ वचनबद्धतेची प्रतिज्ञा केली होती. "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथात याविषयी असे म्हटले आहे की -

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत।
स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव।।१८।७३।।

अर्थ :- हे अच्युता! आपल्या कृपेने अर्थात् आपण मला दिलेल्या शक्तिपातयोगदीक्षेने माझा मोह पार नष्ट होऊन गेला आहे आणि मला माझी स्मृती म्हणजे स्वसंवेद्य आत्मचैतन्य म्हणजे स्वरूपयुक्त श्रीशिव-शक्तिस्वरूपाची प्राप्ती झाली आहे. त्यामुळे मी संशय व संदेहरहित होऊन राहलो आहे. आता मी तुझे म्हणणे मानीन अर्थात् तुझ्या म्हणण्याप्रमाणे वागून मी तुझ्या आज्ञेचे पालन करीन.।।७३।।

आमचे परमश्रद्धेय नाथयोगामृताचे प्राणचैतन्य महासिद्धयोगी श्रीगोरक्ष-नाथ यांनी स्वात्मबोध आणि लोकव्यवहाराच्या संयमनासाठी आपल्या महान् योगशास्त्रयुक्त "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये या महार्थतत्त्वाचे निरूपण करून कैवल्य-स्वविश्रांती अथवा स्वरूपावस्थान किंवा परमपद याचा राजमार्ग मोकळा केला आहे. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये श्रीगोपालकृष्णनाथ-महाराज यांचे श्रीसद्गुरुपद आणि अर्जुनचा शिष्यभाव अथवा प्रपत्तीचे प्रकाशन केलेले आहे. यात स्पष्टरूपाने ही गोष्ट लक्षात येते की, श्रीसद्गुरूंच्या अनुग्रहाने किंवा कृपेने शिष्याचा संपूर्णपणे उद्धार होत असतो. अशा शिष्याच्या दुःखाची

आत्यंतिक निवृत्ती होऊन त्याला स्वसंवेद्यपदाची प्राप्ती होते. हाच नाथयोगाचा सिद्धान्त असून याच्या द्वारा सनातनकाळापासून महायोगज्ञान सुरक्षित आणि सुप्रतिष्ठित झालेले आहे. केवळ नाथयोगच नव्हे; तर योगाच्या सर्वसामान्य भूमीवरही किंवा पातळीवरही महर्षी श्रीपतंजलीमुनींनी चित्तवृत्तिनिरोधाच्या द्वारा द्रष्ट्याच्या किंवा साक्षिपुरुषाच्या स्वस्वरूपावस्थानावर किंवा स्वस्वरूपातील विश्रांतीवर जोर दिलेला आहे. "**श्रीपातंजल योगदर्शन**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम्।।१।३।।

अर्थ :- तो साक्षिपुरुष किंवा द्रष्टापुरुष स्वस्वरूपात अवस्थान करतो किंवा राहतो.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ* यांनी "**श्रीसिद्धसिद्धान्तपद्धती**" या ग्रंथामध्ये योगाविषयी असे म्हटले आहे की -

योगः संहननोपायो ज्ञानसङ्गतियुक्तिषु।
लोके निकृष्टं सततं यं वा यं वा प्रकुर्वते।।
तं वा तं वा वर्जयन्ति लोका ज्ञानबलेन तु।।५।।२२-२३।।

अर्थ :- दुसऱ्या प्रकारानुसार आत्मा व परमात्मा यांचे होणारे मिलन हाच "योग" या शब्दाचा मुख्य अर्थ आहे. लोकामध्ये अनित्य फळ देणाऱ्या वस्तूंच्या योगाचा जो अर्थ केला जातो तो गौण अर्थ आहे. ज्ञानी पुरुष या व्यावहारिक अर्थाचा पूर्णपणे त्याग करून या निकृष्ट आणि गौण अर्थाऐवजी मुख्य अर्थाचे ग्रहण करतात. हा योग ज्ञानसाधनपरक असून मोक्षदायक आहे.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये मुक्तीचा सोपान अर्थात् जिना असलेल्या अशा गुह्यतर किंवा रहस्यतम योग-शास्त्राचे प्रतिपादन केलेले आहे. हा योग हे भगवत्तत्त्व आहे; कारण की, हे साक्षात् भगवान् श्रीगोपालकृष्णनाथमहाराज यांच्या मुखातून अमोघ वचना-मृताच्या रूपात बाहेर पडलेले आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथात याविषयी असे म्हटले आहे की -

हन्त रहस्यं भणामो मूढा! मा भ्रमत गर्भगोलेषु।
अत्यासन्नं हृदयं पर्यालोचयत तस्योद्योगम्।।६९।।

अर्थ :- मी अत्यंत गूढ रहस्याचे प्रकाशन करीत आहे. लोकमाया-अंधकाररूप विश्वप्रपंचाने ग्रासलेले लोकहो! वारंवार जन्ममरणाच्या चक्र-वासामध्ये भ्रमित होऊ नका. अंतर्वर्ती हृदयाच्या उद्योगरूप मोक्षाचे चिंतन

करा. स्वसंवेद्य परमतत्त्वाचा साक्षात्कार हेच साध्य आहे.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी **"श्रीगोरक्षशतक"** या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

शमनं भवतापस्य योगं भजत सत्तमाः।।६।।

अर्थ :- हे सत्पुरुषहो! या योगाचे सेवन करा!! हा योग संसाराचे त्रिविध ताप शमवितो.

या योगाच्या अभ्यासाने सांसारिक दुःख आणि भवबंधन समाप्त होते. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांच्या दृष्टीने योग हे वेदकल्पतरूचे अमृतफळ असून विद्वानांच्या द्वारा किंवा आत्मज्ञानाच्या मर्मज्ञाच्या द्वारा या अमृतफळाचा आस्वाद घेतला जातो. साधकभक्तयोगिशिष्याने याचे सेवन करून कैवल्याची प्राप्ती करून घेणे आवश्यक आहे.

"श्रीमहार्थमंजरी" या ग्रंथामध्ये महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी उपरोक्त सिद्धान्त अत्यंत उत्कृष्ट रूपाने प्रतिपादन करताना असे म्हटले आहे की, महार्थतत्त्वरूपी योगामृताचे सेवन केल्याने साधकभक्तयोगिशिष्याचे भवबंधन समाप्त होत असते आणि त्याच्या सांसारिक दुःखाची आत्यंतिक निवृत्ती होऊन मोक्षप्राप्ती होते. परमात्म्याचे किंवा स्वसंवेद्य अलखनिरंजनाचे चिंतन श्रेयस्कर आहे. याच्या व्यतिरिक्त फळाच्या कामनेने अनात्म वस्तूचे अनुष्ठान करणे योग्य नाही. आत्मतत्त्व किंवा परमात्मतत्त्व यांच्या चिंतनामध्ये रुची हाच विधी आहे. जेथे याचा अभाव आहे तेथेच निषेध आहे. एकमात्र परमात्म्याचेच चिंतन श्रेयस्कर आहे. हा आमच्या हृदयात राहून स्पंदित होणाऱ्या पारमेश्वर विमर्शस्वरूप भावाचा विवेक आहे. हेच परमज्ञान आहे. हा आमच्या हृदयातील पारमेश्वरस्वरूपानुभवाचा प्रकाश आहे. ही गोष्ट स्पष्ट आहे की, ज्या परमतत्त्वामध्ये मन पूर्ण विश्रांतीचा अनुभव घेते तेच आमच्या कल्याणाचे श्रेयस्कर साधन आहे. साधकभक्तयोगिशिष्यासाठी ते सर्वथा आचरणीय आहे. हीच योगज्ञानामृताच्या रसास्वादनाची संपूर्ण वैधता अर्थात् योग्यता आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी **"श्रीमहार्थमंजरी"** या ग्रंथामध्ये आपले मत व्यक्त करताना स्पष्टपणे असे म्हटले आहे की -

यत्र रुचिस्तत्र विधिर्यत्रेयं नास्ति तत्र च निषेधः।
इत्यस्माकं विवेको हृदयपरिस्पन्दमात्रशास्त्राणाम्।।७।।

अर्थ :- लोकव्यवहारामध्ये ज्या वस्तूची इच्छा होते त्या वस्तूचा निषेध केलेला आहे आणि लोकव्यवहारात ज्या वस्तूंचा निषेध केलेला आहे त्यात

रुची ठेवावे असे म्हटले आहे. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाच्या या गाथेमध्ये असे स्पष्टपणे म्हटले आहे की, यात योगाच्या भूमीवर आत्मचिंतनाविषयी आवड ठेवावी आणि अनात्मचिंतनाचा निषेध करावा असे प्रतिपादन केलेले आहे.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांच्या "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये संपूर्ण नाथयोगाचे चित्रण केलेले आढळून येते अर्थात् या ग्रंथामध्ये नाथ-योगाची संपूर्ण माहिती आलेली आहे. श्रीशिवोपदिष्ट योगोपदेशामृत महाज्ञान हा महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांच्या "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाच्या रचनेचा आधार आहे. हे महाज्ञान परंपरागत योगाचे सारतत्त्व आहे. महाभारताच्या युद्धक्षेत्रामध्ये भगवान् श्रीगोपालकृष्णनाथमहाराजांनी अर्जुनाला या महाज्ञानाचा उपदेश केला होता. काश्मीरमध्ये (तथाकथित) नाथयोगी श्रीअवतारकनाथ यांनी प्रवर्तित केलेली नाथयोगाची एक परंपरा चालत आलेली आहे, अशी एक मान्यता आहे. या संदर्भावरून नाथयोगामध्ये ज्ञानयोगमयी भावनेच्या अभ्यासाने परमेश्वरी पराशक्तीच्या बारा रूपांची उपासना केली जाते. या उपासनेलाच "**क्रमदर्शन**" असे म्हणतात. याला त्रिकयोगाच्या शाक्तोपाया-मध्ये स्थान दिलेले आहे. याचा संबंध कौलपरंपरेशी असून महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ द्वारा प्रतिपादित नाथयोगाशी नाही. "**श्रीमहार्थमंजरी**" हा ग्रंथ शुद्धनाथयोगाचे प्रतिपादन करणारा आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. असे असले तरी वेळोवेळी या ग्रंथाला आगमोक्त तांत्रिक भावनांच्या द्वारा आच्छादित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये नाथ-संप्रदायाचे प्रवर्तक महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी वर्णिलेल्या सिद्धान्ताचे (तथाकथित) क्रमदर्शनाशी कसलेही साम्य नाही, अशी धारणा करणे म्हणजे "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाचे नाथयोगस्वरूप बिघडविणे किंवा विकृत करणे आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये स्पष्टपणे असे म्हटले आहे की -

क्रमिको भवति न देवस्तस्य कथं कालकल्मषस्पर्शः।
नित्यनिरावरणस्यापि को जीवतो मोक्षप्रत्यूहः।।५३।।

अर्थ :- विश्वात्मक श्रीपरमेश्वर देवता अनादि, अनंत, नित्य आणि निरावरण किंवा अलखनिरंजन आहेत. ते सनातन, सार्वकालिक आणि सर्वव्यापक आहेत. त्यांना क्रमशः काळाचा कलंक स्पर्शही करू शकत नाही. जिवंतपणी जीवन्मुक्तिस्वरूपामध्ये त्यांच्यासाठी मोक्षरूप विघ्नाचा

प्रश्नच असत नाही. ते नित्य मुक्त आणि विश्ववैचित्र्यविकल्पाच्या पलीकडे आहेत. विश्वव्यापक नित्य निरावरण मायारहित अलखनिरंजन श्रीपरमेश्वर कालकल्मषस्पर्शाच्या पलीकडे असून अकाल, स्वसंवेद्य आणि सहज प्राप्त आहेत. यात पृथकता किंवा भेद नाही. ते सर्वव्यापक आहेत आणि अकाल आहेत. श्रीपरमेश्वर हे निष्प्रंपच आणि निष्कल आहेत. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये हेच नाथयोगतत्त्वामृत विशदता आणि व्यापकता यांनी अभिव्यक्त होऊन अनुस्यूत झालेले आहे.

"**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाच्या उपक्रमामध्ये मूळरूपाने होणारे नाथयोगतत्त्वाचे विस्तारपूर्वक अभिव्यंजन झालेले असून त्याचेच प्रत्यक्षात बीजारोपण उपलब्ध होत असते. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी याविषयी असे म्हटले आहे.

इति महति रहस्योन्मीलने मङ्गलाय।
प्रभवति मम संविद् योगिनीनां प्रसादः।।

अर्थ :- हे परमयोगरहस्य आहे. याचे उन्मीलन मंगलमय आणि अंतर्ज्योतीच्या प्रकाशनाचे माध्यम आहे. श्रीयोगिनीदेवीच्या प्रसादाने माझी संवित्शक्ती जागृत होऊन हे रहस्य प्रकट झाले आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांचे हे कथन त्यांच्या आंतरिक स्पृहेचे किंवा शुभकामनेचे द्योतक आहे. स्वप्नामध्ये प्रकट होऊन योगिनीने महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांना "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाच्या शब्दांकनाची प्रेरणा प्रदान केली होती. यासाठी हा ग्रंथ योगिनीचा अनुग्रह किंवा प्रसाद आहे. याविषयी महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये "**परिमल**" या टीकेच्या मंगलाचरणातील दुसऱ्या श्लोकामध्ये असे म्हटले आहे की -

जयत्यमूलमम्लानमौत्तरं तत्त्वमद्वयम्।

अर्थ :- अमूल म्हणजे मूळरहित, अम्लान म्हणजे तेजस्वी आणि औत्तर म्हणजे सर्व श्रेष्ठ अशा अद्वयतत्त्वाचा विजय असो किंवा हे तत्त्वच विजयी होते.

अद्वयतत्त्व हे औत्तर किंवा उत्तराम्नायतत्त्व अर्थात् ज्या तत्त्वाहून श्रेष्ठ असे अन्य काहीही नाही असे आहे. या अद्वयतत्त्वाचे "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात प्रतिपादन केले आहे. हे अद्वयतत्त्व "**श्रीस्पंदशास्त्र**" या ग्रंथाला पूर्णपणे व्यापून राहिलेले आहे. हे अद्वयतत्त्व श्रीशिवभक्तिमय, अमृतरूप, आणि मकरंदविलसितमहोत्पलरूप अमल किंवा निर्मळ मायोपाधिरहित आणि

अमूर्त तत्त्व आहे. हे सर्वोपास्य परमात्मतत्त्व आहे. हे औत्तरतत्त्व हेच क्रमदर्शन आहे. श्रीशैवागम पंचवक्त्र श्रीशिवांनी उत्तर मुखारविंदातून या तत्त्वाचा उपदेश केलेला आहे अशी शैवपरंपरा आहे. हे औतराम्नाय दर्शन अत्यंत निर्मळ सच्चिदानंद ब्रह्म श्रीशिवांचे प्रतिपादन करणारे असे आहे. हे तत्त्व नाथयोगपरंपरेला पोषक आहे.

यामुळे या परम औत्तराम्नाय तत्त्वाच्या किंवा सच्चिदानंद श्रीशिवांच्या चिंतनामध्ये श्रीसद्गुरूंच्या करुणामयी मूर्तीची शक्तिमान् भूमिका स्वीकारलेली आहे. ही श्रीसद्गुरूंची कृपामूर्ती स्वसंवेद्य तत्त्वाची साक्षात्कारिणी आहे अर्थात् स्वसंवेद्य तत्त्वाचा साक्षात्कार करून देणारी आहे. ही कृपामूर्ती मुक्तिदायक आणि स्वरूपप्रतिष्ठादात्री आहे. नाथयोगदर्शनामध्ये श्रीसद्गुरूंचे महत्त्व हे सर्वथा अभिवंदनीय आहे. श्रीसद्गुरूंच्या माहात्म्याने साधकभक्तयोगिशिष्य हा योगसिद्धीचा अधिकारी होत असतो. या नाथयोगशास्त्रामध्ये श्रीसद्गुरूंच्या द्वारा योगाच्या शक्तिमयतेचे वर्णन केलेले आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीयोगबीज**" या ग्रंथात याविषयी असे म्हटले आहे की -

योगात्परतरं पुण्यं योगात्परतरं सुखम्।
योगात्परतरं सूक्ष्मं योगमार्गात्परं न हि।।८७।।

अर्थ :- योग हेच परमपुण्य आहे. योग हेच परम सुख आहे. योग हेच परमसूक्ष्मज्ञान आहे. योग हाच सर्वश्रेष्ठ मार्ग आहे.

"**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये परमपुण्यरूप, परमसुखरूप व परमसूक्ष्मज्ञानरूप अशा या हितकारक व सर्वश्रेष्ठ योगमार्गाचे प्रतिपादन सहजसुलभपणे केलेले आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या रचनेच्या माध्यमातून जे महार्थतत्त्वाचे प्रकाशन केले आहे त्याचे श्रेय त्यांनी श्रीसद्गुरुकृपेला दिलेले आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ हे महाप्रकाशस्वरूप आहेत. महाप्रकाशाच्या श्रीचरणी नत होणे याचा अर्थ सद्गुरू योगींद्र श्रीमत्स्येंद्रनाथ यांची चरणवंदना असा आहे.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये सुरुवातीलाच असे म्हटले आहे की -

नत्वा नित्यशुद्धौ गुरोश्चरणौ महाप्रकाशस्य।
ग्रश्नाति महार्थमञ्जरीमिमां सुरभिं महेश्वरानन्दः।।१।।

अर्थ :- सच्चिदानंदस्वरूप महाप्रकाश श्रीसद्गुरूंच्या अर्थात् महासिद्धयोगींद्र श्रीमत्स्येंद्रनाथांच्या नित्य व शुद्ध अशा दोन्ही श्रीचरणांवर श्रद्धापूर्वक

नतमस्तक होऊन मी महेश्वरानंद किंवा गोरक्ष महायोगज्ञानस्वरूप **"श्रीमहार्थमंजरीसुरभी"** ग्रंथरूपात बद्ध करीत आहे.

"महेश्वरानंद" हे महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांचेच एक नाव आहे. या दृष्टीने त्यांना "श्रीशिवगोरक्षरूप महेश्वरानंद" असे म्हणण्याला काहीच हरकत नाही. परंतु "श्रीमहेश्वरानंद" यांना श्रीगोरक्षनाथ असे म्हणणे योग्य नाही; कारण की, कोणतीही व्यक्ती आपल्या नावाचे महत्त्व वाढविण्यासाठी स्वतःला "गोरक्ष" म्हणण्याला संकोच करू शकत नाही. **"श्रीमहार्थमंजरी"** या ग्रंथाची रचना महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी केलेली आहे. त्या ग्रंथावर त्यांची **"परिमल"** या नावाची स्वोपज्ञटीका आहे; परंतु काळाच्या ओघात या टीकेच्या विवर्धनात थोडीशी वाढ करून कोणीही महेश्वरानंद या नावाची व्यक्ती स्वतःला "गोरक्ष" असे म्हणवून घेऊ शकते. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी सत्तर गाथांमध्ये स्वप्नात प्रकट झालेल्या योगिनीच्या कृपेने **"श्रीमहार्थमंजरी"** या ग्रंथाची रचना केली, ही गोष्ट निश्चित आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी **"स्वोपज्ञ परिमल व्याख्या"** या टीकेच्या मंगलाचरणाच्या बाराव्या श्लोकामध्ये असे म्हटले आहे की -

स्वप्नसमयोपलब्धा सा सुमुखी सिद्धयोगिनी देवी।
गाथाभिः सप्तत्या स्वापितभाषाभिरस्तु सम्प्रीता।।

अर्थ :- स्वप्नकाळामध्ये आपल्या भाषेमध्ये अभिव्यक्त होणाऱ्या सत्तर गाथा **"श्रीमहार्थमंजरी"** या ग्रंथाच्या रूपात प्रदान करणारी श्रीसिद्धयोगिनी-देवी माझ्यावर प्रसन्न होवो. याचबरोबर या क्रमामध्ये त्यांनी तेराव्या श्लोकामध्ये मंगलाचरणासाठी असे म्हटले आहे की -

वर्धतां देशिकः श्रीमान् संविन्मार्गाश्च वर्धताम्।
माहेश्वराश्च वर्धन्तां वर्धतां च महेश्वरः।।१३।।

अर्थ :- (माझ्या) श्रीसद्गुरूंचे अर्थात् महासिद्धयोगींद्र श्रीमत्स्येंद्रनाथांचे यश वृद्धिंगत होवो! स्वसंवेद्य द्वैताद्वैतविलक्षण अशा ज्ञानमार्गाचा प्रसार होवो! श्रीमाहेश्वरांची अर्थात् श्रीनाथशिवयोग्यांची किंवा श्रीशैवांची कुलवृद्धी होवो. सर्वांना श्रीशिवांचा अधिकाधिक अनुग्रह प्राप्त होवो.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी आपल्या लोकवाणीमध्ये अलखनिरंजन अद्वयतत्त्वाच्या साक्षात्कारावर जोर देत श्रीसद्गुरूंच्या अनुग्रहप्राप्तीचे महत्त्व स्वीकारलेले आहे. त्यांनी **"श्रीगोरखबानी-सबदी"** या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

अबूझी बूझिलै हो पंडिता अकथ कथिलै कहांणी।
सीस नवांवत सतगुर मिलीया जागत रैंण बिहांणी।।२२२।।

अर्थ :- अलखनिरंजन परमात्मा हा ज्ञानविज्ञान यांच्या पलीकडे आहे. त्याचा साक्षात्कार अनुभवैकगम्य आहे. अंतर्चक्षूने किंवा ज्ञाननेत्राने परमात्म्याचा साक्षात्कार होत असतो. श्रीसद्गुरूंच्या ज्ञानाच्या प्रकाशामध्ये परमतत्त्वाची स्वरूपानुभूती येते आणि परमतत्त्वाचे वर्णन करता येते. श्रीसद्गुरूंच्या ज्ञानामुळे संसाररूपी रात्रीचा शेवट होतो

"**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथात अंतर्विवेकगत श्रीसद्गुरुकृपैक साध्य अर्थात् आत जागृत होणाऱ्या विवेकरूपी श्रीसद्गुरूंच्या केवळ कृपेमुळे साध्य होणारे अर्थात् प्राप्त होणारे श्रीशिव साक्षात्काराच्या रहस्याचे प्रकाशन केलेले आहे. नाथसिद्ध श्रीपृथ्वीनाथ अर्थात् श्रीप्रिथीनाथ यांनी आपल्या वाणीमध्ये याच सत्याचे अर्थात् श्रीसद्गुरूंच्या अनुग्रहाने होणाऱ्या साक्षात्कृत तत्त्वाचे प्रकाशन केलेले आहे. नाथसिद्ध श्रीपृथ्वीनाथ यांनी "**श्रीनाथसिद्धों की बानियाँ**" यामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

अकथ अनिछर बंधन मुक्ता। पुस्तकि शिष्यानवाणी।
देवनि दुरलभ नाहिं अगोचर। परचै गुरु मुषिजांणीं।।५४७।।

अर्थ :- जरी देव अर्थात् परमात्मा हा अकथनीय अर्थात् कोणत्याही कथनाच्या पलीकडचा, इच्छाविरहित, सर्व बंधनांपासून मुक्त, पुस्तकी विद्येच्या पलीकडे असलेला, दुर्लभ व अगोचर असला तरी श्रीसद्गुरुकृपेने म्हणजे शक्तिपातयोगदीक्षेने त्याचा साक्षात्कार होतो.

महर्षी श्रीपतंजलीमहामुनी यांनी "**श्रीपातंजल योगदर्शन**" या ग्रंथामध्ये निर्बीज समाधिगत स्वरूपस्थितीसाठी जे "**ईश्वरप्रणिधानाद्वा।।समाधिपाद १.२३।।**" हे सूत्र दिलेले आहे. त्याचा एकमात्र अर्थ परमात्मप्रकाशामध्ये आत्मदर्शन असा आहे. हे आत्मदर्शन म्हणजेच स्वसंवेद्य तत्त्वामध्ये किंवा परमपदामध्ये प्रतिष्ठा होय. हेच "**श्रीमहार्थमंजरी**" या रचनेचे परम तात्पर्य आहे. "**ईशावास्योपनिषद्**" या ग्रंथामध्ये या परमात्मतत्त्वाच्या उपासनेवर जोर दिलेला आहे. त्यात असे म्हटले आहे की -

सम्भूतिञ्च विनाशञ्च यस्तद्वेदोभयं सह।
विनाशेन मृत्युन्तीर्त्वा सम्भूत्यामृतमश्नुते।।१४।।

अर्थ :- जो साधकभक्तयोगिशिष्य या दोघांना अर्थात् अविनाशी परमेश्वराला आणि विनाशशील देवादि यांना बरोबरच जाणून घेतो तो विनाशशील

देवादींच्या उपासनेने मृत्यूच्या पलीकडे जाऊन अविनाशी परमेश्वराच्या उपासनेने अमृताचा भोग घेतो किंवा अविनाशी व आनंदमय श्रीपरमेश्वर अर्थात् परब्रह्म यांचा प्रत्यक्ष साक्षात्कार करून घेत असतो.

हाच "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाच्या चिंतनाच्या स्तरावर अथवा दर्शनाच्या भूमीवर होणारा अलखनिरंजनाचा साक्षात्कार आहे. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये "**ईशावास्योपनिषद्**" या ग्रंथातील सिद्धान्ताची पुष्टी केलेली आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथांनी विश्वप्रपंचाच्या अंकुराचा नाश करून स्वरूपामृताच्या रसास्वादनाची साधकभक्तयोगिशिष्यांना सत्प्रेरणा प्रदान केलेली आहे.

"**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये परमात्म्याविषयी असे म्हटले आहे की -

ये कुलकुम्भसुधासवपानमहोत्सवसुखे प्रवर्तन्ते।
ते खलु विकल्पाङ्कुरान् रसिका उपदंष्टुं प्रगल्भन्ते।।५८।।

अर्थ :- जे साधकयोगी किंवा उपासक परम श्रीशिवांच्या स्वरूपामृत कुंभाच्या रसास्वादनाच्या महोत्सवरूप आनंदामध्ये प्रवृत्त राहतात ते उपासना-रसिक निःसंदेह जन्ममरणरूप विश्ववैचित्र्यविकल्प-विश्वप्रपंच यांच्या अंकुरांना नष्ट करून टाकण्यात समर्थ होत असतात. **श्रुतीमध्ये "रसो वै सः।"** अर्थात् "तो परमात्मा अमृतरसरूपच आहे," या रूपामध्ये परमात्म्याचे प्रतिपादन केलेले आहे. विश्वव्यापक श्रीशिव हा "कुल" या शब्दाचा अर्थ आहे. कुलामृताच्या रसपानाने जीव पशुभावापासून मुक्त होऊन श्रीशिव-स्वरूप होतो. हे त्याच्या श्रीशिवस्वरूपिणी उपासनेचे परमतात्पर्य आहे. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी औत्तरा-म्नायाच्या प्रकाशामध्ये याचे प्रतिपादन केलेले आहे.

संपूर्ण नाथयोगसाहित्य तसेच आपल्या नाथसिद्धांची वाणी यात औत्तराम्नाय महार्थतत्त्वाचे असाधारणत्व प्रतिपादन केलेले आढळून येते. याविषयी असे म्हटले आहे की, विकल्प संस्कार हा निर्विकल्पस्वरूप अशा परतत्त्वज्ञान-स्वरूपिणी मुक्तीचा उपाय आहे. परंतु हे क्रमपूर्वक संपादित झाल्याने याला "**क्रमदर्शन**" असे म्हणतात. औत्तराम्नायाचे प्रतिपादन करताना "**श्रीमहार्थ-मंजरी**" या ग्रंथातील पहिल्या गाथेच्या **परिमलव्याख्येमध्ये** असे निरूपण केलेले आहे की, **औत्तराम्नायाद्यशेषशास्त्रार्थावबोधशिक्षाशालित्वात्।** अर्थात् "औत्तराम्नायादि सर्व शास्त्रांचे ज्ञान व शिक्षण देण्यास तत्पर असल्यामुळे" नाथतत्त्वज्ञानाच्या महार्थतत्त्वाचे औपनिषद् प्रतिपादन हे "**कठोपनिषद्**" या

ग्रंथात पुढीलप्रमाणे उपलब्ध होते. मनुष्याचे शरीर हे जीर्ण होणारे आहे व ते मरणधर्मा आहे. ही गोष्ट जाणणारा कोणताही मनुष्य विषयसुखामध्ये आसक्त होऊन वैराग्याची उपेक्षा करून मरणाचा स्वीकार करू शकत नाही. हीच गोष्ट महार्थतत्त्वाच्या रूपामध्ये अमृततत्त्वाचे प्रतिपादन करीत आत्म्याच्या अमरतेवर प्रकाश टाकीत "**कठोपनिषद्**" या ग्रंथात सांगितली आहे. श्रीयम यांनी श्रीनचिकेत याला उपदेश करताना "**कठोपनिषद्**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

अजीर्यताममृतानामुपेत्य जीर्यन्मर्त्यः क्धःस्थः प्रजानन्।
अभिध्यायन्वर्णरतिप्रमोदानातिदीर्घे जीविते को रमेत्।।१-१-२८।।

अर्थ :- जो केवळ शारीरिक वर्णाच्या प्रेमाने प्राप्त होणाऱ्या स्त्रीसंभोग आदि सुखांना अस्थिर रूपात पाहत अतिदीर्घ जीवनात सुख मानील तो साधकभक्तयोगिशिष्य कधीही म्हातारपणाने ग्रस्त होणार नाही. अशा अमर पुरुषात पोहोचून खाली पृथ्वीवर राहणारा कोण विवेकी मनुष्य असेल?

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

इत्थं प्राकृतसूत्रसप्ततिसमुल्लासैकसन्धायिनीं
जाग्रत्तत्क्षणनिर्विशेषस्वप्नावतीर्णां प्रतिज्ञोत्तराम्।।
लोकोल्लङ्घनयोग्यसिद्धिपदवीप्रस्थानबद्धोद्यमां
कन्थाशूलकपालमात्रविभवां वन्दे तां योगिनीम्।।७१।।

अर्थ :- अशा प्रकारे सत्तर प्राकृत भाषेतल्या गाथांच्या उत्पत्तीमध्ये उल्लास प्रदान करणारी, जाग्रत अवस्थेमध्ये स्वाभाविक, निर्विशेष स्वप्नावस्थेमध्ये अभिव्यक्त, प्रकट अथवा अवतरित होणारी, पूजोपकरणदक्षिणा आदींच्या पलीकडील स्वहस्तमुद्राद्वारा आपल्या हृदयातल्या करुणेचे प्रकाशन करणारी, अलौकिक योगैश्वर्य किंवा योगसिद्धींनी संपन्न, कंथा, शूल आणि कपालमात्र धारण करणाऱ्या अशा योगिनीला मी नमस्कार करतो.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी जाग्रत अवस्थेमध्ये किंवा निर्विशेष स्वप्नामध्ये अभिव्यक्त होणारी किंवा प्रकट होणारी किंवा अवतरित होणारी, स्वहस्तमुद्रेने आपल्या हृदयाच्या करुणेचे प्रकाशन करणारी, अलौकिक योगैश्वर्य अथवा योगसिद्धीने संपन्न, कंथा, शूल आणि कपाल हेच केवळ धारण करणाऱ्या योगिनीपासून "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाच्या सत्तर गाथांच्या रचनेचा उल्हास प्राप्त करून घेतला. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी या

गोष्टीचा स्वीकार केलेला आहे आणि योगिनीला वंदन केलेले आहे.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी आपल्या प्रसिद्ध **"श्रीयोगबीज"** या ग्रंथामध्ये महार्थयोगाचे प्रतिपादन करताना याविषयी असे म्हटले आहे की -

शुद्धे चेतसि तस्यैव स्वात्मज्ञानं प्रकाशते।।८५।।

अर्थ :- चित्त निर्मळ झाल्यानंतरच आत्मज्ञान प्रकाशित होत असते आणि स्वसंवेद्य परमतत्त्वाचा साक्षात्कार होतो. शुद्ध चित्तामध्येच अमृतविद्या अर्थात् महार्थतत्त्वस्वरूपिणी योगविद्येची सिद्धी होते.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी **"श्रीमहार्थमंजरी"** या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

एनमेवामृतमयं मथ्नाति मन्थानभैरवो देवः।।६८।।

अर्थ :- भगवान् श्रीशिव अर्थात् श्रीभैरव महार्थतत्त्वस्वरूपिणी योगविद्येचे मंथन करतात आणि ती योगविद्या योगोपदेशामृताच्या रूपामध्ये योगसिद्धियुक्त श्रीसद्गुरूंच्या द्वारा लोकामध्ये प्रसारित अथवा प्रवाहित करतात.

हेच **"श्रीमद्भगवद्गीता"** या ग्रंथामध्ये अध्यात्मविद्येच्या रूपात सांगताना असे म्हटले की -

सर्गाणामादिरन्तश्च मध्यं चैवाहमर्जुन।
अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम्।।१०.३२।।

अर्थ :- हे अर्जुना! सर्व सृष्टीचा आदि, अंत व मध्यही मीच आहे. तसेच मी सर्व विद्यांमध्ये अध्यात्मविद्या म्हणजे ब्रह्मविद्या आणि परस्परात विवाद करणाऱ्यांमध्ये तत्त्वनिर्णयासाठी केलेला वाद आहे.

"श्रीमहार्थमंजरी" या ग्रंथाच्या द्वारा आत्म्याचे सनातनत्व प्रतिपादित होत असते. यालाच श्रीभगवंतांनी **"श्रीमद्भगवद्गीता"** या ग्रंथामध्ये असे स्पष्टपणे म्हटले आहे की -

य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम्।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते।।२.१९।।

अर्थ :- जो या आत्म्याला मारणारा समजतो आणि जो याला मेलेला मानतो ते दोघेही खरे जाणत नाहीत; कारण हा आत्मा मारीत नाही आणि मारलाही जात नाही.

"कठोपनिषद्" या ग्रंथामध्येही याविषयी असे म्हटले आहे की-

हन्ता चेन्मन्यते हन्तुं हतश्चेन्मन्यते हतम्।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते।।१-२-१९।।

अर्थ :- जेव्हा मारणारा आत्म्याला मारण्याचा विचार करतो आणि मरून जाणारा आपण मेलो आहोत असे समजतो तेव्हा ते दोघेही ही गोष्ट जाणत नाहीत की हा मरत नाही आणि मारलाही जात नाही.

हा आत्मा अनादि आणि अनंत आहे. आत्मा हा कारण व कार्य यांनी रहित, सर्वथा एकरस आणि निर्विकार आहे. साधकभक्तयोगिशिष्याने भोगांची अनित्यता आणि आत्म्याची नित्यता यावर विचार करून द्वैताद्वैतविलक्षण, स्वसंवेद्य व अलखनिरंजनाच्या साक्षात्काराचा लाभ करून घेणे आवश्यक आहे. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाचे हेच योगज्ञानामृत अथवा परमतत्त्व आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

यत्किमपि येनकेनापि रूपेण यत्र कुत्रापि किं नास्ति।
तस्मादात्मा नित्यस्थिरः क्षणभङ्ग एवास्थिरो भवति।।५४।।

अर्थ :- आत्मा हा नित्य आहे आणि स्थिर आहे. तो ज्या कोणत्याही रूपात जसा कसा दिसतो तसा तो असत नाही. विश्वविकल्पामध्ये आत्म्याचे प्रकाश्यरूप क्षणभंगुर आहे. कालक्रमानुगत असल्यामुळे तो अस्थिर आहे अन्यथा सर्व काही परमात्मस्वरूप आणि स्वसंवेद्य अंतर्वर्ती परमतत्त्व परमात्मा आहे.

"**श्रीमद्भगवद्गीता**" हा ग्रंथ हे महार्थतत्त्वाचे अव्यय आणि अक्षर भांडार आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांची अशी वाणी आहे की, भगवान् श्रीगोपालकृष्णनाथमहाराजांनी शोकसंविग्नमानस, कर्त्तव्याकर्त्तव्यनिर्णयहीन, विभ्रमित आणि असत्यसंबंधसंमोहित अर्जुनाला ज्या तत्त्वाचा उपदेश प्रदान केलेला होता तेच "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाचे प्रतिपाद्य तत्त्व अथवा सिद्धान्त आहे. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाच्या तत्त्वसंपादनाची वाणी मंत्रमयी आहे. "मंत्रमयी" या शब्दाचा अर्थ अमोघ फलदायिनी असा आहे. भगवान् श्रीगोपालकृष्णनाथमहाराजांनी अर्जुनाला युद्धक्षेत्रात स्थित राहून युद्ध करण्याचा उपदेश दिला आणि पापबुद्धीचा त्याग करण्याचे शिक्षण दिले. त्याच प्रमाणे त्यांनी अर्जुनाला क्लीबता किंवा नपुंसकता आणि हृदयाचा दुबळेपणा यांचा पूर्णपणे त्याग करून आत्म्याच्या नित्यतेमध्ये प्रवृत्त होऊन कर्मयोगाच्या स्वीकृतीचे तत्त्व समजावून दिले. अर्जुनाने श्रीसद्गुरुरूप श्रीगोपालकृष्णनाथमहाराजांना असे सांगितले किंवा त्याला त्यांना असे सांगणे भाग पडले की, "मी व्यामोह किंवा अनित्य वस्तूंचा मोह सोडून दिलेला

आहे. आपण मला श्रेयाचे किंवा मोक्षाचे मर्म समजावून द्या. मी आपल्याला शरण आलेलो आहे आणि आपला शिष्य आहे." शिष्यभावाचा सम्यक् उदय झाल्यावरच शिष्य महार्थतत्त्वाचे श्रवण आणि आचरण या दोन्ही गोष्टी करण्याचा अधिकारी होत असतो. श्रीभगवंतांनी "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

योगः कर्मसु कौशलम्।२.५०।।

अर्थ :- कर्मातील अर्थात् श्रीसद्गुरुकृपेने म्हणजे शक्तिपातयोगदीक्षेने अनादिनिद्रिस्त आत्मचैतन्यशक्ती कुंडलिनी जागृत होऊन तिने सिद्धयोगाचे आतून होणारे साधन स्वतः करून श्रीशिवशक्तिसामरस्य प्राप्त करणे हाच कर्मबंधनातून सुटण्याचा उपाय आहे व यालाच योग असे म्हणतात.

श्रीभगवंतांनी "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

विहाय कामान्यः सर्वान्पुंमाश्चरति निःस्पृहः।
निर्ममो निरहङ्कारः स शान्तिमधिगच्छति।।
एषा ब्राह्मीस्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति।
स्थित्वास्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति।।२।७१-७२।।

अर्थ :- जो साधकभक्तयोगिशिष्य सर्व कामनांचा निःशेष त्याग करून ममतारहित, अहंकाररहित व स्पृहारहित म्हणजे निरिच्छ होऊन राहतो त्याला परमशांती प्राप्त होते.।।७१।। हे अर्जुना! ही श्रीशिवसामरस्ययुक्त समावेशाची प्राप्ती झालेल्या साधकभक्तयोगिशिष्याची स्थिती आहे. ही स्थिती प्राप्त झालेला साधक कधीही मोहित होत नाही आणि अंतकाली अर्थात् भयंकर दुःखकालात देखील या निष्ठेत किंवा स्थितीत स्थिर राहून ब्रह्मनिर्वाणाला अर्थात् मोक्ष, कैवल्य, अमात्रक स्थिती, अमनस्क स्थिती, सामरस्य किंवा समावेशाला प्राप्त होतो.।।७२।।

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

एनमेव महार्थं युद्धारम्भे पाण्डुपुत्रस्य।
षोडशसहस्त्रशक्तिर्देवः उपदिशति माधव इति शिवम्।।७०।।

अर्थ :- महाभारताचे युद्ध सुरू होण्याआधी मोहकलिग्रस्त पांडव अर्जुनाला सोळा हजार अर्थात् अनंत शक्तींनी संपन्न भगवान् लक्ष्मीपती श्रीमाधव यांनी महार्थतत्त्वाचा अर्थात् परंपराप्राप्त महायोगज्ञानामृताचा उपदेश केला होता.

हा महार्थ सर्व रहस्याचे प्रतिपादन करणारा महातत्त्वार्थ आहे. हे सत्‌ही नाही किंवा असत्‌ही नाही. महार्थतत्त्व हे उभयात्मक असल्याने अनुत्तर-द्वैताद्वैतविवर्जित दुर्विज्ञेय आहे. महार्थतत्त्व हे श्रीभगवदनुग्रहामुळे योग्य किंवा अधिकारी साधकभक्तयोगिशिष्याच्या हृदयामध्ये प्रकाशित होते. या महार्थतत्त्वाच्या वर्णनक्रमामध्ये श्रीभगवंतानी अर्जुनाला असे म्हटले होते की, "जेव्हा तू आपले मन केवळ माझ्यातच युक्त करशील, माझाच भक्त बनशील, माझेच पूजन करशील आणि मलाच नमस्कार करशील तेव्हाच तू पाश-बंधनातून मुक्त होऊ शकशील. मी तुला खरेच असे सांगत आहे की, तू मला प्रिय असल्याने तू मलाच प्राप्त करून घेशील किंवा माझ्याशी एकरूप होशील." श्रीभगवंतांना शरणागत होऊन सर्व धर्मांचा अथवा कर्तव्यकर्मांचा त्यात न्यास करणे, हे महार्थ या शब्दाचे तात्पर्य आहे. हाच शरणागतियोग आहे. हाच महार्थयोग श्रीभगवंतांनी श्रीसूर्यांना सांगितला. श्रीसूर्यांनी आपला पुत्र श्रीवैवस्वत मनू यांना आणि श्रीमनूंनी आपला पुत्र श्रीइक्ष्वाकू यांना हा महार्थ-योग सांगितला. श्रीभगवंतांनी **"श्रीमद्भगवद्गीता"** या ग्रंथामध्ये अर्जुनाला असे सांगितले की -

स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः ।।२.५।।

अर्थ :- मी हाच प्राचीन सिद्धयोग तुला सांगितलेला आहे.

हा सिद्धयोग निःसंदेह श्रीशिवमय आहे. श्रीशिवगोरक्ष महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांच्या द्वारा मी श्रीशिवोपदिष्ट योगामृतरूपामध्ये महार्थतत्त्व या नावाने या योगाचे निरूपण केलेले आहे. अदृश्य शक्ती सिद्धयोगिनीची कृपा अथवा प्रसन्नता हेच महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांच्या वाणीमध्ये महार्थतत्त्वाच्या अवतरणाचे मूळ कारण आहे. हे तत्त्व श्रीभगवंतांच्या मुखातून महार्थयोगाच्या रूपामध्ये निःसृत होऊन परंपराक्रमाने महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांच्या वाणीमध्ये प्रविष्ट होऊन महार्थतत्त्वाच्या रूपामध्ये निःसृत झाल्यामुळे किंवा बाहेर पडल्यामुळे परंपराक्रमाने महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांच्या वाणीचे अलंकरण बनू शकले. यावरून हे स्पष्ट होते की, महार्थरूप सिद्धयोगाचे स्वरूप नित्य, सनातन आणि निर्विकार आहे. श्रीशिवांनी याचा उपदेश केल्यामुळे हे शैवयोगामृत आहे तर भगवान् श्रीविष्णूंनी उपदेश केला असल्यामुळे हे वैष्णवयोगामृत आहे. ज्याप्रमाणे श्रीशिव आणि श्रीविष्णू यांच्यामध्ये स्वरूपतः पूर्ण अभिन्नता आहे त्याचप्रमाणे सिद्धयोग हा आपल्या स्वरूपामध्ये प्रतिष्ठित होऊन कोणत्याही प्रकारच्या

तथाकथित भेदाच्या पलीकडे आहे. यावरून असे लक्षात येते की, महार्थरूप सिद्धयोग म्हणजे परमात्मतत्त्वाची पूर्ण प्राणप्रतिष्ठा अर्थात् सच्चिदानंदमयतेचा अक्षरयोगज्ञानविग्रह आहे. त्यामुळेच हा महार्थरूप सिद्धयोग स्वसंवेद्य अलख-निरंजन परमात्मतत्त्वाच्या साक्षात्काराचे सुनिश्चित माध्यम होऊ शकला. "**श्रीमहार्थमंजरी**" हे योगज्ञानविग्रहाचे किंवा महार्थयोगाचे दिव्य वाङ्मय आहे.

"**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये वर्णिलेले महार्थतत्त्व किंवा महायोग-ज्ञानामृत साक्षात् श्रीशिवगोरक्ष महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांचे श्रीशिव-परंपरागत योगव्यक्तित्व आहे. यात त्यांची नाथयोगसिद्धी ही पूर्णपणे अभिव्यक्त झालेली आहे. त्यांनी काश्मीरपासून ते कन्याकुमारीपर्यंत विस्तृत महार्थ-तत्त्वाला काश्मीरच्या प्रत्याभिज्ञा दर्शनाने एकत्रित करून तीनशे वर्षात अर्थात् नवव्या शतकापासून ते अकराव्या शतकापर्यंत तंत्रीकृत करण्याचा प्रयत्न केला. श्रीअभिनवगुप्तपादाचार्य यांच्या परंपरेतील "श्रीमहेश्वरानंद" नावाच्या व्यक्तीने श्रीगोरक्षनाथ या नावाने आपली ख्याती स्थापित करून "**श्रीमहार्थ-मंजरी**"चा रचनाकार होण्याचा गौरव प्राप्त करून घेतला. परंतु हे नितांत भ्रमाचे कारण बनले; कारण की, "**श्रीमहार्थमंजरी**" हा मूळग्रंथ महासिद्ध-योगी श्रीगोरक्षनाथ यांनी लिहिलेला आहे. या ग्रंथाची "**परिमल**" नावाची त्यांची "**स्वोपज्ञ टीका**" आहे. त्या टीकेला काश्मीरचे श्रीशैवदर्शन आणि तंत्राचार यांना अनुरूप होईल असे संबंधित करण्याचा प्रयत्न केला गेला. दक्षिणभारतामधील केरळ प्रदेशात "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाला दाक्षिणात्य परंपरेने युक्त करून महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांचे पिता आणि श्रीसद्गुरू यांचे "माधव" आणि महाप्रकाशरूपात निरूपण केले गेले. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ हे महासिद्धयोगींद्र श्रीमत्स्येंद्रनाथ यांच्या दिव्य विभूतीपासून उत्पन्न झालेले अमरकाय महासिद्धयोगी आहेत आणि प्रत्येक युगामध्ये प्रकट होत राहण्याचे श्रेय त्यांना मिळालेले आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ नाथ-योगसाधनेचे अधिकारी पुरुष असून त्यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

यथा तव स्थितिस्तथास्स्व निश्चिन्त इति खलु प्रतिष्ठितोऽर्थः।
तत्राप्यस्ति विवेक एवमुपदिशति तस्य कोऽन्यः।।६४।।

अर्थ :- जशी स्थिती आहे त्या स्थितीत निश्चिंत व अव्याकुळ होऊन अर्थात् व्याकुळ न होता प्रतिष्ठित राहा. स्वरूपात स्थित राहणे आवश्यक

आहे. हाच विवेक आहे. अशा तऱ्हेचा उपदेश सिद्धयोग्याशिवाय अन्य कोण देऊ शकतो? ही तंत्र किंवा दर्शन याच्या सीमेच्या नितांत पलीकडील स्वरूपाची स्थिती आहे

हे अंतर्मुखी सिद्धयोगसाधनेचे उपदेशामृत आहे. संकल्प-विकल्परूप चिंतेचे अतिक्रमण करून चिंतारहित आणि व्याकुळतारहित होण्यात खरा विवेक प्रतिष्ठित असतो. श्रीशिवस्वरूप स्वसंवेद्य नाथ-अलखनिरंजनाच्या साक्षात्काराचा हाच सोपान आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी अपार करुणेने किंवा दयेने द्रवित होऊन मराठी भाषेमध्ये अर्थात् महाराष्ट्रीय प्राकृत भाषेमध्ये लोकहित नजरेसमोर ठेवून "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाची रचना केली; परंतु प्रत्येक गाथेला संस्कृतमध्ये रूपांतरित करून संस्कृतमध्ये त्यांनी "**स्वोपज्ञ परिमल टीका**" प्रस्तुत करून नाथयोगाच्या तत्त्वामृताचे युक्तियुक्त विश्लेषण केलेले आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाच्या एकाहत्तराव्या गाथेमध्ये याविषयी असे म्हटले आहे की, "**इत्थं प्राकृतसूत्रसप्तति।**" त्यांच्या स्वोपज्ञ टीकेची दोन संस्करणे आहेत. एक त्रिवेंद्रम संस्कृत ग्रंथ मालेच्या द्वारा विस्तृतरूपात प्रकाशित झालेले आहे आणि दुसरे काश्मीर ग्रंथमालेच्या द्वारा संक्षिप्त रूपात प्रकाशित झालेले आहे.

"**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की, श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांच्या परंपरेचे श्रीमहेश्वरानंद हे चौदाव्या शतकात विद्यमान होते. अशा स्थितीत ही गोष्ट निर्विवाद आहे की, हे श्रीमहेश्वरानंद या "**श्रीमहार्थमंजरी**" ग्रंथाचे प्रणेते असू शकत नाहीत. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथात वर्णन केलेले साधनातत्त्व हे नाथयोगपरक आहे. तथाकथित श्रीमहेश्वरानंद यांनी स्वोपज्ञ टीकाक्रमामध्ये स्वतःला "**श्रीकुंडलाभरण,**" "**श्रीकोमलवल्लीस्तव,**" "**श्रीपरास्तोत्र,**" "**श्रीपादुकोदय,**" "**श्रीमहार्थोदय**" आदि अनेक ग्रंथाचा प्रणेता म्हटलेले आहे. नाथयोगामध्ये कोणत्याही परंपरेमध्ये श्रीशिवगोरक्ष महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांचा अशा ग्रंथांच्या प्रणयनामध्ये कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. यावरून तथाकथित श्रीगोरक्षनामधारी श्रीमहेश्वरानंद कोणत्याही परिस्थितीमध्ये या महायोगशास्त्राचे किंवा "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाचे रचनाकार होऊ शकत नाहीत. श्रीमहेश्वरानंद यांनी श्रीमहार्थमंजरीपरिमलटीकेमध्ये महार्थ, औतराम्नाय व क्रमसरणी इत्यादि नावांच्या क्रमदर्शनाची व्याख्या केलेली आहे. त्यांच्या दृष्टीने क्रमदर्शन हा

त्रिकदर्शनाचाच एक भेद आहे. या क्रमदर्शनाचे श्रीशिवानंद हे प्रथम आचार्य आहेत असे मानलेले आहे. श्रीशिवानंद यांना अन्य नाथसिद्ध परंपरेच्या अंतर्गत "श्रीतारकनाथ" असे म्हटले आहे. श्रीमहेश्वरानंद यांनी क्रमदर्शनाच्या तत्त्वाच्या परिमलामध्ये पुढे जाऊन संवर्धन किंवा मिश्रण केले असल्याची शक्यता आहे. ते काही असो "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाची मूळ रचना ही महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांची देणगी आहे. यामुळे नाथयोगाच्या प्रकाशनात फारच साहाय्य मिळालेले आहे. अशा तऱ्हेने "**श्रीमहार्थमंजरी**" ही नाथ-योगदर्शनाच्या अंतर्गत एक महनीय कृती आहे. श्रीमहेश्वरानंद यांनी स्वतःला लोकदृष्टीने श्रीगोरक्षनाथ असे म्हटलेले आहे आणि देशिक दृष्टीने परिमलाच्या मंगलाचरणामध्ये श्रीसद्गुरूंना "महाप्रकाश" असे म्हटले आहे. टीकेच्या समापनामध्ये त्यांनी असे प्रतिपादन केलेले आहे की, माझे पिता माधव आहेत. ते प्रकाश आहेत आणि नाथ आहेत. यांच्या या कथनावरून माधव हे नाथस्वरूप प्रकाश आहेत. महाप्रकाश हे महासिद्धयोगींद्र श्रीमत्स्येंद्रनाथ आहेत; कारण की, मंगलाचरणाच्या सहाव्या श्लोकामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

नमो निखिलमालिन्यविलापनपटीयसे।
महाप्रकाशपादाब्जपरागपरमाणवे।।६।।

अर्थ :- श्रीशिवस्वरूप असलेल्या श्रीमत्स्येंद्रनाथांचे परमदिव्य असे चरणकमल हे सर्व मायिक मालिन्य व मायोपाधिजन्य प्रपंचरूपी अंधकार नष्ट करून महाप्रकाश उत्पन्न करणारे आहेत. त्या श्रीमत्स्येंद्रनाथांच्या परमदिव्य अशा चरणकमलांच्या परमाणूंना अर्थात् त्यांच्या सूक्ष्मातिसूक्ष्म कणाला मी नमस्कार करीत आहे.

यावरून असे लक्षात येते की, आपले सर्वतंत्रस्वतंत्र नाथयोगिस्वरूप महासिद्धयोगींद्र श्रीमत्स्येंद्रनाथ हे महाप्रकाश आहेत. जे वास्तवात "**श्रीमहार्थ-मंजरी**" या ग्रंथाचे रचनाकार महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांच्या श्रीसद्गुरूंच्या रूपामध्ये नाथसंप्रदायामध्ये अथवा सिद्धामृत मार्गामध्ये पूर्णपणे प्रतिष्ठित आहेत. याबरोबरच हेही लक्षात घेण्यासारखे आहे की, श्रीशिवोपदिष्ट नाथ-योगामृताच्या पोषणक्रमामध्ये महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थ-मंजरी**" आणि "**स्वोपज्ञ टीका**" यांना श्रीशंभूंसाठी पुष्पांजली असे म्हटले आहे. त्यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

पुष्पाञ्जलिर्भवतु वाङ्मय एष शम्भोः ।।९।।

अर्थ :- ही महार्थमंजरी ग्रंथरूपाने किंवा वाङ्मयरूपाने श्रीशंभूंना वाहिलेली पुष्पांजली आहे.

यावरून हे मत नितांत खरे आहे की, "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाची रचना नाथयोगाच्या विशिष्ट दार्शनिक वाङ्मयाच्या रूपामध्ये महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी केली. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाची "**स्वोपज्ञ टीका**" ही त्यांचीच महान् कृती आहे. तसेच अकराव्या ते चौदाव्या शतकाच्या अवधीमध्ये श्रीमहेश्वरानंद जे श्रीगोरक्षनाथ या नावाने प्रसिद्ध होते त्यांनी ही टीका संवर्धित करून तिला वैशिष्ट्य प्रदान करण्याची कृपा केली.

श्रीमहेश्वरानंद हे नाव धारण केलेले नाथसंप्रदायाचे महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ आहेत, ही गोष्ट पूर्णपणे सुसंगत आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ हे चारही युगांमध्ये नित्य प्रकट होणारे अमरकाय योगी आहेत. महार्थतत्त्व हे परमपदप्राप्तिस्वरूप आहे. श्रीसद्गुरूंच्या कृपेनेच या महार्थतत्त्वाची प्राप्ती होत असते. यासाठी महाप्रकाशस्वरूप महासिद्धयोगींद्र श्रीमत्स्येंद्रनाथ या श्रीसद्गुरूंच्या चरणवंदनेने "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाच्या "**परिमलटीकेचे**" मंगलाचरण सजलेले आहे.

"**श्रीसिद्धसिद्धान्तपद्धती**" या ग्रंथामध्ये महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी असे म्हटले आहे की -

अतएव परमपदप्राप्त्यर्थं स सद्गुरूः सदा वन्दनीयः ।५।७०।।

अर्थ :- याकरता परमपदाची प्राप्ती करून घेण्यासाठी श्रीसद्गुरू हे अखंड व निरंतर वंदनीय आहेत.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**स्वोपज्ञपरिमलटीकेच्या**" मंगलाचरणामध्ये असे म्हटले आहे की -

गुरुचरणसपर्याचातुरीचिद्धनोऽहं
गहनपि हृदन्तर्व्योम तद् व्याकरोणि।।१०।।

अर्थ :- श्रीसद्गुरुचरणपूजेच्या परिणामाने प्राप्त झालेल्या सामर्थ्यापासूनच मी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाची व्याख्या केलेली आहे.

स्वोपज्ञ टीकेच्या प्रकाशामध्ये महार्थमंजरी या ग्रंथाचा अभ्यास केला असता महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी उपदेश केलेले नाथयोगतत्त्व सहजपणे प्रकाशित होत असते "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

गुढाद् गूढतरो भवति स्फुटादपि स्फुटतर एष:।
देशिककटाक्षपाते पक्ष: प्रथमो न भवति धन्यानाम्।।६७।।

अर्थ :- भाग्यवान् साधकभक्तयोगिशिष्यांचा देशिक अर्थात् श्रीसद्गुरूंच्या कृपाकटाक्षाने किंवा शक्तिपाताने गूढात गूढतर, स्फुटात स्फुटतर, व्यक्त-प्रव्यक्त, क्षर-अक्षर, प्रकट-अप्रकट, द्विविधात्मक किंवा उभयात्मक व्यवहार समाप्त होतो. असे साधकभक्तयोगिशिष्य श्रीशिवस्वरूपात प्रतिष्ठित होतात ते याच जन्मामध्ये कृतार्थ होतात व त्यांच्या जन्ममरणरूप द्विविधात्मक स्थितीचा अंत होतो.

"**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये या तथ्याचे स्पष्टपणे असे प्रतिपादन केलेले आहे की, श्रीसद्गुरूंच्या कृपाकटाक्षस्वरूप प्रसादाने अथवा अनुग्रहाने म्हणजे शक्तिपातयोगदीक्षेने साधकभक्तयोगिशिष्याला स्वसंवेद्य परमपदाची प्राप्ती होते. अशा साधकभक्तयोगिशिष्याला जन्ममरणरूप पाशबंधनात पडावे लागत नाही. श्रीसद्गुरूंच्या हृदयामध्ये साक्षात् श्रीशिव हे प्रविष्ट होऊन राहतात. यासाठी श्रीसद्गुरूंचा अनुग्रह हा श्रीशिवस्वरूपच असतो. यामुळे ही गोष्ट नक्की आहे की, श्रीशिवयोगामृत हा महार्थतत्त्वाचा सहज, सनातन आणि नित्य निर्विकल्प पर्याय आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थ-मंजरी**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

नत्वात्मन: प्रियार्थं सर्वस्य प्रियत्वं भणति श्रुति:।
तस्मादानन्दस्वभाव आत्मा मुक्तोऽमुक्तो वा।।५५।।

अर्थ :- प्रत्यक्षात आत्म्याच्या प्रियतेने समस्त विषयवस्तूचे प्रेम सिद्ध होते. सच्चिदानंदस्वरूप अलखनिरंजन परमात्मतत्त्व हाच आत्म्याचा स्वभाव आहे. यासाठी अर्थात् या आत्म्यासाठी मुक्त होणे किंवा न होणे असा प्रश्न निर्माण होत नाही.

आत्मनस्तुकामाय सर्वं प्रियं भवति। इति श्रुति:।।

अर्थ :- आत्मकामता हेच सर्वांमध्ये प्रियतेचे, अनुकूलतेचे अथवा आनंदमयतेचे कारण आहे व हाच महार्थ आहे.

नि:संदेहपणे "**श्रीमहार्थमंजरी**" हे असाधारण योगशास्त्र आहे. महासिद्ध-योगी श्रीगोरक्षनाथ यांच्या कथनावरून ही गोष्ट सिद्ध होते की, या ग्रंथामध्ये भगवान् श्रीगोपालकृष्णनाथमहाराजांच्या मुखारविंदातून "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथाच्या अध्यायात अर्जुनाला सूक्ष्म दृष्टीने उपदेशिलेल्या परंपराप्राप्त योगतत्त्वाचे वर्णन आलेले आहे. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाचे हे योगतत्त्व

साधकभक्तयोगिशिष्याच्या जीवनाला अमृतत्त्वामध्ये प्रतिष्ठित करीत असते. अलखविज्ञानी अर्थात् अलखनिरंजन स्वसंवेद्यतत्त्वाचा साक्षात्कार करून घेणारा साधकभक्तयोगिशिष्य "**श्रीमहार्थमंजरी**" चे योगतत्त्व जाणून घेण्याचा अधिकारी आहे. हे गगनशिखर अर्थात् सहस्रारातील कैलासापासून प्रकाशित होणारा शब्द आहे किंवा योगसिद्धिगत अनुभव आहे, यामुळे हा शब्द किंवा अनुभव परम निगूढ आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीगोरखबानी-सबदी**" या ग्रंथामध्ये हे योगज्ञान प्रकाशित करताना असे म्हटले आहे की -

गगनि सिषर महि सबद प्रकास्या
तहं बूझै अलष बिनांणी।।४।।

अर्थ :- (जर ब्रह्माच्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान तुमच्यासाठी हितकारक आहे तर) ब्रह्मरंध्रामध्ये किंवा गगनशिखरामध्ये समाधीच्या द्वारा जो शब्द प्रकाशित होतो त्यात विज्ञानरूप अलक्ष्याचे ज्ञान प्राप्त करून घ्या.

परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या चारही वाणी स्वसंवेद्य परम-तत्त्वाच्या स्वरूपानुभूतीपर्यंत पोहोचण्यास असमर्थ आहेत. स्वसंवेद्य तत्त्वाचे स्वरूपज्ञान ब्रह्मरंध्रामध्ये प्रकाशित किंवा द्योतीत होत असते. या परम-तत्वाचा किंवा अलखनिरंजनाचा किंवा श्रीशिवांचा साक्षात्कार ब्रह्मरंध्रगत कैलासशिखरावरच होत असतो. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाचा उपसंहार करताना असे म्हटले आहे की -

यो मे वामचमत्क्रियोद्यममयः स्तब्धोऽपि सन्नश्रुते
विश्वं व्याप्नुवताश्चिदद्वयमहश्चन्द्रोदयाद् विक्रियाम्।
तस्याह्लादमहार्णवस्य न कथं वर्धेत कूलङ्कषो
वाग्विक्षोभवृजम्भया बहुमुखं कल्लोलहल्लोहलः।

अर्थ :- जो संपूर्ण विश्वामध्ये अद्वय चैतन्याच्या तेजोरूपाने व्यापून राहिलेला आहे त्या चंद्रम्याचा उदय झाल्याने आह्लादरूपी समुद्राचे जल तर वाढतच असते; कारण की, महार्थयोगनिबंधाच्या उद्यमामध्ये किंवा उद्योगा-मध्ये प्रवृत्त आणि वाणीच्या उत्ताल तरंगांनी किंवा लाटांनी तरंगित होणारा बहुमुखी कल्लोलयुक्त समुद्र सुरुवातीला जरी स्तब्ध राहिला असला तरी या ज्ञानोदयानंतर किंवा महार्थतत्त्वोदयानंतर त्याच्या साधनामयी प्रवृत्तीने साधकभक्तयोगिशिष्य निःसंदेहपणे कृतार्थ होतो आणि योगसिद्धी प्राप्त करून घेतो.

नाथयोगदर्शनाच्या अनुरूप हे स्वतःसिद्ध आहे की, "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये वर्णन केलेले श्रीशिवतत्त्व हे आपले रूप आणि स्वरूप यामध्ये "**श्रीसिद्धसिद्धान्तपद्धती**" या ग्रंथामध्ये वर्णिलेल्या विश्वातीत व विश्वरूप श्रीशिवांचा पर्याय आहे. श्रीशिव हे अपरंपर, परमपद, शून्य आणि निरंजन परमात्मा आहेत. "**श्रीसिद्धसिद्धान्तपद्धती**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

अपरम्परं परमपदं शून्यं निरञ्जनपरमात्मेति।।१-१७।।

अर्थ :- श्रीशिव हे अपरंपर, परमपद, शून्य, निरंजन आणि परमात्मा आहेत.

"**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये शक्तिमान् श्रीशिव आणि शक्तिव्यतिरिक्त स्वसंवेद्य अलखनिरंजन परमतत्त्व श्रीशिव या दोघांचेही वर्णन आढळून येते; परंतु मुख्यरूपाने प्रतिपादनामध्ये विश्ववैचित्र्यविकल्परहित श्रीशिवांच्या संबंधात महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी असे म्हटले आहे की -

भवन्ति करणानि पञ्च खलु कर्मप्रधानानि लोकनाथस्य स्पन्दते स्वैरं यैर्जनो जडाद् विलक्षणो भवन्।

अर्थ :- विश्ववैचित्र्यविलासामध्ये व्याप्त लोकनाथ परमेश्वर विश्वरूप श्रीशिवांचे पाच प्रधान करण किंवा श्रीशिवांची पाच प्रधान इंद्रिये ही जड असून जड आणि चैतन्य यांना एकमेकांहून भिन्नपणे प्रकट करीत असतात. या विश्वामध्ये शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या विषयांचे स्वतःच रसास्वादन करीत परमेश्वर श्रीशिव हे क्रीडा करीत असताना आपली स्वतंत्र सत्ता अर्थात् सर्वतंत्र स्वतंत्र निजाशक्ती प्रकट करीत राहतात. हाच श्रीपरमेश्वरांचा विश्वामध्ये होणारा व्यवहार किंवा विलास आहे. हीच श्रीपरमेश्वरांची क्रीडा आहे. श्रीशिवांची शक्ती अपार, असीम, अनंत आणि अचिंत्य आहे. जेव्हा तिळाएवढ्या किटकामध्ये गतिशील राहण्याची शक्ती असते तेव्हा ज्या श्रीपरमात्म्याचे शरीर हे संपूर्ण विश्वच असते. त्याच्या अपरिमित शक्तीचा केवळ विचार केल्याने त्याच्या सर्वशक्तिमत्तेचे दर्शन होत असते. हे विश्व या श्रीपरमात्म्याचेच शरीर आहे, असे म्हटले आहे. "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथामध्ये हे "**दृश्यं शरीरम्।।१.१४।।**" अर्थात् "सर्व आंतर व बाह्य वस्तुजात हे श्रीशिवांचे शरीर आहे," अशा रूपात प्रतिपादन केलेले आहे. या तथ्याने विश्वशरीररूपतेच्या द्वारा श्रीपरमात्म्याची शक्तिमत्ता स्वतः उपकल्पित केली

आहे. या विश्वरूपामध्ये परमात्मा श्रीशिवाची अर्चना आणि उपासना होत असते. त्यामुळे विश्ववैचित्र्ययुक्त विकल्पातीत परमेश्वर, अलखनिरंजन व स्वसंवेद्य श्रीशिवांचा योगज्ञानाच्या स्तरावर साक्षात्कार होत असतो. श्रीशिवांची विश्वरूपता आणि विश्वातीतता याची ही निर्विशेष विलक्षणता आहे. हे वैशिष्ट्य आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीगोरखबानी-सबदी**" या ग्रंथात याविषयी असे म्हटले आहे की -

बदंत गोरष सति सरूप।
तत बिचारैं ते रेष न रूप।।१५३।।

अर्थ :- हे सत्स्वरूप, स्वसंवेद्य व विश्वातीत तत्त्व हेच योगामध्ये प्रतिपादन केलेले परमपद किंवा कैवल्यपद आहे. या कैवल्यपदाचा विचार करता करता प्राणी रूपातीत आणि नामातीत अलखनिरंजनाचा स्वरूपबोध प्राप्त करून घेऊन साक्षात् श्रीशिवस्वरूप होतो. हाच परमात्मविज्ञानाचा अनुभव आहे.

"**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी या परमात्मज्ञानाच्या अनुभवावर किंवा मायातीत व विश्वातीत श्रीशिवस्वरूपाच्या प्रत्यभिज्ञेवर जोर दिलेला आहे. प्रत्यक्षात सर्वभावपदातीत अलखनिरंजन ज्ञानरूप श्रीशिव हेच स्वसंवेद्य आहेत. श्रीशिव हे नाथयोग दर्शनाचे परम व चरम प्रतिपाद्य आहेत.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीयोगबीज**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

सर्वभावपदातीतं ज्ञानरूपं निरञ्जनम्।।१३।।

अर्थ :- निर्मल, स्वसंवेद्य व मायातीत श्रीशिव हे अलख श्रीशिवांचे विश्वविकल्पातीत निर्विकल्प रूप आहेत.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीअमनस्कयोग**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

अनाकारमविच्छन्नमग्राह्यमचलं ध्रुवम्।
सर्वोपाधिविनिर्मुक्तं सर्वकामविवर्जितम्।।१.२५।।

अर्थ :- हे परमतत्त्व निराकार आहे. तसेच हे तत्त्व अविच्छिन्न अर्थात् जन्म व मरण आदींच्या पलीकडे सच्चिदानंदस्वरूप शाश्वत चैतन्य आहे. हे तत्त्व मन आणि वाणी यांना अगोचर आहे. हे महार्थतत्त्व समस्त उपाधींनी रहित असून कामनाशून्य आहे. श्रीशिव हे महार्थतत्त्वात अधिष्ठित झालेले

आहेत.

हे परमपद अर्थात् विश्वातीत अलखनिरंजन श्रीशिव किंवा श्रीपरमशिव हे निरुपाधिक आहेत. प्रमाण आदींच्या साहाय्याने यांची प्राप्ती होणे संभव असत नाही. साधकभक्तयोगिशिष्य हा निर्विकल्प समाधीमध्ये स्थित झाल्यावर स्वरूपानुभवामध्ये स्वतः प्रकाशस्वरूपामध्ये अभिव्यक्त होतो. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

ज्ञाता स आत्मा ज्ञेयस्वभावश्च लोकव्यवहारः।
एकरसां संसृष्टिं यत्र गतौ सा खलु निस्तुषा विद्या।।१६।।

अर्थ :- आत्मा अर्थात् परमात्मा हाच ज्ञाता आहे. हा विश्वविलास किंवा लोकव्यवहार ज्ञेय आहे अर्थात् ज्ञान करून घेण्याला योग्य आहे. ज्ञाता आणि ज्ञेय यांची सामरस्यमयी एकरसात्मिका संसृष्टी अर्थात् अभिन्नता अथवा अभेदता हीच शुद्ध विद्या आहे. ज्ञाता व ज्ञेय यांच्या प्रतीतीच्या सामरस्याच्या प्राप्तीमध्ये शुद्ध विद्या ही सर्वव्यापक व परमात्मभावाची स्थिती आहे.

लोकव्यवहाररूप विश्वप्रपंचाच्या आवरणाच्या पलीकडे गेल्यावरच श्रीपरमशिवांचा साक्षात्कार होतो. ज्ञान आणि क्रिया यांपैकी पहिल्या म्हणजे ज्ञानाच्या उन्मेषामध्ये परमात्मा श्रीसदाशिव श्रीपरमशिव अभिव्यक्त राहतात. ही गोष्ट निर्विवाद आहे की, बाह्य उन्मेषामध्ये परमेश्वर श्रीईश्वर हे नाव धारण करीत असतात आणि आतील उन्मेषामध्ये तेच श्रीसदाशिव आहेत. विश्वरूप श्रीशिव हे सविकल्प आहेत. ते बाह्य उन्मेषामध्ये अभिव्यक्त होत राहतात. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी विश्वरूप श्रीशिवांचे प्रतिपादन करताना वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट सांगितलेली आहे की -

ऊर्ध्वो ज्वलिति प्रकाशो लोकालोकस्य मङ्गलप्रदीपः।
विमर्शदशामुखानीतदह्यमानमलालितैलविच्छर्दः।।१०।।

अर्थ :- ज्याप्रमाणे मंगलमय दिवा हा पूर्णरूपाने वातीच्या तेलाने ओथंबून जाऊन जळत असताना अंधःकार नाहीसा करतो आणि आपला प्रकाश प्रकट करतो त्याचप्रमाणे पूर्ण प्रकाशस्वरूप श्रीपरमशिव हे ज्ञानक्रियारूप-विमर्शामध्ये अत्यंत प्रभासित अथवा प्रकाशित होऊन सर्व आणव, कार्म आणि मायीय मलत्रयांना आपल्या उत्कृष्ट अशा तेजामध्ये भस्मसात करीत असतात.

परमप्रकाशस्वरूप परमात्म्यामध्ये समस्त विश्वविलास विभासित अथवा प्रकाशित झालेला असतो. हेच परमात्मा श्रीशिवांचे विश्वरूप अथवा सविकल्प-

रूप आहे. या विश्वरूपामध्ये अर्थात् सविकल्परूपामध्ये श्रीपरमशिवांच्या द्वारा समस्त विश्वव्यवहार प्रस्फुटित अथवा प्रकाशित होत राहतो. महाव्याप्तिपरक तत्त्व आधार व आधेयवर्जित अलखनिरंजन परमेश्वर श्रीशिवांचे हेच उपास्य-स्वरूप नाथयोगामध्ये प्रतिष्ठित झालेले आहे. श्रीशिवतत्त्व हे द्वैताद्वैतविवर्जित होऊनही विश्वव्यवहाराचे संपादन करीत असते. नाथतत्त्वाची हीच परमप्रतिष्ठा आहे. परमपद हे स्वसंवेद्य तत्त्व आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीगोरखबानी-ग्यानतिलक**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

अञ्जन माहि निरञ्जन भेट्या।
मूरति माहि अमूरति परस्या।।४१।।

अर्थ :- अंजनामध्ये हेच निरंजनतत्त्व आहे. मूर्तीमध्ये अर्थात् द्वैतामध्ये हेच अमूर्तिस्वरूप आहे.

परमेश्वर हा व्यक्त व अव्यक्त विश्वाला धारण करीत असतो. हे विश्व विनाशशील जडवर्ग आणि अविनाशी चैतन्य यांच्या संयोगाने व्यवहार-रूपामध्ये स्थित असते. समस्त विश्वविलासाचे संचालन परमेश्वर श्रीशिव करीत असतात. परमात्मा हेच विश्वाचे मूळ आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी याविषयी असे म्हटले आहे की -

आत्मा खलु विश्वमूलं तत्र प्रमाणं न कोप्यर्थयते।।३।।

अर्थ :- परमात्मा किंवा आत्मा हे विश्वाचे मूळ आहे. यासाठी प्रमाणाची आवश्यकता असत नाही. आत्मा आणि परमात्मा यांच्यासाठी परमात्मा हेच प्रमाण आहे.

समस्त विश्वव्यवहार हा निःसंदेहपणे एका चिच्छक्तीचा अर्थात् ज्ञान-शक्तीचा ज्ञाता आणि ज्ञेय रूपात झालेला विस्तार आहे. ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान या त्रिपुटीच्या अंतराळामध्ये श्रीमहात्रिपुरसुंदरी जगदीश्वरी श्रीपरांबा ही महाशक्ती आहे. यामुळे अद्वय श्रीशिव हे या महाशक्तीला आलिंगन देऊन आपल्या स्वसंवेद्यरूपामध्ये विलसित राहून साक्षात्काराचा विषय बनतात आणि साकार स्वरूपामध्ये अर्थात् द्वैताद्वैतविवर्जित रूपामध्ये अभिव्यक्त होतात.

विश्वरूप श्रीशिवांच्या द्वारा संचालित विश्वव्यवहाराची एकमात्र अधिष्ठात्री शक्ती श्रीजगदीश्वरी ज्ञाताज्ञेयज्ञानस्वरूपिणी एकरस व संसृष्टिमयी भगवती श्रीमहात्रिपुरसुंदरी आहे. या श्रीभगवतींच्या द्वारा परमेश्वर श्रीशिव हे विश्व-

वैचित्र्याचे संचालन करीत असतात. श्रीशिव आणि परमेश्वरी अर्थात् शक्तिमान् आणि शक्ती यांच्या विश्वविकल्परूपाच्या संबंधाचे अत्यंत युक्तियुक्त विश्लेषण महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीसिद्धसिद्धान्तपद्धती**" या आपल्या ग्रंथामध्ये केलेले आहे. या विश्लेषणामध्ये नाथयोगसिद्धान्ताचे स्वरूप प्रतिष्ठित झालेले आहे.

उपरोक्त ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

अनामेति स्वयमनादिसिद्ध एकमेवानादिनिधनं
सिद्धसिद्धान्तप्रसिद्धं तस्येच्छामात्र धर्माधर्मिणी
निजा शक्तिः प्रसिद्धा।।१-५।।

अर्थ :- अलख निरंजन परब्रह्म परमेश्वर हे नामाने रहित आहेत. ते स्वतः स्वाभिव्यक्त आणि अनादिसिद्ध किंवा सजातीय व विजातीय भेदांनी रहित आहेत. सिद्धांचा सिद्धान्त अर्थात् निश्चयात्मक मत असे आहे की, ब्रह्म हे स्वसंवेद्य किंवा अलखनिरंजन आहे. या ब्रह्माची निजा शक्ती ही सकल लोककल्याणाची इच्छा करणारी आहे. ही शक्ती जीवमात्राच्या सुख-दुःखादि भागांच्या निमित्त सृष्टी आणि प्रलय यामध्ये संकोचविकासधर्माची किंवा निग्रहानुग्रहमयी म्हणून प्रसिद्ध आहे. परमश्रीशिवांमधील ही पराशक्ती स्वरूपभूत आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

सर्वकरः सर्वज्ञः पूर्णो नित्योऽसङ्कुचश्च।।१८।।

अर्थ :- परमात्मा श्रीपरमशिव हे सर्वकर, सर्वज्ञ, पूर्ण आणि संकोचरहित आहेत.

ते पूर्ण स्वात्मतृप्त, अलख, दर्शनातीत, परम अमायिक व निरंजन परमेश्वर श्रीशिव आहेत. श्रीशिव आणि शक्ती यांमध्ये कोणताही भेद असत नाही. ज्याप्रमाणे चंद्राच्या स्थितीनेच किंवा अस्तित्वानेच चांदणे असते अर्थात् चंद्र आणि चांदणे यात भिन्नता असत नाही त्याचप्रमाणेच शक्ती व शक्तिमान् हे स्वरूपतः एकच आहेत ही गोष्ट स्वयंसिद्ध आहे. "**श्रीमहार्थमंजरी**" हा ग्रंथ हे संपूर्ण योगदर्शन आहे. जर या ग्रंथाच्या यत्किंचित् आगमरूपाचा विचार केला तर त्यात श्रीशिव हे प्रकाशस्वरूप आहेत आणि शक्ती ही विमर्शरूपा आहे हे स्पष्ट होते. प्रकाशरूप परमात्म्याची विमर्शशक्ती किंवा निजाशक्ती ही परमेश्वरी महामाया असून अनुप्राण आहे. यासंबंधी शास्त्रात असा उल्लेख मिळतो की -

न शिवेन विना शक्तिर्न शक्तिरहितः शिवः।

अर्थ :- श्रीशिवांशिवाय शक्ती असत नाही आणि शक्तिरहित श्रीशिव असत नाहीत.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीसिद्धसिद्धान्तपद्धती**" या योगशास्त्रामध्ये श्रीशिव आणि शक्ती यांचे वर्णन केलेले आहे. त्यांनी तेथे असे म्हटले आहे की -

शिवस्याभ्यन्तरे शक्तिः शक्तेरभ्यन्तरः शिवः।।४-२६।।

अर्थ :- श्रीशिवांमध्ये शक्ती आहे आणि शक्तीमध्ये श्रीशिव आहेत.

ते दोघे पारमार्थिक सत्तेमध्ये अभेद आणि अखंड आहेत. श्रीपरमेश्वरांची निजाशक्ती ही शांभवी शक्ती आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

ज्ञानक्रियामायानां गुणानां सत्त्वरजस्तमस्स्वभावानाम्।
अविभागावस्थायां तत्त्वं प्रकृतिरिति शाम्भवी शक्तिः।।२०।।

अर्थ :- ही निजाशक्ती सत्त्वगुणस्वभावाची असल्याने ज्ञानशक्ती आहे. रजोगुणमयी असल्याने हीच क्रियाशक्ती आहे व तमोगुणरूपिणी असल्याने हीच मायाशक्ती आहे. अशा तऱ्हेने विभक्तअवस्थेमध्ये परमेश्वराची निजाशक्ती ज्ञानक्रियामायात्मिका आहे. अविभक्त एकरस अवस्थेमध्ये किंवा संसृष्टीमध्ये हीच मूळ शक्ती किंवा मूळ प्रकृती आहे. ही मूळ प्रकृती श्रीशिवस्वरूपिणी शांभवी आहे.

या विश्ववैचित्र्यामध्ये श्रीशिव आणि शक्ती यांचा अभिन्न स्वरूपात्मक लीलाविलास हा नित्य चालू राहतो. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये श्रीललितादेवींना "**महोपास्य**" असे म्हटले आहे. श्रीललितादेवी ही श्रीशिवांची शाश्वत अभिन्न महाशक्ती आहे. याविषयी असे म्हटले आहे की -

स्वात्मैव देवता प्रोक्ता ललिता विश्वविग्रहा।

अर्थ :- ही उपास्या श्रीललितादेवी ही श्रीमहार्थमंजरी या ग्रंथाच्या भाषेमध्ये स्वात्मदेवता आहे. श्रीशिवांची प्रकाशस्वरूपता आणि शक्तीची विमर्शरूपता यांनी जगताचे जीवन किंवा लोकव्यवहार संचालित किंवा सक्रिय झालेले आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी या संबंधात आपले मत व्यक्त करीत असताना नाथयोगसिद्धान्ताचे निरूपण केलेले आहे. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये याविषयी असा उल्लेख आलेला आहे की -

तथा तथा दृश्यमानानां शक्तिसहस्राणामिकसङ्घट्टः।
निजहृदयोद्यमरूपो भवति शिवो नाम परमस्वच्छन्दः।।१३।।

अर्थ :- अशा तऱ्हेने सृष्टी व संहार आदि विभिन्न रूपांमध्ये शक्तीच्या दिसून येणाऱ्या हजारो व्यापारांचे ऐक्य हे निजहृदयउद्यमरूप सर्वतंत्र स्वतंत्र परम श्रीशिव या नावाने संपूर्ण विश्वप्रपंचामध्ये अभिव्यक्त होत असते.

इच्छा, ज्ञान आणि क्रिया यांच्या फलस्वरूप व्यापारांचे किंवा कार्यवर्गाचे ऐक्य हेच श्रीशिवस्वरूप आहे. अशा तऱ्हेने विश्ववैचित्र्यविलासरूप विश्वविमर्शामध्ये स्वसंवेद्य अलखनिरंजन हेच शक्तिमान् श्रीशिवस्वरूपामध्ये प्रकाशित झालेले आहेत. श्रीशिवांच्या शक्तिमत्तेपासून हे विश्वरूप कार्य अथवा विश्वविमर्श चाललेला आहे. श्रीशिव आपल्याच शक्तीने विश्वात व्यापून राहून स्वहृदयानंदामध्ये याचे अभिव्यंजन अर्थात् प्रकटन करून त्याचा अनेक रूपांच्या माध्यमाने रसास्वाद घेत असतात. स्वहृदयतत्त्वाच्या बहि:स्फुरणाच्या किंवा बहि:प्रकटीकरणाच्या मध्ये श्रीशिवांची असलेली उन्मुखता यालाच व्यवहारामध्ये क्रियाशक्ती असे म्हणतात. श्रीशिवांच्या परमशक्तीने सचराचर विश्व व्यापून राहिलेले आहे. श्रीशिव आणि शक्ती यांची एकता किंवा एकरूपता यांचे होणारे ज्ञान अथवा अंतर्दर्शन हे मोक्षाचे प्रतिपादन करणारे आहे असे म्हटले आहे. साधकभक्तयोगिशिष्याचे मन हे जेव्हा द्वैताद्वैतविवर्जित स्वसंवेद्य परमश्रीशिवतत्त्वाच्या अमायिक निर्मळ अनुभूतीने स्थिर होते अथवा परमात्मतत्त्वामध्ये अंतर्भूत होते किंवा लय पावते तेव्हाच त्यात मोक्षप्रद ज्ञानाचा उदय होतो.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

श्रीपीठपञ्चवाहनेत्रत्रयवृन्दचक्राणि स्मरत।।३६।।

अर्थ :- श्रीपीठ, पंचवाह, नेत्रत्रय व वृंदचक्र या सर्व चक्रांच्या चिंतन व पूजन यांचे महत्त्व प्रकाशित केलेले आहे.

त्याचप्रमाणे या ग्रंथामध्ये श्रीचक्रार्चन आणि कुलामृतपान यावर प्रकाश टाकलेला आहे.

साधकभक्तयोगिशिष्याने ही गोष्ट नेहमी लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, श्रीचक्र आदींची उपासना आणि पूजा यांच्या विधानामध्ये तंत्रोपचार ऐवजी योगोपचार क्रम सांगितला आहे. याविषयी असे म्हटले आहे की, श्रीशिवशक्ती या दोघांच्या उन्मेषात्मक सामरस्यापासून महावीर्य उत्पन्न झालेले

आहे. यासाठीच शरीर हे महापीठ आहे. हे पीठ आपल्याच कलांमध्ये अर्चनीय किंवा अर्चना करण्याला योग्य आहे. हे पूजन व अर्चन श्रीशिव-साक्षात्काराचे केवळ उपकरण आहे. नाथयोगसिद्धान्तामध्ये साधकभक्त-योगिशिष्य नीलज्योतिस्वरूप नीळकंठ श्रीशिवांचे ध्यान करीत आणि जीव व ब्रह्म यांची एकता संपन्न करून घेऊन आत्मस्थ होतो किंवा परमपदामध्ये प्रतिष्ठित होतो. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये निर्विवाद रूपाने रहस्यात्मक ध्यानाच्या स्तरावर श्रीशिवांचा हाच स्वरूप साक्षात्कार आहे. श्रीशिवशक्ती यांच्या सामरस्याची अथवा ऐक्याची परमानुभूती हीच कुलामृतपानाच्या रसास्वादाची योगसिद्धी आहे. हे सर्व भावात्मक आहे. विश्वपती परमेश्वराच्या पूजेसाठी तांबूल, गंध, पुष्प आदि लोकदृष्टीने असलेली पूजेची उपकरणे ही सहजपणे मिळतात. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

अर्घ्यं वेद्यविलासः पुष्पाणि स्वभावपोषका भावाः ।।४५।।

अर्थ :- येथे भावरूप अर्घ्याचे, भावरूप पुष्पांचे आणि भावरूप कुलबिंदुतर्पणाचे महत्त्व आहे. बाहेर व आत यांच्या भेदाने स्वहृदय देवता श्रीपरमशिव यांच्या तृप्तीचे एकमात्र प्रयोजन हे तत्त्वाच्या दृष्टीने वेद्यविलास आहे. हेच "अर्घ्य द्रव्य" आहे. स्वभाव किंवा स्वचिंतन यांचे पोषण हीच "फुले" आहेत. स्वहृदयस्थ आत्मदेवता परमात्मा श्रीशिव यांची अविकल्प-रूपामध्ये हीच "पूजा" आहे. हेच "ध्यान" आणि हेच "चिंतन" आहे.

या दृष्टीनेच महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाच्या सेहचाळीसाव्या गाथेमध्ये असे म्हटले आहे की, श्रीपरमशिव हे वेद्यवर्गोल्लासस्वभावरूप आहेत. यात परिस्फुरित होणारा शक्तिपरस्पंद हाच बिंदू आहे. हेच कुलामृततत्त्व आहे. श्रीपरमशिवांमध्ये विश्वप्रपंचाचा किंवा वेद्यवर्गविलासाचा निक्षेप यालाच "तर्पण" असे म्हटले आहे. असे झाल्याने बिंदुरूपकुलामृत हे निर्मळ होऊन स्वसंवेद्य परमतत्त्व अलखनिरंजनामध्ये प्रतिष्ठेचे साधन बनत असते.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये साधकभक्तयोगिशिष्याला अशी सत्प्रेरणा दिलेली आहे की, श्रीपरमेश्वररूपी श्रीपरमशिवांना सामोरे होऊन आपले साधनमय जीवन कृतार्थ करीत राहणे हा जीवात्म्याचा स्वाभाविक धर्म आहे. जर तो या कार्यात विमुख राहिला तर तो क्षीण होतो आणि अंतिम पुरुषार्थ असलेला मोक्ष तो आपल्या प्रमादाने

किंवा चुकीने हरवून टाकतो. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थ-मंजरी**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

पर्यालोचनविमुखे वस्तुस्वभावस्यात्मनो हृदये।
शङ्काविषवेगेनेव संसारभयेन मुह्यति लोकः।।८।।

अर्थ :- जीवात्मा हा आत्मवस्तूच्या चिंतनापासून विमुख राहून जन्ममरणभयरूपविश्वप्रपंचामध्ये अनुरक्त अर्थात् आत्मविमुख होऊन संसारभयरूप शंकाविषवेगाने सद्वस्तू परमात्मतत्त्वाविषयी भ्रमित किंवा मोहित होतो. त्याला आत्मविवेक राहत नाही. त्याचा हा मोह किंवा संशय परमात्मतत्त्वाच्या संबंधातील संशयाच्या विषवेगाचाच परिणाम आहे. ही गोष्ट स्पष्ट आहे की, जेव्हा साधकभक्तयोगिशिष्य आत्मचिंतन करतो आणि श्रीपरमशिवांच्या ध्यानामध्ये व्यस्त राहतो तेव्हा त्याला जन्ममरणरूप लोक-व्यवहार इंचभरही भयभीत करू शकत नाहीत. नाथयोगाच्या सिद्धान्ताच्या अनुरूप आत्मतत्त्वाचा हाच विवेक आहे की, श्रीपरमशिव हे सर्वज्ञ, सर्वकर्ता व सर्वव्यापक परमेश्वर आहेत. समस्त विश्व हे श्रीशिवमय आहे. हाच श्रीशैवमहायोगाचा ज्ञानोपदेश आहे. हा परंपरेने नाथयोगसाधनेचा सर्वमान्य साधनक्रम आहे. हाच परमसिद्धान्त आहे. जीवाची भ्रमित राहण्याविषयी महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीविवेकमार्तंड**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

तावज्जीवो भ्रमत्येव यावत्तत्त्वं न विन्दति।।२७।।

अर्थ :- जोपर्यंत जीवात्मा सहस्रारामध्ये ध्यानस्थ होऊन परमात्मा श्रीशिवांच्या चिंतनामध्ये तत्पर राहत नाही तोपर्यंत तो संसारबंधन किंवा विश्वप्रपंच यामध्ये भ्रमित आणि संमोहित होऊन परमात्मतत्त्वाला विमुख राहतो. परमात्मतत्त्वापासून विमुख राहणे याला अनात्मचिंतन असे म्हटले आहे.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

येषां निरूपणीयो व्यतिरिक्तः कोऽप्यात्मनो भावः।
आत्मविमुखानां तेषामधिकारिविभागविभ्रमो भवतु।।६।।

अर्थ :- ज्यांच्यासाठी आत्मभावाव्यतिरिक्त कोणताही अन्य अनात्मभाव अनुगमनीय आहे अर्थात् त्या अनुभवाच्या मागे जाण्याला योग्य आहे ते अनात्मचिंतक फलप्राप्तीच्या योग्यतेने युक्त झाल्यावर त्यांना प्राप्त होणाऱ्या

विविध फलरूप संबंधामध्ये विभ्रम निर्माण होतो.

जगत् हे परमात्म्याचेच रूप आहे. परमात्मा हा स्वतः आपल्या स्वरूपभूत अचिंत्य शक्तीने या रूपात प्रकट होतो. हा अमृतस्वरूप मोक्षाचा स्वामी आहे.

"**श्वेताश्वेतरोपनिषद्**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

पुरुष एवेदं सर्वं यद्भूतं यच्च भव्यम्।
उतामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति।।३-१५।।

अर्थ :- जे काही भूत आणि भविष्य आहे आणि जे अन्नाच्या द्वारा वृद्धी पावते ते सर्वकाही पुरुषच आहे. हा पुरुष अमृतत्त्वाचा किंवा मुक्तीचा प्रभू आहे.

आत्मकल्याणाचे साधन हे निःसंदेहपणे प्रिय वाटणाऱ्या भोगांच्या साधनप्रेमापासून भिन्न आहे. आत्मचिंतनाच्या द्वारा होणारा परमात्मसाक्षात्कार हाच श्रेय किंवा हितकारक आहे.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

विश्वोद्यानविरूढानि गन्धप्रमुखानि सुगन्धीनि पुष्पाणि।
पश्चाप्याजिघ्रन् क्रीडति त्रैलोक्यधूर्तो देवः।।

अर्थ :- हे विश्व हे एका उद्यानासमान आहे. परमेश्वर हा पृथ्वी आदि असामान्य गुणांचे प्रमुख गंधरूप शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या विषयांचे स्वतः रसास्वादन करीत तीनही लोकांमध्ये क्रीडा करीत राहतो आणि आपली स्वतंत्र सत्तां प्रकट करीत राहतो. विश्वाच्या क्रीडेने विदग्ध झालेले श्रीपरमशिव हेच श्रीविश्वनाथ आहेत.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी याविषयी असे म्हटले आहे की -

यो यस्य भावयोगस्तस्य खलु स एव देवता भवति।
तद्भावभाविता अभिलषितं तथा फलन्ति प्रतिमाः।।४७।।

अर्थ :- आपापल्या भावांच्या अनुरूप साधकभक्तयोगिशिष्य या विश्वव्यापी परमेश्वर श्रीशिवांची उपासना करून उपासनेचे फळ प्राप्त करून घेत असतो. श्रीशिवांचे विश्वरूप हे प्राणप्रतिष्ठित चैतन्यविग्रहाच्या रूपामध्ये साधकभक्तयोगिशिष्याला अभीष्ट फळ प्रदान करून त्याच्यावर अनुग्रह करीत असते.

उपासकाच्या भावानुरूप किंवा भावनेनुरूप त्याची उपास्य देवता प्रतिष्ठित होत असतो. आपल्या हृदयातील प्रस्फुटित किंवा विकसित भाव

हे भाव या शब्दाचे तात्पर्य आहे. संपूर्ण चराचराला व्यापून असलेल्या शक्तिमान् आणि शक्ती यांच्या अभिन्न एकरसमयी उपासनेचे हेच स्वरूप आहे. प्रकाशस्वरूप परमात्मा श्रीशिवांच्या पूजेसाठी कोणत्याही विशेष अंगन्यास आदींची आवश्यकता असत नाही. ज्या अवस्थेत समस्त योग-प्रचलित अष्टमहासिद्धीच्या सौभाग्याला मान खाली घालावयास लावणारी परमात्मचिंतनाच्या आनंदाची उत्कर्षश्री किंवा परमाह्लादिनी शक्ती प्रकाशित होते ती अवस्था ही परमात्म्याच्या पूजेची विशिष्ट अवस्था किंवा मुद्रा आहे. याचाच अर्थ असा आहे की, परमात्मा श्रीशिव हे नेहमी वंद्य, पूज्य, चिंत्य आणि उपास्य आहेत. श्रीशिवांची तद्रूप अथवा अभिन्न स्वान्तःस्फुरित होणारी शक्ती शुद्ध विद्यास्वरूपिणी आहे. या शक्तीला चिद्, आनंद, इच्छा, ज्ञान आणि क्रियारूप यामध्ये शक्तिपंचक असे म्हणतात. द्वैताद्वैतविवर्जित अनुत्तरात्मा परम श्रीशिव हे आपल्या या महाशक्तीने शक्तिमान् आहेत. "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

मत्तः परतरं नान्यत्किञ्चिदस्ति धनञ्जय।
मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव।।७-७।।

अर्थ :- हे धनंजया! माझ्याशिवाय किंचित्मात्र दुसरे काहीही नाही. हे सर्व जगत् दोऱ्यात मणी ओवावेत तसे माझ्या ठिकाणी ओवलेले आहे.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

एकरसे स्वभावे उद्भावयन्ती विकल्पाशिल्पानि।
मायेति लोकपतेः परमस्वतन्त्रस्य मोहनी शक्तिः।।१७।।

अर्थ :- ईश्वर परमस्वतंत्र आहे. विश्ववैचित्र्यविलास ही त्याचीच अभिव्यक्ती आहे. लोकपतिरूपामध्ये सत्तावान् व एकरस स्वभावाच्या परमेश्वराची माया नावाची मोहिनी शक्ती अनेक प्रकारची विश्वरूप किंवा लोकरूप विश्व-वैचित्रशिल्प प्रकाशित करीत असते.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये जीवन्मुक्तीच्या स्वरूपावर प्रकाश टाकताना असे म्हटले आहे की, देहामध्ये सच्चिदानंद चिदात्म्याच्या प्रतिपत्तीची दृढता हीच जीवन्मुक्ती आहे. जन्ममरणाची सर्वावस्थानिर्विशेष स्वानंदोत्सवानुभूती हीच जीवन्मुक्ती आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी या जीवन्मुक्तीचे तत्त्व प्रतिपादित करीत परब्रह्मातील लीनतेला किंवा अभिन्नतेला परममोक्ष असे म्हटले आहे.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीगोरक्षपद्धती**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

निरातङ्के निरालम्बे निराधारे निरामये।
योगी योगविधानेन परे ब्रह्मणि लीयते।।२-९५।।

अर्थ :- सिद्धयोगसाधनाच्या साहाय्याने साधकभक्तयोगिशिष्य आतंकरहित, आलंबनरहित, आधाररहित आणि निरामय अशा परब्रह्मात लय पावतो.

याबरोबरच महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांचे परमशिव यांच्या उपासनेतील प्राणायामादि साधनक्रमाविषयीचे मत "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथात पुढील-प्रमाणे मांडले आहे की -

विम्रष्टुं निजसत्त्वं विभवे कार्योन्मुखे स्तिमितेऽपि।
बाह्यवृत्तान्तानां भङ्गः प्राणस्य संयमो ज्ञेयः।।४३।।

अर्थ :- आपल्या सत्त्वाचे चिंतन करताना स्वसामर्थ्यरूप विभवामध्ये आत्मा शांत झाल्यावर बाह्यवृत्तींचा उच्छेद होणे हाच प्राणाचा संयम आहे. अशा तऱ्हेने संपूर्ण वासनेचा नाश झाल्यावर शुद्ध स्वरूपच अभिव्यक्त होत राहते.

श्रीभगवंतांनी "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

विहाय कामान्यः सर्वान्पुमाञ्श्चरति निःस्पृहः।
निर्ममो निरहङ्कारः स शान्तिमधिगच्छति।।२-७१।।

अर्थ :- समस्त अन्य कामना अथवा वासना यांचा पूर्णपणे त्याग करून निःस्पृह, निर्मम आणि अहंकाररहित साधकभक्तयोगिशिष्य परम-शांती प्राप्त करून घेतो.

ही शांती किंवा जीवन्मुक्ती हीच परागती असून अनेक जन्मानंतर संसिद्ध होते आणि साधकभक्तयोगिशिष्य निष्पाप आणि स्वरूपतः शुद्ध होतो. "**श्वेताश्वतरोपनिषद्**" या ग्रंथामध्ये ब्राह्मीस्थितीचे वर्णन आलेले आहे. जे स्वतःमध्ये महार्थतत्त्वाचे प्रकाशक आहेत तेच महार्थतत्त्वाचे प्रतिपाद्य श्रीपरमशिव हे ब्राह्मी स्थितीचे प्रकाशक आहेत.

"**श्वेताश्वेतरोपनिषद्**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की-

एतज्ज्ञेयं नित्यमेवात्मसंस्थं
नातः परं वेदितव्यं हि किञ्चित्।।१-१२।।

अर्थ :- साधकभक्तयोगिशिष्याने स्वत:तील ब्रह्माला किंवा श्रीपरमशिव परमात्म्याला जाणून घेणे आवश्यक आहे. याहून जाणण्याला अधिक अन्य काहीही नाही.

जाणण्याला योग्य अशा श्रीपरमात्म्याचे चिंतन करता करता श्रीपरमात्मस्वरूपच होणे ही जीवात्म्याची अमृतत्वामध्ये संपूर्ण प्रतिष्ठा आहे. अशा स्थितीत साधकभक्तयोगिशिष्याची भोग आणि योग या दोघांमध्ये परमात्मदृष्टी होत असते. हीच भोगमोक्षसामरस्यमयी सिद्धी आहे.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

क्षणमात्रस्पृष्टेनाप्यमृतस्वभावेनानेन भावेन।
सर्वोत्तीर्णः सर्वः सर्वचिरं लभते सर्वसौभाग्यम्।।६६।।

अर्थ :- एका क्षणासाठी अमृतस्वरूप भावाचा स्पर्श झाल्याने साधकभक्तयोगिशिष्य सर्वोत्तीर्ण होतो. असा साधकभक्तयोगिशिष्य समस्त बंधनातून मुक्त होतो आणि समस्त सौभाग्य स्थायी रूपाने प्राप्त करून घेतो. हीच नि:संदेहपणे जीवन्मुक्तीची परम अनुभूती किंवा प्राप्ती आहे. हे शुद्ध चैतन्यमात्र आहे. हेच कैवल्यपद आहे आणि हाच परमसौभाग्य स्वरूप मोक्ष आहे. योग्यांनी याला परमार्थतत्त्व असे म्हटले आहे.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाला पुष्पांजलिरूपाने भगवान् श्रीशिवांना समर्पित केलेले आहे. त्यांनी श्रीपरमशिवांच्या प्रसन्नतेसाठी आणि त्यांच्याविषयीची भक्ती वृद्धिंगत करण्यासाठी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाची रचना केली. "**श्रीमहार्थमंजरी**" हा ग्रंथ हे श्रीशिवतत्त्वाचे प्रतिपादन करणारे महायोगवाङ्मय आहे. श्रीशिवस्वरूप परमतत्त्वात स्थित झाल्यावर सिद्धयोगी बहिर्मुख होऊ शकत नाही. त्याची वृत्ती पूर्ण अंतर्मुखी होऊन परमात्मस्वरूपामध्ये तल्लीन राहते. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

हृदयस्थानप्ररूढो विमर्शकल्पद्रुमो महाशाखः।
पुष्यति भोगश्रिया फलति च निष्कलसुखोत्सवालोकम्।।५२।।

अर्थ :- हृदयप्रदेशात उत्पन्न होणारा आत्मविमर्शरूपी कल्पद्रुम आपले स्वरूप जाणणाऱ्याला अपवर्ग पुष्पाने किंवा मोक्षरूपी फुलाने समलंकृत करतो आणि अपवर्ग अथवा मोक्ष प्रदान करतो. मायोपाधिरहित निष्कल आनंदस्वरूप फळाने कृतार्थ करीत असतो.

याचाच अर्थ असा आहे की, आत्मस्वरूपाचे चिंतन करणारा साधकभक्तयोगिशिष्य नेहमी स्वरूपानंदात निमग्न राहतो. आत्मविमर्शात केवळ स्वरूपानंद हा सर्वथा संपूर्ण अभिव्यक्त राहतो. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीगोरखबानी-सबदी**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

दरसण माई दरसण बाप। दरसणमाहीं आपै आप।
या दरसण का कोई जाणै भेव। सो आपै करता आपै देव।।२७२।।

अर्थ :- दर्शन किंवा स्वरूपामध्ये स्थितीचा अनुभव अथवा परमात्मसाक्षात्कार किंवा शाश्वत चैतन्यस्वरूपात प्रतिष्ठित होणे हेच स्वतःमधील परम निगूढ रहस्य आहे. या दर्शनाचे रहस्य जाणणारा किंवा मर्मज्ञ साक्षात् परमात्मस्वरूप होतो. अशा साधकभक्तयोगिशिष्याला परमात्मा अलखनिरंजनाचा साक्षात्कार अथवा दर्शन होते.

खरे पाहता हीच योगसिद्धी आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी हेच तथ्य स्पष्टरूपाने प्रकाशित केलेले आहे की, अनेक जन्मांच्या प्राप्तीचे फलस्वरूप म्हणून ज्ञानाच्या प्राप्तीच्या द्वारा योग सुलभ होत असतो. ज्ञान हे एकाच जन्मात योगसिद्धी झाल्यावर प्राप्त होत असते. याचसाठी महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीयोगबीज**" या ग्रंथामध्ये याविषयी असे म्हटले आहे की -

तस्माद् योगात् परतरो नास्ति मार्गस्तु मोक्षदः।।७२।।

अर्थ :- योगाहून श्रेष्ठ असा अन्य कोणताही मोक्षप्रद मार्ग नाही.

साधकभक्तयोगिशिष्य या मोक्षप्रद सिद्धयोगाच्या द्वारा महार्थतत्त्वात स्वस्थ किंवा प्रतिष्ठित राहतो. या सिद्धयोगाच्या द्वारा ज्यापासून साधकभक्तयोगिशिष्य कधीही निवर्तित होत नाही ते परमपद त्याला प्राप्त होते किंवा तो महार्थ त्याला प्राप्त होतो. हीच ब्रह्माची प्रतिष्ठा आहे. हेच द्रष्ट्याचे आपल्या स्वरूपात प्रतिष्ठित राहणे आहे. याला "**श्रीयोगदर्शन**" या ग्रंथामध्ये कैवल्य असे म्हटले आहे.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाचे समापन करताना असे म्हटले आहे की -

हन्त रहस्यं भणामो मूढा! मा भ्रमत गर्भगोलेषु।
अत्यासन्नं हृदयं पर्यालोचयत तस्योद्योगम्।।६९।।

अर्थ :- मी अत्यंत गूढ रहस्याचे उद्घाटन करीत आहे किंवा प्रकाशन

करीत आहे. लोकमायाअंधकाररूप विश्वप्रपंचामध्ये ग्रस्त झालेल्या लोकहो! वारंवार जन्ममरणचक्ररूप गर्भवासात भ्रमित होऊ नका! अंतर्वर्ती हृदयाच्या उद्योगरूप मोक्षाचे चिंतन करा. स्वसंवेद्य परमात्मसाक्षात्कार हाच साध्य आहे. आत्मानुकूल कैवल्य हे उद्योगाचे तात्पर्य आहे.

"**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथात प्रतिपादित सर्वधर्मपरित्यागपूर्वक मामेकम् अर्थात् श्रीभगवंतांना शरणागत होण्यामागील हाच अर्थ आहे. हा उद्योगरूप कैवल्याचा वाचक अथवा पर्याय आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांच्या "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाच्या शेवटी अर्थात् उपसंहारामध्ये असलेली ही मांगलिक वाणी आम्हाला नेहमी मार्गदर्शक होवो! ते असे म्हणतात की -

अधिवासयतु सदा मुखमन्यकथालेपलब्धदौर्गन्ध्यम्।
कर्पूरशकल इव मे शिव शिव इति शीतल शब्दः।।

अर्थ :- सुगंधित कर्पूरचूर्णासमान शीतल "शिव" शिव शब्द अन्य चर्चेच्या लेपाने दुर्गंधित झालेले माझे मुख सुरभित किंवा सुगंधित करोत! समस्त "**श्रीमहार्थमंजरी**" हा ग्रंथ भगवान् श्रीशिवांचे स्मरण, चिंतन, वंदन-पूजन आणि ध्यान यांनी सुरभित किंवा सुगंधित बनलेला आहे.

संपादकीय

श्रीशिवगोरक्ष महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी रचलेली "**श्रीमहार्थमंजरी**" ही रचना नित्य, सनातन व पुरातन योगाची किंवा नाथयोगाची अप्रतिम कलाकृती आहे. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथात परमात्मा, परमात्मतत्त्वामध्ये अभिव्यक्त जगताचे स्वरूप किंवा रूप तसेच जीवात्म्याची परमात्म्यामध्ये किंवा स्वसंवेद्य अलखनिरंजन परब्रह्म परमेश्वरामध्ये प्रतिष्ठा, परमपदामध्ये प्रतिष्ठा व समाधी यांचे रहस्यमय वर्णन उपलब्ध होते. यात परमात्मरहस्याचे स्वतःसिद्ध उन्मीलन ही याची दिव्यता किंवा महनीयता आहे. निःसंदेह आध्यात्मिकयोग किंवा अध्यात्मयोग यांच्या अभिव्यक्तिकरणाच्या स्तरावर "**श्रीमहार्थमंजरी**" हे अपूर्व योगवाङ्मय आहे. महाभारताच्या युद्धामध्ये पांडव अर्जुन हा मोहरूपी चिखलात अडकल्यावर भगवान् माधव लक्ष्मीपती श्रीगोपालकृष्णनाथमहाराजांनी या अनिर्वचनीय महार्थतत्त्वाचे वर्णन केलेले आहे, असे महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथात म्हटले आहे. परमकारुणिक श्रीभगवंतांनी आपल्या आत्मवर्ती अर्जुनाला "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथात असा उपदेश केलेला आहे की -

स कालेनेह महता योगो नष्टः परंतप।
स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः।।४-२-३।।

अर्थ :- जो सिद्धयोग बऱ्याच काळापासून पृथ्वीलोकातून लुप्तप्राय झालेला होता तो सिद्धयोग आज मी तुला सांगितला. हे फारच उत्तम रहस्य आहे आणि हा गुप्त ठेवण्याला योग्य असा विषय आहे. हा पुरातन योग आज मी तुझ्यासाठी प्रकाशित केलेला आहे.

"**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथावरून ही गोष्ट निर्विवाद स्पष्ट होते की, महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी या ग्रंथात ज्या पुरातन योगाचे किंवा सनातन योगतत्त्वाचे वर्णन केलेले आहे त्याच सिद्धयोगाचे वर्णन "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथात भगवान् श्रीगोपालकृष्णनाथमहाराजांनी अभिव्यक्त किंवा प्रगट केलेले आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये ही गोष्ट मान्य करताना असे म्हटले आहे की -

एनमेव महार्थं युद्धारम्भे पाण्डुपुत्रस्य
षोडशसहस्त्रशक्तिर्देव उपदिशति माधव इति शिवम्।।७०।।

अर्थ :- महाभारताचे युद्ध सुरू होण्याच्या वेळेला (मोहाने ग्रासलेल्या) पांडुपुत्र अर्जुनाला सोळा हजार (अनंत) शक्तींनी युक्त भगवान् श्रीलक्ष्मीपती श्रीमाधवांनी याच महार्थतत्त्वाचा अर्थात् परंपराप्राप्त महायोगज्ञानामृताचा उपदेश दिला.।।७०।।

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी **"श्रीमहार्थमंजरी"** या ग्रंथाच्या मंगलाचरणामध्ये औत्तराम्नाय तत्त्वाचे वर्णन करताना असे म्हटले आहे की -

जयत्यमूलमम्लानमौत्तरं तत्त्वमद्वयम्।
स्पन्दास्पन्दपरिस्पन्दमकरन्दमहोत्पलम्।।२।।

अर्थ :- हे औत्तरतत्त्व **"श्रीशिवसूत्र"** आणि **"श्रीस्पंदशास्त्र"** या ग्रंथात परिव्याप्त असून ते श्रीशिवभक्तिमय, अमृतरूप, मकरंदविलसित व महोत्पलरूप आहे. हे अमल अर्थात् मायोपाधिरहित आणि अमूळ किंवा अनादि आहे. या श्रीशिवामृतरूपी, द्वैताद्वैतविवर्जित व अलखनिरंजनतत्त्वाची सर्वांनी अखंड उपासना करावी, असे महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी म्हटले आहे. हे महार्थतत्त्व अनिवर्चनीय आणि अद्वय आहे.

महार्थतत्त्वमयी **"श्रीमहार्थमंजरी"** या ग्रंथाला सत्तर गाथांमध्ये महाराष्ट्रीय प्राकृतामध्ये रचण्याची प्रेरणा महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांना स्वप्नामध्ये श्रीसिद्धयोगिनींकडून मिळाली होती. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी मंगलाचरणात श्रीसिद्धयोगिनीचे स्तवन पुढीलप्रमाणे केलेले आहे की -

स्वप्नसमयोपलब्ध्वा सा सुमुखी सिद्धयोगिनी देवी।
गाथाभिः सप्तत्या स्वापितभाषाभिरस्तु सम्प्रीता।।१२।।

अर्थ :- स्वप्नकाळामध्ये आपल्याच भाषेत अभिव्यक्त सत्तर गाथा **"श्रीमहार्थमंजरी"** या ग्रंथाच्या रूपात प्रदान करणारी परमसुंदरी श्रीसिद्ध-योगिनीदेवी माझ्यावर प्रसन्न होवो!

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी महार्थमंजरी या ग्रंथात असे म्हटले आहे की -

इत्थं प्राकृतसूत्रसप्ततिसमुल्लासैकसन्धायिनीं
जाग्रत्तत्क्षणनिर्विशेषस्वप्नावतीर्णां प्रतिज्ञोतराम्।
लोकोल्लङ्घनयोगसिद्धिपदवीप्रस्थानबद्धोधमां
कन्थाशूलकपालमात्रविभवां वन्दे तां योगिनीम्।।७१।।

अर्थ :- अशा प्रकारे सत्तर प्राकृत भाषामयी गाथांच्या उत्पत्तीमध्ये उल्हास किंवा आनंद प्रदान करणारी, जाग्रतावस्थेत स्वाभाविक असलेली, निर्विशेष स्वप्नामध्ये अभिव्यक्त, प्रकट किंवा अवतरित होणारी, पूजोपकरण व दक्षिणा आदींच्या पलीकडे स्वहस्तमुद्रेच्या द्वारा आपल्याच हृदयाच्या करुणेचे प्रकाशन करणारी, अलौकिक यौगैश्वर्य किंवा योगसिद्धीने संपन्न आणि कंथा, शूल व कपाल हे धारण करणारी अशी जी योगिनी तिला मी वंदन करीत आहे.

या गाथेतील "**कंथा**" या शब्दाचे तात्पर्य विश्वव्यवहार आहे. "**कपाल**" या शब्दाचे तात्पर्य शरीरामध्ये अहंताधिवासी आत्मा आहे आणि "**योगिनी**" याचाच अर्थ योगसिद्धिसंपन्न अलौकिक महाशक्ती असा आहे. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी या श्रीसिद्धयोगिनीचा स्वप्नामध्ये साक्षात्कार करून घेतला आणि तिच्याच कृपेने सत्तर गाथांमध्ये "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथामध्ये महार्थतत्त्वाचे प्रतिपादन केले. महार्थविद्या ही ज्ञानाची पराकाष्ठा आहे. कर्तव्याची पराक्रिया आहे आणि भाव्याची पराभूमी आहे. हे चैतन्य-सर्वस्व आहे. यात श्रीशिवशक्ती यांच्या तद्रूपतेचे प्रतिपादन केलेले आहे.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाचे तत्त्व प्रकट करण्यासाठी आणि हे महार्थतत्त्व कोणाच्याही द्वारा असंगत भाष्याने किंवा अभिप्रायाने प्रकट केले जाऊ नये यासाठी "**परिमल**" नावाची "**स्वोपज्ञ टीका**" लिहिली. महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांनी "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथात याविषयी असे म्हटले आहे की -

गोरक्षो लोकधिया देशिकदृष्ट्या महेश्वरानन्दः।
उन्मीलयामि परिमलमन्तर्ग्राह्यं महार्थमञ्जर्याम्।।
स्वक्रियाया अपि व्याख्यां स्वयमेव प्रयुञ्ज्महे।
उपर्यप्यात्मसंरम्भसम्भोगाम्रेडनोत्सुकाः।।
यद्वा विनेयजनचित्तचमत्क्रियार्थ-
मन्त्रोद्यमोऽयमुदितोऽस्तु तदेतदास्ताम्।।
संक्षेपविस्तारविभागविविक्तशोभः
पुष्पाञ्जलिर्भवतु वाङ्मय एष शम्भोः।।७-९।।

अर्थ :- लोकामध्ये श्रीगोरक्ष या नावाने आणि श्रीसद्गुरुप्रदत्त महेश्वरानंद या नावाने प्रसिद्ध असा मी श्रीशिवगोरक्ष "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाच्या अंतर्बाह्य किंवा रहस्यमय "**परिमल**" व्याख्याचे उन्मीलन किंवा विस्तार

किंवा प्रकाशन करीत आहे. स्वत:कडून याआधी एकदा रचलेला "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाचा दुसऱ्यांदा रसास्वाद घेण्यासाठी उत्सुक असलेला मी आपल्या कृतीची आपणच व्याख्या करण्याला दत्तचित्त झालेलो आहे. दीक्षाप्राप्त श्रद्धाळू जनांचे चित्त चमत्काराने भरून टाकणारा "**श्रीमहार्थमंजरी**" रचनारूप उद्यम जसा आहे तसाच राहावा. संक्षेपाने किंवा काही ठिकाणी विस्ताराने विवेचित परिमल व्याख्यारूप वाङ्मय ही भगवान् श्रीशंभूंना पुष्पांजली आहे.

अद्वैत हा "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाचा सर्वसारसिद्धान्त आहे. हे अद्वैत परमात्मतत्त्व हाच द्वैताद्वैतविलक्षण औतराम्नाय आहे. सर्वत्र एकमात्र श्रीशिव हेच आपल्याहून अभिन्न स्वात्मदेवता शक्तीच्या द्वारा संश्लिष्ट अद्वैतस्वरूपात अभिव्यक्त किंवा प्रगट झालेले आहेत.

"**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाची अनेक संस्करणे आहेत. इ.स.१९१९ मध्ये त्रिवेंद्रम संस्कृत ग्रंथमालामध्ये "**श्रीमहार्थमंजरी**" हा ग्रंथ प्रकाशित केला होता. हा ग्रंथ सध्या दुर्लभच आहे. ही संस्कृत ग्रंथावली काश्मीर येथून प्रकाशित झालेली आहे. यात थोडक्यात "**परिमलव्याख्या**" दिलेली आहे. योगप्रचारिणी सभा, गोरक्षटिल्ला, वाराणसी याच्या द्वारा अत्यंत शुद्ध मूळपाठ आणि संस्कृत रूपांतरसहित याचे प्रकाशन केलेले आहे. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाचे अत्यंत विस्तृत आणि आकर्षक संस्करण पं. श्रीव्रजवल्लभ द्विवेदी यांच्या द्वारा संपादित तसेच वाराणशी संस्कृत विश्वविद्यालयाच्या द्वारा इ.स. १९७२ मध्ये उपलब्ध झाले. "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाच्या सर्व प्रकाशनांचा अत्यंत गहन किंवा सखोल अभ्यास केल्यावर वाराणसी संस्कृत विश्वविद्यालयाची प्रत ही शुद्ध व नाथयोगतत्त्वसंमत तसेच स्वोपज्ञ परिमल टीकेसह अपूर्व कृती आहे ही गोष्ट लक्षात येते. ही सर्वच्या सर्व रचना श्रीमहाभारताच्या रणक्षेत्रात श्रीमाधव श्रीगोपाल-कृष्णनाथमहाराज यांनी पांडव अर्जुनाकडे जे रहस्योन्मीलन केले होते त्यावर आधारित आहे. "**श्रीमहार्थमंजरी**" हा ग्रंथ संपूर्ण योगजगताला नि:संदेहपणे महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांची अपूर्व दार्शनिक देणगी आहे.

महासिद्धयोगी श्रीगोरक्षनाथ यांचा "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाचा दार्शनिक आणि तांत्रिक विचारविमर्श हा प्रधान आधार आहे. तथापि याचे अमूल्यत्व असे आहे की, ही योगसाधना प्रशस्त प्रक्रियेची निर्मळ आणि

निष्पक्ष भूमी आहे. साधकभक्तयोगिशिष्य या योगसाधनेचा स्वीकार करून सर्वतंत्रस्वतंत्र होऊन स्वसंवेद्य परमात्मतत्त्वाचा साक्षात्कार करून घेऊन आपल्या सनातन श्रीशिवस्वरूपामध्ये निश्चल आणि स्वस्थ होत असतो. अशा तऱ्हेने "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाची तांत्रिकता आणि दार्शनिकता गौण होते आणि यात वर्णन केलेल्या सिद्धयोगसाधनेच्या प्रक्रियात्मक आणि मानसिक विधींचा समन्वय स्वतः नाथयोगतत्त्वामृत अथवा श्रीशिवोपदिष्ट योगामृताने सर्वदा समृद्ध आणि सार्थक होत असतो. "**श्रीमहार्थमंजरी**" ही कोणत्याही स्थितीत बाराव्या किंवा चौदाव्या शतकाची रचना आहे असे मानणे ही त्याच्या नाथयोगस्वरूपाची उपेक्षा आहे.

ही गोष्ट सर्वथा निर्विवाद आहे की, "**श्रीमहार्थमंजरी**" आणि त्यात वर्णिलेल्या श्रीशिवमय नाथयोगतत्त्वाच्या अभ्यासाने सहृदय साधकभक्त-योगिशिष्यांना योग्य दिशा प्राप्त होते. "**श्रीमहार्थमंजरी**" दिव्य आहे. ही दिव्यशक्ती करुणामयी सिद्धयोगिनीच्या वत्सलतेची चैतन्यामृततरंगिणी आहे. यात अवगाहन केल्याने भगवान् श्रीकृष्णांच्या मुखारविंदातून बाहेर पडलेले आणि श्रीशिवगोरक्ष द्वारा प्रतिपादित योगतत्त्व हे सहजपणे अभिव्यक्त किंवा प्रगट होत असते.

।।श्रीगुरुःशरणम्।।

।। ॐश्रीमद् अमृतमूर्तये शिववामनाय नमः।।

स्वोपज्ञपरिमलाख्यव्याख्योपेता

श्रीमहेश्वरानन्दप्रणीता

श्रीमहार्थमञ्जरी

नमो नालयते शुण्डां विषाणेन मृणालिने।
प्रत्यक्कमलकन्दाय कर्णाभ्यां पर्णशालिने।।१।।

जयत्यमूलमम्लानमौत्तरं तत्त्वमद्वयम्।
स्पन्दास्पन्दपरिस्पन्दमकरन्दमहोत्पलम्।।२।।

कारुण्यामृतसिन्धोरुदितमिवावर्तमीक्षणापाङ्गात्।
मौक्तिकमयं दधाना ताटङ्कं जयति गौरवी मूर्तिः।।३।।

स्फूर्तये विश्वशिल्पस्य श्रीशिवानन्दमूर्तये।
नित्योन्मेषनिमेषायै निस्तुषायै नमस्त्विषे।।४।।

यस्मादनुत्तरमहाह्रदमज्जनं मे
सौभाग्यशाम्भवसुखानुभवश्च यस्मात्।
तत्स्वात्मचित्क्रमविमर्शमयं गुरूणा-
मोवल्लियुग्ममुदितोदितवीर्यमीडे।।५।।

नमो निखिलमालिन्यविलापनपटीयसे।
महाप्रकाशपादाब्जपरागपरमाणवे।।६।।

गोरक्षो लोकधिया देशिकदृष्ट्या महेश्वरानन्दः।
उन्मीलयामि परिमलमन्तर्ग्राह्यं महार्थमञ्जर्याम्।।७।।

स्वक्रियाया अपि व्याख्यां स्वयमेव प्रयुञ्ज्महे।
उपर्यप्यात्मसंरम्भसम्भोगाम्रेडनोत्सुकाः।।८।।

यद्वा विनेयजनचित्तचमत्क्रियार्थ-
मत्रोद्यमोऽयमुदितोऽस्तु तदेतदास्ताम्।
सङ्क्षेपविस्तरविभागविविक्तशोभः
पुष्पाञ्जलिर्भवतु वाङ्मय एष शम्भोः।।९।।

अवगतशिवदृष्टिप्रत्यभिज्ञार्थतत्त्व-
क्रमसरणिरहस्योल्लाससर्वस्ववेदी।
गुरुचरणसपर्याचातुरीचिह्नोऽहं

गहनमपि हृदन्तर्व्योम तद् व्याकरोमि।।१०।।
इह महति रहस्योन्मीलने मङ्गलाय
प्रभवति मम संविद्योगिनीनां प्रसादः।
अपि तु कुलसपर्याबिम्बसम्बन्ध्यवन्ध्याः
सकृदपि मतिमन्तो नैनमुद्धाटयन्तु।।११।।
स्वप्नसमयोपलब्धा सा सुमुखी सिद्धयोगिनी देवी।
गाथाभिः सप्तत्या स्वापितभाषाभिरस्तु सम्प्रीता।।१२।।
वर्धतां देशिकः श्रीमान् संविन्मार्गश्च वर्धताम्।
माहेश्वराश्च वर्धन्तां वर्धतां च महेश्वरः।।१३।।

अर्थ :- या पहिल्या श्लोकांमध्ये निर्विघ्नतेसाठी श्रीगणेशाला नमस्कार केलेला आहे. ज्याची सोंड कमलाच्या दांडीप्रमाणे आहे, ज्याचे दात हे त्या कमलातील केसर आहेत व ज्याचे दोन मोठे रुंद असे कान हे कमलाच्या पानाप्रमाणे आहेत त्या अनादि परमात्मकमलकंद सर्वव्यापक अशा सुशोभित श्रीगजाननाला नमस्कार असो.।।१।।

अद्वैततत्त्व हे सर्वांचे मूळ अधिष्ठान असल्याने त्याला अधिष्ठान नाही. हे अद्वैततत्त्वरूप मोठे कमल कधी म्लान होत नाही. असे हे औपनिषद् अद्वय व औत्तरतत्त्व अर्थात् सर्वश्रेष्ठ उत्तराम्नायतत्त्व श्रीशिवसूत्रांमध्ये प्रतिपादित केलेले आहे. तसेच त्याचे श्रीस्पंदशास्त्रात सर्वत्र वर्णन केलेले आहे. हे अद्वयतत्त्व श्रीशिवभक्तिमय असून ते अमृतरूपी मकरंदविलसित अशा मोठ्या कमलाप्रमाणे निर्मल म्हणजे मायोपाधिरहित आणि अमूल अर्थात् अनादि आहे. या अद्वैततत्त्वाची उपासना करून सर्वांनी आपला उत्कर्ष करून घ्यावा.।।२।।

विशेष :- औत्तरतत्त्व हे क्रमदर्शन आहे. हे अद्वैततत्त्व शैवागम पंचवक्त्र श्रीशिवांच्या उत्तरमुखकमलापासून निघालेले आहे, अशी शैवपरंपरा आहे. आगम (शास्त्रप्रामाण्य) हे क्रमदर्शनावर आधारलेले आहे. श्रीमहार्थमंजरीमध्ये याच क्रमदर्शनाचे वर्णन केले आहे. हेच क्रमदर्शन हे औत्तराम्नायरूपामध्ये प्रसिद्ध आहे. हे औत्तराम्नायदर्शन अत्यंत निर्मल व सच्चिदानंद ब्रह्म श्रीशिवांचे प्रतिपादक असल्याने त्याचे अनादि कमलरूपाने वर्णन केलेले आहे. हे दर्शन नाथयोगाचे प्रतिपादन करणारे आहे.।।२।।

श्रीसद्गुरुमूर्ती ही कृपामृतसिंधूपासून उत्पन्न झालेली असून तिने मुक्तिमय अशी मोत्यांपासून बनविलेली कर्णभूषणे धारण केलेली आहेत. ती श्रीसद्गुरु-

मूर्ती ही मुक्तिदायक आहे. अशा त्या परमकृपामयी, शक्तिपातकारिणी व मुक्तिप्रदायिनी अशा श्रीसद्गुरुस्वरूपिणी तेजोमयी आकृतीचा जयजयकार असो.।।३।।

या श्रीशिवांच्या स्फुरणातून विश्वोत्पत्तिरूप शिल्पकला निर्माण झालेली आहे. या श्रीशिवांची मूर्ती उन्मेषनिमेषमयी अर्थात् सृष्टीची उभारणी व संहारणी करणारी आहे. ती द्वैताद्वैतविवर्जित, स्वसंवेद्य व अलखनिरंजन आहे. अशा सच्चिदानंदस्वरूप व प्रकाशमय तेजस्वी श्रीशिवमूर्तीला माझे नमस्कार असोत.।।४।।

श्रीसद्गुरुचरणकमलांच्या प्रभावामुळे मला अद्वय अर्थात् द्वैताद्वैतविरहित, अव्यय व अनुत्तराम्नाय क्रमदर्शनाच्या श्रेष्ठ आनंदसागराच्या डोहात परिपूर्ण डुंबण्याचा योग आला. त्यांच्या प्रभावामुळेच मला सौभाग्यरूप अशा शांभव-सुखाचा अनुभव मिळाला. त्या स्वतःच्या आत्मचैतन्याचा विमर्श करणाऱ्या आणि ज्यांचे सामर्थ्य नित्य उदयाला पावणारे आहे, अशा श्रीसद्गुरुचरण-कमलांचे मी स्तवन करीत आहे.।।५।।

श्रीशिवस्वरूप असलेल्या श्रीमत्स्येंद्रनाथांचे परमदिव्य असे चरणकमल हे सर्व मायिक मालिन्य व मायोपाधिजन्य प्रपंचरूपी अंधकार नष्ट करून महाप्रकाश उत्पन्न करणारे आहेत. त्या श्रीमत्स्येंद्रनाथांच्या परमदिव्य अशा चरणकमलांच्या परमाणूंना अर्थात् त्यांच्या सूक्ष्मातिसूक्ष्म कणाला मी नमस्कार करीत आहे.।।६।।

मी गोरक्षनाथ लोकव्यवहारामध्ये "गोरक्ष" या नावाने तसेच श्रीसद्गुरूंनी दिलेल्या महेश्वरानंद या नावाने प्रसिद्ध आहे. मी श्रीमहार्थमंजरीच्या अंतर्ग्राह्य अर्थात् रहस्यमय परिमलाचा म्हणजे व्याख्येचा विस्तार करीत असून निगूढ परिमल टीकेचे प्रकाशन करीत आहे.।।७।।

मी प्रथम स्वतः रचलेल्या श्रीमहार्थमंजरीचे पुन्हा रसास्वादन करण्या-साठी उत्सुक असल्यामुळे आपल्या कृतीची व्याख्या करण्यासाठी दत्तचित्त होऊन प्रवृत्त झालेलो आहे.।।८।।

दीक्षाप्राप्त व श्रद्धाळू साधकाच्या चित्ताला चमत्कृत करणाऱ्या श्रीमहार्थ-मंजरीच्या रचनेचा हा उद्योग जसा झालेला आहे तसाच तो राहावा अर्थात् त्यात बदल होऊ नये, अशी माझी इच्छा आहे. या टीकेमध्ये संक्षेप व विस्ताराने विवेचन केलेले असून माझे हे परिमलव्याख्यारूप वाङ्मय पुष्पां-जलीच्या रूपाने मी भगवान् श्रीशिवांच्या चरणी अर्पण करीत आहे.।।९।।

श्रीसद्गुरुचरणकमलांच्या दक्षतापूर्ण सेवेने मी दिव्यदृष्टिसंपन्न झालो असून श्रीशिवदृष्टी, श्रीप्रत्यभिज्ञार्थतत्त्व, श्रीक्रमदर्शन, श्रीरहस्योल्लास इत्यादि सर्वांचे ज्ञान प्राप्त करून घेतलेले आहे. त्याचप्रमाणे श्रीसद्गुरुकृपेने मी चैतन्यघन असा झालेलो असून गहनहृदयाच्या हृदयाकाशामध्ये निगूढ रहस्यमय महार्थतत्त्वाची व्याख्या करीत आहे.।।१०।।

श्रीयोगिनीदेवीच्या प्रसाद अर्थात् अनुग्रहरूपी कृपेने या महान् रहस्याच्या शुभप्रकाशासाठी माझी बुद्धी समर्थ होऊन प्रवृत्त होवो. ज्यांच्या कुलामध्ये पूजादि सदाचार नाहीत, अशा केवळ बुद्धिमान् लोकांनी ही रहस्यपेटी उघडण्याचा प्रयत्न करू नये.।।११।।

या सिद्धयोगिनीदेवीने माझ्या स्वप्नात येऊन मला दर्शन दिले. तिच्या कृपेनेच या सत्तर श्लोकांवरील भाष्य मी करीत आहे. या स्वप्नातील परिमल-भाषा टीकेने ती श्रीयोगिनीदेवी संतुष्ट होवो.।।१२।।

श्रीसद्गुरूंचे यश वर्धमान होवो! स्वसंवेद्य द्वैताद्वैतविलक्षण अशा ज्ञान-मार्गाचा प्रसार होवो! श्रीमाहेश्वरांची अर्थात् शैवांची कुलवृद्धी होवो! परमश्रीशिवांच्या उपासनेत वृद्धी होवो! सर्वांना श्रीशिवांचा अधिकाधिक अनुग्रह प्राप्त होवो!।।१३।।

परिमलव्याख्यार्थ :- या **"श्रीमहार्थमंजरी"** नामक महत्तंत्रामध्ये आत्मरूपाशी अभिन्न असलेल्या श्रीपरमेश्वराच्या ज्ञानाचा व त्याच्या प्राप्तीचा उपाय सांगितलेला आहे. तो सिद्धान्त सांगताना अभ्युपगम म्हणजे तात्पुरता मानलेला सर्वसंमत असा सिद्धान्त, तात्पर्य, प्रतिज्ञा, हेतू व उदाहरणादि पंचअवयववाक्ये यांचा उपयोग केलेला आहे. या श्रीमहार्थमंजरीमध्ये सूत्ररूप अशा सत्तर गाथा (अर्धमागधी या भाषेत) आहेत. त्या गाथांमधील पहिल्या गाथेमध्ये मंगलाचरणपूर्वक आदिवाक्य अशा भाष्यग्रथनाची प्रतिज्ञा केलेली आहे. त्यातील दुसऱ्या गाथेमध्ये तंत्रामध्ये प्रतिपादन केलेल्या वस्तूंचा उल्लेख केलेला आहे. तीन, चार व पाच या तीन गाथांमध्ये आत्मतत्त्वात प्रत्यक्षादि प्रमाणांना विशेष महत्त्व नसल्याचे सांगितले आहे. सहाव्या गाथेमध्ये अधिकारी अशा मुमुक्षूंचा ऊहापोह केलेला आहे. सातव्या गाथेमध्ये विधिनिषेध विषयक विचार आहे. आठव्या गाथेमध्ये संसाराच्या स्वरूपाचे वर्णन केलेले आहे. नवव्या गाथेमध्ये आत्मा स्पष्ट असून अस्फुट भासतो, ते योग्य कसे आहे याचे विवेचन केलेले आहे. दहाव्या गाथेमध्ये ज्ञात स्वरूपाचे ज्ञान हाच पुरुषार्थ असल्याचे वर्णन केले आहे. पुढील अकराव्या आणि बाराव्या

गाथेमध्ये विचारांचा व ज्ञानांचा विचार केलेला आहे. त्यापुढील तेरा ते पंचवीस या तेरा गाथांमध्ये छत्तीस तत्त्वांचा विचार केलेला आहे. सव्वीसाव्या गाथेमध्ये मुक्तीसाठी तत्त्वाची पारमार्थिकता विचारात घेतलेली आहे. सत्ता-विसाव्या गाथेमध्ये संपूर्ण विश्व ज्ञानज्योतीमध्ये अंतर्भूत आहे हे सांगितलेले आहे. अठ्ठाविसाव्या गाथेमध्ये एकाच आत्मवस्तूत श्रीशिवशक्तीचे सामरस्य असल्याचे कथन केलेले आहे. एकोणतिसाव्या गाथेमध्ये श्रीपरमेश्वर हा विश्वशरीरी आहे म्हणून तो विशेष शक्तीने युक्त असल्याचे प्रतिपादन केलेले आहे. तिसाव्या गाथेमध्ये आत्मस्वरूपातच हे विचित्र विश्व विकलतेवाचून म्हणजे अखंडपणे किंवा एकरसपणे; परंतु मोकळे वसलेले आहे, याचे वर्णन आलेले आहे. एकतिसाव्या गाथेमध्ये प्रमाता म्हणजे जीवादि त्रिपुटीचे अर्थात् सत्त्व, रज व तमाचे अद्वैतात पर्यवसान होत असल्याचे कथन केलेले आहे. पुढील बत्तीस व तेहतीस या दोन गाथांमध्ये सत्यासत्यविभागाचे विवेचन केलेले आहे. त्यापुढील चौतीस व पस्तीस या दोन गाथांमध्ये परमेश्वरपर्यायाचे म्हणजेच श्रीशिवपूजेचे वैशिष्ट्य वर्णन केलेले आहे. पुढील छत्तीस ते एक्केचाळीस या सहा गाथांमध्ये पूज्य असा श्रीपंचार्थाचा क्रमविचार केलेला आहे. त्यापुढील बेचाळीस ते शेहेचाळीस या पाच गाथांमध्ये श्रीशिवपूजेच्या स्वरूपाचे यथार्थ निष्कर्ष मांडलेले आहेत. त्यानंतरच्या सत्तेचाळीस व अठ्ठेचाळीस या दोन गाथांमध्ये देवतेच्या स्वभावाचा विचार केलेला आहे. एकोणपन्नासाव्या गाथेमध्ये मंत्रतत्त्व कथन केलेले आहे. पन्नासाव्या गाथेमध्ये वाणीच्या वृत्तीचा विचार मांडलेला आहे. एकावन्नाव्या गाथेमध्ये तत्त्वांसह मुद्रांचे वर्णन आलेले आहे. बावन्नाव्या गाथेमध्ये विश्वाची उत्पत्ती, प्रकाशन व संहारणी करणाऱ्या शक्तीला विमर्श शक्ती म्हटलेले आहे आणि तिच्या साहाय्याने भोग व मोक्ष यांच्या फलाची प्राप्ती होत असते हे कथन केलेले आहे. त्रेपन्नाव्या गाथेमध्ये जीवन्मुक्तीच्या उपपत्तीचे वर्णन केलेले आहे. चोपन्नाव्या गाथेमध्ये क्षणभंगुर-वादाचे खंडन केलेले आहे. पंचावन्नाव्या गाथेमध्ये स्वात्मस्वरूपाच्या आनंदस्पंदनाचे वर्णन आलेले आहे. छपन्न ते एकोणसाठ या पुढील चार गाथांमध्ये तत्त्वाचा बोध करून देणाऱ्या स्पष्ट उपायांचा उपदेश केलेला आहे. पुढील साठ ते पासष्ट या सहा गाथांमध्ये विमर्शविचार करून यात प्रवेश करू इच्छिणाऱ्यांविषयी आणि प्रवेश केलेल्यांच्या निश्चिंततेविषयी विचार आलेला आहे. सहासष्टाव्या गाथेमध्ये आत्मविचाराने सद्यस्वरूपी अर्थात् तत्काळ सिद्धिलाभ कसा होतो, हे सांगितलेले आहे. सदुसष्टाव्या गाथेमध्ये

विमर्श शक्तिरूपी ज्ञानप्राप्तीसाठी श्रीसद्गुरूंच्या कृपाकटाक्षाची आवश्यकता असल्याचे विवेचन केलेले आहे. अडुसष्टाव्या गाथेमध्ये जीवनमुक्तीसाठी सर्व दर्शनांचे सार असे साधन असल्याचे कथन केलेले आहे. एकोणसत्तराव्या गाथेमध्ये तंत्रविस्ताराचे संक्षेपाने वर्णन केलेले आहे. सत्तराव्या गाथेमध्ये श्रीव्यासादियोगिजनांनी या तंत्रालाच श्रेष्ठ मानून शरण गेल्याचे सांगितले आहे. शेवटच्या गाथेमध्ये तंत्रकर्त्यांनी तंत्रोपदेशाचे कारण कथन करीत तंत्र पूर्ण केलेले आहे. असे संक्षेपाने या तंत्राचे तात्पर्य आहे.

❋❋❋❋❋

गाथा क्रमाङ्क १

अवतरणिका :- येथून पुढे मी ग्रंथावर व्याख्या करण्याला सुरुवात करीत आहे. अनुत्तर म्हणजे सर्वश्रेष्ठ अद्वैतसिद्धीसाठी अर्थात् द्वैतभाव सर्व बाजूंनी दूर करण्याला समर्थ अशा तंत्राचा उपन्यास करीत आहे. तंत्रकर्ते हे श्रीसद्गुरुवर्य भट्टारकांचे शिष्य आहेत. श्रीसद्गुरुज्ञानाचे अनुसंधान ठेवूनच हे तंत्र रचले आहे. त्यातील ही प्रथम गाथा आहे.

णमिऊण णिच्चसुद्धे गुळुणो चळणे महप्पआसस्स।
गट्ठइ महत्थमंजरिमिमिणं सुरहिं महेसराणंदो।।१।।
(नत्वा नित्यशुद्धौ गुरोश्चरणौ महाप्रकाशस्य।
ग्रथ्नाति महार्थमञ्जरीमिमां सुरभिं महेश्वरानन्दः।।)

अर्थ :- सच्चिदानंदस्वरूपी व महाप्रकाशी अशा श्रीसद्गुरूंच्या अर्थात् श्रीमत्स्येंद्रनाथांच्या नित्य व शुद्ध चरणकमलद्वयांवर श्रद्धापूर्वक नतमस्तक होऊन मी महेश्वरानंद अर्थात् गोरक्षनाथ महायोगज्ञानरूप श्रीमहार्थमंजरी ही श्रेष्ठ अशा ग्रंथरूपात निबद्ध करीत आहे.।।१।।

विशेष :- श्रीसद्गुरू हे परम अनुग्रहस्वरूप आहेत. ते संपूर्ण जगताला आपल्या अहेतुक करुणेने अनुग्रहीत करीत असतात. श्रीसद्गुरू हे साक्षात् सच्चिदानंदस्वरूपी परमात्माच आहेत. श्रीसद्गुरूंचे दोन्ही चरण हे पूर्णपणे निर्मल असतात. या दोन्ही चरणकमलांचे स्मरण केल्याने व त्यांना नमस्कार केल्याने मायेचा अंधकार व अज्ञान यांचा नाश होतो. श्रीमहार्थमंजरी हे महायोगाचे महातत्त्व व ज्ञानतत्त्व आहे. असे हे तत्त्व भोग व मोक्षरूप असून ते सर्व प्राणिमात्रांनी विशेष करून प्राप्त करावे असे आहे; कारण तेच त्यांचे प्राप्तव्य किंवा ईप्सित आहे. या तत्त्वाचे सर्व जनांना रसास्वादन करता यावे आणि या परमात्मरसाचा अनुभव प्रकट करावा म्हणून मी महेश्वरानंद

अर्थात् गोरक्षनाथ या ग्रंथाची रचना करीत आहे. हा ग्रंथ मी सत्तर गाथांमध्ये रचला असून तो परमात्मप्रकाश आणि विश्वविमर्श अर्थात् विश्ववैचित्र्य-विलासाचा पर्याय आहे.

परिमलव्याख्यार्थ :- या जगतामध्ये सर्व लोकांना उपासना करण्यासाठी एखादी देवता असतेच याविषयी कोणाचेही दुमत नाही. केवळ देवतेच्या नामरूपादि बाबतीत वैषम्य असते. यासंबंधात युक्तीने पर्यावलोचन म्हणजे विचार-विनिमय केल्यास आत्मबुद्धीचा स्फुरणरूप प्रकाश हीच सर्व विश्वाची उपास्य देवता ठरते. त्या प्रकाशदेवतेचे महत्त्व पुढीलप्रमाणे आहे.

सा स्फुरत्ता महासत्ता देशकालाविशेषिणी।
सैषा सारतया चोक्ता हृदयं परमेष्ठिनः।।

अर्थ :- ते बुद्धिस्फुरण सद्रूप देशकालामुळे झाकलेले आहे. हे सर्वांचे सार असून परमेष्ठी अर्थात् ब्रह्मदेवाचे हृदयसर्वस्व-रहस्य आहे.

हे बुद्धिस्फुरणाचे रूप "**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथामध्ये स्पष्टपणे सांगितलेले आहे. ही बुद्धिस्फुरणरूप प्रकाशदेवता विश्वव्यवहाराचे प्रकाशन किंवा दर्शन घडवून सर्वांवर अनुग्रह करीत असल्यामुळे ती श्रीसद्गुरुरूपच जाणावी. ही प्रकाशदेवता नसती तर ही सृष्टी अंधत्व किंवा बधिरत्व पावली असती व काही ज्ञान झाले नसते. श्रीपरमशिवभट्टारक हे त्या आत्मरूप-प्रमात्याचे म्हणजे जीवाचे दुसरे नाव आहे अर्थात् संवित्प्रकाश अर्थात् कुंडलिनी शक्तीचा प्रकाश म्हणजे ही शक्ती व श्रीसद्गुरू हे दोन्ही एकच आहेत. "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथामध्ये "**गुरुरुपायः।**" म्हणजे "श्रीसद्गुरू हे उपाय म्हणजे श्रेष्ठ साधन आहेत," असे सांगितलेले आहे. श्रीसद्गुरूंच्या चरणांमुळे ज्ञानक्रियाशक्तिरूप स्वातंत्र्य मिळते, याच श्रीसद्गुरुचरणांमुळे हे स्वातंत्र्य कळते व आचरिले जात असते. हे श्रीसद्गुरुचरण विश्वाला प्रलयामध्ये भक्षण म्हणजे आत्मरूपात समाविष्ट करून घेतात.

या दृष्टीने "**श्रीकुब्जिकामत**" या ग्रंथामध्ये असे सांगितलेले आहे की -

भोग्यभोक्तृषु भावेषु मिषत्स्वनिमिषत्सु च।
देशकालदिगाख्येषु स्थूलसूक्ष्मपरेषु च।।
सत्तास्फुरणकव्याप्ता गतिभक्षणयोगतः।
कर्मणा चरणाख्येयं न तु पादतया प्रिये!।।

अर्थ :- भोग्य, भोक्ता, भाव, गुप्त, प्रकट, देश, काल, दिशा, स्थूल, सूक्ष्म व परमसूक्ष्म या सर्वांमध्ये शक्तीचे स्फुरण भरलेले आहे. गमन व

संहरण यामुळे या स्फुरणाला "चरण" असे म्हटलेले आहे.

येथे **"चरण"** या शब्दाने गमनकर्म असा अर्थ अभिप्रेत नाही. चरणौ या द्विवचनाची व्यवस्था अशी की, तिसरा चरण म्हणजे प्रत्यक्ष श्रीसद्गुरू मिळून "चरणौ" हे एकवचन समजावे.

यानंतरही **"श्रीकुब्जिकामत"** या ग्रंथामध्येही याप्रमाणेच वर्णन आलेले आहे.

सितो वामेऽरुणो दक्षे वराभयकरो गुरुः।
प्रेताम्बुजगतोऽङ्कस्थरक्तशक्तिस्त्रिलोचनः।।
पञ्चमुण्डधरः स्रग्वी हृदि ध्येयः स्मिताननः।।

अर्थ :- ज्यांचा डावा हात शुभ्र वर्णाचा व वरदायक आणि उजवा हात तांबूसवर्णी व अभयदायक असून या दोन हातांमुळे जे शोभायमान दिसतात, जे प्रेतरूपी कमलावर बसलेले आहेत, जे मांडीवर रक्त-शक्ती धारण करून घेऊन बसलेले आहेत, जे तीन नेत्रांचे, पाच मस्तकांचे किंवा पाच नरमुंडाची माळ घातलेले, पुष्पादि हार घातलेले आणि स्मितहास्य करणारे आहेत अशा श्रीशिवरूपाचे हृदयात ध्यान करावे.

"अयेमव सकलनिष्कलात्मा सर्वविधूननावस्थायां निर्वाणरूपस्तुरीयः पादः। इत्युपनिषत्।।"

अर्थ :- उपनिषदांमध्येही हेच म्हटलेले आहे की, "सकल-निष्कलरूप असा जो निर्वाणरूप तिसरा चरण आहे तो सर्वत्यागसमयी मोक्षरूप आहे. लोकव्यवहार हा सकल व निष्कल अशा चरणद्वयाने कल्पिलेला आहे;" कारण असे म्हटलेलेच आहे की -

शुक्लोऽङ्घ्रिः शुक्लमाविष्टो रक्तं रक्तोऽङ्घ्रिराश्रितः।
पित्रोरङ्घ्रिद्वयेनेदममुना जायतेऽखिलम्।।

अर्थ :- पित्याचा शुक्लवर्ण चरण हा सत्त्व सृष्टीचा उत्पादक असून मातेचा रक्तवर्ण चरण हा रज आदि सृष्टीचा उत्पादक आहे. या दोन चरणांपासून अखिल विश्वोत्पत्ती होते, असे हे दोन चरण असून त्यातच सृष्टीच्या उभारणीचे व संहारणीचे प्रतिबिंब पडते. हेच श्रीपरमेश्वराचे पारमैश्वर्य अर्थात् माहात्म्य आहे. या श्रीपरमेश्वराच्या माहात्म्यामध्येच अंतर्बाह्य ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती यांच्या प्रतिबिंबामुळे चैतन्ययुक्त सर्व विश्वविलास सामावलेला आहे. याच श्रीपरमेश्वरीशक्तीला स्वातंत्र्य, स्पंद, स्फुरत्ता, उद्यम इत्यादि नावांनी आगमग्रंथांमध्ये वर्णिले आहे.

या दृष्टीने "**श्रीप्रत्यभिज्ञा**" या तंत्रग्रंथामध्ये असे म्हटलेले आहे की -

विमर्श एव देवस्य शुद्धे ज्ञानक्रिये यतः।।

अर्थ :- नित्य शुद्धत्वामुळे ज्ञानक्रियाशक्तीला विमर्श असे म्हणतात.

त्या चरणांना म्हणजे शक्तिरूप श्रीसद्गुरूंना नतमस्तक होऊन व सर्वश्रेष्ठत्वाचा मान देऊन वंदन करीत आहे. हे वंदन म्हणजे मन, वाणी व शरीर यांची ऋजुता होय. श्रीकंठाचार्यांनीही असे म्हटले आहे की, "श्रीसद्गुरुरूप शक्तीच्या स्फुरणाला उपासकाचे वंदन असो. महाप्रकाश म्हणजेच परमेश्वराचा श्रेष्ठ असा उत्कर्षरत स्वरूपाविर्भाव आहे. त्या स्फुरणाला त्याच्या उपासकाचे नमन असो. हे प्रत्यक्ष "**नत्वा**" शब्दाने सांगितलेले आहे. पूजा व नमस्कार या क्रियेसाठी देवता ही एकच असणे आवश्यक आहे. एका देवतेमध्ये दुसऱ्या देवतेचा अंतर्भाव केल्यास साधकाला गोंधळल्यासारखे होत असते. श्रीपरमेश्वरांच्या उत्कर्षाचे स्मरण हे महन्मंगलाचरण असून ते तंत्राच्या आरंभाच्या वेळी केलेच पाहिजे.

या संबंधी "**श्रीमत्स्तोत्रावली**" या ग्रंथामध्ये असे म्हटलेलेच आहे की -

सर्वाशङ्काशनिं सर्वालक्ष्मीकालानलं तथा।
सर्वामङ्गल्यकल्पान्तं मार्गं माहेश्वरं नुमः।।
व्यापाराः सिद्धिदाः सर्वे ये त्वत्पूजापुरस्सराः।

अर्थ :- श्रीमाहेश्वर हे सर्व शंकारूपी पर्वताला वज्राप्रमाणे भेदणारे आहेत. हे श्रीमाहेश्वर सर्व अनैश्वर्य अर्थात् निःश्रीक दारिद्र्यादि गोष्टींना अग्नीप्रमाणे जाळणारे आहेत अर्थात् ते सर्व इहपर ऐश्वर्य देणारे आहेत. तसेच हे श्रीमाहेश्वर सर्व अमंगलाचा प्रलयकालाप्रमाणे नाश करणारे असून या श्रीमाहेश्वरांसंबंधी प्रवर्तित केलेल्या सिद्धयोगमार्गाला नमस्कार असो. हा मार्ग सर्वार्थाने सफल व सिद्धिदायक असा आहे.

"**मङ्गलादीनी मङ्गलमध्यानि मङ्गलान्तानि च शास्त्राणि प्रथन्ते। वीरपुरुषाणि भवन्त्यायुष्मत्पुरुषीणि च।।**" अर्थात् "ज्या ग्रंथांच्या किंवा शास्त्रांच्या आरंभी, मध्यात व अंती मंगलाचरण केलेले असते त्या ग्रंथांचा किंवा शास्त्रांचा प्रसार होऊन ते ग्रंथ व शास्त्रे माणसांना निर्भयत्व आणि दीर्घायुष्य देतात," असे वचन असल्यामुळे हे महाभाष्यही दोन किंवा तीन मंगलाचरणांनी युक्त असलेले शास्त्र आहे, असे मानणे आवश्यक आहे. प्रस्तुत श्रीमहार्थमंजरी या ग्रंथामध्ये प्रत्येक गाथेत अनुभवाला येणारे पारमैश्वर्यमांगल्य हे कापराच्या प्रत्येक तुकड्याच्या सुवासाप्रमाणे प्रफुल्लित करीत

असते. या श्रीमहार्थमंजरी तंत्राला **"महातंत्र"** म्हणणे अधिक योग्य आहे. "वक्ता व श्रोता यांना ज्ञान व्हावे," हे या तंत्राच्या उपोद्धातामध्ये स्पष्ट शब्दांमध्ये सांगितलेले आहे. परमेश्वराला नमन केल्याने अडचणीही दूर होत असतात. पारमैश्वर्याचे अनुसंधान व अनुसंधाता या दोघांचे तादात्म्यच येथे कथन व स्थापन केलेले आहे.

"श्रीशिवदृष्टी" या तंत्र ग्रंथामध्ये असे म्हटलेले आहे की -

अस्मद्रूपसमाविष्टस्वात्मनात्मनिवारणे।
शिवः करोतु निजया नमः शक्त्या ततात्मने।।

अर्थ :- श्रीशिवांनी आमच्या रूपात समाविष्ट असलेल्या आत्म व अनात्म वस्तूंच्या निवारणासाठी स्वशक्तीचा उपयोग करून जगन्मंगल करावे. अशा त्या व्यापक आत्मरूपाला आमचे नमन असो.

यामुळे प्रथम नमनाचा उल्लेख आला असून त्यानंतर नमनकर्त्यांचा म्हणजे श्रीमहेश्वरानंदांचा उल्लेख आलेला आहे. मी (म्हणजे हे) श्रीमहेश्वरानंद म्हणजे श्रीपरमशिवभट्टारकच असून ते नित्य, आवरणरहित, प्रकाशानंद, परमार्थस्वतंत्रलक्षण अशा रूपाचे आहेत. श्रीमहेश्वरानंदांना ही स्थिती श्रीसद्गुरूंच्या कृपेने अर्थात् शक्तिपातामुळे प्राप्त झालेली आहे. या श्रीसद्गुरूंच्या कृपाकटाक्षाने प्राप्त झालेल्या शक्तिपातयोगदीक्षेमुळे श्रीमहेश्वरानंदांच्या चित्तामधील सर्व मलाचा उपलेप नष्ट होऊन ते मंगलमहाभिषेकाने युक्त झाल्यामुळे उपनिषदादि तसेच औत्तराम्नायादि सर्व शास्त्रांमध्ये प्रवीण झाले. साधक पुढील तीन कसोट्यांनी स्वतंत्र तंत्र लिहिण्याला योग्य होतो. परमेश्वराच्या ऐश्वर्याचा उत्कर्ष, विचारधारेचे सातत्य व अंतःकरणाची उपक्षीणता या साधकाच्या तीन कसोट्या आहेत. **"श्रीनिशाटन"** या ग्रंथामध्ये असे म्हटलेलेच आहे की, **"त्रिप्रत्ययमिदं ज्ञानम्"** अर्थात् "वरील तीन गोष्टींचा प्रत्यय येणे," हेच ज्ञान आहे. **"श्रीकिरणातंत्र"** या ग्रंथामध्येसुद्धा **"गुरुतः शास्त्रतः स्वतः।"** अर्थात् "श्रीसद्गुरूंपासून, शास्त्रांपासून आणि स्वतःच्या प्रयत्नांमुळे हे ज्ञान होते," असे सांगितले आहे.

"श्रीशिवसूत्र" या ग्रंथामध्ये वर्णिल्याप्रमाणे **"योऽविपस्थो ज्ञाहेतुश्च"** व **"दानमात्मज्ञानम्"** म्हणजे "स्वतःला झालेल्या परमेश्वरज्ञानाचा लाभ दुसऱ्यांनाही मिळावा," या कळकळीने या तंत्राची रचना केलेली आहे, हे योग्यच आहे. अन्यथा इतर शास्त्रकर्त्यांप्रमाणे फसवेपणातच या शास्त्राचेही पर्यवसान झाले असते.

"**श्रीहंसभेद**" या ग्रंथामध्ये असे विवेचन केलेले आहे की -

सेव्यन्ते गुरवोऽनेके ज्ञानविज्ञानभासुराः।
दुर्लभोऽयं गुरुर्देवि योऽहङ्कारक्षयङ्करः।।
तेनाधीतं श्रुतं तेन तेन सर्वमनुष्ठितम्।
येनाहङ्कारनिर्मुक्तः केवलो विदितः स्वयम्।।

अर्थ :- हे देवी! ज्ञानविज्ञानाने श्रेष्ठ असे श्रीसद्गुरू व त्यांचे शिष्य हे अनेक आहेत व भेटतील; परंतु अहंकाराचा मागमूसही न ठेवणारे श्रीसद्गुरू हे अतिशय दुर्लभ आहेत. ज्यांनी अंहकाररहित असे केवळ आत्मतत्त्व जाणलेले आहे व जे स्वतःही त्याप्रमाणेच आहेत, अशा श्रीसद्गुरूंचेच अध्ययन, श्रवण व अनुष्ठान हे यथार्थ समजावे अर्थात् इतरांचे थोतांड किंवा तकलुपी समजावे.

परंतु "**श्रीबाह्यशास्त्र**" यामध्ये असे म्हटले आहे की -

अन्यथा देवपाण्डित्यं शास्त्रपाण्डित्यमन्यथा।
अन्यथा तत्पदं शान्तं लोकाः पश्यन्ति चान्यथा।।

अर्थ :- वेदांमधील पांडित्य व शास्त्रांमधील पांडित्य हे वेगवेगळे समजावे. शांत आत्मतत्त्व आणि लोकांची पाहण्याची दृष्टी ही त्याहूनही निराळी आहे.

यामुळेच बाह्यशास्त्रांना आत्मज्ञानाचे साधकत्व येत नाही.

"**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथामध्येही असेच म्हटलेले आहे की -

येऽप्यसाक्षादुपायेन तद्रूपं प्रविविन्दते।
नूनं ते सूर्यसंवित्त्यै खद्योतादीच्छवो जडाः।।

अर्थ :- जे लोक अप्रत्यक्ष अशा अन्य उपायांनी आत्मरूप जाणण्याची इच्छा करीत असतात, ते लोक सूर्याला पाहण्यासाठी काजव्यांकडे धावणाऱ्या अज्ञानी जनांप्रमाणे समजावेत.

तसेच "**श्रीकुलकमल**" या ग्रंथात असे म्हटलेले आहे की -

शाक्तेन तेजसा शून्यं ये मार्गं पर्युपासते।
ते वह्निरहिते कुण्डे स्थाल्या होमं प्रकुर्वते।।

अर्थ :- जे लोक हे शाक्ततेजोरहित मार्गाचा अवलंब करीत असतात ते लोक हे अग्निरहित कुंडामध्ये हवन करणाऱ्या याज्ञिकांसारखे समजावेत.

या "**श्रीमहार्थमंजरी**" या तंत्रामध्येही तरतमता पाहणे आवश्यक आहे, हे कथन करताना असे म्हटलेले आहे की -

नरर्षिदेवद्रुहिणविष्णुरुद्राद्युदीरितम्।

उत्तरोत्तरवैशिष्ट्यात् पूर्वपूर्वप्रबाधकम् ।।

अर्थ :- मनुष्य, ऋषी, श्रीइंद्रादि देव, श्रीब्रह्मदेव, श्रीविष्णू व श्रीरुद्रादिकांनी सांगितलेली तंत्रे ही उत्तरोत्तर वैशिष्ट्यपूर्ण असल्यामुळे पूर्वपूर्वतंत्रांना गौणत्व येत असते.

मी महेश्वरानंद या श्रीमहार्थमंजरीची रचना करीत आहे. या श्रीमहार्थ-मंजरीतील अर्थ म्हणजे पूर्ण अहंरूप आत्मपदार्थ आहे. त्या अर्थानुसार जरी श्रीशिवशक्तिदृष्ट्या द्वैत दिसत असले तरी त्यांच्यामध्ये स्फुरणरूपाने पारमार्थिक दृष्टीने एक अद्वैतरूपता आहे. जरी फुले वेगवेगळी असली तरी त्यांच्यामध्ये ज्याप्रमाणे गुच्छरूपाने एकता असते त्याप्रमाणे या श्रीमहार्थमंजरीमध्येही अद्वैताचे माहात्म्य वर्णिलेले आहे. ही श्रीमहार्थमंजरी सुरभी म्हणजेच सुगंधित असल्यामुळे सर्व तिचा अभिलाष करीत असतात. श्रीमहार्थमंजरीमध्ये वर्णिलेली तत्त्वे ही सर्व विश्वाचा अनुभव घ्यावयाला योग्य असल्याने प्रतिपादन करण्याला योग्य आहेत. यामुळे हा सिद्धयोगमार्ग निर्भय म्हणून सांगितलेला आहे.

या दृष्टीने "**श्रीसिद्धमत**" या ग्रंथामध्ये असे म्हटलेले आहे की -

अर्थषट्कं च दीक्षा च शिवशास्त्रमिति स्मृतम्।
दीक्षाध्वा निर्भयो भोगशास्त्रे भैरवसंज्ञके।।

अर्थ :- श्रीशिवशास्त्रामध्ये अर्थषट्क व शक्तिपातयोगदीक्षा यांचे वर्णन केलेले आहे. हा दीक्षामार्ग निर्भय म्हणून सांगितलेला आहे. भोगशास्त्रामध्ये याला "भैरव" अशी संज्ञा दिलेली आहे. अतिसुलभ व आस्वाद घेण्याजोग्या अशा या मार्गाचे मी सर्वांच्या उत्कर्षाकरिता प्रकटीकरण करीत आहे. हे यापूर्वी कोणीही सांगितलेले नाही.

"**श्रीप्रत्यभिज्ञातंत्र**" या ग्रंथामध्ये असे म्हटलेले आहे की -

इति प्रकटितो मया सुघट एव मार्गो नवो।
महागुरुभिरुच्यते स्म शिवदृष्टिशास्त्रे यथा।।

अर्थ :- या नवीन व सोप्या मार्गाचे मी प्रकटीकरण करीत आहे. या श्रीशिवदृष्टिशास्त्राला "महागुरू" असेही नामाभिधान दिलेले आहे.

याच "**श्रीमहार्थमंजरी**" या मार्गाचे विश्ववैचित्र्यविलास तसेच प्रत्यभिज्ञा हे इतर पर्याय आहेत. विमर्शाच्या उपायांचे अर्थात् तंत्रांचे यात प्रतिपादन केलेले आहे. शब्दादि विषयांचा ज्ञाता हा महाप्रकाशामध्ये पर्यवसित होतो. या "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथ निर्माणाचे प्रयोजन या महाप्रकाशाची माहिती करून देणे हेच आहे. यात विमर्शाचे वर्णन आहे. या वर्णनामध्ये भोग व

मोक्षाचे स्वरूप आहे. हेच श्रीमहेश्वरांचे ऐश्वर्यस्वरूप आहे आणि वर सांगितलेल्या विविध प्रयोजनांची अपेक्षा असल्याने तिच्याच प्राप्तीची अभिलाषा करण्याने अनवस्था प्रसंग ओढवू शकतो. याकरिताच श्रुतीत असे म्हटलेले आहे की, "**आत्मलाभान्न परं विद्यते**" अर्थात् "आत्मज्ञानाशिवाय किंवा आत्मलाभासाखे इतर काहीही श्रेष्ठ असे अस्तित्वात नाही." हा आत्मलाभ म्हणजेच तंत्र आणि तंत्रामध्ये सांगितलेला विषय यांमध्ये अभिधान व अभिधेय संबंध आहे. हे तंत्र म्हणजे उपाय व उपायाने मिळणारा पदार्थ म्हणजेच चिद्विमर्श हे उपेय होय. या दोहोंमध्ये कार्यकारणभाव संबंध आहे.

तात्त्विकदृष्ट्या स्वात्मरूपातच हा सर्व संबंध आहे. हे कथन करण्याच्या दृष्टीने "**श्रीस्वच्छंदतंत्र**" या ग्रंथामध्ये असे म्हटलेले आहे की -

गुरुशिष्यपदे स्थित्वा स्वयं देवः सदाशिवः।
पूर्वोत्तरपदैर्वाक्यैस्तन्त्रं समवतारयत्।।

अर्थ :- स्वतः श्रीसदाशिवदेव हे श्रीसद्गुरू व शिष्य होऊन पूर्व व उत्तरपक्ष तसेच सिद्धान्तरूपाने हे तंत्र सांगत आहेत.

श्रीअभिनवगुप्तनाथाचार्यांनीही हेच वर्णन करताना असे म्हटलेले आहे की -

सदाभिनवगुप्तं यत् पुराणं च प्रसिद्धिमत्।
हृदयं तत् परोल्लासैः स्वयं स्फूर्जत्यनुत्तरम्।।

अर्थ :- जे अभिनव, रहस्यरूप, सनातन, सुप्रसिद्ध व श्रेष्ठ असे आत्मतत्त्व आहे ते शब्दरूपाने स्वतः स्फुरत आहे.

तत्त्वज्ञानसंपन्न अशा या तंत्रकर्त्याने मोठ्या करुणेने सर्वांशी समरस होऊन "मी ग्रथन करतो" याऐवजी तृतीय पुरुषप्रयोग करून "तो ग्रथितो" असे म्हटलेले आहे. यात अहंकाराचा अभाव असल्याने लोकांची याकडे सहज प्रवृत्ती होते. (अहंकारी व्यक्तीला लोक प्रतिसाद देत नाहीत.) श्रीमहेश्वरानंद असे नावही सांगितल्यामुळे ग्रंथकर्त्याचा अधिकार महान् आहे, हेही लक्षात येते. या शास्त्राच्या अधिकाराविषयी काही नियम सांगितलेला नाही.

"**श्रीस्पंदशास्त्र**" या ग्रंथामध्ये असे म्हटलेले आहे की -

लब्ध्वाऽप्यलभ्यमेतज्ज्ञानधनं हृद्गुहान्तकृतनिहितेः।
वसुगुप्तवच्छिवाय हि भवति सदा सर्वलोकस्य।।

अर्थ :- स्वतःजवळ असूनही सहजगत्या प्राप्त न होणारे हे हृदयगत ज्ञानस्वरूपी धन श्रीवसुगुप्तांना ज्याप्रमाणे श्रीशिवांनी दिले त्याप्रमाणे भूमिगत-

धनलाभाप्रमाणे हे सर्वांना हवेसे वाटत असते.

तसेच **"नत्वा गुरुचरणौ"** यामधील **"चरण"** या शब्दाने **"श्रीचरण-विद्याच"** सुचविल्यासारखे आहे; कारण शास्त्रामध्ये असे म्हटलेलेच आहे की -

विद्येति मातृकापीठं तत् पार्थिवमुदाहृतम्।
मण्डलं कुण्डलीपीठं तदाप्यं परिकीर्तितम्।।१।।
मन्त्रसंज्ञं क्रियापीठं तैजसं तत् प्रकीर्तितम्।
ज्ञानपीठं तु मुद्राख्यं तद्वायव्यं सुरेश्वरि।।२।।
परेच्छामुखतो व्योम पीठत्वेनेह नादृतम्।
तन्मूलस्योपचारस्य बाह्यस्याभावतः प्रिये।।३।।
चेष्टात्मको भवेद्वायुस्ततः स्यान्नतिरध्वरे।
दीपः स्यात् तैजसस्तोयं चरुरिष्टो रसात्मकः।।४।।
पृथिव्या गन्धवत् पुष्पमुपचाराय पादयोः।।५।।

अर्थ :- या चरणविद्येमधील मातृकापीठ हे "पार्थिव" होय, कुंडलीपीठ मंडल हे "जलीय" असून मंत्रक्रियापीठ हे "तैजस" आहे आणि मुद्रा, ज्ञानपीठ हे "वायुसंबंधी" समजावे. आकाशाचा तसा प्रत्यक्ष संबंध येत नाही. चरणविद्येच्या पूजादि क्रियेमध्ये नमन हे क्रियारूप असल्याने वायवीय आहे, दीप हा तैजस आहे, भात हा रसात्मक असल्याने आप्य आहे आणि गंधगुणामुळे पृथ्वी हे पुष्प होय.

हे श्रीचरणसूत्र असून हे सर्व उपचार पंचवाहकक्रमामध्ये येतात. येथे या सर्वांचे विवरण करणे अप्रासंगिक असल्याने टाळले आहे. **"श्रीकंठ"** या ग्रंथामध्ये असे सांगितलेले आहे की, **"नत्वा"** हे स्पष्ट शब्दात सांगण्याचे उद्दिष्ट असल्यामुळे मंत्रमंडलाला वायुशक्तीने स्पंदनरूप मुद्रादिकांमुळे प्राधान्य दिलेले आहे. थोडक्यात ही पहिली गाथा सर्व तंत्रांचे सूक्ष्मशरीरच होय. प्रसंगानुरूप हे संक्षेपाने प्रथम कथन केलेले आहे.।।१।।

❊❊❊❊❊

गाथा क्रमाङ्क २

अवतरणिका :- यातील सर्व विषय जेथे जेथे आवश्यकता वाटेल तेथे तेथे पुढील गाथांमधून विस्तार पावतील. या तंत्रातील मुख्य तत्त्व आत्मविचार हेच असून तेच साध्यसर्वस्व म्हणून तंत्रकर्ता या दुसऱ्या गाथेत वर्णन करतात.

वड्ढउ उमहप्पआसो विमरिसविच्छुरिअणिच्छलुज्जोओ।
सण्णाविसेसणिण्ण अमत्तपअत्ताइ जत्थ सत्थाइ।।२।।
(वर्धतां महाप्रकाशो विमर्शविच्छुरितनिश्छलोद्योतः।
संज्ञाविशेषनिर्णयमात्रप्रवृत्तानि यत्र शास्त्राणि।।)

अर्थ :- श्रीसद्गुरू हे महाप्रकाशस्वरूप असे असून ते विश्वविलासामध्ये परमनिर्मल ज्योतीच्या स्वरूपात आहेत. तेच महाप्रकाशी श्रीसद्गुरू मायेच्या मलाचे उपलेपरूपाने जे संस्कार आहेत त्यांचा उच्छेद करणारे निर्मल उद्योत आहेत. त्यांचा नेहमी उत्कर्ष होवो! त्या श्रीसद्गुरूंचा संकेत करण्यामध्येच केवळ सांख्य, न्याय, वैशेषिक इत्यादि शास्त्रे समर्थ आहेत. याचाच अर्थ असा आहे की, या तत्त्वाचे ज्ञान करून घेण्याच्या संबंधात या शास्त्रांचा केवळ नाममात्र उल्लेख केला जाऊ शकतो.।।२।।

विशेष :- महाप्रकाशरूपी परमज्ञान हे परमात्मज्ञानस्वरूपी परमात्मप्रकाश आहे. हेच परमज्ञान श्रीसद्गुरुरूपामध्ये अभिव्यक्त होऊन आमच्या मायोपाधिरूप मलाच्या अंधकाराला उन्मूलित करीत असते. हा परमार्थभूत स्वात्मरूप विमर्शलाभ म्हणजेच परमार्थभूत स्वात्मप्रकाशाच्या प्राप्तीचे व अनुभूतीचे माध्यम आहे. छत्तीस तत्त्वांनी स्वरूपभूत असा विश्वविमर्श हा महाप्रकाश-युक्त ज्योतीमध्ये स्थित असतो. आपल्याला बाह्य व आभ्यंतर ज्ञानप्रकाश अर्थात् महाप्रकाश हा पूर्णपणे व्यापून असतो. शास्त्राने असे म्हटलेलेच आहे की, "**ज्ञानादृते नार्थसत्ता ज्ञानरूपं ततो जगत्।**" अर्थात् "विश्वविलास-विमर्शामध्ये परमात्मप्रकाशाची सत्ता ही सर्वत्र विद्यमान आहे."

परिमलव्याख्यार्थ :- येथे जो महाप्रकाश सांगितला आहे तो त्या त्या जीवरूप प्रकाशामध्ये प्रवेशाधीन होऊन अर्थात् प्रवेश करून प्रकाशमान होतो आणि स्वभावमात्रानेच शिल्लक राहतो. त्याचे स्वरूप काय आहे? हे खालील टीकेत सांगितले आहे.

तत्तद्रूपतया ज्ञानं बहिरन्तः प्रकाशते।
ज्ञानादृते नार्थसत्ता ज्ञानरूपं ततो जगत्।।
नहि ज्ञानादृते भावाः केनचिद् विषयीकृताः।
ज्ञानं तदात्मतां यातमेतस्मादवसीयते।।

अर्थ :- त्या त्या रूपाने युक्त होऊन ज्ञान आत आणि बाहेर प्रकाशित होते. ज्ञानाशिवाय कोणत्याही वस्तूला किंवा पदार्थाला अस्तित्व नाही आणि त्यामुळेच हे जगही ज्ञानरूपच आहे.

ज्ञान असल्याशिवाय कोणलाही कोणतेही पदार्थ समजून येत नाहीत. तेच ज्ञान आत्म्यामध्ये प्रवेश करते आणि आत्म्याला त्याच्या मूळ स्वरूपापासून खाली आणते.

(एखाद्या वस्तूचे अस्तित्व त्या वस्तूचे ज्ञान होण्यावर अवलंबून आहे. "ती वस्तू तेथे आहे," असे ज्ञान झाल्याखेरीज त्या वस्तूचे अस्तित्वच सिद्ध होणार नाही. हे जग अशाच पदार्थांनी युक्त असल्याने जग ज्ञानरूप आहे असे वरील श्लोकात कथन केले आहे.)

अशा प्रकारे मागच्या गाथेच्या टीकेत सांगितलेल्या श्रीदेविकाक्रमात स्थिर असणारा प्रकाश हा एकमात्र स्वभाव असणारा, छत्तीस तत्त्वांचा समूहरूप आत्मा व प्रत्येक तत्त्वानुसार अनंत प्रकारांचा असणारा विश्वविलास हाच महाप्रकाश असून तो वाढवीत न्यावा म्हणजेच कुंडलिनी शक्ती सुषुम्नेतून वरवर जात असता स्वस्फुरत्ता अर्थात् आत्म्याचे अस्तित्व किंवा प्रकाशन अनुभवीत जावे.

(स्फुरत्ता म्हणजे प्रकाशन होय. स्वस्फुरत्ता म्हणजेच आत्म्याचे प्रकाशन साधकभक्तयोगिशिष्याने अनुभवणे म्हणजेच त्या महाप्रकाशाचे वाढणे होय.)

हाच सांगितलेल्या विमर्शाचा म्हणजे कुंडलिनी शक्तीच्या जागृतीचा महान् उपाय आहे.

"सर्व अनुभव मिथ्या आहेत आणि विश्व हे मिथ्यासंबंधाने जोडलेल्या मिथ्या वस्तूंचे जाळे आहे. व्यवहारापुरत्या सर्व अनुभवाला येणाऱ्या वस्तू सत्य आहेत; परंतु त्यांचा तत्त्वज्ञान दृष्ट्या विचार केल्यास उन्हाने धुके वितळावे तशा त्या नाहीशा होतात आणि त्यामुळेच शून्य हेच सत्य आहे." हा माध्यमिकांचा अनिर्वचनीयवाद स्वीकारून अशी शंका येथे उपस्थित केली जाते की, शून्यस्वभावी व मिथ्यातत्त्वावर उभारलेले विश्ववैचित्र्य हे पारमार्थिक आत्मरूप विमर्शाचे साधन होणे कसे शक्य होईल? खोट्याने खरे ज्ञान कसे होईल? **"निश्छलोद्योत"** या विशेषणाने असे सांगतात की, प्रपंचप्रकाशक निर्मल आत्मरूपात खोट्याला थाराच नाही. लोकव्यवहाराने आत्मविमर्शाची उत्पत्ती कशी होते?, अशी शंका उत्पन्न झाली असता ग्रंथकार असे सांगतात की, धान्य कांडल्याने घाम येतो अर्थात् घाम येण्यासाठी ज्याप्रमाणे कांडणे आवश्यक असते त्याप्रमाणे लोकव्यवहाराने विश्वाचा आत्मविमर्श कसा काय सिद्ध होतो? अर्थात् कांडणे आणि घाम येणे या गोष्टी एकमेकांशी सान्निध्य अर्थात् जवळीक असल्याने त्या सिद्ध आहेत म्हणजेच कांडण्यामुळे

घाम आला असे आपण म्हणू शकतो; परंतु विश्वव्यवहार आणि विश्वाचा आत्मविमर्श यांचा एकमेकांशी कोणत्याही प्रकारचा संबंध बाह्यदृष्टीला दिसत नसल्याने आत्मविमर्शाची सिद्धी या विश्वव्यवहाराने होते असे कसे काय म्हणता येईल? अशी प्रतिपक्षाने शंका व्यक्त केली असता **"विमर्शविच्छुरितेति"** या विशेषणाने असे सांगतात की, सत्तामात्रानेच विश्वाचा आत्मविमर्श प्रत्युपाय म्हणजे सिद्ध होत नाही; तर त्या त्या विमृश्यमान अवस्थांमध्येच आत्मविमर्श उत्पन्न होऊन प्रतीतीला येत असतो. जर "विश्वव्यवहाराचे किंचित् नैयत्य अर्थात् विश्वव्यवहाराचे अस्तित्व सिद्ध होत नसेल म्हणजे हेच याचे उपायत्व," असे उपपन्न होत असेल तर ते संभव नाही. यद्यपि सिद्धान्त मांडणाऱ्यांकडून द्रव्यगुणादि सहा पदार्थ, प्रमाणप्रमेयादि सोळा आणि रूप, ज्ञानादि पाच अशा वेगवेगळ्या पदार्थांचेच स्पष्टीकरण जास्त झालेले आहे म्हणजेच त्यात आत्मविषयक विचार अल्पप्रमाणात आहे. जेथे विश्वविलास आत्म्यासाठी श्रीकणाद, श्रीगौतम इत्यादींची शास्त्रे त्या त्या परिभाषानुसाराने व वैशिष्ट्यानुसार जे संज्ञालक्षण आहे तेच सांगण्यात गुंतलेली आहेत तेथे ज्ञानादिरूप आत्मलक्षणाची वर्णने अभावानेच दिसतात अर्थात् त्यांचे ज्ञान केवळ संज्ञा सांगण्याइतकेच मर्यादित आहे. परत पुढे जाऊन प्रत्यक्षादि प्रमाणांचे ग्रहण करून पृथिव्यादि पदार्थांची परंपरा सांगण्याची त्यांची शक्तीच नाही असा याचा अर्थ आहे.

या द्वितीय गाथेत वर सांगितलेल्या लक्षणांनी युक्त असा जो महाप्रकाश आहे तो अनवच्छिन्न प्रमात्याचा म्हणजे जीवाचा विमर्श अर्थात् यथार्थज्ञान किंवा चैतन्य असून त्याचीच पुरुषार्थ म्हणून स्थापना केली आहे. तो वाढो अर्थात् मायीयमलाच्या उपलेपाचा जो संस्कार त्याचा उच्छेद करण्यापर्यंत उल्लसित होवो. याचा अर्थ इतकाच आहे की, आत्म्यावरच्या मलाचा लेप धुऊन काढला जाऊन त्याला स्व-स्वरूपाची जाणीव होण्याला हा महाप्रकाश साहाय्यभूत होवो. तीच वृद्धी होय. जर ती वृद्धी कैवल्याने होणार नसेल तर मग वृद्धीचा अर्थ काय? **"अहम्"** असा अलौकिक कोणी प्रमाता अर्थात् प्रत्यभिज्ञानात्मारूप जो विमर्श, त्याने होणारे जे विच्छुरण अर्थात् उच्छेदन म्हणजेच विशेषतः अन्य प्रकाश लक्षण्याने लौकिक संबंधस्वभावाचे अतिक्रमण करून तादात्म्यात पर्यवसित अर्थात् परिणत होणारा जो उपश्लेष अर्थात् संयोग, त्याने ज्याचा उपाधिरूप कलंक गळून पडला आहे असा जो उद्योत अर्थात् स्फुरण किंवा स्फुरत्ता; ती ज्याची आहे तशा प्रकाराने वाढो

असा याचा अर्थ आहे. जरी दर्पणादींना प्रतिबिंबादींचे प्रकाशन करण्याचे सामर्थ्य असले तरी प्रमातृ अर्थात् जीवाच्या प्रकाशाच्या सापेक्षत्वामुळे त्याला उपाधित्व येते; परंतु प्रमातृप्रकाशाचे अनन्यमुखप्रेक्षित्वच आहे अर्थात् जीव हा त्याच्या अस्तित्वासाठी दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहणारा होतो. विमर्शरूप म्हणजे आत्मस्वरूपाच्या ठिकाणी व्यपदेशनैयत्याचा अर्थात् नामोल्लेखाचा अभाव असल्याने तो विमर्श प्रत्यसद्भावपर्यवसायी अर्थात् ज्याचे अस्तित्व नाही असा ज्ञानरूप कोणतातरी हृदयंगमभाव होईल या शंकेला **"संज्ञाविशेष"** या विशेषणाने उत्तर देतात. जेथे परमप्रमाताविषयात व्यवहृत अर्थात् पर-ब्रह्माविषयी ज्यात माहिती आहे अशी असल्यामुळे त्यांचे उदाहरण म्हणून सांगितली किंवा केली जाणारी सर्व शास्त्रे श्रीशिव, श्रीविष्णू, श्रीबुद्ध अशा प्रकारे व्यपदेशमात्र करण्यात गुंतली आहेत अर्थात् ही शास्त्रे केवळ संज्ञाच सांगतात. अर्थस्वभावात असलेले भेद उपपन्न अर्थात् सिद्ध करण्यात ती शास्त्रे प्रवीण नाहीत. त्याचप्रमाणे श्रीचार्वाकादि भूतमात्रेच चैतन्यरूप आहेत असे म्हणून चैतन्यविशिष्ट शरीरालाच आत्मा मानतात. **"असदेवेदमग्र आसीत्"** "असत्च सर्वात आधी होते," असे म्हणणारे अभावब्रह्मवादी म्हणजे शून्यवादी माध्यमिक अनाख्यकक्षेत येणारे अर्थात् अनिर्वचनीय असे स्वात्ममात्रस्फुरत्ता लक्षण असणारे "आत्मतत्त्व" आहे असे सांगतात. सांख्यादि निष्कलसाक्ष्यादिगुणविशिष्ट असे आत्मतत्त्व मानतात. परापश्यंत्यादि शब्दाला ब्रह्म समजणारे शब्दब्रह्मवादी हे श्रीसदाशिव तत्त्वभूत असे याला मानतात. मीमांसकही सुखादिसंबंधाला योग्य अशा आत्म्याची ज्ञानगुणता नाकारीत नाहीत. नैयायिक हे "ज्ञानादिगुणांचा आधार असा आत्मा आहे," असे मानतात. बौद्ध "ज्ञानाचे संतानरूपाने सातत्य प्रतिक्षणी वेगळे ज्ञान," असे आत्मरूप मानतात. तात्पर्य-श्रुतिसंमत वा श्रुतिविरोधी सर्वच सिद्धान्तांमध्ये फारसा विवाद नाही. फक्त ते सर्वजण आत्मरूपापासून जवळ-जवळ असे घोटाळत असतात. एवढ्याच संबंधावरून आत्मरूपविचारकांचा आपापसात भांडण-तंटा चालू असतो.

"श्रीपादुकोदय" ग्रंथात पुढीलप्रमाणे मीच हे सांगितले आहे की -

अतो विश्वात्मको नाथः इत्यारभ्य
लोकायतानां देहात्मा शून्यात्मा शून्यवादिनाम्।
क्षणात्मा क्षणनिष्ठानां भिन्नात्मा भेददर्शिनाम्।।
मीमांसिनामपूर्वात्मा ब्रह्मात्मा ब्रह्मवादिनाम्।

अद्वैतिनामभेदात्मा बहुना वा किमुच्यते।।
आक्रीडनं च बालानां स एव परमो गुरुः।
स एव च महार्थात्मा महार्थिकमनीषिणाम्।।

अर्थ :- म्हणून "विश्वरूपधारी नाथ आहे," येथून आरंभ करून लोकायतिकांचा आत्मादेह हा आत्मा, शून्यवाद्यांचे शून्यरूप असत् हा आत्मा, क्षणभंगीयांचा म्हणजे क्षणभंगुरवाद्यांचा क्षण हा आत्मा, भेददर्शींचा भिन्नात्मा अर्थात् अनिश्चितरूप हा आत्मा, मीमांसकाचा अपूर्व असा कर्मोत्पन्न आत्मा, ब्रह्मवादींचे ब्रह्म हा आत्मा व अद्वैत्यांचा अभेदरूप आत्मा, असे किती म्हणून सांगावे. ज्याप्रमाणे मुलांना खेळ अर्थात् चेंडू वगैरे हेच सर्वस्व वाटते त्याप्रमाणे महानर्थाचा विचार करणाऱ्यांना आत्मा हा महान् अर्थ वाटतो. "**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, "**तद्भूमिकाः सर्वदर्शनस्थितयः।**" अर्थात् "सर्व दर्शनकार आपापल्या परी आत्मरूप ठरविण्याचा अट्टाहास करतात." त्यामुळेच "**श्रीपर्यंतपंचाशिका**" या ग्रंथात असे सांगितले आहे की, "**स हि भैरवसिद्धान्तपूर्वपक्षोऽपि यन्मयः।**" अर्थात् "भैरवसिद्धान्तपूर्वपक्षही एतद्विषयक म्हणजेच आत्मविषयक आहे." अशा प्रकारे वस्तुदृष्ट्या "परमेश्वराची विश्वात्मकता हेच ऐश्वर्य," असे सर्व सिद्धान्त्यांकडून कंठरव करून सांगितले जाते.

"**श्रीसंविदुल्लास**" या ग्रंथात मीच असे वर्णिले आहे की -

अन्योन्यमप्रतीकारा बाध्यबाधकभावतः।
वदन्ति तव वैश्वात्म्यं वादिविप्रतिपत्तये।।

अर्थ :- बाह्य अशा बाध्य व बाधक भावाने एकमेकांचा प्रतीकार करण्यात असमर्थ असणारे वादी विप्रतिपत्तीसाठी अर्थात् मतभेदासाठी तुझे वैश्वात्म्य पुढे करतात.

सारांश असा निघतो की, जरी अनेक सैद्धान्तिक कल्पनांनी एक दुसऱ्याचा बाध होत असला तरी विश्वाभासात स्तंभ व घटादि पदार्थ सर्वांना म्हणजे मूर्खांना व पंडितांना प्रत्यक्ष जसेच्या तसेच दिसतात व अनुभवाला येतात म्हणजेच ज्ञानाला विषय होतात. ज्ञान होण्याची क्रिया कर्त्यावाचून व साधनावाचून म्हणजे चक्षुर्मनादींवाचून कशी होईल? ज्याप्रमाणे झाड तोडण्यासाठी कुऱ्हाड वगैरेंची आवश्यकता असते त्याप्रमाणे ज्ञानासाठी चक्षू इत्यादि अवयवांची आवश्यकता असते.

"**श्रीसंविदुल्लास**" या ग्रंथात मीच या दृष्टीने असे सांगितले आहे की -

अविनाशिनि मङ्गलप्रदीपे मनसि प्रज्वलिते महाप्रकाशे।
बहिरिन्द्रियगोलकैर्गवाक्षैरविशेषादवभास्यते त्रिलोकी।।

अर्थ :- ज्यावेळी मनात अविनाशी मंगलदीप महाप्रकाशाने प्रकाशित होऊन तेवत असतो त्यावेळी बाहेरील इंद्रियरूप खिडक्यांमधून सामान्यतः त्रैलोक्य भासमान होते.

चक्षुरादि इंद्रिये ही बाह्यवस्तुग्राहक असल्याने एखाद्यावेळी जर प्रमात्याचे लक्ष नसेल तर ज्ञान होणार नाही म्हणून काही एक अंतरिंद्रिय मानावयाला हवे. ते म्हणजे मन होय.

या दृष्टीने आमच्या श्रीसद्गुरूंनी "**श्रीमनोनुशासनस्तोत्र**" यामध्ये असे म्हटले आहे की -

हंसाः पतन्ति गगने प्रविसार्य पक्षौ
स्वौ सर्वदैव किल मानसराजहंसः।
अत्यद्भुता तव गतिर्गगने परस्मिन्
विक्षेपशून्यमयपक्षयुगं विहाय।।

अर्थ :- हंसपक्षी आपले दोन्ही पंख पसरून आकाशात नेहमी संचार करतात; पण हे मनोरूप राजहंसा! तू मात्र चिदाकाशात विक्षेपशून्यमय पंख नसूनही निरंकुश संचार करतोस.

इंद्रिये कर्त्यावाचून काहीही कार्य करणे शक्य नसल्याने व केल्यास चूक होत असल्याने अर्थात् "स्व"भावाचा नाश होण्याचा प्रसंग येत असल्याने स्तंभघटादि बाह्यवस्तू पाहण्याच्या कामी एखादा कर्ता अर्थातच मानला पाहिजे.

या दृष्टीनेच आमच्या श्रीपरमसद्गुरूंनी "**श्रीसौभाग्यहृदयस्तोत्र**" यामध्ये असे म्हटले आहे की -

नेत्रादिजालकोपान्ते हृत्पद्मासनलीलया।
वारं वारं त्वया देवि! रूपादि मधु सेव्यते।।

अर्थ :- नेत्रादि गोलकांच्या जवळ राहून त्यांच्या माध्यमातून हृदयकमलात सहज लीलेने बसून हे देविमाते! तुझ्याकडून वारंवार रूपादि मधूचे सेवन केले जाते.

तो कर्ता ज्ञेय पदार्थाने संबद्ध होतो व देशकालादि उपाधींचा अनुभव घेतो. याकरिता अलौकिक देशादिसंबंधरहित ज्ञाता मानला पाहिजे. नाहीतर विश्वाचे वैचित्र्य धोक्यात येईल. विश्वव्यवहार अवच्छिन्न अर्थात् सोपाधिक

आणि अनवच्छिन्न अर्थात् निरुपाधिक प्रमात्याशिवाय म्हणजेच ज्ञात्या जीवाशिवाय जुळत नाही. त्यांपैकी अकल्पित प्रमाता अर्थात् ब्रह्मात्मज्ञ स्फुरणमात्र स्वभावाचा असल्याने ज्ञेयपदार्थांना प्रकाशित करतो. कल्पित प्रमाता अर्थात् जीवरूप प्रमाता स्तंभ व कुंभादिभेदाने जाणून त्या वस्तूंच्या सुखदु:खप्रद अनुभवाने चांगल्या व वाईटाचा व्यवहार करतो म्हणून दोन प्रमाते मानणे योग्य होय. अशा प्रकारे विषयग्रहणकाली अर्थात् इंद्रिये त्यांच्या बाह्य विषयांचे ग्रहण करीत असताना इंद्रियादि करणद्वारा विश्वस्थितिव्यवहारकर्ता कोणी अकृत्रिम ज्ञाता मानला पाहिजे हे ओघाने आलेच.

या दृष्टीने **"श्रीअजडप्रमातृसिद्धी"** नामक ग्रंथात असे म्हटले आहे की -

इदमित्यस्य विच्छिन्नविमर्शस्य कृतार्थता।
या स्वस्वरूपे विश्रान्तिर्विमर्शः सोऽहमित्ययम्।।
प्रकाशस्यात्मविश्रान्तिरहम्भावो हि कीर्तितः।

अर्थ :- "हे असे असे" फुटीर किंवा व्यवहारज्ञानाने समजणे ही कृतार्थता होय. स्वतःच्या खऱ्या स्वरूपात विश्रांती "तोच मी आहे," हे ज्ञान वा विचार होय.

त्याचप्रमाणे "प्रकाशाची आत्मरूपी स्थिरता याला अहंभाव म्हणावे." असेही म्हटले आहे.

तसेच श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांनी असे म्हटले आहे की -

स्फुटतरभासमाननीलसुखादिप्रमात्रन्वेषणद्वारेणैव
पारमार्थिकप्रमातृलाभ इहोपदिश्यते।

अर्थ :- स्पष्टपणे भासणाऱ्या नीलसुखादि प्रमात्याच्या शोधानेच पारमार्थिक प्रमात्याचा अर्थात् वास्तविक प्रमात्याचा लाभ होतो.

याच अभिप्रायाने **"श्रीविज्ञानभैरव"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

गीतादिविषयास्वादसमसौख्यैकतात्मनः।
योगिनस्तन्मयत्वेन मनोरूढिस्तदात्मता।।

अर्थ :- ज्याप्रमाणे संगीतादि श्रवणाने जे सुख होते व त्यामुळे मनाची जी एकतानता साधते त्याप्रमाणेच योगीसुद्धा आत्मानंदात मनःस्थैर्य संपादन करीत करीत तन्मय होतो.

चित्तस्थिरतेसाठी गायन व श्रवणादि साधन म्हणूनही होऊ शकते. याबाबतीत

स्मार्तादिकांचे फारसे दुमत नाही.

या दृष्टीने शास्त्रात असे म्हटलेच आहे की -

वीणावादनतत्त्वज्ञः स्वरशास्त्रविशारदः।
तालज्ञश्चाप्रयासेन मोक्षमार्गं निगच्छति।।

अर्थ :- वीणा वाजविण्यात कुशल असणारा, स्वरशास्त्रात विशारद असणारा आणि ताल जाणणारा काहीही प्रयास न पडता अनायास मोक्ष-मार्गाकडे जातो.

वरील श्लोकातील **"वर्धताम्"** या पदाने वृद्धिंगत होवो असा विध्यर्थ करूनही तेथे आज्ञार्थ योजला आहे असे पुढील उताऱ्यावरून वाटते.

ख्यातिमपूर्णां पूर्णख्यातिसमावेशदार्ढ्यतः क्षपय।
सृज भुवनानि यथेच्छं स्थापय हर तिरय भासय च।।

अर्थ :- पूर्णख्यातीने अर्थात् ज्ञानरूप दृष्टीने म्हणजे ज्ञानख्यातिवादाने इतर असत्ख्यातिप्रभृतिवादांचे निर्मूलन कर. मग खुशाल त्रिभुवनाची उत्पत्ती कर, स्थिती कर अर्थात् त्यांना धारण कर किंवा त्यांचा उपसंहार अर्थात् नाश कर आणि त्रिभुवन झाकून टाक वा प्रकट कर. काय वाटेल ते केले; तरी मग अंगी दोष चिकटणार नाही.

अशा प्रकारे साधनसाध्यभावाचे प्रकाशन करणाऱ्या उक्तीने परमेश्वराला दुर्घट घटना करण्याचे सामर्थ्य आहे, असे म्हटल्यासारखे होते.

यावरून इतर दार्शनिकांच्या मते संसारबंधनाला कारण होणारे शब्द-स्पर्शादिविषयांचे तडाखे जीवनमुक्तीचा आनंद देणाऱ्या आत्मज्ञानाच्या प्राप्तीचे उपायच आहेत, असे म्हटल्यासारखेच होते. तसेच या तंत्राच्या शेवटी हेच सांगितले आहे की -

ओ संसारसुहेल्ली ओ सुलहं मोक्खमग्गसहग्गम्।

अर्थ :- संसारसुख प्रिय असणाऱ्यांना हे जरी क्लेशप्रद वाटत असले तरीही आम्हा ज्ञानयोग्यांना हा मोक्षमार्गाचा सौभाग्यभूषणभूत उपायच वाटतो.

संसार हा उपाय म्हणजेच साधन व मोक्ष हे साध्य अशी उभय विषयक समरसता प्राप्त होण्यासाठी जेवढा शक्य असेल तेवढा प्रयत्न करावा. या न्यायाने दोन्हींची एकवाक्यता करण्यासाठी हे तंत्र सांगितले आहे. अशा प्रकारे येथे अभिधेय आणि तत्प्रयोजन विस्तृत करून सांगितले. अंतिम प्रयोजन तिसऱ्या गाथेत सांगितले जाईल.।।२।।

*****

गाथा क्रमाङ्क ३

अवतरणिका :- वर सांगितलेल्या युक्तीने घटनिर्मितीत कुंभारासारखा एखादा कर्ता शोधावा तर तो कोठे दिसत नाही, तर्काने पाहावा तर प्रमाणाने वस्तू सिद्ध होते म्हणून अनुमान अर्थात् अर्थापत्तीसारखे प्रमाण मानले पाहिजे. अन्यथा प्रतिपादन असत्य अर्थात् काल्पनिक ठरेल, अशी शंका घेऊन ग्रंथकारांनी तिचे समाधान या गाथेत केले आहे.

अत्ता खु वीसमूळं तत्थ पमाणं ण को वि अत्थेइ।
कस्स व होइ पिपासा गंगासोत्ते णिमग्गस्स।।३।।
(आत्मा खलु विश्वमूलं तत्र प्रमाणं न कोऽप्यर्थयते।
कस्य वा भवति पिपासा गङ्गास्त्रोतसि निमग्नस्य।।)

अर्थ :- आत्मा अर्थात् परमात्मा हाच विश्वाचे मूळ (कारण) असून त्याच्या सत्यपणासाठी अर्थात् तोच विश्वाचे मूळ कारण आहे हे सिद्ध करण्यासाठी कोणत्याही प्रमाणाची आवश्यकता नाही. श्रीगंगानदीच्या प्रवाहात निमग्न झालेल्या अर्थात् बुडालेल्या प्राण्याला काय तहान लागणार आहे? अर्थात् कधीच तहान लागणार नाही.।।३।।

विशेष :- परमात्मा विश्वात व्याप्त असल्यामुळे परमात्मा आणि जगतात काहीही भेदभाव राहत नाही. आत्म्यासाठी आत्म्याशिवाय कोणतेच प्रमाण सिद्ध होत नाही. श्रीगंगानदीच्या पाण्यात असलेला प्राणी तहानलेला आहे हे सिद्ध करणे शक्यच नाही. श्रीगंगेचा प्रवाह तर स्वतःच अंतर्बाह्य ताप हरण करण्याला समर्थ आहे. अशाच प्रकारे विश्वाच्या व्यवहारात आत्मा किंवा परमात्मा यांची सत्ता अस्तित्वात आहे. निराकार तत्त्वाची उपासना करणाऱ्या तत्त्वज्ञांनी असेच म्हटले आहे की, पाण्यात मासा तहानलेला कसा राहील? अशाच प्रकारे साकार उपासनेतही **"जित देखो तित स्याममई है"** आणि **"सीयराममय सब जग जानी"** ही भावनाच सर्वत्र आहे. विश्व हे परमात्म्याचे रूप आहे.

परिमलव्याख्यार्थ :- येथे आत्माच प्रकाशस्वभाव असल्यामुळे विश्व-व्यवहाराला कारण आहे असे मला वाटते. प्रमात्याचा प्रकाशाशी संबंध असल्यामुळेच स्तंभकुंभादींचे प्रकाशन होते अर्थात् स्तंभकुंभादि प्रकट होतात. तसे जर झाले नसते तर स्तंभच कुंभ आणि कुंभच स्तंभ असा लक्षणांचा घोटाळा झाला असता; कारण त्यांना नियंत्रित करणारा नियंताच राहणार नाही. त्यामुळे स्तंभ आहे का नाही? का अन्य काही आहे? इत्यादि

ज्ञानांचे संमिश्रण होऊन शेवटी गप्प बसावे लागणे हाच विश्वव्यवहाराचा स्वभावधर्म झाला असता. जर ते स्तंभादिक स्वभावत:च प्रकाशमान आहेत आणि दुसऱ्याच्या प्रकाशाची त्यांना आवश्यकता नाही असे मानल्यास सर्वांना ते पदार्थ ज्ञात होतील किंवा कोणालाही ज्ञात होणार नाहीत. त्यामुळे प्रकाशक अर्थात् ज्ञाता यांच्या व्यवहाराला काही किंमत राहणार नाही.

दुसरे असे की, स्तंभादिरूप विश्वाला प्रकाशरूप समजल्यास ते विश्व जाणणारा सर्वज्ञ वा किंचिज्ज्ञ किंवा अज्ञ होईल; कारण तेथे 'नियामक' कोणीही नाही. त्यामुळे नाईलाजाने अर्थात् इच्छा नसूनही विश्वव्यवहाराचा प्रयोजन आत्मा मानला पाहिजे. प्रयोज्य विश्व आणि प्रयोजक आत्मा यांचे शेवटी तादात्म्यच आहे. आत्मप्रकाशमय जगदन्त:पाती सर्व वस्तू आहेत असा निष्कर्ष निघतो.

या दृष्टीने **"श्रीप्रत्यभिज्ञाहृदय"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

प्रागिवार्थोऽप्रकाशः स्यात् प्रकाशात्मतया विना।
न च प्रकाशो भिन्नः स्यादात्मार्थस्य प्रकाशता।।

अर्थ :- प्रकाशात्मतेवाचून पदार्थ पूर्ववत् प्रकाशहीन होईल. प्रकाश हा आत्मरूप पदार्थाहून वेगळा नाही.

अशा प्रकारे निश्चयार्थी स्थित असताना या आत्म्याशिवाय वस्तुस्वरूप-बोधक "हे असे आहे," अशा स्वयं भासमानरूपप्रमाणाच्या बाबतीत कुणालाही म्हणजेच ज्ञानी मनुष्याला व पामराला अपेक्षा उत्पन्न होत नाही. प्रमाता व प्रकाश यांच्यात कोणताही भेद नाही. उलट त्यानेच प्रमाणाचे व्यवस्थापन केले जाते अर्थात् प्रमाणाची व्यवस्था अशी अभेदावरच आधारलेली आहे. प्रमाण म्हणजे नवनवीन उदय होणारा स्वाभासविशेष होय. तो स्व-आभास अर्थात् आत्म्याचे ज्ञान अभिनव आहे. नित्यनूतनता त्या त्या देशकालादि-संबंधाने परस्परविलक्षण प्रमेयरूपाने प्रतीत होणारी आहे. नित्यनवीनता स्वाभाविक धर्म नसून तो पुढील विशेषणविशिष्ट आत्मवस्तूत जुळत नाही. ती आत्मवस्तू सर्व विकल्पांची गडबड जेथे नाही अशी आहे. ती अक्षुब्ध-सागरासारखी आहे. एकस्वभावी आहे. त्यामुळे त्याविषयी कोणी विचार करीत नाही. आत्मविषयक विचाराच्या वेळेला प्रमाण मागणारा असे म्हणेल की, आत्मा असल्यास तो कोण आहे? आत्मा आहे का नाही? जर अनात्मा जडवर्ग असेल तर त्याला प्रमाणाची काही गरजच नाही. आत्मा असेल तर तो स्वत:तच स्वत: प्रमाण असेल; असे म्हणणे अयोग्य आहे.

या संबंधी शास्त्रात असे म्हटलेच आहे की -

अख्यातिर्यदि न ख्यातिः ख्यातिरेवावशिष्यते।
ख्यातिश्चेत् ख्यातिरूपत्वात् ख्यातिरेवावशिष्यते।।
प्रमातृतास्पदे तत्र प्रमाणं नोपयुज्यते।
करणात् कर्तुराधिक्यमन्यैरभ्युपगम्यते।।
स्वतन्त्रः खलु कर्तेति शाब्दिकैरप्युदीर्यते।
तच्च स्वातन्त्र्यमन्येभ्यः कारकेभ्यः प्रधानता।।
यत्प्रभावात् प्रमाणानां प्रमाणत्वव्यवस्थितिः।
तत्रैव तदपेक्षेति न किं व्यर्थं वचो भवेत्।।
लौकिकानां प्रमाणानामनाश्वासाद्धि यौक्तिकैः।
ईश्वरस्य प्रमाणत्वं प्रमातृत्वेऽप्युदाहृतम्।।
प्रमातरि प्रमाणं किमिति पृच्छन् प्रमातृताम्।
विजहाति न वा नाद्यः प्रश्नस्यानुपपत्तितः।।
न द्वितीयश्च कल्पः स्यात् प्रमाणं किमु विस्फुरेत्।
इति हि प्रश्नतात्पर्यं तत्रात्मन्यैक्यसम्मतौ।।
मयि त्वयीति भेदोऽयं न कदाचन युज्यते।
नानात्मत्वे स्वविषयं प्रमाणं प्रति भावना।।
पृच्छ्यते प्रतिवादीति महन्मौर्ख्यं प्रसज्यते।
भ्रान्तिश्चेदात्मनि भ्रान्त्या बुद्धे रज्जुभुजङ्गवत्।।
वाच्यं प्रमाणमित्येतदुन्मत्तवचनायते।
अथ नास्त्येव मे तत्र प्रतीतिरिति कथ्यते।।
तत्र प्रमाणं पृच्छ्येत कीदृग् वोत्तरमुच्यताम्।
अगोचरः प्रमाणानामत आत्मा महेश्वरः।।

अर्थ :- अख्याती (वाद) हा ख्याती (वाद) नाही म्हणजे ख्याती (वादच) शिल्लक राहतो. प्रमात्यासाठी प्रमाणांचा उपयोग नाही. उपकरणांपेक्षा कर्त्याला महत्त्व आहे हे सर्वमान्य आहे. वैयाकरण्यांनीही "**स्वतन्त्रः कर्ता**" अर्थात् "कर्ता स्वतंत्र आहे," असेच सांगितले आहे. अन्य कारकांहून श्रेष्ठत्व म्हणजे स्वातंत्र्य होय. ज्याच्या प्रभावाने प्रमाणांना प्रमाणत्व येते त्याच प्रमात्याविषयी प्रमाणांची गरज आहे असे म्हणणे निरर्थकच ठरेल. लौकिक-तर्कानुमानादींना वस्तुनिश्चिततेविषयी अपूर्णता असल्याने "ईश्वर हा प्रमाता-प्रमाणरूप" मानला आहे. प्रमात्याविषयी प्रमाण काय आहे असे विचारणारा स्वतःचे प्रमातृत्व

हरवून बसतो; कारण हा प्रश्नच उत्पन्न होत नाही. याला कोणतेही प्रमाण पुढे करता येत नाही. त्यामुळे, "प्रमाता" एकटाच आहे, तो एकच एक आहे," हे सर्वसंमत आहे. "माझ्यात व तुझ्यात" हा भेदही येथे योग्य नाही. नाना आत्मे असताना स्वविषयी प्रमाण मागणे ही प्रतिभावना झाली. जर प्रतिपक्षाने असे विचारले तर तो अत्यंत मूर्खतेचा प्रसंग प्राप्त होईल व त्याच्या आत्म्यात भ्रांती होईल. ज्याप्रमाणे रज्जूवर दोरीचा भास होतो त्यावेळी जसा बुद्धिभ्रम झालेला असतो त्याप्रमाणेच आताही बुद्धिभेद उत्पन्न झालेला असतो. प्रमाण पाहिजेच असे म्हणणे हे वेडेपणाचे ठरते. जर "मला प्रत्यय नाही," असे सांगितले गेले असता व तेथे प्रमाण विचारले असता कशा प्रकारचे उत्तर द्यावे? अर्थात् ज्याला प्रचीती आलेली नाही त्यालाच जर प्रमाणाबद्दल विचारले तर तो काहीच उत्तर देऊ शकणार नाही. त्यामुळे प्रमाणांना अगोचर असणारा जो श्रीमहेश्वर तोच आत्मा आणि तोच प्रमाता होय.

"**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथातही असेच म्हटले आहे की -

प्रमातरि पुराणे तु सर्वदाभातविग्रहे।
किं प्रमाणं नवाभासः सर्वप्रमितिभागिनि।

अर्थ :- सर्वस्वरूपी सनातन प्रमात्याविषयी नवीन वेगळे प्रमाण कोणते आणणार? कारण तो सर्व यथार्थ ज्ञानांचा सागर आहे.

त्याचप्रमाणे "**बृहदारण्यक उपनिषद्**" या ग्रंथातही असेच म्हटले आहे की -

"विज्ञातारमरे केन विजानीयात्" इति।
स्वपदा स्वशिरश्छायां यद्वल्लङ्घितुमीहते।
पादोद्देशे शिरो न स्यात् तथेयं वैन्दवी कला।।

अर्थ :- जो सर्वांना जाणणारा आहे त्याला कशाने अर्थात् कोणत्या साधनाने जाणणार?

आपल्या डोक्याच्या सावलीवर आपलाच पाय ठेवण्याची जो इच्छा करतो त्याच्या पाय ठेवण्याच्या जागी डोके कधीच येत नाही अर्थात् जो आपल्या डोक्याची सावली उडीमारून ओलंडण्याचा प्रयत्न करतो तो आपल्या प्रयत्नाने ती कधीही ओलांडू शकत नाही. जसे हे आहे तशीच ही "बैंदवी कला" आहे.

"**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथातही असेच म्हटले आहे की -

प्रमाणान्यपि वस्तूनां जीवितं यानि तन्वते।

तेषामपि परो जीवः स एव परमेश्वरः।।

अर्थ :- ज्या प्रमाणांनी वस्तूंची जीविते विस्तारली जातात त्यांच्यापेक्षाही श्रेष्ठ जीव असून तोच परमेश्वर आहे.

वर सांगितलेला अर्थच दृष्टान्त देऊन दृढ करताना ग्रंथकार असे म्हणतात की, श्रीगंगानदीचा प्रवाह हा शीतलता इत्यादि अनेक गुणांच्या उत्कर्षामुळे आतूनबाहेरून ताप नष्ट करणारा आहे. त्यात स्नान व आचमन इत्यादि कृती करणारा मनुष्य तहानलेला राहूच शकणार नाही. त्याला पाणी पिण्याला कोणतीही अडचण येणार नाही किंवा कोणीही आणणार नाही. तसेच इकडेही विश्वाच्या व्यवहाराला कारण असणाऱ्या परमेश्वराला इतर प्रत्यक्षादि प्रमाणांची काय आवश्यकता आहे? प्रत्यक्षादि प्रमाणे ही अन्य सर्वत्र संभवतात.

या दृष्टीने शास्त्रात असे म्हटले आहे की -

तन्वादि बुद्धिमत्कर्तृ सन्निवेशविशेषवत्।
घटवद् यदनेवं तन्नैवं खपरमाणुवत्।।

अर्थ :- बुद्धिमान् कर्ता साधनांनी शरीरादि अवयवांनी युक्त वस्तू निर्माण करील; परंतु आकाश कसे निर्माण करील?; कारण ते परमाणुरूप नाही.

इत्यादि दृष्टान्तावरून प्रमाणाने ईश्वरसिद्धीचा प्रयत्न करणे व्यर्थ व ईश्वरशंकाही व्यर्थ होय असे समजावे.।।३।।

*****

गाथा क्रमाङ्क ४

अवतरणिका :- वरती आत्म्याला कोणत्याही प्रकारच्या प्रमाणांची आवश्यकता नाही असे सांगितल्यावर येथे प्रतिपक्ष दुसरी एक शंका अशी विचारतात की, ज्याप्रमाणे स्तंभकुंभादि आपल्याला स्पष्टपणे दिसतात म्हणजेच त्यांचे प्रकाशन जसे स्फुटपणे अर्थात् स्पष्टपणे होते तसे आत्म्याचे प्रकाशन स्पष्टपणे होत नाही. तो व्यक्त स्वरूपात कोणालाही दिसत नाही. त्यामुळे अशा अस्पष्ट वस्तूंच्या सिद्धीसाठी प्रमाणांकडे वळावेच लागते. या शंकेलाच ग्रंथकारांनी या चवथ्या गाथेत उत्तर दिले आहे.

जं जाणंति जळा अपि जळहारीओ पि जं विजाणंति।
जस्स च्चिअ जोक्कारो सो कस्स फुडो ण होइ कुळणाहो।।४।।
(यं जानन्ति जडा अपि जलहार्योऽपि यं विजानन्ति।
यस्यैव नमस्कारः स कस्य स्फुटो न भवति कुलनाथः।।)

अर्थ :- ज्याला जडप्रकृती असणारेही जाणतात, ज्याला पाणी वाहून

आणणारी सर्वसाधारण माणसेही जाणतात आणि ज्याला सर्वचजण नमस्कार करतात तो कुलनाथ कोणाला बरे स्पष्ट होणार नाही? अर्थात् तो सर्वांना स्पष्ट स्वरूपात दिसतो.।।४।।

विशेष :- समस्त जीववर्ग किंवा प्राणिमात्र आपल्या मनोरथपूर्तीसाठी आणि त्याचे फळ मिळण्यासाठी परमेश्वराला श्रद्धापूर्वक नमस्कार करून त्याला आपली श्रद्धा व भक्तियुक्त प्रणती समर्पित करतात. परमेश्वर सर्वांच्या अहंभाव रूपात अर्थात् सर्वांच्या आत्मस्वरूप, आत्मचैतन्य व परमप्रकाशाच्या रूपात विद्यमान असतो. त्याच एकमात्र परम प्रकाश परमात्म्याच्या चैतन्य-युक्त सत्तेने समस्त विश्वक्रियाकलाप अर्थात् जगताचा व्यवहार संचलित होत असतो.

परिमलव्याख्यार्थ :- जो विश्वात्मा म्हणून प्रसिद्ध आहे अशा सर्व-व्यक्त आत्म्याला ज्ञानी महात्म्याप्रमाणे अज्ञानी गवळी वगैरेही जाणतात. तसेच विचारतत्पर वीरेश्वरीप्रमाणे सामान्यज्ञानाने शोभणाऱ्या व पाणी भरणाऱ्या स्त्रियाही त्याला जाणतात. सर्व माणसे "मी स्थूल आहे, संपन्न आहे," असे स्वात्मस्फुरण अनुभवतात. अशी श्रुतीही आहे की, **"उतैनं गोपा अदृशन् अदृशन्नुदहार्यः।"** अर्थात् "त्याला अर्थात् सूर्याला गोप, गोपी व पाणी भरणाऱ्या स्त्रिया दररोज पाहतात." ज्ञान्यांच्या दृष्टीने जलाहरणकर्त्या स्त्रिया या सामान्यच आहेत. ज्ञानशक्तीप्रमाणे क्रियाशक्तीही त्याला म्हणजे आत्म्याला वेढते. त्याला अर्थात् सूर्यदेवाला जडबुद्धी पाणी भरणाऱ्या स्त्रिया इत्यादि सर्व जीवमात्र फलाच्या इच्छेने नमस्कार वगैरे करतात. **"यस्मै नमस्तच्छिरः।"** अर्थात् "ज्याला नमस्कार करतात तो शिरःस्थानी श्रेष्ठ आहे," अशी श्रुती आहे. सर्वांचा स्वात्मा हीच देवता होय; कारण **"श्रीमत्स्तोत्रावली"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, **"त्वमेवात्मेश! सर्वस्य सर्वश्चात्मनि रागवान्।"** अर्थात् "हे ईशा! तूच सर्वांचा आत्मा आहेस; कारण सर्वांचे आत्म्यावर प्रेम असते." आणखीही जड म्हणजे स्तंभादि वस्तू, जलहारी म्हणजे शब्दादि ग्राहक इंद्रिये व त्यांची ग्रहणशक्ती या सर्व गोष्टीदेखील त्या आत्मस्वरूपाला जाणतात. यावरून आत्मस्वरूप किती स्पष्ट आहे हे लक्षात येईल. स्तंभघटादि वस्तू प्रमात्याच्या संबंधाने ज्ञानक्रियाश्रयच आहेत; कारण असे म्हटले आहे की, **"द्रष्टैव हि ततो जगत्।"** म्हणून "जगत् हे द्रष्टाच आहे." दृष्टत्व हे कर्तृत्वादींचे उपलक्षण आहे. हाच विषय **"श्रीशंभवैक्यदीपिका"** या ग्रंथात पुढील प्रमाणे आला आहे. तेथे असे म्हटले आहे की, **"विश्वमिदं मन्मयम्,**

मत्कार्यत्वात्। यदित्थं तत् तथा। यथा शरीरम्। इदं च मम कार्यं तस्मान्मन्मयम्।" अर्थात् "हे सर्व विश्वच माझे रूप आहे; कारण ते माझे कार्य अर्थात् मी निर्माण केलेले आहे. ज्याप्रमाणे एखाद्याचे स्वतःचे शरीर असते त्याप्रमाणे हे विश्व माझे शरीरच आहे. जे येथे आहे ते तशा प्रकारचे अर्थात् मद्रूप आहे. ते मी निर्माण केलेले असल्याने मद्रूपच आहे." त्याचप्रमाणे चक्षुरादि इंद्रियेही प्रमात्यामुळे म्हणजे जीवामुळे तशी म्हणजेच प्रमात्याने युक्त असतात अर्थात् ती त्या त्या जीवाप्रमाणेच असतात.

अशा प्रकारे वर सांगितलेला परमेश्वर कुलाचा **"विश्वमिदं मन्मयम्, मत्कार्यत्वात्। यदिन्यं तत् तया। यथा शरीरम्। इदं च मम कार्यं तस्मान्मन्मयम्।"** अर्थात् देहाक्षभुवनादींच्या विश्वविलासाच्या तादात्म्याने पर्यवसित होण्याने स्मृत्यादींचा निर्वाहक होऊन कोणत्या पदार्थात स्पष्ट होत नाही बरे? अर्थात् स्मृती इत्यादींमुळे हा परमात्मा सर्व पदार्थात अभिव्यक्त होत असतो; कारण तो त्या पदार्थाशी तादात्म्य पावलेला असतो. तो स्पष्ट होत नाही असे म्हणणाराच स्वतःचे अस्तित्व घालवितो. याचा भावार्थ असा आहे की, **"विषयेन्द्रियादेर्वेद्य-वैचित्र्यस्य गोपालजलहार्यादेः प्रमातृवर्गस्य च समलो विमलो वापि व्यवहारोऽनुभूयते।** अर्थात् "विषयेंद्रियादि विचित्रविषयांचा गोपाल व गोपी आदि जलहारींचा अर्थात् ज्ञानी व ज्ञानवान् प्रमात्यांचा चांगला, वाईट व साधारण व्यवहार अनुभवाला येतच असतो." असा श्रीप्रत्यभिज्ञाक्रियेने "गावाला जातो", "संध्या करतो" इत्यादि लौकिक-शास्त्रीय व्यवहार, स्वभाव, क्रियाज्ञानादि रूपात प्रत्यक्ष दिसतो.

या दृष्टीने **"श्रीप्रत्यभिज्ञाहृदय"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

तथाहि जडभूतानां प्रतिष्ठा जीवदाश्रया।
ज्ञानं क्रिया च भूतानां जीवतां जीवनं मतम्।।

अर्थ :- जडभूत प्राणिमात्रांची स्थिती जीवदाश्रयावर अर्थात् चैतन्यावर अवलंबून असते. ज्ञान आणि क्रिया या भूतमात्रांचे जीवन आहेत असे मानले आहे.

त्या ज्ञान आणि क्रिया माझ्या म्हणून किंवा अहम् म्हणून अहंभावा-व्यतिरिक्त कोठेही उपपन्न होत नाहीत. त्यामुळे **"सर्वाऽहम्।"** अर्थात् "हे सर्व मी आहे," अशा स्वभावाच्या परमेश्वराबद्दल अर्थात् त्याच्या अस्पष्टतेबद्दल शंका घ्यावयाला कोणतीही जागा नाही.।।४।।

******

गाथा क्रमाङ्क ५

अवतरणिका :- अशा रीतीने आत्म्याविषयी प्रमाणांचा सामान्यदृष्ट्या उपयोग सांगून विशेषरूपाने तेच प्रतिपादन करीत करीत ग्रंथकारांनी आगम-श्रुतिप्रमाणाला थोडेसे महत्त्व देताना पुढील गाथा कथन केली आहे.

ओच्छिण्णं पच्चक्खं ओच्छिण्णं तम्मुहं च अणुमाणं।
आअमदीवालोओ तस्स पयासेइ किं पि माहाप्पं।।५।।
(अवच्छिन्नं प्रत्यक्षमवच्छिन्नं तन्मुखं चानुमानम्।
आगमदीपालोकस्तस्य प्रकाशयति किमपि माहात्म्यम्।।)

अर्थ :- प्रत्यक्षात अवच्छिन्न अर्थात् संकुचितरूपाने राहणाऱ्या आणि अनुमानातही अवच्छिन्नरूपाने राहणाऱ्या त्या अनवच्छिन्न अर्थात् सर्वव्यापक परमात्म्याचे थोडे-फार माहात्म्य आगमदीपालोकात अर्थात् आगमशास्त्रात वर्णन केले आहे.।।५।।

विशेष :- आगमशास्त्राची आप्तवाक्ये अनवच्छिन्न परमात्मतत्त्वाचे थोडेसे महत्त्व प्रदर्शित करतात. आगम अनवच्छिन्न प्रकाशात्मक श्रीमाहेश्वर विमर्श-परमार्थरूप आहेत. त्यामुळेच आगमशास्त्र हे अलौकिक परमात्मतत्त्वाचे प्रकाशक आहे.

परिमलव्याख्यार्थ :- समोर असलेल्या पदार्थांचे ज्ञान करून देण्यात प्रत्यक्षप्रमाणाला महत्त्व आहे. त्यामुळे ते संकुचित आहे म्हणजेच ते अप्रत्यक्ष पदार्थांचे ज्ञान करून देऊ शकत नाही. त्याचप्रमाणे अप्रत्यक्षाचे ज्ञान अनुमान प्रमाणाने होते असे जर म्हणावयाला गेले तर अनुमानाला व्याप्तीची आवश्यकता आहे म्हणजेच ज्याप्रमाणे धूर दिसल्यावर तेथे अग्नी आहे असे अनुमान निघते अर्थात्च येथे धूम व्याप्य झाला असे होते त्याप्रमाणेच असल्यामुळे किंवा त्यामुळे ही व्याप्ती प्रत्यक्षावर अवलंबून आहे म्हणजेच अनुमानही मोजके व मर्यादित असल्याने अप्रत्यक्षाचे म्हणजेच आत्म अर्थात् परमात्म-वस्तूंचे ज्ञान अनुमान प्रमाणाने होत नाही. अर्थापत्ती, अनुपलब्धी इत्यादि प्रमाणांचा अंतर्भाव वैशेषिकादि दार्शनिकांनी अनुमानातच केलेला आहे. जर असा अनुमान प्रमाणात त्यांचा अंतर्भाव केला नाही तर कल्पना करणाऱ्यांच्या कल्पनेवर ती अर्थापत्त्यादि प्रमाणे अवलंबून राहतील. त्यामुळे ही प्रमाणेही संकुचित ठरतात. अशा प्रकारे मर्यादित प्रमाणांची म्हणजेच सोपाधिक प्रमाणांची अमर्यादित अशा निरुपाधिक आत्म्यात प्रवृत्ती करणे हे अत्यंत अनुचित आहे. ही गोष्ट आम्ही आधीही सांगितलेली आहे. आगमांना म्हणजे श्रुतिस्मृती

इत्यादींना जरी आप्तवाक्यत्वामुळे प्रामाण्य येत असले तरी परमात्म्याचे आप्तत्व कोणते? असा विचार केला असता आप्त पुष्कळ असल्यामुळे प्रत्येकाचे कथन किंवा सांगणे हे वेगवेगळे असते. एका आप्ताच्या वाणीचा दुसऱ्यावर अवलंब करीत करीत अर्थात् दुसऱ्याचे साहाय्य घेत घेत मूलवस्तूच अप्रमाण किंवा क्षीण होण्याची भीती असते. रत्नपरीक्षा चार-पाच जणांवर अवलंबून ठेवल्यास ती अपुरी राहते. जर परत **"आगमस्त्वनवच्छिन्नप्रकाशात्मकमाहेश्वरविमर्शपरमार्थः।"** अर्थात् "आगमच अनविच्छिन्न स्वप्रकाश अशा श्रीमाहेश्वरांचा वास्तविक अर्थात् यथार्थ विचार करण्यात अग्रणी आहेत," हे श्रीअभिवनगुप्ताचार्यांचे परमात्म्याच्या विमर्शशक्तियुक्ततेचे जर म्हणणे मानले तर तो आगम अर्थात् प्रमाण सुद्धा अंधकाराने आच्छादित स्तंभादि वस्तूंना दाखविणाऱ्या दिव्याप्रमाणे; परंतु स्वप्रकाशाला प्रकाशाने व्यक्त करण्यासारखे चमत्कारजनकच होईल. परंतु ज्याप्रमाणे दिव्याच्या प्रकाशामुळे अंधारातील स्तंभादि पदार्थांची लांबी, रुंदी, जाडी वगैरे गुणस्वरूप समजते त्याचप्रमाणे आत्म्याचे अनवच्छिन्न स्वभावाचे व आत्मव्यतिरिक्त अशेष त्रिभुवनांचे जीवन चालविण्याचे सामर्थ्य आणि आत्मज्ञानाला पात्र होणाऱ्या साधकाला द्वैतातून अद्वैत संपत्तीकडे नेणे हे अवर्णनीय व अलौकिक असे आत्म्याचे तत्त्व आगमांनी सांगितले जाते.

या दृष्टीने आचार्य श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांनी असे म्हटले आहे की -

यं प्राप्य सर्वागमसिन्धुसङ्गपूर्णत्वमभ्येति कृतार्थतां च।
तं नौम्यहं शाम्भवतत्त्वचिन्तारत्नौघसारं परमागमाब्धिम्।।

अर्थ :- ज्याला प्राप्त करून सर्व श्रुतींचा सागर पार केला जातो व मानव कृतार्थ होतो त्या शांभवतत्त्वाच्या चिंतामणीच्या गाभ्याला आणि परमश्रुतींच्या समुद्राला अर्थात् शैवतत्त्वाला मी नमस्कार करतो.

जर शाखाचंद्र न्यायाने म्हणजे चंद्रकोर दाखविण्यासाठी शाखेचे म्हणजेच फांदीचे टोक दाखविण्याच्या न्यायाने औपचारिक प्रामाण्य मानावयाचे झाल्यास आत्मवस्तूच्या प्रत्यक्षतेसाठी प्रत्यक्ष प्रमाण, अप्रत्यक्षासाठी अनुमान प्रमाण आणि सर्वत्र आगम प्रमाण समजावे. तंत्रांतरातील इतर सामान्य प्रमाण विचार करण्याच्या भानगडीत न पडलेले बरे आहे.।।५।।

✲✲✲✲✲

गाथा क्रमाङ्क ६

अवतरणिका :- जर हे आत्मतत्त्व सर्व प्रमाणांच्या पलीकडे असेल तर

त्या तत्त्वाचे ज्ञान होण्याबाबतीत किंवा विचारांच्या बाबतीत सर्वच माणसे अधिकारी आहेत का नाहीत?; कारण ते तत्त्व प्रमाणांना सामान्यत्व आणणारे आहे. अशी शंका आल्यास येथे अशा प्रकारच्या अधिकारी विभागाची खटपट अनावश्यक आहे असे ग्रंथकारांनी या गाथेत सांगितले आहे.

जाणं णिरूवणिज्जो वइरिक्को को पि अप्पणो भावो।
अप्पविमुहाण ताणं अहिआरिविहाअविब्भमो होउ।।६।।
(येषां निरूपणीयो व्यतिरिक्तः कोऽप्यात्मनो भावः।
आत्मविमुखानां तेषामधिकारिविभागविभ्रमो भवतु।।)

अर्थ :- ज्यांना आत्मभावाव्यतिरिक्त दुसरी एखादी अनात्म वस्तू म्हणजेच उपासना, हवनादींनी युक्त फलप्राप्तीच्या इच्छेने करण्यात येणाऱ्या अनुष्ठान व्रतवैकल्ये यांच्याबाबतीत काही सांगावयाचे असेल त्या अनात्मचिंतकांसाठी फलप्राप्तीच्या योग्यतेने युक्त असण्याऱ्या विविध फलरूप संबंधांमध्ये संशय उत्पन्न होतो.।।६।।

विशेष :- परमात्मस्वरूप स्वसंवेद्य अर्थात् स्व-चित्तात अनुभवाला येणाऱ्या अलक्ष्य निरंजन परमेश्वर श्रीशिवांचे एकमात्र चिंतनच सर्व लोकांसाठी आध्यात्मिक श्रेयाची प्राप्ती होण्यासाठीचा अर्थात् जीव आणि श्रीशिव यांचे सामरस्य होण्यासाठीचा राजमार्ग आहे. तोच एकमात्र सोपा उपाय आहे. आत्मविमुख लोकांच्या बाबतीत ज्योतिष्टोमादि यज्ञयाग करून स्वर्ग प्राप्त करण्याच्या बाबतीत ते अधिकारी आहेत की नाहीत असा संशय उत्पन्न होणे स्वाभाविक आहे. असे लोक आत्मचिंतनाच्या अधिकारापासूनही वंचित राहतात. वास्तविक पाहता आत्मस्वरूपच विभावनीय अर्थात् विशेषरीतीने भावना करण्याला योग्य असे आहे. त्यामुळे आत्मचिंतन करणारा साधक अनात्मपदार्थांच्या चिंतनातून वर उठतो. तो त्या विचारांच्या पलीकडे जातो. तो एकमेव परमात्म्याच्या मनन, चिंतन आणि ध्यानामध्ये आपल्या आत्मोपासनेची सिद्धी समजतो. त्याच्यासाठी विधिनिषेध व बंधनमुक्ती इत्यादींचा काही प्रश्नच राहत नाही. आत्मस्वरूप स्वसंवेद्य, अलक्ष्य, निरंजन, परमात्मतत्त्व, परम उपास्य, ज्ञेय, ध्येय आणि प्राप्तव्य आहे.

परिमलव्याख्यार्थ :- येथे ज्या लोकांना आत्मरूप परमेश्वराहून वेगळा असणारा एखादा ज्योतिष्टोमादि पदार्थ जर निरूपित करावयाचा म्हणजेच सांगावयाचा असेल तर त्यांच्या बाबतीत अन्य पदार्थांकडे त्यांची उन्मुखता असल्यामुळे अर्थात् त्यांचे लक्ष्य आत्मतत्त्व नसून इतर बाह्य वस्तू असल्या-

मुळे भ्रममूलक व प्रमाणरहित असा अधिकारिव्यवहार होत असल्यास होवो. त्याच्या अस्तित्वाविषयी आम्ही कोणीही अडथळा करीत नाही तर त्यांची दिशाभूल करण्याची पद्धत सांगतो.

याबाबतीत श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांनी असे म्हटले आहे की -

आत्मानमनभिज्ञाय विवेक्तुं योऽन्यदिच्छति।
तेन भौतेन किं वाच्यं प्रश्नेऽस्मिन् को भवानिति।।

अर्थ :- आत्मतत्त्वाला न जाणता इतर विवेचन करण्याची ज्याला इच्छा आहे त्याला तू कोण? असा प्रश्न विचारल्यावर तो काय उत्तर देईल?

आमच्या दृष्टीने आत्मविरहित इतर पदार्थ अस्तित्वात असले तरीही शेवटी सर्व आत्ममयच आहे म्हणून आत्म्यावाचून इतर काही तरी आहे असे म्हणणे अयोग्यच आहे.

या दृष्टीने "**श्रीसंवित्प्रकाश**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

यदिदं दृश्यते किञ्चिद् दर्शनात् तन्न भिद्यते।
दर्शनं द्रष्टृतो नान्यद् द्रष्टैव हि ततो जगत्।।

अर्थ :- हे जे काही (मनुष्याला) दिसते ते दर्शनाहून वेगळे नाही आणि दर्शन हे द्रष्ट्यापासून वेगळे नाही म्हणजे (पर्यायाने) जगत् म्हणजे द्रष्टाच होय अर्थात् दृष्ट्यावाचून अन्य काही नाही हे सर्वांचे तात्पर्य आहे.

"**आगम**" ग्रंथातही असे म्हटले आहे की -

यावन्न वेदका एते तावद्वेद्याः कथं प्रिये।

अर्थ :- हे प्रिये! हे जोपर्यंत जाणणारे असत नाहीत तोपर्यंत ते ज्ञेय तरी कसे होईल?

याही उपर दुसरे असे आहे की, आत्मविमुख लोकांच्या बाबतीत आत्म्याचा स्वतंत्र स्वभाव हा सर्वातिशायी धर्म विचारात घेण्यासारखा आहे; पण आत्म्याकडे उन्मुख होण्याचा स्वभाव असलेल्यांच्या बाबतीत कधीही हा अधिकारी विभागाचा अडथळा उत्पन्न होत नाही.

असे म्हटले जाते की, ज्योतिष्टोमादि विभावनीय पदार्थच विभावित करणाऱ्या अर्थात् सांगणाऱ्या जीवांच्या बद्दल वेगवेगळ्या प्रकाराने (अधिकार) प्रसिद्ध आहेत आणि म्हणून स्वर्गप्राप्तीची इच्छा करणाऱ्यांना त्या त्या यज्ञादिकांचे अधिकारही सांगितलेलेच आहेत.

जे आत्मस्वरूपाचेच निरूपण करतात त्यांना आत्म्याशिवाय काही अस्तित्वात आहे अशी शंका येतच नाही. त्यामुळे त्यांच्या ठिकाणी अधिकारित्व

असते अर्थात् अधिकारित्वाचा प्रश्नच उपस्थित होत नाही. जर अनात्मवस्तू नाहीच तर मग अधिकारात तरतमभाव कसा असेल? काही ग्रंथातून **"इहामुत्रार्थफलभोगविरागादि।"** अर्थात् "इह म्हणजे या भूतलावरील व अमुत्र म्हणजे स्वर्गलोकातील भोगाकांक्षावासनाइच्छातृष्णाकामनादींच्या भोगाविषयी वैराग्यादि साधनसंपत्ती असावी," अशा प्रकारच्या अधिकारांचा उल्लेख आढळतो. तो काही अधिकारितारतम्य वा वैशिष्ट्य सांगण्याकरिता नाही; कारण ऐहिक व पारलौकिक भोगांचा उद्रेक म्हणजेच स्वतःचा पुरुषार्थ इच्छिणाऱ्या साधकाचा मोक्ष होय व तोच साधकाच्या आत्मविमर्शाचे प्रयोजन होय, असे पुढे प्रतिपादिलेले आहे. तर मग त्या ठिकाणी मुमुक्षत्व हाच अधिकार असू दे असे जर म्हटले तर म्हणजेच मुमुक्षू हाच आत्मविमर्शाचा अधिकारी म्हटला तर तेही योग्य नाही; कारण -

वस्तुस्थित्यां न बन्धोऽस्ति तदभावान्न मुक्तता।
विकल्पघटितावेतावुभावपि न किञ्चन।।

अर्थ :- वास्तविक पाहता बंधच नाही आणि बंध नसल्यामुळे मोक्षही नाही. बंध व मोक्ष हे सर्व काल्पनिक आहेत. त्यामुळे त्यांना काही वास्तविक अस्तित्वच नाही.

या न्यायाने बंधच नाही. त्यामुळे मोक्ष तरी कोठे आणि मोक्षाची इच्छाही नाही. जर मोक्षेच्छा असलेच तर क्रियाशक्तीतच तिचा शेवट होतो. त्यामुळे विमर्श म्हणजेच ज्ञान आणि मोक्षेच्छा यात भेदाभाव आहे अर्थात् भेदच नाही. त्यामुळे विमर्शच अधिकार होय हे सिद्ध होते. त्याच्यापेक्षा वेगळा अधिकारी नाही आणि नको.।।६।।

*****

गाथा क्रमाङ्क ७

अवतरणिका :- जर प्रमाण व अधिकारादि यांचा काही उपयोग नसला तर विधिनिषेधाला व्यर्थत्व अर्थात् निरर्थकता येईल व चूक झाल्यावरही काही हरकत किंवा बाधा राहणार नाही. त्यामुळे विधिनिषेधाचे खरे स्वरूप सांगताना ग्रंथकार असे म्हणतात की -

जत्थ रुई तत्थ विही जत्थ इमा ण त्थि तत्थ अ णिसेहो।
इअ अह्माण विवेओ हिअअपरिप्पंदमत्तसत्थाणं।।७।।
(यत्र रुचिस्तत्र विधिर्यत्रेयं नास्ति तत्र च निषेधः।
इत्यस्माकं विवेको हृदयपरिस्पन्दमात्रशास्त्राणाम्।।)

अर्थ :- (परमात्म्याचे अर्थात् स्वसंवेद्य अलख निरंजनाचे चिंतनच श्रेयस्कर आहे. या व्यतिरिक्त फलाच्या कामनेने अर्थात् इच्छेने अनात्म वस्तूचे अनुष्ठान करणे उचित नाही.) आत्मतत्त्व किंवा परमात्मतत्त्वाच्या चिंतनात आवड हाच विधी आहे आणि जेथे आवडीचा अभाव आहे तो निषेध आहे. एकमात्र परमात्म्याचे चिंतनच श्रेयस्कर आहे. हाच आमच्या हृदयात असणारा किंवा स्पंदित होणारा पारमेश्वरविमर्श अर्थात् परमेश्वराच्या ज्ञानस्वरूप भावाचा विवेक आहे. तेच परम ज्ञान आहे. तोच आपल्या हृदयातील पारमेश्वरस्वरूपानुभवप्रकाश आहे.।।७।।

विशेष :- लोकव्यवहारात ज्या वस्तूमध्ये रुची असते त्याच्या ठिकाणी निषेध सांगितला जातो आणि ज्याच्यात निषेधाचा भाव असतो त्याच्यात रुची ठेवण्याचा पक्ष घेतला जातो; परंतु महार्थमंजरीचे प्रणेता श्रीगोरक्षनाथांनी आत्मचिंतनात रुची आणि अनात्मचिंतनात निषेध असे प्रतिपादन केलेले आहे. परमेश्वराच्या स्वरूपात आत्मविभोर अशा हृदयाचा अनुभव हाच रुची आणि निषेध यांच्या संबंधी श्रेष्ठ विवेक अथवा विचार आहे. एखाद्या कर्माच्या अनुष्ठानामधल्या प्रवृत्ती व निवृत्तीच्या हेतूनेच विधिनिषेध सांगितले जातात. सांसारिक व्यवहारात व लोकजीवनात विधिनिषेधाचे पालन सावधपणे केले जाते. आत्मचिंतनाच्या बाबतीत विधिनिषेधाचे प्रयोजनच सिद्ध होऊ शकत नाही. आत्मा अथवा परमात्मा सर्वव्यापक आहे व त्याचे चिंतन हाच सर्वांसाठी विधी आहे. ज्या परमतत्त्वात मन पूर्ण विश्रांतीचा अनुभव घेते तेच त्याच्यासाठी श्रेयस्कर असून तीच रुची आहे.

परिमलव्याख्यार्थ :- **"हे जे आहे,"** असे ज्ञानलक्षण म्हणजे विधी असून **"हे नाही,"** हा ज्ञानाचा स्वभाव म्हणजे निषेध होय. तेथे संध्योपासनादि विधी व कलंज म्हणजे मांस, तांबडामुळा, गाजर व टोमॅटो अशा रक्तवर्ण वस्तू व उत्तेजक पदार्थ भक्षण हा निषेध ही उदाहरणे दिली आहेत. त्याबाबतीत असा विचार करावयाला पाहिजे की, अनुष्ठान करणाऱ्यांच्या प्रवृत्ती व निवृत्तीला कारण होण्यासाठीच हा विधिनिषेधाचा व्यवहार आहे; कारण विधीची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, **"अज्ञातज्ञापकत्वे सत्य-अप्रवृत्तप्रवर्तको विधिः।"** अर्थात् "विधी म्हणजे अज्ञात असलेल्या गोष्टीचे ज्ञान करून देऊन अप्रवृत्त गोष्टींची प्रवृत्ती करणे होय." मग तेथे केवळ ज्ञान झाल्यामुळे लोक एखाद्या गोष्टीकडे प्रवृत्त होतात किंवा एखाद्या गोष्टीपासून निवृत्त होतात अगर तदनुकूल इच्छाही आवश्यक आहे? जर

केवळ ज्ञानानेच प्रवृत्ती अथवा निवृत्ती होते असे मानले तर संध्या न करणारा किंवा कलंज भक्षण करणारा कोठेही दिसून येत नाही. जर स्वेच्छाच प्रवृत्ती व निवृत्तीसाठी कारणीभूत होते असे मानले तर अनुष्ठान करणाऱ्यांची रुचीच विधी व निषेधात प्रवृत्त होते असा अर्थ होतो. याचाच अर्थ रुचीलाच जास्त प्राधान्य आहे. जेथे संध्यादि कर्माची आवड आहे तेथे विधी आहे आणि जेथे कलंजभक्षणादींची अप्रीती आहे तेथे निषेध आहे. या न्यायाने जर संध्योपासनेत अरुची निर्माण झाली तर तेथे निषेध होईल आणि कलंजभक्षणादींमध्ये रुची असेल तर तेथे विधी असा अर्थतत्त्वाचा निश्चय होईल. यावरून पाहता आम्हा अहंभावभूषितांचा पारमेश्वरविचार व विवेक विधिनिषेधतात्पर्याचा सारांश आहे. हे सिद्ध झाल्यावर आमच्या शास्त्राची व्याख्या म्हणजे परमात्मविचार हा सर्वज्ञानाचा गठ्ठा, पृथिव्यादि तत्त्वांचा समावेश आहे व हाच हृदयस्पंद आहे. परमेश्वर विज्ञान म्हणजे परमेश्वर-विषयीचे विशेष ज्ञान हाच आगम आहे, हे आधीच सांगितले. त्यामुळे कर्त्याची इच्छाशक्तीच प्रवृत्ती व निवृत्तीला उन्मुख करणारी असल्याने विधिनिषेध संज्ञा कर्त्याच्या इच्छाशक्तीलाच येते.

या दृष्टीने **"श्रीसंवित्प्रकाश"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

त्यागः शक्यक्रियो यस्य स हेय इति निश्चितः।
त्यक्तुं न शक्यते यश्च तदुपादेयमित्यपि।।

अर्थ :- ज्याचा त्याग करणे शक्य आहे ते त्याज्य व जे टाकता येतच नाही ते ग्राह्य होय.

या अर्थानेच **"श्रीसंविदुल्लास"** या ग्रंथात मीही असेच सांगितले आहे की -

प्रामाणिकी विधिनिषेधकथा यदि स्यात्
पर्यन्ततः परम एव शिवः प्रमाणम्।
सर्वोत्तरः स खलु तत्र विधिं निषिद्धे
कर्तुं क्षमेत विहिते च विभुर्निषेधम्।।

अर्थ :- विधिनिषेध हे जर सप्रमाण असतील तर शेवटचे व परमप्रमाण श्रीशिवच होत. ते सर्वश्रेष्ठ आहेत. त्यामुळेच ते विधीला निषेध व निषेधाला विधी करण्याला समर्थ आहेत.

यावरून आमच्या या तंत्राला श्रुतिस्मृतीपेक्षा प्रामाण्योत्कर्ष सांगितला आहे.

हेच **"श्रीमद्भगवद्गीता"** या ग्रंथात सांगताना असे म्हटले आहे की -

एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना गतागतं कामकामा लभन्ते।।९-२१।।
त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन।।२-४५।।

अर्थ :- लोक हे सकाम व वेदोक्त आचार करून जन्मादि चक्रात पडतात. तसेच हे अर्जुना! वेद हे त्रिगुण स्वरूप आहेत. तू गुणातीत हो

या दृष्टीने "**श्रीविज्ञानभैरव**" या ग्रंथात असेच म्हटले आहे की -

किञ्चिज्ज्ञैर्या स्मृताऽशुद्धिः सा शुद्धिः शम्भुदर्शने।
न शुचिर्ह्यशुचिस्तस्मान्निर्विकल्पो भवेन्नरः।।

अर्थ :- सामान्य लोकांनी जी प्रायश्चित्तस्वरूप शुद्धी सांगितली आहे ती शुद्धी शंभुदर्शनात अशुद्धीच होय. त्यामुळे कल्पनात्याग ही खरी शुद्धी होय. (याकरिता) माणसाने निर्विकल्प व्हावे.

त्याचप्रमाणे "**श्रीकालिकामत**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

पतन्ति जन्तवो येन कर्मणा नरके ध्रुवम्।
उत्पतन्ति च तेनैव त्रिकालज्ञा भवन्ति च।।

अर्थ :- प्राणिमात्र ज्या कर्मामुळे म्हणजे कुंडलिनी शक्तीच्या बहिर्मुख गतीमुळे नरकात पडतात त्याच कर्मामुळे म्हणजे कुंडलिनी शक्तीच्या अंतर्मुख अर्थात् सुषुम्नागामित्वामुळे ते वर म्हणजे सहस्रारात येतात व त्रिकालज्ञानी होतात.

याच आशयाने "**श्रीविज्ञानेंदुकौमुदी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

मनो यत्रैव विश्रान्त्या पूर्णभावमुपाश्नुते।
अतः परं हिं किं नाम शुभक्षेत्रं भविष्यति।।

अर्थ :- हे मन जेथे विश्रांती घेतल्याने पूर्णभावाला पोहोचते त्यापेक्षा शुभक्षेत्र आणखी कोणते असू शकेल?

यावरून पुण्यक्षेत्राचे लक्षणही प्रकट झाले आहे. या विवेचनावरून पुढील गोष्ट स्पष्ट होते.

अप्रबुद्धमतीनां हि एता बालबिभीषिकाः।
मातृमोदकवत् सर्वं प्रवृत्त्यर्थमुदाहृतम्।।

अर्थ :- अज्ञानी लोकांना या गोष्टी म्हणजे लहान मुलांना बागुलबुवाची भीती घालण्यासारखे व आईने लहान बालकाला मोदकांचा लोभ दाखविण्या-सारखेच आहे. लोकांची प्रवृत्ती व्हावी याकरिता हे आमिष दाखविणे होय. हा "**श्रीविज्ञानभैरव**" ग्रंथातील थोडा अंश सांगितला आहे.।।७।।

*****

गाथा क्रमाङ्क ८

अवतरणिका :- या जगातील सर्व व्यवहार हा विधिनिषेधांमुळेच होत असतो. जर त्या विधिनिषेधांना स्वेच्छेमुळेच अन्वर्थता येत असेल तर इच्छा ही बहुप्रकारची असल्याने तिला काहीच रूप म्हणजे मर्यादा राहणार नाही. इच्छेलाच संसार असे म्हणतात. त्या संसाराचे म्हणजेच स्वेच्छेचे उल्लंघन करणे अर्थात् तिला ओलांडून जाणे हाच पुरुषार्थ आहे. याच कारणाने म्हणजेच इच्छाविजयासाठी प्रवृत्त झालेले हे तंत्र "कावळ्याला किती दात आहेत?" या निरर्थक परीक्षेसारखे व्यर्थ ठरेल. अशी शंका पूर्वपक्षाने उपस्थित केल्यावर ग्रंथकारांनी खालील गाथेत त्याचे उत्तर दिले आहे.

पज्ञालोअणविमुहे वत्थुसहावस्स अत्तणो हिअए।
सङ्काविसवेएण व संसारभएण मुज्झए लोओ।।८।।
(पर्यालोचनविमुखे वस्तुस्वभावस्यात्मनो हृदये।
शङ्काविषवेगेनेव संसारभयेन मुह्यति लोकः।)

अर्थ :- जीवात्मा आत्मवस्तूच्या चिंतनापासून विमुख होऊन अर्थात् जन्ममरणभयरूप विश्वप्रपंचामध्ये अनुरक्त होऊन म्हणजेच आत्मविमुख होऊन, संसारभयरूप विषवेगाने सद्वस्तूबद्दल भ्रमित किंवा मोहित होत राहतो. त्याला आत्मविवेक राहत नाही. त्याचा हा मोह सद्वस्तू अर्थात् परमात्मतत्त्वा-संबधी संशयाच्या विषवेगाचा परिणाम आहे.।।८।।

विशेष :- हा लोक इच्छा, ज्ञान आणि क्रिया या तीन शक्तींनी युक्त असलेल्या अंतस्तत्त्व सद्वस्तू परमात्म्याच्या चिंतनाविषयी उदासीन असल्याने जन्ममरणरूप लोकयात्रा व्यवहाराने भयभीत होतो. ज्यावेळेला या आत्मतत्त्वाचे तो साधक चिंतन करतो त्यावेळेला त्याच्यासाठी संसार हा भीती आणि शंकांचे कारण नसतो. अनात्मगत विकल्प अर्थात् आत्मतत्त्वाहून सर्वस्वी विरुद्ध अशा वस्तूचे विपरीत ज्ञान म्हणजेच संसार आहे. शुद्ध तत्त्व किंवा आत्मवस्तू हीच संविद् किंवा सद्ज्ञान आहे. आत्मवस्तूचा विवेक झाल्या-नंतर म्हणजेच आत्मवस्तूचे यथार्थ ज्ञान झाल्यानंतर सद्वस्तूच्या नसण्याने विकल्प किंवा शंकेचा विषवेग म्हणजेच विषजन्य उन्माद लोकांना मोहित किंवा भ्रमित करीत नाही. आत्मतत्त्वाचा विवेक हाच आहे की, परम श्रीशिव हे सर्वज्ञ, सर्वकर्ता, सर्वव्यापक परमेश्वर आहेत. समस्त विश्व हे श्रीशिवमय आहे. हाच श्रीशैवमहायोगज्ञानोपदेश आहे.

परिमलव्याख्यार्थ :- हा जो लोक म्हणजेच मनुष्यवर्ग आहे तो दृश्य

पदार्थांहून वेगळा असल्यामुळे द्रष्टा आहे आणि त्यामुळे परमेश्वराप्रमाणे विश्वशरीरी उत्पत्त्यादि पंचक्रियांचा कर्ता इत्यादि ऐश्वर्यवान् असूनही स्वतःला **"पशू"** असे अभिमानाने समजतो अर्थात् तो ज्ञानी असूनही स्वतःला अज्ञानी समजतो. हा या जीवमात्राचा स्वभाव आहे की, तत्त्व शोध करण्याच्या कामी स्वतः परमेश्वराहून भिन्न नसूनही तो आपल्या इच्छेने अहंभावाप्रमाणे इदंभावाचा स्वीकार करून स्वतःच हृदयरूप अंतस्तत्त्व जे इच्छा, ज्ञान व क्रिया या तीन शक्तींचे स्थान आहे त्याचा विचार करण्यात औदासीन्य स्वीकारतो म्हणजेच उदासीन राहतो. हे औदासीन्य चित्त-स्वभावामुळे तो ते बळेच आपल्यावर लादून घेतो. चित्त म्हणजे चिच्छक्ती होय; परंतु ती शक्ती चैतन्यमार्गावरून उतरल्यामुळे तिचे विचारचातुर्य संकुचित म्हणजेच मर्यादित झालेले आहे. या सोपाधिक प्रमात्याला म्हणजेच जीवमात्राला चित्तरूपता हे **"श्रीप्रत्यभिज्ञाहृदय"** या ग्रंथात **"तन्मयो मायाप्रमाता।"** अर्थात् "जीव हा तन्मय म्हणजेच चैतन्यमय आहे," असे रहस्यरूपात सांगितले आहे; कारण **"श्रीशिवसूत्र"** या ग्रंथात **"चैतन्यमात्मा।"** अर्थात् "चैतन्य हाच आत्मा आहे," या सूत्राप्रमाणेच **"चित्तमात्मा।"** अर्थात् "चित्तही आत्मा आहे," असे परत प्रतिपादिले आहे. ते आणवमलाच्या दृष्टीने असल्याने त्याचे औदासीन्य स्वभाविक आहे. त्यामुळेच जीव जन्ममरणरूप संसाराला भितो. यासंबंधी **"द्वितीयाद् वै भयं भवति।"** अर्थात् "दुसऱ्यापासून (द्वैतदृष्टीमुळे) भय असते," असे उपनिषदात म्हटले आहे. तीच दृष्टी उराशी बाळगून तो भेददृष्टीने मोहित होतो व मी परमैश्वर्यवान् आहे हे विसरून दुःखी होतो. ज्याप्रमाणे सर्पभ्रम उत्पन्न करणाऱ्या रज्ज्वादि पदार्थांचा तत्त्वतः विचार न केल्याने मनुष्याला साप चावल्याची लक्षणे होतात आणि तो मूर्च्छा व मरणादि क्लेश भोगतो त्याचप्रमाणे खऱ्या वस्तूचा म्हणजेच आत्मतत्त्वाचा विचार न करताच अनात्मवस्तूत अडकल्याने जीव जन्म व मरणादि क्लेश भोगतो. अशा प्रकारे सर्पदृष्टान्त देऊन आत्मतत्त्व रुजविण्याचा प्रयत्न केला आहे. "मी जीवमात्र आहे," हा मोह होण्यात स्वशक्तीच प्रवृत्त होतात. त्या शक्ती वाक्स्थानात परापश्यंतीमय असतात. प्रत्यक्ष वाणीत त्या ब्राह्मी व माहेश्वर्यादि मातृकास्वरूपाच्या आहेत. ज्ञानात वा बुद्धिरूपात आत्मरूपस्फुरणाच्या वामेश्वरीखेचर्यादि शक्ती होत. प्राणविभागात देहाच्या पोषणाला आणि क्षयाला कारणीभूत असणाऱ्या शक्ती म्हणजेच प्राण, अपान व समानादि शक्ती असतात. या शक्तींना अहंता व इदंता म्हणजे वस्तुमात्र

"मी" शिवाय इतर वस्तू या दोन्ही गोष्टींकडे जाण्याचे सामर्थ्य असल्याने ज्याप्रमाणे आत्मरूपाचे प्रकाशन करणारी शक्ती आहे त्याचप्रमाणे आत्मरूप आच्छादून टाकणारी शक्तीही आहे. या इच्छा, ज्ञान व क्रियादि तीनही शक्ती पशुशरीराभिमानी जीवातही आहेत; तथापि परमैश्वर्य अवस्थेत प्रतिबंध न केलेली अशी अनिरुद्धस्वतंत्रतारूप इच्छाशक्ती, विश्वभेदादि प्रथेनुरूप सर्वज्ञ व सर्व ठिकाणी विस्तारलेली ज्ञानशक्ती आणि सर्व कर्म करण्याची क्रियाशक्ती या पशू अर्थात् जीवाच्या अज्ञानावस्थेत त्याच्या ठिकाणी कासवाच्या अवयव संकोचाप्रमाणे अपूर्ण ज्ञानरूप आणव अर्थात् अणुसंबंधी मल, भेददृष्टिरूप मायामल व शुभाशुभ अनुष्ठानात्मक कार्म मल यांना उन्मीलित करतात. त्यामुळे या आत्म्याला संसारी जीव असे म्हटले जाते. हा भ्रममोह म्हणजेच अज्ञान घालविण्याकरिता चांगल्या श्रीसद्गुरुचरणांची पूजादि सेवा ही उपाय म्हणून सांगितली आहे. ज्यावेळेला हा जीवसमूह स्वहृदयाचे खरे स्वरूप म्हणजेच तत्त्व जाणण्याला प्रवृत्त होतो त्यावेळेला **"संसार"** हा पदार्थच त्याला दृग्गोचर होत नाही किंवा त्याच्या दृष्टीने तो नसतोच; कारण तो स्वज्ञानविस्तार रूपानेच भासतो. या दृष्टीनेच श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांनी असे म्हटले आहे की -

स्वतन्त्रः स्वच्छात्मा स्फुरति सततं चेतनशिवः
पराशक्तिश्चेयं करणसरणिप्रान्तमुदिता।
तदाभोगैकात्मा स्फुरति च समस्तं जगदिदं
न जाने कुत्रायं ध्वनिरनुपतेत् संसृतिरिति।।

अर्थ :- स्वतंत्र, स्वच्छात्मा व चेतन श्रीशिव जेव्हा स्फुरण पावतात तेव्हा पराशक्ती करण अर्थात् साधनरूपाने पुढे येते. त्यावेळी ते श्रीशिव भोगप्रवण अर्थात् भोग भोगण्याला प्रवृत्त होतात व स्वस्वरूपाने विश्व निर्माण करतात. असे असताना संसार हा शब्द मध्येच कोठून येतो हे कळत नाही म्हणजे संसार नाहीच असे ते म्हणतात.

या दृष्टीने **"श्रीअद्वयोल्लास"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

भ्रमः संसारो यत् कथमिव भवेन्मुक्तिरमुत-
स्त्वितीयं या वाञ्छा बत जडधियां सा प्रसरति।
त्वदन्यन्नास्तीति प्रभवदविकल्पाद्वयमतेः
स्थिरीकारो मोक्षो द्वितयघटना संसृतिरतः।।

अर्थ :- भ्रमरूप संसारातून मी मुक्त कसा होईन? अशी इच्छा जडबुद्धी

असलेल्या (जीवाला) उत्पन्न होते. तुझ्याशिवाय कोणत्याही प्रकारचा संसार नाही अशी बुद्धी होणे व ती स्थिर होणे यालाच मोक्ष असे म्हणतात व तुझ्यावाचून दुसरे पाहणे म्हणजेच द्वैत दृष्टी होय व हाच संसार आहे.

याप्रमाणेच "**श्रीसंवित्प्रकाश**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

तस्माद् विकल्पः संशुद्धाद् विज्ञानान्नातिरिच्यते।
तेनैव निर्विकल्पोऽयं विकल्पः स्वात्मनि स्थितः।।
सर्वो विकल्पः संसार इत्युक्तेरयमाशयः।
तदसत्त्वं सृतेः सत्त्वं शुद्धायाः संविदः स्थितम्।।

अर्थ :- अतिशुद्धज्ञानाहून विकल्प काही वेगळा नाही. जीवविषयक वृत्ती अर्थात् ज्ञान म्हणजे विकल्प आणि आत्मविषयक ज्ञान म्हणजे निर्विकल्प होय." त्याचप्रमाणे "विकल्पालाच संसार म्हणण्याचा आशय असा आहे की, संसार खोटा व शुद्धसंवित् ज्ञान हे सत्य आहे.

दृष्टान्ताकडे वळल्यावर रज्ज्वादिकांचे खरे स्वरूप कळल्याने सर्पभ्रम दूर होतो व मूर्च्छादि लक्षणांचा अनुभवही येत नाही.

याचा सारांश असा आहे की, सर्व मानवजातीला बाह्य म्हणजेच लौकिक व्यवहार करीत असतानाच हृदयोन्मुख अशी अहंबुद्धी स्फुरण पावते. ती बुद्धी "**मी ज्ञाता**" अशा स्वरूपाची असते. त्यामुळे येथे ज्ञानशक्ती लपून राहत नाही. "**जानामि**" अर्थात् "**मी जाणतो**" या ठिकाणी विमर्श-आकार-संरंभरूप अर्थात् ज्ञान-आकार-ऊर्जारूप एखादी क्रियाही अर्थाक्षिप्त आहे. या द्वितयानुप्राणन अवस्थेमध्ये इच्छाशक्तीचे सूचन केलेले असल्याने हा इच्छा-ज्ञान-क्रिया-सामरस्ययुक्त स्वभाव अव्याकुलित आहे (असे सिद्ध होते.) त्यालाच हृदय असे म्हटले आहे. "**वितर्क आत्मज्ञानम्।**" अर्थात् "या वस्तूचा म्हणजे शक्तियुक्त श्रीशिवांचा विचार म्हणजेच आत्मज्ञान होय," असे "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात सांगितल्याप्रमाणे तोच मी परमशिवभट्टारक तीन शक्तींनी म्हणजेच इच्छा, ज्ञान व क्रिया या शक्तींनी युक्त आहे अशी विमर्श-लक्षणा शक्ती उत्पन्न होते अर्थात् असे ज्ञान उत्पन्न होते. "**शक्त्याविष्करणेनेयं प्रत्यभिज्ञोपदिश्यते।**" अर्थात् "या शक्तीच्या आविष्काराच्या उद्देशाने ही प्रत्यभिज्ञा उपदेशिली जाते," असे "**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथात सांगितले आहे.

त्याचप्रमाणे "**श्रीईश्वरसिद्धी**" या ग्रंथात हेच सांगितले आहे की -

स्वात्मैवायं स्फुरति सकलप्राणिनामीश्वरोऽन्तः

कर्ता ज्ञातापि च यदि परं प्रत्यभिज्ञास्य साध्या।

अर्थ :- सर्व प्राणिमात्रांच्या हृदयात स्वात्मा स्फुरतो व तोच कर्ता व ज्ञाता आहे असे पुनर्ज्ञान म्हणजे "**प्रत्यभिज्ञा**" होते.

"**श्रीविज्ञानभैरव**" या ग्रंथातही यासंबंधी असे म्हटले आहे की -

सर्वज्ञः सर्वकर्ता च व्यापकः परमेश्वरः।
स एवाहं शैवधर्मा इति दार्ढ्याच्छिवो भवेत्।।

अर्थ :- जो सर्वज्ञ, सर्वकर्ता, व्यापक व परमेश्वर आहे तोच श्रीशिव-धर्मरूप मी आहे असे दृढ ज्ञान झाले की, (साधकभक्तयोगिशिष्य) श्रीशिव होतो.

यासंबंधी "**श्रीशिवदृष्टी**" या ग्रंथातही असे म्हटले आहे की -

अथ स्थिते सर्वदिक्के शिवतत्त्वेऽधुनोच्यते।
तस्मिन् ज्ञातेऽथवाऽज्ञाते शिवत्वमनिवारितम्।।
वह्निर्ज्ञातोऽथवाऽज्ञातः प्रकाशं जनयेन्न किम्।
अज्ञातं न सुवर्णं किं तदा किमुपलं भवेत्।।
इत्याक्षिप्य,
सत्यमेव तथापीह सुवर्णं ज्ञातमात्रकम्।
मूल्यादिनोपभोगाय दानार्थमुपयुज्यते।।
चिन्तामणिरविज्ञातो भवेच्चिन्तामणिः स्फुटम्।
तथापि कार्यभोगार्थमज्ञातः केन धार्यते।।

अर्थ :- सर्व दिशा-विदिशात श्रीशिवतत्त्व भरलेले आहे. जरी ते जाणले किंवा न जाणले तरी श्रीशिवत्व अपरिहार्य आहे. ज्याप्रमाणे अग्नी जाणला किंवा जाणला नाही तरी तो काय प्रकाश निर्माण करीत नाही का? (करतोच) तसेच सोने जाणले नाही तर ते काय दगड होणार आहे? (त्याचप्रमाणे श्रीशिवतत्त्व जाणले किंवा जाणले नाही तरी ते अखंड सिद्धच राहणार.)

असा आक्षेप घेऊन त्याला पुढीलप्रमाणे असे उत्तर देतात की -

सोने हे दगड होत नाही हे खरे; पण ते सोने म्हणून समजले तर त्याचा उपभोग घेता येतो व दानादिगोष्टी करता येतात. त्याचप्रमाणे जरी चिंतामणी हा चिंतामणीच असला तरीही तो जर कळला नाही तर तो जवळ कोण ठेवील?

त्यामुळे पदार्थज्ञान आवश्यक आहे असे प्रतिपादन केले आहे. अशा प्रकारे आत्म्याला परमेश्वर समजल्याने, सर्वविश्व परमेश्वरच आहे असे गृहीत

धरल्याने व संसार हा स्वर्गादींप्रमाणे विश्वांतर्भावी मानल्याने शरीरधारी-जीवाचे शरीर हे **"अहम्"** चा अभेदानुभव देण्याचे स्थान होते.

यादृष्टीने **"श्रीमत्स्तोत्रावली"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

परमेश्वर! तेषु तेषु कृच्छ्रेष्वपि नामोपनमत्स्वहं भवेयम्।
न परं गतभीतस्त्वदङ्गसङ्गादुपजाताधिकसम्मदोऽपि यावत्।।

अर्थ :- हे परमेशा! जरी नानाविध संकटे कोसळली तरी तुझ्या अंगसंगाने जोपर्यंत मी अत्यानंदाने बेहोष होणार नाही तोपर्यंत मला निर्भयता मिळणार नाही अर्थात् परमेश्वररूप झाल्याशिवाय मनुष्य निर्भय होणार नाही.

श्रीमहेश्वरांच्या अद्वैत ज्ञानामृत डोहात निमग्न होणे यातच जीवभावाचे पर्यवसान आहे. असे असल्याने बंध व मोक्षांनी कल्पिलेल्या क्षोभादिरूप कलंकाची आशंका येथे उत्पन्न होत नाही. याबद्दल श्रुतीमध्ये असे आहे की, **"तरतिशोकात्मवित्।"** अर्थात् "आत्मज्ञानी शोकसागरातून तरून जातो."

यादृष्टीने **"श्रीमदनुभवस्तोत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

त्वं पृथग्विगतबाह्यसम्भ्रमस्तिष्ठसीश्वर! यदात्मचित्यलम्।
लूनमूलकलनैः कुतस्तदा गम्यतामतनुमायिता गुणैः।।

अर्थ :- हे ईश्वरा! तू एकटा जर बाह्यजगत्संभ्रम सोडून आत्मचैतन्यात राहिलास तर मूळ नाहीसे झालेले गुण व मायेमुळे होणारे तुझे शरीरधारण वगैरे कोठे जाणार? त्यांना थारा नाहीच.

असे असले तरी **"श्रीशिवदृष्टी"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

यथा नृपः सार्वभौमः प्रभावामोदबृंहितः।
क्रीडन् करोति पादातधर्मांस्तद्धर्मधर्मतः।।
तथा प्रभुः प्रमोदात्मा क्रीडत्येवं तथा तथा।

अर्थ :- (या न्यायाने) ज्याप्रमाणे पराक्रमगंधाने पुष्ट असा सार्वभौम राजा नोकरचाकरांशी त्यांच्या अधिकारानुरूप वागतो तसा आनंदरूप प्रभू त्या त्या नियमानुसार (मनुष्यांशी) खेळतो अर्थात् वागतो.

या दृष्टीने स्वात्मस्वातंत्र्य उल्लासापासून स्व-रूपविचारशून्यता काही ठिकाणी दिसते (आणि त्यामुळे) त्यांना प्रपंच चिकटल्याप्रमाणे दिसतो.

या दृष्टीनेच **"श्रुतीत"** असे सांगितले आहे की -

अदेवाद् देवः प्र च ता गुहा यन्।

अर्थ :- प्रकाशक देव अप्रकाशातून हृदयरूप गुहेत प्रवेश करतो.

त्याचप्रमाणे **"श्रीचिद्गगनचंद्रिका"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

हृद्गुहामभिलषन्नहन्तया दृक्क्रियावपुरदृक्क्रियात् पदात्।
सन्तमेमि समभावदं शिवं सख्यहानिरमुना हि सूतये।।

अर्थ :- मी अहंतेने जेथे दृष्टी व क्रिया नाही अशा स्थानातून हृदयरूप गुहेत जाऊन समभाव देणाऱ्या श्रीशिवांना मिळतो अर्थात् त्यांच्याशी समरस होतो. हे मिळणे म्हणजेच एकरूप किंवा समरस होणे असून भिन्नत्वातील म्हणजेच दोघातली मैत्री नाहीशी करणे होय. वेगळेपणात जगदुत्पत्ती आहे.

या दृष्टीने "**श्रीसमाधिपंचदशी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

यदेतस्यापरिज्ञानं तत् स्वातन्त्र्योपकल्पितम्।
स एव खलु संसारो जडानां यस्तु भीषणः।।

अर्थ :- आत्म्याच्या स्वरूपाचे अज्ञान म्हणजेच संसार होय. तो जडांना भयंकर भासतो.

"**श्रीसर्ववीरभट्टारक**" या ग्रंथातही असेच म्हटले आहे की -

अज्ञानाच्छङ्कते लोकस्ततः सृष्टिश्च संहतिः।
मन्त्राः शिवात्मकाः सर्वे सर्वे वर्णाः शिवात्मकाः।।

अर्थ :- अज्ञानामुळे लोकांना शंका उत्पन्न होते व अज्ञानामुळे सृष्टी आणि संहार या गोष्टी होतात. सर्व मंत्र व वर्ण हे श्रीशिवात्मक आहेत.

"**श्रीमोक्षोपाय**" या ग्रंथातही असे म्हटले आहे की -

स्वापरामर्शमात्रोऽयमपराधः कियानसौ।
तावन्मात्रेण तज्ञातं यद् वक्तुं नैव पार्यते।।

अर्थ :- स्वतःचा म्हणजे आत्मरूपाचा विचार न करण्याचा अपराध तो काय; पण त्याचे फळ पाहिले तर मात्र फार भयंकर (असते.) त्याचे वर्णन करणेच अशक्य आहे.

अशा रीतीने "**आत्म किंवा स्व-रूपज्ञान म्हणजे मोक्ष व तिकडे दुर्लक्ष म्हणजे बंध होय,**" हा इत्यर्थ होय. आता या विषयाचे स्पष्टीकरण पुरे.।।८।।

******

गाथा क्रमाङ्क ९

अवतरणिका :- आत्म्याचा विचार अर्थात् ज्ञान हा सर्व सांसारिक दुःखांचे शमन करणारा आहे हे सांगितले. हा विचार आत्म्याची अस्पष्टता स्पष्ट करणारा आहे. आत्म्याविषयी अस्पष्टतेची शंकाही येत नाही; कारण तो सर्वांहून स्पष्ट आहे. हे अनेक उदाहरणांनी सिद्ध केले. त्यामुळे येथे प्रमाण

व प्रमेय या व्यवहाराचा बिलकुल उपयोग नाही हे विस्तृत सांगितले. यावर शंका व समाधान म्हणजे स्पष्टाचे अस्पष्टत्वही योग्य कसे आहे हे ग्रंथकार पुढील गाथेत सांगतात.

माणिक्कपवेओ विअ णिओलिओ णिअमऊहलेहाए।
पडिभाइ लोइआणं अच्चंतफुडो वि अप्फुडो अप्पा।।९।।
(माणिक्यप्रवेक इव निचोलितो निजमयूखलेखया।
प्रतिभाति लौकिकानामत्यन्तस्फुटोऽप्यस्फुट आत्मा।।)

अर्थ :- ज्याप्रमाणे उत्कृष्ट माणिक रत्न झाकलेले राहूनही आपल्या प्रभेने किंवा तेजाने प्रस्फुटित म्हणजेच प्रकाशित होत राहते त्याचप्रमाणे परमात्मा आपल्या पूर्ण तेजाने भूतमात्रांच्या दृष्टीत अत्यंत प्रकाशित होत राहतो आणि स्वतःतच प्रविष्ट होऊन जातो अर्थात् एकमात्र सर्वव्यापक चैतन्य स्व-स्वरूपात अंतर्निहित होऊन जाते.।।९।।

विशेष :- हे निर्विवाद सत्य आहे की, लोकव्यवहारात सर्वत्र परमात्म्याची सत्ताच क्रियाशील आहे. लोकांमध्ये अर्थात् समस्त जड व चेतन वर्गांमध्ये तो परमात्माच सर्व प्रकाराने व्यापलेला असून त्या जड व चेतन वर्गांमध्येच अप्रकट आणि प्रकट होत असतो.

परिमलव्याख्यार्थ :- आत्मरूप परमेश्वर हा स्वप्रकाशाने सर्व त्रिभुवनाला व्यापून टाकावयाला समर्थ आहे. तो जगद्विषयक कल्पनामय प्रकाशकिरणांचा झोत वरचेवर सारखा टाकत असतो व त्याखाली तो दिसत नाही. **"तत् सृष्ट्वा तदेवानुप्राविशत्।"** अर्थात् "विश्व उत्पन्न करून त्याने त्यातच प्रवेश केला," असे **"उपनिषद्"** ग्रंथात सांगितल्याप्रमाणे परमेश्वर हा विश्वरूप वस्त्राने झाकलेला असतो. त्याला प्रमेय अर्थात् जाणून घेण्याची वस्तू समजून विश्वात पाहण्यासाठी प्रमाणांचा उपयोग करणाऱ्या प्रमात्यांनी प्रयत्न केला तर तो परमेश्वर समजणारही नाही. **"श्रीतंत्रालोक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, **"अत्यन्तस्वच्छता सा यत् स्वाकृत्यनवभासनम्।"** अर्थात् "अतिशय झगमगाटात वस्तूचे खरे स्वरूप स्पष्ट दिसत नाही." या उक्तीवरून परमात्मतत्त्व अत्यंत प्रकाशमान असल्याने ते अस्पष्ट आहे असे कारण सांगितले. यासाठी ग्रंथकारांनी मध्याह्नीच्या सूर्याचा दृष्टान्त दिला आहे. दुपारचा सूर्य प्रखर किरणांमुळे दिसू शकत नाही. तो दिसत नाही म्हणून सूर्य नाही असे आपल्याला म्हणता येणार नाही. पैलू पाडण्याचा त्रास वगैरे न घेतल्याने बहुमोल रत्नही केवळ एक सामान्य दगड वाटतो आणि त्याची चकाकी व

किरण झाकले जातात. त्यामुळे त्याची किंमत किंवा मौल्यवानपणा निश्चित-पणे ठरविता येत नाही. त्याचप्रमाणे आत्मशक्तीचा विश्वविस्ताराने तिरोभाव झाल्याने अर्थात् आत्मशक्ती लोप पावल्याने त्या आत्मरूपाच्या अस्पष्टतेविषयी शंका येते. आत्मा हा उभयस्वभावी म्हणजे स्पष्ट आणि अस्पष्ट असल्याने विश्वव्यवहार किंवा सृष्टिव्यापारही उचितच आहे.

याबद्दल मीच "**श्रीसंविदुल्लास**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

अर्चि:प्ररोहे महत: प्रमातुर्नातिस्फुटत्वे च बहि: प्रथा मे।
अपेक्षते प्रेक्षितुमात्मदर्शं सूर्योदयं तद्व्यवधिं च लोक:।।

अर्थ :- महान् प्रमाता म्हणजेच ज्ञात्या आत्म्याचे तेज:किरण बाहेर फार स्पष्ट नसल्याने तो पाहण्यासाठी आत्मदृष्टी पाहिजे. आत्मरूप पाहवयाला आरसा लागतो व आरशात आत्मरूप पाहवयाचे असल्यासही प्रकाश हा असावा लागतो.

हा लौकिक दृष्टान्त आहे; मात्र "**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

किन्तु मोहवशादस्मिन् दृष्टेऽप्यनुपलक्षिते।
शक्त्याविष्करणेनेयं प्रत्यभिज्ञोपदिश्यते।।
तैस्तैरप्युपयाचितैरुपनतस्तन्व्या: स्थितोऽप्यन्तिके
कान्तो लोकसमान एवमपरिज्ञातो न रन्तुं यथा।
लोकस्यैषा तथानवेक्षितगुण: स्वात्मापि सन्नीश्वरो
नैवालं निजवैभवाय तदियं तत्प्रत्यभिज्ञोदिता।।

अर्थ :- जरी दृश्य असे आत्मरूप मोहादिविकारांमुळे दिसत नसले तरी आत्मशक्ती आविर्भूत झाल्यास अर्थात् श्रीसद्गुरुकृपेने म्हणजे शक्तिपात-योगदीक्षेने कुंडलिनी शक्ती जागृत झाल्यास तोच हा आत्मा अशी प्रत्यभिज्ञा म्हणजेच आत्म्याला पहिल्यांदा पाहिले आहे असे निश्चित स्मरण होते. तसेच पती जवळ असूनही जर सर्वसामान्यांप्रमाणे दिसला तर तो ज्याप्रमाणे (स्त्रीला) उपभोग्य न वाटल्यामुळे तिला त्याच्याबद्दल अनेक रीतींनी पटवून द्यावे लागते त्याचप्रमाणे स्व-आत्मा परमेश्वर असून त्याच्या गुणांच्या अप्रकटतेमुळे त्याचे ऐश्वर्य किंवा तो कळावयाला अपुरा पडतो. त्यामुळे ईश्वरत्वादि गुणांनी त्याची ओळख करून घ्यावी.

अलौकिक असे अंतर्मुख होण्यासाठी "**श्रीमत्स्तोत्रावली**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

न ध्यायतो न जपतः स्यादस्याऽविधिपूर्वकम्।
एवमेव शिवाभासस्तं नुमो भक्तिशालिनम्।।

अर्थ :- अविधिजपध्यान येथे अनुपयुक्त आहे अर्थात् विधियुक्त जप करणे अत्यंत कठीण आहे. त्यामुळे भक्तिलभ्य श्रीशिवाभासाला अर्थात् श्रीशिवरूप दिसणाऱ्या विश्वाला म्हणजेच त्या आत्मरूपाला आम्ही वंदन करतो. ही **"श्रीमत्स्तोत्रावली"** या ग्रंथातील उक्तीच युक्तियुक्त वाटते.।।९।।

*****

गाथा क्रमाङ्क १०

अवतरणिका :- आत्म्याच्या ठिकाणी परस्पर विरुद्ध असे स्पष्टत्व आणि अस्पष्टत्व हे दोन धर्म कसे असू शकतात अशी शंका घेऊन त्या आत्म्याचे तशा प्रकारचे काही स्वांतत्र्य असून त्याला "विमर्श" असे म्हणतात आणि त्याचा विचार पुरुषार्थाने सर्वथा साध्य होतो असे प्रतिपादन ग्रंथकारांनी खालील गाथेत केले आहे.

उड्ढो जलइ पआसो लोआलोअस्य मंगलपईपो।
विमरिसदसामुहाणिअढज्जंतमलालितेलविच्छड्डो।।१०।।
(ऊर्ध्वो ज्वलति प्रकाशो लोकालोकस्य मङ्गलप्रदीपः।
विमर्शदशामुखानीतदह्यमानमलालितैलविच्छर्दः।।)

अर्थ :- ज्याप्रमाणे मंगलदीप पूर्णरूपाने तेलाने भरलेला असल्यावर प्रज्वलित होऊन अंधाराचा नाश करून आपला प्रकाश प्रकट करतो त्याचप्रमाणे पूर्ण प्रकाशस्वरूप परमेश्वर ज्ञानक्रियारूप विमर्शामध्ये अत्यंत प्रभासित म्हणजेच तेजस्वी प्रकाशाने युक्त होऊन प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असणाऱ्या सर्व आणव, कार्म आणि मायीय मलांना आपल्या उत्कृष्ट तेजाने भस्मसात करून टाकतो.।।१०।।

विशेष :- परमात्मा प्रकाशस्वरूप आहे. तो आपल्या आणव, कार्म आणि मायीय कर्मविपाकरूप तीन मलांना जाळून आपल्याला त्याच्या दिव्य तेजाने अंतर्बाह्य निर्मळ करून टाकतो. त्याच्या प्रकाशाने पुण्यपाप-वासनात्मक कर्मफलाचा नाश होतो. परमप्रकाशस्वरूप परमात्म्यातच सर्व विश्वविलास विभासित किंवा प्रकाशित होतो. याचा आशय हाच आहे की, आत्मा सर्व मलसंचय आत्मसात करतो. ज्याप्रमाणे तेलात पूर्णपणे भिजलेली वात असलेला मंगलदीप समस्त अंधकाराला आत्मसात करून सर्वत्र आपला प्रकाश प्रकट करतो त्याचप्रमाणे आत्माही मल आत्मसात करून म्हणजेच

मल नष्ट करून सर्वत्र आपला प्रकाश प्रकट करतो.

परिमल व्याख्यार्थ :- "हा मी जाणतो", "हे मला स्फुरते," इत्यादि सर्व व्यवहारात संपूर्ण भरलेला जो प्रकाशरूप अर्थ किंवा पदार्थ आहे तो (अर्थ किंवा वस्तू) दिसणाऱ्या भावरूप पदार्थांचा व न दिसणाऱ्या आणि आकाशपुष्पादिकांप्रमाणे अभावरूप असणाऱ्या पदार्थांचा दीपाप्रमाणे प्रकाशक म्हणून अनुभवाला येतो. तसे लोक हा मुख्यवृत्तीने प्रमाता अर्थात् ज्ञाता व अलोक हा त्याचे ज्ञान किंवा प्रकाशन प्रमात्याच्या अधीन असल्यामुळे ते प्रमेय होय. ग्राह्य व ग्राहक हे दोन्ही धर्म असल्याने लोक व अलोक हे प्रमाण होय; कारण लोकालोक हा प्रमाता, प्रमेय व प्रमाण या त्रिपुटीचा प्रकाशक आहे. तसा प्रकाश नसेल तर या सृष्टीला अंधकाराचे स्वरूप येइल, असे आम्ही या पूर्वीच सांगितले आहे. त्यामुळे त्या प्रकाशालाच ग्रंथारंभी मंगलसूचक म्हटले आहे. सर्वात मोठे मंगल हेच आहे की, स्तंभकुंभादींचा परस्परातील वेगळेपणा व स्वभावाचा अभाव हे दोन्ही दूर करून त्यांना त्या त्या स्वरूपातच ठेवणे होय. तो सर्वप्रकाश्य पदार्थांहून वेगळा स्वयंप्रकाश आहे व तो प्रकाश सर्वज्ञानरूपाने स्फुरण पावतो. त्याचे हे स्वभाववैशिष्ट्य विमर्शरूप मानावयाला पाहिजे. नाही तर आरसा इत्यादि पदार्थांप्रमाणे त्याला जडता येइल. **"श्रीप्रत्यभिज्ञाहृदय"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, **"प्रकाशोऽर्थोपरक्तोऽपि स्फटिकादिजडोपमः।"** अर्थात् "जरी जवळ असलेल्या रक्तवर्णादि पदार्थांमुळे स्फटिक त्या त्या रंगाचा दिसला तरी तो जडच आहे." कार्यवर्गाच्या विभिन्नतेप्रमाणे प्रकाशाला कर्तृत्व येते हे नंतर सांगण्यात येइल.

या दृष्टीने शास्त्रात असे म्हटले आहे की -

अत्र खल्वतिविस्तीर्णे लोकयात्राविजृम्भिते।
व्यवह्रियन्ते बहवो भावा भूभूधरादयः।।
व्यवहारविधिस्तेषामसङ्कीर्णश्च लक्ष्यते।
तत्र किं तन्निमित्तं स्यादित्यालोचयतां सताम्।।
संवित्तिव्यतिरेकेण नैवान्यदुपलभ्यते।
तस्या व्यपोहशङ्कायां भूः स्वात्मनि न भूर्भवेत्।।
नाप्यभूर्भूधरादस्याः पृथक्त्वं च कथं भवेत्।
मिथो रूपापहारे च फूत्कर्तुं कस्य कौशलम्।।
एवं वेद्यस्य पृथ्व्यादेरसङ्कीर्णे प्रकाशने।

सामान्यतो विशेषाञ्च संविदेव प्रगल्भते।।
सापि वेद्यवदन्येन प्रकाश्या चेत् प्रवर्तते।
प्रकाशस्तन्मयो न स्याज्जाड्ययोगाविशेषतः।।
संविदोऽन्यप्रकाश्यत्वे संवित्त्वं लुप्यते न वा।
न चेद् व्यर्थं तदन्यत् स्याद् येन सेयं प्रकाश्यते।।
लुप्यते चेत् किमाकारा सा तेनास्तु प्रकाशिता।
तस्यान्यस्य प्रकाशश्च कुत इत्यवलोकने।।
अन्यदन्यदिति व्यक्तमनवस्थितिरापतेत्।
अतोऽस्याः स्वप्रकाशत्वं स्वभावादेव सिध्यति।।
प्रकाशश्चोक्तया भङ्ग्या स्वप्रकाशो भवन्नपि।
भावमात्रस्वभात्वे न जाड्यं वेद्यवत् त्यजेत्।।
स्वप्रकाशोऽप्यसौ काञ्चित् कर्तृतामश्नुते न चेत्।
अन्यथा त्वर्थवन्नास्य स्वभावः स्यात् प्रकाशनम्।।
ततश्च कर्तृता तस्य स्वात्मविश्रान्तिलक्षणा।
अनिच्छतापि स्वीकार्या यामहन्तां विदुर्बुधाः।।
पार्यन्तिकी प्रतिष्ठाभूर्वेद्यवर्गस्य यो विभुः।
तस्य स्वयंप्रतिष्ठत्वमहम्भावः प्रकीर्त्यते।।
विमर्शश्चायमेव स्यान्मुख्यमैश्वर्यमीशितुः।
अतः स्वतन्त्रो भगवान् सर्वंसह इति स्थितम्।।

अर्थ :- लोकयात्रेने फुलणाऱ्या या अतिविस्तीर्ण सृष्टीत भू म्हणजे पृथ्वी व पर्वतादि बरेच पदार्थ आहेत व ते व्यवहारात येतात; कारण त्याच्या अर्थात् श्रीशिवांच्या व्यवहारात त्यांची सरभेसळ होत नाही. याचे कारण काय असावे? असा विचारवंतांपुढे प्रश्न आला असता त्यांना संवित्तीवाचून म्हणजेच ज्ञानमय आत्म्यावाचून दुसरे काही दिसले नाही. ती संवित्ती दूर केल्यास किंवा न मानल्यास पृथ्वीला पृथ्वीत्व व भूधरादिभिन्न पदार्थांना (पृथ्वीहून) वेगळेपणा राहणार नाही. तसेच अ-पृथ्वीत्व व अ-भूधरादित्वही राहणार नाही. या पदार्थांना जर परस्परात एकमेकांचे स्वरूप आले तर ते दूर करण्याला कोण समर्थ वा कुशल आहे? अशा रीतीने पृथ्वी आदि प्रमेय म्हणजेच जाणण्यायोग्य वस्तूंचे वेगवेगळे प्रकाशन हे ज्ञान म्हणजे संवित् अर्थात् बुद्धिमय किंवा शक्तिमय आत्मा हाच करू शकतो. ती संवित् प्रमेयाप्रमाणे दुसऱ्याकडून प्रकाशित होते म्हणावे तर तिला व्यर्थत्व येईल,

जडत्व येइल व मोठा दोष निर्माण होऊन अनवस्था प्रसंग निर्माण होईल; कारण या संवित्‌ला प्रकट करण्याला दुसरा प्रकाशक, त्या प्रकाशकाला तिसरा, तिसऱ्याला चौथा असे अनंत प्रकाशक मानावे लागतील. मग कोठे थांबताच येणार नाही. त्यामुळे ती संवित् जात्याच स्वप्रकाश आहे व वेद्य वस्तूप्रमाणे प्रमेय नाही म्हणजेच परप्रकाश्य अर्थात् दुसऱ्याकडून प्रकाशित केली जाणारी नाही. शिवाय या संवित्‌मध्ये कर्तृता म्हणजेच निर्मिती करण्याचे सामर्थ्यही मानले पाहिजे. कर्तृता म्हणजे आत्म्यात विश्रांती घेणे म्हणजेच ज्ञानरूपाने सर्वप्रकाशन करणे होय. ही संवित् सर्व वेद्यवर्गाची आधारभूमी आहे व सर्वाधार म्हणून ती "अहं" रूप आहे. यालाच "**विमर्श**" असे म्हणतात. हेच ईश्वराचे मुख्य अर्थात् प्रधान ऐश्वर्य आहे. त्यामुळेच तो भगवान् व सर्वसहनकर्ता आहे.

या विमर्शाचे स्फुरण आणव, कार्मण व मायिय मलांच्या संघाताला नाहीसे करते म्हणजेच आपल्यात सामावून घेते. त्यापैकी माया म्हणजे सर्व पदार्थ भिन्नरूपाचे आहेत असे ज्ञान होय. तत्संबंधी म्हणजेच मायेशी संबंधित दोष म्हणजे मायिकमल होय. पुण्यपापादि वासनायुक्त कर्माने निर्माण होणारा दोष कार्मणमल होय. अणू म्हणजे "मी पूर्ण आहे," या विचाराच्या अभावाने स्वतःला संकुचित समजणारा जीव होय म्हणजेच "मी पूर्ण व सर्वशक्तिमान् आहे," असा विचार न करता "मी अल्पज्ञ, अल्पशक्तिमान आहे," असे विचार करणारा जीव होय. अनात्मवस्तू आत्मरूप वाटणे व आत्मवस्तूला अनात्मा समजणे हे दोन्ही आणवमल म्हणजे जीवदोष होत. याच आशयाने "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथामध्ये प्रथम उन्मेषातील "**चैतन्यमात्मा।।१।।**" व "**ज्ञानं बन्धः।।२।।**" ही दोन्ही एकमेकाशी जोडल्यावर अ-काराच्या संबंध व असंबंधाने "**चैतन्यमात्माज्ञानं बन्धः।**" असा संधी होऊन "**चैतन्यमात्मा + अज्ञानं बन्धः।।**" असा विग्रह होऊन अज्ञानाने व संकुचित ज्ञानाने बंधप्राप्ती होते असे सांगितले आहे.

या दृष्टीने "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथातही असे म्हटले आहे की -

चैतन्यमात्माज्ञानं बन्ध इत्यत्र सूत्रयोः।
संश्लेषेतरयोगाभ्यामयमर्थः प्रकाशितः।।

अर्थ :- "**चैतन्यमात्माज्ञानं बन्धः।**" या सूत्रांमध्ये संश्लेष म्हणजे "**अ**"चा संबंध घेऊन म्हणजेच "**चैतन्यम् आत्मा**" + "**अज्ञानं बन्धः।।**" असा संधी सोडवून व विश्लेषाने (म्हणजेच "**चैतन्यमात्माज्ञानं बन्धः**"

असा संधी करून) हा अर्थ म्हणजेच ज्ञान हे ही बंधरूप आहे व अज्ञान हेही बंधरूप आहे हा अर्थ मिळतो. अर्थात्च चेतनरहिताला आत्मा मानणे **(ज्ञानं बन्धः)** व आत्मज्ञानच नसणे **(अज्ञानं बन्धः)** या दोन्ही गोष्टी बंधकारकच आहेत.

परमेश्वर हा ज्ञान व क्रिया यांनी युक्त असल्याने प्रकाशस्वभावी व विमर्शस्वभावी आहे. त्याच्या या दोन गुणांपैकी जरी कोणताही एक जाणला नाही तरी तो बंधाला कारणीभूत होतो म्हणजेच हे दोनही गुण जाणले पाहिजेत; कारण आणवमल या दोन गोष्टींच्या अज्ञानामुळे उत्पन्न होतो.

या दृष्टीने "**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

स्वातन्त्र्यहानिर्बोधस्य स्वातन्त्र्यस्याप्यबोधता।
द्विधाणवं मलमिदं स्वस्वरूपापहानितः।।

अर्थ :- स्वस्वरूपाची हानी झाल्यास ज्ञानाचे स्वातंत्र्य नष्ट होते व स्वातंत्र्याचा बोधही होत नाही. या दोन्हीलाही आणव म्हणजे अणू अर्थात् जीवासंबंधी मल अर्थात् दोष असे म्हटले आहे. हा सगळा मलच होय.

"**मलमज्ञानमिच्छन्ति संसाराङ्कुरकारणम्।।**" अर्थात् "संसारोत्पत्तीचे मूलकारण म्हणजे अज्ञानरूप मलच होय" असे "**श्रीमालिनीविजयोत्तरतंत्र**" या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे "आत्मविचाराकडे विन्मुखता अर्थात् आत्मविचाराकडे पाठ फिरवून अनात्म वस्तूंचा विचार करणे" हाच मलाचा अर्थ आहे.

"**श्रीसंविदुल्लास**" या ग्रंथात ईश्वराच्या शक्तीचे वर्णन सदृष्टान्त करताना असे म्हटले आहे की -

औष्ण्यं हुताश इव शीतलिमानमिन्दौ
शय्यासु मार्दवमिवाश्मसु कर्कशत्वम्।
बाह्येषु मोहमिव योगिषु च प्रबोधं
स्वातन्त्र्यमस्ति हि नियन्त्रयितुं महन्मे।।

अर्थ :- ज्याप्रमाणे अग्नीत उष्णता, चंद्रात शीतलता, शय्येत मृदुलता, दगडात कठीणता, बाह्यविषयात मोह व त्या योगिजनात जागृती असते त्याप्रमाणे नियंत्रण करण्यात माझे स्वातंत्र्य अनिर्बंध आहे.

हेच पारमेश्वरी स्वातंत्र्य म्हणजे विवेक किंवा विमर्श होय. त्याचप्रमाणे त्या ग्रंथात पुढे असे म्हटले आहे की -

एकोऽप्यनेकशक्तिर्दृक्क्रिययोश्छादको मलः पुंसाम्।
तुषकम्बुकवद् ज्ञेयस्ताम्राश्रितकालिकावद् वा।।

अर्थ :- केवळ एकच असा आणवमल अनेकशक्तियुक्त आहे; कारण तो आत्मवस्तूच्या ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती या दोघांचा आच्छादक म्हणजेच त्यांच्यावर आवरण घालणारा आहे. ज्याप्रमाणे धान्यावरील कवच किंवा तांबे या धातूवरील काळिमा धान्याला व तांब्याला झाकून टाकतो त्याचप्रमाणे आणवमल ईश्वराच्या ज्ञानशक्ती व क्रियाशक्तींना झाकून टाकतो.

या विवेचनावरून "मल" हे आत्मसंबंधी द्रव्य आहे असे प्रतिपादन करण्याचे खंडन झाले. या मलत्रयाने माखलेले जीव हे मायातत्त्वात गुरफटलेले असतात. देवादिकांच्या ठिकाणी आणव व कार्मण हे दोन मल असतात. आत्म्याच्या ज्ञातृत्व व प्रकाशकत्व या गुणांचा अभाव असल्याने देवादिकांच्या ठिकाणी आणव म्हणजे जीवविषयक मल संभवतो. तसेच काही देवादिकांच्या ठिकाणी मायीयमलही संभवतो; कारण त्यांच्या ठिकाणी प्रमेयभेदज्ञान असते. काही देवांच्या ठिकाणी हे ज्ञान नसते म्हणून त्यांच्या ठिकाणी मायीयमल असत नाही. विज्ञानवादी लोक एकमलयुक्त असतात; कारण त्यांच्यात आत्मविमर्शशून्यता अर्थात् आत्म्याच्या ज्ञानाचा अभाव असतो. विद्वानांना फक्त मायीयमल असतो. मंत्राने मलक्षय होतो म्हणजेच मंत्रामुळे मलक्षय करण्याकडे प्रवृत्ती होते. त्या कामी मंत्रज्ञानी व विद्याज्ञानी अर्थात् श्रीसद्गुरू यांची योजना आहे. त्या दोघांचा म्हणजे मंत्रज्ञानी व विद्याज्ञानी अभिमानी ईश्वर आहे. ज्यांचे आणवादि तीनही मल क्षीण होण्याच्या वाटेवर आहेत त्या साधकभक्तयोगिशिष्यांचे अधिष्ठाते श्रीशिव होत. श्रीशिवतत्त्वाचा आश्रय न घेतल्यास वासनारूप मल शिल्लक राहतो. सर्वदृष्ट्या सर्व मलांचा अभाव म्हणजे भगवान् श्रीपरमशिवभट्टारकच होत. ते प्रमातृश्रेष्ठ आहेत. तीनही मलांचा जर नाश किंवा दाह करावयाचा असेल तर प्रमातृविमर्श हाच एक उपाय आहे. या दृष्टीने शास्त्रात असे म्हटले आहे की -

यथा हि वह्निना लीढमिन्धनं तन्मयं भवेत्।
एवं चिता समालीढं चैत्यं चिन्मयतां व्रजेत्।।

अर्थ :- ज्याप्रमाणे पेटलेले इंधन अग्निरूप होते त्याचप्रमाणे आत्मरूपात अर्थात् चैतन्यात प्रविष्ट झालेले मल इत्यादि सर्व काही चिन्मयच किंवा चैतन्यरूपच होते. या न्यायाने मलत्व जाऊन साधकभक्तयोगिशिष्य आत्मत्वाला पावतात.

या दृष्टीने "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथात असे वचन आहे की, "**ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुतेऽर्जुन।**" अर्थात् "ज्ञानाग्नी हा सर्व कर्मे

नाहीशी करतो."

"**श्रीसंविदुल्लास**" या ग्रंथात मीही हेच प्रतिपादिले आहे की -

वेद्योपरागविभवेन विमोह्यमानं
लोहान्तरव्यतिकरादिव व्यक्तकार्ष्ण्यम्।
ज्वालावलीभिरभितप्य विमर्शवह्निः
स्वच्छं हिरण्यमिव मे हृदयं विधत्ते।।

अर्थ :- वेद्य अशा बाह्य प्रमेयांच्या संसर्गाने मोहित म्हणजेच आक्रांत झालेल्या माझ्या हृदयाला ज्ञानाग्नी हा स्वच्छ व निर्मळ करतो. इतर धात्वादिकांच्या संबंधाने सुवर्णाच्या ठिकाणचा हिणकस किंवा काळेपणा जातोच की!

मलशंकात्याग हाच मलक्षयाचा उपाय आहे. "**श्रीनिशाकुल**" या ग्रंथात या दृष्टीने असे म्हटले आहे की -

स्फटिकोपलगो रेणुः किं तस्य कुरुतां प्रिये।
व्योम्नीव नीलं हि मलं मलशङ्कां ततस्त्यजेत्।।

अर्थ :- स्फटिकावरील धूळ स्फटिकाला धूसर करते काय? आकाशातील नीलिमा मलसंज्ञेला पात्र होईल काय? म्हणून मलशंकाच टाकावी म्हणजे मल नाहीतच असे समजावे.

ज्याप्रमाणे गृहदेवतेपुढे पाजळलेला मंगलदीप घरातील चैत्र व देवदत्तादि मानवांचाही प्रकाशक असतो व इतरही अचेतन स्तंभादि पदार्थांचा प्रकाशक असतो व तो तेवत असतो आणि वातीच्या साहाय्याने सर्व तेल जळून जाते त्याप्रमाणे मलशंकात्यागाने आत्मरूप आपोआपच प्रकाशित होते. येथे रूपक व श्लेष अलंकार आहेत. विषय पटण्यासाठी उपमालंकार व अर्थ आवडावा किंवा कळावा म्हणून ही खटपट आहे हे वेगळे सांगणे नकोच.।।१०।।

*****

गाथा क्रमाङ्क ११

अवतरणिका :- आता प्रस्तुतचे विमर्शरूप आत्म्याचा स्वभावच आहे असे पुढच्या गाथेत ग्रंथकार स्वतःच सांगतात.

संतो हिअअपआसो भवणस्य किआए होइ कत्तारो।
सच्चिअ किआ विमरिसो सोत्था खुहिआ अ वीसवित्थारो।।११।।
(सन् हृदयप्रकाशो भवनस्य क्रियायां भवति कर्ता।
सैव क्रिया विमर्शः स्वस्था क्षुभिता च विश्वविस्तारः।।)

अर्थ :- (स्वात्मरूप) हृदयप्रकाश हाच या भवनक्रिया म्हणजेच

विश्वप्रपंच अर्थात् विश्वविमर्शाचा कर्ता आहे. जोपर्यंत आत्म्यामध्ये हा हृदयप्रकाश स्थिर राहतो तोपर्यंत त्याला शुद्ध आत्मस्वभावरूप विमर्श असे म्हणतात आणि क्षुभित झाल्यावर हाच विश्वविमर्शाचे अर्थात् विश्वविस्ताराचे रूपग्रहण करतो. ।।११।।

विशेष :- कर्तृतामय भवनक्रियेलाच विमर्श असे म्हणतात. जोपर्यंत हा हृदयप्रकाश आत्मस्वरूपयुक्त राहतो तोपर्यंत शुद्ध सत्त्वक्रियात्मक स्थिती राहते. ज्यावेळेला यात विकल्प येतो त्यावेळेला विश्वविस्तार अर्थात् विश्वप्रपंचाचे स्फुरण होते. सत्त्वचिद् अर्थात् सत्त्वयुक्त चैतन्याशी सामरस्य म्हणजेच आनंद होय. हाच सच्चिदानंदस्वरूपाचा अनुभव आहे. सच्चिदानंद-स्वरूप स्वहृदयप्रकाश परमेश्वराचे ज्ञान प्राप्त केले पाहिजे. परमात्म्याने क्रियाकार्यरूपात प्रकट केलेला विश्वव्यवहार आत्मस्वभावविमर्शाचे रूप ग्रहण करू शकत नाही. "स्व-आत्म्यात प्रतिष्ठित हृदयप्रकाशात क्षोभ उत्पन्न झाल्यावरच विश्वप्रपंच अर्थात् विश्वविस्ताराला त्या हृदयप्रकाशाचे कार्य म्हटले जाते." जरी हा विश्वविस्तार हृदयप्रकाशमय आहे तरीही हा शुद्ध सच्चिदानंदस्वरूप हृदयप्रकाश होऊ शकत नाही; कारण हा विश्वविस्तार कार्य आहे, कर्ता तर हृदयप्रकाशरूप परमात्मा आहे. विश्वविमर्श हा आत्म-स्वभावविमर्श होऊ शकत नाही.

परिमलव्याख्यार्थ :- स्वहृदयाचा प्रकाश सर्वांमध्ये असतोच असे म्हणावे लागते; नाही तर स्वतःचे अस्तित्वच धोक्यात येईल. यासंबंधी **"उपनिषदात"** असे म्हटले आहे की -

असन्नेव स भवति असद् ब्रह्मेति वेद चेत्।
अस्ति ब्रह्मेति चेद् वेद सन्तमेनं ततो विदुः।।

अर्थ :- जो ब्रह्म नाही असे समजेल तोच असणार नाही; जो ब्रह्माचे अस्तित्व मानतो तो आहेच. सर्व विद्वान् त्याचे अस्तित्व कबूल करतात.

त्यामुळे आत्माच हृदयप्रकाश होय. **"सन्"** हे प्रकृती व प्रत्ययरूपात विचारणीय आहे. **"अस्ति"** या अस् धातूच्या रूपात शतृ प्रत्यय लागून **"सन्"** रूप होते. **"अस्ति"** चा होण्याची क्रिया असा अर्थ आहे. प्रत्ययाचा अर्थ **"कर्ता"** असा मानला पाहिजे. या रीतीने "असणे" या क्रियेचा कर्ता असा "सन्" चा अर्थ होतो. ती अस्तित्वक्रिया कर्तृरूप म्हणजे विमर्श होय. क्रिया शब्दामुळे अस्तित्व हे सामान्यरूप झाले. यावरून "अस्तित्वाला क्रियारूपता नाही," असे म्हणणाऱ्यांचे खंडन झाले. त्यामुळे "भावः क्रिया"

या न्यायाने धातूचाच अर्थ क्रिया असे मानावे.

या दृष्टीने

अवस्थायुगलं चात्र कार्यकर्तृत्वशब्दितम्।।
तथाहि संविदेवेयमन्तर्बाह्योभयात्मना।
स्वातन्त्र्याद् वर्तमानैव परामर्शस्वरूपिणी।।

अर्थ :- या क्रियेत कार्य व कर्ता येतात. त्याप्रमाणे "संवित्" अर्थात् ज्ञान हे अंतर्बाह्यरूपाने स्वतंत्र व परामर्श रूपाचे आहे. असे "**श्रीस्पंदशास्त्र**" व "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात सांगितल्यामुळे ती क्रिया ज्यावेळेला स्वतःत म्हणजे हृदयप्रकाशरूप आत्म्यात राहते त्यावेळेला तिच्याबद्दल शुद्ध विमर्श असा व्यवहार होतो. तो विमर्श विकल्पयुक्त होतो. त्यापासून प्रपंचस्फुरण-रूप विश्वविस्तार हा औपाधिकपणे उत्पन्न होतो. याचा तात्पर्यार्थ असा आहे की, प्रकाशाचा विमर्श हा स्वभाव मानावा. याच्या उलट अर्थात् जर विरुद्ध स्वभाव मानला तर अप्रकाशत्व येते. त्यावेळेला त्याला म्हणजेच विमर्शाला स्फटिकादिप्रमाणे अल्पप्रकाश व स्तंभादिप्रमाणे अप्रकाश होतो असे म्हणावे लागते. शिवाय "सन्-सत्" यातील जी सत्ता ती चैतन्य म्हणजेच चित् होय. या "सत्-चित्" चे ऐक्य म्हणजेच आनंद होय. "**श्रीरसान्वय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

या चित् सत्तैव सा प्रोक्ता सा सत्तैव चिदुच्यते।
अत्र चित्सत्तयोर्व्याप्तिस्तत्रानन्दो विराजते।।
यत्रानन्दो भवेद्भावे तत्र चित्सत्तयोः स्थितिः।

अर्थ :- जी चित् तीच सत्ता होय आणि जेथे हे दोन्ही अर्थात् सत् व चित्चे ऐक्य आहे तेथे आनंद आहे. जेथे आनंद आहे तेथे सत् व चित् असतात.

एकूण सच्चिदानंदरूप स्वहृदयात्मा परमेश्वरच मानावा; कारण शास्त्रात यासंबंधी असे म्हटले आहे की, "**सच्चित्सुखमयः शम्भुस्त्रिरूपः सर्ववस्तुषु।**" अर्थात् "सर्व वस्तूंमध्ये सत्, चित् व आनंद या तीन रूपांनी श्रीशंकरच भरलेले आहेत."

सारांश -

इत्थमन्तर्बहिर्भाववैचित्र्येऽपि प्रसर्पति।
यौगपद्यमयीं स्वस्य विम्रष्टृत्वमयीं स्थितिम्।।
अनुशील्य जनः स्वच्छामैश्वरीं श्रियमश्नुते।

एवमेतदुपेक्षायां पाशवेन विमुह्यति।।
यथा यथा विजृम्भेत स्वसंरम्भचमत्क्रिया।
तथा तथा विकल्पानां विक्षोभः क्षयमश्नुते।।
कलयापि विमर्शस्य वीर्यवत्ता विपश्चितः।
तन्व्यापि विषकाकिण्या दुर्लङ्घ्यो हि भुजङ्गमः।।

अर्थ :- अशा प्रकारे अंतर्बाह्य वस्तुवैचित्र्य असूनही एकस्वरूपी विमर्शमय स्थितीचे परिशीलन अर्थात् अभ्यास करून मानव स्वच्छ ईश्वरी ऐश्वर्य मिळवितो आणि याची उपेक्षा केल्यास पशुत्वाने मोहित होतो. जशी जशी आत्मज्ञानरूप चमत्कृती वाढेल तसा तसा विकल्पक्षोभ क्षीण होत जाईल. विमर्शाचा लवमात्रही अर्थात् एखादा कणही ज्ञान्याचे सामर्थ्य वाढवितो. थोड्या विषानेही सर्प ज्याप्रमाणे भयंकर होतो त्याचप्रमाणे विमर्शाचे महत्त्व आहे, असा या गाथेचा अर्थ आहे.।।११।।

*****

गाथा क्रमाङ्क १२

अवतरणिका :- जर विश्वव्यवहार हा बहिर्ग्राह्य अर्थात् बाह्य इंद्रियांनी ग्रहण केला जातो तर तो आत्मस्वभावी विमर्शरूप कसा होइल? अशी शंका उत्पन्न झाली असता त्याला ग्रंथकारांनी या गाथेत उत्तर दिले आहे.

पुहुवीपरमसिवाणं पच्चाहारे पआसपरमत्थे।
जो अण्णोण्णविसेसो सो च्चिअ हिअअस्स विमरिसुम्मेसो।।१२।।
(पृथ्वीपरमशिवयोः प्रत्याहारे प्रकाशपरमार्थे।
योऽन्योन्यविशेषः स एव हृदयस्य विमर्शोन्मेषः।।)

अर्थ :- पृथ्वी कार्य आहे व श्रीपरमशिव कारण आहेत. या दोघांच्या मध्ये जो एक-दुसऱ्याहून विशेष अर्थात् तत्त्वसंघातरूप प्रकाश आहे तो हृदयाचा विमर्श अर्थात् उन्मेष आहे.।।१२।।

विशेष :- अंतःस्वात्मप्रकाशच बाहेर प्रकाश्य प्रपंचरूप विश्वविमर्शात अर्थात् विश्ववैचित्र्यविलासात स्फुरित होतो. पृथ्वी व जल इत्यादि संबंधगत व्यवहार हृदयविमर्शोन्मेष अर्थात् हृदयस्थ प्रकाशरूपाने म्हणजे श्रीपरमशिवांनी प्रकाशित होतो. कार्य विश्वव्यवहार आहे आणि त्याचे कारण श्रीपरमशिव कर्ते आहेत. कार्यकारणामध्ये परमेश्वराचेच कर्तृत्व सुचवावयाचे आहे. कार्यवर्ग विश्वविमर्शाचे कारण अजड चेतनच होऊ शकते. अंतःस्थ स्वप्रकाशस्वरूप अर्थात् स्वात्मविमर्शरूप वृक्षाची फुले व पाने किंवा पालवीच विश्ववैचित्र्यविलासरूपातच परिस्फुरित होते. जे काही येथे उत्पन्न झालेले आहे

ते त्याच श्रीपरमशिवांचे रूप आहे.

परिमलव्याख्यार्थ :- विश्वव्यवहाराला कारणीभूत असा सर्व प्रकारचा संबंध कार्य-कारणांमध्ये पर्यवसित होतो. विश्व हे कार्य आणि संबंध हा कारण होय. सर्व कारणांच्या शेवटी मुख्य कारण श्रीपरशिवात्मा होय आणि त्यांनाच कर्ता म्हणूनही स्वीकारले पाहिजे. या दृष्टीने जरी संयोगसमवायादिक, इतरही संबंध आणि इतर काही संयोजक कर्तृरूपे असली तरी ते सारे परमेश्वराच्या इच्छेचेच अनुकरण करणारे असल्यामुळे त्या परमेश्वराचे ते कार्यभूत आहेत. द्रव्य-द्रव्यांचा अन्योन्य संबंध एकरूप असत नाही. द्रव्यगुणांच्या समवायादि संबंधात लौकिक कर्ता दिसत नाही. तेथे परमेश्वर कर्ता मानला पाहिजे. नित्य असा समवायही परमेश्वराचे कर्तृत्व झिडकारीत असतो. उत्पन्न झालेला पदार्थ एक क्षणभर निर्गुण असतो असे नैयायिक मानतात; तर त्या ठिकाणी गुणांचा संयोग व वियोग करण्याचे चातुर्य परमेश्वराचेच आहे असे सिद्ध होते. शिवाय हे संयोग व समवायादिक आपापल्या विषयांवाचून इतरत्र जात नाहीत म्हणजेच त्यांना स्वातंत्र्य नाही असे मानलेच पाहिजे. नाहीतर अतिप्रसंग होईल. विचार केल्यानंतर असे सिद्ध होते की, हे द्रव्यगुणांचे सामर्थ्य नसून वेगळेच तत्त्व पारमेश्वरस्वातंत्र्यरूपाचे आहे आणि हेच आम्ही ओरडून सांगत आहोत. सर्व विश्वविस्तार हा परमेश्वराने केलेला आहे व कार्यरूप आहे हे सर्वसंमत आहे. (ही कार्ये) सामान्यादिक लोकव्यवहारात नित्य असली तरी परमेश्वरापेक्षेने कार्येच आहेत. **"तस्माद्वा वा एतस्मादात्मन आकाश सम्भूतः।"** अर्थात् "आकाश हे नित्य असून परमेश्वराचे कार्य असल्याचे श्रुतिसिद्ध आहे," हे एक उपलक्षण आहे. त्यामुळे सृष्टी व परमेश्वर यांचा कर्म-कर्तृभाव आहे हा तात्त्विक अर्थ होय. जडाला कारणत्व केव्हाच येत नाही. माती व चाक इत्यादि वस्तू असूनही जर कुंभार उदास किंवा आळसावेल तर घटादि कार्ये होणार नाहीत. "बीजापासून अंकुर उत्पन्न होतो," अशा दृष्टान्तावरून जडापासून उत्पत्ती होते असे वाटले तरी आणि येथे कर्ता दिसत नसला तरी अंकुराला त्या प्रकाराने उत्पन्न होण्याची शक्ती नाही; कारण बीजभावात अंकुरास्तित्व असत नाही. या ठिकाणी ती उत्पन्न होण्याची शक्ती बीजाची आहे असे म्हणावे तर वैयधिकरण्याने म्हणजेच अधिकरण वेगळे असल्याने ते जुळत नाही. त्याचबरोबर दुसरे असे की, "ते बीज असलेला अंकुर उत्पन्न करते की त्या बीजात नसलेला अंकुर

उत्पन्न करते? असलेला अंकुर उत्पन्न करते म्हणावे तर यात बीजाचे महत्व ते काय?; कारण पूर्वीपासूनच असलेला अंकुर उत्पन्न करण्याला काहीच महत्त्व नाही. जर नसलेला अंकुर उत्पन्न होतो असे म्हणावे तर एकाच ठिकाणी एक पदार्थ "**अस्ति-नास्ति**" अशा दोन्ही रूपात कसा काय असू शकेल? किंवा मुळातच जे अस्तित्वात नाही ते कसे काय उत्पन्न होऊ शकेल? (ही सत्कार्यवादाची विचारसरणी आहे.) याठिकाणी विरोध मानला तर अतिप्रसंग होईल. त्यामुळे कार्यसमूहाचा कोणी तरी एक चेतन कारण मानला पाहिजे. चेतनत्व म्हणजे कर्तृत्वच होय. जेथे कोठे कुंभार इत्यादींचे कर्तृत्व दिसते तेथेही या दृष्टीने "**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

तथा हि कुम्भकारोऽसावैश्वर्येव व्यवस्थया।
तत्तन्मृदादिसंस्कारक्रमेण जनयेद् घटम्।।

अर्थ :- ईश्वरी व्यवस्थेमुळेच मृत्तिकादि संस्कारक्रमानेच कुंभार घट निर्माण करतो.

उपरोक्त ग्रंथात सांगितलेल्या प्रक्रियेप्रमाणे या ईश्वराच्या स्वातंत्र्य-शक्तीच्या द्वाराच मृत्तिकेपासून घट व तंतूंनी पट उत्पन्न करतात. त्यात कोणीही बदल करू शकत नाही. घटादींच्या अपेक्षने कुंभार हा कर्ता म्हणून अजड म्हणजेच चेतन मानला तरी परमेश्वराच्या अपेक्षेने कुलाल जडच होय; त्यामुळे सर्व संबंधात जो कार्यकारणभाव सांगितला आहे तो योग्यच होय. कारण म्हणजे कर्ताच व इतर कार्य होय. त्यामुळे श्रीपरमशिवांच्या वर दुसरा कोणीही कर्ता नाही व पृथ्वीशिवाय दुसरे कार्य नाही. त्या दोहोत ज्ञात होणारा पृथ्व्यादि तत्त्वसमुदाय हा पदार्थ होय व तत्प्रकाशक परमेश्वराचा स्वभाव (शक्ती) होय. नाही तर डोळे इत्यादि अवयव असूनही ते प्रकाशित होणार नाहीत. "**श्रीनरेश्वरविवेक**" या ग्रंथात "**न प्रथेता-प्रथारूपं नाश्वेतं श्वेतते यथा**" अर्थात् "ज्याप्रमाणे अश्वेत वर्ण श्वेत होणार नाही त्याप्रमाणे अप्रसिद्ध सिद्ध होणार नाही" असे म्हटले आहे. तसेच "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**नह्यप्रकाशरूपस्य प्राकाश्यं वस्तुतापि च**" अर्थात् "अप्रकाशाला वास्तविक प्रकाश नाही." तो अंतःस्थ स्वात्मप्रकाशच बाहेर प्रकाश्य विषयरूपाने स्फुरतो असे मानावे. सव्वीस तत्त्वांनाही प्रकाश हा स्वभावतः समान असल्याने "ही पृथ्वीच पाणी आहे," असा अन्योन्यविशेषत्वाने व्यवहार होत नाही.

लोकात व्यवहार हा प्रत्यक्षत्वाने म्हणजे ही पृथ्वी हे पार्थिव द्रव्य असा होतो. पाणी आणि पृथ्वी एकच असा होत नाही. नाही तर वेगळेपणाला काही अर्थ राहणार नाही. हा विशेष स्वहृदयस्थविमर्शशक्तीमुळे उत्पन्न होतो आणि उत्पत्तीचे पर्यवसान तादात्म्यात म्हणजेच एकरूपतेत होते. याबद्दल शास्त्रात असे म्हटले आहे की, "जे झाले ते तेच होय." "उन्मेष" या पदाने येथे असे सांगितले आहे की, स्वात्मविमर्शरूप वृक्षाचे फूलपानासारखे हे विश्ववैचित्र्याचे स्फुरण आहे. यामुळे पर व अपर प्रमात्याचे प्रकाशविमर्शामुळे अनुजीवन होत असून शेवटी (दोघांचे) तादात्म्य होते असे सांगितले. ते श्रीपरमशिवरूप आहे. या श्रीपरमशिवांचे सांगितलेले स्वातंत्र्य विश्वविलीनतेत अर्थात् संसारसागर तरून जाण्यात पर्यवसित होते. परमस्वातंत्र्यसाम्राज्यरूपी मोक्षात होत नाही. तसा विश्वप्रत्याहार सांप्रत उचित नाही. विश्वाला स्वतःत सामावून घेणे हे विवक्षित नसून विश्वाला स्वतःत खेचून घेणे हे विवक्षित व योग्य आहे.।।१२।।

*****

गाथा क्रमाङ्क १३

अवतरणिका :- आता विमर्शाचे दृढीकरण करण्यासाठी छत्तीस तत्त्वातील अन्योन्य विशेष सृष्टिक्रमानुरूप सांगताना ग्रंथकार आधी श्रीशिव-तत्त्व सांगतात.

तह तह दीसन्ताणं सत्तिसहस्साण एक्कसंघट्टो।
णिअहिअउज्जमरूपो होइ सिवो णाम परमसच्छन्दो।।१३।।
(तथा तथा दृश्यमानानां शक्तिसहस्राणामेकसङ्घट्टः।
निजहृदयोद्यमरूपो भवति शिवो नाम परमस्वच्छन्दः।।)

अर्थ :- अशा प्रकारे (सृष्टिसंहारादि) विभिन्न रूपात दिसणाऱ्या शक्तीच्या हजार-हजार व्यापारांचे ऐक्यच निजहृदय-उद्यमरूप सर्वतंत्र स्वतंत्र श्रीपरमशिव या नावाने (संपूर्ण विश्वप्रपंचात) अभिव्यक्त होते.।।१३।।

विशेष :- इच्छा, ज्ञान आणि क्रिया यांच्या फलस्वरूपाने पृथ्वी इत्यादि समस्त क्रियाशक्तीच्या हजारो-हजारो व्यापारांचे अर्थात् कार्यांचे ऐक्यच श्रीशिवस्वरूपात अभिव्यक्त होते. अशा प्रकारे विश्ववैचित्र्यविलासात म्हणजेच विश्वविमर्शात स्वसंवेद्य अलक्ष्य निरंजनतत्त्वच शक्तिमान् अशा श्रीशिवरूपात प्रकाशित होत असते. श्रीशिवांच्या सर्वशक्तिमत्तेनेच अर्थात् त्यांच्या ठिकाणी स्थित असणाऱ्या सर्व शक्तींमुळेच हा विश्वविमर्श अर्थात् विश्वनिर्मितीचे

कार्य अनुप्राणित होत असते म्हणजेच श्रीशिवांच्या ठिकाणी असणाऱ्या शक्तींमुळेच विश्वाची निर्मिती होते.

परिमलव्याख्यार्थ :- पृथ्वी ते शक्तीपर्यंत हा जो विश्वस्फुरणाचा प्रकार आहे, जो इच्छा, ज्ञान व क्रियारूप म्हणून आहे, जो ज्ञान, स्मरण व अज्ञानरूप म्हणून आहे आणि जो नामरहित व भास या रूपांचा आहे तो सर्व श्रीशिव आहेत. अन्यथा या विश्वातील वेगवेगळ्या स्थानातील पूज्य अशा योगिनी व योगी यांना जाणावयाच्या अर्थात् उपासना करावयाच्या देवतात क्षोभ किंवा गोंधळ निर्माण होईल अर्थात् त्यांना म्हणजे साधक-भक्तयोगिशिष्यांना उपास्य दैवतांचा (कोणाची उपासना करावयाची याचा) निर्णय घेता येणार नाही; कारण त्या प्रत्येक देवतेच्या ठिकाणी एक एक शक्ती अनुभवाला येत असून त्या अनंत असल्याने प्रत्येक शक्तीचा वेगळा अर्थात् व्यक्तिशः विचार करणे कठीण आहे. (आणि त्यामुळे एकाच श्रीशिवांमध्ये किंवा तीन शक्तींमध्ये त्या सर्व शक्तींचा अंतर्भाव केलेला आहे.) इच्छा ही जिज्ञासा, चिकीर्षा इत्यादि भेदांमुळे अनेक प्रकारची आहे. ज्ञान हे स्मृती, अनुभव, संशय व विपर्यय या भेदांमुळे अनेक प्रकारचे आहे. क्रियासुद्धा गमन, आसन, शयन, भोजन व भाषणभेदादि अशा प्रकारांमुळे अनंत प्रकारची आहे. या प्रकारांचे प्रकार पाहिल्यास ते अपरिसंख्य म्हणजेच मोजता न येण्यासारखे असल्याने येथे शक्तिसहस्त्र हा शब्द योजला आहे. त्यांचा असा एक समुदाय कल्पिला आहे की, ज्या समुदायामध्ये उत्पत्ती व विनाशादि परस्परविरुद्ध क्रियाही सामावतात त्या समुदायाला किंवा क्रियांना "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथामध्ये असलेल्या "**उद्यमो भैरवः।**" या सूत्राने अर्थात् "श्रीसद्गुरुकृपेने अर्थात् शक्तिपातयोगदीक्षेने अनादिनिद्रिस्त आत्मचैतन्यशक्ती कुंडलिनी जागृत होऊन सिद्धयोगाचे आतून स्वतः होणारे साधन होऊ देणे हाच उद्यम असून त्यामुळे जागृत कुंडलनी शक्ती इतर सर्व उपशक्तींना आपल्यात समाविष्ट करून घेऊन सुषुम्नागामी झाल्यामुळे अंतिमतः साधकभक्तयोगिशिष्य सहस्रारात श्रीभैरव अर्थात् श्रीशिवरूपच होतो," असे कथन केले आहे. यालाच स्वहृदयउद्योग असे संबोधिले आहे. यालाच स्वच्छंदत्व किंवा स्वातंत्र्य असेही म्हणतात. जो म्हणजे हा स्वहृदयउद्योग उक्त प्रकाराच्या दुसऱ्या अर्थाने म्हणजे सिद्धयोग किंवा शक्तिपातयोगसाधनेने सामरस्याच्या चमत्काराने प्रत्यक्ष होत असल्याने अर्थात् "श्रीशिवशक्तिसामरस्य" साधकाला प्रत्यक्ष अनुभविता

येत असल्याने ते इतर तत्त्वांहून विलक्षण असून तेच सर्वश्रेष्ठ आहे. हे तत्त्व दुसऱ्याच्या तोंडाकडे न पाहणारे अर्थात् अन्यसाहाय्य न इच्छिणारे आहे. इतर प्रकृति-पुरुषादि तत्त्वे अध-ऊर्ध्वभावाने स्वतंत्र आणि परतंत्र आहेत. हे श्रीभैरव अर्थात् श्रीशिव मात्र परमस्वच्छंद आहेत. ते विश्वाच्या पलीकडे असलेले आहेत. दुसरे जे श्रीपरमशिवभट्टारक आहेत ते विश्वोत्तीर्ण व विश्वमय आहेत, हे पुढे प्रकट होईलच. अशा प्रकारे (वर्णन केलेले) हे श्रीशिव आहेत. उन्मेष व निमेषरूप स्वातंत्र्याने (हे स्वातंत्र्य इतर तत्त्वात नाही) चैतन्य आणि आनंद या दोन गुणांनी युक्त होऊन इच्छादि शक्तित्रयाने उन्मुख अर्थात् प्रवृत्त झालेला असा विश्वोत्पन्नतेचा उद्योग करणारे अर्थात् विश्वाच्या निर्मितीचा उद्योग करणारे जे एक विशेषप्रमाता अर्थात् परमात्मा आहेत तेच श्रीशिवभट्टारक होत. या श्रीशिवांबद्दल "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात "**स्वशक्तिप्रचयोस्य विश्वम्।**" अर्थात् "श्रीशिवांच्या स्व-शक्तींचा समूह (हेच) विश्व होय" असे म्हटले आहे.

"**श्रीशिवदृष्टी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

आत्मैव सर्वभावेषु स्फुरन्निर्वृतचिद्विभुः।
अनिरुद्धेच्छाप्रसरः प्रसरद्दृक्क्रियः शिवः।।

अर्थ :- जो सर्व पदार्थांमध्ये स्फुरणारा, चिद्रूप व व्यापक असून ज्याच्या इच्छा व विस्ताराला कोणीही अडथळा आणू शकत नाही आणि जो ज्ञानक्रियाशक्तीचा प्रसारक आहे तो आत्माच श्रीशिव होय.

"**श्रीविज्ञानेंदुकौमुदी**" या ग्रंथातही असेच म्हटले आहे की -

सर्वव्यापकताभूमिर्ज्ञत्वकर्तृत्वसम्मता।
निजाभासचमत्कारमयी शिवदशा स्मृता।।

अर्थ :- सर्वव्यापकतेचा आधार, ज्ञातृत्वकर्तृत्वयुक्त व स्वतःच्या आभासाची चमत्कृतिरूप श्रीशिवदशा आहे.

आतापर्यंत सांगितलेले ऐश्वर्य अर्थात् महिमा स्वरूपसत्तेतच पर्यवसित होतो. "**या चित् सत्तैव सा प्रोक्ता सा सत्तैव चिदुच्यते।** अर्थात् "ती कुंडलिनीरूप चित्सत्ता अर्थात् स्वरूपसत्ता (अस्तित्व) चित्त्वाला म्हणजे श्रीशिवांना सोडून राहत नाही हे पूर्वीच "**या चित्सत्तैव**" यात सांगितले." या स्फुरत्ता महासत्तेचे कार्य नित्य चालू असल्याने "लट्" वर्तमानकालिक प्रयोग केला आहे.।।१३।।

*****

गाथा क्रमाङ्क १४

अवतरणिका :- नंतर क्रमप्राप्त अर्थात् क्रमानुसार ग्रंथकार शक्तितत्त्वाचे विवेचन करतात.

सो च्चिअ वोसं महिउं णाउं काउं च उम्मुहो होंतो।
सक्तिसहावो कहिओ हिअअतिओणमहुमंसलुल्लासो।।१४।।
(स एव विश्वमेषितुं ज्ञातुं कर्तुं चोन्मुखो भवन्।
शक्तिस्वभावः कथितो हृदयत्रिकोणमधुमांसलोल्लासः।।)

अर्थ :- ज्यावेळेला श्रीशिव आपल्या हृदयामध्ये इच्छा, ज्ञान व क्रियारूप त्रिकोणात्मक आह्लादाच्या अर्थात् दिव्य सच्चिदानंदरसाच्या आस्वादनासाठी विश्वाच्या सृजन अर्थात् इच्छा, ज्ञान आणि क्रियेमध्ये उन्मुख होतात त्यावेळेला त्यांना शक्तिमान् व शक्तिस्वभावरूप असे म्हटले जाते.।।१४।।

विशेष :- इच्छा, ज्ञान व क्रियारूपात्मक विश्वविस्तार हे श्रीशिवांच्या निज म्हणजेच अंतरंग शक्तीचे कार्य आहे. आपल्याच शक्तीने श्रीशिव विश्वामध्ये व्याप्त होऊन आपल्या हृदयातील आनंद विश्वामध्ये अभिव्यक्त करून त्याचे अनेक रूपांच्या माध्यमातून रसास्वादन करतात. स्वहृदय-तत्त्वाच्या बहिःस्फुरण अर्थात् बाहेर प्रकट होण्यातच श्रीशिवांच्या उन्मुखतेचा क्रियाशक्तिरूपात व्यवहार केला जातो. अलक्ष्य निरंजन मायोपाधिरहित स्वसंवेद्य श्रीशिवांनाच इच्छा, ज्ञान व क्रियारूप विश्वविमर्शाच्या कार्यामुळे शक्तिमान् असे म्हटले जाते. "**श्रीशिवदृष्टी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

इत्थं शिवो बोधमयः स एव परनिर्वृतिः।
सैव चोन्मुखतां याति स्वेच्छाज्ञानक्रियात्मताम्।।
सैव शाक्तशरीरादिनारकान्तं हि भूतता।

अर्थ :- अशा प्रकारे श्रीशिव हे बोधयुक्त अर्थात् ज्ञानमय असून तेच श्रेष्ठ अशी निर्वृती अर्थात् उत्पादनशक्ती आहेत. ती श्रीशिवरूप शक्तीच स्वेच्छा, ज्ञान व क्रियात्मक अशा उन्मुखतेला प्राप्त होते. तीच उन्मुखता शाक्तशरीरापासून नरकापर्यंतची सृष्टी समजावी.

निःसंशय समस्त भूते, चौदा भुवनादि हे सर्व श्रीशिवांच्या शक्तिमानतेचा विस्तार आहे.

परिमलव्याख्यार्थ :- मागच्या गाथेत वर्णन केलेले श्रीशिव हेच शक्तिरूप आहेत. त्या श्रीशिवांच्या एका विशिष्ट विस्तारलेल्या अवस्थेलाच "शक्ती"

असे नाव आहे. या श्रीशिवतत्त्वाचां स्वभाव पुढीलप्रमाणे आहे.

ते स्वहृदयरूपाने इच्छा, ज्ञान व क्रियात्मक विश्वाच्या त्रिकोणाच्या समरसतेने म्हणजेच इच्छा, ज्ञान व क्रिया या तीनही शक्तींच्या एकत्र येण्याने स्वहृदयात नित्य समुदित अशा आह्लादातिशयाचा अनुभव घेतात अर्थात् श्रीशिवांना अत्यंत आह्लादकारक अर्थात् आनंदकारक अवस्था प्राप्त झालेली असते. त्यांचे हृदय अत्यंत पुष्ट आहे; कारण त्यात भरलेल्या ज्ञानानंदाला प्रज्वलित म्हणजे वृद्धिंगत करणारे मधुद्रव्य अर्थात् मधासारखे द्रव्य त्यांच्या हृदयात आहे. तसेच त्यांचे हृदय पाण्याने काठोकाठ भरलेल्या व फुटू पाहणाऱ्या मोठ्या तलावाप्रमाणे आहे. त्याचप्रमाणे **"बहुस्यां प्रजायेय।"** अर्थात् "मी अनेक रूपांनी प्रकट व्हावे," या वेदोक्तीचे ते अवलंब करणारे आहेत.

या दृष्टीने **"श्रीमत्स्तोत्रावली"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

स्फारयस्यखिलमात्मना स्फुरन् विश्वमामृशसि रूपमामृशन्।
यत् स्वयं निजरसेन घूर्णसे तत् समुल्लसति भावमण्डलम्।।

अर्थ :- ज्यावेळेला तू स्वतःच स्फुरणरूपाने या भावमंडलाचा म्हणजेच विश्वातील पदार्थसमूहाचा विस्तार किंवा प्रकाशन करतोस, जगद्रूपाचा परामर्श घेतोस आणि स्वतः स्वानंदाने घोरतोस त्यावेळेला हे विश्व उदयाला येते व प्रकाशते.

त्याचप्रमाणे **"श्रीशिवदृष्टी"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

गच्छतो निस्तरङ्गस्य जलस्यातितरङ्गिताम्।
आरम्भे दृष्टिमापात्य तदौन्मुख्यं हि गम्यते।।

अर्थ :- संथ व निस्तरंग अशा वाहणाऱ्या जलावर पहिल्यांदा दृष्टिरूप वायूने जे अतिशय तरंग अर्थात् ज्या लहान लहान लाटा येतात तीच उन्मुखता होय.

या उक्तीप्रमाणे ज्यावेळेला श्रीशिव स्वहृदयस्थ तत्त्वाला बाहेर प्रकाशित करण्यासाठी उद्योग करतात अर्थात् उद्युक्त होतात त्यावेळेला त्यांना "शक्ती" असे म्हणतात. त्यांची ही उन्मुखता इच्छा, ज्ञान व क्रिया यांनी होते. पुष्कळ आगमांनी "हे श्रीशिव अशा स्वभावाचे आहेत," असे कंठरवाने सांगितले आहे.

यादृष्टीनेच **"श्रीशिवदृष्टी"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

इत्थं शिवो बोधमयः स एव परनिर्वृतिः।

सैव चोन्मुखतां याति स्वेच्छाज्ञानक्रियात्मताम्।।
सैव शाक्तशरीरादिनारकान्तं हि भूतता।

अर्थ :- या रीतीने श्रीशिव हे बोधमय अर्थात् ज्ञानरूप आहेत. तेच श्रेष्ठ उत्पादनशक्ती आहेत. त्यांची ती स्व-इच्छा, ज्ञान व क्रियारूपाने (विश्वोत्पत्ती करण्याला) उन्मुख होते. ती उन्मुखता म्हणजेच शाक्तशरीरापासून नरकापर्यंतची सृष्टी समजावी.

त्याचप्रमाणे "**श्रीकुलमूलावतार**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

अनादिनिधनाच्छान्ताच्छिवात् परमकारणात्।
इच्छाशक्तिर्विनिष्क्रान्ता ततो ज्ञानं ततः क्रिया।।
इत्यारभ्य,
तयोत्पन्नानि भूतानि भुवनानि चतुर्दश।
वाङ्मयं चैव यत्किञ्चित् तत्सर्वं मातृकोद्भवम्।।

अर्थ :- आदि, अंत, उत्पत्ती व विनाशरहित आणि शांत व परमकारण श्रीशिवांपासून इच्छाशक्ती उत्पन्न झाली व तिच्यापासून ज्ञान आणि त्याच्यापासून क्रिया उगम पावली.

येथपासून सुरुवात करून -

तिच्यापासून प्राणी किंवा महाभूते म्हणजे आकाशादि उत्पन्न झाली. त्यानंतर चौदा भुवने उत्पन्न झाली व जे काही वाङ्मय उदयाला आले ते सर्व मातृकांपासून म्हणजे शक्ती किंवा वर्णांपासून झाले.

येथपर्यंत शक्तीचे वर्णन केले आहे. "**श्रीप्रत्यभिज्ञावृत्ती**" या ग्रंथात असेच वर्णन केले आहे की -

चिद्वपुषः स्वतन्त्रस्य विश्वात्मना स्थातुमिच्छैव जगत् प्रति कारणता कर्तृतारूपा।

अर्थ :- स्वतंत्र व चिद्रूपाला विश्वरूपाने होण्याची इच्छाच अर्थात् शक्तीच या जगताचे कारण व कर्त्री अर्थात् निर्माण करणारी अशी उभयरूपिणी आहे.

"**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथातही यासंबंधी असे म्हटले आहे की -

अकुलस्यास्य देवस्य कुलप्रथनशालिनी।
कौलिकी सा परा शक्तिरवियुक्तो यया प्रभुः।।

अर्थ :- कुलरहित अशा या देवाचे म्हणजे श्रीशिवांचे कुल विस्तृत करणारी अशी कौलिकी नामक श्रेष्ठ शक्ती आहे. तिला सोडून प्रभू वेगळे

राहू शकत नाहीत.

त्याचप्रमाणे या विषयासंबंधी "**श्रीमालिनीविजयोत्तरतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

या सा शक्तिर्जगद्धातुः कथिता समवायिनी।
इच्छात्वं तस्य सा देवी सिसृक्षोः प्रतिपद्यते।।
एवमेतदिति ज्ञेयं नान्यथेति सुनिश्चितम्।
ज्ञापयन्ती जगत्यत्र ज्ञानशक्तिर्निगद्यते।।
एवम्भूतमिदं वस्तु भवत्विति यदा पुनः।
ज्ञात्वा तदैव तद् वस्तु कुर्वन्त्यत्र क्रियोच्यते।।
एवमेषा त्रिरूपापि पुनर्भेदैरनन्तताम्।
अर्थोपाधिवशाद् याति चिन्तामणिरिवेश्वरी।।

अर्थ :- जगद्धारकाची जी शक्ती त्याच्याशी समवायसंबंधाने म्हणजेच त्याच्याशी नित्यसंबंधाने समरस असते ती सृष्टी करण्याची इच्छा असणाऱ्या श्रीशिवांची इच्छाच होते अर्थात् हीच इच्छाशक्ती होय. हे अशा रूपाने जाणावे व वेगळ्या स्वरूपाचे समजू नये, असे सांगणारी "ज्ञानशक्ती" म्हटली जाते. नंतर ही वस्तू अशा तऱ्हेची व्हावी अशा ज्ञानाने ती वस्तू तयार करणारी ती "क्रियाशक्ती" होय. शक्ती अशा प्रकारे तीन रूपांची असून पदार्थांच्या संबंधामुळे प्रकारदृष्ट्या अनंतरूपाची होते. ही ईश्वरशक्ती चिंतामणीप्रमाणे आहे.

त्याचप्रमाणे "**श्रीपरासूक्त**" या ग्रंथामध्येही असे सांगितले आहे की -

कृत्येषु देवि! तव सृष्टिमुखेषु नित्यं
स्वाभाविकेषु विसरत्सु यदुन्मुखत्वम्।
इच्छेति तत् किल निरूपितमागमज्ञै-
र्जानासि येन विदधासि च तं तमर्थम्।।

अर्थ :- हे देवी! तुझ्या उत्पत्त्यादि स्वाभाविक व प्रसरणशील अशा सर्व कार्यांमध्ये तुझी जी प्रवृत्तिरूप उन्मुखता आहे तीच इच्छाशक्ती होय असे आगमवेत्त्यांनी म्हटले आहे. तू त्या उन्मुखतेनेच सर्व जाणतेस आणि जाणलेले करतेस.

त्याचप्रमाणे "**श्रीपूजारहस्यतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

औन्मुख्यमिच्छा ज्ञानं च क्रियेत्येतच्चतुष्टयम्।
स्पन्दनं देवदेवस्य बोधभैरवरूपिणः।।

औदासीन्यप्रहाणेन यदौन्मुख्यं महेशितुः।
तदिदं स्याज्जगत् सर्वमित्यस्मिन् किन्नु युक्तिभिः।।

अर्थ :- उन्मुखता, इच्छा, ज्ञान व क्रिया या चार गोष्टी बोधभैरवस्वरूप देवदेवेश्वरांचे स्पंदन आहे. श्रीमहादेवांचे औदासीन्यत्यागपूर्वक जे उन्मुखत्व तेच हे सारे विश्व अर्थात् जगत्प्रपंच होय. याबद्दल युक्तिप्रयुक्तींचे थोतांड कशासाठी? अर्थात् याबद्दल कोणत्याही युक्त्यांची गरजच नाही, हा याचा भावार्थ किंवा इत्यर्थ आहे.।।१४।।

******

गाथा क्रमाङ्क १५

अवतरणिका :- यानंतर श्रीसदाशिव आणि श्रीईश्वर यांचा विचार ग्रंथकार या गाथेत करतात.

णाणं किअत्ति दोण्ण वि पढमुम्मेसम्मि सइसिवो देवो।
वीआए उल्लेहे वीओ सो होइ ईसरो णाम।।१५।।
(ज्ञानं क्रियेति द्वयोरपि प्रथमोन्मेषे सदाशिवो देवः।
द्वितीयाया उल्लेखे द्वितीयः स भवतीश्वरो नाम।।)

अर्थ :- ज्ञान आणि क्रिया या दोन्हींमधल्या प्रथम म्हणजे ज्ञानाच्या उन्मेषामध्ये आपल्यामध्ये पूर्ण अहम् रूपामध्ये परमात्मा "श्रीसदाशिव" या नावाने समलंकृत होतो आणि दुसऱ्या क्रियेच्या स्फुरणामध्ये अर्थात् क्रीडा-व्यवहारादींच्या स्फुरणाच्या उल्लेखामध्ये लीलाभूमीत तो परमात्मा श्रीईश्वर या नावाने ओळखला जातो किंवा त्याला श्रीईश्वर असे म्हणतात.।।१५।।

विशेष :- परमात्मा ज्ञानाच्या अर्थात् अहंतत्त्वाच्या भूमीवर श्रीसदाशिव या नावाने अस्पष्ट राहतो. तो क्रियाभूमीवर विश्वप्रपंच किंवा विश्वविमर्श-रूप कार्याच्या "कर्त्याच्या" रूपात श्रीईश्वर या नावाने (परम ऐश्वर्ययुक्त म्हणून) ओळखला जातो. तो परमात्मा क्रियाशक्तीमध्ये "श्रीईश्वर" या नावाने व्यक्त होऊन विश्ववैचित्र्यविलासाचा अर्थात् विश्वातील विविधतेचा अधिष्ठाता अर्थात् आधार बनतो. अहंस्वरूपज्ञानाच्या स्तरावर तो श्रीसदाशिव या नावाने अव्यक्त असतो. उन्मेष व निमेषरूप परमेश्वराचे परमस्वातंत्र्य सांगणारे हे स्पंदतत्त्व आहे. बाह्य उन्मेषामध्ये परमेश्वर श्रीईश्वर नाव धारण करतो आणि शेवटी अंतःनिमेषात त्याला श्रीसदाशिव असे म्हणतात.

परिमलव्याख्यार्थ :- ज्ञान म्हणजे अहंभावाच्या अवभासनाने अर्थात् प्रकाशाने युक्त असा सर्व प्राण्यांचा स्वसंवेदनसिद्ध स्वभाव होय. याची

जाणीव स्वतःला अर्थात् प्रत्येकाला असून तो सर्वांचा स्वभावधर्मच आहे. क्रिया ही हात व पाय आदि इंद्रियसंबंधी व प्रत्यक्ष होणारी म्हणजेच दिसणारी असते. "जाणतो" "करतो" इत्यादींप्रमाणे "जाणतोस", 'करतोस" इत्यादींमध्येही "आरसा पाहणे" या न्यायानुसार "अहम्" शब्दच "युष्मद्" (त्वम्-तू) इत्यादि अर्थरूपाने आहे. तसेच चैत्र नामक एखादा मनुष्य दुसऱ्या एखाद्या मोठ्या मनुष्याला वंदन करताना असे म्हणतो की, "हा चैत्र आपणाला वंदन करतो," असे व्यवधानाचा पडदा ठेवून बोलण्यात अर्थतः "प्रथमपुरुष"च प्रतीत होतो; त्यामुळे "अहंता"च आत्मतत्त्व होय.

या दृष्टीने शास्त्रात असे म्हटले आहे की -

अस्तिशेषा क्रिया सर्वा कर्तृशेषं च कारकम्।
एकशेषं च वचनं पुरुषश्चोत्तमावधिः।।

अर्थ :- सर्व क्रिया "आहे" यात अंतर्भूत आहेत, सर्व कारक "कर्त्यात," सर्व वचने "एक वचनात" व सर्व पुरुष "उत्तम" म्हणजे "प्रथम" पुरुषात सामावतात.

या वरील उक्तीप्रमाणे "ज्ञान"चा अर्थ "अहम्" होय म्हणजेच अहंता होय. याप्रमाणे "करतोस, करतो" यांचाही "करोमि" "मी करतो" यातच परमार्थदृष्ट्या अंतर्भाव असल्याने "अहं" भावात सर्व "कर्ता व क्रिया" येतात. (सर्व गोष्टी) केवळ "हे" अशा रूपाने अनुभवाला येत असल्यामुळे "भेद" व्यवहार भासतो. सारांश, ज्ञान व क्रिया या दोहोत पहिल्या "ज्ञाना"चा उद्रेक होत असताना व "क्रिया" थोडी अस्पष्ट असताना "श्रीसदाशिव" नामक तत्त्व म्हणावे. कोणी याची उपासना श्रीविष्णू व श्रीरुद्रादिरूपाने करतात. हाच देव ज्ञानदृष्टीच्या उत्कटतेमुळे व क्रियेच्या न्यूनत्वामुळे क्रीडादि अनेक अर्थानुसंधानात समर्थ आहे. या श्रीसदाशिवतत्त्वाला "प्रकाशमान" असे म्हटले आहे. याचे कारण विश्वोत्पत्यादि आत्मशक्तीहून तो वेगळा नाही, हे दाखविण्यासाठीच होय. श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांनी असे म्हटलेच आहे की -

श्रीमत्सदाशिवोदारप्रारम्भं वसुधान्तकम्।
यदन्तर्भाति तत्त्वानां चक्रं तं संस्तुमः शिवम्।।

अर्थ :- श्रीसदाशिवांपासून ते पृथ्वी अखेर जे काही भासणारे तत्त्वांचे चक्र अर्थात् समुदाय आहे त्या श्रीशिवांचे आम्ही स्तवन करतो.

श्रीशिव व शक्ती हे मुख्यवृत्तीने येथे सांगितल्या नसून श्रीसदाशिव व

श्रीईश्वरादि अनेक ककारतत्त्वांच्या दृष्टीने औपचारिक आहेत. तरी पण तत्त्वांच्या छत्तीस या संख्येला बाध येत नाही. क्रिया म्हणजेच स्फुरण याचे आधिक्य व ज्ञानाचे न्यूनत्व असताना "श्रीईश्वर" अशी संज्ञा आहे. तो अधिष्ठाता म्हणून विश्वाचा प्रमाता आहे. याचा सारांश असा आहे की, अहंता व इदंतारूप ज्ञान व क्रियेचे प्रथमोद्रेकाचे अस्पष्ट चित्र म्हणून व्यक्ता-व्यक्तमय विश्वप्रमाता म्हणून श्रीसदाशिव हे तत्त्व व या उलट क्रियाशक्तीच्या उत्कटतेमुळे व्यक्तविश्वाचा धारक म्हणून श्रीईश्वर हे तत्त्व होय. उन्मेष व निमेष हे परमेश्वराचे अतिश्रेष्ठ स्वतंत्र असे स्पंदत्व आहे. अहंतोन्मेषसमयी इदंतेचा निमेष होतो व इदंतेच्या उन्मेषाच्या वेळेला अहंतेचा निमेष होतो. इदंतेला श्रीईश्वर व अहंतेला श्रीसदाशिव म्हणावे. असे "**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथात सांगितले आहे. ही दोन नावे इतर आगमातही प्रसिद्ध आहेत. श्रीईश्वरतत्त्व हे जरी श्रीसदाशिवतत्त्वाहून वेगळे वाटले तरी सर्वतत्त्वसमुदायात अहंतेची अनुस्यूतता तरतमभावाने अर्थात् कमी व अधिक प्रमाणात आहे हे लक्षात ठेवावे. "**ईश्वरो बहिरुन्मेषो निमेषोऽन्तः सदाशिवः।।**" व "**बहिर्भावपरत्वे तु परतः पारमेश्वरम्**" अर्थात् "बाह्य उन्मेषात श्रीईश्वर आणि अंतरुन्मेषात श्रीसदाशिव" व "बहिर्भावसृष्टी यात परमईश्वरतत्त्व श्रेष्ठ आहे" असे "**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथात म्हटले आहे. "**अहंता**" ही श्रीशिवशक्तिरूप आहे हे या गाथेत पूर्ण उपादान अर्थात् कारणरूपाने सांगितले आहे.।।१५।।

*****

गाथा क्रमाङ्क १६

अवतरणिका :- या गाथेत ग्रंथकारांनी शुद्ध विद्या सांगितलेली आहे.

णाआरो सो अप्पा णेअसहावो अ लोअववहारो।
एक्करसं संघाडिं जत्थ गआ सा खु णित्थुसा विज्जा।।१६।।
(ज्ञाता स आत्मा ज्ञेयस्वभावश्च लोकव्यवहारः।
एकरसां संसृष्टिं यत्र गतौ सा खलु निस्तुषा विद्या।।)

अर्थ :- आत्मा अर्थात् परमात्मा हाच ज्ञाता आहे आणि हा विश्वविलास किंवा लोकव्यवहारच ज्ञेय आहे. ज्ञाता आणि ज्ञेय यांची सामरस्यरूप एकरसात्मक सृष्टी, अभिन्नता अथवा अभेदता हीच शुद्ध विद्या आहे. या एकरससंसृष्टीमध्ये परमात्मा आणि लोकव्यवहार अभिन्न आहेत.।।१६।।

विशेष :- ज्ञातारूप परमात्मा आणि ज्ञेयस्वभाव लोकव्यवहाराची

एकरस सर्वाभिव्यक्ती अर्थात् सर्वव्यापकता हीच अलखनिरंजन परमेश्वराची स्वरूपसत्ता आहे. शुद्ध स्वरूपज्ञान सांगणारी विद्या पारमेश्वरी विद्या आहे. श्रीशिवशक्तीची श्रीसदाशिवतारूपिणी तत्त्वदशा हीच शुद्ध विद्या आहे.

ज्ञाता म्हणजेच ज्याचा धर्म ज्ञातृत्व आहे अर्थात् पूर्णाहंभावयुक्त आत्माच परमेश्वर आहे. लोकव्यवहाराचा अर्थात् प्रपंचाचा प्रसारच ज्ञेय म्हणजे जाणण्याची गोष्ट आहे. ज्ञाता व ज्ञेय यांच्या प्रतीतीच्या सामरस्याच्या प्राप्तीमध्ये शुद्ध विद्या म्हणजेच सर्वव्यापक परमात्मभावाची स्थिती आहे. लोकव्यवहाररूप प्रपंचाच्या आवरणांनी रहित होणे म्हणजेच शुद्ध आत्मस्वरूपाची अनुभूती आहे. तीच शुद्ध विद्या आहे. चिदात्मक सामरस्याच्या अनुभूतीमध्ये भेद उत्पन्न करणारी बुद्धीच अशुद्ध आहे. शुद्ध विद्येनेच या भेदाचा नाश होतो. चिदात्मक एकरस सृष्टीमध्ये व्यतिरेक उत्पन्न करणारी बुद्धीच अशुद्ध आहे आणि जी बुद्धी भेदाला नष्ट करणारी व आवरणरहित करणारी आहे तीच बुद्धी शुद्ध होय. हीच ज्ञानस्वरूपिणी परमात्मशक्ती अथवा शुद्ध विद्या आहे.

परिमलव्याख्यार्थ :- ज्ञाता असून अहंभावाशी विभिन्न असा आत्मा हाच परमेश्वर आहे. त्याच्याच चिच्छक्तीने अस्तित्वात आलेला लोकव्यवहार हा स्फुरणामुळे म्हणजेच प्रकट होण्यामुळे प्रपंचरूपात अतिविस्तारला आहे. यात ग्राह्य व अग्राह्य अशी क्रिया होते. आत्मा व सृष्टी हे दोन्हीही ज्ञानानुभवाने एकच आहेत व एकमेकांशी समरस झालेले आहेत असे जे ज्ञान होते ती शुद्ध विद्या होय. ही संसृष्टी एकरस आहे. यांचे रूप अभिन्न आहे; कारण अन्य तत्त्वांमध्ये हे रहस्य सांगितलेले नाही; कारण **"सामानाधिकरण्यं च सद्विद्याहमिदन्धियोः।"** अर्थात् "अहंबुद्धी व इदंबुद्धी यांचे सामानाधिकरण्य अर्थात् एकाच आधारावर राहणे किंवा जाणणे ही सद्विद्या होय." असे शास्त्रात वर्णन आहे.

त्याचप्रमाणे आमच्या श्रीसद्गुरूंनी **"श्रीमातंगीस्तोत्र"** यामध्ये असे म्हटले आहे की -

स्तनौ घनौ पूर्णसुधौ सुकान्ती तवेशि! नन्दामि परस्पराभौ।
स्थितौ समानाधिकृतौ सुविद्ये! समौ तवैवाहमिदम्प्रकाशौ।।

अर्थ :- हे देवी! तुझे स्तन अमृतपूरित, कांतियुक्त, परस्परांना शोभाप्रद, पुष्ट आणि एकाच अधिकरणावर अर्थात् वक्षःस्थलावर आहेत म्हणून ते "अहम् व इदम्"चे समान प्रकाशक आहेत. त्यामुळे हे सुविद्ये देवी! ते अर्थात् ते दोन स्तन सुविद्यारूप आहेत हे पाहून मला आनंद होतो.

माया ही प्रमातृवर्गात प्रमात्याला "अहम्" या शब्दाने व प्रमेयाला "इदम्" या शब्दाने वर्णिली जाते. तेथे अधिकरण वेगळे आहे हे योग्य आहे. येथे तसे नाही; कारण सामानाधिकरण्य हे एकरसशब्दाने येथे वर्णिले आहे. तिच्या अर्थात् जीवरूप झालेल्या कुंडलिनी शक्तीच्या शुद्धी विषयी असे म्हटले आहे की, "बाह्यत्वाने भासणाऱ्या वेद्य वर्गाला म्हणजेच सर्व वस्तूला (जे) अहंरूपाने लोकोत्तर व स्वाभाविक शरीर अर्थात् स्थान असे समजणे हेच विद्येचे निर्मलत्व आहे. याच "अहम्" चा व्यवहारात "इदम्" मध्ये पालट होतो म्हणजेच हा "अहम्" लौकिक व्यवहारात "इदम्" असा केला जातो अर्थात् अहंरूप विश्वालाच लोक "इदम्" समजतात. ती इदंता टाकून मूलरूपात दिसणे ही उत्कृष्टता होय.

या अर्थानेच "**श्रीपर्यंतपंचाशिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

शुद्धिर्बहिष्कृतार्थानां स्वाहन्तायां निमज्जनम्

अर्थ :- बाह्य अशा अर्थांना स्व-अहंतेत बुडविणे हीच शुद्धी होय.

यादृष्टीनेच "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

चिदात्मकेष्वप्येतेषु या बुद्धिर्व्यतिरेकिणी।
सैवाशुद्धिः परा प्रोक्ता शुद्धिस्तद्धीविमर्दनम्।।

अर्थ :- हे सर्व पदार्थ चिदात्मक असताना जी विपर्यय बुद्धी होते व "हे पदार्थ चिदात्मक नाहीत" असे वाटते ती अशुद्धी होय व अशी बुद्धी नष्ट करणे ही श्रेष्ठ शुद्धी होय.

या विद्येच्या शुद्धीबद्दल काहींचे वेगळे प्रतिपादन आहे. श्रीसदाशिवादि-तत्त्वामध्ये "अहम्" व "इदम्"चे ऐक्य साधणारी जी संवित् आहे, त्या संवित्मध्ये जरी सामानाधिकरण्याने ऐक्य असले तरी मायिक म्हणजेच मायेसंबंधी "इदम्" या अंशाचे स्फुरण वर्जनीय नाही आणि श्रीसदाशिवादि तत्त्वांना माया माहीत नाही. त्यामुळे मायीयदोष टाकून हा इदंतांश "अहम्"चा एक अंश म्हणून (या बुद्धीमुळे) मानला जातो. जर या इदंतेचे अस्तित्व मानलेच नाही तर सामानाधिकरण्यच नष्ट होईल; कारण सामानाधिकरण्य हे दोन वस्तूंशिवाय शक्य नाही. याचा सारांश असा आहे की, भगवान् श्रीपरमशिवांची श्रीसदाशिवादींवर जशी अनुग्रह करण्याची इच्छा आहे तशीच इच्छा काही अज्ञान्यांविषयी असल्याने त्यांची अशुद्धी घालवून स्व-रूपाची ओळख करविणारी संवित्ची स्वातंत्र्यशक्ती हीच शुद्धविद्या होय. तिच्या आश्रयानेच रुद्र, अग्नी व केवलज्ञानी असे प्रमातृवैचित्र्य दिसून येते. "अहम्"

मधून वेगळा काढलेला "इदम्" भाव अगदी वेगळ्या अधिकाराचा होतो. ती शक्ती पुढीलप्रमाणे उत्कृष्ट आहे. डाकिनी व शाकिन्यादि शरीरगत व रक्तादिधातुगत देवता, त्यांच्या पूजादिक्रियायुक्त सिद्धिलाभाचे उपाय, शांभवशाक्तादि दीक्षाप्रकार व जाग्रदादि अवस्थाभेद हे सारे या संवित्चीच विभूती म्हणून मानल्या जातात. "यत्र" म्हणजेच "संवित्" मध्ये असा अर्थ होय.।।१६।।

*****

गाथा क्रमाङ्क १७

अवतरणिका :- मागील गाथेत शुद्धविद्येचे विवरण झाल्यानंतर ग्रंथकारांनी आता "माया" तत्वाचे विवरण या गाथेत केलेले आहे.

एअरसम्मि सहावे उब्भावेंती विअप्पसिप्पाइं।
माएत्ति लोअवइणो परमसअन्तस्स मोहणी सत्ती।।१७।।
(एकरसे स्वभावे उद्भावयन्ती विकल्पशिल्पानि।
मायेति लोकपतेः परमस्वतन्त्रस्य मोहनी शक्तिः।।)

अर्थ :- श्रीईश्वर परम स्वतंत्र आहे. विश्ववैचित्र्यविलासही त्याचीच अभिव्यक्ती आहे अर्थात् हा सर्व विश्वप्रपंच त्याच्यापासूनच प्रकट झाला आहे किंवा होतो. लोकपतिरूपाने विद्यमान असलेल्या एकरस स्वभावाच्या परमेश्वराची माया नावाची मोहिनी शक्ती म्हणजे विमुग्ध अर्थात् भ्रमात टाकणारी किंवा भ्रमित करणारी शक्ती अनेक प्रकारांची विश्वरूपे म्हणजे लोकरूप विकल्पशिल्प अर्थात् विश्ववैचित्र्य शिल्प प्रकाशित करीत असते.।।१७।।

विशेष :- मुक्त पुरुषाला बद्ध करणाऱ्या किंवा बंधनात पाडणाऱ्या आणि बद्ध पुरुषाला मुक्त करणाऱ्या अर्थात् मुक्त हा बद्ध आहे व बद्ध हा मुक्त आहे अशा तऱ्हेने विमोहित करणाऱ्या शक्तीलाच माया असे म्हणतात. परमात्मा विश्वप्रपंचाचा श्रीईश्वर असल्याने त्याला लोकपती असे म्हणतात. तो परमस्वतंत्र आहे. त्याच्या स्वतंत्रतेची पराकाष्ठा म्हणजे ही मायाशक्ती होय. ईश्वर स्वसंविदानंदस्वरूप सच्चिदानंद आहे. त्याच्याच ज्ञानमय व आनंदमय सत्तेचा सर्वत्र विलास आहे. त्यामुळे त्याचा एकरसस्वभाव आहे असे म्हणतात. त्याच्या स्वतंत्र इच्छेची पराकाष्ठा असणारी मायाच विश्वाला अनेक रूपांमध्ये प्रकाशित किंवा प्रकट करीत असते. हा सर्व विश्वप्रपंच एकरस स्वभावाच्या परमेश्वर अर्थात् लोकपतीच्या मायेचेच कार्य आहे.

परिमलव्याख्यार्थ :- परमेश्वराचा एक विशिष्ट विश्वस्फुरणात्मक, महाअस्तित्वरूप आणि युक्तीने विचार केल्यास एकरस असा एक भाव स्वज्ञानानंदाच्या परिस्पंदाचे सौंदर्यच ज्याचे सार आहे असा आहे. तेथे नानाविध विकल्परूप शंका नाहीत व भेदही नाहीत. असे असूनही त्या पारमेश्वरभावावरच स्थिर-चर, घट-पट व चैत्र-मैत्रादि पदार्थांची कल्पना होते. ज्याप्रमाणे सुवर्णावर नानाविध दागिन्यांचा आभास होतो त्याप्रमाणे हे कल्पित पदार्थ पाहून मूल वस्तू अज्ञात तर राहतेच शिवाय कल्पित वस्तू खऱ्या वाटतात व मूळ सुवर्णादि खोटे वाटते. परमेश्वरी भावावर मुक्त व बद्धाचे जे व्यत्यासाने म्हणजे वेगळेपणाने ज्ञान होते ते मायाशक्तीमुळे होते; कारण हा ईश्वर परमस्वतंत्र आहे आणि हीच त्याच्या स्वातंत्र्योत्कर्षाची परिसीमा आहे की, त्याच्याकडे स्वात्मावभासाने अर्थात् स्वआत्म्याच्या प्रकाशाने अद्वैतरूप अशा जगतावर अनेक भेदवैचित्र्य दाखविण्याचे कौशल्य आहे. त्यामुळे न घडणाऱ्या गोष्टी तो घडवितो असा त्याचा लौकिक आहे. त्यामुळे तो लोकपती आहे. तो शरीरइंद्रियादियुक्त विश्वविस्ताराचा ईश्वर आहे. माया नसेल तर भेदज्ञानाने उत्पन्न होणाऱ्या प्रपंचाचा अभाव होईल. जर प्रपंचच नसेल तर प्रपंचविरोधी अशा परमैश्वर्याची उपपत्ती लागणार नाही व कोणतीही गोष्ट व्यक्तरूपतेला येणारी नाही. त्यामुळे ही माया म्हणजे परमेश्वराचे सर्वोच्च स्वातंत्र्य होय.

आमच्या श्रीगुरुदेवांनी "**श्रीमनोनुशासन**" स्तोत्रामध्ये हेच सांगितले आहे की -

स्वातन्त्र्यापरपर्यायमायाजाड्यविलापनात्।
विलीय चिद्रसीभूतं विश्वानन्दमुपास्महे।।

अर्थ :- स्वातंत्र्य हे जिचे दुसरे नाव आहे अशा मायेचे जाड्य घालवून व लीन होऊन आम्ही चिद्रसरूप विश्वानंदाची उपासना करतो.

तसेच "**श्रीपरमार्थसंग्रह**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

परमं यत् स्वातन्त्र्यं दुर्घटसम्पादनं महेशस्य।
देवी मायाशक्तिः स्वात्मावरणं शिवस्यैतत्।।

अर्थ :- श्रीमहेशांचे दुर्घट गोष्टी करण्याचे जे परमस्वातंत्र्य आहे तीच दिव्य मायाशक्ती होय. ती श्रीशिवांचे आत्मरूप झाकणारे पांघरूण आहे.

"**श्रीशचीमत**" या ग्रंथात असे वर्णन आहे की -

स्वातन्त्र्यशक्तिर्मेऽसि त्वमतिदुर्घटकारिणी।

मायेति कीर्त्यसे देवि! भर्तुर्मे वैश्वरूप्यदा।।

अर्थ :- तू माझी स्वांतत्र्यशक्ती आहेस. तू अघटित (कार्य) करणारी आहेस. तू "माया" या नावाने प्रसिद्ध होशील. तू अस्मत्स्वामीला विश्वरूप बहाल करणारी आहेस.

"**श्रीमत्स्तोत्रावली**" या ग्रंथातही यासंबंधी असेच म्हटले आहे की -

न च विभिन्नमसृज्यत किञ्चिदस्त्यथ सुखेतरदत्र विनिर्मितम्।
अथ च दुःखि च भेदि च सर्वथाऽप्यसमविस्मयधाम नमोऽस्तु ते।।

अर्थ :- तुझ्या विषम विस्मयकर तेजाला आमचे नमस्कार असोत. तू सर्व दुःखमयच निर्मिले आहेस. त्यावाचून वेगळे सुख असे काही नाही. सर्व भिन्नरूपत्वामुळे दुःखदायक आहे.

"**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

तस्य स्वतन्त्रभावोऽयं किं किं यत्र विचित्रयेत्

अर्थ :- याचा स्वतंत्रपणा काय काय अघटित करील याचा नेम नाही.

या मायेमुळेच श्रीविष्णू, श्रीसूर्यादिकांना प्रमातृत्व व प्रलयावधी अस्तित्व आले आहे. जरी "**वाय्वग्निसलिलेन्द्राणां धारणानां चतुष्टयम्।**" अर्थात् "या सृष्टीचे वायू, अग्नी, जल व इंद्र हे चार धारक अर्थात् स्तंभ आहेत," या "**श्रीत्रिंशिकाशास्त्र**" या ग्रंथाच्या दृष्टीने मायेच्या कला व विद्यादि अंशाने (वायू आदि चार वस्तूंचा) अंतर्भाव करणे व त्यांना प्रकट करणे उचित असले तरी "**कालाग्निमादितः कृत्वा मायान्तं ब्रह्मदेहगम्**" अर्थात् "कालाग्नीला प्रथमत्व देऊन ब्रह्मदेवाच्या शरीरात शेवटी माया सांगितली आहे." येथे श्रीपराबीजप्रथमांश म्हणून जे उद्धृत केले आहे ते केवळ अभिव्यक्तर्थ अर्थात् प्रकट होण्यासाठी वेगळे करून सांगितले आहे.

ज्यामुळे विश्वस्वभावाची एकरसता होते तो भेदवाद अपवादरूप कसा आहे? अशी शंका व्यक्त केली असता त्याच्यावर ग्रंथकार असे उत्तर देतात की, हा भेद म्हणजे तरी काय आहे? हा भेद अन्योन्याभाव किंवा वैधर्म्य म्हणजे धर्मभिन्नत्व किंवा तो स्वभावच आहे का? भेद म्हणजे अन्योन्याभाव असे म्हणाल तर ते बरोबर नाही; कारण अन्योन्याभाव हा दोघातील उपाधींच्या अपेक्षेनेच उत्पन्न होतो. ज्याप्रमाणे स्तंभ हा कुंभ होत नाही आणि कुंभ हा स्तंभ होत नाही त्याप्रमाणेच हे आहे. अन्योन्याभाव हा दोन गोष्टींचा वेगळेपणा दाखविण्याची इच्छा असल्यास उत्पन्न होतो. तो वेगळेपणा पदार्थांचा स्वभाव आहे का भेददर्शक उपाधी आहे? प्रथमतः जर हा भेद स्वभाव

मानला तर एकत्वाने युक्त अशा वस्तूतही भेद राहील. जर अन्योन्याभाव म्हणजे उपाधी आहे असे म्हटले तर तेही होणार नाही; कारण उपाधी ही अन्यत्व भेद असला तरच उत्पन्न होते किंवा जुळते. येथे भेद तर अजून सिद्ध झाला नाही. त्यामुळे आत्माश्रय किंवा अन्योन्याश्रय दोष येईल. दुसरे वैधर्म्य म्हणजे स्तंभत्व किंवा कुंभत्वरूप हे दोन पदार्थ होत. तेव्हा स्तंभामध्ये स्तंभत्व व कुंभामध्ये कुंभत्व जर नियत म्हणजे निश्चिततत्वाने असेल तर भेद शक्य आहे; परंतु तेथे नियामक कोणीही दिसत नाही. जर (स्तंभाची) काष्ठमयता व (कुंभाची) गोल वगैरे आकृती नियामक आहे असे म्हणाल तर त्या गोष्टी विशिष्ट किंवा असाधारण असल्याने अनुभवाला येत नाहीत. तसा अनुभव स्तंभादींमध्ये भेद असेल तरच येईल. मग भेद हा साध्य असल्याने पूर्ववत् आत्माश्रयादि दोष येतात. शिवाय काष्ठमयत्वादींचा भेद म्हणजेच वेगळेपणाही त्या त्या वैधर्म्याने युक्त असल्यामुळे परमाणूपर्यंत पाहू गेल्यास मूलपर्यंत विपर्यास अर्थात् विरोध करणारी अनवस्था प्राप्त होईल. तिसरे (कारण) अन्योन्याभाव म्हणजे स्वभावही नाही; कारण स्तंभादिकांचे स्वरूप हे "स्व" म्हणजे इतरांच्या स्वभावाशी संबंध नसलेले असे म्हणावे लागेल. नाहीतर पदार्थांच्या स्वभावात संकर होईल म्हणजेच पदार्थांचे स्वभाव एकमेकात मिसळले जातील. स्तंभादिकांचा स्वेतर म्हणजे स्वहून भिन्न असलेल्या पदार्थांशी असंबंध कोणत्या कारणाने आहे याचा विचार केल्यास त्याचे उत्तर "भेद असल्यामुळे" हेच योग्य ठरते. (स्तंभ आणि कुंभ यांच्यात वेगळेपणा असल्यामुळेच स्तंभ हा स्व व इतरपदार्थाहून म्हणजे कुंभाहून वेगळा आहे अर्थात् त्यांच्यात असंबंध आहे.) परंतु भेद तर अजून संशयितच आहे (हा पूर्वीचाच दोष आला.) जर स्वरूप हाच पदार्थांमधील भेद (वेगळेपणा) म्हटला तर (शिंपल्यावर) ही चांदी (आहे) अशा भ्रमाला थारा उरणार नाही; कारण शिंपल्याच्या रूपाला महत्त्व आहे व त्यावर चांदीचा अध्यास होतो. जरी अख्यातिवाद अर्थात् अज्ञान किंवा अभाव मानला तरी भ्रमज्ञानाचा अपलाप होईल; पण भ्रमामुळे झालेल्या व्यवहाराचा अपलाप होणार नाही हे मानले पाहिजे. शिवाय पदार्थात भासणारा हा भेद त्या त्या पदार्थांहून स्वतः भिन्न आहे का नाही? जर तो भेद स्वतःहून भिन्न नसेल तर तो अभेदच ठरेल. जर भेद भिन्न असेल तर तो कशाप्रकारे भिन्न असेल याचा विचार करताना अनेक भेदपरंपरांच्या स्वीकाराने अनवस्था प्रसंग येतो. हा भेद प्रकृतीने स्वभावतःच भिन्न असलेल्या (पदार्थांचा) असतो की अभिन्न अशा (पदार्थांचा)

ही असतो. जर भिन्न (पदार्थांचा) भेद अर्थात् वेगळेपणा असेल तर आगंतुक भेद कशासाठी घ्यावयाचा; ? कारण कृतकारित्व म्हणजे केलेलेच करणे हा दोष तेथे येतो. अभिन्न (पदार्थांचा) भेद म्हणावा तर "व्याघात दोष" स्पष्ट आहे. (अभिन्न पदार्थांमध्ये भिन्नत्व आहे असे म्हणणे किंवा "मला जीभ नाही" असे म्हणणे हे असंबद्ध भाषणच आहे.) शिवाय याही गोष्टीचा विचार केला पाहिजे की, स्तंभाहून (खांबाहून) कुंभ (घट) वेगळा आहे, अशा प्रकारचाच भेद व्यवहार आहे किंवा होतो. येथे भेद दाखविण्यासाठी "स्तंभ व कुंभ" यांच्यात एकत्व आहे असे समजले पाहिजे. त्यामुळे या दोन्हींमधील तत्त्वतः अभेदच प्रकट होतो. येथे हा त्यांच्याहून वेगळा आहे हे दाखविताना असे म्हटले आहे की -

इदमस्मादिह पृथगिति बहिरङ्गुल्यभिनयक्रियाकल्पः।
अन्तर्गतस्वभावस्तात्त्विकमनयोरभेदमाचष्टे।।

अर्थ :- येथे हा याच्यापासून वेगळा आहे," असे म्हणताना जी बोटांनी निर्देशित करण्याची अभिनय क्रिया होते ती क्रिया म्हणजे एक आंतरिक स्वभाव "पदार्थभेद" स्पष्ट आहे असे सांगते. (त्यामुळे) हा अभेद तात्त्विक आहे असे सांगतात.

इत्यादि स्थितीमुळे वस्तुभेदस्वभावामुळे अभेदच स्थिर होतो. येथे एक प्रयोग किंवा तर्क असा आहे की, जे प्रकाशते ते एकप्रकाशयुक्त आहे; कारण त्याचा स्वभावच प्रकाश आहे. "अहम्"च्या ज्ञानाप्रमाणेच ते प्रकाशमान आहे. या बाबतीत उपाधित्यागादि वचनांचा विचार हा ग्रंथगौरव म्हणजेच ग्रंथाचा विस्तार होईल म्हणून केला नाही. त्याचप्रमाणे भेदवादासाठी कितीही प्रयास केले तरी भेद सिद्धच होत नाही. त्यामुळे तो (भेदवाद) व्यर्थ आहे. मग स्तंभ आणि कुंभ यांच्यामध्ये असंकीर्ण अर्थात् एकमेकात न मिसळलेला म्हणजेच स्तंभ आणि कुंभ हे वेगवेगळे आहेत असा व्यवहार कसा काय आहे? असा प्रश्न उपस्थित झाला असता त्याचे उत्तर असे आहे की, भेद आणि अभेदांच्या मर्यादेमुळे हा व्यवहार होतो असे आम्ही म्हणतो. पारमेश्वरप्रकाश हा त्याच्या स्वतंत्रत्वामुळे अर्थात् स्वातंत्र्यामुळे सर्व विश्वविस्तारात निर्विशेषपणे म्हणजे भेदरहित अर्थात् सामान्यपणे प्रकट होतो. सागरतरंगन्यायाने स्तंभकुंभादि पृथक् व्यवहाराची उपपत्ती जमते. मग अशाने भेदवाद येईल असे म्हणाल तर त्याचे उत्तर "नाही" असे आहे. सागरतरंगन्यायाने स्तंभकुंभादि पृथक् व्यवहाराची उपपत्ती

जमते. मग येथे अंशरूप भेदवाद येईल असे म्हणाल तर तसे नाही. शुद्ध असा भेद तशा अपवादाला अधिष्ठान आहे. येथे तर अभेदाचे प्रतिपादन हेच सौभाग्य असल्याने क्षारसिंधूतील उदक हे (एका थेंबावरून) ज्याप्रमाणे क्षाररूपच म्हणजे खारटच असते त्याप्रमाणे हा भेदही दोषयुक्ततेनेच राहतो. जो विभागाला कारण (असा) विश्वाचा भेद आहे तो वेगळेपणाच्या उपाधीमुळे नाही असे जे आम्ही म्हणतो, त्यापैकी दुसऱ्यामुळे अर्थात् पृथकत्व उपाधीमुळे अभेदाशी विरोध आहे. येथे अशी शंका आहे की, अहो! जर भेदाच्या संबंधामुळे अभेदामध्येही दोष येतो असे म्हणाल तर त्याचे उत्तर असे आहे की, प्रकृती ही विकृतीवर अनुग्रह करते, हा न्याय आहे. अभेद ही प्रकृती आहे आणि भेद ही विकृती आहे; कारण भिन्न पदार्थांमध्येही विशिष्ट असे ऐक्य आहेच, तोच अभेद होय. त्यामुळे विश्वविस्ताराचा खरा स्वभाव अभेद आहे. याविषयी कोणतीही अनुपपत्ती नाही अर्थात् विस्ताराचा स्वभाव अभेद आहे हे सिद्ध होते; कारण याविषयी "**एकमेवाद्वितीयं ब्रह्म।**" अर्थात् "एक अद्वितीय ब्रह्मच आहे," व "**नेह नानास्ति किञ्चन।**" अर्थात् "येथे नानात्व असे यत्किंचितही नाही," अशा अनंत श्रुती आहेत. हा भेद-अभेद विषय मोठा क्लिष्ट, खंडित व उलटणारा आहे असे म्हणशील तर, "वा! ठीक झाले, पूर्वीचे आठवले तुला," अशा प्रकारे अतिदुर्घट कार्याची उलाढाल करणारी परमेश्वराची माया नावाची एक अतिशय मोठी शक्ती आहे हे मानले. यावरून अद्वैतच सर्व सिद्धान्ताचे सार किंवा साररूप सिद्धान्त आहे असे सिद्ध होते. ते अद्वैत म्हणजेच निःसीम श्रेष्ठ अवस्था होय. भेदाभेद हा व्यवहार चालविणारा विश्वाचा आणि विश्वोत्तीर्णाचा संबंधस्वभाव म्हणजेच परापरावस्था होय. "भेद" ही अपरावस्था विश्वोत्तीर्ण परमेश्वराच्या प्रकाशांशामुळे उत्पन्न झालेल्या कोवळ्या पल्लवांसारखी विश्ववैचित्र्याने युक्त मंडपाचा भ्रम उत्पन्न करणारी होय. परावस्था, परापरावस्था व अपरावस्था या तिन्हींमध्ये क्रमशः सुप्रबुद्ध, प्रबुद्ध व अप्रबुद्ध असे योगितारतम्य आहे. या तीनही प्रकाशात परमेश्वर अनुस्यूत असल्याने अर्थात् ओवलेला, गुंफलेला किंवा भरलेला असल्याने कोणत्याही प्रकारचे वैलक्षण्य म्हणजेच विलक्षणपणा किंवा निराळेपणा नाही. त्यामुळे बुद्धिवान् अशा श्रेष्ठ विद्वानांना ग्राह्य असलेला असा आमचा पक्ष आहे.

"**श्रीपर्यंतपंचाशिका**" या ग्रंथात यासंबंधी असे म्हटले आहे की -

अनन्तैतावदाकारस्वीकारेऽप्येकलक्षणाम्।
तां स्वसंविदमाविश्य विकल्पान्न विकल्पयेत्।।

अर्थ :- अनंत व अनेक आकार स्वीकरूनही एकजिनसी असलेल्या या आत्मसंवित्‌विषयी विकल्पांची कल्पना करू नये.

ही संवित्‌च उपासना करणाऱ्या जनांच्या अपेक्षेने त्या त्या देवतांच्या रूपात आराधिली जाते.

"**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात याबद्दल असे म्हटले आहे की -

परा चन्द्रसमप्रख्या रक्ता देवी परापरा।
अपरा सा परा काली भीषणा चण्डयोगिनी।।

अर्थ :- परा (देवता) शक्ती ही चंद्रासारखी, परापरा शक्ती ही रक्तवर्णाची आणि अपरा शक्ती ही कृष्णवर्णा, चंडयोगिनी व भयंकर आहे.

अशा प्रकारे मायास्वरूप परामर्श अर्थात् मायारूप विचार हीच जीवन्मुक्ती होय असे उपनिषत्प्रमाण आहे.।।१७।।

*****

गाथा क्रमाङ्क १८

अवतरणिका :- यानंतर मायाविभूतीने युक्त कलादि पंचकांची ग्रंथकार अर्थप्रमाणाने या गाथेत परीक्षा करतात.

सब्वअरो सब्वण्णो पुण्णो णिञ्चो असंकुअंतो अ।
विवरीओ व्व महेशो जाहिं ता होंति पंच सत्तीओ।।१८।।
(सर्वकरः सर्वज्ञ पूर्णो नित्योऽसङ्कुचञ्श्च।
विपरीत इव महेशो याभिस्ता भवन्ति पञ्च शक्तयः।।)

अर्थ :- परमात्मा हा श्रीपरमशिव, सर्वकर अर्थात् सर्वकर्ता, सर्वज्ञ, पूर्ण, नित्य आणि संकोचरहित अर्थात् सर्वतंत्र स्वतंत्र आहे. तो स्वभावतःच विश्वाचा कर्ता आहे, ज्ञाता आहे, सर्वतंत्र पूर्ण म्हणजेच स्वात्मतृप्त आहे, अकाल म्हणजे नित्य आहे व संकोचशून्य आहे. असे झाल्यावर ज्या शक्तींच्या द्वारा (किंचित् कर्तृत्वादिधर्मांने युक्त झाल्यामुळे) तो विपरीत दिसतो त्या पाच शक्ती आहेत. (राग, कला, विद्या, नियती आणि काल या त्या पाच शक्ती आहेत.)

विशेष :- "**श्रीक्रमोदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

रागो माया कलाऽविद्या नियतिः काल एव च।
पञ्चवृत्त्याश्रयाः सर्वे पाशाश्चेति प्रकीर्तिताः।।

अर्थ :- राग, माया, कला, अविद्या व नियती या पाच वृत्तींचा आश्रय घेतलेले सर्व पाश म्हणून प्रसिद्ध आहेत.

राग म्हणजे शब्दादि विषयांची आसक्ती होय. कला किंचित् कर्तृत्त्वाचा हेतू आहे. अविद्या किंचिद्ज्ञानाचे कारण आहे. काल म्हणजेच भाव व अभावांचा द्योतक क्रम आहे. "हे माझे आहे, हे माझे नाही," हीच नियती आहे. या पाच शक्तींमुळेच परमेश्वरामध्ये कर्तेपणाचा बोध होतो अन्यथा त्या शक्तींच्या अभावी तो आपल्या नितांत परमेश्वरी ऐश्वर्यात राहून पाषाणा-प्रमाणे निष्क्रिय असतो.

परिमलव्याख्यार्थ :- परमेश्वर हा तर स्वभावतःच विश्वाचा कर्ता व ज्ञाता आहे. त्यामुळेच तो स्वतंत्र आहे. या स्वातंत्र्यामुळेच तो पूर्ण आणि स्वात्मतृप्त आहे; कारण त्याला कोणापासून काहीही मागावयाचे नाही. आपल्या व्यतिरिक्त स्वावच्छेदक म्हणजेच "स्व"ला आवरण घालणाऱ्या कोणत्यातरी भावाचा असंभव म्हणजे तो भाव किंवा वस्तू अस्तित्वातच नसल्याने तो परमेश्वर प्रागभाव म्हणजेच उत्पत्ती होण्याच्या आधीचा अभाव आणि प्रध्वंसाभाव म्हणजेच नष्ट झाल्यानंतरचा अभाव यांच्या पलीकडे असल्याने तो नित्य आहे. (जी वस्तू अनित्य अर्थात् उत्पन्न होणारी असते तिच्याबाबतीतच हे दोन्ही प्रागभाव व प्रध्वंसाभाव संभवतात; पण जी गोष्ट नित्य अर्थात् कधीच उत्पन्न न होणारी आहे तिच्या बाबतीत उत्पत्तीपूर्वीचा अभावही नसणार आणि नष्ट झाल्यानंतरचा अभावही नसणारच.) त्यामुळे त्याला नियंत्रित करणारा नियंत्रक नाही. अशा प्रकारे असूनही ज्या बंधन करणाऱ्या शक्तींमुळे तो परमेश्वर विपरीत म्हणजेच किंचित् कर्तृत्वादि धर्मांनी युक्त असल्याप्रमाणे भासतो त्या पाच शक्ती आहेत.

त्यांचे म्हणजे उपरोक्त पाच शक्तींचे वर्णन करताना "**श्रीक्रमोदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

रागो माया कलाऽविद्या नियतिः काल एव च।
पञ्चवृत्त्याश्रयाः सर्वे पाशाश्चेति प्रकीर्तिताः।।

अर्थ :- राग, माया, कला, अविद्या आणि नियती हे पंचवृत्तींचा आश्रय करणारे सर्व पाश म्हणून सांगितले आहेत.

त्यांपैकी कला म्हणजे कर्तृत्वाचे कारण, अविद्या म्हणजे अल्पज्ञत्वाचे कारण, राग म्हणजे शब्दादिविषयांची आसक्ती, काल म्हणजे पदार्थांचे प्रकाशन व अप्रकाशन करण्याचा क्रम, नियती म्हणजे "हे माझे आहे" वा "माझे नाही"

अशा मर्यादेचे कारण होय. या पाचांना आगमात .कंचुक अशी संज्ञा आहे; कारण या पाच गोष्टी स्व-रूपाला झाकून टाकतात. जर या आवरणशक्ती दूर झाल्या अथवा त्यांचा अभाव असेल तर मानवही परमेश्वराप्रमाणे प्रकट ज्ञानशक्तीने युक्त असा होईल किंवा पाषाणाप्रमाणे अत्यैश्वर्यात बुडालेला असा होईल. यामध्ये राग, माया, अविद्या, कला व काल हे क्रमाने मानवाला वर-खाली जाऊ न देता त्रिशंकूप्रमाणे मध्येच ताटकळत ठेवण्याच्या कामी पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाशरूपाने उपयुक्त होतात. यावरून या शक्तीत धारण करण्याचे सामर्थ्य आहे हे सांगितले. यासंबंधी "**श्रीत्रिंशिकाशास्त्र**" या ग्रंथात "**वाय्वग्निसलिलेन्द्राणां धारणानां चतुष्टयम्**" अर्थात् "वायू, वह्नी, पाणी व इंद्र हे चार धारक आहेत" असे वर्णन आहे.।।१८।।

❋❋❋❋❋

गाथा क्रमाङ्क १९

अवतरणिका :- आता या गाथेत ग्रंथकार पुरुषस्वभावावर प्रकाश टाकतात.

जो एस वोसणाडअसेलूसो सुड्ढसंविओ संभू।
वण्णअपरिग्गहमई तस्स दसा कापि परुषो होइ।।१९।।
(य एष विश्वनाटकशैलूषः शुद्धसंविच्छम्भुः।
वर्णकपरिग्रहमयी तस्य दशा कापि पुरुषो भवति।।)

अर्थ :- परमस्वतंत्र ज्ञानस्वरूप श्रीशंभू हेच या विश्वनाटकाचे म्हणजेच विश्वप्रपंचाचे नट किंवा सूत्रधार आहेत. ज्याप्रमाणे भिन्न प्रकारच्या वेशभूषा धारण करून नट नाटकाचे कार्यान्वयन करतो त्याचप्रमाणे विभिन्न शक्ति-रूपामध्ये कंचुकित म्हणजे झाकलेल्या परमात्म्याची विश्वनाटकाभिनयोन्मुख अर्थात् विश्व उत्पन्न करण्याच्या नाट्याभिनयासाठी उत्सुक अशी भूमिका आहे. ते पुरुषाच्या अर्थात् श्रीशिवसूत्रधाराच्या रूपात किंवा दशेत अभिव्यक्त होतात.।।१९।।

विशेष :- ज्याप्रमाणे विविध वर्णक अर्थात् नाट्य वेषभूषा धारण करणारा सूत्रधार नाटकाचा अभिनय करण्यासाठी तयारच असतो त्याचप्रमाणे या विश्वप्रपंचरूप नाटकाचे सूत्रधार परमात्माच पुरुष अर्थात् श्रीशिव आहेत. हे विश्व व पृथ्वी इत्यादि श्रीशिवतत्त्वसंदोहात्मक अर्थात् श्रीशिवतत्त्वाच्या समूहाने युक्त आहे. या विश्वात श्रीशिवरूपपुरुषच आपले पौरुष दाखवितात. ते महानट आहेत. शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध इत्यादि असणारी अवस्था

ही श्रृंगार व करुणरसादियुक्त पौरुषाचा परिणाम आहे. श्रीशिवच या देह, प्राण व बुद्धी असणाऱ्या त्रिपुरामध्ये पुरुषरूपाने ज्ञाता, कर्ता आणि भोक्ता असूनही विश्वनाटकाचे सूत्रधार आहेत. याबद्दल अशी एक श्रुती आहे की, "**तेनेदं पूर्ण पुरुषेण सर्वम्।**" अर्थात् "त्या पूर्ण पुरुषामुळेच हे सर्व "झाले आहे." या त्रिपुरात अहंकारपूर्वक आत्मा निवास करतो. या त्रिपुराचा अंत करणारे श्रीशिवच आहेत. समस्त विश्वाला मोहित करीत असूनही ते कोणाकडूनही व्यामोहित होत नसल्याने म्हणजेच कोणाकडूनही व्याकुळ होत नसल्याने तेच विश्वनाटकाचे सूत्रधार किंवा महानट असे म्हणविले जातात. विश्वनाटकशैलूषरूपात ते परम स्वतंत्र आहेत. ते सर्वनियामक आणि सर्व-संचालक परमात्मा आहेत.

परिमलव्याख्यार्थ :- परमेश्वर हा तर "अहम्" मीच सर्व आहे असे विश्वात्मत्वाच्या अनुभवाने युक्त, संकोचकलंकादिशक्तिरहित व स्वस्वातंत्र्य-ज्ञानाने युक्त अशा स्व-संवित् चा म्हणजेच बुद्धीचा अनुभव घेणारा आहे. यामुळे तो विश्वरूपनाटकाचा नट म्हणविला जातो. "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात "**नर्तक आत्मा।**" अर्थात् "(ज्याला स्व-स्वरूपाचा विमर्श प्राप्त झाला आहे) असा आत्मा हा (विश्वमंचावरील) नर्तकच असतो," असे याबद्दल प्रमाणभूत वचनही आहे.

या दृष्टीनेच "**श्रीनैश्वास**" नामक ग्रंथात यासंबंधी असे म्हटले आहे की -

त्वमेकांशेनान्तरात्मा नर्तकः कोशरक्षिता।

अर्थ :- तू एकांशाने अंतरात्मा, नर्तक व कोशरक्षक आहेस.

विश्व हे पृथ्वीपासून ते श्रीशिवांपर्यंतच्या तत्त्वसमूहांनी युक्त आहे. या दृष्टीने शास्त्रात असे म्हटले आहे की -

जननशैशवयौवनवार्द्धकव्ययमयैरखिलैरपि सन्धिभिः।
अभिनयन्नपि पौरुषनाटकं परिणतौ स शिवोऽस्मि महानटः।।

अर्थ :- उत्पत्ती, बाल्य, तारुण्य, वार्धक्य व क्षयादि सर्वभूमिका करून पौरुषनाटक अर्थात् नाटकाचा अभिनय करणारा मी श्रीशिव म्हणजे एक मोठा नटच आहे.

या उक्तीप्रमाणे सृष्टी आदि पाच अवस्थांनी युक्त हे विश्व आरंभप्रयत्नादि अवस्थापंचकात्मक अशा नाटकाचे अनुकरण करणारे आहे.

या अर्थानेच श्रीभट्टनारायणांनी असे म्हटलेच आहे की -

निसृष्टानेकसद्वीजगर्भं त्रैलोक्यनाटकम्।
प्रस्ताव्य हर! संहर्तुं त्वत्तः कोऽन्यः कविः क्षमः।।

अर्थ :- उत्पत्त्यादि अनेक सद्वीजगर्भ असे त्रिभुवनरूप नाटक मांडून पुन्हा त्याचा उपसंहार करणाऱ्या, हे श्रीशंकरा! तुझ्यासारखा दुसरा कोण सर्वत्र (क्रांतदर्शी) समर्थ आहे? कोणीही नाही.

ते श्रीशंभू म्हणजे प्रेक्षकांच्या नेत्रश्रोत्रादिइंद्रियांना श्रृंगारकरुणादि नवरसयुक्त स्पर्शसुखादि अनुभवरूपसुख ज्यांच्यामुळे होते असे आहेत. त्यांचीच नाट्याभिनयाकडे प्रवृत्तिरूपी जी भूमिका तीच "पुरुष" होय.

"**श्रीसारशास्त्र**" या ग्रंथात यासंबंधी असे म्हटले आहे की -

स्वयं बध्नाति देवेशः स्वयं चैव विमुह्यति।
स्वयं भोक्ता स्वयं ज्ञाता स्वयं चैवोपलक्षयेत्।।

अर्थ :- हे देवेश अर्थात् श्रीशिव हे स्वतःच बद्ध होतात. ते स्वतःच मोहित होतात. भोक्ता, ज्ञाता वगैरे त्यांची उपलक्षणेच आहेत.

या भूमिकेला अनुरूपच या शरीरात (नाट्यरूप) क्रिया घडत असते. उच्छ्वास व निःश्वासादि कामे करणारा प्राण, ग्राह्य व त्याज्यादि कामे करणारा व्यान, शरीरादि पोषण करणारा समान, धात्वादिकांच्या गतीवर देखरेख करणारा उदान आणि मलमूत्रादि विसर्जनाचे काम करणारा अपान असे नाटक सदैव चालू असते. ज्याप्रमाणे "**असौ शक्तिपाताद्यभावात् कुम्भकारस्यापि घटकरणे सर्वशक्तिशिवात्मता, तदपरिज्ञानात् तु कुम्भकारतेत्यर्थः**" या न्यायाने "या पुरुषनटात शक्तिपातादि नसल्याने, घट करण्याचे ज्ञान असलेला कुंभकार जसा खरा कुंभार म्हणवितो व ज्ञानाभावी तो नावाचाच कुंभार असतो," त्याप्रमाणेच पारमेश्वरज्ञान नसल्याने तो नावाचा नट व पुरुष होय. तरीपण वेदादिकातून त्यालाच परमेश्वर म्हटले असल्याने ते मान्य करावेच लागेल. तसेच परमेश्वराचा हाच असाधारण स्वभाव आहे की, तो नेहमी सृष्ट्यादिपंचकर्मे करीत राहतो. (ही पंचकर्मे म्हणजे सृष्टी, स्थिती, संहार, निग्रह किंवा अनाख्या व किंवा भासा म्हणजे प्रकाश अथवा अनुग्रह ही होत.) याचा विचार पुढे होईलच. हा असा पारमेश्वर गुण मानला नाहीतर मायावेदान्तातून निर्णीत आत्म्याला स्वस्फुरणरूप गुण नाही असे खोटेपण येईल.

हा पुरुष "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात पुढे सांगितल्याप्रमाणे आहे.

किन्तु दुर्घटकारित्वात् स्वाच्छन्द्यान्निर्मलादसौ।
स्वात्मप्रच्छादनक्रीडापण्डितः परमेश्वरः।।

अर्थ :- हा परमेश्वर दुर्घट असे कर्म करणारा, स्वतंत्र आणि निर्मल असल्याने स्वतःला झाकून ठेवण्याच्या खेळात कुशल असा आहे.

असा असूनही हा पुरुष मायावलंबनाने परमेश्वराप्रमाणे सृष्ट्यादि पंच-कर्मेही करतो. तरीपण त्याच्या संविद्रूपाला बाध येत नाही. सुषुप्त्यादि अवस्थांतही पुढील जागृतीच्या अनुसंधानाने लोकयात्रेला करणीभूत असे सूक्ष्म (तत्त्व) मानले पाहिजे. इतर अवस्थात संवित्‌चे तारतम्य असणे हाच भेद होय.

या दृष्टीने "**श्रीस्पंदशास्त्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

जाग्रदादिविभेदेऽपि तदभिन्ने प्रसर्पति।
निवर्तते निजान्नैव स्वभावादुपलब्धृतः।।

अर्थ :- जागृदादि अवस्थाभेदातही अभेदरूपात तो उदित असतो; कारण तो ज्ञाता असल्याने ज्ञातृत्वाच्या स्व-स्वभावापासून किंचित्‌ही दूर जात नाही.

हे पुढच्या "**जोई जाअरसिविणअ**" या गाथेत स्पष्ट होईल. संवित्-स्वातंत्र्यसंपन्न असा परमेश्वर ज्यावेळेला स्तंभादि दर्शनोन्मुख अर्थात स्तंभ इत्यादि गोष्टींचे दर्शन घेण्यासाठी उत्सुक होतो त्यावेळेला स्तंभादि सृष्टी होते व याच रीतीने कुंभादि वैलक्षण्यदर्शनाने म्हणजे कुंभ या स्तंभाहून निराळा आहे अशा दर्शनाने कुंभादि सृष्टी होते. जोपर्यंत ती दर्शनोन्मुखता थोडावेळ राहते तोपर्यंतच स्थिती म्हणजे स्तंभादि असतात. पदार्थांना त्या त्या रूपात धारण करणे किंवा ठेवणे याला स्थिती असे म्हणतात. ज्यावेळेला परमेश्वर कुंभादि पदार्थांहून इतर पदार्थांमध्ये प्रवेश करण्यासाठी तयार असतो त्यावेळेला स्तंभाचा संहार होतो आणि कुंभाची सृष्टी होते. ज्यावेळेला परत स्तंभाचा त्याग आणि कुंभामध्ये प्रवेश यांच्यामधली जी अवस्था असते त्या स्थितीला परमेश्वराची "तुरीय अवस्था" असे म्हणतात; कारण त्यावेळेला ज्ञेय स्तंभकुंभादि पदार्थांचा संबंध नसतो व त्यामुळे ती अवस्था शुद्धसंविद्रूप असते.

यासंबंधी मीच "**श्रीकोमलवल्लीस्तव**" या ग्रंथात असे म्हटले आहे की-

ज्ञातमेकमवमुच्य चेतसो भावमन्यमवगाढुमिच्छतः।
अन्तरालभुवमम्ब! लम्बिनीमामनन्ति तव तत्त्वमद्वयम्।।

अर्थ :- हे माते! एका पदार्थाचा त्याग करून दुसऱ्या पदार्थात प्रवेश करण्याची इच्छा करणारी चित्ताची जी अंतरालिक अर्थात् लंबमान अवस्था आहे त्याला सर्व ज्ञानी लोक तुझे अद्वयतत्त्व असे म्हणतात.

अशा रीतीने वरती जिचे वर्णन केले आहे ती सृष्टी आदि सर्व क्रियांमध्ये

असलेली आणि त्या सर्व क्रियांना ओलांडून जाण्याला समर्थ असलेली स्वात्मगत अर्थात् आत्मरूपात सामावलेली संवित्शक्ती आहे किंवा स्तंभाचे अनुसंधान होत असताना ज्यावेळेला स्तंभावर जोर दिला जातो त्यावेळेला त्या स्तंभाचा लाकडीपणा इत्यादि ज्ञान नष्ट होते म्हणजेच लाकडीपणा इत्यादींकडे लक्ष जात नाही. ज्यावेळेला लाकडीपणा इत्यादींचे ज्ञान होत असते त्यावेळेला स्तंभत्वाचे ज्ञान नष्ट होते. अशा प्रकारे एकीकडे (एखाद्या पदार्थाची) सृष्टी आणि त्याच बरोबर दुसरीकडे (त्या उत्पन्न झालेल्या पदार्थाचा) संहार अशा प्रकारची व्यवस्था लक्षात येते. स्तंभत्व आणि काष्ठमयत्व या दोनही गोष्टींचे एकत्रपणे ज्यावेळेला ज्ञान होत असते त्यावेळेला "स्थिती" समजावी; कारण ते दोनही अनुभव प्रत्यक्ष असतात, त्यांचे तिरोधान झालेले नसते. ज्यावेळेला स्तंभादि सर्वच काहीही शेष न राहता विलीन होते त्यावेळेला (त्या अवस्थेला) अनाख्या असे म्हणतात. ज्यावेळेला स्वात्मस्फुरत्तेचा अनुभव येतो त्यावेळेला त्याला "भास" (प्रकाश) असे म्हणतात; अशा प्रकारे सृष्ट्यादि प्रकार पाहावा. याच उदाहरणात ज्यावेळेला तो परमेश्वर स्तंभाला ठराविक देशकालाच्या आकारात पाहतो त्यावेळेला भासांशाने तो स्रष्टा (उत्पन्नकर्ता) होतो. ज्यावेळेला त्या ठराविक देशकालाच्या आकारात स्तंभ नसतो त्यावेळेला परमेश्वर आभासांशाने संहारकर्ता असतो. अभेदाचे अवलोकन करीत असताना म्हणजे अभेदाचा अनुभव घेत असताना तुरीय-अनुभवितृत्व अर्थात् परमेश्वर तुरीयेचा अनुभव करणारा होतो आणि प्रकाशाच्या एक-रूपतेने एकदम पाहण्यात त्या परमेश्वराला अनुग्राहकत्व येते. अशा रीतीने जरी सृष्टिकार्यात रस घेतला नाही तरी एकाचवेळी सृष्ट्यादि पंचकृत्ये करण्याचे ऐश्वर्य किंवा प्रभुत्व, सामर्थ्य अगर नियामकत्व परमेश्वराला आहेच. त्यामुळेच संकुचित स्वभावाचा असूनही परमेश्वर तत्त्वदृष्ट्या विकसित झालेला असल्याने त्याला "पुरुष" असे म्हटले जाते. याला प्रमाण **"तेनेदं पूर्णं पुरुषेण सर्वम्"** अर्थात् "त्या पुरुषाने हे सर्व भरलेले आहे, अशी श्रुतीही आहे." **"श्रीचिद्गगनचंद्रिका"** या ग्रंथातही याबद्दल असे म्हटलेले आहे की, **"पूरणात् पुरुषतामुपेयुषि।"** अर्थात् "(हे शक्ती! तू) पूरणता या गुणामुळे पुरुषतेला (उपाधीला) प्राप्त होणारी आहेस." परमेश्वराच्या पंचकृत्यांपैकी सृष्टी, स्थिती आणि संहार यांच्यामध्ये कोठेही विषमता नाही. मोहित झालेल्या पशूंच्या म्हणजेच जीवांच्या चित्ताला पश्चात्तापादि प्रकारांनी व्याकुळ करणे (अनाख्या अर्थात् तिरोधान म्हणजे स्वतःलाच आवरण घालून घेणे) हे परमेश्वराचेच

कृत्य आहे आणि ज्यावेळेला कारुण्याने किंवा आत्यांतिक दया करून पूर्वदोष दूर करून त्याच्या स्व-रूपाचा लाभ पुन्हा करून देणे म्हणजे भासा अर्थात् भासणे याला स्वरूपदर्शनपूर्वक "अनुग्रह" असे म्हटले आहे. अनुग्रह हे ही त्या परमेश्वरीचेच कृत्य आहे. या दोन कृत्यांचेच "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे.

यथा च विस्तृते वस्त्रे युगपद् भाति चित्रता।
तथैव योगिनां धर्मसामस्त्येनैव भाति भूः।।

अर्थ :- ज्याप्रमाणे पसरलेल्या वस्त्रावर चित्र व वस्त्र (लांबी आणि रुंदी) एकदम अर्थात् एकाच वेळेला दिसतात त्याप्रमाणे योगिजनांना सर्वविशेषणत्वाने पृथ्वीवरील वस्तू अर्थात् पृथ्वीचे धर्म आणि पृथ्वी (या दोनही गोष्टी) एकदमच दिसतात.

या प्रमाणाच्या अनुरोधाने ज्यावेळी "अज्ञानी व जाणते" हा उपाधिसंबंध टाकून केवळ विश्वच कार्यरूपाने ज्ञात होते त्यावेळी "अनाख्या व भासा" ही दोन्ही कार्ये झाली किंवा होत आहेत असे समजावे. याबाबतीत एवढा ऊहापोह पुरे आहे. श्रीरामादि अवतारांच्या नटदृष्ट्या ज्या भूमिका भासतात त्या खरेखोटे संशय व सारखेपणादि विलक्षणत्वामुळे वेगळ्याच ज्ञानाला विषय होऊन अनुभवाला येतात किंवा जो नटाची भूमिका करणारा असतो तो श्रीराम इत्यादि भासतो म्हणजेच श्रीरामांची भूमिका करणारा नट हा सामान्य माणूस असूनही आपण त्याला नट न म्हणता श्रीरामच म्हणतो म्हणजेच नटाच्या ठिकाणी "श्रीराम" भासतो. तो भास खरे, खोटे, संशय, सादृश्य इत्यादि विलक्षण किंवा वेगळ्या धर्मांमुळे संविच्छक्तीहून वेगळ्या प्रकारांनी लोकांकडून अनुभविला जातो म्हणजेच त्या भासाकडे आत्मदृष्ट्या पाहिले जात नाही; परंतु तटस्थ वेदज्ञांकडून "तो नट आहे, श्रीराम नाही" हेच जाणले जाते. "**यः एष।**" अर्थात् "जो हा" या पदाने पुराण व आगम इत्यादींमध्ये प्रसिद्ध असलेल्या परमेश्वराची स्वात्म्याशी अत्यंत जवळीक असल्याने स्वाभाविक स्फुरणरूपता सांगून तशा प्रकारच्या विमर्शोन्मेषामध्ये परमेश्वराकडून पुरुषांपर्यंत पसरत जाणारा हा भेद दिसतो किंवा स्फुरणोन्मेषानेच परमेश्वराहून पुरुष भिन्न आहे असा जो भेद दिसतो तो ज्याप्रमाणे वाऱ्यापुढे कापूस टिकत नाही त्याप्रमाणेच टिकणारा नाही असे सांगतात. "**दशा कापि।**" या पदांमधून परमेश्वरभावयुक्त असलेला पुरुष स्वज्ञानाच्या अभावी ज्ञेयत्वात शिरून देह व इंद्रिये यांचा अभिमान धरून किती मूढ बनला आहे अशी

शोचनीयता दाखविली आहे.

यासंबंधी "**श्रीत्रिंशिकाशास्त्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

पृथिव्यादीनि तत्त्वानि पुरुषान्तानि पञ्चसु।
क्रमात् कादिषु वर्गेषु मकारान्तेषु सुव्रते।।

अर्थ :- हे सुव्रते! पृथ्वीपासून पुरुषापर्यंतची पंचवीस तत्त्वे अनुक्रमे "क" पासून "म" पर्यंत पाच वर्गांमध्ये सांगितली आहेत.

त्याचप्रमाणे श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांनी असे म्हटले आहे की, "**पुरुषस्य हि संवेद्यरूपस्यैव परिमितस्य वेद्यराशौ गणनम्।**" अर्थात् "परिमित ज्ञेय पुरुषाची गणना ज्ञेयविषयात केली आहे; (मात्र ज्ञातृपुरुषाची गणना ज्ञेयविषयात केली जात नाही.)" त्या ज्ञेय पुरुषाची अस्मिता पुढील सहा बाबतीत पाहण्यात येते.

या दृष्टीने "**श्रीविरुपाक्षपंचाशिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

सम्पन्नोऽस्मि कृशोऽस्मि स्निह्यत्तारोऽस्मि मोदमानोऽस्मि।
प्राणिमि शून्योऽस्मीति हि षट्सु पदेष्वस्मिता दृष्टा।।

अर्थ :- मी संपन्न आहे, कृश आहे, स्नेह करणारा आहे, आनंदी आहे, मी श्वासोच्छ्वास करतो अर्थात् मी जिवंत आहे आणि मी शून्य आहे या सहा पदांमधून अस्मिता दिसून येते.

वर वर्णन केलेल्या प्रक्रियेने देह आणि प्राणादि संबंधाने अस्मिता अनेक प्रकारचीही असू शकते; कारण या अस्मितेच्या आधाराने ब्रह्माचंद्रादि प्रमातृभेद होतात म्हणजेच अनेक ज्ञाते होतात. यामुळे या पुरुषाला अर्थात् जीवात्म्याला स्वर्गनरकादि भोग आहेत, हेही ओघाने सांगितले गेले.

यासंबंधी "**श्रीशिवदृष्टी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

क्रीडया दुःखवेद्यानि कर्मकारीणि तत्फलैः।
सम्पत्स्यमानानि तथा नरकार्णवगह्वरे।।
निवासीनि शरीराणि गृह्णाति परमेश्वरः।

अर्थ :- परमेश्वर हाच कर्म करणारी, दुःखरूप असलेली, कर्मफलामुळे प्राप्त होणारी व नरकसागरात पिचत पडणारी शरीरे लीलया अर्थात् सहज धारण करतो.

हा परमेश्वर स्वात्मस्फुरत्तेलाच मोहाने अर्थात् अज्ञानाने शरीर-इंद्रियांच्या स्पंदनातच अंतर्भूत करून त्याचा अभिमानी होतो. परंतु ही त्याची वास्तविक, खरी किंवा यथार्थ दृष्टी नव्हे.

"**श्रीस्वच्छंदतंत्र**" या ग्रंथात याबद्दल असे म्हटले आहे की -

सुप्रदीप्ते यथा वह्नौ शिखा दृश्येत नाम्बरे।
देहप्राणस्थितोऽप्यात्मा तद्वल्लीयेत तत्पदे।।

अर्थ :- ज्याप्रमाणे प्रदीप्त अग्नीची शिखा (धुराची रेषा) आकाशात दिसत नाही त्याचप्रमाणे देहप्राणादिकांमध्ये असलेला आत्मा त्यातच लीन होतो अर्थात् लपून राहतो. (त्यामुळे तो दिसत नाही.) ही स्फुरत्ता अर्थात् चैतन्यशक्ती सुद्धा परमेश्वरातच विलीन होते. हीच खरी दृष्टी होय.

यासंबंधी "**श्रीअजडप्रमातृसिद्धी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

यद्यप्यर्थस्थितिः प्राणपुर्यष्टकनियन्त्रिते।
जीवे निरुद्धा तत्रापि परमात्मनि सा स्थिता।।

अर्थ :- जरी अर्थस्थिती अर्थात् स्फुरत्ता किंवा चैतन्यशक्ती ही प्राण व देह इत्यादि अष्टधा प्रकृतीने नियंत्रित अशा जीवात गुंतली असली तरी तिचे अस्तित्व अर्थात् स्थिती खऱ्या अर्थाने परमात्म्यातच असते.

त्याचप्रमाणे -

परमेष्ठिनमारभ्य कीटपर्यन्तमुल्लसन्।
बहुधोपाधिमास्थाय स एकः सन् प्रकाशते।।
शरीराणां प्रभेदेऽपि न शरीरी विभिद्यते।
आदर्शानां प्रभेदेऽपि पश्यन्निव मुखं पुमान्।।
एकमेव यथा तैलं स्थूलेऽपि तिलसञ्चये।
तथा विश्वविलासेऽस्मिन्नेको लोकोत्तरः प्रभुः।।
प्रतिरन्ध्रं गवाक्षाणामन्तरिक्षे व्यवस्थिते।
यथा न वस्तुतो भेदस्तद्वदात्मनि दृश्यताम्।।
एकमेव हि सामान्यं सत्ता गोत्वादि कल्प्यते।
तद्वदेकोऽयमात्मेति वदन् कस्मान्न मृष्यते।।
एकेनैवात्मना सिद्धे लोकयात्राऽनुवर्तने।
नानात्वकल्पनं तत्र गौरवाय न किं भवेत्।।
किञ्च भेदस्य न क्वापि विषयोऽस्तीति दर्शितम्।
अतोऽप्यद्वैतपक्षेऽस्मिन्नानात्वं कथमात्मनः।।
औपाधिकेऽपि तद्भेदे द्वासुपर्णादिवेदवाक्।
सुखदुःखादिभेदानां व्यवस्थाऽप्युपपद्यते।।
ऐक्येनैव निमित्तेन तत्तद्व्यक्त्यानुवर्तनात्।

तस्य व्यापकता सिद्धा याऽन्यैरप्युपपाद्यते।।
ततश्च गजकीटादेस्तत्तद्देहप्रमाणतः।
आत्मावस्थानमित्येतत् त्यज्यतामर्हतां मतम्।।
यत्तु तैरुच्यते तस्मिन्नशेषव्यापके सति।
शरीरेष्विव चैतन्यं शिलास्वपि भवेदिति।।
तत्रोत्तरं शिलादावप्यस्ति चैतन्यवासना।
नौल्बण्यमस्याः प्राणादिसाहाय्यानुदयादिति।।
ये पुनरेनं शरीरादिमेवाहुः, ते पुनरत्यन्तमूर्खाः। तथाहि -
स च देहमयो न स्याच्चैतन्यैकप्रसारभूः।
नो चेच्छवशरीरेऽपि चेष्टा दृश्येत पूर्ववत्।।
स्तम्भः कुम्भः सरिद् ग्रावा मृगः पक्षी पुमानिति।
तारतम्ये निमित्तं किं भूतचैतन्यवादिनाम्।।
एवं नेन्द्रियरूपोऽयं सुषुप्त्यादौ शरीरिणाम्।
सत्येवेन्द्रियसंसर्गे चैतन्याऽनुपलम्भनात्।।
देहेन्द्रियादेरात्मत्वे कर्तृत्वं पर्यवस्यति।
प्रपञ्चस्यैव कर्तृत्वं कार्यमन्यत् किमिष्यते।।
अंशतो यदि कर्तृत्वं कार्यत्वं चेति कथ्यते।
कोंऽशः कस्यास्तु कर्तेति व्यवस्था केन कल्प्यते।।
उक्तरूपविपर्यासशङ्का वा केन वार्यते।
अतोऽस्मन्निश्चितस्यैव तत्त्वस्यात्मत्वमिष्यताम्।।
अथ यः शून्यमाहैनं सोऽपि पर्यनुयुज्यते।
विश्वान्तर्भावतः किं वा शून्योऽयं स्वयमेव वा।।
स्वतः शून्यत्वपक्षोऽस्य स्वशास्त्रेऽपि न लिख्यते।
वेद्यवर्गस्य शून्यत्वे व्यवहारो विलुप्यते।।
सर्वं व्यवहरत्येव शून्यतां साधयन्नपि।
विश्वं सत्यं वदत्यन्यः शून्यं वदति कश्चन।।
यानासनादिवेलायामुभयोः सदृशी स्थितिः।
व्यवहारैकरूप्यं चेद् वाग्वैषम्येण किं फलम्।।
न च सर्वं जगच्छून्यमित्यर्थं साधयन् सुधीः।
लभते वादिनं क्वापि स्वमात्मानं कथामपि।।

अर्थ :- ब्रह्मदेवापासून कीडामुंगीपर्यंत नानाविध उपाधी धारण करून

आविर्भूत होणारा अर्थात् प्रकट होणारा तोच एक म्हणजे परमेश्वर आहे व तोच एकटा प्रकाशित होतो व शोभून दिसतो. ज्याप्रमाणे आरसे पुष्कळ असले तरी त्यात मुख पाहणारा मनुष्य एकच असतो त्याप्रमाणे शरीरे अनेक असली तरी शरीरधारक परमात्म्याचा भेद नसतो अर्थात् हा परमात्मा एकच असतो. ज्याप्रमाणे तिळांच्या राशीत अर्थात् समूहात एकाच प्रकारचे तीळ असतात त्याचप्रमाणे या अनेक प्रकारच्या विश्वसृष्टीत अर्थात् जगद्विस्तारात लोकोत्तर स्वामी म्हणजे एकमेव असलेला प्रभू अर्थात् परमेश्वर लोकांच्या पलीकडे एकटाच असतो. ज्याप्रमाणे खिडकीच्या प्रत्येक छिद्रात असलेले आकाश भिन्न भासले तरी वस्तुतः एक असते त्याप्रमाणेच आत्म्याविषयी समजावे. ज्याप्रमाणे पुष्कळ गाईत गोत्व समान व एकच असते त्याप्रमाणेच आत्म्याचे एकत्व सांगणारा विश्वसनीय किंवा विचारार्ह का वाटत नाही? जर आत्म्याच्या एकत्वानेच लोकव्यवहार जुळतो व चालतो तर आत्मे अनेक मानल्याने तेथे गौरवदोष येणार नाही का? त्याचप्रमाणे भेदाचा कोणताही विषय नाही अर्थात् भेदाला कोठेही स्थान नाही असे दाखविल्यानंतरही या अद्वैतपक्षात आत्म्याचे नानात्व कसे काय आहे? **"द्वा सुपर्णा सयुजा०।"** हे श्रुतिप्रमाण औपाधिक भेद दाखविणारे आहे. त्यामुळे सुख-दुःखादि भेदांची व्यवस्थाही जुळते. एकत्वाच्या निमित्ताने त्या त्या व्यक्तीत तो आत्मा अनुस्यूत असल्याने त्याची अन्य लोकांनीही उपपादित केलेली व्यापकता सिद्ध होते. त्यामुळे हत्तीपासून ते मुंगीपर्यंत त्या त्या देहाच्या प्रमाणातच आत्मा स्थित असतो हे जे जैनांचे मत आहे ते त्याज्य आहे; कारण ते असे म्हणतात की, "तुमचा आत्मा जर सर्वव्यापक असेल तर ज्याप्रमाणे शरीरात चैतन्य असते त्याप्रमाणेच दगडातही असावयाला पाहिजे." या जैनांच्या प्रश्नावर आमचे उत्तर असे आहे की, "दगडातही चैतन्य असतेच; परंतु प्राणादींचे साहाय्य नसल्याने ते उत्कटतेने प्रतीत होत नाही एवढेच.

त्याप्रमाणे -

जे लोक या शरीरालाच आत्मा समजतात ते अत्यंत मूर्ख आहेत; कारण चिद्रूप असा आत्मा शरीररूप नाही म्हणजेच शरीर आत्मा नाही. नाही तर प्रेतातही पूर्वीप्रमाणेच हालचाल दिसली असती. पंचभूते चैतन्याने युक्त आहेत असे म्हणणारे लोक स्तंभ, घट, नदी, दगड, पशू, पक्षी व माणूस यात जे चैतन्यतारतम्य दिसते त्याला काय कारण सांगतील? (काहीच कारण सांगता येणार नाही असा त्याचा अर्थ आहे.) इंद्रियेही चैतन्यरूप नाहीत. सुषुप्त्यादि

अर्थात् मूर्च्छा, स्वप्न इत्यादि अवस्थात शरीराशी इंद्रियसंसर्ग असूनही ज्ञान होत नाही. देहादिकांच्या ठिकाणी आत्मत्व मानल्यास त्यांनाच कर्तृत्व येईल. मग कार्यरूपता कोणाला येईल? अंशतः कर्तृता आणि कार्यत्व आहे असे मानल्यास कोणता अंश कोणाचा आहे? याची व्यवस्था कोणाकडून होते? अशा शंका दूर कोण करणार म्हणून आम्ही निश्चित केलेल्या तत्त्वालाच आत्मत्व (देणे) योग्य आहे. जो शून्यवादी आहे त्याला असा प्रश्न विचारता येण्यासारखा आहे की, शून्य हे विश्वात अंतर्भूत होते की, स्वतंत्र असते? जर शून्य स्वतंत्र आहे असे म्हटले तर तसे शास्त्रात कोठेही लिहिलेले नाही आणि जर वेद्य म्हणजे जाणण्यायोग्य वर्गाला शून्यत्व दिले तर तेथे व्यवहाराचा लोप होतो. शून्यत्व असतानाही सर्वांचा व्यवहार होतच असतो. काहीजण विश्व सत्य आहे असे म्हणतात; तर इतर हे सर्व शून्यच आहे असे मानतात; (परंतु) जाणे, बसणे इत्यादि क्रियांच्या वेळेला दोघांचीही स्थिती सारखीच असते. (मग) जर व्यवहारात एकरूपता असेल तर व्यर्थ वाद घालण्याने काय मिळणार? शून्यवाद्याला वाद करण्याला वादी सापडणारच नाही; कारण सर्व शून्य आहे आणि त्या शून्याचे अस्तित्व मानणाऱ्यालाच अस्तित्व राहणार नाही.

आता या विषयाचा विचार पुरे. आता जो पुरुषविचार चालू आहे त्याचाच विचार करू. अशा प्रकारे सर्व प्रपंचाच्या वैचित्र्याचे **"तस्माच्छब्दार्थ-चिन्तासु न साऽवस्था न या शिवः।"** अर्थात् "त्यामुळे शब्दार्थ चिंतेमध्ये जे श्रीशिव नाहीत ती अवस्थाच नाही," अशा प्रकारे श्रीस्पंदप्रक्रियेच्या दृष्टीने जर परमेश्वराला प्रकाशाने युक्त मानले तर या पुरुषाच्या बद्दल पक्षपाताचा प्रश्न येतोच कोठे?; कारण तो परमेश्वरांतर्गतच आहे.

यासंबंधी "**श्रीनरेश्वरविवेक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

सर्वे चैते प्रमातारः प्रकाशत्वाच्छिवात्मकाः।
सर्वज्ञाः सर्वकर्तारः सर्वतश्चाविभेदिनः।।

अर्थ :- हे सारे प्रमाते अर्थात् पुरुष प्रकाशरूप अर्थात् ज्ञानरूप असल्याने श्रीशिवात्मक, सर्वज्ञ, सर्वकर्ते व सर्वदृष्ट्या अभिन्न आहेत.

हा अर्थ सांगण्यासाठीच पुरुषाला पुरुष असे म्हटले आहे अर्थात् हे प्रकट करण्यासाठी पुरुषाचे दोन अर्थ केले आहेत. शरीरात राहतो अर्थात् "**पुरे वसतीति पुरुषः।**" व शरीराला जाळतो अर्थात् "**पुरमोषति।**" म्हणून तो अनुक्रमे जीव व श्रीशिव (पुरांतक) असतो; परंतु जीव आणि श्रीशिव एकच

आहेत.

"**श्रीहंसभेद**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

बुद्धिप्राणशरीराख्ये यदेतस्मिन् पुरत्रये।
अहङ्काराद् वसत्यात्मा तेनायं पुरुषः स्मृतः।।
एतत् पुरत्रयं दग्धं येन स त्रिपुरान्तकः।
स एव पुरुषः प्रोक्तः स्मरारिरपि स स्मृतः।।

अर्थ :- आत्मा हा बुद्धी, प्राण व शरीर या पुरत्रयात अर्थात् शरीरात अहंकारामुळे राहतो. त्यामुळे या आत्म्याला पुरुष असे म्हटले जाते. हे पुरत्रय ज्याच्याकडून जाळले जाते तो त्रिपुरांतक असून त्यालाच पुरुष असे म्हणतात व तोच श्रीशिव म्हणूनही ओळखला जातो.

जरी हा भेद उचित वाटला तरी वस्तुतः दोघांचे पर्यवसान एकातच होते. आणव, कार्म व मायीय हे तीन मल म्हणजे त्या पुरुषाचे स्वातंत्र्यरूप असून तेच पुरुषाच्या जीवदशेला कारणीभूत होतात. यावर अशी एक शंका विचारली जाते की, "धडधडीत भेद सिद्ध होत असताना तुम्ही श्रीशिव व जीवाचे तादात्म्य आणि तादात्म्याने जीवाला श्रीशिवैश्वर्य आहे असे सांगता तर तादात्म्याने श्रीशिवांना जीवत्व का येऊ नये? माया-मोहाने ते व्यथित हृदय का होऊ नयेत?" याला उत्तर देताना ग्रंथकार असे म्हणतात की, "यावर इंद्रजालाचा दृष्टान्त नजरेसमोर आणला म्हणजे शंका निरसन होईल. जादूगार आपल्या जादूने अर्थात् कौशल्याने सर्वांना मोहित करतो; परंतु स्वतः मात्र कशानेही मोहित होत नाही त्याचप्रमाणे परमेश्वर सर्वांना मोहित करूनही स्वतःवर त्या मोहाचा कोणताही परिणाम घडू देत नाही. त्यामुळेच आम्ही परमेश्वराला "नट" अशी संज्ञा दिली आहे."

******

गाथा क्रमाङ्क २०

अवतरणिका :- आत्म्याचा विचार अर्थात् ज्ञान हे सांसरिक सर्व दुःखांचे शमन करणारे आहे हे सांगितले. हा विचार आत्म्याची अस्पष्टता स्पष्ट करणारा आहे. आत्म्याविषयी अस्पष्टतेची शंकाही येत नाही; कारण तो सर्वांहून स्पष्ट आहे हे अनेक उदाहरणाने सिद्ध केले. त्यामुळे येथे प्रमाण व प्रमेय व्यवहाराचा बिलकुल उपयोग नाही हे विस्तृत सांगितले. यावर शंका व समाधान अर्थात् स्पष्टाचे अस्पष्टत्वही योग्य

कसे आहे ते ग्रंथकार प्रकृतीवर प्रकाश टाकताना या गाथेत सांगतात.

णाणकिआमाआणं गुणाण सत्तरअतमसहावाणं।
अविहाआवस्थाए तत्तं पअडित्ति संभवी सत्ती।।२०।।
(ज्ञानक्रियामायानां गुणानां सत्त्वरजस्तमस्स्वभावानाम्।
आविभागावस्थायां तत्त्वं प्रकृतिरिति शाम्भवी शक्तिः।।)

अर्थ :- प्रकृती ही सत्त्वगुणस्वभावाची असताना ती ज्ञानशक्ती असते, ती रजोगुणस्वभावाची असताना क्रियाशक्ती असते आणि तमोगुणस्वभावाची असताना ती मायाशक्ती असते. अशा तऱ्हेने विभक्त दशेमध्ये प्रकृती ज्ञान-क्रियामायायुक्त असते आणि अविभक्त अर्थात् एकत्रित अवस्थेत ते प्रकृतितत्त्व म्हणजेच शांभवी शक्ती होय.।।२०।।

विशेष :- शक्तिमान् आणि त्रिगुणात्मक स्वभावाची शक्तीची एकाकार एकरस अवस्था अर्थात् अभिन्न स्थितीच विश्वनाटकाचा सूत्रधार असलेल्या श्रीशिवांची स्वरूपशक्ती किंवा मूळ प्रकृती आहे. हीच शांभवी शक्ती आहे. ज्ञान म्हणजेच प्रकाश आहे, क्रिया म्हणजेच विमर्श अर्थात् विचार आहे आणि माया म्हणजेच "हे मी आहे, मी हे आहे" असे वाटणे आहे. श्रीसदाशिवांची अवस्थावत् अहन्तापर्यवसायिनी शक्ती म्हणजे अहंतेत अर्थात् परब्रह्मात परिणमित होणारी शक्ती आहे. या शक्तींना आधारभूत अशीच सुखदुःख-मोहात्मक विश्वव्यवहाराची स्थिती आहे. या तीन ज्ञान, क्रिया व माया शक्तींची श्रीशिवांमध्ये अभिन्नता किंवा अंतरंगता असणे यालाच शांभवी शक्ती असे म्हणतात.

परिमलव्याख्यार्थ :- ज्ञान म्हणजे प्रकाश होय. क्रिया म्हणजे विमर्श अर्थात् विचार किंवा ज्ञान होय आणि माया म्हणजे अहम् इदम् अर्थात् मी हे आहे आणि इदम् अहम् अर्थात् हे मी आहे असे वाटणे होय. थोडा भेद असतानाही श्रीसदाशिवांच्या अवस्थेप्रमाणे अहंतेत परिणमित होणारी शक्ती आहे. (प्रकाशरूप परब्रह्माचे स्वाभाविक स्फुरण सृष्टी, स्थिती आणि संहार करते.) या शक्ती जीवांना मोहित करून बद्ध करीत असल्याने त्या परमेश्वर-शक्ती असूनही गुण होत.

यासंबंधी "**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

स्वाङ्गरूपेषु भावेषु पत्युर्ज्ञानं क्रिया च या।
मायातृतीये ते एव पशोः सत्त्वं रजस्तमः।।

अर्थ :- परमेश्वराच्या ज्ञान, क्रिया आणि माया या स्वांगशक्ती असून

त्याच जीवामधील सत्त्व, रज व तम हे गुण आहेत.

त्याच शक्ती जीवांमध्ये सत्त्व, रज, आणि तम हे तीन गुण बनतात. त्याच्यामुळेच सुख, दु:ख व मोहाने युक्त असा हा लोकव्यवहार होतो. या तीनही गुणांनी युक्त अशी ईश्वराची जी कोणत्याही विभागाने अर्थात् भेदाने विरहित अशी स्थिती एखाद्या धारवाडीकाट्याप्रमाणे अत्यंत अविषम अर्थात् साम्यावस्थायुक्त असते तिला प्रकृतितत्त्व असे म्हणतात. ही प्रकृती शुभ व अशुभादि अनेक गुणदोषोन्मेषाची जननी आहे. हिच्यातच पाच अहंता आणि निवृत्त्यादि पाच कला अर्थात् निवृत्ती, प्रतिष्ठा, विद्या, शांती व शांत्यातीता इत्यादि पाच कला विद्वानांनी कल्पिल्या आहेत. त्याचप्रमाणे ही प्रकृती म्हणजे शांभवी शक्ती आहे. सांख्यांची प्रकृती नव्हे. यामुळेच सांख्यांचा सिद्धान्त खंडित होतो.

सांख्य असे म्हणतात की -

मूलप्रकृतिरविकृतिर्महदाद्याः प्रकृतिविकृतयः सप्त।
षोडशकस्तु विकारो न प्रकृतिर्न विकृतिः पुरुषः।।

अर्थ :- मूळ प्रकृती ही विकृती अर्थात् कोणाचेही कार्य नाही. महदहंकारादि सात कारणे व कार्य आहे. प्रकृती व विकृती (हे महत् आदि मूलप्रकृतीपासून उत्पन्न होतात म्हणून विकृती आणि त्यांच्यापासून अन्य तत्त्वे उत्पन्न होतात म्हणून ते प्रकृतीही आहेत) व ज्ञानकर्मेंद्रियादि सोळा केवळ कार्यच होत. पुरुष हा कार्यही नाही व कारणही नाही.

ज्ञान आणि कर्मेंद्रिये ही केवळ कार्यच आहेत; (कारण त्यांच्यापासून कोणतेही तत्त्व उत्पन्न होत नाही, इत्यादि वचनांनी पुरुषाच्या वर अन्य कोणतेही तत्त्व नाही, हे सांख्यांनी कथन केले आहे.) पुरुष उदासीन असून प्रकृती त्याच्या अधीन असते. ती प्रकृती नित्य असते. ती विकृती नाही. महत्, बुद्धी, अहंकार हे सोळा नित्य विकारात्मक अर्थात् विकृती असतात असे ते सांगतात. परंतु आमची तत्त्वप्रणाली अशी नाही; कारण पुरुषाच्या वर अर्थात् पुरुषाहून श्रेष्ठ अशी श्रीपरमशिवांपर्यंत अनेक तत्त्वे आहेत (असे आम्ही मानतो). पुरुष सर्वदा सर्वकर्ता व सर्वज्ञ असून स्वात्म्याचे ज्ञान नसल्यामुळे संकुचित (झाल्याप्रमाणे) भासतो. प्रकृतीला केवळ पुरुषाकडूनच प्रेरणा मिळते असे नाही; कारण त्या पुरुषाला परमेश्वरस्वातंत्र्याच्या अभावी तशा प्रकारचे प्रेरक सामर्थ्य असत नाही.

यासंबंधी "**श्रीस्पंदशास्त्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

नहीच्छानोदनस्यायं प्रेरकत्वेन वर्तते।
अपि त्वात्मबलस्पर्शात् पुरुषस्तत्समो भवेत्।।

अर्थ :- हा पुरुष इच्छेनुसार प्रेरक होऊ शकत नाही. याउलट आत्मबल स्पर्शाने अर्थात् श्रीपरमशिवांच्या सामर्थ्याने पुरुष त्यांच्यासारखा म्हणजेच प्रेरणादि कर्मांचा कर्ता होतो.

ती प्रकृती नेहमीच विकृत; परंतु कधी कधी अविकृत असते. महदादि सोळा तत्त्वेही अविकृत तर कधी विकृत असतात. यापुढे ग्रंथकारांनी सांख्य मतवाद्यांना काही प्रश्न विचारले आहेत.

अथ ये तमुदासीनमाहुर्नित्योदितोद्यमम्।
त एवं प्रतिवक्तव्याः सर्वदा चेदनुद्यमः।।
तेन मृत्पिण्डकल्पेन जगतः किं प्रयोजनम्।
किमित्यङ्गीकृतिस्तस्य किंप्रमाणोऽपि वा भवेत्।।
यदुच्येत तदेवैतदौदासीन्यं चिदात्मनः।
प्रवर्तयति विश्वस्मिन् प्रकृतिं विकृतिस्पृशम्।।
अन्यथा प्रकृतेः किञ्चिन्न प्रागल्भ्यं प्रवर्तते।
तदर्थं स्वीकृतिस्तस्य विश्वातिक्रान्ततेजसः।।
तेनैव च प्रमाणेन तस्य सिद्धिर्भवेदिति।
अत्रोच्यते यथा सा चेदस्यौदासीन्यकल्पना।।
अनुदासीन एवेति तात्पर्यं पर्यवस्यति।
वैलक्षण्यात् प्रकृत्यादेः सूक्ष्ममुद्यममास्थितः।।
इत्यसौ निष्क्रियो न स्याद् यतः सूक्ष्मापि सा क्रिया।
स्थवीयसीः क्रियाः सूते प्रकृतौ विकृतिष्वपि।।
जडा अपि स्वभावेन देहाक्षभुवनादयः।
यत्प्रभावात् प्रवर्तन्ते स कथं निष्क्रियो भवेत्।।
अत्र च मदीयमेव सूक्तं यथा -
अश्वेषु गच्छत्सु रथः प्रयातीत्युदेतु वादो रथमध्यवर्ती।
सुखं निषण्णो विषयान्तरं च
प्राप्तः पुमान् किन्नु चकार शम्भो।। इति।।
अत्रैतदवधार्यमन्तर्विद्भिः। यदुत -
शिवारम्भः प्रकृत्यन्तस्तत्त्वौघः प्रत्यपादि यः।
तत्र विश्वोत्तरस्यास्य शिवस्य परमेष्ठिनः।।

सर्वक्रिया च सार्वज्ञ्यं सर्वदोदयता तथा।
सर्वव्यापकता पूर्तिः प्रथन्ते पञ्चशक्तयः।।
अथ शक्तौ तदिच्छायामुन्मना समनेत्यपि।
व्यापिनी नादबिन्दु च रश्मयः पञ्च जाग्रति।।
अनुग्रहतिरोधानसंहृतिस्थितिसृष्टयः।
जगत्कृत्यानि पञ्चापि शक्तितत्त्वभुवः प्रथाः।।
सदाशिवे पुनस्तत्त्वे ईशानस्तत्पुमानिति।
अघोरो वामदेवश्च सद्योजातश्च शक्तयः।।
तदूर्ध्वमीश्वरे तत्त्वे रूपातीतोत्तरं महत्।
रूपातीतं च रूपं च पदं पिण्ड इति क्रमः।।
तुर्यातीतं च तुर्यं च सुषुप्तिस्वप्नजागराः।
अवस्थाः पञ्च शुद्धाया विद्यायाः शक्तिविभ्रमः।।
सैवेयं शाम्भवीं शक्तिमाणवीं शोधनीमपि।
बोधनीमपि ता दीक्षा प्रसूते स्फूर्तिशालिनी।।
निरुपायप्रकाशाख्यो ज्ञानं योगः क्रियेत्यपि।
चर्येति च तदुत्थैव पुमर्थोपायकल्पना।।
तत एव महाशक्तिर्हाकिनी नाम जायते।
डाकिनी राकिनी तद्वल्लाकिनी काकिनीत्यपि।।
साकिनीति च देहेऽस्मिन् यद्वैचित्र्यं विजृम्भते।
अथ मायेति यत् तत्त्वमुच्यते तस्य शक्तयः।।
कलाविद्ये रागकालौ नियतिस्तत्र पञ्चमी।
प्राणोऽपानः समानः स्यादुदानो व्यान इत्यपि।
शरीरयात्रोपक्षीणः पुरुषे शक्तिसङ्ग्रहः।
प्रकृतौ तु गुणाः सत्त्वं रजश्च तम इत्यपि।।
विकृत्यविकृती तद्वदुच्यन्ते पञ्च रोचिषः।
अथैतयोः पुम्प्रकृत्योः स्फुरणक्रियया भवेत्।।
वक्ष्यमाणमशेषेण विश्ववैचित्र्यकल्पनम्।
तत्प्रकारोऽपि विधिवद्वितत्य प्रतिपाद्यते।।
पुम्प्रकृत्योः समुद्योगाद्धातुरात्मेति जायते।
त्वगसृङ्मांसमेदोस्थिमज्जाशुक्राह्वयैरयम्।।
वातपित्तकफाख्यैश्च स्वांशोद्योतैर्विजृम्भते।

अनयोरेव सङ्घट्टाद् यो मनो धीरहङ्क्रिया।।
इत्यन्तःकरणोल्लासस्त्रैविध्येनानुभूयते।
तत्र बुद्ध्युद्यमाद् धर्मो ज्ञानं वैराग्यमित्यपि।।
ऐश्वर्यं वरदत्वं चेत्युन्मीलति विचित्रता।
क्रमादेतद्विपर्यासो मनसः शिल्पमिष्यते।।
मदीयत्वामदीयत्वकार्पण्यमदमत्सराः।
अहङ्कारस्फुरत्ताः स्युः संसारस्फूर्तिहेतवः।।
तद्वत् तयोर्विभूत्यैव गुणाः सत्त्वं रजस्तमः।
इति त्रयः प्रतीयन्ते विकृताविकृतोदयाः।।
तत्र सत्त्वस्य सौन्दर्यं सौभाग्यं साधुशीलता।
सौमुख्यमथ सौजन्यमिति स्फुरणविभ्रमः।।
वशीकरणमाकर्षः शान्तिः पोषणपालने।
इति कर्माणि रजसो गुणस्याहुः परिग्रहम्।।
अथ विद्वेषणं यत् स्याद् यच्चोच्चाटनमुच्यते।
स्तम्भनं मोहनं चेति मारणं चेति याः क्रियाः।।
तदेतदखिलं तस्य तमसः क्षोभविभ्रमः।
गुणैरेभिरुपस्कारमहङ्कारो यदाश्नुते।।
सात्त्विकत्वादिभेदेन तदा त्रैविध्यमृच्छति।
तत्र शब्दस्पर्शरूपरसगन्धा इति क्रमात्।।
सात्त्विकः स्वेन रूपेण प्रथते भोग्यवस्तुषु।
राजसस्तु विजृम्भेत वचनादानधावनैः।।
विसर्गानन्दनाभ्यां च पञ्चभिः स्वस्वभाववान्।
तामसोऽपि खवाय्वग्निपाथोभूमिस्वलक्षणैः।।
भूतैर्वपुष्मान् प्रथते विश्वोपादानहेतुभिः।
किञ्च त्रैविध्यवत्यस्मिन्नहङ्काराह्वये पदे।।
विभूतिविभ्रमोत्कर्षात् त्रिधा विततिरिष्यते।
पुण्येच्छा तत्त्वजिज्ञासा लोकोत्तीर्णार्थगृध्नुता।।
वस्तुष्वध्यवसायः श्रीर्धीः सङ्कल्पविकल्पिनी।
शान्तिदान्त्यादिमित्रस्य सात्त्विकस्य विजृम्भितम्।।
श्रोत्रत्वगक्षिरसनाघ्राणेन्द्रियमयीं दशाम्।
राजसस्याहुरैश्वर्यं हर्षभीत्यादिदायिनः।।

वाणी पाणिरथो पादः पायूपस्थमिति क्रमात्।
मोहालस्यादिसुहृदस्तामसस्य परिच्छदः।।
अथ या महती सिद्धीः प्रसूता प्रस्तुतद्वयात्।
तस्याः पञ्चविधा स्फूर्जा साधकेष्वनुभूयते।।
यथेप्सितशरीराप्तिः प्रवेशोऽन्यस्य वर्ष्मणि।
दूराध्वयानायानं च दूरश्रवणदर्शनम्।।
अदृश्यकरणं चेति तत्प्रकारः प्रतीयताम्।
पुण्यक्रियेति काप्यस्ति विश्वोत्पत्त्यै स्थितिस्तयोः।।
वीर्यं गाम्भीर्यमैश्वर्यं भोक्तृत्वं दातृतेत्यपि।
तस्याः प्रथनवैचित्र्यं यल्लभ्यं भाग्यशालिभिः।।
इत्थं तत्रैव चिन्नाडी ज्ञानसूत्रमिति स्मृता।
चित्रपद्मशिवाख्याश्च शक्त्यात्माभिहिते अपि।।
नाडीः पञ्च प्रपञ्चेऽस्मिन् प्रसुवाना प्रवर्तते।
एवं हाटककालाग्नी कूटस्थः कूर्म इत्यपि।।
अनन्तः शक्त्युपश्लिष्टः कपिलर्षिरिति क्रमात्।
तद्विजृम्भैव बोद्धव्या सप्तपातालधारिणी।।
उक्तैतदखिलाभोगस्वभावत्वेऽप्यनाविलः।
निस्तरङ्ग इवाम्भोधिर्वहन् गाम्भीर्यसम्पदम्।।
चिदानन्देषणाज्ञानक्रियापञ्चकशक्तिमान्।
भैरवः परमो नाथस्तत्त्वान्ते कथयिष्यते।।
प्रपञ्चवैचित्र्यभुवं प्रपञ्चयन् प्ररूढपञ्चार्थरहश्चमत्क्रियाम्।
प्रकाशयामास महेश्वरः स्वयं परं परामर्शमयीमहंस्फुराम्।।
अहङ्क्रिया नित्यमहङ्क्रियायां पराक्रमो यस्य पराक्रमे च।
स एव वीरो ननु तस्य शास्त्रं विमर्शशाणोल्लिखिता स्वशक्तिः।।

अर्थ :- सांख्य हे त्या नित्य उद्योगी पुरुषाला उदासीन असे म्हणतात. जर तो नेहमीच अनुद्योगी असेल तर त्यांना म्हणजे सांख्यांना काही प्रश्नांच्या बाबतीत खुलासा करावा लागेल. तो पुरुष अनुद्योगी असेल तर मातीच्या गोळ्याप्रमाणे असलेल्या त्याच्याशी जगाचे काय प्रयोजन असेल? (त्या पुरुषाला जग कशासाठी मानील?) त्याचा अंगीकार तरी कशासाठी करील? आणि त्याच्या अस्तित्वासाठी प्रमाण तरी कोणते आहे? त्या पुरुषाचे म्हणजेच चिदात्म्याचे औदासीन्यच प्रकृतीला विकृत कार्य करून विश्वनिर्मितीसाठी

प्रेरणा देते. नाहीतर प्रकृतीचे प्रागल्भ्य किंवा थोरपणा अगर मोठेपणा प्रकट होणार नाही. त्यासाठीच त्या विश्वाच्याही पलीकडे असलेल्या तेजस्वी पुरुषाचा अंगीकार केला पाहिजे. त्याच प्रमाणाने त्याची सिद्धी अर्थात् पुरुषाचे अस्तित्व होऊ शकेल. यावर आमचे म्हणणे आहे की, जर त्या पुरुषाची औदासीन्य कल्पना मांडीत असाल तर ती कल्पना अनुदासीन अर्थात् उदासीन नसलेला या कल्पनेत बदलून जाते. प्रकृत्यादि तत्त्वे विविध असल्याने सूक्ष्म अशा क्रियेमध्ये स्थित असलेला तो पुरुष निष्क्रिय कसा बरे असेल? (तो पुरुष सूक्ष्म अशा क्रियेत व्यस्त असल्याने निरुद्योगी न राहता उद्योगीच बनला. त्यामुळे त्याला (पुरुषाला) निष्क्रिय म्हणता येणार नाही;) कारण ती क्रिया सूक्ष्म जरी असली तरी ती प्रकृती आणि विकृती या दोन्हीमध्येही अतिस्थूल क्रिया उत्पन्न करते. देह, इंद्रिय व भुवनादि जड (वस्तूही) ज्याच्या प्रभावाने सक्रिय होतात तो स्वतः निष्क्रिय कसा असेल? यासंबंधी माझे असे सूक्त आहे की, घोडे धावत असता रथ चालला आहे असे म्हटले जाते. (गतिक्रिया ही विवाद्य आहे;) परंतु रथारूढ पुरुष मात्र सुखाने अर्थात् विनासायास अपेक्षित स्थळी पोहोचतो. येथे श्रीपरमशिवांनी खरोखर काय केले बरे? याविषयी सूज्ञांनी असा विचार करावा की, श्रीशिवांपासून प्रकृतीपर्यंत जो तत्त्वांचा समुदाय सांगितला त्यात या विश्वाच्या पलीकडे असलेल्या परमेश्वराच्या अर्थात् श्रीशिवांच्या पाच शक्ती सांगितल्या आहेत. त्या पाच शक्ती म्हणजे १. सर्व क्रिया, २. सार्वज्ञ्यं अर्थात् सर्वज्ञता, ३. सर्व उद्युक्तता अर्थात् सतत उद्योगरत राहणे, ४. सर्वव्यापकता व ५. पूर्ती म्हणजे पूर्णता या होत. त्याचप्रमाणे इच्छाशक्तीमध्ये (इच्छाशक्तीचे) १. उन्मना, २. समना, ३. व्यापिनी, ४. नाद व ५. बिंदू हे पाच किरण आहेत. क्रियाशक्तीच्या पाच भूमिका अर्थात् प्रकार पुढीलप्रमाणे आहेत. त्या १. उत्पत्ती, २. स्थिती, ३. संहार, ४. तिरोधान अर्थात् अनाख्या व ५. अनुग्रह म्हणजे भासा या होत. परम श्रीसदाशिव तत्त्वामध्ये १. ईशान, २. तत्पुरुष, ३. अघोर, ४. वामदेव, व ५. सद्योजात हे पाच अंश आहेत. त्याच्यावर श्रीईश्वरतत्त्वामध्ये १. महान् रूपातीतोत्तर, २. रूपातीत, ३. रूप, ४. पद व ५. पिंड हे पाच अंश क्रमाने स्थित आहेत. तशाच १. तुर्यातीत, २. तुर्य, ३. सुषुप्ती, ४. स्वप्न व ५. जागृती या पाच अवस्था शुद्ध विद्येचे शक्तिविभ्रम अर्थात् शक्तीच्या कटाक्षामुळे उत्पन्न होणाऱ्या आहेत. तीच ही शांभवी शक्ती असून आणवी, शोधनी व बोधनी यांना निर्माण करणारी तीच स्फूर्तिदायक शक्ती आहे. पुरुषार्थप्राप्तीसाठी

निरुपायप्रकाश, ज्ञान, योग, क्रिया व चर्या ही पाच साधने आहेत. त्यांच्यापासूनच देहात हाकिनी, डाकिनी, राकिनी, लाकिनी, काकिनी आणि साकिनी या महान् शक्ती उत्पन्न होतात व आश्चर्यकारक गोष्टी या शरीरात होतात किंवा घडतात. आता माया म्हणून जे तत्त्व सांगितले जाते त्याच्या पाच शक्ती आहेत. १. कला, २. विद्या, ३. राग, ४. काल आणि ५. नियती या त्या पाच शक्ती होत. पुरुषशरीरात क्षीण होणाऱ्या शक्तीचा संग्रह पाच वायूंनी होतो. ते पाच वायू म्हणजे १. प्राण, २. अपान, ३. उदान, ४. समान व ५. व्यान हे होत. प्रकृतीच्या सत्त्व, रज, तम, विकृती आणि अविकृती या पाच गुणांना पंचकिरण असेही नाव आहे.

या पुरुष व प्रकृतीच्या स्फुरणरूपक्रियेने विचित्र विश्वाची उत्पत्ती होते. त्याचा सशास्त्र प्रकार विस्ताराने सांगतो. पुरुष व प्रकृतीच्या संयोगाने आत्मा (देहरूप) धातू निर्माण होतो. त्वचा, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा व शुक्र अर्थात् शुक्र हे सात धातू व वातपित्तकफनामक दोष यांच्या स्वांशरूप प्रकाशाने तो (देह) वरचेवर उल्लसित, प्रकाशमान व व्यक्त होतो. या पुंप्रकृती समूहानेच अंतःकरणाचा उल्लास अर्थात् उदय होतो. ते अंतःकरण मुख्यतः मन, बुद्धी आणि अहंकार या तीन प्रकारांनी अनुभवाला येते. त्यांपैकी बुद्धीच्या उद्योगामुळे धर्म, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य आणि वरदत्व अर्थात् दातृत्व या विविध गोष्टींचा विकास होतो. मनाचे कार्य म्हणजे या गोष्टींचा क्रमाने विपर्यास अर्थात् बदल करणे होय. अहंकारापासून ममत्व, निर्ममत्व, कृपणता, गर्व आणि मत्सर या पाच गोष्टी निर्माण होतात आणि संसाराचा विस्तार होण्यासाठी याच गोष्टी कारणीभूत ठरतात. या सर्वांबरोबरच पुरुष व प्रकृतीपासून सत्त्व, रज आणि तम हे गुण निर्माण होतात. या तीन गुणांमध्ये विकृत आणि अविकृत अशा तीन अवस्था आहेत. अविकृत सत्त्वगुणापासून सौंदर्य, सौभाग्य, सज्जनपणा, सौमुख्य आणि सौजन्य ही लक्षणे उत्पन्न होतात व वाढतात. अविकृत रजोगुणाची वशीकरण, आकर्षण, शांती, पोषण आणि पालन ही कर्मे आहेत. तमोगुणाच्या क्षोभाने द्वेष करणे, उच्चाटन, स्तंभन, मोहन व मारण या वृत्तींचा उद्रेक होतो.

ज्यावेळेला अहंकार या तीन गुणांशी संबद्ध होतो त्यावेळेला त्याला सात्त्विकादि त्रिविधता येते.

(त्यानंतर) सात्त्विक अहंकार भोग्यवस्तूंमध्ये शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या क्रमाने स्वतःच्या रूपाने विस्तार पावतो.

राजस अहंकार बोलणे, घेणे, धावणे, मलादित्याग व आनंद अर्थात हर्ष या स्वभावांनी व्यक्त होतो.

तामस अहंकारापासून जगाचे उपादान कारण असलेली पृथ्वी, आप, तेज, वायू व अग्नी ही पाच महाभूते उत्पन्न होतात. या जगत्कारण अशा भूतांमुळे हा आत्मा पुरुषशरीर धारण करतो.

तीन प्रकारांच्या या अहंकारपदामध्ये विभूती,विभ्रम व उत्कर्षामुळे (पुन्हा) तीन प्रकार पडतात. त्यांपैकी सात्त्विक अहंकारापासून पुण्याची इच्छा, तत्त्वजिज्ञासा, मोक्षाची अभिलाषा, निश्चय, श्री म्हणजे कांती व ऐश्वर्य आणि संकल्पादि करणारी बुद्धी या गोष्टी उत्पन्न होतात; कारण शमदमतितिक्षादि धर्म सात्त्विकाजवळ असतात. हर्ष, भीती इत्यादि देणाऱ्या राजस अहंकाराचे ऐश्वर्य श्रोत्र, त्वचा, अक्ष म्हणजे डोळे, रसना व घ्राण या इंद्रियांनी युक्त अशी दशा होय.

मोहालस्यादि (गुणांचा) मित्र असलेल्या तामस अहंकाराचा परिवार म्हणजे वाणी, हात, पाय, पायू व उपस्थ ही पंचकर्मेंद्रिये होत.

. राजस व तामस अहंकारापासून उत्पन्न होणारी जी मोठी सिद्धी आहे तिचे पाच प्रकार साधकांमध्ये दिसतात. वाटेल तसे शरीर धारण करणे, दुसऱ्याच्या देहात प्रवेश करणे, दूरचे ऐकणे, पाहणे व गुप्त होणे, हे ते पाच प्रकार होत. विश्वोत्पत्तीसाठी त्यांची पुण्यक्रिया उपयोगी पडते. भाग्यवंत मनुष्यांना वीर्य, गांभीर्य, ऐश्वर्य, भोक्तृत्व व दातृत्व याही गोष्टी मिळतात.

याच शरीरामध्ये चिन्नाडी आहे. तिला ज्ञानसूत्र असे दुसरे नाव आहे. चैतन्यनाडी ही चित्रानाडी, पद्मनाडी, शिवनाडी, शक्तिनाडी व आत्मनाडी या पाच नाड्यांना जन्म देते. या रीतीने हाटक, कालाग्नी, कूटस्थ, कूर्म, अनंत आणि कपिल या रूपात ती सप्तपातालांना धारण करते. एवढा पसारा असूनही परम श्रीभैरव निर्लेप असतात. ते गंभीर व तरंगरहित समुद्रासारखे असतात. चित्, आनंद, एषणा अर्थात् इच्छा, ज्ञान व क्रिया या पंचशक्तीने ते परम श्रीभैरव युक्त आहेत. याचे वर्णन आम्ही पुढे करू.

हे श्रीमहेश्वर पंचविषयांच्या रहस्यरूप चमत्काराने भरलेल्या प्रपंचाचे प्रकटन करीत करीत स्वाभाविक स्फुरणमय विमर्शाचे प्रकटन करतात.

ज्यांचा अहंकार अहंकारावर मात करणारा आहे व ज्यांचा पुरुषार्थ पुरुषार्थाला जिंकणारा आहे असे ते श्रीमहेश्वर जगदेकवीर आहेत. त्यांचे

शस्त्र म्हणजे त्यांची शक्ती असून ती विमर्शरूप सहाणेवर धार लावून सज्ज ठेवली आहे.

रहस्यरूप अलंकाराचे प्रकाशन किती करावयाचे? म्हणून आता येथे (विसाव्या गाथेची टीका) समाप्त करतो.।।२०।।

*****

गाथा क्रमाङ्क २१

अवतरणिका :- या गाथेत ग्रंथकार अहंकार, बुद्धी व मन यांचे तत्त्व म्हणजे स्वरूप अर्थाद्वारे दाखवितात.

कल्लोलंताइ सइं हिअअंबुणिहिम्मि तिण्णि कलणाइं।
आअड्ढंति इदंतं तत्थ अहंतं च एत्थ ओप्पंति।।२१।।
(कल्लोलायमानानि सदा हृदयाम्बुनिधौ त्रीणि करणानि।
आकर्षन्तीदन्तां तत्राहन्तां चात्रार्पयन्ति।।)

अर्थ :- ज्याप्रमाणे समुद्रामध्ये मोठमोठ्या लाटा उसळत असतात, उत्पन्न होत असतात आणि त्याच्यातच विलीन होत असतात त्याचप्रमाणे हृदयातील ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रियरूप अहंकार, बुद्धी आणि मन ही तीन साधने मोठ्या लाटांच्या रूपात उसळत असतात आणि हृदयातील भावना व विचारांना बाहेर आणि बाहेरच्या विषयांना आतल्या बाजूला यथाक्रम प्रकट आणि विलीन करीत असतात.।।२१।।

विशेष :- "हे माझे आहे, हे माझे नाही," अशा प्रकारच्या अभिमानाला वाढविणारा तो अहंकार होय. बुद्धी अध्यवसायात्मिका अर्थात संकल्पविकल्पांची निर्माती आहे आणि मन संकल्पविकल्पांचा हेतू आहे. ही तीनही इंद्रिये आपल्या हृदयात सतत कल्लोलित किंवा आंदोलित होऊन आत आणि बाहेरच्या विषयवैचित्र्याचा अनुभव देत असतात. ही तीनही करणे अर्थात् इंद्रियरूपी साधने आहेत आणि आपल्या हृदयरूप समुद्राच्या महातरंगाच्या रूपाने प्रसिद्ध आहेत. ही करणे अर्थात् साधने बाह्य विषयांचा हृदयाला अनुभव देत असतात आणि हृदयाच्या चिच्छक्तिद्वारे त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या विषयवस्तूला प्रकट करीत असतात.

परिमलव्याख्यार्थ :- हे हृदय विस्तृत अशा सर्व तत्त्वांचे आधाररूप असल्याने समुद्राप्रमाणे आहे. या दृष्टीने शास्त्रात असे म्हटले आहे की, "**नमः प्रमातृवपुषे शिवचैतन्यसिन्धवे।**" अर्थात् "ज्ञातृस्वरूप श्रीशिवचैतन्यसागराला नमस्कार असो." यातील चैतन्य म्हणजे चेतनास्थान हृदयच

होय. त्या हृदयसागराचे तीन मोठे तरंग अर्थात् लाटा आहेत. त्यांना कालाचे बंधन नाही. ते तीन तरंग या ज्ञातृस्वरूप कर्त्याची तीन साधने ही श्रेष्ठ इंद्रियेच समजावीत. त्या लाटा बाह्य विषयांच्या चित्रविचित्र संपत्तीला हृदयाकडे अर्थात् हृदयात खेचून आणतात. त्याचप्रमाणे त्या लाटा अहंरूप अशा स्वहृदय चिच्छक्तीला ज्ञेयरूपता आणतात. प्रमात्याला प्रमेयत्व देणे अयोग्य असले तरी त्या लाटा प्रमेय बनवितात. त्या तरंगांना बुद्धी, मन आणि अहंकार या संज्ञा आहेत. अहंकार म्हणजे हे माझे, हे माझे नाही अशा प्रकारच्या अभिमानाचे साधन होय. निश्चयाचे साधन बुद्धी आहे. मन म्हणजे संकल्पविकल्पाचे साधन होय. असे प्रत्येकाचे लक्षण आहे. अहंकारादि आत्म्याची अंतरिंद्रिये केवळ बाहेर पाहिलेल्या विषयांनाच आत आणून सोडतात व मोकळे होतात असे नसून स्वतःमध्ये प्रतिबिंबित अशा प्रमात्याच्या चिच्छक्तीने बाहेरील सर्व प्रमेयांना प्रकाशरूपत्व देऊन, औषधाला अभिमंत्रणाची जोड दिल्याप्रमाणे अनुग्रह करतात म्हणजे मन, बुद्धी व अहंकार या शब्दादि विषयांना प्रमातृरूपत्व म्हणजेच चिद्रूपत्व प्राप्त करून देतात. हेच हृदयरूप महासागरातील मोठे तरंग होत. ज्ञान आणि कर्मेंद्रिये तरंगानंतर तरंग या न्यायाने एकापाठोपाठ एक असे येतात. यांचे विभूतिमत्व आणि परिस्पंदनत्व पूर्वीच विस्ताराने सांगितले आहे.।।२१।।

******

गाथा क्रमाङ्क २२

अवतरणिका :- यानंतर या गाथेत ग्रंथकार ज्ञानेंद्रियांचे विवरण करतात.

हिअअट्ठिअस्स विहुणो विसआलोओ विसिस्खलो होइ।
णाणन्दिअदीवेसुं णिअणिअगोलग्गणिच्चलग्गेसुं।।२२।।
(हृदयस्थितस्य विभोर्विषयालोको विश्रृङ्खलो भवति।
ज्ञानेन्द्रियदीपेषु निजनिजगोलाग्रनित्यलग्नेषु।।)

अर्थ :- हृदयात असणाऱ्या विभु-प्रकाशस्वरूप परमात्म्याचा रूपरस-शब्दस्पर्शगंधविषयरूप आलोक अर्थात् प्रकाश ज्ञानेंद्रियरूप दिव्यांच्या गोलकांमध्ये यथाक्रम अवस्थित राहतो अर्थात् त्याला कोणीही अडथळा किंवा प्रतिबंध करीत नाही.

विशेष :- हृदयात स्थित असलेल्या विभूचा विषयालोक ज्ञानेंद्रियदीपाचे गोलक म्हणजेच श्रवण, त्वक्, रसना अर्थात् जीभ, चक्षू म्हणजे नेत्र आणि नासिकेपासून शब्द, स्पर्श, रस, रूप आणि गंध या रूपांमध्ये प्रकाशित होत

असतो अर्थात् बाहेर अभिव्यक्त होतो. ज्ञानेंद्रियांच्या द्वारा विषयांचा हा रसास्वाद किंवा भोग हृदयस्थित परमात्म्याच्या स्वरूपभूत विषयालोकाचे अर्थात् विषयरूप प्रकाशाचे कोणीही न अडविलेले बहिर्गत रूप आहे. समस्त विषयस्वादाचे आदि कारण किंवा मूलभूमी म्हणजेच हृदयस्थित महाप्रकाश-स्वरूप परमेश्वर आहे आणि त्याचाच प्रकाश आपल्या ज्ञानेंद्रियांच्या द्वारा प्रकट होऊन शब्द, स्पर्श,रूप, रस आणि गंध या रूपात बहिर्भूत किंवा व्यक्त स्वरूपात असतो.

परिमलव्याख्यार्थ :- व्यापक, परमस्वातंत्र्यशाली व आपल्या शक्तीने सर्व देशकालस्वभावांना आवरण घातलेल्या महाप्रकाशरूप श्रीमहेश्वरांच्या राहण्याला योग्य असे जे सर्वोत्कृष्ट स्थान आहे त्यालाच हृदय असे नाव आहे. यासंबंधी "**श्रीप्रत्यभिज्ञा**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**सैषा सारतया चोक्ता हृदयं परमेष्ठिनः।**" अर्थात् "तीच म्हणजे मी कुंडलिनी शक्तीच साररूपाने परमेश्वराचे हृदय आहे असे म्हटले जाते." तेथे राहणाऱ्या महाप्रकाश श्रीमहेश्वरांचे बाह्य शब्दस्पर्श इत्यादि विषयांचे चहूबाजूंनी साकल्याने आकलन अमर्याद अर्थात् उच्छृंखल होते म्हणजे बाह्य पदार्थांच्या स्वभावांनी नियंत्रण करण्याच्या पलीकडे जाते. त्याला कारण म्हणजे ही ज्ञानप्रधान इंद्रिये ज्ञानाधिक्याने दिव्यासारखी प्रकाशक आहेत व श्रवणत्वादि बाह्यगोलांच्या अर्थात् छिद्रांच्या अग्रभागी विषयोन्मुखतेला योग्य अशा स्थानात नेहमी स्फुरणरूपाने चिकटून राहतात हे होय. ती इंद्रिये श्रवण, त्वचा, चक्षू, जिह्वा व नाक, अशा पाच प्रकारांनी वेगवेगळी होतात. शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध यांचे ग्रहण करण्याचे साधन होणे हे या इंद्रियांचे लक्षण आहे.।।२२।।

❋❋❋❋❋

गाथा क्रमाङ्क २३

अवतरणिका :- आता या गाथेत ग्रंथकार कर्मेंद्रियांचे विवरण करतात.

होन्ति कलणाइ पञ्च खु कम्मपहाणाइ लोअणाहस्स।
फन्दइ सेरं जेहिं जणो जडादो विलक्खणो होन्तो।।२३।।
(भवन्ति करणानि पञ्च खलु कर्मप्रधानानि लोकनाथस्य।
स्पन्दते स्वैरं यैर्जनो जडाद्विलक्षणो भवन्।।)

अर्थ :- लोकनाथांची म्हणजेच विश्ववैचित्र्यामध्ये अभिव्यक्त झालेल्या परमेश्वराची पाच मुख्य कर्मप्रधान करणे अर्थात् कर्मेंद्रिये आहेत. परमेश्वर स्वतः कार्यात प्रवृत्त झाल्यावर या कर्मेंद्रियांकडून जीववर्ग स्पंदित अर्थात्

गतिशील होऊन जडापासून भिन्न असा प्रतीत होतो अर्थात् भासतो. ।।२३।।

विशेष :- या विश्ववैचित्र्याच्या विलासामध्ये जड आणि चेतन यांना भिन्नपणे प्रकट करणारी विश्वनाथांची पाच कर्मेंद्रिये ही श्रोत्र, त्वचा, जिह्वा, चक्षू आणि घ्राण या ज्ञानेंद्रियांद्वारा कार्यात प्रवृत्त होतात. ही कर्मेंद्रिये म्हणजे वाक्, पाणि, पाद, पायू व उपस्थ हे होत. त्यांच्या क्रियाशक्तीने जीववर्ग जड न दिसता जडाहून काहीतरी वेगळा दिसतो. ज्ञानेंद्रियांच्या मागोमाग येणाऱ्या या पाच मुख्य कर्मेंद्रियांमुळे जीवामध्ये स्पंदनशीलता अर्थात् गतिशीलता झाल्यावर जडाहून त्याचे विशिष्टत्व प्रकट होते.

परिमलव्याख्यार्थ :- लोक म्हणजे जड किंवा स्थिर आणि चल किंवा चेतन यांच्या भेदाने दृग्गोचर होणाऱ्या विश्वाचे अर्थात् जगताचे जे नाथ म्हणजेच उत्पत्त्यादि गोष्टींचे संचालक जे स्वामी आहेत त्यांची कर्मप्रधान पाच इंद्रिये आहेत. प्रधान या शब्दाचा अर्थ असा आहे की, ज्ञानेंद्रियात क्रियेचा संबंध असूनही ज्ञानाला प्राधान्य व कर्मेंद्रियात ज्ञानाचा संबंध असूनही क्रियेला प्राधान्य देणे होय. दोन्ही प्रकारच्या इद्रियात ज्ञान व क्रियांना तरतमभाव आहे. या इंद्रियांच्या निमित्ताने मानवप्राणी जन्ममरणादिकांनी पीडित होऊन जड अशा परप्रकाशित स्तंभादिपदार्थाहून वेगळा होऊन हालचाल करतो. ती क्रियादेखील त्या त्या इंद्रियांपासून मिळणाऱ्या विषया-पलीकडे नसते. स्वैर म्हणजे स्वतःला अर्थात् आत्म्याला इंद्रियांची जशी प्रेरणा होते तशा प्रकारे चालणे होय. तशा प्रकारचे स्वैर स्वातंत्र्य म्हणजेच याचा अर्थात् परमेश्वराचा आवरणरहित, स्वच्छ असा प्रकाश म्हणजेच निरुपाधिक ज्ञान होय. ती कर्मेंद्रिये पाच प्रकारची आहेत. ते पाच प्रकार म्हणजे वाणी, हात, पाय, पायू व उपस्थ हे होत. त्यांची लक्षणे म्हणजे क्रमाने बोलणे, घेणे, फिरणे, त्याग व आनंद या क्रियात साधनरूप होणे हे होय.

या ठिकाणी असा विचार करावा की, कर्मेंद्रियांची पुढीलप्रमाणे विभागणी किंवा मांडणी आहे.

अन्तःकरणवर्गेऽस्मिन्नहङ्कारोऽभिमानभूः।
सहकारितया गृह्णन्न्यद्धीमनसोर्द्वयम्।।
प्रवर्तयति कर्तृणां बहिर्ज्ञानं क्रियामपि।
क्रमादेतद्द्वयाक्रान्त्या ज्ञानकर्मेन्द्रियप्रथा।।
तत्र ज्ञानप्रधानं सच्चक्षुराद्युपपादितम्।
कायप्रवृत्त्यभावेऽपि विषयग्रहणक्षमम्।।

कर्मोत्तरेषु तेष्वेव विशेषः परिकीर्त्यते।
क्रिया हि हानमादानमिति द्वेधाऽनुभूयते।।
बाह्याभ्यन्तरभावेन द्वैविध्यं तद्द्वयोरपि।
बाह्यतायां तयोः पायुर्हानप्राधान्यभाग् भवेत्।।
आदानप्रवणः पाणिः पादस्तदुभयक्रियः।
अन्तर्यदेतदखिलं प्राणो वितनुते मरुत्।।
तद्वागिन्द्रियमाख्यातं शब्दसृष्टिविचक्षणम्।
यदेतदुक्तविक्षोभशान्त्या विश्रान्तिरात्मनः।।
तदुपस्थ इति ज्ञेयमानन्दोत्तरमिन्द्रियम्।
सम्भूयवृत्तावप्येषां प्राधान्यं क्वापि कस्यचित्।।

अर्थ :- अंतःकरणसमूहात अहंकार हा अभिमानाची अर्थात् अस्मितेची ज़ागा होय. बुद्धी व मन यांना सहकारी म्हणून स्वीकारून हा अहंकार जीवांना बाह्यविषयांच्या ज्ञानक्रियेत प्रवृत्त करतो. या दोन भिन्न क्रियांमुळे इंद्रियांना ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये अशी नावे व प्रसिध्दी मिळाली. ज्ञानप्रधान चक्षुरादि इंद्रिये क्रियेच्या अभावीही विषयग्रहणाला समर्थ होतात. कर्मप्रधान इंद्रियांविषयी विशेष प्रतिपादन असे की, क्रिया ही टाकणे आणि घेणे या दोन प्रकारांनी अनुभविली जाते. त्या टाकणे व घेणे या क्रियेचे सुद्धा बाह्य आणि आतंर भावाने दोन प्रकार होतात. बाह्य क्रियेत पायू हे इंद्रिय त्यागप्रधान आहे, हात हे ग्रहणप्रधान व पाय हे उभयप्रधान अर्थात् घेणे व टाकणे या प्रकाराचे आहे. अंतःक्रियेत प्राणवायूकडून प्रेरित वाणी शब्दसृष्टी अर्थात् बोलणे करते. या सर्व क्रियांच्या विक्षोभाची शांती झाली की, आनंदप्रधान उपस्थामुळे आत्म्याला विश्रांती मिळते. जरी सामान्यतः हे प्रधानत्वाने सांगितले तरी सामुदायिक कार्यात कोठेही कोणालाही प्राधान्य येईल.।।२३।।

*****

गाथा क्रमाङ्क २४

अवतरणिका :- आता ग्रंथकारांनी या गाथेत शब्दादि पाच महाभूतांचे विवरण केले आहे.

वीसुज्जाणविरूढे गंधप्पमुहे सुगंधिए पुप्फे।
पञ्च वि अग्घाअन्तो कीलइ तेल्लोक्कधुत्तओ देओ।।२४।।
(विश्वोद्यानविरूढानि गन्धप्रमुखानि सुगन्धीनि पुष्पाणि।
पञ्चाप्याजिघ्रन् क्रीडति त्रैलोक्यधूर्त्तो देवः।।)

अर्थ :- हे विश्व म्हणजे एक उद्यान आहे. यात पृथ्वी आदि असाधारण गुणांनी युक्त प्रमुख गंधरूप शब्दस्पर्शरूपरसगंध या विषयांचे स्वतःच रसास्वादन करीत तीनही लोकांमध्ये व्यवहारकुशल अर्थात् व्यवहारकलेत निपुण असलेला परमेश्वर क्रीडा करीत असतो अर्थात् तो आपली स्वतंत्र सत्ता प्रकट करीत असतो. (तो परमेश्वरच समस्त विषयांचा एकमात्र श्रीपरमशिवांच्या रूपात भोक्ता आहे.)

विशेष :- "आजिघ्रन्" याचा अर्थ ग्रहण अथवा अनुसंधान किंवा रसास्वादन करणे हे होय. "क्रीडति" या पदाचा आशय असा आहे की, तो परमात्मा या विश्ववैचित्र्यविलासात आनंदपूर्वक क्रीडा करीत राहतो. "धूर्त" या पदाचा अर्थ विश्वक्रीडाविदग्ध अर्थात् विश्वक्रीडानिपुण परमशिव श्रीविश्वनाथ असा आहे.

परिमलव्याख्यार्थ :- प्रमाण, प्रमेय व प्रमातारूप अर्थात् त्रिरूपस्वरूप, त्रिभुवनातील अतिशय चतुर, या विश्वात ज्ञानाने सर्व व्यवहाराला ज्याने तिरस्कृत केले आहे अर्थात् बाजूला सारले आहे व प्रकाशकत्वामुळे महान् प्रमाता अर्थात् ज्ञाता होऊन विश्व हेच ज्याचे लक्षण आहे अशा उद्यानात उत्पन्न झालेल्या पृथ्वी इत्यादि भूतांच्या असाधारण गंधानी युक्त अशी सुगंधी फुले म्हणजेच रूपरसादिगुणांनी भरलेली पाचविषयरूप फुले (आपल्या) घ्राणादि इंद्रियांनी ग्रहण करून, सेवनातील अडचणी बाजूला सारून व सरळपणाने अनुसंधान ठेवून परमात्मा क्रीडा करीत असतो अर्थात् जरी सर्व विषय एकदम उपस्थित झाले तरी क्रमाक्रमाने सर्वांचा परामर्श घेत आनंदाने खेळतो. या क्रीडेत त्याचे स्वातंत्र्य दृग्गोचर होते. शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे विषय होत. आकाशादि भूतांचे हे गुण व कर्णादि इंद्रियांनी ग्राह्य असणे हे त्याचे लक्षण होय. (हे विचाराने ठरवावे व मानावे.) गंधाचा उल्लेख आधी उपसंहारक्रमाने आणि तन्मात्रांमध्ये गंधाचे प्राधान्य अर्थात् गंध ही तन्मात्रा प्रधान म्हणजे मुख्य आहे हे दाखविण्यासाठी केला.

यासंबंधी अभियुक्तांनी असे म्हटले आहे की -

इन्द्रियद्वारसङ्ग्राह्यैर्गन्धाद्यैरात्मदेवताः ।
स्वभावेन समाराध्या ज्ञातुः सोऽयं महामखः ।।

अर्थ :- इंद्रियरूप द्वारांनी घेतलेल्या गंध इत्यादि विषयांनी आत्मदेवतांची आराधना स्वाभाविकपणे करावी. हाच ज्ञात्या अर्थात् ज्ञानी जनांचा महान् यज्ञ होय किंवा आहे. (हे इंद्रियलालन किंवा नुसते विषयसेवन करणे नाही.)

सारांश -

गन्धोऽपि निरूप्यमाणः पृथिवी।
पृथिव्या उपरि न किञ्चिद् भूतान्त-
रमित्यत्रोत्कर्ष इति रहस्यम्।।२४।।

अर्थ :- गंध म्हणजे पृथ्वी होय. पृथ्वीनंतर दुसरे कोणतेही भूतमात्र नाही असा येथे उत्कर्ष आहे. हेच (या गाथेचे) रहस्य होय.।।२४।।

******

गाथा क्रमाङ्क २५

अवतरणिका :- यानंतर या गाथेत ग्रंथकार पंचमहाभूतांचे विवरण करतात आणि भूतपंचकाचे स्वरूप सांगतात.

थिण्णस्स कमवसादो इक्खुरसस्स व सिवप्पआसस्स।
गुलपिण्डा इव पञ्च वि भूदाइं महुरदं ण मुश्चन्ति।।२५।।
(स्त्यानस्य क्रमवशादिक्षुरसस्येव शिवप्रकाशस्य।
गुडपिण्डा इव पञ्चापि भूतानि मधुरतां न मुञ्चन्ति।।)

अर्थ :- ज्याप्रमाणे हळूहळू अर्थात् क्रमाक्रमाने वाढलेल्या म्हणजेच अधिक घनीभूत झालेल्या उसाच्या रसाची मधुरता अर्थात् गोडपणा गुळाच्या ढेपी न सोडता तो गोडपणा त्या (एकरस-समानरूपाने) आपल्यात धारण करतात अर्थात् स्वपाकयुक्तिक्रमाने उसाच्या रसाची गोडी धारण करतात त्याचप्रमाणे आकाश, वायू, तेज, जल आणि पृथ्वी ही पाचही तत्त्वे सच्चिदानंद-स्वरूप, रसानंदघनस्वरूप व प्रकाशस्वरूप परमेश्वराच्या घनीभूत अर्थात् घनदाट आह्लादाचा म्हणजेच रसानंदमाधुर्याचा त्याग करीत नाहीत. ती तत्त्वे आपल्या आपल्या सीमेमध्ये गुळाच्या ढेपीप्रमाणे त्या दिव्य परमात्म माधुर्यात बुडून राहतात.।।२५।।

विशेष :- रसस्वरूप परमात्मा म्हणजे श्रीशिवात्मा हाच प्रकाश आहे. तो सर्व भूतांमध्ये अर्थात् तत्त्वांमध्ये व्याप्त माधुर्यमय प्रकाशाने म्हणजेच प्रकाश-स्वरूपाने परिव्याप्त अर्थात् सर्वत्र भरलेला आहे. आकाशादि पंचमहाभूते श्रीपरमशिवप्रकाशाने उल्लसित झालेल्या महा आह्लादयुक्त सामरस्याचा अर्थात् समरसतेचा त्याग करीत नाहीत. श्रीशिवांद्वारे आणि या पंचभूतांच्या द्वारा हे माधुर्य धारण करण्यामध्ये या माधुर्याच्या घनीभूततेमध्ये आधिक्यक्रमानेच भेद आहे; परंतु भेद किंवा वेगळेपणा हा धारण करण्यात आहे, सामरस्य किंवा एकरसतेत नाही; कारण रसमय परमात्मा हा सर्वत्र एकरस व्यापक

आहे. यासंबंधी अशी श्रुतीही आहे की, "**रसौ वै सः।**"

परिमलव्याख्यार्थ :- श्रीशिवात्मा हेच खरोखर प्रकाश होत. तेच शक्तिसदाशिवादि क्रमानुसार मूर्त व मूर्ततर होत होत येथे प्रस्तुत केलेल्या सांप्रतच्या पंचभूतांपर्यंत घनरूपता धारण करतात. त्याबरोबरच प्रकाशरूपाचे ज्ञातृत्व कमी कमी होत जाते आणि ज्ञेयत्वाची पराकाष्ठा होऊन अत्यंत व्यक्त अशी काठिन्यता अनुभवाला येते.

यासंबंधी "**श्रीशिवदृष्टी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

......इत्यादिषट्त्रिंशत्तत्त्वरूपताम्।
बिभ्रद् बिभर्ति रूपाणि तावतो व्यवहारतः।।
यावत् स्थूलं जडाभासं संहतं पार्थिवं घनम्।

अर्थ :- छत्तीस तत्त्वांचे रूप धारण करणारे (ते श्रीशिव) इतरही रूपे घेत घेत व्यवहारासाठी स्थूल व जडाप्रमाणे भरीव पार्थिव रूपे घेतात.

त्या (श्रीशिवांची) मधुरता व समरसता ही आकाशादि पंचमहाभूते टाकत नाहीत. समरसता म्हणजे सर्वज्ञस्वभावी श्रीपरमशिवांच्या प्रकाशकिरणांचा महान् आनंद होय. हा आनंद पंचभूतात कमी-अधिक प्रमाणात असतो. महाभूते या आनंदाला गर्भात वागवितात आणि कार्य करतात. श्रीशिव आणि पंचमहाभूते यात फरक असा आहे की, श्रीशिव स्वच्छप्रकाशरूप आहेत आणि भूते व्यक्त व घन किंवा भरीव स्वरूपाची असतात. याला दृष्टान्त असा देतात की, ऊसाचा रस व त्याच्या पाकाने भरीव बनविलेले गुळाचे खडे त्या उसाच्या रसाची मधुरता टाकून देत नाहीत.

त्याचप्रमाणे "**श्रीपरमार्थसार**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

रसफाणितशर्करिकागुडखण्डाद्या यथेक्षुरस एव।
तद्वदवस्थाभेदाः सर्वे परमात्मनः शम्भोः।।

अर्थ :- ज्याप्रमाणे रस, काकवी, साखर आणि गूळ आदि पदार्थ म्हणजे उसाचा रसच होत त्याचप्रमाणे हे अवस्थांचे विविध प्रकार म्हणजे परमात्मा श्रीशंभूंच्याच अवस्थांचे प्रकार होत.

याचाच अर्थ असा आहे की, श्रीशंभूंच्या म्हणजे परमेश्वराच्या सृष्टीतील सर्व पदार्थ हे वेगवेगळी रूपे किंवा अवस्था होत. श्रीशंभू हे सर्ववस्तुरूपी आहेत म्हणून त्या सर्व पदार्थांमध्ये त्यांचा स्वभावविशेष हा अंशांशरूपाने आला आहे.

त्याचप्रमाणे "**श्रीलक्ष्मीतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

संविदेव हि रूपं मे स्वच्छस्वच्छन्दनिर्भरा।
सापीक्षुरसवद्यो योगात् स्त्यानतां प्रतिपद्यते।
अतो निरूप्यमाणं तच्चैत्यं चित्त्वमुपैष्यति।।

अर्थ :- माझे (श्रीशिव) रूप म्हणजेच संवित् असून ती स्वच्छत्वस्वातंत्र्याने भरगच्च भरलेली आहे. वस्तुसंयोगाने ती संवित् उसाच्या रसाप्रमाणे भरीव होते आणि त्यामुळे पदार्थ निरूपणप्रसंगी चैत्य म्हणजे चित्संबंधी पदार्थांना चिद्रूपता येते.

त्यामुळे पृथ्वीमध्ये श्रीशिवाश्रित नसलेली पस्तीसही तत्त्वे कारणाच्या मागोमाग स्फुरतात अर्थात् प्रकाशित होतात. अशा रीतीने पृथ्वी आदि सर्व वस्तू श्रीशिवतत्त्वामध्ये सत्कार्यवादाच्या प्रक्रियेप्रमाणे स्थिर राहतात. (सत्कार्यवादाच्या म्हणजे कार्य हे उत्पत्तीपूर्ती कारणामध्ये विद्यमान असते, असे सांगणारा सिद्धान्त होय. ज्याप्रमाणे तेल हे तिळामध्ये व घट हा माती-मध्ये त्याप्रमाणेच सृष्ट्युत्पत्तीपूर्वी सर्व तत्त्वे श्रीशिवांमध्ये स्थित असतात.) अशा प्रकारे प्रकृतिपुरुषामध्ये असणारी वरची व खालची तत्त्वे एकमेकात संमिलित होतात. त्यामुळे संविद्रूपत्वाने व सत्कार्यवादाने सर्व वस्तू सर्वात्मक आहेत असे सार किंवा तात्पर्यार्थ होय.

"**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात याबद्दल असे म्हटले आहे की -

एकैकत्र च तत्त्वेऽपि षट्त्रिंशत्तत्त्वरूपता।

अर्थ :- प्रत्येक तत्त्व सर्वतत्त्वात्मक म्हणजे छत्तीस तत्त्वात्मक आहे.

सारांश, अखिल विश्ववैचित्र्य सर्वप्रकारे परमेश्वराच्या प्रकाशस्फुरणाने युक्त आहे असे सांगितल्याप्रमाणे आहे.

या दृष्टीने "**श्रीशिवदृष्टी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

एवं सर्वपदार्थानां समैव शिवता स्थिता।
परापरादिभेदोऽत्र श्रद्दधानैरुदाहृतः।।

अर्थ :- अशा प्रकारे सर्वपदार्थांचे श्रीशिवत्व समान आहे. सश्रद्ध विद्वानांनी सामान्यजनांच्या दृष्टीने व शक्तीनुसार पर व अपर म्हणजे श्रेष्ठ व कनिष्ठ असा भेद सांगितला आहे.

(सामान्यजनांच्या दृष्टीने किंवा शक्तीनुसार) भूते म्हणजेच आकाश, वायू, तेज, आप आणि पृथ्वी ही आहेत हे प्रसिद्ध आहे आणि त्यांचे शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे गुण आणि त्यांची लक्षणे स्पष्ट आहेत. पोकळी व शब्द करणे (आकाश), हालचाल व जीवन (वायू), पचन व पोळणे (तेज),

पातळ होणे व तरंगणे (वाहणे) (जल), कठिनता व धारण करणे (पृथ्वी) ही देखील भूतांची क्रमाने लक्षणे होत. येथे **"वर्णक्रमे पृथिव्यादि-पुरुषान्तं स्पर्शाक्षराणि"** अर्थात् "वर्णक्रमात पृथ्वी ते पुरुष अखेर पंचवीस तत्त्वे म्हणजे क वर्ग ते प वर्ग अखेर पंचवीस अक्षरे आहेत," असे **"श्रीत्रिंशिका"** या ग्रंथातील नियमानुरूप पूर्वीच (आम्ही) वर्णिले आहे. (स्पर्श, दंत, जिह्वा व ताल्वादि संयोगाने उत्पन्न होणारी व्यंजने) ही **"श्रीपंचकंचुकी"** या ग्रंथात पृथ्व्यादि व "क"कारादि अंत:स्थ वर्ण आहेत असे म्हटले आहे. त्यात नियती ही सर्वात भरलेली अर्थात् व्यापलेली असल्याने वेगळी गणली नाही. कालाचा संबंध पुरुषाशी **"मायाप्रमातृता-दानं प्रत्यौचित्यं न विद्यते।"** अर्थात् "माया व प्रमातृता यांच्याविषयी अनुचित अर्थात् अयोग्य वाटल्यामुळे येथे दिलेला नाही." (ज्ञान हे कालावर अवलंबून नाही;) कारण काल हा आकाशाची शक्ती आहे व चिन्मयतेशी एकत्व प्रतिपादन करणारा आहे. त्यासाठी **"श्रीशिवदृष्टी"** या ग्रंथातच असे सांगितले आहे की, **"वाय्वग्निसलिलेन्द्राणां धारणानां चतुष्टयम्"** अर्थात् "वायू, अग्नी, जल आणि इंद्र अर्थात् अंतरिक्षजलस्वामी हे चार अंतस्थ व सृष्टिधारक आहेत." त्याचप्रमाणे श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांनी असे म्हटले आहे की, **"आकाशशक्त्या तु नात्र मायाप्रमातृतादाने प्रयोजनमस्ति।"** अर्थात् "मायाप्रमातृता पुरुषाला देण्यासाठी आकाशशक्तीची काहीही आवश्यकता नसते." शुद्धविद्येपासून श्रीशिवांपर्यंतची तत्त्वेही ऊष्मवर्ण होत. **"ह"**कार हा श्रीशिव आणि शक्ती आहे; कारण तो सर्वांच्या पलीकडचा असून सर्जनशक्तीशी एकरूप आहे. श्रीशिव आणि शक्ती ही दोन्हीही एकरूप किंवा एकमेकांशी समरसच आहेत. त्यांच्यातील भेद हा काल्पनिक आहे.

यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की -

तदूर्ध्वं शादि विख्यातं पुरस्ताद् ब्रह्मपञ्चकम्
षट्त्रिंशत्यत्र तत्त्वेषु पृथ्व्यम्बुपवनादय:।
ते ते पदार्था: संयुक्त्या मिश्रिता बहुशाखया।।
स्तम्भकुम्भादिभावेन कुर्वन्त्यर्थक्रियां नृणाम्।
तत्र कर्मेन्द्रियैरुक्तैर्बहिष्ठास्ते घटादय:।।
अर्प्यन्ते सन्निकर्षेण व्यवहर्तृजनं प्रति।
सांविदैरिन्द्रियैस्त्वेते निरीक्ष्यन्ते तथा तथा।।

अन्तःकरणवर्गेण सङ्कल्पितविकल्पिताः।
निश्चिताभिमताश्चैते विद्यया च विवेचिताः।।
कलाकालादिभिर्भावैर्वेद्यत्वेनानुरञ्जिताः।
विश्राम्यन्ति विमर्शाढ्ये स्वात्मरूपे प्रमातरि।।
स च प्रमाता देहेऽस्मिन् प्राणे धीशून्ययोरपि।
बध्नाति यैरहम्भावं ते सद्विद्यादयः क्रमात्।।
एवं परामर्शमयीं प्रतिष्ठां लक्ष्माहुराप्ताः परमस्य शम्भोः।
एतद्विपर्यासवशात् पशुः स्यात् प्रमाणमस्मिन् गुरुशासनं नः।।

अर्थ :- शादि अर्थात् "श" आदि वर्ण हे श्रेष्ठ व प्रख्यात असे ब्रह्मपंचक आहे. छत्तीस तत्त्वांमध्ये पृथ्व्यादि पदार्थ अनेक प्रकारांनी मिसळून स्तंभ व कुंभादि भागाने मनुष्यांची कामे करतात किंवा त्यांना उपयोगी पडतात. कर्मेंद्रियांकडून बाह्य घटादि वस्तू कर्त्या पुरुषाला दिली जाते. ज्ञानेंद्रियांकडून त्या त्या वस्तूंचे निरीक्षण केले जाते. अंतःकरणवर्गाकडून संकल्पितत्व, निश्चितत्व व अहंतृत्व कल्पिले जाते. ज्ञानाने त्यांचे विवेचन योग्यत्वादि केले जाते. कला व कालादि भावाने त्यांना वेद्यत्व येते व आत्मप्रकाशरूप विमर्शात ते विषय विसावतात म्हणजेच स्वात्मरूप प्रकाशाशी ते एकरूप होतात. तो प्रमाता अर्थात् जीव धीशून्य म्हणजे बुद्धिशून्य अर्थात् ज्ञानशून्य देह व प्राण यांविषयी ज्यांच्यामुळे अहंता बाळगतो ते सद्विद्यादिक क्रमाने असतात. अशा प्रकारे श्रीपरमशिवांचे लक्षण म्हणजे प्रकाशरूप ब्रह्माची सहज स्फुरणरूपात स्थिती प्राप्त होणे किंवा असणे हे होय. याच्या अगदी विरुद्ध स्थिती असता ते पशुत्वच होय. याला प्रमाण म्हणजे आमच्या श्रीसद्गुरुदेवांचे वचन होय.।।२५।।

*****

गाथा क्रमाङ्क २६

अवतरणिका :- आतापर्यंत सांगितलेल्या तत्वप्रपंचाचा अर्थात् तत्त्वविस्ताराचा मथितार्थ या पुढच्या कारिकेत ग्रंथकारांनी सांगितला आहे.

सव्वस्स भुवणविब्भमजन्तुल्लासस्स तन्तुवल्लिव्व।
विमरिससंरम्भमई उज्जिम्भइ सम्भुणो महासत्ती।।२६।।
(सर्वस्य भुवनविभ्रमयन्त्रोल्लासस्य तन्तुवल्लीव।
विमर्शसंरम्भमयी उज्जृम्भते शम्भोर्महाशक्तिः।।)

अर्थ :- भुवनविभ्रमयंत्रोल्लास अर्थात् विश्वाच्या उभारणी व संहारणीरूप

यंत्राचा उल्लास हा श्रीपरमशिवांमध्ये आपल्या स्वांत:स्फुरित शक्तिद्वारे ज्याप्रकारे (कंठभुजादि स्थानांची)यंत्रे एकाच दोऱ्यात ओवलेली किंवा बांधलेली असतात त्याचप्रकारे बांधलेला आहे. ही शक्ती श्रीपरमशिव परमेश्वराचीच महाशक्ती आहे. त्या शक्तीमध्ये समस्त संयोजन व वियोजनमय म्हणजेच उभारणी व संहारणीयुक्त भुवनतत्त्वांचा विलास किंवा विस्तार ओतप्रोत भरलेला आहे.।।२६।।

विशेष :- श्रीपरमशिवांची स्वांत:स्फुरित विमर्श व संरंभमयी अर्थात् ज्ञान व ऊर्जेने युक्त अशी शक्ती शुद्ध विद्यास्वरूपिणी आहे. ही शक्ती चिद्, आनंद, इच्छा, ज्ञान आणि क्रियारूप शक्तिपंचक आहे. श्रीशंभू द्वैताद्वैत-विवर्जित अनुत्तरात्मा परमेश्वर आहेत. त्यांची अभिन्न स्वभावाची महाशक्ती या भुवनविभिन्नरूप यंत्रोल्लासाच्या संयोजन व वियोजन अथवा सृष्टिसंहारा-मध्ये स्वत: स्फुरित असते म्हणजेच क्रियाशील असते. या तंतुवल्लीरूप महाशक्तीमध्येच समस्त भुवनाचे क्रिया व कलाप अनुस्यूत आहेत. "भुवन-विभ्रम" म्हणजेच विश्ववैचित्र्यविलास श्रीपरमशिवांचेच रूप आहे. त्यांच्याशिवाय कोणाचीच सत्ता किंवा अस्तित्व नाही. श्रीशिव त्यांच्या महाशक्तीने युक्त होऊन शक्तिमान् होतात.

"**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथात सर्वतंत्र स्वतंत्र परमेश्वराने असे म्हटले आहे की -

मत्तः परतरं नान्यत्किञ्चिदस्ति धनञ्जय।
मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव।।७-७।।
यथाकाशस्थितो नित्यं वायु:सर्वत्रगो महान्।।
तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय।।९-६।।

याचा आशय असा आहे की, माझ्याहून भिन्न असे दुसरे कोणतेही श्रेष्ठ तत्त्व किंवा कारण नाही. हे संपूर्ण जगत् सूत्रामधील मण्याप्रमाणे माझ्यामध्ये गुंफलेले आहे. ज्याप्रमाणे आकाशापासून उत्पन्न झालेला व सर्वत्र संचार करणारा वायू नेहमी आकाशात स्थित असतो त्याप्रमाणे माझ्याच संकल्पापासून उत्पन्न झाल्याने संपूर्ण भूतमात्रे माझ्यामध्येच म्हणजे परमात्म्यातच स्थित असतात. त्यामुळेच हे स्पष्ट आहे की, श्रीशिवांची स्वांत:स्फुरित शुद्धविद्या-स्वरूपिणी महाशक्ती त्यांच्याशी अभिन्न आणि श्रीशिवस्वरूपिणी आहे. शक्ती आणि शक्तिमान् यांमध्ये अभेदच असतो.

परिमलव्याख्यार्थ :- हा जो तत्वांचा अर्थात् भुवनोत्पादक वस्तूंचा विलास अर्थात् विकास म्हणजेच प्रसरणरूपता आहे ती प्रसरणरूपताच

श्रीशिवांची महाशक्ती आहे. ती सर्व कार्यांमध्ये अनुस्यूत असते. ज्याप्रमाणे लाकडाच्या बाहुल्यांना वाटेल तसे इच्छेप्रमाणे फिरविणे वगैरे क्रिया करविणारी बाहुल्यांच्या वेगवेगळ्या अवयवसंधीतून ओवलेल्या सूत्रांची माळ असते त्याप्रमाणे ही सहजस्फुरणमयी शक्ती आहे. ते श्रीशंभू हे परमानंद प्रकाशाने सांद्र, भरीवरूपाचे व विश्वमय असून विश्वाच्या पलीकडचे आहेत. स्वतंत्र अशा काल, अग्नी व रुद्रापर्यंत जे विश्ववैचित्र्य आहे त्याचा संयोग व वियोग अर्थात् उभारणी व संहारणी करण्यात कुशल असणाऱ्या श्रीपरमशिवभट्टारकांची ती स्वतंत्र व मोठी शक्ती आहे. ती शक्ती तत्त्वांच्या परस्परांतील योजनादि कार्यांमध्ये कुशल आहे. इतकेच नव्हे; तर स्वतंत्र अशा श्रीशिवभट्टारकांनाही पृथ्व्यादितत्त्वांप्रमाणे ताब्यात घेऊन ती वाढते व त्या त्या रूपाने स्फुरण पावते.

या दृष्टीने "**श्रीपर्यंतपंचाशिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

चित्स्वाभाव्यादसौ देवः स्वात्मना विमृशन् प्रभुः।
अनाश्रितादिभूम्यन्ता भूमिकाः प्रतिपद्यते।।

अर्थ :- स्वाभाविक चिद्रूपत्वामुळे हा प्रकाशमान देव स्वतःच विचार करून कालादिकांपासून पृथ्वीपर्यंतच्या सर्व भूमिका वठविती.

ती विमर्श शक्ती संरंभमय आहे अर्थात् ती विमर्श नावाच्या संरंभाने म्हणजे स्वांतःस्फुरित क्रियाशक्तिस्वरूपाने केलेली अर्थात् बनलेली आहे. ती चित्, आनंद, इच्छा, ज्ञान व क्रियारूप शक्तिपंचकांशी सामरस्य होणाऱ्या अशा स्वभावाची आहे. तिच्यापासूनच हे चित्रविचित्र विश्व दृग्गोचर होते. या विश्वात तत्त्वांच्या परंपरांचे स्फुरण व प्रकाश खच्चून भरलेला आहे. त्याचप्रमाणे परमेश्वराच्या ज्ञानविस्ताराला ग्रहण करण्याची शक्तीही या विश्वावतरणात आहे. अशा प्रकारचे हे विश्ववैचित्र्य आहे. या संबंधी "**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**चितिः स्वतन्त्रा विश्वसिद्धिहेतुः।**" अर्थात् "ही चिच्छक्ती स्वातंत्र्याने विश्वनिर्मिती करते." ते हे श्रीपरमशिवभट्टारक महाप्रमाता अर्थात् ज्ञाते असून छत्तीस तत्त्वांचा सर्व समुदाय त्यांनी आत्मसात केला आहे. त्यामुळे त्यांना सदतीसावे तत्त्व म्हणून म्हटले जाते. त्यांची तशा प्रकारची रूपता ही विकल्पकक्षेत अनुप्रवेश करते. सर्व विश्वाच्या पलीकडे असणाऱ्यात प्रकार नसावेत म्हणून काही आगम ग्रंथांमधून श्रीपरमशिवांना विकल्परहित असे अडतीसावे तत्त्व मानले आहे.

या दृष्टीने "**श्रीतंत्रवटधानिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

षट्त्रिंशत्तत्त्वपर्यायस्तदभिन्नः परः शिवः।
उपदेश्यतया सोऽपि स्यादवच्छेदभागतः।।
अष्टात्रिंशं परं धाम यत्रेदं विश्वकं स्फुरेत्।

अर्थ :- (श्रीपरमशिवभट्टारक हे) छत्तीस तत्वांच्या पलीकडे असून त्याहून अभिन्न असे श्रीपरशिव निर्देशिण्याला अर्थात् उपदेश्य म्हणून योग्य आहेत; कारण तत्वांची उपाधी त्यांना लागली आहे. त्यामुळे श्रीपरमशिव हे अडतिसावे तत्त्व आहेत. ते परम तेजस्वी व श्रेष्ठ आहेत. त्यांच्यापासून हे विश्व स्फुरले आहे.

याशिवाय श्रीशंभू हे सर्वश्रेष्ठ व्यापकरूपाचे व त्यांची शक्तीही स्वभावाने त्यांच्यासारखीच आहे. "**अ**"कारादिस्वरसमुदायमय विसर्ग हे तिचे (वर्णानुक्रमारोधाने) दुसरे नाव आहे. ती अतीव आनंदाने, उन्मेषाने व थोड्याशा चंचलतेमुळे अनुत्तर अशा आत्मतत्वात विलीन होते. वर्णप्रत्याहारक्रमाने म्हणजेच "**अ**" पासून "**ह**" पर्यंतच्या क्रमाने सर्व ज्ञानाचा समावेश ज्यात आहे असा "**अहं**" पदार्थ म्हणजे तत्त्व निर्माण किंवा उदित होते. हे तत्त्व "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात असे सांगितले आहे की, "**महाह्रदानुसन्धानान्मन्त्रवीर्यानुभवः।**" व "**मातृकाचक्रसम्बोधः।**" अर्थात् "महाह्रदाशी म्हणजे महाडोहाशी अर्थात् दैवी शक्तीच्या अनंत अशा साठ्याशी किंवा निधीशी अनुसंधान केल्यामुळे व अंतर्मुख होऊन आत्म्याशी अखंड तादात्म्य साधल्यामुळे सर्वश्रेष्ठ श्रीशिवतत्त्वाची जाणीव अर्थात् सर्व मंत्रांची निर्माती असलेल्या परासंवित्ची म्हणजे मंत्रवीर्याची अनुभूती येते," व "मातृकाचक्राचे सम्यक् ज्ञान होते," अशा प्रकारे उपदेशिले आहे.

"**श्रीकंठीयसंहिता**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

आदिमान्तविहीनास्तु मन्त्राः स्युः शरदभ्रवत्।
गुरोर्लक्षणमेतावदादिमान्तं निवेदयेत्।।

अर्थ :- आदि म्हणजे सुरुवात व अंत म्हणजे शेवट नसलेले मंत्र हे शरदऋतूतील मेघांसारखे (निष्फळ) असतात. श्रीसद्गुरूंचे लक्षणच हे आहे की, ते आदि व अंतयुक्त (किंवा "**अ**" काराने सुरुवात होणारे व "**म**" काराने शेवट होणारे) मंत्र सांगतात.

त्याचप्रमाणे आमच्या श्रीसद्गुरूंनी "**श्रीसंवित्स्तोत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

आदिमान्तिमगृहीतवर्णराश्यात्मिकाहमिति या स्वतः प्रथा।

मन्त्रवीर्यमिति साधितागमैस्तन्मयो गुरुरसि त्वमम्बिके।।

अर्थ :- आदिम व अंतिम म्हणजेच "**अ**" आणि "**ह**" हे वर्ण घेतलेले "**अहम्**" हे जे ज्ञान देणारे पद आहे त्याला आगमतंत्राच्या अभ्यासकांनी मंत्रवीर्य असे म्हटले असून हे अंबिके! तू "**अहं**" वर्णयुक्त मंत्रवीर्यमय अथवा मंत्रमय अशी श्रीसद्गुरू आई आहेस.

वीराचे लक्षण किंवा धर्म म्हणजे वीर्य होय. वीर म्हणजे विविध विश्व-वैचित्र्याची प्रेरणा करणारा म्हणजेच भगवान् शब्दराशी श्रीशिवभट्टारक होय.

यासंबंधी "**श्रीचिद्गगनचंद्रिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

ईरणेन विविधेन वीरतां योऽयमक्षरगणः प्रपद्यते।।

अर्थ :- जो म्हणजे हा अक्षरांचा समुदाय विविध प्रकारच्या प्रेरणांनी "**वीरत्वाला**" प्राप्त होतो.

"**श्रीप्रभाकौल**" या ग्रंथातही असे म्हटले आहे की -

वामे वीराः समाख्याताः।

अर्थ :- वामतंत्रामध्ये वीर (साधना) करावी असे सांगितले आहे.

हेच "**श्रीत्रिंशिकाशास्त्र**" या ग्रंथात असे स्पष्ट केले आहे की -

सर्वेषामेव मन्त्राणां विद्यानां च यशस्विनि!।
इयं योनिः समाख्याता सर्वतन्त्रेषु सर्वदा।।

अर्थ :- हे यशस्विनी! सर्व मंत्र व विद्या यांची ही योनी अर्थात् शक्ती हीच मूलकारण आहे असे सर्व तंत्रात उल्लेखिलेले आहे.।।२६।।

*****

गाथा क्रमाङ्क २७

अवतरणिका :- आगमांमध्ये सहा मार्ग सांगितलेले आहेत. त्यांच्यामध्ये तत्त्वसमुदायरूप असा एक अंश किंवा विभाग आहे. इतरत्र तुम्ही सांगितलेला अर्थ कसा योग्य होईल? अशी पृच्छा करणाऱ्यांची शंका दूर करण्याकरिता व तत्त्वजिज्ञासा पूर्ती करण्यासाठी यापुढील गाथेचा तात्पर्यार्थ ग्रंथकार सांगत आहेत.

जं अत्थाण अछक्कं तत्थ पआसत्थलक्खणं अद्धं।
विमरिससद्दसहावं अद्धं ति सिवस्स जामलुल्लासो।।२७।।
(यदध्वनां च षट्कं तत्र प्रकाशार्थलक्षणमर्धम्।
विमर्शशब्दस्वभावमर्धमिति शिवस्य यामलोल्लासः।।)

अर्थ :- सर्वत्र श्रीशिवांचा उन्मेष व निमेषात्मक यामल म्हणजेच दोन

स्वभावांचा उल्लास अभिव्यक्त झालेला आहे. अध्वांची म्हणजे वर्णांची सहा अंगे म्हणजेच वर्ण, पद, मंत्र, कला, तत्त्व आणि भुवन ही आहेत. त्यांचा प्रकाशार्थ म्हणजेच लक्षण केवळ अर्धमात्र आहे. अशा प्रकारेच विमर्श शब्द स्वभावतः अर्धमात्र आहे. या सहा अंगांनी युक्त अध्व अर्थात् मार्ग हा श्रीपरमशिवांचा उन्मेषनिमेषात्मक दोन प्रकारांचा चमत्कार अर्थात् उल्लास आहे.।।२७।।

विशेष :- आगमशास्त्रात सहा अध्वांचे म्हणजे मार्गांचे वर्णन आलेले आहे. वर्ण, पद, मंत्र, कला, तत्त्व आणि भुवन हेच सहा अध्व आहेत. यांच्यातील प्रत्येकाचा विस्तार खूप मोठा आहे. "**अ**" पासून "**ज्ञ**" पर्यंत वर्णांची संख्या पन्नास आहे. पदे व्योमव्याप्य अर्थात् आकाशाने व्याप्त असलेल्या मंत्रमर्यादेच्या क्रमाने एक्याऐंशी आहेत, मंत्र ब्रह्मपंचकासहित अकरा आहेत व निवृत्त्यादि कला पाच आहेत. तत्त्वे एकूण छत्तीस आहेत. त्यांचे वर्णन "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथाच्या तेरा ते सव्वीस या गाथांमध्ये आलेले आहे. भुवने दोनशे चोवीस आहेत. हे सर्व कलापंचकामध्येच अनुस्यूत आहेत. सर्व वाच्यवर्ग श्रीशिवांच्या उन्मेषरूप शक्तीचेच कार्य आहे. वर्ण, पद, मंत्र, कला, तत्त्व आणि भुवन यांच्यामध्ये प्रकाशरूप श्रीशिवांच्या शक्तीचाच विलास आहे. हा वाच्यवर्ग प्रकाशपरमार्थरूपामध्ये प्रकाशविमर्शात्मक उन्मेषनिमेषरूप शक्तीचा चमत्कार आहे. या अध्वांचा एक अर्ध भुवनतत्त्वकलास्वभावरूप आहे आणि दुसरा अर्ध मंत्रवर्णपदात्मक आहे. प्रत्येक अर्ध हा स्थूल, सूक्ष्म आणि परक्रियाक्रमाने तीन प्रकारचा आहे. पहिला अर्ध अभिधेय आहे आणि दुसरा अर्ध अभिधान आहे. अशा तऱ्हेने सर्व वाच्यवर्ग हे प्रकाशपरमार्थ आहेत. वाचक विमर्शशरीर व श्रीशिव प्रकाशविमर्शात्मा आहेत. वर्ण, कला, पद, तत्त्व, मंत्र व भुवन अध्वषट्क हे सर्व चिदात्मादेवी अर्थात् श्रीशक्तीमध्ये विभासित आहेत.

या दृष्टीने "**श्रीसौभाग्यहृदयस्तोत्र**" यात असे वर्णन आले आहे की -

वर्णः कला पदं तत्त्वं मन्त्रो भुवनमेव च ।
इत्यध्वषट्कं देवेशि भाति त्वयि चिदात्मनि।।

अर्थ :- हे देवेशी! वर्ण, कला, पद, तत्त्व, मंत्र आणि भुवन हे अध्वषट्क तुझ्या चिदात्म्यातच भासतात.

त्याचप्रमाणे "**श्रीस्वच्छंदतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, हे सहा अध्व बंधनमात्र आहेत.

मुक्तानां शिवताव्यक्तिकारणं विश्वमेव हि।

शिवताव्यक्तिमार्गत्वात् ते सर्वेऽपि कलादयः।
अध्वशब्देन कथ्यन्ते ते सर्वे बन्धना अपि।।

अर्थ :- मुक्त पुरुषांना विश्वच श्रीशिवरूपाने व्यक्त आहे असे भासते. श्रीशिवांच्या अभिव्यक्तीला हे कलावर्णादि कारणीभूत आहेत म्हणून त्यांना मार्ग असे म्हटले असून जीवांना ते बंधनकारकच आहेत.

"**श्रीविज्ञानभैरव**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, जोपर्यंत मनाचा "**स्वसंवेद्य**" परमात्म्यात लय होत नाही तोपर्यंत भुवन-अध्वादिरूपाने क्रमशः स्थूल, सूक्ष्म आणि पर स्थितीमध्ये समस्त विश्वविमर्शाचे चिंतन केले पाहिजे.

भुवनाध्वादिरूपेण चिन्तयेत् क्रमशोऽखिलम्।
स्थूलसूक्ष्मपरस्थित्या यावदन्ते मनोलयः।।

अर्थ :- साधकयोग्याने हे अखिल विश्व भुवनापासून क्रमाक्रमाने सहाही मार्गरूपाने ध्यानात आणावे म्हणजेच या विश्वाचे स्थूल, सूक्ष्म व पर अशा क्रमाने ध्यान करावे व मनोलय होईपर्यंत ध्यानसातत्य ठेवावे. अशा प्रकारे सर्व विश्ववैचित्र्याचा प्रकाशविमर्श हा उन्मेष व निमेष या दोन भावांमध्ये परिलक्षित होत असतो.

परिमलव्याख्यार्थ :- सहा अध्वा अर्थात् मार्ग आहेत असे आगमात प्रसिद्ध आहे. ते वर्ण, पद, मंत्र, कला, तत्त्व व भुवने असे सहा आहेत. त्यांपैकी वर्ण हे पन्नास आहेत. पदे जरी अनंत असली तरी व्योमव्याप्य वगैरे मंत्रमर्यादेने ती पदे एक्याऐंशी आहेत. त्याचप्रमाणे मंत्रही अनंत असले तरी ब्रह्मपंचक आणि अंगषट्क मिळून संक्षेपतः अकरा आहेत. कला या निवृत्त्यादि पाच आहेत. तत्त्वे आधी सांगितल्याप्रमाणे छत्तीस आहेत. भुवने ही काल, अग्नी व रुद्रांपासून अनाश्रित अखेर एकूण दोनशे चोवीस आहेत. हे सर्व कलापंचकात अंतर्भूत केले आहेत. तो समावेश असा आहे. निवृत्ती या एका कलेमध्ये "**क्ष**" हा एक वर्ण, अठ्ठावीस पदे, हृदय व सद्योजात हे दोन मंत्र, पृथ्वी हे एक तत्त्व, कालाग्न्यादि पासून भद्रकाली अखेर एकशे आठ भुवने आहेत. प्रतिष्ठाकलेत "**ह**" ते "**ट**" पर्यंत (उलटे वर्ण मोजून "**ट**" ते "**ह**" तेवढेच होतात; पण तेथील क्रम असा आहे, तेवीस वर्ण, एकवीस पदे, शिर व वामदेव हे दोन मंत्र, "आप" पासून प्रकृतीपर्यंत तेवीस तत्वे, अमरेश ते श्रीकंठ ही छपन्न भुवने आहेत. विद्या कलेत "**ञ**" ते "**घ**" पर्यंत सात वर्ण, वीस पदे, शिखा व घोर असे दोन मंत्र, पुरुषतत्त्वापासून मायेपर्यंत सात तत्वे, भीमादि पासून अंगुष्ठ अखेरपर्यंत सत्तावीस भुवने आहेत. शांतिकलेत

("ग" "ख" "क") हे तीन वर्ण, अकरा पदे, कवच आणि तत्पुरुष हे मंत्र, शुद्धविद्या, ईश्वर व सदाशिव ही तीन तत्वे व वाम ते सदाशिव अशी अठरा भुवने आहेत. शांत्यतीता अर्थात् शांतीपलीकडील कलेत सोळा वर्ण, एक पद (श्रीशिव?) ईशान, नेत्र व अस्त्र हे तीन मंत्र आहेत. श्रीशिव हे एक तत्त्व असून ते शक्तिस्वभावाचे आहे अर्थात् शक्ती ज्याचा स्वभाव आहे असे मानले जाते. निवृत्तीपासून अनाश्रित अशी पंधरा भुवने आहेत, असे विभाजन केले आहे. हे सर्व सिद्धान्तप्रभृती तंत्रांमधून अत्यंत विस्तृतपणे वर्णिले आहे. त्यामुळे येथे हे थोडक्यात मांडले आहे. अशा रीतीने हे जे अध्वांचे षट्क अर्थात् सहा मार्ग आहेत त्यांपैकी एका अर्धभागात भुवन, तत्व व कला असे तीन आणि दुसऱ्या अर्धभागात मंत्र, पद व वर्ण असे तीन मार्ग येतात. प्रत्येक अर्ध हा स्थूल, सूक्ष्म व पर अशा रीतीने तीन प्रकारचा आहे. त्यांपैकी पहिले भुवन, तत्व व कला हे अभिधेय अर्थात् वाच्य व दुसरे अभिधान आहे. असे असल्याने वाच्य म्हणजे अभिधेय वर्ग प्रकाशरूप असून वाचक अर्थात् अभिधान वर्ग हा विमर्शरूप आहे. त्यामुळे प्रकाशविमर्शरूप श्रीशिवपरमेशांचा दोन्ही उत्पन्न करणाऱ्या (अग्निनिर्माणात) अरणीप्रमाणे म्हणजेच रवीप्रमाणे स्वभाव आहे. उन्मेष व निमेष या दोन्ही शक्तींचा मिळून अनुभूती चमत्कार म्हणजेच श्रीशिवांचा स्वभाव अर्थात् "स्व" म्हणजे श्रीशिव व "भाव" म्हणजे शक्ती अर्थात् त्यांचे सामरस्य होय.

यासंबंधी "**श्रीपर्यंतपंचाशिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

तत्र वाचकवाच्यात्मस्पन्दयोरेकशः प्रभोः।
स्थूलसूक्ष्मपराभासक्रमयोः षड्विधाध्वता।।

अर्थ :- वाचक-वाच्यस्फुरणाच्यारूपाने स्थूल, सूक्ष्म व पर अशा त्रिविध आभासक्रमाने (श्रीशिवांसंबंधीचे) अध्वषट्क सिद्ध आहे.

त्याचप्रमाणे "**श्रीविरुपाक्षपंचाशिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

यस्य विमर्शस्य कणः पदमन्त्रार्णात्मकस्त्रिधा शब्दः।
पुरतत्त्वकलात्मार्थो धर्मिण इत्थं प्रकाशस्य।।

अर्थ :- ज्या श्रीशिवांच्या विमर्शाचा एक कण अर्थात् अंश म्हणजे पद, मंत्र आणि वर्ण या तीन प्रकारचा शब्द असून प्रकाशाचा एक कण म्हणजे भुवन, तत्त्व व कला हे तीन धर्म होत. (श्रीशिव हे धर्मी होत.)

"**श्रीचिद्गगनचंद्रिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

याऽहमित्युदितवाक् पराभिधा यः प्रकाश उदितार्थविग्रहः।

द्वौ मिथः समुदिताविहोन्मुखौ तौ षडध्वपितरौ श्रये शिवौ।।

अर्थ :- ज्यावेळेला परा नामक "अहं" अशी उत्स्फूर्त वाणी आणि रूपधारी "अर्थ" जो प्रकाश हे दोघे एक रूपाने प्रगट झाले त्यावेळेला वर्णपदादि सहा मार्ग उत्पन्न झाले. या सहा मार्गांच्या उत्पादकांना म्हणजेच श्रीशिवशक्तींना मी शरण जातो अर्थात् त्यांचा आश्रय घेतो.

याच आशयाने आमच्या श्रीसद्गुरूंनी **"श्रीसौभाग्यहृदय"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

वर्णः कला पदं तत्त्वं मन्त्रो भुवनमेव च।
इत्यध्वषट्कं देवेशि भाति त्वयि चिदात्मनि।।

अर्थ :- हे देविश्रेष्ठे ! किंवा सर्व देवांच्या ईश्वरी ! वर्ण, कला, पद, तत्त्व, मंत्र व भुवन हे सहा मार्ग तुझ्या चिद्रूपात भासतात.

असे मार्ग व ते या जोडीपासून अर्थात् श्रीशिवशक्तींपासून झाल्याचे वर्णन केले आहे. हेच म्हणणे महाकवी श्रीकालिदास यांनी **"रघुवंश"** या महाकाव्यात **"वागर्थाविव सम्पृक्तौ"** अर्थात् "शब्द म्हणजे शक्ती व अर्थ म्हणजे श्रीशिव यांची अखंड समरसताच असते," असे म्हणून स्पष्ट केले आहे. अशा रीतीने साहित्यशास्त्रातही आमचेच श्रीशिवशक्तिसामरस्याचेच म्हणणे मांडले आहे. (हा परमेश्वराचा अनुग्रहच आहे.) या साहित्याला अनुसरणारे **"श्रीकुण्डलाभरण, श्रीमुकुन्दकेलिपरिमल व श्रीकोमलवल्लीस्तवादि प्रबंध"** यातूनही हेच वर्णिले आहे. त्या शब्द व अर्थ या दोघांचे उत्पादक हे विमर्शप्रकाशस्वभावाचे चैतन्य आहे. **"चितिः प्रत्यवमर्शात्मा परा वाक् स्वरसोदिता"** व **"आत्मार्थस्य प्रकाशता"** "ज्ञानरूप चिच्छक्तीची वाणी म्हणजे परा वाणी होय व आत्मरूप अर्थाचा ही परावाणी प्रकाश आहे." अशा प्रकारे मागील गाथेमधून प्रकाश-स्वरूप श्रीशिवांची शक्ती विमर्शमयी अर्थात् स्वयंस्फुरणरूपा आहे असेही सांगितले आहे. आत्मज्ञानाचा उपाय म्हणून वर्णकलादींचा अध्व या शब्दाने उल्लेख केला आहे.

या अर्थानेच **"श्रीस्वच्छंदतंत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

मुक्तानां शिवताव्यक्तिकारणं विश्वमेव हि।
शिवताव्यक्तिमार्गत्वात् ते सर्वेऽपि कलादयः।।
अध्वशब्देन कथ्यन्ते ते सर्वे बन्धना अपि।

अर्थ :- मुक्तपुरुषांना हे संपूर्ण विश्वच श्रीशिवरूपाने व्यक्त झाले आहे असे भासते. श्रीशिवांच्या अभिव्यक्तीला हे कलावर्णादि कारणीभूत आहेत असे भासते,

त्यामुळे त्यांना मार्ग असे म्हटले असून ते जीवांना बंधनकारकही आहेत.

या करिताच "**श्रीविज्ञानभैरव**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

भुवनाध्वादिरूपेण चिन्तयेत् क्रमशोऽखिलम्।
स्थूलसूक्ष्मपरस्थित्या यावदन्ते मनोलयः।।

अर्थ :- (साधकभक्तयोगिशिष्याने) हे अखिल विश्व भुवनापासून क्रमाक्रमाने सहाही मार्गरूपाने ध्यानात आणावे म्हणजेच या विश्वाचे स्थूल, सूक्ष्म व पर अशा क्रमाने ध्यान करावे व मनोलय होईपर्यंत ध्यानसातत्य ठेवावे.।।२७।।

******

गाथा क्रमाङ्क २८

अवतरणिका :- अशा रीतीने सर्व विश्ववैचित्र्याचा अंतर्भाव प्रकाश व विमर्श या दोन्हीतच असल्याचे सांगून ग्रंथकारांनी हे दोन भेदही औपचारिकच असल्याचे यापुढील गाथेत सांगितले आहे.

आलक्खविसेसम्मिअ गअबुसहाणं दुवेण पडिभासं ।
एक्कस्सिं चिअ अत्थे सिवसत्तिविहाअकप्पणं कुणिमो।।२८।।
(आलेख्यविशेष इव गजवृषभयोर्द्वयोः प्रतिभासम्।
एकस्मिन्नेवार्थे शिवशक्तिविभागकल्पनां कुर्मः।।)

अर्थ :- ज्याप्रमाणे विशिष्ट पद्धतीने काढण्यात आलेल्या चित्रामध्ये (भिन्न अशा) दोन स्वभावांनी युक्त असणाऱ्या हत्तीची आणि बैलाची (एकत्र) प्रतिमा असते त्याचप्रमाणे एकाच अर्थात् श्रीशिव आणि शक्ती यांच्या विभागाची म्हणजेच वेगळेपणाची कल्पना आम्ही करतो; (परंतु तत्त्वतः ते अभिन्नच असतात.)।।२८।।

विशेष :- चित्रकार आपल्या विद्वत्तापूर्ण चित्रकलेला प्रकट करण्यासाठी भिन्न स्वभावाच्या अशा हत्ती आणि बैल यांना एकरस असे चित्रित करतो. अशाच प्रकारे अध्वपर्यंत समस्त प्राप्त करून घेण्यात येणाऱ्या तत्त्वांमध्ये श्रीशिवशक्तिस्वरूप प्रकाशविमर्शाचे उन्मीलन अर्थात् प्रकटीकरण होते. ज्याप्रकारे चित्रविशेषामध्ये प्रथम हत्ती आणि त्यानंतर बैल किंवा आधी बैल आणि त्यानंतर हत्ती यांच्या चित्रणामध्ये एकरसतेत कोणताही फरक पडत नाही त्याचप्रकारे श्रीशिवशक्ती किंवा श्रीशक्तिशिव या दोघांच्या यथाक्रम तत्व प्रकाशनामध्ये अभिन्न एकरसता किंवा समरसता तशीच राहत असते. घट आणि पृथ्वी यांच्यामध्ये कोणतेही अंतर नाही. श्रीशिव आणि शक्तिप्रकाश व विमर्श तत्त्वतः अभिन्न स्वरूपगत एकरसच आहेत. "**श्रीसिद्धसिद्धान्तपद्धती**"

या ग्रंथात श्रीगोरक्षनाथांनी असे म्हटले आहे की, **"शिवस्याभ्यन्तरे शक्तिः शक्तेरभ्यन्तरः शिवः ।।४।२६।।"** अर्थात् "श्रीशिवांमध्ये श्रीशक्ती अंतर्भूत असून श्रीशक्तीच्या अंतरात श्रीशिव आहेत."

परिमलव्याख्यार्थ :- कुशल चित्रकार आपले कौशल्य प्रकट करण्यासाठी भिन्नस्वरूप आणि भिन्नस्वभावाचे असलेले हत्ती आणि बैल आदि चित्रे अशी काढतो की, त्यांच्यामध्ये एकत्व असल्याचा भ्रम होतो आणि वेगळ्या दृष्टीने पाहिल्यास ते वेगळेही भासतात. हे आमचे मत सर्वमान्य आहे; कारण यात दुमत नाही. अशा प्रकारचे ते चित्र असताना हत्तीची सोंड ही बैलाचे वशिंड वाटते, गंडस्थळ बैलाचे नाक, डोळे दोघांचे एकच व हत्तीच्या दाताखालील भाग बैलाचे कान भासतात. अशा रीतीने चित्रकारकौशल्याने पाहणाऱ्याला थोडा वेळ भ्रम व नंतर आश्चर्यही वाटते. त्याचप्रमाणे एकाच अर्थामध्ये सहा मार्गांनी अर्थात् साधनांनी प्राप्त होणारे तत्त्व वस्तुतः एक असून श्रीशिव व शक्ती म्हणून किंवा प्रकाशविमर्श म्हणून जो आभास होतो तो आभासच होय, सत्य नव्हे. श्रीशिव व शक्ती हे दोन नाहीत आणि ते विचित्रस्वरूपाचेही नाहीत; पण त्यातील शक्तिवैविध्याचे वर्णन आमच्या पूजनीय थोर लोकांनी केल्याने आम्ही तशी द्वित्वाची कल्पना करतो,जाणतो,सांगतो व वागतोही; कारण **"फलभेदारोपित-भेदः पदार्थात्मा शक्तिः ।"** अर्थात् "फलभेदामुळे भेदाचा आरोप होणे ही पदार्थाची शक्ती आहे," असा नियम आहे. येथे गजवृषभ या शब्दात द्वन्द्वसमास आहे; परंतु इतरेतर संबंधाने दोघेही दोन प्रकारांनी दिसतात त्यामुळे द्विवचनी द्वंद्व करावा- **"गजौ च वृषभौ च"** (असा) व्याकरणभाष्यकारांनीही असाच विग्रह केला आहे- **"धवौ च खदिरौ च धवखदिरौ ।"** अर्थात् धावडा व खैर हे वृक्ष एकमेकासारखे दिसतात. ज्याप्रमाणे गज शब्दाने गजवृषभ हे दोन्ही सांगितले जातात त्याचप्रमाणेच वृषभ हे पदही वृषभगज ही दोन्हीही पदे सांगते. परंतु ते इतरांना पटत नाही; कारण ते पदार्थाच्या निश्चितरूपाचा त्याग करणे दोषार्ह मानतात; परंतु आम्हा स्वतंत्र-अद्वैतज्ञानसिद्धान्तवाद्यांना ते दोषभय नाही. याबद्दल शास्त्रकार असा दृष्टान्त देतात की -

घट इति पृथिवीति द्रव्यमित्यङ्ग तद्वद्
भवति ननु विकासो भाव इत्याविघातम् ।
यदि विलसति युक्तिस्तत्पुरस्थो घटोऽयं
कथय न कथमेको विश्वमूर्तिर्विभाति ।।

अर्थ :- एक घट हा घटरूपाने, मृत्तिकारूपाने व पदार्थरूपाने त्याच्या

ध्वंसापर्यंत वेगवेगळ्या भावात विकसित व प्रतीत होतो. याच युक्तीने विश्वरूपाने नटणारा परमेश्वर एकच व एकरूपीच समजावयाला काय हरकत आहे !

या न्यायाने एका पदार्थाला स्वतःहून वेगळे अनेक गुण, आकार, विशेषणे इत्यादि मानावयाला हवीत. असो! आपले यथार्थ मत सांगताना इतरांचे दोष काढावयाचे तरी किती? यामुळे अभिहितान्वयवादापेक्षा अन्विताभिधानवाद उचित होय (नावाप्रमाणे वेगळे पदार्थ कल्पिल्यापेक्षा एकाच पदार्थावर इतर नामकल्पना करणे चांगले.) "हा स्तंभ पाहा," या वाक्यात स्तंभपदार्थाशी दर्शनक्रिया संबंधित आहे. ती "पश्य" अर्थात् पाहा या क्रियापदाने सांगितली आहे. त्याचप्रमाणे "पश्य" या क्रियापदाशी स्तंभ हा पदार्थ कर्मकारकाने जोडला आहे. त्याचप्रमाणे सध्याच्या प्रकरणातील प्रकाश व विमर्शांच्या विषयी सर्व प्रपंचाचे स्फुरण व पर्यवसान यांचे स्थल म्हणून उभयता व्यवहार आवश्यक आहे.

याला शास्त्रात असे प्रमाण आहे की -

स्वर्गो भूरिति सागरः सरिदिति स्वामिन्! द्रुमो वीरुदि-
त्यर्थः शब्द इति स्वरः श्रुतिरिति प्रत्यक् परागित्यपि।
शुक्लं रक्तमिति प्रभा तम इति ज्ञानं क्रियेत्यादि ते
युग्मं सर्वमयुग्मनेत्र! विततिर्विद्याविमृष्ट्योर्द्वयोः।।

अर्थ :- स्वर्ग-भूमी, सागर-सरिता, वृक्ष-वेली, अर्थ-शब्द, स्वर-श्रुती, प्रत्यक्-पराक्, शुक्ल-रक्त, प्रभा व अंधार अर्थात् तम आणि ज्ञान व क्रिया या सर्व जोड्या म्हणजे हे अयुग्मनेत्रा अर्थात् त्रिनेत्रा! श्रीशंकरा!! विद्या व विमर्श या दोघांचा विस्तार आहे.

तरीही **"न शिवेन विना शक्तिर्न शक्तिरहितः शिवः।"** अर्थात् "श्रीशिवांवाचून शक्ती नाही व शक्तीवाचून श्रीशिव नाहीत," असा नियम असल्याने प्रकाश हा विमर्श क्रियेशी अर्थात् स्फुरणरूपक्रियेशी व्यभिचरित होत नाही व विमर्शक्रिया प्रकाशाच्या कर्तृतेशी व्यभिचरित होत नाही अर्थात् हे दोघे एकमेकाला सोडून वेगळे असू शकत नाहीत. त्यामुळे या दोघांचे शरीर अर्थात् स्वरूप हे एकत्वाचे व अद्वैततत्त्वाचे भव्य सौभाग्यच आहे, असे तात्पर्य आहे.

या दृष्टीने **"श्रीकोमलवल्लीस्तव"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

त्वं यथा शिवमयी तथा शिवस्त्वन्मयो हि शिवयोरभेदिनोः।

तत्त्वमेकमबहिर्मुखास्पदं यत्र भिन्न इव विश्वविक्रिया।।

अर्थ :- हे देवी! तू जशी श्रीशिवमय आहेस तसेच श्रीशिवही तन्मयच म्हणजे तत्स्वरूपच आहेत. अभिन्न अशा तुम्हा दोघांचे तत्त्व मात्र अगदी एकच आहे. हे अंतर्मुख लोकांनाच कळू शकते. या एकाच तत्त्वात हे जगद्रूप वैचित्र्य भेदरूपाने भासते.।।२८।।

*****

गाथा क्रमाङ्क २९

अवतरणिका :- पुराण व आगमग्रंथांमध्ये प्रमाते म्हणजे जाणते पुष्कळच असल्याचे प्रसिद्ध आहे व आताही पुष्कळ द्रष्टे असल्याचे पाहण्यात येते. परंतु त्यांपैकी कोणाचीही अशी शक्ती नाही की, जे परमेश्वराच्या अभिमताचे वर्णन करतील म्हणजेच परमेश्वर अतुलबलसंपन्न असल्याचे सांगतील. या शंकेचे निराकरण करताना ग्रंथकार या गाथेत असे म्हणतात की -

तिलमत्ते वि सरीरे पेक्खह कीडस्स एत्तिई सत्तो।
सा सच्छन्दअसिरिणो वीससरीरस्स केत्तिई होउ।।२९।।
(तिलमात्रेऽपि शरीरे प्रेक्षध्वं कीटस्यैतावती शक्तिः।
सा स्वच्छन्दश्रियो विश्वशरीरस्य कियती भवतु।।)

अर्थ :- ज्या किड्याचे शरीर तिलमात्र आहे त्याच्यामध्येही जर गतिशील राहण्याची व चालण्या-फिरण्याची इतकी शक्ती असेल तर ज्या परमात्म्याचे शरीर हे समस्त विश्व आहे त्या विराट् परमपुरुषाची शक्ती किती असेल? याचा विचारच केला पाहिजे अर्थात् हे लक्षात घेतले पाहिजे.

विशेष :- परमेश्वरच विश्वशरीर आहे, असे आगमांमध्ये सांगितलेले आहे. "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात असेच सांगितले आहे की, "**दृश्यं शरीरम्।**" अर्थात् "दिसणारे (ते) ईश्वराचे शरीर होय." विश्वव्यापक श्रीपरमशिव परमात्म्याचे असीम, अनंत व अपार ऐश्वर्य त्याच्या स्वेच्छेची म्हणजेच स्वतंत्रतेची अभिव्यक्ती किंवा प्रकटीकरण आहे. परमेश्वराच्या विश्वशरीररूप असण्यामध्येच त्याचे परमैश्वर्य प्रत्यक्ष आहे. याप्रमाणेच "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, "**शक्तिसन्धाने शरीरोत्पत्तिः।**" अर्थात् "शरीराची उत्पत्तीच शक्तीच्या संधानामध्ये संबंधित आहे." त्याचप्रमाणे "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथामध्ये "**स्वशक्तिप्रचयोऽस्य विश्वम्।**" अर्थात् "विश्वशरीररूपतेच्या द्वारा परमात्म्याची शक्तिमत्ता कल्पित आहे." (जर विश्वव्यापकत्वामध्ये त्याचे ऐश्वर्य अशा प्रकारे उपकल्पित आहे तर

विश्वलयामध्ये त्याच्या शक्तीची उपकल्पना स्वाभाविक आहे.)

परिमलव्याख्यार्थ :- परमेश्वर हा विश्वशरीरी आहे असे आगमग्रंथांमधून सांगितले आहे. याबद्दल **"श्रीशिवसूत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, **"दृश्यं शरीरम्।"** अर्थात् "दृश्य असे सर्वकाही भगवच्छरीर आहे."

त्याचप्रमाणे या दृष्टीनेच **"श्रीविरुपाक्षपंचाशिका"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

विमतिपदमङ्ग! सर्वं मम चैतन्यात्मनः शरीरमिदम्।
शून्यश्यपदान्नीलावधि दृश्त्वात् पिण्डवत् सिद्धम्।।

अर्थ :- हे मानवा! विवाद्यरूप असलेले सर्व काही सच्चिदानंदरूप आत्म्याचे म्हणजे माझे शरीरच आहे. शून्यापासून ते नीलाभासी आकाशापर्यंत सर्व दिसणारे (दृश्य) असल्याने पिंडाप्रमाणे आहे. (हे सर्व माझे शरीरच होय.)

परमेश्वर विश्वशरीरी असून स्वच्छंदश्रीकही आहे. स्वतःच्या इच्छाशक्तीने ऐश्वर्याची पखरण म्हणजे उपभोगांची साधने उपलब्ध करणारा आहे. विश्वशरीरत्वामुळे त्याची सर्वश्रेष्ठ शक्ती असल्याचे तर्कानुमानाने सिद्ध होते. त्या त्या शरीरानुरूप शक्ती सर्व प्राण्यांमध्ये दिसतेच. तिळाएवढे शरीर असलेल्या यूकादि अर्थात् ऊ व लिक्षा अर्थात् लिखा इत्यादि किटकांची शक्ती शरीरानुरूप किंवा त्यामानाने अधिक असल्याचे दिसून येते. येथे ग्रंथयोजना अशी आहे की, परमाणुयुक्त व द्व्यणुक अशा परिमाणशरीरी प्राण्यांचा विचार नको; कारण ते दिसत नाहीत म्हणजेच ते अप्रत्यक्ष आहेत. त्यांच्या दृष्टान्ताने मनाला हवे तसे समाधान मिळणार नाही. तिलप्राय अर्थात् तिळाएवढ्या देहाच्या ऊं, लिखा, ढेकूण, मुंगी वगैरे कीट प्राण्यात किती शक्ती आहे ते पाहा. ती शक्ती, स्फुरण, परिभ्रमण म्हणजे फिरणे इत्यादि भेदांमुळे अनेकविध रूपांनी अनुभवाला येते. येथे आज्ञार्थ आणि बहुवचन "पाहा" हे स्पष्ट प्रमाणत्व किंवा अनुभवसिद्धत्व सांगण्यासाठी वापरले आहे. या दृष्टान्ताचा स्वीकार केल्यास यावरून श्रीपरमेश्वराची शक्ती केवढी व किती आहे याचा अंदाज कसा बांधता येईल?

याच दृष्टीने **"श्रीमत्स्तोत्रावली"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

त्वद्धाम्नि विश्ववन्द्येऽस्मिन् नियतिक्रीडने सति।
तव नाथ! कियान् भूयानानन्दरससम्प्लवः।।

अर्थ :- विश्वाला वंद्य असणाऱ्या तुझ्या तेजात किंवा शरीरात विश्वाच्या नियतीचे ऐच्छिक खेळ चालतात. तो आनंदरसाचा जल्लोष केवढा व कसा

असेल? (याची कल्पनाच करवत नाही.)

अशा रीतीने शंकेखोर लोकांच्या समाधानार्थ श्रीभगवंतांची विश्वशरीरता अनुमानाने सिद्ध करून त्यांच्या ऐश्वर्याचे मोठेपणही या निमित्ताने सांगितले. सश्रद्धलोकांसाठी तर इच्छाशक्तीने विश्वशरीरत्व सांगितल्यास पटण्यासारखे आहे. "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**शक्तिसन्धाने शरीरोत्पत्तिः।**" आणि "**स्वशक्तिप्रचयोऽस्य विश्वम्।**" अर्थात् "इच्छाशक्तीला जवळ केले की, जगच्छरीराचा जन्म होतो" आणि "स्वशक्तीचा वापर किंवा संचय म्हणजे विश्व होय." अशा प्रकारे आत्म्याच्या विश्वशरीरत्वाला परामर्शाचा म्हणजेच ज्ञानाचा अभाव हेच एकमात्र कारण आहे. ज्ञानदृष्ट्या श्रीभगवान् अशरीरी आहेत. बाह्यदृष्ट्या नानाविध विभूतींचा अनुभव व लोप विश्वात चालूच असतो. अन्यथा पिंडाप्रमाणे ब्रह्मांडातही सर्वत्र परमेश्वराची स्वातंत्र्यशक्ती आहेच; परंतु ती पाहण्याची अपेक्षा करू नये.

याबद्दल "**श्रीविरूपाक्षपंचाशिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

देहेऽस्मितया यद्वज्जडयोरास्फालनं मिथो बाह्वोः।
इच्छामात्रेणेत्थं गिर्योरपि तद्वशाज्जगति।।

अर्थ :- ज्याप्रमाणे देहात अस्मिता असल्याने जड अशा बाहूंची हालचाल आपापसात होते त्याप्रमाणे विश्वशरीरातील दोन डोंगरांची हालचाल श्रीभगवंतांच्या इच्छाशक्तीने व्हावयाला काय हरकत आहे? असे जर तुम्ही म्हणाल तर ते योग्य नाही. (उपमा व रूपक सर्वांशाने लावावयाची नसते अर्थात् उपमा व दृष्टान्त एकदेशीय असतात.) तरी पण तो सर्वशक्तिमान् आहेच.।।२९।।

******

गाथा क्रमाङ्क ३०

अवतरणिका :- जर हे विश्वशरीर परमेश्वराच्या शक्तीचा उत्कर्ष मानला तर विश्वसंहाराची शक्ती त्याच्या ठिकाणी नाही अशी शंका कोणा भाग्यवानाला आल्यास किंवा त्याने उपस्थित केली असता त्याचे उत्तर देताना ग्रंथकार असे म्हणतात की -

वीसुम्मेसदसाए देसिअणाहस्स जत्तियो पसरो ।
कललावत्थाए ठिओ वीसणिमेसे वि तत्तिओ होइ।।३०।।
(विश्वोन्मेषदशायां देशिकनाथस्य यावान् प्रसरः।
कललावस्थया स्थितोऽपि विश्वनिमेषेऽपि तावान् भवति।।)

अर्थ :- सर्वांवर अनुग्रह करणाऱ्या परमात्म्याचा विश्वाच्या उन्मेष-

दशेमध्ये जेवढा प्रसार म्हणजेच अध्वपर्यंत विस्तार आहे तेवढाच विश्वाच्या निमेषात अर्थात् संहारात म्हणजेच समस्त तत्वांच्या आत्मस्वरूप लयाच्या सर्वाकारमय अविभक्त अवस्थेमध्ये अध्वपर्यंत विस्तार किंवा प्रसार आहे.

विशेष :- विश्वाच्या उन्मेष व निमेष म्हणजेच उभारणी आणि संहारणी या दोन्हीही अवस्थांमध्ये परमात्म्याचा प्रसरस्वभाव अर्थात् वाढण्याचा स्वभाव कार्यप्रवृत्त असतो. अनंत चिच्छक्तीचेच उन्मेष व निमेषामध्ये प्रसरण होते. कललावस्था म्हणजेच अविभक्त सर्वाकाररूप स्थिती होय. जर विश्ववैचित्र्याचा विलास निमेष दशेत होत नसता तर उन्मेष दशाच नसती. वास्ताविक पाहता उन्मेष म्हणजेच निमेष होय आणि निमेष म्हणजेच उन्मेष होय.

"**श्रीत्रिंशिका**" या शास्त्रात असे म्हटले आहे की -

यथा न्यग्रोधबीजस्थ शक्तिरूपो महाद्रुमः।
तथा हृदयबीजस्थं जगदेतच्चराचरम्।।

अर्थ :- ज्याप्रमाणे वडाच्या बीजामध्ये अत्यंत शक्तिशाली विशाल वृक्ष अंतर्निहित असतो त्याचप्रमाणे हृदयबीजामध्ये चराचर जगत् अंतर्भूत असते अर्थात् ते तिरोहित राहते.

परिमलव्याख्यार्थ :- देशिक म्हणजे सर्वानुग्राहक अशा सर्वस्वामी परमेश्वराची उन्मेष व निमेष एकाच वेळेला करणारी अशी जोड शक्ती आहे. स्वरूपोन्मेष प्रसंगी विश्वाचा निमेष म्हणजे विश्वतिरोधान अर्थात् विश्वाची संहारणी आणि विश्वप्राकट्यप्रसंगी स्वरूपनिमेष होतो. या दोन्ही अवस्था तराजूप्रमाणे समकाली होत असतात. यावरून परमेश्वर हा विश्वोत्तीर्ण अर्थात् विश्वाच्या पलीकडचा आणि विश्वात्मक म्हणजे विश्वरूप आहे हे म्हणणे औचित्यपूर्ण ठरते. उन्मेष व निमेष अर्थात् उत्पत्ती आणि लय हे एकमेकांवर अवलंबून असल्याने एकाच्या अभावी दुसऱ्याचाही अभाव होईल म्हणून दोघांनाही सारखेच प्राधान्य देणे योग्य होय.

या संबंधी "**श्रीपरास्तोत्र**" या ग्रंथात मीच असे म्हटले आहे की -

एके भूजलखानिलानलकलारब्धां बहिः प्रक्रिया-
मुत्तीर्णत्विषमन्तरेव कतिचित् चित्काकणीमूचिरे।
अन्ये केचन यामलामृतसरित्सम्भेदसम्भोगिनो
मातस्त्वामपृथक्प्ररोहमुभयोरौचित्यमाचक्षते।।

अर्थ :- हे माते! काही लोक पृथ्व्यादि पंचभूतांच्या अंशांनी उत्पन्न होणाऱ्या तेजोरूप विश्वाला चैतन्यरूपाने युक्त असे तुझे रूप मानतात तर

काही लोक उन्मेष व निमेषात्मक अमृतरूप नदीत डुंबणारे होऊन एकाचवेळी विश्व व आत्मरूप यांची उगमादिक्रिया तुझ्यात पाहतात.

असे असताना विश्वोन्मेष अवस्थेत म्हणजे अंतश्चिच्छक्तीच्या निमेषा-वस्थेत सहा मार्गांचा जेवढा प्रसार होत असतो तेवढाच विश्वनिमेषप्रसंगी आत्मरूपामध्ये तो उन्मेषदशारूप असतो. नाहीतर विश्वलोप म्हणजे आत्मलोप होईल. एवढेच काय; पण कललावस्थेत म्हणजेच उत्पत्तिपूर्व अवस्थेतही हा प्रसार अर्थात् विश्वविस्तार आत्मशक्तीत असतो. याला मोराच्या अंड्याचा दृष्टान्त देऊन असे सांगितले आहे की, मयूरीच्या अंड्यात सूक्ष्मातिसूक्ष्म रूपात पिसांवरील रंगरेखा व चित्रविचित्र वर्ण असतात. हे डोळे दिपविणारे व मती गुंग करून टाकणारे रचनाकौशल्य कोणाचे आहे? अर्थात् चिच्छक्तीचेच आहे. हेच विश्वाच्या बाबतीतही समजावे.

याबद्दल "**श्रीत्रिंशिकाशास्त्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

यथा न्यग्रोधबीजस्थः शक्तिरूपो महाद्रुमः।
तथा हृदयबीजस्थं जगदेतच्चराचरम्।।

अर्थ :- ज्याप्रमाणे वटबीजात महान् वृक्ष (शक्तिरूपाने) असतो त्याप्रमाणेच हृदयबीजात चराचर जगत् साठविलेले असते.

कललता म्हणजेच सर्व अवस्थांचे किंवा सर्व आकारांचे अगर सर्व आकृतींचे सर्वाकार अर्थात् अविभक्त म्हणजे एकत्र असणारे रूप होय. (दोन किंवा चार दिवसांचा गर्भ हा शुक्रशोणितैक्याची एक सूक्ष्मावस्था असतो.) जर हे विश्ववैचित्र्य निमेषदशेत म्हणजे कललावस्थेत नसेल तर उन्मेषदशाच राहणार नाही व विश्व प्रकटच होणार नाही; कारण उत्पत्तिपूर्वी असणाऱ्या पदार्थांचीच उत्पत्ती होणे नियमानुरूप आहे. ज्याप्रमाणे विश्वोन्मेष दशेत आत्मरूपाचे अदृश्यत्व असते; मात्र पूर्णपणे अभाव नसतो त्याचप्रमाणे इकडेही जाणावे म्हणजे आत्मोन्मेषसमयी विश्ववैचित्र्य तिरोहित अर्थात् सूक्ष्मरूपात असतेच म्हणजे त्याचा पूर्ण अभाव नसतो. हा अर्थ जर टाकला तर पाशव म्हणजेच इतर वेदान्ताचा लोप होईल म्हणून सत्कार्यवाद ग्राह्य मानला पाहिजे. त्या वेदान्तात जरी आग्रहाने अद्वैत मानले तरी ते द्वैतातच मोडते; कारण या प्रक्रियेत सत्य व असत्यत्व असल्यामुळे ग्राह्य व त्याज्य कल्पनेत त्याच रूपाने त्यांचे द्वैतातच पर्यवसान होणे हे अपरिहार्य आहे.

यासंबंधी मीच "**श्रीसंविदुल्लास**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

द्वैतादन्यदसत्यकल्पमपरैरद्वैतमाख्यायते

तद् द्वैते बत पर्यवस्यति कृतं वाचाटदुर्विद्यया।
एते ते वयमेवमभ्युदयिनोः कस्यापि कस्याश्चिदं-
प्यालस्योज्झितमैकरस्यमुभयोरद्वैतमाचक्ष्महे।।
अद्वैतगर्वो महतः प्रमातुः को नाम मिथ्या भवति प्रपञ्चे।
स्वयंवरे ते परिपन्थिवर्गे किं तज्जिगीषोरसहायशौर्यम्।।

अर्थ :- काही लोकांच्या मते द्वैताहून वेगळे असलेले सर्व काही नसल्यासारखेच (असते). तर काहींच्या मते द्वैताहून निराळे अद्वैतच असते; परंतु या दोन्हींचे पर्यवसान द्वैतातच होत असल्याने या निष्फळ बडबडीत काही तात्पर्य किंवा अर्थ नाही. आम्ही मात्र ज्या अभ्युदयेच्छू श्रीशिवशक्तीच्या सामरस्याला अद्वैत म्हणतात ते अद्वैतवादी आहोत.

प्रपंचात अर्थात् विश्वात महान् प्रमात्याचा अद्वैताभिमान खोटा कसा होईल? विरोधिवर्गाने अर्थात् शत्रूंनी व्यापलेल्या तुझ्या अर्थात् शक्तिरूपिणीच्या स्वयंवरात तुला जिंकण्याची इच्छा असलेल्या श्रीशिवांच्या शौर्याला कोणाचे साहाय्य आहे का?।।३०।।

*****

गाथा क्रमाङ्क ३१

अवतरणिका :- विश्व व विश्वोत्तीर्ण परमेश्वराचा उन्मेष हाच निमेष आणि निमेष हाच उन्मेष असे म्हटल्यास व्याघातदोष येतो. अशी शंका उत्पन्न झाली असता त्याचे उत्तर देताना ग्रंथकार असे म्हणतात की -

तिउडिमअं खु समत्थं तत्थ अ णेअम्मि णाउए अ समं।
दिढगण्ठी णाणकला कलेइ तेल्लोक्कमेक्कल्लं।।३१।।
(त्रिपुटीमयं खलु समस्तं तत्र च ज्ञेये ज्ञातरि च समम्।
दृढग्रन्थिर्ज्ञानकला कलयति त्रैलोक्यमेकलम्।।)

अर्थ :- (परमेश्वराची) सुदृढ परमस्वतंत्र अशी ज्ञानकला अर्थात् चिच्छक्ती ही निश्चितरूपाने ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान यांनी त्रिपुटीयुक्त असल्याने या विश्वाच्या व्यवहाराला समानरूपात एक स्वभावाने प्रकाशित म्हणजेच अभिव्यक्त करते. (ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञानरूपामध्ये त्रिपुटित विश्वव्यवहार परमात्म्याच्या निश्चयात्मिका व परम स्वतंत्र चिच्छक्तीने प्रभावित अथवा सक्रिय किंवा विमर्शरूप असतो.)।।३१।।

विशेष :- समस्त विश्वव्यवहार अथवा विमर्श हा निःसंदेह एकाच ज्ञानशक्तीचा म्हणजेच चिच्छक्तीचा ज्ञाता आणि ज्ञेय यांच्या रूपातील विस्तार

आहे. ही ज्ञानकला विशेषत्वाने शंकाशून्य असल्याने तिला दृढग्रंथी किंवा निश्चयात्मिका असे म्हटले आहे. ही चिच्छक्ती एकरस असून विश्वव्यवहारात (एका स्वभावाने)तीनही लोकांमध्ये क्रियाशील अथवा कार्यामध्ये प्रवृत्त असते. तिचा हा स्वभाव स्थूल, सूक्ष्म आणि पर असा आहे. याच शक्तीला त्रिपुरा असे म्हणतात. जगतामध्ये ही विमर्शशक्ती आपल्या तत्त्वाला अर्थात् कार्याला भिन्न रूपामध्ये त्याचप्रमाणे अभिन्न अशा स्वात्मरूपामध्ये प्रकट करण्यात समर्थ आहे. ती सर्व समर्थ आहे. ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान यांच्या त्रिपुटीच्या अंतरात हीच चिच्छक्ती सर्वथा संबद्ध ज्ञानकला म्हणून विद्यमान असते.

परिमलव्याख्यार्थ :- लोकव्यवहारात सर्वांचा सर्व वाग्विस्तार ज्ञाता, ज्ञान आणि ज्ञेय या तीन पुटांच्या समाहाररूप अर्थतत्त्वात पर्यवसित होतो. श्रीसद्गुरुमतानुसारी (मीमांसक) या तिन्हींचा (परस्परातील समानता सारखी असल्याने) एकरूपतेत अंतर्भाव करतात. संपूर्ण विश्वाला स्वतःमध्ये सामावून घेण्याच्या शक्तीमुळे त्यांना पुटत्व सांगण्यात येते. त्या त्रिपुटीत दोन्हींमध्ये अंतराळी असलेली जी ज्ञानकला चिच्छक्ती आहे ती खरोखर पुढील प्रमाणे अशी आहे.

या दृष्टीने "**श्रीकोमलवल्लीस्तव**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

वेद्यमेतदखिलं स ईश्वरो वेदिता यदनयोः स्वलक्षणम्।
त्वामृते सुमुखि! वित्तिमन्तरा का नु तद्घटयितुं प्रगल्भते।।

अर्थ :- हे संपूर्ण विश्व वेद्य अर्थात् ज्ञेय आहे व ईश्वर हा ज्ञाता आहे. हे सुमुखी! ज्ञानरूप अशा तुझ्यावाचून म्हणजेच चित्शक्तिशिवाय या दोघांचे वरील लक्षण जुळविण्याला कोण तयार अर्थात् योग्य आहे? अर्थात् तुझ्या व्यतिरिक्त कोणीच नाही.

या वचनाप्रमाणे विषयरूप वेद्यवर्ग आणि भोक्तारूपाने स्फुरणारा ज्ञाता या दोघांचीही समरूपात गाठ मारणारी, दोघांचेही तादात्म्य साधणारी व वज्रासम दृढ अशी तू संबंध स्थिर ठेवणारी होऊन त्रैलोक्याला एका स्वभावात आणतेस. तो एकत्वाचा स्वभाव वेद्य अर्थात् जाणण्यायोग्य, वित् म्हणजे ज्ञान आणि वेदिता म्हणजे जाणणारा, स्थूल सूक्ष्म आणि पर व जागृत, स्वप्न, सुषुप्ती इत्यादि तीन प्रकारांनी जुळतो. दृढ गाठीची म्हटल्याने हा संबंध अतुट आहे असे समजावे. संबंध दृढ नसेल तर एक दुसऱ्यापासून वेगळे होण्याचा संभव असतो. तो येथे संभवत नाही.

या दृष्टीने "**श्रीलघुभट्टारक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

देवानां त्रितयं त्रयी हुतभुजां शक्तित्रयं त्रिस्वरा-
स्त्रैलोक्यं त्रिपदी त्रिपुष्करमथ त्रिब्रह्म वर्णास्त्रयः।
यत् किञ्चिज्जगति त्रिधा नियमितं वस्तु त्रिवर्गात्मकं
तत् सर्वं त्रिपुरेति नाम भगवत्यन्वेति ते तत्त्वतः।।

अर्थ :- त्रैलोक्य या पदाने तीन देव म्हणजे श्रीब्रह्मदेव, श्रीविष्णू व श्रीमहादेव, तीन वेद म्हणजे ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद, तीन अग्नी म्हणजे गार्ह्यपत्य, दक्षिणाग्नी व आवाहनीय, तीन शक्ती म्हणजे जया, विजया व अपराजिता किंवा इच्छा, ज्ञान व क्रिया, तीन स्वर म्हणजे अ, इ व उ किंवा मंद्र, मध्य व तार, तीन लोक म्हणजे भूः, भूवः व स्वर्लोक किंवा स्वर्ग, मृत्यू व पाताळ, त्रिपदी म्हणजे गायत्री वा संहिता, पद व क्रम, त्रिपुष्कर म्हणजे ब्रह्मपुष्कर, विष्णुपुष्कर व रुद्रपुष्कर तीर्थ, तीन ब्रह्म म्हणजे शब्द, नाद व पर, तीन वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे सुचविलेले आहे. अशा प्रकारे जगातील सर्व गोष्टी तीन संख्यांनी नियंत्रित, जखडलेल्या किंवा व्याप्त आहेत. असे हे सगळे त्रिवर्गात्मक असलेल्या हे भगवती त्रिपुरांबिके ! हे सर्व तुझ्याशी अन्वित अर्थात् जोडलेले किंवा एकरूप आहे.

अशा रीतीने उपरोक्त ग्रंथात वर्णिल्याप्रमाणे (जगातील) सर्व (गोष्टी) तीन वर्गांमध्ये अंतर्भूत आहेत. अशा प्रकारे वेत्ता म्हणजे ज्ञाता हाच वेद्य अर्थात् जाणण्याचा विषय, वेद्य हाच वेत्ता आणि वित्ति म्हणजे ज्ञान हेच वेद्य इत्यादि सर्व गोष्टी स्वाभाविक समरसत्वाने एकरूप असतात हे आमचे सिद्धान्तरहस्य आहे. त्या दृष्टीने पाहता **"उन्मेष हाच निमेष"** (या) आमच्या प्रतिपादनात किंवा आमच्या मार्गातील सरहद्दीजवळही व्याघातदोषरूप कंटकांचा अंकुरही कोणी लावू किंवा दाखवू शकणार नाही. याबद्दल **"श्रीस्पंदसंदोह"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, **"एवमियमेकैवाविभाग-रूपा परामर्शभूमिरुन्मेषनिमेषमयी उन्मेषनिमेषशब्दाभ्यामभिधीयते"** अर्थात् "अशा प्रकारे ही एकच अविभक्तरूपाची विचारभूमिका अर्थात् ज्ञानभूमी उन्मेष व निमेषमय असून ती उन्मेष व निमेष या शब्दांनीच ओळखली जाते." या प्रतिपादनाने विमर्श हा सर्व अर्थात् उन्मेषनिमेषादि क्रिया सहन करणारा आहे असे सिद्ध होते. **"श्रीप्रत्यभिज्ञाविमर्शिनी"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, **"विमर्शो हि सर्वंसह आत्मानमपि परीकरोति, परमप्यात्मीकरोति, द्वयमप्येकीकुरुते, उभयमपि न्यग्भावयति"** अर्थात् "विमर्श हा सर्व सहन करणारा किंवा सर्वयुक्त असून आत्म्याला अनात्मा

करतो, अनात्म्याला आत्मा बनवितो अर्थात् आत्मसात् करतो आणि आत्मा व अनात्मा या दोघांनाही एक करतो आणि बाजूलाही सारतो अर्थात् झाकून टाकतो."

या दृष्टीने "**श्रीपरास्तोत्र**" या ग्रंथातही विमर्शमहिमा पुढीलप्रमाणे कथन केला आहे.

परीकर्तुं निजं तत्त्वं स्वात्मीकर्तुं तथोभयम्।
एकीकर्तुं न किं कर्तुं विमर्शो जगति क्षमः।।

अर्थ :- निज म्हणजे आत्मतत्त्वाला अनात्म म्हणजे अन्य तत्त्व करणे, परतत्त्वाला निजतत्व करणे आणि त्याचप्रमाणे आत्म व अनात्म अशा दोन्हीही तत्त्वांना एक करणे (हे सर्व विमर्शच म्हणजे प्रकाशरूप ब्रह्माचे सहजस्फुरणच करीत असते.) तो विमर्श जगात काय करू शकत नाही? अर्थात् तो सर्व काही करतो.।।३१।।

*****

गाथा क्रमाङ्क ३२

अवतरणिका :- सर्वसमरसवाद किंवा एकरूपत्व प्रक्रिया स्वीकारली तर सत्य व असत्य यात भेद कोणता व कसला आहे? अशी शंका घेणाऱ्याला कोणताही भेद नाहीच असे उत्तर ग्रंथकार उदाहरणाने देतात.

को सब्भावविसेसो कुसुमादो होइ गअणकुसुमस्स।
जं फुरणाणुप्पाणो लोओ फुरणं च सव्वसामण्णं।।३२।।
(कः सद्भावविशेषः कुसुमाद् भवति गगनकुसुमस्य।
यत् स्फुरणानुप्राणो लोकः स्फुरणं च सर्वसामान्यम्।।)

अर्थ :- सर्वसाधारण पुष्पाहून आकाशपुष्प असे काय बरे वेगळे आहे? त्याच्या म्हणजे प्रकाशब्रह्मरूप परमेश्वराच्या स्फुरणामुळेच सामान्य लोकव्यवहार अनुप्राणित होऊन स्फुरित होत असतो. (वास्तवात त्या दोघांमध्ये कोणताही वेगळेपणा नाही.)

विशेष :- प्रसिद्ध अशा सामान्य चंपक वगैरे फुलांमध्ये आणि अविद्यमान अशा गगन कुसुम यांच्यामध्ये कोणताही वेगळेपणा नाही. विश्वव्यवहार स्वभावच लोक अर्थात् जगत् आहे. संवित् चिच्छक्तीच सामान्यरूपात कोणत्याही पक्षपाताशिवाय आकाशपुष्पाची विप्रतिपन्नता अर्थात् अभावामध्ये आणि सामान्य म्हणजे सर्वसाधारण पुष्पांच्या संप्रतिपन्नेत अर्थात् अस्तित्वामध्ये स्फुरित होते. जर पक्षपात करण्याची भावना असती तर आकाशपुष्प स्फुरलेच नसते. भाव

व अभाव आदि सर्व गोष्टींमध्ये संवित्‌चे प्रस्फुरण होत असते. हा भेद मायीय सत्तेमध्ये प्रकट होत असतो. विश्वव्यवहारातही लोकांमध्ये अन्य सामान्य पुष्प आणि गगनपुष्प यांच्यामधील विधी व निषेधात्मक व्यवहारामध्ये अंतर किंवा फरक आहे. संवित् अर्थात् चित्सत्तेमध्ये शक्ती विकल्परूप असते; मात्र अविकल्प आत्मा महाप्रकाश तर सर्वसामान्य किंवा अभेदरूप आहे. संविच्छक्तीमध्ये भेदभाव नाहीच. कधी कधी योगी आकाशातून फुले आणताना दिसतो. ती फुले निरुपादानद्रव्योत्पन्न अर्थात् कोणत्याही पदार्थांपासून किंवा साधनापासून उत्पन्न न केलेली अशी असतात. त्याला उपादान कारण नसते. "**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

चिदात्मैव हि देवोऽन्तःस्थितमिच्छावशाद्बहिः।
योगीव निरुपादानमर्थजातं प्रकाशयेत्।।

अर्थ :- ज्याप्रमाणे योगी निरुपादानद्रव्य अर्थात् साधन किंवा करण प्रकाशित करतो त्याचप्रमाणे चिदात्मा देवच स्वेच्छेने अंतःस्थित तत्त्वाचे बाहेर प्रकटीकरण करतो.

परिमलव्याख्यार्थ :- विद्यमान पुष्पामध्ये व अविद्यमान अशा आकाशपुष्पामध्ये काय फरक आहे? यात काहीही फरक नाही असे उत्तर आहे; कारण लोक हे सर्व प्रकारचा व्यवहार करणारे आहेत. ज्ञानरूपिणी श्रीभगवती पदार्थाच्या अस्तित्वज्ञानाला आश्रय अर्थात् आधारभूत आहे, असे आमच्या श्रीसद्गुरुमतमर्यादेनुसार स्फुरण हे प्रकाशाला आपला प्राणच समजून त्याला घेऊन वागते असे आम्ही वारंवार सांगत आलो आहोत. ते स्फुरण म्हणजे विमर्श अविद्यमान आकाशपुष्प व विद्यमान चंपकादि अर्थात् चाफा इत्यादि पुष्प या दोन्हींमध्ये सामान्यत्वाने म्हणजे निःपक्षपाताने असते. जर तेथे संवित् पक्षपातीपणाने व्यक्त झाली तर खपुष्प अर्थात् आकाशपुष्प व्यक्तच होणार नाही. त्यामुळेच आचार्य श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांनी "**सा स्फुरत्ता महासत्ता।**" यातील महासत्ता या पदाचे व्याख्यान करताना असे म्हटले आहे की, "**सा हि खपुष्पादिकमपि व्याप्नोति।**" अर्थात् "ती खपुष्पादिकांनाही व्यापून असते. त्याचप्रमाणे "**श्रीशिवदृष्टी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**शशश्रृङ्गादिकेनापि स्याद् विभक्त्या समन्वयः।**" व "**तस्मात् तत्रापि विभक्तियोगेन कारकत्वेन सति सत्तैव शिवताख्या।**" अर्थात् "शशशृंगालाही विभक्तिप्रत्यय लागतात म्हणजेच त्यांचा वाक्यात वापर होतोच. पदसंगतीमध्ये त्यामुळे विभक्तीचा संबंध आला असता कारकत्व येते आणि

कारकात्वाने सत्ता अर्थात् अस्तित्व मिळते. या अस्तित्वालाच श्रीशिवता असे म्हणतात." यावरून स्तंभकुंभादि पदार्थांचा जीवनदाता म्हणजेच त्यांना अस्तित्व प्रदान करणारा प्रकाशच आहे आणि तो सर्वत्र आहे व तो सामान्यरूपाने सर्वत्र आहे असे सिद्ध होते. सामान्य म्हणजेच वेगळा पदार्थ नाही हे ही सांगितले. येथे कल्पना म्हणजे व्यक्ती होत आणि अविकल्परूपी महाप्रकाश सर्वांमध्ये सामान्यरूपाने असल्याने सामान्य होय. सारखेपणाचे ज्ञान करून देणारा पदार्थ अशी सामान्याची व्याख्या वैशेषिकांनी केलेली आहे. त्यामुळे पशुत्व, गोत्व, मनुष्यत्व इत्यादि भिन्न आहेत या व्याख्येचे निराकारण झाले; कारण प्रकाशाला कोणतेही कारण लागत नाही अर्थात् तो स्वतःसिद्ध आहे. उलट या विश्वविकासाला हा महाप्रकाशाचा विमर्श अर्थात् स्फुरण कारणीभूत असल्याने हा महाप्रकाश सर्वसामान्य ठरतो. अशा प्रकारच्या सामान्याचा विश्वाशी समवाय संबंध आहे म्हणून विश्वच त्याचा विषय आहे. द्रव्यादींनी झाकलेला पदार्थ हा त्या महाप्रकाशाचा विषय होऊ शकत नाही; कारण ते सोपाधिक आहेत. शिवाय येथे असा प्रश्न विचारला जाऊ शकतो की, अन्य पुष्पांपेक्षा खपुष्पामध्ये असा कोणता विशेष आहे? जर तो विशेष म्हणजे तुच्छत्व म्हणजे तुच्छत्वशील खरोखर काय आहे? त्याचप्रमाणे ते वैशिष्ट्य शून्यत्वही नाही. (शून्यत्व म्हणजे अभाव होय;) कारण आकाश व पुष्प या दोन्हीही गोष्टी वेगवेगळ्या अस्तित्वात आहेत. त्या दोघांमध्ये म्हणजेच आकाशपुष्प आणि सामान्यपुष्प यांच्यामध्ये म्हणजे परस्परांमध्ये कार्य-कारण संबंध नसल्याने तेथे वैशिष्ट्याचाही अभाव आहे असे म्हणशील तर तसे नव्हे. या दोघात प्रत्येकाचे वेगवेगळे पर्यालोचन केल्यास अन्योन्यत्व म्हणजेच परस्परसंबंध संभवत नाही. जर असे अन्योन्यत्व त्यांच्या ठिकाणी असेल तर पूर्वीचाच व्याघात दोष येतो आणि जर त्यांच्यामध्ये मेलनाचा अर्थात् संयोगाचा अंश आहे असे म्हणाल तर असंबंधामुळे त्याचा व्याघात होईल; कारण मेलनाचा त्यांच्या ठिकाणी स्वीकार केलेलाच आहे. संयोग हा ज्ञात म्हणजेच प्रतीतीला येत असणारा आहे की न येणारा अज्ञात आहे? शेवटचा पर्याय म्हणजेच "हा संबंध प्रतीतीला न येणारा आहे," हा जुळत नाही; कारण तसा व्यवहार नाही. त्यामुळे प्रतीतिपक्ष अर्थात् अनुभवाला येणारा संबंध हाच शिल्लक राहतो. ती प्रतीती अर्थात् ज्ञानानुभव आकाशपुष्प व इतर सामान्य पुष्प यांच्यातील संबंध प्रस्थापित करीत तुच्छत्वालाच तुच्छ ठरविते. इतर चंपकादि पुष्पांप्रमाणे आकाशपुष्पालाही (वाचिक) व्यवहारात

स्थान असल्याने खोटे म्हणण्याची प्रतिभा अर्थात् बुद्धिशक्ती नाही म्हणून प्रतिपक्षाला मौनच स्वीकारावे लागते. त्यामुळेच काही योगी आकाशातूनही फुले आणताना दृष्टीला पडतात. तशा प्रकारच्या फुलांच्या उत्पत्तीचे उपादान कारण ते योगी सांगू शकतातच असे नाही. योग्याचा संकल्प किंवा इच्छेव्यतिरिक्त दुसरे काही कारण असू शकत नाही.

यासंबंधी "**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

चिदात्मैव हि देवोऽन्तःस्थितमिच्छावशाद्बहिः।
योगीव निरुपादानमर्थजातं प्रकाशयेत्।।

अर्थ :- चिदात्मा देवच योग्याप्रमाणे आपल्या इच्छेनुसार आतील सर्व पदार्थ उपादानकारणाशिवायच बाहेर व्यक्तरूपात आणतो.

या ठिकाणी आपण जरा सौजन्याने किंवा मित्रत्वाने विचार केला असता आपल्याला असे जाणून येईल की, संवित् शक्तीच्या ज्ञानाच्या आधीन असलेल्या सत्तारूपात सामान्य पुष्प आणि खपुष्प यांच्यामध्ये कोणताही भेद नाही; मात्र मायीय सत्तेच्या दृष्टीने इतर फुलांच्या बाबतीत विधिनिषेध म्हणजेच ग्राह्य व त्याज्य व्यवहार आहे. आकाशपुष्पाच्या बाबतीत निषेध विषयता सांगता येते. आता सामान्यजनांना समजण्यासारख्या गोष्टीचा कीस पाडून पांडित्याचे व्यर्थ प्रदर्शन पुरे.।।३२।।

*****

गाथा क्रमाङ्क ३३

अवतरणिका :- बरे, आकाशपुष्पादिकांच्या व्यर्थ व नीरस गोष्टी असू द्या. त्यांच्याविषयी खंडन व मंडनरूप बोलणे किंवा न बोलणे हे बरे आहे किंवा वाईट आहे हे कळत नाही. परंतु लोकव्यवहारात जे भाव आणि अभाव सिद्ध किंवा रूढ आहेत तेथे अभेदवाद कसा काय जुळणार? अशी शंका उत्पन्न झाली असता त्याला उत्तर देताना ग्रंथकार या कारिकेत असे म्हणतात की -

माणिक्कमरदआण व भावाभावाण भेदपडिभासं।
एक्करसो अण्णोण्णं दोण्ण वि उप्फुसइ फुरणसम्भेओ।।३३।।
(माणिक्यमरतकयोरिव भावाभावयोर्भेदप्रतिभासम्।
एकरसोऽन्योन्यं द्वयोरप्युन्मार्ष्टि स्फुरणसम्भेदः।।)

अर्थ :- माणिक आणि मरकत अर्थात् शनी यांच्यामधल्या भाव व अभावरूप भेदाच्या प्रतिभासाला त्यांचे एकरस प्रकाशस्फुरण तिरस्कृत अर्थात्

लुप्त करते.।।३३।।

विषेश :- प्रकाशाने युक्त असणे म्हणजेच स्फुरणयुक्त असणे होय. हे स्फुरण एकरससंबंधाचे द्योतक आहे. माणिक आणि मरकत या दोन्ही पदार्थांशी प्रकाश समस्वभावाने युक्त असतो. यात विषमता किंवा भेदभाव असत नाही. माणिक हे लाल रंगाचे असते व मरकत म्हणजे शनी निळ्या रंगाचा असतो. वेगवेगळ्या रंगांच्या भेदाने त्यांच्या त्यांच्या रूपांमध्ये दोघांचाही भास किंवा प्रतीती येते. ते दोघेही एकाच प्रकाशस्फुरणाशी संबंधित आहेत. त्यामुळेच माणिकाला प्रकाशाच्या संबंधाने अरुण-श्याम आणि मरकतमण्याला श्याम-अरुण असे म्हणण्यामध्ये वैचित्र्य अनुभवाला येते. एक परमात्मसत्तेच्या प्रकाशाच्या स्फुरणतेने माणिक आणि मरकत ही दोन्हीही युक्त आहेत. त्यांच्यामध्ये कोणताही भेद नाही. भेद हा माणिक रत्नाला लाल म्हटल्याने आणि मरकत मण्याला निळा म्हटल्याने प्रकट होतो. तो भेद प्रकाशाच्या स्फुरणसत्तेमध्ये अविषम, एकरस किंवा अभेदरूप होऊन जातो. परमात्म-प्रकाशात भाव किंवा अभावाची प्रतीती नाही. त्याच्यामध्ये केवळ एकरसता, अभेदता किंवा सामरस्यच आहे.

परिमलव्याख्यार्थ :- विश्वव्यवहारातही स्तंभकुंभादि वस्तूंचा भाव व अभाव हे दोन्ही परस्परांमध्ये विरुद्ध व संरुद्ध भावाने युक्त असतात. असा जो भेदाचा आभास म्हणजे परस्परांच्या वेगळेपणाचे ज्ञान त्या भेदाभासाला स्फुरणसंभेद युक्तीने घालवून टाकतो. प्रकाशमानता म्हणजेच स्फुरण होय. ती प्रकाशमानता म्हणजेच एक संबंध किंवा संभेद होय. तो एकरस आहे म्हणजेच भावाभावांचे स्वभावैक्य होय. त्या दोघांच्याही प्रकटपणात वैषम्या-भाव म्हणजेच सारखेपणा आहे. चिद्रूप अग्नीमध्ये अग्निरूप अर्थात् अग्नीशी तद्रूप झालेल्या भावाभावांचे वैषम्य ते काय दिसणार? याला माणिक व मरकतरत्नमणी यांचा दृष्टान्त दिला आहे. अरुण अर्थात् लालवर्ण माणिक व श्यामवर्ण किंवा नीलवर्ण मरकतरत्न जवळ जवळ ठेवले तर परस्परविरुद्ध वर्णांचा एक वर्ण कर्बुर म्हणजे धूसरादि वर्ण दोघांच्या वर्णाला झाकून टाकतो म्हणजेच वर्णभेद कळत नाही; कारण दोघांनीही आपापले वर्ण टाकून एकरूपता धारण केलेली असते आणि त्यामुळे माणिक तांबूसकाळे व मरकतरत्न काळसरतांबडे असा त्या दोघांचा विलक्षण वर्ण दिसतो. इतर शास्त्रातील नियमांनुसारही अभाव हा केवल स्तंभादिकांनी संबंधित असलेला आधारभूत भूभागादि भावरूप पदार्थच मानावयाला पाहिजे आणि तसा मानलाही

आहे. त्यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की, "**भावान्तरमभावोऽन्यो न कश्चिदनिरूपणात्।**" अर्थात् "अभाव हा भावांतर म्हणजे दुसरा भावरूप पदार्थच होय. त्याबद्दल काही बोलताच येत नाही." स्तंभादि भावरूप पदार्थांचा कुंभादि अन्योन्य-अभावरूपाने दिसणारा अभाव मानणे अपरिहार्यच आहे. याप्रमाणे भाव व अभावाचा युक्तीने विचार केल्यास एकरूपताच सिद्ध होते.।।३३।।

*****

गाथा क्रमाङ्क ३४

अवतरणिका :- या अर्थतत्त्वाची अर्थात् शब्द व आकाशादिकांची वारंवार व्यवस्था लावण्याचा प्रयत्न करूनही विद्युल्लतेप्रमाणे क्षणिक समाधान होते. मनाची पूर्ण तृप्ती होत नाही. त्यासाठी एखादा उपाय सांगावयाला हवा होता. अशी आकांक्षा पूर्ण करण्यासाठी पारमेश्वरी उपासना (पूजादिरूपाने युक्त) पाहिजे; कारण ती व्यवहारदृष्ट्या वेगळी असते. त्यामुळे या गाथेत ग्रंथकारांनी आधी पीठ व देवता याचा विचार केला आहे.

अण्डमए णिअपिण्डे पीठम्मि फुरन्ति कलणदेवीओ।
पप्फुरइ अ परमसिवो णाणणिहो ताण मज्झआरम्मि।।३४।।
(अण्डमये निजपिण्डे पीठे स्फुरन्ति करणदेव्यः।
प्रस्फुरति च परमशिवो ज्ञाननिधिस्तासां मध्ये।।)

अर्थ :- अंडमय असे स्वशरीररूप पीठ अर्थात् अर्चनकेंद्रामध्ये करणदेवी म्हणजेच इंद्रियांच्या शक्ती स्फुरित होतात आणि त्याच्या मध्यात (शक्तिमान्) ज्ञाननिधी म्हणजे प्रमाता श्रीपरमशिवच अभिव्यक्त किंवा त्यांच्या अर्थात् इंद्रियांच्याबद्दल आपली शक्तिमानता प्रकट करीत करीत प्रकाशित होतात.।।३४।।

विशेष :- व्यष्टिपिंड पृथ्वी आदि पंचभूते (तत्त्वमय) विश्ववैचित्र्यच अंड आहे. अंड आणि पिंड यांच्या स्वरूपभूत एकतेचे प्रतिपादन श्रुतिप्रसिद्ध आहे. नाथयोगामध्ये प्रामुख्याने या अंड म्हणजे जगत् आणि पिंड अर्थात् जीव यांच्या सामरस्याचे प्रतिपादन केलेले आहे. छत्तीस तत्वांनी युक्त असलेल्या अंडरूप विश्ववैचित्र्यामध्ये श्रीपरमशिव आपली शक्तिमत्ता प्रकाशित करीत असतात. हे त्यांचे स्वशरीर निवासस्थान आहे. विश्ववैचित्र्य विलासामध्ये शक्तिमान् आणि त्याची स्वरूपभूत सत्ता म्हणजे शक्ती प्रकाशित असते. स्वात्मरूप परमेश्वर हीच अंतश्चक्र देवता आहे. स्वात्मरूप परमेश्वराच्या या स्वशरीररूपमहापीठात त्याचे अर्चन म्हणजे पूजा होत असते. स्वात्मरूप

परमेश्वर चक्रदेवता आहे आणि करणशक्ती त्याच्या आवरणदेवता आहेत.

परिमलव्याख्यार्थ :- स्वदेह हाच पिंड आहे. तो पृथ्व्यादि पंचभूतांनी बनलेला आहे आणि सर्व विश्वगत आश्चर्याने युक्त आहे. त्यामुळे त्यालाच अंड म्हणजे ब्रह्मांड असे म्हटले जाते. अंड आणि पिंड यांचे एकरूपत्व आगमांमध्ये वर्णिले आहे.

याबद्दल "**श्रीत्रिशिरोभैरव**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

सर्वतत्त्वमयः कायस्तच्छेदानीं श्रृणु प्रिये।
पृथिवी कठिनत्वेन द्रवत्वेऽम्भः प्रकीर्तितम्।।

अर्थ :- हे प्रिये! हा देह सर्व तत्त्वांनी युक्त कसा आहे ते तुला आता मी अर्थात् श्रीशिव विस्ताराने सांगतो. या देहातील अस्थी आदि कठीण पदार्थ पृथ्वीपासून व पातळ रसरक्तादि पदार्थ जलापासून बनवलेले आहेत.

त्याचप्रमाणे "**श्रीपरमार्थसारसंग्रह**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

षट्त्रिंशत्तत्त्वमृतं विचित्ररचनागवाक्षपरिपूर्णम्।
निजमन्यदथ शरीरं घटादि वा तस्य देवगृहम्।।

अर्थ :- छत्तीस तत्वांनी भरलेले व चित्रविचित्र गवाक्षांनी अर्थात् दारे व खिडक्यांनी पूर्ण व्यापलेले हे आपले शरीर किंवा अन्य घटादिक हे देवघरच आहे.

त्या देवपीठामध्ये करणदेवता अर्थात् इंद्रियरूप शक्ती स्फुरण पावत असतात. त्यांचे आवाहन विसर्जनादि काहीही करावे लागत नाही. त्या स्वतःच स्पष्टपणे प्रकाशतात. त्या देवतांच्यामध्ये महान् प्रमाता श्रीपरमशिव स्फुरतात व प्रकाशतात. त्या शक्तींमध्ये स्वतःची शक्तिमत्ता ज्या प्रकाराने प्रकट होईल तशा प्रकारे ते प्रकाशित होतात; कारण ते ज्ञाननिधी अर्थात् चैतन्यसागर आहेत. ज्याप्रमाणे सर्व नदीनदांच्या प्रवाहाला आधारभूमी समुद्र आहे त्याप्रमाणेच सर्व इंद्रियांच्या शक्तीने उत्पन्न झालेल्या ज्ञानप्रकारांना हे श्रीपरमशिवच आश्रयस्थान आहेत. त्या इंद्रियशक्ती शब्दस्पर्शादि विषयांहून वेगळ्या राहू शकत नाहीत. शब्दस्पर्शादि तन्मात्रे हीच पंचमहाभूते आहेत व त्यामुळेच त्यांना विश्वमय असे म्हणतात.

याबद्दल शास्त्रात असे म्हटले आहे की -

शक्तिश्च शक्तिमांश्चेति पदार्थद्वयमुच्यते।
शक्तयोऽस्य जगत् कृत्स्नं शक्तिमांश्च महेश्वरः।।

अर्थ :- शक्ती व शक्तिमान् असे दोन पदार्थ आहेत. त्यांपैकी शक्ती

म्हणजे हे सर्व जगत् आणि शक्तिमान् म्हणजे श्रीमहेश्वर होत.

त्याचप्रमाणे **"श्रीकक्ष्यास्तोत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

सर्वाः शक्तीश्चेतसा दर्शनाद्याः स्वे स्वे वेद्ये यौगपद्येन विष्वक्।
क्षिप्त्वा मध्ये हाटकस्तम्भभूतस्तिष्ठन् विश्वाकार एको विभाति।।

अर्थ :- हे विश्वाकारी श्रीमहेश्वर आपल्या इच्छेने दर्शनश्रवणादि सर्व शक्तींना त्या त्या विषयांकडे एकाच वेळी प्रेरणा करून स्वतः मधोमध सोन्याच्या स्तंभासारखे शोभून दिसतात.

यानुसार आत्मरूप परमेश्वरच आतील चक्रदेवतांच्या रूपाने बाह्य व अंतरभेदाने आहे. त्या इंद्रियांच्या शक्ती याच आवरण देवता आहेत असे समजावे. त्यांची पूजा स्वशरीरात आत्मरूप महापीठातच योग्य आहे. ज्याप्रमाणे प्रतिमा व ग्रंथादि पदार्थ आत्मरूप मुख्यदेवतेच्या प्रतिनिधित्वाने मानल्या जातात त्याप्रमाणे हा देहच प्रामुख्याने पीठ किंवा आसन होय. इतर अंगांना स्थंडिल व मंडलादिरूपाने स्वीकारले आहे. असे सर्व कथनाचे तात्पर्य आहे.।।३४।।

❋❋❋❋❋

गाथा क्रमाङ्क ३५

अवतरणिका :- अशा प्रकारच्या अलौकिक परमेश्वराची उपासना कशी करावी अशी पृच्छा असल्यास ग्रंथकारांनी कृपा करून प्रेमाने पुढील कारिकेत असे सांगितले आहे की -

सो तत्थ अच्चणिज्जो विमरिसपुप्फाहिवाससुरहीहिं।
चित्तचसअप्पिएहिं वेज्जसुहावीरपाणवत्थूहिं।।३५।।
(स तत्रार्चनीयो विमर्शपुष्पाधिवाससुरभिभिः।
चित्तचषकार्पितैर्वेद्यसुधावीरपाणवस्तुभिः।।)

अर्थ :- (अंडमय निजपिंडामध्ये) श्रीपरमशिव (निजावरणदेवतामंडलित) विमर्शपुष्पवासित अर्थात् विमर्शरूप फुलांच्या गंधाने गंधित झालेल्या सुगंधांनी मंत्रित चित्तचषकामध्ये भयशोकादींचे हरण करणाऱ्या सर्व इंद्रियगत आह्लादमय अर्घ्यरूप पानामृत अर्थात् सुधासामग्रींनी पूजा करण्याला योग्य आहेत.।।३५।।

विशेष :- परमेश्वर श्रीशिवांचे वेद व आगमादींनी प्रतिपादन केले आहे. तेच श्रीशिव अंडमय निजपिंडपीठामधे अर्चनीय अथवा पूजनीय आहेत. या पूजेमधे वेद्यमयी सुधा ही भयशोकहर्षादि-अवस्था-वैचित्र्याने आम्ल, तिखट व मधुर अशी आहे आणि ती समस्त इंद्रियांना आह्लादित करीत असल्याने परमानंदमय, एकरसमय व कुलामृतस्वरूपिणी आहे. तिला तदावरण देवतारूप

शक्तींबरोबर श्रीपरमभैरवांकडून आत्मसात केले जाते. चित्त हे या अमृतद्रव्याच्या पानासाठी उपयुक्त चषक, पानपात्र किंवा पेला आहे. विश्ववैचित्र्यविलासामधे प्रवाहित भावच आत प्रविष्ट होतात आणि श्रीशिवांच्या पूजेच्या द्रव्यांमधे बदलले जातात अर्थात् ते भावच पूजेची उपकरणे होतात. परमेश्वरासाठी स्वात्मरूप विमर्श म्हणजेच प्रत्यभिज्ञारूप विमर्श अर्थात "स्व" चे ज्ञान हेच फूल आहे. मंत्राच्या शक्तींनी अभिमंत्रित किंवा अधिवासित पुष्पसुरभींनीच अर्चना म्हणजेच पूजा संपन्न होते. या सगळ्याचा आशय इतकाच आहे की, पीठ किंवा पूजास्थळाच्या रूपात देहाची अभ्यर्चना अर्थात् पूजादि करून शरीराच्या हृदयरूप आकाशात स्वात्मरूप महाप्रकाशस्वरूप परमेश्वराचे अनुसंधान करीत करीत त्या परमेश्वरयुक्त किंवा प्रसरित म्हणजेच उत्पन्न झालेल्या इंद्रियशक्तींचे चिंतन करून सर्वांतःकरण समष्टिरूप स्वचित्तामध्ये विश्ववेद्यविलासरूप अर्घ्यरूप द्रव्य आपूरित अर्थात् परिपूर्ण करून त्याला पारमेश्वर मंत्रशक्तींनी संस्कारित करून त्याच कुलामृताने निजावरणदेवता-परिमंडलित अर्थात् देवतापरिवाराने वेढलेल्या परमेश्वराची पूजा केली पाहिजे.

परिमलव्याख्यार्थ :- ज्याचा स्वभाव वेदागमादितून प्रसिद्ध आहे असा परमेश्वर शरीरातील हृदयपीठात पूजावा. पूजेमध्ये वेद्यामृत सर्व इंद्रियांना आह्लादक असल्याने पूजाद्रव्य ग्राह्य आहे. पूजा स्वभावतः किंवा वस्तुतः एकच असून भयशोकादि अवस्थावैचित्र्यामुळे ती आम्ल, मधुर व तिक्त अशा अनेक रसांची होते. वीर जे श्रीपरभैरव, वीरा जी स्वातंत्र्यरूपिणी प्रधानशक्ती व वीर श्रीभैरव जोडपी म्हणजे इंद्रिये यांच्याकडून हे अमृत प्राशन केले जाते अर्थात् आत्मसात केले जाते म्हणजेच परमात्म्याकडून त्याचा स्वीकार केला जातो. हे वेद्यामृत विश्वविलास हे ज्याचे उपलक्षण मानले आहे त्या विषयरूप आसवादि द्रव्यांपेक्षा श्रेष्ठ असल्याने पूजेचे मुख्य द्रव्य म्हणून उपयोगात आणले जाते. त्यामुळे जी जी वेद्यामृताने युक्त कुलद्रव्ये आहेत तीच पूजासाधने होत असा अर्थ होतो म्हणजेच त्या त्या इंद्रियांचे विषयही पूजनीय द्रव्ये अर्थात् पूजासाहित्य समजावीत. ही सगळी पूजाद्रव्ये चित्तरूप पेल्यामध्ये मोठ्या युक्तीने घेऊन परमेश्वराला अर्पण करावीत. चित्ताला पेल्याचे स्वरूप देण्याचे कारण असे आहे की, इकडे तिकडे धावणाऱ्या विषयवस्तूंना रुंद तोंडाच्या भांड्यात सहज घेता येते व प्राशनकर्त्या श्रीपरभैरवांना सगळ्यांचा एकच घोट सहज करता येतो. विश्ववर्ती पदार्थ बाहेर वेगवेगळ्या रूपाने स्फुरत असताना ते त्या त्या इंद्रियाने घेतले जाऊन क्षणभर चित्तात थांबून त्या

त्या मार्गाने श्रीभैरवात्म्याला जाऊन मिळतात. ही अत्युत्तम पूजापद्धती आहे.

यासंबंधी "**श्रीमहानयप्रकाश**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

भावा वृत्तिषु ताश्चित्ते चित्तं संविदि सा परे।
व्योम्न्यस्तङ्गमितो यत्र क्रम उल्लङ्घनात्मकः।।

अर्थ :- विषय हे चित्तवृत्तीत लीन होतात, वृत्ती चित्तात, चित्त हे संवित् अर्थात् शक्तीमध्ये व शक्ती ही पराकाशात लीन होते. येथे उल्लंघनक्रम थांबतो अर्थात् येथून पुढे जाणे नाही.

या सर्व वस्तू परमेश्वरामध्ये स्वात्मत्वयुक्त अर्थात् सहजस्फुरणरूप जो विमर्श म्हणजेच प्रत्यभिज्ञानात्मारूप परामर्श अर्थात् आत्मस्वरूपाचे ज्ञान हेच सुगंधित पुष्प आहे; कारण ते स्वभावपोषक अर्थात् "**स्व**" म्हणजे श्रीशिव आणि "**भाव**" म्हणजे शक्ती अर्थात् श्रीशिवशक्तींचे सामरस्य घडवून आणणारे व श्रीसद्गुरुरूप आहे. मंत्रशक्तीने त्या पुष्पाला सुगंधित करावे. नाहीतर शिळी फुले वाहिल्याचा शास्त्रोक्त दोष लागेल. या सर्वाचा सारांश असा आहे की, अगोदर पीठ म्हणजे स्थान म्हणून देहपूजन अर्थात् शरीरशुद्धी करून हृदयाकाशात आत्मरूप महाप्रकाशस्वभावाच्या परमेश्वराचे अनुसंधान ठेवून, त्याच्या भोवती पसरणाऱ्या इंद्रियशक्तींचे चिंतन करून नंतर मनबुद्ध्यादि-चतुष्टयरूप स्वचित्तामध्ये विश्वगत सर्व विषयांच्या अर्घ्य द्रव्यांनी चित्तांजली भरून आणि ते परामर्शयुक्त मंत्रशक्तीने संस्कृत करून अर्थात् ते संस्कारित करून घेऊन त्याच कुलामृताने आवरण देवतांच्या वर्तुळातील मध्यस्थ परमेश्वराची पूजा करावी. हा परमात्मा अर्थात् श्रीशिव हेच संकोचविकास-योगामुळे एका पाकळीपासून सहस्त्र पाकळ्यांपर्यंत आगमांमध्ये अर्चनीय म्हणजेच पूजनीय म्हणून सांगितले आहेत.

यासंबंधी "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

एकवीरो यामलोत्थस्त्रिशक्तिश्चतुरात्मकः।
पञ्चमूर्तिः षडात्माऽयं सप्ताष्टकविभूषितः।।
नवात्मा दशदिक्शक्तिरेकादशनिजात्मकः।
द्वादशारमहाचक्रनायको भैरवः स्थितः।
एवं यावत् सहस्त्रारे निस्संख्यारेऽपि वा विभुः।
विश्वचक्रे महेशानो विश्वशक्तिर्विजृम्भते।।

अर्थ :- एकवीर, युग्मामुळे झालेले, तीन शक्तींचे, चार करणांचे, पाच रूपांचे, षडात्मा, सात अष्टकांनी शोभणारे, नवात्मा, दहा दिशा ज्यांच्या

शक्ती आहेत असे, अकरा आत्मरूपी आणि बारा पाकळ्यांच्या महाचक्राचे स्वामी श्रीभैरव स्थिर आहेत. अशाच सहस्र ते असंख्यपाकळ्यांच्या कमलांमध्ये राहणारे ते व्यापक प्रभू आहेत. विश्वचक्रामध्ये विश्वशक्ती श्रीमहेश्वर शोभून दिसतात.

या तात्पर्यानेच चार स्रोतांनी प्रतिपादित केलेल्या (पूजा) प्रकारांची प्रवृत्ती आहे. यातच सर्व पूजारहस्य सामाविलेले आहे. बाह्यपूजा ही फुले, अक्षता, आसव, धूप, दीपादिकांनी होणारी असून ती आम्ही मानतोच; कारण "**अधिकं नैव दुष्यति।**" अर्थात् "पूजेत (उपचारादिकांचे) आधिक्य असल्यास दोष नसून गुणच आहेत." हा पूजाविचार आम्ही पुढे करणारच आहोत.।।३५।।

*****

गाथा क्रमाङ्क ३६

अवतरणिका :- यानंतर पूजारहस्य सांगितल्यामुळे ग्रंथकार क्रमाने पूजनीय देवताचक्रांचे रहस्य सांगण्यासाठी प्रथम उद्देश म्हणजेच पदार्थांचा नामनिर्देश करतात.

सिरिपीठपञ्चवाहअणेत्तत्तअविन्दचक्कए मरह।
मरह अ गुरुणं पन्तिं पञ्च अ सत्तीओ सिट्ठिपमुहाओ।।३६।।
(श्रीपीठपञ्चवाहनेत्रत्रयवृन्दचक्राणि स्मरत।
स्मरत च गुरूणां पङ्क्तिपञ्च च शक्तीः सृष्टिप्रमुखाः।।)

अर्थ :- (या गाथेमध्ये अर्चना अर्थात् पूजेच्या रहस्याचा उलगडा केला आहे. त्याचप्रमाणे यथाक्रम अर्च्यदेवताक्रमरहस्याचे प्रकाशन केले आहे.) श्रीपीठ, पंचवाह, नेत्रत्रय व वृंदचक्र या सर्व चक्रांचे चिंतन केले पाहिजे. श्रीसद्गुरुमंडल आणि पाच प्रमुख शक्ती म्हणजेच सृष्टी, स्थिती, संहार, अनाख्या आणि भासा यांचेही स्मरण केले पाहिजे.।।३६।।

विशेष :- श्रीपीठाच्या पूजोत्कर्षानेच त्याचे महत्त्व प्रकट होते. हे श्रीपीठ सर्वप्रतिष्ठाभूमी असल्याने प्रधान पीठाच्या रूपात प्रसिद्ध आहे. परमेश्वराच्या स्फुरणधारा म्हणजेच पाच महाशक्ती या पाच वाहांच्या नावाने प्रसिद्ध आहेत.

परिमलव्याख्यार्थ :- श्रीपीठ, पंचवाह, नेत्रत्रय व वृंदचक्र ही जी चक्रे किंवा स्थाने आहेत त्यांचे स्मरण करा किंवा विचार अथवा चिंतन करा. त्यातही ज्यांचा विचार किंवा परामर्श आवश्यक आहे त्या श्रीसद्गुरुनाथांच्या परंपरेचा विचार करा. श्रीसद्गुरुपरंपरेचे प्राधान्य दाखविण्यासाठी दुसऱ्यांदा "**स्मरत**" असे पद घातले आहे. सृष्टिप्रमुख ज्या पाच शक्ती आहेत त्यांचेही

स्मरण करावे. त्या पाच शक्ती म्हणजे सृष्टी, स्थिती, संहार, अनाख्या, भासा या होत. श्रीपीठ हे सर्वात पूज्य असल्याने महत्त्वाचे आहे. हे श्रीपीठ ओड्याण आदि इतर पीठांपेक्षाही श्रेष्ठ आहे; कारण ते सर्व पीठांचा आधार असून प्रधान पीठ आहे. हे श्री (पीठ) थोड्याच अक्षरांनी युक्त असून मंत्रबीजाप्रमाणे अनेक अर्थांचे प्रतिपादन करण्याला समर्थ आहे.

ही गाथा पुढील विस्ताराची रूपरेषा सांगणारी असून सर्व चक्रांचा क्रमानुक्रम व रहस्यप्रकाशिका आहे. पुढे सांगितल्या जाणाऱ्या सर्व देवतांच्या प्रकारांचा संग्रह यात आहे. या दृष्टीने "**श्रीमहाम्नाय**" ग्रंथातील ही सहजोक्ती पाहा.

यत्पीठचक्रार्चितपञ्चवाहप्रकाशमानन्दखमूर्तिचक्रम्।
अष्टाष्टचक्रं प्रविराजते तद्गुरुक्रमौघं सचतुष्टयार्थम्।।

अर्थ :- हे चक्र आनंदाकाशरूप, पंचवाहप्रकाशक, चौसष्ट उपचक्रांचे, श्रीसद्गुरुसमुदायरूप व चतुर्विध पुरुषार्थप्रद आहे.।।३६।।

******

गाथा क्रमाङ्क ३७

अवतरणिका :- यानंतर या गाथेत श्रीचक्राविषयी सांगताना ग्रंथकारांनी प्रथम पीठ ते नेत्रत्रयापर्यंत विभाग करून त्याचे पर्यालोचन अर्थात् विवेचन केले आहे.

पीठम्मि कलाओ णव पञ्चच्चिअ पञ्चवाहपअवीए।
सत्तदह फालणेत्ते वारह छोलह अ अण्णणेत्तेसु।।३७।।
(पीठे कला नव पञ्चैव पञ्चवाहपदव्याम्।
सप्तदश फालनेत्रे द्वादश षोडश चान्यनेत्रयोः।।)

अर्थ :- (या गाथेमध्ये श्रीचक्राचे क्रमाने वर्णन केले आहे. पीठ हेच स्वशरीर आहे) ज्यामध्ये श्रीपरमशिवांचा निवास आहे त्या या पीठामध्ये नऊ कला म्हणजेच नऊ शक्ती आहेत. विश्वगमागमस्थानमय अर्थात् विश्वामध्ये येणे व जाणे या क्रियेने युक्त अशी स्थानमय प्रवृत्ती हीच पदवी आहे. तिच्यामध्ये पंचवाहशक्ती अधिष्ठित आहेत. भालनेत्रामध्ये सतरा कला आणि उजव्यानेत्रामध्ये बारा आणि डाव्या नेत्रामध्ये सोळा कला किंवा शक्ती आहेत.।।३७।।

विशेष :- स्वशरीरपीठासंबंधी असे वर्णन आहे की, श्रीशिवशक्तींच्या उन्मेष व सामरस्याने महत् वीर्य उत्पन्न होते. त्यामुळेच शरीर हेच महापीठ आहे. या महापीठामध्ये नऊ कला अथवा शक्ती आहेत. परमेश्वरामध्ये स्त्री व पुरुष या दोघांमधल्या भेदाचा अभाव असल्याने त्याचे सर्व शक्तींनी संपन्न

असणे हीच कला आहे. या नऊ कला प्रमाता शक्तिमान् श्रीशिव आणि पृथ्वी, जल, तेज, पवन, आणि आकाशरूप प्रमेयवर्गमय शक्तीच्या क्रियांमध्ये अभिव्यक्त आहेत. प्रमात्यामध्ये आद्यस्पंद, त्याच्या वर प्रसरणोन्मुख अर्थात् प्रकट होण्याला किंवा वाढण्याला उद्युक्त झालेली शक्ती, त्या शक्तीच्या प्रमाण-स्फुरत्ता अर्थात् प्रमाणाने स्फुरणाऱ्यांमध्ये अभिव्यक्त झालेला इंद्रियपरिस्पंद, वस्तुव्यवस्थापनात्मिका स्फुरत्ता म्हणजेच वस्तूचे व्यवस्थापनयुक्त स्फुरणाची शक्ती, त्याचप्रमाणे प्रमेयोल्लास, प्रमेयवर्ग, पृथ्वी, जल, तेज, वायू आणि आकाशात रूपायित अर्थात् रूपयुक्त पीठनिकेतन हेच महापीठ चक्र आहे. परमेश्वराची स्फुरणधाराच पदवी किंवा प्रवृत्ती आहे. त्याच्या पाच कला याच पंचवाह आहेत. ही व्योमवामेश्वरी, खेचरी, दिक्चरी, गोचरी आणि भूचरी आहे. व्योम हे ॐमात्मक नामयुक्त आहे. ही शक्ती प्रणवरूप विमर्शाची प्रतिपादक असल्याने तिला व्योमवामेश्वरी असे म्हणतात. ही परमेश्वराची अविकल्पभूमीने युक्त अशी चिच्छक्ती आहे. खेचरी ही बोधरूप म्हणजेच ज्ञानरूप असून ती नादमय आहे. अंतःकरणरूप दिशांमध्ये संचार करणारी शक्ती हीच दिक्चरी होय. ती आनंदशक्ती आहे. गोचरी ही बाहेरच्या इंद्रियां-मध्ये संचार करणारी आहे. ही मंत्रमय शक्ती आहे. विषयभूमीमध्ये संचार करणारी शक्ती भूचरी आहे. या शक्ती चिद्, आनंद, इच्छा, ज्ञान आणि क्रियारूप आहेत. या शक्ती परा, सूक्ष्मा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी वाग्रूप आहेत. परमेश्वराची व्योमवामेश्वरी ही स्वतंत्र चिच्छक्ती आहे. ती चैतन्यरूपिणी सर्वात्मिका आहे. खेचरी आनंदमय आहे. ही परमात्म चिच्छक्ती परमात्म्या-मध्ये स्वात्मविश्रांती स्वभावाची अर्थात् परमात्म्याशी समरस राहून त्यांच्यातच विश्रांती घेण्याच्या स्वभावाची आहे. तिचा संचार मात्र बाहेर असतो. दिक्चरी ही इच्छामयी व अंतःकरणप्रसाधिनी अर्थात् अंतःकरण सुशोभित करणारी आहे. गोचरी ज्ञानमय आहे. ही चक्षू इत्यादि बाह्यइंद्रियांच्या द्वारा प्रकाशित होते. भूचरी क्रियामय आहे. ती विश्वविलासवैचित्र्य प्रकट करणारी आहे. भालनेत्रामध्ये सतरा शक्ती आहेत. भालनेत्राला मूर्तिचक्र असे म्हणतात. या मूर्तिचक्रामध्ये प्रमाता परमेश्वराचा वह्निरूप परमप्रकाश विद्यमान राहत असतो. अग्नीच्या बाह्य आणि आंतर अशा विभागक्रमाने दहा कला आणि सात जिभा प्रसिद्ध आहेत. दहा कला म्हणजे धूम्र, अर्चि, उष्मा, ज्वलिनी, ज्वालिनी विस्फुलिंगिनी, सुश्री, सुरूपा, कपिला आणि हव्यकव्यवाहिनी या होत. हिरण्या, कनका, रक्ता, कृष्णा, सुप्रभा, बहुरूपा व अतिरिक्ता या सात जिभा आहेत.

या सतरा शक्ती यथाक्रम चैतन्यप्राधान्य अभिमान, कर्तृत्व, अध्यवसाय, वचन, आदान, गमन, उत्सर्ज, आनंद, ज्ञान, निश्चय, संकल्प, श्रवण, स्पर्श, दर्शन, आस्वादन आणि आघ्राण या रूपांमध्ये पर्यालोचित अर्थात् रूपांतरित झालेल्या आहेत. उजव्या डोळ्यामध्ये प्रकाशरूप चक्र आणि डाव्या डोळ्यात आनंदरूप चक्र प्रकाशित होते. उजव्या डोळ्याच्या चक्राच्या बारा कला आणि डाव्या डोळ्याच्या चक्राच्या सोळा कला आहेत. प्रकाशचक्रामध्ये सूर्य प्रकाशित होतो. त्याच्यामध्ये बारा शक्ती आहेत. त्या शक्ती तत्त्वदृष्टीने यथाक्रम प्राणप्रधान, वाक्, पाणि, पाद, पायू व उपस्थरूप पाच कर्मेंद्रिये आणि मनप्रधान श्रोत्र, त्वक् अर्थात् त्वचा, चक्षू अर्थात् डोळे, रसना अर्थात् जीभ आणि घ्राणरूप अर्थात् नाक पाच ज्ञानेंद्रिये स्वरूप आहेत. अहंकार या सर्वांमध्ये वेगवेगळ्या रूपाने सर्वत्र अनुस्यूत राहत असतो. अशा प्रकारे उजव्या डोळ्याच्या प्रकाशचक्रामध्ये भगवान् मार्तंड अर्थात् सूर्य बारा रूपाने प्रकाशित होतात. डावा डोळा आनंद चक्र आहे. हा सोमांश आहे. यात सोळा कलांनी युक्त असा चंद्रमा प्रकाशित राहतो. चंद्राच्या सोळा कला या पाच कर्मेंद्रिये, पाच ज्ञानेंद्रिये आणि क्षिती म्हणजे पृथ्वी, जल, तेज, वायू, आकाश ही पंचभूते आणि मनाच्या रूपामध्ये प्रसिद्ध आहेत. हे चक्र प्रमेयवर्गाच्या उल्लासाचे प्रतीक आहे.

परिमलव्याख्यार्थ :- स्वशरीरालाच पीठ असे म्हटले आहे; कारण येथेच परमेश्वर पाच प्रकारांनी वहन करतो अर्थात् राहतो. या देहाबद्दल विचार करताना परस्परांच्या स्पर्शानंदाने संघट्टनाला उद्युक्त झालेले अभिन्न-स्वभावी, माता व पिता अर्थात् श्रीशक्ती आणि श्रीशिव या दोघांच्या सामरस्याने प्रवाहित झालेले स्त्रीपुरुषाचे वीर्य हेच ज्याच्या उत्पत्तीला निश्चित कारण आहे अशा देहातच अनेक देवतासमुदाय असणे योग्य आहे. म्हणूनच या देहाला पीठ असे म्हटले आहे.

या दृष्टीने "**श्रीमहानयप्रकाश**" या ग्रंथात याबद्दल असे म्हटले आहे की -

शिवशक्त्युभयोन्मेषसामरस्योद्भवं महत् ।
वीर्यं तस्माद्देह एव महापीठः समुद्गतः ।।

अर्थ :- श्रीशिव आणि श्रीशक्ती या दोघांच्या सामरस्यातून प्रवाहित झाल्याने उत्पन्न झालेल्या महान् वीर्यामुळेच हा देहच महापीठ आहे असे म्हटले आहे.

अशा प्रकारे पीठविचाराचे प्राधान्य प्रतिपादन करण्यासाठी आधी दूतीयजन म्हणजेच क्षुद्रदेवतायाग सांगतात. यासंबधी "**श्रीक्रमोदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

स्त्रियः सर्वेषु वर्णेषु योगिन्यः स्युर्न संशयः।
देहवद्योनिशुद्धिस्तु आत्मवल्लिङ्गशोधनम्।।
योनौ नवाक्षरीं न्यस्य लिङ्गे सप्तदशाक्षरीम्।
गुरुचक्रस्य पूजार्थं कुर्याद्योगिनिमेलनम्।।
नवाक्षर्या तु मन्त्रेण स्थापयेल्लिङ्गपीठवत्।
शिवशक्त्यात्मभावेन पुरुषो मन्थकः स्मृतः।।
मन्थयेदात्मनः शक्तिं मधुवच्छुल्कशोणितम्।

अर्थ :- सर्व वर्णातील स्त्रिया या योगिनी असतातच, यात कोणताही संशय नाही. देहाप्रमाणे योनिशुद्धी आणि आत्म्याप्रमाणे लिंगशुद्धी समजावी. योनीमध्ये नवाक्षरीचा आणि लिंगामध्ये सप्तदशाक्षरीचा अर्थात् सतराचा न्यास करून श्रीसद्गुरुचक्राच्या पूजेसाठी योगिनीशी संबद्ध व्हावे. नवाक्षरी मंत्राने लिंगपीठाची स्थापना करावी. श्रीशिवशक्तींच्या भावनेने पुरुष हा मंथनकर्ता होय. त्याने आपल्या शक्तीचे म्हणजेच शुक्रशोणितरूप मधूचे मंथन करावे.

त्याचप्रमाणे उपनिषदात असे म्हटले आहे की, "**यथैवं विद्वान् मिथुनमुपैत्यग्रिहोत्रमेव तस्य हुतं भवति।**" अर्थात् "हे सर्व जाणून घेऊन विषयसेवन करणारा पुरुष (अग्रिहोत्रतुल्य) होय. त्याने केलेले मैथुन म्हणजेच अग्रिदेवाची आहुती समजावी."


कला म्हणजे नऊ शक्ती आहेत. परमेश्वराच्या ठिकाणी स्त्री व पुरुष या भेदाचा अभाव असल्याने सर्वच शक्तिमय आहे व त्यामुळेच शक्तीला "कला" असे म्हटले आहे. त्या कलांचा विचार करता पहिला स्पंद हा प्रमात्याचा म्हणजे जीवाचा अंश होय. त्यानंतर प्रसरणाकरिता उन्मुख झालेली शक्ती म्हणजे दुसरा स्पंद होय. त्या प्रमात्याचा प्रमाणरूप इंद्रियमय तिसरा परिस्पंद होय. त्यानंतर वस्तुव्यवस्थारूपिणी त्याची स्फुरत्ता म्हणजे विमर्श होय. त्यानंतर प्रमेयांचा उद्रेक होतो. प्रमेयवर्गाचा सूक्ष्मदृष्टीने विचार करता पंचभूतातच त्याचा अंतर्भाव होतो. येथील या भूतांच्या उपासनेतील क्रम पुढीलप्रमाणे आहे. प्रथम आकाश, मग पृथ्वी, वायू, तेज आणि आप असा क्रम आहे. सर्वारंभी आत्म्याचा चिद्रूपत्वाने विचार म्हणजे आकाश होय. नंतर या चिद्रूपाला स्थिर करणे म्हणजे पृथ्वी होय. त्यासाठी करावी लागणारी हालचाल

म्हणजे वायू होय. त्यानंतर त्याला प्रकाशित किंवा उज्ज्वल करणे म्हणजे तेज होय आणि नंतर स्वविश्रांतिरूप पुष्ट्युत्पादन म्हणजे आप होय. असा क्रम आहे. अशा प्रकारे प्रमाता, प्रमाण व पाच प्रकारची प्रमेये मिळून पीठस्थान असा अर्थ होतो. काही जण पीठ, स्मशान, क्षेत्रेश, मेलाप व यजन अशा प्रकारे (पंचविध) उपासना करतात. जरी हे पीठ नऊ शक्त्यात्मक असले तरी ते प्रमाताप्रमाणांनी युक्त आकाशादिपंचभूत स्वभावाचे असल्याने त्याचे पंचवाह-चक्राशी तादात्म्यच असते किंवा (कोणी एखादा) प्रमाता, त्याची "प्रमा" (नावाची) शक्ती, त्याचे साधन प्रमाण, वस्तुव्यवस्थारूपी त्याची हालचाल व त्यात सामावलेले पंचविध प्रमेय अशा रीतीने पंचप्रकारता अनुभवाला येते.

त्याच प्रमाणे -

आकट्योराकन्धरमादोष्णोरा च नाभिसीमान्तम्।
षट्कोणं यच्छरीरं संवित्पीठं त्रिकोणसाम्यं तत्।।

अर्थ :- दोन कटींपासून मानेपर्यंत (एक त्रिकोण) व दोन खांद्यापासून नाभीपर्यंत (दुसरा त्रिकोण) असे षट्कोण शरीर आहे. यातील मधला त्रिकोण संवित्पीठ होय.



या रीतीने (पीठरूपाने) अगोदर स्वशरीरोपासना करावी. नंतर पुढील उपचार करावेत असा अर्थ सहज होतो. या ठिकाणी गणपतिबटुकादि देवतांची नावे, त्यांची अन्वर्थकता अर्थात् योग्यार्थता वगैरे सांगितल्यास ग्रंथगौरव दोष व रहस्यकथनाचा दोष हे उद्भवतील म्हणून संक्षेपाने सांगतो.

या दृष्टीने "**श्रीमहानयप्रकाश**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

धामादित्रितयेनैव वक्त्रभङ्गभयान्मनाक्।
प्रकाश्यते मया सम्यग् वाक्यैरविषमाशयैः।।

अर्थ :- जर स्थानादि त्रिकांचे वर्णन करू लागलो तर तोंड फाटून जाईल; (कारण ते अपरिमित आहे.) या भीतीने आम्ही थोडेच पण स्पष्ट व

सरळ वाक्यांनी सांगणार आहोत.

तसेच "**श्रीक्रमसद्भाव**" या ग्रंथातही असे म्हटले आहे की -

गोपनीयानि नामानि चोरेभ्यो द्रविणं यथा।
गोपनात् पालयन्त्येव मूर्तयस्तु महार्थतः।।

अर्थ :- ज्याप्रमाणे चोरांपासून धनाचे रक्षण करावे लागते त्याप्रमाणे नामादिरहस्याचे लक्षपूर्वक गोपन करावे. यामुळे त्या देवता महत्फल देऊन आपले पालन करतात.

विद्वानांनी पुढीलप्रमाणे काही निरुक्ती केल्या आहेत. गणपती म्हणजे संख्या केली जाते म्हणून गणः म्हणजे भोगरूप सहा मार्ग होय. त्यांचे रक्षण करतो म्हणून गणपती होय. **(गण्यते-संख्यायते इति गणः षडध्वा भोगरूप उल्लसः। तं पाति इति गणपतिरिति)** विद्वानांनी असे म्हटले आहे की, "**अप्यक्षरवर्णसामान्यान्निर्ब्रूयाद् न त्वेव न निर्ब्रूयात्**" अर्थात् "वर्णदृष्ट्या सामान्य निरुक्ती करावी नाहीतर करूच नये." पंचवाह या शब्दातील "वाह" म्हणजे परमेश्वराच्या स्फुरणधारा होत. त्या संख्येने पाचच आहेत, कमी नाहीत किंवा जास्त नाहीत. विश्वाच्या उत्पत्त्यादिकांना त्या धारा आधार आहेत. त्या पाचच कला म्हणवितात. त्या धारांची नावे अशी आहेत. (१) व्योमवामेश्वरी, (२) खेचरी, (३) दिक्चरी, (४) गोचरी व (५) भूचरी. काहींनी क्रम जरा वेगळा सांगितला आहे. तो गोचरी, दिक्चरी, भूचरी, व्योमवामेश्वरी व खेचरी असा आहे. यांची निरुक्ती म्हणजेच शब्दाची व्युत्पत्ती संप्रदायानुरूप करावी. असो! आमचा क्रम वर सांगितल्याप्रमाणेच आहे.

या दृष्टीने "**श्रीक्रमसिद्धितंत्र**" या ग्रंथात असे सांगितले आहे की -

व्योमवामेश्वरीसंज्ञा नादभूमिश्च खेचरी।
आनन्ददिक्चरीसंज्ञा गोचरी मन्त्रभूमिका।।
मन्त्राणां द्रव्यरूपत्वादावलिर्भूचरी तथा।

अर्थ :- व्योमवामेश्वरीला व्योमवामेश्वरी ही संज्ञा आहे. खेचरी ही नादभूमी आहे. दिक्चरी म्हणजेच आनंद असून गोचरी म्हणजे मंत्रभूमिका होय. मंत्राच्या द्रव्यरूपत्वामुळे आवलीला भूचरी असे म्हटले आहे.

तसेच "**श्रीकोमलवल्लीस्तव**" या ग्रंथात मीही असेच वर्णन केले आहे की -

भूतले किमथ किं गवां कुले दिङ्मुखेषु किमथो किमम्बरे।
किं ततोऽप्युपरि सर्वतश्च किं दृश्यसे तदपि किं न मृष्यसे।।

अर्थ :- पृथ्वीवर किंवा गाईंच्या समुदायात, दिशांमध्ये, आकाशात किंवा त्याही वर सर्वबाजूंनी तू दिसतेस; (पण अज्ञानी) लोक तुझा शोध का बरे घेत नाहीत?

आता पंचवाहांची निरुक्ती सांगतात. -

(१) व्योमवामेश्वरी :- ही परमेश्वराची निर्विशेषरूपिणी चिच्छक्ती होय. प्रणवोपजीवी जे आकाशादि पंचक ते उत्पन्न करण्याची शक्ती फक्त हिच्यातच आहे.

(२) खेचरी :- म्हणजेच ज्ञानरूप प्रमात्यात संचार करणारी शक्ती होय.

(३) दिक्चरी :- म्हणजेच दिशांमध्ये अर्थात् अंतःकरणामध्ये संचार करणारी ती दिक्चरी शक्ती होय.

(४) गोचरी :- म्हणजेच गोमध्ये अर्थात् बाह्येंद्रियांमध्ये संचार करणारी ती गोचरी शक्ती होय.

(५) भूचरी :- म्हणजेच भूमीत अर्थात् विषयभूमीत संचार करते म्हणून ती भूचरी शक्ती होय.

परमेश्वराची स्वतंत्र संविद्रूप अर्थात् ज्ञानशक्ती स्वभावतः निर्विकल्पक अर्थात् उपाधिरहित असूनही क्वचित् मोजक्या प्रमात्यात स्फुरण पावते व त्यानंतर त्याच्या अंतःकरणात प्रविष्ट होऊन व बाह्येद्रियसंबंधिनी होऊन बाह्य विषयांचा उपभोग घेते. ही प्रक्रिया सर्व पंथांमध्ये संमत आहे. याचा अनुभव चित्, आनंद, इच्छा, ज्ञान, क्रियाशक्ती आणि परा, सूक्ष्मा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या वाग्रूपाने येतो. परमेश्वराची चैतन्यलक्षणाचिच्छक्ती सर्व व्यवहार चालविण्यात स्वतंत्र आहे. ती व्योमवामेश्वरी होय. आनंद हा औपाधिक प्रमात्याच्या स्वात्मविश्रांतीच्या स्वभावाचा असल्याने त्याला खेचरी असे म्हणतात. इच्छा ही ज्ञानरूपत्वामुळे अंतरिंद्रियसाध्य असल्यामुळे ती दिक्चरी होय. ज्ञान हे चक्षुरादि बाह्येंद्रियांनी उद्दीपित होते म्हणून ती गोचरी होय. क्रिया सुद्धा पारमेश्वरी शक्तीमध्ये अत्यंत स्थूलत्वामुळे बाह्य वेद्यवर्गातील विविध विषयात दिसून येत असल्यामुळे ती भूचरी होय. अशाच प्रकारे परादि पाच वाणीसुद्धा "**विमर्शो बिन्दुनादौ च स्फोटः शब्दश्च वाक्क्रमः।**" अर्थात् "विमर्श, बिंदू, नाद, स्फोट व शब्द अशा रीतीने हा वाक्क्रम अर्थात् वाणींचा क्रम आहे," व अशाच क्रमाने तो अनुभवावयाला येतो, या "**श्रीपादुकोदय**" या ग्रंथात सांगितलेल्या प्रक्रियेने त्या त्या आनुगुण्यानुसार वर सांगितलेले व्योमवामेश्वर्यादि शक्तिपंचक स्वतःच

तर्काने बसवावे. सृष्टी, स्थिती, संहार, अनाख्या व भासा हे पंचक आणि इतरही सर्व पंचके यातच अंतर्भूत आहेत. या सर्व प्रक्रिया श्रीक्षेमराजादि विद्वानांनी पुस्तकात लिहिलेल्या आम्ही वाचल्या आहेत म्हणून नामनिर्देशादि विस्ताराने चमत्कार अर्थात् कौतुक किंवा गंमत म्हणून वर्णिल्या आहेत. यानंतर पाच प्रवाहाने वाहणाऱ्या किंवा असणाऱ्या परमेश्वराची प्रमातृ, प्रमेय व प्रमाण या त्रिपुटीने उपासना करावी असे निर्देशित करून पुढे मूर्तिचक्राचे वर्णन केले आहे, ते असे आहे. फाल म्हणजे ललाट होय. त्या भालप्रदेशी असलेल्या नेत्रांमध्ये सतरा शक्ती आहेत. त्याला मूर्तिचक्र असे म्हणतात. मूर्छनेमुळे अर्थात् मूर्च्छा आल्यामुळे, मोहरूपतेमुळे किंवा ऊर्ध्व-गतीमुळेही मूर्तित्व म्हटले आहे. येथे आत अहंतेचे व बाहेर इदंतेचे असे द्विविध स्फुरण होते. ज्यावेळेला अहंतेचा उद्रेक होतो त्यावेळेला इदंतेचा लोप होतो. त्याला मोह असे म्हणतात. ज्यावेळेला परत इदंतेचा उद्रेक होतो त्यावेळेला अहंतेचा लोप होतो. यालाही मोह असेच म्हणतात. अशा प्रकारे परमप्रकाश अग्निरूप प्रमात्याची अहंता श्रीपरभैरवाच्या ज्ञानापर्यंत वाढते व पाषाणादि जडापर्यंत कमी होते. या मोठ्या स्वातंत्र्यशक्तीला मूर्ती असे म्हणतात. तेथे सतरा कला सांगितल्या आहेत. अग्नीच्या बाह्य दहा कला व अंतस्थ सात कला मिळून सतरा कला वेदांमध्ये प्रसिद्ध आहेत.

त्या अशा आहेत.

धुम्रार्चिरूष्मा ज्वलिनी ज्वालिनी विष्फुलिङ्गिनी।
सुश्रीः सुरूपा कपिला हव्यकव्यवहे कलाः।।
हिरण्या कनका रक्ता कृष्णा चैव तु सुप्रभा।
बहुरूपाऽतिरक्ता च सप्त जिह्वा हविर्भुजः।।

अर्थ :- (१) धूम्रार्चि, (२) ऊष्मा, (३) ज्वलिनी, (४) ज्वालिनी, (५) विस्फुलिंगिनी, (६) सुश्री, (७) सुरूपा, (८) कपिला, (९) हव्यवहा व (१०) कव्यवहा अशा दहा कला आहेत. आता शिखा पुढीलप्रमाणे आहेत. (१) हिरण्या, (२) कनका, (३) रक्ता, (४) कृष्णा, (५) सुप्रभा, (६) बहुरूपा व (७) अतिरिक्ता (या अग्नीच्या सात जिह्वा आहेत. अशा मिळून या सतरा कला आहेत. मूर्तिचक्रशक्ती ही सतराच आहेत. (१) चैतन्य, (२) प्राधान्य, (३) अभिमान, (४) कर्तृत्व, (५) अध्यवसाय, (६) वचन, (७) आदान, (८) गमन, (९) उत्सर्जन, (१०) आनंदितृत्व, (११) ज्ञान, (१२) संकल्पन, (१३) श्रवण, (१४) स्पर्शन, (१५) दर्शन, (१६) आस्वादन व (१७)

आघ्राणन. हे प्रमात्याचे स्फुरणप्रकारच होत. यांची साधने अंतरिंद्रिये व बाह्यांद्रिये होत. या मूर्तिशक्ती संकुचित अर्थात् सामान्यज्ञानी प्रमात्याला अर्थात् जीवाला पशुत्व देतात व व्यापकस्वभावी प्रमात्याला स्वातंत्र्यशक्तीने उद्दीपित होऊन श्रीपरमशिवस्वरूप मांगल्याची मुक्त हस्ताने खैरात करतात.

यानंतर प्रकाशचक्र व आनंदचक्र यांचे विवरण पुढीलप्रमाणे केले आहे. उजव्या डोळ्यात प्रकाशचक्र बारा शक्तींचे आहे व डाव्या डोळ्यात आनंदचक्र सोळा शक्तींचे आहे. उजव्या डोळ्यातील या प्रकाशचक्राने सर्व प्रमेयांचे म्हणजेच वस्तूंचे प्रकाशन होते म्हणून उजवा डोळा प्रमाण अर्थात् ज्ञानसाधन आहे. तेथे बारा शक्ती आहेत. हंसमत्यादींच्या प्रमाणे महाप्रमात्यापेक्षा म्हणजेच आत्म्यापेक्षा प्रमाणत्व यांच्यात अधिक असल्याने यांना "शक्ती" असे म्हटले आहे. या शक्ती तत्त्वदृष्टीने बुद्धिप्रधान आहेत. त्या यथाक्रम वाक्, पाणि, पाद, पायू व उपस्थ ही कर्मेंद्रिये आहेत अर्थात् पाच कर्मेंद्रिये व बुद्धी एक मिळून सहा होत. मनःप्रधान श्रोत्र, त्वचा, चक्षू, रसना व घ्राण ही ज्ञानेंद्रिये अर्थात् पाच ज्ञानेंद्रिये व मन एक मिळून सहा होत. अशा या बारा शक्ती आहेत. अहंकार हा सर्वत्र अनुस्यूत असल्यामुळे वेगळा गणला जात नाही. उपनिषदात यासंबंधी असे प्रमाणवचन आहे की, **"प्रमाणरूपो भगवान् मार्तण्डो द्वादशधा प्रकाशते"** अर्थात् "प्रमाणरूप भगवान् श्रीमार्तंड बारा प्रकारे प्रकाशतात." डाव्या डोळ्यातले आनंदचक्र होय. आनंद म्हणजे आत्मरूप परमेश्वराचा "इदंतेने" चहूकडून स्फुरणारा समृद्धिस्वभावी प्रमेयवर्ग होय. तो सोम्य म्हणजेच चंद्राचा अंश आहे. तेथे सोळा कला आहेत. वस्तुतः या कला म्हणजे सोळा विकारच आहेत. हे सोळा विकार म्हणजे मन, पाच कर्मेंद्रिये, पाच ज्ञानेंद्रिये आणि आकाशादि पंचमहाभूते होत. यांमध्ये शब्द-स्पर्शादि सर्व ज्ञेयवस्तू अंतर्भूत आहेत. शब्दादिकांची स्थूलरूपे म्हणजे महाभूतेच होत. मनातच बुद्धी व अहंकार सामावलेले आहेत. याला पुराणात असे प्रमाण आहे की -

मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः।
बन्धाय विषयासङ्गि मुक्त्यै निर्विषयं मनः।।

अर्थ :- मन हेच मनुष्याच्या बंधाला आणि मोक्षाला कारणीभूत असते. बंधासाठी मन विषयाशी संबंधित असते व मुक्तीसाठी मन निर्विषय झालेले (असावे लागते.)

अशाच प्रकारे इतर चित्तादिकांचा विचार करावा. ही मूर्तिप्रकाश-आनंदचक्रे

वामेश्वर्यादि शक्तिपंचकरूपेच होत. तेथे प्रमातृवह्निरूप मूर्तिचक्र सर्वांवर असलेल्या सर्वसामान्यत्वाने स्फुरण पावणाऱ्या व्योमवामेश्वरीला निमित्त करून प्राधान्याने खेचरी शक्तीने प्रवृत्त होते. खेचरी शक्ती ही प्रमातृ अर्थात् जीवरूपाने स्फुरणयुक्त असल्याचे या आधीच सांगितले आहे. प्रमाणसूर्यरूपी प्रकाशचक्र दिक्चरी व गोचरी यांच्या संमेलनाने तयार झालेले आहे; कारण या दोन्ही शक्ती अंतर्बाह्य इंद्रियोल्लास अर्थात् स्फुरणरूप आहेत. प्रमेयसोममय आनंदचक्र हे भूचरीवर अवलंबून आहे. (व्योमादिशक्तींचा तीन चक्रात अंतर्भाव दाखविला आहे.) या तीन चक्रात इच्छा, ज्ञान व क्रिया या तीन शक्ती, अग्नी, सूर्य व सोम हे तीन बिंदू, भूः, भूवः व स्वः या तीन व्याहृती, प्राण, अपान व उदान हे तीन वायू, पृथ्वी, अंतरिक्ष व स्वर्ग ही तीन स्थाने, सत्त्व, रज व तम हे तीन गुण, इडा, पिंगला व सुषुम्ना या तीन नाड्या, देवयान, पितृयान व महायान ही तीन याने म्हणजे मार्ग किंवा साधने, स्थूल, सूक्ष्म व पर या तीन अवस्था, कुल, कौल व अकुल हे तीन विभाग आणि मंत्र, मुद्रा व निरीहा ही तीन रहस्ये इत्यादि आणखीही त्रिके यात सामावतात. याला प्रमाण **"तमेकनेमिं त्रिवृतं षोडशारम्"** अर्थात् "त्या एकनेमि त्रिवृत म्हणजेच तीन वेढे असलेल्या सोळा शक्ती आहेत."

✲✲✲✲✲✲

गाथा क्रमाङ्क ३७.५

अवतरणिका :- अशा प्रकारे स्थूलदेहाची पीठरूपाने उपासना करावी असे सांगून सूक्ष्मदेहाचाही असाच विचार करावा म्हणून वृंदचक्राचे विवरण करताना ग्रंथकार असे म्हणतात की -

पअडिअपञ्चक्खन्धे चोसट्ठी होन्ति विन्दचक्कम्मि।।३७.५।।
(प्रकटितपञ्चस्कन्धे चतुष्षष्टिर्भवन्ति वृन्दचक्रे।)

अर्थ :- (हे शरीर आठ पुरींनी युक्त आहे.) या शरीरामध्ये पाच स्कंधांनी युक्त अशा वृंदचक्रामध्ये चौसष्ट कला आहेत.।।३७.५।।

विशेष :- अडतीसाव्या गाथेखाली एकत्रित दिला आहे.

परिमलव्याख्यार्थ :- वृदांचे चक्र ते वृंदचक्र होय. वृंद म्हणजे समूह-स्वरूप होय. ते त्याचे समूहस्वरूप पुर्यष्टक अर्थात् अष्टविध शरीर व ज्ञान-सिद्धादिपंचकांच्या समष्टीमुळे आहे. त्याचे पाच स्कंध आहेत. ज्ञानसिद्ध सोळा, मंत्रसिद्ध चोवीस, मेलापसिद्ध बारा, शाक्तसिद्ध आठ व शांभवसिद्ध चार या न्यायाने स्थूलातील पंचवाहाप्रमाणे हे पाच प्रकार आहेत. ते मिळून

एकूण चौसष्ट होतात. पासष्टावी रुद्ररौद्रेश्वरी हिचा संबंध वरील सर्वांशी असल्याने वेगळी धरली नाही. हिचे दुसरे नाव श्रीकालसंकर्षणी असे आहे. हे चक्र आठ प्रकारांनी पुढील प्रकारे विभक्त आहे.

धाममुद्रावर्णकलासंविद्भावस्वभावतः।
पाताऽनिकेतदृष्ट्या च वृन्दचक्रं प्रकाशितम्।।

अर्थ :- (१) धाम, (२) मुद्रा, (३) वर्ण, (४) कला, (५) संवित्, (६) भाव (७) पात व (८) अनिकेत या आठ प्रकारांनी हे वृंदचक्र प्रकाशित होते. धाम म्हणजे स्थान असून ज्ञानसिद्धादींची क्रमशः कंद, नाभि, हृदय, कंठ व भ्रूमध्य ही स्थाने आहेत.

मुद्राविचार :- आता मुद्राविचार करू. या मुद्रा पुढीलप्रमाणे आहेत.

करङ्किणी क्रोधनी च भैरवी लेलिहानिका।
खेचरी चेति मुद्रायाः पञ्चात्मकतया स्थितिः।।

अर्थ :- करंकिणी, क्रोधनी, भैरवी, लेलिहानिका व खेचरी अशा पाच प्रकारच्या मुद्रा आहेत.

त्याचप्रमाणे **"श्रीविज्ञानभट्टारक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

करङ्किण्या क्रोधनया भैरव्या लेलिहानया।
खेचर्या दृष्टिकाले च परा व्याप्तिः प्रकाशते।।

अर्थ :- करंकिणी, क्रोधिनी, भैरवी, लेलिहानी आणि खेचरी या मुद्रा दृष्टिकालात पराव्याप्ती होऊन अर्थात् दृष्टीतील या चिह्नांनी व्यापून प्रकाशित होतात.

मुद्रा व बंधांचे प्रकारही तेथेच सांगितले आहेत.

मृद्वासने स्फिजैकेन हस्तपादं निराश्रयम्।
विधाय तत्प्रसङ्गेन परा पूर्णा मतिर्भवेत्।।१।।
उपविश्यासने सम्यग् बाहू कृत्वार्धकुञ्चितौ।
कक्षव्योम्नि मनः कुर्वन् शममायाति चिल्लयात्।।२।।
स्थूलरूपस्य भावस्य स्तब्धां दृष्टिं निपात्य च।
अचिरेण निराधारं मनः कृत्वा शिवं व्रजेत्।।३।।
मध्यजिह्वे स्फारितास्ये मध्ये निक्षिप्य चेतनाम्।
होच्चारं मनसा कुर्वन् ततः शान्ते प्रलीयते।।४।।
आसने शयने स्थित्वा निराधारं विचिन्तयेत्।
स्वं देहं मनसि क्षीणे क्षणात् क्षीणाशयो भवेत्।।५।।

अर्थ :- ज्यावेळी (साधकभक्तयोगिशिष्य) मृदू आसनावर एका बाजूवर अर्थात् एक अधोभाग टेकून व हातपाय जमिनीवर न टेकविता बसतो त्यावेळी बुद्धी पूर्ण व उत्कृष्ट होते.।।१।। चांगल्या आसनावर भद्रासनादि आसनात (बैठकीला अर्थात् ध्यानाला) बसावे. हात दुमडून काखेत शिरवावेत किंवा ठेवावेत. मनही तेथेच ठेवावे म्हणजे चैतन्यात मन लय पावून शांत होते.।।२।। स्थूल पदार्थावर दृष्टी स्थिर करून थोड्याच काळात मन निराधार अर्थात् निर्विषय करून श्रीशिवरूपात लावावे.।।३।। जबडा पसरून जिभेमधोमध मन स्थिर केल्याने व "ह" असा उच्चार केल्याने (बाहेर श्वास सोडल्याने) मन शांतरूपात लीन होते.।।४।। आसनावर किंवा अंथरुणावर कोठेही बसून स्वदेह निराधार आहे असे मनाने चिंतावे. असे करता करता मन निर्विषय होते।।५।।

(वरील बंधरूपी क्रिया सातत्याने पुष्कळ दिवस कराव्यात.) वस्तुतः करंकिणी म्हणजे स्वदेह, इंद्रिय व आत्मा यातील भेद दूर करणारी मुद्रा आहे.

याविषयी "**श्रीचिद्गगनचंद्रिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

अन्तरम्ब! बहिरप्यमी करा ये तवाक्षतनवोऽङ्क एष यः।
विग्रहो द्वितयमप्यतः परं चिन्नभो नयसि नः करङ्किणी।।

अर्थ :- हे माते! क्रोधनी म्हणजे पृथ्वी ते प्रकृतीपर्यंतच्या सर्वतत्त्व-समुदायाला आत उपसंहार करू इच्छिणाऱ्या क्रोधाने स्वात्मरूपतेला नेणारी शक्ती होय.

यासंबंधी "**श्रीचिद्गगनचंद्रिका**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

यत् प्रकृत्यवधि तत्त्वमण्डलं क्ष्मामुखं परिमितग्रहास्पदम्।
क्रोधनी त्वमसि संजिहीर्षया मन्त्रमूर्तिरिह तस्य जृम्भिका।।

अर्थ :- जे पृथ्वीपासून प्रकृतीपर्यंतचे थोड्या ग्रहांचे स्थान असलेले तत्त्वमंडल आहे त्याची हे क्रोधनी! तू संजिहीर्षेने अर्थात् उपसंहाराने मंत्रमूर्ती आहेस व त्याची जृंभिकाही अर्थात् जांभईही आहेस.

श्रीभैरवी म्हणजे एकाचवेळी आतील व बाहेरील पदार्थांविषयी पूर्णसंविद्रूपिणी शक्ती होय.

यासंबंधी "**श्रीचिद्गगनचंद्रिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

ग्रन्थयो द्विषडुमे! यया धृता सा निरावरणचिन्नभःपदा।
स्पन्दमूर्तिमृतभेदडम्बरा भैरवी त्वमसि विश्वमेलिनी।।

अर्थ :- हे उमे! अंतर्बहिस्थ बारा ग्रंथी निरावरण चिदाकाशात धारण

करून त्यांचे स्पंदन करणारी व अभेदत्वाने विश्व मेलन करणारी श्रीभैरवी तूच आहेस.

या श्रीभैरवीमुद्रेमुळेच निमेष व उन्मेषरूप समाधीची समरसता मिळत असल्यामुळे ही श्रीभैरवीमुद्रा आमची (म्हणजेच ग्रंथकर्त्याची) फार लाडकी आहे. यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की -

अन्तर्लक्षो बहिर्दृष्टिर्निमेषोन्मेषवर्जितः।
इयं सा भैरवी मुद्रा सर्वतन्त्रेषु गोपिता।।

अर्थ :- आत लक्ष (केंद्रित केलेले असून) निमेष व उन्मेष विरहित बहिर्दृष्टी (असलेली) अशी ही सर्व तंत्रांमध्ये रहस्य म्हणून सांगितलेली श्रीभैरवीमुद्रा आहे.

याविषयीच "**श्रीमहानयप्रकाश**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

महामेलापधर्मिण्यः कौण्डल्युन्मेषविग्रहाः।
निरावरणचिद्व्योमधामस्था भान्ति नित्यशः।।१।।
आपूर्य स्वबलोद्रेकसमुत्थं भेदडम्बरम्।
या स्थिता पूर्णविभवा निरावरणविग्रहा।।२।।
भैरवी सैव विख्याता मुद्रा सदसदुज्झिता।
निस्तरङ्गविकासात्मसामरस्यैकपालिनी।।३।।
आसां मेलापसिद्धानां देवीनां मुद्रिता सदा।
मु(द्रि ?द्र)णेयं द्विधा भासमुद्रेयं भैरवात्मिका।।४।।

अर्थ :- महामिलन हाच स्वभाव असणाऱ्या कुंडलिनीचा उन्मेष हेच स्वरूप असणाऱ्या व निरावरण चिदाकाशरूपी धामात राहणाऱ्या (मुद्रा) नेहमी प्रकाशित होत असतात.।।१।। मी स्वतःच्या बलाच्या उद्रेकाने उत्थित होणाऱ्या भेदडंबराने युक्त अथवा पूर्ण होऊन पूर्ण ऐश्वर्ययुक्त व निरावरण-स्वरूप होऊन स्थित असते.।।२।। सत् व असत्चा त्याग केलेली, तरंगरहित विकासयुक्त सामरस्यशाली ही श्रीभैरवीमुद्रा ओळखली जाते.।।३।। या मेलापसिद्ध देवींची नेहमी मुद्रित केलेली ही मुद्रणा दोन प्रकारची असून ही भासमुद्रा श्रीभैरवात्मक आहे.।।४।।

या श्रीभैरवीमुद्रेने कुंडलिनी शक्ती जागृत होते. त्यामुळेच आमच्या श्रीसद्गुरूंनी "**श्रीमनोनुस्तोत्र**" या ग्रंथात असे वर्णन केले आहे की -

स्तब्धदृष्टि बहिरर्थसंश्रयं निर्विकल्पमपि यत् तवासनम्।
मुक्तपञ्जरशुकानुकारि तद् भैरवं वपुरुदारमाहर।।

अर्थ :- स्तब्ध दृष्टी असलेले, बाह्य वस्तूचा आश्रय घेतलेले; परंतु तरीही निर्विकल्प अर्थात् विकल्परहित असे तुझे आसन आहे. (त्याचप्रमाणे) पिंजऱ्यातून मुक्त झालेल्या पोपटाप्रमाणे जे तुझे श्रीभैरवशरीर अर्थात् श्रीभैरवरूप आहे ते मला दाखव.

मीही "**श्रीपरास्तोत्र**" या ग्रंथात असेच वर्णन केले आहे की -

आनन्दोदयलक्ष्मणोरकलुषैरुत्पक्ष्मणोरुष्मलै-
रक्ष्णोरुन्मिषितैः प्रताप्य पृथिवीमन्तःस्थलैकस्पृशः।
पूर्णाहम्प्रथनोत्सवाय सुधियो यामूर्ध्वमध्यासते
सा काचित् त्वमचिन्त्यसिद्धिरचला मुद्रा महत्युच्यसे।।

अर्थ :- सानंद व अर्धोन्मीलित नेत्रांनी पृथ्वीतत्त्वाला म्हणजेच देहाला किंचित् तप्त करून हृदयाला स्पर्श करणारे विद्वान् योगी अहंब्रह्मानंद मिळविण्यासाठी ऊर्ध्वस्थानात तुझी उपासना करतात. अशी तू सिद्धिदायिनी श्रेष्ठ श्रीभैरवी मुद्रा आहेस.

पुर्यष्टकादि वासनासर्वस्वाचा ग्रास करण्याची इच्छा बाळगणारी ती लेलिहाना मुद्रा होय.

यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की -

अष्टपुर्युदितबीजवासनासंहतिप्रवणरश्मिपुञ्जया।
लीढमात्रमुखभेदया त्वया भूयते जननि! लेलिहानया।।

अर्थ :- हे माते! अष्टपुरीत उत्पन्न होणाऱ्या बीजभूत वासनांचा नाश करणाऱ्या प्रकाशकिरणांनी तू युक्त आहेस. तू मुख पसरून सर्वांना जिभेने चाटून टाकणारी लेलिहाना या नावाने निर्माण होतेस.

खेचरीमुद्रा म्हणजे वाच्यवाचकादि विकल्प क्षोभांचा नाश करणारी, सुषुम्ना मार्गाची सीमा ओलांडून जाणारी व आत्मज्ञानाशी अभिन्न अशा आकाराची शक्ती होय.

यासंबंधी "**श्रीचिद्गगनचंद्रिका**" या ग्रंथातील प्रमाण असे आहे की -

त्वं पराप्रभृतिवैखरान्तिमोल्लेखविस्तरविलापनोन्मुखी।
देव्यनावरणशम्भुसद्मगा खेचरी भवसि चिद्विकासिनी।।
वह्निसूर्यशशिधामघस्मरी कुण्डली तिडदिवोत्पतन्त्यसौ।
शाम्भवं जननि! बिन्दुमध्वना मध्यमेन च मतासि खेचरी।।

इति मुद्राविभागः

अर्थ :- (हे शक्ती!)तू परादि वाणींच्या विस्ताराला लुप्त करण्याला समर्थ

असणारी, अनावरणरूप श्रीशिवांच्या निवासस्थानापर्यंत गमन करणारी, चैतन्य-विकास करणारी, अग्नी, सूर्य व चंद्रस्थानांचा ग्रास करणारी, विजेसारखी लकाकणारी आणि मध्य अर्थात् सुषुम्णा मार्गाने श्रीशंभुस्थानापर्यंत जाणारी अशी कुंडलीरूपिणी आहेस.

अशा प्रकारे **"मुद्राविभाग"** सांगून झाला.

वर्ण विचार :- आता वर्ण विचार करू. वर्ण हे श्रीभैरवस्वरूपाचा शब्दसमूह आहेत. त्यांपैकी ज्ञानसिद्ध हे सोळा स्वरमय आहेत. **"क"**कार ते **"म"** अखेर वर्णरूप मंत्रसिद्ध होत. मेलापसिद्धांची संख्या सहा स्वररूप आहे. **"य"** पासून **"ह"** अखेर आठ शाक्तसिद्ध होत. **"अ"**कारकला स्वरूपाच्या शांभवसिद्ध होत. **"अ"**कार कला या बिंदू, अर्धचंद्र व निरोधक अशा नादस्वरूपाच्या आहेत. बिंदू म्हणजे सर्व वाच्यांशी अभिन्न असलेला प्रकाशात्मा व चंद्राकृती ॅ अनुस्वार होय. हिच्या या **"अ"**कार कलेच्या साहाय्याने परिमितयोग्यांचा नादात प्रवेश होतो. त्याचप्रमाणे अपरिमित-योग्यांची भेददृष्टी निरुद्ध होते अर्थात् त्यांचे भेदज्ञान नष्ट होते. नाद हा आत्मविचाराची परमश्रेष्ठ अर्थात् अर्थप्राप्यवस्तू आहे. श्रीपंचपिंडनाथात असणारे **"अ"**कारादि वर्ण ज्ञानासिद्धादींच्या क्रमाने होतात. शिवाय ज्ञानसिद्धादिक **"अ"**कार कलामय आहेत. शांभवीकला त्यांच्या समष्टिरूप आहेत. आम्ही **"अ"**कार व पंचपिंड यांची एकरूपताच मानतो.

यासंबंधी **"श्रीमहानयप्रकाश"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

अवर्णपञ्चपिण्डार्णरूपयोरद्वयी गतिः ।
यतस्तस्मादुच्यतेऽलं देवीनां तद्गतं वपुः ।।

अर्थ :- अवर्ण-पंचपिंडार्ण रूपांच्या दोन गती आहेत; कारण त्यामुळेच देवीचे शरीर त्याच्यात बसविले आहे.

या वर्णनाने श्रीमहार्थत्रिकदर्शनातील व यातील वर्णनात परस्पर फारसा भेद नाही हे सांगितले. अशाच प्रकारे ॐकाराचेही वर्णन आहे असे समजावे किंवा लावावे; कारण हा ॐकार ओड्याणपीठात असणारा, नादलक्षणाचा, परमाकाशरूप, सृष्ट्यादित्रयाचा ग्रासक, जाग्रदाद्यवस्थांचे अधिष्ठाते जे ब्रह्मादिदेव त्यांच्या रूपाचा, अकार, उकार व मकारात्मक, सर्व अविभाग प्रथेने युक्त अशा नादरूप अर्ध्या मात्रेने युक्त, पूर्वी सांगितलेल्या वर्णचतुष्टयात समरस होणारा व महानादाचा बीजभूत आहे.

"श्रीमहानयप्रकाशतंत्र" या ग्रंथामध्ये या प्रणवाला पुढील प्रकारे

वर्णनपूर्वक नमन केले आहे.

विसर्गस्थितिसंहारप्रथाग्रासैकतत्परः।
निरुपाख्यमहादीप्तिसमुल्लसनतत्परः।।
योऽध्युष्टकलनोद्रेकस्वभावः प्रणवाभिधः।
पीठाभिधं तमेवाहं नमाम्यागमसिद्धये।।
इति वर्णक्रमः

अर्थ :- सृष्टी, स्थिती व प्रलय यांचा ग्रास करण्यात तत्पर असलेला आणि निरूपिलेल्या महातेजाचे उल्लसन करणारा जो अध्युष्टकलन-उद्रेक अर्थात् खालील अध्वांचा म्हणजे सृष्ट्यादि कलांची अभिव्यक्ती करण्याच्या स्वभावाचा आहे त्याला प्रणव असे म्हणतात. त्या आगमसिद्ध पीठाला मी नमस्कार करतो.

अशा प्रकारे "**वर्णक्रम**" सांगून झाला.

कला विचार :- आता कला विचार करू. रौद्र्यादि कला होत. त्यांच्यापैकी रौद्री, वामा, अंबिका व ज्येष्ठा यांचे ग्रहण ज्ञानसिद्धादि चौघे करतात. शांभवी कला यांना सामावून घेणारी आहे.

यासंबंधी "**श्रीचिद्गगनचंद्रिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

ज्ञानदीधितिषु रौद्र्युदेति ते मन्त्रदीधितिषु वामयोदितम्।
योगदीधितिषु जृम्भतेऽम्बिका ज्येष्ठयेत्थमधिशक्तिदीधिति।।
देव्यभेदितकलाचतुष्टयी शम्भुदीधितिषु दीप्यते स्वरः।

अर्थ :- ज्ञानसिद्धांमध्ये रौद्री, मंत्रसिद्धांमध्ये वामा, योग म्हणजे मेलाप-सिद्धांमध्ये अंबिका, शाक्तसिद्धांमध्ये ज्येष्ठा व शांभवसिद्धांमध्ये या चार कलांशी अभिन्न अशी देवी कला ही आहे. या कलेत स्वरोद्दीपन अर्थात् नादोत्पत्ती होते.

संवित् विचार :- यापुढे संवित् विचार केलेला आहे. ज्ञान म्हणजे सामान्यज्ञान ही पहिली प्रथा अर्थात् अवस्था किंवा पायरी होय. या पायरीलाच आलोचना असे म्हणतात. मंत्र म्हणजे पदार्थविषयक क्रियादि सांगणारा होय. त्या मंत्राचे आत्म्यात विश्रमण किंवा विश्रांती म्हणजे मेलाप होय. वासनाशांती म्हणजे शक्ती अर्थात् शाक्त होय. सर्व वासनांची शांती आणि स्वात्मसंवित्‌च शिल्लक राहणे म्हणजे शांभव होय.

भावविचार :- आता भावविचार सांगितला आहे. परमेश्वराचा प्रकाश हा स्वभावतःच प्रसन्नगंभीर व निस्तरंग अशा जलराशींचे अनुकरण करणारा

आणि निर्विकल्प स्वरूपाचा होऊन स्वतंत्ररूप आनंदशक्तीचा अनुभव घेतो. त्याच्या या स्वभावाला शांभवी शक्ती असे म्हणतात. या शांभवी शक्तीत ज्यावेळेला थोड्या क्रियेची उन्मुखता म्हणजेच प्रवृत्ती दिसते त्यावेळेला शक्तीचा उल्लास झाला असे समजावे. नंतर तरंगाविर्भाव झाला की, मेलाप-शक्तिस्फुरण अर्थात् सारखे तरंग किंवा वरचेवर लाटा येऊ लागल्या म्हणजे मंत्राविर्भाव होतो आणि चंद्रोदयानंतर समुद्र जसा आपली मर्यादा सोडतो तसा (परमेश्वरप्रकाशामध्ये) क्षोभ झाला म्हणजे ज्ञानसिद्धोदय होतो. या अनुरोधाने ज्ञानसिद्ध हे प्रमेय, मंत्रसिद्ध हे प्रमाण, मेलापसिद्ध हे प्रमाता, शाक्तसिद्ध हे त्याच्या अवच्छेद व्यपोहाने अर्थात् व्यापकता सामावून घेतल्यामुळे किंवा स्वतःच व्यापक झाल्यामुळे शुद्धप्रमाते व शांभवसिद्ध हे पूर्णज्ञानमय, स्वतंत्र व श्रीपरमशिवरूप जाणावेत.

पातविचार :- पातविचार पुढे सांगितला आहे. पंचवाह व वृंदचक्र यांच्या एकात्मतेचे अनुसंधान किंवा विचार म्हणजे पात होय. शांभवसिद्धां-मध्ये व्योमवामेश्वरी, शाक्तसिद्धांमध्ये खेचरी, मेलापसिद्धांमध्ये दिक्चरी, मंत्रसिद्धांमध्ये गोचरी व ज्ञानसिद्धांमध्ये भूचरी अशा क्रमाने ऐकात्म्य पाहावे. याच रीतीने सृष्ट्यादि क्रमातही पाताचे अर्थात् एकात्मतेचे अनुसंधान सांगितले आहे.

यासंबंधी **"श्रीक्रमसिद्धितंत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

संवित्क्रममिमं देव! श्रृणु वक्ष्यामि सुन्दर।
सृष्टिं स्थितिं च संहारानाख्याभासास्वरूपकम्।।
ज्ञानं मन्त्रं च मेलापं शाक्तं शाम्भवसंयुतम्।

अर्थ :- हे देवा! हा संवित्क्रम मी सांगते तो ऐक. सृष्टीत ज्ञान, स्थितीत मंत्र, संहारात मेलाप, अनाख्यात शाक्त व भासामध्ये शांभव यांचे ऐकात्म्य पाहावे.

या दृष्टीने **"श्रीक्रमसद्भाव"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

ज्ञानं सृष्टिं विजानीयात् स्थितिर्मन्त्रः प्रकीर्तितः।
संहारं तु महाकालमेलापं परमं विदुः।।
अनाख्यं शक्तिरूपं तु भासाख्यं शम्भुरूपकम्।
पञ्चप्रकारमेतद्धि विज्ञेयं तत्त्वदर्शिभिः।।

अर्थ :- सृष्टीला ज्ञान म्हणून जाणावे. स्थितीला मंत्र असे म्हटले आहे. संहाराला महाकालमेलाप म्हणून जाणावे. अनाख्या म्हणजे शक्तिरूप आणि

भासा ही श्रीशंभुरूप आहे. अशा प्रकारे हे पाच प्रकार तत्त्वदर्शी ज्ञान्यांनी सांगितले आहेत.

अनिकेतविचार :- अनिकेत म्हणजे ज्ञानसिद्धादींच्या भावक्रमाचे प्रतिलोमतेने अर्थात् उलट रीतीने त्या त्या प्रमेयत्वाच्या विकल्पविक्षोभाच्या निरासाने परमप्रतिष्ठाभूमीपर्यंतच्या लाभांशाचा विचार होय. तो आठ प्रकारचा आहे. त्यापैकी ज्ञानसिद्ध शक्ती म्हणजे पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, पाच महाभूते व मन मिळून सोळा प्रकाराने विकारमय आहेत. मंत्रसिद्ध शक्ती अंतर्बहिरिंद्रियांच्या स्पंदनस्वभावी आहेत. इंद्रिये ही मनबुद्धी धरून बारा आहेत. त्यात अहंकार अनुस्यूत आहे. त्यामध्ये दोन अवस्था सांगितल्या आहेत. आत्मरूपापासून पदच्युत होऊन विषयात रमणे व विषय सोडून आत्मरूपात विश्रांती घेणे, या दोन प्रकारांमुळे त्या इंद्रिय वासनांचे चोवीस प्रकारचे उद्रेक होतात. मेलापकसिद्ध हे प्रमाते आहेत हे मागे सांगितले आहे. प्रमात्यांचा स्वभाव हा आहे की, ज्ञानसिद्धरूप सर्व प्रमेयाला मंत्रसिद्ध प्रमाणद्वारा आत्म्यात विश्रांती देणे म्हणजेच आत्म्याला प्रमाणांनी प्रमेयज्ञान करून देणे होय. प्रमाणभूत इंद्रियांची विषयांमध्ये प्रवृत्ती अधिक असल्याने मेलापसिद्धचक्र हे बारा इंद्रियमय आहे असा अर्थ होतो.

शाक्तसिद्धांचा विचार :- आता शाक्तसिद्धांचा विचार सांगतात. शक्ती ही वासनामय आहे. ती वासना पुर्यष्टकामुळे आठ प्रकारची आहे. तिच्या आठ पुरी पुढीलप्रमाणे आहेत. बुद्धी, अहंकार, मन, शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या त्या पुरी होत. या पुर्यष्टकांच्या संबंधाने हे चक्रस्फुरण आहे. शांभवी शक्ती म्हणजे ज्याच्या सर्व वासना लीन झालेल्या आहेत अशा भगवन् श्रीपरमशिवभट्टारकाच्या स्वरूपाशी अभिन्न अशी शक्ती होय. या शांभवी शक्तीच्याच तत्त्वदृष्टीमध्ये अंबा, ज्येष्ठा, वामा व रौद्री या नावांनी चार शक्ती सांगितल्या आहेत.

इत्येनां गुरुमुखसम्प्रदायलब्धा वाचालः शुक इव वृन्दचक्रचर्याम्।
पञ्चार्थक्रमपदवीरहस्यसंवित्सर्वस्वव्यतिकरगर्भिणीमवोचम्।।

अर्थ :- अशा रीतीने श्रीसद्गुरुमुखाने व संप्रदायाने कळलेली पंचविषय-क्रमपदवीरहस्यसंवित्सर्वस्वाने युक्त अशी वृंदचक्राची संपूर्ण माहिती एखाद्या बोलक्या पोपटाप्रमाणे मी यथाशक्ती येथे सांगितली.।।३७.५।।

*****

गाथा क्रमाङ्क ३८

अवतरणिका :- अशा रीतीने ग्रंथकारांनी पीठस्थान म्हणून स्थूलदेहाविषयी, वृंदचक्रस्वरूपात सूक्ष्म देहाविषयी व पंचवाहस्वभावाने कारण म्हणजे परदेहाविषयी सांगून आणि त्या त्रैविध्याचा प्रमाता, प्रमाण व प्रमेय तसेच मूर्ती, प्रकाश व आनंदचक्रदृष्ट्या विचारविनिमय करून त्या सर्वांवर श्रेष्ठत्वाने विलासणारी श्रीसद्गुरुनाथपरंपरा व्यतिरेकमुखाने पुढील प्रकारे सांगितली आहे.

ण हु मण्डले गुरूणं णिअमो णिअमाइलङ्घिणं जुत्तो।।३८।।
(न खलु मण्डले गुरूणां नियमो नियमातिलङ्घिनां युक्तः।।)

अर्थ :- (परमेश्वराहून अभिन्न) अशा श्रीसद्गुरुमंडलपंक्ती या याच्यात म्हणजे वृंदचक्रात नाहीत; कारण पंक्तिभेदामुळे नियमाचे उल्लंघन होते.।।३८।।

विशेष :- वृंदांचे चक्र हेच या अष्टपुरींनी युक्त असणाऱ्या शरीरामध्ये "वृंदचक्र" या नावाने ओळखले जाते. ज्ञानसिद्ध इत्यादि पाचांचे समष्टिरूप (म्हणून) पाच स्कंध परिगणित आहेत. हे पाच स्कंध म्हणजे ज्ञानसिद्ध, मंत्रसिद्ध, मेलापसिद्ध, शाक्तसिद्ध आणि शांभवसिद्ध होत. ज्ञानसिद्ध सोळा, मंत्रसिद्ध चोवीस, मेलापसिद्ध बारा, शाक्तसिद्ध आठ आणि शांभवसिद्ध चार अशी एकूण चौसष्ट वृंदचक्रे आहेत. याच्यात पासष्ठावी रुद्ररौद्रेश्वरी सर्वमयी असल्याने या चौसष्ठांहून वेगळी गणली जात नाही. धाम, मुद्रा, वर्ण, कला व संवित् या रूपांमध्ये वृंदचक्र निरूपित केले आहे. वर्ण म्हणजे श्रीमत्-शब्दराशि-भैरव-आत्मा होत. या वर्णांमध्ये ज्ञानसिद्ध सोळा स्वरांचे आहेत. मंत्रसिद्ध "**क**" पासून "**म**" पर्यंत वर्णात्मक आहेत. मेलापसिद्ध खंडस्वर रूप आहेत. शाक्तसिद्ध "**य**"कारापासून "**ह**"कारापर्यंत आहेत. शांभवसिद्ध "**अ**"कार कलारूप आहेत. "**अ**"कार कला या बिंदु-अर्धचंद्र-निरोधरूप आहेत. ज्ञानसिद्धादि हे "**अ**"कार कलामय आहेत. शांभवसिद्ध हे त्यांचे समष्टिरूप आहे. ज्ञान म्हणजे संवित्स्वभाव होय. मंत्र म्हणजे पदार्थोदय-संरभात्मापरामर्श आहे. तोच स्वात्मविश्रांत मेलाप आहे. त्याच रूपाच्या वासनाशांतीच्या स्वभावाने युक्त असे शाक्तसिद्ध आहेत. शांभवसिद्ध समस्त वासनांच्या विलयरूप स्वात्मसंविन्मात्र आहेत. भावस्वभावामध्ये पारमेश्वर प्रकाश परम स्वतंत्र पूर्णानंदमय आहे. प्रकाशरूप श्रीपरमशिवांच्या शक्ती म्हणजेच शांभव होय. ज्यावेळेला ते श्रीशिव कल्लोलक्रियोन्मुख अर्थात् क्रियेला प्रवृत्त होतात त्यावेळेला शाक्तोल्लास होतो. त्यांच्या उद्रिक्त अर्थात् उसळणाऱ्या कल्लोलामध्ये मेलापसिद्ध प्रकट होतो. कल्लोलकल्पनेमध्ये मंत्राचा उन्मेष होतो.

ज्ञानसिद्ध प्रमेय, मंत्रसिद्ध प्रमाण, मेलापसिद्ध प्रमातात्मक, शाक्तसिद्ध शुद्धप्रमातृरूप आणि शांभवसिद्ध पूर्णसंवित्स्वातंत्र्यमय पर्यालोचनीय आहे. संवित्क्रमामध्ये सृष्टी, स्थिती, संहार, अनाख्य आणि भासाशक्ती पर्यालोचनीय आहे. ज्ञानसिद्ध शक्तीच सृष्टी, मंत्रसिद्ध स्थिती, मेलापसिद्ध संहार, शाक्त अर्थात् शक्तिसिद्ध अनाख्य आणि शांभव अर्थात् शंभुरूपसिद्ध भासा आहे. ज्ञानसिद्ध सोळा विकारांनी युक्त आहे. मंत्रसिद्ध हे अंतर्बाह्य इंद्रियस्पंदवासनामय आहे. मेलापसिद्ध हे प्रमातृपरमार्थ स्वभावाने युक्त आहेत. शाक्तसिद्ध अर्थात् शक्ती वासनारूप आहेत. ही शक्ती पुर्यष्टकानुरूप आठ प्रकारची आहे. बुद्धी, अहंकार, मन आणि शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे पाच विषय मिळून या आठ पुरी होत. अशेष विश्ववासनाप्रलीन अर्थात् सर्व वासनांचा लय झालेल्या भगवान् श्रीशिवांच्या स्वरूपाहून अभिन्न शक्तीच शांभव होत. अशा प्रकारे श्रीशिव हे स्वदेहपीठ निकेतनरूपात स्थूल, वृंदचक्रात्मरूपात सूक्ष्म व पंचवाह स्वभावाने युक्त असल्याने पर म्हणजे श्रेष्ठ आहेत. प्रमातृ, प्रमाण, प्रमेयरूप मूर्ती, प्रकाश व आनंदचक्राचे वर्णन केल्यानंतर त्या व्यतिरिक्त उपासनीय श्रीसद्गुरुपरंपरेचे प्रकाशन असे आहे की, या पीठामध्ये स्वतः स्फुरित अर्थात् प्रकाशित होण्याच्या नियमामध्ये श्रीमंगलादेवीपासून श्रीमहेश्वरानंदांपर्यंत वेगवेगळी श्रीसद्गुरूंची पंक्ती नाही. स्वात्मरूप श्रीसद्गुरुनाथ सर्वत्र व्याप्त आहेत. त्यामुळे त्यांची वेगळी पंक्ती नाही. श्रीसद्गुरुपंक्तीच पूर्ण संवित्स्वरूप, अखंड ज्ञानरूप व सर्वव्याप्त आहे. श्रीसद्गुरुपंक्ती पूर्ण संवित्स्वभावरूप अर्थात् तिचे स्वरूप पूर्णज्ञान, संवित्स्वरूप अर्थात् शक्तिस्वरूप हेच आहे.

परिमलव्याख्यार्थ :- हाच त्या पीठातील व पीठप्रतिष्ठाप्य देवतातील भेद आहे की, पीठ व देवता यात जरी आधार व आधेय भाव असला तरी पीठाला (स्वतःहून) स्फुरणत्व नाही व देवतांना मात्र जातिवंत स्फुरत्ता असल्याने त्या सदैव प्रकाशोत्कर्ष आहेत. त्या देवतांपैकी पीठ देवतांचा स्फुरणाविषयी जो औपाधिक अर्थात् उपाधीच्या संबंधाने नियम आहे तो श्रीमंगलादेवी ते श्रीमहेश्वरानंदांपर्यंत असलेल्या श्रीसद्गुरुपरंपरेला लागू नाही; कारण हे श्रीसद्गुरुमंडल देवतादिकांच्या नियमांपलीकडील आहे म्हणजेच श्रीसद्गुरुपंक्ती ही पूर्णसंविद्रूपिणी आहे, हा त्याचा भावार्थ किंवा तात्पर्यार्थ होय; कारण त्यांना देशकालादि उपाधी शिवत नाही, हे त्यांचे वैशिष्ट्य होय. हे (म्हणणे) तात्त्विक दृष्ट्या जुळत नाही. केवळ त्या त्या उपाधिसंबंधाने औपचारिक म्हणूनच मानावे लागते. ज्याप्रमाणे एकच वस्तू आरसा, पाणी व

तेल इत्यादि आधारभेदांमुळे तशी तशी प्रतिबिंबित होते; (परंतु पदार्थ भिन्न वाटत नाही किंवा नसतो) त्याप्रमाणेच अनेक शरीरांचा संबंध आला तरी भेदज्ञान होत नाही.

ज्याप्रमाणे मीच "**श्रीपादुकोदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

तत्र यत् पूज्यमस्माकं शक्तीनां मण्डलं महत्।
स्वस्वभावात्मके शम्भौ तत् कृत्स्नं पर्यवस्यति।।
सोऽपि देवे गुरौ स्वात्मन्यैकात्म्यमुपगच्छति।
स च स्वभावादेकः सन्ननेक इव भासते।।
आरभ्य मङ्गलादीप्तिशिवानन्दादिकं क्रमम्।
अम्बानाथपदाध्यासात् पारम्पर्येण पूज्यते।।
शक्तिः शिवो देवपाणिर्दक्षिणामूर्तिरित्यपि।
अन्यथा वा समाख्यातो लोके सोऽयमलौकिकः।।
तत्तत्कालानुगुण्येन देवस्तैस्तैर्बुभुत्सुभिः।
तत्तत्पृथक्त्वमायाति कल्लोलैरवि भानुमान्।।
वैचित्र्यं च शरीरादेस्तस्यैवेच्छाविजृम्भितम्।
तद्विकल्पेन नानात्वं ज्ञेयं तत्पादुकास्वपि।।

अर्थ :- आम्हाला पूज्य असे हे शक्तिमंडल सर्वस्वभावाने युक्त अशा श्रीशंभूंमध्ये पर्यवसान पावते. ते श्रीशंभू देव, श्रीसद्गुरू व आत्मा यात एकरूपतेला पावतात. ते श्रीशंभू स्वभावतः एक असून अनेकवत् भासतात. श्रीशिव हे आपल्या श्रीशिवपदाचा अध्यास केल्यामुळे श्रीमंगलादीप्तीपासून क्रमशः श्रीमहेश्वरानंदांपर्यंत श्रीशिवपदाचा अध्यास करून परंपरेने शक्ती, श्रीशिव, देवपाणि व दक्षिणामूर्ती प्रभृति रूपात व अन्य देवरूपात पूजिले जातात. हे श्रीशिव अलौकिक सामर्थ्यवान् असल्याने वाटेल ती व तेवढी रूपे घेऊन त्या त्या कालानुरूप वेगळे भासतात. लाटांमध्ये प्रतिबिंबित झालेला सूर्य हा सूर्यासारखा, लंब, वर्तुळ व वक्रादि रूपाचा दिसतो. त्या त्या शरीरांचे विचित्रपण व नानात्व हा त्या श्रीशिवेच्छेचाच प्रभाव आहे व तो तत्पादुकातही आहे.

"**अतश्च तत्त्ववृत्त्या स्वात्माविभिन्नानुत्तरस्वभावनादशक्त्यात्मा विमर्श एव श्रीगुरुनाथ इत्युक्तं भवति।**" अर्थात् "याकरिता तत्त्ववृत्तीने पाहता स्वात्म्याशी अभिन्न असा श्रेष्ठ स्वभावाचा नादशक्तिरूपाचा विमर्श म्हणजे सहज प्रकाशरूप स्फुरण हेच श्रेष्ठ श्रीसद्गुरुनाथ होत.

"**श्रीमहानयप्रकाश**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

वस्तुतस्त्वस्वरोल्लासप्रथनोच्छूनतात्मकः।
यो विभाति महानादस्तमजं देशिकं श्रये।।

अर्थ :- स्वरावाचूनच स्वररूपाने प्रकट झालेला जो महानाद आहे त्याचा मी आश्रय करतो. तो जन्मरहित आहे व देशिक अर्थात् श्रीसद्गुरुरूपी आहे.

या दृष्टीने **"श्रीचिद्गगनचंद्रिका"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

अस्वरोल्लसनबीजमग्रिमोच्छूनतावपुरपाकृतक्रमः।
नाद एष तव विश्वदेशिकः कोऽपि स स्मृतिविमर्श ईश्वरे।।

अर्थ :- स्वरांशिवायच प्रकट होणारा, महच्छरीरी, क्रमरहित व सर्वांचा श्रीसद्गुरू असलेला असा हा अनाहत नाद ईश्वराच्या ठिकाणचे स्मरणरूप स्फुरण होय.

या स्फुरणाचे असे स्वरूप समजण्यासाठी श्रीपादुकांची उपासना सांगितली आहे. पादुका म्हणजे पराशक्ती होय. **"शैवीमुखमिहोच्यते।"** अर्थात् "त्या शक्तीला "शैवी" असे म्हटले आहे." विद्वानांनी तिचे स्वरूप असे सांगितले आहे की, **"परापरात्मनः स्वात्मनः परानन्दमयी स्वव्यतिरेककवलनोद्युक्ता परा शक्तिः पादुकेति गीयते।"** अर्थात् "पर म्हणजे श्रेष्ठ व अपर म्हणजे कनिष्ठ अशी स्व-रूपावाचून सर्वांचा ग्रास करण्यासाठी उद्युक्त झालेली किंवा समर्थ असलेली अशी आनंदमयी परब्रह्मशक्ती म्हणजे पादुका होय.

यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की -

वागुरामूलवलये सूत्राद्याः कवलीकृताः।
तथा कुलार्णवज्ञानं पादुकायां प्रतिष्ठितम्।।

अर्थ :- ज्याप्रमाणे मत्स्यजालाचे सर्व धागे एका मोठ्या सूत्रात एकत्रित केलेले असतात त्याप्रमाणे कुलार्णवगत ज्ञान पादुकात साठविलेले किंवा प्रतिष्ठित झालेले आहे.

या दृष्टीने **"श्रीपूर्वतंत्र"** या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

क्रमसङ्कोचगुलिका तद्विकासैकमूलिका।
तत्तत्स्वरूपा वीरादिवीरान्ता पातु पादुका।।

अर्थ :- क्रम, संकोच व विकासादि करणारी मुळी अर्थात् दिव्य औषधी वीरादिवीरांता अशी पादुका म्हणजे पराशक्ती (आमचे) रक्षण करो.

हिचे आणखी वर्णन मी लिहिलेल्या **"श्रीपादुकोदय"** ग्रंथामध्ये पाहावे.।।३८।।

******

गाथा क्रमाङ्क ३९

अवतरणिका :- यानंतर अशा प्रकारे उपपादन केलेल्या आत्मरूप परम श्रीशिवांशी अभिन्न अशा श्रीगुरुदेवांचे स्वतंत्र संविच्छक्तीपासून होणाऱ्या असाधारण कृत्यपंचकांचे वर्णन करण्यासाठी सर्वांच्या पलीकडच्या "सर्वोत्कृष्ट भासाचे" वर्णन वेगळे ठेवून प्रथमतः सृष्टी, स्थिती, संहार व अनाख्या या चारांचे वर्णन ग्रंथकार करीत आहेत.

सिट्ठीए दह कलाओ ठिईए दावीस होन्ति सत्तीओ।
एक्कादह संहारे तेरह ताओ तुरीअपव्वम्मि।।३९।।
(सृष्टौ दश कलाः स्थितौ द्वाविंशतिर्भवन्ति शक्तयः।
एकादश संहारे त्रयोदश तास्तुरीयपर्वणि।।)

अर्थ :- (या गाथेमध्ये परमेश्वर श्रीशिवांच्या स्वतंत्र संविच्छक्तीच्या स्वभावगत अशा असाधारण पाच कृत्यांमधल्या सृष्टी आदि चार कृत्यांचेच वर्णन केले आहे. यामध्ये भासा या कृत्याचे वर्णन नाही.) सृष्टीमध्ये दहा कला अर्थात् शक्ती, स्थितीमध्ये बावीस, संहारात अकरा आणि तुरीयामध्ये तेरा शक्ती आहेत.।।३९।।

विशेष :- सृष्टिकृत्यामध्ये परम काली विद्याच सृष्टिस्वभावयुक्त आहे. परमेश्वराच्या सृष्टिकृत्यामध्ये प्रथम प्रवृत्तीला जागे करणाऱ्या दहा शक्ती आहेत. त्या शक्ती उद्योग, अवभास, चर्वण, आत्मविलापन व निस्तरंग स्वभावाच्या आहेत. या शक्ती परमेश्वराच्या कर्तृत्वस्वभावाला प्रकट करतात. या शक्ती क्रिया, ज्ञान, इच्छा, उद्योग, प्रतिभा, सृष्टी, स्थिती, संहार, अनाख्य आणि भासा या रूपात प्रकट होतात. सृष्टी इत्यादि पाच कृत्यांमध्ये सर्व विश्ववैचित्र्य हे एका सृष्टिशक्तीमध्येच प्रस्फुटित होते. यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की -

तया व्याप्तमिदं विश्वं त्रैलोक्यं सचराचरम्।।

अर्थ :- हे चराचरासहित त्रैलोक्य विश्व त्याच एका सृष्टिमय महाशक्तीने व्याप्त झालेले आहे.

स्थितिकृत्यामध्ये बावीस शक्ती आहेत. सृष्ट अर्थात् निर्मिती झालेल्या पदार्थांचे त्याच रूपामध्ये संहारापर्यंत अवधारण म्हणजेच राहणे ही "स्थिती" होय. यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की -

स्थितिर्नाम स्वरूपस्य तत्तद्रूपतया धृतिः।

अर्थ :- स्थिती म्हणजे (पदार्थांच्या) स्वरूपाचे त्या त्या (मूळ) रूपात

धारण होणे होय.

शिरचक्रामध्ये युगनाथरूपी चार शक्ती आहेत आणि त्यांच्या चार देवी आहेत. साधिकार व निरधिकार या प्रकारानुसार बारा राजपुत्र आहेत आणि हृदयामध्ये कुलेश्वर आणि कुलेश्वरी आहेत. हे युगनाथ उड्डियाण, जालंधर, पूर्णगिरी आणि कामरूपपीठामध्ये अधिष्ठित राहून कली, द्वापर, त्रेता आणि कृतयुगानुसार नाथरूपामध्ये जाग्रत, स्वप्न, सुषुप्ती आणि तुर्यावस्थेने व्यापलेल्या विश्वाच्या स्थापनेमध्ये अकार, उकार, मकार व नादात्मक प्रणवकलारूप मंत्रांनी वाढविलेल्या ऐश्वर्यरूपामध्ये कर्ता, ज्ञाता, व्यवसिता आणि चेतिता या क्रमाने श्रेष्ठ कर्तृस्फुरत्तेने अनुप्राणित अर्थात् प्राणरूपाने युक्त अशा रूपामध्ये विद्यमान राहतात. या चारही पीठांमध्ये अखिलेश्वरी परमेश्वरी श्रीमहादेवी विद्यमान राहते. जगताचे रंजन केल्याने अर्थात् जगताला तुष्ट करीत असल्यामुळे साक्षात् देव श्रीमहेश्वर हेच राजे आहेत. राजपुत्राच्या साधिकार क्रमाने बुद्धि-सहित पाच कर्मेंद्रिये आणि मनासहित पाच ज्ञानेंद्रिये हीच निरधिकार क्रमाने कार्यामध्ये प्रवृत्त होतात. कुलेश्वर हाच अहंकार आहे. त्याची अभिमानशक्ती ही कुलेश्वरी आहे. संहाराच्या शक्ती अकरा आहेत. त्या शक्ती सर्वान्तःकरण समष्टिरूप अहंकार आणि बाह्य दहा इंद्रियांचे भक्षण करीत करीत स्फुरित होतात. हाच अकरा रूपामध्ये तत्त्वनिश्चय होय. अहंकार म्हणजेच प्रमाता होय. हीच एकादश रुद्रत्वाची भावना होय. अनाख्य क्रमामध्ये तेरा शक्ती आहेत. अनाख्य चक्र म्हणजेच तुरीयचक्र होय. आख्याशून्यत्वामुळे म्हणजेच त्या शक्तीची व्याख्या करता येत नसल्यामुळे किंवा तिचे वर्णन करता येत नसल्यामुळे तिला अनाख्या असे म्हणतात. आख्या ही पश्यंती इत्यादि तीन स्थूलवाक् स्वभावाची आहे. तुरीय ही शून्यमयी कक्षा विशेष आहे. ही अकथ्य शक्ती आहे. सृष्टिसृष्टी, सृष्टिस्थिती, सृष्टिसंहार, सृष्टितुरीय, स्थितिसृष्टी, स्थितिसंहार, स्थितितुरीय, संहारसृष्टी, संहारस्थिती, संहारसंहार व संहारतुरीय रूपामध्ये बारा इंद्रियांची ही स्फुरत्ता आहे. सर्वांमध्ये अनुस्यूत अशी भासा शक्ती हीच तेरावी शक्ती आहे.

परिमलव्याख्यार्थ :- सृष्टिविचार - प्रथम सृष्टीसंबंधीचा विचार कथन करतात. सृष्टी म्हणजे उद्योग, अवभास, चर्वण, आत्मविलापन व निस्तरंगत्व या पाच लक्षणांची समष्टी होय. आम्ही सर्व प्रमाते अर्थात् जीव या पंचकाशिवाय असू शकत नाही हे विचाराने किंवा तर्काने जाणावे. ज्याप्रमाणे कुंभार इत्यादि स्वतःच्या बुद्धीमध्ये स्थित असणाऱ्या कुंभादि पदार्थांना बाहेर वेगळे

करण्यासाठी उद्युक्त होतो, (हा उद्योग होय.) त्या पदार्थाला. अर्थात् कुंभाला चक्रादि साधनांनी प्रकाशित करतो, (हा अवभास होय.) नंतर त्या घटादि वस्तूला आव्यात ठेवून वारंवार पाहतो, (हे चर्वण होय.) त्यानंतर मनासारखे झाल्यानंतर स्वस्थ अर्थात् उदासीन किंवा निष्क्रिय होतो, हे औदासीन्यच त्याचे आत्मविलापन अर्थात् त्या कार्यापासून दूर होणे होय. काही वेळाने किंवा अर्थप्राप्तीनंतर त्याला त्या क्रियेचा विसर पडतो (ही निस्तरंगता होय); कारण कुंभादिवस्तूच तरंगरूपाने प्रकट होतात व पुन्हा परमेश्वरात विलीन होतात. ईशसृष्टीतील या पाच गोष्टी आत्मपरामर्शाने युक्त असल्याने त्यांना पवित्रता आहे व सामान्यक्रियेत आत्मसंबंध नाही एवढाच काय तो यामध्ये फरक आहे, हे आम्ही पूर्वीही सांगितले आहे. "सृष्टी" मध्ये प्रथम प्रवृत्तीसाठी म्हणजेच प्रथम क्रिया करण्याला उन्मुख होणाऱ्या कला म्हणजेच एकूण दहा शक्ती आहेत. त्या योनी अर्थात् सृष्टिहेतू आहेत. तत्त्वदृष्टीने पाहता उद्योगादि पाच कला व कर्तृस्वरूप हे सर्व तत्त्वदृष्टीत पर्यवसान पावते. तात्पर्यतः सृष्ट्यादि पाचही गोष्टी एका सृष्टीतच पर्यवसान पावतात.

त्याचप्रमाणे "**श्रीक्रमसद्भाव**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

तया व्याप्तमिदं विश्वं त्रैलोक्यं सचराचरम्।

अर्थ :- त्या महाशक्तीने हे चराचरासहित सर्व विश्व व त्रैलोक्य व्यापलेले आहे,

अशा प्रकारे इतर ठिकाणीही चक्रामध्ये त्या चक्राव्यतिरिक्त चक्रभावाचा प्रवेश हा अवश्य घडणारा असतो; कारण यासंबंधी "**प्रधानेन व्यपदेशा भवन्ति।**" अर्थात् "प्रधान म्हणजे मुख्य वस्तूमुळे व्यपदेश प्रख्यात होतो," असे शास्त्र आहे. त्या त्या उद्रिक्तांशाच्या अर्थात् उसळणाऱ्या शक्तीच्या संग्रहामुळे किंवा एकत्रिकरणामुळे सृष्टी आदि गोष्टींची वेगवेगळी व्यवस्था आहे.

यासंबंधी "**श्रीक्रमसिद्धी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

दोहे व्याप्तं गवि क्षीरं स्तनाभ्यां प्रसृतं यथा।
सर्वगा व्यापिनी सूक्ष्मा एकस्मिन् प्रसृता शिवा।।

अर्थ :- ज्याप्रमाणे कासेत व्यापलेले गाईचे दूध स्तनातून पसरते अर्थात् बाहेर पडते त्याप्रमाणेच ही श्रीशिवा अर्थात् शक्तिस्वरूपिणी सूक्ष्म, व्यापिनी व सर्वत्र जाणारी म्हणजे पसरलेली असून एकातच विस्तारलेली आहे.

या संबंधी "**श्रीमहानयप्रकाश**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

येयं तस्य निरौपम्यशरीरा दीप्तयस्तु ताः।
नियतग्रहसंस्थानं निधानाय समुत्थिताः।।
ता एव गदिताः पञ्च योनयः परधामगाः।
नियतग्रहसंस्थानकल्पनापरिवर्जिताः।।

अर्थ :- ही जी श्रीशिवा आहे ती श्रीशिवांची शक्ती असून ती निरूपम देहाची आहे. तिच्या दीप्ती अर्थात् प्रकाशरूप शक्ती ग्रहणस्थापनादिं विषयी उद्युक्त असतात. त्यांनाच सृष्ट्यादिहेतू असे म्हटले आहे. ज्यावेळेला त्या परात्म्यात राहतात त्यावेळेला सृष्ट्यादिकल्पनारहित म्हणजे सुप्त अवस्थेत असतात.

याचे तात्पर्य असे आहे की, सृष्टिप्रभृति उद्योग व त्याचा अभाव हे दोन्हीही या श्रीशिवादेवतेतच आहेत.

"**श्रीक्रमसद्भाव**" या ग्रंथातही असे म्हटले आहे की -

श्रृणु मे परमां कालीं विद्यां सृष्टिस्वभावगाम्।

अर्थ :- सृष्टिस्वभावाची विद्या ही परमकालीरूपिणी असून माझीच शक्ती आहे.

याचा विचार आम्ही पुढे देखील केला आहे. अशा प्रकारे परमेश्वराच्या एका कृत्यातसुद्धा पाच कृत्ये सामावलेली असून त्यातच त्यांची प्रवृत्ती व उन्मुखताही अर्थात् उभारणी भरलेली आहे.

याबद्दल "**श्रीमहानयप्रकाश**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

इत्थमेकैव पञ्चात्मरूपेण स्फुरति स्वतः।
स्वभावं प्रकटीकर्तुं या देवी तामहं श्रये।।
आसां मध्यात् तु देवीनां यदैका स्फुरति स्वतः।
सर्वास्तदैव सततं सामरस्येन भान्त्यलम्।।

अर्थ :- अशा प्रकारे जी श्रीशक्ती एकटीच पाच रूपाने (स्वतःच-स्वतःला प्रकट करण्याकरिता) स्फुरते तिला मी शरण जातो. त्याचप्रमाणे या सर्वदेवींपैकी एकटी एकदेवी स्फुरण पावली तरी सामरस्यामुळे सर्वच्या सर्व देवी प्रकाशतात.

"**श्रीचिद्गगनचंद्रिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

पञ्चसु स्फुरति देवि! वृत्तिषु त्वन्मयीषु यदि काचन स्वतः।
शश्वदाशु निखिलास्तदैव ताः सामरस्यमधिरुह्य भान्त्यमूः।।

अर्थ :- हे देवी! जर कोणी म्हणजे पाचांपैकी एखादी शक्ती स्वतः

त्वन्मय अशा पाच वृत्तींमध्ये स्फुरली तर अन्य सर्व शक्ती सामरस्यामुळे तत्काळ प्रकाशतात.

त्याचप्रमाणे "**श्रीशिवदृष्टी**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

यदेकतरनिर्माणे कार्यं जातु न जायते।
तस्मात् सर्वपदार्थानां सामरस्यं व्यवस्थितम्।।

अर्थ :- साधनांपैकी एखादे जरी नसले तरी कार्याची उत्पत्ती होत नाही. त्यामुळे सर्व पदार्थांची समरसता किंवा एकरूपता म्हणजेच परस्परावलंबित्व ठेवले आहे.

स्थितिक्रमविचार - आता सृष्टीनंतर "**स्थितिक्रम**" सांगतात अर्थात् स्थितिक्रमासंबंधीचा विचार कथन करतात. स्थितीमध्ये बावीस शक्ती आहेत. स्थिती म्हणजे उपसंहार होईपर्यंत सृष्ट पदार्थांचे अव्याकुल अर्थात् क्षेमरूपात असणे होय.

यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की -

स्थितिर्नाम स्वरूपस्य तत्तद्रूपतया धृतिः

अर्थ :- स्थिती म्हणजे पदार्थांच्या स्वरूपाचे त्या त्या रूपात स्थित असणे होय.

शिरचक्रात चार युगनाथ व त्यांच्या चार देवी अर्थात् स्त्रिया असे मिळून आठ आणि नंतर हृदयषट्कोणात बारा राजपुत्र साधिकार व निरधिकार विभागाने आहेत. त्यांमध्ये कुलेश्वर व कुलेश्वरी असे दोन मिळून एकूण बावीस शक्ती आहेत. शरीरात उड्डियाण, जालंधर, पूर्णगिरि व कामरूप नावाची चार पीठे आहेत. कली, द्वापर, त्रेता आणि कृत या युगांचे स्वामी म्हणजे चार युगनाथ होत. हे युगनाथ जागृती, स्वप्न, सुषुप्ती व तुर्या या अवस्थांनी आक्रांत अशा विश्वाच्या स्थापनेसाठी "अ," "उ," "म" व "नादरूप प्रणवमंत्ररूपाने" ऐश्वर्यवान् असून कर्ता, ज्ञाता, व्यवसिता व चेतिता या क्रमाने परमकर्त्याच्या स्फुरणानुरूपाने वागणारे आहेत.

त्यांच्या देवी पुढील प्रमाणे आहेत.

श्रृणोति शब्दमोलम्बे प्रेक्षते पुष्करद्वये।
करालम्बेऽभिधत्ते च सह्ये जिघ्रति गन्धवत्।।
मातङ्गे तु महापीठे व्याप्नोत्यखिलमीश्वरी।

अर्थ :- या चार युगनाथांच्या चार देवींची शब्दश्रवण करणे, रूपग्रहण करणे, काम करणे व गंधग्रहण करणे ही कामे होत. मातंगी ही महापीठा-

धिष्ठाची परमेश्वरी होय. ती सर्वव्यापिनी आहे.

त्यांची नावे क्रमशः क्रिया, ज्ञप्ती, व्यवसिती व चिच्छक्ती अशी आहेत.

राजपुत्रासंबंधी कथन करताना "**श्रीपादुकोदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

जगतो रञ्जनाद् राजा साक्षाद् देवो महेश्वरः।
तत्पुत्रा राजपुत्राः स्युः ....।।

अर्थ :- जे जगाचे रंजन करतात ते राजे म्हणजेच साक्षात् श्रीमहेश्वर असून त्यांचे पुत्र हे राजपुत्र होत.

उपरोक्त ग्रंथात म्हटल्या प्रमाणे हे राजपुत्र म्हणजेच इंद्रिये होत.

यासंबंधी "**श्रीचिद्गगनचंद्रिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

राजनात् प्रकृतिरञ्जनाच्च मां राजसंज्ञमनुबोधकर्मणोः।
षट् त्वया पृथगमी प्रवर्तकाः पुत्रभावमधिरोपिताः शिवे।।

अर्थ :- राजनामुळे म्हणजेच राजेपणामुळे आणि प्रकृतिरंजनामुळे मला राजा अशी संज्ञा असून हे शिवे! तुझ्याकडून या सहा प्रवर्तकांवर म्हणजे अशा इंद्रियांवर पुत्रभाव आरोपित केला गेला आहे.

जेथे कर्माचे प्राधान्य असते तेथे साधिकारत्व असते; "**कर्मण्यैश्वर्य-मधिकारः।।**" अर्थात् "कर्माचे ऐश्वर्य म्हणजे अधिकार होय," असे यासंबंधी वचन आहे. याच्या उलट ज्ञानोद्रेकामुळे निरधिकारत्व असते. त्यामुळे बुद्धी, वाक्, पाणि, पाद, पायू व उपस्थ ही कर्मेंद्रिये साधिकाराने युक्त होत. मनं, श्रोत्र, घ्राण, जिह्वा आणि अक्ष ही ज्ञानेंद्रिये निरधिकार राजपुत्र होत. कुलेश्वर हाच अहंकार होय. त्याची अभिमानशक्ती हीच कुलेश्वरी होय. हे तत्त्वदृष्ट्या अर्थकथन आहे.

संहारप्रकार :- आता "**संहारप्रकार**" ग्रंथकार सांगतात. संहारात अकरा कला आहेत. संहार म्हणजे बाहेर टाकलेल्या पदार्थांचे परमेश्वर प्रकाशात पुन्हा उत्पन्न होण्याच्या योग्यतेने ज्याप्रमाणे वटबीजात वटवृक्ष असतो त्याप्रमाणे वासनारूपात राहत असणे होय. त्या संहारात एकूण अकरा शक्ती आहेत. त्या सर्व शक्ती अंतःकरणाचा समष्टिभूत असा अहंकार असून त्या (इतर) बाह्य दहा इंद्रियांना भक्षण करीत करीत स्फुरण पावतात आणि अशा प्रकारे त्यांची अकरा ही संख्या होते व असा तत्त्वनिश्चय होतो. येथे (समष्टिभूत) अहंकारच प्रमाता म्हणजेच ज्ञाता किंवा जीव होय; कारण त्याच्याशिवाय वेगळ्या जीवाची सिद्धी होत नाही. इंद्रिये ही प्रमाणे होत. त्या

इंद्रियरूप प्रमाणांनी जे ज्ञेय असते तेच प्रमेय होय. या प्रमात्रादित्रयीला आत घेऊन चर्वण करतात म्हणून या कलांना संहारकर्त्या असे म्हटले जाते. या कलांच्या संबंधामुळे परमेश्वराला एकादशरुद्र म्हणून प्रसिद्धी आहे.

अनाख्याक्रम :- आता ग्रंथकार "**अनाख्याक्रम**" सांगतात. तुरीय म्हणजे अनाख्या चक्र होय. या अवस्थेत तेरा काल किंवा शक्ती आहेत. अनाख्या म्हणजे आख्याशून्यत्व अर्थात् ज्याच्याबद्दल काहीही सांगता येत नाही अशी वस्तू होय. आख्या ही पश्यंती, मध्यमा आणि वैखरी अशा तीन स्थूल वाणींच्या स्वभावाने युक्त असते.

यासंबंधी "**श्रीचिद्गगनचंद्रिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

नादबिन्दुलिपिविग्रहा गिरस्तिस्त्र ऊर्ध्वगविमर्शशीकराः।
संहृतिस्थितिविसृष्टिधामसु व्यापृतास्त्वदध ईशवल्लभे।।

अर्थ :- नाद, बिंदू व लिपी या रूपांच्या पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या तीन वाणी ऊर्ध्व स्फुरणाचे थेंब असून त्या संहार, स्थिती व उत्पत्तिरूप तीन स्थानात काम करणाऱ्या आहेत. हे ईशवल्लभे! त्या तुझ्या आज्ञेत राहणाऱ्या आहेत.

हे अनाख्यतत्त्व संहृत अर्थात् संहार केल्या गेलेल्या प्रमात्रादींचे अवशिष्ट असे जे अग्निरूप असते त्या स्वरूपाचे आहे.

यासंबंधी "**श्रीसंविदुल्लास**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

उद्योगमयमालस्यं प्रकाशैकात्मकं तमः।
अशून्यं शून्यकल्पं च तत्त्वं किमपि शाम्भवम्।।

अर्थ :- उद्योगमय असून संथ, प्रकाशात्मक असून तमःस्वभावी अर्थात् अंधकाररूप व अशून्य असून शून्यासारखे असे हे जरा विचित्र असे शांभव किंवा श्रीशिवतत्त्व आहे.

हे शांभवतत्त्व अशून्य म्हणजे भरलेले असूनही शून्य कक्षेप्रमाणे भासते. त्यामुळेच गाथेमध्ये "**तुरीयपर्वणि**" असे म्हटले आहे; कारण याच्याच प्रकाशात योग्याने काहीतरी अंतस्थ तत्त्व शोधावयाचे असते. ते अलौकिक स्फुरणरूप सुख स्पंदरूपात पर्यवसित होते.

यासंबंधी "**श्रीस्पंदशास्त्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

तदा तस्मिन् महाव्योम्नि प्रलीनशशिभास्करे।
सौषुप्तपदवन्मूढः प्रबुद्धः स्यादनावृतः।।

अर्थ :- जेथे चंद्र व सूर्य लीन झाले आहेत अशा महाकाशात झोपेतून

जागे झालेले आवरणरहित असे ज्ञानवान् श्रीशिव आहेत.

तेथे जरी मुख्य वृत्तीने शक्तिकल्पना उपपाद्य होत नसली तरीही आगमांमधून लक्षणेने तसे सांगितले जाते.

"**श्रीस्तोत्रभट्टारक**" या ग्रंथात यासंबंधी असे म्हटले आहे की -

अकथ्यं वा त्रयातीतमुपचारेण गीयते

अर्थ :- पश्यंत्यादि तीन वाणींच्या पलीकडे असलेले परारूपी तत्त्व सांगता येण्यासारखे नाही; परंतु औपचारिकतेने किंवा लक्षणेने ते सांगितले जाते.

ज्या उत्पत्तिस्थितिसंहार करणाऱ्या तेरा शक्ती आहेत त्या संहर्तृरूपात अर्थात् मूलकंदरूपात अवस्थित आहेत. त्या बारा इंद्रिये व समष्टिरूपात तेरा आहेत. त्या शक्ती "**इहैकैकत्र सृष्ट्यादौ चक्ररूपता विद्यते**" अर्थात् "इह सृष्टीमध्ये एकात एक (याप्रमाणे) चक्ररूपता असते," या "**श्रीक्रमकेली**" या ग्रंथामधील नियमानुसार बारा व समष्टीची एक अशा तेरा शक्ती पुढील-प्रमाणे आहेत. सृष्टिसृष्टी, सृष्टिस्थिती, सृष्टिसंहार व सृष्टितुरीय, स्थितिसृष्टी, स्थितिस्थिती, स्थितिसंहार व स्थितितुरीय आणि संहारसृष्टी, संहारस्थिती, संहारसंहार व संहारतुरीय. सृष्टिस्थितिसंहारात अनुस्यूत अशी तुरीयशक्ती तेरावी आहे. "**अनाख्याभासयोरत्र नोपदिष्टः पृथङ्‌मनुः**" अर्थात् "अनाख्या-भासाचा येथे वेगळा उल्लेख केलेला नाही," असे सांगून तुरीयातच भासाशक्ती अंतर्भूत केलेली आहे.

"**श्रीमहानयप्रकाश**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

आसां द्विषट्‌कदेवीनां वमनग्रासतत्पराम्।
देवीं त्रयोदशीं वन्दे तादात्म्यप्रतिपत्तये।।

अर्थ :- या बारा शक्तींना उत्पन्न व ग्रास करण्यात समर्थ वा तत्पर असलेली जी तेरावी देवी अर्थात् शक्ती आहे तिला मी तादात्म्य प्राप्तीसाठी वंदन करतो." यांचा "**श्रीस्तोत्रभट्टारक**" या ग्रंथात "**सृष्टिकाली**" इत्यादि नावांनी त्रयोदशसंविधानोपनिषदात उल्लेख केला आहे.।।३९।।

✲✲✲✲✲

गाथा क्रमाङ्क ४०

अवतरणिका :- आता या गाथेत ग्रंथकार सर्वांच्या पलीकडे असलेल्या "भासा" या शक्तीचे वर्णन करताना असे म्हणतात की -

भासाए ण विअप्पो फुरइ फुरन्तेक्कणिक्कलसिरीए।

जइ पडिबिम्बगईए फुरइ परं छोलहाहिआ देवी।।४०।।
(भासायां न विकल्पः स्फुरति स्फुरदेकनिष्कलश्रियाम्।
यदि प्रतिबिम्बगत्या स्फुरति परं षोडशाधिका देवी।।)

अर्थ :- एकमात्र कलाप्रमेय शक्तिवर्गाच्या पलीकडे असलेली, परमेश्वराची अनुग्रहमय, सर्वोत्तीर्ण व सर्वमयी अशा भासाशक्तीमध्ये विकल्प स्फुरित होत नाही. जर प्रतिबिंबगत कोणती शक्ती स्फुरित अगर प्रकट होत असेल तर ती विलक्षण व विशिष्ट अशी (सोळा विकारांच्या पलीकडे असलेली) सतरावी शक्ती आहे.।।४०।।

विशेष :- सृष्टी, स्थिती, संहार व अनाख्य यांनी आक्रांत विश्व-वैचित्र्यव्यवहारामध्ये व्याप्त असलेली सर्वोत्कृष्ट, सर्वानुग्रहमयी व पारमेश्वरी चिच्छक्तीच भासा शक्ती आहे. ही सर्वव्यापिका आहे. या शक्तीतच प्रमातृ व प्रमेयात्मक जगत् प्रतिबिंबरूपामध्ये भासते. भासाशक्तिमय परमेश्वरच श्रीसद्गुरू आहेत आणि ती शक्ती श्रीसद्गुरुमय आहे. भासाशक्ती स्वातंत्र्यस्वरूपिणी आहे. तिच्यामध्ये सृष्टी, स्थिती, संहार आणि अनाख्य यांच्याप्रमाणे विभाग नाहीत. ती विकल्पशून्य अर्थात् कोणताही विकल्प नसलेली आणि सर्वानुग्रहमयी आहे. (ज्याप्रमाणे सृष्टीमध्ये स्थिती, संहार, अनाख्य आणि भासा या चार कला आहेत त्याप्रमाणे त्या प्रकारचे विभाग किंवा विकल्प भासा कलेमध्ये अर्थात् शक्तीत नाहीत. या सोळा विकारांपासून ती कलाशून्य किंवा अतीत आहे.) या कारणामुळेच भासा शक्ती निष्कल म्हणजेच कलारहित आहे असे म्हटले जाते. भासा ही परमेश्वराची स्वतंत्र शक्ती आहे. ही चिच्छक्ती आहे. ही विक्षोभरहित अर्थात् कोणताही क्षोभ नसलेली अशी आहे. वरती सांगितलेल्या सृष्टी ते अनाख्यपर्यंत यथानुक्रम निरूपित सोळा शक्ती याच विश्वप्रतिबिंब-स्वभावाच्या आहेत. भासा ही षोडशविकारप्रतिबिंबितसमष्टिस्वभावाची एक सतरावी शक्ती आहे. ही विश्वात्मक कालीरूप शक्ती लोक आणि वेदांमध्ये प्रसिद्ध आहे.

यासंबंधी "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशसम्भवम्।।
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत्।।१०-४१।४२।।

अर्थ :- जी जी विभूतियुक्त अर्थात् शक्तियुक्त वस्तू आहे ती ती वस्तू माझ्या तेजांशाची अभिव्यक्ती आहे असे जाणले पाहिजे. मी या समस्त

जगताला आपल्या योगशक्तीच्या एका अंशमात्राने धारण करून स्थित आहे.।।१०-४१।४२।।

ही परा शक्ती जन्मकाली माता, पूजाकाली देवता, रतिकाली दूती आणि मृत्युकाळी कालिका आहे.

परिमलव्याख्यार्थ :- भासा म्हणजे सृष्टी आदि पाच कृत्यांनी व्यापलेल्या विश्ववैचित्र्यव्यवहाराला आपल्यात साठविणारी, सर्वश्रेष्ठ व सर्वानुग्राहक अशी परमेश्वराची चिच्छक्ती किंवा चैतन्यशक्ती आहे. जे परमेश्वराचे स्वातंत्र्य आहे ते भासा शक्तीचेच मानले आहे.

याबद्दल "**श्रीपादुकोदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

भासा च नाम प्रतिभा महती सर्वगर्भिणी।
स्वस्वभावशिवैकात्मदेशिकात्मकचिन्मयी।।
यस्यां हि भित्तिभूतायां मातृमेयात्मकं जगत्।
प्रतिबिम्बतया भाती नगरादीव दर्पणे।।
स्वातन्त्र्यरूपा सा काचिच्चिच्छक्तिः परमेष्ठिनः।
तन्मयो भगवान् देवो गुरुर्गुरुमयी च सा।।

अर्थ :- भासा म्हणजे महान् प्रतिभा, सर्वांना आपल्या गर्भामध्ये सामावून घेणारी, श्रीशिवांशी तादात्म्य पावलेली, श्रीसद्गुरुस्वरूप आणि चैतन्यरूपा शक्ती आहे. ही भिंतीप्रमाणे आधार देणारी असून ज्याप्रमाणे एखाद्या आरशात नगर आदींचे प्रतिबिंब पडलेले दिसते त्याप्रमाणेच या शक्तीमध्ये प्रमातृ व प्रमाण यांनी युक्त असे जग प्रतिबिंबाप्रमाणे भासते. स्वातंत्र्यरूपा अशी ही भासा शक्ती परमेश्वराची चिच्छक्ती आहे. त्या भासा शक्तीने युक्त असा हा परमेश्वर हेच श्रीसद्गुरू होत आणि ती शक्ती श्रीसद्गुरुमय आहे.

ही भासा शक्ती कलारहित एकत्वाने शोभणारी, विभागरहित अर्थात् भेदरहित, स्वात्मरूपाशी तादात्म्यसंबंधाने शोभणारी, विभाग किंवा भेदरहित, सृष्ट्यादि कल्पनांना सहन न करणारी, ऐश्वर्यवती, विशेषणांनी (अशी किंवा तशी) रहित आहे. तिच्यामध्ये विकल्प अर्थात् हे असे व ते तसे अशा प्रकारची विरुद्ध कल्पना कधीही स्फुरण पावत नाही. जर काही स्फुरत असेलच तर ते सोळा तत्त्वांहून वेगळेच किंवा निराळेच असते. तेही प्रतिबिंबस्वरूपाचेच असेल (असा अक्षरादिकांनी निघणारा अर्थ आहे.) त्यामुळेच असे म्हटलेले आहे की, परमेश्वराच्या स्वातंत्र्यशक्तीने युक्त अशा परमसंवित् स्फुरणस्वरूपिणी या भासा शक्तीमध्ये वैश्वात्म्यप्रथापरिशेष्यामुळे

अर्थात् विश्वरूप आत्म्याच्या म्हणजे श्रीशिवांच्या प्रथेच्या परिशिष्टत्वामुळे कोणताही विकल्प निर्माण होईल अशी शंकासुद्धा संभवत नाही. या उलट भासा शक्ती अत्यंत निर्मळ असल्याने तिच्यामध्ये सृष्ट्यादि चक्रे प्रतिबिंबित होऊन स्फुरतात म्हणून या चक्रांची सामान्यरूपाने उपासना होऊ शकते.

"श्रीक्रमकेली" या ग्रंथात असे म्हटले आहे की, **"अत एव ये निर्विमर्शं तुर्यातीतमिच्छन्ति, ते निरुपदेशा एव।"** अर्थात् "त्यामुळेच जे स्फुरणरहित तुर्यावस्थेपलीकडील वस्तूंची इच्छा करतात त्यांना उपदेश करता येत नाही म्हणजे त्यांना सांगण्याची आवश्यकता नाही." ही भासा शक्ती षोडशाधिका म्हणजेच सोळा कलांनंतरची सतरावी कला आहे. या सोळा कला विश्वप्रतिबिंबस्वभाव अर्थात् विश्वाचे प्रतिबिंब धारण करणाऱ्या आहेत. ही शेवटची सतरावी कला **"विश्ववैचित्र्यचित्रस्य समभित्तितलोपमा।"** अर्थात् "त्या प्रतिबिंबाचीही अर्थात् विश्ववैचित्र्य चित्राच्या आधारभूत भिंतीसारखी समजावी." श्रीप्रत्यभिज्ञा प्रक्रियेने पाहता भासा कला ही समष्टिरूपाने अधिष्ठानरूप असून षोडशकलात्मक विश्व व सर्वोत्तीर्ण परमेश्वर हे दोन्ही या भासामध्ये संग्रहित होतात. ही प्रतिबिंब प्रक्रिया जरा अलौकिक आहे, असे मानले पाहिजे; कारण स्फटिकादिकात प्रतिबिंबित्वासाठी बिंबभूत म्हणजेच पुष्पादि पदार्थांची आवश्यकता असते; पण ही मात्र समस्तविश्वाच्या प्रतिबिंबासाठी भिंतीसारखी आहे. हे आम्ही पुढेही स्पष्ट करणार आहोत. ही भासा या सोळा चक्रात अनुप्रविष्ट असल्याने समष्टिदृष्ट्या सोळाहून अधिक म्हणजे सतरावी होय. नंतर प्रकाश व विमर्श या दोन भेदसंबंधाने व श्रीभैरव-भैरवी विभागाने ती चौतीस अंशाने भासते. ही भासा शक्ती विकसित होऊन पन्नास वर्णात्मक विश्वप्रसरणाच्या विचारांच्या परमार्थत्वाने स्फुरित होऊन आणि संक्षेपानेच पाहवयाचे झाल्यास पीठनिकेतनात पंचवाहरूप व श्रीसद्गुरूंशी अभिन्न अशा परमेश्वराची मूर्ती, आनंद, प्रकाश व वृंद ही चार चक्रे व सृष्ट्यादि पाच चक्रे मिळून नऊ चक्रांनी युक्त होऊन नवाक्षरी बनते. त्यानंतर सर्व प्रपंच-संक्षेपरूपाने ही पंचवाहत्वाला पावते. हे पंचवाहत्व म्हणजे पंचपिंडत्व वाग्भव-बीजात पर्यवसित होते. हे बीज अनुत्तर कलेत व ही अनुत्तर कला स्वात्म-परामर्शात अर्थात् स्वत: स्वत:ची ओळख करून घेण्यात पर्यवसित होते. ही भासा शक्ती वेगवेगळ्या शास्त्रांमधील सिद्धान्तात अधिकारतारतम्याने वेग-वेगळ्या रूपात सांगितली गेली आहे.

यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की -

येन येन स्वरूपेण भाव्यते तस्य तन्मयी।
माहेश्वराणां शक्तिः सा साङ्ख्यानां प्रकृतिः परा।।
महाराज्ञी च सौराणां तारा सुगतवन्दिनाम्।
लोकायतिकमुख्यानां तदात्वा सा प्रकीर्तिता।।
शान्ता पाशुपतादीनामर्हतां श्रीश्च तद्विदाम्।
श्रद्धा हैरण्यगर्भाणां गायत्री वेदवादिनाम्।।
अज्ञानतिमिरान्धानां सर्वेषां मोहनी स्मृता।

अर्थ :- आपण जशी भावना करू तशी ही (भासा शक्ती) भासते किंवा दिसते. ही भासा श्रीमाहेश्वरांची शक्ती, सांख्यांची प्रकृती, सौरांची महाराज्ञी, बौद्धांची तारादेवता, लोकायतिकांची लोकरूपा अर्थात् तदात्वा, पाशुपतांची शांता, अर्हतपंथीयांची म्हणजेच जैनांची श्री, हिरण्यगर्भोपासकांची श्रद्धा व वेदवाद्यांची गायत्री होय. एवढेच नव्हे; तर अज्ञानी लोकांची मोहनी हीच आहे.

याच आशयाने "**श्रीलघुभट्टारक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

लक्ष्मीं राजकुले जयां रणमुखे क्षेमङ्करीमध्वनि
क्रव्यादद्विपसर्पभाजि शबरीं कान्तारदुर्गे गिरौ।
भूतप्रेतपिशाचजम्भकभये स्मृत्वा महाभैरवीं
व्यामोहे त्रिपुरां तरन्ति विपदं तारां च तोयप्लवे।।

अर्थ :- राजकुलात लक्ष्मी, रणांगणात जया अर्थात् विजयरूपा, हिंस्त्र पशूंनी व्याप्त अशा अरण्यात क्षेम म्हणजेच रक्षण करणारी, अवघड पर्वतादि ठिकाणी शबरी अर्थात् शबरराजकन्यादेवी, भूतप्रेतादिकांच्या स्मशानादि भयप्रदस्थानात भैरवी, मोहावस्थेत त्रिपुरा व जलामध्ये तारा ही भासा शक्तीच आहे. त्या त्या ठिकाणी तिच्या तत्तद्रूपस्मरणाने मनुष्य संकटमुक्त होतो.

"**श्रीअंबास्तव**" या ग्रंथामध्येही असेच वर्णन आहे की -

त्वं चन्द्रिका शशिनि तिग्मरुचौ रुचिस्त्वं
त्वं चेतनासि पुरुषे पवने बलं त्वम्।
त्वं स्वादुतासि सलिले शिखिनि त्वमूष्मा
निस्सारमेव निखिलं त्वदृते यदि स्यात्।।

अर्थ :- (हे भासा शक्ती!) तू चंद्रामधील चांदणे अर्थात् शीतप्रभा आहेस. सूर्यात कांती, पुरुषात चैतन्य, वायूत बल, पाण्यात माधुर्य व अग्नीत उष्णता तूच आहेस. तुझ्यावाचून हे सर्व निःसार आहे.

आम्ही रचलेल्या "**श्रीपरास्तोत्र**" या ग्रंथातही भासा शक्तीचे हेच वर्णन

पाहवयास मिळेल.

दातॄणां करपल्लवेषु करिणां गण्डेषु पृथ्वीरुहां
पुष्पेषु स्तनमण्डलेषु सुदृशामंसेषु भूमीभुजाम्।
कण्ठाग्रेषु च गायतां कवयतां जिह्वासु चेतस्विनां
सङ्कल्पेषु च कल्पयन्ति कतिचिद्धन्यास्त्वैवोद्यमम्।।

अर्थ :- दानशूरांच्या हातात, हत्तींच्या गंडस्थळात, वृक्षवनस्पत्यादींच्या पुष्पात, स्त्रियांच्या स्तनात अर्थात् वक्षःस्थळात, वीरांच्या बाहूत, गाणाऱ्यांच्या कंठात, कवींच्या रचनेत व उदात्तचित्तांच्या संकल्पात तुझ्याच अस्तित्वाची कल्पना काही भाग्यवान् करतात.

"**आगमातही**" हेच तत्त्व पुढीलप्रमाणे आढळते.

सैव काली महादेवी गीयते लोकवेदयोः।
इतिहासेषु तन्त्रेषु सिद्धान्तेषु कुलेषु च।।

अर्थ :- वेद, लोकव्यवहार, इतिहास. तंत्रग्रंथ, सिद्धान्त व कुलग्रंथ या सर्वांमध्ये श्रीमहादेवी कालीचाच अर्थात् भासा शक्तीचाच जयघोष ऐकावयाला मिळतो.

"**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथातही असे म्हटले आहे की -

यद्यद्विभूतिमत् सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसम्भवम्।।१०-४१।।

अर्थ :- जी जी विभूतियुक्त अर्थात् शक्तियुक्त वस्तू आहे ती ती वस्तू माझ्या तेजांशापासून निर्माण झाली आहे असे जाणले पाहिजे.।।१०-४१।।

अशाच प्रकारची इतरही उदाहरणे आहेत.

जन्मकाले भवेन्माता पूजाकाले च देवता।
रतिकाले भवेद् दूती मृत्युकाले च कालिका।।

अर्थ :- जन्मकाली माता, पूजाकाली देवता, रतिकाली दूती आणि मृत्यूकाली कालिका हीच अर्थात् भासा शक्ती होते.

आम्ही उद्देशरूपपद्धतीनुसार सृष्टी ते भासा शक्ती पर्यंतचे चक्र श्रीदेवपाणि-संप्रदायानुरूप लावले आहे; कारण आमचा संप्रदायही तोच आहे.

"**श्रीक्रमसद्भाव**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

तेषां मध्यात् क्रमेणैव आदौ पूज्यस्तु कःक्रमः।
तन्मे कथय सुश्रोणि! विस्तरेण यथाविधि।।

इति प्रश्नानन्तरम् -

पुरा यत् कथितं देव! पञ्चवाहमहाक्रमम्।
तेषां तु क्रमराजानां सृष्टिरूपोऽग्रतः सदा।।
ततस्तु स्थितिसंहारमनाख्यं च ततः परम्।
भासाख्यं च ततः पश्चात् पूजयेदक्रमक्रमम्।।

अर्थ :- "हे सुश्रोणी देवी! यांच्या पूजेचा क्रम म्हणजे आधी कोणाची पूजा इत्यादि यथाशास्त्र व विस्ताराने सांग." अशा प्रश्नांना उत्तर देताना "हे देवा! पूर्वी जो पंचवाहमहाक्रम सांगितला त्यात प्रथम सृष्टिस्थित्यादिक्रमाने नंतर भासा-अनाख्यादि विपरीतक्रमाने पूजावे असे सांगितले.

या पंचकांचे प्रणेतेपण हे परमेश्वराचे परमैश्वर्य आहे हे आम्ही वारंवार सांगितले. याचेच आगमात नष्ट झालेल्या अर्थचतुष्काचे अवभासन, लीन मेयत्रयवासनांची अनुवृत्ती, मेयमानसंहाराचे ज्ञान, सविकल्पमेयस्फुरण व निर्विकल्पमेयावभास असे संक्षिप्त वर्णन करून सांगितले आहे. येथील त्या त्या देवतांचा मंत्रोद्धार अस्मत्प्रणीत "**श्रीमहार्थोदय**" या ग्रंथात पाहावा.।।४०।।

*****

गाथा क्रमाङ्क ४१

अवतरणिका :- याप्रकारे सांगितलेल्या सृष्टिपंचकाच्या प्रत्येकाच्या स्फुरणप्रकारात एककालत्व अर्थात् रूपसाम्यत्व विचारणीय आहे. त्याविषयी सांगताना ग्रंथकार या गाथेत असे म्हणतात की -

सिट्ठीए पञ्चमकला भासेत्ति जणो गणइ ववहणं।
सिट्ठीए मूलकन्दो भासा भासाए पल्लवो सिट्ठी।।४१।।
(सृष्टेः पञ्चमकला भासेति जनो गणयति व्यवधानम्।
सृष्टेर्मूलकन्दो भासा भासायाः पल्लवः सृष्टिः।।)

अर्थ :- सृष्टीची पाचवी कला म्हणजे भासा शक्ती आहे. तिच्यामध्ये उपयुक्त क्रमाचे व्यवधान करणे यालाच उल्लंघन असे म्हटले जाते. सृष्टीचा मूलकंद भासा शक्ती आहे आणि भासाचा पल्लव म्हणजेच पहिले स्फुरण अर्थात् सृष्टीचा आरंभ आहे.।।४१।।

विशेष :- वस्तुतत्त्वाचे संपूर्ण ज्ञान नसल्याने जन्ममरण इत्यादींनी दंडित झालेला प्रमातावर्ग सृष्टीपासून भासापर्यंत चक्रपंचक क्रमगणनेमध्ये सृष्टीनंतर स्थिती, संहार, अनाख्य आणि तिच्यानंतर असलेल्या भासा शक्तीमध्ये व्यवधान मानतो. मान्य प्रचलित क्रम असा आहे. सृष्टिस्थिती, सृष्टिसंहार व सृष्टिभासा; परंतु भासा ही तर परमेश्वराची तत्त्वस्वरूपिणी

परम स्वतंत्र चिच्छक्ती आहे. सृष्टी तर भासाचे स्फुरण मात्र आहे. ही भासा म्हणजे सृष्टीचा पहिला कंद आहे. तत्त्वदृष्टीने पाहू गेल्यास सृष्टीची आदि भूमी म्हणजेच भासा शक्ती आहे. या भासा कलेचे सर्वात प्रथम स्फुरण होत असल्याने तिला सृष्टीचे मूळ म्हणजेच प्रधान कारण म्हणून स्वीकारले आहे. भासा एकमात्र संवित् अर्थात् चिच्छक्ती म्हणजेच ज्ञानकलेच्या परामर्शाचा म्हणजेच स्फुरणाचा परम चमत्कार आहे. विश्वप्रतिबिंबामध्ये युक्तिपूर्वक अनुप्रविष्ट झालेल्या प्रपंचस्वभावक्रमामध्ये ही भासा पाचवी आहे आणि सृष्टी, स्थिती, संहार व अनाख्य यांच्यामध्ये याच भासा या पाचव्या कलेचे प्राधान्य आहे. हा क्रमविमर्शच जीवन्मोक्ष आहे आणि तो एकमात्र श्रीसद्गुरूंच्या कृपाकटाक्षाने संभवतो.

परिमलव्याख्यार्थ :- परमेश्वर हा अलातचक्राप्रमाणे अर्थात् हातात उदबत्ती किंवा अग्नीने जळणारी वस्तू घेऊन ती गोलगोल फिरविल्यानंतर दिसणाऱ्या चक्राप्रमाणे सृष्ट्यादि पाच कृत्ये सतत करणारा आणि स्रष्टा व स्थापयित्वा आदि होऊन स्वकर्तृत्वोत्कर्षाचा अनुभव घेत राहतो. त्यामुळे हा परमेश्वर विम्रष्टा अर्थात् स्वात्मस्फुरणस्वरूपी होऊन कौलागमरूप महामृत सागराचा कर्णधार समजला जातो आणि जडाला ब्रह्म समजणाऱ्या पंथीयांना केव्हाच बाजूला सारतो. परमेश्वराचे खरे स्वरूप न समजल्यामुळे हे प्राणी जन्ममरणादींनी पीडित होतात आणि सृष्टी ते भासापर्यंतच्या चक्रपंचक-क्रमाने सृष्टीपासून स्थित्यादींमधील तीन शक्ती अर्थात् स्थिती, संहार व अनाख्या सोडून भासा ही पाचवी शक्ती आहे असे समजतात. वस्तुतः भासा हीच सृष्टीची अधिष्ठानभूमी अर्थात् आश्रय आहे. हिचा पहिला प्रसरणरूपी परिस्पंद म्हणजे सृष्टी असे जाणले पाहिजे. हे उपलक्षण आहे. स्थितीचा मूलकंद म्हणजे सृष्टी आणि सृष्टीचा पल्लव म्हणजे फांदी पाने वगैरे स्थिती होय. असा क्रम स्वतःच लावला किंवा कल्पिला पाहिजे. हे सांगण्याचा उद्देश असा आहे की, सृष्ट्यादि चार कृत्यांमध्ये सृष्टिसृष्टी, सृष्टिस्थिती, सृष्टिसंहार व सृष्टी-अनाख्या असे चातुर्विध्य व शेवटी त्यांचे पर्यवसान भासा या शक्तीमध्ये होते. स्वरूपतः विचार केल्यास भासा ही संविदैक्य चमत्काराने भरलेली असून ती विश्वप्रतिबिंबाने युक्त असल्याने ती प्रपंचस्वभावाचे अनुकरण करते म्हणून ती पंचकस्वरूपिणी आहे. त्यामुळे सृष्ट्यादि पाचही शक्ती पंचात्मकतेला सोडून नाहीत. त्यामध्ये पूर्वपूर्व पंचकाच्या पाचव्या कलेचा म्हणजे शक्तीचा अवलंब करून उत्तरोत्तर पंचकाची पहिली कला म्हणजे

शक्ती स्फुरण पावते. या रीतीने उत्तरोत्तर पंचकांची पहिली स्फुरणे खालील पंचशक्तींमध्ये विसावतात. याला दृष्टान्त देताना ग्रंथकार असे म्हणतात की, शंभर कमळांच्या पाकळ्यांमध्ये सुई घातल्यास ती सुई शंभर पाकळ्यांचा क्रमानेच भेद करते व ते ज्याप्रमाणे क्रमदृष्ट्या दुर्ज्ञेय अर्थात् जाणण्याला अवघड होते त्याप्रमाणेच ही परमेश्वरी शक्ती भासा पंचकृत्यरूप चक्रमंडलातून जाते. हे सतत अभ्यास करणाऱ्या विद्वानांनाच समजू शकते; (कारण हे सामान्य जनांना कळत नाही.) अशा प्रकारे या क्रमाचा अभ्यास अर्थात् विचार करणे म्हणजेच आत्मस्फुरणरूप जीवन्मोक्षच होय. यापासून आज्ञाधरत्वादि बाह्यविभूती अर्थात् सिद्धी स्वतःच न चुकता विकसित होतात. ही जीवन्मुक्तीची अवस्था श्रीसद्गुरूंच्या कृपेशिवाय येत नाही.

यासंबंधी "**श्रीक्रमसिद्धी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

क्रकारः क्रोधरूपस्तु मकारो मङ्गलो भवेत्।
क्रोधे तु मङ्गलं कुर्यात् क्रमः कालक्रमो भवेत्।।
गुर्वायत्तं क्रमज्ञानमाज्ञासिद्धिकरं परम्।
क्रमज्ञानान्महादेवि! त्रैलोक्यं कवलीकृतम्।।

अर्थ :- "क्र"कार हा क्रोधरूप आहे तर "म"कार मंगल आहे. क्रोधात मंगल करावे म्हणजे क्रम हा कालक्रम होतो. श्रीसद्गुरूंवरच क्रमज्ञान अवलंबून आहे. ते आज्ञासिद्धी अर्थात् आज्ञा म्हणजे शक्ती व सिद्धी म्हणजे श्रीशिव यांचे सहस्त्रारात सामरस्य प्राप्त करून देणारे श्रेष्ठ ज्ञान आहे. हे श्रीमहादेवी! या क्रमज्ञानाने सर्व त्रैलोक्य आकळलेले अर्थात् व्यापलेले आहे.।।४१।।

❋❋❋❋❋

गाथा क्रमाङ्क ४२

अवतरणिका :- या एवढ्या विस्ताराने पूज्यदेवताचक्राच्या स्वरूपाचा परमार्थतः विचार करून ग्रंथकार आता पूर्वी सांगितलेल्या पूजेचे निष्कृष्ट म्हणजेच श्रेष्ठ स्वरूप सांगताना असे म्हणतात की -

णिअबलणिभालणच्चिअ वरिवस्सा सा अ दुल्लहा लोए।
सुलहाइ वीसपइणो आसवतम्बुल्लगन्धपुप्फाइं।।४२।।
(निजबलनिभालनमेव वरिवस्या सा च दुर्लभा लोके।
सुलभानि विश्वपतेरासवताम्बूलगन्धपुष्पाणि।।)

अर्थ :- आत्मशक्तीचे प्रकाशन किंवा संप्रयोग अथवा परामर्श अर्थात् चिंतन म्हणजेच श्रीसद्गुरुकृपेने अनादिनिद्रिस्थ आत्मचैतन्यशक्ती कुंडलिनी

जागृत होऊन तिच्या द्वारा आपोआप होणारे सिद्धयोगाचे साधन हीच उपासना आहे आणि अशा प्रकारची उपासना या लोकामध्ये तरी दुर्लभ आहे. विश्वपती परमेश्वराच्या पूजेसाठी आसव अर्थात् मध, तांबूल, गंध व फुले इत्यादि सर्व द्रव्ये तर सहजपणे मिळू शकतात.।।४२।।

विशेष :- आत्मस्वरूपाचे चिंतन करीत राहणे हीच श्रीपरमशिवांची उपयुक्त उपासना किंवा पूजा आहे. ही पूजा आपल्या शक्तीने साध्य होणारी आहे. अशा प्रकारच्या पूजेमध्ये आत्मबल हाच मंत्र आहे. आत्मस्वरूपाचे चिंतन दुर्लभ आहे. पूजेमध्ये चार, राव, चरू आणि मुद्रा यांचा प्रयोग होतो. चार म्हणजे समयाचार, राव म्हणजे विमर्श, चरू म्हणजे द्रव्य आणि मुद्रा म्हणजे अंगन्यास आहे. या पूजेच्या क्रमामध्ये "राव" ही विमर्शाचीच विशेषता किंवा प्राधान्य आहे. स्वस्वरूपविमर्शालाच परम पूजा किंवा श्रेष्ठ पूजा असे म्हटले आहे. गंध, पुष्प इत्यादि द्रव्ये ही पूजेची बाह्य उपकरणे आहेत. आपल्या हृदयामध्ये स्फुरित देवताच इष्ट परमात्मा आहे. आपल्या शक्तीने त्या परमात्म्याचे तादात्म्यानुप्रवेशभावाने चिंतन हीच वरिवस्या अथवा पूजा आहे. याच कारणामुळे हृदयस्थ परमात्म्याच्या प्राप्तीसाठी आत्मबल अर्थात् आत्मशक्तीच्या परामर्शाला "मंत्र" असे म्हटले आहे. जोपर्यंत हृदयस्थ परमतत्त्वाचे अभिज्ञान अर्थात् पुन्हा ज्ञान होत नाही तोपर्यंत पूजा, जप, लिंगपरिग्रह, हवन इत्यादि निरुद्देश्य किंवा व्यर्थ आहेत. या सर्व गोष्टी तर स्वात्मविमर्शरूप श्रद्धेनेच संपन्न होतात.

या दृष्टीने "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः।।९-२६।।

अर्थ :- जो कोणी उपासक मला प्रेमाने अर्थात् स्वात्मविमर्शपूर्वक पत्र, पुष्प, फल, जल इत्यादि द्रव्य समर्पित करतो, त्या शुद्धबुद्धी अर्थात् निष्काम उपासकाने प्रेमपूर्वक समर्पित केलेला पत्र व पुष्पादींचा मी स्वीकार करतो.।।९-२६।।

पूजा ही तर हृदयस्थ देशिकेंद्र अर्थात् परमश्रीशिवांचे स्वात्मभाव-पूर्वक स्मरण आणि चिंतन आहे. ही महापूजा आहे. हीच स्वात्मविलयरूप स्वविश्रांती आहे.

परिमलव्याख्यार्थ :- पूजा ही चार, राव, चरू आणि मुद्रा अशी चार प्रकारची आहे.

यासंबंधी "**श्रीचिद्गगनचंद्रिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

चाररावचरुभिर्विभेदितैर्मुद्रया च यदुपासनं तव।

तद्वशेन भजते परम्परा तावकक्रमगता स्फुटीकृतम्।।

अर्थ :- चार, राव, चरू आणि मुद्रा यांनी विभागलेली जी तुझी उपासना म्हणजेच पूजा आहे त्या वशाने म्हणजे दृष्टीने क्रमगत व स्फुट म्हणजे स्पष्ट केलेली परंपरा भजली जाते अर्थात् या चारगोष्टींच्या अवलंबनाने उपासना केली जाते.

चार म्हणजे तत्कालीन आचरण, राव म्हणजे विमर्श, चरू म्हणजे प्रथमद्वितीयादि द्रव्य आणि मुद्रा म्हणजे स्वतः परमेश्वर आहे, हे सांगण्या-करिता हातापायांना वेगवेगळ्या तऱ्हेने स्थापणे आणि वेषधारण म्हणजेच भस्मरुद्राक्षादि धारण करणे होय. सर्वश्रेष्ठ मुद्रा रावात म्हणजे विमर्शातच अंतर्भूत होते. या चारही पूजाक्रमात प्रामुख्याने "राव" म्हणजे "विमर्शाचा" च जास्त उपयोग केला जातो. इतर त्यांचे मदतनीस म्हणून घेतले जातात. त्यामुळे स्व-स्वरूप विचार हीच सर्वश्रेष्ठ पूजा होय. इतर जी गंध, पुष्प, धूप व दीप यांनी केली जाणारी पूजा असते ती अवडंबरच होय. याचा अक्षरार्थ असा की, स्वहृदयात स्फुरणारा परमेश्वर हीच देवता होय असे सांगितले व पुढेही सांगतील. येथे जे स्वात्म्याशी तादात्म्य पावलेले बल किंवा विश्वाचा विक्षोभ सहन करण्याचे सामर्थ्य हेच विमर्शकत्व होय आणि त्याचा विचार करणे म्हणजेच वरिवस्या होय. त्याला आपण "बल" असेच म्हणू.

याविषयी "**श्रीस्पंदशास्त्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**अपि तु आत्मबलं मन्त्राः।**" अर्थात् "खरोखर आत्मबल हेच मंत्र आहेत" आणि "**तदाक्रम्य बलं मन्त्राः।**" अर्थात् "प्रत्येक प्रकारचे मंत्र त्या स्पंदरूप आत्मबळाशी तादात्म्य प्राप्त केल्याने सर्वज्ञता, तृप्ती, अनादिबोध, अप्रतिहत स्वातंत्र्यशक्तीचा अडथळारहित प्रसार आणि विश्वरूपामध्ये विकसित असलेले अनंत शक्तीचे ऐश्वर्य या सहा प्रकारच्या श्रीमाहेश्वर बलांना प्राप्त करून घेऊन शोभित होऊ लागतात." त्याचप्रमाणे "**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**बललाभे विश्वमात्मसात्करोति।**" अर्थात् "(साधकभक्त-योगिशिष्य) बलाने सर्व जग आपल्या आधीन करतो." याबद्दलची श्रुतीही अशी आहे की, "**न वा ओजीयो रुद्र! त्वदस्ति**" अर्थात् "हे रुद्रा! तुझ्याहून श्रेष्ठ बली कोणी नाही," अशी आत्मदेवतारूपाची पूजा सामान्यतः पूजक अशा प्रमातृवर्गात दुर्मिळ आहे; कारण जनांमध्ये तशा विचारांचा

अभाव आहे. काही महाज्ञानी योगीच असा विचार करू शकतात म्हणून खरी पूजा हीच होय. इतर आसवादि उपचाराने होणारी पूजा ही पुढील प्रमाणे असते.

दीपार्पणं दवाग्नेः पर्जन्यस्य प्रपाजलोद्धारः।
वात्यायाश्च पटाञ्चलवीजनमेतत् तवाद्य नैवेद्यम्।।

अर्थ :- ज्याप्रकारे दावाग्नीला दीप ओवाळणे, पर्जन्यदेवतेला पाणपोई घालणे व सोसाट्याच्या वाऱ्याला पंख्याने वारा घालणे (हे व्यर्थ आहे) त्याप्रकारेच तुला नैवेद्य दाखविणे व्यर्थ आहे.

अशा प्रकारच्या सुलभ उपायांनी केलेल्या पूजाद्रव्यार्पणरूप गोष्टींना पूजा असे म्हणतात; कारण हा विश्वपती विश्वातील सर्व पूजाद्रव्ये व इतर पदार्थ यांचा आत्मतादात्म्य दृष्टीने अधिष्ठाता आहे. मात्र अशा त्या स्वतः सर्व विश्वव्यापक सर्वद्रव्यरूप परमेश्वराला इतर तांबूल, आसव व पुष्पादि अर्पणाचा खटाटोप व्यर्थप्रायच होय. (दुसऱ्याकडून मिळणाऱ्या या पदार्थांचा तो भुकेलेला नाही.)

या दृष्टीने "**श्रीविज्ञानभट्टारक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

यैरेव पूज्यते द्रव्यैस्तर्प्यते वा परावरः।
यश्चैकः पूजकः सर्वः स एवैकः क्व पूजनम्।।

अर्थ :- ज्या पूजाद्रव्यांनी परमेश्वराची पूजा केली जाते, त्याला तर्पण केले जाते आणि जो पूजक असतो त्या सर्व गोष्टी तो एकमात्र परमेश्वरच आहे. मग पूजन कोणते?

त्याचप्रमाणे "**श्रीप्रभाकौल**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

यावत् तत् परमं शान्तं न विजानन्ति सुन्दरि।
तावत् पूजाजपध्यानहोमलिङ्गार्चनादिकम्।।
विदिते तु परे तत्त्वे सर्वाकारे निरामये।
क्व पूजा क्व जपो होमः क्व च लिङ्गपरिग्रहः।।

अर्थ :- हे सुंदरी! (मनुष्य) जोपर्यंत हे परमशांत तत्त्व जाणत नाहीत तोपर्यंतच त्याने पूजा, जप, ध्यान, होम व लिंगार्चनादि गोष्टी कराव्यात. एकदा त्याने सर्वाकार निरामय तत्त्व जाणले की, जपहोमादि काही नको.

जर ती पूजाद्रव्ये त्या विमर्शशक्तीने पवित्र केली असतील तर असेनात खुशाल; कारण "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।

तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः।।९-२६।।

अर्थ :- जो कोणी मला प्रेमाने अर्थात् आत्मज्ञानपूर्वक पान, पुष्प, फल, जल इत्यादि द्रव्य समर्पित करतो त्या शुद्धबुद्धी अर्थात् निष्काम उपासकाने प्रेमपूर्वक समर्पित केलेल्या पत्र व पुष्पादिकांचा मी स्वीकार करतो.।।९-२६।।

या दृष्टीने "**श्रीसंविदुल्लास**" या ग्रंथात मीही असे सांगितले आहे की -

स्वविभवविमर्शसुरभीण्याददते देवताः प्रसूनानि।
ननु काननेषु सुलभं यदि तत् सामान्यसौरभात् तृप्तिः।।

अर्थ :- स्वविभवविमर्शाने सुगंधित अशी फुले (आदि) पूजाद्रव्ये देवता ग्रहण करतात; नाही तर अरण्यात सामान्य सुगंधी फुले काय थोडी आहेत?

असा विमर्श म्हणजेच जर ज्ञानयुक्त पूजा नसेल तर -

मुहुः कराग्रेण निरुध्य नासां मुहुश्च पार्श्वस्थमवेक्षमाणाः।
देवान् यजन्ते कतिचिद् वयं तु स्वानन्दमुद्रैकमहासपर्याः।।

अर्थ :- अनेक वेळा हाताने नाक दाबून आणि अनेक वेळा पाठीमागे बघून देवांना कितीतरी पूजतात; परंतु आम्ही मात्र स्वानंदमुद्रेनेच महापूजा करणारे आहोत.

याप्रमाणे बाह्योपचारांचा पसारा म्हणजे पूजेची थट्टाच होय.

या दृष्टीने "**श्रीअर्चनात्रिंशिका**" या ग्रंथात अशा पूजेबद्दल असे म्हटले आहे की -

बालिकारचितवस्त्रपुत्रिकाक्रीडितेन सदृशं तदर्चनम्।
यत्र शाम्यति मनो न निर्मलस्फीतचिज्जलधिमध्यमाश्रितम्।।

अर्थ :- ज्याप्रमाणे लहान बालिका कपड्याच्या बाहुल्या करून लटुपुटीचा लग्नाचा सोहळा करतात आणि खेळतात तशी ही पूजा आहे; कारण या पूजेमध्ये निर्मल व निस्तरंगचित्समुद्रात (साधकभक्तयोगिशिष्याचे) चित्त मग्न होऊन समाधान पावत नाही.

त्याचप्रमाणे "**श्रीपश्चिमतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

पूजा होमः क्रमश्चर्या व्रतं शास्त्रनिषेवणम्।
तपो ध्यानं जपः शौचं तत्त्वहीनस्य निष्फलम्।।

अर्थ :- पूजा, होम, क्रम, अर्पण म्हणजे क्रियादि कर्म, व्रते, शास्त्राभ्यास, तप, ध्यान, जप व बाह्यादि निर्मलत्वादि गोष्टी तत्त्वज्ञान नसलेल्या (साधक-भक्तयोगिशिष्यासाठी) निष्फळच होत.

याकरिताच "**श्रीगीतानिष्यंद**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

न पादपतनं भक्तिर्व्यापिनः परमात्मनः।
भक्तिर्भावस्वभावानां तदेकीभावभावनम्।।

अर्थ :- व्यापक अशा परमेश्वराची भक्ती म्हणजे काही पन्नास वेळा पाया पडणे नव्हे. सर्व वस्तूत परमेश्वराची दृष्टी ठेवणे म्हणजे सर्व वस्तूत परमेश्वर आहे या दृष्टीने बघणे व सर्वांमध्ये ऐक्य पाहणे ही भक्ती होय.

त्याचप्रमाणे "**श्रीमत्स्तोत्रावली**" या ग्रंथातही असेच म्हटले आहे की -

न योगो न तपो नार्चा क्रमः कोऽपि प्रणीयते।
अमाये शिवमार्गेऽस्मिन् भक्तिरेका प्रशस्यते।।

अर्थ :- मायारहित अशा या श्रीशिवमार्गात भक्तीची प्राधान्याने प्रशंसा केली आहे. योग, तप, अर्चा, क्रम इत्यादिकांना फारसे महत्त्व नाही.

त्याचप्रमाणे यासंबंधी "**श्रीमहानयपद्धती**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

परमनिरावरणात्मनि रूपे यो दृढतरः परामर्शः।
पूजनमेतदितीत्थं प्रभुणा निरणायि यद्यपि प्रकृतम्।।

अर्थ :- आवरणरहित श्रेष्ठ अशा आत्मरूपाविषयीचा जो दृढतर विचार आहे तीच पूजा होय असे स्वतः परमेश्वराने सांगितले आहे. बाकीच्या गोष्टी सामान्य होत.

त्याचप्रमाणे या दृष्टीने "**श्रीपादुकोदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

पूजा च स्वात्मभावेन देशिकेन्द्रविमर्शनम्।

अर्थ :- आत्मभावाने अर्थात् स्वात्मरूपाने श्रीसद्गुरुश्रेष्ठांचा विचार करणे म्हणजे तशी दृष्टी ठेवणे हीच पूजा होय.

या संबंधी "**श्रीमदृजुविमर्शिनी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

पूजा विश्वस्य वेद्यस्य चिद्भूमिविश्रान्तिः।

अर्थ :- वेद्यरूप विश्वाची चित्स्वरूपात विश्रांती हीच पूजा होय.

त्याचप्रमाणे "**आम्नायांमध्ये**" असे म्हटले आहे की -

पूजा नाम न पुष्पाद्यैर्या मतिः क्रियते दृढा।
निर्विकल्पे महाव्योम्नि सा पूजा ह्यादराल्लयः।।

अर्थ :- निर्विकल्प महाकाशात बुद्धी दृढ अर्थात् स्थिर करून तेथेच तिचा म्हणजे बुद्धीचा लय करणे हीच खरी पूजा होय. पुष्पादिकांनी केलेली पूजा ही खरी पूजा नव्हे; कारण स्वात्मविलय म्हणजे स्वविश्रांतिरूप स्वपरामर्शात

म्हणजेच "स्व"च्या ज्ञानात पर्यवसान होणे होय.यादृष्टीने शास्त्रात असे म्हटले आहे की -

यत्रेन्धनं द्वैतवनं मृत्युरेव महापशुः।
अलौकिकेन यज्ञेन तेन नित्यं यजामहे।।

अर्थ :- ज्या अलौकिक यज्ञात सर्व द्वैतरूपी वनाच्या समिधा व मृत्युरूपी महापशूचा बळी दिला जातो असा यज्ञ आम्ही नेहमी करतो.

याच आशयाने **"आगमात"** स्वात्मदेवतातृप्ती करावी असे सांगताना म्हटले आहे की -

कर्पूरशकलोन्मिश्रताम्बूलापूरिताननाम्।

अर्थ :- कर्पूर, लवंग व केशरादि संमिश्र तांबूलाने देवतेला संतोषवावे. (तांबूलचर्वण करीत असलेल्या जगन्मातेला डोळाभर पाहावे.)

या अर्थानेच **"श्रीपूर्वतंत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

द्रवद्रव्यसमायोगाद् स्नपनं तस्य जायते।
गन्धपुष्पादिगन्धस्य ग्रहणं यजनं स्मृतम्।।
षड्रसास्वादनं तस्य नैवेद्याय प्रजायते।
यमेवोच्चारयेद् वर्णं स जपः परिकीर्तितः।।

अर्थ :- द्रवद्रव्ये एकत्र केली की, आत्म्याची आंघोळ होते. सुगंधी पुष्पग्रहणाने त्याचे यजन होते. षड्रसांचा स्वाद आपण घेतला की, त्याचा नैवेद्य होतो. जो वर्ण आपण उच्चारू तो जप होतो.

ही सांगितलेली अशी पूजा एखाद्याच भाग्यवानाच्या वाट्याला येते.

याकरिताच **"श्रीतंत्रालोक"** या ग्रंथात असे वर्णन केले आहे की -

एष यागविधिः कोऽपि कस्यापि हृदि वर्तते।
यस्य प्रसीदेच्चिच्चक्रं द्रागपश्चिमजन्मनः।।

अर्थ :- ज्या महात्म्याचा हा अंतिम जन्म असून ज्याच्यावर चिच्छक्ती सुप्रसन्न झालेली आहे अशा एकमात्र साधकभक्तयोगिशिष्याच्याच हृदयामध्ये अशा यज्ञाचे रहस्य प्रतिफलित होत असते.

आसवादि समर्पणही फलदायक आहेच. आसवाने आपल्या व विश्वपतीच्या अंतःकरणाची प्रसन्नता होते. तांबूलाने शरीराबद्दल बाह्य व आंतर अशी दोन्हीही शरीरे शुद्ध होतात. चंदनादि गंधाने बाह्य अवयवांवर सुसंस्कार होतात. फुलांनी (देवतेच्या) केशादिकांना सुगंधित्व येते. यामध्ये जो क्रम सांगितला आहे तो पूर्वपूर्वप्राधान्य सांगण्याच्या इच्छेने सांगितला

आहे असे समजावे. विश्वपतीला या वरील पदार्थांचा लाभ सुलभत्वाने होतो; मात्र दुर्लभ आहे ती वरिवस्या किंवा आत्मपूजा होय.

याविषयी शास्त्रात असे म्हटले आहे की -

इदं हि शास्त्रमाहात्म्यदर्शनालसचेतसाम्।
अपभाषणवद् भाति न च सौभाग्यमुज्झति।।

अर्थ :- शास्त्रमाहात्म्य पाहण्याविषयी ज्यांचे मन आळशी व उदासीन आहे त्यांना हे वरील विवेचन व्यर्थ वाटेल; परंतु म्हणून त्याचे म्हणजे या शास्त्राचे सौभाग्य अर्थात्‌च महत्त्व कमी होत नाही.।।४२।।

******

गाथा क्रमाङ्क ४३

अवतरणिका :- अशा प्रकारे सामान्यतः पूजाविषय प्रतिपादून त्यातील विशेष गोष्टी सांगताना प्रथम प्राणायामाचा योग्य अर्थ सांगताना किंवा खरा अर्थ प्रकट करताना ग्रंथकार असे म्हणतात की -

विमरिसिउं णिअसत्तं विहवे कज्जम्मुहम्मि थिमिए वि।
वाहिरबुत्तन्ताणं भंगो पाणस्स संजमो णेओ।।४३।।
(विम्रष्टुं निजसत्त्वं विभवे कार्योन्मुखे स्तिमितेऽपि।
बाह्यवृत्तान्तानां भङ्गः प्राणस्य संयमो ज्ञेयः।।)

अर्थ :- (या गाथेमध्ये परमेश्वराच्या उपासनेमध्ये प्रवृत्त झाल्यावर प्राणायामाच्या स्वरूपावर प्रकाश टाकला आहे.) आपल्या सत्त्वाचे पर्यालोचन अथवा चिंतन करण्यात व स्वसामर्थ्यरूप विभवात आत्मा शांत झाल्यावर बाह्यवृत्तींचा उच्छेद होणे म्हणजेच प्राणांचे संयम करणे यालाच प्राणायाम समजले पाहिजे.।।४३।।

विशेष :- निजसत्त्व म्हणजे चिद्रूपसत्त्व होय. ते आनंदस्वरूप आहे. भावामध्ये आनंदाची स्थिती हेच चित्सत्त्व होय.

यत्रानन्दो भवेद् भावे तत्र चित्सत्त्वयोः स्थितिः।

बाह्य वृत्तांताचा अर्थ समस्त इंद्रियांकडून ग्राह्य विषय असा आहे आणि त्यांचा भंग होणे हीच त्या विषयांपासून निवृत्ती आहे. या बाह्यवृत्तांताचा भंग होणे यालाच आत्मस्वरूपाच्या विचारामध्ये प्राणायाम असे म्हटले आहे.

या अर्थानेच "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः।

इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।२-५८।।

अर्थ :- ज्याप्रमाणे कासव सर्व बाजूंकडून आपली अंगे आकर्षून घेते त्याप्रमाणे ज्यावेळेला हा पुरुष अर्थात् साधकभक्तयोगिशिष्य इंद्रियांच्या विषयांपासून इंद्रियांना बाजूला वळवितो त्यावेळेला त्याची बुद्धी स्थिर आहे असे समजले पाहिजे.।।२-५८।।

हीच आत्मशांतीची स्थिती आहे. ही स्थिती स्वसामर्थ्यरूप विभवानुरूप निजसत्त्वाच्या चिंतनकार्यामध्ये प्रवृत्त झाल्यावर प्रस्फुटित होते. ही आत्मशांतीच मोक्षमार्गाच्या प्राप्तीमध्ये प्राणसंयमरूप बाह्य विषयोन्मुख वृत्तींचा भंग किंवा उच्छेदामध्ये संनिहित असते.

याबाबतीत **"श्रीस्वच्छंदतंत्र"** या ग्रंथामध्ये असे वर्णन केले आहे की -

अपसव्येन रेच्येत सव्येनैव तु पूरयेत्।
नाडीनां शोधनं ह्येतन्मोक्षमार्गपथस्य तु।।
रेचनात् पूरणाद् रोधात् प्राणायामस्त्रिधा स्मृतः।

अर्थ :- डाव्या नासिकारंध्राने वायू आत घेऊन (थोडा वेळ थांबून) तो उजव्या नासिकारंध्रातून बाहेर सोडावा. हेच मोक्षमार्गामध्ये नाड्यांचे शोधन आहे. रेचक, पूरक व कुंभक म्हणजे रोधरूपामध्ये प्राणायाम तीन प्रकारचा सांगितला जातो. प्राणाच्या संयमाने मन स्थिर झाल्यानंतर आत आत्मशांतीची स्थिती प्राप्त होते.

परिमलव्याख्यार्थ :- परमेश्वराच्या उपासनेकडे वळलेल्या प्रमात्यांचा म्हणजेच जीवांचा असा स्वभाव असतो की, ते आत्मस्फुरणाने संयुक्त झालेल्या शक्तीने त्या त्या विकासवैचित्र्याने आक्रांत अशा प्रपंचवृद्धीला प्रवृत्त करणारे होऊन बाह्य आणि आंतर्भेदशून्य अशा अलौकिक आत्मभूमीवर स्थिर होऊन श्रेष्ठ अशा चिदानंदाचा आनंद उपभोगीत स्वच्छंद व यथेच्छ विहार करतात. ते उपासनेच्या वेळी उपासनांग म्हणून जो प्राणसंयम करतात तो पुढीलप्रमाणे असतो. स्वतःचे सत्त्व म्हणजे बलस्वरूपी सद्भाव हेच एक अलौकिक अंतस्तत्त्व आहे. ते विकल्पविक्षोभाने संबंधित होऊन नेहमी अन्वयव्यतिरेकाने अनुभवले जाते. व्यतिरेक म्हणजे अगदी अभाव नव्हे; तर किंचित्संकोच होय.

यासंबंधी **"श्रीस्पंदशास्त्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

कार्योन्मुखः प्रयत्नो यः केवलं सोऽत्र लुप्यते।
तस्मिन् लुप्ते विलुप्तोऽस्मीत्यबुधः प्रतिपद्यते।।१५।।

न तु योऽन्तर्मुखो भावः सर्वज्ञत्वगुणास्पदम्।
तस्य लोपः कदाचित् स्यादन्यस्यानुपलम्भनात्।।१६।।

अर्थ :- अज्ञानी माणूस कार्योन्मुख प्रयत्न लुप्त झाला की, मी लुप्त झालो असे समजतो; परंतु सर्वज्ञ गुणात्मक अंतर्मुख भाव पुढे दुसरा पदार्थ नसला तरी कधी लुप्त होत नाही.

याचाच अर्थ असा आहे की, या समाधिकाळामध्ये केवळ एवढेच होते की, कार्योन्मुख प्रयत्न अर्थात् कार्य संपादन करण्याला प्रवण असलेला शब्द, स्पर्श इत्यादि बाह्य विषय ग्रहण करण्याचा बाह्य इंद्रियांचा व्यापार लुप्त होत असतो. इंद्रियांचा व्यापार लुप्त झाला की, "मी लोप पावलेलो आहे अर्थात् मी अभावामध्ये लय पावलेलो आहे," असे अबुध किंवा अज्ञानी योग्याला वाटू लागते.।।१५।।

याप्रमाणे ज्ञेय पदार्थांना लुप्त करण्याचे आत्मबलवैभव सूक्ष्म गर्भावस्थेच्या अस्तित्त्वरूप स्थैर्याचा अनुभव घेत असतानाही विश्वोत्तीर्ण परमेश्वराचा विमर्श (स्फुरद्रूपता) असतोच असे समजावे.

याचाच अर्थ असा आहे की, परंतु ती अंतर्मुख अर्थात् शाश्वत अहंरूपामध्ये स्पंदायमान होणारी स्पंदरूप चेतनसत्ता अथवा स्पंदायमान होणारा आत्मा सर्वज्ञत्व, सर्वकर्तृत्व इत्यादि गुणांचे आश्रयस्थान आहे. या चेतनसत्तेचा किंवा आत्म्याचा केव्हाही लोप होत नाही; कारण समाधी अवस्थेमध्ये आत्मस्वरूपाव्यतिरिक्त दुसरी सत्ता अथवा दुसऱ्याचे अस्तित्व आढळत नाही किंवा अनुभवावयाला येत नाही.।।१६।।

याला दृष्टान्त देताना ग्रंथकार असे म्हणतात की -

विश्वस्यैव विलासं मे शरीरं चाश्नुते शिवः।
शालामिव विशालां स्वामादर्श च यथा द्विपः।।

अर्थ :- हे माझे शरीर म्हणजे विश्वाचा विलास असून श्रीशिवच त्याचे संहारकर्ते आहेत. ज्याप्रमाणे लहान आरशात मोठ्या हत्तीचा आणि विशाल प्रासादाचा किंवा वाड्याचा प्रतिबिंबरूपाने समावेश होतो त्याप्रमाणे श्रीशिवही शरीर व विश्वावडंबर म्हणजे समस्त पिंडब्रह्मांड आपल्यात सामावून घेतात.

या विवरणावरून प्राणायाम म्हणजे बाह्य जागतिक ज्ञेयवस्तूंचा भंग होय. विकल्पांच्या धांदलीतही आत्मस्फुरणानुसंधानाचा अर्थात् आत्मस्वरूपाच्या अनुसंधानाचा उपाय म्हणजे प्राणायाम होय.

या दृष्टीने **"श्रीस्वच्छंदतंत्र"** या ग्रंथामध्ये म्हटले आहे की -

अपसव्येन रेच्येत सव्येनैव तु पूरयेत्।
नाडीनां शोधनं ह्येतन्मोक्षमार्गपथस्य तु।।
रेचनात् पूरणाद् रोधात् प्राणायामस्त्रिधा स्मृतः।
सामान्याद् बहिरेते तु पुनश्चाभ्यन्तरे त्रयः।।
अभ्यन्तरेण रेच्येत पूर्येताभ्यन्तरेण तु।
निष्कम्पं कुम्भकं कृत्वा कार्याश्चाभ्यन्तरास्त्रयः।।

अर्थ :- डाव्या नाकपुडीने रेचन आणि उजव्या नाकपुडीनेच पूरण करून नाड्यांची शुद्धी करावी. याने मोक्षमार्गाची म्हणजे सुषुम्नेची शुद्धी होते. रेचन, पूरण व रोध म्हणजे कुंभक अशा तीन प्रकारचा प्राणायाम आहे. या बाह्य प्राणायामाप्रमाणेच आंतरिकही तीन प्राणायाम आहेत. आतच रेचन व पूरणपूर्वक मनाचा म्हणजे वृत्तींचा निष्कंपकुंभक करावा.

तसेच -

नाभ्यां हृदयसञ्चारान्मनश्चेन्द्रियगोचरात्।
प्राणायामश्चतुर्थस्तु सुप्रशान्तपदे स्थितः।।

अर्थ :- सुशांत होऊन मनाला नाभिस्थानी स्थिर करणे हा चौथा प्राणायाम आहे.

"**प्राक् संवित् प्राणे परिणता।**" अर्थात् "नंतर बुद्धी प्राणात परिणत होते," असे म्हटले आहे. येथे "प्राण" शब्दाचे एकवचन ठेवले आहे. ते रेचनादिवायुचक्राचे सारे कार्य प्राणवायूवर अवलंबून असल्यामुळे तसे एकवचन केले.।।४३।।

*****

ग्राथा क्रमाङ्क ४४

अवतरणिका :- प्राणायामाच्या प्रसंगाने नंतर होणाऱ्या शोष, दाह व आप्लुवन या अवस्थांवरही ग्रंथकारांनी प्रकाश टाकताना असे म्हटले आहे की -

सोसो मलस्स णासो दाहो एअस्स वासणुच्छेओ।
अब्बालणं तणूणं णाणसुहासेअणिम्मिआ सुद्धी।।४४।।
(शोषो मलस्य नाशो दाह एतस्य वासनोच्छेदः।
आप्लावनं तनूनां ज्ञानसुधासेकनिर्मिता शुद्धिः।।)

अर्थ :- (या गाथेमध्ये, प्राणायामाच्या वेळेलाच शोष, दाह आणि आप्लुवन यांचे तत्त्व उत्तेजित होते, असे वर्णन केलेले आहे.) मलाचे शोषण

शरीराच्या शोषणादि क्रियांचा मी आश्रय करतो अर्थात् शरीरशुद्धीने बुद्ध्यादि शुद्धीला मदत होते.

पूजकांनी अगोदर प्राणस्पंदन मुख्य असल्याने वायुतत्त्वाशी तादात्म्य साधावे. नंतर त्यांना म्हणजे पूजकांना दाह व आप्लावन करण्याची योग्यता येते. त्यानंतर परमप्रमात्याचा म्हणजेच परमात्म्याचा परामर्श करताना शरीराभिमानी जीवभावाचा दाह होतो.

यासंबंधी "**श्रीविज्ञानभट्टारक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

कालाग्निना कालपदादुत्थितेन स्वकं पुरम्।
प्लुष्टं विचिन्तयेदन्ते शान्ताभासः प्रजायते।।

अर्थ :- कालपदापासून उत्पन्न झालेल्या कालाग्नीने स्व-पुर म्हणजे देह भाजून पवित्र होतो असे मानावे. नंतर शांताभास निर्माण होतो.

त्यानंतर त्याच्या पाठोपाठच तीच स्थिती दृढ राहण्यासाठी अलौकिक "**अहं**" रूप आनंदाच्या चांदण्यांच्या अमृतप्रवाहाच्या अभिषेकाचा अनुभव येतो. हेच आप्लावन होय.

तेथेच म्हणजे "**श्रीविज्ञानभट्टारक**" या ग्रंथातही असे म्हटले आहे की -

सर्वं जगत् स्वदेहं वा स्वानन्दभरितं स्मरेत्।
युगपत् स्वामृतेनैव परानन्दमयो भवेत्।।

अर्थ :- सर्व जगत् आणि स्वदेह हे स्वानंदाने भरलेले आहेत असे स्मरून त्या स्व-अमृतानेच परानंदमय व्हावे.

उपनिषदातही असे म्हटले आहे की, "**पर्यन्ततः प्रामाण्येन प्रकाशानन्द-सामरस्यानुभवो भूतशुद्धिः।**" अर्थात् "प्रकाश आणि आनंद यांच्या समरसतेचा अनुभव हीच जगत् व देहशुद्धी होय. हीच खरोखर अलौकिक सृष्टी होय.

"**श्रीमत्स्तोत्रावली**" या ग्रंथात असेच म्हटले आहे की -

अस्मिन्नेव जगत्यन्तर्भवद् भक्तिमतामपि।
हर्षप्रकाशबहलमन्यदेव जगत् स्थितम्।।

अर्थ :- भक्तिमानांच्या या जगात हर्षप्रकाशाने उजळलेले दुसरे जगत् दिसू लागते.

त्याचप्रमाणे "**श्रीस्तोत्रभट्टारक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**प्रकाशानन्दयोरन्तर्लोलीभूता परा स्थितिः।**" अर्थात् "प्रकाश व आनंद यातील मधली आंदोलन पावणारी अवस्था म्हणजे परास्थिती होय."

या दृष्टीने मीच "**श्रीकोमलवल्लीस्तव**" या ग्रंथामध्ये असे म्हटले

करणे, तो नष्ट करणे, त्याला दग्ध करणे, वासनांचा उच्छेद करणे, त्या अत्यंत सूक्ष्म असल्याने त्यांचे आप्लुवन करणे व यांच्या परिमाणस्वरूपाने ज्ञानामृत-स्वात्मबोध होणे हीच शुद्धी आहे.

विशेष :- या गाथेमध्ये मलाच्या नाशाचे तात्पर्य असे आहे की, बुद्धी, अहंकार, मनोरूप आणव, मायीय आणि कार्म स्वभावाच्या तीनही मलांचा नाश करणे होय. "दाह" याचा अर्थ असा आहे की, शून्यावस्थारूप वासनेचा दाह आणि वासनेचा उच्छेद करणे होय. त्याचप्रमाणे आप्लावन याचे तात्पर्य असे आहे की, तनुशुद्धी किंवा अज्ञानाचा नाश करणे होय. यांचा परिणाम हा अमृतरूप ज्ञानात म्हणजेच स्वात्मशुद्धीत होतो. ज्ञानाग्नीनेच मल, वासना आणि अज्ञानाचा नाश होतो.

याबाबत "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुतेऽर्जुन।।४-३७।।

अर्थ :- हे अर्जुना! ज्याप्रकारे प्रज्वलित अग्नी इंधन किंवा समिधा जाळून भस्मसात् करतो त्याचप्रकारे ज्ञान समस्त कर्मांचा (विकार किंवा मल यांचा) नाश करते.।।४-३७।।

संसारांकुराचे कारणरूप अज्ञानच मल आहे. या मलाचा नाश म्हणजेच वासनांचा उच्छेद आणि ज्ञान म्हणजेच स्वरूपबोधाची प्राप्ती होय. या ज्ञानामृताचे फलच शुद्धी आहे.

परिमलव्याख्यार्थ :- पूजकांनी अर्चनारंभीच काही अलौकिकता मिळविली पाहिजे. ती मलोपलेप व क्षयादींमध्ये पर्यवसित होते म्हणजेच निर्मलत्व हेच अलौकिकत्व होय. अर्चकांच्या देहांचा शोष म्हणजे देहाधीन असलेल्या संसारहेतूच्या अज्ञानरूप मलाचे कर्शन म्हणजे मलकृशता होय. दाह म्हणजे अर्चकांच्या अज्ञानमलासंबंधी वासनासंस्काररूपाने असलेल्या वासनांचा निरास म्हणजेच नाश होय. आप्लावन म्हणजे अज्ञाननिवृत्तिपूर्वक स्वरूपलाभामुळे मिळणारे अमृततुल्य ज्ञान किंवा आत्मावबोध होय. यामुळे अर्चकांचे देह पवित्र व शुद्ध होतात.

"**श्रीक्रमवासनातंत्र**" या ग्रंथात आमच्या श्रीसद्गुरूंनी असे म्हटले आहे की -

संवित्सतत्त्वनैर्मल्यसिद्धये शोषणादिकम्।
विकल्पसार्वभौमस्य शरीरस्याश्रयाम्यहम्।।

अर्थ :- संविदादि सर्व तत्त्वांच्या निर्मलतेसाठी विकल्पनिधी असलेल्या

आहे की -

संप्लुता समरसं सुधाप्लवैर्वह्निवृष्टिरिव विश्वतोमुखी।
चण्डि! चेतसि विभासि कस्यचिच्चिन्मयी समयिनश्चमत्क्रिया।।

अर्थ :- अमृतप्रवाहामध्ये वह्निवृष्टी अर्थात् अग्नीच्या ज्वालाही जशा चहुबाजूंनी अमृतमय म्हणजे अमृतात समरस होतात तशा हे चंडिके! भाग्यवान् अर्चकाच्या चित्तात तू चिन्मय होऊन राहतेस.।।४४।।

******

गाथा क्रमाङ्क ४५

अवतरणिका :- यानंतर ग्रंथकार अंगन्यास, अर्घ्य, शुद्धी व पुष्पादि-वर्णनाकडे वळताना असे म्हणतात की -

अविअप्पदाए मरसो विअप्पवग्गस्स अङ्गसण्णाहो।
अग्घं वेज्ञविलासो पुप्फाइ सहावपोसआ भावा।।४५।।
(अविकल्पतया मर्शो विकल्पवर्गस्याङ्गसन्नाहः।
अर्घ्यं वेद्यविलासः पुष्पाणि स्वभावपोषका भावाः।।)

अर्थ :- (परमात्मा निर्विकल्प, अखंड, ज्ञानस्वरूप व अलखनिरंजन आहे. विश्ववैचित्र्य म्हणजेच विकल्पशिल्प आहे.) निर्विकल्प आत्मस्वरूपाचा विमर्श किंवा चिंतन हेच विकल्पवर्गाचे अंगकवच आहे, वेद्यतत्त्वाचा विलास हेच अर्घ्यदान आहे आणि यात स्वभावाचे पोषण करणारे भाव हीच पुष्पे आहेत.।।४५।।

विशेष :- सर्व अंगांमध्ये एकच परमात्मसत्ता आहे. याचे चिंतन हाच विकल्पविक्षोभप्रपंच अर्थात् विकल्प आणि विक्षोभरूप प्रपंचाचा अंगन्यास आहे. अशा प्रकारे पूर्णाहंभावभावनारूप 'अविकल्पता म्हणजेच "मी" पूर्ण ज्ञानाने युक्त अशा भावाची भावनारूप अविकल्पता म्हणजेच कल्पना-रहिततेचा विचार किंवा ज्ञान हेच विश्वमोक्षप्रपंचाचे अंगरक्षक कवच आहे. अंतर्बाह्य या फरकाने स्वहृदयदेवतेच्या तृप्तीचे एकमात्र प्रयोजनच तत्त्वदृष्टीने वेद्य विलास आहे. हेच अर्घ्य द्रव्य आहे. स्वभाव म्हणजेच स्वचिंतनाचे पोषण करणारे भावच पुष्पे आहेत. स्वहृदयस्थित इष्ट आत्मदेवतेची अविकल्परूपामध्ये हीच पूजा आहे. या पूजेमध्ये स्वचिंतन हा विश्वविकल्पाचा अंगन्यास, वेद्यविलास म्हणजेच ब्रह्माचा विलास अर्थात् जगत् हे अर्घ्य आणि स्वभावाचे पोषण करणारे भावच पुष्पे आहेत. वेद्य अर्थात् विकल्पप्रसाराचा विलास अर्थात् संकोचावस्थेत स्वभाव-अतिक्रांत

व्यवहार हाच अर्घ्य आहे. स्वभाव म्हणजेच "स्व" चा भावच पूज्यदेवतेचा स्वभावनिरूपित चमत्कार आहे. त्याचे चिंतन पुष्ट करण्याचे प्रयोजनच पुष्प आहे.

परिमलव्याख्यार्थ :- वेगवेगळ्या कार्यात व्यापृत अशा करचरणादि अवयवांमध्ये शरीरगत एकच आत्मा कारणरूपाने आहे असे जाणून सर्व विकल्प दूर करणे म्हणजे अंगन्यास होय. याचा स्पष्टार्थ असा आहे की, करचरणादि अवयवांनी उपलक्षित केलेल्या विकल्प-विक्षोभरूप प्रपंचामध्ये पूर्ण अहंभावरूप भावनेचा स्वभाव ठेवणे हेच अविकल्प विमर्शन अर्थात् कल्पनारहित ज्ञान होय.

यासंबंधी "**श्रीक्रमवासना**" या ग्रंथात आमच्या परमश्रीसद्गुरूंनी असे सांगितले आहे की -

कारणात्मपरामृष्टकार्यभूताङ्गुलिस्थितिम्।
करोमि चिन्मयीं शुद्धिं करयोः परिशोधनीम्।।
सर्वज्ञत्वादिशक्तीनां सतीनामात्मनि प्रभौ।
उन्मज्जनं भावयामि षडङ्गविधियोगतः।।

अर्थ :- कार्यरूप अंगुलीत कारणरूप आत्मस्थापना करून (मी) हातांची चिन्मय शुद्धी करतो. आत्मप्रभूत सर्वज्ञत्वादि शक्तींना बुडवून मी हृदयादि षडंगन्यासाची भावना करतो.

ही क्रिया शरीरावयवांना कवचासारखी आहे. त्यामुळे भेदज्ञानरूपी शस्त्राचा प्रहार होत नाही. यानंतर स्वसिद्धान्तानुरूप अर्घ्यशुद्धी सांगतात. पूर्वी सांगितलेली पूजा म्हणजेच अर्घ्य होय. या पूजेला योग्य असे अलौकिक द्रवद्रव्य म्हणजे अर्घ्य होय.

"**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात यासंबंधी असे म्हटले आहे की -

यन्मुग्धानां प्रणयवचसि प्रौढिमानं विधत्ते
यन्निर्विघ्नं निधुवनविधौ साध्वसं सन्धुनोति।
यस्मिन् विश्वाः कलितरुचयो देवताश्चक्रचर्य-
स्तन्माध्वीकं सपदि कुरुते यत्र भोगापवर्गौ।।

अर्थ :- जे सुंदरींना प्रणयसंभाषणात महत्त्व आणते, विषयसेवनात विघ्न करीत नाही, भीती घालवून टाकते, ज्याच्या सेवनात विश्वगतप्राण्यांना रुची वाटते आणि ज्याच्या भोवती देवताही रुंजी घालतात ते माध्वीक अर्थात् मध किंवा मद्य तत्काळ भोग व मोक्ष देणारे आहे.

हे द्रव्य अंतर्बाह्य भेदाने देवता व स्वहृदय या दोघांची तृप्ती करणारे मानले आहे. तत्त्वदृष्ट्या हे वेद्य असे जगतच (स्वविस्तारयुक्त) अर्घ्यद्रव्य मानावे. हे विश्व संकोचावस्थेतही स्व-स्वभावाला सोडीत नाही; पण व्यवहार-भाषादृष्ट्या "विलास" हा शब्द वापरला आहे. वेद्यविलास ही औपचारिक भाषा होय. या विलास-विस्ताराने युक्त वेद्य-विश्व अर्घद्रव्यात मोडते. या वेद्यात शब्दस्पर्शादि गुण व आकाशादि महाभूते मूर्तरूपाने स्फुरण पावतात अर्थात् स्थूलगुणाने होतात असे ओघानेच आले. शिवाय स्वहृदयाला आधारभूत पृथ्वी, त्या हृदयाला आंतरिक पुष्टी देणारे आप, प्राचीन वासनांना भाजून काढणारे तेज, संवित्‌तत्त्वाला चालना देणारा वायू व शुद्ध चैतन्यात पर्यवसित होणारे आकाश अशी ही भूते समष्टिरूपाने विश्वविस्तारच होत. या प्रकारे बाह्यद्रव्यांनी स्वात्मतृप्ती सांगून पूजांगभूत पुष्पादींचे स्वरूप सांगतात. पुष्पे म्हणजे पूज्य देवतांच्या स्वभावाचे पोषण करणारे भाव होत. देवतांच्या परामर्शप्रतिष्ठानरूपी पोषणादि क्रिया पुष्पामुळे होतात व स्वभावांचे पोषण करतात म्हणून पुष्प असे म्हटले जाते. पुष्प हे उपलक्षण आहे. यात बाह्य व आभ्यंतर सर्व द्रव्यांचा अंतर्भाव आहे. "**श्रीत्रिंशिकाशास्त्रविमर्शिनी**" या ग्रंथात श्रीअभिनवगुप्तपादाचार्य असे म्हणतात की, "**पुष्पैर्हृदयान्तः स्वरूप-समर्पणादेव हृदयस्य पोषकैर्बाह्याभ्यन्तरैः सर्वैर्द्रव्यैः।**" अर्थात् "फुलांनी हृदयाच्या अंतःस्वरूप समर्पणामुळेच बाहेरच्या व आतल्या सर्व पोषक द्रव्यांनी हृदयाचे पूजन होते. गंध हा गुण सर्व प्रपंचस्फुरत्तात्मक मानला आहे.

या दृष्टीनेच "**श्रीपादुकोदय**" या ग्रंथात असे वचन आहे की -

स्वस्वकार्येषु सर्वेषां कारणानामवस्थितिः।
अजहद्रूपतायोगादविनाशेन वर्तते।।
हेतुहैतुकभावश्च शिवशक्त्यादिगोचरः।
पारम्पर्यक्रमात् प्राप्तः सर्वो विश्राम्यति क्षितौ।।
अतो विश्वमयी पृथ्वी तस्या गन्धोऽपि तन्मयः।
तद्ग्राहकं च करणं विश्वस्य ग्राहकं भवेत्।।

अर्थ :- ज्याप्रमाणे घटात माती राहते त्याप्रमाणे आपल्या कार्यरूप द्रव्यांमध्ये ती ती कारणे राहतात. ते कारणांचे अवस्थान म्हणजे राहणे हे स्वरूपाचा त्याग न करता अविनाशस्वरूपाचे असते. हेतु-हेतुमद्भाव किंवा कार्य-कारणभाव श्रीशिवशक्तीला ज्ञात असतो व तो परंपरेने पृथ्वीत विसावतो.

त्यामुळे पृथ्वी ही विश्वरूपिणी असून तिचा गुण गंधही विश्वमयच आहे. त्या गंधाचे ग्रहण करणारे घ्राणेंद्रिय हे विश्वग्रहण करणारे आहे. (पृथ्वीत सर्वभूते व गंधात सर्वभूतांचे गुण आहेत.)

गंधगुणी पुष्प व पुष्पपदाने सर्व उपचार स्वीकार असे म्हटले ते योग्यच आहे.

या दृष्टीने "**श्रीत्रिंशिकाशास्त्र**" या ग्रंथात असे म्हटलेच आहे की -

ततः सुगन्धिपुष्पैश्च यथाशक्ति समर्चयेत्।।

अर्थ :- यथाशक्ती सुगंधिपुष्पांनी पूजा करावी (म्हणजे सर्वोपचार मिळाल्यासारखे होते.)।।४५।।

✲✲✲✲✲

गाथा क्रमाङ्क ४६

अवतरणिका :- अशा प्रकारे लौकिक व अलौकिक दृष्ट्या सामान्यत्वाने मानलेल्या द्रव्यांपैकी अलौकिक द्रव्य वेगळे घेऊन त्याचे संस्कार व उपयोग सांगताना ग्रंथकार असे कथन करतात की -

पुण्णाहन्ताए मुहे वीसविअप्पङ्कुराण विक्खेवं।
मन्तुल्लेहविसुद्धं पुण्णं कुलबिन्दुतप्पणं भणिमो।।४६।।
(पूर्णाहन्ताया मुखे विश्वविकल्याङ्कुराणां विक्षेपम्।
मन्त्रोल्लेखविशुद्धं पूर्णं कुलबिन्दुतर्पणं भणामः।।)

अर्थ :- पूर्णाहंता अर्थात् अखंड अनुत्तर स्वातंत्र्यरूप शुद्धविद्येच्या मुखामध्ये विश्वविकल्प अंकुररूप कार्यवर्गाच्या निक्षेपपूर्वक मंत्राच्या उल्लेखाने पूर्ण अशा कुलबिंदुतर्पणाचे आम्ही वर्णन करतो।।४६।।

विशेष :- कुल अर्थात् श्रीपरमशिव हेच वेद्यवर्गोल्लासस्वभावरूप आहेत. यामध्ये परिस्फुरित अर्थात् प्रकाशित झालेला शक्तिपरिस्पंद म्हणजेच शक्तीचा तरंग हाच बिंदू आहे. हे तर्पणच पूर्णाहंतेच्या मुखामध्ये वेद्यविलास अर्थात् समस्त विश्वप्रपंचरूपविलास म्हणजेच कार्यवर्गाचा विक्षेप किंवा निक्षेप आहे. हे तर्पण मंत्रोल्लेखामुळे विशुद्ध म्हणजेच निर्मल अथवा उज्ज्वल आहे. मंत्रालाही परामर्श विशेष म्हणजेच चिंतनस्वरूप असे म्हटले आहे. मंत्राचा उल्लेख म्हणजेच स्वात्मानुप्रवेशरूप उज्ज्वलीकरण किंवा शुद्धीकरण होय. हे शुद्ध कुलबिंदुतर्पणच परममोक्षप्राप्तीचा पूजनक्रम आहे. हाच परम कैवल्यप्राप्तीचा प्रशस्त क्रम आहे.

परिमलव्याख्यार्थ :- कुल म्हणजे वेद्यवर्ग-उल्लास-स्वभावाने युक्त असे

अर्घ्यच होय; (कारण त्यात सर्व ज्ञेय पदार्थ येतात.) या अर्घ्यातील जे बिंदू असतात ते अंशांशाने स्फुरणारे शक्तीचे परिस्पंद होत. त्या बिंदूंनी देवतेला तृप्त करणे म्हणजे तर्पण असे आम्ही म्हणतो. येथे "आम्ही" असे जे बहुवचन ठेवले त्याचे कारण असे आहे की, या रीतीने विचारविमर्श करणाऱ्यांच्या ठिकाणी अलौकिक अहंकाराचा उत्कर्ष असतो हे होय.

या दृष्टीने **"श्रीमत्स्तोत्रावली"** या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

उत्तमः पुरुषोऽन्योऽस्ति युष्मच्छेषविशेषितः ।
त्वं महापुरुषस्त्वेको निश्शेषपुरुषाश्रयः ।।

अर्थ :- "अहं" पदाचा उल्लेख युष्मत् शब्दाहून वेगळा असा उत्तम पुरुष म्हणून आहे. तू एक महापुरुष असून सर्व पुरुषांचा आश्रय आहेस म्हणून "अहं" ता हे सर्वश्रेष्ठ तत्त्व आहे.

तो प्रमाता अर्थात् ज्ञाता आहे. त्याहून सर्व प्रमाते ज्ञेयरूपच आहेत. "अहं" हा सर्व संकोचाच्या पलीकडे आहे म्हणून "अहम्" शब्दात सर्वांचा अंतर्भाव आहे.

या अर्थानेच **"श्रीहंसभेदतंत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

अहं प्राणो मनश्चाहमहङ्कारोऽप्यहं मतः ।
अहं बुद्धिरहं शक्तिरहं स भगवान् शिवः ।।
किं वा बहुप्रलापेन जगत्यस्मिंश्चराचरे ।
योऽर्थः प्रमाणोपारूढः सोऽहं सर्वात्मकः स्थितः ।।

अर्थ :- मी प्राण, मन आणि अहंकारही मीच आहे. मी बुद्धी, शक्ती आणि मीच भगवान् श्रीशिव आहे किंवा अधिक बोलून तरी काय उपयोग? स्थावरजंगमात्मक या जगातील प्रमाणाने अशा सर्व वस्तू मद्रूपात्मक आहेत म्हणजेच मी "अहम्" सर्वात्मक आहे.

"अहम्" चा विचार हा सर्व प्रपंच स्फुरणाच्या बाबतीतच केला जातो. श्रीशिवसूत्रात **"चैतन्यमात्मा। उद्यमो भैरवः।"** अर्थात् "सर्व ज्ञानक्रिया-स्वातंत्र्य असलेले श्रीशिव म्हणजे चैतन्य हेच आत्मा आहेत" आणि "आतून उचंबळून येणारी शक्ती हीच श्रीभैरव म्हणजे श्रीशिव आहे." असे पर्याय त्या "अहम्" पदाचे सांगितले आहेत. या दृष्टीने "अहम्" प्रतिपाद्य अर्थ म्हणजे "महास्फुरत्ता" होय. ही स्वात्मदेवता आहे. तिचे मुख म्हणजे हे आपले शरीर होय; कारण यात प्राणादिकांच्या बलाने बुद्धीचे प्रसरण व प्रकटन वगैरे होते. हे शरीर प्राणादिकांचे अधिकरण किंवा अधिष्ठान किंवा आश्रय ठरले की,

उपनिषत्क्रियेप्रमाणे **"न ह वा एवंविदि किञ्चनानन्नम्"** अर्थात् "अशा ज्ञानी माणसाला अनन्न म्हणजेच अभक्ष्य असे काही नाही." सर्व काही त्याचे अन्नच आहे. विश्ववर्ती सर्व विकल्पांचे सूक्ष्म अंकुर म्हणून कारणरूपी ज्या कला आहेत त्यांना **"चिन्मयस्वात्मपरमेश्वराराधनेन तदीयस्पन्दविलासात्म-षट्त्रिंशत्तत्त्वमयं जगत् पोषयेदित्यर्थः"** अर्थात् "चिन्मयपरमेश्वराच्या आराधनेने त्याच्या विलासमय छत्तीस तत्त्वात बसवून तत्त्वमय जगताचे पोषण करावे. या पोषणाचा अर्थ श्रीशांभवदिपिकेत सांगितल्याप्रमाणे विक्षेप असा आहे. "क्षिप्" हा धातू ठेवणे किंवा टाकणे या अर्थी आहे. अन्वयदृष्ट्या तर्पणाला आम्ही विक्षेप म्हणतो. ते तर्पण मंत्रोच्चारणाने विशुद्ध आहे. मंत्र म्हणजे विचार किंवा परामर्श होय. तो मंत्रविचार पुढे येणार आहेच. उल्लेख म्हणजे उज्ज्वलीकरण होय. स्वात्मतादात्म्यभावनेने उज्ज्वलता येते. संवित्स्वातंत्र्याने विशुद्धी येते. विशुद्धी म्हणजे अलौकिक भावोत्कर्ष होय. हा उत्कर्ष सर्व पूर्ववासनांच्या निरासाने प्राप्त होतो. अशा तर्पणाला "पूर्ण" म्हणजे पुण्य व पावनतेची परा कोटी असे म्हणावे. या पावनतेला भेददृष्टीच्या कलंकाने अशुद्ध असलेले मानवपशू स्पर्शही करू शकत नाहीत. ते फक्त पावनतेची निंदा मात्र करतात; कारण **"अशक्तास्तत्पदं गन्तुं ततो निन्दां प्रकुर्वते।"** अर्थात् "असमर्थ किंवा दुर्बल लोक त्या पदापर्यंत जाण्याला असमर्थ ठरतात आणि त्यामुळे त्याची ते निंदा करतात." हे ज्ञान त्यांना जिरत नाही किंवा पचत नाही. जे ज्ञान इतर अपवित्र वस्तूंना पवित्र करू शकते त्याच्या पवित्रतेविषयी संशय कसला?

यासंबंधी **"श्रीत्रिंशिकाशास्त्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

शिवासङ्ख्याभिजप्तेन तोयेनाभ्युक्षयेत् ततः।
पुष्पादिकं क्रमात् सर्वं लिङ्गं वा स्थण्डिलं च वा।।

अर्थ :- श्रीशिवांच्या जपाने अभिमंत्रित केलेल्या पाण्याने सर्व वस्तूंचे म्हणजेच पुष्प, लिंग किंवा जमीन इत्यादि जरी काहीही असले तरी त्यांचे प्रोक्षण करावे.

या दृष्टीने **"श्रीतंत्रालोक"** या ग्रंथातही असे म्हटले आहे की -

अर्घ्यपात्राम्बुविप्रुड्भिः स्पृष्टं सर्वं विशुध्यति।
शिवार्ककरसंस्पर्शात् कान्या शुद्धिर्भविष्यति।।

अर्थ :- अर्घ्यपात्रात राहणाऱ्या पाण्याच्या विप्रुषांनी अर्थात् लहान लहान तुषारयुक्त कणांनी स्पर्श केलेले सर्व काही अत्यंत विशुद्ध होते.

त्यामुळे श्रीशिवरूपी सूर्याची मंत्रात्मक किरणे विकसित होऊन बाहेर पडतात. या किरणांचा स्पर्श द्रव्याला, यजमानासहित सर्व कार्याच्या उत्पत्तीला व कारणाच्या हेतूंनाही होतो. यामुळे जी शुद्धी होते ती जगताच्या कोणत्याही शक्तीमुळे होऊ शकत नाही.

त्याचप्रमाणे "**श्रीज्ञानेंदुकौमुदी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

यद्यथोपनतमेव पूर्णतामादधाति हृदयङ्गमत्वतः।
तत् तथैव परमेशपूजने योग्यमन्यदिह नास्ति लक्षणम्।।

अर्थ :- आपल्याला आवडलेले जे असेल ते ईश्वरार्पण केल्याने पूर्णता मिळते. त्यामुळे परमेशपूजनाला अशा प्रकारची अर्पणताच योग्य आहे. येथे योग्यतेचे दुसरे लक्षणच नाही.

त्यामुळे पराहंता अर्थात् अहं ब्रह्मरूप परमेशाला परम संतुष्ट करण्याकरिता मद्य, मांस, स्त्री वगैरेही अर्पावयाला हरकत नाही. "अहं" चा संतोष म्हणजेच जीवन्मुक्ती होय, असे याचे तात्पर्य आहे.

"**श्रीमहानयप्रकाश**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

प्रायो हि मैथुने मद्ये मांसे च परिदृश्यते।
आसक्तिः सर्वजन्तूनां विशेषात् कस्यचित् क्वचित्।।
यदि तत् त्यागसंरम्भपूर्वं तेषां विधीयते।
उपदेशो न स मनागपि चित्ते प्ररोहति।।

अर्थ :- सर्व जंतूंची आसक्ती मैथुन, मद्य व मांसादिकांवर असते. कोणाला काही आवडते; तर कोणाला काही. जर अशा वस्तूंचा आग्रहाने त्याग सांगितला तर ते त्यांना यत्किंचितही आवडत नाही.

याकरिता शेवटी "**श्रीमहानयप्रकाश**" या ग्रंथात याच आशयाने असे म्हटले आहे की -

अनेनैवाशयेनात्र परब्रह्मोपलब्धये।
ललनामद्यमांसानि पूजाग्र्याणि विशेषतः।।

अर्थ :- याच आशयाने परब्रह्मप्राप्तीसाठी ललनामद्यमांसांना पूजाद्रव्यात अग्रस्थान दिले आहे.।।४६।।

*****

गाथा क्रमाङ्क ४७

अवतरणिका :- पूजेचे स्वरूप जसे स्पष्ट सारतत्त्वरूपाने सांगितले तसेच देवतेचेही स्वरूप सांगावयाला हवे म्हणून देवतेच्या स्वरूपावर प्रकाश

टाकताना ग्रंथकार असे म्हणतात की -

जो जस्स भावजोओ तस्स हु सोच्चेअ देवदा होइ।
तब्भावभाविआओ अहिलसिहं तह फलन्ति पडिमाओ।।४७।।
(यो यस्य भावयोगस्तस्य खलु स एव देवता भवति।
तद्भावभाविता अभिलषितं तथा फलन्ति प्रतिमाः।।)

अर्थ :- ज्याचा जो भावयोग आहे तीच त्याची (उपास्य व इष्ट) देवता असते. त्याच भावाने भावित प्रतिमाच अर्थात् प्राणप्रतिष्ठित चैतन्यमूर्ती उपासकाला इच्छित फळ प्रदान करते.।।४७।।

विशेष :- उपासकाच्या भावानुरूपच त्याची उपास्य देवता असते. भाव म्हणजे स्वहृदयामध्ये प्रस्फुटित होणारे भाव होत. अनात्म आणि जड अशा माती, लोखंडाची पट्टी, लाकडी प्रतिमा इत्यादि वस्तूंमध्ये स्वतः भाव प्रकाशित होत नाहीत. त्यांच्यामध्ये भावाच्या प्रकाशित रूपामध्ये चैतन्य किंवा प्राणाचा संचार अर्थात् प्रतिष्ठाच चेतन जीवात्म्याच्या भावाचा अधिग्राहक होऊन इष्ट फल देते. प्रतिमेच्या उपासनेद्वारा अभीष्ट फलप्राप्तीचा हाच अभिप्राय आहे. यामध्ये प्राधान्य हे उपासकाच्या हृदयामध्ये प्रकाशित झालेल्या भावालाच आहे. असे म्हटले जाते की, ज्याची जशी भावना असते त्यानुसारच त्याला शाश्वत चैतन्याच्या प्रतिष्ठेचा अनुभव येतो.

जाकी रही भावना जैसी। हरि मूरति देखी तिन तैसी।।

ईप्सित प्रसाधन आणि अनीप्सित निषेध हाच देवतेचा स्वभाव आहे. स्वात्मचैतन्यच विश्ववैचित्र्यविलासामध्ये अभिव्यक्त झालेले आहे. अशा प्रकारे त्याच एका स्वात्मदेवतेची पूजा अभीष्ट फलाच्या सिद्धीला कारण होते. नाद हाच मंत्र आहे, आत्मा म्हणजेच हृदयामध्ये विराजित परमात्माच देवता आहे, अनुसंधान हीच पूजा आहे आणि तृप्ती हेच पूजेचे फल आहे. स्वात्मदेवतारूप परमेश्वराचीच पूजा किंवा उपासना करावयाला पाहिजे. विश्वविग्रह किंवा समस्त विश्वामध्ये व्याप्त श्रीभगवती महाशक्ती ललिता हीच स्वात्मदेवता आहे. शक्ती आणि शक्तिमान् परम श्रीशिव यांच्यामध्ये तिळमात्रही भेद नाही; त्यांच्यामध्ये पूर्ण तादात्म्य आहे. हे सर्व चराचरासहित त्यांचेच रूप आहे. साकार-निराकार-विलक्षण असा स्वसंवेद्य स्वात्मस्वरूप परमेश्वरच उपास्य आहे.

परिमलव्याख्यार्थ :- अर्चकांची म्हणजे प्रमात्यांची पूजनीय अशी देवता दुसरी कोणतीही असू शकत नाही. त्यांच्या त्यांच्या हृदयात स्फुरणारा किंवा

प्रकाशिलेला जो भाव असेल ती त्यांची पूज्य देवता होऊ शकते. मृत्तिका, दगड व लोहादि धातुनिर्मित प्रतिमा या देवता होऊ शकत नाहीत; कारण जड व चेतन यांमध्ये जड जे स्तंभकुंभादिक आहेत त्यांची ग्रहण व त्यागादि क्रिया चेतन पदार्थांवर म्हणजेच मनुष्यावर अवलंबून आहे म्हणजे यात चेतनाला स्वातंत्र्य आहे असे लौकिक व्यवहारात पाहण्यात येते. देवत्तांचा स्वभाव इष्ट देणे आणि अनिष्टाचा निषेध करणे हा आहे. या गोष्टी जड प्रतिमा करू शकतात काय? अर्थात् नाही. मग कशाकरिता त्यांना देवता म्हणावे, त्यांना अभिषेकवस्त्रपुष्पादि समर्पण करण्याचा खटाटोप का करावा व त्यांचा अभिमान का म्हणून बाळगावा? हे करणे बिलकुल योग्य नाही. क्रियेचे स्वातंत्र्य संवित् अर्थात् चैतन्य बुद्धीकडे म्हणजेच ज्ञानयुक्त मनुष्याकडे जाते. संवित् म्हणजेच चेतन बुद्धीचा स्वभाव होय. "**श्रीमत्स्तोत्रावली**" मध्ये असे सांगितले आहे की, "**महताममरेश! पूज्यमानोऽप्यनिशं तिष्ठसि पूजकैकरूपः।**" अर्थात् "हे अमरेशा! देवेंद्रा!! पूज्यमान असा तू नेहमी पूजकाच्या रूपानेच असतोस."

यावरून असे सिद्ध होते की, पूजा करणारे प्रमाते म्हणेजच जीव हेच देवता होत. त्यामुळे असे समजते की, स्वात्मप्रकाशाला देवतात्व आहे, प्रतिमांना नाही, असा आमचा निश्चय आम्ही पूर्वी वारंवार सांगितला आहे.

यासंबंधी "**श्रीज्ञानेंदुकौमुदी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**स्वात्मानं हि विहाय चेतनममुं किं पूजयेयुर्जडम्।**" अर्थात् "चेतन आत्म्याला सोडून जडाची पूजा का करावी?"

"**श्रीनयसंगतीतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

नास्ति नादात् परो मन्त्रो न देवः स्वात्मनः परः।
नानुसन्धेः परा पूजा नहि तृप्तेः परं फलम्।।

अर्थ :- नादासारखा श्रेष्ठ मंत्र नाही, स्व-आत्म्यासारखा श्रेष्ठ देव नाही, अनुसंधानासारखी श्रेष्ठ पूजा नाही व समाधानासारखे श्रेष्ठ फल नाही.

त्याचप्रमाणे "**श्रीगीतनिःष्यंद**" या ग्रंथातही असे म्हटले आहे की -

उज्झित्वात्मसमाधानं ये ध्यायन्त्यन्यदेवताः।
भिक्षन्ते भूरिवित्तास्ते भिक्षित्वापि बुभुक्षिताः।।

अर्थ :- जे आत्मसमाधानरूप देवतेला सोडून इतर देवतांचे ध्यान करतात ते धनवान् असूनही भीक मागतात व भीक मागूनही उपाशीच राहतात. (असे आत्मदेवतेचेच महत्त्व प्रतिपादिले आहे.)

पूजकत्वाच्या उपाधीने प्रमाते भिन्न भिन्न भेदाभिमानी असल्याने त्या त्या भावानुरूप देवतांचे बाहुल्य अर्थात् बहुसंख्याकत्व सांगितले. यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की, **"यद् यद् रूपं कामयते तत् तद् देवतारूपं भवति"** अर्थात् "ज्या ज्या रूपाची (साधकभक्तयोगिशिष्य) इच्छा करतो ते ते देवतारूप होते." त्यामुळे ऋग्वेदात असे म्हटले आहे की, **"रूपं रूपं मघवान् बोभवीति"** अर्थात् "इंद्र वेगवेगळी रूपे घेतो." असे जरी असले तरी मुख्यत्वाने पाहिल्यास सर्वत्र प्रकाशरूप ऐकात्म्य सारखे असल्याने हृदयस्फुरणाचीच आराधना देवतारूपाने करावी. याचा तात्पर्यार्थ असा आहे की, प्रतिमा, ग्रंथ इत्यादि जड पदार्थ यांना देवत्व नाही. गाथेतल्या "भावयोग" या शब्दातील "योग" या शब्दाचा अर्थ एक प्रकारची शक्ती असा होतो.

या शक्तीबद्दल **"श्रीशचीमततंत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

योगस्त्वमसि देवेशि! योगी चाहं सनातनः।
योगेनेदं त्वया विश्वमाविष्टं शम्भुना मया।।

अर्थ :- हे देवेशी! तू योग आहेस आणि मी (तुझ्याशी संबंधीत असा) सनातन योगी आहे. हे सर्व विश्व तुझ्या योगाने व माझ्या श्रीशिवत्वाने भरलेले आहे.

"श्रीमद्भगवद्गीता" या ग्रंथात असे म्हटले आहे की, **"पश्य मे योग-मैश्वरम्"** अर्थात् "माझे हे योगाचे ऐश्वर्य पाहा." त्यामुळे **"णमि ऊण"** या पहिल्या गाथेत सांगितलेली **"नत्वा नित्यशु०"** अर्थात् "महाप्रकाश हीच देवता होय. दुसरी नाही." हा जड प्रपंच स्वतंत्रस्फुरणरूप देवतेचा विस्तार आहे हे सांगितल्यासारखेच आहे. या दृष्टीने **"श्रीपूर्वतंत्र"** या ग्रंथात असे सांगितले आहे की -

सर्वमन्यत् परित्यज्य चित्तमत्र निवेशयेत्।
मृद्धातुशैलरत्नादिभवं लिङ्गं न पूजयेत्।
अर्चयेच्चिन्मयं लिङ्गं यत्र लीनं चराचरम्।

अर्थ :- (साधकभक्तयोगिशिष्याने) बाकीचे सर्व सोडून देऊन चित्त येथे म्हणजे चिन्मय किंवा आत्मस्वरूपात प्रविष्ट करावे. माती, धातू, माणिक इत्यादींनी शोभित केलेल्या लिंगाची पूजा करू नये. जेथे सर्व विश्व लीन झालेले आहे अशा चिन्मय लिंगाचीच पूजा करावी.

त्याप्रमाणे **"श्रीप्रभाकौल"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

पश्य मोहस्य माहात्म्यं स्वहृदिस्थेऽपि शङ्करे।
लिङ्गस्थण्डिलवह्न्यप्सु वीक्षयन्ति यथा शिवम्।।

अर्थ :- पाहा, मोहाचे हे माहात्म्य कसे आहे! आपल्या हृदयात श्रीशंकर असतानाही लिंग, दगड, अग्नी आणि पाण्यामध्ये (माणसे) श्रीशिव पाहतात.

तसेच यासंबंधी "**श्रीकोमलवल्लीस्तोत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

स्त्रीपराङ्मुखमनाः किल क्रुधा पुष्पकेतुमदहन्महेश्वरः।
त्वं तदापि ननु तस्य सैव धीः सत्यमम्ब! सुभगाऽभिधीयसे।।

अर्थ :- स्त्रियांपासून मन विरक्त झालेल्या श्रीमहादेवांनी क्रोधाने मदनाला जाळले; परंतु तू म्हणजे शक्तिरूप स्त्री असूनही म्हणजे धीरूप अर्थात् संविद्रूप असल्याने त्याला प्रिय झालीस. त्यामुळेच तू भाग्यवती म्हणवितेस.

त्यामुळे विश्वप्रकाशाहून स्वहृदयप्रकाश श्रेष्ठ असल्याने स्वात्मरूपा सोभाग्यसंविन्मय हीच देवता अर्थात् शक्तीच देवता आहे याविषयी कोणाचेही दुमत नाही.

यासंबंधी शास्त्रात असे वचन आहे की, "**स्वात्मैव देवता प्रोक्ता ललिता विश्वविग्रहा।**" अर्थात् "विश्वमयी श्रीललिता हीच स्वात्मरूप देवता होय." याचे विशेष विवेचन आमच्या श्रीसद्गुरूंनी रचलेल्या "**श्रीमदृजुविमर्शिनी**" या ग्रंथात पाहावे. अशा रीतीने विचारमंथनातून आत्मभाव हीच देवता होय असे चिंतन करावे. आत्मभाव म्हणजे आत्म्याची सहजस्फुरणरूप सत्ता होय. तिने भावित म्हणजेच या सत्तेने युक्त झालेल्या स्कंदगणपत्यादि देवतांच्या धातू आदींनी बनविलेल्या प्रतिमाच पूजकांची पुत्र, धन इत्यादि इच्छा पूर्ण करतात.

यासंबंधी "**श्रीपूर्वतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

बहिर्लिङ्गस्य लिङ्गत्वमनेनाधिष्ठितं यतः।
अतः प्रपूजयेदेतत् परमाद्वैतमाश्रितः।।

अर्थ :- श्रीशिवांचे पार्थिवादि लिंगात अधिष्ठान आहे. त्यामुळे परम अद्वैताच्या भावनेने लिंगपूजन करावे.

"**श्रीसिद्धान्त**" या ग्रंथातही असेच म्हटले आहे की, "**अन्तर्लिङ्गं दृढं बद्ध्वा बहिर्लिङ्गं ततोऽर्चयेत्**" अर्थात् "(अंतःकरणामध्ये किंवा चित्तामध्ये) अंतर्लिंगाची दृढ स्थापना करून नंतर बहिर्लिंगाची पूजा करावी."

याला "**श्रीमत्स्तोत्रावली**" या ग्रंथात असे प्रमाण आहे की -

अन्तर्भक्तिचमत्कारचर्वणामीलितेक्षणः।
नमो मह्यं शिवायेति पूजयन् स्यात् तृणान्यपि।।

अर्थ :- आत्मरूपावर प्रेम ठेवून व डोळे झाकून बाह्य तृणादिकांची पूजा "**नमः शिवायै, नमः शिवाय**" म्हणून करावी.

स्वहृदयस्थ देवता व देवतांच्या प्रतिमा यांमध्ये काही वैलक्षण्य नाही. खऱ्या सुवर्णात आणि धातुवादाने निर्मित सुवर्णात काही फरक नसतो; मात्र आत्मभावना दृढ असली पाहिजे.

या दृष्टीने "**श्रीविरुपाक्षपंचाशिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

या देवता यमर्थं करोति तेनार्थिनो दृढं तस्याम्।
विधृताहङ्कारस्य क्षणेन सोऽर्थः समायाति।।

अर्थ :- जी देवता जे देऊ शकते त्या देवतेत आत्मअहंकार दृढ ठेवल्यास मनातील इच्छा पूर्ण होते.

भावना ही मुख्य देवतेसारखी फलदायिनी आहे. यासंबंधी "**श्रीचिद्गगनचंद्रिका**" या ग्रंथातील प्रमाण असे आहे की, "**कल्पनापि न मृषा फलं शिवे यत् स्थितं गरुडभावनादिजम्**" अर्थात् "कल्पनासुद्धा खोटी नसते; कारण श्रीशिवांमध्येही गरुडभावनादींपासून उत्पन्न होणारे फल असते."।।४७।।

✲✲✲✲✲

गाथा क्रमाङ्क ४८

अवतरणिका :- याच मताच्या दृढीकरणासाठी सामान्यप्रमात्याला कळण्याजोगा या गाथेत दुसरा दृष्टान्त देताना ग्रंथकार असे म्हणतात की -

चित्तं ण लिहइ चित्तं चित्तअरो उवह लिहइ तं चित्तं।
ता भणह कुत्थ जोग्गा काउं दोण्णं वि देवदाबुद्धी।।४८।।
(चित्रं न लिखति चित्रं चित्रकारः पश्यत लिखति तच्चित्रम्।
तद् भणत कुत्र योग्या कर्तुं द्वयोरपि देवताबुद्धिः।।)

अर्थ :- चित्रकार हा चित्र एकदमच रेखाटत नाही तर तो रेखाटलेल्या चित्राला प्रथम पाहतो आणि नंतर त्या (जड व अचेतन) चित्राला चित्रित करतो. अशा प्रकारे जड व अजड म्हणजे चेतन या दोन्हींमध्ये समान रूपाने देवताबुद्धी अर्थात् चेतनत्व कशा प्रकारे प्रतिष्ठित होऊ शकते? ही विचार करण्याजोगी गोष्ट आहे.।।४८।।

विशेष :- जड म्हणजे अचेतन आणि अजड म्हणजे चेतन अशा दोघांमध्येही देवताबुद्धी ठेवणे शंकास्पद आहे. चेतन हे चेतन आहे आणि

जड हे जड आहे. हे विश्ववैचित्र्य चेतनामध्ये अभिव्यक्त होऊन चेतनाप्रमाणे भासते; परंतु ते चेतन नाही, तर जड आहे. हा सर्व विश्वप्रपंच चेतनापासूनच नि:सृत झालेले अर्थात् बाहेर पडलेले परमश्वराचे अर्थात् श्रीशिवांचेच रूप आहे. जड आणि अजड यांमध्ये देवताबुद्धीपर शंका तशीच राहते. चित्रकार आपल्या हृदयामध्ये असा विचार करू शकत नाही की, वास्तविकता किंवा यथार्थ गोष्ट काय आहे? तो चैतन्याच्या सामर्थ्याबद्दल आणि अचेतन वस्तूंच्या असामर्थ्याबद्दल जागरूक राहू शकत नाही, ही विचित्र गोष्ट आहे. चेतनवृत्तीच देवत्व प्रकाशित करते. चराचरासहित जगत् हे परमात्म्याची प्रतिकृती आहे. या जगतामध्ये पूर्णरूपाने अलख निरंजन, द्वैताद्वैताविलक्षण अर्थात् द्वैत आणि अद्वैत या दोन्हीही लक्षणांनी रहित असलेला असा स्वसंवेद्य अर्थात् हृदयात प्रकाशित होणारा सच्चिदानंद परमात्माच प्रकाशित झालेला आहे. "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, "परमात्म्याला सोडून अन्य कोणाहीमध्ये देवत्वाच्या भावनेने पूजन हा अज्ञानाचा परिणाम आहे; परंतु हे पूजनही परमात्म्याचेच म्हटले जाते."

येऽप्यन्यदेवता भक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः।
तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम्।।९-२३।।

अर्थ :- हे अर्जुना! जे दुसऱ्या देवतांचे भक्तही श्रद्धेने युक्त होऊन त्या अन्य देवतांची पूजा करतात ते सुद्धा माझेच पूजन करतात; परंतु ते त्यांचे पूजन अविधिपूर्वक अर्थात् अज्ञानपूर्वक असते.

या गाथेमध्ये "**चित्रं न लिखति**" याचा आशय असा आहे की, चित्ताचे अर्थात् अंतःकरणाचे चित्रकार चित्रण करीत नाही. आपल्या आत्म्यामध्ये आपले आपणच आपल्या लेखणीने स्वतःच त्याला चित्रित करून आणि ते पाहून परमेश्वर प्रसन्न होतो असे म्हटले जाते. स्वात्मदेवता अर्थात् परमेश्वर निःसंदेह निर्बंध, सर्वेश्वर आणि सर्वव्यापक आहे. हा परमेश्वर मंत्र-तंत्रांनी जाणता येत नाही. तो स्वसंवेद्य असल्याने आत्मसाक्षात्काराचाच विषय आहे. तो स्वयंप्रकाश आहे. समस्त विश्वविकल्पवैचित्र्य याच्यामध्येच प्रकाशित होत असते.

परिमलव्याख्यार्थ :- जड व चेतन यांपैकी देवता कोणती? अशा संशयाने पछाडलेल्या मनुष्याला पुढील उदाहरणाने समजून द्यावे. भिंतीवर चितारलेल्या स्त्री-पुरुषादि कोणत्याही चित्राला म्हणजे चित्रातील स्त्री व पुरुषापैकी कोणालाही त्याच प्रकारचे किंवा दुसऱ्या प्रकारचे चित्र रेखाटण्याचे

सामर्थ्य नसते हे सर्वांच्या अनुभवाचे आहे. या उलट त्या चित्राच्या जातीशी विरुद्ध अशा चित्रकारामध्ये अर्थात् चित्रकाराच्या करात किंवा हातात तसे शिल्प अर्थात् चित्र निर्माण करण्याचे कौशल्य असते म्हणजेच चेतनातच ही कला असते, ही सर्वानुभूत किंवा निर्विवाद प्रक्रिया आहे. हा अर्थ हृदयावर ठसावा म्हणून "**पश्यत**" असे गाथेत म्हटले आहे. चेतन आणि अचेतन यांचे सामर्थ्य व असामर्थ्य स्पष्ट करण्यासाठी गाथेत चित्र शब्द अनेक वेळा वापरला आहे त्यामुळे जरी अन्वय व व्यतिरेक दृष्ट्या कसेही पाहिले तरी चेतनाकडेच क्रियाकारित्व किंवा कर्तृत्व येते. त्याच्याशिवाय ते दुसऱ्या कोणाहीकडे म्हणजे अचेतनाकडे येत नाही, त्यामुळे तर "**भणत म्हणजे विचार करा**" असे म्हटले आहे. त्या चित्र आणि चित्रकार या दोघांमध्ये देवतात्व कोठे मानणे योग्य होईल याचा विचार करा म्हणजे तुम्हाला तर ते पटेलच; परंतु लहान मुलांनाही हे निःसंशयपणे समजेल की, चित्रादि कार्यकलापात "**स्वतन्त्रः कर्ता**" या न्यायाने चित्रकारात स्वातंत्र्याचा एक मोठा गुणोत्कर्ष असतो. हा अर्थ अत्यंत स्पष्टतया ज्ञेय असल्याने त्याचा उपन्यास पुन्हा करीत नाही. याचे तात्पर्य असे आहे की, चेतनाला देवतात्व येते व चेतननिर्मित पार्थिवादि मूर्तींना चेतनाच्या आवेश व प्रवेशाने औपचारिक देवतात्व येते. त्यामुळे त्या मूर्तींना अन्यदेवता असे म्हटले आहे.

या दृष्टीने "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

येऽप्यन्यदेवताभक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः।
तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम्।।९-२३।।

अर्थ :- हे अर्जुना! जे दुसऱ्या देवतांचे भक्तही श्रद्धेने युक्त होऊन त्या अन्य देवतांची पूजा करतात ते सुद्धा माझेच पूजन करतात; परंतु त्यांचे पूजन अविधिपूर्वक अर्थात् अज्ञानपूर्वक असते.।।९-२३।।

आत्मपूजा खरी व इतर पूजा अविधी होय. यावरून असे समजते की, चितारी परमेश्वर असून जरी त्याने विश्ववैचित्र्याचे चित्र काढले असले तरी परमेश्वरालाच चित्र समजतात. वस्तुतः तो चित्रकार तर आहेच; पण चित्राला आधारभूत भिंत वा कागद वगैरेही तोच आहे.

या दृष्टीने "**श्रीप्रत्यभिज्ञाहृदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**विश्ववैचित्र्यचित्रस्य समभित्तितलोपमे।**" अर्थात् "विश्वविचित्ररूप चित्राची ही जणू भिंत आहे."

त्याचप्रमाणे "**श्रीपदसंगतितंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

चिदाकाशमये स्वाङ्गे विश्वालेख्यविधायिने।
सर्वाद्भुतोद्भवभुवे नमो विषमचक्षुषे।।

अर्थ :- चिदाकाशमय स्वशरीरावर विश्वाचे चित्र रेखाटणाऱ्या व सर्व अद्भुताच्या उत्पत्तीला कारण असणाऱ्या अशा विषम अर्थात् तीन नेत्रधारी श्रीशिवांना नमस्कार असो.

त्याचप्रमाणे अभियुक्तांनी असे म्हटले आहे की -

जगच्चित्रं समालिख्य स्वात्मतूलिकयात्मनि।
स्वयमेव तदालोक्य प्रीणाति परमेश्वरः।।

अर्थ :- स्वतनूवर आत्मकुंचल्याने जगच्चित्र चितारून व ते पाहून परमेश्वर स्वतःच खूष होतो किंवा मान डोलवतो.

दुसऱ्या एका प्रकारानेही याची उपपत्ती अशी लावता येते की, आलेख्य म्हणजे चित्र, चित्त अर्थात् अंतःकरण व संवित्त्व म्हणजे चित्त्व होय. अंतःकरणरूप पटावर चित्रकार रेखाटत नाही. अंतःकरणरूप पटावर चित्त्वाचे म्हणजे शक्तीचे चित्र चेतनाने म्हणजे श्रीशिवांनी काढले आहे. कोणत्याही उपपत्तीने चेतनालाच कर्तृत्व येते. चित्त म्हणजे दुसरे अंतःकरण होय. चित्त म्हणजे प्रकाशित होणे किंवा दुसऱ्याला प्रकाशित करणे अथवा ज्ञान होणे किंवा ज्ञान करून देणे होय. त्याचा भाव म्हणजे चैतन्य होय. ते आलेख्य म्हणजेच चित्र, प्रमेयरूप चित्त किंवा प्रमाणात्मक चित्त्व हे त्याला सजातीय म्हणजे जाणण्याच्या स्वभावाने युक्त अशी दुसरी वस्तू रेखाटत नाही.।।४८।।

*****

गाथा क्रमाङ्क ४९

अवतरणिका :- आत्म्यालाच जर मुख्य देवतात्व आहे असे मानले तर मंत्रतंत्रादींचा खटाटोप व्यर्थच होईल; कारण मंत्र हा जर आत्मव्यतिरिक्त देवतेला अभिमुख करण्याला कारण मानला आहे असे म्हणाल तर आत्मदेवतानुगुणच मंत्रार्थ सांगतो असे म्हणून ग्रंथकार असे कथन करतात की -

मणणमयी णिअविहवे णिअसङ्कोए भअम्मि ताणमई।
कवलिअवीसविअप्पा अणुभूई कावि मन्तसद्दत्थो।।४९।।
(मननमयी निजविभवे निजसङ्कोचे भये त्राणमयी।
कवलितविश्वविकल्पा अनुभूतिः कापि मन्त्रशब्दार्थः।।)

अर्थ :- आत्मविभवामध्ये मननमयी आणि आत्मसंकोचामध्ये म्हणजेच भीतीमध्ये रक्षण करणारी अर्थात् सर्व विश्ववैचित्र्यविकल्पाला कवलित किंवा आत्मसात् करणारी अनुभूतीच वास्तविक मंत्रांचा शब्दार्थ किंवा पर्याय आहे.।।४९।।

विशेष :- मंत्र हा मननत्राणधर्मी असतो. मंत्रानुसंधानाच्या दोन अवस्था आहेत. पहिली अवस्था विभव आणि दुसरी अवस्था म्हणजे संकोच आहे. पूर्ण आत्मभावाचा विकास म्हणजेच विभव होय. हे परम ऐश्वर्य आहे. संकोच हा त्याचा विपर्यय म्हणजे उलट अर्थ आहे. संकोच हा पाशवरूप म्हणजे पशुस्वभावाचा आहे. विभव हा परमात्मस्वरूप असून त्याचे मनन केले जाते. पशुस्वभाव किंवा पाशवभाव जीवरूपाचा वाचक असून त्याचे त्राण म्हणजेच रक्षण मंत्राने केले जाते. पहिल्या विकासात भावचमत्कार आहे आणि दुसऱ्या संकोचात अर्थात् भयात त्राण अनुस्यूत आहे. वास्तविक पाहता संवित् हाच मंत्र आहे. चित्त हे मंत्रस्वरूप आहे. जे उच्चारले जातात ते वर्ण मंत्र नव्हेत. देवता आणि गंधर्वाचीसुद्धा बुद्धी मंत्रासंबंधी विमोहित किंवा संदिग्ध राहत असते.

मंत्रानुसंधान करणाऱ्याच्या पूर्णाहंभावभावनेचा विकास किंवा परमात्म-ऐश्वर्यालाच आत्मविभव असे म्हटले आहे. या भावाचे अपूर्णत्वच म्हणजे जीवस्वभावच संकोच या नावाने अथवा रूपाने लक्षिला जातो. विभव आणि संकोच हाच दोन कारणांमध्ये वेद्यविक्षोभसर्वस्वग्रासविशृंखलेचा म्हणजेच जाणून घेण्याच्या वस्तूंच्या विक्षोभाचा संपूर्णपणे ग्रास करणाऱ्या शृंखलेचा उल्लास हीच अनुभूती आहे. हृदयाची जी संवेद्यविमर्शशक्ती अर्थात् संवित्ज्ञानशक्ती आहे तीच मंत्र आहे. ती मननरूप आणि त्राणरूप आहे. परमात्मभावामधील भावनाच मंत्राचे वास्तविक रूप आहे. यामुळे चित्ताला मंत्र असे म्हटले आहे. सर्वात्ममय भगवती संविच्छक्तीला मंत्रस्वरूप म्हटले आहे. हा मंत्र सर्वप्रकारे ज्ञानस्वरूप किंवा विमर्शस्वरूप आहे.

परिमलव्याख्यार्थ :- **"मननत्राणधर्माणो मन्त्राः।"** अर्थात् "मनन केल्याने रक्षण करणे," हा मंत्रांचा शास्त्रप्रणीत अर्थ आहे. मंत्रानुसंधात्याच्या इच्छेनुरूप विभव व संकोच अशा दोन अवस्था पडतात. विभव म्हणजे विश्व किंवा विश्वात्मक आणि विश्वोत्तीर्ण यांच्या समरसतेने पूर्णअहंभावनारूपी विकास होय. यालाच पारमैश्वर्य असे म्हणतात. संकोच म्हणजे याच्या उलट अपूर्णत्वाचा अभिमान होय. याला पाशव म्हणजेच जीवसंबंधी असे

म्हणतात. येथे विभव हा स्वाभाविक आहे आणि संकोच हा आरोपित आहे. असा या दोन्हीतील फरक आहे. असे असल्यामुळे विकास होत असताना आत्म्याचे जे मनन म्हणजे पूर्ण अहंभावाची अनुस्यूतता ही स्वाभाविक आहे. तसेच संकोचसमयी म्हणजे अपूर्णत्वाभिमान जागृत असताना जे रक्षण **"सङ्कोचो विचार्यमाणश्चिदैकात्म्येन प्रथमानत्वाच्चिन्मय एव। अन्यथा तु न किञ्चित्"** अर्थात् "संकोच हा चेतनात्म्याशी एक-रूपत्वामुळे चिन्मयच असून दुसरे काहीही नाही," या **"श्रीप्रत्यभिज्ञाहृदय"** या ग्रंथोक्तीप्रमाणे त्या संकोचाची विश्वात्मप्रविष्टतेमुळे अपूर्णत्वाभिमानतारूपी जी तन्मयत्वानुभूती ही स्वहृदयाने जाणली जाणारी विमर्श अर्थात् स्फुरण शक्ती होय. हाच मंत्रशब्दाचा अर्थ आहे.

"श्रीराजराजभट्टारक" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

वर्णात्मको न मन्त्रो दशभुजदेहो न पञ्चवदनोऽपि।
सङ्कल्पपूर्वकोटौ नादोल्लासो भवेन्मन्त्रः।।

अर्थ :- मंत्र वर्णात्मक नाही आणि मूर्त्यात्मकही नाही म्हणजेच तो पाच मुखांचा व दहा हातांचा इत्यादि नाही. संकल्पानुरूप नादाची अभिव्यक्ती म्हणजे मंत्र होय.

"श्रीविज्ञानभट्टारक" या ग्रंथात या संबंधी असे म्हटले आहे की -

भूयो भूयः परे भावे भावना भाव्यते हि या।
जपस्तोत्रं स्वयं नादो मन्त्रात्मा जप्य ईदृशः।।

अर्थ :- वारंवार परतत्त्वाविषयी जी भावना केली जाते त्याला जप, स्तोत्र, नाद व मंत्र अशा संज्ञा आहेत. (मंत्रात्मा ईश्वर हा असा आहे.)

तसेच **"श्रीशिवसूत्र"** या ग्रंथात **"चित्तं मन्त्रः।"** अर्थात् "चित्तच मंत्र आहे," असे म्हटले आहे. **"श्रीस्तोत्रभट्टारक"** या ग्रंथातही असे म्हटले आहे की, **"चिदग्निसंहारमरीचिमन्त्रः संविद्विकल्पान् ग्लपयन्नुदेति"** अर्थात् "प्रलयंकर चिदग्नीचा किरण हा मंत्र होय. तो चित्तातील सर्व विकल्पांना आपल्या दाहकतेने चटके देत देत आविर्भूत होतो."

"श्रीक्रमकेलीतंत्र" या ग्रंथात असे म्हटले आहे की, **"सेयमेवंविधा भगवती संविद्देव्येव मन्त्रः"** अर्थात् "अशा प्रकारची ती भगवती संविद्देवीच मंत्र आहे."

त्याचप्रमाणे "श्रीभूतिराजभट्टाने" **"सर्वक्रोडीकारेण स्थितत्वाद् देव्येव मन्त्रः"** अर्थात् "सर्वांना आपल्यात सामावून घेऊन राहणारी देवी हीच मंत्र

होय." असेच सांगितले आहे.

याचा सारांश असा आहे की -

पृथङ्मन्त्रः पृथङ्मन्त्री न सिध्यति कदाचन।
ज्ञानमूलमिदं सर्वमन्यथा न प्रसिध्यति।।

अर्थ :- मंत्र व मंत्राचा जप करणारे जर वेगळे असले तर सिद्धिलाभ होत नाही. हे सर्व ज्ञानमूलकच असल्यास फलसिद्धी होते अन्यथा नाही.

या उक्तीप्रमाणे स्वात्मसंवित् हाच "मंत्र" या शब्दाचा मुख्य अर्थ आहे. अक्षरसमुदायाला मंत्र अशी औपचारिक संज्ञा आहे. त्याबद्दल शास्त्रात असे म्हटले आहे की -

उच्चार्यमाणा ये मन्त्रा न मन्त्राञ्श्चापि तान् विदुः।
मोहिता देवगन्धर्वा मिथ्याज्ञानेन गर्विताः।।

अर्थ :- वर्णरूपाने उच्चारले जाणारे मंत्र हे मंत्र नव्हेतच. या मिथ्याज्ञानाने देव आणि गंधर्वही मोहित होऊन गर्वित होतात.

या दृष्टीने मीही "**श्रीसंविदुल्लास**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

पुण्ड्रेक्षोरिव मन्त्रस्य माधुर्ये हृदयस्पृशि।
ऋजीषमानने तिष्ठत्यक्षरोच्चारलक्षणम्।।

अर्थ :- मंत्राचे माधुर्य हृदयात तरंगत असताना मुखातील अक्षरोच्चार म्हणजे पुंड्रजातीच्या उसाचा रस पोटात व चोथा तोंडात अशाप्रमाणे समजावे.

याच आशयाने विचारवंत असे म्हणतात की -

गुरुदेवतामनूनामैक्यं सम्भावयन् धिया शिष्यः।

अर्थ :- शिष्याने श्रीसद्गुरू, देवता व मंत्र या तिन्हींचे ऐक्यच आहे असे ज्ञानपूर्वक जाणावे.

अशा प्रकारेच जपाचीही व्याख्या केली जाते. "जप" हा जनन व पालन-स्वभावाचा आहे. यासंबंधी आमचे श्रीपरमसद्गुरू असे म्हणतात की -

जनिपालनधर्मेण जपेनान्तर्मुखात्मना।

अर्थ :- जनांच्या पालनधर्माने अंतर्मुख आत्म्याने जप करावा.

हा जप विभव व संकोचरूप मंत्रामध्ये पर्यवसित होतो. मंत्राच्या स्वरूपाचा विचार म्हणजेही जप होय. मंत्राचे स्वरूप म्हणजे विश्वरूप आत्म्याचा अनुभवच आहे. त्यामुळे सगळा वाग्व्यापार आत्मपरामर्शरूप आहे. श्रीभट्टनारायणांनी असे म्हटले आहे की, "**का च वाङ् नोच्यसे यया**" अर्थात् "अशी

कोणती वाणी आहे की ज्यात तू नाहीस" म्हणूनच "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात "**कथा जपः**" अर्थात् "सिद्धभक्तयोग्याचे बोलणे हाच जप असतो." असे म्हटले आहे.।।४९।।

******

गाथा क्रमाङ्क ५०

अवतरणिका :- अलौकिक आत्मानुभव हे मंत्राचे स्वरूप किंवा अर्थ मानल्यास सर्वांना सामान्यरूपाने ज्ञात असलेला, श्रोत्रेंद्रियाने ग्राह्य म्हणजे ऐकावयाला येणारा असा शब्दसमुदाय म्हणजे मंत्र होय, या व्याख्येला निरर्थकता येईल. ही शंका घालविण्यासाठी वाणीतत्त्वाची छाननी करताना ग्रंथकार असे म्हणतात की -

वेहरिआ णाम किआ णाणमई होइ मज्झमा वाआ।
इच्छा उण दक्खन्ती सण्णा सव्वाण समरसा वुत्ती।।५०।।
(वैखरिका नाम क्रिया ज्ञानमयी भवति मध्यमा वाक्।
इच्छा पुनः पश्यन्ती सूक्ष्मा सर्वासां समरसा वृत्तिः।।)

अर्थ :- क्रियामय वाणी ही वैखरीवाणी आहे, ज्ञानमय वाणी ही मध्यमावाणी आहे, इच्छाशक्ती हीच पश्यंतीवाणी आहे आणि सर्वसमरसवृत्ती हीच सूक्ष्मवाणी अर्थात् परावाणी आहे.।।५०।।

विशेष :- तालु इत्यादि करणांच्या व्यापारामध्ये स्फुरित होणारी वैखरीवाणी हीच क्रियाशक्ती होय. बुद्धिवृत्तीचे प्रवर्तन करणारी वाणी ही ज्ञानमय आहे. हीच मध्यमावाणी होय. बाह्य ठिकाणी प्रसारित होत असल्याने इच्छामय वाणी हीच पश्यंतीवाणी आहे आणि परमेश्वरपर प्रत्यक्‌दृष्टी स्वभावमय असल्याने सर्वसमरसवृत्ती हीच सूक्ष्म वृत्ती अथवा परावाणी आहे. परमेश्वराची उद्योगलक्षणावृत्तीच सूक्ष्म वृत्ती होय. ही परमेश्वराच्या स्वरूपामध्ये अनुप्रविष्ट होऊन स्फुरित किंवा अभिव्यक्त होत असते. (अशा प्रकारे परावाक्‌मय स्वात्मस्फुरत्ता हीच अनुभूती आहे. ही वाणी मंत्राचा पर्याय आहे. प्रकाशरूप आत्मशक्तीचा विमर्श किंवा ज्ञान हेच या अनुभूतिरूप मंत्राला अनुप्राणित करीत असते.) आत्मविमर्शरूप परावाणी ही सर्वसमरस असते.

परिमलव्याख्यार्थ :- वाक्तत्त्व क्रमशः सूक्ष्मा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी असे चार प्रकारचे आहे.

"**श्रीसांबपंचाशत्**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

या सा मित्रावरुणसदनादुच्चरन्ती त्रिषष्टिं
वर्णानत्र प्रकटकरणैः प्राणसङ्गात् प्रसूते।
तां पश्यन्तीं प्रथममुदितां मध्यमां बुद्धिसंस्थां
वाचं वक्त्रे करणविशदां वैखरीं च प्रपद्ये।।

अर्थ :- जी मित्रावरुणसदनापासून म्हणजेच मूलबंधापासून निघून प्राणवायूशी संबंध आल्याने विभागली जाऊन त्रेसष्ट अक्षरांना जन्म देते ती प्रथम उदित होणारी पश्यंतीवाणी होय. नंतर जी बुद्धीमध्ये अर्थात् बुद्धितत्त्वात स्थित होते तिला मध्यमावाणी असे म्हणतात आणि वाणीत करणांनी म्हणजेच इंद्रियांनी जी स्पष्ट होते तिला वैखरीवाणी असे म्हणतात. अशा वाक्तत्त्वाला मी शरण आलो आहे.

त्यांपैकी तालु, दंत आदि इंद्रिय व्यापारांनी प्रकट होत असल्यामुळे वैखरी या प्रसिद्ध वाणीला क्रियाशक्ती असे म्हटले आहे. मध्यमावाणी ही बुद्धिवृत्तीनेच प्रवृत्त होणारी असल्याने ती ज्ञानशक्ती आहे. पश्यंतीवाणी ही इच्छाशक्ती आहे; कारण ती बाह्यप्रसरणाने ज्ञात होते. परावाणी पाहणारी होते म्हणून ती पश्यंती आहे. अशी पश्यंती या शब्दाची उत्पत्ती आहे. सूक्ष्मा किंवा परावाणी ही मयूरीच्या अंड्याप्रमाणे आहे; कारण या सूक्ष्मा म्हणजे परावाणीत तीन्ही वाणींचा सूक्ष्मांश आहे व तिला जीवात्म्याची उद्योगरूप वृत्ती असे म्हणतात. ही परावावाणी पुन्हा त्याच प्रत्यकरूप परमेश्वराच्या स्वरूपामध्ये अनुप्रविष्ट होऊन स्फुरण पावते म्हणजेच प्रकाशते. यासंबंधी आमच्या श्रीपरमसद्गुरुंनी "**श्रीमदृजुविमर्शिनी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**मातृकां परवागात्माऽनाहतभट्टारकपरमशिवस्वरूपां षट्त्रिंशत्तत्त्वप्रसरणहेतुभूतां संविदमित्यर्थः**" अर्थात् "ही मातृकारूपिणी संवित् छत्तीस तत्त्वांच्या प्राकट्याला कारणीभूत, श्रीपरमशिवरूप व अनाहतनादरूपा आहे." वचनक्रियेची ही कर्त्री अर्थात् कर्ता आहे म्हणून "**वक्ति इति वाक्**" अर्थात् "बोलली जाते ती वाणी," अशी "वाक्"ची कर्तृरूपाने उत्पत्ती आहे, "**उच्यते इति वाक्**" अर्थात् दुसऱ्याकडून बोलली जाते ती वाक् अशी कर्मरूप व्युत्पत्ती नाही.

आमचे श्रीसद्गुरू "**श्रीसंवित्स्तोत्र**" या ग्रंथात यासंबंधी असे म्हणतात की -

त्वामुपासितगुरूत्तमाः परां वाचमाहुरविभक्तविश्वकाम्।
स्वप्रकाशनविमर्शनात्मिकां वक्ति वागिति निरुक्तिमास्थिताः।।

अर्थ :- हे देवी! तुझी सर्व श्रीसद्गुरुभक्त विश्वरूपिणी व प्रकाश-विमर्शस्वरूपा अशी परावाणी म्हणून उपासना करतात. **"वक्तीति वाग्"** अर्थात् "बोलली जाते ती वाणी होय," अशी व्युत्पत्ती करून तुझे वर्णन करतात.

त्यामुळे सर्व वाक्प्रपंच इच्छादिशक्तित्रयाने विस्तारला आहे. यासंबंधी **"श्रीयोगिनीहृदय"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

इच्छाशक्तिस्तथा सेयं पश्यन्तीवपुषा स्थिता।
ज्ञानशक्तिस्त्रिधा प्रोक्ता मध्यमा वागुदीरिता।।
क्रियाशक्तिस्तु रौद्रीयं वैखरी विश्वविग्रहा।

अर्थ :- ती इच्छाशक्ती पश्यंतीवाणीच्या रूपाने स्थित आहे. तीन प्रकारची ज्ञानशक्तीच मध्यमावाणी म्हणून सांगितली जाते. क्रियाशक्ती म्हणजे विश्वरूप वैखरीवाणी होय.

त्याचप्रमाणे **"श्रीतंत्रालोक"** या ग्रंथात यासंबंधी असे म्हटले आहे की -

प्राक् पश्यन्त्यथ मध्याऽन्या वैखरी चेति ता इमाः।
परापरा परा देवी चरमा त्वपरात्मिका।।
इच्छादिशक्तित्रितयमिदमेव निगद्यते।
एतत्प्राणित एवायं व्यवहारः प्रतायते।।

अर्थ :- प्रथम पश्यंती, मग मध्यमा व शेवटी वैखरी असा हा क्रम असून पश्यंती, परा, मध्यमा, परापरा आणि वैखरी हा अपरात्मक उल्लास आहे. या तीनही वाणी इच्छा, ज्ञान आणि क्रियात्मक आहेत. यांच्या प्रेरणेनेच हा जगताचा व्यवहार अनुभवाला येतो.

स्वात्मस्फुरत्ता ही इच्छादि स्वभावाची आहे. त्या रूपाची अनुभूती हाच मंत्र या शब्दाचा अर्थ आहे. त्यामुळे या आधी सांगितलेले सर्व काही जुळते. इच्छा म्हणजे पश्यंतीवाणी उद्देश्य व उपादेयत्वाने अर्थांतर बोधक; परंतु उलट क्रमाने होते. **"न सोऽस्ति प्रत्ययो लोके यः शब्दानुगमादृते।"** अर्थात् "जो शब्दानुगमाशिवाय नाही असा कोणताही या जगात प्रत्यय किंवा अनुभवच नाही." या नियमामुळे प्रमाता हा पूर्णपणे वाणीमय अर्थात् वाङ्मय आहे. प्रकाशरूप आत्म्याची विमर्श अर्थात् स्फुरण शक्तीच अनुसरणकर्त्री आहे. तिलाच मंत्र, जप, पूजा इत्यादि अनेक क्रमांनी ओळखतात. फक्त त्या त्या निमित्ताने ती भिन्न भिन्न रूपाची भासते.।।५०।।

❋❋❋❋❋

गाथा क्रमाङ्क ५१

अवतरणिका :- यानंतर या गाथेत मंत्रांच्या साहचर्यामुळे मुद्रांचेही अलौकिकित्व सांगताना ग्रंथकार असे म्हणतात की -

आणन्दुल्लाससिरी छुल्लइदट्ठमहसिद्धिसोहग्गा।
दीसइ जत्थ दसाए सोच्चिअ देवस्स सव्वमुद्दाओ।।५१।।
(आनन्दोल्लासश्रीः क्षुल्लकिताष्टमहासिद्धिसौभाग्या।
दृश्यते यत्र दशायां सैव देवस्य सर्वमुद्राः।।)

अर्थ :- (प्रकाशस्वरूप परमात्म्याच्या पूजेसाठी अंगन्यास आदिपूर्वक कोणत्याही विशेष बाह्यमुद्रेची अपेक्षा नाही.) ज्या दशेमध्ये समस्त योगप्रचलित अष्टमहासिद्धींच्या सौभाग्याला तिरस्कृत करणारी अर्थात् टाकून देणारी व त्याज्य करणारी जी ऐश्वर्यरूपिणी परमात्मविमर्शाच्या आनंदाच्या उत्कर्षाचे वैभव म्हणजेच परमाह्लादिनी शक्ती आहे तीच अभिव्यक्त किंवा स्वानुभूतिमय-रूपाने प्रकाशित होते. ती शक्तीच परमात्म्याच्या पूजेच्या समस्त मुद्रात स्वीकारली आहे.।।५१।।

विशेष :- लोकांमध्ये खङ्गगोरोचनोद्दिष्टपाताल इत्यादि विभूतींचेच स्पंद सिद्धींच्या रूपांमध्ये प्रसिद्ध आहेत. त्यांच्यापेक्षाही अणिमादि शक्तींना महासिद्धी असे म्हटले आहे. शरीराला अणुप्रमाणे सूक्ष्म करणारी सिद्धी म्हणजेच अणिमा होय. गगन इत्यादींमध्ये व्यापकता म्हणजेच महिमा सिद्धी होय. समुद्र किंवा पाण्याला दोन्ही पायांनी पार करताना त्या पाण्याला स्पर्श केल्याशिवायच पार जाणे म्हणजे लघिमा होय. आपल्याला हव्या असलेल्या वस्तूची प्राप्ती म्हणजेच प्राप्ती ही सिद्धी होय. केवळ संकल्प करूनच सर्वत्र विना अडथळ्याने जाण्याची शक्ती हीच प्राकाम्य सिद्धी होय. सार्वत्रिक प्रभुत्व किंवा ऐश्वर्याने युक्त असणे म्हणजेच ईशित्व सिद्धी होय. इंद्रियांच्या विषयोपभोगासाठी स्वेच्छामात्राधीन हानोपादान अर्थात् भोगेच्छेपासून निवृत्तिपर निष्कामता म्हणजेच वशित्व होय. आपल्या इच्छेने स्वर्गनरकादींच्या अनुभूतीचा विवेक म्हणजे कामावसायित्व होय. परमेश्वराच्या पूजेनिमित्त सर्वमुद्रांमध्ये आनंदोल्लासश्रीमध्ये प्रकाशरूपाने सर्वपदार्थांतर्भाव अर्थात् सर्व पदार्थांमध्ये भावरूपाने राहण्याचे सामर्थ्य म्हणजेच अणिमा आहे. त्याचप्रमाणे व्यापकता म्हणजेच महिमा होय. भेदांबद्दल उदासीनता किंवा भेदांची उपेक्षा म्हणजे लघिमा होय. स्वात्म-विश्रांतिलाभ म्हणजे प्राप्ती होय. वेद्यविलासामध्ये अभिरुची अथवा प्रीती

म्हणजे प्राकाम्य होय. संपूर्ण प्रभुसत्ता म्हणजेच ईशित्व होय. विमर्शरूप भूमी ही वशित्व आहे. पूर्णाहंभावभावना हीच कामवसायित्व आहे. या सर्व सिद्धी अद्वैत सर्वव्यापक परमात्म्याच्या पूजेमध्ये स्वात्मविमर्शरूप मुद्रेच्या स्वरूपातच स्वीकारल्या जातात. परमात्म्याची स्वात्मविमर्शस्वरूपिणी शक्तीच सर्वमुद्रामय आहे.

परिमलव्याख्यार्थ :- ज्या अवस्थेत क्रीडाविजयप्राप्तीच्छा आदि अनेक क्रियांमध्ये स्वतंत्र असणारा, पूज्यपूजकत्वाशी समरस होणारा आणि प्रकाशमान जो परमेश्वर आहे त्याला विश्रांतीचा आनंद उपभोगण्याचा उल्लास व त्याच्यासाठी होणाऱ्या स्फुरणाच्या सातत्याचा प्रत्यक्ष आपल्याला येणारा अनुभव हीच खरी महती मुद्रा होय. हिच्यामध्येच करंकिणी व संक्षोभिणी आदि व इतरही प्रसिद्ध मुद्रा अंतर्भूत होतात असे जाणावे. ही मुद्रा अष्टमहासिद्धींच्या सुभगतेने किंवा शक्तीने युक्त आहे. जगामध्ये भूमिगत जलज्ञानादि काही छोट्या सिद्धी आहेत. त्यांच्याहून जरा मोठ्या अशा अणिमादि महासिद्धी आहेत. त्या आठ आहेत. साधकांच्या हृदयात जे चित्, आनंद, इच्छा, ज्ञान, क्रिया, अनुभव, स्मृती व अपोहन अर्थात् आच्छादन किंवा तर्क हे धर्म आहेत त्यांना ब्राह्मीमाहेश्वर्यादि आठ मातृकांच्या अधिष्ठानाद्वारे बाह्य विभूतित्व अर्थात् ऐश्वर्य येते. यासंबंधी आगमग्रंथातून असे म्हटले आहे की -

वर्गानुक्रमयोगेन यस्यां मात्रष्टकं स्थितम्।
वन्दे तामष्टवर्गोत्थमहासिद्ध्यष्टकेश्वरीम्।।

अर्थ :- जिच्या ठिकाणी वर्गानुक्रमसंयोगाने आठ मातृका आहेत त्या अष्टवर्गोत्थ महासिद्ध्यष्टक स्वामिनीला अर्थात् शक्तीला मी नमन करतो.

जरी सर्व सिद्धींमध्ये वरील चिदानंदादि आठ धर्म आहेत तरीही काही काही अधिक असल्याने आठ महासिद्धी प्रसिद्ध अशा मानल्या आहेत. त्यांपैकी स्वशरीराला अतिसूक्ष्म करण्याची शक्ती ही अणिमा, गगनादिकांना स्वशरीराने व्यापून टाकण्याचे कौशल्य ती महिमा, पाणी व कंटकादींवरून चालताना त्यांचा स्पर्श न होणे ही लघिमा अर्थात् हलके होणे, इच्छित पदार्थांचा लाभ ही प्राप्ती, संकल्पानेच सर्वत्र जाण्याची शक्ती ही प्राकाम्य, सर्वत्र स्वस्वामित्व म्हणजे ईशितृता, विषयोपभोगात यथेच्छ ग्रहणत्यागाची शक्ती वशित्व, आपल्या अभिलाषांवर हुकुम आणि स्वर्ग व नरकादि अनुभव ज्या शक्तीमुळे मिळतात ती कामावसायित्व होय. अशा रीतीने यांचे स्पष्टीकरण आहे. साधकांच्या हृदयाला आनंद देणारे जे सौभाग्य त्याला या आनंदोल्लास

मुद्रेने कमीच लेखले आहे असा शब्दार्थ आहे. याचा भावार्थ असा आहे की, ही परमश्रेष्ठ आनंदमुद्रा अशी आहे की, तिच्यामध्ये करचरणादि आकुंचन-प्रसारणादिकांचा खटाटोप नाही. ती लाटा नसलेल्या समुद्राप्रमाणे गंभीर असून फेसांच्या बुडबुड्याप्रमाणे बिंदू आदि स्थानीय आवरणविक्षेपादींना आत विलीन करून स्थिररूप झालेली आणि स्फुरणक्रियेलाही विश्रांती देणारी अशी अलौकिक अनुभव किंवा अनुभवरूप आनंद देणारी (मुदं राति-ददाति इति मुद्रा) महामुद्रा आहे. त्याचप्रमाणे ही करंकिण्यादि सर्व मुद्रांची उत्पत्ती व विलयभूमी आहे. (सर्व मुद्रा येथून उदय पावतात व येथेच लय पावतात.)

यासंबंधी "**श्रीपश्चिमतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

सा सिद्धिः सर्वसिद्धीनां सिद्धित्वे परिकीर्तिता।
ज्ञानं ह्यकलितं चैकं मुद्रा चैका ग्रहात्मिका।।
द्वावेतौ यस्य जायेते सोऽन्वयी सिद्धशासने।

अर्थ :- ती (परमश्रेष्ठ आनंदामुद्रा ही) सर्व सिद्धींची सिद्धी म्हणून सिद्धित्वामध्ये सर्व ठिकाणी प्रसिद्ध आहे. ज्या मनुष्याच्या बाबतीत अकलित अर्थात् अखंड ज्ञान आणि ग्रहात्मक मुद्रा या दोन गोष्टी निर्माण होतात तो सिद्धशासनात अन्वयी अर्थात् अनुगामी असतो.

आनंद या शब्दात परानंद, निरानंद, महानंद, आनंदविषय, आनंद व स्वभाव या सर्व आनंदांची समरसता प्रकट करण्याची उत्सुकता व ऐश्वर्य अथवा श्री या दोन्हीही गोष्टींचे ग्रहण आहे किंवा या सर्व शब्दांच्या अर्थांचा समावेश होतो. यासंबंधी "**श्रीस्तोत्रभट्टारक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**कौलार्णवानन्दमयोर्मिरूपाम्**" अर्थात् "कुलार्णवाच्या आनंदमय तरंगरूपाला (नमन) असो."

तसेच "**श्रीचिद्गगनचंद्रिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

यत् परो निरुपसर्गतः परः स्यान्महानपि च केवलः शिवे।
उत्तरश्च विषयात् स च त्वदानन्द उल्लससि तद्धनासि यत्।।

अर्थ :- श्रीपरशिव हे मुक्तीच्याही पलीकडचे व्यापक असल्यामुळे महान्, असंग असल्यामुळे केवल म्हणजे एकीएक किंवा स्वतःच स्वतःचे अगर स्वतःच स्वतःत राहणारे आणि सर्व विषयांच्या पलीकडचे आहेत. हे पार्वती! ते श्रीपरशिव हे तुझ्या आनंदाला प्रकट करतात आणि तो आनंद हेच तुझे ऐश्वर्य आहे.

या आनंदोल्लासात सर्व सिद्धींचा (अध्यात्मदृष्ट्या) अंतर्भाव दाखवितात. प्रकाशरूपाने सर्व पदार्थात सामावून असणे ही अणिमा, सर्वांना व्यापून टाकणे अर्थात् स्वत:त सामावून घेणे ही महिमा, भेदरूप गुरुत्वाचा अर्थात् अवजडपणाचा नाश म्हणजे लघिमा, स्वात्मविश्रांतीचा लाभ म्हणजे प्राप्ती, वेद्य वस्तूंचे लालन म्हणजे प्राकाम्य, निरुपाधिक ऐश्वर्याने असणे किंवा शोभणे म्हणजे ईशितृत्व, विचारी होऊन सर्व सहन करणे म्हणजे वशिता आणि पूर्णाहंभावाची भावना म्हणजे कामवसायित्व होय. या संविन्मयत्व प्रक्रियेने आम्ही सांगितल्याप्रमाणे या श्रेष्ठ सिद्धी होत; कारण यात काही हेतू नसतात. या मंत्र-मुद्रांप्रमाणे इतरही ध्यान व होमादि सर्व व्यापार संवित्शी एकरूप होण्याच्या दृष्टीने स्वत: तर्कानुरूप बसवावेत.

यासंबंधी "**श्रीविज्ञानभैरव**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

ध्यानं या निश्चला चिन्ता निराकारा निराश्रया।
न तु ध्यानं शरीरादिमुखहस्तादिकल्पनम्।।
महाशून्यालये वह्नौ भूताक्षविषयादिकम्।
हूयते मनसा सार्धं स होमश्चेतनास्रुचा।।

अर्थ :- निराकार अर्थात् आकाररहित, निराश्रय अर्थात् आश्रयरहित आणि निश्चल अर्थात् हालचालरहित असा विचार म्हणजे ध्यान होय. शरीरादि, मुख्य अथवा हस्त इत्यादींचे कल्पन म्हणजे ध्यान नव्हे. महाशून्यालयरूप अग्नीमध्ये महाभूते, इंद्रिये, त्यांचे विषय आणि मन यांचे चेतनारूप पळीने हवन करणे हा होम होय.

कुलार्घ्यस्वीकार हा अंतर्होम होय, असे जाणावे. यासंबंधी आमच्या श्रीसद्गुरुदेवांनी "**श्रीसुभगोदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

पराहन्तामये संविदग्नौ संवेद्यतर्पणे।
इदन्तालक्षणं हव्यं जुहुयादबहिर्मुखः।।

अर्थ :- पराहंतामय संविदग्नीत इदंतामय सर्व वेद्यवस्तूंचे अंतर्मुख होऊन हवन करणे हा अंतर्होम होय.

त्याचप्रमाणे मीच "**श्रीमहार्थोदय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

अथ हव्यमिदन्ताख्यं हावं हावं स्वचिन्मुखे।
उल्लङ्घ्य मायामालिन्यं स्वैरमासीत मेरुवत्।।

अर्थ :- आत्मचैतन्यात इदंता हव्याचे हवन करून मायेचे मलिनत्व दूर करून मेरूप्रमाणे निश्चल, स्थिर किंवा स्वतंत्र असावे.

आता यापेक्षा अधिक रहस्य सांगणे पुरे.।।५१।।

*****

गाथा क्रमाङ्क ५२

अवतरणिका :- अशा रीतीने विमर्शस्वरूप सविस्तर सांगून ग्रंथकार या गाथेत विमर्शाचे प्रयोजन सांगताना असे म्हणतात की -

हिअअट्ठाणपरूढो विमरिसकप्पद्दुमो महासाहो।
पुप्फइ भोगसिरीए फलइ अ णिक्कलसुहोसवालोअं।।५२।।
(हृदयस्थानप्ररूढो विमर्शकल्पद्रुमो महाशाखः।
पुष्यति भोगश्रिया फलति च निष्कलसुखोत्सवालोकम्।।)

अर्थ :- हृदयप्रदेशात उत्पन्न झालेला व मोठ्या मोठ्या फांद्या असलेला आत्मविमर्शरूप कल्पद्रुम (स्व-स्वरूप जाणणाऱ्या पुरुषांची) भोगरूप संपत्ती व अपवर्ग म्हणजे मोक्ष इत्यादींनी पुष्पित करतो, स्वर्गसुखादि प्रदान करतो आणि (मायोपाधिरहित) निष्कल अर्थात् कलारहित आनंदस्वरूप प्रकाश-प्रत्यक् अर्थात् प्रकाशरूप (जीवन्मुक्तीच्या) फलाने कृतार्थ करतो.।।५२।।

विशेष :- हृदयरूप गुहेतच साधक समाहित होऊन आत्मस्वरूप अथवा परमात्म्याचे चिंतन करतो. हृदयाला विश्वप्रतिष्ठाभूमी अर्थात् विश्वाची आधार भूमी असे म्हणतात. उपनिषदात यासंबंधी असे म्हटले आहे की, **"हृदयं तद् विजानीयाद् विश्वस्यायतनं महत्।"** अर्थात् "विश्वाचे हे जे मोठे आयतन किंवा स्थान आहे तेच हृदय म्हणून जाणावे." आत्मविमर्शामध्ये सर्व विश्वविक्षोभ लीन होतो. कार्यासंबंधी विधिनिषेधांचा भेदच राहत नाही. आत्मविमर्शात अथवा आत्मज्ञानात विधिनिषेधगत भिन्न-भिन्न द्रव्य आणि गुणांनी युक्त हजारो विकल्प अथवा विचार असणाऱ्या विश्वव्यवहाराचे पर्यवसान होते. हे परमात्मचिंतन आत्मस्वरूप यज्ञाला भोगैश्वर्य आदि गोष्टींनी युक्त करते. हा परमात्मविमर्श अथवा परमात्मज्ञान अहंता आणि इदंतारूप मायेपासून सर्वथा विरहित असतो. हा निजानंदप्रकाशाने आत्मस्वरूप जाणणाऱ्या साधकभक्तयोगिशिष्याला जीवन्मुक्तीच्या दशेमध्ये सुप्रतिष्ठित करतो. या विमर्शामध्ये पंचभूतात्मक इंद्रियग्राह्य अर्थात् इंद्रियांकडून ग्रहण केले जाणारे समस्त विषयप्रपंच विलीन होऊन जातात. जीवन्मुक्तिरूप ऐश्वर्यच या हृदयस्थ आत्मविमर्शकल्पद्रुमाचे अमृतफल आहे.

परिमलव्याख्यार्थ :- हृदय हे विश्वाला आधार देत असल्यामुळे ते खूप मोठे स्थान आहे. यासंबंधी श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांनी असे म्हटले आहे की,

"हृदयं हि नाम प्रतिष्ठास्थानमुच्यते" अर्थात् "हृदय म्हणजेच प्रतिष्ठास्थान होय." त्याचप्रमाणे यावषयी उपनिषदातही असे प्रमाण आहे की, **"हृदयं तद् विजानीयाद् विश्वस्यायतनं महत्।"** अर्थात् "विश्वाचे जे मोठे स्थान आहे त्यालाच हृदय म्हणून जाणावे." तेथे प्रकर्षाने रूढ झालेल्या अर्थात् भोगक्रियेला प्राप्त झालेल्या अथवा भोगक्रियेला योग्य असलेल्या हेतूपासून अथवा कारणापासून भेदाचे विविधप्रकार व्यक्त होतात. "प्रकर्ष म्हणजेच त्याचा मध्य प्रसविणारा," या सांगितलेल्या न्यायाचे उल्लंघन करून एखादी भासमान होणारी उज्ज्वलता होय. ही स्थिती प्राप्त झालेले विमर्शशील अर्थात् स्फुरण अथवा ज्ञानाने शोभणारे जे भाग्यवान् योगी आहेत त्यांना जरी स्वर्गस्थानीय भोग मिळाले तरी त्यांची निश्चिन्तता अथवा विश्वास कायम राहतो. त्याचप्रमाणे त्यांचे चित्त चंचल होत नाही आणि विकारांनी युक्त होत नाही.

यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की -

वासनामात्रलाभेऽपि योऽप्रमत्तो न जायते।
तमनित्येषु भोगेषु योजयन्ति विनायकाः।
तस्मान्न तेषु संसक्तिं कुर्वीतोत्तमवाञ्छया।।

अर्थ :- वासनांची प्राप्ती होऊनही अथवा वासनांशी संबंधित होऊनही ज्याचे अर्थात् ज्या सिद्धयोग्याचे चित्त उन्मत्त होत नाही त्याला स्वर्गस्थ देवतांकडून अनित्य भोगांमध्ये योजले जाते. त्यामुळे उत्तम सुखाची इच्छा करणाऱ्या (मनुष्यांनी) वासनांची आसक्ती धरू नये.

याचे कारण असे आहे की, आत्म्याचे चैतन्य सच्चिदानंदाशी समरस होण्याच्या योग्यतेचे असते किंवा तद्रूपच असते. त्या चैतन्याची रूढावस्था म्हणजेच इच्छा, ज्ञान व क्रियाशक्ती होत.

त्यापैकी क्रियाशक्तीविषयी शास्त्रात असे म्हटले आहे की -

क्रियात्मको ह्ययं कालः क्रिया कारकमाश्रिता।
षोढा च कारकग्रामः शक्त्यात्मनि हि तिष्ठति।।

अर्थ :- हा काल क्रियेने युक्त असून क्रिया ही कारकांवर आश्रित अर्थात् अवलंबून असते म्हणजे कर्त्यादि कारकाश्रयाने राहते. सहा प्रकारचा कारकसमूह (षष्ठी विभक्तीला सोडून) शक्तीने आत्म्यात राहतो.

ही क्रियाशक्ती करणअधिकरणादि कारकांच्या स्वभावाची होऊन क्रमाने कार्यत्वाने स्फुरण पावते किंवा प्रकाशित होते.

या दृष्टीने **"श्रीतंत्रवटधानिका"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

क्रिया स्वात्मपरिस्पन्दस्ततः प्राणोऽथ तत्कृतम्।
कालवैचित्र्यमित्येतत् संवित्स्पन्दाधिकं नहि।।

अर्थ :- क्रिया म्हणजे आपले स्पंदन अर्थात् चलन किंवा हालचाल असून त्यापासूनच प्राण आणि प्राणामुळे काल वैचित्र्य निर्माण होते. हे सर्व संवित्स्पंदाहून वेगळे वा अधिक नाही.

कार्य अर्थात् क्रिया या विधिनिषेधयुक्त विषयात्मक रीतीने पुष्कळ प्रकारच्या असून त्यात गुण, कर्म, द्रव्य इत्यादि अनेक प्रकारचे पोटभेद आहेत. त्यांच्या साहाय्यानेच जगताचा व्यवहार होतो व तो कार्यातच मोडतो. त्यामुळे हा सर्व विमर्शशक्तीचा म्हणजेच परमेश्वरप्रकाशस्फुरणाचा विस्तार होय. अशा प्रकारचा हा विस्तार म्हणजे बाह्य व आभ्यंतर अशा सर्व अनुभवांचा निर्वाहक व त्या त्या इच्छित गोष्टी देणारा कल्पवृक्षच होय. हा विमर्शरूप वृक्ष म्हणजेच ज्ञान हेच लक्षण असणारा व स्वात्म्याच्या परामर्शाने युक्त असा चमत्कार आहे. तो स्वस्वरूप जाणणाऱ्या पुरुषांना भोगरूप संपत्तीने पुष्पित करतो अर्थात् अनेक भोगरूप पुष्पांचे प्रदान करतो. भोग म्हणजे आवडत्या स्त्रीला आलिंगन इत्यादि पासून मिळणाऱ्या बाह्य सुखाचा अनुभव होय. त्याची महती हीच की, विधिनिषेधांना बाजूला ठेवून ज्ञानदृष्ट्या सर्व अद्वैतरूप अर्थात् द्वैतहीन किंवा एकरूप समजून भोगसुद्धा मोक्षसंपत्तीच आहे या भावनेने तो सिद्धयोगी कौतुकाने भोगग्रहण करतो व आत्मविचाराची जागृती ठेवतो. हा विमर्शरूपी कल्पतरू परमानंद फलाचा वितरक अर्थात् दाता आहे. हा परमसुखदाता आहे. या सुखात अहंता व इदंता भेदरूप व्यंग अथवा कलंक नाही. ऐहिक व पारलौकिक सुख समानरूपाने मानले जाते. याला शास्त्रामध्ये असा दृष्टान्त आहे की -

शचीकुचतटे शक्रो नरके विलुठन् कृमिः।
उभौ समसमाधानौ विचित्रो वासनाभ्रमः।।

अर्थ :- इंद्राला इंद्राणीशचीपासून जे सुख प्राप्त होते तेच सुख नरकातील जंतूला त्याच्या स्त्रीमुळे मिळते. या सुखामध्ये कोणतेही अंतर नाही. जर काही विशेष असेल तर हा वासना किंवा कल्पनेचा भ्रम आहे.

विषयसुखाला सुख समजून विषयीजन सौख्यारोप करतात तो कल्पनेतील दोष आहे असा श्रीशिवानंदमहाप्रकाशमहेश्वरानंदादि योगिश्रेष्ठांनी संवाद व अनुभवाने निर्णय केला आहे व तसा पूर्णानुभवही त्यांना मिळालेला आहे. हा विमर्शवृक्ष आनंदमय प्रत्यक् प्रकाशाला प्रसविणारा आहे. हा प्रकाश

निष्कल आहे. कला या शब्दाचा अर्थ मायाशक्ती, पंचकंचुकी, ब्राह्म्यादि विभूतींची समष्टी किंवा मातृका, स्वात्मा व स्वसंकोच इत्यादि प्रकारांनी करावा. कला म्हणजे परिमित रूपाने बाह्यपरिच्छिन्नता किंवा सोपाधिकत्व अर्थात् विशिष्ट लक्षणांनी किंवा विशेषणांनी युक्त स्वरूप दाखविणारी मायाशक्ती आहे.

याचा तात्पर्यार्थ असा आहे की, विमर्श म्हणजे या विश्ववैचित्र्याला अर्थात् विविध प्रकारच्या विश्वाला प्रकट करणारा, अतिशय स्वतंत्र असा परमेश्वर मी आहे अशा सुंदर अनुभवाने वागणारा, सर्व प्रपंच कल्पनेला स्वतःत सामावून घेणारा व आत्मज्ञानी योगिजनांना भोग व मोक्षरूप दोनही पुरुषार्थांची प्राप्ती करून देणारा आहे.

यासंबंधी "**श्रीप्रबोधपंचाशिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

तस्या भोक्त्र्याः स्वतन्त्राया भोग्यैकीकार एष यः।
स एव भोगः सा मुक्तिः स एव परमं पदम्।।

अर्थ :- स्वतंत्र अशा संवित्चे भोग्यवस्तूंशी एकरूपत्व हाच भोग, हीच मुक्ती व हेच परमपद होय.

या वर्णनानुरूप पाहिल्यास भोग हा मोक्षरूप व मोक्ष हा भोगरूप असे अन्योन्यमेलनरूप संविद्-अद्वैतसिद्धान्तलभ्य जीवन्मुक्ती हे या विमर्शाचे फल होय.

"**श्रीश्रीमतदेव**" या ग्रंथात यासंबंधी असे म्हटले आहे की -

यस्येच्छातः सतां देवि! जीवन्मुक्तिः क्षणाद् भवेत्।
तस्याहं वच्मि दिव्यौघं जीवन्मुक्तिप्रवृद्धये।।

अर्थ :- ज्याच्या इच्छेने एका क्षणात सज्जनांना जीवन्मुक्ती मिळते त्या जीवन्मुक्तीच्या वाढीसाठी त्याचा दिव्य ओघ मी सांगतो.

चांगल्या क्षेत्रात अथवा जमिनीत उत्पन्न झालेला वृक्ष शाखांनी फोफावतो आणि पुष्प व फल देतो. पुष्पात सत्कार्यवादाप्रमाणे फल आहे व फलात कारणरूपाने पुष्प आहे. त्यामुळे पुष्प हे फल आहे व फल हे पुष्प आहे अशा प्रकारची विवेकी लोकांची विचारधारा असते. विमर्शाची वृक्षरूपता आगमप्रसिद्ध आहे.

"**श्रीमत्स्तोत्रावली**" या ग्रंथात यासंबंधी असे म्हटले आहे की -

प्रार्थनाभूमिकातीतविचित्रफलदायकः।
जयत्यपूर्ववृत्तान्तः शिवः सङ्कल्पपादपः।।

अर्थ :- हे श्रीशिव प्रार्थनेपेक्षा अधिक, अलौकिक फल देणारे आणि ज्यांचे पूर्वज्ञान अर्थात् पूर्वायुष्य कोणालाही माहीत नाही असे अनादि संकल्प-वृक्ष आहेत.

या विमर्शाला अव्हेरणारा जो बाह्याद्वैत सिद्धान्त आहे तो पशुशास्त्राच्या बैठकीवर बसणारा आहे. यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की -

अद्वैतवादनिर्वाहो वेदान्तेष्वपि विद्यते।
तत्रात्मा कश्चिदुत्तीर्णः सच्चिदानन्दलक्षणः।।
एकः सत्यतया स्फूर्जन्निर्मलो निरहङ्क्रियः।
अनादिनिधनः शान्तो विश्वोत्पत्तिविपत्तिभूः।।
संविन्मयस्वभावेन भावाभावदशोज्झितः।
स्वयम्प्रकाशतां बिभ्रन्नित्यमुक्तो निरूपितः।।
समञ्जसमिदं सर्वं किन्तु तस्यात्मनः प्रभोः।
अविम्रष्टृत्वपर्यायमकर्तृत्वं न युज्यते।।
सा चास्य कर्तृताशक्तिः स्वभावानतिलङ्घिनी।
जानातेश्च करोतेश्च साधारण्येन वर्तते।।
तत्क्रियापि भवेज्ज्ञानं ज्ञातुर्धर्मो यदुच्यते।
एवं कर्तृस्वभावत्वात् तस्य ज्ञानमपि क्रिया।।
औन्मुख्यमनयोरिच्छा विश्वमेतद्विजृम्भितम्।
तस्माद् विमर्शो देवस्य स्वभावोऽस्माभिरुच्यते।।
भवन्त्यस्यैव पर्यायाः शक्तिरैश्वर्यमुद्यमः।
स्पन्दः स्वतन्त्रता स्फूर्तिरूर्मिरोजः कलेत्यपि।।

अर्थ :- वेदान्तशास्त्रामध्ये अद्वैतवादाचा ऊहापोह अर्थात् विचार केलेला आहे. त्यात आत्मा सच्चिदानंदस्वरूपी मानला आहे. तो एक, सत्य, निर्मल, निरहंकार, अनादिनिधन, शांत, विश्वाच्या उत्पत्तिनाशाला आश्रय, ज्ञानमय, अस्ति-नास्ति-अवस्थारहित, स्वयंप्रकाश व नित्यमुक्त असा वर्णिला आहे. हे सर्व वर्णन योग्य व ठीक आहे; पण त्या आत्म्याला अकर्ता अर्थात् अविम्रष्टा अर्थात् स्फुरणत्वहीन मानले आहे ते जुळत नाही. त्याची कर्तृत्वशक्ती ही स्वभावाशी जुळणारी आहे. ती जाणणे व करणे यात सामान्यरूपाची आहे. त्याच्या क्रियेला ज्ञान असे म्हणतात; कारण ज्ञात्याला धर्मज्ञान आहे. ते ज्ञान कर्तृस्वभाव असल्याने त्याला क्रियाच म्हणावे. या एकरूप ज्ञान व क्रियेची उन्मुखता हीच इच्छा होय व

त्यामुळेच या विश्वाचा विलास होतो. त्यामुळे परमेश्वराचा विमर्श अर्थात् स्फुरण हा स्वभाव आहे असे आम्ही मानतो. त्या विमर्शाचे पर्यायवाची शब्द शक्ती, ऐश्वर्य, उद्यम, स्पंद, स्वतंत्रता, स्फूर्ती, ऊर्मी, ओज व कला हे होत.

आता चर्वितचर्वणाचे चापल्य पुरे झाले.।।५२।।

❊❊❊❊❊❊

गाथा क्रमाङ्क ५३

अवतरणिका :- श्रीमहेश्वरांचे जीवन्मुक्तीचे लक्षण हे विमर्शाचे फल म्हणून प्रतिपादन केले जाते परंतु हे संभवत नाही; कारण देहोपाधिरहित कालातच मानवांना मोक्ष मिळतो असा इतरांचा आग्रह वा म्हणणे आहे. ही शंका दूर करण्यासाठी ग्रंथकारांनी ही गाथा सांगितली आहे.

कमिओ होइ ण देवो तस्स कहं कालकम्मसप्फंसो।
णिच्चणिरावरणस्स वि को जीवन्तस्स मोक्खपच्चूहो।।५३।।
(क्रमिको भवति न देवस्तस्य कथं कालकल्मषस्पर्शः।
नित्यनिरावरणस्यापि को जीवतो मोक्षप्रत्यूहः।।)

अर्थ :- (विश्वात्मक) परमेश्वर अनादि, अनंत, नित्य, निरावरण आणि अलख निरंजन अर्थात् शुद्ध ब्रह्म आहे. तो सनातन, सार्वकालिक आणि सर्वव्यापक आहे. त्याला काल व कलंकाचा स्पर्श कधीही क्रमशः होत नाही. जिवंत असतानाच किंवा जीवन्मुक्तिस्वरूपामध्ये त्याच्यासाठी मोक्षरूप विघ्नाचा प्रश्नच येत नाही; कारण तो नित्यमुक्त आणि विश्ववैचित्र्य विकल्पांच्याही पलीकडचा आहे.

विशेष :- विश्वव्यापक, नित्यनिरावरण, मायारहित व अलख निरंजन परमेश्वर कालकल्मषस्पर्शाने कधी क्रमित किंवा आक्रमित होत नाही. तो अकाल आहे. कालस्वरूप होऊनही तो कालाच्या नियंत्रणापलीकडे आहे. तो पूर्व व अपर अर्थात् आधीचा व नंतरचा अशा कल्पनाक्रमांनी आक्रमित होत नाही अथवा अतिक्रमित म्हणजेच ओलांडला जात नाही. त्याच्यामध्ये पृथक्ता किंवा भेद नाही. तो सर्वव्यापक श्रीशिव आहे. तो नित्यनिरावरण असल्याने कालसापेक्ष नाही. चिदात्मकप्रतिपत्तीची म्हणजेच आपण चित्स्वरूप आहोत या अनुभवाची दृढता म्हणजेच जीवन्मुक्ती होय. जीवाला मोक्ष मिळणे हे त्याच्या बाबतीत विघ्न सिद्ध होत नाही. जीव नित्यमुक्त नाही. जीवत्व हा आत्म्याचा विशिष्ट विकल्प आहे. निर्विकल्पतेची अनुभूती हाच मोक्ष आहे.

देहादि अस्तित्वात असूनही चिदात्मानंदाचा लाभ झाल्यावर जीवन्मुक्ती सिद्ध होते. भोग आणि मोक्षाच्या सामरस्याचा साक्षात्कार होणे हाच जीवन्मोक्ष आहे. हे सर्व परमेश्वराचेच ऐश्वर्य आहे. जीवन्मुक्तीचे तात्पर्य "जन्ममरणमयी अवस्थेच्या निर्विशेष स्वानंदोत्सवाची अनुभूती," असे आहे. सर्वकालांनी युक्त असूनही कालरहित अशा परमेश्वरासाठी मरणाने प्रभावित होणाऱ्या जीवाप्रमाणे मोक्षरूप विघ्नांचा प्रश्नच उत्पन्न होत नाही. तो तर नित्यमुक्त, अलख निरंजन अर्थात् शुद्ध ब्रह्म आहे. अकाल आहे.

परिमलव्याख्यार्थ :- देव म्हणजे विश्वात्मक परमेश्वर होय; कारण तो देशकालादि विश्वविस्ताराला स्व-ज्ञान देऊन द्योतन अर्थात् प्रकाशन इत्यादि अनेक कार्यांचे कौशल्य धारण करणारा आहे. त्यामुळे तो क्रमिक होऊ शकत नाही अर्थात् तो अगोदरचा अथवा नंतरचा असा कालसंबंधित होऊ शकत नाही; कारण तो सर्व जगद्विस्ताररूपी आहे. अर्थात् **"चलित्वा यास्यते कुत्र सर्वं शिवमयं यतः ।"** म्हणजे "सर्व काही श्रीशिवमय आहे मग जाऊन जाऊन कोठे जाणार ?" असे म्हटले असल्याने कोणीच कोणापासून वेगळे नाही. त्यामुळे (पहिला व दुसरा) असा क्रम कोठे लावावयचा ? तेव्हा युक्तीने पाहिल्यास प्रतिपक्षाला गप्पच बसावे लागते.

या दृष्टीने **"श्रीविरुपाक्षपंचाशिका"** या ग्रंथात या संबंधी असे म्हटले आहे की -

अक्रमता मे क्रमिकं ज्ञात्राद्यं सक्रमाक्रमा तु चितिः ।

अर्थ :- ज्ञानरूप चैतन्याला क्रम, सक्रम व अक्रम असे काहीही नाही. ज्ञातृत्वालाही क्रम नाही तर ज्ञानाला कसा असेल ?

त्यामुळे कालसंपर्काची कुणकुणही चैतन्याला लागत नाही. तत्त्वदृष्ट्या कालाचे पर्यवसान क्रमात होते. **"श्रीप्रत्याभिज्ञाहृदय"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

कालः सूर्यादिसञ्चारस्तत्तत्पुष्पादिजन्म वा ।
शीतोष्णे वाथ तल्लक्ष्यः क्रम एव स तत्त्वतः ।।

अर्थ :- सूर्यादि संचार म्हणजे काल होय. त्यावर पुष्पादि उत्पत्ती अवलंबून आहेत. शीतकाल व ग्रीष्मवर्षादि कालावरच अवलंबून आहेत. त्यामुळे (तत्त्वदृष्ट्या) काल म्हणजे क्रमच होय.

"कल्मष" म्हणजे काय ते आता सांगतात. काल म्हणजे परमेश्वराची एक शक्तीच होय. तिच्यापासून तो वेगळा कसा होणार ? (शक्ती व्यक्तीला

सोडून राहत नाही.) उलट विश्वालाच ती कालशक्ती वेगळी ठेवते म्हणून कालाला संकोचाचा डाग लागत नाही. त्या कालाला स्वात्मा स्वतःत सामावून घेत असल्याने त्याला नित्य असे म्हणतात. त्याचप्रमाणे (हा आत्मा) देशोपाधीला दूर करीत असल्याने तो व्यापकही आहे. अशा प्रकारे आत्मा सर्वांना आवरण करणारा व स्वतः निरावरणरूप असूनही प्राण व शरीरादिकांचा संबंध त्यावर लादून त्याला सदोष ठरवून चिदानंदलाभरूपी मोक्षाविषयी प्रतिकूल तर्क करून कोणते विघ्न उत्पन्न होणार व कोण विघ्न करणार? अर्थात् तत्त्वदृष्ट्या काही अडचण नाहीच. जर जीवभाव हा आत्मरूपातील विकल्प व मोक्ष म्हणजे निर्विकल्पानुभव असे म्हटले तर अन्योन्यविरुद्ध वर्णन होईल. प्राणशरीरादींबाबतीत असाच अन्योन्यविरुद्ध संबंध आगंतुक म्हणजे अज्ञानाने लादलेला आहे असे समजावे. **"श्रीप्रत्यभिज्ञाहृदय"** या ग्रंथात जीवन्मुक्तीची व्याख्या अशी केली आहे की, **"चिदानन्दलाभे देहादिषु वेद्यमानेष्वपि चिदैकात्म्य-प्रतिपत्तिदार्ढ्यं जीवन्मुक्तिः।"** अर्थात् "चिदानंदाच्या अनुभवानंतर वेद्य अशा देहादि वस्तू चिद्वस्तूशी एकात्म आहेत असे दृढ ज्ञान म्हणजे जीवन्मुक्ती होय." या उक्तीनुसार भोग व मोक्ष यांच्या समरसतेचा साक्षात्कार म्हणजेच जीवन्मोक्ष होय. **"सर्वो ममायं विभवः।"** अर्थात् "हे सर्व माझेच वैभव आहे," अशी विश्वात्मानुसंधानरूप ऐश्वर्यवान् प्रमात्यांची दृष्टी असल्याने काही विशेष "ने-आण" करावी लागत नाही.

या दृष्टीने **"श्रीसंविदुल्लास"** या ग्रंथात मीच असे म्हटले आहे की -

विश्वं मूर्तिर्वैखरी नाममाला यस्यैश्वर्यं देशकालातिलङ्घि।
तद्भक्तानां स्वैरचारः सपर्या स्वेच्छा शास्त्रं स्वस्वभावश्च मोक्षः।।

अर्थ :- तुझ्या भक्तांचे शरीर म्हणजे हे विश्व, वैखरी ही नामपंक्ती, देशकालाच्या पलीकडे असणे हे ऐश्वर्य, स्वैरवर्तन ही पूजा, स्वेच्छा हे शास्त्र व स्व-स्वभाव हा मोक्ष होय.

असे असताना कालादिकांचा संबंध आत्मरूपात लावण्यासाठी खटाटोप कशाकरिता करावयाचा? आमच्या प्रवचनाचे वैशिष्ट्य म्हणजे भोग व मोक्षाचा एकरूप अनुभव घेणे होय.

यासंबंधी **"श्रीरत्नदेवतंत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

भुक्तिर्वाप्यथ मुक्तिश्च नान्यत्रैकपदार्थतः।
भुक्तिमुक्ती उभे देवि! विशेषे परिकीर्तिते।।

अर्थ :- हे देवी! भुक्ती व मुक्ती एकरूप असल्याने त्या एकत्रच आहेत. वेगळ्या नाहीत. तुझ्या रूपातील ते विशेष होत.

"**श्रीसिद्धमत**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

अध्वषट्कं च दीक्षा च शिवशास्त्रमिति स्मृतम्।
दीक्षाध्वा निर्भयो भोगः शास्त्रे भैरवसंज्ञके।।

अर्थ :- श्रीशिवशास्त्र म्हणजे अध्वषट्क व दीक्षा होय. दीक्षाषट्क व निर्भय भोग हे श्रीभैरवशास्त्रात आहेत.।।५३।।

******

गाथा क्रमाङ्क ५४

अवतरणिका :- जीवन्मुक्ती म्हणजे जन्ममरणादिकात गुंतलेल्या आत्म्याचा सर्वावस्थात्यागपूर्वक स्वानंदाचा उपभोग होय. आत्मा जर स्थिर नसेल तर ही जीवन्मुक्ती त्याच्या बाबतीत कशी काय शक्य होईल? असा क्षणभंगवाद उद्धृत करून त्याचा निरास या गाथेत करताना ग्रंथकार असे म्हणतात की-

जं किं वि जेण केण वि रूवेण जहिं कहिं वि किं णत्थि।
ता अप्पा णिच्चठिरो खणभङ्गो च्चेअ अट्ठिरो होइ।।५४।।
(यत् किमपि येन केनापि रूपेण यत्र कुत्रापि किं नास्ति।
तस्मादात्मा नित्यस्थिरः क्षणभङ्ग एवास्थिरो भवति।।)

अर्थ :- आत्मा नित्य आहे. तो स्थिर आहे. जे काही ज्या कोणत्या रूपात दिसते ते वास्तविक तसे नसते. (विश्वविकल्पामध्ये आत्म्याचे प्रकाश्यरूप) हे तर क्षणभंगुर किंवा क्षणिक व कालक्रमानुगत असल्याने अस्थिर आहे अन्यथा सर्व परमात्मस्वरूपच आहे.।।५४।।

विशेष :- सर्वत्र परमात्मसत्ताच अभिव्यक्त झालेली असते. व्यवहार-कालामध्ये विश्वाच्या अनेक रूपांमध्ये परमात्मसत्तेचा प्रादुर्भाव आणि ध्वंस होण्याच्या प्रवृत्तीमध्ये क्षणभंगुरतेची अथवा क्षणिकतेची स्थिती स्वाभाविक आहे. खरेतर प्रकाश्य आणि प्रकाश यांच्यामध्ये स्वरूपगत संपूर्ण अभेदता अथवा स्थिरता कायम असते. अशा प्रकारे नित्याच्या अनित्य रूपामध्ये होत असलेल्या प्रकाशनापासून परमार्थसत्तेमध्ये भेदाची कल्पनाच नाही. परमात्मा हाच कोणत्याही स्वरूपात स्फुरित झाल्यावर अनित्य अथवा अस्थिर असल्याप्रमाणे प्रतिभासित होतो. तसे पाहू गेल्यास जेथपर्यंत प्रकाश्य आणि प्रकाशामध्ये एकात्मता अथवा अभिन्नता आहे तेथपर्यंत व त्याचप्रमाणे हे

जोपर्यंत प्रकाशित आहे तोपर्यंत हे सर्व श्रीशिवमय आहे, परमात्मस्वरूप आहे. हा परमेश्वर सर्वव्यापक आणि स्वतंत्र आहे. यामध्ये भेद अथवा अलगपणा सिद्धच होत नाही. या आत्म्याला स्थिर आणि नित्यच जाणले पाहिजे. नित्यता आणि स्थिरता हेच याचे स्वरूप आहे. परमात्मा कालक्रमाच्या पलीकडचा अथवा अकाल आहे. कालक्रमाने जो प्रभावित झालेला असतो तोच विषय अस्थिर आणि क्षणभंगुर असतो. विश्वव्यवहारामध्ये परमात्म्याची ज्ञानस्मृती, अपोहन म्हणजे दोषापहारक तर्क व शक्तीच प्रभावी असते.

या दृष्टीने "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च।।१५-१५।।

अर्थ :- मीच सर्वांच्या हृदयामध्ये स्थित असून माझ्यापासूनच स्मृती, ज्ञान आणि अपोहन म्हणजे तर्क अर्थात् सत्तर्क होत असतो.।।१५-१५।।

याचा आशय असा आहे की, परमात्माच सर्वांच्या हृदयात स्थित असून त्याच्यापासूनच स्मृती, ज्ञान आणि अपोहन होत असते. परमात्माच नित्य, स्थिर आणि सर्वात्मस्वरूप श्रीपरमशिव आहे.

परिमलव्याख्यार्थ :- विश्व प्रकाश्य आहे व प्रकाशक आत्मा आहे असे मानले जाते. प्रकाशाच्या संबंधानेच प्रकाश्यकत्व येत असते. हा संबंध "**तेनानेकस्य रूपस्य श्लेष ऐकात्म्यमेव सः।**" अर्थात् "जरी अनेक रूपांचा संबंध असला तरी ऐकात्म्य असते," या संबंधसिद्धिवचनाप्रमाणे प्रकाश्य व प्रकाशकाचा संबंध ऐकात्म्यापर्यंत जातो. जर प्रकाश हा पदार्थाचा धर्म मानला तर ग्राहकाच्या अभावी तो असू शकेल; मग सगळे सगळ्यांनाच प्रकाशित होईल किंवा कोणालाही होणार नाही. या प्रकाराने लोकव्यवहाराचा भंग होईल. त्यामुळे पदार्थ प्रकाशतो याचा अर्थ पदार्थ प्रकाशकतेचा अनुभव घेतो. यासंबंधी "**श्रीअजडप्रमातृसिद्धीविमर्शिनी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**इदं मम ज्ञानमिति नाञ्जसा ज्ञानप्रकाशः। अपि तु जानाम्यहमिति ज्ञानस्यास्मदर्थविश्रान्ततैव**" अर्थात् "हे माझे ज्ञान आहे असे म्हणणे म्हणजे ज्ञानप्रकाश नव्हे; तर "मी जाणतो" यामुळे या ज्ञानाची अर्थविश्रांतता होते अर्थात् "मी जाणतो" हे ज्ञान बरोबर आहे." याचे प्रकाशांतर्गतत्व बरोबर असल्याने विश्वाचे व विश्वप्रकाशक आत्म्याचे एकात्मत्व अपरिहार्य आहे. परमेश्वराला दुसऱ्याच्या मुखाकडे पाहावे लागत नाही म्हणजेच त्याचे स्वातंत्र्य आहे असे जर स्वीकारले तरच ते उचित आहे. नाहीतर दुसऱ्या सजातीय ईश्वराची अपेक्षा असल्याने (ईश्वराला) अपुरेपणा येईल. येथे

प्रतिस्पर्ध्याला आमचा असा प्रश्न आहे की, काही अभावरूप अथवा भावरूप वस्तू कोणत्याही काळी जवळ अथवा दूरच्या ठिकाणी विभक्त वा अविभक्तरूपाने आहे किंवा नाही? नाही असे म्हणता येणार नाही; कारण त्या ठिकाणी शून्यत्व प्रसंग येतो. प्रपंच हा शून्यरूप आहे याचा निरास अथवा निषेध आम्ही या आधीच केला आहे. त्यामुळे काहीतरी वस्तू आहेच असे म्हणावे लागेल. जर हा आत्मा वस्तुरूपाने स्फुरत असेल तर मग तो अस्थिर आहे असे कसे म्हणता येईल?

याचा भावार्थ असा आहे की, आत्मा विश्वाकार आहे असे जरी मानले तरी क्षणभंगनामक जो पदार्थ आहे तो थोडा वेळ तरी स्थिर आहे म्हणून त्यासंबंधी आत्म्याच्या स्थैर्यालाही काही धक्का नाही. विश्वस्थैर्याच्या बाबतीत तर बोलायलाच नको; कारण आत्मा विश्वरूपच आहे. स्मृती व तत्कारण अनुभव यांच्या परापरानुसंधानावर लोकयात्रा चालते. खांब पाहा, घट आण इत्यादि क्रियेत पूर्वानुभव व स्मरण अवश्य असावे लागते.

"**श्रीअपोहवाद**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

शब्दस्य व्यवहारार्थमर्थचिन्ताऽवतार्यते।
तदर्थमेव सङ्केतस्तद्व्युत्पत्तिरपीष्यते।।

अर्थ :- शब्द व्यवहाराकरिता अर्थस्मरण व संकेत अर्थात् नाव यांची आवश्यकता आहे. सगळ्या संवित् अर्थात् बुद्धी व ज्ञानांना परस्पर अनुसंधानाचे बळ नाही.

याचे कारण असे आहे की, प्रत्येक संवित् स्वयंप्रकाश अर्थात् स्वतःबद्दल सांगणारी आहे. त्यात इतर वस्तुज्ञानाचा संबंध नाही. याकरिता सर्व प्रकारच्या ज्ञानांना जोडणारा कोणी स्थिर पदार्थ आहे असे नाइलाजाने मानावे लागते.

या दृष्टीने शास्त्रात असे म्हटले आहे की -

नित्यश्चात्माऽवगन्तव्यः कालक्रमविलङ्घनात्।
सर्वलोकप्रसिद्धेयं तत्र युक्तिरुदीर्यते।।
प्रसवानन्तरं बालो जनन्याः स्तनमापिबन्।
स्तन्यादर्थक्रियां स्वस्य स्मरत्येवेति कल्प्यते।।
स्मृतिश्चानुभवायत्ता स च नात्रास्ति जन्मनि।
अतः प्राचीनया भाव्यमनुभूत्या कयाचन।।
सामानाधिकरण्यं च तयोर्विद्वद्भिरिष्यते।
अत आत्मा सदा स्थैर्यान्नित्योऽसाविति बुध्यताम्।।

अर्थ :- याकरिता तो नित्य असा आत्मा (सर्व ज्ञानाची गुंफण करणारा) मानावा. याला दृष्टान्त असा आहे की, नुकतेच जन्माला झालेले बालक पूर्वानुभवाने मातृदुग्धाच्या स्मरणाने स्तनपान करते. हे स्मरण या जन्मातील नसून पूर्वजन्मातल्या अनुभवाचेच आहे. त्यामुळे चालू जन्मातील स्मरण व पूर्व जन्मातला अनुभव या दोघांना एकच अधिकरण असले पाहिजे. त्यामुळे आत्मा नित्य स्थिर असा मानायला पाहिजे.

या दृष्टीने **"श्रीपरास्तोत्र"** या ग्रंथात मी असेच म्हटले आहे की -

मातुर्गर्भसमुद्गकादवतरन्नुर्वीमिमामर्भक-
स्तत्पूर्वं स्तनचूचुकप्रणयिना मुग्धेन वक्त्रेण ते।
आचष्टे तदनश्वरं पदमहंकुर्वन् परे! किं पुनः
क्रीडाकञ्जुलिका कलेवरमयी कुत्रापि न त्यज्यते।।

अर्थ :- आईच्या गर्भातून या पृथ्वीतलावर जन्माला आलेले अर्भक जन्म होण्यापूर्वीच्या ओढीने म्हणजे संस्काराने सहजरीत्या मुखाने स्तनपान करते. (या बालकाला कोठलेही ज्ञान असत नाही अर्थात् घ्यावे, द्यावे व करावे इत्यादि क्रिया करण्याची जाणीव त्याला असत नाही.) आणि म्हणूनच मी ते सनातन अविनाशी स्थान ग्रहण करणारा असून याबद्दल फार काय सांगावे? जरी एखाद्या खेळण्याप्रमाणे असणारे शरीर नष्ट झाले तरीही जीव तदनुषंगिक ज्ञानाचा त्याग करीत नाही.

त्यामुळे आत्म्याचे सार्वकालिक स्थैर्य आहे हे सांगण्याने स्तंभादि पदार्थांचे स्थैर्य त्यांच्या नाशापर्यंत असते अर्थात् ते क्षणिक नसते हे सांगितल्यासाररखेच झाले.

दुसरे असे की, शास्त्रातही असे म्हटले आहे की -

तथाहि क्षणतो भङ्गे दृश्यमानस्य वस्तुनः।
अत्रैवास्य क्षणे सत्त्वं नीलादेर्नोपरि क्षणे।।
इति गृह्णाति या संवित् तस्यास्तत्र क्षणद्वये।
अवस्थानाभ्यनुज्ञायां क्षणभङ्गः प्रणश्यति।।
सापि संवित् क्षणाद् भग्नेत्युक्तौ तत्तत्पृथक् क्षणाः।
परस्परानभिज्ञास्ता भिन्नकालतया धियः।।
जानीयुः कथमन्येषां क्षणमात्रव्यवस्थितिम्।
लोकयात्राप्रवृत्तिर्वा न क्षीयेत कथं नृणाम्।।
सन्ततिस्तत्क्रियां कुर्यादिति तैर्यदुदीर्यते।

असन्ततिवदेव स्याददृढा सन्ततिर्यदि।।
दार्ढ्ये तस्या जगत्स्थैर्यं पर्यायेणानुमन्यते।
शिवदृष्टाविदं प्राह श्रीसोमानन्ददेशिकः।।
इतश्चास्ति जगत्यैक्यमित्यादौ ग्रन्थविस्तरे।

अर्थ :- पदार्थांचे नीलादि रूप ग्रहण करणारी संवित् या क्षणी असते. जरी दुसऱ्या क्षणी नीलादि रूप नसले तरी संवित् मात्र दोन्ही क्षणात असते म्हणून क्षणभंगवादाचाच भंग होतो. ती संवित् त्या पहिल्याच क्षणी नष्ट झाली असे म्हणशील तर त्या दोन क्षणांना परस्परांचे ज्ञान कसे राहील व व्यवहार तरी चालेल कसा? त्याचप्रमाणे सातत्याने ज्ञान होइल असे म्हणशील तर "सातत्य" सतत असणे क्षणभंगी न मानता स्थिर मानावे लागेल. त्यामुळे याठिकाणी जगताचे स्थैर्य सहजच सिद्ध होते. श्रीसोमानंदचार्यांनी **"श्रीशिवदृष्टी"** तंत्रात विस्ताराने जगदैक्य सांगून क्षणभंगवाद खोडला आहे.

त्यामुळे वरील युक्तीप्रमाणे पाहिल्यास क्षणभंगवाद टिकतच नाही व त्यामुळे विश्वस्थैर्य सिद्ध होते. अशा तऱ्हेने परमेश्वराच्या ठिकाणी ज्ञान, स्मृती व अपोहनरूप तीन शक्ती आहेत. त्यामुळे तो विश्वव्यवहाराचा चालक आहे हे ठरले. यासंबंधी **"श्रीप्रत्यभिज्ञाहृदय"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, **"स्यादेकश्चिद्वपुर्ज्ञानस्मृत्यपोहनशक्तिमान्"** अर्थात् "तो परमात्मा एक, चित्-शरीराचा तसेच ज्ञान, स्मृती व अपोहनशक्तिमान् आहे." त्याचप्रमाणे **"श्रीमद्भगवद्गीता"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, **"मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च।"** अर्थात् "स्मृती, ज्ञान व अपोहन हे माझ्याच (ताब्यात) आहेत."

यासंबंधानेच शास्त्रात असे म्हटले आहे की -

स्वान्तः क्रोडीकृताशेषवेद्यवर्गो महेश्वरः।
लोकयात्रामुपस्कर्तुं तत्तद्वैचित्र्यशालिनीम्।।
नियतानेव निर्भिद्य काञ्श्चिदर्थान् निजेच्छया।
उन्मज्जयति यत् स्वस्माद् दृक्शक्तिः सा निगद्यते।।
बहिरौन्मुख्ययोगेऽपि स्वात्मचिद्रूपमुज्ज्वलम्।
स्वच्छायामजहत् स्वच्छां भवेज्ज्ञानं नवं नवम्।।
अस्मिन् नवनवोल्लासे विद्युत्प्राये स्फुरत्यपि।
यथाभिलाषं लोकेन व्यवहर्तुं न पार्यते।।
तत्संविदो बहिर्मुख्या यदन्तर्मुखतास्पदम्।
चित्स्वरूपमवस्थासु कालभेदे महत्यपि।।

तस्य बाह्यपरामर्शप्रागल्भ्यं स्मृतिरुच्यते।
अथापि तन्नवाभासं स्मृतं वा वस्तु वस्तुतः।।
विश्वमय्या स्वचिच्छक्त्या तादात्म्यं न परित्यजेत्।
अतो बोधः स्मृतिश्च द्वौ वर्ज्यौ स्यातां महेशितुः।।
तद्वेद्यं वित्तितस्तस्या वित्तिर्वित्त्यन्तरादपि।
वेद्यं च वेद्यादन्यस्माद् यथा विच्छेदमश्नुयात्।।
तथा भगवतः काचित् स्वातन्त्र्यश्रीरपोहनम्।
इत्याख्याता स्फुटं ज्ञानस्मृत्यपोहनशक्तयः।।
तिसृभिः शक्तिभिराभिः शिवः कुविन्दो भवन् कुलालो वा।
अनुभवति सुखं स्मरति च बहु च विकल्पयति विश्ववैचित्र्यम्।।

अर्थ :- श्रीमहेश्वर सर्व ज्ञेय अर्थात् वेद्य वस्तूंना स्वतःत सामावून घेऊन विचित्ररूपाचा लोकव्यवहार चालविण्यासाठी स्वेच्छेने काही ठराविक वस्तू बाहेर टाकतात किंवा मांडतात. ही (क्रिया) शक्ती ज्ञानशक्ती म्हणविते. यावेळी उज्ज्वल, स्वचिद्रूप व स्वतःची निर्मल छाया यांच्या योगे जे नवनवीन ज्ञान होते व त्या विजेसारख्या चंचल ज्ञानाने जेव्हा मनासारखा विश्वाचा व्यवहार होतोच असे नाही तेव्हा श्रीमहेश्वरांना पूर्वस्मृती होते. ही स्मृतिशक्ती म्हणावी. ज्यावेळेला या दोन्ही शक्ती वेद्य अर्थात् ज्ञेय वस्तूंशी तादात्म्य पावतात त्यावेळेला दुसऱ्या ज्ञानस्मृतींनी पूर्वीच्या ज्ञानस्मृतींना ते श्रीमहेश्वर परास्त करतात. ही त्यांची स्वातंत्र्यशक्ती अपोहन शक्ती म्हणविते. या तीन शक्तींनी हे श्रीशिव कोष्टी किंवा कुंभार होऊन विश्वाचा अनुभव अर्थात् ज्ञान घेतात, स्मरण करतात व (विश्वाला) बदलूनही टाकतात.।।५४।।

*****

गाथा क्रमाङ्क ५५

अवतरणिका :- हे असू दे. क्षणभंगवाद जुळत नाही. स्थिर आत्म्याला जीवन्मुक्तिरूप पुरुषार्थलाभ होतो. परंतु त्याचा जो आनंदरूप स्वभाव सांगितला आहे त्याला (काहींचा) विरोध आहे; कारण मुक्त्यवस्था म्हणजे पाषाणावस्था होय असे काहींनी प्रतिपादिले आहे. त्याला उत्तर देताना ग्रंथकार असे म्हणतात की -

णं अप्पणो पिअत्थं सव्वस्स पिअत्तणं भणाइ सुई।
ता आणन्दसहावो अप्पा मुत्तो अमुक्तो वा।।५५।।
(नन्वात्मनः प्रियार्थं सर्वस्य प्रियत्वं भणति श्रुतिः।

तस्मादानन्दस्वभाव आत्मा मुक्तोऽमुक्तो वा।।)

अर्थ :- श्रुतींमध्ये असे म्हटले आहे की, वास्तवात आत्म्याच्या प्रियतेनेच अर्थात् आत्मा प्रिय वाटत असल्यानेच समस्त विषयवस्तूंची प्रियता किंवा रमणीयता सिद्ध होते. आत्मा आनंदस्वभावसच्चिदानंदस्वरूप, स्वसंवेद्य व अलक्ष्य निरंजन परमात्मतत्त्व आहे, त्यामुळे त्याच्यासाठी मुक्त होणे अथवा मुक्त न होणे, या कशाचाच प्रश्न उद्भवत नाही.

विशेष :- आत्मकामता किंवा आत्म्याबद्दल प्रेम वाटणे हेच सर्व गोष्टींबद्दलच्या प्रियतेचे, अनुकूलतेचे अथवा आनंदमयतेचे कारण आहे. "**आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति।**" अर्थात् "आत्म्याकरिता म्हणजे आपल्याकरिताच जगातील सर्व वस्तू प्रिय असतात, असे श्रुतींमधील वचनही आहे. वेदामध्ये आत्मकामतेचे प्रतिपादन मिळते. ज्या वस्तूबद्दल आत्मा आनंदाचे रसास्वादन करतो ती वस्तू त्याला निःसंदेह प्रिय होते; कारण आत्म्याची स्वरूपानंदमयी सत्ता सर्वत्र अभिव्यक्त आहे. आनंदालाच ब्रह्म असे म्हणतात. "अहम्" हे स्वरूप पूर्णत्वाने युक्त आहे. "अहं ब्रह्म" हे पूर्णत्वाचेच द्योतक आहे. या अंतर्ज्ञानालाच आनंद असे म्हटले जाते. पूर्णाहंतेचे अनुसंधानपर स्वात्मविश्रांतितत्त्वच आनंद होय. याच्यामध्ये मुक्त अथवा अमुक्त या दोन्हीही अवस्थांचे कोणतेही तारतम्य नाही. आत्म्याचा आनंदस्वभाव असल्याकारणानेच अपत्य, कलत्र, शमदमादि भाव सर्व काही आत्मानंदासाठी प्रीतीकर होतात. ज्यावेळेला सर्वत्र आत्मानंदच व्याप्त राहतो त्यावेळेला मुक्त होण्याची अथवा विषयप्रपंचग्रस्त होऊन बद्ध व अमुक्त होण्याची आशंकाच राहत नाही. आत्मगत इच्छा, उत्सुकता, आशा, स्पृहा आदि भावच आत्मकामता आहेत. यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की -

यत्र चित्सत्तयोर्व्याप्तिस्तत्रानन्दो विराजते।
यत्रानन्दो भवेद् भावे तत्र चित्सत्तयोः स्थितिः।।

अर्थ :- जेथे चित्सत्ता व्याप्त आहे तेथे आनंदाचे अस्तित्व असतेच आणि जेथे भावात आनंद असतो तेथे निःसंदेह चित्सत्तेची स्थिती स्वतः-सिद्धच असते.

परिमलव्याख्यार्थ :- "**आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति।**" अर्थात् "आत्म्याकरिता म्हणजे आपल्याकरिताच जगातील सर्व वस्तू प्रिय आसतात," अशी श्रुती प्रसिद्ध आहे. ही परमेश्वर विषयक विचार करणारी म्हणून

स्वाभाविकच प्रमाणभूत आहे. "**आनन्दो ब्रह्मेति व्यजानात्।**" अर्थात् "आनंदच ब्रह्म आहे असे जाणले म्हणजे जाणावे," ही श्रुती विलक्षण-स्वरूपाने वेगळे वैशिष्ट्य सांगणारी असली तरी पूर्वश्रुतीला बाध आणणारी अथवा विरुद्ध अर्थाची नाही. त्याच्या अर्थाशी सारखा अर्थ सांगणारी अर्थात् एकार्थबोधिनीच आहे. आत्मा म्हणजेच आपण अर्थात् जीव होय. आपल्याला प्रिय अशा अपत्य, कलत्र, मित्रादि पदार्थ व्यावहारिकदृष्ट्या आत्मप्रियत्वाने अनुभूत असतात. त्यामुळे "**पूर्णत्वादहमित्यन्तर्ज्ञानमानन्द उच्यते।**" अर्थात् "आत्महृदयस्फुरणरूप आत्मा पूर्णत्वाने "अहं" असा अंतर्ज्ञानरूपी म्हणूनच आनंद म्हणवितो," हे पूर्ण अहंतेशी संबंधित असलेले आत्म्याचे विशेषरूप "आनंदयुक्त" आहे. आत्मा अशा स्वभावाचा असल्याने तो मुक्त व बद्ध अवस्थेतही काही बदलत नाही. जर आत्म्याचा आनंद हा स्वभाव नसता तर अपत्य, पत्नी किंवा शमदमादि भाव त्याला प्रिय किंवा आनंददायी झाले नसते. अपत्यादींना हजारो चैतन्यशून्य अर्थात् जडाबद्दल आकर्षण वाटले नसते. चैतन्याची स्वतःमध्ये विश्रांती म्हणजे आनंद होय. ज्यावेळेला त्या चैतन्याला विश्रांतीविषयी औदासीन्य वाटते त्यावेळेला त्याला दाहच्छेदादि दुःखानुभव येतो. वास्तविक पाहता तशा प्रकारच्या परामर्शरहित स्थितीतही त्याच्या ठिकाणी स्व-विश्रांतीचा अभाव कधीही नसतो. त्यामुळे चैतन्याच्या बाबतीत सुखाच्या अनुभूतिव्यतिरिक्त कोणत्याही तऱ्हेचे दुःख संभवतच नाही. आत्मा आनंदात्मक असताना क्रोधादि मनोवृत्तींच्या वेळेला वाटेल ते प्रहारादि क्लेश अनुभविण्याची तयारी का असते? अशी जर शंका घेतली तर त्याचे उत्तर असे आहे की, पुत्रादिकांच्या मोहाधीनतेमुळे तसा व्यवहार होत असला तरी शेवटी आनंदाकरिताच तो व्यवहार आहे हे सिद्ध होते. दुःखनाश व सुखप्राप्ती हे आत्म्याचे स्वभाववैशिष्ट्य आहे. यासंबंधी "**श्रीमत्स्तोत्रावली**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**दुःखान्यपि सुखायन्ते।**" अर्थात् "दुःखेही सुखकरच वाटतात." अशा प्रकारे आत्म्याचा म्हणजेच "स्व"चा जो काम म्हणजेच इच्छा, औत्सुक्य, आशा व स्पृहा इत्यादि भाव आहेत ते त्याच्या ठिकाणी स्वभावत्वाने राहतात. त्याला प्रकट करणारा पुत्र, पत्नी इत्यादि वेद्य पदार्थांचा समूह आनंददायी होतो असा श्रुत्यर्थ सांगितला. "**तु**" शब्द "**एव**" या अर्थी आलेला आहे. "**कामाय**" म्हणजे इच्छेसाठी असा अर्थ होय. "**आत्मर्थे पृथिवीं त्यजेत्।**" अर्थात् "आत्मसुखासाठी पृथ्वीत्यागही अर्थात् जन्मभूमी किंवा देशत्यागही करावा," असे व्यतिरेकाने सांगितले.

प्रिय म्हणजे प्रीतीला विषय झालेले सर्व पदार्थ असून यात सर्व साधने आणि उपकरणे समाविष्ट होतात. त्याचप्रमाणे आत्मा मुक्त असो अथवा अमुक्त असो त्याच्यासारखा प्रिय अन्य पदार्थ नाही. त्याच्याकरिताच इतर पदार्थ प्रिय असतात. नैयायिकांच्या सिद्धान्ताप्रमाणे मुक्तीच्या अवस्थेतच पाषाणा-प्रमाणे असल्यामुळे आत्मा आनंदाशिवाय आहे असे नसून अमुक्तावस्थेतही त्याचा असा उदासीन स्वभाव आहे. मग मुक्त्यनुभवात तर बोलावयालाच नको अर्थात् मुक्तीची फारशी किंमत नाही. शिवाय तो आनंदरूप असल्याने बंध व मोक्षाची कल्पनाच जुळत नाही. आनंदात सत्त्वाची व चित्त्वाची समरसता आहे.

यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की -

यत्र चित्सत्तयोर्व्याप्तिस्तत्रानन्दो विराजते।
यत्रानन्दो भवेद्भावे तत्र चित्सत्तयोः स्थितिः।।

अर्थ :- जेथे सत् आणि चित् यांची व्याप्ती आहे तेथे आनंद आहे व जेथे आनंद आहे तेथे चित्त्वसत्त्वाची स्थिती आहे.

आमच्या आगमादि ग्रंथात प्रथमद्वितीयादि द्रव्यग्रहणाचा निर्बंध सांगितला आहे. या दृष्टीने **"आत्मनस्तु कामायः"** उपनिषत् प्रतिपादित अर्थ समजून घ्यावा.।।५५।।

*****

गाथा क्रमाङ्क ५६

अवतरणिका :- अशा प्रकारे सांगितलेल्या आत्मस्वरूपविमर्शाच्या (स्फुरत्तेच्या) स्पष्टीकरणार्थ अत्यंत स्पष्ट आणवादि तीनही उपाय या एकाच गाथेत सांगताना ग्रंथकार असे म्हणतात की -

जइ णिअहिअउल्लासं णिण्णेउं णिच्चणिक्कलं इच्छा।
मज्झतुडी खुडिअव्वा अत्थं एत्ताण सोमसुज्जाणं।।५६।।
(यदि निजहृदयोल्लासं निर्णेतुं नित्यनिष्कलमिच्छा।
मध्यतुटिस्त्रुटितव्याऽस्त्रं यतोः सोमसूर्ययोः।।)

अर्थ :- जर आपल्या हृदयाच्या (विकल्प व कल्पनांनी रहित) अशा नित्य आणि मायारहित निर्मल उल्लासाची (आपल्या श्रद्धेनुरूप) इच्छा होईल तर (हं-स) सोम व सूर्याच्या मध्याची त्रुटी विसर्जनीय अथवा छेदन करण्यायोग्य असेल.।।५६।।

विशेष :- "**ह**"कारातून श्वास बाहेर जातो आणि "**स**"कारातून आत

प्रवेश करीत असतो. हृदयामध्ये या "**ह**" आणि "**स**"च्या मध्यातली त्रुटी विसर्जित केल्यावर "**सोऽहं**" स्थितीमध्ये आत्मस्वरूपाच्या प्रकाशात नित्य अलख व निरंजन परमात्मतत्त्वाचा बोध होतो. इच्छित ज्ञेय कार्याचा स्वभाव म्हणजेच प्रमेयोल्लास (रूप) आहे, सोम म्हणजे चंद्र अर्थात् इडा नाडी आहे आणि इच्छा, ज्ञान व क्रियात्मक प्रमाणस्फुरण म्हणजेच सूर्य म्हणजे पिंगला नाडी आहे. त्याची आंतरिक त्रुटी किंवा संदेहात्मक दोषच संच्छेद्य अर्थात् छेदून टाकण्याला योग्य अथवा विसर्जनीय आहे. या गाथे-मध्ये सोम आणि सूर्य यांचे अर्थ "**ह**"कार आणि "**स**"कार हे वर्णविशेष होत. "**स**"कार व "**ह**"काराहून पलीकडे, शून्य, सच्चिदानंदस्वरूप व अलख निरंजन परमात्मतत्त्वात मनाचे उन्मन अर्थात् मन नाहीसे करून "**सोऽहं**" स्वरूपात प्रतिष्ठित झाले पाहिजे. "**तुटि**" चा अर्थ विभज्य अवस्था असा आहे. "**ह**"कार व "**स**"कार यांनी हंसस्वरूप विमर्श उत्पन्न होतो. "**हंस**" हा महामंत्र आहे. हीच अजपा गायत्री आहे. हंस मंत्रानेच "**सोऽहं**"ची स्वरूपसिद्धी होते. याचा आशय असा आहे की, अजपा "**सोऽहं**" मंत्रा-द्वारा कालाचे खंडन करून म्हणजेच परमात्म्याच्या स्वरूपाचे चिंतन केले पाहिजे. सोम अपान आहे आणि सूर्य प्राण आहे. या दोघांचे ऐक्य स्थापन करून मनाचे उन्मन झाल्यावर स्वरूपाचे अनुसंधान केले पाहिजे.

परिमलव्याख्यार्थ :- साक्षात्काराला योग्य असलेले असे पूर्ववर्णित स्वरूपाचे आपले हृदय आहे. त्याचा उल्लास म्हणजेच चेत्य व चेतयिता इत्यादि रूपाचे स्फुरण होय. तो उल्लास स्वभावतःच कालविभागरहित म्हणजेच निष्कल अर्थात् हेय व उपादेयादि सर्व विकल्पांनी रहित असतो. तो अत्यंत स्पष्ट व्हावा अशी जर श्रीमद्भगवद्गीतेतील "**श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः।**" अर्थात् "जो ज्या श्रद्धेने युक्त असतो तो जीव त्या श्रद्धेच्या अनुरूपच असतो," या नीतीनुसार तुम्हा ज्ञानीजनांची इच्छा अथवा श्रद्धा असल्यास हा पुढे सांगितलेला उपाय पाहा. सर्व वेद्य वस्तूंना अनुजीवन देणारे जे सोम म्हणजे चंद्र व सूर्य आहेत ते प्रमात्यांशी सम स्वभावाचे असल्यामुळे क्रमशः "**स**" कार व "**ह**" काररूपी वर्ण आहेत. यामध्ये हृदयसंपुट स्वरूप अनुस्वार द्यावा. रत्नावरील मालिन्य जसे दूर केले जाते तसे त्या अक्षरांना उलट करून "**ह**" व "**स**" करून अनुस्वार दिल्याने "**हंस**" असे रूप होते. पण मुळात "**अहं**" आणि "**स**" असलेला आत्म-ज्ञानोपयोगी म्हणून "**हंस**" असा महामंत्र होतो.

हा मंत्र सर्वलोकविश्रुत होऊ नये यासाठी "**श्रीलघुबृंहणी**" या ग्रंथात असे सांगितले आहे की -

बहिर्व्यवहरन् लोक्यान् स्थगयन्नूहगोचरान्।
चरन् कपटमार्गेण वामं नयामिवोन्नयेत्।।

अर्थ :- ज्याप्रमाणे लोकव्यवहारातील काही गोपनीय विषय कापट्याने गुप्त ठेवले जातात त्याप्रमाणेच हा "**सोऽहं**" मंत्रराज असून (तो अत्यंत गुप्त ठेवणेच योग्य आहे.)

हा मंत्रराज मंत्र वर्णविशेषाने तयार झालेला अतिशय रहस्यरूप आहे. हा आणवोपाय आहे.

यासंबंधी "**श्रीमालिनीविजयोत्तरतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

उच्चारकरणध्यानवर्णस्थानप्रकल्पनैः।
यो भवेत् स समावेशः सम्यगाणव उच्यते।।

अर्थ :- उच्चार, करण, ध्यान, वर्ण व स्थान या गोष्टींमुळे जो समावेश अर्थात् स्फुरण होते त्याला आणव (उपाय) असे म्हणतात.

अशाच प्रकारे उच्चारांमध्येही समजावे. त्यापैकी प्राणव्यापाररूप उच्चाराचे स्वरूप सांगतात.

कुम्भिता रेचिता वापि पुरिता वा यदा भवेत्।
तदन्ते शान्तनामासौ शान्त्या शान्तः प्रकाशते।।

अर्थ :- ज्यावेळेला प्राणगती कुंभित, रेचित किंवा पूरित होते म्हणजे कुंभक, रेचक व पूरक हे तीन प्राणायाम होतात त्यावेळेला शांत नावाची शांती लाभते व शांतवृत्ती प्रकाशित होते.

काय म्हणजे शरीरस्थापनरूप करणा म्हणजे साधना या विषयी असे सांगितले आहे की -

अम्ब! केचिदमृताम्बुचिन्मयीलम्बिकाङ्कुरशिखावलम्बिनीम्।
तालुमूलवलयीकृताग्रया जिह्वया कवलयन्ति ते कलाम्।।

अर्थ :- हे अंबे! काही योगी चिन्मय अमृताने भरलेल्या, किंचित् लोंबणाऱ्या व तालुमूलात वर्तुळरूप झालेल्या जिह्वेने तुझ्या कलेचा ग्रास अर्थात् घास करतात.

आता चित्तस्वभावविशेष ध्यानाचे विवेचन पाहा.

अनुकलममृतार्द्रादालवालान्तराला-
ल्ललितमुदयमाना पल्लवापाटलश्रीः।

अशिथिलमवलम्ब्य स्थाणुमुद्भासभाना
फलति कमपि भावं कोमला कापि वल्ली।।

अर्थ :- अमृतरूप जलाने ओलसर झालेल्या आळ्यातून हळूच नाजुक तऱ्हेने उगविलेली, अरुणवर्णीय पल्लवकांतीला धारण करणारी, स्थाणूच्या अगर काठीच्या किंवा खांबाच्या किंवा श्रीशिवांच्या आधाराने फोफावणारी व सुंदर अशी कोणी एक लता म्हणजे शक्ती नावाची वल्ली भावरूप पुष्पाला प्रसविते.

त्यानंतर स्थानाविषयी असे सांगतात की -

योनौ कनकपुञ्जाभं हृदि विद्युच्छटोज्ज्वलम्।
आज्ञायां चन्द्रसङ्काशं महस्तव महेश्वरि!।।

अर्थ :- हे महेश्वरी! योनीत म्हणजे मूलस्थानात सुवर्णाप्रमाणे प्रकाशमान, हृदयात विजेप्रमाणे उज्ज्वल व आज्ञाचक्रात चंद्राप्रमाणे सौम्यशीतल असे तुझे तेज आहे.

या वर्णनांमध्ये जरी थोडे सांकर्य वाटले तरी त्यातील प्राधान्य पाहून ध्यानादि आणवविचार पाहावा.

सोम अर्थात् चंद्र म्हणजे सर्व इच्छित ज्ञेय वस्तूंचा किंवा प्रमेयांचा प्रपंच होय. सूर्य म्हणजे इच्छा, ज्ञान व क्रियात्मक प्रमाणांचे स्फुरण होय. या दोघांची आपआपली क्रिया करण्याची जी शक्ती आहे ती माझी म्हणजे स्वात्म्याचीच शक्ती असावी असा संशय काढून किंवा तोडून टाकावा व स्वात्मशक्तीच आहे अशी दृढ भावना करावी. शोधकस्वरूप आत्म्याच्या इच्छादि शक्तींच्या (आदि शब्दाने ज्ञान व क्रिया यांचाही उल्लेख होतो) प्रवृत्तीवाचून संशोध्य स्थूल अशा प्रपंचाचा उल्लास किंवा स्फुरण कसे होईल? अशा विचाराने आत्म्याचा अपरोक्ष साक्षात्कार होतो. हा शाक्तोपाय म्हणजे आत्मशक्तीमुळे होणारा उपाय आहे; कारण यात वर्णादि उच्चार नसून स्वसंवित्‌ची कल्पना आहे.

यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की -

उच्चाररहितं वस्तु चेतसैव विचिन्तयन्।
यं समावेशमाप्नोति शाक्तः सोऽत्राभिधीयते।।

अर्थ :- उच्चाररहित वस्तूचा चित्तानेच विचार करून ज्या समावेशाला (साधकभक्तयोगिशिष्य) प्राप्त होतो त्याला "शाक्तसमावेश" असे म्हणतात.

आता शांभव उपाय सांगतात. सोम म्हणजे चंद्र हा अपान व सूर्य हा

प्राणवायू आहे. त्या दोघांची स्व-स्व स्थानांपासून हृदयापर्यंत बारा-बारा अंगुले गमनागमनाची अर्थात् येण्याजाण्याची गती चालू असते. ही स्वतः होणारी सोम व सूर्याची स्फुरणरूप क्रिया आत-बाहेररूपाने प्रतीत होणारी हृदयापर्यंत असलेली व हृदयस्थ आत्म्याचा परामर्श अर्थात् ज्ञान घडविणारी क्रियारूपिणी आहे असा निर्णय करावा. जरी ही क्रिया प्रत्येक शरीरात सामान्य रूपाने घडणारी असली तरी आत्म्याशी अनुसंधित आहे, असा विचार केल्याने चित्तस्थैर्य व हृदयानंदरूप चमत्कार साधतो. हा शांभव उपाय आहे. या उपायात वर्णोच्चार म्हणजे आणवोपाय नाही, इच्छादि शक्ति-विचार म्हणजे शाक्तोपाय नाही; तर केवळ "स्व" अर्थात् आत्मस्वभाव कथन आहे.

यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की -

अकिञ्चिच्चिन्तकस्यैव गुरुणा प्रतिबोधितः ।
उत्पद्यते य आवेशः शाम्भवोऽसावुदाहृतः ।।

अर्थ :- कशाचेही चिंतन न करणारा; परंतु श्रीसद्गुरूंनी जागे केल्यामुळे उत्पन्न होणारा जो आवेश असतो तोच शांभव उपाय होय.

या तीन उपायांव्यतिरिक्त चौथा श्रीभैरवोपाय आहे. तो "**श्रीविज्ञानभट्टारक**" या ग्रंथात पुढीलप्रमाणे सांगितला आहे.

एवमेवं दुर्निशायां कृष्णपक्षागमे चिरम् ।
तैमिरं भावयेद् रूपं भैरवं रूपमेष्यति ।।

अर्थ :- कृष्ण पक्षातील अंधाऱ्या रात्रीत कृष्णवर्ण अशा तिमिराची अर्थात् अंधकाररूपाची भावना केल्यास श्रीभैरवरूपाची प्राप्ती होते.

दर्शअमावस्यादिनी चंद्र व सूर्य एकदम अस्तंगत होतात. ज्यावेळी ते अस्ताचलावर उतरतात त्या वेळचा काललेश बुद्धीने आकर्षित करावा. हा अर्थ अतिस्पष्ट असल्याने मुद्दाम सांगितला नाही. या विवरणात अस्त्र, आस्था, अर्थ, मध्य, त्रुटी व तुटी हे शब्द प्राकृत अर्थात् अर्धमागधी भाषेच्या प्रबल तंत्राने सांगितले आहेत. या आणवादि तीन उपायात सूक्ष्मदृष्ट्या संकर अर्थात् सरभेसळ आहेच; परंतु प्रत्येकातील प्राधान्य पाहावे. "**संवित्तिफल-भेदोऽत्र न प्रकल्प्यो मनीषिभिः ।**" अर्थात् "विद्वानांनी संवित्फलभेदाची कल्पना करू नये;" कारण संवित् अर्थात् ज्ञानफलात कोणतीही विषमता नाही. अधिकारीजनांच्या अपेक्षेने पृथक् पृथक् कथन आहे. त्या ठिकाणी असे म्हटले आहे की -

अभेदोपायमत्रोक्तं शाम्भवं शाक्तमुच्यते।
भेदाभेदात्मकोपायं भेदोपायं तदाणवम्।।
प्राणादिभूमिकैराद्याः सिध्यन्त्युच्चारणादिभिः।
विकल्पैर्मध्यमाः शुद्धैरन्याः प्रशमितैस्तु तैः।।

अर्थ :- शांभवोपाय अभेदात्मक, शाक्तोपाय भेदाभेदात्मक आणि आणवोपाय भेदात्मक आहे. उच्चारणादींनी आणवांना अर्थात् आणव साधकांना सिद्धिलाभ, विकल्पांनी शाक्तांना आणि वरील दोन्हींच्या त्यागाने शांभवीयांना सिद्धी अर्थात् ज्ञान मिळते.

या "**श्रीतंत्रालोकोपायद्विशती**" या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे प्राणादि-स्पंदोच्चारणादि अशुद्ध विकल्प असा आणव, चित्तामुळे शुद्ध विकल्परूप शाक्त व सर्वविकल्पविलयरूप शांभव, अशा त्रिविध उपायतत्त्वात स्थूल-सूक्ष्मादि तरतमतेने शक्त्युल्लेख आहे; परंतु शाक्तोपायात शक्त्याधिक्य आहे असे समजावे.

या दृष्टीने "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

सा शक्तिराणवैः शाक्तैः शाम्भवैश्च त्रिधोदितैः।
उपायैः शिवमाभास्य स्वसृष्टैर्मोचयत्यमून्।।

अर्थ :- आणव, शाक्त व शांभवादि तीनही उपायांनी ही शक्ती श्रीशिवांना दाखवून म्हणजे त्यांच्याशी समरस करून जीवांना मुक्त करते.।।५६।।

*****

गाथा क्रमाङ्क ५७

अवतरणिका :- अशा रीतीने एकदम तीन उपाय सांगून शिष्याच्या चित्तात हे चांगल्या प्रकाराने रुजविण्यासाठी प्रत्येक उपाय वेगळा-वेगळा विवरण करण्याच्या इच्छेने आधी आणवोपायावर प्रकाश टाकताना ग्रंथकार असे म्हणतात की -

थोरअरेसुं वि पेक्खह भूदेसुं खस्स णिक्कलावत्थं।
छत्तिंसिआइलङ्घी कीरिसओ होउ सोमणाहो सो।।५७।।
(स्थूलतरेष्वपि प्रेक्षध्वं भूतेषु खस्य निष्कलावस्थाम्।
षट्त्रिंशिकाऽतिलङ्घी कीदृशो भवतु सोमनाथः सः।।)

अर्थ :- स्थूलतर भूतांमध्ये अर्थात् विश्वप्रपंच उत्पन्न होण्याला कारणीभूत होणाऱ्या प्राकृतिक तत्त्वांमध्ये निष्कल अवस्थेचे अर्थात् शुद्ध म्हणजे सूक्ष्म व निर्मल चैतन्यस्वरूपाचे परीक्षण असे केले पाहिजे की, समस्त छत्तीस

तत्त्वांच्या पलीकडे किंवा अतीत सोमनाथपरमेश्वर श्रीशिवांचे अलखनिरंजन परमात्मतत्त्व कशाप्रकारे निष्कल आहे ?

विशेष :- समस्त व्याख्यायित तत्त्वांच्या मध्ये श्रीपरमशिवच प्रतिपाद्य तत्त्व आहेत. अन्य प्रकृती व पुरुष आदि स्थूल आहेत. पृथ्वी इत्यादि सूक्ष्म आकाशाची निष्कल व शून्यस्वरूप अवस्था आलोच्य अथवा निरीक्षणीय आहे. स्थूलाहून स्थूल अशा निष्कल अवस्थेत छत्तीस तत्त्वांना आक्रमित करून अथवा ओलांडून परमेश्वर स्थित आहे हे विचारणीय आहे. परमेश्वराच्या स्वरूपाच्या अनुसंधानाचा क्रम असा आहे की, स्थूल तत्त्वाचा त्याग करून सूक्ष्माचे वरण केले पाहिजे. त्याच्यानंतर सूक्ष्माचा त्याग करून मनोलयाच्या म्हणजेच मनाच्या उन्मनीकरणाच्या स्थितीत चिदानंदात्म्याच्या पायावर परमात्मा श्रीपरमशिवांचे चिंतन केले पाहिजे. सूक्ष्माचा विकास स्थूल आहे आणि स्थूलाचे मुकुलन अर्थात् संकोच हेच सूक्ष्म आहे.

सूक्ष्माभिमत परमेश्वराचे स्फुरणच समस्त स्थूल वेद्यविलास अर्थात् विश्ववैचित्र्यविकल्प आहे. या विश्ववैचित्र्याच्या पलीकडे निष्कल परमेश्वराचे स्वरूप अनुसंधान करण्याला योग्य आहे.

परिमलव्याख्यार्थ :- आतापर्यंत सांगितलेल्या सर्व तत्त्वांमध्ये श्रीपरमशिव हे परतत्त्व आहेत; कारण सर्व उपायांनी त्यांचेच प्रतिपादन केले आहे. इतर तत्त्वात श्रीशिवादिक सूक्ष्म आहेत. प्रकृतिपुरुषादिक स्थूल व पृथ्व्यादि तत्त्वे स्थूलतर व त्या तत्त्वांचे कार्य स्तंभ व घटादिक स्थूलतम म्हणावेत. त्या स्थूलतम तत्त्वांमध्ये पृथ्व्यादिकांच्या मानाने आकाशाची निष्कल अवस्था, निरुपाधिक व किती सूक्ष्म आहे याचा विचार करा. या अवस्थेमुळे आकाश हे खेचरी सिद्धींचे आश्रय व साधन ठरते किंवा ठरले. **"प्रेक्षध्वम्"** या शब्दाने ग्रंथकार असे सुचवितात की, आस्तिक व नास्तिक किंवा अविवाद्य व विवाद्य अशा कोणत्याही दार्शनिकांनी आपआपल्या पांडित्याचा कस लावून पाहावे. अशा रीतीने अतिस्थूलही निरंश व निष्कल असू शकते; मग सर्वतत्त्वांपलीकडील परमेश्वर कसा असेल? त्याच्या निष्कलत्वाचा उत्कर्ष किंवा अंतिम बिंदू कसा व किती असेल याचा विचार करा. हे दंडापूपन्याय-दृष्ट्या परीक्षून पाहावे. हा आणवासाठी ध्यानरूप उपाय आहे. नंतर स्थूल-ध्यानत्यागपूर्वक सूक्ष्मदृष्टिपुरःसर ध्यान करीत राहिल्यास स्वात्मविमर्शरूप अमृतस्वादप्रद शाक्तोपायही सांगितला गेलाच आहे.

यासंबंधी **"श्रीउपायविंशतितंत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

स्थूलं स्थूलं परित्यज्य सूक्ष्मं सूक्ष्मं समाश्रयेत्।
पश्चात् सूक्ष्ममपि त्यक्त्वा केवलं चिन्मयो भवेत्।।

अर्थ :- स्थूल-स्थूल तत्त्वांचा त्याग करून सूक्ष्म-सूक्ष्म तत्त्वांचा आश्रय घ्यावा. त्यानंतर त्या सूक्ष्माचाही त्याग करून केवळ चिन्मय व्हावे.

त्याचप्रमाणे "**श्रीविज्ञानभट्टारक**" या ग्रंथातही असे म्हटले आहे की -

भुवनाध्वादिरूपेण चिन्तयेत् क्रमशोऽखिलम्।
स्थूलसूक्ष्मपरस्थित्या यावदन्ते मनोलयः।।

अर्थ :- भुवन व अध्वादि म्हणजे मार्गादि रूपाने सर्वांचे क्रमशः चिंतन करावे. स्थूल व सूक्ष्माचे चिंतन करता करता मनोलय साधला पाहिजे.

हे उपलक्षण आहे. सर्व तत्त्वांचे निष्कलत्व पाहता पाहता म्हणजे चिंतन करीत करीत शेवटी परमेश्वरस्वरूप निःसंशय कळेल असे अनुसंधान करावे.

या दृष्टीने "**श्रीपरास्तोत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

पृथ्वी पूर्वमितो वनं तरुरतस्तत्रापि शाखा ततः
पत्रं तत्र च पुष्पमत्र च फलं माधुर्यमस्मादिति।
एकस्मादपि तारतम्यपदवीमुत्कर्षणीं पश्यतो।
विश्वस्मादपि कापि सिध्यति परे! त्वामेव तां ब्रूमहे।।

अर्थ :- ज्याप्रमाणे आधी पृथ्वी, नंतर वन, त्यात वृक्ष, त्याची शाखा, तिला पाने, नंतर फूल, नंतर फळ व त्यात माधुर्य हे जसे तारतम्य आहे आणि ते दिसतेही त्याप्रमाणेच विश्वातही हे देवी! तुझ्या निष्कलरूपापर्यंत तसा तरतमभाव येईल; मात्र अंतिम निष्कलतत्त्व आम्ही तुलाच म्हणतो.

याच अभिप्रायाने "**श्रीईश्वरसिद्धिविमर्शिनी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

"**गृहपतिरिव कुटुम्बवर्गे, नरपतिरिव गृहपतिवर्गे, चक्रवर्तीव राजवर्गे, लोकपाल इव चक्रवर्तिवर्गे, ब्रह्मादिरिव लोकपालवर्गे, ब्रह्मादिवर्गेऽप्यधिष्ठाता।**"

अर्थ :- कुटुंबवर्गात कुटुंबप्रमुख, त्यात राजा, राजवर्गात चक्रवर्ती, चक्रवर्ती मंडळात लोकपाल, लोकपालात ब्रह्मादिक व ब्रह्मादिकातही अधिष्ठाता (असा क्रम असतो.) आणि "**सूक्ष्मस्यैव विकासः स्थौल्यं स्थूलस्य मुकुलनं सौक्ष्म्यम्।**" अर्थात् "अशा प्रकारे सूक्ष्माचा विकास स्थूल व स्थूलाचा

संकोच म्हणजे सूक्ष्म होय."

यानुसार हा स्थूल विश्वविलास म्हणजे या ज्ञानस्वभावी अशा परमसूक्ष्म परमेश्वराचा स्फुरणप्रकारच होय आणि विश्वाचे पिंडासहित असे निकृष्ट शरीर तो परमेश्वर होय. या रीतीने शांभव उपायही यात अंतर्भूत होतो असे सांगितले.

"**श्रीस्वच्छंदतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

तदेव भवति स्थूलं स्थूलोपाधिवशात् प्रिये।
स्थूलसूक्ष्मप्रभेदेन तदेकं संव्यवस्थितम्।।

अर्थ :- हे पार्वती! ते सूक्ष्म तत्त्व स्थूलाच्या उपाधीने स्थूल होते. अशा प्रकारे स्थूल व सूक्ष्मभेदाने ते तत्त्व अवस्थित आहे.

त्याचप्रमाणे आगमात यासंबंधी असे म्हटले आहे की -

जलं हिमं च यो वेद गुरुवक्त्रागमात् प्रिये।
नास्त्येव तस्य कर्तव्यं तस्यापश्चिमजन्मनः।।
एतेन —
आत्मानमत एवायं ज्ञेयीकुर्यात् पृथक्स्थितिः।
ज्ञेयं न तु तदौन्मुख्यात् खण्ड्येतास्य स्वतन्त्रता।।

अर्थ :- हे प्रिये! जो श्रीसद्गुरूंच्या मुखातून मिळालेल्या ज्ञानामुळे पाणी व बर्फ एकच मानतो त्याला पुढचा जन्मही असत नाही व चालू जन्मातही काही कर्तव्य उरत नाही.

यावरून -

हा परमेश्वर स्वतःलाच विश्वरूप देऊन ज्ञेय बनवितो किंवा होतो. ज्ञेय म्हणजे वेगळेपणा नव्हे तर एकविधत्व होय. त्यामुळे याची स्वतंत्रता खंडित होत नाही.

"**भवतु**" प्रश्नार्थी लोट् प्रत्यय होय. "**प्रेक्षध्वम्**" याचा अर्थ "विश्व-सर्गादिविषयी तुम्हीच विचार करा," असा आहे.

आता "**सोमनाथ**"चे विवरण असे आहे. उमा म्हणजे इच्छाशक्ती होय. "**इच्छाशक्तिरुमाकुमारी।**" अर्थात् "इच्छाशक्ती ही उमाकुमारीच," असे वचन आहे. तिच्यासह (सोमनाथ किंवा श्रीशिव) असतात. "**बहु स्यां प्रजायेय।**" अर्थात् "मी अनेक व्हावे," या वेदवचनानुरूप बाह्य विस्तार योग्यत्वामुळे "**सोम**" शब्दाने स्थूलत्व गृहित होते. "**श्रीपादुकोदय**" या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे "**नाथ**" पदाने सर्व विकल्पांचे उल्लंघन केलेले निष्कल

असे सूक्ष्मरूप" असा अर्थ घ्यावा. "**आनन्तर्यं यथेत्याहुस्तदस्यास्मादयं च न।**" अर्थात् "एकानंतर एक, स्थूलानंतर सूक्ष्म वा सूक्ष्मानंतर स्थूल असा अर्थ घेऊ नये." परमेश्वराचे स्थूलसूक्ष्मरूप एकदमच प्रकट होते. त्यामुळे त्याचे विश्वमयत्व व विश्वोत्तीर्णत्व हे उभय प्रकारचे रूपही सिद्ध होते. या दोन विशेषणांची जरी अन्योन्यविरुद्धता असली तरी त्या विरुद्धपणातही सामरस्याला जागा आहे. जरी हे आणवादि तीनही उपाय यापूर्वीच्या गाथेत नामतः व क्रियारूपाने सांगितले असले तरी या गाथेत व्यंजनारूपाने दोन्हीहून अर्थात् शाक्त व शांभव यांहून ते वेगळे आहेत. व्यंजना म्हणजे शब्दार्थापेक्षा तात्पर्य व लक्षणा यामुळे निघणारा वेगळा भाव होय. ज्याप्रमाणे आत्म्याचा म्हणजे जीवाचा शयन, आसन व भोजनाहून वेगळा असा स्वतंत्र व्यापार आहे (त्याप्रमाणेच विश्वाचा स्वतंत्र भाव आहे.) "**श्रीतत्त्वालोक**" या ग्रंथाच्या कर्त्याने "**श्रीकाव्यालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

प्रतीयमानं पुनरन्यदेव वस्त्वस्ति वाणीषु महाकवीनाम्।
यत् तत्प्रसिद्धावयवातिरिक्तमाभाति लावण्यमिवाङ्गनासु।।

अर्थ :- ज्याप्रमाणे स्त्रियांमध्ये नेत्रादि अवयवांच्या सौंदर्याव्यतिरिक्त लावण्य म्हणून वेगळा असा पदार्थ असतो त्याप्रमाणे महाकवींच्या वाणीतून अनुभवाला येणारी वस्तू व तत्त्व काही वेगळेच असले पाहिजे.

व्यंजनेचा विचार याहून अधिक करणे येथे अप्रस्तुत होईल म्हणून इतकेच पुरेसे आहे.।।५७।।

*****

गाथा क्रमाङ्क ५८

अवतरणिका :- आता या गाथेत ग्रंथकार शाक्तोपायाचा आविष्कार करतात.

जे कुलकुम्भसुहासवपाणमहूसवसुहे पअट्टन्ति।
ते खु विअप्पङ्कुरए रसिआ उवदंसिउं पअब्भन्ति।।५८।।
(ये कुलकुम्भसुधासवपानमहोत्सवसुखे प्रवर्तन्ते।
ते खलु विकल्पाङ्कुरान् रसिका उपदंष्टुं प्रगल्भन्ते।।)

अर्थ :- जे साधक किंवा उपासक श्रीपरमशिवांच्या स्वरूपामृतकुंभाच्या रसास्वादनाच्या महोत्सवरूप आनंदामध्ये राहतात ते रसिकजन निःसंदेह जन्ममरणरूप विश्ववैचित्र्यविकल्प अर्थात् विश्वप्रपंचाच्या अंकुरांनाच नष्ट करण्यात समर्थ होतात.।।५८।।

विशेष :- परमात्मा **"रसो वै सः।"** अर्थात् "परमात्मा रसरूप आहे," या सिद्धान्ताच्या रूपात श्रुतींनी प्रतिपादिलेला आहे. कुल म्हणजे विश्वव्यापक शक्तिमान् श्रीशिव होत. श्रीसद्गुरूंच्या कृपाकटाक्षाने कृतार्थ साधक अर्थात् सिद्धयोगी लौकिक व अलौकिक स्वभावानंद माधुर्याचे आस्वादन करून जीवन्मुक्तीमध्ये सुप्रतिष्ठित होऊन जन्म व मरणाच्या बंधनाचा नाश करून स्वरूपविश्रांती प्राप्त करतात. त्यांचा पाशवभाव किंवा सांसारिक बंधन समाप्त होऊन जाते. त्यांचे पशुरूप नष्ट होते. ते सिद्धयोगी श्रीशिवस्वरूपात स्वानंदाने युक्त शरीरस्वरूप होऊन जातात.

परिमलव्याख्यार्थ :- श्रीसद्गुरूंच्या कृपाकटाक्षाने शुद्धचित्त झालेले भाग्यवान् महापुरुष हे कुल म्हणजे षडध्वात्मक विश्वरूप कुंभ असून ते कुंभातील आत्मानंदाला स्वतःत सामावून घेणारे आधार विशेष आहेत. ते महापुरुष त्यातील आसव म्हणजेच लौकिक व अलौकिक माधुर्याचे समरसत्व असलेल्या व श्रीभैरवांना प्रिय असणाऱ्या या द्रव्यरूप अमृताचा निःशंकपणे स्वीकार करतात. या आसवात आत्मरूपाचे संपूर्ण ऐश्वर्य भरलेले आहे अशा विचाराने त्याचे पान करतात. हा पानविधी म्हणजे आत्मानंदाचा यज्ञस्वरूपी मोठा उत्सवच होय. या उत्सवात वेद्यवेदकादि स्वरूपाचा विकल्प नाहीसा होतो. त्यामुळेच ते सिद्धयोगी पशूशी संबंधित विविध शैवादि कल्पनांनी युक्त भेदज्ञानरूप विलासांना चटण्याकोशिंबिरीप्रमाणे तोंडी लावतात व अत्यंत विश्रांतीचा अनुभव घेतात.

या संबंधी **"श्रीमत्स्तोत्रावली"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

अपीत्वाऽपि भवद्भक्तिसुधामनवलोक्य च।
त्वामीश! त्वत्समाचारमात्रात् सिध्यन्ति जन्तवः।।

अर्थ :- हे ईश्वरा! तुझ्या भक्तिसुधेचे पान न करताही व तुझे दर्शन न घेताही तुझ्या चिंतनानेच प्राणिमात्र सिद्ध होतात.

श्रीसद्गुरुकृपालब्ध महापुरुष पुनरावृत्तिरहित होतात, त्यांना **"रसो वै सः।"** अर्थात् "परमात्मा हा रसरूपच आहे," या श्रुतिवचनानुसार ब्रह्माचा अनुभव येतो. या रसामुळे अर्थात् ब्रह्मामुळे श्रृंगारादिरसांना **"रस"** ही संज्ञा प्राप्त झाली आहे. याच तात्पर्याने **"स वा एष पुरुषोऽन्नरसमयः।"** अर्थात् "तोच अन्नरसाने युक्त पुरुष होय," ही श्रुती प्रकट झाली. नाहीतर **"रस"** या शब्दाचा प्रयोग निरर्थक होईल. सुधा व आसव या दोन शब्दांनी दाखविलेला पाशव अर्थात् पशू व शैव म्हणजे श्रीशिवसंबंधी असा स्वभावभेद, विधी व

निषेध असा प्रयोजक भेद, लौकिक व अलौकिक असे व्यवहारतारतम्य, गोप्य व अगोप्य असे भावविभजन, श्रद्धा व घृणा अर्थात् कंटाळा असा अवस्थाविशेष, ऐहिक व पारलौकिक असा फलभेद आणि "देवाः" व "असुराः" अशी देवाताव्यवस्था हे लोकव्यवहारातील सर्व विरोध वरील सुधापान करण्याने धन्यतम झालेल्या महापुरुषांना कसलाच बट्टा अर्थात् दोष लावू शकत नाहीत; कारण तेथे ब्राह्मणचांडालादि भेददृष्टीच नाही.

या दृष्टीनेच शास्त्रात असे म्हटले आहे की -

घृणा शङ्का भयं लज्जा जुगुप्सा चेति पञ्चमी।
कुलं जातिश्च शीलं चेत्यष्टौ पाशाः प्रकीर्तिताः।।

अर्थ :- घृणा, शंका, भय, लज्जा, निंदा, कुल, जाती व शील हे आठ पाश होत.

जरी वर्णाश्रमादिव्यवस्थेनुसार यांचा उल्लेख करून ते आचार व नियम म्हणून ग्राह्यत्याज्यादिदृष्ट्या सांगितले असले तरी स्वहृदयसंवादरूप आत्मज्ञान झालेल्यांचे हे आठ पाश स्वतःच आपोआप नाहीसे होतात. याबाबतीत जे सौत्रामणियागादि कथनाने (आसवपानाला) प्रामाण्य आणू पाहतात ते मोडक्या ब्राह्मण्याची तरफदारी करू इच्छितात. आम्ही सर्व संशयमय पर्वतशिखरांना ओलांडून पलीकडे जाणारे आहोत.

या दृष्टीने **"श्रीसंविदुल्लासतंत्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

धन्याः केचिद्धनमिव विभोरागमैर्गोप्यमानां
वाकुर्वाणां जगदपरथा वीरविक्रान्तिविद्याम्।
माधुर्यस्य प्रथमपदवीं मङ्गलानां प्रतिष्ठां
मान्त्रीं शक्तिं मनसि महती देवतेत्याद्रियन्ते।।

अर्थ :- (जे साधकभक्तयोगिशिष्य) मांत्री अर्थात् मंत्ररूपिणी शक्तीला स्वहृदयात मोठी देवता म्हणून स्थान देऊन आदर करतात ते धन्य होत; कारण ही शक्ती आगमातून गुप्तधनाप्रमाणे जोपासिली किंवा संरक्षिली गेली आहे. ती जगाचे विकाररूपाने परिवर्तन घडविणारी आहे, वीरांची पराक्रम-रूपिणी विद्या आहे, मधुरतेची मूस आहे व मांगल्याची प्रतिष्ठा आहे.

आम्ही या शक्तीचे उपासक आहोत. आम्हाला या शक्तीविषयी अप्रामाण्याची शंकाच येणार नाही; मग प्रामाण्य प्रसाधनाचा प्रसंग तरी कसा येणार? श्रीशिवधर्मादि ग्रंथात या अलौकिक अर्थाला उद्देशून असे म्हटले आहे की -

आगमत्वेऽपि सामान्ये कः प्रद्वेषः शिवागमे।

अनायासेन यत्रोक्ता मुक्तिरेकेन जन्मना।।

अर्थ :- हे श्रीशिवागम अर्थात् श्रीशिवशास्त्र जरी सामान्य आगमरूप असले तरी याचा द्वेष किंवा तिरस्कार का करावा? कारण या मार्गात एकाच जन्मात अनायासाने मुक्तीचा लाभ होतो.

हा प्रस्ताव किंवा विचार आम्ही "**अग्घं वेज्जविलासो**" **क्रमांक ४५,** "**पुण्णाहन्ताण मुहे**" **क्रमांक ४६, (अर्घ्यं वेद्यविलासः० व** "**पुर्णाहन्ताया मुखे**"**)** या गाथांमधून विस्ताराने सांगितला आहे. या एकाच उपायामध्ये शाक्त व शांभव या दोहोंचा अंतर्भाव आहे. स्वीकृत विलासात्मकतेने अर्थात् सर्व ज्ञेय पदार्थांच्या विस्ताराने युक्त असे तत्त्व स्थापन केल्याने "**शक्तयोऽस्य जगत्सर्वम्।**" अर्थात् "हे सर्व जग म्हणजे (श्रीशिवांच्या) शक्ती आहेत," या नियमानुसार हे श्रीशिव सर्व शक्तींशी समरस झालेले असतात. त्यामुळे ते अन्य समयाचारांपासून त्याच्यामागोमाग असणाऱ्या आचारांचे आस्वादन करीत असतात. त्याचप्रमाणे ते स्फुरणरूप शक्तीच्या स्वभावाने युक्त असे अनुभवाला येत असल्याने त्यांना शाक्त असे म्हणतात. त्याचप्रमाणे पूजादि द्रव्यांमुळे स्वरूपोत्पन्न आह्लादाचा विशेष अनुभव येत असल्यामुळे त्यांना "शांभव" असेही म्हणतात; कारण "**पामरवृत्तिः प्रमाणम्।**" या "**श्रीराज-भैरव**" ग्रंथातील सूत्रानुसार पाहिल्यास हा शांभवोपाय "प्राणिमात्रांचा सहज-प्रवृत्तिविषय" आहे.

त्यामुळे "**श्रीविज्ञानोद्योत**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

जग्धिपानरसोल्लासरसानन्दविजृम्भणात्।
भावयेद् भरितास्थां महानन्दमयो भवेत्।।

अर्थ :- अन्नपानादि विविध रसांच्या सेवनामुळे होणाऱ्या आनंदावरून आत्मानंदाची भावना व कल्पना करावी आणि महानंदमय बनावे.

हे शांभववैभव श्रीक्षेमराजांनी "**श्रीविज्ञानभट्टारक**" या ग्रंथात वर्णिले आहे. रसविषयाप्रमाणेच शब्दादि चार विषयांच्या सुखास्वादाच्या बाबतीतही समजावे.

या दृष्टीने "**श्रीविषयपंचिका**" या ग्रंथात यासंबंधी असे वर्णन केले आहे की -

मधुरसरसवीणावेणुगीतादिवाद्य-
श्रवणजनितहर्षः शब्दमात्रैकशेषः।
तदनु भवविरामप्रस्फुरद्बोधमूर्ति-

र्भवविभवविमुक्तो मुक्तिमाप्नोति सम्यक्।।

अर्थ :- नानाविध वाद्यांच्या सुस्वर संगीताने होणाऱ्या आनंदात केवळ शब्द अर्थात् ध्वनीच शिल्लक राहतो. त्यानुसार (जीव) हा संसारविरामाने स्फुरलेल्या ज्ञानाने संसारातून मुक्त होतो व मुक्तीचा अधिकारी होतो.

त्याचप्रमाणे माझ्या "**श्रीसंविदुल्लास**" या ग्रंथात वरीलप्रमाणेच असे वर्णन आले आहे की -

पुष्पोपहारघनचन्दनवंशताल
नृत्तप्रयोगमधुमुग्धवधूप्रधानाः।
भावाः सहस्रमपि जाग्रतु तत्तदन्तः-
प्रह्लादिनी विजयते परचित्कलैका।।

अर्थ :- जरी पुष्प, नैवेद्य, चंदन, वेणू, मृदंग, नृत्य, मद्य व सुंदर स्त्री प्रभृति हजारो भाव अंतःकरणात गर्दी करीत असले तरी त्यातूनही परचैतन्याची चित्कला आनंदाची उधळण करताना शोभते.

यातील शाक्त व शांभवादि विभाग ग्रंथगत प्रकरणावरून कळून घ्यावेत.

या दृष्टीने "**श्रीविज्ञानोद्योत**" या ग्रंथात केलेल्या प्रियजनाच्या उपभोगरूप एकाच विषयाच्या वर्णनावरून हे पुढील प्रमाणे कळून येईल.

शक्तिसङ्गमसंक्षुब्धशक्त्यावेशावसानिकम्।
यत् सुखं ब्रह्मतत्त्वस्य तत् सुखं स्वाक्यमुच्यते।।
इत्यत्राणवत्वम्,
लेहनामन्थनाकोटैः स्त्रीसुखस्य भरात् स्मृतेः।
शक्त्यभावेऽपि देवेशि! भवेदानन्दसम्प्लवः।।
इत्यत्र शाक्तत्वम्–
आनन्दे महति प्राप्ते दृष्टे वा बान्धवे चिरात्।
आनन्दमुद्गतं ध्यात्वा तल्लक्ष्यस्तन्मयो भवेत्।।
इत्यत्र शाम्भवत्वं –

अर्थ :- शक्तिसंगमाने क्षुब्ध व शक्त्यावेशात पर्यवसान पावलेले ब्रह्मतत्त्वाचे जे सुख ते विषयसुखाशी एकरूप म्हटले जाते.

हा आणव दृष्टान्त सांगितला आहे.

आलिंगनादिजन्य स्त्रीसुखाच्या स्मरणाने हे देवेशी! जो आनंद होतो तो तुझ्याही स्मरणाने होतोच.

हा शाक्त दृष्टान्त सांगितला आहे.

फार दिवसांनी भेटलेल्या प्रियबांधवाच्या दर्शनाने जो महदानंद होतो त्या आनंदाचे ध्यान करून तन्मय व्हावे.

हा शांभव उपाय सांगितला आहे.।।५८।।

*****

गाथा क्रमाङ्क ५९

अवतरणिका :- या नंतर शांभवोपायाचे सविस्तर वर्णन करताना ग्रंथकार असे म्हणतात की -

हन्त मुहं पडिबिम्बउ पडिबिम्बेउ तह तं पि अद्दाओ।
अद्दाओ उण जस्सिं पडिबिम्बइ सो वि णाअव्वो।।५९।।
(हन्त मुखं प्रतिबिम्बतु प्रतिबिम्बयतु तथा तदपि दर्पणः।
दर्पणः पुनर्यस्मिन् प्रतिबिम्बति सोऽपि ज्ञातव्यः।।)

अर्थ :- आश्चर्याने किंवा सखेदाने असे म्हणावे लागत आहे की, जरी मुख आरशात प्रतिबिंबित होते आणि आरसा त्याला प्रतिबिंबित करतो हे योग्य असले तरीही ज्या वस्तूमध्ये आरसा प्रतिबिंबित होतो अथवा ज्या वस्तूत आरशाचे प्रतिबिंब पडते तेही जाणण्याला योग्य अर्थात् ज्ञातव्य असते.।।५९।।

विशेष :- स्वच्छ व निर्मळ आरशात मुख प्रतिबिंबित होत असते. हे मुख प्रतिबिंबमात्र आहे. हा प्रतिबिंबनाचा अनुभव स्थूल दृष्टीने आहे. हे केवळ नाममात्रानेच मुखाच्या रूपात प्रतिबिंबित होत असते. हा आरसा स्वच्छतेमुळे मुख इत्यादि प्रतिबिंबिस्थलरूपात अनुभूत होतो. तोच आरसा ज्या अत्यंत स्वच्छ म्हणजेच मायारहित निर्मल आत्म्यात त्याच रूपात प्रतिबिंबित होतो आणि ज्याच्यात हे संपूर्ण रूपाने प्रतिबिंबित होते ते तत्त्व जाणण्यायोग्य आहे. परमेश्वरामध्ये विश्ववैचित्र्यविलास प्रतिबिंबित होऊन त्याच्यातच तो अभिव्यक्त होतो. एक ब्रह्म परमात्मा श्रीशिवच सर्वात्मा असून तेच सर्वांमध्ये व्याप्त आहेत. ज्या प्रकारे मुख दर्पणात नसते तर त्याच्यामध्ये मुखाचे केवळ प्रतिबिंब असते त्याचप्रमाणे हे विश्व परमात्म्यात प्रतिबिंबित झालेले असते. परमात्मा तर स्वतः स्वप्रकाशरूपात विभासित असतो. तो आपल्याच प्रकाशरूपात भासणारे विश्वरूप असतो. तो परमात्माच ज्ञेय म्हणजे जाणण्याला योग्य आहे.

परिमलव्याख्यार्थ :- व्यवहारात दर्पणादि स्वच्छ पदार्थांमध्ये पुढे असलेल्या मुखादि पदार्थांचे प्रतिबिंबरूपाने परिस्फुरण होते हे सर्वप्रसिद्धच आहे. त्यांपैकी

दर्पणादींचे वास्तविक स्वरूप याच गाथेत नंतर सांगितले जाईल. स्थूलदृष्टीने विचार केल्यास मुखरूपी पदार्थ प्रतिबिंबनक्रियेचा अनुभव घेतो. आदर्श म्हणजेच आरसा इत्यादि पदार्थ त्या प्रतिबिंबाचा आधार बनून त्या क्रियेचा प्रयोजक अर्थात् कर्ता होतो हे सिद्धच आहे. हा जो आरसा स्वच्छत्वामुळे मुखादींचे प्रतिबिंबस्थल म्हटले जाते तोच अर्थात् आरसाच अत्यंत निर्मल अशा आत्म्यात त्या रूपाने प्रतिबिंबित होतो. ज्यावर अशेष अर्थात् संपूर्ण प्रतिबिंबनाचा व्यवहार होतो तो आत्माही जाणला पाहिजे किंवा तो आत्माच ज्ञातव्य अर्थात् ज्ञान होण्याला योग्य म्हणजेच अवश्य जाणावयाला पाहिजे, असे शिष्यवर्गाला अभिमुख करण्यासाठी अनेक अर्थ समजावेत. "**प्रतिबिम्बतु-प्रतिबिम्बयतु**" या ठिकाणी "लोट्" प्रत्ययाने क्रियेचे ऐच्छिकत्व अर्थात् स्वच्छंदत्व दाखविले आहे. "**हन्त**" या पदाने "बिंब-प्रतिबिंबाचे ज्ञान नसावे," असे मत असलेल्या सिद्धांच्या बद्दल "अरेरे!" असा खेद व्यक्त करून त्यांच्या ज्ञानाची कीव केली आहे. आदर्श अर्थात् आननादींनी उपलक्षित केलेल्या स्तंभ-कुंभादि सर्व ज्ञेय पदार्थांचा समूह हा ज्याच्या मानाने अन्य पदार्थ अस्वच्छ भासतात अशा अत्यंत निर्मळ व स्वस्वभावाशी अभिन्न अशा परमेश्वररूप मोठ्या आरशात तन्मयरूप प्रतिबिंबत्वाने स्फुरण पावतो असा तात्पर्यार्थ आहे. रूपीपदार्थविषयक हे उपलक्षण आहे.

या दृष्टीने "**तंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

शब्दो नभसि चानन्दस्पर्शधामनि सुन्दरः।
स्पर्शोऽन्योऽपि दृढाघातशूलशीतादिकोद्भवः।।
परस्थः प्रतिबिम्बत्वात् स्वदेहोद्धूननाकरः।
एवं घ्राणान्तरे गन्धो रसो दन्तोदके स्फुटः।।

अर्थ :- आनंदरूप आकाशात सुंदर शब्दाचे प्रतिबिंब, आनंदरूप स्पर्शस्थानात आघात, शूल व शीतादिकांचा स्पर्श, घ्राणात गंधाचे व दंतोदकात रसाचे प्रतिबिंब पडते.

असे उपरोक्त ग्रंथात म्हटल्याप्रमाणे आकाशात प्रतिश्रावित शब्द, स्त्री अनुस्मृत्यादि आधार चक्रात, जवळच्या कठीण स्पर्शाच्या अनुसंधानामुळे सुकुमार शरीरात स्पर्श, इतरजण चिंचेचा आस्वाद घेत असताना आपल्या तोंडाला सुटणारे पाणी, चंदनादि धूप जळत असताना नाकात राहणारा गंध आणि दुसऱ्याच्या अनुभवानुरूप आपल्या अंतकर:णात स्फुरणाऱ्या हर्ष-शोकादि अवस्था या सार्वत्रिक व सर्वानुभूत प्रतिबिंबाचे ऐश्वर्य (महत्त्व)

आहेच. याचा सारांश असा आहे की, बाह्यदर्पणादिकांमध्ये बिंबाच्या अपेक्षेने प्रतिबिंबज्ञान व आत्मरूपात मात्र याच्या उलट म्हणजेच बिंबाभावी प्रतिबिंबज्ञान आहे; कारण सर्व विश्ववैचित्र्याचा प्रतिबिंबत्वाने अनुभव येतो.

या दृष्टीने "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

प्रतिबिम्बं च बिम्बेन बाह्यस्थेन समर्प्यते।
तस्यैव प्रतिबिम्बत्वे किं बिम्बमवशिष्यताम्।।

अर्थ :- बाह्य बिंबामुळे प्रतिबिंब पडते. जर बिंबच प्रतिबिंबाप्रमाणे अथवा प्रतिबिंबच झाले तर बिंब राहिलेच कोठे?

तसेच "**श्रीचिद्गगनचंद्रिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

वह्निवारिमुकुरादिषु स्फुटं स्वच्छवस्तुषु कुमारि बिम्बता।
मन्त्रिता सह परिच्छदेन यत् तेन बिम्बमनवेक्षितं तव।।

अर्थ :- अग्नी, पाणी व आरसा इत्यादि स्वच्छ निर्मल पदार्थात बिंब अर्थात् छाया पदार्थ इतरही वस्तूंसह निमंत्रिले गेले (आले); पण त्या पदार्थांनी तुझे बिंब पाहिलेच नाही. हे कुमारी देवी! हे आश्चर्यच नव्हे काय?

ही अलौकिक प्रतिबिंब प्रक्रिया शांभवोपायातच पर्यवसान पावते. यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की -

मत्त एवोदितमिदं मय्येव प्रतिबिम्बितम्।
मदभिन्नं जगच्चेति त्रिधोपायस्तु शाम्भवः।।

अर्थ :- हे सर्व माझ्यामुळे अथवा माझ्यापासूनच उत्पन्न झाले व माझ्यातच प्रतिबिंबिले आहे. हे जगत् माझ्याहून भिन्न किंवा वेगळे नाही असा हा त्रिविध शांभवोपाय आहे.

या दृष्टीनेच "**श्रीतंत्रवटधानिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

यथादर्शे घटादीनां स्थितिर्मिश्रेतरात्मिका।
चिदात्मनि तथाऽमीषां भावानां चित्ररूपिणी।।

अर्थ :- ज्याप्रमाणे घटादि वस्तूंचे आरशात वेगळे व मिश्र अस्तित्व असते त्याप्रमाणे माझ्यात सर्व वस्तूंचे चित्ररूपाने अस्तित्व आहे.

हेच परमेश्वराचे सर्वातिशायी स्वातंत्र्य असून स्वातंत्र्यामुळेच परमेश्वर सर्वविश्वाचे प्रतिबिंब स्वतःमध्ये साठवितो. विचारवंतांनी याची दखल घ्यावी. प्रकाशरूप परमेश्वरात या विश्वाचे प्रतिबिंब पडते. याशिवाय इतर प्रक्रिया आम्हाला तरी योग्य वाटत नाहीत. जर कोणी असे म्हणेल की "विवर्तवाद, परिणामवाद इत्यादि प्रक्रिया येथे लावून पाहा किंवा जुळवून पाहा," तर

त्याचे उत्तर असे आहे की, विवर्त म्हणजे भ्रांती होय किंवा एकावर दुसऱ्या पदार्थाचा आरोप करणे होय. विश्वाचा आत्म्यावर किंवा आत्म्याचा विश्वावर आरोप मानला पाहिजे. पहिल्या पक्षात ज्याप्रमाणे सर्पावर पाहिलेले सर्पत्व दोरीवर आरोपिले जाते तसे कोठे पाहिलेले विश्व आत्म्यावर लादणार? शिवाय हा सर्प नव्हे असा नंतर त्या मिथ्याज्ञानाचा बाध होतो तसा विश्वाचा बाध झालेला अनुभव येत नाही. युक्तीने बाध साधावा असे जर म्हणत असाल तर कोणती युक्ती लढविणार? तर्क किंवा प्रमाणाची युक्ती लढवावी लागेल. त्यापैकी तर्क जुळत नाही. प्रत्यक्षादि प्रमाणांच्या आधारावाचून तर्क म्हणजेच युक्त्यनुकूल अनुमान कसे व काय करणार? तर्क स्वतंत्रपणे काही साधू शकत नाही. (स्वयंपाक घरात धूर व अग्नी यांचे साहचर्य पाहून **"यत्र धूमस्तत्र वह्निः।"** अर्थात् "जेथे धूर तेथे अग्नी असतो," असा हा तर्क होय.) आता दुसरे म्हणजे प्रमाण होय. प्रत्यक्ष, शास्त्र किंवा अनुमान ही ती प्रमाणे होत. यांपैकी प्रत्यक्षप्रमाणदृष्ट्या पाहिल्यास विश्वाचा बाध कोणी चर्मचक्षूंनी पाहिला नाही. उलट विश्वाचा व्यवहार कार्य व फलादि रूपात निराबाध अव्याहतपणे चालू असल्याचाच अनुभव येतो. दुसरा उपाय म्हणजे आगम प्रमाण होय. शास्त्रात **"एकमेवाद्वितीयं ब्रह्म।"** अर्थात् "एकमात्र अद्वितीय ब्रह्मच आहे" व **"नेह नानास्ति किञ्चन।"** अर्थात् "अनेक असे काहीही नाही" अशी वचने आहेत. त्यांचा अर्थ असा आहे की, "आत्मरूप परमेश्वराशी अभिन्न अशा ब्रह्माला आकार मानणे उचित नाही," असा विचार करून पाहा. (आत्मवस्तूत) स्फुरणारा प्रपंच कसा असतो? आम्ही असे म्हणतो की, इदंतेने निश्चित केलेल्या ब्रह्मावर आकाशवाय्वादि सर्व प्रपंच नाना किंवा वेगळा होऊ शकत नाही. तो भेदयुक्त ज्ञानाला विषय होऊ शकत नाही. उलट आम्ही प्रतिपादिलेल्या स्वतंत्ररूप प्रतिबिंबदृष्टीने अभिन्न असे ब्रह्मरूप तेथे स्थापिले जाते. अन्यथा **"न इह सत्यमस्ति किञ्चन।"** अर्थात् "येथे यत्किंचितही सत् नाही," अशी श्रुती प्रसिद्ध झाली असती किंवा शून्यवाद आला असता. आता तिसरे प्रमाण म्हणजे अनुमान आहे. आगमाने **(नेहनाना०)** सांगितलेले खोटे आहे; कारण ते दिसणारे आहे. (जे दिसते ते नसते) उदाहरणार्थ शिंपल्यावर भासणारे रूपे होय. असे व अशा रीतीचे हेतू कालतः खंडित आहेत म्हणजेच याचे खंडन अगोदरच झालेले आहे. अशा रीतीने असिद्ध्यादि हेतूंचा विचार करावा. ग्रंथ वाढेल या भीतीने त्याचा येथे विस्तार करीत नाही. शिवाय ब्रह्मावर या प्रपंचाचा अध्यारोप कोणत्या

प्रमात्याने केला? जर हा अध्यारोप त्या ब्रह्माने केला असे म्हणाल तर अधिष्ठानच मिथ्या मानावे लागेल; कारण ते ब्रह्म अर्थात् प्रमाता म्हणजे आरोप करणारे आहे.

अंशतः ते ब्रह्म अधिष्ठान व आरोपक या दोन्ही भूमिका करते असे म्हणाल तर तसे होत नाही. तथापि तरीही त्यांचे भ्रांतिमत्व अंशतः अटळ आहे. मग जर "जीवात्मा अध्यारोपक व ब्रह्म अधिष्ठान आहे," असे मानले तर तसेही मानता येणार नाही; कारण जीव आणि ब्रह्म यात भेद मानणे कोणालाच संमत नाही. जर अंशतः भेद मानला तर आत्माश्रयदोष येतो. जर काल्पनिक भेद स्वतंत्र स्वीकारावा असे म्हणाल तर आम्ही त्यालाच विवर्त म्हणत आहोत. शिवाय कोणत्या सादृश्याने ब्रह्मावर प्रपंचाचा आरोप करणार?; कारण सादृश्याखेरीज आरोप होत नाही. (शिंपला व रूपे यात चकचकितपणा हे सादृश्य आणि दोरी व सर्प यांच्यात दीर्घत्व हे सादृश्य आहे.) सादृश्याभावी आरोप केल्यास अतिप्रसंग होईल. ब्रह्म व प्रपंच यात सत्य व असत्यादि विभागामुळे विसदृशत्वच प्रसिद्ध आहे. विश्वावर ब्रह्माचा आरोप करणे हे मर्यादातिक्रमण अगर हे उद्धटपणाचे किंवा दांडगाईचे आहे. ब्रह्माला मिथ्यात्व आणणारे आहे. या दोन कारणांमुळे हा पक्ष म्हणजे हे म्हणणे निरर्थक आहे असे समजावे. त्यामुळे विचित्र अशा प्रतिबिंबप्रक्रियेने (नुकतेच सांगितलेल्या रीतीने) विश्वाचा विवर्त मानणे यात काही अनौचित्य नाही. ज्याप्रमाणे "**श्रीक्रमकेली**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**तद्विवर्तः स्मृतो रश्मि-पुञ्जश्चक्रेशिपूर्वकः।**" अर्थात् "विवर्त म्हणजे चक्रेशीने युक्त असा किरणांचा समूह होय." आणि शास्त्रात इतरत्र असे म्हटले आहे की, "**विवर्तो विचित्रेण रूपेण वर्तनं न त्वविद्यावशात् अपि सु स्वातन्त्र्यतः।**" अर्थात् "विवर्त म्हणजे विचित्ररूपाने वर्तन म्हणजे असणे होय. ते वर्तन अविद्येमुळे नव्हे; तर स्वातंत्र्यामुळे असते." या वचनाने सत्त्व, असत्त्व व औदासीन्याने शोभणाऱ्या संवित्स्वातंत्र्यमय महासत्तेने विश्वव्यवहाराचे निर्वचन करता येते, व्यवस्था निश्चित लावता येते व अनिर्वचनीयत्वाचे निराकरणही होते.

परिणामवादाचेही असेच समजावे. परिणाम म्हणजे दुधाचे पहिले असणारे सर्व रूपगुण नाहीसे होऊन त्याला दह्याचे रूप येणे होय. याविषयी आम्ही असे विचारतो की, ब्रह्म विश्वरूपाने परिणत होते की, विश्व ब्रह्मरूपाने परिणाम पावते? पहिला पक्ष मानला तर ब्रह्माच्या रूपाचा नाश होईल. दुसरा पक्ष मानला तर विश्वाला सच्चिदानंदादि स्वभाव चिकटेल व ब्रह्मामुळे विश्वाचा

सर्व आकार बदलेल व परिणामवादाचा मागमूसही शिल्लक राहणार नाही. याच रीतीने वृक्षत्व व शिंशपात्व (एक वृक्षविशेष) असा लौकिक तादात्म्यपक्षही जुळत नाही. असे समजावे. "(तुमच्या) प्रतिबिंबवादातही मिथ्यात्व हे अपरिहार्यच आहे. (हे अपरिहार्यत्व प्रतिवादी सोदाहरण मांडतात.) दर्पणादि निर्मल द्रव्या-पासून नेत्रकिरण परावृत्त होऊन पुढील रूप ग्रहण करतात अशी प्रक्रिया असल्याने "आरशात पुरुष" असा अनुभव म्हणजे भ्रांतीच आहे; कारण नंतर "आरशात मनुष्य नाही," असा बाध होतोच," असे जर तुम्ही (प्रतिवादी) म्हणाल तर तसे नाही. आमची पारमेश्वरी प्रतिबिंबपद्धती अलौकिक असल्याने ती स्वतःला निर्दोषच म्हणविते; कारण तिच्यात बिंबाची अपेक्षा असत नाही. ती असती तर अन्वय व व्यतिरेकाने म्हणजे बिंब असताना प्रतिबिंब व नसताना प्रतिबिंब नाही अशा रीतीच्या मिथ्यात्व शंकेला जागा असली असती. शिवाय लौकिक दर्पणामध्येही मिथ्यात्वानुकूल बाध नाही; मग अलौकिक दर्पणात तो कसा असेल? असे आमचे म्हणणे आहे. दर्पणात पुरुष नाही असा बाधानुभव येतो असे जर म्हणाल तर तसे नाही. आरशात पुरुषाचा आरोपच असेल तर त्याचा बाध होईल. तसा तर अनुभव नाही; कारण आरशात केवळ छायाच दिसते, छायावान् पुरुष दिसत नाही. त्यामुळे बुद्धिमंतांचा "पुरुष आहे" असा अनुभव नसल्याने "बाधही नाही" असेच समजावे. प्रतिबिंबामुळे काही कार्य होत असेल तर त्याचे खोटेपण उचित नाही. आरशात पाहून दात चांगल्या प्रकाराने घासले जात आहेत, तिलक नीट लावला जात आहे इत्यादि गोष्टी कळतात. शुक्तिकेवरील म्हणजे शिंपल्यावरील चांदीने काही कार्य होत नाही (तरीपण दोन्हींच्या मिथ्यात्वात काहीही भेद नाही). जर लोकांना अनुभव येणाऱ्या सत्याच्या कक्षेबाहेरचा हा प्रतिबिंब प्रकार आहे असे म्हणाल तर आम्ही असे म्हणतो की, सर्वांहून अलौकिक असा हा प्रकार आहे. मग या प्रकाराला सत्यासत्याहून व्यतिरिक्त असा अन्य तिसरा प्रकारच म्हणावे लागेल. याचे उत्तर "होय" असे असून याच प्रकाराला आम्ही "हेच अलौकिक मोठे असे पारमेश्वरस्वातंत्र्य होय," असे म्हणून कधीपासून सांगत व कानीकपाळी ओरडत आहोत.

यानुसारच **"श्रीमत्स्तोत्रावली"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

सदसत्त्वेन भावानां युक्तानां द्वितयी स्थितिः।
तामुल्लङ्घ्य तृतीयस्मै नमश्चित्राय शम्भवे।।

अर्थ :- सर्व वस्तू सत् आणि असत् या दोन प्रकारच्या विशेषणांनी

युक्त असतात म्हणजेच त्या दोन प्रकारच्या असतात. या दोन्हींना उल्लंघून विचित्र प्रकारचे म्हणजे तिसऱ्याच प्रकारचे तुम्ही आहात अशा तुम्हाला हे श्रीशिवा ! नमस्कार असो.

पण बिंबावाचून प्रतिबिंब कधीच पडत नाही हे खरे आहे. त्यामुळेच ते परमेश्वराचे स्वातंत्र्य मानावे असे आम्ही वारंवार म्हणतो. मग बिंबालाच प्रतिबिंब म्हटले तर काय होईल? तसे म्हणता येणार नाही. कारण बिंबाची लक्षणे प्रतिबिंबात नसतात. बिंब हे इतर संबंधाने रहित असते व स्वतंत्र पदार्थ म्हणून त्याचा अनुभव येतो. ज्याप्रमाणे आरशात दिसणारे मुख इत्यादि पदार्थ होत त्याप्रमाणेच हे आहे.

यासंबंधी "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

ननु बिम्बस्य विरहे प्रतिबिम्बं कथं भवेत्।
किं कुर्मो दृश्यते तद्धि ननु तद्बिम्बमुच्यताम्।।३-५२।।
नैवं तल्लक्षणाभावाद् बिम्बं किल किमुच्यते।
अन्यामिश्रं स्वतन्त्रं सद् भासमानं मुखं यथा।।५३।।

अर्थ :- बिंबाच्या अभावामुळे प्रतिबिंब पडता कामा नये; परंतु काय करणार? प्रतिबिंब तर दृष्टीला पडते. जर कोणाची प्रतिबिंबालाच बिंब म्हणण्याची इच्छा झाली तर तो तसे म्हणू शकतो; (कारण खरेपणात काही अंतर पडू शकत नाही. या दृश्यमान विश्वाला जर कोणी प्रतिबिंब म्हटल्याने संतुष्ट होत नसेल तर तो या प्रतिबिंबालाच बिंब म्हणून संतुष्ट होऊ शकतो.)।।३-५२।।

वास्तविक पाहता (दृश्यमान विश्वात) बिंबाचे लक्षण दिसून येत नाही. मग बिंबाचे लक्षण काय आहे? बिंब हे सजातीय किंवा विजातीय अशा कोणत्याही अवस्थेत दुसऱ्याशी एकरूप होत नाही; कारण बिंब हे स्वतंत्र असते. (जो दुसऱ्या कोणाचीही अपेक्षा ठेवीत नाही तो स्वतंत्र असतो.) ज्याप्रमाणे मुख हे आरशात प्रतिबिंबरूपाने भासमान होते; पण ते स्वस्वरूपनिष्ठच असते त्याप्रमाणे विश्व हे वरील तीन लक्षणांप्रमाणे नुसते भासमान होत असते.

जर प्रतिबिंबाचेही लक्षण तेथे नाही असे म्हणाल तर, तसे नाही. प्रतिबिंबाचे लक्षणही तेथेच असे सांगितले आहे की -

अन्यव्यामिश्रणायोगात् तद्भेदाशक्यभासनम्।
प्रतिबिम्बमिति प्राहुर्दर्पणे वदनं यथा।।

बोधमिश्रमिदं बोधाद् भेदे वा शक्यभासनम्।
पुरतत्त्वादिबोधे किं प्रतिबिम्बं न भास्यते।।

अर्थ :- दुसऱ्याच्या संबंधाशिवाय ज्याचे भेदज्ञान होणे अशक्य आहे ते प्रतिबिंब होय. ज्याप्रमाणे आरशातील मुख असते त्याप्रमाणेच हे होय. हे बोधाने किंवा ज्ञानाने युक्त (असे प्रतिबिंब) ज्ञानात भेद निर्माण झाला असता विकल्पाने भासणारे होते. पुरतत्त्वादींचे ज्ञान झाले असता प्रतिबिंब भासत नाही काय?

सौगतांच्या म्हणजे जैनांच्या प्रतिबिंबवादात आणि तुमच्या प्रतिबिंबवादात फरक काय आहे? या प्रश्नाचे उत्तर देताना ग्रंथकार असे म्हणतात की, त्यांच्या संवित्‌मध्ये संवेद्य अर्थात् ज्ञेय वस्तूच प्रतिबिंबित होतात, संवित् संवेद्यामध्ये कधीच प्रतिबिंबित होत नाही; परंतु आमच्या प्रतिबिंबवादानुसार दोन्ही म्हणजे संवेद्य आणि संवित् वस्तू एकमेकात प्रतिबिंबित होतात. यासंबंधी "**श्रीप्रत्याभिज्ञाविवृतिविमर्शिनी**" या टीकाग्रंथात असे म्हटले आहे की, "**सौगतस्य अपि संविदि संवेद्यं प्रतिबिम्बम् अर्पयति, न तु संवेद्ये संवित्।**" अर्थात् "सौगतांच्याही संवित्‌मध्ये संवेद्य प्रतिबिंबरूपाने भासते; पण संवेद्यामध्ये संवित् भासत नाही." हे दोन्हीही अर्थात् संवित् आणि संवेद्य परमेश्वराच्या स्फुरणाचाच प्रकार असल्याने त्यांच्या निर्मलपणात कोणतेही वैषम्य नाही. हाच मुद्दा "**अविआरोहअपासे०।।६०।।**" या गाथेमधून सांगितला जाईल. त्याचप्रमाणे जे दोन्हीकडेही प्रतिबिंबीत होते त्याला विश्वाचे वैचित्र्य असे म्हणतात.

यासंबंधी मीच (म्हणजे ग्रंथकारांनी) "**श्रीसंविदुल्लास**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

आदर्शयोरिवान्योन्यं लम्भितप्रतिबिम्बयोः।
शिवशक्त्योरनन्ताः स्युरन्तरन्तः प्रसक्तयः।।
तत्रापि –
बोध्यमिश्रमिदं बोध्याद् भेदे वा शक्यभासनम्।
ज्ञानस्मृत्यादि बोध्ये किं प्रतिबिम्बं न भण्यते।।

अर्थ :- ज्याप्रमाणे दोन आरशांचे एकमेकात प्रतिबिंब पडलेले असते त्याप्रमाणे श्रीशिवशक्तींच्या अनंत प्रसक्ती अर्थात् प्रतिबिंबसंबंध एकमेकात मिसळलेले आहेत.

त्याच ग्रंथात पुढे असेही म्हटले आहे की -

ज्ञेयसंमिश्र पदार्थ ज्ञेयाहून भिन्न असतानाही भासणे शक्य आहे. ज्ञेयात ज्ञान व स्मृती यांचे अस्तित्व म्हणजे प्रतिबिंब नव्हे काय?

याही उदाहरणाने प्रतिबिंब प्रकार सर्वत्र सारखाच आहे. ज्ञान्याच्या ज्ञानात ज्ञेयाचे प्रतिबिंब व ज्ञान्याच्याच ज्ञेयात ज्ञानाचे प्रतिबिंब पडते. कसेही पाहिल्यास परमेश्वराच्या स्वातंत्र्यशक्तीच्या आधीन हा विश्वाचा विक्षोभ आहे. अशा रीतीने सांख्यादिकांच्या प्रतिबिंबवादाचे विलक्षणत्व विचाराने विवरावे. अशा प्रकारे विवर्तादि वादांपेक्षा आमचा प्रतिबिंबवाद श्रेष्ठतेकडे झुकतो. यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की -

अतः प्रपञ्चस्य मृषात्ववादी कार्यत्ववादी प्रतिभेदवादी।
असत्यवादी च परेश! शम्भो! तव स्थितिं नेषदपि स्पृशन्ति।।

अर्थ :- हे परेशा! श्रीशंभो! प्रपंचाला असत्य म्हणणारे, कार्य म्हणणारे, प्रतिभेद म्हणणारे व मिथ्या म्हणणारे तुझ्या स्थितीला किंचितही स्पर्श करू शकत नाहीत.

"प्रतिबिंब द्या" या वचनाने हे सुचविले आहे की, "ज्याप्रमाणे आरशात मुख प्रतिबिंबित होते त्याप्रमाणे स्वात्म्यात विश्व प्रतिबिंबिते, या दृष्टान्ताने विरुद्धवाद्यांचे समाधान होईल का? होणार नाही. मग त्यांच्या इच्छेप्रमाणे होऊ द्या."

या दृष्टीने शास्त्रात असे म्हटले आहे की -

स्वस्यैव स्फुरणं मुख्यं विश्वस्मिन्नधिरोप्यते।
ननु नौकाधिरूढस्य चलतीवापगातटम्।।

अर्थ :- ज्याप्रमाणे नौकारूढ असणाऱ्या मनुष्याला तीरावरील वृक्ष धावतात असे वाटते; कारण तो स्वतःचे धावणे त्या वृक्षादि अचेतन वस्तूंवर लादतो.

त्याप्रमाणेच स्वात्मनिष्ठ विश्वप्रतिबिंबनाची क्रिया सादृश्याने दर्पणनिष्ठ-मुखाप्रमाणे औपचारिक आहे. नाहीतर शुभ्र वस्तूला हंसादि उपमा देणे अयोग्य होईल; कारण हंसाचे सर्व गुण उपमेय वस्तूत असतीलच असे नाही. जरी विद्वान् तत्त्वज्ञानी प्रतिबिंबाच्या उपमेव्यतिरिक्तही अर्थ लावू शकतात तरीपण असलेल्या सुयोग्य शब्दाचा तात्पर्यार्थ लावणे आवश्यक आहे. त्यामुळेच विवेचन अवश्य ठरले.

इति गुरुपदपरिचर्यातात्पर्यधनो महेश्वरानन्दः।
प्रतिबिम्बवादसम्पत्सौभाग्यं स्वहृदयार्थमाचख्यौ।।

अर्थ :- अशा प्रकारे श्रीमहेश्वरानंदांनी श्रीसद्गुरुसेवा करून मिळविलेले प्रतिबिंबवादाचे स्वहृदयाला पटलेले रहस्यमय धनरूप सौभाग्य तत्त्वतात्पर्य म्हणून सांगितले.

हा उपायविस्तार जिज्ञासूंसाठी विशद केला. आरूढ व प्राप्ततत्त्वासाठी करावयाचे उपाय हे उपाय राहत नसून स्वस्वभावैक्यात पर्यवसित होतात; कारण त्याच्याशिवाय उपाय स्फुरणे किंवा प्रकाशणे हे अशक्य आहे.

या दृष्टीने "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

यावानुपायो बाह्यः स्यादान्तरो वापि कश्चन।
स सर्वस्तन्मुखप्रेक्षी तत्रोपायत्वभाक् कथम्।।

अर्थ :- जेवढे अंतर्बाह्य उपाय आहेत ते सारे आत्मज्ञानसंपन्नाच्या तोंडाकडे पाहणारे आहेत; मग त्याला उपायांची गरज कशी भासणार?

त्याचप्रमाणे यासंबंधी "**श्रीतंत्रवटधानिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

उपायैर्न शिवो भाति भान्त्यमी तत्प्रसादतः।
स एवाहं स्वप्रकाशो भासे विश्वस्वरूपकः।।

अर्थ :- उपायांनी श्रीशिव दिसत नाहीत तर उपायच म्हणजे साधनेच श्रीशिवप्रसादाने भासतात. स्वप्रकाश श्रीशिव मीच असून विश्वरूपाने मीच भासतो.।।५९।।

*****

गाथा क्रमाङ्क ६०

अवतरणिका :- यारीतीने वरील उपायविस्ताराच्या बळावर आत्मस्वरूप विचारामुळे जे पुष्ट झालेले आहेत त्या साधकभक्तयोगिशिष्यांचे वैशिष्ट्य सांगताना ज्यात आतबाहेरील दशेचा निरास होतो तो निश्चितपणा वर्णन करताना ग्रंथकार या गाथेत असे म्हणतात की -

अविआरोहअपासे चासअवेहुणसरिश्शए अत्थे।
अन्तोहुत्तो जोई बाहिरहुत्तो ति कप्पणा कत्तो।।६०।।
(अविकारोभयपार्श्वे चाषपिङ्गसदृक्षेऽर्थे।
अन्तर्मुखो योगी बहिर्मुख इति कल्पना कुतः।।)

अर्थ :- श्रीनीलकंठांच्या पिवळ्या नेत्रांप्रमाणे दोन्ही बाजूंमध्ये अविकृतरूपाने स्थित असणाऱ्या परमतत्त्वात अंतर्मुख होऊन योगी बहिर्मुख होईल, या गोष्टीची कल्पनाच केली जाऊ शकत नाही.।।६०।।

विशेष :- चाष याचा अर्थ मोर असाही होऊ शकतो. ज्याप्रमाणे मोराचा पिसारा दोन्ही बाजूंनी समान रूपाने निळ्या रंगाचा असतो त्याचप्रमाणे योगीही समान रूपाने परमात्मतत्त्वामध्ये अंतर्मुख होऊन विश्वप्रपंचात बहिर्मुख होऊ शकत नाही. योगी परमात्मतत्त्वामध्ये निरंतर समाहित राहतो. स्वात्मरूप तर अलौकिक तत्त्वच आहे. योगी स्वात्मरूप परमात्मतत्त्वाने युक्त असतो. सर्वत्र श्रीशिवच व्याप्त असतात. जो योगी अथवा साधकभक्त परमेश्वराने युक्त असतो त्याच्या हृदयात स्वात्मरूप तत्त्वाशिवाय दुसरे विजातीय स्वरूप म्हणजेच विश्वप्रपंच मात्र जडत्व अधिष्ठितच राहू शकत नाही. योगी अथवा आत्मस्वरूपप्राप्त साधकाच्या अंतर्देशामध्ये निरंजन ज्योती प्रस्फुटित राहत असते आणि बहिर्देशात विश्ववैचित्र्य विलास श्रीशिवमयच आहे असे अभिव्यक्त होत राहते.

परिमलव्याख्यार्थ :- सर्वांकडून मिळविला जातो तो "**अर्थ**" म्हणावा. स्वात्मरूप हे काही अलौकिक तत्त्व आहे. ते दोन्हीकडून म्हणजे उलटसुलट, आतबाहेर मोरपिसांशी विलक्षण धर्म असणारे व तास पक्षाच्या पिसांसारखे दोन्ही बाजूंनी सारखेच असणारे असे आहे. (मोराची पिसे मागून पुढून सारखीच नसतात. ती वेगवेगळी असतात. तसे आत्मतत्त्व वेगवेगळ्या स्वरूपाचे नसते. ते मागून, पुढून व बाजूनी एकाच प्रकारचे असते.) अशा प्रकारे वर्णन केलेले आत्मस्वरूप "अहंता व इदंता" रूपाने आतून बाहेरून दोन प्रकारचे भासते. याशिवाय देशस्फुरत्ता वेगळी नाही. पूर्वेकडचे आणि पश्चिमेकडचेही यात अंतर्भाव होऊन भासते. स्थूलदृष्टीने कल्पिलेल्या दोन बाजू वेद्य म्हणजे ज्ञेय व वेत्ता म्हणजे ज्ञाता आदि स्वरूपाच्या रूपाने आहेत असा जो वैषम्यानुभव आहे तो जरी येथे विकाररूपात भासला तरी वस्तुदृष्ट्या पाहता आत्मरूप अविकारीच आहे. संवित्स्वातंत्र्यपरिस्पंदावाचून अहंताइदंता यांची दुसरी अस्तित्व प्रक्रियाच नाही. मग ती विक्रिया कशी होईल? "अर्थे" या ठिकाणची सप्तमी विभक्ती कर्तरि, ज्ञातरि इत्यादींप्रमाणे सिद्धस्वभावता प्राप्यता सुचविते असा त्या "अर्थ" पदाचा अर्थ असल्याने "**श्रीविज्ञानभट्टारक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

ग्राह्यग्राहकसंवित्तिः सामान्या सर्वदेहिनाम्।
योगिनां तु विशेषोऽयं सम्बन्धे सावधानता।।

अर्थ :- सर्व प्राणिमात्रांना होणारे ग्राह्यग्राहकाचे ज्ञान समानच असते. त्यातल्या संबंधाचे विवेचक ज्ञान असणे हा योग्यांचा विशेष असून त्याविषयी

या योग्यांनी सावध असले पाहिजे.

उपरोक्त ग्रंथात म्हटल्याप्रमाणे वेद्य व वेदिता यांच्यामधल्या संबंधाचा विचार त्या योग्यांना ज्ञात असतो. याच योगाचा अवलंब केलेल्या आणि परतत्त्वैक्याने युक्त अशा प्रमात्याला स्वात्मनिष्ठा व बाह्यवेद्य प्रवृत्ती या अंतर्बाह्य विषयक कल्पना कशा असू शकतील? असणार नाहीतच. यादृष्टीने पाहता डोळ्यांच्या उघडझापीवर अवलंबिलेली समाध्यवस्थाही कल्पनाच होय. याचे तात्पर्य असे आहे की, प्रौढांच्या कल्पनेवर आधारलेले वेद्य-वेत्ता, शक्तिमान्-शक्ती, पति-पाश, होणारा-झालेला, दृष्टि-दृश्य, पुरुष-प्रकृती, आत्मा-शरीर, आत-बाहेर, परोक्ष-अपरोक्ष व सत्-असत्यादि जोड्या म्हणजे कल्पना-प्रपंच अर्थात् खेळ होय आणि हे सर्व श्रीशिवच आहे.

या दृष्टीने **"आम्नाय अर्थात् वेद"** यातील वचन असे आहे की -

शिवो दाता शिवो भोक्ता शिवः सर्वमिदं जगत्।
तस्माच्छब्दार्थचिन्तासु न साऽवस्था न या शिवः।।
वस्तुतः शिवमये हृदि स्फुटं सर्वतः शिवमयं विराजते।
चलित्वा यास्यते कुत्र सर्वं शिवमयं यतः।।

अर्थ :- श्रीशिव हेच दाता व श्रीशिव हेच भोक्ता असून हे सर्व जगत्ही श्रीशिवमयच आहे. त्यामुळे शब्द आणि अर्थ यांच्या विचारामध्ये अशी एकही अवस्था नाही की, जी श्रीशिव नाही. वस्तुतः श्रीशिवमय अशा हृदयामध्ये सर्व प्रकारांनी स्फुट असे श्रीशिवमयच शोभून दिसते. हे सर्व श्रीशिवमयच असल्याने तुम्ही जाऊन जाऊन तरी कोठे जाल?

"हा सर्व विस्तार परमेश्वरयुक्त प्रकाशरूपच आहे," अशी दृष्टी असणाऱ्या साक्षात् परमेश्वरत्व पावलेल्या महापुरुषाला आत्मस्वरूपावाचून दुसरे प्रमाण व स्फुरण कोठे असणार?

यासंबंधी **"श्रीमत्स्तोत्रावली"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

योऽविकल्पमिदमर्थमण्डलं पश्यतीश! निखिलं भवद्वपुः।
स्वात्मपक्षपरिपूरिते जगत्यस्य नित्यसुखिनः कुतो भयम्।।

अर्थ :- जो हे पदार्थांनी युक्त असे विकल्परहित जग तुझे म्हणजे श्रीशिवांचे शरीरच आहे असे समजतो त्या नित्यसुखी अशा सिद्धयोग्याला स्वात्मपक्षाने परिपूर्ण अशा जगात भीती कोणाकडून असणार?

याच संबंधी **"श्रीप्रत्यभिज्ञाहृदय"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

सर्वो ममायं विभव इत्येवमभिजानतः।
विश्वात्मनो विकल्पानां प्रसरेऽपि महेशता।।

अर्थ :- हे सारे माझे वैभव आहे असे जाणणाऱ्या विश्वात्मपुरुषाला कल्पनेचा पसारा मूर्तरूपात समोर असतानाही श्रीमहेशत्व सोडून जात नाही.

यासंबंधी विद्वानांनी असे म्हटले आहे की -

अन्तर्निरञ्जनं ज्योतिर्बहिरष्टौ च मूर्तयः।
परितः परितः शय्या हंसाङ्गरुहतूलिका।।

अर्थ :- आतील बाजूला काजळी न येणारी ज्योती म्हणजे दीप व बाहेर अष्टमूर्ती (पृथ्वी प्रभृती जगदुत्पादक पदार्थ किंवा श्रीशिवांच्या आठ मूर्ती) अशा ज्ञानी महात्म्याला जिकडे पाहावे तिकडे हंसांच्या परांच्या अर्थात् पंखांच्या गाद्या म्हणजे सुखकर शय्या पसरलेल्या असतील.।।६०।।

*****

गाथा क्रमाङ्क ६१

अवतरणिका :- आता या गाथेत देशपरिच्छेदाप्रमाणे कालपरिच्छेद-युक्त संकोचकलंकाचा या ज्ञान्याला अर्थात् सिद्धयोग्याला स्पर्शही होत नाही असे ग्रंथकार सांगत आहेत.

जोई जाअरसविणअसोसुत्ततुरीअपव्वपरिपाहिं।
चित्तं विअ मणिमालं विमरिससुत्तेक्कगुब्भभुव्वहइ।।६१।।
(योगी जागरस्वप्नसौषुप्ततुरीयपर्वपरिपाटिम्।
चित्रामिव मणिमालां विमर्शसूत्रैकगुम्फितामुद्वहति।।)

अर्थ :- योगी विविध रंगांच्या मणिमालेसमान विमर्शसूत्रामध्ये गुंफलेल्या जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ती आणि तुरीय या अवस्थांच्या परिपाटीचे उद्वहन करतो अर्थात् या चारही अवस्था आत्मस्वरूपाचा विमर्शाने किंवा ज्ञानाने मोजतो अथवा धारण करतो.।।६१।।

विशेष :- योग्याच्या दृष्टीने सर्व काही आत्मस्वरूपच असते. जाग्रत् अवस्थेला ज्ञानाचे स्वरूप असे म्हटले जाते. ही अवस्था बाह्य आणि आभ्यंतरिक इंद्रियांपासून निर्माण होणाऱ्या जागृतीचा पर्याय आहे. स्वप्नावस्था ही अंतःकरणासाठी असाधारण अर्थ निर्माण करणारी विकल्पावस्था आहे. समग्ररूपाने स्फुरणाची शून्यताच अर्थात् स्फुरणरहित अवस्था हीच सुषुप्ती आहे. योग्याच्या दृष्टीने जाग्रत्, स्वप्न आणि सुषुप्ती या तीन अवस्था म्हणजेच धारणा, ध्यान आणि समाधी होत. चित्ताचा देशबंध अर्थात् एका

ठिकाणी चित्त एकाग्र करणे ही धारणा होय. त्याचा प्रत्ययप्रवाह म्हणजे ध्यान आहे. वेद्य आणि वेदक हे भाव नष्ट होणे ही समाधी आहे. अनन्य अवस्था ही तुरीयावस्था होय. "**परिपाटी**" या शब्दाचे तात्पर्य "आत्म-स्वरूपयुक्त अनन्यता" हे आहे. योगी या चारही अवस्थांना मोती अथवा माणिक यांच्या एका दोऱ्यात ओवलेल्या विचित्र माळेप्रमाणे आपल्या स्वात्म्यात स्थापित करतो. सर्वत्र आणि सर्व कालात योग्याची आत्मदृष्टी अर्थात् हे सर्व श्रीशिवमय आहे अशीच भावना राहते.

परिमलव्याख्यार्थ :- या जागृती इत्यादि कालावलंबित अर्थात् काळाचा आधार घेतलेल्या अवस्था (अंश) विशेष आहेत. त्या अवस्थांचे लौकिक स्वरूप पुढीलप्रमाणे आहे. (सर्वसाधारण पदार्थविषय दृष्टीने) अंतर्बाह्य उभय इंद्रियजन्य (ज्ञान) म्हणजे जागृती होय. ज्यात अंतःकरणच कारणीभूत आहे व ज्यात असाधारण (विशेष किंवा अलौकिक) पदार्थनिर्मिती दिसते ते स्वप्न होय. सर्व दृष्टीने पदार्थ स्फुरणाचा अभाव म्हणजे सुषुप्ती होय. "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात या विषयी असे म्हटले आहे की, "**ज्ञानं जाग्रत्, स्वप्नो विकल्पः, अविवेको माया सौषुप्तम्।**" अर्थात् "ज्ञान म्हणजे जाग्रदावस्था होय, स्वप्न म्हणजे विकल्पांनी युक्त अवस्था होय आणि अविवेक अर्थात् विवेकरहित आणि मायायुक्त अवस्था म्हणजे सुषुप्ती होय."

यासंबंधी "**श्रीप्रत्याभिज्ञा**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

सर्वाक्षगोचरत्वेन या तु बाह्यतया स्थिरा।
सृष्टिः साधारणी सर्वप्रमातॄणां स जागरः।।
मनोमात्रपथोऽप्यक्षविषयत्वेन विभ्रमात्।
स्पष्टावभासा भावानां सृष्टिः स्वप्नपदं मतम्।।
तावन्मात्रस्थितौ प्रोक्तं सौषुप्तं प्रलयोपमम्।

अर्थ :- सर्वेंद्रियांना ज्ञात व बाह्यदृष्ट्या स्थिर अशी साधारण सृष्टी म्हणजे सर्व जीवांची जाग्रदावस्था होय. मनःप्रवाहाने पण इंद्रियांना विचित्र-रूपात स्पष्ट भासणारी पदार्थांची सृष्टी म्हणजे स्वप्न होय. सुषुप्ती म्हणजे प्रलयोपम अवस्था; पण मनोमात्रस्थितीने किंवा ज्ञानमात्र स्थितीत जीवाचे अवस्थान असणे (हेच खरे किंवा श्रेष्ठ) होय.

योग्याच्या दृष्टीने या अवस्था म्हणजे धारणा, ध्यान व समाधी या स्वरूपाच्या असतात. "**चितस्य देशबन्धोधारणा तत्तत्प्रत्ययप्रवाहो ध्यानम्, वेद्यवेदक-भावादिविगलनं समाधिः।**" अर्थात् "चित्त एकाच

ठिकाणी असणे ही धारणा होय. त्याच स्थितीचा सतत किंवा अखंड प्रवाहरूपाने येणारा अनुभव म्हणजे ध्यान होय. वेद्यवेदक किंवा ज्ञेयज्ञातृ-भाव नष्ट होणे ही समाधी अवस्था होय," असे आगमांमधून सांगितले आहे. तुरीयावस्था म्हणजे सर्व अवस्थांशी संबंधित असताना किंवा नसतानाही एकरूप स्थिती असणे होय. केवळ असेच ज्ञान सदैव राखण्याचे सामर्थ्य असणे हेच योग्याचे वैशिष्ट्य होय. "**त्रिषु चतुर्थं तैलवदासेच्यम्**।" अर्थात् "तुरीय म्हणजे जाग्रदादि तिन्ही अवस्थांमध्ये तैलधारेप्रमाणे सारखी राहणारी एक (चौथी) अवस्था होय." जाग्रदादि तीन अवस्थास्थांमध्ये असणारी महास्फुरत्ता म्हणजे तुरीय अवस्था होय" असे "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात सांगितले आहे. हे उपलक्षण होय. कारण एकात दुसरे, या दोन्हीत तिसरे, या तीन्हीत चौथे व या सर्वात पाचवे अवश्य असावे लागतेच. हे सूत्रातून सुज्ञेय होण्यासाठी एकत्रित रूपाने सांगितले. अशा या सर्व अवस्थांना अन्योन्य रूपतेमुळे एकता व एकरूपता आहे. या अवस्थांना विमर्शरूप सूत्राने अर्थात् तंतूने एकत्र गुंफून वर वर्णिलेला योगी रत्नमालेप्रमाणे धारण करतो. तो लौकिक नियमांचे उल्लंघन करून त्यांच्या स्वरूपांचा विचार करून त्यांना आपल्यात सामावून घेतो. या विमर्शाला परमप्रमातृरूपता असल्याने तुर्यातीतावस्था असे म्हणावयाला पाहिजे; पण तिला तुर्यावस्था असे म्हटले आहे. याचे कारण असे आहे की, ही अवस्था जाग्रदादि अवस्थांच्या पलीकडे असूनही त्या अवस्थांमधून ती सूत्राप्रमाणे ओवली गेली आहे. त्यामुळे ती तीनही अवस्थांना आपल्या ताब्यातही घेते आणि त्यांच्यामध्येही असते. त्याचप्रमाणे जाग्रदादि चार अवस्थांतही परस्परसंबंध आहेच. या चार अवस्था जागृतिजागृती, जागृति-स्वप्न, जागृतिसुषुप्ती व जागृतितुर्या अशा आहेत. आता ग्रंथकार त्या अवस्थांचे प्रकार सांगत आहेत. "**अबुद्धं बुद्धं, प्रबुद्धं सुप्रबुद्धमिति जाग्रतश्चत्वारो भेदाः**।" अर्थात् "जागृतीचे अबुद्ध, बुद्ध, प्रबुद्ध व सुप्रबुद्ध असे चार भेद होत." "**गतागतं सुविक्षिप्तं सङ्गतं सुसमाहितम्**।" अर्थात् "स्वप्नावस्थेचे गतागत अर्थात् नष्ट झालेले दिसणे, सुविक्षिप्त अर्थात् भलतेच दिसणे, संगत अर्थात् योग्य दिसणे व सुसमाहित अर्थात् अतिचांगले दिसणे असे चार प्रकार आहेत. "**उदितं विपुलं शान्तं सुप्रसन्नमिति सुषुप्तस्य**।" अर्थात् "सुषुप्तीचे उदित, विपुल, शांत व सुप्रसन्न" असे चार प्रकार आहेत. "**नैतस्यामपारा तुर्यदशा सम्भाव्यते किल**" अर्थात् "तुरीयावस्था मात्र

सर्वांहून वेगळी आणि भेदरहित" असून "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात या अवस्थेचे "**मनोन्मनमनन्तं सर्वतोभद्रमितित्रयो भेदाः।**" अर्थात् "मनोन्मन, अनंत आणि सर्वतोभद्र असे तीन प्रकार सांगितले आहेत." "**तुर्यातीते भेद एकः सततोदितमित्ययम्।।" इति नीत्या "नित्यविमृष्टताद्योतकसततोदितमित्येको भेद उपचर्यते।**" अर्थात् "तुर्यातीत अवस्थेत सदैव स्फुरणकर्तृत्व **किंवा विमृष्टत्व अथवा** अखंड आत्मस्वरूपाची जाणीव हा एकच प्रकार आहे." ही अवस्था स्फुट, स्फुटास्फुट आणि अस्फुट अशी भासमान होत असते व ती सर्वांमध्ये भरून राहिलेली असते.

"**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात या अवस्थांची क्रमशः पुढीलप्रमाणे लक्षणे सांगितली आहेत.

यस्य यद् यत् स्फुटं रूपं तज्जाग्रदिति मन्यताम्।
यदेवास्थिरमाभाति स्वरूपं स्वप्न ईदृशः।
अस्फुटं तु यदाभाति सुषुप्तं तत् पुरोऽपि यत्।
त्रयस्यास्यानुसन्धिस्तु यद्वशादुपजायते।।
स्रक्सूत्रकल्पं तत् तुर्यं सर्वभेदेषु गृह्यताम्।।

अर्थ :- ज्याचे जे जे स्पष्ट रूप आहे ते ते जाग्रत् मानावे. जे अस्थिर स्वरूप भासते त्याला स्वप्न म्हणावे. जे अगदी अस्पष्ट भासते ते सुषुप्त रूप होय. त्याच्याही पुढे या तीन्ही अवस्थांची एकत्रित अवस्था जिच्यामुळे निर्माण होते ती मणी ओवलेल्या दोरीप्रमाणे असून तिला तुर्य अवस्था असे म्हणतात. तिचा सर्व भेदांमध्ये स्वीकार करावा.

तुर्यातीत अवस्था मात्र सर्वत्र एकरूपत्वाने असल्याने निराकुल, आत्मरूप आणि श्रीपरभैरवस्वभावाची आहे.

"**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथातच हे लक्षण सांगताना असे म्हटले आहे की -

यत्त्वद्वैतभरोल्लासद्रावितिाशेषभेदकम्।
तुर्यातीतं तु तत् प्राहुरित्थं सर्वत्र योजयेत्।।

अर्थ :- अद्वैताच्या परिपूर्ण उद्रेकामुळे सर्व भेदाला जिने पळवून लावले आहे ती तुर्यातीतावस्था होय.

त्यामुळेच तुर्यावस्थेला जाग्रदादि तीन व तुर्यातीत या दोन्हीलाही जोडण्याचे चातुर्य आहे असे सांगणे हे योग्यच होय. अशाच आशयाने तिला "चित्रा" म्हणजे विचित्र प्रकारची वा विलक्षण असे म्हटले आहे. ज्याप्रमाणे माणिक, मोती, महानील व पाचू आदि अनेक मण्यांचा हार

तांबूस, पांढरा, निळा आदि वर्णांच्या मिश्रणाने एका वेगळ्याच संमिश्र वर्णाचा दिसतो त्याचप्रमाणे तुर्यावस्था ही जाग्रदादि सर्व अवस्थांमध्ये संबंधिनी आहे हे सुचविले आहे. याचा सारांश असा आहे की, चिच्छक्तिरूप महाप्रकाश नावाचा श्रेष्ठ प्रमाता म्हणजे परमात्मा, नित्य उद्युक्त तुर्यातीत भगवान् तुरीयावस्थेला साधन करून (जी अवस्था सदैव जाणणारी निरलस उद्युक्त आहे तिच्या द्वारा) प्रमेय, प्रमाण व प्रमात्याचे औदासीन्य, पिंड म्हणजे शरीर, पद म्हणजे नाव, रूप, क्रिया, ज्ञान व इच्छा प्रभृती सर्व त्रिकांचे आक्रमण करतो. तसेच जाग्रदादि तीन अवस्थांचे व अलौकिक ऐश्वर्य देणाऱ्या योगशक्तीचे आक्रमण करून स्वकीयस्वतंत्र स्फुरण हेच श्रेष्ठ परमार्थ अर्थात् प्राप्य आहे असे अनुसंधान ठेवतो. "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात "**त्रितयभोक्ता वीरेशः।**" अर्थात् "जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तीनही अवस्थांमध्ये (अत्यंत श्रेष्ठ आत्मिक) आनंदाचा उपभोग घेणारा तो सिद्धयोगी (शक्तिस्वरूप असलेल्या खऱ्याखुऱ्या) इंद्रियांचा स्वामी होतो." व "**त्रिपदाद्यनुप्राणनम्।**" अर्थात् "(उत्पत्ती, स्थिती व लय) या तीन अवस्थांपैकी मुख्य अवस्थेने (अंतर्मुख होऊन) ती तशी अवस्था आहे अशा भावनेने त्या आनंदाचे पुनरुज्जीवन करावे," असे वचन आहे.

या दृष्टीने "**श्रीस्पंदशास्त्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

जाग्रदादिविभेदेऽपि तदभिन्ने प्रसर्पति।
निवर्तते निजान्नैव स्वभावादुपलब्धृतः।।३।।

अर्थ :- जाग्रदादि भिन्न अवस्थांमध्ये अभिन्नरूपाने (सिद्धयोगी) हा (नेहमी) वावरतो. स्वस्वभावापासून त्याची ज्ञातृत्वशक्ती कधी दूर जात नाही. तो केव्हाही ज्ञातृस्वभावाचा म्हणजेच ज्ञाता असतो.।।६१।।

*****

गाथा क्रमाङ्क ६२

अवतरणिका :- मागच्या गाथेतील सिद्धान्तावर प्रतिपक्षी अशी शंका घेतात की, तुम्ही वर्णन केलेली देशकालाची अपरिच्छिन्नता अर्थात् अखंडता, शुद्धसंविद्रूपमुक्तिस्वभावता आणि स्वच्छंदता या गोष्टी आत्मव्यतिरिक्त देह व प्रमाणादि कल्पनांच्या संबंधाकडे पाठ फिरविलेल्या सिद्धयोग्यालाच प्राप्त होतात किंवा शक्य होतात; परंतु हे म्हणणे संभवत नाही, कारण कोणत्या ना कोणत्या तरी विकल्पांचा संबंध अटळच आहे. यावर ग्रंथकार या गाथेत उत्तर देताना असे म्हणतात की -

उल्लोआणन्दसुहासीहुरसुब्वेइएण हिअएण।
अहिलसइ लोअजत्तातिन्तिणिचव्वणरसन्तरं जोई।।६२।।
(उल्लोकानन्दसुधाशीधुरसोद्वेजितेन हृदयेन।
अभिलषति लोकयात्रातिन्तिणिचर्वणरसान्तरं योगी।।)

अर्थ :- ज्याप्रमाणे आसवाच्या अर्थात् मद्याच्या सेवनाने उन्मत्त झालेल्या हृदयाला शांत करण्यासाठी किंवा उन्मादाच्या शमनासाठी आम्लरसयुक्त चिंचेचे चर्वण केले जाते त्याप्रमाणे योग्याचे हृदय आत्मस्वरूपाच्या आनंदसुधेच्या मादकतेने उत्तेजित झालेले असल्यामुळे तो एकरस आत्मामृताने मत्त किंवा उन्मादित होऊन आनंदोन्माद शांत करण्यासाठी लोकयात्रा किंवा व्यावहारिक विश्वप्रपंचमय जीवनाचे अशा प्रकारे वरण किंवा स्वीकार करतो.।।६२।।

विशेष :- **"उल्लोकानन्दसुधाशीधुरस"** या पदाचे तात्पर्य अलौकिक स्वानंदस्वरूप एकरसात स्वविश्रांती घेणे होय. योगी अन्य रसाचे सेवन करण्याची अपेक्षा ठेवून लोकव्यवहारात प्रविष्ट होतो. नाहीतर तो एकरस स्वात्मानंदातच किंवा जाग्रत्, स्वप्न आणि सुषुप्ती पलीकडे असणाऱ्या तुरीयावस्थेतच स्थित राहतो. तो मनाचे उन्मनीकरण करून अर्थात् मनाचे अमन करून स्वरूपामृतमय स्वसंवेद्य अलक्ष्य निरंजन परब्रह्माचाच निरंतर साक्षात्कार करीत असतो. स्वरूपानंदाच्या उन्मादामध्ये रमलेल्या योग्यासाठी लोकव्यवहारही आवश्यकच आहे. याचा आशय असा आहे की, लोक-व्यवहारगत विषयसुखाचे सेवन करीत असूनही योगी स्वरूपानंदात डुंबत असतो. **"तिन्तिणि"** हा शब्द मूळ द्रविड भाषेतला असून संस्कृतमध्ये त्याला **"तितिडी"** असे म्हणतात. त्याचा अर्थ "चिंच" असा आहे.

परिमलव्याख्यार्थ :- हा जो उल्लोक आहे तो **"स एको ब्रह्मण आनन्दः।"** अर्थात् "तो एक ब्रह्माचा आनंद आहे," या उपनिषत्प्रक्रियेप्रमाणे मनुष्यांचा आनंद, गंधर्वांचा आनंद इत्यादि सर्व जीवांच्या आनंदापेक्षा अधिक अर्थात् त्यावर ताण करणारा असा "मी पूर्ण आहे" अशा भावनांनी चमत्कृतिपूर्ण, केवळ आत्मविश्रांतिरूप संपत्तीचाच स्पंद म्हणजे स्फुरणरूप असा जो आनंदोत्कर्ष तो वस्तुतः अमृत आणि आसव या उभयरसांचे फल देणारा व प्रकाश व विमर्शाच्या अतिमधुररसाने युक्त असल्याने योग्याच्या हृदयात (त्या रसाविषयी) उद्वेग (कंटाळा) उत्पन्न करतो व मधुरेतर अर्थात् मधुर रसाशिवाय इतर रसाकडे खेचतो. त्यामुळे सिद्धयोग्याच्या हृदयाला देह-इंद्रियादिकांचे सामान्य लोकप्रिय विषय बरे वाटतात. ज्याप्रमाणे सामान्य

मनुष्याला मधुर चवीऐवजी चिंच इत्यादि आंबट चवीचे पदार्थ आवडतात त्याप्रमाणे योग्याला विषयप्रवृत्ती आवडते व त्याची इच्छाशक्ती जागृत होते. योग्याची इच्छा फलप्राप्तीशिवाय थांबत नाही. "**श्रीशिवसूत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**चित्तस्थितिवत् शरीरकरणबाह्येषु।**" अर्थात्, "ज्याप्रमाणे चित्ताच्या अवस्थेत (तुर्यानंद पुरवावा व अनुप्राणन करावे असे सांगितले आहे.) त्याप्रमाणे शरीर, इंद्रिय व बाह्यवस्तू यांच्या ठिकाणीसुद्धा तुर्यानंदाचे अनुप्राणन करावे." दूध व साखर खाऊन कंटाळलेल्या माणसांना आंबट व खारट खाण्याची इच्छा होते हे सर्वांच्या परिचयाचे आहे. हे सांगण्याचा हेतू हा आहे की, परिमित अर्थात् सामान्य योग्याला, शरीरेंद्रियादिकांच्या विषयप्रवृत्तीला बाजूला सारून आत्मानंदाचा आनंद मिळाला म्हणजे साश्चर्य आनंद होतो; परंतु अपरिमित अर्थात् पूर्ण सिद्धयोगिवरेण्याचे तसे नाही. अहंब्रह्मभावाच्या पूर्ण विचारामुळे त्याला निरतिशय आनंद होतो. त्या आनंदाच्या आस्वादाने परमानंदी झालेल्या त्याच्या चित्ताला असे वाटते की, आत्मरूप झालेल्या व असलेल्या या इदम्‌रूपी विश्वविस्ताराचा अनुभव आपणही घ्यावा. त्यानंतर विश्वविकल्पाचा अनुभव घेऊन झाल्यावर तो अनुभव देशादि अनवच्छिन्न अहम् भावाने प्रकाशित अशा प्रमात्याच्या अनुभवात पर्यवसित होतो अथवा विलीन होतो. या दृष्टीने "**श्रीक्रमसूत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**बाह्यादन्तः प्रवेशोऽभ्यन्तराद्वा बाह्यस्वरूपानुप्रवेशः" इति। यथा च व्याख्यातं श्रीमत्क्षेमराजेन - "तत्र च बाह्याद् गृह्यमाणाद् विषयग्रामादन्तः परस्यां चितिभूमौ ग्रसनक्रमेणैव प्रवेशः समावेशो भवति, अभ्यन्तराच्चितिशक्तिस्वरूपात् साक्षात्कृतात् समावेशसामर्थ्यादेव बाह्यस्वरूप इदन्तादिनिर्देश्ये विषयग्रामे वमनयुक्त्या प्रवेशश्चिद्रसाश्यानतात्मा समावेशो जायते**" अर्थात् या दृष्टीने "इदंतेकडून म्हणजेच बाहेरून अहंतेकडे म्हणजे आत किंवा अहंतेकडून इदंतेकडे प्रवेश किंवा निष्क्रमण अर्थात् ये-जा चालू असते." यासंबंधी श्रीक्षेमराजांनी असे म्हटले आहे की, "बाह्यविषयसमुदायातून श्रेष्ठ चैतन्यरूपात प्रवेश होतो व अंतश्चैतन्य साक्षात्काराच्या सामर्थ्यानेच इदंतारूपविषयसमूहात हे चिद्रूपच आहे अशा भावनेने प्रवेश होतो." याच अभिप्रायाने "**श्रीप्रत्यभिज्ञा**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**विश्वरूपोऽहमिदमित्यखण्डानन्दबृंहितः**" अर्थात् "मी विश्वरूपीच आहे अशा प्रकारच्या अखंड आनंदाने विस्तृत झालेलो आहे."

त्याचप्रमाणे आमच्या श्रीसद्गुरुनाथांनी "**श्रीआनंदतांडवविलासस्तोत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

वयं त्विमां विश्वतयाऽवभानं बहिर्मुखस्यास्य तवोन्मुखस्य।
स्वसंहितं विश्वविलापनोद्यत्स्वतन्त्रतानन्दमयीं नमामः।।

अर्थ :- विश्वरूपाने भासणारी व बहिर्मुख दिसणारी; पण तुम्हाला म्हणजे श्रीशिवांना सन्मुख असणारी ही शक्ती विश्वलय करण्याच्या स्वातंत्र्यानंदाने भरलेली असते असे आम्ही समजतो.

विषयांचा संपर्क असतानाही सिद्धयोग्याच्या चित्ताला व्याकुळता येत नाही हेच त्या सिद्धयोग्याच्या चित्ताचे निर्मलत्व आहे.

यासंबंधी "**श्रीचंद्रज्ञान**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

येन प्रबुद्धभावेन भुञ्जानो विषयान् स्वयम्।
न याति पाशवं भावं ज्ञानचन्द्रः स कीर्तितः।।

अर्थ :- जो अर्थात् सिद्धयोगी प्रबुद्धभावाने स्वतः विषयांचा भोग घेतो तो पशुभावाला प्राप्त होत नाही. त्यालाच "ज्ञानचंद्र" असे म्हणतात.

याशिवाय मधुररसाच्या सेवनाधिक्याने इतर आंबट इत्यादि रसांच्या सेवनाची इच्छा होते व कालांतराने त्याही रसांचा उद्वेग शांत होऊन परत मधुर रसाकडे प्रवृत्ती होते. अशीच सिद्धयोगिजनांची स्थिती असते. पूर्णाहंतेच्या अनुसंधानानंतर इदंतेचा अर्थात् विश्वगत विषयाचा संबंध येणे आवश्यकच आहे. त्यानंतर पुन्हा पूर्णाहंतेचा संबंध अर्थातच येतो. या चक्रगतीप्रमाणे पाहिल्यास आत्म्याची सदैव उद्युक्तता किंवा आनंदोत्साहरूपता असते. याचा भंग कधीतरी होत असावा या शंकेला जागाच राहत नाही. राज्यभ्रष्ट राजाप्रमाणे म्हणजे जसे अराजक माजले की, राजाची गरज असते तसे इदंतेच्या अनुपस्थितीत अहंतेची उपस्थिती व अहंभावाच्या अनुपस्थितीत इदंतेची अर्थात् अराजकतेची गडबड असणे हे काही विस्मयकारक नाही, तर साहजिकच आहे. या संबंधी "**श्रीशांभवैक्यदीपिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**अन्तर्गता हि प्रकाश व्याप्तिरिदमिति विश्राम्यति बहिर्गता चाहमिति, एतद्द्वयं सर्वजनप्रसिद्धमनपह्नवनीयम्**" अर्थात् "अंतर्गत प्रकाशव्याप्ती "इदम्" मध्ये विसावते व बहिर्गत प्रकाशव्याप्ती "अहम्"मध्ये विसावते हे सर्वानुभूत असल्याने मिथ्या म्हणता येत नाही."।।६२।।

******

गाथा क्रमाङ्क ६३

अवतरणिका :- "इदंता" ही मायीय असल्याने इदंता व अहंता यात समानता आहे असे म्हणणे कसे जुळते? अशी प्रतिपक्षाने शंका उत्पन्न केली असता ग्रंथकार या गाथेत त्यावर असे उत्तर देतात की -

जाहिं गह्णइ जोई कलणपणालीहि विसअसोक्खाइं।
णिअहिअउव्वमरीहिं फुरणमअं ताहि कुणइ तेल्लोक्कं।।६३।।
(याभिर्गृह्णाति योगी करणप्रणालीभिर्विषयसौख्यानि।
निजहृदयोद्वमनशीलाभिः स्फुरणमयं ताभिः करोति त्रैलोक्यम्।।)

अर्थ :- आपल्या हृदयाच्या ज्या उद्वमनशाली अर्थात् बाहेर टाकण्याच्या किंवा बहिर्मुख प्रवृत्ती असणाऱ्या इंद्रियमार्गांनी सिद्धयोगी विषयसुखांचे ग्रहण करतो त्याच इंद्रियमार्गांनी तो तीनही लोकांना स्फुरित अर्थात् प्रकाशित करतो.।।६३।।

विशेष :- या गाथेमध्ये "इंद्रिय प्रणालींद्वारा किंवा इंद्रियमार्गांद्वारा विषयसुखाचे ग्रहण," याचे तात्पर्य असे आहे की, ती सुखे आत्मसात् करणे होय. स्वप्रकाशानंदाने आह्लादित सिद्धयोगी ज्या आभ्यंतरिक आणि बाह्यमुखी इंद्रियशक्तींनी रूप, रस, शब्द, स्पर्श आणि गंध या विषयांना आत्मसात् करतो त्याच स्वहृदयस्फुरणयुक्त शक्तींनी तीनही लोकांना स्फुरित किंवा प्रकाशित अथवा चमत्कृत करतो. सर्व विश्ववैचित्र्य हे सिद्धयोग्याच्या स्वात्मभावाने संपन्न होते.

परिमलव्याख्यार्थ :- स्वभावतःच परमप्रमात्याच्या अधिकारावर आरूढ असून ऐच्छिक उपाधीचा अवलंब करून मर्यादित जीवभाव धरून प्रकाशानंद सामरस्याच्या अर्थात् समरसतेच्या अमृतमय डोहाप्रमाणे गंभीर असा सिद्धयोगी अंतर्बाह्य इंद्रियांच्या प्रवाहरूप क्रियेने शब्दस्पर्शादि विषयसुखाचा उपभोग घेतो अर्थात् त्या विषयांना आत्मसात् करतो आणि "ज्याप्रमाणे हत्ती आपल्या सोंडेने घेतलेले पाणी बाहेर टाकतो" त्याप्रमाणे सिद्धयोगी इंद्रियांच्या द्वारा प्रमातृप्रमाणप्रमेयरूप स्वहृदयाला स्फुरणरूप त्रैलोक्याच्या स्वरूपात बाहेर टाकतो. हे सांगण्याचा भाव असा आहे की, "योगी स्वकीय प्रमातेपण जीवभावात उतरवितो, जीवभाव अंतःकरणात अर्थात् बुद्धी, मन व अहंकारादिकात प्रविष्ट करतो, ते अंतःकरण बाह्येंद्रियात व इंद्रिये चित्तामध्ये आणतो आणि त्रिपुटीमय सर्व त्रैलोक्य आत्मसंविन्मय आहे अशी धारणा अथवा भावना ठेवतो.

यासंबंधी "**श्रीचिद्गगनचंद्रिका**" या ग्रंथामध्ये असे म्हटले आहे की -

मातृमेयमितिसाधनात्मिका त्वत्कृतोन्मिषति या विकल्पधीः।
त्वत्स्वरूपमकलङ्कितं तया कस्य देवि! विदुषो न मुक्तता।।

अर्थ :- हे मातृमेयादि साधनरूपा देवी! तुझ्यामुळे उदयाला आलेली ही जगत्कल्पना म्हणजेच तुझे निष्कलंकरूप आहे असे ज्ञान असलेला कोण बरे मुक्त होणार नाही? अर्थात् विश्वाला त्वद्रूप समजणारा जीव कधीच बद्ध होणार नाही.

या प्रमाणे विश्वग्रास करून स्वानंदानुभव घेणाऱ्या जीवाला मायीय दोषांचा स्पर्श होतो अशी शंकाही घेणे अयोग्य आहे. हा विषय "**तिउडिमअं खु समत्थं (त्रिपुटीमयं खलु समस्तं)।।३१।।**" या गाथेत आम्ही स्पष्ट केला आहे. (त्रिपुटीरूप प्रपंच चिन्मय आहे) या गाथेत प्रपंचाच्या चिन्मयत्वा-मुळेच मायीयता दोष सिद्धयोग्यात शिरू शकत नाही हा विशेष प्रतिपादिला आहे.।।६३।।

*****

गाथा क्रमाङ्क ६४

अवतरणिका :- ही योग्यांची निश्चिंती अनिश्चिततेत पर्यवसित होते; कारण आणवादि उपायांच्या अपेक्षने ती निश्चितता आहे आणि त्यामुळेच ती विकल्पांना ओलांडून जाण्याला समर्थ आहे. (त्यामुळे विकल्पांचा थोडाही संबंध असता उपयोगी नाही.) अशी प्रतिपक्षाने शंका व्यक्त केली असता त्यावर ग्रंथकार या गाथेत असे उत्तर देतात की -

जह तुह ठिई तहच्छसु णिच्छिन्तोत्ति हु पडिट्ठिओ अत्थो।
तत्थ वि अत्थि विवेओ एव्वं उवदिसइ तस्स को अण्णो।।६४।।
(यथा तव स्थितिस्तथास्स्व निश्चिन्त इति खलु प्रतिष्ठितोऽर्थः।
तत्राप्यस्ति विवेक एवमुपदिशति तस्य कोऽन्यः।।)

अर्थ :- ज्याप्रमाणे तुमची स्थिती आहे त्याप्रमाणे तुम्ही निश्चिंत अथवा अव्याकुल होऊन प्रतिष्ठित अथवा स्थिर व्हा. हाच विवेक आहे. अशा प्रकारचा उपदेश (सिद्धयोग्याशिवाय) दुसरा कोणी देऊ शकेल काय?।।६४।।

विशेष :- साधकयोग्याने यथास्थित अथवा ज्या स्थितीत असेल तसे निःशंक आणि निर्भय होऊन राहिले पाहिजे. साधकयोग्याने कधी बहिर्मुख अर्थात् प्रपंचादि वस्तूंमध्ये अनुरक्त आणि कधी अंतर्मुख होऊन स्वात्मपरायण असे होऊ नये. ही एक प्रकारची मानसिक अस्थिरता आहे. संकल्प व

विकल्पांच्या स्थितीत चित्त कधीही एकाग्र होऊन आत्मस्वरूपामध्ये प्रतिष्ठित किंवा स्थिर होऊ शकत नाही. विकल्पमय चिंतेचे अतिक्रमण करून निश्चिंत आणि व्याकुलतारहित होण्यामध्येच विवेक आहे. या विवेकापेक्षा आणखी जास्त काय आहे? असा या ग्रंथात उपदेश केलेला आहे. सर्व काही श्रीशिव-स्वरूप किंवा श्रीशिवमय आहे. काय आहे आणि काय नाही या प्रपंचात न पडता श्रीशिवस्वरूप स्वात्म्यात अर्थात् स्वसंवेद्य परमतत्त्वामध्ये प्रतिष्ठित होणे हेच साधनामय जीवनाचे उपदेशामृत आहे. अशा प्रकारच्या निश्चिंत अवस्थेलाच योग्याचा स्वभाव असे म्हटले आहे. चिद्विकासानेच आंतरिक आणि बाह्य विकारांचे शमन केले पाहिजे. हीच आत्मप्रतिष्ठा आहे.

परिमलव्याख्यार्थ :- जरी आणवादि उपायांमध्ये भेदज्ञानाच्या संबंधामुळे विकल्पावस्थेमध्ये त्या आणवांचा प्रवेश सांगितला आहे तथापि आणवांमध्ये विकल्पांचे आधिक्य, शाक्तोपायात त्यांचे केवळ स्फुरण व शांभोवापायात हे सर्व विकल्प नष्ट होतात अर्थात् त्यांचा अभाव उत्पन्न होतो. अभाव म्हणजेच निर्विकल्पकत्व होय. त्यामुळेच तर सिद्धयोगिजनांची निर्विकल्पकता किंवा निश्चिंतता अप्रतिहत किंवा निरंतर असते. जर शांभवोपाय हाही उपायच असल्याने सूक्ष्म दृष्टीने पाहता अल्पसा विकल्प तेथे असणे अपरिहार्य आहे असे कोणी म्हणेल तर शांभवोपाय हा निरुपाय म्हणजे उपायरहित तत्त्वाकडे जाणारा असल्याने किंवा त्याच्या अगदी जवळ असल्याने तो शुद्धसंविद्रूप आहे. त्यामुळे त्या ठिकाणी विकल्पस्पर्श असूच शकत नाही. त्याचप्रमाणे शास्त्रात असे म्हटले आहे की -

यथा स्थितस्तथैवास्स्व मा गा बाह्यमथान्तरम्।
केनचिच्चिद्विकासेन विकारनिकरान् जहि।।

अर्थ :- तू जसा आहेस तसाच राहा. बाह्य मतमतांतराकडे पाहू नकोस अथवा जाऊ नकोस अर्थात् बाहेरही जाऊ नकोस आणि आतही राहू नकोस. कोणत्या तरी चिद्विकासाच्या प्रसादाने विकारसमूहावर विजय मिळव.

या प्रसिद्ध उक्तीप्रमाणे म्हणजेच तुला जेवढा जसा उपदेश मानवला असेल अथवा कळला असेल त्याच रीतीने विकल्पाची चिंता टाकून अगदी बेफिकीर वागत जा. अरे! असे वागणे म्हणजे शांभव उपायाकडे जाणेच होय; कारण याही वागण्यात काही ज्ञान, काही दृष्टी किंवा विचार आहेच. या रीतीने केलेला उपदेश किंवा रहस्य-प्रकाशन-भेदराहित्यासाठी व विकल्पाच्या अभावासाठी असल्याने येथे "उपदेशकर्ता कोण? कसला उपदेश?" इत्यादींचा

अभावच असल्यामुळे "आहे त्या स्थितीत राहा," असा रोखठोक उपदेश केला आहे; कारण वास्तविक यात उपदेश्य व उपदेशक असा भेद नाहीच. कोणी असे म्हणेल की, अशा अनेक तंत्रग्रंथांमधून अनेक कल्पनांचा विस्तार व भेदाभेदविचार कशासाठी केला आहे? त्यावर आम्ही असे म्हणतो की, ते औपचारिक आहे. कारण श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांनी "**श्रीत्रिंशिका-शास्त्र**" या ग्रंथारंभी असे म्हटले आहे की, "**श्रीदेव्युवाचेत्यादौ स्वात्मदेवतैव प्रबुध्यमानावस्थायामात्मानं परामर्शेनानवरतं पृच्छति।**" अर्थात् "श्रीदेवी उवाच इत्यादि स्थळी स्वात्मदेवताच जागृत अशा परमात्म्याला निरंतर प्रश्न करते म्हणजेच जीवच श्रीशवांना विचारतो."

"**श्रीस्वच्छंदतंत्र**" या ग्रंथातही असे म्हटले आहे की -

गुरुशिष्यपदे स्थित्वा स्वयं देवः सदाशिवः।

अर्थ :- श्रीगुरू आणि शिष्य या स्वरूपात स्वतः श्रीशवच स्थित असतात.

("**माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव। आपणचि देव होय गुरू।।**" असे श्रीसंततुकाराममहाराजांनी म्हटले आहे. त्यामुळे योग्याची निर्भयता ही जन्मसिद्धच आहे, असे या सगळ्याचे तात्पर्य आहे.) सर्व रूपाने नटणाऱ्या परमेश्वराच्या प्रकाशाने उजळून पावन झालेल्या व तादात्म्य पावलेल्या या प्रपंचात आत्म्याच्या सावधान व अनवधानाचा कल्पनाप्रकार व विचार शेवटी निष्फल व निष्प्रयोजनच ठरतो.

यासंबंधी "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

त्यजावधानानि ननु क्व नाम धत्सेऽवधानं चिनुहि स्वयं तत्।
पूर्णेऽवधानान्नहि नाम युक्तं नापूर्णमभ्येति च सत्यभावः।।

अर्थ :- तू विचारांचा त्याग कर. विचार म्हणजे काय? याचा तू स्वतः शोध घे. पूर्णाच्या ठिकाणी अवधानता राहत नाही व अपूर्णाला सत्यभाव प्राप्त होत नाही.

शिवाय "कोण कोणाला कसला उपदेश करतो?" या गाथावचनावरून पाहता तत्त्वदृष्ट्या या उपदेशादि प्रकाराला अतात्त्विकत्वच येते असे सुचविले नाही काय? त्यामुळे स्वात्मरूप परमेश्वर पूर्णच असल्याने त्याच्याविषयी कोणत्याही कल्पनाच जुळत नाहीत. त्यामुळे "परमेश्वर असा आहे, परमेश्वर तसा आहे," या कल्पनांना काहीच अर्थ नाही. आत्म्यात अंतर्बाह्य विभागच पडत नाहीत; मग "**चलित्वा यास्यते कुत्र सर्वं शिवमयं यतः।**" अर्थात्

"सर्व श्रीशिवमयच असल्याने कोठून कोठे जाणार?" या उक्त्यनुरूप गमन व आगमन जुळत नाही तद्विरुद्ध "बसणे व राहणे" वगैरे या क्रियेला औपचारिक म्हटले ते निर्विवाद होय. **"पुरुषश्च उत्तमावधिः"** अर्थात् "परमात्मा हाच उत्तम अवधी म्हणजे शेवट आहे." या न्यायाने "अहम्" म्हणजे मी या अर्थावाचून "युष्मत्" म्हणजे तू शब्दाच्या अर्थाला असत्यत्व अपरिहार्य आहे. **"क्वचित् सतः क्वचिन्निषेधः।"** अर्थात् "कधीतरी असणाऱ्याचा कधीतरीच निषेध होतो" अर्थात् जे अस्तित्वात नाही त्याचा निषेध असणेही शक्य नाही" या न्यायाने चिंताच नाही तर निर्विचारता किंवा निश्चितता कुठली? अशा रीतीने "आस्व" "आहे त्या स्थितीत राहा," असा विधी आहे. आज्ञाकारी शब्दार्थ अप्रवृत्तीची प्रवृत्ती सांगणारा असल्याने विशेष जुळणारा नाही असे युक्तीने जाणावे.।।६४।।

*****

गाथा क्रमाङ्क ६५

अवतरणिका :- अशा रीतीने सिद्धयोग्यांच्या आश्चर्यकारी निश्चित स्वभावाचे वर्णन करीत आपणही त्यांच्याहून वेगळे नसून तसेच आहोत म्हणजे त्याच आनंदातिशयाचा अनुभव घेणारेच आहोत याचे दर्शन ग्रंथकार स्वतः आत्मज्ञानगौरवाने पुष्ट होऊन (इतरांना) घडवितात म्हणजेच या गाथेत आत्मानुभव सांगताना ते असे म्हणतात की -

ओ संसारसुहेल्लो ओ सुलहं मोक्खमग्गसोहग्गं।
खुडिआअङ्ककलङ्का ओ सिवजोईणं जामली सिद्धि।।६५।।
(अहो संसारसुखातिशयः अहो सुलभं मोक्षमार्गसौभाग्यम्।
त्रुटितातङ्ककलङ्का अहो शिवयोगिनां यामली सिद्धिः।।)

अर्थ :- अरे! संसाराचे सुख अतिशय आहे आणि मोक्षमार्गाचे सौभाग्यही सुलभ आहे. यांमध्ये कोणत्याही तऱ्हेचे भय नाही. हीच श्रीशिवयोग्यांची भोगमोक्षसामरस्याने युक्त अर्थात् श्रीशिवशक्तिसामरस्यानुग्रहाने युक्त अशी यामली सिद्धी आहे.।।६५।।

विशेष :- जे जन्ममरणादींच्या रूपात मनुष्यासाठी दुःखकारक आहे ते संसारसुख किती आश्चर्यकारक आहे. अशा प्रकारेच परमेश्वराच्या अनुग्रहस्वरूप मुक्तिमार्गाचे अन्वेषण अर्थात् शोध सुलभ किंवा सहज आहे. सिद्धयोग्यासाठी तर समस्त जगत् श्रीशिवस्वरूप आहे. त्याच्यासाठी भोग आणि मोक्ष या दोन्हीही गोष्टींमध्ये परमेश्वराचा अनुग्रह प्राप्त असतो. त्यामुळेच

भोगमोक्षसामरस्य त्याच्यासाठी आतंकरहित आहे. त्याच्यामध्ये कोणत्याही प्रकारे भीतीसाठी स्थान असत नाही. हीच परमात्म अनुग्रहमयी स्वच्छ व निर्मल सिद्धी आहे. सिद्धी म्हणजेच स्वस्वभावाच्या चमत्काराची स्फुरत्ता होय. श्रीशांकरमार्गात अर्थात् श्रीशिवयोगात दु:ख हे सुख होते, विषय हे अमृतस्वरूप होतात व संसार हा मोक्षप्रद होतो; कारण की, या मार्गावर जाणाऱ्या किंवा चालणाऱ्या श्रीशिवयोग्यांच्या दृष्टीमध्ये सर्वत्र श्रीशिवच अभिव्यक्त होतात. त्यांच्यासाठी भोगमोक्षसामरस्य कोणत्याही प्रकारे भीतिप्रद अथवा भयंकर ठरत नाही. हीच यामली सिद्धी आहे.

परिमलव्याख्यार्थ :- हे संसारसुख किती श्रेष्ठ आहे; पण सामान्यजनाला जन्ममरणादि संबंधामुळे हा संसार दु:खमय वाटतो, हे आश्चर्यच नव्हे काय? जरी (सर्वांनी) हा संसार त्याज्य ठरविला तरी तो आम्हाला मोक्षसुखाप्रमाणे आस्वाद्य वाटतो.

यासंबंधी **"श्रीमत्स्तोत्रावली"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

दु:खान्यपि सुखायन्ते विषमप्यमृतायते।
मोक्षायते च संसारो यत्र मार्ग: स शाङ्कर:।।

अर्थ :- या श्रीशांकरमार्गात दु:खे ही सुखमय होतात, विष हे अमृतस्वरूप बनते व संसार हा मोक्षमयच होतो.

या ठिकाणी दुसरेही आश्चर्य असे आहे की, ज्याचा सर्व लोक शोध करतात व जो परमेश्वराच्या अनुग्रहानेच मिळतो अशा मोक्षाचा आनंद (या सिद्धयोगमार्गात) अगदी सुलभतया अनुभवाला येतो. **"अदृष्टमण्डलोऽप्येतत् तिलाद्याहुतिवर्जितम्।"** अर्थात् "तिलादिकांच्या आहुतीशिवाय प्रखर अग्नीप्रमाणे असणे," हा या **"श्रीत्रिंशिकाशास्त्र"** आदि ग्रंथातील उदाहरणांप्रमाणे मोक्षानंद सहज मिळतो. जो आनंद विषयसेवन व मांस खाणे इत्यादि सांसारिक गोष्टींनीही उपलब्ध होतो तोच आनंद या मोक्षामुळे अनुभवाला येतो.

यासंबंधी श्रीमहावनमुनी यांनी असे म्हटले आहे की -

अलिपिशितपुरन्ध्रीभोगपर्याकुलोऽहं
बहुविधकुलयोगारम्भसम्भावितोऽहम्।
पशुजनविमुखोऽहं भैरवीसंश्रितोऽहं
गुरुचरणपरोऽहं भैरवोऽहं शिवोऽहम्।।

अर्थ :- मी नाना प्रकारचे विषयभोग भोगून व्याकुल व तुष्टही आहे, कुलधर्म व कुलाचार पाळणारा आहे, पशू म्हणजे सांसारिक गोष्टींकडे पाठ

करून बसलेलो आहे, श्रीभैरवीचा अर्थात् शक्तीचा आश्रित आहे आणि श्रीसद्गुरुपदसेवक आहे. इतके असून श्रीभैरव व श्रीशिवही मीच आहे.

याच रीतीने परस्परविरुद्धत्व प्रतिपादन करून तराजूप्रमाणे समत्व-दर्शक अर्थात् सारखेपणा दाखविणारे एकात्मकत्व सहेतुक **"त्रुटितातङ्क"** या पदांनी सांगतात.

श्रीशिवयोगी कसे असतात हे **"श्रीमत्स्तोत्रावली"** या ग्रंथात पुढील-प्रमाणे सांगितले आहे.

न ध्यायतो न जपतः स्याद् यस्याविधिपूर्वकम्।
एवमेव शिवाभासस्तं नुमो भक्तिशालिनम्।।

अर्थ :- जो विधिपूर्वक ध्यान व जपादि काहीच करीत नाही; परंतु श्रीशिवांप्रमाणेच असतो त्या श्रीशिवभक्तीने शोभणाऱ्या सिद्धयोग्याला आम्ही स्तवितो व वंदितो.

या वर्णनाप्रमाणे श्रीशिवयोगी प्राणायाम व ध्यानादिक्रियेत न पडता प्रकाशरूप श्रीशिवांशी विमर्शाचा नित्य संबंध ठेवणारे असतात. त्यांची आत्मस्वभावरूप चमत्काराच्या आकाराची स्फुरत्ता ही सिद्धी असते. तिला "यामली" असे म्हणतात. तिच्यात वेद्य व वेदक अशा उभयस्वभावी सृष्टीचा अंतर्भाव असतो.

या दृष्टीने **"श्रीतंत्रशास्त्र"** या ग्रंथात असे म्हटले आहे की -

यस्योन्मेषनिमेषाभ्यां जगतः प्रलयोदयौ।
तदन्तः कालयोगेन सोमसूर्यौ प्रकीर्तितौ।
ज्ञानक्रियात्मनोः शम्भुमरीच्योर्मेलनात्मकम्।

अर्थ :- ज्यांच्या अर्थात् श्रीशिवांच्या उन्मेष व निमेषामुळे जगाची उत्पत्ती व नाश होतो त्यांच्याच अंतरात कालरूपतेमुळे चंद्र व सूर्य प्रकाशरूपतेला पावतात. श्रीशंभुकिरणरूप ज्ञानक्रियांच्या मेलनाने ही यामली सिद्धी होते.

असे अनेक आम्नायातून अर्थात् वेदांमधून सांगितल्याप्रमाणे संकोच-विकासरूप आणि ज्ञातृत्व व कर्तृत्व हे ज्याचे प्रतिशब्द आहेत अशा प्रकाश व विमर्शाची समरसता ज्यात आहे ते यामलसिद्धीचे स्वरूप आहे. हेच श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांनी असे सांगितले आहे की, **"तत्र ज्ञाता नामोन्मेष-निमेषलक्षणेन सङ्कोचविकासात्मना ज्ञानक्रियालक्षणेन स्वभावेन स्वपरि-स्पन्दनसार एव"** अर्थात् "ज्ञाता म्हणजे उन्मेष व निमेष, संकोचविकास व ज्ञानक्रिया हाच ज्यांचा स्वभाव आहे असे परिस्पंदनाचे सारच होय." या

यामलाचा एक भाग श्रीपरभैरवाच्या संवित्स्वातंत्र्यापर्यंत व दुसरा भाग अत्यंत जड घटादिकांच्या प्रकाशनापर्यंत स्फुरण पावतो. यात आत्मरूपाचा आविर्भाव व विश्रांती आहे. "**अ इति ब्रह्म तत्रागतमहम्**" अर्थात् "अ म्हणजे ब्रह्म, त्यात आलेले अहम्" अशी "**ऐतरेयोपनिषद्**" या ग्रंथात आलेली निरुक्ती आहे. याप्रमाणे पाहता नित्योद्योगस्वरूपाचे श्रीशिवशक्तीचे संमेलन आहे म्हणून हे "**श्रीरुद्रयामल**" आहे. "**श्रीत्रिंशिकाशास्त्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**इत्येतद् रुद्रयामलम्।।**" अर्थात् "हेच अशा प्रकारचे रुद्रयामल होय." याला कारण किंवा हेतू "**त्रुटितातङ्ककलङ्कत्वम्**" हा सांगितला आहे. आतंक म्हणजे शंकेमुळे झालेले आश्चर्य होय. शंका ही आत्मरूपाच्या एकरसत्वामध्ये विघ्नरूपिणी आहे. हे दोषरूप किंवा कलंक-रूप आहे; कारण यामुळे निर्मल आत्मरूपात मलिनतेचा संबंध लादला जातो. ही आतंकव्याधी यामलीसिद्धीने नष्ट होते म्हणजेच वासनाक्षय झाला की, त्यावेळेला यामली सिद्धी मिळते हा इत्यर्थ होय. श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांनी असे म्हटले आहे की, "**न त्वत्र विद्याव्रतादि किञ्चित् सहकारिभावेनोपयोगि। केवलं परीक्षणशङ्कातङ्कत्वमत्रोपयोगि**" अर्थात् "येथे विद्याव्रतादि सहकारी भावनेने उपयोगी नसून केवळ परिक्षणशंका ही आतंकत्वाने उपयोगी आहे." "**ओ**" हे पद येथे आश्चर्यद्योतक आहे.

या दृष्टीने "**श्रीसंविदुल्लास**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

दर्शनान्तरकान्तारकण्टकद्रुमकोटरात्।
किरातः कोऽपि कूटस्थो दत्ते मन्त्रामृतं मधु।।

अर्थ :- अनेक दर्शनरूप अर्थात् शास्त्ररूप अरण्यातील काटेरी वृक्षांच्या बुंध्यातून कूटस्थ अर्थात् आत्मा नावाचा कोणी भिल्ल मंत्रामृतरूप मध (सर्वांना) देतो.

या उपरोक्त ग्रंथातील वचनाप्रमाणे व्रत व उपवासादि कष्टप्रद उपायांनी भरलेल्या अनंत शास्त्रांनी जखडलेल्या या प्रपंचात योग्यमार्ग कथनात कुशल व परम कारुणिक परमेश्वराने आम्हाला यामली सिद्धी बहाल केली आहे.

ही सिद्धी "**श्रीकुलगह्वरादि**" ग्रंथात पुढील रूपात वर्णिली आहे.

यत् तदक्षरमव्यक्तं प्रियाकण्ठेऽप्यवस्थितम्।
ध्वनिरूपमनिच्छं तु ध्यानधारणवर्जितम्।।
तत्र चित्तं विधायैवं वशयेद् युगपज्जगत्।

अर्थ :- प्रियेच्या कंठात अर्थात् शक्तीत किंवा स्त्रीत असलेले अव्यक्त,

अक्षर, ध्वनिरूप, अनिच्छ म्हणजे सहज अर्थात् अजपाजप, धारणा व ध्यानरहित जे तत्त्व आहे तेथे चित्त स्थिर करावे व सर्व जगत् एकदम ताब्यात घ्यावे.

या सूत्रावरून या सिद्धीत भोग व मोक्ष यांची समरसता असल्याचे सांगितले.

यासंबंधी "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात प्रमाणवचन असे आहे की -

"अस्यां भूमौ सुखं दुःखं बन्धो मोक्षश्चितिर्जडः।
घटकुम्भवदेकार्थाः शब्दाः" इति।।

अर्थ :- या भूमिकेत म्हणजे सिद्ध्यवस्थेत सुख-दुःख, बंध-मोक्ष, चेतन-जड आदि शब्द घट-कुंभ या शब्दांप्रमाणे एकार्थी किंवा समानार्थी आहेत.।।६५।।

*****

गाथा क्रमाङ्क ६६

अवतरणिका :- "या निर्भय व ज्ञानानंदात्मक पुरुषार्थप्राप्तीविषयी व उत्कर्षाविषयी एखादी तीव्र उपासना आवश्यक आहे. ती आमच्यासारख्यांना ताबडतोब जमणारी नाही. फक्त या सिद्धींचे वर्णन कानाला आह्लाददायक आहे. ते हृदयापर्यंत पोहोचणारे व अनुभवात पर्यवसित होणारे नाही," अशी शंका उत्पन्न केली असता ग्रंथकार या गाथेत त्याचे उत्तर देताना असे म्हणतात की -

खणमेत्तफंसिएण वि अमअसहावेण णेण भावेण।
सव्वोत्तिण्णो सव्वो सव्वइरं लहइ सव्वसोहग्गं।।६६।।
(क्षणमात्रस्पृष्टेनाप्यमृतस्वभावेनानेन भावेन।
सर्वोत्तीर्णः सर्वः सर्वचिरं लभते सर्वसौभाग्यम्।।)

अर्थ :- या अमृतस्वभावरूप भावाचा क्षणमात्रभरसुद्धा स्पर्श झाल्यावर योगिसाधकभक्तशिष्य सर्वोत्तीर्ण होतो अर्थात् तो सर्व बंधनांपासून विमुक्त होऊन जातो आणि सर्व सौभाग्ये कायमची प्राप्त करून घेतो.।।६६।।

विशेष :- श्रीसद्गुरूंच्या कृपाकटाक्षाने साधक क्षणातच अमृतस्वभावरूप जीवन्मुक्ती, महान् उपभोग आणि परमाह्लादाने युक्त होऊन जातो. अशा प्रकारे तो नित्य आत्मानंदाचा रसास्वादन करणारा होतो. हाच अमृतस्वभाव आहे. या जीवन्मोक्षरूप नित्य अमृतस्वभावाने क्षणभरातच योग दृढ होतो आणि पशुरूप जीव पाशरूप बंधनातून पशुपती श्रीशंकरांकडून विमुक्त केला जातो.

तो शुद्ध चैतन्यभावाला प्राप्त होतो.

परिमलव्याख्यार्थ :- वर उल्लेख केलेली व "स्वहृदय स्फुरत्ता" हे जिचे दुसरे नाव आहे अशी अवस्था म्हणजे महासत्ता होय.

यासंबंधी "**श्रीरत्नमाला**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

यस्मिन् काले तु गुरुणा निर्विकल्पं प्रभाषितम्।
तदैव किल मुक्तोऽसौ यन्त्रं तिष्ठति केवलम्।।

अर्थ :- ज्यावेळी श्रीसद्गुरू "तू निर्विकल्प आहेस," असा शिष्याला उपदेश करतात त्याचवेळी तो शिष्य कैवल्यरूप मुक्ती प्राप्त करतो.

या वचनानुसार साधकभक्तयोगिशिष्य महासत्ता प्राप्त करू शकतो. श्रीसद्गुरूंचा कृपाकटाक्ष टाकण्याचाच काय तो अवकाश! म्हणजे एका क्षणातच साधकभक्तयोगिशिष्याला मुक्ती प्राप्त होते. तेवढ्यात तो सामान्यासारखा सृष्टिगत मानवाकाराचा असून अमृतरूप चिदानंदाचा व विषयभोगाचा असा दुहेरी अनुभव घेऊन एकरूप होतो व भोगमोक्षानुभवी बनतो किंवा श्रीसद्गुरुकृपेनेच नित्यामृताचा भोक्ता होतो. हेच "**श्रीत्रिंशिका-शास्त्र**" या ग्रंथात "**अस्योच्चारे कृते०।**" पासून "**फलं यद्वासमीहितम्०।**" पर्यंतच्या वर्णनात अर्थात् सूत्रात सांगितले आहे. त्यातील विशेष असा आहे की, जसजसे अधिक साधन होईल अर्थात् सिद्धयोगसाधनाभ्यास दृढ होत जाईल तसतसा प्रकाशविमर्शानुभव दृढ होत जाईल (असाही अर्थ लावता येईल.) अशा भावनेने ज्ञातृवर्ग म्हणजे ज्ञाते किंवा सिद्ध पुरुष पशुत्व व मनुष्यत्व, जीवत्व व मुक्तत्व आणि जडत्व व चेतनत्वादि तरतमभावाने रहित होतो म्हणजे श्रीशिवरूप होतो. "**समनान्तं पाश-जालमुन्मन्यन्ते परः शिवः।**" अर्थात् "समनस्कावस्थेत सर्व पाश असतात; मात्र उन्मनी दशेत तो अर्थात् सिद्धयोगी पाशमुक्त होऊन श्रीपरमशिवत्व पावतो," या उक्तीप्रमाणे तो सिद्धयोगी बंधोत्पादक विश्वविलासापासून मुक्त होऊन शुद्ध व चिद्रूप होतो आणि दीर्घकाल सर्व सुखांचा उपभोक्ता होतो.

याकरिता "**श्रीलघुबृंहणीय**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

ब्रह्मायुषो दशगुणं विष्णोरायुः परं स्मृतम्।
सहस्रगुणितं तस्माद् रुद्रस्यायुः परं किल।।
तस्माल्लक्षगुणं प्रोक्तमीश्वरस्यायुरुत्तमम्।
तस्मात् सदाशिवस्यायुः प्रोक्तं कोटिगुणं बुधैः।।

समुद्रगुणितं तस्माच्छिवयोर्देहधारणम्।

अर्थ :- श्रीब्रह्माच्या आयुष्यापेक्षा श्रीविष्णूचे आयुष्य दहापट आहे. श्रीरुद्राचे आयुष्य त्याच्यापेक्षा सहस्रपट आहे. त्यापेक्षा ईश्वराचे आयुष्य लक्षपट आहे. त्याच्यापेक्षाही श्रीसदाशिवाचे आयुष्य कोटीपट आहे असे विद्वानांनी संगितले असून त्याच्यापेक्षाही श्रीशिवांचे आयुष्य समुद्रपट आहे.

त्यापैकी ब्रह्म्यापासून पाषाणादि जड पदार्थापर्यंत "इदंता" आणि ब्रह्म्यापासून श्रीपरमशिवरूप चिच्छक्तीपर्यंत "अहंता" या महान् कालखंडातील सर्वप्रकारच्या संपत्तीचे सौभाग्य त्या सिद्धयोग्याला लाभते. तो विश्वगत व विश्वबाह्य सर्वसमत्वरूप रसाचा आस्वाद घेतो व श्लाघ्यतम होतो. याचा तात्पर्यार्थ असा आहे की, श्रीसद्गुरूंची कृपादृष्टी होताक्षणीच मानवांना स्वहृदयाला अनुकूल व स्वतःला भूषविणारा जीवन्मुक्तिरूप पुरुषार्थाचा लाभ होतो. याविषयी कोणाचे दुमत नाही. "**श्रीत्रिंशिकाशास्त्र।**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**सद्यः कौलिकसिद्धिदम्।**" अर्थात् "तत्काळ कौलिक सिद्धी देणारे" आणि "**सद्यो योगविमोक्षदम्।**" अर्थात् "तत्काळ योग आणि मोक्ष देणारा" असा श्रीसद्गुरुकृपेचा महिमा असतो असे वर्णन केले आहे. श्रीअभिनवगुप्तपादाचार्य यासंबंधी असे म्हणतात की, "**एतद् यो लभते स लाभकाल एव न पशुः।**" अर्थात् "**हे ज्याला मिळते अर्थात् श्रीसद्गुरूंच्या कृपेने ज्याला शक्तिपात होतो तो झाल्याक्षणीच साधक पशुत्वाला किंवा जीवत्वाला मुकतो.**" त्याचप्रमाणे बाह्य अणिमादि ऐश्वर्य त्याला अंतःस्फुरणाबरोबरच मिळते व त्याला सर्वज्ञताही येते. श्रीअभिनवगुप्तपादाचार्यांनी यासंबंधी "**श्रीत्रिंशिका**" या शास्त्रात असे म्हटले आहे की, "**एतदभ्यस्यतः सिद्धिः सर्वज्ञत्वमवाप्यते**" अर्थात् "**याचा म्हणजे शक्तिपातयोगाचा किंवा सिद्धयोगाचा अभ्यास केला असता सिद्धी आणि सर्वज्ञत्वाची प्राप्ती होते.**" त्याचप्रमाणे तेथेच असे म्हटले आहे की, "**अभ्यासेन विनापि जीवन्मुक्तता परा कौलिकी सिद्धिः।**" अर्थात् "अभ्यास न करताही श्रीसद्गुरुकृपेने जीवन्मुक्तता आणि श्रेष्ठ कौलिकी सिद्धी मिळते." क्षणमात्र म्हणजे एक क्षणभराचा परामर्श होय. हा एका क्षणाच्या श्रीसद्गुरूंच्या कृपेने होतो. "**श्रीशिवदृष्टी**" या ग्रंथात "**सकृज्ज्ञाते सुवर्णे मा भावनाकरणं व्रजेत्।**" अर्थात् "सुवर्ण एकदा जाणले की, भावनेची गरज नाही," असे म्हटल्याप्रमाणे बाह्य पदार्थातही तो परामर्श क्रियाकारी होतो; मग स्वात्मरूप परमेश्वरात होईल हे सांगावयाला नकोच.

यादृष्टीनेच "**श्रीशिवसृष्टी**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

एकवारं प्रमाणेन शास्त्राद् वा गुरुवाक्यतः।
ज्ञाते शिवत्वे तत्रस्थप्रतिपत्त्या दृढात्मना।।
करणेन नास्ति कृत्यं क्वापि भावनयापि वा।

अर्थ :- एकवेळ प्रमाणाने शास्त्रांपासून किंवा श्रीसद्गुरुवाक्यांपासून श्रीशिवत्वाचे दृढ ज्ञान झाले असता इंद्रियांनी अथवा भावनेनेही काहीही करणे शिल्लक राहत नाही.

अनेक शास्त्रगत पदपदार्थविचाराने ग्रंथ वाढेल म्हणून इतकेच पुरे. सर्वसमत्त्वप्रतिपादक "**श्रीमहार्थसिद्धान्तोपनिषत्**" असे आहे. याविषयी आगमात असे म्हटले आहे की -

समता सर्वभावानां वृत्तीनां चैव सर्वशः।
समता सर्वदृष्टीनां द्रव्याणां चैव सर्वशः।।
भूमिकानां च सर्वासामोवल्लीनां च सर्वशः।
समता सर्वदेवानां वर्णानां चैव सर्वशः।।

अर्थ :- (ज्यावेळी सिद्धयोग्याला श्रीशिवशक्तिसामरस्यरूप ही स्थिती प्राप्त होते त्यावेळी त्याला) सर्व भाव, वृत्ती, दृष्टी, द्रव्य, भूमिका, देव व वर्ण या सर्वांविषयी समता (प्राप्त) होते.।।६६।।

******

गाथा क्रमाङ्क ६७

अवतरणिका :- अशा प्रकारे अनायासे किंवा कोणतेही प्रयत्न न करता मिळणारा हा परमपुरुषार्थ सर्व जीवांना इतका सुलभ आहे असे जर म्हटले तर मुक्त व बद्ध असा जीवांचा जो व्यवहार होतो त्याची वाट काय? यावर ग्रंथकारांनी असे उत्तर दिले आहे की -

गूढादो गूढअरो होइ फुडादो वि फुडअरो एसो।
देसिअकडक्खपादे पक्खो पुढमो ण होइ धण्णाणं।।६७।।
(गूढाद् गूढतरो भवति स्फुटादपि स्फुटतर एषः।
देशिककटाक्षपाते पक्षः प्रथमो न भवति धन्यानाम्।।)

अर्थ :- सौभाग्यशाली साधकभक्तयोगिशिष्यांचा श्रीसद्गुरूंच्या केवळ कृपाकटाक्षाने अर्थात् शक्तिपाताने अत्यंत गूढापासून गूढतरापर्यंत, स्पष्टापासून स्पष्टतरापर्यंत व्यक्त व अव्यक्त, क्षर व अक्षर आणि प्रकट व अप्रकट असा द्विविधात्मक व उभयात्मक व्यवहार समाप्त होऊन जातो. ते म्हणजे सौभाग्यशाली

साधकभक्तयोगिशिष्य सिद्ध होऊन श्रीशिवस्वरूपात प्रतिष्ठित होतात आणि याच जन्मात कृतार्थ होऊन जातात. (श्रीसद्गुरूंचा कृपाकटाक्षपात अर्थात् शक्तिपातयोगदीक्षा होऊन अनादि निद्रिस्त आत्मचैतन्यशक्ती कुंडलिनी जागृत झाल्याने त्यांच्यासाठी द्विविधात्मक स्थितींची शंकाच राहत नाही. त्यांचा तोच जन्म अंतिम जन्म असतो. ते अमृततत्त्वामध्ये प्रतिष्ठित होतात.)

विशेष :- श्रीसद्गुरूंच्या कृपाकटाक्षपातस्वरूप प्रसादाने किंवा अनुग्रहाने अर्थात् शक्तिपातयोगदीक्षा होऊन अनादि निद्रिस्त आत्मचैतन्यशक्ती कुंडलिनी जागृत झाल्याने साधकभक्तयोगिशिष्याला परमपदाची प्राप्ती होते; कारण परत त्याला जन्ममरणरूप पाशात किंवा बंधनात यावे लागत नाही. तो सिद्धयोगी श्रीशिवस्वरूपच होऊन जातो. गुह्यतर व गूढतर म्हणजे अत्यंत गुह्य होय. श्रीसद्गुरूंचा कृपाकटाक्षपात शिष्याला परममोक्ष प्रदान करून त्याचा पशुभाव किंवा जन्ममरणरूप बंधन छिन्न-भिन्न करून टाकतो. श्रीसद्गुरूंच्या हृदयात साक्षात् श्रीशिवच अनुप्रविष्ट झालेले असतात. त्यामुळे श्रीसद्गुरूंचा अनुग्रह श्रीशिवस्वरूपच असतो आणि साधकभक्तयोगिशिष्यही श्रीशिवरूपात प्रतिष्ठित झालेला असतो. श्रीसद्गुरूंच्या दीक्षेने जीव बंधनमुक्त होतो.

परिमलव्याख्यार्थ :- प्रकरणानुरोधाने याचा म्हणजे जीवन्मोक्षरूप पुरुषार्थाचा विचार केल्यास स्थूल व सूक्ष्म, प्रकट व गुप्त, व्यक्त व अव्यक्त आणि क्षर व अक्षरादि रूपाने श्रीविष्णुपुराणात सांगितलेल्या प्रक्रियेनुसार प्रकट व अप्रकट अशा दोन अवस्था त्यात पडतात. स्तंभकुंभादिव्यवहार हा स्पष्ट व वेदान्तादि अर्थतत्त्व अस्पष्ट होय.

या दृष्टीने "**श्रीत्रिंशिका**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

एतद् गुह्यं महागुह्यं कथयस्व मम प्रभो।

अर्थ :- हे प्रभो! मला हे अत्यंत गूढ (असे तत्त्व) सांगा.

आकाशपुष्प अत्यंत अस्फुट आहे. त्यापेक्षा स्तंभ दृश्यमान असून कुंभादि प्रपंच त्याहून स्पष्ट आहे. हे आम्ही "**सः कस्य स्फुटो न भवति कुलनाथः।** या गाथेत विस्ताराने सांगितले आहे. अस्पष्ट व स्पष्ट असा द्विविधस्वभाव त्या वस्तूच्या स्वातंत्र्यामुळेच असून इतर कोणत्याही गुणामुळे तसा द्विविध स्वभाव असणे शक्य नाही. असे जर आहे तर मुक्त आणि बद्ध यांची उपपत्ती कशी काय शक्य आहे? असा प्रश्न जर विचारला तर त्याचे उत्तर "विषयविभागामुळे ते शक्य आहे" असे आहे. कुलगुरूंच्या शक्तिपातरूप दृष्टिपाताने भाग्यवंतांना म्हणजेच ज्या साधकभक्तयोगिशिष्यांना परत जन्म

मिळणार नाही अशांना प्रथम पक्ष म्हणजे गूढतरता संभवत नाही; तर त्यांना सर्व स्पष्टतर असते व दिसते; कारण त्यांना "**दीयते शिवसद्भावः क्षप्यते पाशसञ्चयः।**" अर्थात् "पापनाशपूर्वक श्रीशिवभाव दिला जातो," या उक्ती-प्रमाणे त्यांना दुसरा पक्ष म्हणजे स्पष्टतरत्व संभवते. श्रीसद्गुरुकृपालाभाने धन्य झालेल्यांना श्रीपरमशिवरूप मोक्ष मिळतो आणि इतरांना बंध म्हणजेच जीवभावत्व मिळते अशी व्यवस्था आहे. आत्मरूपरहस्याचे उपदेशक जे श्रीसद्गुरू त्यांच्या शरीरात प्रविष्ट झालेला परमेश्वरच करुणेने औपाधिक प्रमातृरूप जीवाला अर्थात् शिष्याला तारून नेतो.

यासंबंधी आगमामधून असे म्हटले आहे की -

कुलाचार्यमधिष्ठाय देवो दीक्षयिता शिवः।

अर्थ :- कुलाचार्यांमध्ये अधिष्ठित होऊन प्रत्यक्ष देव श्रीसदाशिवच दीक्षा देणारे आहेत.

या दृष्टीने "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

गुरुहृदयनिविष्टः शङ्करोऽनुग्रहीता।
एतेन -
दीक्षया मुच्यते जन्तुः प्रातिभेन तथा प्रिये!।
गुर्वायत्ता तु सा दीक्षा बद्धबन्धनमोक्षणे।।
प्रतिभा स्वस्वभावस्तु केवलीभावसिद्धिदः।

अर्थ :- श्रीसद्गुरूंच्या हृदयात प्रविष्ट होऊन श्रीशंकरच अनुग्रह देतात.

यावरून -

दीक्षेने व प्रातिभेने अर्थात् प्रातिभज्ञानाने किंवा स्वाभाविक योग्य प्रयत्नाने मनुष्य मुक्त होतो. दीक्षा श्रीसद्गुरूंवर अवलंबून असते व बंधमुक्त होण्यासाठी प्रतिभेने अर्थात् प्रातिभज्ञानाने केवलत्व सिद्धी मिळते.

"**श्रीकिरण**" या ग्रंथात सांगितल्याप्रमाणे साधकभक्तयोगिशिष्याच्या प्रयत्नांना श्रीसद्गुरूंच्या अनुग्रहाची आवश्यकता असतेच; कारण ज्याचे प्रकटन अर्थात् उत्पत्त्यादि परमेश्वराधीन आहे अशा विश्वात श्रीसद्गुरूंच्या आज्ञेवाचून जीवांमध्ये अशी प्रतिभाच उत्पन्न होऊ शकत नाही. जर श्रीसद्गुरुदेवांच्या शरीरात परमेश्वराचा आविर्भाव झाला तरच ते दीक्षादान करण्याला समर्थ होतात. "**कटाक्षपात**" शब्दाने केवळ चाक्षुषी दीक्षा सांगितली आहे. याच दीक्षेमध्ये अनुप्रविष्ट झालेले आणव, शाक्त व शांभवादि तीन उपाय असून देशकालादि आनुकूल्याप्रमाणे कोणत्याही एकामध्ये इतर दोन उपायांचा

अंतर्भाव मानावा; कारण "कटाक्ष" म्हणजे श्रीसद्गुरूंची अनुग्राह्य शिष्यात स्वहृदयसंविद्रूप शांभवी दीक्षाच होय. सर्व दीक्षा-उपायांमध्ये जी अनुस्यूत आहे तिलाच दृक्‌शक्ती असे म्हणतात.

या दृष्टीने शास्त्रात असे म्हटले आहे की -

सा च सर्वाध्वसम्पूर्णमात्रसंविदभेदिना।
गुरुणाऽनुग्रहधिया शिष्ये यदवलोकनम्।।

अर्थ :- सर्व मार्गात संवित्‌चा अभेद पाहणाऱ्या श्रीसद्गुरूंनी अनुग्रहबुद्धीने शिष्याकडे पाहणे ही दृक्‌शक्ती म्हणजे चाक्षुषी दीक्षा होय.

श्रीसद्गुरूंनी शिष्याच्या श्रवणेंद्रियात मंत्रकथनपूर्वक स्वरूपसमावेश साधणे ही आणवी दीक्षा होय. त्याचप्रमाणे कुंडली अर्थात् कुंडलिनी शक्तीला जागृत करणाऱ्या मनोव्यापारांचे अनुसंधान करणारी दीक्षा ही शाक्ती दीक्षा या नावाने ओळखली जाते. ज्या दीक्षेत सर्व विकल्पविनाशपूर्वक स्व-स्वरूपाशी अभिन्न अशा श्रीशंभुदेवांचा समावेश होतो त्या दीक्षेला शांभवी दीक्षा असे समजावे. या रीतीने शक्तिपातात तीव्रतीव्रतरत्वादि भेद तर्काने कल्पावेत.

श्रीसद्गुरुचरणांच्या सेवेनेच कौलिक सिद्धान्त समजतो अन्यथा नाही. हे गूढ रहस्य होय.

या दृष्टीने "**श्रीपादुकोदय**" या ग्रंथात मीच असे म्हटले आहे की -

गुरुमत्तैव नः शास्त्रे परमं फलमुच्यते।

अर्थ :- श्रीसद्गुरूंनी युक्त असणे अर्थात् श्रीसद्गुरू करणे हेच आमच्या शास्त्रातील श्रेष्ठ फल किंवा अंग होय.

या संबंधी "**श्रीमहाभारत**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

ऋतस्य दातारमनुत्तरस्य निधिं निधीनां चतुरन्वयानाम्।
ये नाद्रियन्ते गुरुमर्चनीयं पापाल्लोकांस्ते व्रजन्त्यप्रतिष्ठान्।।

अर्थ :- श्रीसद्गुरू हे अत्युत्तम सत्यवस्तूचे दाते व चतुर्वेदातील ज्ञानाचे निधी असतात. जे अशा परमपूज्य श्रीसद्गुरूंची अर्चना करीत नाहीत व अनादर करतात ते लोक पापयोनीत पिचत पडतात.।।६७।।

*****

गाथा क्रमाङ्क ६८

अवतरणिका :- परेश्वराने प्रसृत केलेले चार प्रवाह आहेत. ते प्रवाह ज्ञानी अंतर्निष्ठांनी मानले आहेत आणि येथे तर वेदाहून श्रेष्ठ अशा शास्त्रतुल्य मार्गाचा अर्थात् कुलशास्त्राचा उल्लेख केला असून हाच पुरुषार्थप्राप्तीचा उपाय

आहे असे प्रतिपादन केले आहे. त्यामुळे येथे ते अप्रयोजक व अप्रस्तुत असून इतर शास्त्रावरील श्रद्धेला घालविणारे आहे. त्यामुळे दोन्ही दृष्ट्या हे अनुचित आहे अशी शंका आल्यास ग्रंथकारांनी त्यावर या गाथेत पुढील-प्रमाणे समाधान सांगितले आहे -

अच्छउ अण्णा विज्ञा चउसोत्ताणं वि साअराणं व।
एणं चिअ अमअमअं मन्थइ मन्थाणभेरवो देव्वो।।६८।।
(आस्तामन्या विद्या चतुःस्रोतसामपि सागराणामिव।
एनमेवामृतमयं मथ्नाति मन्थानभैरवो देवः।।)

अर्थ :- चार प्रवाहयुक्त असलेल्या, समुद्रासमान आणि ज्ञान, सांख्य, योगक्रिया, अर्चा, श्रुतिस्मृतिइतिहास, न्याय, नीती व आन्विक्षिकी इत्यादि स्वरूपाच्या अन्य विद्या बाजूला होवोत, विश्राम करोत किंवा थांबून जावोत. भगवान् श्रीशिव ज्या विद्येचे मंथन करतात त्या विद्येलाच अमृतमयी विद्या असे म्हणतात. (हे महार्थतत्त्वच श्रीशिवांनी मंथन केलेले अमृततत्त्व अथवा परमपदसंमत महायोगज्ञान आहे.)

विशेष :- ज्याप्रमाणे फुलामध्ये गंध, तिळामध्ये तेल, देहामध्ये जीवात्मा आणि पाण्यामध्ये अमृत स्थित किंवा प्रतिष्ठित असते त्याप्रमाणेच समस्त शास्त्रज्ञानाचे सार असे हे कुलामृत अथवा योगज्ञानामृतच सर्वांच्या शीर्षस्थानी आहे. हेच आत्मस्वरूप अमृत आहे. ज्याप्रमाणे पुष्पादींमध्ये परमेश्वराच्या अनुग्रहाने गंध इत्यादींचे सहज अस्तित्व असते त्याचप्रमाणे शास्त्रामध्ये कुलामृत अथवा महार्थरूप योगामृत प्रतिष्ठित राहते. हीच स्वरूपस्थिती अथवा योगाच्या भाषेत आत्मविश्रांती आहे. सांख्य, पांचरात्र, वेदादि त्याचप्रमाणे योगादींची निंदा करू नये; कारण त्यांच्यामध्ये आत्म्याचे अमृतत्व प्रतिष्ठित आहे. ही एक विशेष गोष्ट आहे की, श्रुतिस्मृती आदि बाह्यविद्यांहून श्रेष्ठ असे हे अमृतस्वरूप महार्थतत्त्व आहे आणि ते श्रीभगवंतांच्या अनुग्रहाचे सारतत्त्व आहे. हेच समस्त दर्शनांचे त्याचप्रमाणे अध्यात्मविद्येचे सार असून तेच "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथामध्ये "**अध्यात्मविद्या विद्यानाम् ।।१०-३२।।**" अर्थात् "सर्व विद्यांमधील अध्यात्मविद्या म्हणजे महार्थरूप शक्तिपातयोगविद्या किंवा सिद्धयोगविद्या ही सर्वश्रेष्ठ आहे," असे म्हणून श्रीभगवंताच्या विभूतीच्या रूपात वर्णिलेले आहे.

या दृष्टीने "**श्रीमहानयप्रकाश**" या ग्रंथात असे वर्णन केले आहे की -

सर्वोत्तमोत्तमो हि ततो महार्थः।

अर्थ :- सर्व उत्तमातला उत्तम असा हा महार्थ अर्थात् परार्थ होय. हेच श्रीशिवांनी दिलेले योगोपदेशामृत आहे. परमेश्वरच सर्वपर्यंत प्रतिष्ठारूप कुलाचे ईश्वर आहेत अर्थात् कुलेश्वर आहेत. तेच आपल्या शक्तीचे स्वतः मंथन करून संसारातील भयभीत प्राण्यांना अभय प्रदान करणारे श्रीभैरवदेव किंवा श्रीमहादेव आहेत. "भैरव" या शब्दाचा अर्थ "भीती नष्ट करणारी देवता" असा होतो. विश्वाचे भरण व पोषण करणारे प्रयोजक भगवान् श्रीशिवच आहेत. श्रीक्षेमराजांनी यासंबंधी असे म्हटले आहे की -

विश्वस्मिन् भरणादिकृद् विजयते विज्ञानरूपः शिवः।

अर्थ :- या विश्वामध्ये भरण व पोषणादि क्रिया करणारे विज्ञानरूप श्रीशिव विजयी होतात.

निःसंदेह विश्वंभर परमात्मा व विज्ञानरूप श्रीशिवच महार्थतत्त्व प्रदान करतात.

परिमलव्याख्यार्थ :- "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

पुष्पे गन्धस्तिले तैलं देहे जीवो जलेऽमृतम्।
यथा तथैव शास्त्राणां कुलमन्तः प्रतिष्ठितम्।।

अर्थ :- ज्याप्रमाणे फुलातील गंध, तिळातील तेल, देहातील जीव किंवा जलातील अमृत असते त्याप्रमाणे सर्व शास्त्रांमध्ये हे "कुल" नावाचे कौलिकशास्त्र स्थिर आहे.

या प्रमाणानुसार परमेश्वर हाच सर्वानुग्राहकतेने श्रुतिस्मृत्यादि बाह्य विद्यांपेक्षा कौलिक विद्याच प्राप्त करावी, असा चार स्रोतसांतील हाच अर्थ घेऊन प्राप्त झालेल्या आणि जवळ व शरण आलेल्या शिष्याला देण्यासाठी प्रवृत्त करतो अथवा सांगतो असा आमचा निश्चय आहे. याच आशयाने आगमग्रंथांमधून असे सांगितले आहे की -

साङ्ख्य योगं पाञ्चरात्रं वेदांश्चैव न निन्दयेत्।

अर्थ :- सांख्य, योग, पांचरात्र व वेद यांची निंदा करू नये.

त्यातही शास्त्रात असे म्हटले आहे की -

न्यायागमादि मदुपेक्षितमप्यसारं
स्वीकृत्य केचिदधिकं मदमुद्वहन्ति।
निर्माल्यमुज्झितमपि प्रभुणा पृथिव्यां
चेट्यो हि मूर्ध्नि विनिवेश्य परिभ्रमन्ति।।

अर्थ :- काही लोक मद्वर्णनरहित अर्थात् माझे वर्णन नसणाऱ्या असार

अशा तर्कादि शास्त्रांचा अभ्यास करून पांडित्याभिमान बाळगतात. त्यांच्याविषयी बोलावयाचे झाल्यास असे म्हणता येइल की, ज्याप्रमाणे श्रीमंत मालकाने निर्माल्य म्हणून फेकून दिलेले हार व गजरे त्यांच्या दासी आपल्या केशसंभारात घालून मिरवीत असतात त्याप्रमाणेच हे पंडित लोक असतात.

वरील उदाहरणानुरूप बाह्यदृष्ट्या दर्शनरूपाने वेगळी भासणारी सांख्ययोगादि विद्या थोडी बाजूला ठेवू या. जातिवाचक म्हणून विद्या असे एकवचन सांगितले आहे. (यात सर्व विद्यांचा परामर्श आहे.) श्रुतिस्मृत्यादि बाह्य (विश्वाचा विचार करणाऱ्या) विद्यासुद्धा महार्थाच्या प्राप्तीसाठी उपाय होऊ शकत नाहीत. मग इतर विद्यांचा तेथे काय पाड लागणार? याचे स्पष्टीकरण आम्ही **"संज्ञाविशेषनिर्णयमात्रप्रवृत्तानि यत्र शास्त्राणि।।२।।"** या गाथेत केले आहे. अलौकिक, विस्तार, गांभीर्य, अक्षोभ्यत्वादि गुणांनी सागराप्रमाणे असलेली, परमेश्वराच्या पूर्वदक्षिणादि चार मुखातून प्रवाहरूपाने बाहेर पडलेली, निर्मल, मधुर, शीत, आह्लादक रसाने पूर्ण भरलेली व आत्म-संवित्चे प्रतिपादन करणारी अशी जी आज्ञावचने म्हणजेच वेद आहेत त्यातील रहस्यमय तात्पर्याने भरलेले, स्वसंविद्रूप आह्लादातिशयाने शोभणारे व वर वर्णन केलेले अमृतमय तत्त्व मंथन करून श्रीभैरवदेवांनी बाहेर काढले व इतर गोष्टींना स्वात्मशक्तीने गोळा करून बाजूला ठेवले. (त्यामुळे हे महार्थतत्त्व वेदांइतकेच अथवा त्यापेक्षा श्रेष्ठ आहे.) याचे तात्पर्य असे आहे की, बाह्यविद्यांमध्ये नृत्य, वाद्य व संगीत आदि कला स्वस्फुरणावस्थेत तज्ज्ञ माणसांच्या हृदयाला एकाग्र करण्याचा चमत्कार करणाऱ्या असल्याने महार्थ किंवा परार्थ प्राप्त करवून देण्यात थोडी मदत करीत असल्याने वेदशास्त्र, इतिहास व पुराण इत्यादि गोष्टींबद्दल बोलावयालाच नको. परंतु हे सर्व परंपरेने साधनीभूत होतात त्यामुळे त्याचा विचार करणे फलदृष्ट्या व्यर्थच आहे; परंतु अलौकिक अशा चार स्रोतसांमध्ये ज्ञान, योग, क्रिया व चर्चा यांना प्राधान्य असल्याने वेगवेगळे विषय चर्चिले गलेले असूनही प्राप्त झालेल्या भूमिकेत आम्ही सांगितलेला अर्थच साररूपाने निघतो. त्यामुळेच आगमात **"चतुराज्ञाकोशभूताम्।"** अर्थात् "चार आज्ञा या कोशभूत आहेत," असे विशेषण आहे. तसेच आमच्या श्रीपरमसद्गुरूंनी **"श्रीमदृजुविमर्शिनी"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, **"चतुष्पीठाधिष्ठातृमहासंविदालम्बनेन प्रवृत्तचतुःस्रोतोरूपा महापदवी चतुराज्ञा, तस्याः कोशभूता महाधिष्ठात्री शेवधिस्ताम्"** अर्थात् "चार पीठांमध्ये अधिष्ठित असणाऱ्या महासंवित् अर्थात्

श्रेष्ठ चैतन्यशक्तीच्या आधाराने चार प्रवाहाने प्रवृत्त झालेली श्रेष्ठ अशी चतुर् आज्ञा म्हणजे शक्ती होय. त्यांना म्हणजे या चार प्रवाहांना कवचरूप असलेली ही आज्ञा अर्थात् शक्ती अत्यंत श्रेष्ठ अधिष्ठानाने युक्त व निधिरूपिणी आहे. "**श्रीक्रमकेली**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**वामदक्षिण तन्त्रादिष्वप्येतन्मयमेव सर्वं निर्वहतीति मन्तव्यम्**" अर्थात् "वामदक्षिण तंत्रांमध्येही याच महार्थाचा विचार केला आहे असे जाणावे." याचे तात्पर्य असे आहे की, हे महार्थरूप स्फुरणतत्त्व सर्व दर्शनाचे सार असून सर्व स्रोतोतिशायी व अत्यंत प्रशंसनीय असे आहे, असा ध्वनी निघतो.

या दृष्टीने "**श्रीमहानयप्रकाश**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

एवंविधं यदधिगन्तुमिहात्मतत्त्वं
मिथ्याविकल्पविभवोद्दलनं च सम्यक्।
युक्तिं महानयमयीं न विहाय शक्यं
सर्वोत्तमोत्तमतमो हि ततो महार्थः।।

अर्थ :- अशा प्रकारे येथे आत्मतत्त्व जाणण्यासाठी आणि मिथ्याविकल्प योग्य प्रकारे नष्ट करण्यासाठी महानयाने अर्थात् श्रेष्ठ मार्गाने युक्त अशी युक्ती सोडणे शक्य नाही अर्थात् मिथ्या कल्पनांचा नाश करणारा हा महार्थ आत्मसात करावयाचा असल्यास आमची प्रक्रियाच मानली पाहिजे. त्यामुळे सर्वोत्तमातला उत्तम अर्थ हा महार्थच आहे.

त्यामुळेच ज्यांना कोठे थारा नाही त्यांच्यासाठी अलौकिक शक्तीचे हे तत्त्व आश्रयस्थान होईल व आहेही. त्याकरिता आम्ही रहस्य म्हणून याचे प्रकाशन करीत आहोत.

यासंबंधी शास्त्रात असे म्हटले आहे की -

सर्वोपायपरिक्षीणास्ते महार्थार्थिनः किल।
अस्ति नान्या गतिस्तेषां विकल्पग्राससाहसात्।।

अर्थ :- सर्व प्रयत्न करून भागलेले लोक या प्रक्रियेचे पाईक होतात. तसेच विकल्पांनी ज्यांचे साहस खलास केले आहे त्यांना याच्याशिवाय दुसरा मार्ग वा गती नाही.

या दृष्टीने "**श्रीक्रमकेली**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

यश्चायमेवंविधार्थमथनप्रगल्भो भगवान्, अत एव सर्वपर्यन्तप्रतिष्ठास्थानरूपो यः कुलेश्वरः, स एव यतः स्वशक्तिं निर्मथ्य सृष्ट्यादिकारी, अत एवंविधं श्रीमन्थानं भैरवं नमामीति सम्बन्धः।

अर्थ :- अशा महदर्थाचा शास्त्रमंथन करून शोध लावणारे श्रीभगवान्, सर्वांना अधिष्ठानभूत जे कुलेश्वर व स्वशक्तीचे मंथन करून विश्वोत्पत्ती करणारे भगवान् श्रीभैरव त्यांना आमचे प्रणाम असोत, असा संबंध म्हणजे अन्वय लावावा.

असे उपरोक्त ग्रंथात सांगितल्याप्रमाणे केवळ स्वेच्छेनेच विश्वाची उलटापालट करणारे हे भगवान् श्रीभैरव आहेत. या शक्तिमानांना कौलिकतंत्रांमधून प्राय:श्रीभैरव ही संज्ञा दिलेली आहे. श्रीभैरव या शब्दाची निरुक्ती पुढीलप्रमाणे आहे. "**भीरु**" म्हणजे संसाराला भ्यालेल्या प्राण्यांना अभय देणारे ते श्रीभैरव होत. "**भी:**" म्हणजे संसारभयामुळे होणारा प्राणिमात्रांचा "**रव**" म्हणजे आक्रोश किंवा शोकस्वराचा प्रवर्तक होय किंवा ती भीती दूर करण्यासाठी (प्राण्यांच्या) मनात विचाररूपाने राहणारे ते श्रीभैरव होत किंवा पशुसंबंधी भीतीने होणाऱ्या "**रव**" शब्दाच्या स्वभावाने युक्त अशा माहेश्वर्यादि देवतांचे स्वामी किंवा नरकादि लोकांची भीती दाखविणारे किंवा लोकांमध्येच भय उत्पन्न करणारे किंवा "**भ**" म्हणजे नक्षत्रांनी उपलक्षित होणारे चंद्रसूर्यादि दीप, त्यांना प्रेरणा करणारे किंवा "**भेर**" म्हणजे कालाला शुष्क किंवा शोषण करणाऱ्या महायोग्यांचे अधिष्ठाते किंवा विश्वाच्या भरण, रमण व वसन म्हणजे स्थान यांचे प्रयोजक कर्ते भगवान् श्रीभैरव हेच होत.

यासंबंधी श्रीक्षेमराजांनी असे म्हटले आहे की -

भीरूणामभयप्रदो भवभयाक्रन्दस्य हेतुस्ततो
हृद्धाम्नि प्रथितश्च भीरवरुचामीशोऽन्तकस्यान्तक:।
भेरं वायति य: सुयोगिनिवहस्तस्य प्रभुर्भैरवो
विश्वस्मिन् भरणादिकृद् विजयते विज्ञानरूप: शिव:।।

अर्थ :- भित्र्या लोकांना अभय देणारे, संसाराच्या भीतीमुळे होणाऱ्या आक्रंदनाचा हेतू, हृदयरूप धामात व्यक्त झालेल्या पशूसंबंधीच्या भीतीने होणाऱ्या रवाने म्हणजेच शब्दाने युक्त अशा माहेश्वर्यादि देवतांचे स्वामी, काळाचे शोषण करणाऱ्या अशा योग्यांचे प्रभू व भरणादि कृत्ये करणारे असे विज्ञानरूपशिव श्रीभैरव या विश्वात विजयी होतात.

"**दिव्यतीती देव:।**" अर्थात् "जे प्रकाशतात ते देव होत." "दीव्" धातूचे क्रीडा व विजिगीषा आदि अनेक अर्थ आहेत. क्रीडा म्हणजे ग्राह्यत्याज्यादि विकल्परहित ज्ञानघनरूपाने वावरणे होय. सर्वाधिकत्वाने वागण्याची

प्रवृत्ती म्हणजेच विजिगीषा होय. निर्विकल्प आत्म्यातही कल्पनाज्ञान म्हणजे व्यवहार होय. भासमान प्रपंचाबरोबरही स्वयंप्रकाशता म्हणजे द्युती होय. स्वरूपलाभापासून सर्व वेदांच्या प्रवृत्तीचे ज्यात पर्यवसान होते त्याला स्तुती असे म्हणतात. गती म्हणजे सृष्ट्यादि क्रियांमध्ये इच्छा, ज्ञान व क्रियात्मक तीन शक्तींचा स्वीकार होय.

हेच मी पुढील श्लोकातूनही वर्णन करताना असे म्हटले आहे की -

नैश्चिन्त्योत्कटमुच्चलन्नभिलषन् सर्वोत्तरं वर्तितुं
स्वस्मिन् भेदमभेदितेऽपि विमृशन् स्वात्माविशेषं स्फुरन्।
अर्थानामुदयव्ययप्रकृतिभूरुच्छ्रायवानिच्छया
देवो दृक्क्रिययोः प्रदीप्तमहिमा भावेषु वो दीव्यतु।।

अर्थ :- "उत्कट" निश्चिततेचे उच्चलन करून, सर्वांच्या वरती राहण्याची इच्छा करून, स्वतःमधल्या भेद व अभेदत्वाचा विचार करून, अविशिष्ट स्वात्म्याचे स्फुरण करून आणि पदार्थांच्या उदय व अस्त होण्याला कारणीभूत होण्याच्या इच्छेने देव हे दृक् व क्रिया या पदार्थांमध्ये तुम्हाला प्रकाशित करोत.।।६८।।

*****

गाथा क्रमाङ्क ६९

अवतरणिका :- अत्यंत भिन्न अशा या चार प्रवाहातून निघालेले ऐक्यरूप फल व मंत्रतंत्रानुष्ठानादिकांनी मिळणारे फलही तसेच ऐक्यरूप आहे. यांची संगती कशी लावणार? ही शंका दूर करीत या महातंत्राचा उत्कृष्ट अर्थ किंवा रहस्य तत्त्व या गाथेत थोडक्यात सांगताना ग्रंथकार असे म्हणतात की -

हन्त रहस्सं भणिमो मूढा! मा भमह गब्भगालेसुं।
अच्चासण्णं हिअअं पज्जालोएह तस्स उज्जोअं।।६९।।
(हन्त रहस्यं भणामो मूढा! मा भ्रमत गर्भगोलेषु।
अत्यासन्नं हृदयं पर्यालोचयत तस्योद्योगम्।।)

अर्थ :- मी अत्यंत गूढ रहस्याचे उद्घाटन किंवा प्रकाशन करतो. हे लोकमायाअंधकाररूप विश्वप्रपंचाने ग्रासलेल्या लोकांनो! वारंवार जन्ममरणाच्या चक्ररूप गर्भवासात भ्रमित होऊ नका. अंतर्वर्ती हृदयाच्या उद्योगरूप मोक्षाचे चिंतन करा. स्वसंवेद्य परमात्मसाक्षात्कारच साध्य अथवा लक्ष्य आहे.।।६९।।

विशेष :- साधकभक्तयोगिशिष्यासाठी अत्यासन्न हृदयस्थ परमात्म्याचे

स्वरूपचिंतनच परम श्रेयस्कर आहे. या परमपदापासून च्युत होऊन विश्व-प्रपंचामध्ये मतमतांतरे व तर्कवितर्क इत्यादि गोष्टींनी भ्रमित होऊन अथवा गोंधळून जाऊन सन्मार्गरूप योगज्ञानामृताचे विस्मरण करून जन्ममरणाच्या चक्रात साधकभक्तयोगिशिष्याने पडू नये. वारंवार जन्म व मरण होऊ नये व याच जन्मात परमात्म बोधाची संपूर्ण प्राप्ती व्हावी हेच जीवांचे म्हणजेच साधकांचे परम लक्ष्य आहे. मायारूप मोहाने मलिन झालेल्या काळिम्याने कलुषित झालेले जीवात्मेच या विश्वप्रपंचामध्ये मूढ किंवा पथभ्रष्ट होतात. ते शरीर आदींच्या सुखामध्ये तल्लीन राहून मातेच्या गर्भात वास करण्याचे क्लेश वारंवार जन्ममरणाच्या रूपात अनुभवितात. गर्भवास हा तर उपद्रव आणि क्लेश यांच्या अनुभूतींची पराभूमी आहे. हे जन्ममरणरूप क्लेशाच्या अनुभवाचे स्थान आहे. या गाथेत उद्योग शब्दाचा अर्थ आत्मानुकूल कैवल्य असा आहे. जीवन्मोक्षरूप ऐश्वर्यच महोपभोग आहे. स्वात्मविश्रांती हाच हृदयाचा उद्योग आहे. हीच जीवन्मुक्ती आहे. हेच प्रसाधित अर्थात् प्रयासाने साध्य केलेले औत्तर अर्थात् सर्वांच्या पलीकडचे अर्थतत्त्व किंवा महार्थ अर्थात् योगज्ञानामृत आहे.

परिमलव्याख्यार्थ :- हे संसारी अज्ञजन हो ! तुमचे अंतःकरण माया-मोहाच्या काजळीने धुरकट व कलुषित किंवा गढूळ झालेले आहे आणि त्यामुळेच तुम्ही शरीरेंद्रियांचा अहंकार बाळगणारे आहात. आम्ही श्रीसद्गुरूंच्या कृपाकटाक्षाने आत्मैश्वर्यलाभ झाल्यामुळे सर्वश्रेष्ठ आहोत आणि दुसऱ्यांवर अनुग्रह करण्याच्या इच्छेने भारले गेले आहोत. **"तदेतत् परमं गुह्यं योगिनीनां मुखे स्थितम्।"** अर्थात् "त्यामुळे तर योगिनींच्या मुखातील परम गुह्य अर्थतत्त्व आम्ही अत्यंत स्पष्ट होण्यासाठी वैखरीवाणीने सांगणार आहोत." योगिनींच्या मुखातून आलेले असल्याने हे तत्त्व इतरांना विश्वसनीय वाटते व हृदयात स्थिर होऊ शकते. नाही तर वैखरीवाणी व्यर्थ होण्याचा प्रसंग येईल म्हणून पुरुषविशेषांना या अर्थतत्त्वाचे किंचित् ज्ञान करून देतो असे ग्रंथकार म्हणतात. नंतर हे अर्थतत्त्व सांगावयाचे थोडे बाजूला ठेवून, ते जर जाणले नाही तर अनंतक्लेश आहेत म्हणून त्याची ज्ञानलालसा वाढविण्यासाठी **"मा भ्रमत गर्भगोलेष्विति।"** अर्थात् "लोकांनी निष्कारण गर्भगोलात फिरत राहू नये," या बद्दल असे म्हणतात की, गर्भावस्थेतील क्लेश दूर करण्याचा उपाय हाताशी असताना हे प्राणी जन्मचक्रात का पडतात? जर त्यांनी या तत्त्वाची कास धरली तर ते निश्चितच त्यातून सुटतील; कारण या महार्थतत्त्वातच असे

जन्मप्रतिबंधाचे सामर्थ्य आहे. गर्भवास हा सर्व उपद्रवांची जन्मभूमी आहे. भ्रमण या शब्दाने **"मातापितृसहस्राणि"** अर्थात् "या जीवाला अनंत सहस्रावधी आई व वडील आहेत व त्यांच्यामुळे अनंत कालाचा हा फेर आहे," हे सुचविले. **"जनन"** या शब्दावरून मृत्यूचेही ग्रहण होते; कारण **"जातस्य हि ध्रुवो मृत्युः"** अर्थात् "जन्मलेल्याचा मृत्यू निश्चित आहे" या **"श्रीमद्भगवद्गीता"** या ग्रंथातील वचनाप्रमाणे त्याचप्रमाणे **"विनाशाग्रात उत्पादः"** अर्थात् "जन्म हा मृत्यूने ग्रासलेला आहे," या श्रीक्षेमराजांच्या वचनानुसार मृत्यू व त्याचे दुःखही समाविष्ट होते. जन्म आणि मृत्यू दुःखप्रद म्हणून स्थितीही उपद्रवयुक्त आहे हे एका **"गर्भ"** म्हणजे जन्मावस्था या शब्दाने सुचवून सर्व संसारदुःखांचा संग्रह केला आहे. याच आशयाने **"श्रीलघुभट्टारक"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, **"ज्ञात्वेत्थं न पुनः स्पृशन्ति जननीगर्भेऽर्भकत्वं नराः"** अर्थात् "हे (महार्थतत्त्व) अशा प्रकारे जाणून मनुष्य परत मातेच्या गर्भाला स्पर्श करीत नाही."

आता सध्याच्या विषयाकडे वळून त्या महार्थाची सुलभता दाखविण्या-करिता उपोद्घात करताना ग्रंथकार असे म्हणतात की, **"अत्यासन्नं हृदयम्।"**; अर्थात् "हे हृदय प्रकाश व विमर्श यांचे मेलन असलेले आतील तत्त्व आहे." ते तत्त्व सहामार्गांच्या शरीराला जीवन देणारे असून अविकल्पावस्थेत शरीरज्ञानाहून तुटक असते. त्याची प्राप्ती पर्वतशिखर व नदीतीरादिकांप्रमाणे कठीण नाही; कारण ते हृदय आत्मरूपाशी अभिन्न आहे, वेगळे नाही. त्याच्या उद्योगाकडे जरा विचार करून पाहा. जरी ते तत्त्व परमात्म्याशी अनुकूल अर्थात् एकरूप असे असल्याचे दिसले तरी इच्छा, ज्ञान व क्रिया शक्तीच्या परिस्पंदाने विश्वाच्या सर्व व्यवहाराची प्रवृत्ती करणारे आहे. ज्या एकाच साध्याविषयी अर्थात् तत्त्वाविषयी चार प्रवाहरूपात प्रवृत्त झालेले मंत्रतंत्रादि अनेक उपाय आहेत ते या हृदयज्ञानातच समाविष्ट आहेत. उदाहरणार्थ- ज्याप्रमाणे वायूचे अस्तित्व दाखविण्याकरिता पंखा, गवाक्ष, वस्त्राचा पदर, भाता आणि फुंकर या व अशाच प्रकारची साधने उपयुक्त आहेत त्याप्रमाणे तेवढीच गरज मंत्रतंत्रादिकांची आहे. जे हृदय अथवा चित्त त्या महार्थाशी क्षणभर जरी अनुबद्ध किंवा संबद्ध झाले तरी जन्ममरणादि अनेक उपद्रव अर्थात् सर्व दुःखे घालविण्यात समर्थ असलेला जीवन्मोक्षरूप-संपत्तीचा उपभोग साधकभक्तयोगिशिष्याला प्राप्त होतो. तो हृदयोद्योग जर कदाचित् इंद्रियांशी संबद्ध झाला व क्रियाशक्तीने युक्त झाला तर साधकभक्त-

योगिशिष्य रूपरसादि बाह्य विषयांच्या शय्येवर लोळतो व चित्तविक्षेपाचा अथवा भ्रमाचा अनुभव घेतो. तसेच कदाचित् हा हृदयोद्योग करणारा साधकभक्तयोगिशिष्याने ज्ञानशक्तीने युक्त होऊन विषयत्याग केला तर तो आत्मस्वरूपात विश्रांती घेत आत्मानंदांत रमतो. या दोन्हीला दंड व मुंड क्रम असे शास्त्रात म्हटले आहे.

"**आगमात**" या संबंधी असे सांगितले आहे की -

मुण्डनं ज्ञानरूपेण दण्डनं च क्रियात्मना।
मुण्डदण्डक्रमौ तेन मतौ ज्ञानक्रियात्मकौ।।

अर्थ :- ज्ञानरूपाने मुंडन व क्रियारूपाने दंडन हे ज्ञानक्रियात्मक होत.

हृदयाची स्तिमित अथवा निश्चल स्वरूपाची अवस्था हाही एक उद्योग-विशेष आहे. या दृष्टीने "**श्रीलक्ष्मीतंत्र**" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "**स्तिमितं यत् परं ब्रह्म तस्य स्तिमितताऽस्म्यहम्**" अर्थात् "स्तिमित असे जे परब्रह्म आहे त्याची स्तिमितता मी आहे." हृदयाच्या या उद्योगाने विश्व-व्यवहार भरला असताना असे दृष्टीला पडते की -

तस्मात् तत्त्वमतत्त्वं वा न भानेन विना भवेत्।
स्वसाम्राज्यवशाद् भानं तत् तत्त्वातत्त्वयोः समम्।।
यथा यथा प्रथा पुंसः शाम्भवी सा च नापरा।

अर्थ :- तत्त्व व अतत्त्वाचे ज्ञान भानाने होते. आत्मसाम्राज्यामुळे दोन्हीही सारखेच भासतात. अशी ही प्रथा अर्थात् प्रतीती किंवा ज्ञान दुसरे काही नसून शांभवी होय.

या न्यायानुसार ग्राह्य विषय विहित की निषिद्ध या विचाराला जागाच नाही; कारण विधिनिषेधाचे विषय असलेल्या धर्माधर्मांचा विचार करता त्यात सामान्यविशेषभाव असल्याने, अधिकारीविभागाचे वैचित्र्य असल्याने व अन्योन्यविरुद्ध अनेक शास्त्रमर्यादांच्या भेदव्यवस्थांवर ते धर्माधर्म अवलंबून असल्याने अमुक एक विहित आणि अमुक एक निषिद्ध असा दृढ नियम नाही, हा अर्थ सर्वश्रुत आहे. ज्याचे षडध्वा क्षीण झालेले नाहीत त्याने ज्ञानकर्मेंद्रियांच्या देवतेला तृप्त करावे.

या दृष्टीने "**श्रीरहस्यआम्नाय**" या ग्रंथात असे वचन आहे की -

धीकर्माक्षगतां देवीं निषिद्धैरेव तर्पयेत्।

अर्थ :- बुद्धी व कर्मगत देवीला निषिद्ध द्रव्यांनीच तर्पावे.

त्यामुळे इतर शास्त्रांनी निंद्य ठरविलेले स्त्रीमद्यमांसादि पदार्थ आमच्या

उपास्य देवतांच्या पूजाविधीत ग्राह्य सांगितले आहेत.

"**श्रीमहानयप्रकाश**" या ग्रंथात असे सांगितले आहे की -

अन्यैरावारकत्वेन ये भावाः परिवर्जिताः।
तैरेव ज्ञानिनामर्थं जाज्वलीति परा चितिः।।

अर्थ :- इतरांनी अशास्त्रीय म्हणून जे पदार्थ वर्जित मानले आहेत ते ज्ञानीजनांचे संग्राह्य विषय आहेत; कारण परा चिती म्हणजे चैतन्यरूप शक्ती जाज्वली किंवा सतेज अग्निरूप आहे.

हे पूर्वी अनेक वेळा अनेक ठिकाणी सांगितले असल्याने अधिक विस्तार नको आहे. "**भ्रमत**" या लोट् "प्रत्ययाने मायामोहित जनांविषयी कीव येते हे दाखविले.

यासंबंधी "**श्रीमदालसा**" आपल्या पुत्रांना असे म्हणते की -

तातेति किञ्चित् तनयेति किञ्चि-
न्ममेति किञ्चिन्न ममेति किञ्चित्।
तवेति किञ्चिन्न तवेति किञ्चिद्
भौतं स्वयं बहुधा मालपेस्त्वम्।।

अर्थ :- हे पुत्रा! तू तात, तनय, माझे, तुझे व तद्विपरीतही बोलतोस. अशी भाषा वा भान किंवा ज्ञान सर्व भौतिक आहे, ते तुला कसे कळत नाही.

"**हन्त**" म्हणजे अरेरे! तंत्रकर्त्यांना अज्ञानी जनांची अनुकंपा वाटून हे उद्गार त्यांनी काढले आहेत.।।६९।।

*****

गाथा क्रमाङ्क ७०

अवतरणिका :- आम्ही सांगितलेले हे औत्तर अर्थात् सर्वांच्या पलीकडे असलेले अर्थतत्त्व इतर व्यासादि महामुनींनाही अंतःकरणात अनुसंधान करावयाला योग्य अशी देवताच असली पाहिजे नव्हे आहेच; कारण त्यांनी रचलेल्या ग्रंथामधून तात्पर्यांचे पयालोचन करण्याच्या दृष्टीने पाहिल्यास हेच तत्त्व मुक्त कंठाने व ठामपणाने सांगितले आहे. श्रीमद्भगवद्गीतारूप उपनिषदात प्रपंचवैचित्र्याला वेदसागराच्या बिंदूचा एक छिडकावा आहे असे म्हटले आहे. याचे अधिक स्पष्टीकरण करण्यासाठी ग्रंथकार ही गाथा सांगताना असे म्हणतात की -

एणं चेअ महत्थं जुत्थारम्भम्मि पण्डुउत्तस्स।
छोलहसहस्ससत्ती देवो उवदिसइ माधवो त्ति सिवं।।७०।।

(एनमेव महार्थं युद्धारम्भे पाण्डुपुत्रस्य।
षोडशसहस्त्रशक्तिर्देव उपदिशति माधव इति शिवम्।।)

अर्थ :- महाभारताचे युद्ध सुरू होण्याच्या वेळेला (मोहाने ग्रासलेल्या) पांडुपुत्र अर्जुनाला सोळा हजार अर्थात् अनंत शक्तींनी युक्त भगवान् श्रीलक्ष्मीपती श्रीमाधवांनी याच महार्थतत्त्वाचा अर्थात् परंपराप्राप्त सिद्धमहायोगज्ञानामृताचा म्हणजे शक्तिपातयोगरहस्याचा अर्थात् सिद्धयोगमहाशास्त्राचा उपदेश दिला.।।७०।।

विशेष :- हा महार्थ सर्व रहस्यांचे प्रतिपादन करणारा महातत्त्वार्थ आहे. हा अर्थ सत् ही नाही आणि असत् ही नाही; तर तो उभयात्मक असल्याने तो अनुत्तर अर्थात् द्वैत आणि अद्वैत यांनी वर्जित आणि जाणण्याला अत्यंत अवघड आहे. परमेश्वराच्या अनुग्रहानेच हा महार्थ योग्य साधकभक्तयोगि-शिष्याच्या हृदयामध्ये प्रकाशित होतो. "**षोडशसहस्त्रशक्तिः**" या गाथेतील पदाचा अर्थ "अकालकलितविलासक्रीडा किंवा लीलेने युक्त अनंतपरमात्मशक्ती असा आहे. त्याच्याच द्वारा परमेश्वराचा लीलाविलास निरंतर प्रवाहित होत राहतो. ज्यावेळेला अर्जुनाला असा मोह झाला की, मी आपल्याच पितामह आदि स्वजनांचा वध करून पापाचा भागीदार होईन त्यावेळेला भगवान् श्रीकृष्णांनी त्याला असे समजावून सांगितले की, ही हृदयाची दुर्बलता आहे. अशा प्रकारचे क्लैब्यत्व अर्थात् दुर्बळपणा त्याने दाखवू नये. हा आत्मा अविनाशी आहे, हा मरतही नाही आणि कोणाकडून मारलाही जात नाही. त्यावेळेला श्रीभगवंतांनी त्याला आपल्या रूपाचे परमैश्वर्य दाखविले. त्यावेळेला ते अर्जुनाला असे म्हणाले की, तू ज्यावेळेला माझ्या मनाशी आपले मन युक्त करशील, माझा भक्त बनशील, माझीच पूजा करशील आणि मलाच नमस्कार करशील त्यावेळेलाच तू पाशांपासून किंवा बंधनांपासून मुक्त होशील आणि मी सत्य सांगतो की, तू मलाच प्राप्त होशील आणि मला प्रिय होशील.

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।
मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे।।
।। श्रीमद्भगवद्गीता १८-६५।।

परमेश्वरांनी महार्थाचा उपदेश पुढीलप्रमाणे केला आहे. सर्व धर्म व कर्तव्य कर्मांना माझ्यामध्ये ठेवून मला शरण ये. हाच जीवमात्रासाठी बंधनांपासून मुक्त होण्याचा उपदेश आहे.

"सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।।
।। श्रीमद्भगवद्गीता १८-६६।।"

हे महार्थतत्त्वच सिद्धमहायोग आहे. भगवान् श्रीकृष्णांनी अर्जुनाला असे म्हटले आहे की, मी हा अविनाशी योग अर्थात् महार्थ श्रीसूर्यदेवांना सांगितला होता. श्रीसूर्यदेवांनी तो आपल्या पुत्राला म्हणजेच श्रीवैवस्वतमनूंना सांगितला आणि त्यांनी त्यांच्या पुत्राला अर्थात् ईक्ष्वाकूला सांगितला. तोच प्राचीन योग मी तुला सांगितला आहे.

स एव मया तेऽद्यः योगः प्रोक्तः पुरातनः।।

।। श्रीमद्भगवद्गीता ४-३।।

या योगाचे वर्णन अशा प्रकारे "**श्रीमहाभारत**" या ग्रंथामध्ये श्रीव्यासांनी केले आहे. त्याच योगाचे वर्णन महार्थरूपाने श्रीगोरक्षनाथांनी "**श्रीमहार्थ-मजंरी**" या ग्रंथामध्ये सत्तर गाथांमध्ये केले आहे. हा योग श्रीशिवमय अर्थात् परमकल्याणकारी आहे.

परिमलव्याख्यार्थ :- या महाप्रबंधाने सांगितलेले अर्थ पुढीलप्रमाणे आहेत.

भावार्थः सम्प्रदायार्थो निगर्भार्थश्च कौलिकः।

तथा सर्वरहस्यार्थो महातत्त्वार्थ एव च।।

अर्थ :- भावार्थ, संप्रदायार्थ, अग्रिगर्भार्थ, कौलिक अर्थात् कुलार्थ, सर्वरहस्यार्थ व महातत्त्वार्थ हेच सर्व या महाप्रबंधाने सांगितलेले अर्थ आहेत.

या आम्नायोक्तीप्रमाणे सर्व अर्थतत्त्वांच्या वैचित्र्याच्या समष्टीच्या अधिष्ठानरूपाने हा महार्थ आहे. सर्व भेदप्रभेदाला त्याने आपल्यात सामावून घेतले आहे. हेच मिळविण्यायोग्य असे तत्त्व आहे.

याचेच वर्णन "**श्रीतंत्रालोक**" या ग्रंथात करताना असे म्हटले आहे की -

न सन्नासन्न सदसन्न च तन्नोभयात्मकम्।

दुर्विज्ञेया हि सावस्था किमप्येतदनुत्तरम्।।

नैष ध्येयो ध्यात्रभावान्न ध्याता ध्यानवर्जनात्।

न पूज्यः पूजकाभावात् पूजाभावान्न पूजकः।।

अर्थ :- ते सत् नाही, असत् नाही, सदसत् आणि उभयात्मकही नाही. हे महार्थतत्त्व म्हणजे सर्वांहून निराळी व न कळणारी अशी एक अनुत्तर अर्थात् श्रेष्ठ अवस्था आहे. हे तत्त्व म्हणजे ध्याता, ध्यान, ध्येय, पूजक, पूज्य व पूजा यांपैकी काही नाही.

सर्व विकल्पांच्या पलीकडील आणि स्वातंत्र्याने परिपूर्ण असा हा महार्थ किंवा श्रेष्ठ तत्त्व सोळा हजार शक्तींनी युक्त, कालाने आक्रांत नसलेले उलट

प्रलयकालीन शक्ती धारण करणारे, क्रीडाविजिगीषादि गोष्टींनी प्रकाशणारे, श्रीमहालक्ष्मीवल्लभ व मधुकुलभूषण अशा भगवान् श्रीकृष्णांनी युद्धारंभी म्हणजे कौरव व पांडवांच्या संघर्षाच्या वेळेला अर्जुनाला सांगितला. प्राकृतभाषेत भूत व वर्तमानकालाच्या प्रत्ययांबद्दल नियम नाही किंवा श्रीभगवान् प्रत्येक युगात भारतादि व्यापार पूर्वीप्रमाणेच चालू ठेवीत असल्याने प्रवाहनित्यत्वामुळे "**उपदिशति**" असा वर्तमानकालीन "लट्" प्रयोग केला आहे. त्यावेळेला युद्धारंभी "**श्रीमद्भगवद्गीता**" या ग्रंथात असे म्हटले आहे की -

तान् समीक्ष्य स कौरव्यः सर्वान् बन्धूनवस्थितान्।
कृपया परयाविष्टो विषीदन्निदमब्रवीत्।।१-२७/२८।।

अर्थ :- त्या सन्मुख उभ्या असलेल्या सर्व बांधवांना व आप्तांना पाहून तो अत्यंत करुणेने व्याकुळ झालेला अर्थात् चित्तात परम कृपा आपोआप उत्पन्न झालेला असा तो कुंतीचा पुत्र अर्जुन विषाद किंवा खेद करीत असे बोलू लागला. आपणच आपल्याशी अभिन्न असलेल्या प्रवृत्तींशी निवृत्तीच्या साहाय्याने साधनयुद्ध खेळणार आहोत असे पाहून साधकभक्तयोगिशिष्यरूप अर्जुनाला खेद किंवा विषाद झाला.।।१-२७/२८।।

असा आरंभ करून -

अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम्।
यद्राज्यसुखलोभेन हन्तुं स्वजनमुद्यताः।।१-४५।।
यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः।
धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत्।।४६।।

अर्थ :- काय चमत्कार आहे ! अरेरे ! आम्ही राज्य सुखाच्या लोभाने स्वजनांना मारण्यास तयार झालो (आणि हे) मोठे पाप करण्यास तयार झालो.।।४५।।

जर शस्त्ररहित व शत्रूंचा प्रतिकार न करणाऱ्या मला शस्त्रधारी कौरव अर्थात् सर्व प्रवृत्ती रणांगणात म्हणजे सिद्धयोगसाधनयुद्धात मारतील तर ते मला अतिशय कल्याणकर होईल.।।४६।।

येथपर्यंत अर्जुनाची मागील अनेक जन्मांच्या वासनांनी युक्त अशा पाशवावेशामुळे श्रुतिस्मृती इत्यादि बाह्य आम्नायांनी निषिद्ध केलेल्या पितृ-पितामहादि स्वजनांच्या हत्यारूप पातकांची चिकित्सा, त्यामुळे उत्पन्न झालेले राज्यलाभादि सर्व सुखांविषयी वैराग्य आणि त्यामुळे उत्पन्न झालेले वैक्लव्य इत्यादि ध्वनित केले आहे. "**माधव**" या संबोधनाने श्रीकृष्णांची अर्जुना-

बरोबरची तारुण्यकालीन मैत्री सुचविली आहे.

कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम्।
अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन।।२-२।।
मा क्लैब्यं गच्छ कौन्तेय! नैतत् त्वय्युपपद्यते।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परन्तप।।३।।

अर्थ :- हे अर्जुना! हे श्रेष्ठ लोकांनी न अंगिकारलेले, स्वर्ग अर्थात् सहस्रारात सामरस्यसुख न देणारे व अकीर्ती करणारे अर्थात् सिद्धयोग-साधनयुद्ध न करण्याचे पाप तुला (तुझ्या मनात) या कठीण प्रसंगी कोठून प्राप्त झाले?।।२-२।।

हे पार्था! अशा दुर्बलपणाला अर्थात् सिद्धयोगसाधन न करण्याच्या वृत्तीला प्राप्त होऊ नकोस. हे मानसिक दौर्बल्य तुझ्या ठिकाणी उचित दिसत नाही. प्रवृत्तिरूप शत्रूंना संताप देणाऱ्या हे अर्जुना! हृदयाचे हे क्षुद्र दुर्बलत्व अर्थात् सिद्धयोगसाधनयुद्ध न करण्याची वृत्ती टाकून ऊठ.।।३।।

या वचनांनी अर्जुनाला श्रीगोपालकृष्णनाथमहाराजांनी रहस्यजिज्ञासेकडे प्रवृत्त केले. नंतर -

कार्पण्यदोषोपहतस्वभावः
पृच्छामि त्वां धर्मसम्मूढचेताः।
यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे
शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्।।२-७।।

अर्थ :- कार्पण्य म्हणजे कृपणता, दैन्य, आत्म्याचे स्वरूप न जाणणे या दोषांमुळे ज्यांचा स्वभाव म्हणजे क्षात्रधर्म म्हणजे साधनधर्म अर्थात् सिद्धयोग-साधनयुद्ध खेळण्याचा किंवा करण्याचा उपहत म्हणजेच नष्ट झाला आहे आणि त्यामुळेच स्वधर्म अर्थात् परमात्म्याविषयी ज्याचे चित्त मूढ झाले आहे असा मी तुला हे विचारतो की, जे निश्चित श्रेय असेल व ज्याच्यापासून परमपुरुषार्थरूप अव्यभिचारी फल प्राप्त होईल ते तू मला सांग. मी तुझा शिष्य आहे. तुला शरण आलेल्या मला तू उपदेश कर.।।२-७।।

अशा प्रकारे कार्पण्यलक्षणामुळे प्रवृत्त झालेल्या शिष्याच्या भावामुळे परमेश्वर सदयहृदय झाले व ते अर्जुनाला असे म्हणाले की -

य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम्।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते।।२-१९।।

अर्थ :- जो कोणी या आत्म्याला मारणारा समजतो व जो कोणी या

आत्म्याला मेलेला मानतो ते दोघेही आत्म्याला जाणत नाहीत अर्थात् त्यांना त्याचे खरे स्वरूप माहीत असत नाही; कारण हा आत्मा मारीत नाही आणि मारलाही जात नाही.।।२-१९।।

अशा प्रकारे श्रीभीष्म व श्रीद्रोणादींच्या शरीरातील आत्मा नित्य-व्यापकत्वादि गुणांनी युक्त असल्याने कोणाकडूनही नष्ट होणारा नाही व "बाह्य शास्त्रावर विसंबून उगीच का भीतोस?," असे म्हणून परमेश्वराने अर्जुनावर अनुग्रह केला. सोळा हजार स्त्रियांच्या बाह्य संभोगाप्रमाणेच सोळा हजार आंतर शक्तींनी युक्त अशा परमेश्वराच्या शक्तीचे ऐश्वर्य दाखविण्यासाठी "**दर्शयामास पार्थाय परमं रूपमैश्वरम्।।११-९।।**" अर्थात् "पार्थाला श्रीकृष्णांनी आपल्या रूपाचे श्रेष्ठ असे ऐश्वर्य दाखविले," अशा तऱ्हेने आपले विश्वरूप प्रकट केले. तसेच "**कालोऽस्मि लोकक्षयकृत् प्रवृद्धो लोकान् समाहर्तुमिह प्रवृत्तः।।११-३२।।**" अर्थात् "मी या लोकांचा क्षयकारी वाढलेला महाकाल आहे. या वेळी या लोकांना नष्ट करण्यासाठी प्रवृत्त झालो आहे." असे म्हणून आपले प्रचंड माहात्म्य सांगितले. ते पाहून आणि अनुभवून "**नमो नमस्तेऽस्तु सहस्त्रकृत्वः पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते।।११-३९।।**" अर्थात् "तुला सहस्त्रशः नमस्कार असोत. आपणाला आणखीही वारंवार नमस्कार असोत," असे म्हणून अर्जुनाने भगवत्तेजाने दीपित होऊन हात जोडले व -

इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा
स्वकं रूपं दर्शयामास भूयः।
आश्वासयामास च भीतमेनं
भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा।।११-५०।।

अर्थ :- त्यानंतर संजय असे म्हणाला की, हे राजा धृतराष्ट्रा! याप्रमाणे भगवान् श्रीवासुदेवांनी अर्जुनाला असे बोलून पुन्हा तसलेच म्हणजे पूर्वीचे आपले चतुर्भुज रूप दाखविले आणि पुन्हा महात्मा श्रीगोपालकृष्णनाथ-महाराजांनी सौम्यरूप धारण करून त्या भयभीत झालेल्या अर्जुनाला धीर देऊन त्याचे समाधान केले.।।११-५०।।

असे म्हणून अर्जुनाला पूर्वरूप दाखवून पूर्वस्थितीवर आणून सोडले. "**अथ चेत्त्वमहङ्कारान्न श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि।।१८-५८।।**" अर्थात् "आणि तू अहंकारामुळे किंवा अभिमानामुळे हे माझे वचन न मानल्यास मोठ्या आपत्तीत पडशील," असे सांगितले.

"देव" या शब्दाने लीला विभूतींचे -

रसोऽहमप्सु कौन्तेय! प्रभाऽस्मि शशिसूर्ययोः।
प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु।।७-८।।

अर्थ :- हे अर्जुना! मी पाण्यातील रस आहे. चंद्र व सूर्य यांच्यामधील प्रकाश मी आहे. सर्व वेदांमधील ॐकार मी आहे. आकाशामधील शब्द मी आहे आणि पुरुषातील पुरुषत्व मी आहे.।।७-८।।

अशा तऱ्हेने विवरण किंवा प्रवचन करून बाह्यरूपात मीच आहे असे सुचवून -

सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो
मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदान्त-
कृद् वेदविदेव चाहम्।।१५-१५।।

अर्थ :- मीच अर्थात् माझ्या श्रीशिवशक्तिस्वरूपासह सर्व प्राण्यांच्या हृदयात किंवा बुद्धीत आत्मरूपाने उत्तम प्रकारे प्रवेश करून तेथे राहिलो आहे आणि माझ्या म्हणजे आत्मरूप व अनवच्छेद्य किंवा समरस असलेल्या कुंडलिनी शक्तीपासूनच स्मृती, ज्ञान व तर्क उत्पन्न होतात आणि सर्व वेदांच्या द्वारे मीच म्हणजे श्रीशिवच जाणण्यास योग्य आहे तसेच वेदान्ताचा कर्ता अर्थात् वेदान्ताच्या विषयाचा संप्रदाय करणारा व वेदांना जाणणाराही मीच आहे.।।१५-१५।।

असे सांगून स्मृती, ज्ञान व अपोहन हे माझेच स्फुरणप्रकार आहेत असे सांगितले. श्रीमाधवपांडुपुत्र शब्दांनी भगवान् आणि अर्जुन यांच्यात कसलेही वैलक्षण्य नसताना "मी सार्वज्ञादिशक्तियुक्त व तू याच्या उलट आहेस" त्यामुळेच अनुग्राह्य आणि अनुग्राहकत्व असल्याचे पुढील उक्तीने दाखविले आहे.

बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन।
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परन्तप।।४-५।।

अर्थ :- हे अर्जुना! माझे व तुझे अनेक जन्म होऊन गेलेले आहेत; परंतु हे परंतप! या सर्व जन्मांचे मला स्मरण आहे अर्थात् ते मी जाणतो; परंतु तुला त्यांचे स्मरण नाही अर्थात् तू ते जाणत नाहीस.।।४-५।।

"उपदिशति इति" या पदाने अठरा अध्यायांमधून अनुस्यूत अंगअंगिभावाने युक्त बाह्य व अंतर अशा उभयशास्त्रांच्या तात्पर्याचे आधारतत्त्व म्हणून स्वात्मदेवतेची उपासनाच प्रधान असल्याचे प्रकट केले आहे.

सांख्य, योग व वेदान्तादि शास्त्रसमुदायातून हीच आत्मोपासना महत्त्वाची

मानली आहे. "महार्थ" या पदाने अर्जुनाला बोध करताना श्रीभगवंतांनी चतु:स्त्रोतसांतून निघालेला अनुत्तर म्हणजे सर्वोत्तर व सर्वोत्तम तत्त्वार्थ सांगून तत्त्वार्थ लक्षात येणे सोपे नाही, त्याला पांडित्य लागते हे पटविले आहे. त्याचा अंश असा आहे -

अपि चेत् सुदुराचारो भजते मामनन्यभाक्।
साधुरेव स मन्तव्य: सम्यग् व्यवसितो हि स:।।९-३०।।
मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।
मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे।।१८-६५।।

अर्थ :- जर कदाचित निंद्य आचरण करणारा दुराचारी मनुष्य माझा अनन्य भक्त होऊन म्हणजे सिद्धयोगाचा साधक होऊन मला निरंतर भजू लागला म्हणजे साधन करू लागला तर तो साधूच म्हणजे सदाचरण संपन्नच आहे असे समजले पाहिजे. कारण तो यथार्थ निश्चयी असा साधकभक्तयोगी झालेला असतो.।।९-३०।।

तू माझ्यामध्ये म्हणजे सुषुम्नेमध्ये मन अर्थात् मनरूप शक्ती धारण करणारा हो अर्थात् अशा रीतीने तू माझा भक्त म्हणजे सिद्धयोगाचे श्रीसद्गुरुकृपेने जागृत होणाऱ्या आत्मचैतन्यशक्तिद्वारा आपोआप होणारा सिद्धयोगाचे सहज साधन करणारा हो. अशा रीतीने तू अलौकिक सिद्धयोगसाधनयज्ञ करणारा हो. तू मलाच नमस्कार कर. अर्थात् सुषुम्नागामी होऊन सहस्त्राराकडे ऊर्ध्वगामी होऊन तंत्रस्थ श्रीशिवाशी समरस होणारा होऊन सामरस्य प्राप्त करणारा हो. तू माझ्या सांगण्याप्रमाणे महासिद्धयोगाचे साधन केलेस म्हणजे तू मलाच येऊन मिळशील म्हणजे माझ्याशी समरस होशील; अशी मी तुला सत्य प्रतिज्ञा करून सांगतो कारण तू मला अत्यंत प्रिय आहेस.।।६५।।

यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति।
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति।।६-३०।।
अपि चेदसि पापेभ्य: सर्वेभ्य: पापकृत्तम:।
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं सन्तरिष्यसि।।४-३६।।
सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच:।।१८-६६।।
नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते।
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।।२-४०।।
इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद् गुह्यतरं मया।

विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु।।१८-६३।।

अर्थ :- त्याचप्रमाणे जो सिद्धयोगसाधक सर्व भूतमात्रांच्या ठिकाणी सर्वांचा आत्मरूप असलेला जो मी वासुदेव किंवा मलाच व्यापक आत्म्याला समरसतेने पाहतो आणि सर्व भूतमात्रांना माझ्या म्हणजे वासुदेवाच्या अंतर्गत पाहतो त्याला मी नाहीसा होत नाही आणि तोही मला नाहीसा होत नाही.।।६-३०।।

हे अर्जुना! जर यदाकदाचित् तू सर्व पाप्यांहूनही अतिशय पाप करणारा असलास तरी ज्ञाननौकेने अर्थात् ज्ञान म्हणजे श्रीसद्गुरुकृपेने जागृत होणारी कुंडलिनी शक्ती व नौका म्हणजे तिच्या द्वारा उपस्थित होणाऱ्या सिद्धयोग साधनानेच सर्व पापातून चांगल्या प्रकारे तरून जाशील.।।४-३६।।

हे अर्जुना! तू सर्व धर्म व अधर्म या दोहोंचाही परित्याग करून म्हणजे बहिर्मुखाने संसारोन्मुख झालेल्या शक्तीला अंतर्मुखाने जागृत करून केवळ मलाच म्हणजे सहस्रारस्थ श्रीशिवाला अनन्य शरण ये म्हणजे जीवरूपाने असलेल्या प्राणशक्ती कुंडलिनीला ऊर्ध्वगामी करून सहस्रारात येऊन माझ्याशी समरस हो. मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन. तू शोक करू नकोस.।।१८-६६।।

या श्रीशिवशक्तीसामरस्यरूप कर्मयोगात म्हणजे सिद्धयोगात आरंभिलेल्या कर्माचा म्हणजे जागृत कुंडलिनी शक्तीचा (ती सहस्रारात श्रीशिवाशी एकरूप होईपर्यंत) तिचा कधीही नाश होत नाही. अशा प्रकारे केलेल्या साधनात कोणताही दोष उत्पन्न होत नाही. (यामुळे) या सिद्धयोगरूप साधनधर्माचे थोडेसेही अनुष्ठान जन्ममरणरूपी महाभयामासून साधकाचे रक्षण करते.।।२-४०।।

याप्रकारे मी तुला गुह्याहून अत्यंत गुह्य ज्ञान म्हणजे सिद्धयोगसाधनाने प्राप्त होणारे श्रीशिवशक्तिसामरस्याचे रहस्य सांगितले आहे. तू या रहस्यमय ज्ञानाचा म्हणजे साध्यसाधनाचा संपूर्णतः विचार करून मग जसे तुला वाटेल तसे कर.।।१८-६३।।

श्रीमाधव पांडुपुत्राला उपदेश करतात असा श्रीसद्गुरु-शिष्य भाव दाखवून पुढील श्लोकांनी श्रीसद्गुरुशिष्यपरंपरा असावी असे सुचविले.

इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्।
विवस्वान् मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत्।।४-१।।
एवं परम्पराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः।
स कालेनेह महता योगो नष्टः परन्तप।।२।।
स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः।

भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम्।।३।।

अर्थ :- हे अर्जुना! मी हा अक्षय फल देणारा व अविनाशी असा सिद्धयोग (कल्पारंभी) श्रीसूर्याला सांगितला होता. (पुढे) श्रीसूर्याने (हा सिद्धयोग आपला मुलगा) श्रीमनूला सांगितला आणि श्रीमनूने (आपला मुलगा) राजा श्रीइक्ष्वाकुला सांगितला.।।४-१।।

याप्रमाणे परंपरेने प्राप्त झालेला हा सिद्धयोग राजर्षींनी म्हणजे क्षत्रियांनी अर्थात् साधकांनी जाणून घेतला आणि त्यांनी या सिद्धयोगाचे अनुष्ठान म्हणजे साधन केले; परंतु हे अर्जुना! हा सिद्धयोग दीर्घकालापासून या भूलोकावरून संप्रदायरहित अर्थात् लुप्तप्राय झाला आहे.।।२।।

हे अर्जुना! तू माझा भक्त आणि प्रिय सखा अर्थात् मित्र असल्यामुळे तोच हा प्राचीन असा सिद्धयोग मी तुला आज सांगितला किंवा सांगत आहे; कारण हा सिद्धयोग अत्यंत उत्तम, रहस्यमय अर्थात् सर्वश्रेष्ठ असा ज्ञानमय आहे.।।३।।

"पाण्डुपुत्राय" या विशेषणाने अर्जुनाच्या कुलीनता, सौजन्यता इत्यादि गुणांचे वर्णन करीत.

इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन।
न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति।।१८-६७।।

अर्थ :- हे श्रीमद्भगवद्गीताशास्त्र अर्थात् सिद्धयोगसाध्यसाधनरहस्य तुझ्या हितार्थ सांगितले असून ते तू तपश्चर्या म्हणजे साधन न करणाऱ्याला सांगू नकोस तसेच जो अभक्त म्हणजे श्रीसद्गुरु, ईश्वर व सिद्धयोगसाधनशास्त्र यांच्यावर विश्वास ठेवणारा नसेल त्यालाही हे साधनरहस्य सांगू नकोस आणि जो श्रीसद्गुरू व ईश्वर यांची शुश्रूषा करणारा नसेल त्यालाही तू ही परम गूढतम साधन विद्या सांगू नकोस आणि जो माझी असूया म्हणजे निंदा करतो त्यालाही तू हे सिद्धयोगाचे परम रहस्यात्मक साधन सांगू नकोस.।।१८-६७।।

या श्लोकाने हे सिद्धयोगसाधनशास्त्ररहस्य अयोग्यांना देऊ नये, योग्य म्हणजे तपस्वी भक्त इत्यादींना द्यावे म्हणजे हे परमपुरुषार्थात अर्थात् मोक्षात पर्यवसित होते असे सांगितले. ग्रंथकारांनी सात शे श्लोकांचे संग्रहण स्वकाव्याने केले आहे. ते पुढीलप्रमाणे धैर्यगंभीरसागर व महायोगी पाराशर्यांनी **"श्रीमहाभारत"** या ग्रंथात श्रीभगवद्गीतोद्देशाने केले असून तेथे असे म्हटले आहे की -

पाराशर्यो महायोगी धैर्यगाम्भीरसागरः।

भारते भगवद्गीतामधिकृत्येदमब्रवीत्।।
यत् कुरुक्षेत्रमाक्रम्य धार्तराष्ट्रेषु धन्विषु।
पाण्डवेषु च सज्जेषु सङ्ख्याक्षौहिणीं क्षणात्।।
पितृ न् पितामहान् भ्रातृ न् पुत्रान् पौत्रान् गुरूनपि।
हन्तव्यानात्महस्तेन प्रेक्ष्य वैक्लब्यविह्वलम्।।
त्रस्यन्तं कर्मणः क्रूरादवधूताहवोद्यमम्।
बीभत्समानं बीभत्सुं निस्पृहं राज्यसम्पदि।।
अनुसन्धाय भगवान् मुकुन्दो रुक्मिणीपतिः।
कारुण्याक्रान्तहृदयः स्यन्दनस्थं तमभ्यधात्।।
हन्त किं तव संवृत्तमकाण्डे कश्मलोत्तरम्।
वैक्लब्यं त्यज्यतामेतल्लोकद्वयविगर्हितम्।।
कः पिता तव को भ्राता को गुरुः के च बान्धवाः।
त्वमेव तावत् को नाम कारुण्यं नाम किं तव।।
पात्रमेतस्य कश्च स्यात् केन को वाऽभिहन्यते।
बह्व्यः सामान्यतो भाषाः कल्प्यन्ते लोकशास्त्रयोः।।
विशेषमपरिज्ञाय ताभ्यो मा भूद् बिभीषिका।
इति लोकोत्तरामर्थमुद्रामुन्मुद्रयन् क्रमात्।।
प्रसङ्गानुप्रसङ्गेन विश्वविक्षोभकल्पनाम्।
अकालकलितस्वच्छस्वच्छन्दानन्दचिन्मयीम्।।
निश्चिन्वन्निश्चलस्वात्मसंरम्भैकविजृम्भिताम्।
उपर्युद्रिक्तकारुण्यो वीरेन्द्रः सव्यसाचिनि।।
कालग्रासैकरसिकां कालसङ्कर्षणीं कलाम्।
अनुप्रविश्य योगेन खेचरीखचितौजसा।।
स्वबलाक्रमणाटोपव्याप्तकौलक्रमो भवन्।
दत्त्वा लोकोत्तरां तस्मै दृष्टिमस्खलितार्चिषम्।।
प्रांशुः प्रदर्शयाञ्चक्रे वैश्वरूप्यमनुग्रहात्।
बाहवो यत्र कोटीनां कोटयः स्फुरदङ्गदाः।।
सहस्राणां सहस्राणि मूर्धा च मुकुटस्पृशाम्।
यदन्तः सागराः सर्वे सर्वे च कुलपर्वताः।।
काननानि च सर्वाणि सर्वा सर्वंसहाऽप्यभूत्।
भीष्मद्रोणकृपद्रौणिकर्णदुर्योधनादयः।।

शलभा इव यद्वक्त्रज्वालामालम्ब्य शेरते।
तदालोक्य ससन्त्रासं साश्चर्यं च धनञ्जयम्।।
अभ्रगम्भीरनिर्घोषो भगवानभ्यभाषत।
पश्य विश्वं मया ग्रस्तमाकीटादापितामहम्।।
विलीयमानं जिह्वाग्रे ज्योतिर्ज्वालाकलापिनि।
यत्र क्षणादखण्डानां ब्रह्माण्डानां परम्पराः।।
समुद्रबुद्बुदन्यायादुन्मिषन्ति त्रुटन्ति च।
अत्र भीष्ममितो द्रोणमिह शल्यमितः कृपम्।।
पश्य भस्मीकृतान् बन्धून् मय्यक्षय्यमहार्चिषि।
मज्ज्वालालीढसारं सञ्चराचरमिदं जगत्।।
प्राचीनं वासनाशेषं दग्धं वस्त्रमिवाश्नुते।
तदुत्तिष्ठ जहि स्वैरमात्तसारान् महिपतीन्।।
येन ते तीक्ष्णबाणस्य दोष्णोः शौर्यं प्रथिष्यते।
इति फल्गुनमाकर्षन्नात्मैश्वर्यविजृम्भया।।
क्रमादक्रमचिच्छक्तिस्वातन्त्र्यन्मीलनक्षमैः।
अवधीरितवेदादिबाह्यविद्याविडम्बनैः।।
आचक्षाणैरवैषम्यं कर्माकर्मविकर्मणाम्।
विकल्पकल्पनोल्लासग्रासतात्पर्ययोगिभिः।।
निषिद्धस्याप्यनुष्ठाने विहितस्याप्यतिक्रमे।
प्रत्यवायं व्युदस्यद्भिः स्वच्छसत्संविदां नृणाम्।।
लौकिकेऽप्युपयुक्तानां धर्माणामनुमन्तृभिः।
स्वसंविद्देवतामात्रसपर्यापरदृश्वभिः।।
चित्तस्यान्तर्निषिञ्चद्भिरद्वैतामृतचन्द्रिकाम्।
उन्मूलयद्भिरामूलं मायामालिन्यवासनाम्।।
संच्छिद्य संशयातङ्कमर्पयद्भिरहंप्रथाम्।
स्थापयद्भिरनाहार्यं प्रातिभं स्थैर्यमाशये।।
चित्स्वभावतया स्थातुं स्मारयद्भिः स्वमुद्यमम्।
प्रमाणैर्युक्तिभिस्तर्कैरनुवादैर्निदर्शनैः।।
आशङ्कोत्तरचर्चाभिरन्यैश्च गमकैः क्रमैः।
प्रकाशयद्भिर्विश्वस्य प्रतिष्ठामौत्तरं क्रमम्।।
स्पष्टैरव्याकुलैर्वाक्यैरन्योन्यान्वयबन्धुरैः।

बहुधा पुण्डरीकाक्षः पाण्डवं प्रत्यबोधयत्।।
सोऽपि तत्क्षणमारभ्य स्वविमर्शविचक्षणः।
लक्ष्मीमनुभवन् साक्षाज्जीवन्मोक्षप्रथामयीम्।।
क्षपयित्वा विपक्षं तं चिच्छक्त्या तीव्रविक्रमः।
अग्रजं च प्रतिष्ठाप्य स्वस्य राज्ये युधिष्ठिरम्।।
स्वसंरम्भानुगुण्येन स्वैरं व्यवहरन् बहिः।
कालं महान्तं निश्चिन्तो विजहार विशृङ्खलः।।
एतद् वितत्य विख्यातैः क्रमकेलौ कुलागमे।
नाथाभिनवगुप्तार्यैः पर्यालोचितमादरात्।।
एवं रामायणे काव्ये वाल्मीकीयेऽपि धीमता।
प्रहरन्तं शरीरेषु न ते पश्यन्ति राघवम्।।
इन्द्रियार्थेषु तिष्ठन्तं भूतात्मानमिव प्रजाः।
इत्यादिस्वात्मविस्फूर्तिप्रधानं स्वयमूह्यताम्।। इति।।

अर्थ :- धनुर्धारी धार्तराष्ट्र व पांडव अक्षौहिणी परिमितसेना घेऊन कुरुक्षेत्रात जमले. पितामह, चुलते, बंधू, पुत्र, नातू व श्रीसद्गुरुजन यांना आपल्या हाताने मारण्याचा प्रसंग आलेला पाहून व्याकुळ झालेला अर्जुन क्रूरकर्मव्याप्त युद्धाला भ्याला व राज्यसंपत्तीविषयी विरक्त झाला हे पाहून भगवान् श्रीरुक्मिणीपती श्रीमुकुंद रथात हताश होऊन बसलेल्या अर्जुनाला असे म्हणाले की, "हे भलत्यावेळी तुझ्या मनात काय आले? असे करण्याने तुझी इहपरलोकात निंदा होईल. तुझा पिता, भ्राता, गुरू वैगेरे कोण? प्रत्यक्ष तू कोण? तुझी दया ती कसली? या होणाऱ्या पापपुण्यांचा अधिकारी व पात्र कोण? कोण कोणाला मारतो? लोक व शास्त्रातील सामान्यतः कथित विषयांचे विशेष ज्ञान नसताना भीती ती कसली? असा लोकविलक्षण अर्थ सांगण्याच्या ओघात विश्वविक्षोभ करण्यात कुशल, स्वच्छंद-आनंद-चिद्रूपाचे ज्ञान व अनुभव करवीत कालसंकर्षणी विश्वग्रास करणाऱ्या खेचरीतेजोयुक्त कलेत योगाने प्रवेश करून श्रीभगवंतांनी अर्जुनाला दिव्यदृष्टी देऊन विश्वरूपांश दाखविला. त्यात बाहुभूषणयुक्त कोट्यवधी हात तसेच किरीटकुंडलांसहित मस्तके, सागरसमूह व पर्वतसंघ आतल्या बाजूला दिसत असताना व तशीच अरण्ये, भूभाग आणि भीष्मदुर्योधनादि सर्व वीर पतंगांप्रमाणे मुखात प्रविष्ट होत असताना संत्रस्त झालेल्या अर्जुनाला भगवान् श्रीकृष्ण असे म्हणाले की, "पाहा! मी हे सर्व कीटकांपासून ते ब्रह्मापर्यंत असलेले विश्व गिळले आहे.

या माझ्या तेजात कोट्यवधी ब्रह्मांडे बुडबुड्याप्रमाणे होतात व जातात. या भस्मीभूत भीष्मादिकांना पाहा. हे सर्वजण जळलेल्या वस्त्राच्या घडीप्रमाणे आहेत. चल उठ! आता यांना मारून टाक. हे सत्त्वहीन झालेले आहेत. यांचा नाश करण्यामध्ये तुला कोणत्याही प्रकारचे श्रम न होता तुझे बाहुबल प्रख्यात होईल. अशा रीतीने भगवान् श्रीगोपालकृष्णनाथमहाराजांनी अर्जुनाला आपल्याकडे वळविले व आत्मैश्वर्य दाखविले. त्यावेळी श्रीभगवंतांची भाषा कशी होती हे सांगताना ग्रंथकारांनी असे वर्णन केले आहे की, ती (भाषा) स्वच्छंद स्वातंत्र्याला प्रकट करण्याला समर्थ, वेदादिबाह्यविद्याविडंबक, कर्माकर्म-विकर्मांचे वैषम्य अर्थात् विषमता घालविणारी, विहितत्याग व निषिद्ध कर्मांच्या अनुष्ठानात दोष नाही असे सांगणारी, लौकिक व्यवहारात धर्मानुष्ठानाला अनुमोदन देणारी, स्वसंविद्देवतेच्या पूजेचा परतीर दाखविणारी, चित्तात अमृताचा सडा टाकणारी, मायेने मलिन झालेल्या वासनेला उखडून टाकणारी, संशय नष्ट करून अहंचे ज्ञान देणारी, आशयात अनाहार्य प्रतिभेचे स्थैर्य स्थापणारी, चिद्रूपत्वाने अर्थात् चैतन्यरूपाने राहण्याची आठवण देणारी, स्वकर्माचे व स्व-उद्योगाचे स्मरण करविणारी, तसेच प्रमाण, युक्ती, तर्क, अनुवाद, दृष्टान्त, शंका, समाधान, इतर चर्चांनी विश्वाच्या स्थिती-संहारादिकांची माहिती देणारी, स्पष्ट, निराकुल व अन्योन्यसंबंधी अशी आहे. या भाषेने श्रीभगवंतांनी पार्थाला जागृत केले. अर्जुनही त्याच क्षणापासून विचारी बनला व जीवन्मोक्षानंद अनुभवीत अतुल पराक्रमाने शत्रुसंहार करून धर्मराजाला राज्यावर बसवून, स्वतः स्वानंदमग्न, निश्चिंत व निःसंशय होऊन त्याने बराच काळ विहार केला. हे क्रमकेली-कुलागमादि तंत्रग्रंथातून विद्वानांनी विस्ताराने सांगितले आहे. हाच विषय श्रीअभिनवगुप्तपाद आदि आचार्यांनी आदराने विवेचिलेला आहे. याचाच बुद्धिमान् श्रीवाल्मीकी ऋषींनी रामायणात श्रीरामांना उपदेश करताना असे म्हटले आहे की, "शरीर-इंद्रीय-विषयात आत्मरूपाने विहार करणारा तूच आहेस," अशा प्रकाराने लोक राघवाला ओळखत नाहीत." हा विषय आत्मसंबंधी वाक्यांनी विचारात घ्यावा किंवा "शब्दादि विषयात राहणाऱ्या भूतात्म्याला अर्थात् जीवाला जशी प्रजा जाणत किंवा ओळखत नाही तशीच ती शरीरामध्ये प्रहार व विहारादि क्रिया करणाऱ्या राघवाला अर्थात् परमात्म्याला जाणत नाही."

वरील सर्व वाक्ये स्वतःच्या तर्काने लावावीत. असे हे सातशे श्लोकाने प्रतिपादिलेले अति महत् व अनुत्तम म्हणजेच सर्वोत्तम प्रमेय किंवा ज्ञेय आहे.

ज्यात उपसर्ग, निपात, अभिधा व व्यंजनादि अनेक शब्दशक्तिवैचित्र्य भरलेले आहे व संक्षेपविस्तारादिकांनी युक्त, वेदविस्तारातील तात्पर्यार्थातील रहस्य जे पिंडरूपाने म्हणजे शक्तिरूपाने सांगितले आहे ते सर्व श्रीशिवच आहेत; कारण ते श्रीशिवज्ञानाला कारण, श्रीशिवरूपापासून उत्पन्न झालेले, श्रीशिव-स्वभावाशी अभिन्न व श्रीशिवमयच आहे. येथे **"णमि उण० (नत्वा नित्य०१)"** पासून **"देवो उवदिसइ माहवो त्ति सिवम् (देव उपदिशाति माधव इति शिवम्।७०)"** या तंत्रोपसंहारात आदिअंताची अक्षरे **"नत्वा शिवम्"** यातील अक्षरद्वय घेऊन "नवम्" असा अक्षराकार होतो. हे आम्ही सांगितलेले तत्त्व सर्वनूतन आहे असे सुचविले आहे. तसेच विश्वव्यवहारात राहणाऱ्या प्रमात्याच्या रूपाचे किंवा प्रमात्याच्या अधीन ज्याचा उद्रेक आहे असा कर्तृत्व-युक्त आत्मदेवतारूप श्रीशिववस्तूला नमन करून म्हणजेच अंतिम रहस्याचा विचार करून प्राचीन जड वासनेचा निरास करून उदयाला आलेले हे संवित्स्पंदाचे सार व अलौकिक स्वभावाचे हे तत्त्व अर्थात् तद्रूप उपनिषत् समाप्त झाले.।।७०।।

*****

गाथा क्रमाङ्क ७१

अवतरणिका :- या प्रमाणे सर्वतंत्र निराकुल समाप्त करून त्याचा अवतरणक्रम सांगणारे व सिद्धसंकल्पामुळे चित्त भाररहित झालेले तंत्रकर्ते स्वप्नात दर्शन दिलेल्या सिद्धयोगिनीदेवतेचे स्मरण करून असे म्हणतात की -

इत्थं पाअडसुत्तसत्तइसमुल्लासेक्कसन्धाइणिं
जग्गत्तक्खणणिव्विसेससविणोइण्णं पइण्णेत्तरं।
लोउल्लङ्घनजोग्गसिद्धिपअवीपत्थाणबद्धुज्जमं
कन्थासूलकपालमेत्तविहवं वन्दामि तं जोइणिं।।७१।।
(इत्थं प्राकृतसूत्रसप्ततिसमुल्लासैकसन्धायिनीं
जाग्रत्तत्क्षणनिर्विशेषस्वप्नावतीर्णां प्रतिज्ञोत्तराम्।
लोकोल्लङ्घनयोग्यसिद्धिपदवीप्रस्थानबद्धोद्यमां
कन्थाशूलकपालमात्रविभवां वन्दे तां योगिनीम्।।)

अर्थ :- अशा प्रकारे सत्तर प्राकृत भाषेतल्या गाथांच्या उत्पत्तीमध्ये उल्लास प्रदान करणाऱ्या, जाग्रत अवस्थेमध्ये स्वाभाविकपणे व निर्विशेष स्वप्नावस्थेमध्ये अभिव्यक्त, प्रकट अथवा अवतरित होणाऱ्या, पूजोपकरणदक्षिणा आदींच्या पलीकडील स्वहस्तमुद्राद्वारा आपल्या हृदयातल्या करुणेचे प्रकाशन

करणाऱ्या, अलौकिक योगैश्वर्य किंवा योगसिद्धींनी संपन्न आणि कंथा, शूल व कपालमात्र धारण करणाऱ्या अशा योगिनीला मी नमस्कार करतो.।।७१।।

विशेष :- या एकाहत्तराव्या गाथेतल्या "कंथा" या शब्दाचे तात्पर्य "विश्वव्यवहार" असे आहे. कपाल म्हणजे शरीरातील अहंताधिवासी आत्मा होय. योगिनी म्हणजेच कालसंकर्षिणीस्वरूप योगसिद्धींनी संपन्न अशी अलौकिक महाशक्ती होय. ही योगिनीच स्वस्पंदानंद चिन्मय श्रीमहार्थमंजरी-मध्ये अनुप्रविष्ट आहे व तिच्या उत्पत्तीची कारणभूमी आहे. जाग्रत् अवस्थेत निर्विशेष विलक्षणताशून्य (सहज) स्वप्नामध्ये योगिनी प्रकट झाली. ती श्रीसद्गुरुशक्तिमय योगशक्तींनी संपन्न अशी परमेश्वरी आहे. या योगिनीचा महायोगी श्रीगोरक्षनाथांना स्वप्नामध्ये साक्षात्कार झाला. तिच्या कृपेने त्यांनी सत्तर गाथांमध्ये श्रीमहार्थमंजरीच्या रूपात महार्थतत्त्वाचे किंवा योगामृताचे संयोजन केले.

श्रीमहार्थमंजरीच्या रचनेसंबंधी परिमल टीकेच्या उपसंहारामध्ये असे म्हटले आहे की, एकदा विश्वभावन श्रीभैरव भगवान् श्रीशिव संविदाकाशाच्या मणिमंडपामध्ये विराजमान होऊन विषयासवाचे पान करीत होते. स्वसंवेद्य स्वानंदभोगलहरींचे आपल्या सदाशिवादि शिष्यांनी सेवा केले जात असलेले ते चिंतन करीत होते. विश्रांतीअवस्थेत त्यांची एक इच्छाशक्ती उत्पन्न झाली. तिने तत्वार्थाच्या निश्चयासाठी पुष्पांजली समर्पित केली. त्या शक्तीने श्रीभैरवांना असे विचारले की, "हे करुणामय! ज्याचे ज्ञान झाले असता पूर्णता प्राप्त होते असे सर्वत्र असणारे तत्त्व काय किंवा कोणते आहे?" त्यावेळी तिला स्वच्छंद श्रीभैरव भगवान् श्रीशिवांनी संविद् औत्तरतत्त्वाचा म्हणजेच उत्तराम्नायरूप महार्थतत्त्वाचा उपदेश केला. महार्थक्रमगर्भिणी विद्या दिव्य-सिद्धमनुष्यौघ विभागातून अवतरित झाली आहे. ही दुर्लभ विद्या योग्यांच्याच वाणीमध्ये स्थिर राहू शकते. कालक्रमाने चोलदेशशिरोमणी "महाप्रकाश" नावाचे एक श्रीसद्गुरू होऊन गेले. त्यांचे शिष्य पूज्य श्रीगोरक्षनाथ महेश्वरानंद या नावाने झाले. ते नित्य जप, पूजन आणि देव-आराधनादिमध्ये मग्न असत. एकदा ते रात्रीच्या वेळी योगमंडपात बसले होते. त्यांनी कंथाशूलकपालधारिणी देवीला पाहिले. त्या देवीचा भांग कुंकवाने शोभित होता. श्रीगोरक्षनाथांनी त्या देवीची पूजा केली आणि दूतीला दक्षिणा द्यावयाला सांगितले. त्यावर ती योगिनी क्रुद्ध झाली आणि हातात सात संख्येने युक्त अशी मुद्रा बांधत तिने असे म्हटले की "ही मुद्रा आहे. याचे फळ सांगितले पाहिजे." श्रीगोरक्षनाथांच्या

डोक्याला स्पर्श करून ती तेथून अदृश्य झाली. त्यांनी सकाळी आपल्या श्रीसद्गुरूंना हा वृत्तांत सांगितला आणि त्यांच्या आदेशानुसार सत्तर गाथांमधून अमृताचा वर्षाव करणाऱ्या श्रीमहार्थमंजरीची रचना केली. महार्थरूप सिंधूचे मंथन करून ते तत्त्व श्रीसद्गुरूंना ऐकविले आणि शिष्यांना ज्ञान होण्यासाठी त्याच्यावर "**परिमल**" नावाची टीका लिहिली. या महार्थविद्येच्या चिंतनाने श्रीशिव, श्रीब्रह्मा आणि श्रीविष्णू आपल्या अधिकारात जागृत राहतात, सावधान राहतात आणि शक्तीने युक्त होतात. श्रीशुक, श्रीवामदेव आदि याचे विवेचन करून सर्व संपद्रूप प्रतिष्ठेमध्ये अधिष्ठित राहतात. भगवान् श्रीगोपालकृष्णनाथ-महाराजांनी महाभारतात रथामध्ये स्थित असणाऱ्या व कर्तव्यापासून विमुख झालेल्या अर्जुनाला या महार्थविद्येचा अथवा योगज्ञानामृताचा उपदेश केला होता. ही महार्थविद्या ज्ञानाची पराकाष्ठा आहे, कर्तव्याची पराक्रिया आहे व भाव्याची परा भूमी आहे. हा महार्थ चैतन्याचे सर्वस्व आहे. याच्यात श्रीशिव आणि शक्ती यांच्या अभिन्नतेचे प्रतिपादन केलेले आहे. याच्यात चिदात्मशक्तीचा उत्कर्ष वर्णित केलेला आहे. त्यात सत् आणि असत् यांच्या भेदाचे भंजन केलेले आहे. हे तत्त्व पूजेच्या स्वरूपाचा निष्कर्ष आहे. यात मंत्रतत्त्वाचे चिंतन आहे. हे तत्त्व म्हणजे वाग्वृत्तिस्फूर्तिनिश्चय आहे. हे तत्त्व भोग आणि मोक्षश्री यांच्या सामरस्यफलाच्या अर्पणाचे उत्कृष्ट स्वरूप आहे. श्रीमहार्थमंजरी परिमल-टीकेची रचना शिष्यांच्या सद्बोधासाठी श्रीमहेश्वर अर्थात् श्रीगोरक्षनाथ यांनी प्रेमपूर्वक केली आहे. परिमल टीकेच्या शेवटी अनेक श्लोकातून श्रीमहार्थ-मंजरी या ग्रंथाचे महत्त्व वर्णन केले आहे. त्यात श्रीगोरक्षनाथांच्या व्यक्ति-प्रकाशनात त्यांच्या चोलदेशीय दाक्षिणात्य अभिव्यक्तीचे निरूपण केले आहे.

परिमलव्याख्यार्थ :- या प्रमाणे उक्तप्रकारे ही प्राकृत भाषेतली म्हणजे संस्कृतभाषेशिवाय महाराष्ट्र-मागधादि इतर प्राकृत भाषेतली सूत्रे म्हणजेच सूचक अशी गाथारूप वाक्ये आहेत. त्यांच्या सत्तरसंख्येबद्दल उल्लास, उत्पत्ती आणि प्रसार या गोष्टींचे संधान करणारी, दुसऱ्याच्या मदतीशिवाय उत्पादन करणारी व विचार प्रभुत्वाने गोचर होणारी योगिनी अर्थात् अलौकिक ऐश्वर्यात्मक योगशक्तिसंपन्न जी परमेश्वरी आहे तिला मी नमस्कार करतो, स्तवितो अथवा अभिवादन करतो अर्थात् तादात्म्यरूपाने तिच्यात प्रवेश करतो. "**श्रीक्रमकेली**" या ग्रंथात "**वन्दनं हि तदनुप्रवेशः ।।**" अर्थात् "वंदन म्हणजे तिच्यात प्रवेश करणे," असे म्हटले आहे. ती तंत्राची प्रयोजक असल्याने वंदनीय आहे. वंदनीयतेची कारणे सांगणाऱ्या विशेषणांचा आता

विचार करीत आहोत. जाग्रदात्मा म्हणजे एक विशिष्ट अवस्था होय. जागृत ही कर्तृत्वोपचाराने जागरावस्थाच होय. तिच्यासह निर्विशेष व विलक्षणतारहित स्वप्नात अत्यंत नि:शंक होऊन अनुप्रविष्ट झालेल्या योगिनीला नमस्कार असो. जाग्रदावस्था आणि तिच्याबरोबरच स्वप्नावस्था या दोन्ही समानरूपाच्या व भेदरहित आहेत. त्यांपैकी स्वप्न स्पष्टास्पष्ट व जागृती स्पष्टरूपा आहे. जर स्वप्नातील अस्पष्ट अंश सोडला तर स्पष्टांशात दृग्गोचर झालेल्या योगिनीला नमन असो. प्रतिज्ञोत्तरा म्हणजेच पूजादि उपकरणांना बाजूला सारून हस्तनिर्मित मुद्रेने महदुत्कर्षाने शोभणाऱ्या अशा योगिनीला नमन असो. वेद्यवर्गापलीकडील ज्ञातृरूपाने अवस्थित असण्याच्या कौलिकेश्वर्यरूपसिद्धीला सोडून विश्वोत्तर स्वभावाकरिता उद्युक्त असलेल्या योगिनीला तसेच विश्वोल्लंघनाला समर्थ असूनही इदंतेचा स्वीकार करून म्हणजे विश्व होऊन व्यवहार करणाऱ्या योगिनीला वंदन असो. शिवाय कंथा म्हणजे झोळी, शूल व कपाल या वस्तूंच्या ऐश्वर्याने शोभणाऱ्या योगिनीला वंदन असो. या तीन पदार्थातच विश्व अंतर्भूत असल्याने इतर वस्तूंनाही सत्य म्हणावयाला हरकत नाही. त्यापैकी कंथा म्हणजे भेदप्रभेदाने विलक्षणता दिसली तरी ऐक्याचे अनुसंधान करणारा विश्वव्यवहार होय. **"इत्थमिच्छाक्रियाज्ञानशक्तिशूलाम्बुजाश्रयः।"** अर्थात् शूल म्हणजे इच्छा, ज्ञान व क्रियारूप तीन पात्यांनी शोभणारे त्रिशूल होय. (ते तीन पाकळ्यांच्या कमळाप्रमाणे) आहे. कपाल म्हणजे देहविषयक अहंतेने युक्त असा मर्यादित जीवभाव होय. त्याला मनोमय मायाज्ञाता असे म्हणतात. अशा तीन आयुधांनी शोभणाऱ्या देवतेला नमस्कार असो. कालाला योग्य व पूर्णरूपाने खेचण्याच्या अपार सामर्थ्याने प्रकाशणाऱ्या योगिनीला (मी वंदन करतो) नमन करतो असा श्लोकार्थ सांगितला.

संस्कृत ही सर्वभाषांची मूलप्रकृती होय. तिच्यापासूनच झालेले हे प्राकृत होय. हे भाषांतर म्हणजे दुसरी भाषा होय. तिच्या आश्रयाने काव्यरचना करणे हेही कौशल्यच आहे; कारण त्यात प्रकृतीचे म्हणजेच संस्कृतचे सौष्ठव आणि परिचय हे दोन्हीही साधण्याची चमत्कृती आहे. **"न म्लेच्छितवै नापभाषितवै"** व **"न म्लेच्छितव्यं ज्ञादौ"** अर्थात् "म्लेच्छ भाषेतून भाषणही करू नये" व "अशा भाषांमधून यज्ञादि क्रियाही करू नयेत," असे म्हणून अपशब्द व प्राकृत भाषेचा निषेधच श्रुतिस्मृतीतून सांगितला आहे व संस्कृतभाषाच विधिरूपाने अर्थात् योग्य आहे म्हणून सांगितली आहे. संस्कृतविरहित इतर भाषा म्हणजे अपभ्रंश होत; कारण **"शास्त्रेषु संस्कृतादन्यदपभ्रंशतयोच्यते।"**

अर्थात् "शास्त्रांमध्ये संस्कृतशिवाय इतर भाषा अपभ्रंश होत," असे वचन आहे, असे म्हणाल तर तसे नाही. आत्मपरमेश्वरविषयक विचारांशिवाय अन्यत्र यज्ञात स्रुक्स्रुवादि पदार्थांविषयी वापरलेली संस्कृतभाषाच चिखलात पडलेल्या फूलपाकळ्याप्रमाणे अपभ्रष्ट अथवा निर्माल्याप्रमाणे समजावी. जर इतर कोणतीही सामान्यभाषा असून तिचा विषय देवता व मंत्र असा उत्कृष्ट असेल तर ती भाषा श्रेष्ठच समजावी; कारण त्याच्या प्रयोगाने **"एकः शब्दः सम्यग् ज्ञातः सुष्ठु प्रयुक्तः स्वर्गे लोके कामधुग् भवति"** अर्थात् "एक शब्द उत्तम प्रकारे जाणला असता व योग्य प्रकारे प्रयुक्त केला असता (साधक-भक्तयोगिशिष्य) स्वर्गलोकात सर्व इच्छा पूर्ण झालेला असा होतो," अशा श्रुतींनी सांगितलेल्या स्वर्गशर्करेचा परित्याग करून त्याहून अतिश्रेष्ठ अशा स्वपरामर्शविषयक श्रेष्ठ अशा आत्मस्वरूपाचा विचार असल्यास भाषा कोणतीही असो ती श्रेष्ठ समजावी असे विद्वानांनी सांगितले आहे. शिवाय स्वप्नकाली साक्षात् झालेल्या योगिनीला हीच भाषा आवडते. आम्ही सांगितलेली विद्या प्राकृतभाषेतूनच असल्याने तीच उचित आहे. आमच्या परमश्रीसद्गुरूंनी **"श्रीमदृजुविमर्शिनी"** या ग्रंथात असे म्हटले आहे की, **"इह हि विद्यायां त्रिष्वपि बीजेष्वन्तस्थातृतीयमस्ति, सम्प्रदायस्य काश्मीरोद्भूतत्वात्, प्राकृतभाषाविशेषत्वाच्च यथासम्प्रदायं व्यवहार इत्युपदेशः"** अर्थात् "या विद्येत तीनही बीजांमध्ये अंतस्थ अतृतीयतत्त्व आहे. संप्रदाय काश्मीरात उद्भूत झाल्यामुळे आणि प्राकृतभाषा विशेषामुळे जसा संप्रदाय आहे तसा व्यवहार करावा असे म्हटले आहे." गाथांमधून अर्थरहस्याची सूत्रेच सांगितली आहेत. याच कारणामुळे **"परिमल"** नामक टीकाग्रंथाची आवश्यकता भासली. नाही तर **"सन्तो हिअपआसो"** इत्यादि गाथेत **"सत्"** याला सांगितलेल्या प्रकृतिप्रत्ययावरून या **"सत्"**चा अर्थ विमर्श असा आहे हे कसे समजले असते? तसेच प्राकृतसूत्रे म्हणून सूत्रांचे वैशिष्ट्य सांगत असताना संस्कृतपेक्षाही या प्राकृतशब्दांचे अनेक अर्थ करता येतात हे या गाथेतून दृष्टान्तादाखल सांगितले आहे. **"चित्तं(न)ण लिहइ चित्तं (चित्रं न लिखति चित्रं०)"** यात चित्तंचा अर्थ चित्र, चित्त, चित् असा तीन प्रकारांनी करता येतो. तसेच **"अत्थं एत्ताण सोमसुज्झाणं"** यात अस्त्र, आस्था, अर्थ व अस्त असे बरेच अर्थ होतात. असाच विचार इतरत्रही करावा. असेच "प्राकृत" **"पाअड-"** या शब्दाने प्रकट असा अर्थ होत असल्याने सूत्र-ज्ञानाविषयी स्पष्टार्थताच दिसते. आता **"सप्तति"** विचारात घेऊ. योगिनी या

सर्व विषयांमध्ये अवगाहन करूनच व्यवहार करतात म्हणजेच त्या सर्वज्ञ असतात. "**श्रीमत्सप्तकोटीश्वरीविद्यानुसंधान**" या ग्रंथाच्या "**सप्तकोटि-महामन्त्रा महाकालीमुखोद्गताः।**" अर्थात् "सात कोटी महामंत्र हे महाकालीला मुखोद्गत आहेत," या उक्तीवरून प्रत्येक दशकात एक कोटी मंत्रांचा अंतर्भाव करून सिद्धयोगिनीच्या सप्तसंख्यायुक्त मुद्रांची गणना (दशकाची एक मुद्रा याप्रमाणे) सत्तर होते. शिवाय श्रीमन्महार्थक्रमविस्तार हा वृंदचक्रात समाविष्ट होतो. ते वृंदचक्र पुढील प्रमाणे चौसष्ट शक्तींची समष्टी अथवा समूह आहे.

धाममुद्रावर्णकलासंविद्भावस्वभावतः।
पातानिकेतदृष्ट्या च..............।।

अर्थ :- त्यात धाम, मुद्रा, वर्ण व कला संविद्भावस्वभावानेच निकेत-दृष्टीने अर्थात् स्थानदृष्टीने समाविष्ट आहेत.

यानुसार शांभवसिद्धादिकात व्योमेशी आदि सिद्धिसमावेश अपरिहार्य आहे. त्याप्रमाणेच सर्वांमध्ये अनुस्यूत असणारी साम्राज्यशालिनी श्रीरुद्र-रौद्रेश्वरी अवश्य मानली पाहिजे. या गणितानुरूप धामवर्ण, कला, संविद्भाव, निकेत व मुद्रा मिळून सत्तर संख्या (चौसष्ट शक्ती व सहा धामादि) पूर्ण होते हे निर्विवाद होय. **लास म्हणजे सूत्रांची स्फुरत्ता होय. उल्लास म्हणजे शब्दार्थांची उत्पत्ती होय. समुल्लास म्हणजे शब्दार्थांचे प्रसरणशीलत्व होय.** सूत्रांच्या उत्पत्तीला फुलांना देठाशी जोडल्याप्रमाणे तंत्रकाराच्या मनात संधान करणे होय. प्रसरण किंवा प्रसृती म्हणजे बाणांचे पिसारे धनुष्यादिकांवर ठेवणे होय. एकच शक्ती साधकाच्या हृदयात प्रविष्ट होऊन प्रकाश व विमर्श स्वभावाची होते आणि वाच्य व वाचकरूप दोन प्रकाराने प्रसरण पावणाऱ्या प्रपंचाच्या विलक्षणसंपत्तीला उत्पन्न व प्रकाशित करते. त्या जाग्रदवस्थेमध्ये श्रीपरमेश्वरीशक्तीचा साक्षात्कार होऊ शकतो.

"**श्रीविज्ञानभैरवतंत्र**" या ग्रंथात यासंबंधी असे म्हटले आहे की -

अनागतायां निद्रायां विनष्टे बाह्यगोचरे।
यावस्था मनसा गम्या परा देवी प्रकाशते।।

अर्थ :- बाह्यविषय नाहीत व निद्राही नाही अशी जी मनाला गम्य असणारी मधली अवस्था असते त्या अवस्थेत परा देवी प्रकाशित होते.

या प्रकारे सांगावयाच्या तंत्रविशेषाचे एकप्रकारच्या कारुण्याने ग्रथन करणे व त्याचे विवरण करून ते प्रकाशित करणे हीच प्रतिज्ञेची दृढता आहे. त्या योगिनीनेच हे सर्व माझ्या हातून करविले. योगिनींची अशी ही स्थिती

साधकभक्तयोगिशिष्यांना पाहिजे ते देणारी आहे. अन्यथा साधकभक्तयोगिशिष्यांना साक्षात्कारही होणार नाही किंवा त्यांच्यामध्ये वरप्रदानाचे सामर्थ्य राहणार नाही. यांपैकी काही तरी एकच साधेल. स्वतः अपरिमित अर्थात् पूर्ण प्रमातृरूपा योगिनी इच्छादि तीन शक्तींनी विचित्र विश्वविलास जीवभावाच्या व्यवधानरूप उपायाने आकर्षित करून जीवाला आत ठेवते व दुसऱ्यांच्या अर्थात् परिमित व अपूर्ण जीवमात्रांच्या अनुग्रहाकरिता विश्वविस्तारसंपत्तीचा अभिलाष करणाऱ्या, समीप असणाऱ्या व इदंतादि प्रमेयाभिमान धरणाऱ्या जीवांना ती संपत्ती बहाल करते. या शूल, कंथा व कपालादि शब्दांचे तात्पर्य समजून घ्यावे. आत्मदेवतेच्या स्वभावाला अनुकूल असणाऱ्या, उंचबळलेल्या कारुण्याने जिचे अंतःकरण तरंगित झाले आहे अशा, स्वरूपसाक्षात्काररूप अलौकिक संपत्तीचे दान करून औदार्याने शोभणाऱ्या व कुलाचार्यांच्या सेवेने जी फलप्राप्ती होते तेच फल स्वतःच्या सेवेनेही प्राप्त करू देणाऱ्या त्या आर्यसिद्ध योगिनीला मी वंदन करतो. अशा स्व-उपास्यदेवतारूप व्यक्तींना केलेला नमस्कार सर्वमंगलकारी होतो. याविषयी आमच्या परमश्रीसद्गुरूंनी "**श्रीत्रिपुरसुंदरीमंदिरस्तोत्र**" यामध्ये असे म्हटले आहे की -

लक्ष्मीमहोदयमहोत्सवपुण्यलग्नं
वाणीविशेषपरिमेलनपूर्वपर्व।
त्वद्वन्दनं त्रिपुरसुन्दरि! विश्ववन्द्यं
तद्वत् परं विजयते महानीयसारम्।।

अर्थ :- हे श्रीत्रिपुरसुंदरी! तुला केलेले वंदन श्रीलक्ष्मी प्राप्त करून देणाऱ्या पुण्याशी संलग्न करणारे आहे. ते श्रीसरस्वतीशी गाठ घालून देणारे असून विश्वाने मानलेले व महत्सार संपन्न आहे.।।७१।।

आयातिरथ तन्त्रस्य कथ्यते कौलिकोदिता।
यामाकर्ण्य पुमानत्र विमर्शौचित्यमश्नुते।।
पुरा कदाचिद् भगवान् भैरवो विश्वभावनः।
संविदाकाशमास्थाय महान्तं मणिमण्डपम्।।
स्वचित्तचषकापूर्णमापिबन् विषयासवम्।
स्वानन्दभोगलहरीं स्वसंवेद्यां परामृशन्।।
सदाशिवादिभिः शिष्यैः सेव्यमानो मदोज्झितैः।
आसाञ्चक्रे चिरं कालं निर्विकल्पे निजे पदे।।
तत्र क्रियायां सुप्तायां विश्रान्तायां च संविदि।

इच्छाशक्तिरभूदेका प्रबुद्धा परमेष्ठिनः।।
प्रशान्तबाह्यसंरम्भं चक्रमालक्ष्य सा तदा।
तत्त्वमर्थस्य निश्चेतुं जग्राहान्तः कुतूहलम्।।
अथ पुष्पाञ्जलिं क्षिप्त्वा सौरभोद्भ्रान्तषट्पदम्।
पाणिभ्यां पद्मताम्राभ्यां पस्पर्श पदयोः प्रभुम्।।
देवोऽपि किञ्चिदुन्मील्य चमत्कारोत्तरं ज्वलन्।
कारुण्यवर्षिभिर्नेत्रैः प्रेयसीं तामुदैक्षत।।
प्रणिपत्य च सा भूयः कल्पिताञ्जलिकुड्मला।
शुचिस्मिता स्मरारातिं बभाषे शशिभूषणम्।।
देव! त्वद्वदनादेव गोपितान्यन्यदर्शने।।
प्राक्प्रत्यगुत्तरावाञ्चि स्त्रोतांसि श्रुतवत्यहम्।।
किन्तु प्रष्टव्यमेतन्मे कारुण्यं यदि ते हृदि।
किं तत्त्वमत्र सर्वत्र यज्ज्ञानात् पूर्णता भवेत्।।
इति श्रुत्वा गिरं देव्याः श्रीमान् स्वच्छन्दभैरवः।
मानयन् माननीयां तां पृष्टं सुमुखि! सुष्ठिवति।।
पवित्रं स्वहविश्शेषं ग्राहयित्वा स्मितोत्तरम्।
अन्तर्लक्षे पदे तिष्ठन् बभाषे तत्त्वमौत्तरम्।।
यथा स्यात् स्वात्मनः स्फूर्तिर्यथा तस्य बहिः प्रथा।
यथा च मोहः प्रभ्रश्येद् देशिकेन्द्रे प्रसीदति।।
प्रक्षालितमलश्चासौ विशुद्धिं स्वां परामृशन्।
यथा च नित्यं भुञ्जीत जीवन्मुक्तिचमत्क्रियाम्।।
तथा तथा शिवस्तस्याश्चैतन्यमुपबृंहयन्।
अर्थतत्त्वमुपादिक्षदौत्तराम्नायसंविदाम्।।
क्रमशः श्रृण्वती सा च रहस्यं तत्त्वनिश्चयम्।
विमृशन्ती च विशदं स्वस्पन्दानन्दचिन्मयीम्।।
विश्वस्य स्वात्मानश्चैक्यं प्रत्यभिज्ञाय वास्तवम्।
तेन भैरवनाथेन तादात्म्यामोदभागभूत्।।
अथ सा कालयोगेन शिवानन्दस्य धीमतः।
शिष्यस्योपादिशद् देवी चिदद्वैतस्य निश्चयम्।।
क्रमेण तच्च नाथानां परिपाट्या भुवः स्थलम्।
दिव्यसिद्धमनुष्यौघप्रविभागादवातरत्।।

अवतीर्णाऽप्यसौ विद्या महार्थक्रमगर्भिणी।
योगिनां वदनेष्वेव तिष्ठत्यत्यन्तदुर्लभा।।
अथ कालक्रमवशाच्चोलदेशशिरोमणिः।।
महाप्रकाशो नामासीद् देशिको दृक्क्रियोत्तरः।।
तस्य शिष्योऽभवद्धीमान् गोरक्षोनाम वश्यवाक्।
महेश्वरानन्द इति प्राप्तपूज्याह्वयो महान्।।
अर्चयन् देवतां नित्यं जपन् ध्यायंश्च निश्चलम्।
पर्यटञ्श्च दिशामन्तान् कालं कञ्चिदवाहयत्।।
अथैकदा निशीथिन्यामासीनो यागमण्डपे।
तर्पयित्वा परां देवीं गन्धपुष्पाक्षतासवैः।।
आस्वाद्यानन्दपात्राणि त्रीणि तीव्राणि तन्मनाः।
स्वसंरम्भपरामर्शभव्यामनुभवन् प्रथाम्।।
जागरास्वप्नयोर्मध्यमध्यास्य महतीं दशाम्।
दूत्याः स्तनतटोत्सङ्गमपराङ्गेन पीडयन्।।
प्रदीपैः कुशलैरेव प्रदीप्तैरपरोक्षितः।
आस्ते स्म विस्मयाक्रान्तः कह्लारोत्फुल्ललोचनः।।
अत्रान्तरे स्त्रियं काञ्चित् कन्थाशूलकपालिनीम्।
स ददर्श किलोल्लोकां सिन्दूरालङ्कृतालिकाम्।।
आलोक्य च स तां सिद्धां कुर्वन्नासन्नमासनम्।
उपाहरदुदारश्रीः पूजोपकरणं क्रमात्।।
दक्षिणां च यथाशक्ति दातुं दूतीं समादिशत्।
क्रुद्धेव योगिनी सा च किमेभिरिति निःस्पृहा।।
महाराष्ट्रभुवं भाषां प्रयुञ्जाना स्मितोत्तरम्।
सप्तसङ्ख्योचितां मुद्रां बध्नती हस्तपल्लवे।।
अलमर्थैरियं कन्था वसोर्धारां हि वर्षति।
प्रदीयतामियं मुद्रा फलं च प्रतिपाद्यताम्।।
इत्थमाभाषमाणैव सकपालेन पाणिना।
स्पृशन्ती मस्तकं तस्य निश्शङ्कं सा तिरोदधे।।
अथ तन्महदाश्चर्यमश्नुवानो महामनाः।
आरचय्यार्चनाशेषमशेषामनयन्निशाम्।।
प्रातर्गुरुकुलं गत्वा प्रणम्य चरणौ गुरोः।

रात्रिवृत्तान्तमाचख्यौ प्राञ्जलिः प्रश्रितैः पदैः।।
देशिकेन्द्रोऽपि सञ्चिन्त्य निश्चित्यार्थं च तत्क्षणम्।
पुण्योत्सव इति प्रीतः शिष्यं श्रीमानभाषत।।
अलमर्थप्रपञ्चेन पिण्डितोऽर्थः प्रकाश्यते।
अलमर्थैरिति प्राह यदियं सिद्धयोगिनी।।
यच्च सप्तोचितां सङ्ख्या कुर्वाणा करकुड्मले।
सफलीक्रियतामेषा भावज्ञेनेत्यभाषत।।
तदार्थीं सृष्टिमुल्लङ्घ्य शाब्दीं सा काञ्चिदिच्छति।
येन मन्त्रात्मकैः शब्दैः परमेश्वर्युपास्यते।।
सप्तकोटीश्वरी देवी तया नूनमुपास्यते।
अन्यथा तादृशीमेव मुद्रां न प्रतिपादयेत्।।
तत् त्वयात्र विधातव्या स्फीतसारस्वतश्रिया।
सूत्राणां सप्ततिस्तन्त्रे महार्थे मन्त्रगर्भिणी।।
सद्यस्त्वद्वदनात् तस्मात् पादुकोदयशोधितात्।
पुरातनागमप्रख्यो ग्रन्थः प्रख्यायतां महान्।।
किञ्च भाषा तदीयैव माधुर्यामृतवर्षिणी।
औचित्यं पोषयत्यत्र महामन्त्रानुसारिणी।।
इत्याज्ञां देशिकेन्द्रस्य दयालोर्मूर्ध्नि धारयन्।
महार्थमञ्जरीं नाम संविद्दर्पणमण्डलम्।।
तन्त्रं दिनैः कतिपयैः प्रबबन्ध स्वतन्त्रधीः।
कार्यारम्भो हि महतामविलम्बेन सिध्यति।।
तच्च तत्त्वविदं लोके वेदशास्त्रकलास्वपि।
महार्थसिन्धुमन्थानं श्रावयामास देशिकम्।।
स्वयमेव च तां विद्यां स्वविमर्शकुतूहलात्।
शिष्याणामपि निर्बन्धाद् व्याचचक्षे विचक्षणः।।
यथा हि पुष्पमञ्जर्यां ग्राह्यः परिमलो भवेत्।
तद्वदस्यामपि ग्राह्या व्याख्या परिमलाह्वया।।
अस्यामर्थस्थितिः सैव या सर्वत्र कुलागमे।
किन्तु शब्दस्य शय्याऽन्या नात्यन्तं सा विभिद्यते।।
शुद्धो जन्मस्वनेकेषु यः कश्चिज्ज्ञायते कृती।
एनामुपदिशन्त्यस्मै योगिन्यो भाग्यशालिने।।

अनयैव शिवो विष्णुर्ब्रह्मान्येऽपि महौजसः।
अन्तर्विमृष्टया शुद्धाः स्वाधिकारेषु जाग्रति।।
इमामेव विमृश्यान्तर्वामदेवशुकादयः।
अध्यतिष्ठन् परां काष्ठां प्रतिष्ठां सर्वसम्पदाम्।।
इमामेव च सङ्ग्रामे बन्धुहत्यापराङ्मुखम्।
मुकुन्दो बोधयामास स्यन्दनस्थं धनञ्जयम्।।
क्षणमालोचिताऽप्येषा जीवन्मुक्तिं प्रयच्छति।
उपर्युपर्यनुस्यूतास्तत्तदैश्वर्यसम्पदः।।
न चैनामर्हति प्राप्तुं क्रूरः कौटिल्यवान् खलः।
प्रमत्तो मत्सरी भीरुरामयावी मदोद्धतः।।
नास्तिकः स्वल्पधीर्दुःखी दर्शनान्तरतत्परः।
गुरुभक्तिविनिर्मुक्तः कृतघ्नो दुर्मनाः शठः।।
अश्रद्धालुरहङ्कारी रागद्वेषोपरूषितः।
चपलप्रकृतिः पापो निष्कृपः कृपणोऽलसः।।
प्राप्नुयाद् यदि मौर्ख्येण गुरोरेतादृशः पुमान्।
उभौ तौ कुलयोगिन्यः शपन्ति क्षुभिताः क्रुधा।।
अकृत्वा कौलिकीं तृप्तिं विष्टरादुद्धरन्निमाम्।
उद्घाटयन् पठन् शृण्वन् व्याचक्षाणश्च नेष्यते।।
अमन्त्रबिन्दुसंस्पर्शं कोशमस्याः परामृशन्।
योगिनीनां प्रचण्डानामापानेष्वामिषायते।।
मूलसंवित्कलामात्रमधिगम्यार्चयन्निमाम्।
अश्नुते सिद्धिमखिलामविनश्वरसम्पदम्।।
सिद्धान्तानां यथान्येषां सारं स्यादौत्तरः क्रमः।
तथा तस्याप्यशेषस्य सारमेषाऽवधार्यताम्।।
बाह्यानामान्तराणां च मन्त्राणामुज्ज्वलार्चिषाम्।
वीर्यमेषैव बोद्धव्या पराहन्तामयी कला।।
ज्ञातव्यानां परा काष्ठा कर्तव्यानां परा क्रिया।
भाव्यानां च परा भूमिरियमीशेन कथ्यते।।
सहस्रशोऽपि सन्त्वाज्ञाः शिवभट्टारकप्रभोः।
इयं तु तस्य चैतन्यसर्वस्वमिति निर्णयः।।
इयमेव शिवेनोक्ता श्रुतिस्मृत्यादिविस्तरे।

अन्यथाकरणे हेतुर्व्याख्यातॄणां मतिभ्रमः।।
अन्यत्र पारम्पर्येण साक्षादत्रार्थनिश्चयः।
इति वैषम्यमप्यूचे भगवानिन्दुशेखरः।।
आस्थाय धैर्यमवधूय विकल्पचिन्ता –
मालूय संशयमुपास्य च देशिकेन्द्रम्।
ग्राह्येयमौत्तरमहाक्रमतन्त्रगर्भा –
दार्यैरुदन्वदुदरान्मणिमञ्जरीव।।
आदिवाक्यमुपक्षेपः प्रतिपाद्यस्य वस्तुनः।
प्रयोजनादेः प्रथमं प्रमाणातिक्रमः प्रभोः।।
अधिकारिण्यनियमस्थितिर्विधिनिषेधयोः।
परीक्षा संसृतेः स्वस्य स्फुटास्फुटतया प्रथा।।
स्वविमर्शस्य साध्यत्वं तत्स्वरूपविमर्शनम्।
षट्त्रिंशत्तत्त्वनिर्णीतिस्तदुत्तीर्णा विचारणाः।।
अन्तर्भावः प्रपञ्चस्य स्वप्रकाशविमर्शयोः।
शिवशक्त्योरभिन्नत्वं शक्त्युत्कर्षश्चिदात्मनः।।
संहृतावपि विश्वस्य स्वस्मिन्नव्याकुला स्थितिः।
प्रमात्रादित्रयस्यैक्यं सदसद्भेदभञ्जनम्।।
उल्लोकता सपर्याया महार्थक्रमवासना।
पूजास्वरूपनिष्कर्षो देवताया निरूपणम्।।
चिन्तनं मन्त्रतत्त्वस्य वाग्वृत्तिस्फूर्तिनिश्चयः।
मुद्रारूपपरामर्शो विमर्शस्यात्मवर्तिनः।।
प्रागल्भ्यं भोगमोक्षश्रीसामरस्यफलार्पणे।
जीवन्मुक्तेरुपन्यासः क्षणभङ्गतिरस्क्रिया।।
स्वस्यानन्दस्वभावत्वमाणवादित्रयं क्रमात्।
विवेचनमुपायानां नैश्चिन्त्यं योगशालिनाम्।।
विमर्शस्याविलम्बत्वं फलस्य प्रतिपादने।
गुरुकारुण्यनिघ्नत्वं स्वपरामर्शसम्पदः।।
सर्वदर्शनसारत्वमुपक्रान्तस्य वस्तुनः।
उक्तसर्वार्थसंक्षेपो भारताद्यविरुद्धता।।
उपपत्तिप्रयोगश्च तन्त्रावतरणक्रमे।
इति स्वस्पन्दसंसिद्ध्यै गृह्यतां तन्त्रसङ्ग्रहः।।

इति गुरुमुखाम्नायन्यायान्महाक्रममञ्जरी-
परिमलमिमं शिष्यप्रेम्णा बबन्ध महेश्वरः।
कनकसदसो मध्ये नृत्यन्निव प्रभुरद्भुतं
यदिह सुलभः साक्षात्कर्तुं विमर्शमयः शिवः।।
गाथानामनुभाषणं तदनु तच्छाया ततो व्याकृति-
र्ग्रन्थार्थग्रथनक्रियासु गहनो हृद्यश्च कश्चित् क्रमः।
संवादोक्तिसहस्रसङ्कलनया तत्त्वार्थचर्चोत्सवः
सौभाग्यं च विमर्शसम्पद इति प्रस्थानमध्यक्ष्यताम्।।
चोलास्ते सततोत्सवा जनपदाः श्लाघ्यो गुणैर्माधवो
रेतोधाः स्फटिकावदातहृदयो नाथः प्रकाशो महान्।
स्रोतः स्वच्छमनुत्तरं परिणतं पाण्डित्यमास्थाधिका
वश्या वागिति हन्त तन्त्रकृदसौ सर्वोत्तरो वर्तते।।
सत्संवित्समयमहाब्धिकल्पवृक्षा-
नाचार्यानभिनवगुप्तनाथपादान्।
आमूलादमलमतीनुपघ्नयन्त्या-
वाग्वल्ल्याः प्रचुरफलो ननु प्ररोहः।।
साहित्याब्धौ कर्णधारोऽहमासं
काव्यालोकं लोचनं चानुशील्य।
तद्वत् स्वच्छं लब्धवानस्मि बोधं
पान्थो भूत्वा प्रत्यभिज्ञापदव्याम्।।
यो मे वामचमत्क्रियोद्यममयः स्तब्धोऽपि सन्नश्नुते
विश्वं व्याप्नुवतश्चिदद्वयमहश्चन्द्रोदयाद् विक्रियाम्।
तस्याह्लादमहार्णवस्य न कथं वर्धेत कूलङ्कषो
वाग्विक्षोभविजृम्भया बहुमुखं कल्लोलहल्लोहलः।।
कावेर्या इव माधुर्यं कह्लारस्येव सौरभम्।
नटेशस्येव तन्नृत्तमस्य ग्रन्थस्य गौरवम्।।
विश्वोत्पत्तिविपत्तिभूः स भगवानत्र प्रवक्ता शिव-
स्तस्याहं प्रतिशब्दपर्वतगुहा यन्मे न गर्वग्रहः।
तद्दोषोऽस्तु गुणोऽपि वा न खलु तत् स्वायत्तमित्थं स्थिते
मात्सर्यं महतामुदेतु यदि वा वात्सल्यमुज्जृम्भताम्।।
अधिवासयतु सदा मुखमन्यकथालेपलब्धदौर्गन्ध्यम्।

कर्पूरशकल इव मे शिव शिव इति शीतलः शब्दः।।

।। इति शिवम्।।

इति श्रीमहाप्रकाशशिष्यस्य गोरक्षापरपर्यायस्य
श्रीमन्महेश्वरानन्दस्य कृतिर्महार्थमञ्जरीपरिमलः सम्पूर्णः।।

कालचक्रघटीयन्त्रकल्पनामूलशिल्पिने।
नमः स्वच्छन्दचिन्मात्रपरिबर्हाय शम्भवे।।
पादुकोदयमहार्थमञ्जरीकोमलास्तवपरास्तुतिक्रमैः।
स्फारयन् भुवि महार्थसंविदं देशिको विजयते महेश्वरः।।
जयत्यमूलम्लानमौत्तरं तत्त्वमद्वयम्।
स्पन्दास्पन्दपरिस्पन्दमकरन्दमहोत्पलम्।।

।। शुभमस्तु।।

अर्थ :- आता या तंत्राची कौलिक किंवा तंत्रोक्त उत्पत्ती सांगतो ती ऐका. ती ऐकून मनुष्य विमर्शज्ञानाला योग्य होतो. पूर्वी एकदा भगवान् श्रीभैरव चिदाकाशात वसती करून स्वचित्तपात्रातील विषयासवाचे पान करून निरहंकारी अशा श्रीसदाशिवादि शिष्यांची सेवा घेत निर्विकल्पानंदात बरेच दिवस राहिले. त्यावेळेला क्रिया झोपली होती व ज्ञानशक्ती आराम करीत होती. त्याच सुमाराला परमेश्वराची इच्छाशक्ती जागृत झाली. तिने विश्वचक्र निवांत असलेले पाहून मनात अर्थतत्त्वाचे कौतुक पाहण्याचा निश्चय केला व हातात पुष्पांची रास घेऊन ती श्रीभैरवपदकमलावर वाहिली. श्रीभैरवांनी कारुण्यपूर्ण नजरेने त्या प्रेयसीकडे साश्चर्य पाहिले. तिने श्रीशिवांना नमन करून हात जोडले व ती मदनरिपू श्रीचंद्रशेखरांना असे म्हणाले की, "हे देवा! आपल्या वंदनामुळेच इतर दर्शनातून गुप्त असलेली पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर अशी चार स्रोतसे असल्याचे मी ऐकले आहे. माझ्यावर आपली कृपा असल्यास मी तुम्हाला एक गोष्ट अशी विचारते की, "सर्वत्र विश्वात असे कोणते तत्त्व आहे की ज्याच्या ज्ञानामुळे पूर्णता येते." ते ऐकून स्वच्छंद श्रीभैरव तिच्या वचनाला मान देऊन तिला असे म्हणाले की, "वा:! प्रश्न उत्तमच आहे" मग श्रीभैरवांनी तिला आपल्यातील शिल्लक राहिलेले आसव देऊन अंतर्मुख होऊन श्रेष्ठ तत्त्व सांगितले. ते पुढील प्रमाणे आहे. श्रीसद्गुरूप्रसन्न झाले की, आत्मस्फुरण, बाह्यज्ञान, मोहभ्रंश होतो आणि मनाची निर्मलता शिष्याला प्राप्त होऊन साधकयोगी स्वतःच्या विशुद्धीचा विचार करीत जीवन्मुक्तीचा चमत्कार भोगतो व श्रीशिव त्याच्या चिच्छक्तीचा

विस्तार करीत त्याला अर्थतत्त्व सांगतात. उपनिषदांचे सर्वश्रेष्ठ सार ऐकणारी ती म्हणजे इच्छाशक्ती चिन्मय आनंदस्पंदाचा विचार करीत विश्व आणि आत्मा यांचे वास्तव ऐक्य जाणून श्रीभैरवांच्या कृपेने तादात्म्यरूप किंवा सामरस्यरूप सुंगधाचा उपभोग घेणारी झाली. नंतर काही कालाने तिने श्रीशिवानंदांच्या बुद्धिमान् शिष्याला किंवा श्रीशिवानंदांनाच चिद्-अद्वैताचे तत्त्व सांगितले. क्रमाने ते नाथसांप्रदायाच्या रूपाने पृथ्वीवर आले व सिद्ध-योगसाधकभक्तयोगिशिष्यांच्या प्रवाहरूपाने पृथ्वीवर पसरले. हे तत्त्व अर्थात् विद्या महार्थानुक्रम असलेल्या योग्यांच्या मुखात राहिल्याने दुर्लभ झाले. पुन्हा काही काळानंतर चोलदेशात एक विद्वान् "महाप्रकाश" नामक तत्त्वज्ञानी अवतरले. त्यांनाच वाक्सिद्धी असलेले "श्रीगोरक्षनाथ" नावाचे शिष्य भेटले. त्यांनाच पुढे पूज्यतादर्शक "श्रीमहेश्वरानंद" हे नाव मिळाले. ते सदैव जप-ध्यानादि करीत असत. त्यांनी यात्रा करण्याच्या मिषाने सर्व भूभाग पालथा घातला. असेच एकदा रात्रीच्या वेळेला यागमंडपात ते अर्थात् श्रीमहेश्वरानंद परा शक्तीचे पूजन करीत होते. गंध, पुष्प, अक्षता व आसवांनी श्रीशक्तीला तृप्त करून त्यांनी तीन आसवपात्रांचा आस्वाद घेतला. (तीन आसवे म्हणजे गंधासव, अक्षतासव व पुष्पासव होय.) त्या आनंदावस्थेत ज्ञान व विमर्शाचा अनुभव घेत असताना ते जागृती व स्वप्न यांच्या मधल्या अवस्थेत मग्न झाले. त्यावेळी त्यांना असे दिसले की, एका दूतीच्या वक्षस्थळाला आपण निरखून पाहात आहोत व चहूकडे दीपांचा लख्ख प्रकाश पडला आहे व आपण आश्चर्यचकित होऊन डोळे विस्फारून पाहत आहोत. इतक्यात त्याच अवस्थेत कंथा, शूल, कपालधारिणी, भांगात सिंदूर घातलेली व तेजस्वी अशी एक देवता त्यांच्या सन्मुख आली. श्रीमहेश्वरानंदांनी त्या सिद्धदेवतेची आसन, अर्घ्य व पाद्यांनी पूजा केली व दक्षिणा देण्याकरिता दूतीला आज्ञा केली. दक्षिणेचा विषय निघताच ती निःस्पृह सिद्धयोगिनी किंचित् क्रुद्ध होऊन त्याची आवश्यकता नसल्याचे तिने (प्राकृत भाषेत) सांगितले आणि स्मित-हास्य करीत हातांच्या बोटांच्या साहाय्याने सात मुद्रा करून दाखवीत ती असे म्हणाली की, "अरे ! धन कशाकरिता ? ही कंथा धनवर्षाव करणारी आहे. ही मुद्रा मला दे व त्याचे फल मिळव." असे बोलून कपालयुक्त करांनी त्याचे मस्तक स्पर्शून ती एकदम अंतर्हित झाली. नंतर उदार मन असणाऱ्या श्रीमहेश्वरानंदांनी चकित होऊन (जागृतीत) अपूर्ण पूजन पूर्ण करून त्याच विचारांच्या आश्चर्यात रात्र घालविली. नंतर पहाटे ते श्रीसद्गुरुकुलात गेले व

श्रीसद्गुरूंना वंदन करून रात्रीची घटना सुंदर शब्दात सांगितली. ती घटना ऐकून श्रीसद्गुरूंनी काही विचार मनाशी निश्चित करून ते आपल्या शिष्याला असे म्हणाले की, "तुला याचा थोडक्यात अर्थ सांगतो. अर्थाचा फाफटपसारा आता पुरे. ती सिद्धयोगिनी अर्थविषयक विचार सोडून शब्दविषयाचा विचार देऊ इच्छिते." "अर्थ पुरे," असे म्हणून तिने हाताच्या ज्या सात मुद्रा तुला दाखविल्या त्यावरून असे वाटते की, ज्या मंत्ररूप शब्दाने सप्तकोटीश्वरी देवीची उपासना होते त्या शब्दसृष्टीची किंवा काव्याची तिला कामना आहे. अन्यथा तिने हाताच्या सप्तमुद्रा दाखवून पुढे ठेवलेल्या अर्थाचा अर्थात् दक्षिणेचा अव्हेर केला नसता. त्यामुळे तू निर्मल वाग्वैभवाने मंत्रगर्भ अशा सत्तर सूत्रांचे ग्रथन कर. (त्याचे श्रीमहार्थतंत्र हे नाव असेल.) पादुकोदयामुळे निर्मळ झालेल्या अशा तुझ्या मुखातून पुरातन आगम विचार सांगणारा एक महान् ग्रंथ तयार होवो व त्या ग्रंथाची अमृतमधुर अशी प्राकृतभाषाच असू दे. त्यातच महामंत्रत्वाचे औचित्य राहील." अशा प्रकारची आपल्या दयाळू श्रीसद्गुरुदेवांची आज्ञा शिरसावंद्य मानून श्रीमहेश्वरानंदांनी आपल्या स्वतंत्र कुशाग्रबुद्धीने थोड्याच दिवसात "**श्रीमहार्थमंजरी**" नावाच्या ग्रंथाची रचना केली. **थोरांचे इष्ट कार्य पूर्ण होण्याला फारसा वेळ किंवा कालावधी लागत नाही.** या ग्रंथात ज्ञानाचे दर्शन घडविणारे आरसेच चारही बाजूंनी लागले आहेत. ग्रंथ पूर्ण होताच त्यांनी वेद, शास्त्र व कला यात निपुण आणि अर्थसागराचे मंथन करण्यात कुशल अशा आपल्या श्रीसद्गुरूंना तो दाखविला. त्यांनी आपल्या काही शिष्यांनाही त्यांच्या आग्रहाखातर तो शिकविला. पुष्पातील परिमल जसा ग्राह्य असतो तशी याची "**परिमल**" नावाची व्याख्याही अत्युत्तम आहे. सर्व कुलागमातील जो अर्थ अर्थात् विषय आहे तोच अर्थ अर्थात् विषय याही ग्रंथाचा आहे. फक्त शब्दरचना जरी थोडी वेगळी भासली तरी ती खूप विलक्षण नसून बरीचशी मिळती-जुळतीच आहे. अनेक जन्मांनी जो शुद्ध, निर्मल व भाग्यवान् झाला आहे त्यालाच योगिनीचा हा उपदेश लाभतो. श्रीब्रह्मा, श्रीविष्णू आणि श्रीशिव हे महातेजस्वी देवही याच ज्ञानाने शुद्ध होऊन स्वतःचे अधिकार जागरुकतेने पाळतात. श्रीवामदेव, श्रीशुकदेव आदि ज्ञानी ज्या अध्यात्म संपत्तीच्या परमसीमेवर पोहोचले त्याला मूलकारण हा विमर्श होय. युद्धामध्ये आपल्या बांधवांच्या हिंसेपासून परावृत्त झालेल्या अर्जुनाला श्रीमुकुंदांनी याचाच उपदेश केला आहे. या "**श्रीमहार्थमंजरी**" ग्रंथाचे क्षणभर जरी

आलोकन केले तरी जीवन्मुक्ती सुलभ होते; मग सतत अभ्यासाने संपूर्ण आध्यात्मिक ऐश्वर्य घरी चालत येते हे सांगावयाला नको. हे शास्त्र पुढील अनधिकारी लोकांना देऊ नये. हे तत्त्व क्रूरप्रकृती लोकांना व दुष्टांना देऊ नये. त्याचप्रमाणे कपटी, हिंसक, उन्मत्त, मत्सरी, भित्रे, रोगी, गर्विष्ठ, नास्तिक अर्थात् वेदाची निंदा करणारे, मंदबुद्धी, दुःखी, इतर दर्शनांच्या अभ्यासात गढलेले, श्रीसद्गुरुभक्ती न करणारे, कृतघ्न, दुश्चित्त, लबाड, अश्रद्ध, अहंमन्य, रागद्वेषाने भरलेले, चंचलस्वभावी, पापी, निर्दय, कृपण व आळशी अशा लोकांना हे रहस्य सांगू नये. दुर्दैवाने असाच शिष्य भेटल्यास त्या श्रीसद्गुरू व शिष्यांना सिद्धयोगिनीचा शाप मिळतो. कौलिकीतृप्ती केल्याशिवाय या मंत्राचे उद्घाटन, पठन, श्रवण, कथन इत्यादि करणे शक्य नाही. मंत्रबिंदूच्या स्पर्शाशिवाय या कोशाला अर्थात् साठा किंवा निधी यांना हात लावणारा प्राणी योगिनीचे खाद्य बनतो. जरी मूलसंवित्चा अंशमात्र मिळाला तरी शाश्वतसंपत्ती आणि सर्वसिद्धींचा (तो साधकयोगी) स्वामी बनतो. सर्व सिद्धान्ताचे सार औपनिषत्तत्त्व आहे. त्याचेही सार ही **"श्रीमहार्थमंजरी"** अर्थात् तेथे सांगितलेला विषय होय. तेजोरूप बाह्यान्तर्मंत्राचे वीर्य म्हणजेच ही पराहंतामयी कला होय. ही **"श्रीमहार्थमंजरी"** ज्ञेयाची पराकाष्ठा, कर्तव्यातली श्रेष्ठ क्रिया व भावनीयातील श्रेष्ठ स्थान होय, असे श्रीशिवांनी सांगितले आहे. श्रीशिवांच्या अनंत आज्ञा असल्या तरी ही कला म्हणजे **"श्रीमहार्थमंजरी"** श्रीशिवांचे चैतन्यसर्वस्वही आहे असा निर्णय अर्थात् सिद्धान्त आहे. श्रीशिवांनी श्रुतिस्मृत्यादींच्या विस्तारातून हाच अर्थ सारभूत असल्याचे सांगितले आहे. यातून वेगळाच अर्थ काढणाऱ्यांचा मतिभ्रम झाला आहे असे खुशाल समजावे. श्रीशिवांनी अजून पुढे असे म्हटले आहे की, इतर शास्त्रातून परंपरेने किंवा पर्यायाने हा अर्थ निघतो; परंतु आमच्या या तंत्रातून मात्र साक्षात् हा अर्थ निघतो. हे दोन्हीतील वैषम्य आहे. याचे तात्पर्य असे आहे की, धैर्य धरून, विकल्पचिंता दूर सारून, संशय सोडून, श्रीसद्गुरूंची सेवा करून, श्रेष्ठ महाक्रमतंत्रगर्भातून व समुद्रोदरातून रत्नमंजरीप्रमाणे या विमर्शाच्या तत्त्वार्थाचे आर्यांनी ग्रहण करावे.

या नंतर ग्रंथकार अध्यायानुक्रम सांगतात. आधी प्रतिपाद्यवस्तू सांगितली. नंतर ग्रंथाचे प्रयोजन सांगितले. ईशाचे प्रमाणातीततत्त्व, अधिकारीचा अनियम, विधिनिषेध परीक्षण, स्वसंसृतीचे स्फुटास्फुटत्वज्ञान, स्वविमर्शाची साध्यता, विमर्शस्वरूप कथन, छत्तीस तत्त्वांचा निर्णय, विचारांची तत्त्वातीतता, त्यात

प्रपंचांतर्भाव, प्रकाशविमर्शाचे व श्रीशिवशक्तीचे अभिन्नत्व, चिदात्म्याचा शक्त्युत्कर्ष, विश्वाच्या उपसंहाराच्या वेळेला स्वात्म्यात अव्याकुलस्थिती, प्रमात्यादि त्रिपुटींचे ऐक्य, सदसद्भेदनिरास, पूजाविचार, महार्थक्रमविचार, पूजास्वरूप निर्णय, देवतानिरूपण, मंत्रतत्त्वचिंतन, वाग्वृत्तिस्फूर्तिनिश्चय, मुद्राविचार, आत्मवर्तिविमर्शाचे महत्त्व, भोगमोक्षसमरसता, जीवन्मुक्त्युपन्यास, क्षणभंगवादखंडन, स्वतःचे आनंदस्वभावत्व, आणवादि उपायत्रयांचे क्रमाने स्वरूपकथन, उपायविचार, योग्यांची निश्चिंतता, फल देण्यात विमर्शाचे अग्रेसरत्व, श्रीसद्गुरुकारुण्य विचार, परामर्शमहत्त्व, तत्त्वाला सर्वदर्शनसारता, भारतादि ग्रंथाची अविरोधता, सर्वार्थसंक्षेप व अनुक्रमकथनपूर्वक तंत्रानुक्रमणकथन अशा प्रकारे गाथांचा अनुक्रम सांगितला.

अशा रीतीने श्रीमहेश्वरांनी श्रीसद्गुरुमुखातून बाहेर आलेल्या वाक्यांना वेदतुल्य समजून आपल्या शिष्यांवरील प्रेमाने "**श्रीमहार्थमंजरी**" या ग्रंथावर "**परिमल**" नावाची टीका लिहिली. या टीकासाहाय्याने कनकसभेत तांडवनृत्य करणाऱ्या श्रीशिवप्रभूंचा विमर्शस्वरूपात साक्षात्कार होणे कठीण नाही. या ग्रंथात आधी गाथा, नंतर त्या गाथेची छाया, तिचे स्पष्टीकरण व ग्रंथार्थ सांगणारा मनोहर क्रम, सहस्रविध ग्रंथातील प्रमाणवचने, काही ठिकाणी संवाद, तत्त्वार्थाची चर्चा, विमर्शसंपत्तीचे सौभाग्य इत्यादि गोष्टी आढळतील. या ग्रंथाचे कर्ते सर्वोत्तर अर्थात् सर्वांच्या पलीकडचे आहेत. त्यांचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे. नित्योत्सवी असा चोलदेश, गुणवान् असा माधवराजा, स्फटिकनिर्मलहृदयी महाप्रकाश, नाथपंथीय श्रेष्ठ विद्वान्, त्यांची ओघवती वाणी, श्रेष्ठ पांडित्य, सश्रद्धता व वाक्सिद्धी लाभलेले हे तंत्रकर्ते लोक-विलक्षणच म्हणावे लातील. श्रीअभिनवगुप्तपादाचार्य हे ज्ञानसागर, कल्पवृक्ष व निर्मलमतीसाधकांच्या अज्ञानलेशाचे निरसनरकर्ते असून त्यांच्या वाग्वल्लीचा हा सुंदर सुफल देणारा अंकुर आहे.

मी साहित्यसागरातील कर्णधार होतो. मी काव्यालोकरूप नेत्राचा अभ्यास करून स्वच्छ ज्ञान मिळविले व प्रत्यभिज्ञारूप मार्गावरील प्रवासी बनलो.

गंभीर व स्तब्ध असा आनंदसागर माझ्या वाक्चमत्कृतीने चंचल होतो व विश्वव्यापकचैतन्यरूप चंद्रोदयाने तो विक्रिय होतो म्हणजेच त्यात खळबळ निर्माण होते. मग माझ्या वाग्रूप प्रवाहाच्या सतत मेलनाने तो स्वमर्यादा सोडून उचंबळेल यात नवल ते काय? अर्थात् या ग्रंथाच्या अभ्यासाने निरंतर आनंद होईल हे तात्पर्य होय. या ग्रंथाचे श्रेष्ठत्व किंवा

गौरव हा श्रीनटेशांच्या नृत्याप्रमाणे, माधुर्य हे कावेरी नदीप्रमाणे व सुगंध हा कमळफुलाप्रमाणे आहे. या ग्रंथाचे वक्ते विश्वाची उत्पत्तिप्रलयादि क्रीडा करणारे भगवान् श्रीशिव आहेत. त्यांच्या शब्दाचा पुनरुच्चार करणारा मी एक पर्वताची गुहा आहे. त्यामुळे मला या ग्रंथाच्या रचनेचा गर्व किंवा अभिमान नाही. असे असल्याने त्यातील गुण व दोष माझ्याकडे येत नाहीत. त्यामुळे विद्वानांच्या मनात मत्सर किंवा वात्सल्य वाटले तरी मला त्याचे काही नाही.

अन्यभाषणामुळे किंचित् दुर्गंधयुक्त झालेले माझे मुख कापुराच्या वडीप्रमाणे असलेली "शिव, शिव" अशी शीतल अक्षरे सदैव सुगंधित किंवा पवित्र करोत अर्थात् माझ्या मुखातून श्रीशिवनामस्मरण सतत घडो.

कालचक्ररूप घटीयंत्राची कल्पना करून त्याला मूर्त स्वरूप देणाऱ्या स्वच्छंद चिन्मात्ररूपाने शोभणाऱ्या श्रीमहादेवांना नमस्कार असो.

ज्या श्रीमहेश्वरनामक महात्म्याने श्रीपादुकोदय, श्रीमहार्थमंजरी, श्रीकोमलवल्लीस्तव, श्रीपरास्तुतिप्रभृति ग्रंथसाहाय्याने महार्थसंवित्‌चा प्रकाशात आणून प्रसार केला त्या श्रीसद्गुरुवर्यांचा विजय असो.

या अद्वैत औपनिषत् तत्त्वाचा जयजयकार असो. हे तत्त्व कधी म्लान होत नाही, हे तत्त्व सर्वांचे मूलाधार आहे. हे कमलरूपाने सुंदर आहे. याच्या स्पंद, अस्पंद व परिस्पंद अशा पाकळ्या आहेत आणि हे तत्त्व सुगंधाने काठोकाठ भरलेले आहे. (मुमुक्षू साधकभक्तयोगिशिष्यभ्रमरांना हे तत्त्व मकरंदामुळे आपल्याकडे आकर्षित करणारे आहे) अशा या औत्तर अर्थात् सर्वांच्या पलीकडे असलेल्या व सर्वश्रेष्ठ तत्त्वाचा विजय असो.

।। शुभं भवतु ।।

श्रीमहार्थमंजरीच्या मूलगाथांची अक्षरानुक्रमणिका

****** ******

श्रीमहार्थमंजरीपरिमलव्याखेत उद्धृत केलेले ग्रंथ

***** *****

श्रीमहार्थमंजरी परिमलव्याखेत उल्लेखिलेले ग्रंथकर्ते

*****

श्रीमहार्थमंजरीपरिमलव्याखेतील ग्रंथकाराने स्वतः रचलेल्या श्लोकांची अर्धानुक्रमणिका

*****

*****

संकेत-सूची

अ०त्रिं = अर्चनात्रिंशिका
अ० सि० = अजडप्रमातृसिद्धिः
अ० सि० वि० = अजडप्रमातृसिद्धि-विमर्शिनी
अद्व० = अद्वयोल्लासः
अ० वा० = अपोहवादः
अ० स्त० = अम्बास्तवः
अ० स्तो० = अनुभवस्तोत्रम्
आ० स्तो० = आनन्दताण्डवविलास स्तोत्रम्
ई० प्र० = ईश्वरप्रत्यभिज्ञा
ई० प्र० वि० = ईश्वरप्रत्यभिज्ञा-विमर्शिनी
ई० प्र० वि० वि० = ईश्वरप्रत्यभिज्ञा-विवृतिविमर्शिनी
ई० प्र० वृ० = ईश्वरप्रत्यभिज्ञावृत्तिः
ई० सि० = ईश्वरसिद्धिः
ई० सि० वि० = ईश्वरसिद्धिविमर्शिनी
उ० द्वि० = उपायद्विशती
उ० नि० = उपनिषद्
उ० भै० = उच्छुष्मभैरवः
उ० विं० = उपायविंशतिः
ऋ० = ऋग्वेदः
ऋ० वि० = ऋजुविमर्शिनी
ऐ० आ० = ऐतरेयारण्यकम्
क० स्तो० = कक्ष्यास्तोत्रम्
का० म० = कालिकामतम्
कि० = किरणागमः
कु० क० = कुलकमलम्
कु० ग० = कुलगह्वरम्
कु० भ० = कुण्डलाभरणम्
कु० म० = कुब्जिकामतम्
कु० मू० = कुलमूलावतारः
कुला० = कुलार्णवः
को० स्त० = कोमलवल्लीस्तवः
क्र० के० = क्रमकेलिः
क्र० स० = क्रमसद्भावः
क्र० सि० = क्रमसिद्धिः
क्र० सू० = क्रमसूत्रम्
क्रमो० = क्रमोदयः
क्षे० रा० = क्षेमराजः
गी० नि० = गीतानिःष्यन्दः
च० ज्ञा० = चन्द्रज्ञानम्
च० सू० = चरणसूत्रम्
चि० च० = चिद्गगनचन्द्रिका
छा० उ० = छान्दोग्योपनिषद्
ज्ञा० कौ० = ज्ञानेन्दुकौमुदी
त० धा० = तन्त्रवटधानिका
तन्त्रा० = तन्त्रालोकः
त० प्र० = तत्त्वप्रकाशः
तै० उ० = तैत्तिरीयोपनिषद्
त्रि० भै० = त्रिशिरोभैरवम्
त्रि०म०उ० = त्रिपाद्विभूति महानारायणोपनिषद्
त्रि० स्तो० = त्रिपुरसुन्दरी-मन्दिरस्तोत्रम्
त्रि० हृ० = त्रिकहृदयम्
दे० क्र० = देविकाक्रमः

ध्वन्या० = ध्वन्यालोकः
न० प्र० = नखप्रलापः
न० वि० = नरेश्वरविवेकः
न० स० = नयसङ्गतिः
नि० = निरुक्तम्
नि० कु० = निशाकुलम्
निशा० = निशाटनम्
नि० षो० = नित्याषोडशिकार्णवः
नै० = नैश्वासागमः
प० त्रिं० = परात्रिंशिका अथवा त्रिंशिकाशास्त्रम्
प० त्रिं० वि० = परात्रिंशिकाविमर्शिनी
प० प० = पर्यन्तपञ्चाशिका
प० म० = परामतम्
प० स० = पदसङ्गतिः
प० सा० = परमार्थसारः
प० सू० = परासूक्तम्
प० स्तो० = परास्तोत्रम्
पश्चि० = पश्चिमम्
पादु० = पादुकोदयः
पू० = पूर्वम्
पू० र० = पूजारहस्यम्
प्र० कौ० = प्रभाकौलम्
प्र० प० = प्रबोधपञ्चदशिका
प्र० हृ० = प्रत्यभिज्ञाहृदयम्
बृ० उ० = बृहदारण्यकोपनिषद्
ब्र० उ० = ब्रह्मोपनिषद्
भ० गी० = भगवद्गीता
भू० रा० = भूतिराजः
म० दे० = मतदेवः
म० प० = महानयपद्धतिः
म० प्र० = महानयप्रकाशः
म० भा० = महाभाष्यम्
म० भा० प० = महाभाष्यपस्पशाह्निकम्
म० मु० = महावनमुनिः
म० स्तो० = मनोनुशासनस्तोत्रम्
महा० = महाम्नायः
महाभा० = महाभारतम्
महार्थ० = महार्थोदयः
महे० = महेश्वरानन्दः
महे० सू० = महेश्वरानन्दसूक्तम्
मा० पु० = मार्कण्डेयपुराणम्
मा० वि० = मालिनीविजयोत्तरम्
मा० स्तो० = मातङ्गीस्तोत्रम्
मु० के० = मुकुन्दकेलिः
मो० = मोक्षोपायः
या० स्मृ० = याज्ञवल्क्यस्मृतिः
यो० हृ० = योगिनीहृदयम्
र० दे० = रत्नदेवः
र० मा० = रत्नमाला
रसा० = रसान्वयः
रा० भ० = राजराजभट्टारकः
रा० सू० = राजभैरवसूत्रम्
ल० त० = लक्ष्मीतन्त्रम्
ल० बृं = लघुबृंहणी
ल० स्त० = लघुस्तवः
वा० रा० = वाल्मीकीयरामायणम्
वा० सं० = वाजसनेयसंहिता
वि० उ० = विज्ञानोदयः
वि० कौ० = विज्ञानेन्दुकौमुदी
वि० प० = विरूपाक्षपञ्चाशिका
वि० भै० = विज्ञानभैरवः

विष० प० = विषयपञ्चिका
वी० वा० = वीरवामनक:
श० दी० = शम्भ्वैक्यदीपिका
श० म० = शचीमतम्
शा० दी० = शाम्भवदीपिका
शि० दृ० = शिवदृष्टि:
शि० ध० = शिवधर्म:
शि० सू० = शिवसूत्रम्
शि० स्तो० = शिवस्तोत्रावली
श्री० सं० = श्रीकण्ठीयसंहिता
स० ज्ञा० = सर्वज्ञानोत्तरम्
स० प० = समाधिपञ्चदशी
स० भ० = सर्वधीरभट्टारक:
सा० प० = साम्बपञ्चाशिका
सा० शा० = सारशास्त्रम्
सि० प० = सिद्धसिद्धान्तपद्धति
सि० = सिद्धान्त:
सि० म० = सिद्धामतम्

सु० = सुभगोदय:
सु० वा० = सुभगोदयवासना
सू० सं० = सूतसंहिता
सौ० स्तो० = सौभाग्यहृदयस्तोत्रम्
सं० प्र० = संवित्प्रकाश:
सं० सि० = सम्बन्धसिद्धि:
सं० स्तो० = संवित्स्तोत्रम्
संवि० = संविदुल्लास:
स्त० चि० = स्तवचिन्तामणिर्भट्ट-नारायणकृति:
स्तो० भ० = स्तोत्रभट्टारक:
स्प० का० = स्पन्दकारिका
स्प० नि० = स्पन्दनिर्णय:
स्प० स० = स्पन्दसन्दोह:
स्व० त० = स्वच्छन्दतन्त्रम्
ह० च० = हर्षचरितम्
हं० भे० = हंसभेद:

परिमलव्याखेतील वचनांची श्लोकार्धानुक्रमणिका

*****

*****

परिमलव्याख्येतील विशिष्ट शब्द

******

******

परिमलव्याख्येत उद्धृत केलेले वाद

*****

*****

श्रीमहार्थमञ्जरी

✡ साररूप विषय ✡

"श्रीमहार्थमञ्जरी" या ग्रंथाचे सार "क्रमदर्शन" या एका शब्दातच साठविलेले आहे; कारण निर्विकल्प परमतत्त्व-ज्ञानरूप श्रीशिवशक्तिसामरस्याचा उपाय सर्व विकल्प दूर करणे हाच आहे. हे सर्व संस्कार सिद्धयोगसाधनाने म्हणजेच श्रीसद्गुरुकृपेने अर्थात् श्रीसद्गुरूंनी दिलेल्या शक्तिपातयोगदीक्षेने जागृत झालेल्या अनादिनिद्रिस्थ आत्मचैतन्य कुंडलिनी शक्तीच्याद्वारा आपोआप होणाऱ्या सिद्धयोगसाधनाने ती सुषुम्नागामी झाल्यावर विगलित होत असल्यामुळे क्रमाक्रमाने म्हणजेच हळूहळू विलीन होतात. ही प्रक्रिया एकदम किंवा अचानक होत नाही. त्यामुळे सिद्धयोगाचे नाव क्रमदर्शन असे झाले आहे. एका अर्थाने महायोगी श्रीसिद्धगोरक्षनाथ यांनी सिद्धयोगरूप क्रमदर्शनाचा व तदंगभूत क्रमपूजा, क्रमसिद्धी आणि क्रमज्ञान यांचा विविध अंगांनी, रहस्यमय रीतीने व विश्लेषणात्मक पद्धतीने सांगोपांग विचार या ग्रंथात प्रस्तुत केला आहे व यातील सर्व रहस्ये साक्षेपाने उलगडून दाखविली आहेत, असे म्हटले तर यत्किंचितही अतिशयोक्ती होणार नाही.